M2117

BF 1651 .K8

Magazine : kundali vignan : ank : 16

Rasik Mehta

Rs2.00

7BF
1651
K8-8

SMT. HANSA MEHTA LIBRARY
The Maharaja Sayajirao University
of Baroda
Call No. 7BF
1651
K8-8
M. 2117

Gift
Date 21-5-59
Initial hru
M. 2117.
Rs:

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम् ।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥ 'भवभूति'

पुस्तक ८ वें.] आश्विन कृ० २, रविवार [अंक २६ वा

फलज्योतिष.

[प्रो. रामकृष्ण सखाराम आठवले. वि. ज्ञा. वि. वरून.]

[१]

फलज्योतिषाचा उगम अगदीं प्राचीन काळीं झाला आहे, किंबहुना, तो मनुष्याच्या इहलोकच्या अवताराच्या समकालीन आहे. ज्याप्रमाणें इतर शास्त्रांचा उगम आर्यावर्तांत झाला आहे त्याचप्रमाणें ज्योतिषशास्त्राचा उगमही आर्यावर्तांत प्रथम झाला, असें ह्मणण्यास सबल प्रमाणें आहेत.

आतां इतकें खरें कीं, आर्यावर्तांतील ज्योतिषांत कालेंकरून मिसर युनान, चीन व अरबस्थान या देशांतील ज्योतिषाची भर पडली आहे. परंतु या शास्त्राचें परिशीलन व प्रगति जितकी आर्यावर्तांत झाली आहे तितकी इतर देशांत झालेली नाहीं. कालचक्राच्या गतीनें जशी इतर सर्व शास्त्रांची वाढ खुंटली आहे तशीच ज्योतिषशास्त्राची वाढ आर्यावर्तांत खुंटली आहे. शास्त्राच्या प्रगतीस अवलोकन व संचालन या दुकलीची सदोदित आवश्यकता आहे. परंतु या दोन बाबतींत, कांहीं अंशीं राजाश्रयाच्या अभावानें व कांहीं अंशीं आमच्या शास्त्रांच्या निरुत्साहवृत्तीनें, अत्यंत शिथिलता आली आहे.

या फलज्योतिषशास्त्रावर अनेक प्रकारचे आक्षेप घेतले जातात. एक अक्षेप असा आहे कीं, हें शास्त्रच नव्हे, निवळ थोतांड आहे-

भोळसर लोकांची कल्पना आहे. मनुष्य आरंभीं अज्ञान स्थितींत होता त्यावेळीं त्याला सृष्टीचे नियम अवगत नव्हते, परंतु सृष्टींत जे चमत्कार घडतात ते कांहीं तरी योग्य कारणांनीं घडतात या सिद्धांतावर—अर्थात् कार्यकारण संबंधावर—त्याची अत्यंत निष्ठा असल्यानें त्यानें नियमांची कल्पना केली, ती कल्पना अनुभवाशीं ताडून न पाहतां व त्या कल्पनेचें योग्य परीक्षण न करतां—योग्य प्रमाणांची अपेक्षा न करतां-तो ती खरी मानून चालला; व अशा प्रकारें या काल्पनिक [मिथ्या] शास्त्राचा उगम झाला आहे. अर्थात् याला अनुभवाचा पाया नाहीं, याला युक्ति अथवा विचाराचें पाठबळ नाहीं. सर्वथैव काल्पनिक, ह्मणून अनुभवास न येणारें असें हें शास्त्र आहे. यदाकदाचित् अनुभवाशीं मिळालेंच तर तें केवळ 'काकतालीय' न्यायानें, वस्तुतः त्या नियमांचा व जगांतील घडामोडीचा कांहीं संबंध नाहीं;—अर्थात् असें शास्त्रच असूं शकत नाहीं. दुसरा आक्षेप असा आहे कीं, या शास्त्रांतील नियम अनुभवास येत असले तरी त्यांची परस्पर संगति न दाखविल्यानें या नियमांस "शास्त्र" ही संज्ञा प्राप्त होत नाहीं. तिसरा आक्षेप असा आहे कीं, असें शास्त्र खरें असूं शकेल व त्याप्रमाणें तें आहे असें मानलें, तरी त्याचा जगांतील व्यवहारांत उपयोग नाहीं. कारण या शास्त्रांतील मुख्य प्रमेय असें आहे कीं, ग्रहांच्या गतिस्थितींवर जगांतील घडामोडी अवलंबून आहेत. अर्थात् मानवी घडामोडी ह्या सर्व ग्रहांच्या गतिस्थितींवर सर्वस्वी अवलंबून आहेत, व त्या गतिस्थिति तर पूर्णपणें नियमबद्ध आहत. हे नियम त्रिकालाबाधित व सार्वत्रिक आहेत, त्यामुळें विवक्षित काळीं ग्रहांची विवक्षित स्थिति असणार, व त्या स्थितींवर मानवी घडामोडी अवलंबून असल्यानें त्या स्थितींत आणुरेणू इतका फरक करणें मनुष्याच्या हातीं नाहीं;—अर्थात् मनुष्याला स्वातंत्र्य नसल्यानें त्याला कर्तव्य अथवा प्रयत्न उरत नाहीं. तेव्हां प्रत्येक घडामोड जर पूर्वीपासून नियत होऊन चुकली आहे व तींत आपणास मुळींच फरक करतां येत नाहीं, तर या शास्त्राचा अभ्यास करण्यापासून व्यवहारांत त्याचा काय उपयोग ? जें होणार तें सर्व ठरून चुकलेलें, तर अमुक वेळीं

अमुक होईल हें कळलें काय अथवा न कळलें काय सारखेंच. या प्रकारचे अनेक आक्षेप या फलज्योतिषावर येतात. या सर्व आक्षेपांचें यथासांग शास्त्रीयरीत्या निरसन करणें जरी साध्य व इष्ट असलें तथापि त्या कामास हें स्थल योग्य नव्हे. अन्य स्थळीं याचा विचार करतां येईल.

आज आपणास विचार करावयाचा तो इतकाच कीं, हल्लीं आपली परिस्थिति कशी आहे-आपले व्यवहार कसे चालले आहेत—त्यास या शास्त्राची अपेक्षा आहे किंवा नाहीं ह्याचा विचार केल्यास असें दिसून येईल कीं, आपल्या देशांत बहुतेक लोकांचा या शास्त्रावर दृढ विश्वास आहे. कित्येकांस दृढ विश्वास नसला तरी तो त्याच्या अंगीं अल्प प्रमाणानें तरी असतो. कित्येकांस विश्वास नसतो तरी विश्वास असून जसे इतरांचे व्यवहार चालतात तसेच त्यांचेही चालतात. अर्थात् लोकव्यवहार फलज्योतिषावर बऱ्याच अंशीं अवलंबून आहे ही गोष्ट कबूल करावी लागते. कित्येकांची वागणूक दृढ विश्वासानें होते, तर कित्येकांची व्यवहार अडूं नये ह्मणून होते, कित्येक उघड रीतीनें श्रद्धा आहे असें दाखवून वर्तणूक ठेवतात. तर कित्येकांस आपली श्रद्धा चारचौघांत उघडपणें व्यक्त करण्याचें धैर्य नसल्यानें ते वादविवादांत व संभाषणांत अश्रद्धा दाखवितात. परंतु अंतर्यामी आदर असल्यानें व्यवहार त्या धोरणानें चालवितात. तात्पर्य इतकेंच कीं, आपल्या व्यवहारांत फलज्योतिषाचें बरेंच प्राबल्य होऊन बसलें आहे. तेव्हां या शास्त्राच्या नियमांचा अभ्यास, अनुभव व चालना होणें इष्ट आहे.

पाश्चिमात्यांनीं अलीकडे ज्ञानाची व शास्त्रांची मोठी प्रगति चालविली आहे. अशा उद्योगशील, ज्ञाननिष्ठ लोकांमध्यें फलज्योतिषाचें महत्व कमी झालें आहे ही गोष्ट खरीआहे. परंतु मुळींच नाहींसें झालें आहे असें मात्र नाहीं. कोणाची जर अशी कल्पना असेल कीं, फलज्योतिष हें शास्त्र जुनें व पोकळ ठरून त्याविषयीं पाश्चिमात्यांस आदर वाटेनासा झाला असावा, तर ती कल्पना चुकीचीआहे. अलीकडे या शास्त्राचें पुनरुज्जीवन होत आहे. तिकडील विद्वानांचा व लोकांचा या विद्येविषयीं आदर वाढूं पाहत आहे. या शास्त्राच्या अध्ययनाकडे त्यांची प्रवृत्ति वाढत आहे. शोध चालू आहेत, शास्त्रीय व्यवस्थित-

पणा आणण्याची खटपट चालू आहे. आपली श्रद्धा कितीही जबर असो-आपलें ज्ञानभांडार कितीही असो-परंतु आज आपले प्रयत्न शिथिल झाले आहेत. त्या लोकांच्या शोधक बुद्धीची, व्यवस्थित व अश्रांत प्रयत्नांची आपणास वार्ताही नाहीं. तिकडे फलितावर व्याख्यानें होत आहेत, त्याच्या अध्ययनासाठीं व प्रसारासाठीं मंडळ्या स्थापन झाल्या आहेत, मासिक पुस्तकें आहेत, फलिताची चर्चा चालू आहे, व अनुभवाचें एकीकरण चालू आहे. याप्रमाणें पाश्चिमात्य लोकांत या शास्त्राचें परिशीलन व परीक्षण चालू आहे. याउलटपक्षीं आपलेकडे असला प्रयत्न करणें योग्य आहे असें दिसून येईल.

घटकाभर असेंही मानलें कीं, या शास्त्राची सत्यता अद्याप निर्विवाद अथवा अबाधित रीतीनें सिद्ध झाली नाहीं, अथवा अनुभवास आली नाहीं—किंबहुना या शास्त्राचा पाया अगदीं कच्चा अथवा खोटा आहे असेंही मानलें-तरी आपणास त्याचें परीक्षण करणें अवश्य आहे. लोकादराविषयीं व सत्यतेविषयीं या शास्त्राचा इतका जुना हक्क आहे व त्याचा प्रभाव व प्रसार इतका विस्तृत आहे कीं, याग्य प्रमाणांवांचून व परीक्षणावांचून या शास्त्राचें उच्चाटन करणें इष्ट असलें तरी तें करतां येणार नाहीं. तेव्हां या शास्त्राच्या सत्यासत्यतेचा शोध केल्यावांचून गत्यंतर नाहीं. या परीक्षणांत त्याची सत्यता व्यक्त झाली तर ठीकच, असत्यता प्रत्ययास आली तरी ठीकच कारण, ज्या शास्त्रानें लोकव्यवहारास ग्रासून टाकलें आहे व भारून टाकलें आहे. तें सत्य ठरलें तर लोकादर वाढून त्याचें परिशीलन होईल व तें उपयुक्त होईल. खोटें ठरलें तर जगास भ्रमाच्या तडाक्यांतून मोकळें केल्याचें श्रेय येईल. तात्पर्य, उभयपक्षीं फलज्योतिषशास्त्राची तपासणी अथवा परीक्षण होणें अत्यंत इष्ट आहे.

आतां हें परीक्षण कोणकोणत्या दिशेनें केलें पाहिजे, पूर्वी झालें असल्यास कसें झालें आहे, व त्यांत अडचणी कोणत्या व त्या कशा दूर करतां येतील, याचा आतां विचार करूं.

वरील लेखांत फलज्योतिष शास्त्राचें परीक्षण करणें अवश्य आहे असें दाखविलें. हें परीक्षण कोणत्या रीतीनें करतां येणें शक्य आहे

व तें पूर्वी कधीं कोणी केलें असल्यास तें कसें केलें आहे, त्यांत कितपत यश मिळालें आहे, त्यांत प्रत्यवाय कोणते आले, व आज ते दूर कसे करतां येतील, हें आतां पाहूं.

कोणत्याही शास्त्राचें परीक्षण दोन प्रकारें करतां येतें. त्या शास्त्रांतील प्रमेयें व नियम यांची उपपत्ति व संगति लावणें हा त्यांपैकीं एक प्रकार. यांत कांहीं ठरीव व स्वतःसिद्ध (स्वतः प्रमाण) अशा थोडक्या मूळ तत्त्वांवर सर्व प्रमेयांची व नियमांचीं उभारणी झाली आहे असें दाखवावें लागतें. अर्थात् मूलतत्त्वें ग्राह्य झालीं कीं त्यांवर अवलंबून असणाऱ्या सर्व प्रमेयांची व नियमांची उपपत्ति व संगति ओघानें प्रत्ययास येते. त्यांतल्या त्यांत हीं मूलतत्त्वें एकाद्या भौतिक शास्त्रांतिल प्रमेयांवर अवलंबून आहेत असें जर दाखवितां आलें तर तीं अलीकडील शास्त्रज्ञांस विशेष ग्राह्य वाटूं लागतात.

जरी भौतिक शास्त्राशीं सांगड लावतां न आली तरी निदान वर लिहिल्याप्रमाणें कांहीं तत्त्वें अथवा कल्पना बसविणें अवश्य असतें. ही कल्पना बहुधा प्रथम भूयोदर्शनानें बसविलेली असते. प्रथम कल्पना मांडून त्यावरून सर्व शास्त्राची उभारणी करणें हें काम मोठें बिकट आहे. तथापि कित्येक शास्त्रांचे शास्त्रत्व अद्याप या रीतीनें सिद्ध केलें नसून तीं लोकांस शास्त्रें म्हणून मान्य झालीं आहेत. तर तसा प्रकार फलज्योतिष शास्त्राचा आहे यांत कांहीं नवल नाहीं.

कित्येक प्रसंगीं भूयोदर्शनानें बसविलेली कल्पना चुकीची असूनही या कल्पनेच्या आधारें काढलेलीं अनुमानें मात्र अनुभवास येणारीं असतात. ग्रहांच्या गतीविषयीं टॉलमीची कल्पना आज चुकीची ठरली आहे व कोपर्निकस व केप्लर यांची कल्पना खरी ठरली आहे. तथापि ग्रहणें, ग्रहांच्या स्थिति, युति इत्यादि प्रत्यक्ष दिसणाऱ्या गोष्टींचें टॉलमीच्या कल्पनेवर रचलेल्या गणिताधारें भाकित

करतां येतें. आपले देशांत ग्रहांच्या गतीविषयीं जी कल्पना गृहीत धरली आहे ती जरी टॉलमीच्या कल्पनेशीं तंतोतंत जुळत नसली तरी त्या दोहोंत मोठें साम्य आहे. या कल्पनेच्या आधारें गणित करून ग्रहांच्या ग्रहण युत्यादिकांविषयीं भाकितें आपले सिद्धांतज्योतिषी करीत असतात तीं साधारणपणें प्रत्यक्षाशीं जुळतात. परंतु कोपर्निकसाची कल्पना, किंवा केप्लरनें बसविलेले नियम, अथवा न्यूटननें गणितशास्त्रद्वारें केलेली उपपत्ति, यापैकीं एकाचीही वार्ता टॉलमीस अथवा आपलेकडील ज्योतिषी यांत नसते. बसविलेली कल्पना चुकीची ह्मणजे निसर्गाशीं तंतोतंत जुळणारी नसली, तरी तिच्या योगानें जें भाकित होऊं शकतें तें जर अनुभवाशीं मिळेल तर ती कल्पना शास्त्राला आधारभूत मानण्यास काहीं प्रत्यवाय नाहीं तेव्हां खरें महत्व अनुभवास आहे, मूळभूत कल्पनेस तितकें नाहीं. भाकित अनुभवास जुळत असलें ह्मणजे कल्पना ग्राह्य ठरते. यासाठींच **परिक्षणाचा दुसरा प्रकार** अथवा मार्ग हा आहे कीं, अनुभवाशीं भाकितांचा मेळ पाहून नियमांचा खरेखोटेपणा ठरविणें हा मार्ग उपयुक्त, साध्य व सर्वमान्य असून साधारण मनुष्यासही पटणारा आहे. सारांश, उपपत्ति व संगति लावण्याच्या कामीं भूयोदर्शनादिद्वारा मूळतत्वांविषयीं कल्पना रचणें हें प्रत्येक शास्त्रपरीक्षणांत महत्त्वाचें आहे. त्या कल्पनेचा आधार भौतिक शास्त्राबर असला तर ती विशेष ग्राह्य होते. परंतु तिला तसा पाया नसला व ती निव्वळ कल्पनाच असली तरी देखील ती शास्त्रदृष्ट्या ग्राह्य ठरते. मात्र त्या कल्पनेच्या आधारें केलेलीं अनुमानें किंवा भाकितें अनुभवाशीं मिळालीं पाहिजेत. तीं तंतोतंत मिळालीं पाहिजेत असें देखील नाहीं. कारण, व्यवहारांत येणारें कोणतेंही शास्त्रीय प्रमेय अनुभवाशीं तंतोतंत मिळणें दुरापास्त असतें.

तेव्हां ज्योतिषशास्त्राचें परीक्षण करण्याच्या दोन प्रकारांपैकीं प्रथम प्रकार जरी अवघड असला तरी दुसरा ग्राह्य व सुलभ असल्यानें निदान त्याचा तरी आपल्या देशांत विचार होणें अवश्य आहे.

अंगोदर भाकित करून मग त्याचा अनुभवाशीं मेळ बसला तर शास्त्रावर विश्वास जास्त बसतो, हें खरें. परंतु उलट प्रकार-ह्मणजे प्रथम अनुभव नोंदून तोच अनुभव शास्त्रांतील अनुभवाशीं जुळतो असें दाखविणें, अर्थात् शास्त्रप्रमेयें गृहीत धरून अनुभवाची त्या आधारें उपपत्ति लावणें हाही एक शास्त्रपरीक्षणाचा तिसरा प्रकार आहे. परंतु तो गौण आहे. त्यांत कधीं कधीं जुळवाजुळवी करून घेण्याची मनाची साहाजिक प्रवृत्ति असते, यामुळें कधीं कधीं साधक गोष्टींचाच विचार होतो; बाधक गोष्टीकडे दुर्लक्ष्य होतें. तेव्हां या प्रकारें झालेल्या परीक्षणाचें महत्व पुष्कळांस वाटत नाहीं. तथापि हा प्रकार ह्मणजे अयाग्य किंवा निरुपयोगी आहे असें मात्र समजतां कामा नयें. कारण आजकाल जीं प्रचलित शास्त्रें आहेत त्यांची प्रगति या मार्गानेंच होत आहे. याचें कारण असें आहे कीं, व्यवहारांत एक कार्य होण्यास अनेक कारणें असतात; परतु दरएक शास्त्रांत बहुधा एकेका कारणाचाच विचार लागतो. त्यामुळें इतर कारणें त्या शास्त्राच्या कक्षेंतील नसल्यानें त्यांचा समावेश किंवा परीक्षण त्या शास्त्रास करतां येतच नाहीं. तात्पर्य, मागाहून उपपत्ति लावून घेणें हा शास्त्रशोधनाचा मार्ग ग्राह्य आहे, व हाच मार्ग मोठमोठ्या शास्त्रांत पतकरलेला आहे.

परंतु हा मार्गही वर सांगितल्याप्रमाणें थोडा दूषित आहे. एका कारणापासून अनेक कार्यें होतात, तेव्हां अमुकच कार्य होईल असें सांगण्याचें धाडस शास्त्रज्ञ करीत नाहीं. परंतु अमुक कार्यापैकीं कांहीं तरी होईल असें ह्मणून जर तो स्वस्थ बसेल तर त्याजवर

"मौघम बोलण्याचा" अथवा दुटप्पीपणाचा दोष येतो, व लोकांचें समाधान होत नाहीं. तेव्हां शास्त्रज्ञास व्यवहारांत कांहीं धोरणाचा स्वीकार करावा लागतो. व त्याच्या आधारावर—संभव पाहून—अनेक परिणामांपैकीं एकच सांगण्याचा त्याजवर प्रसंग येतो, व तसा अनुभव न आल्यास मागाहून अन्य प्रकारें उपपत्ति लावणें त्यास भाग पडतें. श्रद्धा असली ह्मणजे अशी उपपत्ति समाधानकारक मानली जाते. परंतु तिचा अभाव असला ह्मणजे मात्र समाधान होऊं शकत नाहीं. ह्मणून या प्रकारापासून शास्त्रप्रसारास विशेष मदत होऊं शकत नाहीं.

उपपत्ति लावण्याचे कामीं अगदीं प्राचीन काळीं, ह्मणजे ज्यावेळीं ज्योतिःशास्त्राची प्रथम रचना होऊं लागली त्यावेळीं, ज्योतिषशास्त्रप्रणेत्यांनीं कांहीं तत्त्वें ठरविलीं होतीं. परंतु तीं भूयोदर्शनानें अनुभवावरून ठरविलीं होतीं, किंवा कांहीं दिव्य साधनानीं ठरविलीं होतीं हें आज सांगतां येणें कठीण आहे. आज आपण योगादि दिव्य शास्त्रांचा सार्वत्रिक अभ्यास सोडून दिला असल्यानें त्या शास्त्राची परंपरा नष्टप्राय झाली; व त्यामुळें दिव्य दृष्टीनें कांहीं तत्त्वें कळूं शकतात या गोष्टीवर आपला विश्वास बसूं शकत नाहीं. इतक्या प्राचीन काळीं भौतिक शास्त्रांत लोकांची प्रगति झाली होती असें मानण्यासही आपण तयार नाहीं. आजकालच्या भौतिक शास्त्राच्या प्रगतीचा इतिहास पाहतां त्यांत क्रमिक उन्नति दिसून येते. तशा क्रमिक उन्नतीचा इतिहास प्राचीन काळासंबंधानें उपलब्ध नसल्यानें त्याकाळीं भौतिक शास्त्रांची उन्नत्ति झाली असावी असें मानणें आपणास जड जात आहे. कसेंही असो, हल्लींच्या काळांत जशी भौतिकशास्त्रांच्या आधारानें आपल्या प्रत्येक अनुभवाची उपपत्ति लावली जात आहे तशी तरी निदान प्राचीन काळीं लाविली गेली

होती असें दिसत नाहीं. अर्वाचीन काळांत या शास्त्रावर अनेक ग्रंथ लिहिले गेले आहेत. परंतु त्यांत उपपत्तीचा लेशही दिसून येत नाहीं. किंबहुना, चिकित्सक बुद्धीनें एकही ग्रंथ ज्योतिषावर लिहिलेला आढळत नाहीं पश्चिम खंडांत अलीकडे ज्याप्रमाणें फलज्योतिषाची भौतिक शास्त्राशीं सांगड घालण्याचे प्रयत्न चालू आहेत, तसे प्रयत्न आपल्या देशांत होणें अवश्य असून ते होत नाहींत हें दुर्दैव आहे. परंतु असे प्रयत्न झाले नाहींत, किंवा होणें दुर्घट असलें, तरी निदान या शास्त्रास आधारभूत अशी कांहीं कल्पना बसविली पाहिजे.

ज्योतिष शास्त्रावरील आपले प्राचीन सर्वमान्य ग्रंथ पाहतां असें दिसून येतें कीं, त्यांच्या मूळाशीं कांहीं कल्पना आहे. ही कल्पना कशी आली? ती दिव्य दृष्टीनें अथवा साक्षात्कारानें आली असो, किंवा भूयोदर्शनानें आली असो, त्या प्रश्नाचें विशेष महत्त्व नाहीं. कारण, आजकाल सर्वमान्य झालेल्या कित्येक शास्त्रांच्या औपपत्तिक प्रश्नाचा निकाल अद्याप होऊं शकत नाहीं तरी तीं शास्त्रें मानलीं जात आहेत. अस्तु, ती कल्पना कोणती आहे हें मात्र आज स्पष्ट सांगतां येणें कठिण आहे. वर सांगितलेंच आहे कीं बसविलेली कल्पना निसर्गतुल्य नसली तरी कांहीं हरकत नाहीं. मात्र त्या कल्पनेवरून निघणारीं अनुमानें व भाकितें अनुभवाशीं जुळलीं पाहिजेत. ह्मणून निदान शास्त्राचें परीक्षण अनुभवानें तरी केलें पाहिजे, अनुभवानें शास्त्राचें परीक्षण करण्याचा मार्ग सर्वसाधारण लोकांस सुगम व मान्य असतो. व त्यामुळेंच असे अनुभव पाहण्याचें काम आपलेकडे सदोदित चालू असतें. जो तो आपले ग्रह कसे आहेत, आपणास कोणतीं सुखदुःखें येणार आहेत, हें आपापलेपरी पाहत असतो. अनुभव आला तर ज्योतिषशास्त्र व ज्योतिषी यांजवर श्रद्धा बसते ; न आल्यास असलेली श्रद्धा उडून जाते. याप्रमाणें व्यक्तिशः अनुभव घेण्याचें काम चालू आहे. परंतु या परीक्षणास शास्त्रीय किंवा व्यवस्थित परीक्षण ह्मणतां येणार नाहीं. एक एका व्यक्तीच्या अनुभवावर सर्वांचा विश्वास—सार्वजनिक विश्वास;

—बसूं शकत नाहीं. कारण त्यांच्यामध्यें कमींतकमी श्रद्धेपासून तों मूढ विश्वासापावेतों क्रम असतो. त्यामुळें अशा अनुभवाचें महत्त्व कमी असतें. अशा अनुभवाचें एकीकरण झालें पाहिजे. तरच शास्त्रीय परीक्षणास मदत होईल, असें एकीकरण कोणी कोठें सप्रमाण व व्यवस्थितपणें केलेलें दिसत नाहीं. प्राचीनकाळीं असें एकीकरण होत असावें, असें अनुमान होऊं शकतें. कारण निरनिराळ्या आचार्यांचीं निरनिराळीं मतें आढळतात. यावरून त्या वेळीं अनुभवाचें एकीकरण करून प्रत्येक आचार्य आपआपल्या माहितीप्रमाणें अथवा अनुभवाप्रमाणें अनुमानें काढून नियम बसवीत असला पाहिजे. अलीकडील ग्रंथांत तर तोही प्रकार नाहीं. आचार्यांच्या मतांचा संग्रह मात्र या ग्रंथांत केलेला असतो. त्यावर सप्रमाण टीका अथवा अभिप्राय किंवा उहापोह मुळींच आढळत नाहीं. फार तर काय? 'प्रमाण' याचा देखील 'ग्रंथवचन' असा अर्थ होऊन बसला आहे. तात्पर्य, स्वतःच्या किंवा इतरांच्या अनुभवाचें आविष्करण न करतां सारभूत सिद्धांत देण्याकडे पूर्वी जी प्रवृत्ति होती तीही नाहींशी होऊन केवळ 'वचनोद्धारा' पलीकडे या ग्रंथांची मजल जात नसते. व कदाचित् गेलीच तर ती पूर्वाचार्यांनीं केलेल्या रूपकांचा योग्यायोग्य अतिदेश करण्याकडे. पूर्वी ज्या लोकांनीं मूळभूत कल्पना बसविली ती सुबोध व स्मृतिगम्य करण्यासाठीं त्यांनीं त्या कल्पनेचें किंवा तत्त्वांचें वर्णन रूपकें योजून केलें. परंतु असलीं रूपकें जेव्हां चिकित्साशून्य लोकांच्या ताब्यांत आलीं व मूलतत्त्वपरंपरा नष्ट झाली तेव्हां रूपकें दांडगीं होऊं लागलीं. मूलतत्त्व एकीकडे राहून केवळ रूपकच मुख्य होऊन बसलें प्रस्तुतावर उपमान किंवा रूपकाचा पगडा बसल्याची या जगांत शेंकडों उदाहरणें आहेत. एकदां रूपकांचा पगडा बसला ह्मणजे मग कल्पनेला आळा राहत नाहीं. कल्पना अमर्यादित झाली कीं रूपकांचा वाटेल तसा अतिदेश होऊं लागतो. उदाहरण, रवीचे गुण, अधिकार व तेजस्विता हें दर्शविण्यासाठीं त्यास "राजा" ह्मटलें. पुढें यांतील इंगित विसरल्यावर, राजास राणी, राजपुत्र, मंत्री, हेर, ध्वज, पताका, भाट, चारण, चोपदार इत्यादि

सरंजाम असतो तो रवीसही असावा ह्मणून, त्या सरंजामाची तरतूद लावण्याच्या कामीं कल्पना कंबर बांधून सज्ज होते. कुंडलींत लग्नापासून तिसरें स्थान भावंडाचें, चवथें मातेचें, सातवें बायकोचें, दहावें पित्याचें, असा अनुभव ठरला कीं पुढें कोणत्याही स्थानापासून तिसरें स्थान त्या स्थानच्या भावंडाचें इत्यादि कल्पना वाढूं लागते; व त्यामुळें परिणाम असा होतो कीं 'मुलांची भावंडें व पत्नी,' 'मातेची माता व पत्नी' "श्वशूर व माता" या जोड्यांचा विचार एकाच स्थानावरून करण्याबद्दल शिफारस होऊं लागते. या रूपकामुळें आणखी एक परिणाम होतो तो असा कीं, मूळ उपपत्तींत कांहीं भौतिक शास्त्राचें प्रमेय असलें तरी तें कालेंकरून लुप्त होतें. याप्रमाणें आपलेकडील ज्योतिष शास्त्राच्या मूलतत्त्वांचा भौतिक शास्त्रांच्या प्रमेयांशीं कांहीं संबंध लुप्त झाला असल्यास आश्चर्य वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. अशा भौतिक चमत्कारांवर कित्येक पौराणिक कथा रचल्या गेल्या आहेत असें मार्मिक पाहणारांच्या सहज लक्ष्यांत येतें. रुद्र व प्रजापतीची कथा, रोहिणीची कथा, कृतिकांची कथा, या आकाशांतील विवक्षित स्थितीवरून रचल्या गेल्या आहेत यांत तिलप्राय शंका नाहीं. परंतु रूपकाच्या दांडगाईनें आज त्या कथांस आकाशस्थितीचा आधार आहे, त्या ऐतिहासिक नव्हत, अशी कल्पना सुद्धां आज आपणास सहन होईनाशी झाली आहे.

हा प्रकार जुन्या ग्रंथांच्या आधारें नवीन अर्वाचीन ग्रंथ लिहिले आहेत त्यांचा झाला. अगदीं अलीकडे ज्योतिष विषयांवर कांहीं (मासिक) पुस्तकें लिहिली गेलीं आहेत व लिहिलीं जात आहेत. त्यांत कांहीं चिकित्सेचा भाग दिसून येतो. नाहीं असें नाहीं. तरी तो थोडा आहे असें ह्मणावें लागतें. दोन चार गृहस्थ हा उद्योग करीत आहेत, तरी तो जितका विस्तीर्ण पाहिजे तितका नाहीं, व तो शास्त्राचें परीक्षण करण्याच्या हेतूनें आरंभिलेला नाहीं. आपापलीं ठाम मतें देणें व त्यांचें स्पष्टीकरण याहून जास्त प्रयत्न केलेला दिसत नाहीं. आपल्या मतांच्या पुष्ट्यर्थ जितका पुरावा अथवा प्रमाणें देण्याची आवश्यकता आहे तितकाही पुरावा त्यांच्या लेखांत दिलेला

आढळत नाहीं. स्वतःच्या अनुभवाचा किंवा विचाराचा निष्कर्ष लिहिण्यापलीकडे कांहीं झालेलें नाहीं. आतां हे लेखक व्यासंगी असल्यानें त्यांच्या अभिप्रायाचें महत्व ज्यास्त आहे यांत कांहीं शंका नाहीं. परंतु ज्यास स्वतः प्रमाणें पाहण्याची इच्छा असते व त्यांवरून आपलें मत स्वतंत्रपणें तयार व्हावें अशी ज्यांस इच्छा असते त्यांस जी प्रमाणसामुग्री पाहिजे ती या पुस्तकांत दिलेली नसते. तात्पर्य सर्वांस उपलब्ध अशा अनुभवाचा संग्रह पाहिजे, तो आजवर कोठें एकत्र झालेला दिसत नाहीं असा संग्रह दोन रीतीनें करतां येईल. ऐतिहासिक पुरुषांच्या कुंडल्यांवरून भाकित करून तें अनुभवाशीं जमतें किंवा नाहीं हें पाहणें; व खात्रीचा जननकालसंग्रह व वृत्तसंग्रह एकत्र करून फलिताचा वृत्ताशीं मेळ पाहणें. कांहीं गृहस्थांनीं पहिल्या प्रकारें प्रयत्न केलेला आहे. परंतु तो फार अल्प प्रमाणावर केलेला आहे. त्याहून तो ज्यास्त विस्तीर्ण पाहिजे. थोड्या अनुभवावरून नियमांची सत्यासत्यता पाहणें, तसेंच नवीन नियम बसविणें, हें शास्त्रीयदृष्ट्या फार धोक्याचें आहे. व आपल्या ज्योतिषशास्त्रांत जर कांहीं अनिष्ट प्रकार झाला असेल तर तो या प्रकारानेंच झाला आहे. गुरु दहाव्या स्थानीं असला ह्मणजे अमुक फल दोन चार वेळ अनुभवास आलें कीं लगेच त्यावरून सार्वत्रिक नियम ठरवून टाकला जातो. असा प्रकार होणें इष्ट नाहीं. अनुमानास पुरे इतकें अवलोकन केल्यावांचून काढलेलें अनुमान अनुभवाअंतीं चुकीचें ठरण्याचा फार संभव असतो. ही सावधगिरी न ठेवल्यानें ज्योतिषशास्त्राचें अवजड अवडंबर बनलें आहे. यांत भर घालण्याची जितकी आवश्यकता आहे त्याहून छाटाछाटी करण्याचीच आवश्यकता विशेष आहे, असें आमचें मत आहे. अस्तु, हल्लीं जीं मासिक पुस्तकें फलज्योतिषावर आपलेकडे निघत आहेत त्यांचा उद्योग स्तुत्य आहे असें ह्मणतां येईल. तरी तो शास्त्रीय परीक्षणाच्या कामीं मदत देण्यासारखा नाहीं. कारण, त्यांतील विषयम लिका प्रायः अशी असतेः—१ कोणत्या तरी जुन्या ग्रंथाचें भाषांतर (त्यावर चिकित्सक टिपा बहुधा नसतात); २ चारित्रविरहित कुंडल्या; ३ व्यंगद्योतक अथवा विलक्षणपणा दाखविणाऱ्या कुंडल्या; [परंतु त्या कुंडल्यांच्या विश्वसनीयतेविषयीं खात्री नसते.]; ४ ज्योतिष शास्त्राची माहिती: [परंतु त्याच्या नियमांची संगति लावण्याचा प्रयत्न बहुधा क्वचितच आढळतो]: ५ थोडीबहुत उपपत्ति व किंचित्सा असते. परंतु त्यांत केवळ स्वतःचा अनुभव अगर विचाराचा निष्कर्ष दिलेला असतो. कोणत्या प्रमाणांवरून व अनुभवावरून निष्कर्ष काढला गेला आहे त्याचा क्वचित्च उल्लेख आढळतो. इतरांस स्वतः तपासणी करितां येईल अशी माहिती दिलेली नसते. आपण ठरविलेल्या सिद्धांताचे शेरे ठिकठिकाणीं आढळतात. परंतु त्या शेऱ्यांची तपासणी करण्याचीं साधनें क्वचितच आढळतात. कित्येक वेळीं तर घटकेंत सायन पक्षास अनुसरून तर घटकेंत निरयन पक्षास अनुसरून फळें सांगितलीं असतात. या प्रकारें घरसोड दिसून येते. सर्व नियम, सर्व पद्धति,—मग त्या परस्पर संगत असोत अथवा विसंगत असोत त्या सर्वांचा युगपत् स्वीकार व कधीं कधीं एक पक्षानें काम न भागलें [ह्मणजे भाकित न जुळलें] तर दुसऱ्या पक्षानें जुळवून घेणें, असाही प्रकार आढळतो. तात्पर्य, एक मोठें ज्ञानभांडार तयार केलें जातें,—विश्वसंग्रह करण्याचा प्रयत्न होतो. परंतु त्यांत चोखपणा विश्वसनीय आधार अथवा निवडानिवड यांचा बराच अभाव असतो. त्यामुळें सत्यशोधनाविषयीं बरीच उदासीनता व्यक्त होते, व शास्त्रीय परीक्षणास या प्रचंड सामुग्रीचा ह्मणण्यासारखा उपयोग होऊ शकत नाहीं.

ऐतिहासिक पुरुषांच्या कुंडल्यांवरून ज्योतिष शास्त्राची सत्यासत्यता ठरविण्यांत एक मोठी सोय असते; अशा पुरुषांचें चरित्र सुप्रसिद्ध असतें, त्यांत संशय घेण्यास जागा नसते. परंतु जरी त्यांचीं चरित्रें सर्वांस उपलब्ध असलीं तरी भाकिताच्या आधाराविषयीं शंकेला जागा उरतेच. जरी हे पुरुष इतिहास प्रसिद्ध असले तरी त्या सर्वांची प्रसिद्धि जन्मतः नसते. ते त्यांच्या कर्तृत्वानें नांवारूपास आलेले असतात. तेव्हां त्यांच्या जन्मकाळीं जननकाळ नीट रीतीनें नोंदून ठेवण्याची तजवीज झालेली नसते. त्यामुळें कुंडलीविषयीं खात्री नसते. व या प्रकारें जर आधारच संशयग्रस्त अथवा वादग्रस्त

असला तर मग त्यावरील उभारलेल्या इमारतीवर किती भरंवसा ठेवणें शक्य आहे हें वाचकांनींच पहावें. श्री सयाजीराव गायकवाड हे आज सुप्रसिद्ध व कर्त्या पुरुषांपैकीं आहेत, व त्यांचें उदात्त चरित्र सर्व जगापुढें आहे. पाहिजे तर त्यांची दिनचर्याही मिळवून प्रसिद्ध करतां येईल. परंतु त्यांची ह्मणून जी कुंडली हल्लीं प्रसिद्ध आहे ती खरी कशावरून? फलज्योतिष खरें व त्यांतील नियम खरे अशा कल्पनेवर अदमासानें कुंडली बसवून त्यावरून पुढील भाकित केलें जाणार असें भाकित अनुभवाशीं मिळालें तर त्याचें महत्व शास्त्रदृष्टया मुळींच नाहीं असें नाहीं. परंतु श्रद्धात्मक दृष्टीनें पाहील त्यास त्याची किंमत. श्रद्धा नाहीं अशांची श्रद्धा बसण्यास कांहीं उपयोग नाहीं. तात्पर्य, भाकित करण्याचें साधन पत्रिका व तिचा आधार मुख्यत्वें जन्मकाळ. त्याविषयीं जर शंका राहिली किंवा शंकेस आस्पद मिळालें तर अशा पत्रिकांपासून व चरित्रांपासून शास्त्रीय परीक्षणास फारशी मदत होईल असें नाहीं. जननकाळ जर खात्री वा मिळला तर एक आधार पक्का होईल, परंतु तेवढ्यानेंच कांहीं कार्य भागत नाहीं. ज्याचा जननकाळ पक्का मिळाला आहे त्याचेंच चरित्रही उपलब्ध झालें पाहिजे, व तें प्रसिद्ध पाहिजे. निदान प्रसिद्ध करतां येण्याजोगें पाहिजे. परंतु या प्रकारें जननकाळ व जातवृत्ताची तरतूद चांगली आधारशुद्ध लागली तरी तेवढ्यानें आपलें काम भागणार नाहीं. आपलेकडे ज्योतिषी लोक पत्रिका करतात त्यांत इष्टकाल साधन. व त्यावरून लग्नसाधन व ग्रहस्पष्टीकरण हीं अंगें मुख्य असतात. परंतु हें काम व्हावें तितकें चोख होत नाहीं. इष्टकालसाधनांत कांहीं ज्योतिषी चुक्या करतात असें अनुभवास आलें आहे. मार्मिकपणें ज्यांचा अभ्यास झाला आहे त्यांची गोष्ट निराळी. परंतु असा अभ्यास व अधिकार शेंकडा दहा पांचांसच असतो. पुनः दिलेल्या इष्टकालांत आपल्या मतें जो फेरफार करणें इष्ट वाटतें तो करून घेऊन मूळ कालाचा मागमूसही उरूं न देण्याचा अधिकार ज्योतिष्यांस असतो. त्यामुळें उपलब्ध कुंडल्यामध्यें असलेला इष्टकाल दिलेल्या इष्टकालाबरोबर आहे किंवा तो बदलला आहे हें समजण्यास कांहीं आधार

राहत नाहीं. ग्रहांच्या गणितसंबंधी ही एक उणीव आहे. आपल्या देशांतील ज्योतिष्यांत वेध घेणारा ज्योतिषी हजारांत एकादा, मुळींच नाहीं ह्मटलें तरी चालेल. वेधपरंपरा बुडाल्यानें ग्रहगणितांत सुधारणा करण्याचें काम होत नाहीं व त्यायोगें केवळ ग्रंथांतील मानें व वचनें यांवरच विश्वास ठेवावा लागतो. ज्योतिर्गणिताचें सम्यक् ज्ञान होण्यास रेखागणित, बीज, त्रिकोणमिति, घातांकगणित, सिद्धांतज्योतिष यांचें ज्ञान चांगलें असावें लागतें. परंतु आजकाल ज्योतिष्यांस बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार व वर्गमूळ यांपलीकडे गणिताचें ज्ञान नसतें. अपूर्णांकांचें किंवा दशांशाचेंही ज्ञान नसतें. ही गोष्ट आपणास मोठी लांच्छनाची आहे. गणकास कांहीं ज्योतिषशास्त्राच्या [आकाशांतील प्रत्यक्ष व कल्पित] पदार्थांचेंही थोडें बहुत ज्ञान पाहिजे. थोडें गतिशास्त्राचेंही पाहिजे. परंतु असें ज्ञान त्यांस सामान्यतः नसतें ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे. आतां हें ज्ञान जितकें पाहिजे तितकें नसतें यांत दोष कोणाचा, हें पाहण्याचें हें स्थल नव्हे. ह्मणून तो दोष तूर्त "काला" वर टाकून देऊं. परंतु यांत कांहीं सुधारणा केली पाहिजे हें मात्र आपलें कर्तव्य आहे. घोंटाळा होण्यास कारण कांहींही झालेलें असो, तो काढून टाकून व्यवस्था लावणें हें आपलें कर्तव्य आहे; व तें टाळणें ह्मणजे पातक आहे. तूर्त दृक् प्रत्ययास येणारें गणित पाश्चिमात्यांचें घेतल्यास काम चालूं शकेल, व तें तसें चालविलें पाहिजे. परंतु ही उणीव दूर करण्याच्या तजविजीस आपण लागलें पाहिजे आपणास नवीन धरतीवर आपली एकादी वेधशाळा स्थापन करतां येऊं नये हें मोठें आश्चर्य नव्हे काय? असतु. तेव्हां जननकाल खात्रीचे जमविले पाहिजेत-चरित्रें सर्वोपलब्ध झालीं पाहिजेत-व गणितांत होईल तितकें करून कसर राहिली न पाहिजे; व असें झालें तरच हें परीक्षणाचें काम सुव्यवस्थित होऊं शकेल.

[३]

फलज्योतिष शास्त्राचें परीक्षण कसें केलें पाहिजे, तें कसें झालें आहे, व त्यांत कोणत्या अडचणी होत्या कोणता कमीपणा होता व तो कसा दूर करतां येईल याबद्दल वर विवेचन केलें. आतां फल-

ज्योतिषाच्या ज्या अनेक शाखा आहेत, त्यांपैकीं महत्त्वाच्या कोणत्या त्यांपैकीं परीक्षण करण्यासाठीं साध्य कोटींत कोणत्या येतात, व त्या परीक्षणाच्या कामीं कोणत्या योजना कराव्या लागतील, व त्यांत जनसाहाय्य किती आवश्यक आहे, वगैरे गोष्टींचा विचार करावयाचा आहे.

फलज्योतिषाच्या मुख्य ६ शाखा आहेत. त्यांचीं नांवें:—१ संहिता, २ जातक, ३ होरा, ४ ताजिक, ५ गोचर, व ६ मुहूर्त. यांत कोणते विषय येतात हें प्रथम सांगणें आवश्यक आहे. (१) संहितेमध्यें ग्रहांच्या गतिस्थितींच्या अनुरोधानें राष्ट्रीय घडामोडी, सृष्टचमत्कार, उत्पात इ० गोष्टींचा विचार असतो. (२) जातकांत पुरुष अथवा स्त्रिया यांच्या आयुष्यक्रमांतील महत्त्वांच्या गोष्टींचा विचार असतो; ह्मणजे जन्मकालीन ग्रहस्थितीवरून व्यक्तींच्या चारित्रांचें किती भाकित करतां येतें ह्याचा विचार या भागांत केला जातो. (३) होरा शाखांत, कोणत्याही वेळीं प्रश्न विचारला असतां तत्कालीन ग्रहांच्या स्थितिगतीवरून इष्ट कार्य घडून येण्यास किती अनुकूलता अथवा प्रतिकूलता आहे हें कसें सांगतां येईल, या विषयीं विचार असतो. (४) ताजक शाखेंत, नवीन वर्षप्रवेशकालीन ग्रहस्थितीवरून त्या त्या वर्षाचें व्यक्तिविषयक भाकित कसें करतां येतें याचें विवेचन असतें. (५) गोचरशाखेंत, जसजशी ग्रहांची स्थिति आकाशांत बदलत जाते तसतसा व्यक्तींवर कोणता परिणाम घडून येतो, याचा विचार केलेला असतो. व (६) मुहूर्तशाखेंत, इष्टकार्याच्या सिद्धीस अनुकूल योग व ग्रहस्थिति केव्हां असते प्रतिकूल केव्हां असते, कोणत्या कालीं कोणतीं कर्मे ग्राह्य अथवा वर्ज्य असतात, याचा विचार केलेला असतो.

याप्रमाणें फलज्योतिषाच्या मुख्य सहा शाखा आहेत. या प्रत्येक शाखेचा मूळ आधार ज्योतिर्गणितावर आहे. ग्रहांच्या गतीवर व स्थितीवर सर्व फलें अवलंबून असल्यानें त्या गतीचें व स्थितींचें गणित शुद्ध व सूक्ष्म असेल तितकें बरें हें उघड दिसून येतें. ग्रहांच्या गतींचीं मानें जरी नियमानें बद्ध आहेत तरी ते नियम सर्व आपणास कळले

आहेत अथवा ते सूक्ष्म रीतीनें कळले आहेत असें नाहीं. ज्योतिर्गणिताची प्रगति सारखी होत आहे. नवीन गणितरीति निघत आहेत इतकेंच नव्हे, तर नवीन नियमांचे शोधही लागत आहेत. गतिशास्त्र व आकर्षणशास्त्र यांचे सामान्य नियम आपणास कळले आहेत यांत शंका नाहीं. परंतु पदार्थांचें परस्परांवर अमुक नियमानें आकर्षण होतें ही गोष्ट जरी कळली तरी त्या नियमांचा उपयोग करण्याचा प्रसंग आला ह्मणजे किती अडचणी उपस्थित होतात हें गणित करणारांसच माहित. अनेक पदार्थांचें एका पदार्थावर ज्या नियमानें आकर्षण होतें तो नियमसमंजण्यास कितीही सोपा असो, त्या सर्व पदार्थांचा आकर्षणाचा व्यक्त परिणाम किती व कसा होईल हें काढणें फार किटकिटीचें काम आहे. तसेंच आकर्षणाच्या सामान्य नियमांवरून जीं विशेष अनुमानें काढून ठेवावीं लागतात तीं व्यवहारांत उपयोगांत आणण्यापूर्वी स्थूल करून घ्यावीं लागतात. उदाहरणार्थ, गति व आकर्षण शास्त्राच्या नियमानें अथवा भूयोदर्शनानें पृथ्वीचा सूर्याभोवतालचा परिभ्रमणकाल आणिला तर तो (अतिसूक्ष्म परिमाणाचें माप मोजण्यास घेऊन देखील) **तंतोतंत येतो असें नाहीं**; व तो तसा तंतोतंत आला अशी कल्पना केली तरी तो पूर्णांक दर्शवितां येणें शक्य नसतें. यामुळें पूर्णांकाचा आधार घ्यावा लागतो. हे अवघड व अवजड अपूर्णांक गणितांत शिरलें ह्मणजे किती त्रास होतो हें सामान्य विद्यार्थ्यांस चांगलें ठाऊक असतें. यामुळें व्यवहार सुकर होण्यास कसर सोडून देणें भाग येतें. कसर सोडली ह्मणजे अर्थात् गणिताला स्थूलपणा येतो. सौकर्यार्थ हा स्थूलपणा पतकरणें भाग येतें. परंतु हा स्थूलपणा वारंवार होऊं लागला ह्मणजे कसर जमतां जमतां मोठी वाढते. व गणिताचा वेधाशीं मेळ बसत नाहीं व दृक्प्रत्यय येत नाहीं. या प्रमाणें

गणितांत स्थूलपणा व कसर हे अपरिहार्य दोष राहतात. तेव्हां दृक्प्रत्ययासाठीं वेळोवेळीं संचित दोषाचें क्षालन होणें आवश्यक असतें. अशा चालनीस क्षेपक व बीज संस्कार असें ज्योतिषशास्त्री म्हणतात. ज्याकाळीं शास्त्रीय जिज्ञासा जागृत होती, व शास्त्रास उत्तेजन व आश्रय मिळत असे, त्याकाळीं उद्योगशील शास्त्री असे संस्कार वेळोवेळीं करीत असत. अलीकडे आपल्या जुन्या शास्त्रास व शास्त्रयांस कोणी विचारीनासें झालें आहे व त्यामुळें शास्त्रीही निरुत्साही, शिथिलप्रयत्न, आळशी व केवळ चरितार्थी बनले आहेत ह्यांत कांहीं नवल नाहीं पूर्वी सरस्वतीभक्तांत लक्ष्मीची पर्वा न करणारे असे लोक पुष्कळ असत. आज तशी स्थिति नाहीं. यामुळें उदात्त विचार जाऊन व इतिकर्तव्यतेविषयीं समजुती पालटून जाऊन केवळ चरितार्थापलीकडे दृष्टीच जात नाहीं. ही स्थिति अत्यंत शोचनीय आहे असें कोणीही म्हणेल. त्याविषयीं वाद नाहीं. आपणांत जिज्ञासा नाहीं, उद्योगशीलता नाहीं, अभिमान नाहीं, गुणग्राहकता नाहीं, द्रव्यबल नाहीं, साधनसंपत्ति नाहीं, त्याचा हा परिणाम आहे यांत संशय नाहीं. ही स्थिति इष्ट नाहीं हें खरें, परंतु ती पालटण्यास, जिज्ञासा येण्यास, द्रव्यवृद्धि होण्यास व साधनांची विपुलता होण्यास काय केलें पाहिजे हा प्रश्न महत्त्वाचा आहे. व त्याचा खल होऊन उपाय धुंडून ज्यावेळीं आपण कार्यतत्पर होऊं तेव्हां अभ्यूदयाची वार्ता. आजकाल थोडीं सुचिन्हें दिसूं लागलीं आहेत. जागृति होत आहे, व आपल्या परिस्थितीचें खरें स्वरूप आपणांस कळूं लागलें आहे. त्यामुळें अंकुरला थोडे अंकूर फुटूं लागले आहेत. अस्तु, याप्रमाणें आपलेकडील ग्रहगणीत स्थूल झालें आहे ही शास्त्रपरीक्षणाच्या कामीं मोठी अडचण उपस्थित झाली आहे. ती दूर होण्याचे उपाय करणें

अवश्य आहे. तथापि आज आपलेजवळ नाहीं तर दुसऱ्याचेंही वापरावयाचें नाहीं असा निराशाद्योतक निश्चय करणें प्रशस्त नव्हे. उसनें आणून काम भागविलें पाहिजे. सारांश, पाश्चात्य देशांतील गणितांचा उपयोग करून तूर्त निभाव करून घेणें इष्ट आहे.

सर्व फलज्योतिष शाखांचा ग्रहांच्या गतीवर व स्थितीवर मदार असते असें आतांच सांगितलें. ग्रहाची स्थिति राशि, अंश, कला, विकला इत्यादि परिमाणानें वर्णिली जाते. पृथ्वी हा मध्य मानून आकाशकटाहावर सूर्याच्या मार्गाचा नकाशा काढण्याचा प्रयत्न केल्यास असें दिसून येईल कीं, तो एका वृत्तावर फिरत असतो. याच वृत्तावर ग्रहांच्या स्थितीचीं मापें घेतलीं जातात. या क्रांतिवृत्तावर कोठेंतरी आरंभ करून त्या आरंभबिंदूपासून तो सूर्यादि ग्रहांपावेतों जितका वर्तुलखंड समाविष्ट होईल त्याचें माप ऋष्यादिकानें काढलें जातें. परंतु आरंभबिंदु कोठें घ्यावयाचा याविषयीं दोन पद्धति प्रचारांत आल्या आहेत. एका पद्धतीमध्यें विषुववृत्त व क्रांतिवृत्त यांच्या संपातापासून प्रारंभ धरतात. विषुववृत्त क्रांतिवृत्तावर मागें मागें सरकत असल्यानें हा प्रारंभबिंदु प्रतिवर्षी मागें सरकत जातो. म्हणून या पद्धतींतील प्रारंभस्थान चल असतें. यास अयन किंवा गति असते, यावरून या पद्धतीस सापेक्षत्वानें " सायन " अशी संज्ञा दिली आहे. दुसऱ्या पद्धतींत क्रांतिवृत्तावरीलच एका स्थिर बिंदूपासून प्रारंभ करण्यांत येतो. या पद्धतीस सापेक्षत्वानें 'निरयण' अशी संज्ञा दिली आहे. सायन पद्धतीनें एकाद्या स्थिर बिंदूचें माप (वर्तुलखंड) प्रतिवर्षी निरनिराळें आलें पाहिजे. परंतु निरयण पद्धतींत तें माप प्रतिवर्षी तेंच तें राहील. या दृष्टीनें पाहतां 'निरयण' पद्धतीच सुगम असें वाटेल. साधन पद्धतीस दरवर्षाचीं मानें काढण्यास संपाताच्या गतीचा हिशेब घ्यावा लागेल. परंतु सर्व ग्रहांच्या स्थितींचें ज्ञान

होण्यास जें गणित करावें लागतें तें गणित सूर्यावर अवलंबून असतें. कारण सूर्याभोंवतीं सारे ग्रह फिरत असतात. यामुळें त्यांचें गणित सूर्य मध्य धरून केलें तर तें उपपत्ति दृष्ट्या सोपें जातें. अशा आणखी कांहीं कारणांनीं 'सायन' पद्धतीचा उपयोग करणें विशेष सोईचें असतें. अस्तु. तात्पर्य सांगावयाचें हें कीं, या दोन पद्धतींमुळें कोणत्याही ग्रहांचीं दोन मतें उपस्थित झालीं पाहिजेत. व त्यांतील फरक [अयनांश] प्रतिवर्षी वाढत गेला पाहिजे. यामुळें एक ग्रह निरयण पद्धतीनें एका राशींत तर सायन पद्धतीनें दुसऱ्या राशींत झटला जाईल. आतां राशींचीं फळें निरनिराळीं वर्णिलीं आहेत व ग्रह ज्या राशींत ज्या स्थानीं असेल त्या राशीप्रमाणें व स्थानाप्रमाणें त्याचें फळही भिन्न मानलें गेलें आहे. तेव्हां दोन्ही पद्धतीनीं सांगितलेलीं, राशी वगैरेवर अवलंबून असणारीं फळें अर्थात् भिन्न येतील. तेव्हां फलज्योतिषाच्या परीक्षणाचे कामीं ही एक मोठी अडचण उपस्थित होते. कित्येकांच्या मतें सायन पद्धतीनें राशीचे गुण अनुभवास येतात तर कित्येकांच्या मतें निरयन पद्धतीनें. कित्येक हा भेद लक्षांत न घेतां कधीं ह्या पद्धतीप्रमाणें तर कधीं त्या पद्धतीप्रमाणें. जसें जमेल किंवा साधेल तसें करून, फळें सांगतात. जुने ग्रंथ निरनिराळ्या वेळीं निर्माण झालेले आहेत. त्यांत कोणती पद्धती ग्राह्य मानलेली आहे हें नीट कळून येत नाहीं. व अलीकडील ग्रंथांत सर्व संग्रह करण्यापलीकडे विचार नसल्यानें सर्व कडबोळें करून ठेविलेलें असतें तथापि बहुतांशीं आपले अर्वाचीन ज्योतिषी 'निरयण' पद्धतीनेंच फळें सांगतात. युरोपांत व कांहीं अंशीं आपल्या देशांत सायन पद्धतीचा स्वीकार केला आहे. उभय पक्षकारांचें ह्मणणें आमची पद्धतीच ग्राह्य व अनुभवसिद्ध आहे. तर या गोष्टीचाही सप्रमाण व अनुभव घेऊन निर्णय करणें जरूर आहे. याप्रमाणें, गणिताची अडचण दूर केली तरी ही

अडचण आहेच, मात्र या अडचणी ज्योतिषशास्त्राच्या प्रत्येक शाखेस सारख्याच लागू असल्यानें त्यांचा कसा तरी परिहार करणें प्राप्त आहे. परंतु प्रत्येक शाखेंत देखील अडचणी आहेत व तें कामही फार अवघड व अवजड आहे. व त्यांपैकीं कित्येक शाखांचें महत्त्वही कमी आहे, ह्मणून सध्यां तरी कांहीं शाखा वगळून एक दोन शाखेतच प्रयत्न केले पाहिजेत; ह्मणून कोणत्या शाखा वगळाव्या व कोणत्या घ्याव्या याचा विचार आतां करूं.

होरा अथवा प्रश्नज्योतिषाचा खरेपणा, अर्थात् अनुभवतुल्यता प्रश्न विचारणाऱ्याच्या तात्कालीन मनोवृत्तीवर अवलंबून राहतो. परिणाम दर्शविणारी ग्रहस्थिति आली ह्मणजे मनुष्यास एक प्रकारची हुरहुर लागते. त्याबरोबर वेळ पाहून ज्योतिषास प्रश्न विचारला तर अनुभवाशीं जमणारें येतें, एरव्हीं नाहीं, असें या शाखेच्या बुडाशीं एक तत्व आहे. त्यामुळें या शाखेंत एक असा नियम केलेला असतो कीं, महत्त्वाच्या कार्याविना व खरी आस्था असल्याविना विचारणारांनीं प्रश्न विचारूं नये व सांगणारांनीं त्याचा विचार करूं नये. व्यवहारांत या नियमाचें उल्लंघन उभयपक्षांकडून वारंवार होतें ही खेदाची गोष्ट आहे. कारण त्यामुळें शास्त्राचे ठायीं अनास्था व अश्रद्धा उत्पन्न होते. शिवाय वर जी उपपत्ति सांगितली तीवर पुष्कळांची श्रद्धा बसत नाहीं. अशा स्थितींत या शाखेचें परीक्षण करण्याचें काम एका बाजूस ठेवल्यास हरकत नाहीं. हीच गोष्ट कांहीं अंशीं मुहूर्तशाखेसही लागू आहे. बारीकसारीकही प्रसंगीही मुहूर्त पाहण्याची संवय लागल्यानें मुहूर्तापासून हित न होतां उलट अनेक वेळीं प्रतिकूलता मात्र उत्पन्न होते, सामान्य ओघापुढें (संचितकर्माच्या बलापुढें) मुहूर्ताचा टिकाव लागत नाहीं. एखाद्या मनुष्यानें खुनासारखा भयंकर अपराध करावा, व चौकशीचे वेळीं

मुहूर्त पहावा, मग त्या मुहूर्ताचा उपयोग कितीसा होणार! चौकशीच्या ठिकाणीं जातांना अडथळा होणार नाहीं या पलीकडे त्यानें आशा बाळगणें व्यर्थ आहे. तात्पर्य, परिस्थिति व स्वकर्म यांच्या परिणामाला प्रतिबंध करण्याइतका जोम मुहूर्तांत असूं शकणार नाहीं. त्या परिणामांत जो फरक होईल तो बेताचाच होईल. तेव्हां ही मुहूर्तशाखाही फारशी महत्त्वाची नाहीं असें ह्मणतां येईल.

ताजक शाखेचें महत्व ज्योतिषाचा पेषा ज्यांचा आहे, त्यांच्या दृष्टीनें व लोकांच्या दृष्टीनें ज्यास्त असतें. तसें असण्याचें कारण ह्मणजे ह्या शाखेची विशेष सत्यता हें नव्हे, तर त्याचा प्रसार व प्रचार जास्त आहे इतकेंच. प्रचार जास्त होण्याचें कारणही हेंच कीं, ज्योतिष्यांस ही शाखा सुलभ जाते व लोकांस आज आपणास कोणता लाभ व कोणती हानि होईल हें जाणण्याची इच्छा ज्यास्त असते. मागें काय झालें तें झालें व पुढें पुष्कळ अवधीनंतर काय होणार तें होईल. आज या दोन्ही गोष्टीचें महत्व कमी. शिवाय, व्यक्तींच्या जीवनक्रमाचा ओघ सामान्य ठरलेला असतो तो कळून मनाचें समाधान होत नाहीं. व फलित भावी अनुभवाशीं जुळवून पाहण्यास अवधि असतो तितका धीर धरवत नाहीं. ह्मणून तात्काळ कांहीं प्रत्यय मिळवून घेण्याची प्रवृत्ति अर्थात् ज्यास्त असते. अशा कित्येक कारणांनीं या शाखेचें महत्व वाजवीपेक्षां ज्यास्त वाढून गेलें आहे. ज्याप्रमाणें मोरोपंताच्या आर्यांवर आपलेकडील कथेकऱ्यांचा बहुतेक उदरनिर्वाह चालतो त्या प्रमाणें ताजकावर ज्योतिषांचा चालतो. द्रव्यप्राप्ति या मार्गानेंच ज्यास्त होते हा अनुभव त्यांस पक्का असतो. नवीन आख्यानें, रचण्याचे परिश्रम करून अथवा इतर कवींचीं त्रुटित आख्यानें हुडकून काढण्याचे परिश्रम करून जास्त प्राप्ति होत नसल्यानें जसा कथेकरी मोरोपंताचा आश्रय करितात तसाच प्रकार ज्योतिष्यांचा असतो.

त्यामुळें गणित, सिद्धांत इत्यादि ज्योतिष्याच्या अंगांचा अभ्यास करण्याचे परिश्रम ज्योतिषी करीत नाहींत. मग त्यांजकडून शास्त्रीय प्रगति अथवा चिकित्सा झाली नाहीं. तर त्यांत आश्चर्य तें कोणतें? परंतु फलज्योतिषशास्त्राचा असा सिद्धांत आहे कीं, जें फल जन्मलग्नकुंडलीवरून निघत नाहीं तें वर्षकुंडलीनें प्राप्त होत नाहीं. जन्मकुंडलीच्या योगाला अनुसरून वर्षकुंडलीचें फल असतें. तेव्हां अर्थात् जन्मकुंडली मुख्य व वर्षकुंडली गौण. ह्यामुळें ताजकाचें महत्व ज्यातकाइतकें नाहीं. शिवाय अयनांश [सायन निरयणमानांतील फरक] किती याविषयीं अनिश्चय, व वर्षमान किती याविषयीं घोंटाळा, या दोन कारणांनीं तर ताजकाच्या परीक्षणाचें काम फार कठीण झालें आहे.

गोचर शाखेचें महत्त्व साधारणच आहे. फलज्योतिषाच्या उपपत्तीचे दोन प्रकार आहेत. पहिला असा कीं, ग्रहांच्या भिन्न भिन्न स्थितींचा परिणाम ऐहिक [व्यक्ति राष्ट्र इत्यादिक] गोष्टीवर होतो हें मानणें. दुसरा असा कीं, आधानकाल, निषेककाल व जननकाल या तीन कालांचें इतकें महत्त्व आहे कीं त्या वेळीं भावी स्थिति अथवा तिचें धोरण बहुतेक ठरून जातें व पुढील गोचर स्थितीनें त्यास मदत होते. अथवा त्यांत थोडा फेरफार होतो या तत्त्वांपैकीं पहिलें तत्त्व भौतिक शास्त्रवेत्त्यांस जितकें लवकर मान्य होईल तितकें दुसरें होणार नाहीं. तथापि ज्योतिषशास्त्राचा मूळ पाया दुसऱ्या तत्त्वावर बहुतेक रचलेला आहे. [व याच कारणानें त्यावर भौतिक शास्त्रवेत्त्यांचें लक्षच जात नाहीं] यांचें महत्त्व ज्योतिषांत मुख्य असल्यानें 'गोचर' शाखा ही गौणच ठरली. जन्मकुंडली व दशा यांचे अनुरोधानें गोचराचें फल घ्यावें. असा नियम या शास्त्रांत आहे. शिवाय गोचरांतही तत्त्व गृहीत धरावें लागतेंच एरव्ही गोचरांचा व्यक्तीशीं संबंध लावतां येत नाहीं व गोचर गौणच ठरतें.

आतां राहिल्या शाखा दोन संहिता व जातक. संहितेचे कोण-त्याही वेळीं राष्ट्रीय अगर समष्टिदृष्टीनें महत्व जास्त आहे असें कबूल केलें पाहिजे. व्यक्तिविषयक जातकाचें व्यक्तीच्या दृष्टीनें कितीही महत्व असो, शास्त्रांत समष्टिदृष्टीलाच ज्यास्त महत्व दिलें पाहिजे. परंतु या शाखेचें महत्त्व जरी निर्विवाद असलें तरी तिचें परीक्षण करण्याचें कामही तितकेंच अवघड आहे, या शाखेचें परीक्षण व अनुभव घेण्यास साधनांची विपुलता पाहिजे. ह्मणजे मागील घडलेल्या गोष्टींचा संग्रह पाहिजे इतकेंच नव्हे, तर पुढील अनुभवाची नोंद ठेविली पाहिजे. असा संग्रह व अशी नोंद अलीकडे, ह्मणजे शेंपन्नास वर्षांत, इंग्रजी अमलामुळें होत आहे. सिमला इत्यादि ठिकाणीं सरकारनें अशा शाखेसाठीं (अर्वाचीन भौतिक शास्त्रांपैकीं वायुचक्रशास्त्रासाठीं) पुष्कळ खर्च ठेवला आहे, परंतु अनुभवाशीं भाकितांचा मेळ ही कसोटी जर लावावयाची झाली तर वायुचक्रशास्त्रावरून व अवलोकनावरून जीं भाकितें प्रसिद्ध केलीं जातात तीं अनुभवाशीं बहुतेक विसंवादी अशींच ठरतात. फलज्योतिषाचे या शाखेंतालही सिद्धांत आहेत. परंतु ते ग्राह्य असले तरी त्यांचा स्थानिक उपयोग करण्यांत मोठी चूक होते, व या सिद्धांतांत उत्पात फलावर विशेष नजर असते यामुळें त्यांचा नित्य व्यवहारांत फारसा उपयोग होत नाहीं. या संबंधांत आमची कल्पना अशी आहे कीं, ही शाखा [भौतिक शास्त्रांतील व ज्योतिषांतील] अपूर्ण आहे. भूयोदर्शनानें व नव्या जुन्या कल्पनांनां या शाखेची वाढ केली पाहिजे. फलज्योतिषांची, वायुचक्र शास्त्राची, व अवलोकनाची सांगड घातली तर कांहीं तत्त्व निष्पन्न होईल अशी आशा आहे. वायुचक्रशास्त्र व फलज्योतिषांतील संहिताशास्त्र या दोहोंची ज्यांस माहिती आहे त्यांच्या हातून हें काम

तडीस जाण्याचा संभव आहे. "स्थानिक" पर्जन्यवृष्टीविषयीं भाकित करतां येणें हें आपल्या कृषिमय देशाच्या स्थितीस फार महत्त्वाचें आहे. आह्मी कित्येक वर्षे याविषयीं विचार करून कांहीं नियम बसविण्याचा प्रयत्न केल आहे. व त्या धोरणानें भाकित करून इष्ट मित्रांस कळवीत असतों तीं भाकितें दुष्काळाच्या (१८९७, १८९९) सालांत मात्र जशीं जुळावीं तशीं जुळलीं नाहींत. त्याचें कारण कांहीं अंशीं "आडांत नाहीं तर पोहऱ्यांत कसें येईल" या तत्त्वाकडे आमचें दुर्लक्ष्य झालें हेंच असावें. परंतु यावरून कोणाचा असा ग्रह होऊं नये कीं, बसविलेले नियम शास्त्रीय योग्यतेचे झाले आहेत. अगोदर या कामीं जितकीं साधनें, जितक्या सवडी, जितका वेळ पाहिजे तितका नसल्यानें शास्त्ररचनेस किंवा परीक्षणास अवश्य तितकें भूयोदर्शन झालेलें नाहीं. अर्थात् बसविलेल्या नियमांविषयीं खात्री नाहीं. व पुष्कळ भाकितें जमतात याचेंच मोठें आश्चर्य वाटत आहे. अनुभवानें नियम बसविणें हे शास्त्रीय प्रगतीस अनुकूल असतें हें खरें. परंतु तो अनुभव संकुचित असला तर प्रगतीस विघातक होतो, निदान प्रयत्न तरी हास्यास्पद होतो. या शाखेचें अध्ययन मोठें मनोवेधक व उपयुक्त आहे. तरी त्यास द्रव्यबल, मनुष्यबल पाहिजे. तें नसल्यानें असलें काम एका व्यक्तीनें किंवा लहानशा समूहानें हातीं घेणें यांत शहाणपणा वाटत नाहीं.

जातकाचें महत्व समष्टिदृष्ट्या फारसें नसलें तरी तें मुळींच नाहीं असें ह्मणतां येत नाहीं. कसेंही असो, या दिशेनें प्रयत्न करण्यांत विशेष सुलभता आहे असें आह्मांस वाटतें.

यामुळें जातक शाखेचेंच परीक्षण करणें उपयुक्त व साध्य असें वाटतें, व यासाठीं या शाखेंत प्रयत्नाची दिशा प्रस्तुत प्रसंगीं तरी

कशी असावी याचा विचार करूं. जातकामध्यें आधान व निषेक कालाचें ज्ञान प्रत्यक्ष होणें बहुतेक असंभवनीय आहे, तेव्हां जननकालावरच सर्व भार ठेवणें भाग आहे. हे जननकाल जरी सूक्ष्मरीत्या जाणतां येणें शक्य असलें, तरी त्याचें महत्व समजल्यावांचून व उत्सुकतेवांचून तें काम नीट होत नाहीं. थोडक्यांत उदाहरण पहावयाचें झटलें तर. आजकाल पाहण्यांत येणाऱ्या पत्रिकेंत (मिनिटा दोन मिनिटांच्या फरकानें) जननकाल खात्रीचा आहे अशा सर्वांस किती उपलब्ध होऊं शकतील याचा विचार करावा. अगोदर घड्याळ बरोबर लावण्याचें ठिकाण नसतें व आस्थापूर्वक वेळ नोंदून ठेविली जात नाहीं, व तितकेंही झालें तरी ज्योतिष्यांच्या ताब्यांत तो काल गेला कीं त्यांत फेरफार त्यांनीं केलाच! व हा फेरफार किती केला या विषयीं ते मागमूसही राहूं देत नाहींत. तात्पर्य अशा जननकालाची विश्वसनीयता फार कमी. शास्त्रोक्त फल जुळविण्यासाठीं इष्ट कालास ज्योतिषी संचलन देतात, त्यामुळें ज्योतिषांची चूक, गणितांतील नजरचूक, इत्यादि गोष्टी शोधून काढण्यास साधन राहत नाहीं. जननकाल शुद्ध असला तरी त्याची सार्वजनिक उपलब्धि होऊं शकत नाहीं, व जननकालावरून वर्तविलेलें भाकित अनुभवाशीं मिळतें अथवा नाहीं हे पाहतां यावें यासाठीं जातवृत्तें प्रसिद्ध असलीं पाहिजेत, तीं ही प्रसिद्ध झालेलीं नसतात. तेव्हां विश्वसनीय जनकालसंग्रह व विश्वसनीय जातवृत्तसंग्रह करून तें प्रसिद्ध करून सर्वांस उपलब्ध करून दिल्यावांचून परीक्षणाचा मार्ग सुगम होणार नाहीं. यासाठीं जननकाल बरोबर कसा घ्यावा व प्रत्यंतरानें ताडून कसा पहावा, याविषयीं लोकांस साधनें व माहिती दिली पाहिजे व लोकांचे गैरसमज असल्यास दूर केले पाहिजेत व त्यांचें सहाय्य या कामीं मागितलें पाहिजे.

या कामीं ऐतिहासिक पुरुषांच्या पत्रिकांचा पुष्कळ उपयोग होऊं शकेल. कारण त्यांचे जननकाल मिळविणें सोपें असतें व त्यांच्या इतिवृत्ताचा बराच भाग जगापुढें असतो. तेव्हां अशा प्रमुख पुरुषांचे जननकाल व जीवनचरित्रें मिळविण्याचा प्रयत्न अवश्य केला पाहिजे. परंतु केवळ यावरच भिस्त ठेवतां कामा नये. कारण एक तर त्यांचे जननकाल विश्वसनीय असलातच असें नाहीं, व त्यांची संख्याही थोडी. यामुळें परीक्षणाचें काम फार संकुचित होईल व त्याचें शास्त्र दृष्ट्या महत्त्व बेताचेंच राहील.

वर दर्शविल्याप्रमाणें संग्रह तयार झाला झणजे निरनिराळ्या पद्धतीनें भाकितें करून त्यांचा इतिवृत्ताशीं मेळ पाहतां येईल व त्यावरून जातकशास्त्राचें व त्यांतील निरनिराळ्या पद्धतीचें परीक्षण करतां येईल.

परीक्षणाचें काम अर्थात् असला संग्रह मोठा झाल्यावर सांगोपांग करतां येईल; व त्यास शास्त्रज्ञानाचीही आवश्यकता आहे. हें काम करण्याची स्फूर्ति कोणास ना कोणास तरी होईल. झणून आपलें आज कर्तव्य साधनसंचय करण्याचें आहे. तितकें तरी आरंभावें या विचारानें आम्ही इंदूरास एक "ज्योतिषसंचालक" मंडल स्थापन केलें आहे. यास श्रीमानांनीं, विद्वानांनीं व विशेषतः उत्साही लोकांनीं द्रव्य, ज्ञान व परिश्रम या त्रयींचें सहाय्य द्यावें. त्यांजवरच यशाची भिस्त आहे असें सांगून हा लेख पुरा करतों.

आठवले.



कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥
'भवभूतिः'

पुस्तक ८वें.] वैशाख शु० १, शुक्रवार [अंक १४वा

कालचक्र

ह्या वर्षाच्या ११ फेब्रुवारीच्या अंकांत वर्षारंभकालची कुंडली दिली आहे, ती पहा. तिचें वर्णन करितांना असें ह्मटलें आहे कीं "वर्षारंभींच रविशनियुति हा या वर्षाला अपशकुन आहे. भांडणें, युद्धें, चकमकी, रोग, चोऱ्या, खून व मृत्यु इत्यादिकांचें हें वर्ष आगर दिसतें" या गोष्टींचा अनुभव तूर्त हिंदुस्थानांत तरी येत आहे. मेच्या पहिल्या पंधरवड्यांत निघड्या छातीच्या बंगाली तरुणांनी कोणते भयंकर प्रकार केले ते सर्वांस अवगत आहेतच. कालचक्राच्या दशम [राज्य] स्थानांत सांप्रत हर्शल आहे, तो आणखी कोणकोणत्या भयंकर व कल्पनातीत गोष्टी घडवून आणितो इकडे

ज्योतिषी लोकांचें विशेष लक्ष्य लागणें साहजिक आहे. सन १९०४ च्या मार्च्यमध्यें या ग्रहानें राशिचक्राच्या दशमांत प्रवेश केला. तेव्हांपासूनच हिंदुस्थानांतील राजकीय चळवळी प्रबल होत चालल्या. मकर राशीचें स्वामित्व बंगालवर स्पष्ट दिसतें. बंगालची फाळणी जेव्हां झाली तेव्हां या राशींत हर्शलच्या जोडीस मंगळ होता! सन १९०७ मध्यें पुनः मंगळ या राशींत आला, त्या वेळीं बंगाल्यांत पुष्कळच अनर्थकारक गोष्टी घडल्या. सन १९०८ मध्यें तो या राशींत नाहीं, हें एका प्रकारें सुदैव होय! सन १९०९ मध्यें मार्च्य व एप्रिल मध्यें तो तिसऱ्यानें मकर राशींत येणार आहे, त्या वेळीं काय प्रकार घडतात ते पहावे! आमच्या मतें १९०९ साल फार कठीण दिसतें. कारण, मंगळ ७ महिने मेष राशींत बलवान् होणार आहे! असो. हर्शल दशमांत आहे तों पर्यंत बंगाल्यांत किंबहुना सर्व हिंदुस्थानांत शांतता स्थापित होईल असें वाटत नाहीं. हा हर्शल ज्या ज्या वेळीं शनीच्या व मंगळाच्या दृष्टींत असेल किंवा युक्त असेल त्या त्या वेळीं अनर्थ व्हावा- असें अनुमान होत आहे. या वर्षी मेच्या १ ल्याच तारखेला हर्शल हा मंगळाच्या पूर्ण[अष्टम] दृष्टींत होता, त्याचा अनुभव आलाच आहे. जूनच्या १६ तारखेला मंगळ व हर्शल हे समोरासमोर येत आहेत. या वेळीं मंगळ सुखस्थानीं आहे. अर्थात् हा महिना बंगाली तरुणांच्या हालअपेष्टांचा आहे. याच महिन्यांत त्यांस कृतकर्मांचीं फलें भोगावयास लागणार आहेत !

सन १९०८ मध्यें हर्शल हा शनीच्या दृष्टींत येत नाहीं, हें एक प्रकारें बरें आहे. नाहीं पेक्षां फार अनर्थ झाला असता. शनि हा

दशमाचा अधिपति असून तो या वर्षापासून मेष राशीचा झाला आहे. त्यामुळें तो राष्ट्रपुरुषाच्या तनुस्थानीं आला आहे. शनि हा मंगळाच्या क्षेत्रीं फार अनिष्ट होय. दशमांत हर्शल व दशमाधिपति तनुस्थानीं बिघडलेला ही स्थिति अनर्थमूलक होय शनि मेष राशींत आहे तों पर्यंत हिंदुस्थानांतच काय पण सर्व जगांतही शांतता नांदणार नाहीं. सर्व जग राष्ट्रीय चळवळ व युद्ध यांत निमग्न होईल.

ह्या वर्षी बुध आणि शुक्र हे कर्क राशींत फार दिवस आहेत बुध हा जून व जुलई आणि शुक्र हा मेपासून सप्टेंबरपर्यंत या राशींत आहे, कर्क हा चंद्राचा राशि असल्यामुळें ते शत्रुगृहीं दुर्बल आहेत. अर्थात् कवि, ग्रंथकार, वक्ते व वर्तमानपत्रकार यांस या कालीं फार त्रास सोसावा लागणार आहे. सप्टेंबरपासून सुशिक्षितांचा त्रास कमी होईल असें वाटतें.

वंध्यायोग.

[रा. रा. ग. दा. ग्रंथे यांजकडून]

खालील कुंडल्या सर्व स्त्रियांच्याच आहेत.

जन्म—ता. ५ जुलई सन १८७४

१



पंचमांत मेष हा अल्पसंतति देणारा राशि असून त्याचा स्वामी मंगळ नीच असून अस्तंगत असा अष्टमांत आहे. मंगळ हा रवीशीं युति करण्याच्या स्थितींत आहे. राहु आणि नेपच्यून हे पाप ग्रह

पंचम स्थानीं वसतात. कारण, षष्ठभावाचा आरंभ वृषभ राशीच्या १९ अंशांत असून राहू या राशींत २ अंश व नेपच्यून १ अंश आहे. त्यामुळें या दोन्ही ग्रहांचा पंचम स्थानावरच पूर्ण परिणाम घडतो. शनीची पंचमावरही पूर्ण दृष्टि आहे.

२

जन्म—ता. ३० सपटंबर सन १८४६



या कुंडलींतही पंचमं स्थानीं मेष राशीच उदित आहे. या राशींत हर्शल हा पाप ग्रह वक्री आहे. पंचमावर रवि, मंगळ, राहु हे तीन पाप ग्रह पाहत असून पंचमाधिपति मंगळ अस्तंगत आहे. या कुंडलींतही शनि पंचमावर पाहतो.

३

जन्म—ता. २८ नवंबर सन १८८३



पंचमेश शनि वक्री आहे. संततिकारक ग्रह गुरु वक्री असून मंगळानें युक्त आहे. नवमांत नेपच्यून हा पाप ग्रह आहे. मुख्य योग गुरु सिंह या वंध्या राशींत वक्री असून मंगळानें युक्त झाला हाच आहे.

कुंडलीविज्ञान

यदाकिंचिज्ज्ञोऽहं द्विप इव मदान्धः समभवं ।
तदा सर्वज्ञोऽस्मीत्यभवदवलिप्तं मम मनः ॥
यदा किञ्चित्किञ्चिद्बुधजनसकाशादवगतं ।
तदा मूर्खोऽस्मीति ज्वर इव मदो मे व्यपगतः ॥

पुस्तक ७ वें.] जानेवारी, १९०७ [अंक १ ला.

स्फुट विचार

वृश्चिक राशीचा १३ अंशांतला चंद्र द्वितीय स्थानीं असून त्याच्या बरोबर समोर वृषभ राशीचा १३ अंशांतला वक्री मंगळ अष्टम स्थानीं आहे, अशा एका मनुष्यास लहानपणीं देवी आल्यामुळें मुखावर वण आहेत. डोक्यांत खांडकें पडल्याच्या खुणा आहेत. दोन वेळां अपघात होऊन एक डोक्यावर व एक गुढघ्यावर अशा दोन निशाण्या आहेत. एकदां पाण्यांत अपमृत्यु झाला होता. आम्लपित्ताचा कायमचा विकार आहे व त्यामुळें किल्येक दिवस निवळ दुधावर रहावें लागतें. उष्ण पदार्थ बिनकूल सोसत नाहींत. असे पदार्थ एकाद्या वेळीं खाण्यांत आल्यास गुदद्वाराची आग होऊन रक्तमिश्रित मळ होतो. वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल कीं, हे सर्व धर्म मंगळाचे आहेत.

* * *

जन्मकालीं मेष राशीचा शनि जाया स्थानीं असून तृतीय स्थानीं धनु राशींत रविबुध युति आहे. शनि ८ अंशांत व रवि १८

अंशांत आहे. धनु राशि शनीला चांगला नाहीं. या राशींत असतां नाशाकडे त्याची प्रवृत्ति असते. या राशींत अगर समोरच्या मिथुन राशींत जर जन्मकाली रवि असेल, तर तो शनि निश्चयानें नाशकारक होतो रवीवर पितृसुख अवलंबून असतें, ह्मणून रवि कोणत्याही स्थानीं असला तरी त्या राशींत शनि गेल्यावर बापाला दुखणें आल्याशिवाय राहणार नाहीं. अशा काळांत जर साडेसाती असेल व रवि हा दशमाचा अधिपति असेल तर बापाला चांगलेंच लोळावें लागेल. वरील तृतीय स्थानीं असलेल्या रवीवर जेव्हां शनि गेला, त्यावेळीं बापाला व भावंडांसही कष्ट होऊन एक भावंडही मरण पावलें. कारण तृतीय स्थान भ्रातृस्थान आहे. साडेसाती असल्यामुळें स्वतःसही कष्ट झाले. या सर्व गोष्टी ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत.

* * * *

सप्तम स्थानीं असलेला नीच शनि हा लग्नीं उच्च होतांच विवाह झाला, पंचमांत कुंभ राशींत स्वगृहीं होतांच संतति झाली.

* * * *

एखादा मनुष्य दत्तक आहे असें जर आपणास समजलें तर त्याच्या लग्नाच्या, चंद्राच्या अगर रवीच्या चतुर्थदशमांत, शनि, हर्शल किंवा मंगळ असलाच पाहिजे. धनुराशींत चतुर्थ स्थानीं शनि व हर्शल असे दोन पाप ग्रह एका कुंडलींत होते. त्या मनुष्यास जनित आई, सावत्र आई व दत्तक आई असे मातृसुखाचे तीन प्रकार झाले. चतुर्थ स्थान हें मातृस्थान आहे. या स्थानांत धनु राशीचा शनि चांगला नाहीं. शनि हा अग्नि राशींत व्यक्तीचा नाश करितो. वरील मनुष्याची जन्मदात्री माता हर्शल चतुर्थ स्थानीं असतांच मृत्यु पावली.

* * * *

आपणांस माहीत आहे कीं, इंजिनियरची नोकरी फिरती आहे.

ह्मणून त्या मनुष्याचे बरेच ग्रह चर राशींत असले पाहिजेत, असें ठरतें. अनुभवही तसाच येतो. चंद्र मेष राशींत, शनि कर्क राशींत व शुक्र तूळ राशींत असतां एक मनुष्य इंजिनियर होता. कन्या, तूळ, कुंभ व मिथुन या राशींत शुक्र, मंगळ, लग्न अगर चंद्र नसेल तर तो इंजिनियर नव्हे असें इंजिनियरांच्या कुंडल्या पाहिल्यानें दिसून येतें. इंजिनियर होण्यास शुक्र आणि मंगळ हे ग्रह अनुकूल स्थितींत पाहिजेत. लग्न, द्वितीय आणि पंचम या स्थानीं कोणत्याही राशींत किंवा कन्या, मिथुन, तूळ व कुंभ या राशींत कोणत्याही स्थानीं वरील ग्रह असले ह्मणजे ते अनुकूल स्थितींत आहेत, असें ह्मणावयाचें. नकाशे काढणें हा शुक्राचा धर्म असून एस्टिमेट करणें व मापें घेणें हा धर्म मंगळाचाच आहे.

* * *

वरील वर्णन अमुक एका पद्धतीला अनुसरून केलें आहे असें समजणें मूर्खपणा होय. ग्रहांचे व राशींचे जे स्वाभाविक धर्म आहेत त्यांस अनुसरून केलेलें वर्णन जर सायन पद्धतींत दृष्टीस पडेल तर सायन पद्धति खरी आणि निरयन पद्धतींत दृष्टीस पडेल तर निरयन पद्धति खरी. खऱ्या खोट्याचा निर्णय वाचकांनीं करावा.

* * *

ज्याप्रमाणें मेष, तूळ, कर्क व मकर हे चर राशि आहेत, त्याप्रमाणेंच चंद्र, बुध व शुक्र हेही चर ग्रह आहेत. कारण, सर्व ग्रहांत या ग्रहांच्या गति अधिक आहेत. लग्न, सप्तम तृतीय व नवम हीं चर स्थानें आहेत. चर स्थानांत चर राशि व चर ग्रह असतां प्रवास फार व्हावयाचे, हें उघड आहे.

* * *

पुस्तक १ लें, अंक १ ला पृ० ४ पहा. यांत राशींचीं निवासस्थानें सांगितलीं आहेत. हीं निवासस्थानें विचारांत घेतल्यास प्रवासाच्या

स्थलाचा निर्णय करितां येण्यासारखा आहे. उदाहरणार्थ—जंगल इनस्पेक्टर घ्या. या नोकरास नेहमीं डोंगराळ प्रदेशांत जेथें अरण्यें असतील, तेथें फिरावें लागतें. यावरून त्याचे ग्रह कोणत्या राशींत असले पाहिजेत हें ठरवूं. राशींचीं स्थानें येणेंप्रमाणें:—

मेष — धातूंच्या व रत्नांच्या खाणी-अर्थात् डोंगराळ प्रदेश.

वृषभ — पर्वतांचें शिखर, शेतें, गाई व बैल यांचीं रानें

सिंह — मोठाले पर्वत, मुद्दा अरण्यें.

कन्या — कोमल तृणानें हिरवा गार देश.

मकर — नद्या व जलमय अरण्यें.

वृश्चिक — खडकाळ जमीन, विषारी जनावरांचीं बिळें.

याप्रमाणें डोंगराळ प्रदेश व अरण्यें मेष, वृषभ, सिंह, कन्या, वृश्चिक आणि मकर या राशींचीं निवासस्थानें आहेत. ह्मणून या राशींतच बहुतेक ग्रह असले पाहिजेत, असें सिद्ध होतें. अमुक मनुष्य जंगल खात्यांत नोकरी करण्यास पात्र आहे कीं नाहीं, या प्रश्नाचें उत्तर देण्यास मात्र या माहितीचा उपयोग होईल. "माझ्या मनांत जंगल खात्यांत नोकरी करणें आहे, तर मी या नोकरीस पात्र आहें काय?" या प्रश्नाचें उत्तर जर कोणास सोडविण्याचा प्रसंग आला तर त्याच्या कुंडलींत वरील राशि कोण कोणत्या स्थानीं पडले आहेत व त्यांत कोण कोणते ग्रह आहेत तें पाहून उत्तर देतां येईल.

* * * *

रात्रीं वनस्पतींस प्रकाश देणारा जो चंद्र तो वनस्पतींचा पोषक (माळी) होय. या ग्रहाचा जंगलाशीं संबंध विशेष. ह्मणून वरील राशींतूनच चंद्र आढळला पाहिजे, हें तात्विक दृष्टीनें अगदीं बरोबर आहे. अनुभव काय येईल तो येवो. जर कोणाजवळ या खात्यांतील नोकरांच्या कुंडल्यांचा संग्रह जन्मकालासह असेल तर तो प्रसिद्ध करावा. त्यास या पुस्तकांत अवश्य स्थल मिळेल. या विषयाचा ऊहापोह बराच झाला पाहिजे, ह्मणजे कालांतरानें अमुक मनुष्य याच खात्यांत नोकरी करील असें भविष्य करितां येईल.

कुंडलीविज्ञान

यदाकिंचिज्ज्ञोऽहं द्विप इव मदान्धः समभवं।
तदा सर्वज्ञोऽस्मीत्यभवदवलिप्तं मम मनः॥
यदा किञ्चित्किञ्चिद्बुधजनसकाशादवगतं।
तदा मूर्खोऽस्मीति ज्वर इव मदो मे व्यपगतः॥

पुस्तक ७ वें.] फेब्रुवारी, १९०७ [अंक २ रा.

१ स्फुट विचार

कोणत्याही विषयाची समाजांत वारंवार जागृति केल्यानें त्या विषयाचा परिणाम जितका चांगला घडतो, तितका उशीरानें जागृति केल्यानें घडत नाहीं. ह्मणून ज्योतिषविषयक चर्चा आटल्यास झालीच पाहिजे. कुंडलीविज्ञान साप्ताहिक काढण्यास बहुतेकांची सहानुभूति मिळाली आहे. परंतु ट० ख० चा बोजा अधिक पडतो असें बऱ्याच वर्गणीदारांचें ह्मणणें आहे. गोष्ट खरी आहे. ह्मणून सर्व बाजूंनीं विचार करून तें महिन्यांतून तीन वेळां प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे. मार्च्याच्या २१ व्या तारखेस पहिला, अंक प्रसिद्ध होऊन पुढें प्रत्येक महिन्याच्या १ ल्या, ११ व्या व २१ व्या तारखेस पुढील अंक प्रसिद्ध होत जातील. दर वेळीं पृष्ठसंख्या २० व एक अंक २४ पृष्ठांचा या प्रमाणें दरमहा ६४ पृष्ठें मिळतील. ट० ख० ९ आणे, व व्ही० पी० बद्दल १ आणा. एकूण वर्गणी २ रु० १० आणे. ह्मणजे ३॥ आण्यांत ६४ पृष्ठें सजकूर मिळेल! यापैकीं १॥ रु० पूर्वी वसूल झाला आहे बाकी १ रु. २ आणे. वर्गणीसाठीं २१ मार्च्यपासून व्ही. पी. नें अंक पाठवूं. मासिकाचे अंक वेळेवर

निघत नाहींत तर हे अंक वेळेवर कसे प्रसिद्ध होतील अशी शंका बाळगण्याचें कारण नाहीं. अनिवार्य अडचणींशिवाय अंकाचा खोळंबा होणें शक्य नाहीं. शक्य तितका प्रयत्न करण्यास कधींही कसूर होणार नाहीं.

* * *

दाशाहिक अंकापासून टायटल तुप्पट, अडीचपट अगर तिप्पट होईल. त्यावर जाहिराती घेतल्या जाणार आहेत. ज्या कोणास एकाद्या कुंडलीसंबंधाचा प्रश्न सर्व वर्गणीदारांच्या पुढें मांडावयाचा असेल, त्यांच्यापासून छपाईचा चार्ज ८ आणे घेऊन तो प्रश्न एक वेळ कुंडलीसह प्रसिद्ध करूं.

* * *

जगदवृत्त या सदरांत ज्योतिषविषयक वार्तम्या प्रसिद्ध होणें जरूर आहे. म्हणून जे कोणी आपल्या कुटुंबांतील अगर गांवांतील त्या त्या आठवड्यांत झालेले जन्ममृत्यु, विवाह, दत्तकविधि, आजार, अपघात वगैरे मजकूर जन्मकालासह कळवितील त्यांस वरील सदरांत अवश्य जागा मिळेल. विवाह झाला असेल तेव्हां वधूवरांच्या कुंडल्या व लग्नमुहूर्त ही माहिती अवश्य द्यावी. कोणत्या ठिकाणीं, केव्हां, कोणत्या मुलाचा जन्म अगर मृत्यु झाला, एकाच वेळीं कोठें कोठें जन्म अगर मृत्यु झाले, एकाच वेळीं एक हीन जातीचा व एक उच्च जातीचा जन्म होतो कीं काय; एकाच वेळीं जन्मलेलीं मुलें पुढें एकाच स्थितींत असतात कीं काय वगैरे हजारों प्रश्नांचा खुलासा आपोआप होणार आहे. नांव प्रसिद्ध करावयाचें नसल्यास स्पष्ट कळवावें. पाहिल्याच अंकासाठीं अशा तऱ्हेच्या मजकुराची जरूर आहे. तरी जिज्ञासूंनीं हा अंक पावल्यापासून ८।१० दिवसांत यथाशक्ति मजकूर पाठवावा म्हणजे आरंभींच या माहितीचा उपयोग दृग्गोचर होईल.

* * * *

घोडे, गाई, बैल, म्हशी, कुत्रीं मांजरें वगैरे पशूंचे जन्मकालसुद्धां

ज्योतिष्यास कळतील तर त्यांचें ज्ञान विकसित व विस्तृत होईल, म्हणून ही माहितीही शोधकांनीं दिल्यास तिला अग्रस्थान मिळेल.

* * * *

राहु हा ग्रह लग्नीं, द्वितीय स्थानीं, चंद्राजवळ किंवा चंद्राच्या द्वितीय स्थानीं असतां तीं माणसें बोलतांना जीभ दांतांशीं लावतात, लहानपणीं पुष्कळ दिवस बोबडीं बोलतात, शब्दोच्चार करितांना आखडतात, जपून बोलण्याचा प्रयत्न करितात, वारंवार जीभ तोंडाबाहेर काढितात, लिहितांना किंवा काम करितांना तोंडें बेडीं वाकडीं करितात व जीभ नाचवितात, व रडतांना 'आ' पसरितात. हीं सर्व लक्षणें एकाच्याच ठिकाणीं असतात असें मात्र समजूं नये. यांपैकीं एखादें तरी लक्षण आढळतें, यांत संशय नाहीं. जेव्हां हा ग्रह फार अंतरावर असतो, किंवा लग्नीं द्वितीय स्थानीं चंद्राजवळ किंवा चंद्राच्या द्वितीय स्थानीं शुभ ग्रह असतो, तेव्हां हीं लक्षणें आढळतीं लग्न अशी खात्री नाहीं. इतर प्रसंगीं मात्र अनुभव आल्याशिवाय राहणार नाहीं. ग्रहांचा मनुष्याशीं संबंध नाहीं असें म्हणणाऱ्यांनीं वरील अनुभव घेऊन पहावा. चेहऱ्यावरून कुंडली मांडणाऱ्या विद्यार्थ्यास हा बोध चांगला उपयोगी पडेल.

* * * *

या शास्त्राचा जों जों खोल विचार करावा, तों तों मनाला उल्हास, आनंद व आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाहीं. कृष्णानें तोंड उघडून त्यांत यशोदेला विश्वरूप दाखविलें होतें. वाचक हो, या गोष्टीचा जर सूक्ष्म विचार कराल तर ती गोष्ट अक्षरशः खरी आहे, असें अनुभवास येईल. आपल्या मुखामध्यें सुद्धां हें विश्वरूप प्रतिबिंबित झालेलें आहे. पण तें दाखविणारा कृष्ण व पाहणारी यशोदा मात्र कोणी नाहीं. आकाशांतील मेषादि राशि, सूर्यादि ग्रह, अश्विन्यादि नक्षत्रपुंज, सर्व प्रकारचे तारे, धूमकेतु इ० चें जन्मकालच्या विश्वस्थितीचें प्रतिबिंब

आपल्या मुखामध्यें खात्रीनें बठलेलें आहे. यांतलेंच एक प्रतिबिंब वर दाखविलें आहे. तें पाहण्याची सर्वांनीं मेहेरबानी करावी. राशिपरत्वें या प्रतिबिंबाचीं स्वरूपें भिन्न भिन्न होतील. तीं दाखविण्यास मात्र आह्मी आज असमर्थ आहों.

* * * *

जन्मलग्नाचा स्वामी जन्मकालीं जर पापग्रहानें दूषित झालेला असेल, तर ज्या ज्या वेळीं तो त्याच पाप ग्रहानें दूषित होईल, त्या त्या वेळीं मनुष्यास आजारीपणा उत्पन्न होतो. जेव्हां तो जन्मलग्नाचा स्वामी दूषित करणाऱ्या पापग्रहाचा शत्रु असेल, तेव्हां काळजी करण्यासारखी स्थिति उत्पन्न होते. आजारीपणा पाप ग्रहांनीं उत्पन्न होतो, शुभ ग्रहांनीं होत नाहीं. शुभ ग्रह शत्रुक्षेत्रीं शत्रुग्रहानें युक्त अथवा दृष्ट असून पाप ग्रहांनीं जर ते दूषित होतील तर मात्र ते आजारीपणा निश्चयानें उत्पन्न करितात; या धोरणानें प्रत्येकानें आपआपले आजारीपणाचे काल निश्चित करावे. जेव्हां अनेक पाप ग्रहांच्या योगानें आजारीपणा उत्पन्न होईल, तेव्हां मृत्युसम वेदना होतील, असें जाणावें.

* * * *

आमच्या पाहण्यांत एक भृगुसंहितेची पत्रिका आली आहे. तिच्या शेवटीं '**सत्यं सत्यं मुनिश्रेष्ठ प्रत्यक्षं कृष्णकेरलं**' व '**इति कृष्णकेरलोक्तजन्मत्रयविधिः**' असें लिहिलें आहे. यावरून '**कृष्णकेरल**' नांवाचा अति विस्तृत असा जातकावर पूर्वी एक ग्रंथ असला पाहिजे. त्यांत प्रत्येक कुंडलीचें तीन जन्मांचें वर्णन दिलेलें असावें. जातकावर हल्लीं जे उपलब्ध ग्रंथ आहेत ते पूर्वीच्या ग्रंथांशीं ताडून पाहिल्यास अगदींच निरुपयोगी ठरतात.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥
'भवभूतिः'

पुस्तक ८ वें.] माघ शु. १०, मंगळवार [अंक ५ वा

कालचक्र.

जगांतील राष्ट्रीय चळवळीशीं हर्शलाचा विशेष संबंध असावा असें सांप्रतच्या स्थितीवरून दिसतें. कालपुरुषाच्या दशम स्थानीं मकर हा राशि आहे. हा राशि स्वभावतः हट्टी, दुष्ट व लढाऊ आहे. या राशीच्या ठिकाणीं अविचाराचें प्राबल्य जास्त आहे. जातक ग्रंथकारांनीं तर '**मूर्खोऽयं मकरे**' असें स्पष्ट झटलें आहे. या राशींत सन १९०४ च्या मार्चमध्यें हर्शलचा प्रवेश झाला आहे. त्या वेळेपासून सन १९१२ च्या फेब्रुवारीपर्यंत तो त्या राशींत असेल. हा ग्रह विलक्षण चळवळ्या आहे. हा कालपुरुषाच्या दशमांत गेल्यापासून जगांत राष्ट्रीय चळवळी सर्वत्र उत्पन्न झाल्या आहेत. एशिया खंडांतु चीन, जपान, हिंदुस्थान, इराण वगैरे देशांत, यूरोपांत ऐर्लंड, रशिया, पोर्तुगाल, वगैरे देशांत, आफ्रिकेंत व ट्रान्सव्हाल व इजिप्त येथें व अमेरिकेंत कानडा या देशांत असल्या चळवळी विशेष जोरांत आलेल्या दिसतात. दिवसें-

दिवस यी चळवळी रंगारूपास येत चालल्या आहेत. राजपक्ष व प्रजापक्ष हद्दास पेटलेले दिसतात. रशिया व जपान या दोन राष्ट्रांचे घनघोर युद्ध याच कालांत होऊन दुर्बलानें बलवानास चित केलें आहे! रशियांत व इराणांत राजपक्ष प्रजापक्षाकडून दुर्बल झालेला आहे! गेल्या आठवड्यांत तर पोर्तुगालच्या राजाला कोणी गोळी घालून ठार केलें आहे! गेल्या वर्षी फ्रान्समधें प्रजापक्षानें किती दंगल केली व अखेरीस राजपक्षाला कशी हार खावी लागली हें सर्वांस माहीतच आहे. ट्रान्सवालांतील हिंदी लोकांची चळवळ यशस्वी झाल्याचीही खबर आली आहे. ब्या० गांधी यांस सोडून देण्याचा हुकूम झाला असून इतर लोकांवर खटले करण्याचेही तूर्त बंद झाले आहे. कानडा व एशियाटिक या तद्देशीय यांत रक्षात होऊन तेथीयांस माघार घ्यावी लागली. बेलफास्टचा दंगाही वाचकांस माहीत आहेच. हिंदुस्थानचें तर वर्णन करावयासच नको! पण इतरत्र ज्याप्रमाणें दुर्बल यशस्वी झाले त्याप्रमाणें मात्र हिंदुस्थानांत विशेष अनुभव नाहीं. येथें राजपक्ष व प्रजापक्ष दोघेही हद्दास पेटलेले दिसतात. दुर्बल पक्ष हळू हळू बलवान् होऊं पाहत आहे व बलवान् पक्ष त्यांच्या नांग्या मोडण्याचा प्रयत्न करीत आहे! आतां पहावें कोणता पक्ष जेतेस येतो तो. इतर ठिकाणचा अनुभव पाहतां हिंदुस्थानांतीलही दुर्बल पक्षाला जय मिळाला पाहिजे असें अनुमान होत आहे.

सन १९०८ मध्यें हा ग्रह या राशींत मध्यवर्ती होणार आहे म्हणून या वर्षी या चळवळी फारच जोरांत येतील. या वर्षी कालपुरुषाच्या तनुस्थानीं दशमाचा अधिपति जो शनि तो नीच होणार आहे, म्हणून कालचक्रच येत्या २॥ वर्षांत जणों अनर्थकारक गोष्टी घडवील. सर्व जग आपत्तीनें शोककुल होईल. मेषें वर्षें तींच बरीं असें म्हणण्याचा प्रसंग येईल, कारण कालचक्राच्या तीन केंद्रांत तीन बलाढ्य पापग्रह आले आहेत! लग्नीं शनि, सुखस्थानीं नेपच्यून व दशमांत हर्शल! तनुस्थानीं शनि आल्यामुळें सर्व जगांत रजोगुणाचा [कापट्याचा] प्रभाव दृष्टीस पडेल. रोगांच्या साथी पसरतील, चोऱ्या व दरोडे यांचा सुकाळ होईल.

सत्य दडपून जाईल व असत्य सिंहासनावर विराजमान होईल! क्रांति व रूपांतरें होतील मृत्युसंख्या वाढेल. दुष्काळ पडतील. सर्व जगाला आपण सुरक्षित कसे राहतों याची चिंता पडेल, हा काल इतिहासांत नमूद करण्यासारखा होईल. विचारापेक्षां अविचाराचेंच प्राबल्य दृष्टीस पडेल. या साठीं सर्व मनुष्यांनीं परमेश्वराला शरणच गेलें पाहिजे.

या वर्षी जानेवारी, फेब्रुवारी या महिन्यांत कालपुरुषाच्या तनुस्थानीं मंगळ आहे म्हणून या ग्रहाचें या दोन महिन्यांत साम्राज्य आहे, खून, अग्नी, धरणीकंप, चकमकी, अपघात शस्त्रे व विषें यापासून भय, ताप, देवी गोवर, कांजण्या वगैरे रोगांच्या साथी, हे मंगळाचे स्वाभाविक धर्म दृग्गोचर होतील, या वर्षी मंगळ अतिचर गतीत आहे. म्हणून जहाल लोक व त्यांची जहाल मतें जोरांत असतील, सैनिकांचे बाहू स्फुरण पावतील, व ते युद्धासाठी उत्सुक होतील, ऑक्टोबर आणि नवंबर महिन्यांत कालचक्राच्या चारही केंद्रांवर पाप ग्रह येतात, म्हणून हा काल स्मरणीय होईल, जून महिना फारच अनिष्ट जाईल,

मार्च्याच्या १९ व्या तारखेला शनि मेष राशींत प्रवेश करितो व २१ व्या तारखेला त्याच्याशीं रवि युति करितों, या युतीचा परिणाम राजे, वरिष्ठ अंमलदार आणि राजपक्षाचे लोक यांस अनिष्ट आहे. शनी एका राशींतून दुसऱ्या राशींत प्रवेश करूं लागला म्हणजे पृथ्वीवरील हवेंत बराच फेरफार होतो, कदाचित् शनीचे वातावरण व पृथ्वीचें वातावरण यांत चुंबकत्व असेल, हा फेरफार संक्रमणाच्या पूर्वी महिना पंधरा दिवस व नंतर ८।४ दिवस होतो, तुफानी वारे सुटतात व अतिशय कडक थंडी पडते व क्वचित् पर्जन्यही पडतो.

ता. २२ जानेवारीला शिशिर ऋतूचा आरंभ झाला. म्हणून या ऋतूंत या वर्षी वरील दर्शन चांगलें अनुभवास येईल.

राष्ट्रांतील सुशिक्षित व मुत्सद्दी पुरुषांस सप्टेंबर पासून दिवस चांगले नाहींत. कारण गुरु हा कालचक्राच्या षष्ठस्थानीं भ्रमण करितो. हें गुरूचें भ्रमण जगाची अधोगति दर्शवितें. अशाप्रकारें कालपुरुषाच्या कुंडलींत

ग्रहस्थिति आली आहे, तिचा अनुभव काय येतो इकडे ज्योतिषी लोकांनीं विशेष लक्ष द्यावें.

सन १९०८ या वर्षी रवीचें सायन मेष संक्रमण ता. २१ मार्च्य या दिवशीं सकाळीं ५ वाजून १५ मि. नीं होत आहे. या वेळचीं सायन भावचलित कुंडली अशी होते.



या दिवशीं रवि व शनि यांची युति दिवसास १० वाजून २७ मि० नीं होणार आहे, व ती लग्नीं होणार आहे. चंद्र अष्टम स्थानीं आपल्या नीचांत आहे. याप्रमाणें वर्षारंभावरून चिन्ह ठीक दिसत नाहीं. राजा व प्रजा किंवा राजपक्ष व प्रजापक्ष या दोघांसही हें वर्ष अनिष्ट दिसतें. गेल्या राष्ट्रीयसभेच्या वेळीं ज्याप्रमाणें अपशकुन झाला त्याचप्रमाणें वर्षारंभींच रविशनियुति हा या वर्षाला अपशकुन आहे. भांडणें, युद्धें, चकमकी, रोग, चोऱ्या, खून व मृत्यु इत्यादिकांचें हें वर्ष आगर दिसतें! ग्रहमालेचा राजा रवि हा आपल्या दुष्ट व कपटी अशा चाकराकडून पीडित झालेला आहे, हें कशाचें दर्शक असावें बरें?

॥ शुभं भवतु ॥

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि विपुलाच पृथ्वी॥

'भवभूति'

पुस्तक ९वें.] पौष शु० १० शुक्रवार [अंक १ ला

सन १९०९

प्रसिद्ध जर्मन ज्योतिषी जैडकिल हा हिंदुस्थान संबंधानें लिहितो कीं, "या वर्षीं हिंदुस्थानांत शांतता राहणार नाहीं, ऑफिसरांनीं सावध राहिलें पाहिजे. व्हाइसराय साहेबांस मोठ्या जोखमीचा समय प्राप्त होईल. हिंदुस्थानी सैन्य व प्रजा यांत राजद्रोह फैलावून इंग्लंड मोठ्या काळजींत पडेल. इ०" आमच्या मतेंही हें साल हिंदुस्थानासच काय, पण सर्व राष्ट्रांस चांगलें नाहीं! कालचक्राचा दशमाधिप शनि हा तनुस्थानीं मेष राशींत दुर्बल झाला आहे व दशमांत हर्शल प्रबल झाला आहे. त्यामुळें या वर्षीं सर्वत्र राजकीय घडामोडीच होणार आहेत.

शनि हा ता. ६ आगष्ट पासून ता. २० डिसेंबर पर्यंत वक्री आहे. त्याचें वक्र भ्रमण भरणी नक्षत्रांत होणार आहे. त्याबद्दल प्राचीन ग्रंथकारांचें असें मत आहे—

भरण्यां चैव ऋक्षेतु रविपुत्रो हि संस्थितः॥
भ्रातृणां प्राग्भवेद्युद्धं राज्ञां चैव महद्भयम्॥

अर्थ.— भरणी नक्षत्रांत शनि वक्र झाला असतां पूर्वेकडे भ्रात्राभावांत युद्ध होतें व राजे लोकांस मोठें भय उत्पन्न होतें!

'पूर्वेकडे भावांचीं युद्धें होतात' याचा अर्थ आपणास केला पाहिजे. पूर्वेकडे ह्मणजे आशिया खंडांत अगर हिंदुस्थानच्या पूर्वेकडे ह्मणजे बंगाल, नागपूर वगैरे प्रांतांत असा अर्थ होऊं शकेल. भावांचीं युद्धें ह्मणजे प्रजेंतल्याच दोन पक्षांचीं भांडणें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. यावरून राष्ट्रीय पक्ष व मवाळ अथवा सरकारी हिंदी कामगार व प्रजा यांत मोठी चकमक उडावी असें वरील श्लोकावरून अनुमान होत आहे.

फेब्रुवारीच्या १६ वीला जी चंद्रमंगळयुति आहे ती धनु राशींत होणार आहे. धनु राशींत मंगळ फार प्रबळ असतो. ह्यामुळें जनता दडपशाहीनें पीडित होईल व लोकांचा एखादा चांगला पुढारी या समयाला संकटांत पडेल. पृथ्वीवर कोठेंतरी मोठा अपघात होऊन त्यांत शेंकडों माणसें मरून जातील. मोठाल्या शहरांत आगीचें भय विशेष आहे या युतीच्या वेळीं चंद्र हा मंगळाच्या आडून जाणार आहे, ह्मणून तिचा परिणाम विशेष अनिष्ट आहे.

मार्च्यमध्यें मंगळ दशमांत प्रबल झाला असून त्याची ता० २७ रोजीं हर्शलशीं युति होणार आहे. ही युति राजकीय गोष्टी संस्मरणीय घडवून आणील असें वाटतें. बंगालची फाळणी झाली तेव्हां हे ग्रह याच राशींत होते. यावरून बंगाल्यांत व इतरत्र या महिन्यांत असंतोष जास्त पसरेल, खून—मारामाऱ्या—संप वगैरे गोष्टी होऊन अस्वस्थता होईल.

सपटंबर महिना चमत्कारिक दिसतो. या महिन्यांतील ग्रहस्थिति काळजी करण्यासारखी आहे. जुलईच्या २१ व्या तारखेपासून मंगळ कालचक्राच्या तनुस्थानीं होणार आहे व तो आगष्टच्या २४ तारखेपासून अकटंबरच्या २४ तारखेपर्यंत अश्विनी नक्षत्रांत वक्रगतीनें भ्रमण करितो. त्याच्या वक्रगतीचें फल.—

क्षितिजो वक्रभूतोपि दुर्भिक्षंच महद्भयम् ॥
आरक्तानि च द्रव्याणि तानि सर्वमहर्घता ॥

अर्थ.—मंगळ वक्र झाला असतां दुष्काळ पडतो, मोठें भय प्राप्त होतें व लाल रंगाच्या वस्तु महाग होतात.

शनि ता. ६ आगष्टपासून व मंगळ ता० २४ आगष्टपासून या प्रमाणें दोन ग्रह आगष्टपासून वक्री झालेले आहेत, ह्मणून यंदाचें वर्ष मोठें कठीण जाणार आहे. या ग्रहांच्या स्थितिवरून पृथ्वीवर कोठें तरी भयंकर रणकंदन माजेल असा रंग आहे! शांतता अशी कोठेंच आढळणार नाहीं प्लेगाचा जोर विशेष वाढेल. व मोठा दुष्काळ पडेल. आगी, मारामाऱ्या, खून व अपघात यांचें हें वर्ष आगर आहे. पाऊसही नीट पडणार नाहीं! ठिकठिकाणीं भूकंपाचे धक्के बसून प्राणहानि होईल. सपटंबरमध्यें दोन चमत्कारिक योग आहेत. एक असा आहे कीं ता० २ व २९ या तारखांस चंद्रमंगळयुति असून ता. ३ व ३० या तारखांस चंद्रशनियुति आहे. यावेळीं मंगळ व शनि हे चंद्राच्या स्थानीं येतात व चंद्र त्यांच्या खालून जातो.

सर्व वर्षांत मार्च्य व सपटंबरमध्यें योग फार वाईट आहेत. मार्च्य महिन्याबद्दल झडकील लिहितो कीं 'मार्च्यमध्यें यूरोप, हिंदुस्थान व मेक्सिको यांस भय आहे. एका राजाला हद्दपार केलें जाईल. हिंदुस्थान, मेक्सिको, अफगाणिस्तान व इतर देश येथील राज्यकर्ते संकटावस्थेंत सांपडतील. सर्वत्र खळबळ उडेल. इंग्रज सरकारास आपल्या फायद्याकरितां व सत्तेकरितां अधिक सावध राहणें जरूर पडेल. ११ तारखेपासून २६ तारखेपर्यंत मोठ्या मोठ्या शहरांना आगीचें भय आहे. यूरोप व अमेरिका यांत अजार पसरेल. चीन व हिंदुस्थान यांत प्लेगापासून मोठी हानि होईल. हिंदुस्थानांत खून पडतील.'

सपटंबराबद्दल लिहितो कीं "हिंदुस्थानच्या एका भागांत मीठा राजद्रोह पसरेल. व्हाईसराय चिंताग्रस्त होतील. भूकंपाचे धक्के बसतील. इ०...."

१९०८ च्या नागपूरच्या राष्ट्रीय सभेचें आह्मी वर्तविलेलें भविष्य बरोबर उतरलें आहे १९०९च्या कांग्रेसला फार अनिष्ट योग आहेत. कारण, ता. २९ डिसेंबरला शनिमंगळयुति आहे. ही युति कांग्रेसला मारक आहे या वर्षी या महिन्यांत कांग्रेस भरवूंच नये असें आमचें मत आहे.

तात्पर्य असें दिसतें कीं हें वर्ष मागील सर्व वर्षांवर ताण करील! परमेश्वर सर्वांचें रक्षण करो!

मेषसंक्रमणकाल.



तनुस्थानीं मकर राशींत हर्शल व मंगळ असून त्यांची याच महिन्यांत युति आहे. हा योग सर्व जगांत क्रांति आणि असंतोष दर्शवितो. तनुस्वामी शनि मेष राशींत दुर्बल असून तो आपला शत्रु जो रवि त्यानें युक्त आहे व त्यांची ता० ३ एप्रिल या दिवशीं युति होणार आहे. दशमाचा अधिपति शुक्र हाही आपल्या शत्रूशीं युति करीत असल्यामुळें तो जरी उच्चांत बलवान् आहे तरी शत्रूशीं झगडावें लागणार आहे. या प्रमाणें सर्व ग्रह विग्रह करीत आहेत, ह्मणून सर्वत्र नाश आणि हाहाकारच होणार असें वाटतें! बगाल व उत्तर हिंदुस्थान येथील परिस्थिति अत्यंत बिकट होणार यांत शंका नाहीं. इंग्लंडचा निदर्शक राशि मेष हाही रवि व शनि यांनीं धरलेला असल्यामुळें या देशासही हें वर्ष चांगलें नाहीं. काय होणार असेल तें होवो, पण इतकें खास कीं राजे व राज्य यांचा या वर्षी निकट व काळजी करण्यासारखा व्यवहार होणार!

॥ शुभंभवतु ॥

कुंडलीविज्ञान.

पुस्तक १० वें.] पौष वद्य ७ मंगळवार [अंक २ रा

संपादकीय स्फुट विचार.

१ मनुष्याचें एकंदर पूर्ण आयुष्य १२० वर्षें आहे, असें आजपर्यंत सर्व लोक मानीत आले आहेत. परंतु कित्येकांनीं १०८ वर्षेंही मानिलें आहे. एकशें वीस वर्षें आयुष्य मानिल्यास प्रत्येक राशीच्या वांट्यास १०।१० वर्षें येतात व एकशें आठ वर्षें आयुष्य मानिल्यास ९।९ वर्षें येतात, ह्मणून जैमिनीय पद्धतीमध्यें ज्या अनेक प्रकारच्या दशा सांगितल्या आहेत त्यांत कांहीं मध्यें प्रत्येक राशीच्या दशेचीं वर्षें १०।१० प्रमाणें घेतलीं असून कांहीं मध्यें ९।९ प्रमाणें घेतलीं आहेत.

* * *

२ या वरून अशी एक कल्पना सुचते कीं, जर १२० वर्षें नऊ ग्रहांस विभागून दिलीं तर प्रत्येकास १३ व० ३ म० वाटणीस येतील. इतकें आयुष्य प्रत्येकाचें ३० अंशांस (एक राशीस) मानून भोग्य अंशांवरून त्रैराशिकानें मिळणारें आयुष्य काढावें. नंतर सर्व ग्रहांच्या आयुष्यांची बेरीज द्यावी. जी संख्या येईल तितकें त्या मनुष्याचें आयुष्य मानावें. उदाहरण—

रवि—मिथुन ६	शुक्र—कर्क १८
चंद्र—कर्क. २८	शनि—धनु २ व.

मंगळ–वृषभ १ हर्शल–कर्क १०
बुध–मिथुन १८ नेपच्यून–मेष १६
गुरु–मेष ७

या प्रमाणें प्रत्येक ग्रहाचे त्या त्या राशीवर भुक्त अंश आहेत. शनि वक्री आहे, ह्मणून त्याचे २८ अंश भुक्त असून २ अंश भोग्य आहेत असें मानावें. भुक्त अंश ३० अंशांत वजा दिले ह्मणजे भोग्य होतात. हे अंश अनुक्रमें—२४, २, २७, १२, २३, १२, २, २०, १४ असे आहेत. आतां त्रैराशिकानें या प्रत्येकाचीं वर्षें काढूं.

रवि. १० व. ८ म.	शुक्र–९ ब. ४ म.
चंद्र– ० व. १० म.	शनि–० व. १० म.
मंगळ–१२ व ० म.	हर्शल–८ व १० म.
बुध–९ व. ४ म	नेपच्यून–६ व. २ म.
गुरु–१० व. २ म.	एकूण–६० व. २ म.

* * *

३ अशा प्रकारच्या दशांस आपण **"नवग्रहदशा"** असें नांव देऊं, आतां या दशांचा आरंभ कसा करावयाचा तें सांगतों.

राशिचक्राचें आरंभस्थान जें मेष त्यापासूनच या दशांचा आरंभ करावयाचा. ह्मणून मेष राशीवर जो ग्रह आरंभीं असेल त्याची दशा प्रथम मानून नंतर वृषभ राशीवरील ग्रहाची दशा मानावयाची. एका राशीवर अनेक ग्रह असतील तर जो सर्वांत कमी अंशानें ग्रह असेल तो प्रथम घेऊन त्यापेक्षा अधिक अंशाचा ग्रह दुसऱ्यानें ध्यावा. जर दोन ग्रहांच्या युतिकाळींच जन्म झाला असेल तर जो ग्रह राशिपरत्वें व स्थानपरत्वें अधिक योग्यतेचा असेल त्याची दशा प्रथम ध्यावी. अशा रीतीनें येणाऱ्या ज्या ज्या दशा त्या महादशा समजाव्या.

वरील ग्रह ज्या कुंडलींतून घेतले आहेत, ती कुंडली अशी आहे–

जन्म—ता. २६ मे सन १८६८ रात्रीं १२ वाजतां.



या कुंडलींत मष राशींत गुरु ७ अंश आहे व त्याच्या पुढें नेपच्यून १६ अं. आहे. ह्मणून गुरुची दशा आरंभीं घेऊन पुढें नेपच्यूनची दशा ध्यावयाची. त्याच्या पुढें वृषभ राशीवरील मंगळाची दशा ध्यावयाची. या प्रमाणें पुढील दशा घेतल्यानें दशाक्रम खालील प्रमाणें येतो.

नवग्रहदशाक्रम

गु.	ने.	मं.	र.	बु.	ह.	शु.	चं.	श.
१०	६	१२	१०	५	८	५	०	०
२	२	०	८	४	१०	४	१०	१०

या प्रमाणें महादशा तयार झाल्यावर त्यांच्या अंतर्दशा तयार करण्या. त्या अशा.—

आपणास बुधाच्या अंतर्दशा तयार करावयाच्या आहेत अशी कल्पना करूं–आपला एकंदर आयुर्दाय ६० वर्षें २ महिने झाला आहे. ह्मणून

६० व २ म. : ५ व. ४ म. :: ५ व ४ म. : १०

या त्रैराशिकानें बुधाच्या महादशेंतील बुधाची अंतर्दशा येईल. ती ५ म. २० दि. आली. या नंतर हर्शलची अं. द. काढावयाची ह्मणून

६० व. २ म. : ८ व. १० म. :: ५ व. ४ म. : किती ?

या त्रैराशिकानें बुधाच्या महादशेंतील हर्शलची अंतर्दशा काढिली, ती ९ म. १२ दि. आली. अशाच रीतीनें सर्व अंतर्दशा तयार केल्या त्या खालील प्रमाणें आल्या.

बुधाच्या अंतरदशा

बु.	ह.	शु.	चं.	श.	गु.	ने.	मं.	र.
०	०	०	०	०	०	७	१	०
५	९	५	०	०	१०	६	०	११
२०	१२	२०	२७	२७	२४	१७	२६	१०

या प्रमाणें प्रत्येक ग्रहांच्या अंतर्दशा तयार कराव्या. या अतर्दशांच्या उपदशा तयार करावयाच्या असतील तर पुढील रीति योजावी.

प्रथमतः बुधाच्या उपदशा तयार करावयाच्या तर बुधाच्या अंतर्दशेचीं वर्षें ० म. ५ दि. २२ यांस त्यानींच गुणून गुणाकारास ६० व म. नीं भागावें. ह्मणजे बुधाच्या अंतर्दशेंतील बुधाचीच उपदशा तयार होईल. याच रीतीनें पुढील दशा तयार कराव्या. उपदशांच्या सूक्ष्मदशा व सूक्ष्मदशांच्या प्राणदशाही याच युक्तीनें तयार कराव्या.

४ कोणत्याही प्रकारच्या दशा असोत, जर ग्रह विकलांपर्यंत सूक्ष्म असेल तर उपदशा, सूक्ष्मदशा व प्राणदशा करण्यापासून बोध होईल. नाहींपेक्षां दशांचे काल स्थूल घेऊन फलादेश एकेक वर्षापर्यंतही चुकीचा येईल!

५वरील दशांचीं फलें इतर दशांप्रमाणें पहावीं. वाचकांना अनुभव घेण्यासाठीं या दशांचा आज इतकाच विचार पुरे आहे.

कुंडलीविज्ञान.

पुस्तक ९वें.] मार्गशीर्ष शु०९ मंगळवार [अंक २०वा

संपादकीय स्फुट विचार.

१ एकदां एका गृहस्थानें प्रश्न केला कीं—ग्रह हे परीणामकारक आहेत कीं परिणामसूचक आहेत?—प्रश्न फार महत्वाचा आहे. ज्योतिषी भविष्य वर्तवितांना जी भाषा वापरतो ती 'ग्रह हे परिणामकारक आहेत' असा बोध व्हावा अशी असते. ग्रहांचा विद्युच्छक्तीनें अथवा आकर्षणशक्तीनें प्राण्यांच्या शरीराशीं संबंध असणें शक्य असेल, पण त्यांच्या मानसिक विचाराशीं, व्यवहाराशीं आणि प्रारब्धाशीं संबंध असण्याचें काय कारण याचा उलगडा अद्यापि कोणीही केलेला नाहीं व करितां येणेंही कठीण आहे. ह्मणून 'ग्रह हे परिणामकारक' नसून ते 'परिणामसूचक' असले पाहिजेत असें वाटतें. पंचम स्थानीं मंगळ असला ह्मणजे तो 'गर्भाला अपाय करितो,' याचा अर्थ तो 'गर्भाला अपाय होईल असें सुचवितो' असा करावा असें आह्मांस वाटतें. मनुष्य उत्पन्न झाला ह्मणजे त्याच्या शरीराची ठेवण, स्वभाव, शारीरीक भोग इ०गोष्टी त्या वेळीं आकाशात जी ग्रह स्थिति असेल तिला धरून असते यांत मात्र कांही इतका संशय नाहीं. ग्रह हे परिणामकारक आहेत कीं परिणामसूचक आहेत या शाब्दिक वादाशीं आपणास कांहीं कर्तव्य नाहीं. परिणामकारक असले तरी ते कां आहेत किंवा परिणामसूचक असले तरी ते तसे कां असावे, याचें उत्तर समाधानकारक देतां येणें कोणालाच शक्य नाहीं.

२ फलज्योतिष हें शास्त्र निसर्गसिद्ध नसून तें ग्रहांचे गुणधर्म पाहून त्यांवरून बसाविलेलें आहे. ग्रहांचे तेज, आकार, द्रव्य,

आकर्षणशक्ति व त्यांचें भ्रमण या गोष्टी लक्षांत घेऊन त्या गोष्टी प्राण्यांच्या शरीरांशीं व व्यवहाराशीं जुळवून घेतल्या आहेत. मंगळाचें तेज तांबडें आहे. तांबडा वर्ण हा तामसगुणाचा दर्शक आहे, ही गोष्ट प्रत्यक्ष आहे. ह्मणून मंगळ हा या गुणाचा कारक मानिला गेला. पुढें या तत्वाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला तो तंतोतंत जुळला. मंगळ अमुक स्थितींत असला ह्मणजे तामसवृत्ति उद्दीपित होते याही गोष्टीचा त्याच्या परिभ्रमणावरून अनुभव घेतला तेव्हां मंगळाच्या हालचालींवरून भविष्यही करितां येऊं लागलें. याच प्रमाणें प्रत्येक ग्रहावरून फलज्योतिष हें शास्त्र तयार झालें आहे. तेव्हां यावरून ग्रह हे परिणामकारक आहेत कीं परिणामसूचक आहेत याचा उलगडा ज्यानें त्यानें आपल्या मतानें करावा. कांहीं ह्मटलें तरी शास्त्राच्या सत्यतेला बाध येत नाहीं. कित्येकांना असें वाटतें कीं, या गोष्टीचा निर्णय जर ज्योतिष्यास करितां आला नाहीं, तर या शास्त्रांत कांहीं अर्थ नाहीं. त्यांस आमची विनंति आहे कीं, या शाब्दिक वादांत आरंभींच पडण्यापूर्वी शास्त्राचा अनुभव प्रथम घ्यावा. अनुभवानंतर या प्रश्नाचा विचारानें आपोआप खुलासा होईल.

३ उपपत्तिदृष्ट्या विचार केला ह्मणजे 'ग्रह हे परिणामकारकच' असले पाहिजेत असें दिसतें. पण यांचें समर्थन पूर्णपणें करितां येत नाहीं ह्मणून तें करण्याचें सामर्थ्य येईपर्यंत 'ग्रह हे परिणामसूचक' आहेत असें ह्मणावें 'असा वरील लिहिण्याचा आशय आहे.

४ दुसऱ्याचा घातपात करणारीं जीं कृत्यें त्यांच्या कारस्थानांस कृष्णकारस्थान हें नांव आहे. यावरून असल्या कृत्यांचा वर्ण काळा असला पाहिजे. शनीचा वर्णही अशाच प्रकारचा असल्यामुळें शनीच्या भ्रमणानुसार असल्या कृत्यांची हालचाल झाली पाहिजे. सांप्रत शनि हा मेष या अग्निराशींत आहे. शनि या राशींत नीच असतो. व ह्मणून तो अशुभ किंवा अनिष्ट असा मानला जातो. यामुळें सर्व जगांत कृष्णकारस्थानांची रेलचेल झालेली दृष्टिस पडत आहे. मंगळ हा शनीच्या विरुद्ध धर्माचा ग्रह आहे, त्यामुळें या दोन ग्रहांचें शत्रुत्व मानिलें आहे. एकाच्या लग्नीं शनि असेल व दुसऱ्याच्या लग्नीं मंगळ हा असेल तर त्या दोन मनुष्यांचें कधींच सख्य होणार नाहीं, इतकेंच नाहीं तर त्यांच्यांत मारामारीसुद्धां झाल्याशिवाय राहणार नाहीं. जीं दोन माणसें एकमेकांचा खून करण्यास प्रवृत्त होतात त्यांच्या कुंडल्या दृष्टीस पडतील तर वरील गोष्टींची सत्यता दृष्टीस पडल्याशिवाय राहणार नाहीं. जन्मकालीं जरी हे ग्रह लग्नीं नसले तरी आपल्या भ्रमणगतीनें ते जेव्हां दोन माणसांच्या लग्नीं येतील तेव्हां त्यांच्यांत कलह, शिवीगाळी किंवा मारामारी झाल्याशिवाय राहणार नाहीं. हेच ग्रह एकमेकांच्या जन्मनक्षत्रीं असतां अगर भ्रमणानें आले असतांही तसाच प्रकार घडल्याशिवाय राहणार नाहीं. सांप्रत मंगळही मेष राशींतच आहे या राशींत मंगळ प्रबळ असतो. मेष हें मंगळाचें घर आहे. या घरांत सांप्रत शनि आला आहे व त्याची मंगळाशीं ता. २९ ला युति आहे. यावरून गुप्त कृत्यांनीं खून, मारामाऱ्या यांचा सुकाळ झाला पाहिजे असें अनुमान निघतें. हें अनुमान बहुतेक खरें ठरल्यासारखें झालें आहे. ही युति होणार त्याच्या पूर्वीचा एक आठवडा व नंतरचा एक आठवडा याकडे आपणास दृष्टि दिली पाहिजे, व तशा गोष्टी घडतात किंवा नाहीं हें पाहिलें पाहिजे.

५ ग्रहांचें शत्रुमित्रत्वही वर्णावरूनच कल्पिलेलें असावें असें वाटतें. सूर्याचे शुक्र–शनि, मंगळाचा बुध, बुधाचा चंद्र, गुरुचे बुध–शुक्र, आणि शनीचे रवि, चंद्र, मंगळ हे शत्रु आहेत असें शास्त्रांत कल्पिलेलें आहे. "रक्तश्यामो दिवाधीशो, गौरगात्रौ निशाकरः ॥ अतुश्चांगो रक्तभौमो दूर्वाश्यामो बुधस्तथा ॥ गौरगात्रौ गुरुर्ज्ञेयः शुक्रः श्यामस्तथैवच ॥ कृष्णदेहो रवेः पुत्रो ज्ञायते द्विजसत्तम ॥" या श्लोकांवरून—

रवि चंद्र भौम बुध गुरु शुक्र शनि
रक्तश्याम गौर रक्त दूर्वाश्याम गौर श्याम कृष्ण

ग्रहांचे वर्ण अशा प्रकारचे आहेत असें आपल्या प्राचीन ऋषींनीं ठरविलें आहे. सूर्याचा वर्ण रक्तश्याम असल्यामुळें तो पाप ग्रह मानिला आहे. कृष्ण व रक्त वर्णाचे ग्रह मनुष्यांस मारक आहेत. यांस पाप ग्रह

ह्मणतात- इतर वर्णाचे ग्रह शुभ फलें देणारे आहेत. हा वर्णाचा विषय मानसशास्त्राशीं मिळता आहे व तो अलीकडील थिऑसॉफिस्ट लोकांसही मान्य आहे. यावरून फलज्योतिषाचा पाया सत्यावर व प्रत्यक्षावर उभारलेला आहे हें कबूल केलेंच पाहिजे. शनीचे रवि, चंद्र आणि मंगळ हे शत्रु मानिले आहेत. यांत रवि व मंगळ यांचा वर्ण तांबडा असून चंद्राचा पांढरा आहे. मनुष्य क्रोधाविष्ट झाला ह्मणजे त्याचे डोळे इंगळासारखे लाल होतात, अर्थात तो ताम्र वर्णाचे किरण बाहेर फेकूं लागतो, तो शांत वृत्तींत असला ह्मणजे तेजस्वी व शुभ्रवर्णांकित असे त्याचे नेत्र दिसतात, अर्थात् त्या वेळीं तो शुभ्रकिरण फेकू लागतो, आणि कपट, नीच वासना इ०मनोधर्म उद्दिपत झाले ह्मणजे तो काळा ठिक्कर दिसूं लागतो, अर्थात् त्यावेळीं तो कृष्ण वर्णाचे किरण बाहेर फेकूं लागतो, नीच मनोवृत्ति व सात्विक आणि तामस मनोवृत्ति यांचें शत्रुत्वच असणार नव्हे काय? तात्पर्य, शनीचे रवि, चंद्र व मंगळ हे जे शत्रु आहेत असें फलज्योतिष सांगतें, तें उपपत्तीला धरूनच आहे. ढोंगी लोकांचें तर्कट नाहीं हें वाचकांच्या सहज लक्षांत येईल. गुरूचा वर्ण गौर असतां तो शनीचा शत्रु न मानितां सम मानिला आहे. ह्मणजे तो त्याचा मित्रही नव्हे व शत्रुही नव्हे असें कल्पिलें आहे तें कां, अशी सहज शंका येते. पण सर्वार्थचिंतामणींत वर्णाचा श्लोक आहे तो असा:—

रक्तः श्वेतोतिरक्तो हरीतकनकरुक् चित्रनीलारतुनाथा—॥

या श्लोकांत चंद्राचा पांढरा व गुरुचा सुवर्णासारखा अर्थात पीत असा आहे. हा पीत वर्ण कृष्णवर्ण यांत मित्रत्वही नाहीं व शत्रुत्वही नाहीं हें उघड आहे. याचप्रमाणें इतर सर्व ग्रहांच्या शत्रुमित्रत्वाची उपपत्ति लागते.

१ फलज्योतिषाचा पाया तर उपपत्तिसिद्ध आहे. पण आकाशस्थ ग्रहांचा व आपला कां संबंध असावा हें कळत नाहीं. संबंध मात्र खात्रीनें आहे. बरोबर कारण कळेपर्यंत 'ग्रह हे परीणाम सूचकच' आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

— — —

कुंडलीविज्ञान.

पुस्तक १० वें.] माघ शु० ६ मंगळवार [अंक २ रा

संपादकीय स्फुट विचार.

समुद्रसंपादकांनीं आपल्या एका अंकांत अकबराची कुंडली घेऊन तिचा त्याच्या स्थितीशीं मेळ घातला आहे. परंतु त्यांनीं जो जन्मकाल घेतला आहे, त्या कालची ती कुंडली नसल्यामुळें वर्णनाची सर्व इमारत एकदम ढासळली आहे! त्याची ही नजरचूक झाली आहे. कुंडली खरी असेल असें समजून तिचें त्यांनीं वर्णन केलें ऐतिहासिक किंवा पौराणिक राजपुरुषांच्या कुंडल्या पुष्कळांच्या संग्रहीं आहेत. पण त्या खऱ्या आहेत असें मानण्यास आधार नाहीं. ह्मणून असल्या पुरुषाचे विश्वसनीय जन्मकाल मिळवून त्यांवरून कुंडली तयार केली पाहिजे व नंतर तिचा मेळ घेतला पाहिजे. समुद्रसंपादकांची चूक झाली ती येथेंच. पण ती साहजिक झाली आहे, व नेहमीं कुंडल्या पाहणारांस हा अनुभव नित्य आहे, परंतु आपण जी कुंडली वर्तवणार ती आपल्या समजुतीप्रमाणें त्याच मनुष्याची आहे अशी खात्री झाल्या शिवाय तिचें वर्णन कधींच करूं नये हें निदान ग्रंथकारांनीं तरी विसरतां कामा नये.

* * *

चूक सहज झाली. पण प्रश्न बिकट उत्पन्न झाला आहे! कुंडली खरी नसतांही (कोणतीही असली तरी) ती पटवून देतां येते, या अर्थी ज्योतिःशास्त्र विश्वसनीय नाहीं, तें कांहीं तरी पोटभरू लोकांचे थोतांड आहे अशी समजूत पसरण्याचा संभव आहे. सुशिक्षितांचें अलीकडे किंचित् लक्ष लागूं लागलें आहे, तोंच त्यांच्या समोर ही कृति गेल्यानें ते एरुसहा सर्व ज्योतिष्यांस किंवहुना ज्योतिःशास्त्रासही दूषणें देऊन थट्टा करूं लागतील तर त्यात मोठेंसें आश्चर्य नाहीं.

❀ ❀ ❀

अकबर हा हिंदुस्थानचा सार्वभौम राजा होता, म्हणून त्यास राजयोग असला पाहिजे. समुद्रसंपादकांनीं जी कुंडली घेतली आहे ती एखाद्या सार्वभौम (सर्व पृथ्वीच्या) राजाला किंवा अवतारी पुरुषाला शोभशी आहे यांत शंका नाहीं. म्हणून या दृष्टीनें ती अकबराची नसेलच असें सकृद्दर्शनीं न वाटणें साहजिक आहे. राजयोग अनंत आहेत त्यामुळें कोणत्याही प्रकारची कुंडली राजाची नसेल असें कसें म्हणावें? वकिलीचे योग अनेक आहेत, प्रत्येक वकिलास कोणता तरी योग असणारच. तरी अमुक एका कुंडलींत तो योग आहे, म्हणून ती अमक्या वकिलाचीच आहे असें मात्र म्हणतां येणार नाहीं. तसेंच राजयोग आहे म्हणून ती अकबराचीच आहे असें मात्र म्हणतां येणार नाहीं. शारीरिक लक्षणें, कुटुंबांतील कुंडल्या व इतर घडलेल्या गोष्टी यांच्याशीं त्या कुंडलीचा मेळ शास्त्रीय पद्धतीनें बसला पाहिजे, म्हणजे ती कुंडली खरी आहे असें मानतां येतें. इतिहासांत राजपुरुषांचे जन्मकाल तारखेपर्यंत जसे दिलेले असतात, तसे ते वेळेपर्यंत नसतात, म्हणून असल्या पुरुषांच्या कुंडल्या विश्वसनीय मानतां येत नाहींत. जन्माच्या दिवसांत सुद्धां मतभेद असतात. मग वेळेबद्दल काय विचारावें?

एखाद्याची कुंडली वर्णनाशीं मिळते म्हणून ती खरी आहे असें मानणेंच चुकीचें आहे. वाग्भटांत रोग्याची परीक्षा (दर्शनस्पर्शनप्रश्नैः परीक्षेताथ रोगिणां) रोग्याकडे पाहून, शरीराचे अवयव तपासून व त्याला कित्येक प्रश्न विचारून करावी असें सांगितलेलें आहे. हल्लींचे डाक्टर सुद्धां याच मार्गानें परीक्षा करितात. ज्योतिष्यानेंही कुंडलीची परीक्षा वरील तीन प्रकारानीं केली पाहिजे. समुद्रसंपादकांनीं फक्त एकच बाजू वाचकांच्या पुढें मांडली आहे, पण तीवरून ती अकबराचीच कुंडली आहे असें सिद्ध होणार नाहीं. ज्योतिःशास्त्राची सत्यता सिद्ध करणाऱ्या संपादकांनीं ऐतिहासिक अगर पौराणिक पुरुषांच्या कुंडल्या देतांना त्या पुरुषांचें शारिरीकलक्षण, त्यांचा फोटो, त्यांच्या नातलगांच्या कुंडल्या व त्यांचीं चरित्रें या सर्वांशीं मेळ घालून दिला पाहिजे. तो घालतां येत नसेल तर त्या कुंडल्या देण्याच्या भानगडींत पडूं नये हा उत्तम पक्ष.

❀ ❀ ❀

समुद्रसंपादकांनीं आपल्या अंकांत खालील प्रमाणें कुंडली दिली आहे.

ता. १९ अक्टोबर १९४२



जन्म अक्टोबरांतला असून रवि मेषेचा उच्च घेतला आहे, ही चूक सहज नजरेस पडणारी आहे. संपादकांचें दुर्लक्ष झालें तें

येथेंच. एक रवि चुकल्यामुळें बुध व शुक्र हेही चुकीचे निघाले. दुसरी गोष्ट, हल्लींच्या पद्धतींत बुध हा रवि पासून इतका दूर जाणें शक्य नाहीं. ही कुंडली एखाद्या राजाचीच असेल, पण ती अकबराची नाहीं. इंदुप्रभेंत जो यावर टीकात्मक लेख प्रसिद्ध झाला आहे, त्यांत अकबराची जन्मतारीख १४ आहे असें झटलें असून हुमायुनानें केलेली उत्तर हिंदुस्थानांत प्रचारांत असलेली कुंडली खालील प्रमाणें दिली आहे.



यावरून सायन कुंडली केरोपंती ग्रहसाधनांच्या आधारें तयार केली आहे ती अशी.—



यावरून हुमायुनानें केलेली कुंडली बरोबर असावी असें अनुमान होतें. या सर्व कुंडल्यांत राजयोग आहेत व ते निरनिराळे आहेत. यामुळें राजयोगावरून कुंडलीचा खरेपणा कळणार नाहीं. खोपणा सिद्ध करण्यास बाप व मुलें यांच्या कुंडल्या मिळाल्या पाहिजेत व त्या खऱ्या असल्या पाहिजेत. त्याच प्रमाणें त्याचें शारीरवर्णन व इतर खासगी गोष्टी समजल्या पाहिजेत. एरवीं सर्व प्रयत्न व्यर्थ आहे अशी आमची समजूत आहे.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम् ।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥

'भवभूति'

पुस्तक १० वें.]फाल्गुन शु० ४ मंगळवार [अंक ५ वा

संपादकीय स्फुट विचार.

मेष, सिंह व धनु हे अग्निराशि आहेत. वृषभ, कन्या व मकर हे पृथ्वीराशि आहेत. मिथुन, तूळ व कुंभ हे वायुराशि आहेत व कर्क, वृश्चिक आणि मीन हे जलराशि आहेत असें पाश्चात्य ज्योतिषी मानतात.

आमच्या ग्रंथकारांनीं कर्क, वृश्चिक, मकर व मीन हे जलराशि, वृषभ, मिथुन, कन्या व कुंभ हे जलाश्रयी राशि व मेष, सिंह, तुला व धनु हे निर्जलभूमितलस्थ राशि असे वर्ग करितात.

रवि आणि मंगळ अग्निग्रह, चंद्र व शुक्र हे जलग्रह, बुध भूग्रह, गुरु आकाश ग्रह व शनि वायुग्रह याप्रमाणें ग्रहांचे वर्ग आहेत.

आमच्या मतें आमच्या ग्रंथकारांनीं जे राशींचे तीन वर्ग केले

आहेत, त्यांच्यापेक्षां पाश्चात्य ज्योतिष्यांचे वर्ग बरे आहेत. परंतु कित्येक गोष्टींचा विचार करितांना अनुभवानीं असें दिसून येतें कीं मकर हा जलराशीच घेतला पाहिजे. व वृश्चिक हा जलरातून सोडला पाहिजे. ह्मणजे कर्क, मकर व मीन हे तीन जलराशि आहेत असें ह्मटलें पाहिजे. जातकपारिजातामध्यें राशींचीं निवासस्थानें सांगितलीं आहेत, त्यांत असें ह्मटलें आहे—कर्क, विहिरी, तळीं व वाळवंटच्या जमिनी. मकर, नद्या व जलमय अरण्यें. मीन, नद्या, समुद्र वगैरे जलाशय आणि वृश्चिक, खडकाळ जमीन व विषारी जनावरांचीं बिळें. यावरून वृश्चिक हा जलराशींत गणतां येत नाहीं असें सिद्ध होतें.

आमच्या ग्रंथकारांनीं अग्निराशि कोणते हें सांगितलें नाहीं पाश्चात्यांनीं मेष, सिंह व धनु हे अग्निराशि मानिले आहेत. परंतु अनुभव मात्र मेष आणि सिंह या दोनच राशींचा चांगला येतो. त्याचप्रमाणें तूळ व कुंभ हे वायुराशि आणि बाकीचे पृथ्वीराशि असें मानणें जास्त अनुभवाचें आहे.

रवि व मंगळ अग्निराशींत असतां अत्यंत उष्णता उत्पन्न करितात. चंद्र व शुक्र हे जरी जलग्रह मानले असले तरी चंद्र हा जलराशींत आर्द्रता जास्त उत्पन्न करितो असा अनुभव येतो. शनि हा वायुग्रह वायुराशींत असतां कोरडेपणा उत्पन्न होतो, वाताची हालचाल जास्त होते व तो अधिक प्रमाणाचा उत्पन्न होतो. बुध, गुरु व शुक्र हे पृथ्वीराशींत असतां समान स्थिति राहते असा अनुभव येतो.

जलराशींत चंद्र असून शनि त्याच्याशीं योग करील तर दमा, खोकला, पडसें वगैरे सर्दीचे आणि शीतवातात्मक विकार सदोदित असतात. मकर राशींत तर चांगलाच अनुभव येतो. वायुराशींत जरी हा योग झाला तरी मुख्यत्वें सर्दीचा दोष निरंतर शरीरात राहतो. शनि, चंद्र व लग्न हीं तीनही जर जलराशींत अगर

वायुराशींत असतील तर निश्चयानें सर्दीचे विकार होतील. सदोदित पडसें असणें किंवा वारंवार होणें किंवा झाल्यावर लवकर बरें न होणें, घसा बसणें, बोलतांना खंकारणें, लाळ गळणें किंवा चूळ सुटणें किंवा वारंवार थुंकणें, वारंवार खोकला होणें व झाल्यावर लवकर बरा न होणें, दमा, वारंवार थंडी वाजून ताप येणें इत्यादि सर्दीचे विकार आहेत.

जलराशींत अग्निग्रह जे रवि व मंगळ ते जर शनि अथवा चंद्र याच्याशीं योग करितील तर भयंकर व्याधि उत्पन्न करितील. अपस्मार, झटके, अर्धांगवायु, चातुर्थिकादि शीतज्वर, पिनस, संग्रहणी, वगैरे विकार होतील व पाण्यांत बुडण्याचे वारंवार प्रसंग येतील.

अग्निराशींत जर रवि व मंगळ यांचा योग असेल तर त्या मनुष्याची प्रकृति अतिशय उष्ण असेल व त्या मनुष्यास रक्तविकार व उष्णतेचे विकार उत्पन्न होतील आणि वारंवार त्यांच्यापासून त्रास भोगावा लागेल. मूळव्याध, जाळवात. रक्त पडणें, मस्तक तापणें, अंग सदा कढत असणें, डोळे लाल असून त्यांची आग होणें, भाजणें, जखम होणें, गळवें, गजकर्ण, महारोग, भगंदर व व्रण वगैरे रोग, गोवर. व देवी येतांना भयंकर ताप, थंडी भरल्याबरोबर येणारे ताप, सुदतीचे व सन्निपाताचे ज्वर इत्यादि विकार हे ग्रह अग्निराशींत असतां होतात. या राशींत या ग्रहांशीं जर शनि किंवा हर्शल यांचा योग होईल तर मोठाले जन्ममर बाधणारे विकार होतात व प्रत्येक दुखण्याच्या वेळेस मृत्युतुल्य वेदना होतात. अपघात होतात किंवा दुसऱ्या कोणत्याही रीतीनें शरीराची मोडतोड किंवा नासाडी होते. मरणही फार कष्टप्रद स्थितीनें येतें.

बुध गुरु व शुक्र यांचा धर्म असा दिसतो कीं ते ज्या गुणधर्माच्या राशींत असतात ते गुणधर्म चांगल्या स्थितींत मनुष्याला सुखप्रद होतात. व ते जरी पाप ग्रहांनीं दूषित झाले तरी विशेष अनिष्ट करीत नाहींत.

कुंडलींत राशींवरून जो विचार होतो तो बराच स्थूल असतो. मेष हा अग्निराशि आहे व या राशींत मंगळ आहे अशी कल्पना करा. तर मेष आणि मंगळ यांच्या मेलनाचें जें उष्णतेच्या विकाराचें फल तें पूर्णपणें अनुभवास यतेंच असें नाहीं. एखाद्याच्या कुंडलींत मेष राशीचा जर लग्नीं मंगळ असला तर त्याचें शरीर फार उष्ण असलें पाहिजे, शिरोभागाला कोणत्याही प्रकारें जखमा होऊन त्याच्या शरीरावर खुणा असल्या पाहिजेत, त्याला पुष्कळ वेळां अपघात झाले असले पाहिजेत वगैरे जीं आपण अनुमानें करूं तीं खात्रीनेंच अनुभवास येतील असें समजूं नये. कारण फलज्योतिष हें राशिवर फार स्थूल असतें. मेष राशीचेच असे कांहीं अंश आहेत कीं त्यांत मंगळ लग्नीं असेल तर आपलें वरील अनुमान तंतोतंत मिळेल. यासाठीं आपणास आपलें ज्ञान अंशांपर्यंत नेणें जरूर आहे. परमेश्वरी लीला अगाध आहे त्यामुळें अंशांपर्यंत जरी ज्ञान झालें तरी तेवढ्यानें उद्यां काय होईल हें सांगतां येईल कीं नाहीं याची शंकाच आहे ! कारण तसें मानव्यास परमेश्वराच्या कर्तृत्वशक्तीला कमीपणा येतो. साधारणतः मोठा प्राणी म्हणजे आपण हत्ती समजतों, पण महासागरांत एवढे मोठे प्राणी आहेत कीं ते आपल्या पोटांत १०।१५ हत्ती सहज सांठवूं शकतात! त्याच प्रमाणें पाण्याच्या एका थेंबांत जर सूक्ष्मदर्शक यंत्रानें अवलोकन केलें तर लक्षावधि जीव इतस्ततः आपला जीवनक्रम चालवीत वाहेत असें दृष्टीस पडतें ! यावरून परमेश्वरी मर्यादा जाणण्यास कोण समर्थ आहे हें कळून येईल. मनुष्यानें नेहमीं स्थूलापासून सूक्ष्माकडे अवलोकन करण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. पण अमुक मर्यादेच्या पलीकडे आतां परमेश्वरीकर्तृत्व तिळभरही राहिलं नाहीं असें मानणें मूर्खपणा नव्हे तर काय ?

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम् ।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधि विपुलाच पृथ्वी ॥

'भवभूति'

पुस्तक १०. वें.] चैत्र शु० ६ शुक्रवार [अंक ६ वा

संपादकीय स्फुट लेख.

आई अगर बाप यांचें लग्न किंवा रास सांगतां येण्याची एक कल्पना आहे. एखाद्याची कुंडली प्रथम मागून घ्यावी. नंतर त्याच्या चेहऱ्यावरून व बोलणें, हावभाव इत्यादिकांवरून तो आईच्या वळणाचा आहे कीं बापाच्या वळणाचा आहे, याची कल्पना करावी व त्यावरून तो ज्याच्या वळणाचा असेल त्याचा लग्न राशि अगर चंद्र सांगावा. मनुष्य पाहून तो कोणाच्या वळणाचा असला पाहिजे. हें सांगतां येतें असा अनुभव आहे. हें कसें सांगतां येतें तें लिहून दाखवितां येत नाहीं. अवलोकनानें हें ज्ञान होतें यांत शंका नाहीं.

* * *

एखादा मनुष्य बसला असतां त्याच्या बसण्याच्या तऱ्हेवरून

व त्याच्या मुद्रेवरून तो अमुक एका प्रकारचा विचार करीत असली पाहिजे असें सांगतां येणें शक्य आहे. हें एक शास्त्र आहे. व जर कोणी त्याच्यावर एखादा ग्रंथ करील तर तो होण्यासारखा आहे. मुंबईच्या आमच्या एका मित्रानें या विद्येवर बराच विचार केला आहे असें अनुभवास आलें आहे. मनुष्य आनंदांत असला ह्मणजे कसा बसतो, मुद्रा कशी करितो व हालचाल कशी करितो या गोष्टींचें बारकाईनें निरीक्षण करून तसा प्रकार दृष्टीस पडतांच अमुक मनुष्य मोठ्या आनंदांत आहे असें निश्चयानें सांगतां येणें शक्य आहे. मनुष्य मिशांना पीळ केव्हां देतो, दाढीचे अगर मिशांचे केंस केव्हां उपटतो, बैठक कोणत्या प्रसगीं कशी मारतो, कोणत्या प्रसंगीं कशी मुद्रा करितो वगैरे गोष्टी टिपून ठेविल्यास हें ज्ञान सहज होईल.

* * *

जीं मनुष्यें बसलीं असतां हनुवटीखालीं हाताचा टेंका देतात, तीं उत्तम बुद्धिमान् असून मुत्सदी, कल्पक विचारी व शोधक असतात. जीं ताठ बसतात तीं दुसऱ्याला तुच्छ मानणारीं असून मोठीं गर्विष्ठ असतात. शाळा मास्तरांस कोणतीं मुलें कोणत्या प्रकारचीं आहेत याची कल्पना करितां येण्यासारखी आहे. शिकवीत असतां कोणता मुलगा कोणत्या स्थितींत बसला आहे तें पाहून त्याच्या बुद्धीची व विचाराची बरोबर कल्पना करितां येईल.

* * *

कानावरून मनुष्याच्या श्रीमंतीची परीक्षा होते असें कित्येकांचें मत आहे. पातळ, पारदर्शक व लहान असलेले कान दुःख व दारिद्र्य दर्शवितात. कानाच्या पाळ्या जाड व मोठ्या असतील

तर तो मनुष्य संपत्तीचें सुख उपभोगील व पैशाचा संग्रह करून असेल. मोठे असून पुढें लवलेले कान श्रीमंतीचे दर्शक आहेत.

* * *

हातावर जर लहान लहान फार रेषा असतील तर तो मनुष्य जन्मभर ओढघस्त असेल. पैसा कितीही मिळाला तरी तो त्याला पुरा पडणार नाहीं. त्याच्यावर संसाराचें ओझें विशेष पडतें.

* * *

घारे डोळे व गोरा वर्ण यांचा संबंध असावा असें वाटतें. कारण, गोऱ्या माणसांत घाऱ्या डोळ्यांचें प्रमाण अधिक आढळतें. काळा मनुष्य घारा क्वचित् असेल. काळ्या माणसांत जीं घारीं मनुष्यें दिसतात त्यांच्या घारेपणांत तांबुसपणाची झाक विशेष असते व गोऱ्या माणसांत हिरवटपणाची झांक विशेष असते. मेष, सिंह व धनु हे अग्निराशि व रवि, मंगळ आणि हर्शल हे ग्रह आणि लग्न, द्वितीय व द्वादश हीं स्थानें घारेपणास व पिंगटपणास कारण आहेत असें दिसून येतें. डोळ्यांच्या अशा प्रकारच्या तेजावरून मनुष्याच्या स्वभावाची पारख होते असें ह्मणतात. घाऱ्या व पिंगट डोळ्यांत कावेबाजपणा विशेष असतो असें दिसतें. नील वर्णाचे डोळे सत्व गुणाचे दर्शक आहेत. तांबुस वर्णाचे डोळे तमोगुणाचे दर्शक आहेत. मलीन वर्णाचे डोळे पापबुद्धीचे दर्शक आहेत.

* * *

जाड व रांठ केश दारिद्र्यदर्शक आहेत. सूक्ष्म व अल्प केशांचीं माणसें तमोगुणी असावीं. अंगावर केश फार असतील तर तो मनुष्य दयाळू व उदार असला पाहिजे. कानांवर केश असतील तर तो मनुष्य भाग्यशाली जाणावा. ऊष्णप्रकृतीच्या माणसांच्या

अंगावर केश कमी असतील, कफप्रकृतीच्या माणसांवर केश फार असतात, वातप्रकृतीच्या माणसांवर केश राठ असतात. केसांवरून आयुष्याचें निदानही होतें असें ह्मणतात.

* * *

मनुष्याच्या शरीरांत ज्या मानानें ऊष्णता अधिक त्या मानानें त्याची कातडी पातळ असेल. कातडी पातळ असेल तर मनुष्य तल्लख स्वभावाचा व अति चपळ असेल. जाड कातडीचा मनुष्य मंद व गंभीर असेल.

* * *

एका गृहस्थाचें ह्मणणें आहे कीं, चंद्राजवळ जर पाप ग्रह असेल तर त्या मनुष्याची नखें काळीं असतात. पण हें ह्मणणें सर्वांशीं खरें नाहीं. नखें काळी असतां चंद्राजवळ पाप ग्रह आहे असें अनुमान करणें चुकीचें नाहीं, पण चंद्राजवळ पाप ग्रह आहे ह्मणून त्या मनुष्याचीं नखें काळीं असलीं पाहिजेत असें जर कोणी ह्मणेल तर मात्र तें अनुभवास येईलच असें वाटत नाहीं. कारण ग्रह हे विशिष्ट राशीच्या विशिष्ट अंशांत मात्र परिणाम करितात. हे विशिष्ट प्रकार जर अवगत असतील तर मात्र निश्चयात्मक फल सांगतां येईल, एरवीं येणार नाहीं असें समजावें.

* * *

ग्रह व राशि यांचा शारीरलक्षणांशीं मेळ घेत गेल्यास उत्तम प्रकारचें सामुद्रिक शास्त्र तयार होईल. पण असले शोध राजाशिवाय होत नसतात. एकाच प्रकारचें लक्षण अनेक ठिकाणीं अनुभवास आल्याशिवाय तें खरें आहे असे ह्मणतां येत नाहीं व असा पुष्कळ अनुभव घेण्यास शोधकाला राजाशिवाय दुसरा पोशिंदा नाहीं.

र. नं. बी. ४५५

कुंडलीविज्ञान.

पाक्षिक.

कालात्मा दिनकृन्मनस्तु हिमगुःसत्वं कुजोज्ञोवचो
जीवो ज्ञानसुखं सितश्च मदनो दुःखं दिनेशात्मजः॥
राजानौ रविशीतगू क्षितिसुतो नेता कुमारो बुधः॥
सूरिर्दानवपूजितश्च सचिवौप्रेष्यःसहस्रांशुजः॥१॥

(बृ० जा०

पु०१०]ता १मे रविवार १९१०[अंक७वा

विषयानुक्रम

१ संपादकीय स्फुट लेख. २ बोलंतिणीच्या खोलींतील स्थिति. ३ गर्भसंभव. ४ श्रीधूतपापेश्वरपंचांग. ५ श्रीयुत अनंत श्रीधर कोटीभास्कर. ६ पत्रव्यवहार. ७ शनीचें भ्रमण. ८ प्रसूति आणि मातृनिधन. ९ सूचना, पोंच, फोटो नं. ३ चे उत्तर, जगद्वृत्त, आहिरात (टायटलपेज.)

संपादक—विष्णु गोपाळ नवाथे.
पो० महाड, जि० कुलाबा.

हें पुस्तक गणेश गोपाळ नवाथे यांनी आपल्या "चंडाकिरण" प्रेस गथ्थें छापून महाड येथें नव्या पेठेतील जुन्या पोष्टाच्या घरांत "कुंडलीविज्ञान" ऑफिस मध्ये संपादकाकरितां प्रसिद्ध केलें.

वार्षिक वर्गणी टपाल खर्च सह २।७
फुटकळ अंकास ४२ आणे.

सूचना.

ता. १० मे पासून आमचा मुक्काम मुंबई येथें होणार आहे. "संपादक कुंडलीविज्ञान"

पोंच.

"**वैश्य मासिक**" या पुस्तकाचा १ ला अंक पावला. श्रीयुत विश्वनाथ गोपाळ शेट्ये यांनी गिरगांव नं. ४ वैश्यमासिक ऑफिस यांत प्रसिद्ध केलें जातें. वार्षिक वर्गणी रु. ख महे १ रु. ३ आणे आहे. कोकणस्थ वैश्यसमाजच्या उन्नतीकरितां या मासिकाचा जन्म आहे विषय वाचनीय आहेत.

फोटो नं १ चें उत्तर.

प्रो. भिसे यांची जन्मकुंडली येणें प्रमाणें.

लग्न	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.
मेष	वृषभ	कुंभ	सिंह	मेष	मीन	मेष
२१।५४	८।११।२०	२९।५७	१।२५	११।४३	८।१९	०।१२

श.	रा.	ह.	ने.
वृश्चिक	कन्या	कर्क	मेष
२१।४६ व	२१।१०	१।५९	१३।२८

हे ग्रह सायन आहेत. अयनांश वजा करून निरयन ग्रह घ्यावे.

जगद्वृत्त.—ता. १९ एप्रिल रोजीं ठाणें येथील तुरंगांत सकाळीं ७ वाजतां नाशिकच्या खटल्यांतील तीन खुनी इसमास फांशीं दिलें.

३०० रु. बक्षीस !

गणप्रधात्मक वेगळाल्या २५० कूटांच्या "चमत्कारिक कूट (कोडीं) संग्रह" पुस्तकांतील बक्षिसासाठीं निराळी कूटें उत्तर रीतीने सोडवणाऱ्यांना हे बक्षीस मिळेल. या पुस्तकांत प्रचलित असलेली वेगळाल्या प्रकारचीं कूटें, सांपत्तिक रीति व उत्तरें आहेत अर्थात् हें बक्षीस मिळून इतर मासिकें पत्रें यातून येणाऱ्या कूटांवरील बक्षिसेंही मिळवितां येतील. अशा तऱ्हेचे मराठींत हेच पहिलें पुस्तक होय. तरी सर्वांनीं अवश्य संग्रह करावा किं. ८१० व्ही. पी. नें. ८१२ रा. वि. इनामदार सु० पळसगांव. पोष्ट मायणी (सातारा)

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम् ।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥

'भवभूति'

पुस्तक १० वें.] चैत्र कृ० ७ रविवार [अंक ७ वा

संपादकीय स्फुट लेख.

एखाद्याच्या जन्मकाळीं रवि व शनि हे एकाराशीवर जवळ जवळ असतां किंवा समोरासमोर असतां जन्म झाला आहे अशी कल्पना करा. या योगाचे स्वाभाविक धर्म असे आहेत.—"बापाला संकट अथवा आजार, बापाचा मृत्यु अल्पावधींत, बाप दरिद्री, रोगी व कष्टी, बापाशीं वैर, बापाचा वियोग, राजा अगर राजाचे अमलदार यांच्या पासून भय व त्रास, कोणत्याही प्रकारच्या नोकरींत अपयश, कोणत्याही संस्थेचा पुढारी होण्यास नालायक, व्यसनी, दुराचारी व विश्वासघातकी, अपघात अगर दुखापतींचा संभव विशेष, काबाडकष्ट करणारा, नीच वृत्तीचा व प्रकृति बहुधा रोगट किंवा भयंकर दुखणीं होतात." हे या योगाचे स्वाभाविक धर्म आहेत, तरी निरनिराळ्या कुंडल्यांत राशि-

परत्वें व स्थानपरत्वें ते भिन्न स्वरूपांत व कमजास्त प्रमाणांत आढळतील. साधारणतः हा योग ज्या स्थानांत होईल त्या स्थानसंबंधी सुखाचा नाश होईल. रविशनियोगापासून चांगलें फल कधींच मिळणार नहीं. असलीं माणसें मित्रत्वाला योग्य नाहींत. चाकरमाणसांत जर असा कोणी असेल तर त्याला ताबडतोब रजा दिली पाहिजे. भागीच्या धंद्यांत असला मनुष्य भागीदार असेल तर त्याच्यावर विश्वास टाकून उपयोगी नाहीं. बापानें अशा मुलाशीं फार जपून वागलें पाहिजे. रवीला फलज्योतिषांत शनीचा बाप झटलें आहे. शनिमाहात्म्यात असें वर्णन आहे कीं,

"दृष्टीचा ऐका चमत्कार । जन्मला जेव्हां शनैश्चर ॥
तेव्हां दृष्टी पडली पित्यावर । तेणें कुष्ठ भरलें सर्वांगीं ॥ ९९
पित्याच्या रथीं होता जो सारथी । तो पांगुळ झाला निश्चिती ॥
अश्वांचिया नेत्रांप्रती । अंधत्व आलें तत्क्षणीं ॥ १० ॥"

जेव्हां शनीचा जन्म झाला तेव्हां त्याची आपल्या बापावर दृष्टि पडली. तिचा परिणाम असा झाला कीं, बापाच्या सर्वांगाला कुष्ठ भरलें, सारथी (अरुण) पांगळा झाला व घोडे आंधळे झाले! सूर्याला ज्या प्रमाणें प्रदक्षिणा करणारे ८ ग्रह आहेत त्याच प्रमाणें शनीलाही प्रदक्षिणा करणारे ८ गोल (उपग्रह) आहेत. याप्रमाणें तो सूर्यासारखा असल्यामुळें त्याला सूर्याचा पुत्र झटलें आहे. शनिमहात्म्यांतलें वर्णन सूर्यास्त होत असून शनीचा उदय होत आहे अशा वेळचें आहे. अस्तकाळीं सूर्य कोड उठल्याप्रमाणें निकट होतो व त्याचे अश्व झणजे किरण हें आंधळे होतात झणजे कृष्णवर्ण होतात. अरुण हा सदा पंगूच आहे, कारण त्याला स्वतंत्रतेनें चालतां येत नाहीं. ही स्थिति शनीमुळें झाली असें नाहीं, ती केव्हांही अशीच असावयाची. येथें कौतुकासाठीं

शनि व रवि यांतील वैरभाव दाखविण्यासाठीं असें वर्णन केलें आहे. शनीचा उदय व रवीचा अस्त अशी स्थिति ते एकमेकांच्या सप्तमांत (समोरासमोर) असतां असते. शनि व रवि हे समोरासमोर असतां मुलाचें बापाशीं कसें वैर असतें हें या दृष्टांतानें दाखविलें आहे. अशा योगावर जें मूल जन्मेल तें आपल्या बापाचा कसा सत्यनाश उडवील हें यावरून कळण्यासारखें आहे. समोरासमोर असतां जें फल प्राप्त होतें तेंच फळ एकत्र असतां मिळतें.

* * *

एखाद्या राजाचा भरलेला दरबार पहा. त्यांत राजाच्या सन्निध युवराज असतो. दोन बाजूस त्याचे प्रधान असून एका बाजूस सेनापति असतो व सर्वांचे शेवटीं नोकरमंडळी असते. हाच कल्पना सूर्यमालेशीं केली असतां सूर्य हा राजा, त्याच्या जवळचा ग्रह जो बुध तो युवराज, त्याच्या पलीकडचा ग्रह शुक्र हा प्रधान, व त्याच्या पलीकडे आपली पृथ्वी असून तिच्या पलीकडे जो ग्रह मंगळ तो सेनापति, मंगळापलीकडील ग्रह गुरु हा दुसऱ्या बाजूचा प्रधान व त्याच्या पलीकडला ग्रह जो शनि तो चाकर असा हा सूर्याचा दरबार दिसतो. आपले सर्व व्यवहार सूर्य व चंद्र यांच्या कालमानांवरून चालतात, झणून सूर्यप्रमाणेंच फलज्योतिषांत चंद्राला राजाचा मान दिला आहे. राशिचक्रांत हा दरबार खालीलप्रमाणें बसतो.

कर्क सिंह
चं. सू.
मिथुन—बुध बुध—कन्या

वृषभ—शुक्र	शुक्र—तूळ
मेष—मंगळ	मंगळ—वृश्चिक
मीन—गुरु	गुरु—धनु
कुंभ—शनि	शनि—मकर

हर्शल व नेप्च्यून हे अलीकडील ग्रह वरील दरबारांत कोठेंसे बसतील व त्यांस काय ह्मणावें हा विचार नवीन आहे. आमच्या मतें यांची गणना परकीय राजमंडळांत करावी. त्यांत सिंह हा राशि हर्शलास द्यावा आणि कर्क हा नेप्च्युनास द्यावा. हर्शलच्या भोंवतीं चार व नेप्च्यूनच्या भोंवतीं एक असे गोल फिरतात. हर्शल व नेप्च्यून हे शनि व गुरु या दोन ग्रहांखेरीज सर्व ग्रहांत फारच मोठे असून नेप्च्यून हा हर्शलच्या दिढीनें मोठा आहे. उपग्रहांच्या संख्येवरून हर्शल यास गुरुपुत्र व नेप्च्यून यास भौमपुत्र अशीं नावें देतां येतील. आमच्या आधुनिक ज्योतिष्यांनीं प्रजापति व वरुण अशीं त्यांस नावें दिलीं आहेत त्यांच्यापेक्षां वरील नावें फलज्योतिषाला योग्य आहेत. आमच्या ज्योतिषी वाचकांनीं यांना कोणतीं नावें द्यावीं हें सुचविल्यास त्याचा विचार करूं.

* * * *

नेप्च्यून हा सांप्रत कर्क राशींत आहे व हर्शल याच्या समोरच्या राशींत आहे. सन १९०५ पासून ही जोडी समोरासमोर आहे. ह्मणून तेव्हांपासून आतां पर्यंतच्या कालांत दोन स्वतंत्र अशा परकीय राष्ट्रांची (रशिया व जपान यांची) घनघोर लढाई झाली. जिकडे तिकडे राजकीय कलह माजले व रक्तपात झाले. सन १९१५ पासून हे ग्रह सिंह व कुंभ राशींत अनुक्रमें समोरासमोर येत आहेत. सन १९१८ मध्यें नेप्च्यूनच्या जोडीला शनि

आहे व त्याच्या समोर हर्शल आहे. ह्मणून या अवधींत अशी एखादी प्रचंड लढाई होते कीं काय हें पाहिलें पाहिजे, कर्क व सिंह हीं दोन बादशाही तक्तें नेप्च्यून, शनि व हर्शल हे १९१५ पासून पीडित करीत आहेत, मग काय होईल तें पहावें ? सन १९१७ च्या उत्तरार्धांत सिंह राशींत शनि हा नेप्च्यूनशीं युति करील व १९१८ मध्यें तो हर्शलच्या समोर येईल.

* * *

ता २३ एप्रिलच्या सयाजीविजयमध्यें हॅलेच्या धूमकेतूविषयीं मजकूर आहे. हा महाड येथें प्रथम आह्मी ता. २२ ला पाहिला, तो अस्पष्ट असा दिसला.

"कलकत्ता सेंटझेविअर कॉलेजमधील वेधशाळेचे अधिकारी रे. फादर ब्राईट यांनीं माहिती कळविली ती अशी—आज ता. २० रोजीं हॅलेचा सपुच्छतारा सूर्यमंडलाच्या अति सन्निध आला आहे. त्यांत व सूर्यबिंबांत अवघें ५५ लक्ष मैल अंतर आहे. तो पृथ्वीपासून १००० लक्ष मैल दूर आहे. हा तारा लवकरच नुसत्या डोळ्यानें दिसूं लागेल. सूर्यबिंबावरून या ताऱ्याचें ता. १९ मे रोजीं अतिक्रमण घडेल. त्या दिवशीं सकाळीं ८॥ वाजतां तें कलत्त्यांतून पाहणारांना दिसेल. ता. २१ रोजीं हा सपुच्छ तारा किंवा धूमकेतु त्याच्या कक्षेंत शक्य तितका पृथ्वीजवळ येणार आहे. त्या वेळीं तो संध्याकाळीं पश्चिमे आकाशात दृश्यमान होईल. त्या सुमारास तो गांवच्या अंशानुसार स्थितीप्रमाणें चांगला दिसला पाहिजे. नंतर आस्ते आस्ते अस्तंगास जाईल. तो पुनः ७५ वर्षेंपर्यंत दिसणार नाहीं."

— बाळंतिणीच्या खोलींतील स्थिति —

प्राच्यादिगृहक्रियादयो द्वौ द्वौ कोणगता द्विमूर्तयः ॥
शय्यास्वपि वास्तुवद्वदेत्पादैः षट्त्रिनवांत्यसंस्थितैः ॥

अर्थ.—मेष व वृषभ लग्नीं किंवा त्या नवमांशीं बाळंतिणीच्या खोलींत तिची शय्या पूर्वेस असेल, मिथुनावर आग्नेय दिशेस, कर्क

व सिंह यांवर दक्षिणेस, कन्येवर नैर्ऋत्येस, तूळ आणि वृश्चिक यांवर पश्चिमेस, धनूवर वायव्येस, मकर आणि कुंभ यांवर उत्तरेस आणि मीन राशीवर ईशान्यभागीं असेल. ३।६।९।१२ या स्थानांतील राशींवरून शय्येचे (बाजेचे पाय) सांगावें.

बृहज्जातकाचा ५ वा अध्याय जो जन्मविधि त्यांत आणखी पुष्कळ गोष्टी सांगितल्या आहेत, त्यांचा अनुभव घेण्यासारखा आहे. आजच्या अजाण जनसमूहाप्रमाणेंच पूर्वीच्या ज्योतिष्यांची अशी समजूत झालेली असावी कीं, ज्योतिषशास्त्राच्या आधारानें वाटेल ती गोष्ट सांगतां यावी. अथवा असेंही असेल कीं त्यांच्या असल्या प्रयत्नांमुळेंच समाजाची आज अशा प्रकारची समजूत झाली. आमच्या मतें इतकें सूक्ष्म हें शास्त्र नाहीं. जन्माचा गांव कसा होता, त्या गांवांत कोणत्या दिशेला जन्म झाला असला पाहिजे, जन्माची जागा अथवा घर कोणत्या प्रकारचें असेल, त्या घराचें तोंड कोणत्या बाजूस असेल, घराच्या कोणत्या दिशेला जन्मस्थान (खोली) असेल, त्या जागेंत मातेनें कोणत्या दिशेला व कसें शयन केलें असेल किंवा कोणत्या बाजूला व तो कोणत्या स्थितींत असेल, मुख्य सूतिका किती व त्या कोणत्या जातीच्या, किती वयाच्या आणि कोणत्या स्थितीच्या असतील, त्याचप्रमाणें उपसूतिका(इतर स्त्रिया)कोणत्या प्रकारच्या किती असतील, जन्मानंतर मूल मातेच्या कोणत्या बाजूला असेल, मूल कसें जन्मास आलें असलें पाहिजे, सुटका किती कालानें व कशा प्रकारची झाली असेल, मातेला किती काल कष्ट भोगावे लागले असतील वगैरे जन्मज्ञान आपणास होईल तर मोठा आनंद होईल, पण हें अशक्य दिसतें. ग्रंथकारांनींही हें वर्णन उडत उडत केलें आहे, त्यावरून निश्चित ज्ञान होत नाहीं. राशि किंवा नवमांश असें दुटप्पी वर्णन आहे तें बरोबर नाहीं.

गर्भसंभव

या विषयावर आम्ही मागें एक वेळ लिहिलेलें आहे. आज सारावलीमध्यें या संबंधानें श्लोक आढळले ते येणेंप्रमाणें.—

उपचयगौ रविशुक्रौ बलिनौ पुंसः समांशसंप्राप्तौ ॥
युवतेर्वा जचंद्रौ यदा तदा गर्भसंभवो भवति ॥

अर्थ—३।६।१०।११ या स्थानांस उपचय ही संज्ञा आहे. पुरुषाच्या कुंडलींत या स्थानांमध्यें जर बलवान् अशा रविशुक्रांची युति होईल किंवा स्त्रीच्या कुंडलींत याच स्थानांत बलवान् अशा चंद्रमगळांची युति होईल तर गर्भसंभव जाणावा.

येथें हीं स्थानें लग्नापासून घ्यावयाचीं कीं चंद्रापासून घ्यावयाचीं याचा उल्लेख नाहीं, तरी उभयतांपासून घ्यावीं असा सर्वत्र अन्य प्रसंगीं उल्लेख आहे.

शुक्रार्क भौमशशिभिः स्वांशोपचयस्थितैः सुरेज्ये वा ॥
धर्मोदयात्मजस्थे बलवति गर्भस्य संभवो भवति ॥

अर्थ.—वरील श्लोकांत सांगितल्याप्रमाणें उपचय स्थानीं युति करणारे ग्रह नवमांशीं असून गुरू हा ९।१।५ या स्थानीं बलवान् असेल तेव्हां गर्भसंभव जाणावा.

आमच्या मतानें पहिल्या श्लोकापेक्षां दुसरा श्लोक जास्त महत्त्वाचा आहे. गर्भसंभव गुरूवर जास्त अवलंबून आहे. अनुभवानें असें दिसून आलें आहे कीं कुंडलींतील सर्व विषम स्थानीं गुरु गर्भ देण्यास समर्थ असतो. हीं स्थानें मुख्यत्वें लग्नापासूनच घ्यावीं. चंद्रापासून क्वचित् अनुभव येतो. ज्या स्त्रीला गर्भसंभव लवकर लवकर होतो त्या स्त्रीच्या अगर तिच्या पतीच्या प्रत्येक विषम स्थानीं गुरु गर्भ देतो. मध्यम कालानें होणारी संतति एक टाकून एक अशा विषम स्थानच्या गुरूवर गर्भ पावते व दीर्घकालानें होणारी संतति १।९।२ स्थानच्या गुरूवर म्हणजे एकमेकांच्या त्रिकोणस्थ राशींवरील गुरूवर गर्भ पावते. अनियमितपणानें होणाऱ्या संततीचा गर्भसंभव अनियमित होत असल्यामुळें तो निश्चित कळणार नाहीं, सुमारानें ज्ञान होतें.

गुरूप्रमाणेंच शुक्रही विषम स्थानीं गर्भ देण्यास समर्थ असतो उभयतांच्या लग्नापासून अथवा चंद्रापासून किंवा एकाच्या लग्नापासून तर दुसऱ्याच्या चंद्रापासून शुक्र जर विषम स्थानीं आलेला असेल तर गर्भसंभव आहे असें मानण्यास हरकत नाहीं. त्यातही

लग्न-नवपंचम हीं त्रिकोणस्थानें जास्त महत्वाचीं आहेत. गुरु व शुक्र हे दोन्ही गर्भ देण्याच्या स्थितीत आल्याशिवाय गर्भ राहणें अशक्य आहे.

पुरुषाच्या कुंडलींत रविशुक्राचा उपचयस्थानीं योग किंवा स्त्रीच्या कुंडलींत चंद्रमंगळाचा त्याच स्थानीं योग हे विशेष प्रकारचे योग आहेत; त्यांचा अनुभव घेतला पाहिजे. आह्मांत असें वाटतें कीं हे योग लग्नाच्या अगर चंद्राच्या विषम स्थानींही पहावे व त्यांतल्या त्यांत १।५।९ या स्थानीं विशेष विचारांत घ्यावे. स्त्रीच्या कुंडलींत जर गर्भसंभव योग आला असेल तर त्याच वेळीं पुरुषाच्या कुंडलींतही एखादा दुसरा योग असला पाहिजे हें तत्व विसरतां कामा नये.

हे योग दोन प्रकारांनीं पहावे असे वाटतें. एक, दोन्हीं ग्रहांचे योग गोचरीचे घ्यावे किंवा एक ग्रह जन्मस्थानचा व दुसरा गोचरीचा यांचे योग घ्यावे अशा जोडानें गर्भसंभवकाल ठरवावे. प्रत्येक वर्षी किंवा गर्भ राहण्याच्या मर्यादेनें येणाऱ्या वर्षी प्रत्येक महिन्यांतले गर्भसंभवकाल उत्पत्तींच्या कुंडल्यांवरून सूक्ष्म विचारानें काढून ठेवावे व त्या कालींच समागम करावा ह्मणजे कोणत्या योगावर गर्भ राहिला असेल हें कळेल. उभयतांच्या न मिळताहि तर एकाच कुंडलीवरून संभव काल काढावे. गर्भ राहू नये अशी इच्छा असेल तर ते संभवकाल सोडून द्यावे. उत्तम संततीची इच्छा असेल तर ज्या संभवकाली इतर ग्रहांचे उत्तम योग असतील त्या कालींच स्त्री-गमन करावें. ज्या स्त्रियांना नेहमीं गर्भपात होतात किंवा बाळंत होतांना अडतात, त्या स्त्रियांनी व त्यांच्या पतींनीं उत्तम संभवकाल साधण्यास चुकूं नये. संभवकाल हा पावसाळा आहे. उन्हाळ्यात जमिनींत धान्य पेरलें असतां तें जसें निष्फळ तसेंच अयोग्य कालीं झालेला संभोग निष्फळ होय. जमीन, बीं व पाणी या तिहींचा संगम झाल्यास धान्य उगवतें, त्याच प्रमाणें पुरुषाचे शुक्र हें बीज, स्त्रीचें रज ही जमीन व संभवयोग हें पाणी या तिहींचा संगम गर्भधारणा करितो. या गोष्टीचा प्रत्येकानें विचार करण्यासारखा आहे.

कुंडलीविज्ञान.

पुस्तक १० वें.]भाद्रपद व०१३ शनिवार[अंक १६ वा

स्फुट विचार.

परमात्म्याची कृपा प्रत्येक मनुष्यावर पाहिजे तरच त्याची जीवनयात्रा सुखावह होईल हें सर्वांस समजत आहे, व जो तो आपणावर त्याची कृपा व्हावी ह्मणून आपापल्या बुद्धयनुरूप व कर्मानुरूप प्रयत्न करीत आहे. कोणताही मानवी प्रयत्न परमात्म्याच्या कृपेशिवाय यशस्वी व्हावयाचा नाहीं, तुझ्या पेक्षां मजमध्यें सामर्थ्य अधिक आहे, म्हणून मी जें बोलेन तें करीन व करीन तें होईल, अशी विचित प्रार्थना करणारा मनुष्य या जगांत एक तरी असेल कीं नाहीं याची शंका आहे!

असें जरी आहे तरी कित्येक मनुष्यें अशीं आढळतात कीं तीं बाह्यात्कारीं परमात्म्याला आळवितांना मुळींच दृष्टीस पडत नाहींत. पण, त्यांची कृति पहावी तर त्यांच्या ठिकाणीं परमात्म्याचें अधिष्ठान असलेंच पाहिजे असें म्हटल्याशिवाय गत्यंतर नाहीं. ही माणसें देवदर्शनास जातांना, स्नानसंध्येचें बंड माजवितांना, देवपूजा करितांना, गोमुखींत हात घालून ध्यानस्त बसतांना, सोंवळें ओंवळें किंवा स्पर्शास्पर्श यांत गढून जातांना याचप्रमाणें कथाकीर्तनें किंवा पुराणें ऐकण्यास बसतांना केव्हाही आढळत नाहींत. परंतु जगाचें कल्याण हें एकच ध्येय त्यांच्या पुढें असून तें साधण्याच्या कामांत अहर्निश प्रयत्न करीत असतात. असलीं माणतें संतमालिकेंत कां गोवूं नयेत समजत नाहीं. जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति। देह कष्टविती उपकारें ॥' हें भगद्भक्त तुकारामाचें वचन खेठें आहे काय?

आत्महित हेंच इतिकर्तव्य समजणारे अष्टपैलू होत. मग तें आत्महित कोणत्याहि प्रकारचें असो. ब्रह्मपदीं लीन होऊन मोक्ष-साधन करणारा योगी असो कीं दारोदार भीक मागणारा भिक्षेकरी असो. तो जर जगाच्या कल्याणासाठीं कांहींच करीत नसेल तर स्नानसंध्येचा किंवा भजनपूजनाचा अथवा आचारविचाराचा त्याचा डौल कवडी किंमतीचा आहे, हें उघड आहे. त्याच्यावर परमेश्वराची कृपा असली काय आणि नसली काय सारखीच. जो सर्व जगाला आपल्यासारखें करून सोडतो व ज्याला सर्व जग परमेश्वराप्रमाणें मान देतें त्याच्यावर परमात्म्याची कृपा नाहीं असें म्हणणें धाडसाचें कीं अंधत्वाचें याची परीक्षा वाचकांनींच करावी.

जगाचें कल्याण करण्यासाठीं सर्व देशांत आणि सर्व कालीं परमेश्वराच्याच विभूति जन्मास येत असतात. व अवतारकार्य संपूर्ण झालें म्हणजे इतर मनुष्यांप्रमाणेंच पंचत्व पावतात. हें कार्य किती करावयाचें तें त्यांनीं पूर्वीच ठरवून ठेवलेलें असतें. आगगाड्या तारायंत्रें, फोटोग्राफ, फोनोग्राफ, विमानें वगैरे गोष्टींची कल्पना ज्यांनीं बसवली तीं माणसें अवतारी नव्हत काय? कोणत्याहि प्रकारच्या शास्त्राचें शोधन करून त्याचें शिक्षण केवळ लोककल्याणासाठींच जीं माणसें देतात तीं परमात्म्याचे अंश नव्हत असें आमच्यानें तरी म्हणवत नाहीं. असल्या माणसांस पुनर्जन्म नसला पाहिजे व असलाच तर प्रारब्ध कार्य तडीस नेण्यासाठींच असेल हें उघड आहे.

हीं माणसें कुंडलीवरून ओळखतां येतात. असलीं माणसें ज्या देशांत व ज्या कुलात निर्माण होतात त्या देशाच्या व त्या कुलाच्या त्या काळच्या परिस्थितीप्रमाणें प्रथम व्यवहार करितात. पण, शेवटीं जागृति होऊन तो व्यवहार सोडून देतात व आपल्या अवतारकृत्याला कोणीही न शिकवितां केवळ आपल्या बुद्धीनेंच आरंभ करितात, व सर्व जगांत नांव मिळवितात. कित्येकांना तर लहानपणींच जागृति होते. न्यूटन पुढें ज्या व्यवहारानें उदयास आला ते व्यवहार त्याच्या बालपणींच खेळामध्येंही घडत होते! शिवाजी सोळा वर्षांचा झाला तोंच स्वराज्यसंस्थापनेचे प्रयत्न करूं लागला! असल्या माणसांच्या कुंडल्या पाहण्यासारख्या असतात.

ज्याला आत्महितच करावयाचें असतें त्याला परमेश्वराची कृपा आपणावर व्हावी म्हणून जपतपादि साधनें साधावीशीं वाटतात. परंतु, जगाच्या कल्याणासाठींच माझा जन्म आहे असें दृढ मानून तें साधण्याच्या कामीं अहर्निश झटणाऱ्या पुरुषाला परमात्म्याच्या कृपेसाठीं स्नानसंध्यादिकांचें अवडंबर माजवावें लागत नाहीं, कारण आपणावर परमेश्वराची कृपा आहेच व तो निश्चयानें करील अशी त्याची पूर्ण भावना असते. कारण, स्वार्थासाठीं धडपडणाऱ्या पेक्षां लोकहितासाठीं धडपडणारा पुरुष परमेश्वराला जास्त प्रिय असला पाहिजे हें कोणीही नाकबूल करणार नाहीं. अग्नीनें आपल्या कार्याला आरंभ केला कीं त्याला वाऱ्याची तपश्चर्या करावी लागत नाहीं त्याचप्रमाणें लोकहिताला ज्यानें आपला देह विकला किंवा त्या कामासाठीं गुलाम बनला त्याला परमात्म्याला आळवावें लागत नाहीं. परमात्मा आपण होऊन त्याच्या मदतीसाठीं धांव घेतो हें विसरतां कामा नये

असो. हे विचार सुचण्याचें कारण असें आहे कीं,— एक गृहस्थ म्हणतात कीं ज्योतिषावर परमात्म्याची कृपा पाहिजे. म्हणजे त्याचें भविष्य बरोबर उतरेल. त्यानें परमात्म्याची कृपा संपादन करण्यासाठीं जपतपादि साधनें केलीं पाहिजेत. आमच्या मतें जें शास्त्र परमात्म्याच्या कृपेवर अवलंबून राहतें तें शास्त्र व्यवहाराला कुचकामाचें आहे. परमात्म्याच्या कृपेनेंच सर्व व्यवहार चालवावयाचे तर मानवी शास्त्राची बिलकूल जरूर नाहीं. अहर्निश परमात्म्याच्या भक्तींत गढून गेलेला महासाधू तुकाराम सुद्धां हेंच म्हणतो—'जाण-

ती शकून । भूतभविष्यवर्तमान ॥ त्यांचा आह्मांसी कंटाळा । पाहों नावडती डोळां ॥ ....' कारण त्याला परमेश्वराच्या भक्तीवांचून कशाचीही जरूर नाहीं. भक्तींत किती सामर्थ्य आहे हें संतांच्या कथा वाचल्यानें ध्यानांत येईल. असें जरी आहे तरी मनुष्याला मानवी शास्त्रांनींच जगांत व्यवहार केला पाहिजे असें आजपर्यंतच्या इतिहासावरून दिसून येतें. अर्जुनावर परमात्म्याची अनुपमेय कृपा होती तरी त्याला मानवी शास्त्रानें निर्माण केलेल्या साधनांनींच लढावें लागलें. त्यानें जर कौरवांचा नाश करण्याचें मनांत आणिलें असतें तर एका शब्दानेंच काम झालें असतें ! ज्योतिषशास्त्र हें जर परमात्म्याच्या कृपेचें शास्त्र असेल तर त्यासाठीं त्याची कृपाच संपादन केली पाहिजे. पण, मग जन्मटाईम बरोबर घ्या, जन्मस्थलाची त्या कालची कुंडली वेधतुल्य ग्रहांची तयार करा, दशावर्ग, पहा, दशांचा विचार करा वगैरे खटाटोप करण्याचें कारणच उरत नाहीं. ईश्वराच्या कृपेनें सर्व भविष्यं वर्तवितां येईल.

जो मनुष्य ईश्वराच्या कृपेनें भविष्य सांगतो, तो ज्योतिषी नव्हे हें निर्विवाद आहे. ग्रहांच्या गतिस्थित्यनुरूप जो फल वर्तवितो तोच ज्योतिषी. कालाचा प्रत्येक भाग ज्याचा ग्रहांच्या विचारांत जातो त्याला ईशकृपेसाठीं निराळा प्रयत्न करण्याचें कारण नाहीं. कारण, तीच त्याची तपश्चर्या, तेंच त्याचें सोंवळें ओंवळें, तोच त्याचा जप, तीच त्याची स्नानसंध्या व तींच त्याची स्तोत्रें होत. ज्याला परमेशाच्याच कृपेनेंच फलें सांगावयाची असतील त्यानें सदासर्वकाल ईशभजनच केलें पाहिजे मग त्याला कुंडली पाहण्याची जरूर नाहीं. या दोहों पैकीं ज्याला जें आवडेल तें त्यानें घ्यावें.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम् ।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥

'भवभूति'

पुस्तक १० वें. वैशाखशु० ७ रविवार [अंक ८ वा

संपादकीय स्फुट लेख.

"नर करणी करे सो नरका नारायण होजाय." हें साधुवाक्य खोटें नाहीं. विश्वामित्रानें प्रतिसृष्टि निर्माण केली असें भरतांत वचन आहे (चकारान्यं च लोकं वै कृद्धो नक्षत्रसंपदा । प्रतिश्रवण पूर्वाणि नक्षत्राणि चकार यः ॥) असें जरी आहे तरी मनुष्यप्राण्याच्या सामर्थ्याला मर्यादा असलीच पाहिजे. आक्सिजन व हायड्रोजन या दोहोंच्या संयोगानें मनुष्य पाणी उत्पन्न करूं शकतो, म्हणून तो काय मोठाले नदीनद वाहवूं शकेल ? कृतीनें मनुष्य पर्जन्यही पाडूं शकतो, पण तो किती ? इंद्राचीही त्याला बरोबरी करितां येणार आहे ? सारांश, मनुष्याच्या कर्तृत्वशक्तीला मर्यादा आहे व तिची परमेश्वराच्या कर्तृत्वशक्तीशीं बरोबरी होणें अशक्य आहे. अर्थात् उद्योगाला मर्यादा आहे. उद्योगानें घडेल ते होईल

हें म्हणणें लंगडें आहे. भौतिक शास्त्रांनीं कितीही शोध लागले तरी मनुष्याला ईश्वराचें कर्तृत्व संपादन करितां येईल हें म्हणणें अतिरेकाचें आहे. म्हणून ज्या गोष्टी दैवाधीन आहेत त्या उद्योगानें टाळतां येणार नाहीत. श्रीमत् भास्कराचार्यांनीं आपल्या मुलीचा वैधव्य योग टळेल असा मुहूर्त शोधून काढिला व तो साधण्यासाठीं आपलें बुद्धिसर्वस्व खर्च केलें, तरी अखेर कांहींतरी व्यत्यय येऊन मुहूर्त येऊन मुहूर्त चुकला व मुलगी विधवा झाली !

* * *

पण दैवाधीन गोष्टी कोणत्या आहेत, हें नक्की कोणाला कळत नाहीं, म्हणून उद्योगाला महत्व आलें आहे. आडलेल्या बायका डाक्टर सोडवितात अशीं उदाहरणें आपणासमोर असल्यामुळें होणाऱ्या गोष्टी टाळतां आल्या पाहिजेत अशी भ्रामक कल्पना उत्पन्न होते, परंतु ती जर मरणारीच असेल तर डाक्टर वेळेवर येणारच नाहीं किंवा आला तरी तो आपल्या क्रियेंत कोठें तरी चुकेल. सारांश मरणाऱ्या बाळंतिणीला सोडवणारा परमेश्वरावांचून कोणीही समर्थ नाहीं. जगणारीची सुटका कोणाच्या साह्यावांचूनही होते व झाली पाहिजे.

* * *

पण मरणारी कोणती व जगणारी कोणती हें कोणता लेक निश्चयानें सर्वदा सांगूं शकतो ! म्हणून बाळंतीण अडली कीं डॉक्टर आणलाच पाहिजे. मरणार असेल तर मरेल व जगणार असेल तर जगेल, यासाठीं आपण कांहींच करूं नये, हें म्हणणें जरी तत्वशास्त्राच्या दृष्टीनें खरें असलें तरी तें मनुष्याला उपयोगी नाहीं, कारण मनुष्याला उद्योगावांचून कांहींच मिळत नाहीं असा शेकडा ९९ प्रसंगीं प्रत्यक्ष अनुभव आहे. म्हणून मरणारी असो कीं

जगणारी असो, अडली कीं डाक्टराकडे गेलेंच पाहिजे.

* * *

मनुष्याला ज्योतिषशास्त्र कांहीं उद्योग करूं नको असें सांगत नाहीं. उलट उद्योगाला मदत करितें. अमुक एक स्त्री बाळंत होतांना अडेल किंवा अडण्याचा संभव आहे हें ज्योतिषशास्त्रावांचून दुसरें कोणतेंही शास्त्र सांगू शकत नाहीं. उत्तम (अनुभविक) ज्योतिषी अशी सूचना पूर्वी देऊं शकतो व त्याचा अनुभवही अनेक वेळां येतो. सर्वदा येतोच असें आम्हीही म्हणत नाहीं, पण येत नाहीं असें मात्र म्हणण्यास आम्ही तयार नाहीं. ज्या ज्या स्त्रिया प्रसूति होतांना आडलेल्या आहेत त्या त्या स्त्रियांस सांगितल्याप्रमाणेंच अनिष्ट ग्रह आले होते असें आम्हांस दाखवितां येतें, म्हणूनच अमुक स्त्री अडेल किंवा तिची सहज सुटका होईल हें उत्तम ज्योतिष्याला पूर्वी कळतें असें आमचें म्हणणें आहे. असें जर आहे तर हें शास्त्र उद्योगाला मदत करील कीं आला म्हणून पाडील ?

* * *

एखाद्या गोष्टीचा सर्व बाजूंनी पूर्ण विचार करून ती गोष्ट अमुक काळीं घडेल असें जर एखाद्या अनुभविक ज्योतिष्यानें भविष्य केलें असेल, तर त्यावर विश्वास ठेऊन त्या काळीं योग्य ती सावधगिरी ठेवणें अगत्याचें आहे. मग त्या काळीं ती गोष्ट घडो वा न घडो. कुत्रें पिसाळलें आहे व पिसाळलेलें कुत्रें चावलें तर मनुष्याला भयंकर यातना भोगाव्या लागतात, म्हणून अशा वेळीं आपण सावधगिरीनें वागतों. त्याच प्रमाणें ग्रह बिघडले आहेत

व बिघडलेले ग्रह मनुष्याला पीडा करितात हें जर खरें आहे, तर त्या वेळीं सावधगिरी ठेविल्यानें काय बिघडेल? यातना भोगाव्याच लागतील असें निश्चयात्मक समजतेंच असें नाहीं हें आह्मांसही कबूल आहे. पण ज्या ज्या वेळीं यातना भोगाव्या लागतात, त्या त्या वेळीं ग्रह बिघडलेले असतात असा जर प्रत्यक्ष अनुभव आहे तर ते बिघडलें असतां सावध राहण्यांत कोणती चूक आहे हें समजणें कठीण आहे.

* * *

सावधगिरीनें यातना चुकतील असें नाही, पण हें केव्हां म्हणतां येईल? अमुक प्रकारच्या यातना अमक्या कारणानें अमुक वाजून मिनिटांनीं निश्चयानें भोगाव्या लागणार इतकें ज्ञान होईल तेव्हां. ज्योतिष शास्त्रानें हें ज्ञान होत नाहीं. त्यामुळें सावधगिरी ठेवूनही यातना चुकत नाहींत. कुंडली विज्ञानचे संपादक ता. १५ एप्रिल रोजीं सकाळीं ७ वाजतां अगदीं साध्या जमिनीवर धोंतरांत पाय अडकून प्रथमें डाव्या हातावर खालीं पडले व दुसऱ्या हातांत निखारे असल्यामुळें उठण्याचा प्रयत्न करीत असतां ज्याप्रमाणें मागाहून जोरानें कोणी ढकलावें त्याप्रमाणें ढकलले जाऊन जवळच्या दगडी पायंडीवर तोंडघशीं पडले! तत्काळ एक दांत साफ उडाला, वरची व खालची दंतपंक्ति हालूं लागली व आणखी तीन दांत पडले असते तर बरें झालें असते अशा स्थितींत लडबडूं लागले. पुष्कळसें रक्त वाहून गेल्यामुळें दाढांची शक्ति कमी झाली! याप्रमाणें त्यांस अकालीं जरा आली ओह! तेव्हां एक गृहस्थ थट्टेनें हाणाले, "कांहो, तुह्मी जर ज्योतिषी! मग हें असें कसें झालें?" वाचकहो, या गृहस्थांना तुह्मीं काय उत्तर द्याल? तेराव्या तार-

खेच्या रात्रीं २ वाजून २५ मि. नीं चंद्र हा व मंगळ यांची युति होती व ती जन्मस्थ शनीच्या समोर चतुर्थ स्थानीं होती. १५ व्या तारखेच्या रात्रीं चंद्र व नेपच्यून यांची रात्रीं २ वाजून ३१ मि. नीं जन्मराशींत युति होती. १६ व्या तारखेला सायंकाळीं ५ वाजून ५२ मि नीं चंद्र हा हर्शलच्या समोर आपल्या जन्मराशींतच येणार होता. १७ व्या तारखेला सकाळीं ८ वाजून ३५ मि. नीं रवि व शनि यांची युति मुखस्थानीं मेष या शिरोभाग दर्शक कृत्तिका या दुष्ट विभागांत होती, हे सर्व यातना भोगावयास लावणारे योग आहेत हें ज्योतिषी वाचकाला माहीत आहेच. कुंडलीविज्ञान संपादक ही हें जाणून होते. त्यांनीं प्रवासाला जाण्याचे आणि वाहनांत बसण्याचे आवश्यक असे सर्व प्रसंग टाळले होते. परंतु अखेरीस यातना भोगाव्या लागल्याच. परंतु या बद्दल त्यांस आश्चर्य अथवा दुःख मुळींच झालें नाहीं. कारण, यातना चुकविण्याचे शक्य तितके प्रयत्न त्यांनीं केले होते. दुसरें, अपघाताच्या प्रसंगीं घर न सोडल्यामुळें इतर आपत्तीही त्यांस चुकविता आल्या, व कदाचित् भयंकर यातना भोग य लागल्या असत्या, ही भीति नाहींशी होऊन समाधान झालें. हा या शास्त्रापासून थोडा फायदा झाला काय?

* * *

कोणत्या प्रसंगीं कसें वागावें हें समजण्यास कोणत्या काळीं कोणते योग होत आहेत व त्यांचा परिणाम कोणत्या प्रकारचा घडूं शकेल, आपणाला त्या वेळीं कोणती परिस्थिति उत्पन्न होण्याचा संभव आहे अगर अमुक एक कार्य करावें लागणार आहे इतकें

ज्ञान झालें पाहिजे. कारण तो ज्याचा त्याला जितका सूक्ष्म करितां येईल तितका ज्योतिष्यास करितां येणार नाहीं.

* * *

कित्येक प्रश्न फार घोटाळ्याचे आहेत. वैधव्ययोग कुठलाही लग्न केलें तरी टळणार नाहीं काय? या प्रश्नाला उत्तर नाहीं. कारण अमुक वयापर्यंत लग्न केलें तर आहे, पुढें केल्यास नाहीं हें समजण्यास मार्ग नाहीं. वैधव्य योग आहे हे ज्योतिष्याला जितक्या जोरानें सांगतां येतें तितक्या जोरानें तो अमुक कालींच आहे पुढे नाहीं असें सांगतां येत नाहीं. ह्मणून तो उत्तम मुहूर्तावरच लग्न लावावें असा उपाय सांगतो. भास्कराचार्यांनीही हाच उपाय योजिला होता. मंगलाला मंगळ शोधीत बसण्यापेक्षा असा मुहूर्त पाहावा कीं तो जर बरोबर साधला तर वैधव्य येऊंच नये. ज्या कालीं पतीला अनिष्ट ग्रह आहेत. असें उभयतांच्या कुंडल्या दर्शवितील त्या वेळीं त्यांच्या जिवास अपाय न होईल अशी सावधगिरी जितकी घेतां येईल तितकी घ्यावी इतकेंच आपलें कर्तव्य आहे, ह्मणून तें करण्यास चुकू नये ह्मणजे झालें.

ग्रहांचे योग.

ग्रहांचे युतियोग, प्रतियोग, केंद्रयोग व त्रिकोणयोग असे चार प्रकारचे योग फार महत्त्वाचे आहेत. या प्रत्येक योगाचे तीन तीन

प्रकार होतात. १ ला.—होणारा योग, २ रा.—प्रत्यक्ष योग व ३ रा.—होऊन गेलेला योग. या प्रत्येक प्रकाराचें फल निरनिराळें आहे, असें अनुभवास येतें. उदाहरणार्थ.—रवि व शनि यांचा जर होणारा योग असेल, तर तो पितृसुखाला विशेष अनिष्ट नाहीं असें दृष्टीस पडतें. पण, तो जर प्रत्यक्ष योग असेल किंवा होऊन गेलेला योग असेल तर बापाला व त्याच्यापासून प्राप्त होणाऱ्या सुखाला फार अनिष्ट असतो. कारण, शनीला पूर्ण भ्रमणानें रवीवरून जावयाचें असतें, ह्मणून तो पितृसुखाला अनिष्ट होत नाहीं. लग्नीं रवि व शनि होणाऱ्या योगांत दोन ठिकाणीं आढळले. एका कुंडलींत मकर लग्नीं २९ व्या अंशांत रवि व २३ व्या अंशांत शनि असून त्यांची एक दिवसांत युति होणार अशा कालीं जन्म झाला आहे. व दुसरींत कर्क लग्नीं ११ व्या अंशांत रवि व १७ व्या अंशांत शनि असून त्यांची सुमारें ७ व्या दिवशीं युति होणार होती अशा कालीं जन्म झाला आहे. या दोनही गृहस्थाचे वडील पुष्कळ वर्षे हयात होते व त्यांच्यापासून सुखही चांगलें होतें. पहिल्या गृहस्थाच्या प्रकृतिवर मात्र अनिष्ट असे परिणाम पुष्कळ घडले व दुसऱ्या गृहस्थाला शत्रु पुष्कळ होऊन पुष्कळ वेळां मोठाल्या कामांत अपयश आलें यांच्या जन्मकालीं कोणत्या वाईट गोष्टी घडून आल्या हें कळण्यास मार्ग नाहीं, त्यामुळें त्यांच्या फलाची कल्पना होत नाहीं. तथापि शास्त्राच्या दृष्टीनें या युतींचा परिणाम चांगला नसल्यामुळें जन्मकालीं स्वतःला आजार व बापावर संकट या गोष्टी एक महिन्याच्या आंत घडल्या पाहिजेत असें अनुमान होतें. तसेंच या मनुष्यांचा मृत्यु फार वाईट प्रकारानें घडेल इतकेंही भविष्य करण्यास हरकत नाहीं.

एक कुंडली खालील प्रमाणें आहे, ती एका २ वर्षे कैद भोगून सुटलेल्या वर्तमानपत्रकाराची आहे. तींत अनिष्ट योग कसे झाले आहेत ते पाहण्यासारखे आहेत.



लग्नांत मगळ व शनि असून त्यांची एका आठवड्यांत होणारी युति आहे. जन्मकालींच शनि हा रविवर पूर्ण पाहून झाला असून चंद्र हा हर्शलशीं सुमारें ४ तासांनीं युति करणार आहे चंद्रमंगळ व शनिहर्शल यांचा होऊन गेलेला त्रिकोण योग आहे। असले योग कारागृहवासाला व इतर भयंकर यातनांना कारण होतात असा बऱ्याच ठिकाणीं अनुभव येतो. सारांश, योगांचे हे तीन प्रकार विचारणीय आहेत. व त्याचा पुढें सवडीनें विचार करावयाचा आहे.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम् ।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥

'भवभूति'

पुस्तक १० वें. वैशाखव० ८ बुधवार [अंक ९ वा

संपादकीय स्फुट लेख.

या वर्षाच्या अंक ६ मध्यें 'नूतनप्रश्नपद्धति' ह्मणून जो विषय दिला आहे त्याचा अनुभव वारंवार येत आहे. हा चमत्कार आह्मीं आपल्या मित्रमंडळींत व इतरत्रही करून दाखविला आहे. एका गृहस्थानीं पांच सात वेळ अशा कुंडल्या मांडून प्रश्न विचारले, तरी तितक्याही वेळीं त्यांनीं ज्या कुंडल्या मांडल्या त्यांत कधीं लग्न तर कधीं लग्नसप्तम व कधीं रवि तर कधीं रविसप्तम असे लग्न, चंद्र व रवि मांडलेले आढळले. अगदीं अनभिज्ञ मनुष्या-जवळून कुंडली मांडून घेतल्यास ती बरीच चांगली उतरते, पण ज्योतिष जाणणारा जवळूनही घेतली तरी नियमांत चूक होत नाहीं असें दिसून आलें आहे. एका प्रसंगीं दोन इसमांस ऐच्छिक कुंडल्या मांडण्यास सांगितलें होतें. त्यावेळीं त्या दोघांनींही एकाच

लग्नावर व एकाच रवीवर कुंडल्या मांडल्या ! चंद्र मात्र एकमेकांचा सप्तम होता, ज्योतिषशास्त्र जाणणाऱ्या एका इसमास व अनभिज्ञ अशा दुसऱ्या एका इसमास जवळ बसलेल्या एका गृहस्थाच्या स्त्रीची कुंडली मांडण्यास सांगितलें त्या वेळीं दोघांच्याही कुंडल्या स्त्रीच्या कुंडलीशीं वरील नियमानें मिळत्या आल्या. यावरून मनुष्याचा आत्मा सर्वज्ञ आहे असें सिद्ध होतें. मनाच्या उपाधीनें त्याचें हें ज्ञान आपणास दिसून येत नाहीं, पण जेव्हां तो निर्विकल्प स्थितींत असतो तेव्हां त्याच्या ज्ञानाचा आपणास चांगला अनुभव येतो. यासाठीं आपणास कुंडली मांडून घेतांना असा इसम शोधिला पाहिजे कीं केवळ त्याचा आत्माच आपल्या उपयोगीं पडेल, चंचल चित्ताचा, नास्तिक, दुर्बुद्धीनें ग्रासलेला आपला शत्रु किंवा प्रतिस्पर्धी असा मनुष्य या कामास नालायक आहे. सत्वगुणी मुलांकडून हें काम करून घेतल्यास बरेंच बिनचूक उतरलें पाहिजे.

* * *

एक ज्योतिष जाणणाऱ्या गृहस्थाजवळून जेव्हां जवळच्या एका गृहस्थाच्या स्त्रीची कुंडली मांडून घेतली तेव्हां त्या गृहस्थाला ती बरोबर उतरलेली पाहून असें भासलें कीं मी खरोखरीच कांहीं एका नियमानें ती बरोबर मांडली ! परंतु मजा अशी कीं त्यानें आपलेंच लग्न मांडलें होतें ! कांहीं एक विचार न करितां मांड झाल्या बरोबर त्या गृहस्थाला दुसऱ्या मनुष्याच्या स्त्रीची कुंडली मांडतां येणें शक्य आहे काय ? मनाचा पगडा आत्म्यावर बसण्या पूर्वीच आपण त्याकडून काम करून घेतल्यास तो बिनचूक करितो हा मोठा चमत्कार आहे !

* * *

आपणाला थोडें तरी मेस्मेरिझमचें ज्ञान असलें पाहिजे म्हणजे एखाद्याच्या आत्म्याला जर आपण हुकूम केला कीं, तुला अमुक मनुष्याची कुंडली माहीत आहे ती बरोबर मांड, तर तो मनुष्य जर सत्वशील व स्थिरचित्ताचा असेल तर तंतोतंत बरोबर अशी कुंडली मांडल्याशिवाय राहणार नाहीं. यासाठीं आपणास कुंडली मांडतांना अशीं माणसें शोधून ठेविलीं पाहिजेत. शारीरलक्षणांवरून कुंडली मांडण्याच्या कामीं या पद्धतीचा पुष्कळ उपयोग होईल असें वाटते.

* * *

वरील लोकांच्या कुंडल्या आपण पाहूं लागलों तर असा एक सर्व साधारण नियम आढळतो कीं, त्यांचीं लग्नें गुरु, बुध किंवा शनि यांच्याच राशींचीं असतात. धनु व मीन हीं गुरूचीं, मिथुन व कन्या हीं बुधाचीं आणि मकर व कुंभ हीं शनीचीं लग्नें आहेत. लग्न, चंद्र, शनि, गुरु व बुध यांचें निवासस्थान बहुतांशीं वरील राशींत नसेल तर ती कुंडली वकिलाची नव्हे असें खात्रीनें सांगतां येईल. * * *

धनस्थानीं असलेला पापग्रह जर आपल्या शत्रूच्या घरांत असेल तर वडिलार्जित धन व इष्टेट यांच्या संबंधानें कुटुंबांत तंटे उत्पन्न होतील व त्या पायीं त्या धनाचा व इष्टेटीचा नाश होईल असें निश्चयानें समजावें. * * *

मकर राशीच्या रवीवर ज्यांचा जन्म आहे त्यांस पुढील गोष्टींचा अनुभव मिळाला पाहिजे. १ बाप दरिद्री व आते संकटें भोगणारा. २ त्याच्याशीं वैर ३ त्याच्यापासून दूर राहण्याचा योग ४ दत्तकयोग ५ नोकरींत दगदग ६ अधिकाऱ्यांशीं तंटे ७ अनेकांशीं शत्रुत्व ८ शत्रूकडून जिवावरचे प्रसंग ९ सूड घेण्यावे प्रयत्न १० संप-

त्तीच्या अडचणी. हे परिणाम एका मनुष्यास सर्वच अनुभवास येतील असें नाहीं, पण अशा तऱ्हेचा त्याला थोडा तरी अनुभव आलाच पाहिजे. * * *

शनि व हर्शल हे दोन ग्रह जवळ जवळ असे दुसऱ्या स्थानांत असतील तर डोळे घोरपिंगट व दुखरे असतील. हा योग रवि किंवा मंगळ यांच्या घरीं किंवा धनु राशींत झाल्यास फार वाईट कदाचित् नेत्र जाण्याचाही संभव आहे

* * *

मेष राशींत जर चंद्र हा मंगळाशीं युति करीत असतां जन्म होईल तर त्याच्या शिरोभागावर निश्चयानें पडल्याची अगर लागल्याची कांहीं तरी खुण असेल. हा योग लग्नांत अगर चतुर्थ स्थानांत होऊन त्यावर शनीचा अगर हर्शलची दृष्टि असेल तर त्याचे आयुष्य फार धोक्याचें होईल. अपघात व दुखापति यांचें तो माहेरघर असेल व त्या संबंधाने तो अतिशय क्लेश भोगील. मेष राशींत २६ अंश ४० कलांच्या पुढें चंद्रमंगळयुति असेल तर ती फार भयंकर होय. * * *

एका मुलाचा जन्म झाल्यावर आई वेडी झाली व तिची सैतानी वृत्ति झाली. त्या मुलाची कुंडली पाहिली, तींत मातृकारक चंद्र वृश्चिक २३।१४ मध्यें नीचस्थ असून मातृस्थानाचा अधिपति शनि हाही मेष राशींत २३।१३ मध्यें नीच आहे व या उभयतां ग्रहांमध्यें षडाष्टक योग झाला असून मातृ (चतुर्थ) स्थानीं हर्शल मकर राशींत १३।२० आहे आणि समोर नेपच्यून आहे, त्याचप्रमाणें चंद्राच्या अष्टमांत राहू आहे असें दिसून आलें. हे योग इतके भयंकर अहेत कीं त्यामुळें तिचे इहलोकीं फार दिवस जाणें शक्य नाहीं ! मुलही अल्पायुच होणार हें निःसंशय आहें.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम् ।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥

'भवभूति'

पुस्तक १० वें.] ज्येष्ठ शु० ८ बुधवार [अंक १० वा

संपादकीय स्फुट लेख.

ज्योतिष्याला संकटकाळ जितका चांगला कळतो तितका मुक्तकाळ चांगला कळत नाहीं. दशांवरून मुक्तकाल कळतो असें कित्येकांचें ह्मणणें आहे, परंतु त्यांत विशेष अर्थ नाहीं. आमच्या मतें तो निवळ भ्रम आहे. टिळकांचे ग्रह बिघडले आहेत ह्मणून ते संकटांत पडतील हे ज्योतिष्यांस जितकें ठासून सांगतां आलें तितका मुक्तकाल आजमासानें सांगतां आला नाहीं ! आबा, कोणी दोन वर्षांनंतर सुटतील असे ह्मणेल तर दुसरा ३ वर्षांनीं सुटका होईल असें ह्मणेल, तिसरा चार वर्षांनीं तर चवथा पांच वर्षांनीं व पांचवा पूर्ण शिक्षा भोगतील असें ह्मणेल, आणि शेवटीं यांपैकीं एखाद्याचें भविष्य बरोबर उतरेल हें उघड आहे. पण याला शास्त्रीय भविष्य ह्मणतां येणार नाहीं. आमच्या मतें

ज्योतिःशास्त्रानें हें सांगतां येणें कठीण आहे, किंबहुना अशक्यच आहे. वर्ष मुकरर करितां येणार नाहीं, मग महिना आणि तारीख यांचें नांव कशाला पाहिजे? या उदाहरणावरून संकटाचा मुक्त-काल सांगणें ज्योतिष्याच्या सामर्थ्याबाहेर आहे असें सिद्ध होतें.

* * *

ज्योतिष्याला ग्रहणें, ग्रहाच्या युत्या व त्यांचे उदयास्त बिनचूक समजतात, ह्मणून भविष्यहि अमुक वाजून अमुक मिनिटांपर्यंत बिनचूक कळलें पाहिजे हें जरी शाब्दिक दृष्टीनें खरें असलें तरी तसा अनुभव येत नाहीं. सुधाराचा काल समजतो, ह्मणून कित्येक लोक या शास्त्रावर विश्वास ठेवीत नाहींत. त्यांचें ह्मणणें जशीं ग्रहणें वर्तवितां येतात तसेंच भविष्य वर्तवितां येईल तरच ज्योतिःशास्त्र खरें, नाहींपेक्षां तें जादुगारांचें एक पोट भरण्याचें साधन आहे. या पलीकडे त्यांत कांहीं अर्थ नाहीं. परंतु हें त्यांचें अज्ञान आहे. ज्योतिःशास्त्र आज इतकें पूर्ण आहे, असें कोण ह्मणतो? तथापि पूर्वी एका काळीं तें इतक्याहि योग्यतेला गेलेलें होतें असें भृगुसंहितादि प्राचीन ग्रंथावरून दिसतें. ज्या शास्त्रानें कुंडलीवरून आई, बाप, भावंडें, बायका व मुलें यांच्या नांवाचीं आद्याक्षरें कळलीं, जन्मगांव, भाग्योदयाचें व व्यवहाराचें स्थल यांचीं नांवेंही आद्याक्षरानें समजलीं असून प्रसूति, लग्न, भाग्योदय, आजारीपणा, आईबापांचे मृत्यु, वगैरे गोष्टींचे बिनचूक काल समजले होते असें भृगुसंहितादि ग्रंथांवरून दिसतें, तें शास्त्र खरें नाहीं असें कोण ह्मणेल? आज अशा तऱ्हेचें भविष्य बिनचूक करितां येईल असें त्याला शास्त्रीय स्वरूप दिलेले ग्रंथ नाहींत, ह्मणून जो तो ज्योतिषी आपल्या बुद्ध्यनुरूप भविष्य वर्तवित असतो, तें कित्येक प्रसंगीं बरोबर उतरतें तर कित्येक प्रसंगीं साफ चुकतें. ह्मणून हा एक पोट भरण्याचा भिकारडा

धंदा आहे असें कसें ह्मणावें? आजच्या शास्त्रानेंही कित्येक गोष्टी चांगल्या समजतात, पण त्यांची संख्या कमी आहे हें आह्मांस कबूल आहे. ती संख्या अधिक वाढविण्याची खटपट करणें हें प्रत्येक ज्योतिष्याचें कर्तव्य आहे असें आह्मी समजतों.

एक गृहस्थ मोठ्या ऐटींत ह्मणाले कीं, "ज्योतिष्याला दगड सुद्धां कळत नाहीं, माझा तर त्यांच्या वरचा साफ विश्वास उडाला आहे." या गृहस्थांस असें मत होण्याचें कारण विचारिलें, तेव्हां ते ह्मणाले—"अहो, हैदराबादेंत किती तरी ज्योतिषी आहेत व इतरत्रही टोपलीभर असतील, पण एकाही ज्योतिष्यानें सांगितलें नाहीं कीं, यंदा या शहरांत मोठा कहर होणार आहे व सर्व शहर पावसाच्या पाण्यानें जमीनदोस्त व्हावयाचें आहे! जर एवढी मोठी गोष्ट ज्योतिष्यास कळत नाहीं तर ते ज्योतिषी कसले व तें शास्त्र कसलें!" या गृहस्थाला समाधानकारक उत्तर देणें कठीण आहे. परंतु अशा कोणत्या ज्योतिष्यानें पाटी लावली आहे कीं, "कोणत्या ठिकाणीं काय अनर्थ होणार आहे अगर कोणतें ठिकाण शृंगारलें जाणार आहे, हें ज्यांस विचारावयाचें असेल त्यानें मजकडे यावें?" हैदराबादेंतला प्रत्येक मनुष्य जर आपली कुंडली एखाद्या चांगल्या ज्योतिष्यास दाखविता तर 'तुझा अमुक काळीं मोठा नाश होणार आहे' असें ज्योतिष्यानें त्याला खात्रीनें सांगितलें असतें. व याप्रमाणें जर त्याच्या दृष्टीस शेंकडों कुंडल्या दृष्टीस पडल्या तर ज्योतिषी त्यांवरून हैदराबादच्या नाशाचेंही कदाचित् निदान करिता. पावसाचें भविष्य अद्यापि एकाही ज्योतिष्याला करितां येत नाहीं, मग अमुक ठिकाणीं अतिवृष्टि होऊन त्या ठिकाणचा नाश होणार हें त्याला कसें सांगतां येईल! ज्या मार्गानें सांगतां येण्यासारखें आहे तो मार्ग परस्वाधीन आहे. ह्मणून या गृहस्थाचें ह्मणणें कबडी मोल आहे असें आह्मीं समजतों.

* * *

अमुक ठिकाणीं अमुक प्रमाणाचा पाऊस अमुक ठिकाणीं पडेल असें सांगणारे ज्योतिःशास्त्रावर ग्रंथ नाहींत, ह्मणून ज्योतिष्याचा निरुपाय आहे. ज्योतिष्याला पावसाचे योग साधारणतः कळतात, पण त्यांचा परिणाम कोठें किती घडेल हें सांगतां येत नाहीं. हिंदुस्थानांत निरनिराळ्या स्थळीं निरनिराळ्या प्रमाणाचा पाऊस पडतो. कित्येक स्थळीं ६०० इंचपर्यंत पडतो तर कित्येक स्थळीं मुळींच पडत नाहीं. कित्येक स्थळीं तर वर्षांतून दोन वेळ पडतो. या विषयाचें विवेचन "**वातावरण**" नामक मराठी पुस्तकांत सुरेख केलेलें आहे. पावसाचें भविष्य वर्तविणाऱ्या ज्योतिष्यानें हें पुस्तक अवश्य संग्रही ठेवावें. पावसाचे योग उत्तम असूनही एखाद्या ठिकाणीं अतिवृष्टि होते, तर दुसऱ्या ठिकाणीं पावसाचा एक थेंबही दृष्टीस पडत नाहीं. कोंकणांत सुबत्ता झाली तर गुजरायेत दुष्काळ! असा पावसांत अनियमितपणा असल्यामुळें फलज्योतिषानें पावसाचें प्रमाण वर्तविणें अशक्य आहे.

* * *

हल्लींच्या भूमध्यस्थ पद्धतीनें पावसाचें अनुमान मुळींच होणें नाहीं. पृथ्वीला कोणता ग्रह जवळ आला आहे व कोणता पृथ्वीपासून अति दूर अंतरावर गेला आहे, अमुक ग्रहांचा योग पृथ्वी आणि सूर्य यांच्यामध्यें होत आहे अगर अन्यत्र होत आहे, वगैरे गोष्टींचें ज्ञान झाल्याशिवाय पावसाचें भविष्य चांगलेंसें करितां येणार नाहीं. त्याचप्रमाणें सूर्यावर दिसणाऱ्या डागांचेंही ज्ञान झालें पाहिजे. केवळ अमुक नक्षत्र हत्तीवर बसलें आहे, ह्मणून पाऊस पुष्कळ पडेल व अमुक कोल्ह्यावर बसलें आहे ह्मणून तो फार कमी पडेल किंवा मुळींच पडणार नाहीं, असल्या कोटिक्रमानें ज्ञात्यांचें समाधान होण्यासारखें नाहीं हें उघड आहे.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम् ।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥

'भवभूति'

पुस्तक १०.वें.]अषाढ शु० ९ शुक्रवार [अंक १२ वा

संपादकीय स्फुट लेख.

"जिशीं विद्या, आणि तिशीं धन" अशी एक आपल्यांत ह्मण आहे. मुलगा आठ वर्षांचा झाला ह्मणजे त्याला मौंजीबंधन करून गुरूच्या स्वाधीन करावयाचा, तेथें बारा वर्षें अध्ययन झाल्यावर त्यानें गृहस्थाश्रमाचा स्वीकार करून कुटुंबपोषणाचा मार्ग धरावयाचा असा आपल्या देशांतला पूर्वीचा निर्बंध आहे. ह्मणून वीस वर्षांपर्यंतच विद्येचा काळ समजला गेला. हल्लींचा काळ किंचित् बदलला आहे. विसाव्या वर्षी एम्. ए. किंवा एल्. एल. बी. झालेलीं माणसें फारशीं आढळत नाहींत. विसाव्या वर्षी मोठ्या शिकस्तीनें बी. ए. होतां येतें व त्यामुळें एम्. ए. वगैरे होण्यास आणखी २।३ वर्षें तरी लागतात. त्यामुळें मुलगा जर उत्तम बुद्धिमान् असला तर मोठ्या शिकस्तीनें २२।२३ व्या वर्षी त्याचा विद्याभ्यास पुरा होतो. परंतु हें सर्वांना साधत नाहीं. ह्मणून हल्लींची मर्यादा जवळ जवळ तीस वर्षें गेली आहे. विद्यारंभ ६ वर्षें

धरून सुद्धां मर्यादा विसांच्या पुढें गेली आहे ! विद्येची मर्यादा पुढें गेल्यामुळें धनाची मर्यादाही सहजच पुढें गेली,

* * *

वीस वर्षांपर्यंत ज्याचा विद्याभ्यास पुरा होतो, त्याला धनाचा संग्रह करण्यास १० वर्षें लागतात. शनीचा फेरा ३० वर्षांनीं होतो. ह्मणून पहिला फेरा पूर्ण झाल्यावर मनुष्यास चांगलें दिवस येतात. हा फेरा कुंडलींत ज्या ठिकाणीं पूर्ण होतो, त्या ठिकाणीं अनिष्ट असा जन्मकालींच योग असल्यास शनि सुस्थळीं जाईपर्यंत त्याचा भाग्योदय होत नाहीं.

* * *

मनुष्याचें एकशें वीस वर्षें आयुष्य मानलेलें आहे. इतक्या मर्यादेंत शनीचे चार फेरे होतात. शनीचा पहिला फेरा विद्याभ्यास व उद्योगधंद्याचा आरंभ यांत जातो. दुसऱ्या फेऱ्यांत त्याला स्वतः साठीं किंवा मुलांबाळांसाठीं कमवावयाचें असतें. हा फेरा साठ वर्षांनीं पुरा होतो. तिसऱ्या फेऱ्यांत त्याला बसल्या जागेवरूनच संसाराचा गाडा चालवावयाचा असतो, आणि चवथ्या फेऱ्यांत ह्मणजे ९० वर्षांपलीकडील काळांत त्याला परतंत्र व्हावें लागतें !

* * *

सांप्रत बहुतेकांचें आयुष्य शनीच्या तिसऱ्या फेऱ्याच्या आरंभाच्या सुमाससच खलास होतें असा अनुभव आहे. शनीच्या चवथ्या फेऱ्यांत जीवनयात्रा कंठणारा पुरुष हिंदुस्थानांत कचित् असल्यास नकळे ! तिसऱ्या फेऱ्यानंतर कोणीही जिवंत राहूं शकत नाहीं. ह्मणून पहिल्या फेऱ्यांत मृत होणारा तो अल्पायु, दुसऱ्या फेऱ्यांत मृत होणारा तो मध्यायु, तिसऱ्या फेऱ्यत मृत होणारा तो दीर्घायु व चवथ्या फेऱ्यांत मृत होणारा तो पूर्णायु समजावा.

* * *

शनीच्या पहिल्या फेऱ्यांत पांच वर्षें पर्यंत बाल, १६ वर्षांपर्यंत कुमार व पुढें तरुण अशा अवस्था येतात. पंचविशीपर्यंतच

तारुण्याचा भर असतो. पुढें ४० वर्षेंपर्यंत समान स्थिति असते. चाळिशीनंतर वृद्धावस्था सुरू होते. शनीच्या तिसऱ्या फेऱ्यापर्यंत या अवस्थेची मर्यादा दिसते. पुढील काल हा मृतावस्थेचा होय. शनीच्या चवथ्या फेऱ्यांत तर तो पूर्णपणें मृतावस्था भोगितो.

* * *

शनीच्या तीन भ्रमणांइतकेंच जवळ जवळ हर्शलचें एक भ्रमण आहे. ह्मणून साधारणतः हर्शलचें एक भ्रमण ह्मणजे मध्यमायूंची अमर्यादा होते. इतक्या कालांत नेपच्यूनची अर्धी प्रदक्षिणा होते. नेपच्यूनची पाऊण प्रदक्षिणा ह्मणजे पूर्णायूची आयुर्मर्यादा होते.

* * *

वरील तीन ग्रहांच्या भ्रमणस्थितिवरून आयुष्यांतला कोणता काल सुखाचा व कोणता काल दुःखाचा याची कल्पना करीत आली पाहिजे. कोणत्या अवस्थेंत वरील तीन ग्रह कोणत्या स्थितींत आहेत, तें पाहून ती अवस्था कशा प्रकारची जाईल याची कल्पना करावी. * * *

कोणताही ग्रह लग्न व चंद्र यांच्या ९।१०।११ स्थानांतून जेव्हां भ्रमण करितो, तेव्हां तो काल मनुष्यास सुख, संपदा व ऐश्वर्य यांच्या प्राप्तीचा होतो. यांत तिलप्राय शंका नाहीं. जर हर्शल, नेपच्यून, शनि व गुरु हे ग्रह एखाद्याच्या कुंडलींत एकाच कालीं भाग्य, दशम व लाभ या स्थानांत भ्रमण करूं लागतील तर तो काल त्या मनुष्यास सर्वोत्तम असा जाईल. * *

लग्नाच्या ९।१०।११ या स्थानांतून कोणताही ग्रह भ्रमण करितांना त्याचा जन्मस्थ चंद्राशीं शुभयोग झाला पाहिजे, तरच त्याचें उत्तम फल मिळतें. अशुभ साडेसाती आणि लग्न व चंद्र यांस६।८

१२।४इतक्या स्थानीं पापग्रह असण्याचा काल मनुष्याच्या दुःखाचा आहे.

* * *

कुंडलीवरून प्रथम मनुष्याची लायकी समजली पाहिजे. एखादा मनुष्य भाग्यवान् असेल तर त्याला अनिष्ट ग्रहांची बाधा बहुधा मुळींच होत नाहीं व झाली तरी समजण्यांत येत नाहीं, त्याच्या ऐश्वर्याची एकसारखी वृद्धिच होत जाते. पण जो मनुष्य अभागी असतो, तो जरी श्रीमंताच्या पोटीं जन्मास आला, तरी अखेरीस भिकारी होतो व त्याचें दिवसें दिवस मार्गेंच पाऊल पडत जातें जे मध्यम असतात, त्यांच्या भाग्याची नेहेमीं भरती ओहोटी होत जाते. ग्रह चांगले आले कीं भरभराट होते व एखादा ग्रह बिघडतांच नुकसान होतें. याशिवाय आणखी एक वर्ग आहे, तो हा कीं जीं माणसें विवक्षित कालापर्यंत सारखें वाढतें, ऐश्वर्य भोगतात, पण त्या कालापासून उतरती कळा लागत जाते. किंवा प्रथम सारखें दारिद्र्य वाढतें व त्या कालापासून पुढें सारखी चार वर्गांपैकीं कोणत्या मार्गीत तो मनुष्य येतो, याची चांगली पारख झाली पाहिजे. ही पारख कशी करावी तें सांगतां येण्यासारखें नाहीं. निरंतर कुंडल्या पाहण्याचा क्रम ही दृष्टि प्राप्त होण्यासारखी आहे.

* * *

चंद्राच्या अगर लग्नाच्या धनस्थानीं किंवा व्ययस्थानीं जर मंगळ असेल तर त्या मनुष्यानें कितीही धन मिळविलें तरी फुकट आहे असा अनुभव येतो.

कुंडलीविज्ञान.

पुस्तक १०.वें.] श्रावण शु०१० सोमवार[अंक १४ वा

स्फुट विचार.

आपल्या कुंडलींत संपत्तिदायक ग्रह कोणता हें प्रथम ठरविलें पाहिजे. हें जर बिनचूक निश्चित होईल तर कोणत्या कालांत आपणाला चार पैसे मिळतील हें निश्चयात्मक ठरवितां येईल. उदाहरणार्थ–आपल्या कुंडलींत लाभस्थानीं तूळ राशीचा शुक्र आहे तर हाच ग्रह आपणास संपत्ति मिळवून देणारा आहे असें समजलें पाहिजे. ह्मणून तो संपत्तिदायक स्थितींत येईल त्याच वेळीं घडणाऱ्या व्यवहारांत आपणास चांगला फायदा हाऊ शकेल. ही वेळ जर आपल्या भाग्याची असेल तर आपल्या कल्पनेबाहेर धन मिळेल आणि दुर्दैवाची असेल तर साधारण लाभ होईल.

* * *

शनि, गुरु व हर्शल या तीन ग्रहांच्या अनुरोधानें भाग्यकालाची मर्यादा ठरवावयाची असते. बहुतेक ज्योतिषी दशांनाच महत्व देतात. पण, उत्तम ग्रहाची दशा असून जर अनिष्ट साडेसाती असेल किंवा वरील तीन ग्रह अनिष्ट स्थितींत आले असतील तर त्या दशेंत अनिष्ट गोष्टीच घडून येतात असा अनुभव येतो. ह्मणजे चर ग्रहांचें दशास्वामीपेक्षां प्राबल्य होते. ह्मणून चर ग्रहांनाच महत्व द्यावें लागतें. दशाविचार हा गौण आहे. दशा विचार जर चर ग्रहांच्या मदतीनें केला तर भविष्य चांगलें सांगतां येईल. सारांश, उत्तम फल देणारी दशा असून शनि, गुरु, हर्शल हे तीन ग्रह ज्या कालीं उत्तम फल देऊं शकतात तोच भाग्यकाल जाणावा.

* * *

भाग्यवान् मनुष्यांना भाग्यकालीं संपत्तिदायक ग्रह संपत्ति देण्या योग्य स्थितींत आला ह्मणजे निश्चयानें अनेक प्रकारें विपुल संपत्ति मिळते. मिळवण्याचा प्रयत्न करावा लागतो असें नाहीं, दुर्दैवी मनुष्यालाही भाग्यकालीं थोडाबहुत लाभ होतोच. वंध्या स्त्रीला ज्याप्रमाणें कोणत्याही उपायानें संतति होणें शक्य नाहीं त्याच प्रमाणें कोणत्याही उपायानें भाग्यकालींही संपत्ति मिळत नाहीं असा दुर्दैवी मनुष्य विरळा ! जो मनुष्य मुळींच जन्मांध त्याच्या पुढें प्रत्यक्ष सूर्य उभा राहिला ह्मणून त्याला यत्किंचित तरी दिसणें शक्य आहे काय ? तात्पर्य ज्याला पुष्कळ संपत्ति मिळविण्याची इच्छा असेल त्याला जन्मकाळीं भाग्ययोग उत्तम प्रकारचा झालेला पाहिजे.

* * *

भाग्ययोगाचे नंबर लावतां येतील तर आपण कोणापेक्षां थोर व आपला नंबर कितवा हें चांगल्या रीतीनें सांगतां येईल. जातक ग्रंथांत अनेक भाग्ययोग सांगितले आहेत, पण त्यांत कोणता श्रेष्ठ व काणता कमी योग्यतेचा हें सांगितलेलें नाहीं. त्यामुळें ज्योतिषाला नेमकें फल सांगतां येत नाहीं. भाग्ययोग आहे इतकें त्याला कळतें, पण तो किती योग्यतेचा आहे हें स्पष्ट शब्दानें सांगतां येत नाहीं. आजपर्यंत असा कोणींच प्रयत्न केला नाहीं कीं, भाग्ययोग अमुक योग्यतेचा आहे असें स्पष्ट शब्दानें सांगतां येईल.

* * *

भाग्ययोग असा पाहिजे कीं कुंडलींत दुर्दैवी योग एकही होतां कामा नये. अशी जी कुंडली असेल ती आपणास १ ल्या वर्गांत ठेवितां येईल. भाग्ययोग विशेष महत्वाचे असून दैवहीन योग दुर्बल असतील अशी कुंडली २ ऱ्या वर्गांत बसेल. भाग्ययोग जितक्या योग्यतेचे तितक्याच योग्यतेचे जर दैवहीन योग होतील तर तो मनुष्य ३ ऱ्या प्रतीचा झाला. भाग्ययोग दुर्बल असून दैवहीन योग प्रबल असतील तर तो मनुष्य ४ थ्या प्रतींत गणला

जाईल. भाग्ययोग मुळींच नसून दुर्दैवी योगच ज्या कुंडलींत आहेत ती कुंडली ५ व्या वर्गाची झाली. याप्रमाणें पांच वर्ग केल्यास आपणास आपली कुंडली कोणत्या वर्गांत येते हें ज्याचें त्यास ठरवितां येण्यासारखें आहे.

* * *

पहिल्या वर्गांतील माणसें जगांत फार कमी आहेत. असल्या माणसांस ज्योतिषशास्त्राची आवश्यकताच नाहीं. ज्याप्रमाणें निरोगी माणसांना वैद्याची किंवा औषधाची मुळींच जरूर नसते, त्याच प्रमाणें पहिल्या वर्गाच्या मनुष्याला ज्योतिषाची किंवा जपदानादि उपायांची जरूरच नसते. शिवाजी किंवा पहिला बाजीराव यांसारखीं जीं माणसें तीं या पहिल्या वर्गांत येतात. याच्या प्रयत्नांत एकंही ग्रह आडवा येऊं शकत नाहीं अथवा तीं आडव्या आलेल्या ग्रहाला धक्की मारून आपला प्रयत्न नेटानें चालवितात व शेवटीं जयलक्ष्मी मिळवितात. असलीं माणसें फलज्योतिष हें एक शास्त्र आहे किंवा त्या शास्त्राची लोकांस आवश्यकता आहे असें कधींच ह्मणणार नाहींत ! ते दैवगान् असल्यामुळें उद्योगाचीच महती गातील. एका बादशहानें विचारलें, "क्यों बे बिरबल, रयत क्यों के रोती हय ? यावर बिरबल ह्मणतो—'बडा दुष्काळ पडा आहे, खानेकू अन्न नहीं मिलता, इसवास्ते रयत बडा शोक करती हय.' त्यावर बादशहा ह्मणतो—'अन्न नहीं मिला तो क्या फिकर ? **घीशक्कर** खाना और दूध पीना !' बेट्या बादशहाला दुष्काळाची काय कल्पना असणार ? 'राजाला सदाच दिवाळी तो असेंच ह्मणणार कीं, 'तूपसाखर खाऊन दूध प्यावें ह्मणजे झालें !

* * *

या पृथ्वीचा निदान तीनचतुर्थांश भाग दुर्दैवी माणसांनींच

व्यापून टाकलेला आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं त्यांत चवथ्या आणि पांचव्या वर्गांचींच माणसें फार आहेत. पांचव्या वर्गाचीं माणसें तर नेहमीं कपाळावर हात मारून घेत असतात !. अशा माणसांस एकनाथात्मजासारखे बादशाह जर असा उपदेश करूं लागले कीं–'बाबांनों भिऊं नका, नोकरी किंवा मजुरी मिळत नसेल तर व्यापार करा ह्मणजे झालें !' तर त्यांच्या त्या उपदे–शाची ते लोक काय किंमत करितील याचा वाचकांनीं विचार करावा !! जग कितीही सुधारलें तरी हे लोक त्याच्या अंतापर्यंत असणारच. त्यांना उद्योगवाद व्यर्थ आहे. अनिष्ट ग्रह असतां त्यांना एकनाथात्मजांसारख्यांनीं मागाहून किती जोरानें जरी टेकू दिला तरी तीं हाय हाय करीत उताणीं पडणारच ! अशा वेळीं फलज्योतिषाचा टेकूच जर पडला तर थोडाबहुत उपयोगी पडेल. त्याला फलज्योतिषी सांगेल कीं 'बाबा तुझा अमुक ग्रह बिघडलेला आहे, यासाठीं यावेळीं जर तूं अमुक काम केलेस तर त्यांत तुझा नाश होईल आणि जर कार्णेच प्राप्त होईल तर तें नीट विचा–रानें कर व त्या ग्रहाचा आराधनाही कर.' कारण, हीं माणसें ह्मणजे 'पावट्याच्या निमित्ताचीं' असतात, त्यामुळें एखादा ग्रह बिघडला तरी त्यांच्यावर त्याचा परिणाम होतोच. मग त्या वेळीं इतर ग्रह कितीही चांगले असोत.

* * *

तात्पर्य, एखाद्या कुंडलीचें जज्जमेंट लिहितांना वरील गोष्टींचा प्रथम विचार केला पाहिजे. नाहीं तर भविष्य कधींही बरोबर उतरणार नाहीं.

कुंडलीविज्ञान.

पुस्तक १० वें.] पौष शु० ४ शनवार [अंक १ ला.

मुद्राज्योतिष.

किंवा

पटवर्धनी विद्या.

जातक, मुहूर्त व संहिता हे फलज्योतिषाचे तीन प्रकार आहेत. जन्मकालीन ग्रहस्थितीवरून जें भविष्य करितात त्यास जातक ह्मणतात. मग हें भविष्य कोणत्याही प्राण्याचें, वनस्पतीचें, संस्थेचें अगर अन्य कोणत्याही गोष्टीचें असो. असें आहे तरी आमच्या सर्व जातक ग्रंथांत मनुष्य प्राण्याचेंच भविष्य कसें करावें हें सांगितलें आहे. क्वचित् वनस्पतीविषयींही सांगितलेलें आहे, पण तें फारच आकुंचित आहे, व्यवहारांतही त्याची फारशी जरूर नसते, ह्मणून ग्रंथकारांनीं व शोधकांनीं तिकडे फारसें लक्ष दिलेलें नाहीं. त्यामुळें जातकाची ही शाखा बरीच अपूर्ण आहे. संस्था वगैरे गोष्टी विषयीं तर कोठेंच उल्लेख नाहीं. तरी पण कोणत्याही ग्रंथकाराला व शोधकाला या शाखांवर स्वतंत्रपणें शोध करितां यावा व ग्रंथरचना करितां यावी अशी तत्वें सांगितलेलीं आहेत. शोधक व ग्रंथकार यांचीच आवश्यकता आहे. फलज्योतिषाचा दुसरा प्रकार जो मुहूर्त त्यावर बरेच ग्रंथ आहेत. अमुक काल अमक्या प्रकारचा आहे,

ह्मणून अमुक काळीं अमुक कर्म करावीं किंवा करूं नयेत अशा प्रकारचा या विषयांत उल्लेख केलेला आहे. परंतु तो सामान्य किंवा तात्विक असल्यामुळें प्रत्येक व्यक्तीनें प्रत्येक प्रसंगीं त्याचा कसा उपयोग करून घेतला पाहिजे हें त्यावरून समजत नाहीं. गमनास उत्तम नक्षत्र किंवा उत्तम वेळ पाहिल्यानें काम भागत नाहीं. ती वेळ एखाद्या व्यक्तीला अगर कार्याला फायदेशीर आहे कीं नाहीं हें ठरविल्याशिवाय यश खात्रीनें मिळेलच असा भरंवसा नसतो. ह्मणून मुहूर्तप्रकरणींही नवीन शोधकास अगर ग्रंथकारास हात घालण्यास जागा आहे. संहिता प्रकरणांत देशानिहाय भविष्य वर्तवितां यावें अशी योजना नाहीं, ह्मणून हेंही प्रकरण आधुनिक ज्योतिर्विदांस विचारार्ह आहे. या प्रमाणें या तीन प्रकारांची हल्लींची स्थिति आहे. यांपैकीं आह्मीं आपणांस जातक प्रकरणावरच विचार करण्यास पूर्णपणें वाहून घेतलें असल्यामुळें यांत जें कांहीं आमच्या बुद्धीला कमजास्त वाटेल तें वाचकवर्गापुढें वेळोवेळ मांडावयाचें इतकेंच आमचें कर्तव्य आहे. या कर्तव्याला अनुसरून शिरोभागीं लिहिलेल्या विषयावर आज जे जे विचार सुचले आहेत ते जसेच्या तसेच या खालीं नमूद करण्याचें योजिलें आहे. मनुष्यानें कर्तव्य करावयाचें आहे, फलाची इच्छा करावयाची नाहीं असें भगवान् श्रीकृष्ण गीतेंत सांगतात, ह्मणून आह्मीही त्या भगवंतावर निष्ठा ठेवून आपलें कर्तव्य करीत राहणार आहों. फलप्राप्ति होणें न होणें परमेश्वराधीन आहे, अशी आमची समजूत आहे.

जातक प्रकरणीं आह्मीं तूर्त मनुष्य प्राण्याच्या सुखदुःखादिकांचा विचार करणार आहों. मनुष्य प्राण्यासंबंधाचा सर्व बाजूनीं पूर्ण विचार झाल्यानंतर इतर प्राण्यांचा विचार करावयाचा. पण मनुष्याचाच अद्याप इतका विचार केला पाहिजे आहे कीं, अनेक मनुष्यांनीं

आपलें सर्व आयुष्य या कामीं खर्च केलें पाहिजे. असो. जातकाचे मुख्य दोन भाग आहेत. एक शारीरिक लक्षणांवरून कुंडली तयार करणें व दुसरा कुंडलीवरून भविष्य वर्तविणें. हे दोन्हीं भाग सारखेच महत्वाचे आहेत व कोणाचीही योग्यता दुसऱ्या पेक्षां कमी नाहीं. तथापि शारीर लक्षणांवरून कुंडली तयार करण्याची प्रशंसा जास्त होते. अशी कुंडली तयार करणाराचें लोकांस मोठें कौतुक वाटतें व नास्तिक मनुष्य सुद्धां त्याच्या भजनीं लागतो. आमच्या मतें ही विद्या भविष्य विद्येपेक्षां बरीच सोपी असून लवकर साध्य होण्यासारखी आहे. कारण भविष्य वर्तविणारांस कुंडलीवरून शारीरिक लक्षणें सांगण्याचा नित्य अभ्यास असतो. पत्रिका करणारा प्रत्येक जोशी प्रथम तनु भावाचें वर्णन करितो, तेव्हां तो शारीरलक्षणें लग्नचंद्रादिकांवरून सांगत असतो. कुंडली खरी आहे किंवा खोटी आहे हें ठरविण्याची लोकांची रीति अशी आहे कीं, जोशाच्या पुढें ती कुंडली टेवून "हा मनुष्य कसा असावा?" असा प्रश्न विचारावयाचा. जोशानें सांगितलेलीं लक्षणें जुळलीं ह्मणजे ती कुंडली खरी आहे असें समजावयाचें. जोशाला हीं लक्षणें जुळवून देण्यास शारीर लक्षणाची चांगलीच माहिती असावी लागते. कुंडलीवरून जर शारीर लक्षणें बिनचूक सांगतां येत असतील तर शारीर लक्षणांवरून कुंडलीही मांडतां आली पाहिजे असा सिद्धांत निघतो. पण अनुभव मात्र असा नाहीं. कुंडलीवरून लक्षणें सांगणारे ज्योतिषी गल्लोगल्लीं आहेत, पण लक्षणांवरून कुंडली मांडणारा मात्र "बाबाजीराव पटवर्धन उर्फ महाडकर ज्योतिषी" हा महाराष्ट्रांत एकच होऊन गेला. यावरून गल्लोगल्लीं असणाऱ्या ज्योतिष्यांस कुंडलीवरून लक्षणें सांगण्याची विद्या कितपत साध्य झालेली आहे याची वाचकांनींच कल्पना करावी! आमच्या मतें आंस या विद्येचा फारच अल्प भाग साधलेला आहे.

जर कुंडलीवरून लक्षणें समजलीं तर लक्षणांवरून कुंडलीही समजली पाहिजे. अर्थात् ही विद्या प्रयत्नानें साध्य आहे. कर्णपिशाच अगर एखादें दैवत साध्य करून घेण्याची आवश्यकता नाहीं. तथापि हा युक्तिवाद अद्यापि लोकांस खरा वाटत नाहीं, हें मोठें आश्चर्य आहे! ते असें ह्मणतात कीं, जर देवता साध्य होण्याची जरूर नसेल तर तुम्ही कुंडली सांगा पाहूं! कल्पनाशक्ति, बुद्धिसामर्थ्य व स्मरणशक्ति यांचें ज्याला भरपूर साह्य आहे तो मनुष्य किती विलक्षण गोष्टी करून दाखवितो, हें ज्याला समजतें तो असा वेड्यासारखा प्रश्न विचारणार नाहीं. आह्मांला कुंडली सांगतां आली नाहीं तर ही कर्णपिशाचाची विद्या आहे असें सिद्ध करणें निवळ अज्ञान होय असें आमी समजतों. कुंडलीविज्ञानांत या विद्येसंबंधानें मागें अनेक वेळां आह्मीं आपलें मत दिलें आहे, तेंच अद्यापि कायम आहे. या विद्येस आह्मी **—मुद्राज्योतिष** किंवा **पटवर्धनी विद्या**—हें नांव दिलें असून या संबंधानें आतां जास्त विचार करणार आहों.

साधनें

आमच्या मतें या विद्येचीं पुढील ३ साधनें आहेत.

१ लें—कोणत्याही काळची पंचांगाच्या साह्यावांचून कुंडली मांडतां येणें.

२ रें—कुंडलीवरून शारीरलक्षणें सांगतां येणें.

३ रें—कुंडलीवरून अनेक मनुष्यांतून नेमका हुडकून काढतां येणें.

याप्रमाणें या विद्येचा अभ्यास करणारानें या तीन साधनांचा प्रथम उपयोग केला पाहिजे. या प्रत्येक साधनांत ज्या मानानें प्राविण्य संपादन होईल, त्या मानानें ही 'पटवर्धनीविद्या' साध्य होईल, हें उघड आहे. या साठीं या प्रत्येक साधनाविषयीं काय काय केलें पाहिजे याचा विचार करूं.

साधन १ लें—कोणत्याही काळाची कुंडली पंचांगाच्या साह्यावांचून पूर्णपणें मांडतां येणें कठीण आहे. कारण सर्व पंचांगें पाठ करण्याइतकी विशाल बुद्धि मनुष्यामध्यें असणें शक्य नाहीं. तथापि जर पंचांगांचें संक्षिप्त टिपण जवळ असेल तर त्यावरून सर्व ग्रह बिनचूक भरतां येतील. इंग्रजीमध्यें अशा तऱ्हेचीं पुस्तकें आहेत. मराठींतही तशा धर्तीवर एखादें पुस्तक करण्यासारखें आहे. शके १७७१ पासून शके १८३१ पर्यंतचें साठ वर्षांचें एक पुस्तक आम्ही तयार केलें असून तें लवकरच छापून प्रसिद्ध करणार आहों. या पुस्तकाचीं सुमारें १२५ मानें होतील. अशा तऱ्हेचें पुस्तक मराठींत हें पहिलेंच होणार असून त्याची कुंडली तयार करण्याच्या कामीं उत्तम तऱ्हेनें मदत होईल. मंगळ, बुध व शुक्र हे ग्रह पाठ करून मांडतां येण्या सारखे नाहींत. रवि, चंद्र, शनि, गुरु व राहू हे ग्रह पाठ करितां येतात. रवि हा चैत्रादि महिन्याच्या अमावास्येस मेषादि राशींत असतो. ह्मणजे चैत्र अमावास्येस रवि मेष राशींत, वैशाख अमावास्येस वृषभ राशींत, ज्येष्ठ अमावास्येस मिथुन राशींत इत्यादि. अमावास्येस चंद्र हा रवीजवळच असतो, ह्मणून चंद्रही अमावास्येस कळेल. पौर्णिमेचा चंद्र साधारणतः चैत्रांत चित्रा, वैशाखांत विशाखा, ज्येष्ठांत ज्येष्ठा, आषाढांत पूर्वाषाढा, श्रावणांत श्रवण, भाद्रपदांत पूर्वाभाद्रपदा, आश्विनांत अश्विनी, कार्तिकांत कृत्तिका, मार्गशीर्षांत मृगशीर्ष, पौषांत पुष्य, माघांत मघा, फाल्गुनांत पूर्वा फाल्गुनी या किंवा याच्या जवळच्या नक्षत्रांत असतो. या नक्षत्रांवरून

साधारणतः वाटेल त्या तिथीचें नक्षत्र समजूं शकेल. मात्र हें अदमासानें कळेल, नक्की कळणार नाहीं. तिथि आणि नक्षत्र यांचें बिनचूक ज्ञान झालें तर रवि नक्की कळेल. उदाहरणार्थ.—पौर्णिमेला हस्त नक्षत्र आहे तर रवि याच्या समोरच्या राशींत ह्मणजे मीन राशींत असेल. शु० ८ ला आर्द्रा नक्षत्र आहे, तर रवि याच्या मागें ६॥। नक्षत्रें सुमारें असेल, आणि वद्य अष्टमीला पूर्वाषाढा नक्षत्र असेल तर रवि याच्या मागें ६ ॥। नक्षत्रें असेल. चंद्रनक्षत्राच्या घटका बरोबर कळतील तर रवि बिनचूक काढता येईल. एक तिथि

ह्मणजे रवि व चंद्र यांत १९ अंश अंतर, व एक नक्षत्र ह्मणजे १३⅓ अंश हें कोष्टक ध्यानांत घेऊन वाटेल त्या तिथीचा रवि बिनचूक कळतो. शनि, राहू व गुरु यांचीं राश्यंतरें पाठच केलीं पाहिजेत. याप्रमाणें तयारी केल्यावर कोणत्याही काळची कुंडली पंचांगाच्या साह्या वाचूंन मांडतां येईल.

वाटेल त्या काळचे ग्रह लक्षांत राहण्यासाठीं अंशकुंडली भरण्याचा व कुंडलीवरून जन्मकाल सांगतां येण्याचा अभ्यास केला पाहिजे. अंधकुंडलीवरून जन्मकाल सांगतां येण्याची माहिती कुंडलीविज्ञानांत मागें एखादां दिली आहे व कुंडलीवरून जन्मकाल सांगतां येण्याची माहिती सुलभजातक भाग १ मध्यें आहे. तथापि नवीन झालेल्या वाचकांसाठीं ही माहिती येथें उदाहरणानें देतों. ती अशी

अंधकुंडली



अशी एक कुंडली आपणासमोर आहे. या कुंडलींत राशींचे अंक नाहींत ते भरावयाचे आहेत.

प्रथमतः आपण अशी कल्पना करूं कीं, रवि व चंद्र हे एकाच राशीवर आहेत, त्या अर्थी अमावास्या किंवा त्याच्या जवळची तिथि असली पाहिजे. अमावास्येस आहे, असें मात्र आपणास सांगतां येणार नाहीं. कारण चंद्र २। दिवस एका राशीवर असतो, त्यामुळें २। दिवसांत रवि आणि चंद्र हे एकाच ठिकाणीं असूं शकतात.

लग्नीं रवि आहे ह्मणून हा सूर्योदयाच्या सुमाराच्या काल आहे. सूर्योदयाचाच आहे असें मात्र सांगता येणार नाहीं. कारण एक लग्न ५ घ. पर्यंत असूं शकतें. ह्मणून या अवधींत केव्हांही कुंडली मांडि-

ली तरी ती अशीच येईल. रवीचे व लग्नाचे अंश कळतील तरच नक्की घटका सांगतां येतील.

आतां, शक व महिना सांगावयाचा. कुंडलींत गुरु व राहू हे एका राशीवरच आहेत; तेव्हां ते कोणत्या अंकांत होते हें आपल्या स्मरणशक्तीनें पाहून त्यावरून शक काढिला पाहिजे. शके १७७८ सालीं हा योग होता, व तो मीन राशींत होता. हें समजल्याबरोबर या कुंडलींत आंकडे भरले ते असे.—



यांत रवि ६ व्या राशीवर आहे, ह्मणून चैत्रापासून ६ वा महिना जो भाद्रपद या महिन्याच्या अमावास्येच्या सुमाराची व सूर्योदयाच्या वेळची ही कुंडली आहे असें आपणास समजेल.

अंध कुंडली मांडण्याचा व ती मांडून जन्मकाल सांगावयाचा अभ्यास फार गमतीचा आहे. या अभ्यासानें पंचांग चांगलें लक्षांत राहतें. हा चमत्कार दाखवून अज्ञान लोकांस मोठें कौतुक वाटतें. केवळ इतक्याच ज्ञानावर लोकांस चकवून पैसा काढणारे ज्योतिषी केव्हां केव्हां आढळतात ! सामान्य मनुष्य कोणी झाला तरी गेल्या ६० ७० वर्षांतीलच कुंडली दाखवितो, व ही कुंडली ज्योतिष्यास सांगण्यास फारसा विचार करावा लागत नाहीं. पण तो जर चारपांचशें वर्षांच्या पूर्वीची एखादी कुंडली पुढें करील तर ज्योतिषीबुवांचीं थोडी गाळण च उडवील! किंबहुना तो कच्चा असेल तर फजीत झाल्याशिवाय राहणारच नाहीं! असो. आपण तूर्त ६० वर्षांतील ग्रहांचेच आडाखे बसवून ठेवूं, ह्मणजे अपणासही क्षणभर गंमत करितां येईल.

पुढील कोष्टकांत गुरु, राहू व शनि हे ग्रह वर्षांतून दोन वेळ कोणत्या स्थितींत होते हें दाखविलें आहे. यांत प्रत्येक वर्षाच्या चै. शु. १५ चे व आश्विन शु. १५ चे ग्रह दिले आहेत व ते शके १७७१ पासून शके १८३० अखेरपर्यंतचे आहेत.

शनि, राहू व गुरु

शके १७७१ ते १८३० अखेर.

शक	श	रा	गु.	शक.	श.	रा.	गु	शक	श.	रा	गु.	शक	श	रा.	गु.
१७७१	१२	५	४	१७८२	२	७	८	१८०१	१२	१०	११	१८१६	७	१२	२
	१२	५	५		७	७	८		१२	९	११		७	२२	३
१७७२	१२	५	५	१७८७	७	७	९	१८०२	१२	९	१२	१८१७	७	११	३
	१२	४	६		७	६	९		१	९	१२		७	११	४
१७७३	१	४	६	१७८८	७	६	१०	१८०३	१	८	१	१८१८	७	११	४
	१	४	६		७	६	१०		१	८	२		७	१०	५
१७७४	१	३	८	१७८९	८	५	११	१८०४	१	८	२	१८१९	८	१०	५
	१	३	८		८	५	११		२	७	३		८	१०	६
१७७५	१	३	९	१७९०	८	५	१२	१८०५	२	७	३	१८२०	८	१०	६
	२	२	९		८	५	१२		२	७	४		८	९	७
१७७६	२	२	१०	१७९१	८	४	१	१८०६	२	७	४	१८२१	९	९	७
	२	२	९		८	४	१		३	६	५		८	९	७
१७७७	२	१	११	१७९२	९	४	२	१८०७	२	६	५	१८२२	९	८	८
	३	१	११		९	३	२		३	६	६		९	८	८
१७७८	३	१	१२	१७९३	९	३	२	१८०८	३	५	६	१८२३	९	७	९
	३	१२	१२		९	३	४		४	५	६		९	७	९
१७७९	३	१२	१२	१७९४	९	२	४	१८०९	३	५	७	१८२४	१०	७	१०
	४	१२	१		९	२	५		४	४	७		९	७	१०
१७८०	४	११	१	१७९५	१०	२	५	१८१०	४	४	८	१८२५	१०	६	११
	४	११	२		१०	१	५		४	४	८		१०	६	११
१७८१	४	११	२	१७९६	१०	१	६	१८११	४	३	९	१८२६	१०	६	१२
	५	१०	४		१०	१	६		५	३	९		१०	५	१
१७८२	५	१०	३	१७९७	१०	१२	७	१८१२	५	३	१०	१८२७	११	५	१
	५	१०	५		१०	१२	७		५	२	१०		११	५	२
१७८३	५	९	४	१७९८	११	१२	८	१८१३	५	२	११	१८२८	११	४	२
	५	९	५		११	११	८		६	२	११		११	४	३
१७८४	५	९	६	१७९९	११	११	९	१८१४	६	१	१२	१८२९	१२	४	३
	६	८	६		११	११	९		६	१	१२		११	३	४
१७८५	६	८	७	१८००	१२	१०	१०	१८१५	६	१	१	१८३०	१२	३	४
	६	८	७		१२	१०	१०		९	१२	२		१२	३	५

[के० ग्र० सा० पृ० २६ को० ८ वरून]

शालिवाहन शकांत १६०० पासून २०७३ पर्यंत अधिकमास व क्षयमास कोणकोणते येतात तें कोष्टक.

अधिक मास.								क्षयम.स.	
ज्ये.	१६०१	१७१७		१८३४	चै	१९५१	२०६७	१७१२	आ.	१६०३
	१६२०	१७६६		१८५२	फा.	१९६९	भा. १६१४	१७३१	मार्गे	१६०३
	१६३९	२७५५		१८७२		१९८८	१६३३	१७५०	आ.	१७४४
	१६५८	१७७४		१८९१		२००७	१६५२	ज्ये १७६९	मार्गे	१७४४
	१६७७	१७९३	ज्ये.	१९१०	आ	२०२६	१६७१	१७८८	आ.	१८८५
वै.	१६९६	१८१२		१९२९	भा.	२०४५	आ १६९०	१८०७	मार्गे	१८८५
	१७१५	आ. १८३१		१९४८		२०६४	१७०९	१८२६	पौ.	१९०३
	१७३४	१८५०		१९६७	वै.	१६१२	१७२८	१८४५	फा.	१९०४
	१७५३	१८६९		१९८६		१६३१	१७४७	१८६४	का.	१९५०
	१७७२	१८८८		२००५		१६५०	१७६६	१८८३	मार्गे.	१९५०
	१७९१	१९०७		२०२४	चै	१६६९	१७८५	१९०२	का.	२००७
चै.	१८१०	१९२६	वै.	२०४३		१६८८	१८०४	१९२१	का	२००७
	१८२९	१९४५	ज्ये.	२०६२		१७०७	१८२३	१९४०	फा.	२०२६
	१८४८	१९६४ आषाढ		१६०९	आषाढ	१७२६	१८४२	१९५९	मार्गे.	२०४५
	१८६७	१९८३		१६२८		१७४५	१८६१	चै. १९७८	का.	२००७
	१८८६	२००२		१६४७	आ	१७६३	१८८०	१९९७	मार्गे	२०२६
आ	१९०४	२०२१		१६६६		१७८२	१९९९ आषाढ	२०१६	पौ.	२०४५
	१९२३	२०४०	ज्ये.	१६८५		१८०१	१९१८	२०३५	मार्गे	२०२६
	१९४२	२०५९		१७०४		१८२०	१९३७	२०५४		
	१९६१	आ. १९०६		१७२३	भा.	१८३९	१९५६	२०७३		
भा	१९८०	१६२५		१७४२		१८५८	१९७६			
	१९९९	१६४४		१७६१		१८७७	१९९४			
	२०१८	१६६३		१७८०		१८९६	२०१३			
	२०३७	१६८२		१७९९		१९१५	२०३२			
	२०५६	१७०१		१८१८		१९३४	ज्ये. २०५१			
वै.	१६०४	१७२०	वै.	१८३७		१९५३	२०७०			
आ	१६२२	१७३९		१८५६	आ.	१९७२ आषाढ	१६१७			
	१६४१	१७५८ आषाढ		१८७५		१९९१	१६३६			
	१६६०	१७७७		१८९४		२०१०	१६५५			
	१६७९	१७९६		१९१३		२०२९	१६७४			
भा.	१६९८	१८१५		१९३२		२०४८	१६९३			

हीं दोन्ही कोष्टकें ज्योतिष्यास चांगलीं पाठ पाहिजेत म्हणजे अंधकुंडली चटकन भरतां येईल. मुद्राज्योतिषाचा अभ्यास करणारांनीं प्रथम आपणाकडे जो कोणी कुंडली दाखविण्यास येईल त्याला फक्त ग्रहकुंडली मांडण्यास सांगावें व नंतर आपण या कोष्टकाच्या आधारें आंत राशींचे अंक भरावे. या कामांत प्राविण्य संपादन झाल्यानंतर अंक भरतांना या कोष्टकाचा उपयोग न करितां केवळ चेहरा व इतर शारीरलक्षणें पाहून अंक भरण्याचा अभ्यास करावा या प्रमाणें उलट सुलट अभ्यासानें ही विद्या लवकर साध्य होईल.

अंधकुंडलीच्या अभ्यासांत विशेष प्राविण्य मिळविण्यासाठीं आणखी एका प्रकारचा अभ्यास ठेवावा. कुंडलींत सर्व ग्रह न भरितां एक दोन ग्रह राखून ठेवण्यास सांगावे व तेही राशींच्या अंकाबरोबर आपण भरून द्यावे. या प्रमाणें करितां येऊं लागलें म्हणजे प्रथम नुसते अंकच भरून घेऊन आपण त्यांत सर्व ग्रह भरून देण्याचा अभ्यास करावा. सारांश, या विद्येचा अभ्यास करणारानें निरनिराळ्या कल्पनांनीं पंचांगांत प्राविण्य संपादन केलें पाहिजे. हा अभ्यास फार गमतीचा असल्यामुळें बुद्धि व स्मरणशक्ति यांची वाढ होईल व करमणूक होऊन समाधान प्राप्त होईल, अशक्य गोष्टी शक्य वाटूं लागतील व लोकभ्रमही आपोआप दूर होईल.

साधन २ रें.—या पुढें कुंडलीवरून शारीरलक्षणें बिनचूक सांगता येण्याचा अभ्यास करावयाचा आहे. हा अभ्यास अत्यंत महत्त्वाचा आहे, यांत ज्या मानानें प्राविण्य संपादन होईल त्या मानानेंच पटवर्धनी विद्या साध्य होईल. अभ्यास करणारांस जातक ग्रंथ एकही उपयोगीं पडणार नाहीं असें अनुभवांतीं कळून येईल. लग्नचंद्रादिकांचें वर्णन जातक ग्रंथांत आहे, पण तें या विद्येच्या कामीं निरुपयोगी आहे. शरीराचा प्रत्येक अवयव कोणत्या ग्रहामुळें कसा बनतो हें समजून घेतल्या शिवाय पटवर्धनी विद्या साध्य होणारी नाहीं. शरीराचा एखादा अवयव लहान, मोठा, नाजूक, तेजस्वी, सुंदर अथवा दुसरा वगैरे केव्हां असतो हें ज्ञान आह्मांलाही नाहीं, त्यामुळें या साधनावर विशेष लिहितां येणार नाहीं. कित्येक गोष्टी नजरेला कळतात, पण लिहून दाखवितां येत नाहींत. तथापि वाचकांना या अभ्यासाची दिशा समजावी म्हणून आह्मांला जितकें समजलें आहे, तितकें सांगणें आमचें कर्तव्य आहे. या दिशेच्या अनुरोधानें अभ्यासी मनुष्यानें प्रयत्न करावा.

असें अनुभवाला आलें आहे कीं, लग्न आणि चंद्र यांच्याच स्थितीवर मुख्यत्वें शरीराचा बांधा व चेहरा असतो. तरी पण कित्येक ग्रह विशिष्ट राशींत कोठेंही असले तरी त्यांचा शरीरावर अंमल अंसलेला दृष्टीस पडतो. असो, आतां सामान्यत्वें प्रत्येक राशींचें व तींतील ग्रहांचें स्वरूप सांगतों.—

१ मेष.—अश्विनी, भरणी व कृत्तिकांचा एक चरण मिळून मेष रास होते. या प्रत्येक नक्षत्राचें स्वरूप भिन्न आहे, त्यामुळें या राशीच्या लक्षणांत परस्पर विरोधही दृष्टीस पडतो. प्रत्येक राशींत असाच प्रकार आहे. आह्मीं जीं लक्षणें सांगणार तीं सर्व राशीला अनुसरून आहेत, म्हणून विरोधाकडे वरील दृष्टीनें अवलोकन करावें.

लक्षणें.—अजागळ, बोलणें अडखळत, फार बोलावयास नको, एकांत अधिक प्रिय, हसणें फारच कमी, शुद्ध घोगरा (रडव्या मनुष्या सारखा), दांत पुढें किंवा दिडकें किंवा पुढले खालचे बकरीच्या दांतासारखे कंसाकार लहान, बोलतांना तोंड कमी उघडतें व त्या वेळीं हा दांतांचा चमत्कार दृष्टीस पडतो, मुद्रा रागीट व अति तरुण अशी, चालणारा व पळणारा जबर, शरीर सडपातळ, चेहरा फारसा देखणा नसतो, दांतांतून रक्त येण्याची व्यथा किंवा दुसरा कोणताही दंतरोग, भोळेपणा (होस हो म्हणण्याचा गुण) विशेष, डोळे लालपिंगट, शरीराचा वर्ण तांबूस, मस्तकावर, तोंडावर अथवा कोणत्याही शिरोभागावर कसल्या तरी निशाण्या, प्रकृति उष्ण, तामसगुण प्रधान. अवयव काटक अशा प्रकारचें या राशीचें स्वरूप आहे.

या राशींत जर रवि असेल तर डोळे घारे असतील. रवि आणि मंगळ असतील तर विशेष घारे. मंगळ असेल तर तांबूसपिंगट डोळे व केंस या राशींत जर लग्नीं रवि असेल तर मस्तकशूळ व शरीर उंच आणि तप्त असेल. लग्नीं या राशींत मंगळ असेल तर शरीराच्या कोणत्या तरी भागांतून रक्त जाण्याचा विकार असेल, तोंड व छाती हे भाग विशेष लाल असतील, मस्तकांत गळवें, खांडकें वगैरे होऊन त्याच्या निशाण्या असतील किंवा पडून जखम झाल्याच्या निशाण्या असतील किंवा देवींचे वण असतील. रवि किंवा मंगळ दुसऱ्या स्थानांत असतील तर डोळे अति घारे किंवा दुखरे असतील. डोळे येण्याची संभव विशेष सहाव्या स्थानांत या ग्रहाचा योग असेल किंवा चवथ्या स्थानांत असेल, तर अपघात येतील, भयंकर ताप येतील, गोंवर व देवी यांच्या पासून फार त्रास होईल, जाळवात, किंवा भयंकर आम्लपित्त असेल, शरीरावर डाग असेल. या राशींत लग्नीं शनि असेल व तो बोलतांना फार अडखळेल किंवा दुसऱ्या कांहीं खोड्या असतील, दांत आंवळून बोलेल, डोळे मळकट, खोल असून किंचित् पिंगट असतील. शनीच्या जोडीला रवि किंवा मंगळ असेल किंवा दोन्ही असतील तर डोळे थेट मांजरा प्रमाणें असतील या प्रमाणें सामान्यत्वें या राशीचें स्वरूप आहे.

२ वृषभ—कृत्तिकांचे तीन चरण, रोहिणी व मृगांचे दोन चरण मिळून वृषभ रास होते. लक्षणें—बांधा मध्यम उंच असून गोंडस, दांत स्वच्छ, वर्ण गौर असून तेजस्वी, चेहरा सुंदर, नेत्र तेजस्वी, प्रकृति निरोगी, गाल, व हाताचीं मनगटें गोल असून भरदार. विशेषतः शरीरांत वर्तुलत्व, तेजस्विता व अति स्वच्छता हे गुण दृष्टीस पडतात.

या राशींत गुरु, चंद्र किंवा शुक्र असतां शरीराचा व दांतांचा वर्ण अति शुभ्र व तेजस्वी असतो. या लग्नाचीं किंवा या- चंद्राचीं माणसें फारशीं दृष्टीस पडत नाहींत.

३ मिथुन.—मृगांचे दोन चरण, आर्द्रा व पुनर्वसूंचे तीन चरण मिळून मिथुन रास होते. लक्षणें—चेहरा सुरेख, किंचित् लांबट—बहुधा डोकें लांबट मागें नारळा सारखें, शरीर उंच, वर्ण काळसर, बांधा सडपातळ, नेत्र काळे, केंस बारीक असून लांब, स्वर बारीक असून मंजूळ, वाणी स्पष्ट, बोलकेपणा विशेष, विद्वान, भाषाशास्त्र जास्त प्रिय, वेंचे—ऋणी— श्लोक यांचा उपयोग बोलण्यांत अधिक, नाना बुद्धि, शांत मुद्रा अशा प्रकारचें या राशीचें स्वरूप आहे.

४ कर्क.— पुनर्वसूंचा एक चरण, पुष्य व आश्लेषा मिळून हा राशि होतो. लक्षणें—प्रवासी, उत्तम पोहणारा, बागबगीच्यांचा शोकी, गायनप्रिय, पुढले दांत मोठे, चेहरा वाटोळा असून मोहक, हाताचे पंजे व बोटें आणि पावलें हे अवयव मोठाले, धांवणारा, जलद परंतु पावलें वाकडीं टाकून चालणारा, शूर, अभद्र बोलणारा, चैनी, स्त्रियांचा शोकी, वर्ण काळसांवळा, बांधा साधारण मजबूत, उंची मध्यम, व्यसनी अनेक स्त्रिया भोगणारा अशा प्रकारचें या राशीचें स्वरूप आहे.

या राशींत लग्नीं गुरु असतां वर्ण गोरा व बांधा चांगला असतो व निर्व्यसनी राहतो. शुक्र व चंद्र असतां अति चैनी होतो, गाण्याचा वाजवण्याचा किंवा नाटकांचा विशेष शोक असतो. मंगळ, शनि व राहू असतां व्यसनी, हलकट विचाराचा व रोगट प्रकृतीचा होतो. चतुर्थ अथवा षष्ठ स्थानीं या राशींत हे ग्रह असतील तर दुःख, दारिद्र्य, विपत्ति भोगणारा होऊन बहुधा पोटदुखण्या किंवा उदररोगी होईल.

५ सिंह.—मघा, पूर्वा व उत्तरांचा पाद मिळून सिंह राशि होतो. लक्षणें—दांत अति मजबूत, छाती व कपाळ हे भाग रुंद

व भरदार आणि केव्हां केव्हां पुढें आलेलें चेहरा भिवयांच्या बाजूनें सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यास सिंहा सारखा दिसतो, नाक नकटें, शरीर मजबूत, वर्ण काळा, शब्द मोठा, निधड्या छातीचा, प्रमुखत्वानें वागणारा अधिकारी, प्रख्यात, शरीर मजबूत व अति काटक, छाती काढून चाल, धिप्पाड शरीर अशा प्रकारचें सिंह राशीचें स्वरूप आहे.

या राशींत गुरु, चंद्र, शुक्र, बुध हे ग्रह असतां वर्ण गोरा व शरीर किंचित् नाजूक होतें, कपाळ विस्तीर्ण होतें. रवि असतां फार मजबूत होतें वर्ण काळा होतो. मंगळ असतां बरेंच धिप्पाड होतें डोळे तांबूस होतात, वर्ण तांबूस होतो व मनुष्य लढाऊ होतो, अधिकारी होतो व प्रमुखत्व[illegible]तो. अपघात आणि दुखापती होतात. शनि किंवा राहू असतां शरीर सोशीक होतें, पण रोगट होतें, प्रमुखत्व प्राप्त होत नाहीं, शत्रु व भय फार.

६ कन्या.—उत्तरा तीन चरण, हस्त, चित्रा दोन चरण मिळून कन्या रास होते. लक्षणें—लाजाळू, उभा राहिल्यावर अथवा चालतांना मान वाकडी करितो, आळशी, संथ, चालतांना हात जास्त हालवतो, बोलतांनासुद्धां मान फार हालवतो, हांसत बोलतो, चेहरा रुंद व वाटोळा, चाल किंचित् डुलत, पळण्याच्या कामांत सामान्य, प्रौढ भाषण करणारा, शुद्ध लहान व बारीक, स्त्रियांसारखा भासतो, विद्वान असतो, अशा प्रकारचीं या राशीचीं लक्षणें आहेत.

७ तूळ.—चित्रा चरण दोन, स्वाती आणि विशाखा चरण तीन मिळून तूळ रास होते. लक्षणें—चेहरा, हात, पायाच्या नळ्या व एकंदर शरीर फार लांबट, बांधा वरचा उंच असून सडपातळ, वर्ण काळा, स्वर लहान, हांसणें तोंड आंकुचित करून व मासलेवाईक, बोलणें जपून, नेमकें व सत्य, वृत्ति सात्विक, बोलतांना माना उभ्या फार हालवतो अशा प्रकारचीं या राशीचीं लक्षणें आहेत.

या राशींत लग्नीं रवि असांत शरीर फार उंच व काळें, चंद्र असतां अवयव फार लांबट व गोरे असतात. गुरु, शुक्र व बुध हे ग्रह असतां देखणा होतो.

८ वृश्चिक.—विशाखा चरण १, अनुराधा व ज्येष्ठा मिळून वृश्चिक रास होते. लक्षणें—कमरेच्या वरच्या भागापेक्षां खालचा भाग बुडगा, उंची कमी, चेहरा बेढब, नाक मोठें व फुगीर, आंतल्या गांठीचा, डाव साधारण, ओठ मोठे, दांत सर्वच मोठे, वर्ण गोरा अशा प्रकारचीं या राशीचीं लक्षणें आहेत.

९ धनु.—मूळ, पूर्वाषाढा व उत्तराषाढांचा एक चरण मिळून धनु रास होते. लक्षणें.— छाती पुढें करून डुलत चालणें, तालीमबाज, शरीराची ठेवण विशेष बांधेसूद, नाक चांपेकळीसारखें, सडसडीत असून फारच काटक आणि मजबूत, गळा हनुवटी हे भाग रेखल्यासारखे व कोरदार, मान भरदार, दंड पीळदार व मनगटें जाड अशा प्रकारचें या राशीचें लक्षण आहे. वर्ण साधारण गोरा, लढवय्येपणा, दुसऱ्यावर ज्याची सहज छाप पडते, घोड्यावर बसणारा, डोळे पिंगट इ० प्रकारें या राशींचीं लक्षणें आहेत.

१० मकर.—उत्तराषाढांचे तीन चरण, श्रवण व धनिष्ठांचे दोन चरण मिळून मकर रास होते. लक्षणें—कित्येक वेळां शरीर किरकोळ, मान उंटा सारखी, असंबद्ध भाषण, एकाच गोष्टींत मन गुंग, मूर्खपणा विशेष, अंगविक्षेप फार, अति हंसत बोलणें, एकदम मोठ्यानें व मध्येंच फार हळू भाषण, कित्येक वेळां अति लठ्ठ, शरीराचे कित्येक अवयव वाजवी पेक्षां फार स्थूल, स्नानसंध्या, पूजा, देवतार्चन, स्वच्छता, ईश्वरभक्ति हे गुण विशेष, जमाखर्ची पद्धत, मिश्रा मोठाल्या, भिवयांना केंस फार अशा प्रकारचीं या राशीचीं लक्षणें आहेत.

११ कुंभ—धनिष्ठांचे दोन चरण, शततारका व पूर्वाभाद्रपदांचे तीन चरण मिळून कुंभ रास होते. लक्षणें—शरीर सूक्ष्म, डोक्याला बहुधा टक्कल, कपाळाचे दोन बाजूचे भाग बरेच निमूळते, चेहरा देखणा, विद्येची मोठी आवड, बरदस्त कल्पक, खोल व तात्विक विचार करणारा, वकील अशा प्रकारचीं या राशीचीं लक्षणें आहेत. या पेक्षां या राशीचीं जास्त लक्षणें समजलेलीं नाहींत.

१२ मीन.—पूर्वाभाद्रपदांचा एक चरण, उत्तराभाद्रपदा व रेवती मिळून ही रास होते. लक्षणें—शरीर फार ठेंगणें, डोकें व शरीराचे कित्येक अवयव फारच लहान, जननेंद्रिय तोकडें व बारीक या प्रकारें या राशींचें स्वरूप आहे.

या प्रमाणें राशींचीं सामान्य लक्षणें आहेत. एकाच राशीचीं जीं निरनिराळीं लक्षणें दिलीं आहेत तीं सर्व एकाच माणसाचे ठिकाणीं आढळतील असें समजूं नये. ज्या वेळीं तीं लक्षणें आढळतील त्या वेळीं मात्र ती रास सांगतां येण्या सारखी आहे असें समजावें. पटवर्धनी विद्येचा अभ्यास करणारानें आपल्या जवळ एक टिपणपत्र ठेवावें व त्यांत निरनिराळ्या माणसांचीं लक्षणें जेव्हां जेव्हां आढळतील तेव्हां तेव्हां तीं टिपून ठेवावीं. या लक्षणांची माहिती जशी जशी विस्तृत होत जाईल तसें तसें पटवर्धनी विद्येचें उत्तम ज्ञान होत जाईल.

ग्रह लग्नीं असतां शरीरावर विशेष परिणाम करितात. तथापि ते कोठेंही असले तरी राशिपरत्वें निरनिराळ्या अवयवांवर थोडाबहुत परिणाम करीतातच. यांविषयीं माहिती आमच्या सुलभजातक भाग १ मध्यें आहे ती पहावी. जास्त माहिती ज्याची त्यानें संपादन करावी.

साधन ३ रें. पहिल्या दोन साधनांचा चांगला अभ्यास केल्यानंतर दहा पांच इसम आपल्या समोर उभे करावे व त्यांच्या कुंडल्या त्यांचीं नावें न घालतां आपणाजवळ घेऊन त्या ज्याच्या त्यास देण्याचा अभ्यास करावा. हा अभ्यास फारसा कठीण जाणार नाहीं. कुंडलीवरून वय बिनचूक कळतें व चेहऱ्यावरून वयाचा अजमास न करीतां कुंडलीवरून समजणारीं लक्षणें शारिरलक्षणांशीं ताडून पाडून मनुष्य ओळखण्याचा अभ्यास करणें पटवर्धनी विद्येच्या संपादनाला विशेष अगत्याचा आहे हें विसरतां कामा नये.

लटपटाध्याय

तीन साधनांचा विशेष अभ्यास केल्याशिवाय पटवर्धनी विद्येचा चमत्कार दाखविणारे अलीकडे बरेच ज्योतिषी फडकूं लागले आहेत! पृच्छकाची नजरबंदी करून आपणास जी काय माहिती पाहिजे असेल ती काढून घेण्याच्या कामीं ते मोठे पटाईत असतात. पृच्छक जर ज्ञानी असेल तर तो कांहींच बोलत नाहीं. तो बोलत नाहीं कीं, ज्योतिषीबुवा गडबडलेच म्हणून समजावें. असल्या ज्योतिष्यांच्या विद्येस आम्हीं 'लटपटाध्याय' असें नांव दिलें आहे. वाचकांना हा 'लटपटअध्याय' चांगला समजावा म्हणून त्याचें थोडक्यांतस्वरूप सांगतों.

मनुष्य पाहिल्याबरोबर त्याचें वयोमान साधारणतः कळतेंच. हें मान ७।८ वर्षांच्या फरकानें समजलें तरी चालतें. या मानावरून शनीची तीन राशींवरची स्थिति समजते. कल्पना करा, आज एक मनुष्य आपल्या समोर असून त्याचें वयोमान २९ ते ३० पर्यंत असावें असें आपणास समजलें. तर शके १८०६ पासून शके १८०१ पर्यंतचा त्याचा कोणता तरी शक असला पाहिजे हें उघड झालें: शके १८०० पासून १८०६ पर्यंत शनि मीन, मेष व वृषभ

या तीन राशींवर आहे. म्हणून आपणास या तीन राशींतून कोणता तरी एक शनि तुम्हा असला पाहिजे असें म्हटल्यास तो मनुष्य 'होय' म्हणणारच. त्यानें होय म्हटल्यावर आपण आणखी डोकें चालवून मेष राशीचा शनि आहे म्हणून म्हणावें. तो होय म्हणाला तर ठीकच, नाहींपेक्षां मीन किंवा वृषभ रास सांगावी. अशा रीतीनें त्याच्यापासून मोठ्या शिताफीनें प्रथम शनि काढून घ्यावा. त्यानें मेष राशीचा आहे असें म्हटलें तर आपणास राहूचें सहजच ज्ञान होतें. कारण मेष राशीवर शनि असतां राहू धनु अगर वृश्चिक राशीवरच असला पाहिजे असें ठामपणें सांगतां येतें. धनूवर आहे काय? असा प्रश्न विचारतांच 'नाहीं' म्हणेल तर वृश्चिक राशीवरच राहू असला पाहिजे असें ठाम झालें. राहू ठाम झाला कीं गुरुही समजला. तो मेष अगर वृषभ राशीवरच असला पाहिजे. मेष राशीवर आहे म्हणाला कीं, शके १८०३ मध्यें जन्म झालेला आहे असें त्यास बिनचूक सांगतां आलें! नेहमीं हाच व्यासंग करणारा मनुष्य वयोमान बिनचूक ठरवितो व शनि, राहू आणि गुरु हेही सहजच बिनचूक सांगतो. केव्हां केव्हां इतकें सांगितलेंतरी आपण चेहऱ्यावरून कुंडली सांगतों अशी आपली कीर्ति होईल.

वरील तीन ग्रह सांगतांना प्रत्येक वेळीं तो कुंडलीच्या उजवेकडील भागांत आहे काय असें विचारीत असावें व तो होय किंवा नाहीं जें काय सांगेल तें ध्यानांत ठेवावें. उदाहरणार्थ, शनि उजवेकडील अर्धांत आहे असें तो म्हणला असेल तर आपणास सप्तम स्थानापासून लग्नापर्यंतच्या राशींचें ज्ञान झालें. व त्यावरून १।२।६।४।५।६।७ या सहा राशींतून कोणतें तरी लग्न असलें पाहिजे इतकें समजलें. राहू वृश्चिक राशीवर आहे, म्हणजे शनीच्या अष्टमांत आहे. हा ग्रहही उजवेकडेच आहे असें म्हणाला तर लग्न मेष अगर वृषभच असलें

पाहिजे असें बेलाशक ठांसून सांगावें. कारण शनि उजवेकडे असतां राहू सप्तमांत अगर अष्टमांतच येतो, तरच तो उजवेकडे असेल. शनि व गुरु हें एकाच राशीवर आहेत, म्हणून गुरुबद्दल विचारावयासच नको. सारांश, या लटपटीनें खालील कुंडली तयार झाली.



कित्येक वेळां लटपटे जोशी इतकेंच सांगून वेळ मारून नेतात व बाकीचे ग्रह पंचांगावरून भरावे म्हणून सांगतात.

नेकीनें व सचोटीनें कुंडली सांगणारासही प्रथम वयोमानाचाच अजमास करावा लागतो तो केल्या नंतर शनि, राहू व गुरु हे ग्रह राशींच्या स्वरूपावरून चेहऱ्याशीं व सर्व शरीराशीं ताडून नियमित करावे लागतात. अर्थात् त्यास एकही प्रश्न विचारावा लागत नाहीं हें पूर्ण ध्यानांत असावें. असो. आतां लटपटाध्यायांतील पुढील प्रकार सांगतों.

साधारण इकडे तिकडे पाहून 'तुमची कर्क रास असावी' असें संशयित पण मोठ्या डौलानें म्हणावें. नाहीं म्हणेल तर आणखी २।३ राशींची नावें घ्यावी. सरासरी ३।४ राशि पुढें करून मोठ्या खुबीनें चंद्र काढून घ्यावा. किंवा स्पष्टच विचारावें कीं, चंद्र 'या बाजूला आहे कीं या बाजूला आहे?' डावीकडे आहे म्हणाला, तर

डावी कडच्या राशींतून दोन तीन नांवें घ्यावीं. बहुधा एखादें नांव जुळतेंच. बरें इतकेंही करून न जुळेल तर जन्मनांव मोठ्या खुबीनें केव्हांच बिचारून ठेवलेलें असावें कीं चंद्र कायम झालाच. तो कर्क राशीवर आहे असें समजलें.

आतां, रवीचा विचार करावयाचा आहे. लटपटाघ्यायांत हेंही कठीण नाहीं. प्रथम अयन सांगावें. अयनें दोनच आहेत. ह्मणून कोणतें तरी एक नांव घ्यावें. चुकलें तरी आपलें काम झालेंच दक्षिणायन झटलें तर रवि हा कर्क, सिंह, कन्या, तूळ, वृश्चिक, धनु या राशींतला असला पाहिजे व उत्तरायण झटलें तर मकर, कुंभ, मीन, मेष, वृषभ, मिथुन या राशींतला असला पाहिजे असें सिद्ध झालें.

नंतर ऋतु सांगावा. प्रत्येक अयनांत तीन ऋतु असतात ह्मणून अयन निश्चित झाल्यावर त्यांतील एखाद्या ऋतूचें नांव घ्यावें. जुळलें तर कामच झालें, न जुळेल तर आणखी एक नांव घ्यावें. तिसरें नांव घेण्याचें कारणच पडणार नाहीं. कारण दुसरें चुकलें कीं तिसरें कायम झालेंच. अशा युक्तीनें ग्रीष्म ऋतु ठरला. उत्तरायणांत शिशिर, वसंत व ग्रीष्म हे ऋतु असावयाचे व दक्षिणायनांत वर्षा, शरत व हेमंत हे ऋतु असावयाचे. मेष, वृषभ–वसंत. मिथुन, कर्क–ग्रीष्म; सिंह, कन्या–वर्षा; तूळ, वृश्चिक–शरत; धनु, मकर हेमंत; कुंभ, मीन–शिशिर. अथवा, चैत्र–वैशाख, वसंत. ज्येष्ठ–आषाढ, ग्रीष्म. श्रावण–भाद्रपद वर्षा. आश्विन–कार्तिक, शरत्. मार्गशीर्ष– पौष, हेमंत. माघ–फाल्गुन, शिशिर. अशा रीतीनें ऋतु कायम झाला ह्मणजे महिना कळतो. कल्पना करा, शरत् ऋतु कायम झाला, तेव्हां आश्विन अगर कार्तिक यांपैकीं एखादा महिना असला पाहिजे असें ठोकून देण्यास हरकत नाहीं.

महिने दोनच असणार, ह्मणून एक चुकला तरी दुसरा बरोबर येतोच. अशा रीतीनें एकदांचा कार्तिक महिना कायम झाला. या महिन्याची आमावास्या वृश्चिक राशीवर रवि असतां पूर्ण व्हावयाची. ह्मणून रवि हा जन्मकाळीं तूळ किंवा वृश्चिक राशीवर असणार हें उघड आहे. इतकें समजलें ह्मणजे जन्म अस्तमानाच्या सुमाराचा अगर ४ घ. रात्रीच्या आंत आहे असें सांगण्यास प्रत्यवाय नाहीं. कारण कुंडलींत तूळ रास षष्ठ स्थानीं व वृश्चिक सप्तमांत आहे.

प्रथम चंद्र कर्क राशीवर आहे असें ठरविलें होतेंच तेव्हां ती कुंडली खालील प्रमाणें झाली.



या कुंडलीवरून जन्म वद्य पक्षांत आहे व तो ६।७ च्या सुमाराचा आहे असें सहजच समजतें ह्मणजे एवढी तिथि सांगावी ह्मणजे झालें. तिथि समजली कीं नक्षत्रही समजलेंच.

चंद्र पूर्वी काढून घेतला नसला तर महिना सांगितल्यानंतर पक्ष सांगावा. पक्षही दोनच असतात, ह्मणून एक चुकला तरी दुसरा बरोबर येणारच. पक्ष कायम झाला ह्मणजे चंद्र सहा राशींत ठाम होतो नंतर २।२ राशींचीं नांवें घेऊन चंद्रही कायम होतो.

बुध व शुक्र हे ग्रह रवीजवळ किंवा त्याच्या मार्गेपुढें १।२ घरें असतात. ह्मणून तेही जुळवून द्यावे. हे ग्रह व मंगळ जुळवून देणें लटपटीनें विशेष साध्य नाहीं, ह्मणून लटपटे जोशी ते ग्रह सांगण्याच्या भरींसच पडत नाहींत.

सचोटीनें कुंडली मांडणारास रवि सांगण्यास फार जड जाईल. डोळ्यांच्या तेजावरून तो कुंडलींत कोठेंसा असावा हें समजतें असें ह्मणतात, तथापि आह्मांस तितकें ज्ञान झालेलें नाहीं. ह्मणून आज लग्न, चंद्र, शनि, गुरु, राहू हे ग्रह शारीरलक्षणावरून सांगतां येणें शक्य आहे असें आह्मीं खात्रीनें सांगतों. या पुढील कुंडली मांडण्यास थोड्याबहुत तरी लटपटीच कराव्या लागतील. कोणताही प्रश्न विचारल्याशिवाय सर्व कुंडली बिनचूक कोणासही भरून देतां येणार नाहीं. पटवर्धनही मांडीत नव्हते. पटवर्धन रवि मात्र चटकन सांगत असत असें ह्मणतात. परंतु हें ह्मणणें सार्वकालीन अबाधित असेल असें सांगवत नाहीं. नेत्रांच्या तेजावरून रवि, शुक्र अगर मंगळ यांचें केव्हां केव्हां ज्ञान होईल इतकें मात्र खरें आहे. घारेपणा, पिंगटपणा, काळेभोरपणा, फार मोठे, फार लहान, खोल, पुढें आलेले, लांबट, वाटोळे, सतेज, निस्तेज, पांढरे, तांबडे, दुखरे, फूल पडलेले, कबडा आलेले किंवा खांचा पडलेले, उलट्या बाहुल्या इत्यादिकांवरून वरील ग्रहांचें केव्हां केव्हां ज्ञान होईल. सार्वकाल होईलच अशी आमची समजूत नाहीं.

शारीरलक्षणें व त्या मनुष्याची हकीकत यांच्या साह्यानें कुंडली मांडतां येणें बरेंच शक्य आहे. ह्मणून हा अभ्यास करणारानें य मार्गानें प्रयत्न करावा असें आमचें मत आहे.

कुंडलीच्या खरेपणाचे मार्ग.

आपण आपली कुंडली एखाद्याकडे घेऊन गेलों, ह्मणजे ज्योतिषी तिचें वर्णन करूं लागतो. तें वर्णन कांहीं जुळतें व कांहीं जुळत नाहीं किंवा एखाद्या कडून सर्वच जुळतें किंवा सर्वच चुकतें, अथवा एखादा जी गोष्ट बरोबर सांगतो तीच दुसरा चुकीची सांगतो, पण ज्यानें ती चुकीची सांगितली तोच दुसरी अगदीं बरोबर सांगतो व ती पहिल्याची चुकलेली असते अशा प्रकारचा आपणास अनुभव येतो. जो वर्णन बरोबर करितो, तो कुंडली बरोबर आहे असें ह्मणतो व जो चुकतो तो कुंडली चुकीची आहे असें ह्मणतो. अशा व्यवहारामुळें आपली कुंडली खरी आहे किंवा चुकीची आहे, याची खात्री पटल्याचा आपणास कांहीं तरी मार्ग काढिला पाहिजे.

"कांहीं सोन्याचा तर कांहीं सोनाराचा गुण" असा असावयाचाच. सोनें बावनकशी व सोनारही उत्तम असा योग जमेल तर दागिनाही उत्तमच घडला जाईल, हें उघड आहे. जन्मकाल अगदीं बरोबर काळजी पूर्वक घेतलेला असला तर उत्तम ज्योतिषी फलेंही चांगलीं जुळवून देतो, व त्यानें जुळवून दिलीं पाहिजेत. परंतु शेंकडा ९५ जन्मकाल चुकीचे असतात व ज्योतिषीही तितकेच अज्ञानी असतात त्यामुळें वरील प्रकारचा घोटाळा उडतो. आपली स्त्री प्रसूत होण्याच्या समयास एक बिनचूक चालणारें घड्याळ प्रसूतीच्या जागेंत लावून ठेविलें व प्रसूतीच्या वेळीं घड्याळ बिनचूक समजणाऱ्या बाईची योजना केली तर जन्मकाल

अगदीं सूक्ष्म घेतां येईल. घड्याळ सेकंद काट्याचें असावें, ह्मणजे सेकंडा पर्यंतही सूक्ष्म काल घेतां येईल. हल्लींच्या प्रगतीच्या काळांत तर या गोष्टीस मुळींच अडचणी नाहींत. कारण, घड्याळ हा एक पुरुषांचा अलंकारच बनला आहे. घडयाळेंही १॥ रुपयां पासून मिळूं लागलीं आहेत. घरांत घड्याळ असलें ह्मणजे बायकांसही किती वाजले हें आपोआप कळतें. अशा सर्व सोयी असून मनुष्यजन्मासारख्या पर्वणीचा काल अद्यापि कोणी बरोबर साधीत नाहींत हें मोठें आश्चर्य आहे! सारांश, जन्मकालाचा स्थूलपणा हा फलें बरोबर न जुळण्याचें आदिकारण आहे.

जन्मकाल इतक्या काळजीनें घेतलेल्या कुंडलीचीं फलें उत्तम ज्योतिष्यास बरोबर मिळवून देतांना आलीं पाहिजेत. हीं फलें जो जितक्या मानानें बरोबर सांगेल तो तितक्या योग्यतेचा ज्योतिषी आहे असें आपणास ठरवितां येईल. व जो अधिक फलें जुळवील तो पुढील भविष्यही चुकणार नाहीं असें आपणास मानतां येईल.

पण जन्मकालच अजमासाचा असला तर ज्योतिष्याची परीक्षा कशी होणार व त्यानें सांगितल्या भविष्यावर विश्वास कसा बसणार? अमुक एका ज्योतिष्यानें सांगितलेल्या गोष्टी जुळल्या सबब जन्मकाल बरोबर आहे असें आपण मानावें किंवा नाहीं, हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. ह्मणून ज्योतिषी जें वर्णन करितो, त्याचें वर्म काय आहे हें आपण जाणलें पाहिजे.

साधारणपणें कोणतेंही लग्न ४ किंवा ५ घटकां पर्यंत असूं शकतें, ह्मणून प्रचलित निरयण मानाची कोणतीही कुंडली पुष्कळ वेळां ४ किंवा ६ घ. च्या अवकाशांत केव्हांही असूं शकते. वास्तविक कुंडली हा आकाशाचा नकाशा आहे. व या नकाशावरून ग्रहांचीं फलें पहावयाचीं आहेत. ह्मणून जसा जन्मकाल खरा पाहिजे तसा हा नकाशाही खरा पाहिजे. प्रचलित कुंडलींत लग्न मात्र वर्तविलेलें असतें, तसा प्रत्येक भाव वर्तविलेला नसतो व ग्रहही वेधतुल्य स्पष्ट केलेले नसतात. त्यामुळें असल्या कुंडल्यांवरून वास्तविकपणें वर्णनच करितां येत नाहीं. असें असून ज्योतिषी तीच कुंडली पाहून फलें सांगतात हें शास्त्राचें दुर्दैव होय! लग्नकुंडलीवरून केवळ अमुक ग्रह अमुक राशीवर आहे, इतकेंच समजतें, तो अमुक स्थानांत असून अमुक भावाचें फल देतो, तो अमक्या ग्रहाशीं युति करितो किंवा दृष्टि करितो, तो वक्री आहे कीं अस्तंगत आहे कीं, पूर्ण उच्चांत आहे कीं पूर्ण नीचांत आहे, वगैरे गोष्टी मुळींच समजत नाहींत. लग्नकुंडलीवरून त्यांचा साधारण अजमासही ज्योतिष्यास करितां येत नाहींत अशा प्रकारच्या पद्धतीनें फलें जुळलीं अगर जुळलीं नाहींत तरी त्यांची काय किंमत? सारांश, कुंडली मांडण्याची पद्धति शुद्ध नाहीं, ह्मणून फलें बरोबर जुळलीं तरी जन्मकाल बरोबर आहे असें सिद्ध होणार नाहीं. छिद्र पडलेल्या होडक्यातून जरी आपले पाय जमिनीस लागले तरी तें होडकें सुरक्षित आहे असें ह्मणतां येत नाहीं, हा जो व्यवहार तोच येथेंही लागूं होतो.

सारांश, जन्मकाल सूक्ष्म पाहिजे व कुंडली मांडण्याची व पाहण्याची पद्धति सशास्त्र पाहिजे, ह्मणजे फलें बरोबर उतरल्याशिवाय बहुधा राहणारच नाहींत. न उतरलीं तर तो दोष सोन्याचा नसून सोनाराचा आहे असें आपण समजलें पाहिजे. तों पर्यंत सोनार कच्चा कीं सोनें कच्चें याचा निर्णय होऊं शकणार नाहीं.

ज्योतिषी कित्येक वेळां अशक्य प्रश्नांचीं उत्तरें देत असतो व तीं शेंकडा ९० चुकतात, त्यामुळें एक घोटाळा उडत असतो. उदाहरणार्थ, भावंडांचीं संख्या किंवा मुलांची संख्या, आईबापांचे मृत्युकाल, विवाहकाल, मृत्यु वगैरे गोष्टी आमच्या मतें नक्की कोणालाच सांगतां येणार नाहींत. असें असतां ज्योतिषी त्या गोष्टी सांगतो व अनुभवाला जुळत नाहींत अशा वेळीं पृच्छकाला वाटतें कीं, माझी कुंडलीच चुकीची आहे! पण, वास्तविक दोष कुंडलीचा नसून ज्योतिष्याचा असतो हें विसरतां कामा नये.

आपली कुंडली खरी आहे कीं खोटी आहे, या विषयीं खात्री करून घेण्याचा मार्ग वरील प्रकारचा नाहीं, हें उघड आहे. आमच्या मतें शारीरलक्षणें, रोग, नातलगांच्या कुंडल्या व आजपर्यंतची त्याची हकीकत यांच्या साह्यानें खऱ्या खोट्याचा निर्णय केला पाहिजे. या सर्वांशीं जर मेळ बसवितां आला नाहीं तर केवळ कुंडलीच्या वर्गनावरून कुंडली खरी आहे अगर खोटी आहे हें मानणें अविचार होय.

कुंडलीवरून स्त्रीपुरुष ज्ञान होत नाहीं. असें असतां कित्येक ज्योतिषी अमुक वेळेवर पुरुषच जन्मास आला पाहिजे किंवा स्त्रीच जन्मली पाहिजे असें गृहीत घेऊन कुंडली चूक आहे अगर बरोबर आहे हें जें सांगतात, तें सर्वथा अविश्वसनीय आहे. कारण, ते ज्या श्लोकाच्या आधारानें सांगतात, तो श्लोकच अपवादात्मक व असंभवनीय असा आहे.

या सर्व गोष्टी अद्यापि पुष्कळांस समजलेल्या नाहींत, म्हणून आज यावर लिहिणें जरूर वाटलें. त्याचा सर्वांनीं नीट विचार करावा व कोठेंही फसूं नये.

गेल्या अंकांत जो फोटो दिला होता त्यावरून प्रत्येकानें जन्मकालाचा अजमास केला असेल. फोटोची व्यवस्था नीट जुळली नाहीं, त्यामुळें अजमास चांगला झाला नसेल. तरी पण साधारण बोध होण्यास हरकत नाहीं असें वाटतें. प्रथमतः वयाचा अजमास करावयाचा. साधारपणें हा मनुष्य तिशीच्यावर व चाळीसच्या आंत असेल, इतकें ज्ञान झालें तर शनि, राहु व गुरु यांचा बोध होईल. प्रथम शनि कायम केला पाहिजे. शके १७२० ते शके १८००पर्यंतच्या अवधींत जन्मकाल आहे. इतका बोध होतो. काय? होत असेल अंक १ वरून शनि, गुरु व राहू यांची स्थिती खालील प्रमाणें येईल.

श.	रा.	गु.		श.	रा.	गु.
१७२०,	८	५ १२		१७९९,	१०	२ ६
१७२१,	८	४ १		१७९६,	१०	१ ६
१७९२,	९	४ २		१७९७,	१०	१२ ७
१७९३,	९	३ ३		१७९८,	११	१२ ८
१७९४,	९	२ ४		१७९९,	११	११ ९

या कोष्टकावरून शनि मकर राशीचा असेल असा बोध होतो काय? खरोखर तो मकर राशीचाच आहे. केंस फार असून रांठ म्हणजे तो लग्नींच असेल. शरीराची ठेवण चांगली आहे, त्यावरून गुरु सिंह राशीचा असेल किंवा सिंह राशींत दुसरा कोणी तरी ग्रह असेल. पुढले दांत जरा मोठे दिसतात व हाताचीं बोटेंही मोठीं दिसतात यावरून कर्क राशींत चंद्र संभवतो. शनि लग्नीं कल्पिल्याचें कारण तो डोळे निस्तेज आणि बारीक करितो. असा विचार करून कुंडली केल्यास बरीच बरोबर येईल. वा मनुष्याची सायन व निरयन कुंडली खालील प्रमाणें आहे.

जन्म—१७२४ सौम्य शु. १३शनिवार सू. नं ५९ घ ३ प.

सायन



निरयन



वयाचा अजमास प्रथम दसकावर करावा. जसें— हा मनुष्य तीस वर्षांच्या वर व ४० वर्षांच्या आंत असावा. हें अनुमान कायम झाल्यावर त्याचा मध्य कायम करावा व त्या मध्याच्या पुढें वय असेल कीं मागें असेल तें ठरवून शनि, गुरु व राहू यांची स्थिति कायम करावी. नंतर लग्न व चंद्र ठरवून कुंडली मांडावी. रवि कायम करणें कठीण आहे व त्या संबंधानें नियमही कळत नाहींत. तथापि धोरणा धोरणानें तोही केव्हां केव्हां सांगतां येईल. जन्म दिवसाचा असावा कीं रात्रीचा असावा, शुक्ल पक्षांतला आहे, कीं वद्य पक्षांतला आहे, इत्यादि गोष्टींवरून व कांहीं शारीर लक्षणांवरून अभ्यासानें तोही समजेल अशी खात्री वाटते.

अंधकुंडली. [नंबर १ चें उत्तर.]

अंधकुंडलीचें उत्तर देतांना प्रथम ती कुंडली शनि लग्नीं धरून मांडावी व आजचीही कुंडली तशीच मांडावी. नंतर खालीं लिहिल्या प्रमाणें हिशेब करून जन्मकाल तयार करावा.

अंधकुंडली नं. १



आजची कुंडली



अंधकुंडलीवरून असें दिसतें कीं गुरु हा शनीला जाऊन मिळण्यास सुमारें ३।४ वर्षांचा अवकाश आहे व राहू आणि तो नुकतेच एकत्र असले पाहिजेत. तेव्हां असा योग केव्हांसा असेल? पंचांगावरून हे योग पाठ केलेले असले पाहिजेत. ह्मणजे चटकन ध्यानांत येईल. शनि व गुरु हे एका राशीवर शके १७८२।८३ १८०२।३, व १८२२।२३ मध्यें होते. हे ग्रह २०।२१ वर्षांनीं एकत्र असतात असें पंचांगावरून समजेल. वरील एक अंक जरी पाठ असला तरी त्यावरून वाटतील तितक्या वर्षांचे मागले सुमाराचे अंक कळतील.

राहू व गुरु एकत्र असल्याचे काल.—१७७१।७२,१७७८ ।७९१,७८५,१८२२।२३,१८००,१८०७,१८१५,१८२२ व १८२९ या प्रमाणें सुमारें ७।८ वर्षांनीं ते एकत्र जमतात असें दिसतें.

या दोहोंच्या आधारें ध्यानांत येईल कीं १७७८।७९ या सालांतील ही कुंडली असली पाहिजे. ह्मणजे आजच्या पूर्वी ९२ वर्षांची असली पाहिजे. आजचा गुरु कन्येंत आहे व तो ९२ वर्षांनीं आलेला आहे, ह्मणजे तो मूळचा मेष अगर वृषभ राशीचा असला पाहिजे. आजचा शनि मीनेंत सरता आहे व तो ९२ वर्षांनीं आलेला आहे, ह्मणून तो मिथुनेंतच असला पाहिजे आजचा राहू वृषभेंत आहे, ह्मणून ९२ वर्षांपूर्वी तो मीनेंत असला पाहिजे. असा हिशेब करून १७७९ शक कायम करावा व मिथुन लग्न कायम करावें.

मिथुन लग्न आलें तेव्हां चंद्र तूळ राशीचा व रवि मिथुनेचा आला. अर्थात शुक्ल पक्ष अमून पौर्णिमेला ५।६ दिवस कमी आहेत. रवि लग्नीं आहे ह्मणून सूर्योदयाच्या सुमाराचा जन्म आहे. महिना आषाढ आहे. वार बुधवार, शु० १०

नं. २ च्या कुंडलीचा काल शके १८०० माघ कृ० ७ गुरुवार इ० घ० ३५।१५ आहे.

नं० २ चा जन्मकाल ता. २ फेब्रूवारी सन १८८३ सायंकाळीं ७ वाजून २० मि. लग्न सिंह. यांत गुरु चुकीचा आहे. तो एकादश स्थानीं पाहिजे. बुध व मंगळ मकरेंत आणि शुक्र धनेंत आहे.

नं.० ४ च्या प्रश्नाचें उत्तर.—लग्न–३ रवि–११ चंद्र–६ मं–१२ बु–१० गु–२ शु–९ श–४ रा–११. या प्रश्नाचें पूर्णपणें उत्तर देतां येणें कठीण आहे. फक्त लग्न, रवि, चंद्र, शनि, गुरु व राहू इतकेंच ग्रह सांगतां येतील. बुध, शुक्र व मंगळ हे ग्रह समजणार नाहींत. बुध व शुक्र अजमासानें कळतील, कारण ते नेहमीं रवीच्या जवळ असतात. मंगळ मात्र मुळींच कळणार नाहीं.

प्रश्न

नं. १



नं. २



या कुंडल्यांत राशींचे अंक भरा व राहिलेले ग्रह भरा.

नं. ३ शके १७९० आषाढ शु. ५ या दिवशीं रात्रीं ८ वाजतां एकाचा जन्म आहे. तर त्या वेळची कुंडली पंचांगाच्या साह्यानेंचून भरा.

सूचना—पुढील अंकांत व्यवस्थित फोटो देण्याची तजवीज केली आहे. केवळ कांचेवरून प्रती तयार करणारास श्रम फार पडतात व इतकेंही करून सर्व प्रती सारख्या चांगल्या निघत नाहींत असा पहिल्याच खेपेस अनुभव आल्यामुळें फोटोवरून कट तयार करून फोटोझिंकोच्या पद्धतीनें प्रती तयार केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. या कामास प्रत्येक वेळीं १५ ते २० रुपयेपर्यंत खर्च येणार आहे. त्यामुळें तूर्त सवडी सवडीनें फोटो देणार आहों. प्रत्येक अंकास एक फोटो देण्याचें ठरविलें तर सुमारें ४०० रुपये सालास अधिक खर्च करावा लागणार! परंतु इतकी शक्ति कुंडलीविज्ञानांत नाहीं हें संपादकाचें दुर्दैव होय!!

कुंडलीविज्ञान.

पाक्षिक.

कालात्मा दिनकृन्मनस्तु हिमगुःसत्वं कुजोज्ञोवचो
जीवो ज्ञानसुखं सितश्च मदनो दुःखं दिनेशात्मजः॥
राजानौ रविशीतगू क्षितिसुतो नेता कुमारो बुधः॥
सूरिर्दानवपूजितश्च सचिवौप्रेष्यःसहस्रांशुजः॥१॥

(वृ० जा०)

गु०१०]ता.१५एप्रिल१९१०[अंक१वा.

विषयानुक्रम

१ संपादकीय स्फुट लेख. २ नूतन प्रश्नपद्धति. ३ भ्रमाचा खेळ. ४ षष्ठवंशफल. ५ बालेतिणीच्या खोलींतील स्थिति. ६ पाठावलि. ७ प्रयाणास मुहूर्त कसा असावा. ८ 'सॉं फ्रानसेस्को झेव्हीअर' आगबोट. ९ पत्रव्यवहार. १० अंशफल. ११ (टायटलपेज.) फोटो नं ३ पांच.

संपादक—विष्णु गोपाळ नवाथे.
पो० महाड, जि० कुलाबा.

हें पुस्तक गणेश गोपाल नवाथे यांनी आपल्या "चंडकिरण" प्रेस मध्यें छापून महाड येथें नव्या पेठेंतील जुन्या पोष्टाच्या घरांत "कुंडलीविज्ञान" ऑफिस मध्यें संपादकाकरितां प्रसिद्ध केलें.

वार्षिक वर्गणी ट. खं. सह २।७

फुटकळ अंकास ८२ आणे.

फोटो नं १

आजच्या अंकासोबत प्रसिद्ध कर्पक व शोधक प्रोफेसर भिसे यांचा फोटो पाठविला आहे व खाला त्याच्या कुंडलीतले फक्त राशयंक दिले आहेत. तरी त्यांच्या शारीरलक्षणांवरून व इतर माहितीवरून सर्व ग्रह भरा.

प्रोफेसर साहेबांचें शरीर निरोगी असून बांधा मध्यम आहे. तनु गौर वर्ण आहे. चेहेरा साधारण वाटोळा, मुद्रा गंभीर. स्वभाव मनमिळाऊ आहे कोणत्याही गोष्टीच्या मुळाशीं जाऊन त्यांतील तथ्य शोधून काढण्याची मानसिक प्रवृत्ति चेहेऱ्यावर पूर्ण व्यक्त होते. निर्व्यसनी असून धर्माचरण उत्तम प्रकारचें आहे.

(१) पहिले स्त्रीचा मृत्यु नवंबर १८९२
(२) बापाचा मृत्यु १७ आगष्ट १८९३
(३) आईचा मृत्यु २८ फेब्रवारी १९०४
(४) युनिव्हर्सिटीची परिक्षा डिसेंबर १८८७
(५) सरकारी नोकरी जून १८८८
(६) प्रथम इंग्लंडास प्रयाण १२ अकटंबर १८९५
(७) पुनः प्रयाण २९ मे १८९९
(८) दुसरें लग्न फेब्रुवारी १८९३

यांच्या कर्तबगारीचें वर्णन मासिक पुस्तकें, वर्तमानपत्रें यांत प्रसिद्ध झालेलें आहे. हल्लीं यांचें वय सुमारानें ४२।४३ असावें.

निरयन कुंडली



सायन कुंडली



पोंच—निर्णयसागरचें, धूतपापेश्वर आरोग्यमंदिराचें व शंकरशास्त्री ज्योतिषी यांचें याप्रमाणें तीन पंचांगें त्यांच्या मालकांकडून पावलीं. अभिप्राय पुढील अंकीं. "संपादक कु. वि."



श्रीयुत प्रोफेसर शंकर आबाजी भिसे.

एफ. एस. एस्. सी; ए. एस. ए; एम. एस. एंजीनीयर्स

(लंदन)

भिसोटाईप यंत्राचे शोधक.

अंशफल

यूरोपियन ग्रंथकारांनीं प्रत्येक राशीच्या प्रत्येक अंशाचीं फलें सांगितलीं आहेत. तशीं आमच्या इकडील ग्रंथांत कोठें आढळत नाहींत. शुक्रनाडी वगैरे जे नाडीग्रंथ ताडपत्रांवर लिहिलेले दक्षिण हिंदुस्थानांत आहेत त्यांत अंशांच्या १० व्या भागाचेंही वर्णन अहे असें पाश्चात्य ग्रंथकार ह्मणतात! त्यांच्या मतें ही विद्या हिंदुस्थानांत पूर्ण अवस्थेस जाऊन पोचली होती. परंतु आमचें दुर्दैव कीं त्या ग्रंथांत इतकें सांगितलेलें आहे अशी आमची कल्पनाही होत नाहीं! हे ग्रंथ आमच्या जवळ आहेत, पण ते वाळवीच्या भक्ष्यस्थानीं पडलेले आहेत. ते ज्यांच्या जवळ आहेत ते महाभाग स्वतः कांहीं पहात नाहींत व दुसऱ्यालाही दाखवीत नाहींत! आमचें फलज्योतिष फक्त राशीवर आहे! ह्मणजे त्याचा पूर्ण ऱ्हास झाला आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. याच स्थितींत तें पुढें कितीही दिवस राहिलें तरी व्यर्थ आहे. अलीकडील ज्योतिषी केवळ राशींच्या फलावरच उड्या मारीत आहेत. कित्येकांनीं मोठाल्या पाट्या लावून आपल्या तुटपुंज्या ज्ञानाचीं दुकानें उघडलीं आहेत तर कित्येक चर्वितचर्वण करून तेंच तें उगाळीत 'येन केन प्रकारेण' आपणास ग्रंथकार ह्मणवून घेण्यांत गुंतले आहेत. यांच्या जाळ्यांत अज्ञान जनसमूह सहज सांपडूं शकतो. पण हा काल दिवसें दिवस जात चालला आहे. पाश्चात्य विद्येनें प्रत्येकाचें डोकें सुसंस्कृत होऊं लागलें आहे व त्यास खरें कोणतें व खोटें कोणतें हें कळूं लागलें आहे. अशा स्थितींत प्रचलित ज्योतिःशास्त्राचा मुळींच टिकाव लागणार नाहीं ह्मणून आपणास आपल्या शास्त्राला सूक्ष्म व सत्य असें स्वरूप देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आज ज्योतिषाला पत्रिका दाखविणारा समाज जरी मोठा असला तरी त्याला शास्त्राचें वर्म कळूं लागल्यामुळें व यूरोपियनाचे सुंदर ग्रंथ वाचावयास मिळूं लागल्यामुळें तो कालांतरानें आपली पत्रिका युरोपियन जोशाला दाखवूं लागेल, लग्नमुहूर्त त्याच्याच जवळून काढून घे-

ईल व कदाचित् घटका घालण्यासही त्यालाच आमंत्रण देईल! ही शोचनीय स्थिति टाळण्याचा प्रयत्न करणें आमचें कर्त्तव्य नाहीं काय? राशींवरून येणारा फलानुभव फारच स्थूल आहे- यासाठीं आपणास तो अंशापर्यंत नेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

आह्मी हा प्रयत्न प्रथम काल्पनिक रचून नंतर तो अनुभवानें कायम करणार आहों यासाठीं यांत जें न्यूनाधिक्य असेल तें वाचकांनीं कळवावें अशी विनंति करितों. आह्मी स्वतःच्या प्रेरणेनें जें सुचेल तेंच लिहिणार आहों. तें कोणत्याही ग्रंथाचें भाषांतर नाहीं.

मेष

१ ला अंश०—वर्ण तांबूस, लढाऊ, रागीट, नेत्र व केंस पिंगट, प्रकृति उष्ण, हिंमतदार, स्वतःच्या बुद्धीनें चालणारा, रक्तविकार, अपघात., वगैरे ज्याला होतात असा, दीर्घायु, तामसवृत्तीचा पण सत्यप्रिय, आपला नंबर १ ला असावा अशी इच्छा करणारा' कर्तृत्वशक्तीचा, उंच व सडसडीत.

२ रा अंश०—गर्व जास्त, सामर्थ्य कमी, स्त्रियांचा शोकी, थाटामाटानें राहणारा, अति कामी, कांहींसा गोरा, चैनीकडे व ऐषआरामाकडे प्रवृत्ति, वशाचे विकार, यंत्रशास्त्रज्ञ, बुद्धि मध्यम, गारुडी.

३ रा अंश०—वर्ण काळा, बुद्धिमान्, शास्त्रांची आवड, उंच, सडसडीत, क्षणिक विचाराचा, समयसूचक.

४ था अंश०— दुर्बल, नेभळा, फसणारा, प्रवासी, कष्टाळू, व दुर्दैवी, वर्ण काळा, रोगी, सर्दीचे विकार विशेष.

५ वा अंश०—क्रूर, दुष्ट, धिप्पाड, दांत व छाती मजबूत, मुख्यत्वानें वागणारा, दुसऱ्यावर ज्याची सहज छाप बसते असा, शिपाई, अंमलदार, किंवा धातूंचीं कामें करणारा, अति उष्ण प्रकृतीचा, पिंगट डोळ्यांचा.

६ वा अंश०—मंद, आळशी, मळकट पोषाख घालणारा, गबाळ्या, विद्वान, कपटी, हस्तकौशल्याचीं कामें करणारा, वैद्यविद्येची ज्याला आवड विशेष, स्त्रीसदृश चेहेरा.

७ वा अंश०—अति उंच व सडपातळ. वर्ण काळा, विद्वान्, चपल, सत्यप्रिय, तत्ववेत्ता, शास्त्री, प्रवासी, परदेशात ज्याचा भाग्योदय, मोजकें बोलणारा.

८ वा अंश०— खुनशी, सुड उगवणारा, रसायनशास्त्रज्ञ, रोगट ठेंगणा, गोरा, चुका करणारा, मश्चात्तापी, व दीर्घप्रयत्नी, पाण्यापासून ज्याला भय असा, विषारी पदार्थांचा क्रयविक्रय करणारा, वक्तृत्वहीन.

९ वा अंश०—अत्यंत उष्ण प्रकृतीचा, लढाऊ, ज्याला अपघात होतात व शस्त्रपीडा होते असा, तालीमबाज, साधारण बुद्धिमान, काटक, हाडापेरांनीं मजबूत, पित्तप्रकृतीचा, गोरा, नेत्र पिंगट.

१० वा अंश०—रोगी, दुर्दैवी, मूर्ख, शत्रु पुष्कळ, खादाड, कुरूप, केस पुष्कळ व राठ, दरिद्री, चिडणारा, घातक, चोर किंवा ठक.

११ वा अंश०—शोधक, कल्पक, बुद्धिमान्, शास्त्रज्ञ, ग्रंथकार, तत्ववेत्ता, कृष्णवर्णाचा, शरीर सूक्ष्म व नाजूक.

१२ वा अंश०—शरीर सूक्ष्म, साधारण गोरा, जलप्रवासी, विद्वान्, कायद्यांचेंज्ञान ज्याला असा, ठेंगणा.

१३ वा अंश०—दीर्घोद्योगी, साहसी, धीट, हेकेखोर, तांबुसवर्णाचा, प्रवासी, चपल, भांडखोर, उष्णप्रकृतीचा, साधारण विद्वान्, सडसडीत व काटक बांध्याचा.

१४ वा अंश०—स्त्रियांचा शोकी, थाटामाटानें राहणारा, तेजस्वी, गोरा, निष्काळजी वृत्तीचा.

१५ वा अंश०—बुद्धिमान्, पंडीत, वक्ता, शास्त्रज्ञ, उंच, काळा, क्षणोक्षणीं ज्याची बुद्धि पालटते असा.

१६ वा अंश०—नीच कृत्यें करणारा, चपल, प्रवासी पाण्यापासून भय पावणारा, रोगट प्रकृतीचा, अधर्मी, निष्काळजी.

१७ वा अंश०—अति प्रसिद्ध, अति उष्ण प्रकृतीचा, धीट, मुख्यत्वानें राहणारा, अंमल गाजविणारा, नेत्र पिंगट वर्ण काळा.

१८ वा अंश०—आळशी, बुद्धिमान्, विद्वान्, कपटी, वर्ण काळा स्वर मधुर, पोषाखाची काळजी न घेणारा.

१९ वा अंश०—शरीर उंच व सडपातळ, विद्वान्, सत्यप्रिय, किंचित् भोळा पण मतलबला सावध, वर्ण काळा, प्रवासी.

२० वा अंश०—खुनशी, तापट, सुडघेणारा, रसायनशास्त्रज्ञ, विषारी पदार्थांचा व्यवहार करणारा, साधारण विद्वान् खटपटी.

२१ वा अंश०—प्रकृति फार उष्ण, अपघातांचें भय विशेष, हाडापेरांनीं मजबूत, अग्नि व शस्त्रें यांसंबंधानें व्यवहार करणारा.

२२ वा अंश०—मूर्ख, खादाड, रोगी, कुरूप, काळा, चिडखोर,

२३ वा अंश०—अति विद्वान् शोधक, कल्पक, सुधारणाप्रिय, विद्वान्, ग्रंथकार, कायदेपंडित, तत्ववेत्ता व सतत विद्याव्यासंगी.

२४ वा अंश०—गोरा, साधारण बुद्धिमान् व विद्वान्, चिल्लर, उतावळा, ठेंगणा व अवयव सूक्ष्म.

२५ वा अंश०—प्रकृति उष्ण, रक्तविकार, अति प्रवासी व अतिचपल, दीर्घोद्योगी, तुसड्या स्वभावाचा, धीट, नेत्र पिंगट, स्वतःच्या हिंमतीनें चालणारा.

२६ वा अंश०—स्त्रियांचा शोकी, पोषाखाची आवड, चैनी, साधारण विद्वान्.

२७ वा अंश०—बुद्धिमान्, विद्वान्, चलाख, कायदेपंडीत, बोलका, विद्वानांचा आदर करणारा.

२८ वा अंश०—रोगी, दुर्दैवी, अप्रामाणी, हलकट, नीच कृत्यें करणारा, जलप्रवासी, पाण्यापासून भय पावणारा.

२९ वा अंश०—प्रख्यात, धैर्यवान्, राजयोगी, डौलानें वागणारा, गंभीर, प्रकृति अति उष्ण, तेजस्वी.

३० वा अंश०—बुद्धिमान्, विद्वान्, वैद्यविद्या जाणणारा, आळशी किंवा झोंपाळू.

याप्रमाणें मेष राशीच्या अंशांच्या फलांची कल्पना होते.

वृषभ

अंश १ ला.—प्रकृति उष्ण, सौंदर्यवान्, वर्ण गोरा, छानछोकी, सामान्य बुद्धीचा, अंग गोंडस, नेत्र काळे, उंची मध्यम, तोंडावळा गोल, केश अल्प, विद्येचा कंटाळा, व्यापाराकडे व चैनीकडे प्रवृत्ति.

अंश २ रा.—बुद्धिमान्, विद्येची आवड, वर्ण काळसर, तोंडवळा किंचित् लांबट किंवा डोक्याचा भाग किंचित लांबट, स्वर मधुर, वक्ता व विद्वान्, विशेषतः व्याकरणादि विषयाकडे प्रवृत्ति.

अंश ३ रा.—वर्ण काळा, जलद गतीचा, बेफिकिर चैनी, गाणारा तोंडवळा गोल. विद्येकडे दुर्लक्ष, व्यसनी व स्त्रीलंपट.

अंश ४ था.—वागणुक डौलाची, फार गर्विष्ठ, मुख्यत्वानें वागणारा, शरीर बांधेसूद, वर्ण काळा, महत्वाकांक्षी, विद्येकडे विशेष लक्ष नाहीं.

अंश ५ वा.—लाजाळू, आळशी, तोंडवळा गोल, स्त्रीसदृश मुद्रा, बुद्धिमान्, हस्तकौशल्याचीं व कलाकौशल्याचीं कामें करणारा, वैद्यक अगर कायदा जाणणारा.

अंश ६ वा.—सत्यवक्ता, वागणुक सरळ, उंच बांधा, वर्ण काळा बुद्धिमान्, तारतम्य जाणणारा व विद्वान्.

अंश ७ वा.—अतिशय गर्विष्ठ, गुप्त विचार करणारा, सूड घेण्याकडे ज्याची प्रवृत्ति, अतिशय विषयी, गुह्येंद्रिय ज्याचें पीडित, वर्ण गोरा, उंची कमी.

अंश ८ वा.—शरीराचा शोक, वागणुक डौलाची, बाणा शिपाईगिरीचा, प्रकृति उष्ण, अपघात व दुखापति विशेष, मूळव्याध किंवा एखाद्या अवयवांतून रक्त पडण्याचा विकार, दुसऱ्यावर छाप ठेवणारा.

अंश ९ वा.—खांदाड, शरीराचे कित्येक भाग फार लठ्ठ, हि-

शोबी, अति भांडखोर व चिडखोर, मूर्ख किंवा अविचारी, बुद्धि-कमी, घातकी उंच, वर्ण काळा,

अंश १० वा.—शोधक, कल्पक, विद्वान्, वर्ण काळसर, बुद्धि-चांगली, चतुर व समयसूचक.

अंश ११ वा.—वर्ण गोरा, अवयव लहान, साधारण बुद्धिमान् अधिऱ्या मनाचा.

अंश १२ वा—मुद्रा नेभळट, भोळा, फसणारा, सडपातळ, गोरा, जलद चालणारा, प्रवासी, बोलणें कमी.

अंश १३ वा—गोरा, तेजस्वी, शरीर वर्तुलाकार, विद्वत्ता कमी, परदारासक्त, नीटनेटका पोषाख करणारा, सौंदर्यवान्, दांत व नेत्र स्वच्छ असा.

अंश १४ वा.—मेधावी, शास्त्रकुशल, वक्ता, विद्वान्, वर्ण काळा, शरीर उंच व सडपातळ, विद्याव्यासंगी.

अंश १५ वा.—चैनी, निष्काळजी, फिरणारा, बागबगीच्यांचा नाद, वर्ण काळसर, चेहरा वाटोळा, गायनवादनांचा शोक.

अंश १६ वा.—प्रौढ विचाराचा, गंभीर, मानी, अंमलदार शरीर मजबूत, वर्ण काळा, भोगी व ऐश्वर्यवान्.

अंश १७ वा.—वैद्य अगर डाक्टर, हस्तकलाकुशल, विद्वान्, दुसऱ्याचें मन ओढून घेणारा, संसारी

अंश १८ वा.—विद्वान्, शरीर सडपातळ व उंच, सत्यवक्ता, सभ्य, काटेतोल बोलणारा, शास्त्री व बुद्धिमान्, वर्ण काळसर.

अंश १९ वा.—अविश्वासु, ठक, दुष्टपणाकडे प्रवृत्ति, आंतल्या गांठीचा अति गर्विष्ठ, ठेंगणा, गोरा.

अंश २० वा.—शरीर मजबूत, निरोगी, छाती काढून चालणारा, बळाचा गर्व, तालीमबाज, बुद्धि व विद्या साधारण, वर्ण गोरा

अंश २१ वा—खादाड, मूर्ख, चिडखोर, भांडखोर, शरीर कुरूप, वर्ण काळा, देवभोळा.

अंश २२ वा—शास्त्रशोधक, विद्वान्, विद्याव्यासंगी, लेखक, कवि, सुधारक, वर्ण काळसर.

अंश २३ वा.—वर्ण साधारण गोरा, अधीर मनाचा, साधारण विद्वान्, पोहोणारा, शक्ति कमी, साधारण सौंदर्य.

अंश २४ वा.—प्रवासी, अस्थिर बुद्धीचा, बुद्धिसामर्थ्य कमी, दुःख व कष्ट भोगणारा, दुसऱ्यावर अवलंबून राहणारा वर्ण गोरा.

अंश २५ वा—वर्ण गोरा, बुद्धि साधारण, विषयी, गर्विष्ठ, शारीरसौंदर्य चांगलें.

अंश २६ वा.— बुद्धिमान्, मेधावी, शास्त्री, वक्ता, विद्याव्यासंगी, कायदेपंडित.

अंश २७ वा—बेफिकिर, वागणूक फाजीलपणाची, गाणारा, पोहोणारा, प्रवासी, वर्ण काळसर.

अंश २८ वा.—गंभीर, मुख्य, राजापासून मान इच्छिणारा, हाडापेरांनीं मजबूत, बुद्धि बरी, वर्ण काळा, बळाचा गर्व.

अंश २९ वा.—विद्वान्, शांत, मायावी, खोटा डौल मिरवणारा, आळशी, अनिश्चित वागणूक, हस्तकलाकुशल.

अंश ३० वा—विद्वान्, शास्त्री, वक्ता, विद्याव्यासंगी शरीर लांबट, वर्ण काळा, सत्यप्रिय.

मिथुन

अंश १ ला.—अति विद्वान्, चांगला वक्ता, उत्तम शास्त्री, लेखक, ग्रंथकार, वैय्याकरणी, कायदेपंडित, वर्ण काळा, शरीर उंच, चेहरा किंवा डोळे लांबट.

अंश २ रा.—गाणारा, बागबगीच्यांचा शोकी, पोहणारा प्रवासी, चंचल, बेफिकिरपणानें वागणारा, चेहरा वाटोळा, वर्ण काळा.

अंश ३ रा.—प्रमुख, राजापासून मान मिळणारा, प्रसिद्ध, बुद्धि साधारण, शरीर मजबूत, साधारणतः बलवान्.

अंश ४ था—अति विद्वान्, मेधावी, अनेक शास्त्रांत प्रवीण, वैद्य, चेहरा वाटोळा, आडव्या बांध्याचा, शेखी मिरवणारा.

अंश ५ वा –विद्वान्, विद्याव्यासंगी, सत्यवक्ता, लेखक, सत्वगुणी, वागणूक अतिशय सरळ, विश्वास ठेवण्यास पात्र.

अंश ६ वा.–रसायनशास्त्रज्ञ, डॉक्टर, सर्जन, विषारी पदार्थांचा व्यापारी, वर्ण साधारण गोरा, आंतल्या गांठीचा, मनातल्या मनात जळणारा.

अंश ७ वा.–वर्ण साधारण गोरा, शरीराची ठेवण चांगली, बलवान्, धाडशी, साधारण बुद्धिमान्, सुखाची इच्छा करणारा.

अंश ८ वा.–वेदाध्ययन करणारा, उपासना मार्गाचा, शुचिर्भूत, कांहींसा मूर्ख, वर्ण काळा, जमाखर्ची, शरीर रोडकें.

अंश ९ वा –अति बुद्धिमान, शास्त्राचें शोधन करणारा, कायदेपंडित विलक्षण प्रकारचा शोध लावणारा, वर्ण काळसर ग्रंथकार.

अंश १० वा –साधारण बुद्धिमान, अवयव सूक्ष्म, जलप्रवासी, अस्थिर बुद्धि, वर्ण साधारण गोरा, उंची कमी.

अंश ११ वा–चलाख, प्रवासी, भोळा, धाट, वर्ण तांबूस, शरीर सडपातळ, प्रकृति उष्ण.

अंश १२ वा.–वर्ण साधारण गोरा, बुद्धि साधारण नटण्याची हौस, उंची मध्यम, थोडा गर्विष्ट.

अंश १३ वा.–अति बुद्धिमान, विद्वान, शास्त्री, कायदेपंडित.

अंश १४ वा०—प्रवासी, पोहोणारा, गाणारा, विषयी, बुद्धि व विद्या साधारण, चैनी आणि बेफिकीर.

अंश १५ वा०—मुख्य, प्रौढ विचाराचा, बादशाही डौल, राजापासून मान इच्छिणारा, प्रख्यात, मानी, ज्याची पत मोठी.

अंश १६ वा—विद्वान्, हस्तकलाप्रवीण, मायावी, अविश्वासू, आळशी, वृथा डौल मिळवणारा.

अंश १७ वा—अति विद्वान, शास्त्रें जाणणारा, गणिती, सत्यवक्ता, उंच, काळा.

अंश १८ वा—रसायन शास्त्रज्ञ, गूढ शास्त्रें जाणणारा, डॉक्टर सर्जन, उंचीमध्यम, वर्ण गौर.

अंश १९ वा—शरीर काटक, साधारण गोरा, प्रकृति उष्ण, धातूंचीं कामें करणारा, शरीराचा शोक विशेष.

अंश २० वा—वेदाध्यायन करणारा, देवभोळा, डौल विशेष, चिडखोर, खादाड, वर्ण काळा, देह रोडका.

अंश २१ वा०—अतिबुद्धिवान, शास्त्रें जाणणारा, तत्ववेत्ता, सुधारणाप्रिय, विलक्षण शोध लावणारा, विद्वान, ग्रंथकार.

अंश २२ वा –साधारण विद्वान् व बुद्धिमान्, वर्ण गोरा, शरीर सूक्ष्म, चित्त चंचल.

अंश २३ वा–प्रकृति उष्ण, चंचल, प्रवासी, धैर्यवान्, हिंमतदार, दुसऱ्याकडून फसला जाणारा.

अंश २४ वा–चैनी, स्त्रियाभिलाषी, भोग भोगणारा साधारण बुद्धिमान्, विद्या अल्प, वर्ण गोरा.

अंश २५ वा–अति बुद्धिमान्, विद्वान्, अनेक शास्त्रें जाणणारा, ग्रंथकार, वकील किंवा कायदेपंडित.

अंश २६ वा–चैनी, गायक, बेफिकीर, चंचल, प्रवासी, विद्येची आवड विशेष नाहीं.

अंश २७ वा–प्रमुखत्वानें वागणारा, मानाची इच्छा विशेष करणारा, राजाला प्रिय, बलवान्.

अंश २८ वा–विद्वान्, मायावी, दुसऱ्याचें मन वळवण्याच्या कामांत पटाईत.

अंश २९ वा.–अति बुद्धिमान, विद्वान्, सत्वगुणी, शास्त्रें जाणणारा.

अंश ३० वा–रसायनशास्त्रज्ञ, विषारी पदार्थांचा व्यापारी किंवा डॉक्टर, वर्ण गोरा, उंची कमी.

कर्क.

अंश १ ला–शूर, राजयोगी, अधिकारी, वर्ण काळसांवळा, बागबगीच्यांचा शोक, पोहणारा प्रवासी, जलसन्निध राहणारा, व जन्म पावणारा, कफप्रकृति, सत्वगुणी, चंचल, चेहरा वाटोळा, नेत्र व दांत तेजस्वी, बुद्धिमान्.

अंश २ रा.–शूर, धाडशी, शरीर मजबूत, अधिकारी, अमल चालविणारा, वर्ण काळा, बुद्धिमान्, प्रख्यात.

अंश ३ रा–बुद्धिमान्, कलाकुशल, किंचित् आळशी, पोषाखाची काळजी न घेणारा, काळसांवळा, शरीर नीटनेटकें, आडव्या बांध्याचा, चेहरा वाटोळा, चाल सावकाश.

अंश ४ था–तोंडावळा लांबट, चांगला बुद्धिमान्, विद्याव्यासंगी, प्रवासी, सत्वगुणी, खऱ्याकडे प्रवृत्ति, वर्ण काळा, मोजकें बोलणारा बांधा उंच.

अंश ५ वा–ठेंगणा, वर्ण साधारण गोरा, आडवा बांधा, चाल वांकडी, साधारण बुद्धिमान, स्वभाव दुष्ट.

अंश ६ वा–शरीर मजबूत, धीट, लढाऊ, बळाचा गर्व, प्रकृति वातपित्तात्मक, वर्ण साधारण गोरा, बुद्धि साधारण

अंश ७ वा–मूर्ख, पातळ पदार्थांचा व्यापारी, जलसन्निध राहणारा, मूर्ख, बुद्धीनें मंद, वर्ण काळा, अवयव रोडके असून कुरूप, क्रोधी व सूड घेणारा.

अंश ८ वा–बुद्धिमान्, विद्याव्यासंगी, शोधक, तत्ववेत्ता, गुणवान्, शरीर कृश, वर्ण काळा, दूरवर विचार करणारा.

अंश ९ वा–शरीर सूक्ष्म, वर्ण साधारण गोरा. उतावळा, बुद्धि साधारण, पोहणारा.

अंश १० वा–शरीर सडपातळ, वर्ण तांबुस, अति प्रवासी, धीट, लढाऊ, प्रकृति उष्ण, चंचल.

अंश ११ वा–वर्ण गोरा, शरीर गोंडस, गाणारा, पोषाखाची काळजी घेणारा, शरीर सुंदर, बुद्धि साधारण, गर्विष्ठ.

अंश १२ वा–बुद्धिमान्, शास्त्रज्ञ, कला जाणणारा, वर्ण काळा, तोंडावळा लांबट, शरीर सडपातळ असून उंच.

अंश १३ वा–दूर दूरचे प्रवास करणारा, विशेषतः जलपर्यटण करणारा, बागबगीच्यांचा शोक अधिक, चंचल, वातकफात्मक प्रकृतीचा, वर्ण काळा.

अंश १४ वा–छाती रुंद व भरदार, तालीमबाज, धीट, हाडापेरांनीं मजबूत, वर्ण काळा, हुकमत चालवणारा.

१५ वा–विद्वान्, हस्तकलाकुशल, किंचित् आळशी, पोषाखाची काळजी न घेणारा, तोंडावळा वाटोळा, क्षीसदृश मुद्रा, वर्ण मध्यम, बांधा आडवा.

१६ वा–चेहरा लांबट, अति प्रवासी चंचल, विद्याव्यासंगी, सात्विक, वर्ण काळा, बुद्धिमान्, विद्वान्, शरीर उंच.

अंश १७ वा–उंची कमी, आडवा बांधा, स्वभाव भांडखोर किंवा हट्टी किंवा खुनशी, जलसन्निध राहणारा, वर्ण गोरा.

अंश १८ वा–बांधा मजबूत, वर्ण गोरा, हाडापेरांनीं काटक, लढाऊ बाणा, प्रकृति उष्ण, विद्या कमी.

अंश १९ वा–जलपर्यटण करणारा, फार दूरचे प्रवास कर-

णारा, नित्य फिरणारा, पोहोणारा, मूर्ख, वर्ण काळा, शरीर बेढब.

अंश २० वा—अति बुद्धिमान् विद्वान्, शोधक, सुधारणा करणारा, विद्याव्यासंगी, वर्ण काळसर, शरीर नाजूक.

अंश २१ वा—शरीर सूक्ष्म, अवयव लहान, वर्ण गोरा, बुद्धि चंचल, साधारण विद्वान्, जलक्रिडा करणारा.

अंश २२ वा—शरीर सडसडीत, अतिशय चालणारा, चंचल, प्रवासी, बोलणें कमी, धीट, वर्ण तांबूस, प्रकृति उष्ण, तापट.

अंश २३ वा—शरीर गोंडस, रूप चांगलें, वर्ण गोरा, नटण्याची हौस, स्त्रियांचा शोकी.

अंश २४ वा—वर्ण काळा, डोकें लांबट, बुद्धिमान्, विद्वान्, शास्त्रज्ञ, वर्ण काळा, उंच व सडसडीत,

अंश २५ वा—चैनी, बेफिकीर, उतावळा, नाचरा, गाणारा, प्रवासी, वर्ण काळा, शरीर सडपातळ, सर्दीचे विकार.

अंश २६ वा—बांधा मजबूत, धीट, शूर, वर्ण काळा, मुख्य, अंमल चालविणारा, बळाचा गर्व, प्रख्यात.

अंश २७ वा—आळशी, तोंडवळा वाटोळा, स्त्रीसदृश मुद्रा, आडवा बांधा, वर्ण मध्यम, बुद्धिमान् व विद्वान्, हस्तकलाकुशल.

अंश २८ वा—तोंडवळा लांबट, उंच, सडसडीत, वर्ण काळा, प्रवासी, जलद चालणारा, बुद्धिमान्, विद्वान्, विद्याव्यासंगी.

अंश २९ वा—खुनशी, स्वभाव कठोर, विद्येचा व्यासंग कमी, जलसन्निध राहणारा, उंची कमी, वर्ण गोरा.

अंश ३० वा—शरीर मजबूत, उष्ण प्रकृति, नेत्र पिंगट, साधारण गोरा, बळाचा गर्व, नाक सरळ, छाती पुढें करून चालणारा, बुद्धि व विद्या साधारण.

सिंह.

अंश १ ला—शरीर मजबूत, काटक, दांत व छाती हे भाग मजबूत, कपाळ मोठें असून किंचित् पुढें, चेहरा भव्य, वर्ण काळसर, अंमलदार, प्रख्यात, मुख्य.

अंश २ रा—आडवा बांधा, वर्ण मध्यम, किंचित् आळशी, विद्वान्, हस्तकलाकुशल.

अंश ३ रा—शरीर किंचित् उंच, तोंडवळा लांबट अति विद्वान्, विद्याव्यासंगी, वर्ण काळा, मोजकें बोलणारा.

अंश ४ था—आग्रही, खुनशी, रागीट, उंची कमी, विद्या साधारण, प्रकृति उष्ण.

अंश ५ वा—अति बळकट, शरीर पीळदार, केश अल्प, प्रकृति फार उष्ण, डोळे पिंगट, बुद्धि साधारण, वर्ण गोरा.

अंश ६ वा—मिश्रा कलेदार, क्रोधी, केश अधिक, लढ, बुद्धि व विद्या कमी, वर्ण काळा, आहार मोठा.

अंश ७ वा—बुद्धिमान्, शोधक, विद्वान्, शास्त्रज्ञ, सुंदर, वर्ण काळसर, उंची मध्यम, शरीर नाजूक.

अंश ८ वा—शरीर सूक्ष्म, साधारण विद्वान्, उंची कमी वर्ण साधारण गोरा.

अंश ९ वा—प्रकृति अति उष्ण, खरूज—गळवें वगैरे विकार, जखमा, खुणा, पित्त प्रकृति, डोळे पिंगट, शरीर सडपातळ, चलाख, प्रवासी, तांबूसगौर.

अंश १० वा—नटणारा, पोषाखाचा शोकी, डामडौल विशेष, स्त्रियांचा शोकी, गर्विष्ठ, बांधा नीटनेटका, वर्ण गोरा.

अंश ११ वा--चेहरा लांबट, वक्ता, शास्त्री, बुद्धिमान्, विद्याव्यासंगी, वर्ण काळा, शरीर उंच.

अंश १२ वा -चैनी, बागबगीचे करणारा, शेतकरी, जलक्रीडा करणारा, प्रवाशी, वर्ण साधारण काळा, दांत मोठे.

अंश १३ वा—अति बळकट, प्रख्यात्, अंमलदार, मुख्य, किल्लेदार, प्रकृति उष्ण, वर्ण काळा

अंश १४ वा—पोशाखाची विशेष काळजी न घेणारा, आडवा बांधा, बुद्धिमान्, विद्वान्, हस्तकलाकुशल, वर्ण मध्यम.

अंश १५ वा—वर्ण काळा, तोंडवळा लांबट विद्वान्, शास्त्रज्ञ, शरीर सडपातळ असून उंच.

अंश १६ वा—प्रकृति उष्ण, बांधा मजबूत व किंचित ठेंगणा, वर्ण गोरा, स्वभाव खुनशी, साधारण विद्वान्, विषारी किंवा अंमली पदार्थांचा व्यापारी, वैद्यकी किंवा रसायनशास्त्र जाणणारा, साधारण प्रसिद्ध.

अंश १७ वा—प्रकृति फार उष्ण, बांधा फार मजबूत, शरीर धिप्पाड असून पिळदार, बळाचा गर्व, अपघात व दुखापती यांचें भय, अग्नि, शस्त्रें इ० चा धंदा करणारा, छापखानेवाला वर्ण साधारण गोरा, साधारण विद्वान्.

अंश १८ वा—खादाड, मूर्ख, माथेफिरू, विद्या अल्प, रोगट प्रकृतिचा, वर्ण काळा, बुद्धीनें मंद, पुष्कळांचा शत्रु, वेड्या सारखा.

अंश १९ वा—विद्याव्यासंगी, डोक्याचा चांगला, शोधक, शरीर सूक्ष्म, वर्ण काळसर विद्वान्.

अंश २० वा—शरीर सूक्ष्म, उंची कमी, वर्ण गोरा, बुद्धि व विद्या साधारण, निरोगी.

अंश २१ वा—प्रकृति अति उष्ण, वर्ण तांबुसगोरा, शरीर सडपातळ, शब्द घोगरा, रागीट व हट्टी, प्रवासी, धीट, शूर, विद्या कमी.

अंश २२ वा—छानछोकी, वर्ण गोरा, शरीर देखणें व नाजूक, विद्या कमी.

अंश २३ वा—शरीर सडपातळ व उंच, तोंडवळा लांबट, शास्त्रज्ञ, विद्या विशेष, बोलका, वर्ण काळा.

अंश २४ वा—शरीराचे कित्येक भाग फार मोठे, शरीर मजबूत, शूर, धीट, बागबगीचे किंवा शेतकी करून राहणारा वर्ण साधारण काळसांवळा, तोंडवळा वाटोळा, स्वभाव बेफिकीर.

अंश २५ वा—दांत मजबूत, छाती भरदार, शरीर फार मजबूत, तालीमबाज, काटक, किल्लेदार, वर्ण काळा, मुख्य, अंमलदार, विद्या साधारण.

अंश २६ वा—तोंडवळा वाटोळा, बांधा आडवा, वर्ण साधारण गोरा, हस्तकलाकुशल, विद्याव्यासंगी, पोषाखाची फारशी काळजी न घेणारा, आळशी, झोंप विशेष.

अंश २७ वा—अवयव लांबट, शरीर उंच, विद्वान्, शास्त्री, विद्याव्यासंगी, सत्यवक्ता, मोजकें बोलणारा वर्ण काळा.

अंश २८ वा—किंचित् ठेंगणा, रसायनशास्त्रज्ञ, डाक्टर, साधारण विद्वान्, वर्ण गोरा.

अंश २९ वा—प्रकृति फार उष्ण, बांधा धिप्पाड असून फार मजबूत, लष्करी बाण्याचा, वर्ण साधारण गोरा.

अंश ३० वा—अवयव लठ्ठ, खादाड, माथेफिरू, वर्ण काळा, मूर्ख, विद्या कमी.

कन्या.

अंश १ ला—चेहरा गोल, बांधा आडवा, शब्द मधुर व सूक्ष्म, मुद्रा स्त्रीसदृश, वर्ण मध्यम, चाल मंद, आळशी, बुद्धिमान्, विद्वान्.

अंश २ रा—अति विद्वान्, शब्द मांजका, सत्यप्रिय, शास्त्री, वर्ण काळा, अवयव लांबट, फिरणारा, चलाख.

अंश ३ रा—रसायनशास्त्रज्ञ, विषारी अगर अमली पदार्थांचा क्रयविक्रय करणारा, किंचित् ठेंगणा स्वभाव खुनशी, वर्ण गोरा.

अंश ४ था—साधारण विद्वान्, शरीर मजबूत व पीळदार, वर्ण गोरा, छापखानेवाला, धातूंची कामें करणारा, कारागीर.

अंश ५ वा—जास्त बोलणारा, मूर्ख, वर्ण काळा, साधारण पोहोणारा, धार्मिक, उपासनाप्रिय, वागणूक भ्रमिष्टासारखी.

अंश ६ वा—अति विद्वान्, शोधक, कल्पक, बुद्धिमान्, कायदेपंडित, वर्ण मध्यम, प्रकृति नाजूक.

अंश ७ वा—शरीर सूक्ष्म, उंची कमी, साधारण विद्वान्, कायदेपंडित, वर्ण मध्यम.

अंश ८ वा—प्रवासी, हेकट, वर्ण तांबुस गौर, शरीर सडपातळ, बोलणें कमी किंवा अडखळत, बुद्धि कमी.

अंश ९ वा—शरीर गोंडस, वर्ण गोरा, छानछोकी, बुद्धि व विद्या साधारण, स्त्रियांचा शोकी.

अंश १० वा—अवयव लांबट, बुद्धिमान्, विद्वान्, शास्त्री, अति बोलका, हरदास, पुराणिक अगर वक्ता, वर्ण काळा.

अंश ११ वा—बेफिकीर, प्रवासी, चैनी, गाणारा, कित्येक अवयव मोठे, वर्ण काळा, पोहोणारा.

अंश १२ वा—अढयतेनें वागणारा, मुख्यपणाची इच्छा करणारा, शरीर मजबूत, वर्ण काळा, बुद्धि साधारण, विद्या कमी, विशेषें करून सरकारी नोकरीची इच्छा करणारा.

अंश १३ वा—चांगला बुद्धिमान्, स्त्रीसदृश चेहरा, मातृमुखी, चाल मंद, हास्यमुख, विद्वान्, वैद्यविद्या जाणणारा, हस्तकौशल्य विशेष, वर्ण मध्यम, तोंडवळा बाटोळा, झोंप विशेष.

अंश १४ वा—उत्तम बुद्धिमान्, निरंतर विद्याव्यासंगी, शास्त्री, लेखक, वक्ता, सात्विक, शरीर सडपातळ असून उंच, वर्ण काळसर.

अंश १५ वा—स्वभाव आंतल्या आंत जळणारा, उंची कमी, रसायनशास्त्र जाणणारा, अंमली पदार्थांचा व्यापारी, वर्ण गोरा, बुद्धि कमी व विद्याही साधारण.

अंश १६ वा—शरीर बांधेसूत व बळकट, छापखान्याचा धंदा करणारा, बुद्धीनें साधारण, वर्ण साधारण गोरा.

अंश १७ वा—हट्टी, स्वभावानें वाईट, एकमार्गी, वर्ण काळा, सोंवळेओंवळें विशेष करणारा, शरीर कुरूप, बांधा किरकोळ व मान उंच, प्रवासी, पैपामूत जमाखर्च ठेवणारा.

अंश १८ वा—अति बुद्धिमान् निरंतर विद्याव्यासंगी, शोधक, कल्पक, लेखक, वकील किंवा कायदेपंडीत, वर्ण काळसर, शरीर नाजूक, चेहरा सुंदर.

अंश १९ वा—शरीर सूक्ष्म, कित्येक अवयव लहान, उंची कमी, पोहणारा, बुद्धि साधारण, वर्ण गोरा.

अंश २० वा—बोलणें कमी, एकांतप्रिय, स्वर फिका, प्रवासी, जलद चालणारा, रागीट, फसणारा, वर्ण तांबुस, शरीर रोडकें.

अंश २१ वा—चैनी, कपडे, सुगंधी पदार्थ, स्त्रिया व नाटकें यांचा नाद विशेष, वर्ण गोरा, बुद्धि व विद्या कमी.

अंश २२ वा—अति बुद्धिमान्, तोंडवळा लांबट, विद्या विशेष, शास्त्री, शास्त्रें व पुराणें जाणणारा, उंच, काळा.

अंश २३ वा—प्रवासी, मातृमुखी, गैरहिशोबी वागणुक, वर्ण काळा, पुढले दांत मोठे

अंश २४ वा—अंमलदार, बळाचा गर्व विशेष, सर्वांचा मुख्य असावें अशी इच्छा करणारा, शरीर मजबूत, बुद्धि व विद्या साधारण, वर्ण काळा.

अंश २५ वा—तोंडवळा वाटोळा, पोषाखाची विशेष काळजी न घेणारा, हस्तकारागीर, विद्वान्, कायदेपंडित, वर्ण मध्यम.

अंश २६ वा—अवयव लांबट, अति विद्वान्, शास्त्रज्ञ, विद्याव्यासंगी, शरीर सडपातळ असून उंच, वर्ण काळा.

अंश २७ वा—खुनशी, आग्रही, रसायनशास्त्रज्ञ, उंची कमी, वर्ण साधारण गोरा.

अंश २८ वा—शरीर मजबूत, छाती रुंद व भरदार, वर्ण साधारण गोरा बुद्धि व विद्या साधारण.

अंश २९ वा—पूर्खे, वर्ण काळा, मोठा हिशोबी, व्यापारी, शरीर किरकोळ, प्रवासी.

अंश ३० वा—विद्वान्, शोधक, कल्पक, विद्याव्यासंगी, वकील, लेखक, उत्तम डोक्याचा, वर्ण काळा, बांधा साधारण.

तूळ.

अंश १ ला—तोंडवळा व शरीराचे कित्येक अवयव लांबट, उंच सडपातळ, प्रवाशी, फिरण्याचा शोकी, चंचल, मित भाषणी, सत्यप्रिय, वर्ण काळा, शास्त्रें जाणणारा व अति विद्वान्, निरंतर विद्याव्यासंगी.

अंश २ रा—उंची कमी, शरीर साधारण भरदार, रसायनशास्त्रज्ञ, वैद्य अगर डाक्टर, अंमली पदार्थांचा व्यवहार करणारा, वर्ण साधारण गोरा.

अंश ३ रा—शरीर मजबूत, उंची मध्यम, साधारण बुद्धिमान् व विद्वान्, वर्ण मध्यम व गोरा.

अंश ४ था—वर्ण काळा, शरीर किरकोळ, देवभोळा, एककल्ली, चिडखोर, बुद्धि व विद्या कमी.

अंश ५ वा—अति बुद्धिमान्, सुधारणा करणारा, प्राचीन विद्यांचा संशोधक, लेखक, निरंतर विद्याव्यासंग करणारा, शोधक, कल्पक, शरीर सूक्ष्म, वर्ण काळा.

अंश ६ वा—शरीराचे अवयव लहान, उंची कमी, विद्या साधारण, वर्ण साधारण गोरा.

अंश ७ वा—अति प्रवासी, फार लांबचे प्रवास करणारा, जबर चालणारा, बुद्धीनें कमी, अवयव किरकोळ, विद्या साधारण, वर्ण तांबुस.

अंश ८ वा—चैनी, सुगंधी पदार्थ बाळगणारा, स्त्रीलंपट, साधारण गोरा, शरीर मध्यम.

अंश ९ वा—अति बुद्धिमान्, विद्याव्यासंगी विद्वान्, शास्त्री, तोंडवळा लांबट, वर्ण काळा, शरीर सडसडीत व उंच.

अंश १० वा—प्रवासी, पाण्यांतले प्रवास विशेष करणारा, जबर चालणारा, चपल, चैनी, विद्या साधारण, शेतकरी अगर बागवान्, वर्ण काळा, दांत मोठे, जलद बोलणारा.

अंश ११ वा—मुख्यत्वानें वाणगारा, प्रसिद्ध, महत्वाकांक्षी, शरीर मजबूत, विद्या साधारण, वर्ण काळा.

अंश १२ वा—विद्वान्, मंदगति, कारागीर, वळणदार अक्षर लिहिणारा, तोंडवळा वाटोळा, अंगाची ठेवण चांगली, वर्ण मध्यम.

अंश १३ वा—शरीराचे अवयव फार लांबट, तोंडवळा लांबट, वर्ण काळा, शरीर सडपातळ असून उंच, विद्वान व बुद्धिमान्, चपल व प्रवासी.

अंश १४ वा—द्राष्ट स्वभावाचा, आंतल्या आंत जळणारा, उंची कमी, शरीर बोजड, रागीट, बुद्धि कमी, रसायनशास्त्रज्ञ, वैद्य अगर डॉक्टर, वर्ण साधारण गोरा.

अंश १५ वा—शरीर बरेंच मजबूत, अग्नि व लोखंड यांच्याशी व्यवहार करणारा, छापखानेवाला, विद्या साधारण, वर्ण साधारण.

अंश १६ वा—देवघेवींत कुशल, शरीर बेढब, वर्ण काळा, मूर्ख, लबकर तापणारा व हेकेखोर, विद्या व बुद्धि अल्प, देवभोळा, दानिक.

अंश १७ वा—अति बुद्धिमान्, व विद्वान्, प्राचीन विद्यांचें पुनरुज्जीवन करणारा, शोधक, कल्पक, वकील अगर कायदेपंडित, वर्ण काळा.

अंश १८ वा—शरीर सूक्ष्म, अवयव लहान पोहणारा, साधारण विद्वान्, संसार करून राहणारा, उंची कमी, वर्ण साधारण गोरा.

अंश १९ वा—अति प्रवासी, सदा फिरणारा, दूर दूरचा प्रवास करणारा, एकांतप्रिय, बोलणें कमी, वर्ण तांबुस, नेत्र पिंगट, विद्या व बुद्धि कमी.

अंश २० वा—चैनी, पोषाखाची विशेष काळजी घेणारा, स्त्रीलंपट, शेतकरी, विद्या व बुद्धि कमी, वर्ण साधारण गोरा.

अंश २१ वा—अति विद्वान्, तोंडवळा लांबट, विद्याव्यासंगी, शास्त्री, हरिदास अगर पुराणिक, वक्ता, लेखक, शरीर सडपातळ असून उंच.

अंश २२ वा—प्रवासी, फार फिरणारा, चैनी, शेतकरी अगर बागबगीचे करणारा, गाणारा, वर्ण काळा.

अंश २३ वा—शरीर मजबूत, महत्वकांक्षी, अंमलदार, विद्या व बुद्धि साधारण, वर्ण काळा.

अंश २४ वा—बुद्धिमान्, मंद, पोषाखाची काळजी न घेणारा, हस्तकलाकुशल, आंगाची ठेवण चांगली, वर्ण मध्यम.

अंश २५ वा—तोंडवळा लांबट, शरीर उंच व सडपातळ, वर्ण काळा, बुद्धिमान्, विद्वान्, शास्त्री, मोजकें बोलणारा, सत्यवक्ता, विद्याव्यासंगी.

अंश २६ वा—उंची कमी, आंतल्या गांठीचा रसायनशास्त्रज्ञ, अंमली पदार्थांचा क्रयविक्रय करणारा, वर्ण साधारण गोरा, बुद्धि व विद्या साधारण.

अंश २७ वा—शरीर मजबूत, काटक, बांधा नीटनेटका, रुबाबदार, बुद्धि व विद्या साधारण, वर्ण साधारण गोरा,

अग्नि व लोखंड यांच्याशीं व्यवहार करणारा, छापखानेवाला.

अंश २८ वा—वर्ण काळा शरीर कृश, ,मूर्ख व हट्टी, देवभोळा, उत्तम जमाखर्ची, बुद्धि व विद्या कमी.

अंश २९ वा—अति बुद्धिमान्, शोधक, कल्पक, विद्याव्यासंगी, शरीर सूक्ष्म, वर्ण काळा.

अंश ३० वा—शरीर सूक्ष्म, उंची कमी, विद्या साधारण, वर्ण गोरा (मध्यम).

वृश्चिक.

अंश १ ला—रागीट, खुनशी, आंतल्या गाठीचा, मनांतल्या मनांत जळणारा, धीट, वर्ग गोरा, अमली पदार्थांशीं व्यवहार करणारा, उंची कमी, बांधा मध्यम.

अंश २ रा—शरीर मजबूत, बद्धीचा गर्व विशेष, विद्या साधारण, वर्ण साधारण गोरा, नाक अणीदार.

अंश ३ रा—स्वरूप बेढप, वर्ण काळा, मूर्ख, अति हट्टी, फार लबकर तापणारा, सूड घेणारा, बुद्धि व विद्या कमी.

अंश ४ था—बुद्धिमान्, विद्वान्, रसायनशास्त्रज्ञ, वैद्य अथवा डॉक्टर, शरीर सूक्ष्म, वर्ण काळसर.

अंश ५ वा—शरीर सूक्ष्म, अवयव लहान, उंची फार कमी, पोहणारा, अधीर वृत्तीचा, वर्ण गोरा, बुद्धि व विद्या अल्प.

अंश ६ वा—अति रागीट, मोठा धाडशी, लढाऊ, प्रकृति फार ऊष्ण, नेत्र पिंगट, शरीर सडपातळ, वर्ण तांबूस गोरा, विद्या साधारण, प्रवासी, अति चपळ, एकांतप्रिय, बोलणें व हंसणें कमी, मुद्रा क्रूर.

अंश ७ वा—चैनी, बेफिकीर, पोषाख व सुगंधी पदार्थ यांचा शोक विशेष, स्त्रीलंपट, वर्ण गोरा, अंगाची ठेवण चांगली.

अंश ८ वा—तोंडवळा किंचित् लांबट, शास्त्रांचा अभ्यासी, वक्ता, विद्वान, वर्ण काळसर.

अंश ९ वा—प्रवासी, स्त्रीलंपट, गाणारा, शूर, तोंडवळा सुरेख, वर्ण काळसर.

अंश १० वा—बांधा मजबूत, दांत, छाती व कपाळ हे भाग विस्तृत व कणखर, महत्त्वाकांक्षी, मुख्यत्वानें वागणारा, प्रसिद्ध, वर्ण काळा.

अंश ११ वा—बुद्धिमान्, विद्वान्, तोंडवळा बाटोळा, पोषाखाची विशेष काळजी न घेणारा, वर्ण मध्यम.

अंश १२ वा—विद्वान्, शास्त्रें जाणणारा, सत्यप्रिय वर्ण काळसर, बांधा सडसडीत असून उंच.

अंश १३ वा मोठा रागीट आंतल्या आंत जळणारा, खुनशी, ठेंगणा, अमली पदार्थांचा व्यापारी, वैद्य अथवा डॉक्टर, वर्ण गोरा.

अंश १४ वा—बांधा मजबूत, शरीर पीळदार, वर्ण गोरा, बुद्धि व विद्या साधारण, लोखंडाशीं व्यवहार करणारा.

अंश १५ वा—मूर्ख, फार चिडणारा, चेहरा बेढब, वर्ण काळा, बुद्धि व विद्या कमी.

अंश १६ वा—बुद्धिमान्, विद्वान्, शोधक, कल्पक, शरीर सूक्ष्म, वर्ण काळा.

अंश १७ वा—फार ठेंगणा, बुद्धि व विद्या साधारण, वर्ण गोरा, पोहणारा, पातळ पदार्थांचा व्यापारी.

अंश १८ वा–धीट, मुद्रा उग्र, शरीर किरकोळ, प्रकृति फार उष्ण, प्रवासी, वर्ण तांबूसगौर.

अंश १९ वा–फार चैनी, स्त्रीलंपट, बुद्धि व विद्या कमी, शारीरसौंदर्य चांगलें, वर्ण गोरा, बांधा गोंडस, उंची मध्यम.

अंश २० वा–विद्वान्, शास्त्राचा अभ्यास करणारा, तोंडवळा लांबट, वर्ण काळसर, शरीर किरकोळ व उंच.

अंश २१ वा–प्रवासी, जलप्रवास करणारा, पोहणारा, शेतकरी अगर बागबगीचे करणारा, बांधा मजबूत, वर्ण काळा.

अंश २२ वा–शरीर मजबूत व काटक, छाती व दांत मजबूत, मुख्यपणाची इच्छा करणारा, वर्ण काळसर.

अंश २३ वा–बुद्धिमान्, सर्व कामांत कुशल, तोंडवळा वाटोळा, किंचित् आळशी किंवा झोंपाळू, वर्ण उजळ.

अंश २४ वा–शरीराचे अवयव लांबट, सडपातळ व उंच, विद्वान्, बुद्धिमान्, विद्याव्यासंगी, वर्ण काळसर.

अंश २५ वा--शरीर फार ठेंगणें, बांधा भरदार, वर्ण गोरा, स्वभाव मनांतल्या मनांत जळणारा, अंमळी पदार्थांशीं व्यवहार करणारा, साधारण बुद्धिमान, व विद्वान्.

अंश २६ वा–शरीर मजबूत व काटक, प्रकृति ऊष्ण, चाल डौलदार, नाक सरळ, छाती रुंद, बुद्धि व विद्या कमी, वर्ण साधारण गोरा.

अंश २७ वा--मूर्ख, मंद, प्रवासी, लवकर तापणारा, चिडखोर, एककल्ली, जमाखर्ची, वर्ण काळा, शरीर रोडकें.

अंश २८ वा–बुद्धिमान्, विद्वान्, शोधक, कल्पक, विद्याव्यासंगी, शरीर सूक्ष्म, वर्ण काळसर.

अंश २९ वा -शरीर फार ठेंगणें, बांधा भरदार, वर्ण गोरा, बुद्धि व विद्या साधारण, कन्यासंतति विशेष, पाण्याशीं अगर पातळ पदार्थांशीं व्यवहार करणारा.

अंश ३० वा--मुद्रा उग्र, बोलणें कमी, एकांत प्रिय, प्रवासी, जलद चालणारा, विद्या कमी, वर्ण तांबुसगौर.

धनु.

अंश १ ला--शरीर बळकट व काटक, बांधेसूत, वर्ण गोरा, चाल डौलदार, वर्ण गोरा, बुद्धि व विद्या साधारण.

अंश २ रा--मूर्ख, बुद्धि व विद्या कमी, देवभोळा, जमाखर्ची, वर्ण काळा, प्रवासी.

अंश ३ रा--बुद्धिमान्, विद्वान्, शोधक, कल्पक, लेखक, विद्याव्यासंगी, शरीर नाजूक, वर्ण काळसर.

अंश ४ था--बांधा ठेंगणा, अवयव लहान, वर्ण गोरा, जलसन्निध राहणारा, बुद्धि व विद्या कमी.

अंश ५ वा- शरीर सडपातळ असून काटक, वर्ण तांबुसगौर, प्रवासी, प्रकृति फार ऊष्ण, जलद चालणारा, मुद्रा क्रूर.

अंश ६ वा--चैनी, ऐषआराम भोगणारा, स्त्रियांचा शोकी, शरीर गोंडस, वर्ण गोरा, बुद्धि व विद्या साधारण.

अंश ७ वा विद्वान्, शास्त्री, तोंडवळा लांबट, वर्ण काळसर, शरीर किरकोळ असून उंच.

अंश ८ वा--प्रवासी, शेतकरी अगर बागबगीचे करणारा, फार दूरचे जलप्रवास करणारा, बेफिकीर, नाटकी, गाणारा, वर्ण काळसर.

अंश ९ वा--शरीर अति बळकट व पीळदार, दांत, छाती, कपाळ हे भाग विस्तीर्ण व भरदार, वर्ण काळसर, मुख्यपणानें वागणारा, अधिकारी किंवा हुकूम करणारा.

अंश १० वा- साधारण बुद्धिमान्, कायदेपंडित, हस्तकलाकुशळ, तोंडवळा गाल, वर्ण मध्यम, शरीर नीटनेटकें.

अंश ११ वा- शरीर सडपातळ असून उंच, अवयव लांबट, बुद्धिमान्, विद्वान्, शास्त्री, तत्त्ववेत्ता, वर्ण काळा.

अंश १२ वा--बांधा ठेंगणा असून मजबूत, स्वभाव खुनशी, अंमली पदार्थांशी व्यवहार करणारा, वर्ण गोरा.

अंश १३ वा--बांधा अतिशय मजबूत, वर्ण मध्यम, स्वभाव धीट असून मनमिळाऊ, बुद्धि व विद्या साधारण.

अंश १४ वा- वर्ण काळा, चिडखोर स्वभावाचा, देवभोळा, वृत्ति दांभिक, शरीर किरकोळ, शरीरसौंदर्य कमी.

अंश १५ वा--विद्वान्, विद्याव्यासंगी, वकील अगर कायदेपंडित, कल्पक, चतुर शारीरसौंदर्य चांगलें वर्ण काळसर.

अंश १६ वा--शरीर सूक्ष्म, कित्येक अवयव लहान, उंची कमी, साधारण बुद्धिमान व विद्वान्, वर्ण गोरा.

अंश १७ वा--धीट, जलद चालणारा, प्रवासी, शरीर सडपातळ, प्रकृति ऊष्ण, वर्ण तांबूसगौर.

अंश १८ वा--चैनी, ऐषआराम भोगणारा, स्त्रियांचा शोकी, शरीराची ठेवण चांगली, वर्ण गोरा, विद्या व बुद्धि कमी.

अंश १९ वा--विद्वान्, शास्त्री, वक्ता, कायदा जाणणारा, विद्याव्यासंगी, तोंडवळा लांबट, सडसडीत असून उंच, वर्ण काळसर.

अंश २० वा--चैनी, प्रवासी, जलप्रवास करणारा, तोंडवळा वाटोळा, कित्येक अवयव मोठे, वर्ण काळसर.

अंश २१ वा--फार मजबूत, तालीमबाज, छाती, दांत व कपाळ हे भाग भरदार व विस्तीर्ण, वर्ण काळसर, प्रकृति फार ऊष्ण, महत्वाकांक्षी, विद्या व बुद्धि साधारण.

अंश २२ वा--विद्वान्, बुद्धिमान्, तोंडवळा, आंगवठा चांगला, झोंपाळू, हस्तकलाकुशळ, वर्ण मध्यम.

अंश २३ वा--विद्वान्, मितभाषणी, सत्यवक्ता, वागणूक सरळ, अवयव लांबट, वर्ण काळसर.

अंश २४ वा--स्वभाव दुष्ट, प्रकृति रोगट, चेहरा बेढब, उंची कमी, विद्या साधारण, व्यसनी, वर्ण गोरा.

अंश २५ वा--शरीर फार मजबूत, लढाऊ. बळाचा गर्व, गोरा मध्यम, विद्या व बुद्धि साधारण, प्रकृति ऊष्ण, लोखंड व शस्त्रें यांच्याशीं व्यवहार करणारा, डोळे पिंगट.

अंश २६ वा--वर्ण काळसर, शरीर रोडकें, चिडखोर, मूर्खपणा करणारा, हिशोबी कामांत पटाईत.

अंश २७ वा--अति बुद्धिमान्, विद्वान्, कल्पक, शोधक व लेखक, वकील अगर कायदा जाणणारा, शारीरसौंदर्य चांगलें, वर्ण काळसर.

अंश २८वा-- शरीर सूक्ष्म, उंची कमी, कित्येक अवयव लहान, वर्ण गोरा, विद्या व बुद्धि साधारण.

अंश २९ वा--प्रकृति ऊष्ण, मुद्रा उग्र, बोलणें व हासणें कमी, प्रवासी, जलद चालणारा, वर्ण तांबुसगौर.

अंश ३० वा—चैनी, ऐषआराम भोगणारा, नाटकी, पोषाखाची विशेष काळजी घेणारा, बांधा चांगला, वर्ण गोरा.

मकर.

अंश १ ला—वर्ण काळा, शरीर रोडकें, चिडखोर, देवभोळा, केश विशेष, डोकें मोठें, जेवणी लहान, प्रकृति सर्द, विद्या व बुद्धि कमी.

अंश २ रा—चांगला बुद्धिमान्, विद्वान्, वकील अगर कायदा जाणणारा, वर्ण काळसर.

अंश ३ रा—उंची कमी, कित्येक अवयव लहान, बुद्धि व विद्या कमी, जलसन्निध राहणारा, वर्ण मध्यम काळा.

अंश ४ था—अति प्रवासी, दूरदूरचे प्रवास करणारा, वातपित्तात्मक प्रकृति, अतिशय रागीट, शरीर सडपातळ, वर्ण तांबुस काळा.

अंश ५ वा—स्त्रियांचा शोकी, चैनी, नाटकी, वर्ण मध्यम गोरा, बांधा चांगला, विद्या व बुद्धि कमी.

अंश ६ वा—बुद्धिमान्, विद्वान्, शास्त्री, विद्याव्यासंगी वकील अगर कायदा जाणणारा, उंच, वर्ण काळसर.

अंश ७ वा—पोहोणारा, पाण्याशीं खेळणारा, माळी, दूर दूरचे जलप्रवास करणारा, वर्ण काळा.

अंश ८ वा—वर्ण काळा, शरीर मजबूत, प्रकृति वातोष्ण, मुख्य, विद्या व बुद्धि साधारण.

अंश ९ वा—विद्वान्, हस्तकलाकुशल, किंचित् आळशी, वकील अगर कायदा जाणणारा, तोंडवळा बाटोळा वर्ण मध्यम.

अंश १०—वा अति विद्वान्, सत्यवक्ता, वागणूक सरळ, अवयव लांबट, वर्ण काळा, प्रवासी.

अंश ११ वा—अंमळ करणारा, व्यसनी, उंची कमी, आग्रही, वर्ण साधारण गोरा.

अंश १२ वा—लढ, शरीर मजबूत, विद्या व बुद्धि कमी, वर्ण मध्यम.

अंश १३ वा—मूर्ख, आग्रही, वर्ण काळा, शरीर रोडकें, जमाखर्ची, देवभोळा, बुद्धि व विद्या अल्प.

अंश १४ वा—कायदा जाणणारा, बुद्धिमान्, विद्वान् विद्याव्यासंगी, शोधक, वर्ण काळा, शारीरसौंदर्य बरें, बांधा मध्यम.

अंश १५ वा—वर्ण साधारण गोरा, अवयव लहान, बांधा ठेंगणा, बुद्धि व विद्या साधारण, पातळ पदार्थांचा व्यवहार करणारा.

अंश १६ वा—शरीर फार कृश, रोगट, अतिशय चपल, प्रवासी, वर्ण तांबुस काळा, हट्टी, भांडखोर, चिडखोर, बुद्धि व विद्या साधारण.

अंश १७ वा—चैनी, स्त्रियांचा शोकी, नटणारा, बुद्धि व विद्या कमी, सौंदर्य बरें, वर्ण साधारण गोरा.

अंश १८ वा—तोंडवळा लांबट, शरीर कृश असून उंच, शास्त्री, विद्वान्, वर्ण काळसर.

अंश १९ वा—अति प्रवासी, फार दूरचे प्रवास करणारा, विशेषतः जलप्रवास करणारा, कित्येक अवयव मोठे, वर्ण काळसर, बुद्धि व विद्या कमी.

अंश २० वा—शरीर मजबूत, दांत, छाती, कपाळ हे भाग

भरदार असून विस्तीर्ण, वर्ण काळा, बलवान्, मुख्य पणाची इच्छा करणारा, बुद्धि व विद्या साधारण.

अंश २१ वा—साधारण बुद्धिमान्, चेहरा मोहक, बांधा स्थूल, वर्ण मध्यम, हस्तकलाकुशल, वकील अथवा कायदेपंडित.

अंश २२ वा—अवयव लांबट, वर्ण काळसर, बुद्धिमान्, विद्वान्, प्रवासी, बांधा सडपातळ असून उंच, चपल, फिरणारा.

अंश २३ वा—बांधा ठेंगणा, जाड, चेहेरा कुरूप, वर्ण मध्यम गोरा, बुद्धि व विद्या कमी, स्वभाव हट्टी.

अंश २४ वा—बांधा लठ्ठ व मजबूत, बुद्धि कमी, डोळे पिंगट वर्ण मध्यम.

अंश २५ वा—मूर्ख, वर्ण काळा, नादी, एककल्ली, चिडखोर, अप्रासंगिक व असंबद्ध बोलणारा, जमाखर्ची देवभोळा, भमिष्ठासारखी वृत्ति.

अंश २६ वा—सांगला बुद्धिमान्, वर्ण काळसर, विद्वान् शोधक, विद्याव्यासंगी, शरीर सूक्ष्म, सौंदर्य बरें.

अंश २७ वा—शरीराचे कित्येक अवयव लहान, उंची कमी, शरीर किरकोळ, वर्ण किंचित् गौर, बुद्धि व विद्या कमी.

अंश २८ वा—शरीर किरकोळ, प्रकृति वातपित्तात्मक, प्रवासी, जलद चालणारा, एकांतप्रिय, हट्टी, रागीट, वर्ण तांबुसकाळा, बुद्धि व विद्या कमी.

अंश २९ वा—चैनी, स्त्रीलंपट, नटणारा शरीर गोंडस, वर्ण मध्यम गोरा. बुद्धि व विद्या कमी.

अंश ३० वा—बुद्धिमान्, विद्वान्, शास्त्री, विद्याव्यासंगी, वर्ण काळसर, शरीर उंच, तोंडवळा लांबट.

कुंभ.

अंश १ ला—विद्वान्, शोधक, कल्पक, विद्याव्यासंगी, कायदा जाणणारा, उत्तम ग्रथकार किंवा कवि, शरीर सूक्ष्म, तोंडवळा बाटोळा वर्ण काळसर.

अंश २ रा—कित्येक अवयव लहान, उंची कमी, साधारण बुद्धिमान् व विद्वान्, वर्ण गोरा.

अंश ३ रा—सडसडीत बांधा, वर्ण तांबुस, प्रवासी, चपळ, जलद चालणारा, विद्या कमी.

अंश ४ था—चैनी, स्त्रीलंपट, नटणारा, विद्या व बुद्धि साधारण, वर्ण गोरा

अंश ५ वा—तोंडवळा, लांबट, शरीर सडपातळ उंच, अति विद्वान्, वक्ता, लेखक, शास्त्री, वर्ण काळसर.

अंश ६ वा—प्रवासी, चैनी, तोंडवळा बाटोळा, स्त्रीलंपट, वर्ण काळा, विद्या व बुद्धि साधारण.

अंश ७ वा—शरीर बांधेसूद व मजबूत, वर्ण काळा, मोठेपणाची इच्छा करणारा, मुख्य, अधिकारी, हुकूम करणारा.

अंश ८ वा—विद्वान्, किंचित् आळशी, झोंपाळू, हस्तकलाकुशल, बांधा मध्यम, वर्ण मध्यम.

अंश ९ वा—शरीराचे अवयव लांबट, तोंडवळा लांबट, वर्ण काळा, शरीर सडपातळ असून उंच, विद्वान्, सत्यप्रिय, शास्त्री, विद्याव्यासंगी, मोजकें बोलणारा, प्रवासी.

अंश १० वा—बांधा, ठेंगणा, वर्ण गोरा, रसायनशास्त्रवेत्ता, वैद्य अथवा डॉक्टर, अंमली पदार्थांचा व्यवहार करणारा, विद्वान.

अंश ११ वा–शरीर बरेंच मजबूत, वर्ण मध्यम, विद्या व बुद्धि साधारण.

अंश १२ वा–शरीर किरकोळ, वर्ण काळा, मूर्ख, हट्टी, विद्या व बुद्धि कमी, प्रवासी.

अंश १३ वा–अति विद्वान्, विद्याव्यासंगी, शोधक, कल्पक, ग्रंथकर्त्ता, अति बुद्धिमान्, वर्ण काळसर बांधा मध्यम, चेहरा गोल.

अंश १४ वा–साधारण विद्वान्, कायदा जाणणारा, उंची वर्ण साधारण गोरा, चेहरा गोल, शरीराचे अवयव लहान.

अंश १५ वा–हट्टी, चपळ, जलद चालणारा, मुद्रा, उग्र, शरीर सडपातळ, उंच वर्ण तांबुस, बुद्धि व विद्या कमी.

अंश १६ वा–चैनी, स्त्रियांचा शोकी, नटणारा, शरीर गोंडस, वर्ण मध्यम, शेतकरी, बुद्धि व विद्या साधारण.

अंश १७ वा–अति बुद्धिमान्, विद्वान्, शास्त्री, वक्ता, कायदेपंडित, चेहरा लांबट, वर्ण काळा, बांधा सडपातळ.

अंश १८ वा–शरीराचे कित्येक अवयव मोठे, बेफिकीर, विचकट बोलणारा, प्रवासी, चपळ, वर्ण काळसर, बुद्धि व विद्या साधारण,

अंश १९ वा–शरीर मजबूत, छाती, कपाळ, दांत हे भाग विस्तीर्ण व भरदार, वर्ण काळा, हुकूम करणारा.

अंश २० वा–बुद्धिमान्, विद्वान्, हस्तकलाकुशल, चेहरा गोल, वर्ण मध्यम, कायदा जाणणारा.

अंश २१ वा–चेहेरा लांबट, अवयव दीर्घ, वर्ण काळसर, अति बुद्धिमान्, मोजकें बोलणारा.

अंश २२ वा–रसायनशास्त्रज्ञ, वैद्य अगर डॉक्टर, अमली पदार्थांशी व्यवहार करणारा, शरीर ठेंगणें, वर्ण साधारण गोरा.

अंश २३ वा–शरीर मजबूत, घोड्यावर बसणारा, लढाऊ, बुद्धि व विद्या कमी, वर्ण मध्यम.

अंश २४ वा–मूर्ख, आग्रही, एक मार्गी, जमाखर्ची, वर्ण काळसर, बांधा रोडका.

अंश २५ वा–अति बुद्धिमान्, शोधक, कल्पक, विद्याव्यासंगी, लेखक, कायदा जाणणारा, चेहेरा गोल, वर्ण काळसर.

अंश २६ वा–साधारण विद्वान्, उंची कमी, कित्येक अवयव लहान, वर्ण मध्यम गोरा.

अंश २७ वा–प्रकृति ऊष्ण, शरीर सडपातळ, प्रवासी, बुद्धि कमी, वर्ण तांबुस.

अंश २८ वा–चैनी, स्त्रियांचा शोकी, नटणारा, शेतकरी, बांधा गोंडस, वर्ण गोरा, चेहेरा वाटोळा बुद्धि व विद्या कमी.

अंश २९ वा–चेहरा लांबट, अति बुद्धिमान, विद्वान् शास्त्री, कायदा जाणणारा, शरीर सडपातळ, वर्ण काळसर.

अंश ३० वा–चैनी बेफिकीर, प्रवासी चपळ, बागबगीचे करणारा, कित्येक अवयव मोठे, वर्ण काळसर.

मीन.

अंश १ ला–शरीर ठेंगणें, किरकोळ, कित्येक अवयव फार लहान, साधारण विद्वान्, वर्ण गोरा.

अंश २ रा—एकांतप्रिय, बोलणें कमी, विद्या व बुद्धि कमी, प्रवासी वर्ण तांबुस.

अंश ३ रा चैनी, शेतकरी, शरीर गोंडस, स्त्रियांचा शोकी वर्ण गोरा, बुद्धि व विद्या साधारण.

अंश ४ था—चेहेरा लांबट, शरीर सडपातळ व उंच, शास्त्री, विद्वान्, कायदा जाणणारा, वर्ण काळसर

अंश ५ वा—प्रवासी, चपळ, चैनी, विचकट बोलणारा, बुद्धि व विद्या कमी, वर्ण काळसर.

अंश ६ वा—शरीर मजबूत, मुख्य, हुकूम करणारा, वर्ण काळा, प्रसिद्ध बुद्धि व विद्या मध्यम.

अंश ७ वा—विद्वान्, चेहेरा गोल, बांधा आडवा, हस्तकलाकुशल, किंचित् आळशी, वर्ण मध्यम.

अंश ८ वा—चेहेरा लांबट, शरीराचे अवयव दीर्घ, विद्वान, सत्यप्रिय, प्रवासी, वर्ण काळसर.

अंश ९ वा—चेहेरा गोल, बांधा ठेंगणा, साधारण मजबूत, बुद्धि व विद्या साधारण, वर्ण गोरा.

अंश १० वा—शरीर मजबूत, वर्ण मध्यम, बुद्धिमान्, विद्वान्.

अंश ११ वा—शरीर रोडकें, वर्ण काळा, आग्रही, मूर्ख, देवभोळा, जमाखर्ची.

अंश १२ वा—बुद्धिमान, विद्वान्, कायदा जाणणारा, लेखक, ग्रंथकार, वर्ण काळसर, चेहेरा गोल.

अंश १३ वा—शरीर ठेंगणें, अवयव लहान, वर्ण गोरा, बुद्धिमान् व विद्वान्.

अंश १४ वा--प्रवासी, चपळ, जलद चालणारा, शरीर

सडपातळ, वर्ण तांबुस, बुद्धि व विद्या साधारण.

अंश १५ वा—चैनी, नटणारा, स्त्रियांचा शोकी, शरीर गोंडस, वर्ण गोरा, शेतकरी, बुद्धि व विद्या साधारण.

अंश १६ वा--चेहेरा लांबट, विद्वान्, शास्त्री, बांधा किरकोळ, कायदा जाणणारा, वर्ण काळसर.

अंश १७ वा--प्रवासी, विशेषेंकरून जलप्रवास करणारा, स्त्रीयांचा शोकी, विद्या व बुद्धि साधारण, शूर, वर्ण काळसर.

अंश १८ वा—धीट, शरीर मजबूत व काटक, मुख्य, अंमल गाजवणारा, हुकूम करणारा, साधारण विद्वान, वर्ण काळा.

अंश १९ वा—विद्वान्, बुद्धिमान्, हस्तकलाकुशल, आळशी, तोंडवळा गोल, वर्ण काळा.

अंश २० वा—उत्तम बुद्धिमान्, अति विद्वान्, चेहरा लांबट, शरीराचे अवयव दीर्घ, प्रवासी, वर्ण काळसर.

अंश २१ वा--बांधा ठेंगणा, तोंडवळा वाटोळा, साधारण विद्वान्, जलसन्निध राहणारा, अमली पदार्थांशीं व्यवहार करणारा, वर्ण गोरा.

अंश २२ वा--शरीर विशेष मजबूत, बळाचा गर्व, लढाऊ, विद्या व बुद्धि कमी, वर्ण गोरा.

अंश २३ वा--मूर्ख, चिडखोर, असंबद्ध भाषण करणारा, जलप्रवासी, विद्या कमी, वर्ण काळा.

अंश २४ वा--अति बुद्धिमान्, विद्वान्, शोधक, कलाक, सुधारणा करणारा, विद्याव्यासंगी, कायदा जाणणारा, वर्ण काळा.

अंश २५ वा--ठेंगणा, शरीराचे अवयव लहान, जलसन्निध राहणारा, साधारण बुद्धिमान, वर्ण गोरा.

अंश २६ वा प्रवासी, चपळ, धीट, भांडणांत न हटणारा, चेहेरा उग्र, एकांतप्रिय, बोलणें अडखळत, वर्ण तांबुस गोरा.

अंश २७ वा--चैनी, नटणारा, स्त्रियांचा शोकी, शेतकरी. अगर व्यापारी, वर्ण गोरा, चेहेरा गोल.

अंश २८ वा--बुद्धिमान, विद्वान्, विद्याव्यासंगी, तोंडवळा लांबट, शरीर सडपातळ असून उंच, वर्ण काळा.

अंश २९ वा--चैनी, प्रवासी, दूर दूरचे जलप्रवास करणारा, नाटकी, बुद्धि व विद्या कमी, वर्ण साधारण.

अंश ३० वा--शरीर बांधेसूद असून बळकट, मुख्य हुकूम-करणारा, वर्ण काळा, विद्या साधारण.

या प्रमाणें प्रत्येक राशीच्या प्रत्येक अंशाचें लक्षण आहे. प्रत्येक कुंडलींत हें अंशवर्णन पूर्णपणें मिळणें शक्य नाहीं. घोरणानें अमुकच अंश असला पाहिजे असें ठरवितां येईल. लग्नांत ज्या वेळीं ग्रह असतील त्या वेळीं हें अंशवर्णन जुळणार नाहीं. निरनिराळे ग्रह निरनिराळ्या अंशांत असल्यामुळें सामुदायिक फल ठरविणें कठीण जाईल हें खरें आहे, तरी असे प्रसंग फारच विरळा येतील.

ग्रहांचें राशिपरत्वें फल अंशवर्णनाचा धरून पाहिल्यास बरेंच सूक्ष्म, ज्ञान होईल असें वाटतें अंशवर्णन मात्र खरें पाहिजे. आम्ही जें हें वर्णन केलें आहे, तें केवळ काल्पनिक नसून एका तत्त्वाला धरून केलें आहे, म्हणून तें बहुधा बरोबर अनुभव देईल, असें वाटतें.

मनांत धरलेली कुंडली सांगणें.

—:o:—

कै. बाबाजीराव पटवर्धन ऊर्फ महाडकर ज्योतिषी हे ज्या प्रमाणें चेहेऱ्यावरून कुंडली मांडीत त्या प्रमाणेंच त्यांनीं मनांत धरलेली कुंडली सांगण्याचेही क्वचित प्रयोग केल्याचें ऐकिवांत आहे. हे प्रयोग ते फारसे करीत नसत. एखाद्या स्थळीं ते एखादाच प्रयोग करीत; तो कित्येक बरोबर उतरे असें म्हणतात तर कित्येक त्यांत विशेष तथ्य नाहीं असेंही म्हणतात. कै० वा० शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं आपल्या भारतीय ज्योतिःशास्त्राच्या इतिहासांत पृ. ४८० मध्यें खालीं लिहिल्या प्रमाणें म्हटलें आहे.—

"बापाच्या शारीरलक्षणावरून मुलाची जन्मकुंडली पटवर्धनांनीं सांगितली अशीं कांहीं उदाहरणें मीं पाहिलीं आहेत, त्यांतलें एक सांगतों. रा० ब० नारायणभाई दांडेकर यांच्या मुखचर्येवरून त्यांच्या गणेश नामक पुत्राची जन्मकुंडली बहुतेक ग्रहांसह पंधरा वीस मिनिटांत माझ्या समक्ष मांडिली. हा प्रकार कोणत्याही ग्रंथांत नाहीं. पटवर्धनांनीं स्वतः कल्पनेनें बसविला आहे. असो, यावरून जातकशास्त्रानें काय काय विलक्षण गोष्टी निष्पन्न होतील हें आज सांगतां येत नाहीं. अनुभव घेऊन हें शास्त्र वाढविलें पाहिजे. म्हणजे कित्येक आधुनिक शास्त्रांप्रमाणें जातक हें अनुभवावलंबी उत्कृष्ट शास्त्र बनेल अशी माझी समजूत आहे."

वरील उताऱ्यावरून ते वाटेल त्याची कुंडली मनांत धरिली तरी सांगत असें निष्पन्न होत नाहीं व हेंच खरें असावें असें आम्हांस वाटतें. वाटेल त्याची कुंडली सर्व ग्रहांसह तर कोणासच सांगतां येणें शक्य नाहीं. प्रश्नकुंडलीवरून वाटेल त्याची कुंडली 'मीं

मांडूं शकतों' असें ह्मणणारे श्री. विष्णु गोविंद गुर्जर (पाध्ये) या नांवाचे एक तरुण गृहस्थ आहेत, ते इंदुप्रकाश छापखान्यांत नोकर आहेत. यांना अशी एखादी कुंडली सांगावयाची असेल तर पूर्वी १।२ दिवस कांहीं तयारी करावी लागते. ती झाल्या नंतर प्रयोगाच्या वेळीं १०।२० (किंवा त्याहूनही अधिक) कोप चहा तयार ठेवावा लागतो. या चहाच्या बळावर पुष्कळशा वेळानें ुंडली सांगतों असें ते ह्मणतात. आह्मांस अद्यापि त्यांचा अनुभव नाहीं. केवळ ज्योतिःशास्त्राच्या बळावरच जर त्यांस हा चमत्कार करितां येत असेल तर त्यांचें ज्योतिःशास्त्र कांहीं निराळें असलें पाहिजे असें वाटतें. सिद्धपुरुषाच्या प्रसादानें सांगत असले तर ग्रंथच आटोपला! आह्मांस तर असें खात्रीनें वाटतें कीं, प्रश्नकुंडलीच्या बळानें हें कार्य होणार नाहीं. जर त्यांनीं कोठें हा प्रयोग करून कुंडली मांडली असेल तर त्यांनीं लोकांस खात्रीनें चकवलें असलें पाहिजे. एक दोन वेळां यांच्या बोलण्यांत असें आलें कीं, आम्ही जे प्रयोग करितों ते मोठ्या वजनदार लोकांत करितों! यावरून आमच्या साऱ्या गरिबांची यांच्याकडे डाळ शिजत नाहीं असें दिसतें. असो. तूर्त आह्मांस त्यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळेपर्यंत निश्चयात्मक कांहीं लिहितां येणार नाहीं. उंबराचीं फुलें कधीं दृष्टीस पडतील तो सुदिन ह्मणावयाचा!

बाबाजीराव बापाच्या शारीरलक्षणावरून मुलाची कुंडली बहुतेक ग्रहांसह पंधरावीस मिनिटांत सांगत, हें दीक्षितांचें ह्मणणें आह्मांस खरें वाटतें. पण जें मूल बापाच्या [illegible] गाचें असेल किंवा पहिलेंच असेल त्याची कुंडली थोड्याबहुत प्रमाणानें सांगतां येईल असें आह्मांस वाटतें. मुलांचे चेहेरे आईबापांसारखेच बहुतेक असतात, त्यामुळें बापाचें लग्न किंवा चंद्र ज्या राशींत असेल त्याच राशींत

मूल त्याच्या बळणाचें असेल तर लग्न किंवा चंद्र असेल हा नियम बहुतेक ठिकाणीं आढळतो. ह्मणून दीक्षितांचें ह्मणणें आह्मांस खरें वाटतें. वाटेल त्याची कुंडली सांगतां येणें निःसंशय अशक्य आहे.

आम्हींही या संबंधानें प्रयोग केले व त्याच वेळीं अभिप्रायही घेतले, ते वाचकांसाठीं खालीं देतों.—

(१) " ता. १।२।१० मंगळवार या दिवशीं स्टँ. ४।४९ या वेळीं मी एक कुंडली मनांत धारिली होती. तिच्या संबंधानें तुह्मी **तेरा प्रश्न** केलेत त्यांपैकीं **८ प्रश्न** बरोबर आले. दुसरी ९॥ वाजतां मनांत धरिली. तिच्या संबंधानें **८ प्रश्न** केले त्यांपैकीं ९ बरोबर आले! यावरून या विद्येचीं मूलतत्वें तुह्मांस कांहीं कळलेलीं असावीं व अशी कुंडली मांडतां येणें शक्य आहे असें मला अनुमान होत आहे—

शिवराम प्रभाकर जोशी
गणपती वाले—

(२) ता. २।२।१० रोजीं स्टँ. ९ वाजतां सकाळीं मनांत धरलेल्या कुंडलीचा प्रयोग केला. त्यांत १३ उत्तरांपैकीं ७ उत्तरें बरोबर सांगितलीं. यावरून ही विद्या साध्य होण्यासारखी आहे असें वाटतें.

वामनराव नाना मोरोबा
जे. पी. मुंबई.

(३) ता. ६।२।१० रोजीं मनांत धरलेल्या कुंडलीसंबंधानें बारा प्रश्नांपैकीं नऊ प्रश्न बरोबर आले! यावरून असाच प्रयत्न केल्यास यांत चांगलीच गति होईल, यांत संशय नाहीं.

के. जी. पेठे, मास्तर
मुंबई.

(४) मनांत धरलेल्या कुंडलींतील गुरु व लग्न बरोबर पटलें, रवि व चंद्र चुकले.

त्रिविक्रम रामकृष्ण आठल्ये.

(५) मीं मनांत धरलेल्या कुंडलींतील गुरु, रवि आणि लग्न बरोबर जुळलें.

पांडुरंग काशीनाथ खरे, मास्तर

(६) मनांत धरलेल्या कुंडलींतील ११ गोष्टी पैकीं ८ गोष्टी चांगल्या जुळल्या.

आत्माराम शिवराम दिवाडकर, ज्योतिषी.

❀ ❀ ❀

नमुन्यासाठीं तूर्त ६ सर्टीफिकिटें दिलीं आहेत. आमचा प्रयत्न चालू आहे व त्यांत थोडें बहुत यशही मिळेल असें वाटत आहे. आह्मीं प्रयोग करितांना पृच्छकांची कुंडली आधारास घेत असतों आतां पर्यंतचा अनुभव असा आहे कीं, जर पृच्छक आपल्या मनांत आपल्या मुलाचीं कुंडली धरील तर ती जितकी सूक्ष्म सांगतां येते तितकी दुसरी एखाद्या नातलगाची धरून सांगतां येत नाहीं. नातलगां शिवाय इतरांच्या कुंडल्या सांगण्यास फारच त्रास पडतो व एखादी दुसरी गोष्ट जुळली तर जुळते! या संबंधाचे काय नियम आहेत व कसें सांगतां येतें याचा विचार पुढील खेपेवर ठाकणें जरूर आहे.

वाहनयोग

मनुष्य गरीब असो कीं श्रीमंत असो ज्याला ह्मणून वाहनयोग आहे, तो गाड्या, घोडे बाळगतो व नेहमीं वाहनांचा उपभोग घेतो. गाड्या हाकणारे कोचमन यांस वाहनयोग असलाच पाहिजे. श्रीमंतमुलें किंवा व्यवहाराच्या सोईसाठीं एखादा मनुष्य वाहनें बाळगील तर त्यास वाहनयोग असेलच असें नाहीं. पण जर तो स्वतःच्या सुखासाठीं बाळगील व त्याला वाहनांचा विशेष शोक असेल तर त्याच्या कुंडलींत हा योग स्पष्ट आढळेल. राजेरजवाडे, जहागीरदार, शेटसावकार व मोठ्या पगाराचे नोकर हे नेहमीं घोड्यावरून किंवा गाडींतून फिरतात, पण इतक्यावरून त्यांस वाहनयोग आहे असें ठरणार नाहीं. यावरून असें ठरतें कीं, गाड्या हाकणारे कोचमन व जे केवळ शोकानें वाहनें बाळगतात त्यांस वाहनयोग खात्रीनें असला पाहिजे. जेवणें, झोंप घेणें, मैथुन इत्यादि मनुष्याचे स्वाभाविक धर्म आहेत. ह्मणून यांचा योग कुंडलींत आहे ह्मणण्यांत अर्थ नाहीं. परंतु जेव्हां एखादा मनुष्य मोठा खादाड असतो किंवा निरंतर उपास करितो, अतिशय झोंप घेतो किंवा मुळींच निजत नाहीं. स्त्रीसंग अतिशय करितो किंवा मुळींच करीत नाहीं असल्या माणसांच्या कुंडल्यांत मात्र ते ते तसे तसे योग आढळतील. तसेंच मुंबई, कलकत्ता, लंदन, पारीस वगैरे शहरांत गाड्या व घोडे बाळगणें किंवा त्यांतून फिरणें या गोष्टी साहजिक आहेत, ह्मणून त्यांचा योग कुंडलींत आढळणार नाहीं. कोणताही योग जेव्हां तो स्वाभाविकाच्या पुढें गेलेला असतो, तेव्हांच तो कुंडलींत दिसून येतो. ट्राम हाकणारा, आगगाडीचा ड्रायव्हर व गाई, मोटारगाडी चालविणारा यांच्या कुंडल्या दृष्टीस पडतील तर वाहनयोग स्पष्ट दिसून येईल.

कुंडलींतल्या चवथ्या स्थानावर मुख्यतः या योगाचा विचार करितात. तरीपण एखाद्या वेळीं हाच योग चंद्राच्या किंवा चतुर्थेशाच्या चतुर्थ स्थानावरही विचार करावा लागतो. ज्यांच्या कुंडलींत चतुर्थ स्थानीं शुभ ग्रह शुभ स्थितींत असतील त्यांस वाहनयोग खात्रीनें सांगण्यास हरकत नाहीं. या स्थानांत अशुभ ग्रह असले तर वाहनात त्याला यश मिळणार नाहीं किंवा वाहनसुख मुळींच मिळणार नाहीं.



वरील कुंडलींत 'वा' हें अक्षर जेथें आहे त्या स्थानावर गाड्या व घोडे यांचा विचार होतो. या स्थानांत शुक्र, गुरु, बुध व चंद्र हे शुभ ग्रह असतील तर मनुष्यास गाड्या घोड्यांचा शोक असल्याशिवाय राहणार नाहीं, मग तो गरीब असो वा श्रीमंत असो. कोणी ड्रायव्हर किंवा गार्ड होतील, कोणी ट्रामगाड्या चालविणारे किंवा त्यांत तिकीटकलेक्टरचें काम करणारे होतील, हत्तीचे महात याच वर्गांत येतात, उंटावरून सदा प्रवास करणारे व खेंचरें अगर गाढवें यावर बसणारे, लष्करांतील घोडेस्वार, व्हाईसरायांसारखे चार घोड्यांच्या गाडींतून जाणारे किंवा हत्तीच्या अंबारींतून मिरवणारे गाड्या, घोडे, हत्ती, बैल, खेंचरें याचा व्यापार करणारेही याच वर्गांत येतात. चतुर्थ स्थानांत वाहनसुखास शुक्र अत्यंत चांगला. त्याच्या खालोखाल गुरु, बुध, व चंद्र हे आहेत. हे ग्रह राशिपरत्वें

ज्या मानानें बलवान् असतील त्या मानानें वाहनांची प्राप्ति, त्यांचें यश प्राप्त होईल.

कुंडलींतील ११ वें स्थान जें लाभस्थान तें मोठ्या किमतीचें घोडे, हत्ती, पालख्या व रथ यांच्या प्राप्तीस मुख्य कारण आहे. वरील कुंडलींत तें 'ला' या अक्षरानें दर्शविलें आहे. लग्न, चतुर्थ व लाभ हीं स्थानें व यांचे अधिपति बलवान् असल्यास उंची वाहनें प्राप्त होतील व त्यांचा निरंतर सुखोपभोग मिळेल असें मानण्यास हरकत नाहीं.

लग्नाच्या अगर चंद्राच्या चतुर्थ स्थानीं कर्क, सिंह, धनु हे राशी वाहनसुखाला उत्तम आहेत. या राशींत जर शुक्रादि ग्रह असतील तर उत्तम प्रकारचें वाहनसुख प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाहीं.

लग्नाच्या अगर चंद्राच्या चतुर्थ स्थानीं जर पाप ग्रह असतील तर त्याला वाहनयोग नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. ते ग्रह फारच बलवान असतील व शुभ ग्रहांशीं संबंध करीत असतील तर कांहींसें वाहनसुख मिळेल. ते जर अनिष्ट असतील तर वाहनें मिळणार नाहींत व जबरदस्तीनें प्रयत्न केल्यास त्यांत यश मिळणार नाहीं. धनाची हानि होऊन शरीरालाही यातना होतील आणि वाहनें मरतील.

१ लग्न, चतुर्थ व लाभ यांचे अधिपति कुंडलींत केंद्रांत अगर त्रिकोणांत युति करितील तर तो उत्तम प्रकारचा वाहनयोग होतो. शुभ ग्रहांनीं उत्तमोत्तम व पाप ग्रहांनीं मध्यम योग होतो.

२ लग्न, चतुर्थ व लाभ यांचे अधिपति एकमेकांच्या केंद्रीं अगर त्रिकोणांत असतील तर त्यांच्या बलानुसार वाहनसुख बरें वाईट मिळाल्या शिवाय राहणार नाहीं.

३ लग्न, चतुर्थ व लाभ यांचे अधिपति एकमेकांच्या स्थानीं अगर कुंडलींत कोठेंही एकमेकांच्या राशीस असून दृष्टियोग, केंद्रयोग किंवा

त्रिकोणयोग करीतील तर वाहनसुख आजन्म मिळेल असें समजावें.

लग्न, चतुर्थ व लाभ या स्थानीं शुक्र, गुरु. बुध व चंद्र हे ग्रह शुभ स्थितींत असतील तर तो गरीब असला तरी वाहनसुख भोगील.

या प्रमाणें कुंडलीवरून वाहनसुखांचा विचार करावा, असें वाटतें. वाचकांनीं वरील चार नियमांचा अनुभव घेऊन कळवावें अशी विनंति आहे.

लग्ने वाहेशदेहानां संबंधश्चाश्ववाहनम्॥
शुक्रेणांदोलिकाप्राप्तिर्गुरुणा गजवाहनम्॥

लग्नस्वामी व चतुर्थेश हे लग्नांत (शुभ) युति करीतील तर त्या मनुष्यास घोडे बसावयास मिळतील. शुक्राचा संबंध असतां पालखी व गुरूचा संबंधअसतां हत्ती हीं वाहनें प्राप्त होतील असें एक ग्रंथकार ह्मणतो.

केंद्रायस्वविलग्नकोणसहजस्थौकांत्यवाहेश्वरौ
दे हेऽन्ये न्दु विलग्ननाथसहितामन्योन्यभावाश्रितौ॥
अन्योन्यामतिभाग्यकंटकगतौ दुःस्थानगौ स्वगृहं
पश्यंतौ यदि दीनवंशजनितोऽपिस्याच्चतुर्वाहनः॥

लग्न व चतुर्थ याचे स्वामी केंद्र, लाभ, धनु, लग्न, त्रिकोण च तृतीय या स्थानीं युति करीतील; चंद्र आणि लग्नस्वामी हे लग्नीं किंवा लाभ स्थानीं युति करीतील किंवा एकमेकांच्या स्थानीं असतील; किंवा एकमेकांच्या केंद्रीं अथवा त्रिकोणांत असतील किंवा ६।८।१२ स्थनांतून स्वगृहाला पाहत असतील तर मनुष्य जरी हीन कुलांत उत्पन्न झाला असला तरी त्याला चारही प्रकारचीं वाहनें प्राप्त होतात असा या श्लोकाचा भाव दिसतो.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥ 'भवभूति'

पुस्तक ८ वें.] कार्त्तिक कृ०, ३ बुधवार [अंक २९ वा

जन्मपत्रिका.

आजच्या अंकांत जन्मपत्रिका कशी असावी याचा विचार करावयाचा आहे. आमचे जोशी जन्मपत्रिकेचें भलें थोरलें मेंडाळें करितात, लिहिण्याचे पुष्कळ श्रम घेतात, अनेक प्रकारचीं रंगीबेरंगी कमळें (चक्रें) काढितात व पुस्तकी माहितीही बरीच देतात. परंतु ग्राहकांस त्यापासून जें पाहिजे असतें तें ज्ञान फारच अल्प प्रमाणानें होतें असा सर्वत्र अनुभव आहे. एवढी मोठी विस्ताराची पत्रिका असूनही तिचा त्याला यत्किंचित्ही उपयोग होत नाहीं असें दिसून येतें. द्वादशभाव वर्णन व दशा इतकाच कायतो त्यांत उपयोगी असा भाग असतो. दशा कितपत उपयोगी आहेत याबद्दल मागें एका अंकांत सांगितलेंच आहे. अमुक ग्रहाची दशा अमुक फल देते हें सामान्य तत्व आहे. पण विवक्षित कुंडलींत तो ग्रह अमुकच फल उत्पन्न करील हें जर त्या पत्रिकेंत सांगितलेलें नसलें तर त्या कोष्टकांच्या अकटोविकट खटाटोपाचा काय उपयोग आहे बरें? अष्टोत्तरी विंशोत्तरी आणि योगिनी अशा तीन मताच्या दशा देण्यांत पत्रिकेची लांबच लांब वाढवी करावी या पेक्षां अन्य हेतु असणें शक्य

आहे काय? ग्राहकानें यांतील कोणत्या मतावर भरंवसा ठेवावा? सारांश, एवढ्या मोठ्या भेंडाळ्यांत द्वादशभाववर्णन मात्र ग्राहकाच्या उपयोगीं पडणारें आहे, असें दिसून येतें! ग्राहक जर सुज्ञ असला व तो जर या पत्रिकेंतील प्रत्येक गोष्ट विचारांत घेऊं लागला तर अंधेरीस त्याच्या "डोंगर पोखरून उंदीरच," हातीं लागावयाचा हें उघड आहे! पत्रिकेची ही अंधपरंपरा आतां आपणास सोडून दिली पाहिजे व ती सर्व प्रकारें उपयोगी पडेल अशी तिची रचना केली पाहिजे. यासाठीं अह्मास जे या संबंधानें विचार सुचले आहेत ते वाचकांस विचारासाठीं खालीं दिले आहेत, त्यांचा योग्यायोग्य विचार करावा व सर्वानुमतें पत्रिकेची रचना कायमची करावी अशी सूचना आहे.

१ आरंभीं हिंदुलोकांनीं आपल्या धर्माप्रमाणें गणपति, शंकर अगर विष्णु यांच्या स्मरणाचे व नंतर ग्रहांच्या स्मरणाचे श्लोक द्यावे. इतर धर्माच्या लोकांनींही आपापल्या देवाचें स्मरण ज्यांत आहे अशीं पद्यें द्यावीं हें बरें (हिंदूंनीं) नंतर आपली माता, भूमाता व कुलस्वामी यांचा उल्लेख करावा.

२ सर्वांच्या स्मरणानंतर जन्मणाराचें नांव, जनकाचें नांव, जन्माचें स्थल, अक्षांश रेखांश (जन्म स्थलाचे माहीत नसतील तर त्याच्या जवळच्या प्रसिद्ध ठिकाणाचे अक्षांश रेखांशाचा निर्देश करावा.) जन्माचा सन, संवत् अथवा शक, महिना, पक्ष तिथि, तारीख, वार व त्या दिवशीं सूर्योदयानंतर किती कालानें जन्म झाला तो काल घटिका, पळें, तास, मिनिटें वगैरे अथवा घड्याळाचें टाईम या सर्वांचा उल्लेख करावा. सूर्योदय झाल्यावर वाराचें नांव बदलतें व मध्य रात्रीनंतर दुसरी तारीख लागते ह्मणून वार व तारीख यांची याच नियमांनीं नोंद करावी.

३ नंतर जन्मकालचे व जन्मस्थलाचे सर्व स्पष्ट ग्रहांचें एक कोष्टक असावें. त्यांत ग्रह जितके सूक्ष्म करितां येईल तितके करून त्यांची गति व क्रांति द्यावी. ग्रह वक्री असेल तर त्यांची गति ऋण आहे हें समजण्यासाठीं—असें चिन्ह करावें किंवा 'व' असें अक्षर घालावें.

४ स्पष्ट ग्रहांच्या खालीं द्वादश भाव लिहावे व ते वाचेल तर ससंधिक लिहावे.

५ नंतर भावचलित कुंडली असावी. सायन भावचलित कुंडली मांडावयाची असेल तर द्वादश भाव कोष्टक देण्याची जरूर नाहीं.

६ नंतर दशवर्ग कोष्टक आंखून त्यावरून ग्रह कोणत्या वर्षी कोणत्या योग्यतेचा आहे हें लिहावें. दशवर्ग कुंडल्यांत होरा व नवमांश या दोन कुंडल्या महत्वाच्या आहेत, ह्मणून तितक्याच द्याव्या इतरांची आवश्यकता नाहीं.

७ इतकें झाल्यावर द्वादशभाव वर्णन लिहावें.

८ द्वादशभाव वर्णनावरून मनुष्याच्या स्थितीचा बोध होईल. पण अमुक कालीं अमुक प्रकारच्या गोष्टी घडतील हें त्यावरून समजणार नाहीं. ह्मणून त्या करितां कालवर्णन करावें.

९ शेवटीं आपल्या धर्माप्रमाणें आशीर्वादपर श्लोक अथवा वचन यांचा उल्लेख करावा.

याप्रमाणें तिची रचना केल्यास ग्राहकास जन्मपत्रिकेचा खरा खरा उपयोग होईल व ज्योतिषालाही श्रम माफक पडतील असें वाटतें. पत्रिकेचा आकार पुस्तकासारखाच असावा. सर्व पत्रिका चालू [इंग्रजी, मराठी, कानडी, गुजराथी वगैरे] भाषेंत असावी. संस्कृत रचना असल्यास ती सर्वांना समजत नाहीं. ग्राहकाला समजेल अशा भाषेंत ती लिहावी हें उत्तम. श्लोक दिल्यास त्याचा अर्थही द्यावा. पत्रिका होतां होईल तों साधार असावी, आधाराशिवाय तींत कोणतेंही विधान नसावें. कोणतेंही विधान तर्क, व्यवहार व तत्व यांस धरून असावें मग तें चुकलें तरी हरकत नाहीं. ज्योतिषी हा ब्रह्मदेव नव्हे हें उघड आहे. वैद्य जशी रोग्याची चिकित्सा करितो व त्याच्या प्रकृतिमानाप्रमाणें औषधोपाय करितो त्याच प्रमाणें ज्योतिष्यानेंही ग्रहस्थितीची चिकित्सा करून उपाय सुचवावे. अमुक प्रकारचा काल आहे असें निदान करून त्यावेळीं अमुक प्रका-

रानें आचरण ठेवावें असे त्यांत उपाय असावे. धार्मिक उपायही सुचविण्यास हरकत नाहीं. फलज्योतिषाला सिद्धांताचें स्वरूप अद्यापि प्राप्त झालेलें नाहीं ह्मणून भावी अनिष्ट गोष्टी टाळतां येतात असेंच मानिलें पाहिजे. डॉक्टर लोक रोगी मरणाच्या पंथाला असतांही सारखे उपचार सुरू ठेवतात तसेच ज्योतिष्यानेंही सुचवावे. अशा तऱ्हेनें जी पत्रिका केली असेल तीच जन्मपत्रिका या नांवाला योग्य आहे.

पत्रिका करणारानें ती कोणत्या तरी एका पद्धतीला धरून केली पाहिजे. दशा देणें असतील तर त्याही एकाच पद्धतीच्या पाहिजेत. व दशांचीं फलेंही ग्रहांची सर्व प्रकारची स्थिति लक्षांत घेऊन दिलीं पाहिजेत. नुसते श्लोक दिल्यानें कार्य होणार नाहीं. त्याच प्रमाणें प्रत्येक दशा कोणत्या दिवशीं सुरू होते हेंही त्यांत लिहिलेलें असलें पाहिजे. डिंभाख्य चक्र, पंचांगफल, राशिगत व भावगत ग्रहफल, अष्टवर्ग, आयुर्दाय, सर्वतोभद्र चक्र, सूर्यकालानल चक्र, चंद्रकालानल चक्र, निर्याणचंद्र वगैरे निरुपयोगी भाग देऊन पत्रिकेची जागा अडवूं नये. द्वादशभाववर्णन व कालवर्णन यांतच ज्योतिष्यानें आपलें सामर्थ्य खर्ची घालावें. त्याचा होईल तितका विस्तार करावा, व पाहिजेतर मेघमंडलापर्यंत वावडी करावी!

केशवीच्या पद्धतीनें ग्रहांचीं बलें तयार करून त्यावरून जर सूक्ष्म फल समजत असेल तर आमचें कांहीं ह्मणणें नाहीं. पण तसें त्यांत सामर्थ्य नसेल तर विनाकारण श्रम घेऊं नयेत. वंध्यामैथुनानें फल-निष्पत्ति होत नसते!

सारांश, पत्रिकेंत एक ओळसुद्धां निरुपयोगी असतां कामा नये. या प्रमाणें आज सुचलेले विचार सुज्ञ वाचकां समोर मांडले आहेत. फेरफार होणें इष्ट असेल तर तो कळवावा ह्मणजे सर्वानुमतें पत्रिकेचा नमुना तयार करण्यास ठीक पडेल.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥

'भवभूति'

पुस्तक ८ वें.]कार्त्तिक कृ०,१३ शनिवार [अंक ३० वा

जन्मपत्रिका.

नंबर २

१ द्वादशभाववर्णन.

जन्मपत्रिकेंत द्वादशभाववर्णन मुख्य आहे. इतर सर्व खटाटोप या वर्णनाचें उपकरण आहे. ग्राहकाला उपकरणांची महति नसते व त्यांत त्याला कांहीं कळतही नाहीं. उपकरणें लिहून काढणें ह्मणजे एक ग्रंथच उतरून घेणें आहे. या उपकरणांचा फक्त ज्योतिषासच थोडाबहुत उपयोग होतो. ग्राहकाला वर्णनाचीच आवश्यकता असते, त्यामुळें तो पत्रिका उघडून प्रथम ज्योतिष्यानें माझ्याबद्दल काय लिहिलें आहे हेंच पाहण्यास उत्सुक असतो. ज्याप्रमाणें जज्ज एखाद्या खटल्याचा निकाल देतांना जज्जमेंट लिहितो व तेंच सर्व कागदांत अति महत्वाचें असतें त्या प्रमाणेंच ज्योतिषी हा एक जज्ज असून द्वादशभाववर्णन हें त्याचें जज्जमेंट आहे. जज्जमेंटावरून ज्याप्रमाणें जज्जाची विद्वत्ता दिसून येते त्याचप्रमाणें द्वादशभाववर्णनावरून ज्योतिष्याची विद्वत्ता दिसून येते. ज्या पत्रिकेंत द्वादश-

भाववर्णन विस्तारानें व योग्य विचारानें लिहिलेलें नाहीं ती पत्रिका केराच्या टोपलींत अगर वाण्याकडे पुड्या बांधण्यास जाण्यासच योग्य आहे. बरेच ज्योतिषी आपलें अज्ञान झांकण्यासाठीं उपकरणांचीच गर्दी करून सोडतात हें चांगलें नाहीं. जन्मपत्रिकेंत फलभागापेक्षां गणित-भागच अधिक देण्याची पद्धति सर्वत्र दृष्टीस पडते. पण हें लक्षांत घेत नाहींत कीं, पत्रिका ही कांहीं गणितासाठीं करावयाची नसते, फलादेशासाठींच तिची आवश्यकता आहे. फलादेश हा जन्मकालाच्या आकाशाच्या नकाशावरून तयार करावयाचा आहे, ह्मणून तितका नकाशा (कुंडली) असला ह्मणजे झालें. त्या नकाशावरून ज्योतिष्यानें मनुष्याला या लोकीं प्राप्त होणाऱ्या स्थितीचें वर्णन मात्र करावें ह्मणजे झालें. मनुष्याला आपली जीवनयात्रा अंधकारांतून करावयाची असते. ह्मणून सुज्ञ मनुष्य ज्याप्रमाणें अंधकारांतून मार्ग आक्रमण करितांना दिव्याचा उपयोग करितो त्याचप्रमाणें त्यानें आपल्या तमोमय जीवनमार्गांत व्यवहार करण्यासाठी जन्मपत्रिकेचें साह्य घ्यावें हें योग्य आहे. अंधकारांत दिवा असला ह्मणजे मनुष्य ज्या प्रमाणें आपला व्यवहार सावधगिरीनें चालवितो तसाच तो जन्मपत्रिकेच्या साह्यानें सर्वदा चालवूं शकतो. इतकें त्या जन्मपत्रिकेचें महत्व आहे. ह्मणून ती त्याच योग्यतेची झाली पाहिजे. हो योग्यता द्वादशभाववर्णनावर व कालवर्णनावरच अवलंबून आहे. यासाठीं प्रथम द्वादशभाववर्णन कसें असावें याचें यथाशक्ति विवेचन करितों.

१ **तनुभाव.**—कुंडलींतलें जें पहिलें स्थान त्यास लग्न किंवा तनु असें ह्मणतात. स्थान आणि भाव हे एकाच अर्थाचे शब्द आहेत. यासच आणखी भुवन असेंही ह्मणतात. तनुभावावर शरीर, वर्ण, आयुष्य, स्वभाव व जाति यांचा विचार करावयाचा असतो. या भावांत असलेला राशि व ग्रह आणि त्या राशीचा स्वामी या त्रयींवर तनुभावाचें वर्णन करण्याची सर्व ज्योतिष्यांची पद्धति आहे. जन्मपत्रिका निबधांत हा भाव कसा लिहावा तें पुढील प्रमाणें सांगितलें आहे—

प्रथमं तनुभवनं अमुकस्थं-तनुस्थानीं अमुक राशि उदित आहे—। अमुक दैवत्यं-त्यावा स्वामी अमुक ग्रह आहे-। स्वस्वामिना युतं वा अयुतं-आपल्या स्वामीनें युक्त आहे किंवा नाहीं-। अमुक ग्रहदृष्टं-त्यावर अमुक

ग्रहांची दृष्टि आहे-। एवं शुभाऽशुभग्रहदृष्टिविचरणादस्य पुरुषस्य—या प्रमाणें शुभ व अशुभ ग्रहांच्या दृष्टि विचारांत घेतां या पुरुषाचा-। अमुकवर्णः—वर्ण अमुक असावा-। लग्ननवांशपतयो मध्ये यो बलवान्भवति स ग्रहः लग्नोपरि वा स्वनवांशलग्नोपरि दृष्टिप्राप्तः वा युतं तद्ग्रहवशात्तनुप्रकृतिः-लग्नस्वामी व नवमांशाचा स्वामी यांमध्यें जो बलवान् असेल तो ग्रह लग्नांत असेल अगर त्या लग्नावर पाहत असेल तर त्या ग्रहाप्रमाणें शरीरप्रकृति असावी-। उभयो र्बलिष्ठौ न भवेतः—दोन्ही ग्रह जर सारखेच बलवान् असतील तर त्यांपैकीं कोणावरच शरीरप्रकृति अवलंबून नसते अशा वेळीं-। तदा वीर्ययुतो ग्रहो केंद्रत्रिकोणगतो लग्नं पश्यति तद्ग्रहवशात् तनुप्रकृतिः—जो बलवान् ग्रह केंद्रीं किंवा त्रिकोणांत असून लग्नास पाहत असेल त्या ग्रहाप्रमाणें शरीरप्रकृति जाणावी—। [प्रत्येक ग्रहाच्या तनुप्रकृतीचे श्लोक जातक ग्रंथांतून दिले आहेत त्यांचाच येथें उपयोग करावयाचा आहे.] नवांशे यस्मिन् राशौ चंद्रो व्यवस्थितः तस्य स्वामीबशात् वर्णः—नवमांश कुंडलींत ज्या राशीस चंद्र असेल त्या राशीच्या स्वामीचा जो वर्ण तोच त्या पुरुषाचाही सांगावा-। सूर्यस्य ताम्रतुल्य—सूर्याचा तांबूस-। चंद्रस्य श्वेतवर्णः-चंद्राचा पांढरा-। भौमस्यातिरक्तः—मंगळाचा अतिशय लाल-। बुधस्य हारितनीलः—बुधाचा हिरवट निळा-। गुरुव्याप्तितः पीतः—गुरूचा पिंवळा-। यदा शुक्रस्तदा चित्रवर्णः—शुक्राचा चित्रित—। यदा शनि असितः—शनीचा काळा-। परंकुलजातिदेशवशाद्वर्णःवाच्यः—वर्ण सांगतांना कुल, जाति व देश ही विचारांत घ्यावीं-। जन्मकाले यस्मिन् राशौ चंद्रो व्यवस्थितः तद्राशितुल्य पूर्वोक्तराशिस्वरूपः तत्तुल्यस्वभावो जायते—जन्मकालीं चंद्र ज्या राशींत असेल त्या राशीच्या स्वरूपाप्रमाणें स्वभाव असतो—जसें। यदा मेषराशि र्यस्य भवति तदा तस्य क्रूरस्वभावः स्वांगपित्ताधिकः महानशब्दः पूर्वदिशायां सुखी पीतवर्णतो प्राप्तिः अल्पस्त्रीसंगः अल्पसंतानः रूक्षकांतिः समांगः—जर मेष राशींत चंद्र असेल तर स्वभाव क्रूर, पित्तप्रकृति. शब्द मोठा, पूर्व दिशेला सुखी. पिंवळ्या रंगाच्या पदार्थांपासून द्रव्यप्राप्ति, स्त्रीसंग अल्प करणारा, मुलें थोडीं, कांति रुक्ष व शरीर नीटनेटकें असेल—। यदा वृषराशिर्यस्य भवति तस्य स्थिरारंभः स्त्रीस्वभावः शीतलस्वभावः कांतिरहितः दक्षिणे सुखी वातप्रकृतिः शुभ्रवर्णतःप्राप्तिः महानशब्दः मध्याव-

स्थायां प्रजासुखं—जर वृषभ राशींत चंद्र असेल तर स्थिर, स्त्रीस्वभावाचा शांत, कांतिरहित, दाक्षिण दिशेला सुखी, वातप्रकृति, पांढऱ्या रंगाच्या पदार्थांपासून प्राप्ति, शब्द मोठा व मध्यावस्थेत मुलांचें सुख याप्रमाणें स्थिति जाणावी—। यदा मिथुनराशिर्यस्य भवति तदा तस्य पश्चिमदिशायां सौख्य वाताधिक्यः हारितवर्णः पुरुषस्वभावः स्वकार्ये आलस्यवान् परकार्यकर्त्ता क्रूरस्वभावः मध्यावस्थायां पुत्रकलत्रादि सुखं महानशब्दः श्लथलांगः—जसें मिथुन राशीला चंद्र असेल तेव्हां पश्चिम दिशेला सुख, वाताधिक्य, हिरवट वर्ण, पुरुषस्वभाव, आपल्या कामांत आळशी. दुसऱ्यांचें कार्य करणारा, स्वभाव क्रूर, मध्यवयांत पुत्रस्त्रियादिकांचें सुख, शब्द मोठा, व शरीर ढिलें या प्रमाणें स्थिति असते—। यदा यस्य कर्कराशि भवति तदा बहुसंतानः कार्यारंभे अतिशीघ्रता स्त्रीस्वभवः श्वेतवस्तुतो प्राप्तिः हीनशब्दः मितभाषी सौम्यस्वभावः कफप्रकृतिः जलप्रियः उत्तर दिशायां सुखी शीथलांगी—कर्क राशीचा चंद्र असतां मुलें फुष्कळ, कार्यारंभीं अतिशय जलदी, स्त्रीस्वभावाचा पांढऱ्या वस्तूंवर प्रीति, शब्द हळू मोजकें भाषण, सौम्य स्वभाव, कफप्रकृतीचा, पाण्याचा शोकी, उत्तर दिशेला सुखी व ज्याचें शरीर ढिलें अशी स्थिति असते—। यदा सिंहराशि र्यस्य भवति तदा पुरुषस्वभावः स्थिरारंभः उष्णस्वभावः पीतवर्ण प्राप्तिः रुक्षकांतिः पित्तप्रकृतिः पूर्वदिशायां सुखी दृढांगः दीर्घ शब्दः अल्पस्त्रीसंगः अल्पप्रजः उग्रः धूम्रवर्णतो प्राप्तिः—सिंह राशीचा चंद्र असतां पुरुषस्वभावाचा, कार्यारंभीं स्थिर, स्वभाव कडक, कांति रूक्ष, पितप्रकृतीचा, पूर्व दिशेला सुखी, बळकट, शब्द मोठा, स्त्रीसंग अल्प, मुलें अल्प, उग्र व धूम्रवर्णाचे पदार्थ प्रिय अशी स्थिति असते.—। यदा कन्याराशि र्यस्य भवति तदा पांडुप्रकृतिः शीतलस्वभावः खंडितशब्दः रूक्षकांतिः अल्पसंगः अल्पप्रसवः सौम्यस्वभावः शीथलांगी—कन्येचा चंद्र असतां अशक्त, थंड स्वभावाचा, अडत बोलणारा, रूक्ष कांतीचा, स्त्रीसंग अल्प, मुलें अल्प, शांत व शरीर ढिलें अशी स्थिति असते—। यदा तुलाराशिर्यस्य भवति तदा तस्य पुरुषस्वभावः चंचलः नानाविधवर्णः उष्ण प्रकृतिः पश्चिम दिशायां सुखी स्वल्पप्रजास्वल्पस्त्रीसंगः वाताधिकः मितभाषी क्रूरस्वभाव; समांग;—तूळ राशींत चंद्र असतां पुरुषस्वभावाचा, चंचल, अनेक वर्णांचा, उष्ण

प्रकृतीचा, पश्चिम दिशेला सुखी, मुलें मध्यम व स्त्रीसंग मध्यम, वाताधिक्य, मोजकें बोलणारा, क्रूर स्वभावाचा व नीटनेटक्या शरीराचा होतो—। यदा वृश्चिकराशि र्यस्य भवति तदा तस्य स्थिरारंभः शुभ्रवर्णतो रुचिः स्त्रीस्वभावः उत्तरदिशायां सुखी मितभाषी कफप्रकृतिः जलप्रियः बहुसंततिः बहुस्त्रीसंगः सौम्यस्वभावः शीथलांगी—वृश्चिक राशींत चंद्र असतां आरंभीं स्थिर, शुभ्रवर्णाच्या पदार्थांवर भक्ति, स्त्रीस्वभावाचा. उत्तर दिशेला सुखी, मोजकें बोलणारा, कफ प्रकृतीचा पाण्याचा शोकी, संतति पुष्कळ, स्त्रीसंग विशेष, शांत व शरीर ढिलें असा होतो—। यस्य धनराशि भवति तस्य पुरुषस्वभावः स्वर्णकांतिः महान्शब्दः उष्णपित्तप्रकृतिः अल्प स्त्रीसंगः अल्पप्रसूतिः परोपकारी स्वकार्ये आलस्यवान् उष्णस्वभावः स्यात्—धनु राशींचा चंद्र असतां पुरुषस्वभावाचा, चांगल्या कांतीचा, मोठा शब्द, पित्त प्रकृतीचा स्त्रीसंग अल्प, मुलें अल्प, परोपकारी, स्वतःच्या कामांत आळशी व कडक स्वभावाचा होतो—। यस्य मकर राशिर्भवति सः शीघ्रकार्यकर्त्ता स्वल्पभाषी दक्षिणदिशायां सुखी स्त्रीस्वभावः पिंगलवर्णः कांतिरहितः सौम्यस्वभावः स्वल्पप्रजासंगश्च वातप्रकृतिः शीथलांगी—मकर राशीचा चंद्र असतां लवकर काम करणारा, थोडकें बोलणारा, दक्षिण दिशेला सुखी, स्त्रीस्वभावाचा, पिंगट वर्णाचा निस्तेज, शांत, मध्यम स्त्रीसंग व मध्यम संतति, वातप्रकृतीचा व ढिल्या शरीराचा होतो—। यस्य कुंभराशि भवति तस्य पुरुषस्वभावः मध्यम स्त्रीसंगः मध्यमप्रसवः स्थिरारंभः कर्बूरवर्णतो प्राप्तिः पित्तवातकफप्रकृतिः पश्चिमदिशायां सुखी उग्रस्वभावः शीथलांगी—कुंभ राशींत चंद्र असतां पुरुषस्वभावाचा, मध्यम स्त्रीसंग, मध्यम संतति. आरंभीं स्थिर, भुरकट रंगावर प्रीति, पित्तवातकफात्मक प्रकृति, पश्चिम दिशेला सुखी, स्वभाव उग्र व ढिल्या शरीराचा होतो—मीनराशिर्यस्य भवति तस्य स्त्रीस्वभावः कफप्रकृतिः जलप्रियः अल्पभाषी पिंगलवर्णप्राप्तिः कदा शीघ्रकार्यकर्त्ता कदा स्थिरारंभी अति स्त्रासंगप्रसवश्च सौम्य स्वभावः उत्तरदिशायां सुखी शीथलांगी—मीन राशीचा चंद्र असतां स्त्रीस्वभावाचा, कफात्मक प्रकृतिं, पाण्याचा शोकी, थोडकें बोलणारा, पिंगटवर्णावर प्रीति. केव्हां लवकर कार्य करणारा तर कधीं संथपणानें करणारा, स्त्रीसंग अति व संतति पुष्कळ, शांत, उत्तर दिशेला सुखी व ढिल्या शरीराचा होतो—इतिराशिस्वभावः ।

सत्वगुणप्रकृतीचें लक्षण—दयावान् सत्यवक्ता देवब्राह्मणेषु प्रीतिवान् परोपकारी तीर्थगमने मतिः सन्मार्गदानेन बहूयशस्वी बहुबुद्धिमान् योग-मार्गे व्रतेच प्रीतिवान् मतिवान् स्मृतिमान् अकलितमूर्तिर्भवति। या-प्रमाणें सत्वगुणाचे स्वाभाविक धर्म आहेत.

रजोगुण प्रकृतीचें लक्षण—शूरः अभिमानी उग्रमतिः यशस्वी मनस्वी न्यायप्रियः राजद्वारे मानवृद्धिः कामी वस्त्राभरणतांबूलादिषु रुचिः शस्त्रो-परकरादिषु प्रीतिवान् धनवान् स्वजनवल्लभी अतिभोगवान् बहुकल्पनाऽ-तिदानयुक्तः गंभीरः गानेषुरुचिः वार्तासुरसिकः। याप्रमाणें रजोगुणाचे स्वाभाविक धर्म आहेत.

तमोगुण प्रकृतीचें लक्षण—क्रोधी आलस्यवान् चौर्यप्रसंगी शठः अति-कलहप्रियः कुत्सितवाक् कृतघ्नी अतिनिद्रा नटविद्यायां कुत्सित; मंत्रयंत्रेषु तत्पर; छलभेदकर्त्ता शीर्षोपवादी निंदायुक्तः लुब्धधीः

कर्कधनसिंहवृश्चिक कन्यातुलाः एते षड्राशयः दीर्घराशयः भवंति

कर्क, धन, सिंह, वृश्चिक कन्या, तूळ हे सहा दीर्घ राशि आहेत.

मीनमेषवृषकुंभमिथुनमकराः एते षड्राशयः लघुराशयः भवंति

मीन, मेष, वृषभ, कुंभ, मिथुन, मकर हे सहा लघु राशि आहेत.

दीर्घराशौ दीर्घग्रहाः भौमगुरुशनैश्चराः युक्तदृष्टाः तत्रांगे दीर्घः वक्तव्यः—दीर्घ राशींत मंगळ, गुरु, शनि हे दीर्घ ग्रह असतील अगर दृष्टि करतील तर शरीर दीर्घ होतें.

यदा लघुसंज्ञराशौ रविचंद्रबुधशुक्राः युक्तदृष्टा भवंति लघुराशिर्यत्रांगे व्यवस्थिता तत्रांगे लघुस्यात्—जेव्हां लघुराशींत रवि, चंद्र, बुध, शुक्र हे असतील अगर दृष्टि करतील तेव्हां ते ज्या बाजूस असतील त्या बाजूचे शरीराचे भाग लघु होतात.

यदि यस्य जन्मकाले सूर्यो बलिष्ठो भवति लग्ने वा नवांशे लग्ने वा तत्पतौ यस्य भावे स्थितः तद्भावे युक्तदृष्टिकर्त्ता सूर्यस्तदातिक्तव-स्तुप्रियः—जन्मकाला लग्नीं किंवा नवमांश कुंडलीच्या लग्नीं अथवा लग्नस्वामी ज्या भावांत असेल त्या भावांत सूर्य बलवान् असेल अगर दृष्टि करीत असेल तर त्या मनुष्यास तिखट पदार्थ आवडतात.

एवं चंद्रो बलिष्ठो भवति तदा लवणक्षारान्नभोक्ता-जेव्हां चंद्र बलवान असेल तेव्हां खारट पदार्थ प्रिय असतात—। यदा एवं विधिना भौमो बलिष्ठो भवति तदा कटुकषायवस्तुप्रियः—मंगळ बलवान असतां कडू व तुरट पदार्थ प्रिय असतात—। बुधो बलिष्ठो भवति तदा मिश्ररसः प्रियः—बुध बलवान असतां मिश्र रस प्रिय असतात—। गुरुर्बलिष्ठो भवति तदा मधुररसप्रियः—गुरु बलवान असतां गोड पदार्थांवर भक्ति विशेष असते—। शुक्रो बलिष्ठो भवति तदाम्लादिरसप्रियः—शुक्र बल-वान असतां आंबट पदार्थ आवडतात.—। शनी बलिष्ठो भवति तदा कषायरसप्रियः—शनि बलवान असेल तर तुरट पदार्थ प्रिय असतात.।

प्रलंबबाहुवा समबाहु—हात लांब किंवा मध्यम—कोष्ठे उदरे वायु-त्वचायां—उदरांत वायु अथवा कातडी वातयुक्त—पित्तः—न तुंगः वा तुंगः—शरीर उंच अथवा ठेंगणें— गर्ववान व गर्वरहित;— गर्विष्ठ किंवा साधा—

यदि लग्ने सूर्ये चरराशौ व्यवस्थिते वा चंद्रलग्ने चरराशौ व्यव-स्थिते तदा इतस्ततः भ्रमणशीलः—जर लग्नीं चर राशीस सूर्य असेल किंवा चंद्र चर राशीस असेल तर प्रवासी होतो.—

यदा लग्ने सौम्यग्रहस्थिते तदा मुखे मिष्टभाषी—लग्नीं शुभ ग्रह असतां गोड बोलणारा होतो—। यदा पापग्रहस्थिते तदा कटु वचन भाषी—जेव्हां पाप ग्रह लग्नीं असेल तेव्हां कडू बोलणारा होतो—सौम्यग्रहे मनसि सरलता—शुभ ग्रह लग्नीं असतां मनांत सरळ बुद्धि असते.—। पापग्रहे कापट्यभावः—पाप ग्रह लग्नीं असतां मन कपटी होतें.—।

सर्वांगे तिलकमशकादि चिन्हानि लेखनीयं वा गडगुमडादि गुच्छं लेखनीयं-शरीराच्या कोणत्या भागावर तीळ, मसा किंवा इतर चिन्हें आहेत ते लिहावें—। यदा लग्नप्रथमद्रेष्काणे दशांशमध्ये स्यात् ग्रहोपि प्रथमद्रेष्काणे स्यात्तदाजन्मप्रभृति आगंतुकं चिन्हं लेखनीयं—जर लग्न व लग्नांतील ग्रह प्रथम द्रेष्काणभागीं असेल तर तें चिन्ह जन्मापासूनचें आहे असें लिहावें—। यदि प्रथमद्रेष्काणे लग्नं स्यात् द्वितीये तृतीये वा द्रेष्काणे ग्रहो भवति तस्य भेद्रेष्काणं कथित;—जर लग्न प्रथम द्रेष्काणांत असून ग्रह दुसऱ्या अथवा तिसऱ्या द्रेष्काणांत असेल तर त्याला भेदद्रेष्काण असें म्हणतात—। एवं

चेत्तदा तस्य ग्रहस्य दशांतर्दशोपदशायां तिलकमशकादि व्रणादि गुच्छं लेखनीयं--या प्रमाणें जेव्हां भेदद्रेष्काण असेल तेव्हां तीळ, मसा इत्यादि चिन्हें त्या ग्रहांच्या दशा, अंतर्दशा किंवा उपदशा या कालांत होतील असें लिहावें--।

यदा षष्ठाष्टमे पापग्रह; भवंति तस्यांगे उच्चात्पनादि लेखनीयं--जर ६ व्या व आठव्या स्थानांत पाप ग्रह असतील तर त्याला उंचावरून पडण्याचें भय आहे असें लिहावें--

यदि नवपंचमे सौम्यग्रहाव्यवस्थिता तदा शास्त्रज्ञः राजकलासु दक्षः वार्तासुरसिकः धर्मप्रियः कार्यसमये अवसरज्ञः उदारचेता प्रपंचे रतः सद्योद्यमी वाचालः अल्पनिद्रा गीतगाने हास्यः कथासुदक्षता-- जर नवमांत व पंचमांत शुभ ग्रह असतील तर शास्त्रज्ञ वगैरे होतो--यदि नवपंचमे पापग्रहा व्यवस्थिताः तदा हठी स्वेच्छाचारी क्वचित् दुग्धवत्तप्यते आलस्यवान् अतिनिद्रा पूर्वोक्तगुणेनरहितः--जर नवमांत व पंचमांत पाप ग्रह असतील तर हट्टी, स्वच्छंदी वगैरे गुणांनीं युक्त होतो--।

यदि सूर्यभौमौ बलिष्ठौ भवतः तदा पूर्ववये सुखी--जर रवि व मंगळ हे बलवान् असतील तर पूर्व वयांत सुखी होतो--। गुरुशुक्रौ बलिष्ठौ भवतः तदा मध्यवये सुखी--गुरु व शुक्र हे बलवान् असतील तर मध्यवयांत सुखी होतो--। यदा शनिचंद्रौ बलिष्ठौ भवतः तदांत्यवये सुखी--शनि व चंद्र हे बलवान् असतील तर अंत्य वयांत सुखी होतो--। यदा निर्बलौ भवतः तदा आद्यमध्यांत्यवये दुःखी--जर ते निर्बली असतील तर सर्व आयुष्य दुःखमय होईल--।

प्रथमादिद्वादशभावांत्येषु यत्स्थाने पापालये पापग्रहदृष्टे तन्मासे वा तद्वर्षे तस्य शरीरे ग्रहप्रकृतिवशात् ज्वरयमनादि श्लेष्मशूलचातुर्थकांतरादि तस्यांगे पीडा लेखनीया--प्रथम भावापासून ज्या भावांत पाप ग्रहाचा राशि असून त्यावर पाप ग्रहाची दृष्टि असेल तितक्या महिन्यांनीं अथवा वर्षांनीं ग्रहमानाप्रमाणें ज्वरादि पीडा लिहावी--। एवं सौम्यालये सौम्य ग्रहदृष्टे तदा तन्मासे वर्षे वा अतिसुखं लेखनीयं--शुभ ग्रहाचा राशि असून त्यावर शुभ ग्रहाची दृष्टि असेल तर तितक्या महिन्यांनीं किंवा वर्षांनीं अतिशय सुख मिळेल असें लिहावें.--। मिश्रे मिश्रग्रहे मिश्रग्रहदृष्टे तदा तन्मासे वा तद्वर्षे मिश्रफलं लेखनीयं--। मिश्रस्थिति असतां मिश्रफल लिहावें--। वा पापालये पापग्रहदृष्टे तस्य ग्रहस्य दशां-

तर्दशोपदशायां तद्वर्षमध्ये ग्रहप्रकृतिवशात्कष्टं लेखनीयं--किंवा दशांतर्दशाकालीं त्या ग्रहाचे कष्ट लिहावे.

षष्ठे वा व्ययेऽष्टमे पापग्रहव्यवस्थिते तदा ज्वरदमनादि व्यथा

सहाव्या, आठव्या किंवा बाराव्या स्थानांत पाप ग्रह असतां ताप, ओकारी इ० व्यथा लिहावी.--। वाऽन्यस्थाने पापग्रहव्यवस्थिते तस्य दशांतरोपदशायां तस्य भावस्य हानिर्लेखनीया--अन्य स्थानीं पाप ग्रह असतां त्याच्या दशेंत त्या भावसंबंधी हानि लिहावी--। सौम्ये केंद्रत्रिकोणे प्राप्ते बलिष्ठे तस्य दशांतर्दशोपदशायां तद्वर्षमध्ये तस्य शरीरे सुखं लेखनीयं--केंद्रां किंवा त्रिकोणांत शुभ ग्रह बलवान् असेल तर त्याच्या दशेंत त्याच्या शरीरास सुख लिहावें.--। एवं तनुभावविचारः संपूर्णः।

या प्रमाणें या ग्रंथांत तनुभावाचें वर्णन लिहिण्याची पद्धति दिलेली आहे व बहुतेक ज्योतिषी याच पद्धतीनें भाववर्णन देत असतात. या वर्णनांत पुढील गोष्टी मुख्यत्वें सांगितल्या आहेत—**१ वर्ण २ शरीरप्रकृति ३ स्वभाव ४ बांधा ५ आवडते रस ६ शरीरावरील चिन्हें ७ गुण ८ शारीरसुख.** आतां या गोष्टी वर्णन करण्याच्या ज्या पद्धति आहेत त्यांबद्दल निःपक्षपातीत्वानें विचार करणें जरूर आहे.

शरीराचा वर्ण सांगण्याच्या दोन पद्धति दिल्या आहेत. एक पद्धति अशी आहे कीं लग्नांतील राशि व ग्रह व त्यांवर शुभाशुभ ग्रहांची दृष्टि या तीन गोष्टी विचारांत घेऊन वर्ण सांगावा. राशि व ग्रह यांचे स्वाभाविक वर्ण कोणते ते जातक ग्रंथांत सांगितलेले आहेत त्यांवरून वरील तीन गोष्टींचा विचार करून वर्ण सांगावा. दुसरी पद्धति अशी आहे कीं, चंद्र हा नवमांश कुंडलींत ज्या राशींत असेल त्या राशीच्या स्वामीचा जो वर्ण तोच त्या मनुष्याचा सांगावयाचा. या दोन पद्धतींत खरी कोणती हें अनुभवानें कळणारें आहे. नवमांश कुंडलीवरूनच बहुतेक ज्योतिषी वर्ण सांगतात व तो जर चंद्रावरून जुळत नाहीं

असें दिसलें तर नवमांश कुंडलींतील लग्नावरून सांगतात किंवा तें न जमेल तर नवमांशलग्नीं जो ग्रह असेल त्यावरून सांगतात अगर तेंही न जुळेल तर जन्मलग्नाचा जो स्वामी असेल तो ज्या नवमांशीं असेल त्यावरून सांगतात. इतक्या भयंकर कैचींतून कोणाचाही वर्ण सुटेल अशी आशा करणें व्यर्थ आहे! आमचें असें ह्मणणें आहे कीं जें काय सांगणें असेल तें एकाच नियमानें सांगा. नवमांश कुंडलीवरून जर शरीराचा वर्ण बिनचूक (शें. ६० प्रमाणें तरी) कळत असेल तर तो कोणत्या रीतीनें कळतो हें कायम केलें पाहिजे. यावरून नाहींतर त्यावरून आणि त्यावरून नाहीं तर आणखी तिसऱ्यावरून कसें तरी जुळवून देणें हें खऱ्या ज्योतिष्याचें लक्षण नव्हे. जर कुंडलीवरून शरीराचा वर्ण कळणें शक्य नसेल तर तो देण्याची तसदीच न घेणें बरें नव्हे काय! तात्पर्य ज्योतिष ग्रंथांत वर्ण सांगण्याचा निश्चयात्मक एकच मार्ग सांगितलेला नाहीं व जे अनेक मार्ग सांगितले आहेत त्यांपैकीं कोणत्या वेळीं कोणत्या मार्गानें उत्तर द्यावें हेंही सांगितलेलें नाहीं. ह्मणून या बाबतींत शोधकांनीं विचार करणें अगत्याचें आहे. ग्रंथांत तत्वें मात्र आहेत. अमुक राशीचा नैसर्गिक वर्ण अमुक व अमुक ग्रहाचा नैसर्गिक वर्ण अमुक हें तत्व ग्रंथांत आहे आणि सूक्ष्म विचारांतीं तें बरोबरही आहे. राशींचे वर्ण आकाशांत ग्रहांच्या वर्णासारखे प्रत्यक्ष दृष्टीला दिसणारे नाहींत. कारण राशि हें एका कल्पित वर्तुळाच्या बाराव्या भागाला नांव आहे. अर्थात् ते दृश्यमान् पदार्थ नाहींत त्यामुळें अमुक राशीचा वर्ण अमुक हें ठरविण्यास व खात्री पटावण्यास प्रत्यक्ष साधन नाहीं. ग्रहांचे वर्णांची नुसत्या डोळ्यांनीं किंवा दुर्बिणीच्या साह्यानें प्रत्यक्ष पाहून खात्री करून घेतां येते तशी खात्री राशींच्या वर्णाची करून देतां येत नाहीं. बरें राशींच्या नांवानुरूप त्यांचे वर्ण आहेत असें ह्मणावें तर ते तसेही नाहींत. यावरून ते जातकांत अनुभव घेऊनच ठरविलेले असले

पाहिजेत असें वाटतें. याप्रमाणें राशींचे वर्ण अनुभवीक असून ग्रहांचे प्रत्यक्ष दृष्टिगोचर असल्यामुळें या दोहोंवर आपला विश्वास असला पाहिजे. तात्पर्य, वर्णसंबंधीं तत्वें बरोबर आहेत यांत शंका नाहीं. पण तीं मनुष्याचा वर्ण सांगण्याच्या कामीं कशीं उपयोगांत आणावीं हा महत्वाचा प्रश्न आहे. पुस्तकी ज्ञानानें हा प्रश्न सुटणारा नाहीं. अनुभव घेतला पाहिजे व अनुभवानेंच एखादी पद्धति कायम केली पाहिजे. आह्मांस असें वाटतें कीं नवमांश कुंडलीचा वर्ण ठरविण्याच्या कामीं तादृश उपयोग होणार नाहीं, व राशीच्या वर्णाचाही विशेष उपयोग होणार नाहीं. प्रत्येक राशीचा प्रत्येक अंश किंवा प्रत्येक पांच पांच अंशाचा एकेक विभाग अथवा निदान नक्षत्रभाग तरी कोणत्या वर्णाचा असतो हें ठरविलें पाहिजे. मेष राशीचा वर्ण तांबुस खरा, पण त्याचा कोणताही भाग त्याच वर्णाचा आहे असें अनुभवावरून दिसून येत नाहीं. २। नक्षत्रांचा राशि व एका नक्षत्राचे चरण चार ह्मणून राशीचा नवमांश ह्मणजे नक्षत्राचा चरण झाला. धूर्त ज्योतिष्यांनीं राशींवरून वर्णानें जुळत नाहींत असें पाहून तीं नक्षत्राच्या चरणांवर बसविल्यानें सूक्ष्मता प्राप्त होऊन जुळतील ह्मणून नवमांश चक्राची योजना केलेली दिसते. पण ती गृहीत तत्वानुसारी आहे ह्मणून भरंशाची नाहीं. योजना अनुभवाची पाहिजे. यासाठीं अशी योजना जोंपर्यंत झाली नाहीं तोंपर्यंत शरीराचा वर्ण सदा सर्वकाळ सर्वत्र बरोबर सांगतां येईल असें वाटत नाहीं. शिवाय ग्रहांचे वर्णही राशिपरत्वें भिन्न भिन्न झालेले आढळतात. लग्नीं शुक्र असला ह्मणजे गोरा किंवा शनि असला ह्मणजे काळा असेलच असा नियम नाहीं. कित्येक ज्योतिषी वर्ण जुळत नाहीं सबब लग्नच चुकीचें आहे असें भलतेंच विधान ठोकून देतात! हें त्यांचें अज्ञान आहे, लग्न, लग्नांतील ग्रह व चंद्र यांच्या उदित

अंशानुरोधानें शरीराचा वर्ण सांगतां येणें शक्य आहे. पण आज मितीस तें साधन उपलब्ध नाहीं ह्मणून शरीराचा वर्ण कोणासही बिनचूक सांगतां येणार नाहीं. ज्योतिष्यानें पत्रिकेंत वर्ण लिहावा पण ग्राहकानें तो जुळत नाहीं सबब कुंडलीच चूक आहे किंवा ज्योतिष्यासच कांहीं समजत नाहीं असें समजूं नये ह्मणजे झालें. ज्योतिष्यानें आपला अनुभव वाढविण्यासाठीं वर्ण सांगावयाचा तो नेहमीं एकाच पद्धतीनें सांगावा व शेंकडा ६० ठिकाणीं तरी जर त्या पद्धतीचा अनुभव जुळेल तरच ती पद्धति खरी आहे असें त्यानें ठरवावें. आह्मीं **वर्णबोध** ह्मणून वर्ण ओळखण्याच्या माहितीच पुस्तक लिहिलें आहे. त्या पद्धतीनें बऱ्याच ठिकाणीं अनुभव येतो असें आढळून आलें आहे. तथापि ती पद्धति सुद्धां अद्यापि आमच्याच मतानें अपुरी आहे. ती जेव्हां राशिभागावर सूक्ष्म होईल तेव्हां तिला पूर्णता प्राप्त झाली असें ह्मणतां येईल. ती पद्धति अशी.—

राशींचे वर्ण

मेष—रक्त	वृषभ—श्वेत	मिथुन—पोपटी	कर्क—प्याजी
सिंह—बदामी	कन्या—चित्रित	तूळ—कृष्ण	वृश्चिक—सोनेरी.
धनु—पिंगट	मकर—करडा	कुंभ—मुंगुसवर्ण	मीन—मत्स्यवर्ण.

ग्रहांचे वर्ण.

सूर्य—ताम्र	चंद्र—श्वेत	मंगळ—रक्त	बुध—हिरवट
गुरु—पीत	शुक्र—चित्रित		शनि—कृष्ण.

याप्रमाणें राशि व ग्रह यांचे नैसर्गिक वर्ण आहेत. लग्नांतील राशि व ग्रह आणि चंद्र व त्याशीं युत असणारे ग्रह यांच्या अनुरोधानें वरील तत्वें विचारांत घेऊन वर्ण सांगितल्यास बराच जुळतो असा अनुभव आहे. वर्णबोध या पुस्तकांत हा प्रश्न कसा सोडवावा

तें उदाहरणासह लिहिलेलें असून अभ्यासाकारितां ८८ उदाहरणें दिलीं आहेत. तरी पण हे वर्ण राशींवरून नक्षत्रांवर आणल्याशिवाय व अपवादांचें ज्ञान झाल्याशिवाय बिनचूक वर्ण सांगतां येईल अशी आशा नाहीं. आह्मीं आपल्या अल्प बुद्धीनें नक्षत्रांचे वर्ण बसविले आहेत त्यांचा अनुभव कसा काय येतो त्याचा वाचकांनीं विचार करावा. नक्षत्रें सायन घ्यावीं.

नक्षत्रांचे वर्ण

अश्विनी—काळा	भरणी—गोरा	कृत्तिका—तांबुस
रोहिणी—गोरा	मृग—मध्यम	आर्द्रा—गोरा
पुनर्वसु—काळा	पुष्य—मध्यम	आश्लेषा—काळा
मघा—काळा	पूर्वा—गोरा	उत्तरा—मध्यम
हस्त—मध्यम	चित्रा—गोरा	स्वाती—गोरा
विशाखा—काळा	अनुराधा—गोरा	ज्येष्ठा—मध्यम
मूळ—मध्यम	पूर्वाषाढा—मध्यम	उत्तराषाढा—पिंगट
श्रवण—गोरा	धनिष्ठा—मध्यम	शततारका—काळा
पूर्वाभाद्रपदा—मध्यम	उत्तराभाद्रपदा—मध्यम.	रेवती—मध्यम

याप्रमाणें हे नक्षत्रांचे वर्ण आहेत. उदित लग्नाचे व लग्नांतील ग्रहाचे अंश व चंद्राचे आणि चंद्राशीं युत असणाऱ्या ग्रहाचे अंश कोणत्या नक्षत्राचे आहेत तें पाहून वर्ण ठरवावा. अशा पद्धतीनें सांगितला जाणारा वर्ण बहुत अंशी जुळावा असें अनुमान आहे. अपवादांचें ज्ञान अद्यापि झालेलें नाहीं. याप्रमाणें वर्ण लिहिण्याची पद्धति असावी असें आमचें मत आहे.

शरीरप्रकृती सांगण्याचे दोन प्रकार आहेत. पहिला असा आहे कीं, लग्नस्वामी व नवमांचा स्वामी यांमध्यें जो बलवान् असून

लग्नात असेल अगर लग्नाला पाहत असेल त्या ग्रहाप्रमाणें शरीर-प्रकृति सांगावयाची. दोन्ही ग्रह जर सारखेच बलवान् असतील तर त्यांवरून न सांगतां जो ग्रह बलवान् असून केंद्रीं अगर त्रिकोणांत असेल व लग्नास पाहत असेल त्याप्रमाणें शरीरप्रकृति सांगावी. दुसरा प्रकार असा आहे कीं चंद्र ज्या राशींत असेल त्या राशीच्या धर्माप्रमाणें शरीर प्रकृति सांगावी. बृहज्जातकांत चंद्रराशींचीं वर्णनें दिलीं आहेत तीं या कामीं ज्योतिष्यांस फार उपयोगी पडतात. शिवाय प्रत्येक राशीचे जे स्वाभाविक धर्म आहेत तेही ज्योतिषी लिहून काढतात. त्यांच्यामतें हे धर्म लिहून काढले कीं शरीरप्रकृतीचें वर्णन झालें. पण हा निवळ लटपटाध्याय आहे. जातकशास्त्रांत अत्यंत विकट असा हाच एक भाग आहे. याचा सामुद्रिकाशीं मुख्यत्वें संबंध आहे. कुंडली वरून एखाद्याच्या शरीरप्रकृतीचें वर्णन करावयाचें म्हणजे सामुद्रिक लक्षणें पूर्णपणें ओळखणें आहे. या विषयांत आतां पर्यंत बाबाजीराव हे एकच पटाईत होऊन गेले. सामुद्रिक लक्षणांवरून कुंडली मांडतां येते असें त्यांनीं टिळक, दीक्षित वगैरे अनेक विद्वानांस सिद्ध करून दाखविलें आहे. हे त्यांचे ज्योतिषीगणावर मोठे उपकार झालेले आहेत. त्यामुळें आतां ग्रहांचा मनुष्यांवर परिणाम होतो किंवा नाहीं यावद्दल संशय राहिलेला नाहीं. बाबाजी. रावांनीं या विद्येवर ग्रंथ केला नाहीं किंवा ती विद्या कोणास शिकविलीही नाहीं हें देशाचें दुर्भाग्य होय. भौतिक शास्त्रांत निमग्न होऊन ज्योतिष म्हणजे सब झूट असें मानणाऱ्या लोकांचें या विद्येकडे लक्ष वेधण्यास त्यांचा ग्रंथ फार उपयोगी पडला असता. असो शरीरप्रकृति कुंडलीवरून समजली पाहिजे हें वरील वर्णनावरून सिद्ध आहे. शरीराची रचना, कोणते अवयव लहान अगर मोठे, शरीराचें सामर्थ्य, जन्मतः असलेले व पुढें होणारे रोग, अपघात व

दुखापती आणि व्यंग इतकें वर्णन शरीरवर्णनांत येणें जरूर आहे. हें वर्णन, कसें करावें या बद्दल एका विस्तृत अशा सामुद्रिक ग्रंथाची आवश्यकता आहे. असा ग्रंथ होईपर्यंत हें वर्णन करतां येणें शक्य नाहीं. राशी व ग्रह यांच्या सामान्य तत्वांनीं काम भागणार नाहीं. पुष्कळ लोक कुंडली दाखवून हा मनुष्य कसा असावा म्हणून प्रश्न विचारतात व त्यास ज्योतिषीही उत्तर देतोच. जणूं काय प्रत्येक ज्योतिष्यास सामुद्रिकाचें ज्ञान आहे व तें सर्व ग्रंथांत सांगितलेलें आहे! पण हा समज चुकीचा आहे. ग्रहाच्या अगर राशीच्या वर्णनाचा एखादा ग्रंथांतील श्लोक देऊन कधींही भागणार नाहीं. ज्योतिष्यानें अनुभव घेऊन जर लक्षणें बसविलीं असतील तरच त्याला किंमत आहे. सामान्य मनुष्यास संस्कृत समजत नसल्यामुळें ज्योतिष्याची या संबंधाची लटपटपंजरी झांकून जाते. परंतु तेंच वर्णन जर तो चालू भाषेंत करील तर प्रत्येकाला खऱ्या खोट्याचा निर्णय करितां येईल. तात्पर्य, शारीरवर्णन अनुभवानें किंवा निदान कल्पनेनें तरी पत्रिकेंत लिहिलेलें असलें पाहिजे. तसें लिहितां येत नसेल तर हें वर्णन देऊंच नये हा उत्तम पक्ष. सुलभजातक भाग १ व कुंडलीविज्ञान यांत या वर्णनाबद्दल लिहिलेलें आहे तें प्रत्येकानें वाचण्यासारखें आहे. त्याच्या साह्यानें ज्योतिष्यास थोडीबहुत लक्षणें समजण्यासारखीं आहेत. वा विषयाचा आणखी बारकाईनें विचार चालू आहे. कुंडलीवरून लक्षणें समजल्याशिवाय लक्षणांवरून कुंडली मांडतां येणें शक्य नाहीं.

तनुभावांवरून शरीर व मन यांसंबंधाचें सर्व प्रकारचें वर्णन करितां आलें पाहिजे. शरीरावरील चिन्हें द्रेष्काण कुंडलीच्या साह्यानें जाणावीं असें जातक ग्रंथांत सांगितलेलें आहे व त्याप्रमाणेंच ज्यो-

तिषी पत्रिकेंत वर्णन देत असतात. तीळ, मसा, गुच्छ अगर डाग हीं अमुक कारणानें होतात, व अमुक कारण असतां अमुक प्रकारचें चिन्ह होतें या विषयीं ग्रंथांत कांहीं सांगितलेलें नाहीं. ज्योतिष्यानें हें ज्ञान स्वतः संपादन करावयास पाहिजे आहे. द्रेष्काण कुंडलीवरून कांहीं समजत नाहीं. पत्रिकेंतल्या इतर निरर्थक भागाप्रमाणेंच हाही एक भाग आहे. जन्मपत्रिकानिबंधांत एक या संबंधाचें चक्र आहे तें अनुभव घेण्यासाठीं येथें देतों.

कालांगविभाग

	१	१२	
	मस्तक	दोन्हीपाय.	
३	२	११	१०
उर	मुख	दोन्हीजंघा	दोन्ही गुढगे
४	५	८	९
हृदय	उदर	गुह्येंद्रिय	मांड्या
	६	७	
	कटी	बस्ती	

या चक्राचा अर्थ असा आहे कीं मेष राशि व कुंडलींतलें पहिलें स्थान यांचा संबंध मस्तकाशीं आहे; मीन राशि व १२ वें स्थान यांचा संबंध दोन्ही पायांशीं आहे; मिथुन राशि व तिसरें स्थान यांचा संबंध उराशीं आहे; याप्रमाणें राशि व स्थानें यांचा त्या त्या अवयवांशीं संबंध आहे. पाप ग्रह जखम किंवा व्रण (वण) करितात व शुभ ग्रह तीळमासादि चिन्हें करितात. हीं सामान्य तत्वें विचारांत घेऊन शरीरावरील चिन्हें ओळखण्याचा एक प्रकार आहे. या प्रकारांत बरेंच तथ्य आहे असें दिसून येतें. परंतु तो इतका अपुरा आहे कीं त्यावरून पुष्कळ वेळां कांहीं बोध होत नाहीं.

प्रथमद्रेष्काण.

	१	१२	
	मस्तक	दृष्टि	
३	२	११	१०
कान	दृष्टि	कान	नाक
४	५	८	९
नाक	गाल	हनु	गाल
	६	७	
	हनु	मुख	

द्वितीयद्रेष्काण.

	१	१२	
	कंठ	खांदा	
३	२	११	१०
बाहु	खांदा	बाहु	पाठ
४	५	८	९
पाठ	हृदय	उर	हृदय
	६	७	
	उदर	नाभी	

तृतीय द्रेष्काण

	१	१२	
	ओर्ट,पोट	गुह्येंद्रिय	
३	२	११	१०
वृषण	गुह्येंद्रिय	वृषण	मांडी
४	५	८	९
मांडी	गुढगा	पोटरी	गुढगा
	६	७	
	पोटरी	पावलें	

एखादा ग्रह प्रथम द्रेष्काणांत मेष राशीचा असला तर तो मस्तकाला चिन्ह करितो मीन राशीचा असला तर डोळ्यास चिन्ह करितो या प्रमाणें या तीन चक्रांचा उपयोग करावयाचा असतो.

हीं चिन्हें जन्मतः आहेत कीं पुढें होणारीं आहेत हेंही ओळखण्याची ज्योतिषांची एक रीत आहे. ती अशी कीं जर लग्न व ग्रह एकाच द्रेष्काणाच्या भागांत असतील तर जन्मतःच चिन्ह सांगावें व भिन्न भागीं असतील तर त्या ग्रहाच्या महादशेंत किंवा अंतर्दशेंत किंवा उपदशेंत चिन्हाची उत्पत्ति होईल असें सांगावें!

वरील माहिती केवळ अनुभव घेण्यासाठीं दिली आहे. जर या पद्धतीनें चिन्हांचें ज्ञान होऊं लागलें तर सामुद्रिक लक्षणाचा एक तुकडा आपल्या हतांतच आला असें समजलें पाहिजे! पण निरर्थक खटाटोप आहे असें मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें!

तनुभावावर मनाचाही विचार होतो. लग्नांत जो ग्रह उदित असेल त्याच्याच अनुरोधानें मन असतें असा सामान्य नियम आहे. लग्नातील राशि व ग्रह आणि चंद्र यांच्याच अनुरोधानें मुख्यत्वें मन असतें. तथापि सूक्ष्म विचार करितांना इतर ग्रहही विचारांत घेतले पाहिजेत. सत्वादि गुण, मनाची स्वाभाविक प्रवृत्ति, चालचालणूक वगैर गोष्टी तनुभाव व चंद्र यांच्या अनुरोधानें बऱ्याच चांगल्या सांगतां येणें शक्य आहेत. निवळ एकाच गुणाचीं माणसें बहुधा मिळणारच नाहींत. आईबाप एकाच गुणाचीं असतील तर मूलही त्याच एका शुद्ध गुणाचें उपजेल. सर्व माणसें मिश्र गुणांचींच आहेत. तरीपण तिखट, मीठ, चिंच वगैरे पदार्थ मिसळून केलेलें एखादें पक्वान्न तिखटच विशेष लागतें किंवा खारटच लागतें त्याच प्रमाणें प्रत्येक मनुष्यांत कोणत्या तरी एका गुणाचें प्राबल्य असतेंच व तेंच ज्योतिष्यानें सांगावयाचें आहे. गुणाची परीक्षा होईल तर

स्वभावाचीही आपोआपच होईल. कारण गुणानुरूपच स्वभाव असतो प्रत्येक गुणाचा मनुष्य कोणत्या स्वभावाचा असतो हें आरंभीं सांगितलेंच आहे. त्यावरून स्वभावाचें वर्णन करावें

तनुभावावरून पहावयाच्या इतक्याच गोष्टी आहेत. या सर्व गोष्टींचें ज्योतिष्यानें आपल्या अनुभवाप्रमाणें व तर्कशक्तीप्रमाणें पत्रिकेंत वर्णन द्यावें. हें वर्णन चुकण्याचा संभव पुष्कळ आहे म्हणून तेवढ्यावरून लग्नच चुकीचें किंवा शास्त्रच खोटें असें कोणीही समजतां कामा नये. वर्णन देतांना ज्योतिष्यानें आपली बुद्धि खर्च केली पाहिजे. नमुन्याबरहुकूम काम केल्यानें सुटका होणार नाहीं. बुद्धि चालत नसेल तर वर्णन देऊंच नये हा उत्तम पक्ष होय. शिवाय जितकें समजेल तितकेंच लिहावें. सर्व लिहिल्यानें पत्रिकेची वाढवी होईल खरी पण त्याबरोबरच ज्योतिष्याची किंमत होऊन शास्त्राविषयीं शंका उत्पन्न होईल. सर्वच लिहिण्याची इच्छा असल्यास "मीं हें केवळ कौतुकासाठीं लिहित आहें" असा आरंभींच शेरा द्यावा म्हणजे बेभरंसा उत्पन्न होणार नाहीं. लपंडाव नसावा. थोडकेंच लिहावें, पण त्यांत कांहीं तरी डोकें खर्च केलेलें असावें. उदार, धैर्यवान्, मानी वगैरे विशेषणें देतांना फार सावधगिरी ठेवावी. प्रत्येक मनुष्य उदार आहे व कृपणही आहे. पत्रिकेंत उदार असें लिहिल्यानें जन्मणारास भ्रमानें तें खरेंच वाटतें व ज्योतिषी मोठा विद्वान् आहे असा भ्रम उत्पन्न होतो. उदार माणसें जगांत फार थोडकीं आहेत हें लक्षांत ध्यावें. या सर्व गोष्टी जर ज्योतिषी विचारांत घेईल तर त्याला तनुभावाचें वर्णन १०।५ ओळींतच आटोपावें लागेल असें खात्रीनें वाटतें.

शारीररचना व शारीरसामर्थ्य यांचा विचारही मुख्यत्वें याच भावाचा विषय आहे. तरी केवळ तनुभुवनावरच या गोष्टी अवलंबून नाहींत असें अनुभवानें दिसून आलें आहे. लग्न अमुक राशीचें असलें,

लग्नावर, लग्नांतील ग्रहांवर अमुक ग्रहांची दृष्टि असली, लग्नस्वामी अमुक स्थानांत –अमुक ग्रहानें युक्त व दृष्ट असला ह्मणजे शारीरचना अमुक प्रकारची असेल व शारीरसामर्थ्य अमुक प्रकारचें असेल असें ठरविणें चुकीचें आहे. बाराही राशि व नऊ ग्रह यांच्या स्थितीवर या गोष्टी अवलंबून आहेत असें सूक्ष्म दृष्टीनें दिसून येतें. सिंह, धनु या राशींतील ग्रह शरीर काटक, कणखर पीळदार व धिप्पाड करितात. विशेषें करून रवि, मंगळ व गुरु हे या राशींत असतां शरीर वरील प्रकारचें असतें. दांत मजबूत असणें, छाती रुंद व भरदार असणें, बळाचा गर्व असणें, मर्दुमकीचे खेळ खेळणें हे सिंह राशीचे स्वभावधर्म आहेत. सिंह राशींतला प्रत्येक ग्रह निरनिराळे धर्म उत्पन्न करील. त्याचप्रमाणें त्या राशीच्या निरनिराळ्या अंशांत प्रत्येक ग्रहाचे निरनिराळे गुण दृष्टीस पडतील. सिंह हा राशि नांवाप्रमाणेंच जोरदार आहे. सूक्ष्म निरीक्षण करणाऱ्या मनुष्यास या सर्व गोष्टी दिसून आल्याशिवाय राहणार नाहींत. धनु हा राशि युद्धदर्शक आहे. बलवान् योद्धयाला अनुरूप असे गुण याच राशींत आहेत. शिवाजी महाराजांचा गुरु याच राशीच्या आरंभींच होता! टिळकांचा रवि सिंह राशीच्या आरंभींच आहे! सिंह राशींत रवि व धनु राशींत गुरु असतां त्या मनुष्याच्या शारीरसामर्थ्याचें काय वर्णन करावें? हे राशि कुंडलींत कोठेंही असले तरी शारीरसामर्थ्यांत फरक पडणार नाहीं, तथापि लग्नीं असतील तर विशेष शोभायमान शरीर होईल. मंगळ सिंह राशीपेक्षां धनु राशींत विशेष प्रबल असतो. धनु राशींतला गुरु ज्या प्रमाणें शिपाईगिरी व मुत्सद्देगिरी हे दोन्ही गुण उत्पन्न करितो तसा मंगळ फक्त शिपाईगिरीच उत्पन्न करू शकतो हा या उभयतांत फरक आहे. वृश्चिक व मीन हे राशि शरीर ठेंगणें करितात. या राशींत लग्न व चंद्र असतां चांगला अनुभव येतो. मीन राशि शरीराचे

कित्येक अवयव फार लहान करितो. वृश्चिक राशि शरीर केव्हां केव्हां ओबडधोबड करितो. वांकडेपणा या राशीवर अवलंबून आहे. ज्या वेळीं एखाद्याचें शरीर वेडें वांकडें असेल त्यावेळीं हा राशि पाहण्यासारखा आहे. मीन राशींत कोणताच ग्रह वाईट नाहीं. वृश्चिक राशींत शनि चांगला नाहीं. मिथुन व तूळ हे राशि शरीर उंच व सडपातळ करितात. शरीराचे कित्येक अवयव लांबट करितात. डोकें, चेहरा, हात, पाय यांच्या लांबटपणांचा संबंध याच दोन राशींशीं आहे. बुटोळेपणा, दांत, पावलें, बोटें हे अवयव मोठाले, चाल किंचित् वांकडी इत्यादि लक्षणें कर्क राशीचीं आहेत. हा राशि स्वभावतः निष्काळजी, चैनी, व्यसनी, बातेल, भटकणारा व दुराचारी आहे. तरी त्या राशींत गुरु असतां मात्र उलट अनुभव मिळेल. या राशींत गुरुचंद्रयोग असतां शरीर नीटस होईल व मनुष्य सद्गुणी निपजेल. वृषभ राशी शरीर गोंडस करितो. मेष हा दुबळा, एकलकोंड्या, डुम्या, अजागळ, प्रवासी असा आहे. परंतु या राशींत मंगळ, रवि, गुरु, शुक्र व बुध हे असतां अगदीं उलट अनुभव येईल. तथापि वरील गुणांचीं कांहींशी झांक मारीलच. शारीरसामर्थ्य साधारणच असतें. शरीररचना सडपातळ. वृषभ राशि स्वभावतः शरीर गोंडस करितो. मकर लठ्ठ व बोजड शरीर बनवितो. कुंभ राशि शरीर नाजूक बनवितो. प्रत्येक राशीच्या प्रत्येक भागांत प्रत्येक ग्रह निरनिराळ्या प्रकारचें शरीर बनवितो. हा विषय इतका मोठा आहे कीं त्यावर मोठासा ग्रंथच होऊं शकेल. असा ग्रंथ निर्माण झाल्याशिवाय शारीरज्ञान होणें शक्य नाहीं. केवळ शारीरज्ञानासाठींच मनुष्यास कित्येक वर्षें परिश्रम घ्यावे लागतील. असा प्रयत्न राजाश्रयावांचून होणें शक्य नाहीं. आजपर्यंत असा ग्रंथ झालेला नाहीं, ह्मणून शारीररचना व शारीरसामर्थ्य यांचें बिनचूक वर्णन कोणासही करितां येणार नाहीं.

स्थूल अनुमान मात्र होईल. सुलभजातक भाग १ ला यांत व कुंडलीविज्ञानांत या विषयावर आमचे विचार प्रगट झालेले आहेत, त्यांवरून दिशा कळेल. लग्न व चंद्र यांचा शरीराशीं विशेष संबंध आहे असें शोधकास दिसून येईल तरी केवळ या दोहोंवरच शारीररचना अवलंबून नाहीं. हें त्यानें ध्यानांत ध्यावें. नवमांश कुंडलीवरून कांहीं सुद्धां समजणार नाहीं.

शारीरसौंदर्य, व्यंग व कायमची व्यथा या गोष्टी सुद्धां तनुभावाचेच विषय आहेत. वातापित्तकफ या त्रयींतून कोणत्या दोषाचें प्राबल्य शरीरावर विशेष आहे हेंही कुंडलीवरून थोडेंबहुत समजलें पाहिजे. तनुभावाच्या वर्णनांत या गोष्टी प्रधान आहेत. शुक्र, गुरु, बुध, चंद्र, मंगळ, रवि, शनि, राहु हे ग्रह एकापेक्षां दुसरा कमी अशा परंपरेनें शारीरसौंदर्य देतात. शारीरसौंदर्य विशेषें करून लग्न व चंद्र यांवरच अवलंबून आहे व्यंग आणि कायमची व्यथा हे जरी तनुभावाचे विषय असले तरी ते सर्व भावांवर अवलंबून आहेत. रोग आणि अपघात हेही विषय याच भावाचे आहेत. अपघात हा लग्न, चंद्र व त्यांचीं चतुर्थदशम स्थानें यांवर अवलंबून आहे. सर्वसाधारण समजून अशी आहे कीं रोगाचा विचार षष्ठस्थानावर होतो. परंतु अनुभवानें तसें दिसत नाहीं. पोटदुखी चतुर्थ स्थानावर पहावी लागते, मुखरोग व शिरोरोग लग्नावर पाहावे लागतात, नेत्र रोग दुसऱ्या व बाराव्या स्थानावर आणि कर्णरोग तृतीय स्थानावर पहावे लागतात. तात्पर्य रोगाचा विचार करितां सर्व भाव विचारांत घ्यावे लागतात. असो. तनुभावाचें वर्णन करितांना कोणत्या गोष्टींचें कशारीतीनें विवेचन झालें पाहिजे हें येथपर्यंत लिहिलेल्या विचारावरून कळून येईल. तथापि स्मरणार्थ पुनः तनुभावाचे कोणते विषय आहेत ते क्रमवार सांगतों.—

ग्रहांचें स्थानगत सामान्य फल.

हा विषय अत्यंत महत्वाचा आहे, तो ज्याला चांगला समजला, तो कुंडलीवरून जन्मणाराचें अगदीं बरोबर असें वर्णन करील. जातक ग्रंथांत पाहिल्यास प्रथम प्रत्येक ग्रहाचें भाववर्णन असावयाचें नंतर राशिवर्णन असावयाचें व नंतर भावस्वामीवर्णन असावयाचें. हीं तीन प्रकारचीं वर्णनें पृथक् पृथक् असल्यामुळें त्यांवरून निश्चयात्मक फल कोणतें हें समजत नाहीं. पत्रिका करणारे जोशी हीं वर्णनें ग्रंथा बरहुकूम पत्रिकेंत पृथक् पृथकच देत असतात! निश्चयात्मक फल ज्यावरून सांगतां येईल असा ग्रंथ झाला नाहीं, त्यामुळें जातकाची शाखा आजमितीस अपुरीच आहे हें उघड आहे. या शाखेची पूर्णता करणें सोपें काम नाहीं. ज्योतिषी कितीही ज्ञानी असला तरी त्याला हें काम शेवटास नेण्यास किती जन्म ध्यावे लागतील कळत नाहीं! एखादा ग्रह अमुक स्थानांत, अमुक राशीच्या अमुक अंशांत, अमुक अंशांतल्या एक अथवा अनेक ग्रहांनीं युक्त अथवा दृष्ट असतां अमुक फल देतो असें जेव्हां त्याचें वर्णन करितां येईल तेव्हांच जातकाची ही शाखा पूर्ण झाली असें म्हणतां येईल. आपणांस जर हा प्रयत्न करावयाचा असेल तर कुंडलीसंग्रह करून भागणार नाहीं. कुंडलीसंग्रह ही या मार्गाची प्रथम पायरी आहे. कुंडलीविज्ञानांत हा प्रयत्न होतच आहे. पण आम्हांस आतां हिच्या वरच्या पायरीवर चढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हा प्रयत्न जितका जारीनें करितां येईल तितकें या शाखेस नियमित स्वरूप लवकर येईल. हा अक्रोडाचा वृक्ष आहे. याची फळें आपणांस चाखावयास मिळतीलच असें समजूं नये. पण हा प्रयत्न

केलाच पाहिजे. आह्मीं या प्रयत्नास प्रथम आरंभ करणार तो असा कीं, कुंडलींत जेव्हां जेव्हां एखाद्या ग्रहाची नक्की स्थिति आढळेल तेव्हां तेव्हां ती टिपून तें टांचण जशाचें तसेंच छापावयाचें, त्यांत अनुक्रम असावयाचा नाहीं. अनुक्रमाचें काम शेवटलें आहे तें पुढें कोणी तरी करील. दुसरें असें कीं, हें काम आह्मांस प्रत्येक अंकांत देतां येणार नाहीं. निदान ४ पृष्ठांचा मजकूर जेव्हां तयार होईल तेव्हांच हा विषय एखाद्या अंकांत देतां येईल. याकरितां आह्मांस शोधक वाचकांच्या प्रयत्नाचेंही साह्य घेणें जरूर आहे. हें साह्य मात्र कितीही अल्प असलें तरी तें अंकांत छापून प्रसिद्ध करण्यास हरकत नाहीं, ह्मणून शोधकांनीं ही माहिती वरचेवर पाठविण्याची कृपा करावी.

यदा लग्नस्थानं गतवति रवौ यस्य जनने
तपेत्कान्तावर्गान्निजसहजवर्गादपि मनः ॥
वपुःकष्टं पित्तानिलरुधिररोगेण परमं
विदेशव्यापारादव्रजति धनमल्पत्वमितः ॥ १ ॥

कुंडलींत जर लग्नीं रवि असेल तर त्या मनुष्याचें मन स्त्रीवर्गा. कडून व बांधवांकडून संतप्त होतें, ह्मणजे त्यांच्या पासून निरंतर मनाला ताप भोगावा लागतो. स्वतःच्या शरीराला पित्त, वात व रक्त यांच्या दोषानें फार त्रास होतो. याप्रमाणें रवीचें ग्रंथकारानें वर्णन केलें. पण याचा अनुभव सर्वत्र येतो काय? एकटाच रवि जरी लग्नीं असला तरी सुद्धां त्याचा अनुभव मिळत नाहीं. रवीचे धर्म निरनिराळ्या राशिभागांत निरनिराळे आढळतात, हे धर्म कोणते यांचें आपणास टिपण केलें पाहिजे. हाच रवि एक अथवा अनेक ग्रहांनीं युक्त असतां त्याचीं फलें निरनिराळीं प्राप्त होतात. हीं फलें अनुभवानें कळण्यासारखीं आहेत, ह्मणून तो अनुभव मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

पाठावलि.

ग्रहांचें स्थानगत फल.

लग्नस्थितो दिनकरः कुरुतेंगपीडां पृथ्वीसुतो वितनुते रुधिरप्रकोपं ॥
छायासुतः प्रकुरुते बहुदुःखभाजं जीवेदुभार्गवबुधाः सुखकांतिदाःस्युः॥१

या श्लोकांत लग्नीं प्रत्येक ग्रह काय फल देतो हें अगदीं थोडक्यांत सांगितलें आहे. रवि–अंगपीडा. मंगळ–रक्तविकार. शनि अनेक प्रकारचीं दुःखें. गुरु, चंद्र, शुक्र व बुध–सुख व कांति. साधारणतः हीं फलें खरीं आहेत. परंतु ते वास्तविक राशि, योग व दृष्टि यांना अनुसरून फलें देतात, ह्मणून वरील श्लोकांतलीं फलें तात्विक आहेत. असें समजावें. त्याचप्रमाणें पुढील श्लोकांतील फलेंही अगदीं तात्विक आहेत. या शास्त्राचा अभ्यास करणारांना आरंभीं इतकी माहिती पुरे आहे, ह्मणून नवीन अभ्यास करणारांनीं हे श्लोक पाठ करावे. कुंडली सांगतां येण्यास पाठावलीचा फार उपयोग आहे. ह्मणून जातकग्रंथांतून निवडक श्लोक पुढें देण्याचें ठरविलें आहे

दुःखावहाधनविनाशकराः प्रदिष्टा वित्तस्थिता रविशनैश्चरभूमिपुत्रः ॥
चंद्रोबुधः सुरगुरु भृगुनंदनोवा नानाविधं धनचयं कुरुते नराणां ॥२

कुंडलींतल्या दुसऱ्या स्थानांत रवि, शनि आणि मंगळ हे दुःखदायक व धनाचा नाश करणारे आहेत. चंद्र, बुध, गुरु व शुक्र हे अनेक प्रकारें धनाचा संचय करितात.

भानुः करोति विरुजं रजनीकरोपि कीर्त्यायुतं क्षितिसुतः प्रचुरप्रकोपं ॥
ऋद्धिं बुधः सुविषणं सुविनीतवेषं स्त्रीणां प्रियं गुरुकवीरविजस्तृतीये॥३

कुंडलींतल्या तिसऱ्या स्थानांत ह्मणजे सहजस्थानांत रवि निरोगी करितो, चंद्र कीर्ति देतो, मंगळ अतिशय राग उत्पन्न करितो. बुध संपत्ति देतो. व गुरु शुक्र आणि शनि हे चांगली बुद्धि, चांगला वेष व स्त्रियांचें प्रेम हे गुण उत्पन्न करितात.

आदित्यभौमशनयः सुखवर्जितांगं कुर्वंति जन्मनिनरं सुचिरं चतुर्थे ॥
सोमो बुधः सुरगुरुर्भृगुनंदनो वा सौख्यान्वितंच नृपकर्मरतप्रधानं॥४

कुंडलींतल्या चवथ्या स्थानांत रवि, मंगळ व शनि हे शरीरास दुःख देतात. चंद्र, बुध, गुरु व शुक्र हे सुखी करितात व तो मनुष्य सरकारी नोकरींत गढून जातो.

पुत्रे रविः प्रचुरकोपयुतं बुधश्च स्वल्पात्मजं शनिधरातनुजौ वपुत्रं ॥
शुक्रेंदुदेवगुरवः सुतधामसंस्थाः कुर्वंति पुत्रबहुल सुखिनं सुरूपं ॥५

कुंडलींतल्या पांचव्या स्थानांत ह्मणजे सुत स्थानांत रवि असतां मनुष्य अतिशय रागीट होतो, बुध थोडकी संतति देतो. शनि व मंगळ हे निपुत्रिक करितात आणि शुक्र, गुरु व चंद्र हे पुष्कळ संतति देतात व सुखी आणि स्वरूपवान् करितात.

मार्तंडभूमितनुजौ हतशत्रुपक्षं पंगुर्नरं रिपुगृहेष्वति पूजनीयं ॥
काव्येंदुजौ मतिविहीनमनल्परोगं जीवः करोति विपुले मरणंशशांकं॥६

कुंडलींतल्या सहाव्या स्थानांत ह्मणजे रिपुस्थानांत रवि किंवा मंगळ असतां शत्रूचा पराजय होतो, शनि असतां अल्प बुद्धीचा व किंचित् रोगट प्रकृतीचा होतो. गुरु व चंद्र हे अल्पायु करितात.

तिग्मांशुभौमरविजः किलसप्तमस्था जायां कुकर्मनिरतां ननु संततिंच ॥
जीवेंदुभार्गवबुधः बहुपुत्रयुक्तां रूपान्वितां जनमनोहररूपशीलां ॥७

कुंडलींतल्या सातव्या स्थानांत ह्मणजे जायास्थानांत रवि, मंगळ

आणि शनि हे असतां मनुष्याची स्त्री आणि मुलें दुराचरणी असतात. गुरु, चंद्र, शुक्र व बुध हे असतां त्याच्या स्त्रीला अनेक पुत्र होतात व ती अतिशय सुंदर अशी असते.

सर्वे ग्रहा दिनकरप्रमुखानितांत मृत्युस्थिता वितनुते कलिदुष्टबुद्धिम्॥
शस्त्राभिघात परिपीडितगात्रयष्टिं सौख्यैर्विहीनमतिरोगगणैरुपेतं ॥८

सर्व ग्रह हे मृत्युस्थानांत ह्मणजे कुंडलींतल्या आठव्या घरांत चांगले नाहींत. कलह, दुष्टबुद्धि, शस्त्रपीडा, निरंतर दुःख व अतिशय रोग हे या ग्रहांचे परिणाम आहेत.

धर्मस्थिता रविशनैश्चरभूमिपुत्राः कुर्वंति धर्मरहितं विमतिं कुशीलं ॥
चंद्रो बुधो भृगुसुतः सुरराजमंत्री धर्मक्रियासु निरतं कुरुते मनुष्यं॥९

कुंडलींतल्या नवव्या स्थानांत ह्मणजे धर्मस्थानांत रवि, शनि व मंगळ हे असतां मनुष्य विधर्मी, दुर्बुद्धीचा व वाईट शीलाचा चंद्र, बुध, शुक्र व गुरु हे असतां मनुष्य धार्मिक कृत्यें करण्यांत गुंतलेला असतो.

आदित्यभौमशनयः किलकर्मसंस्थाः कुर्युर्नरं बहुकुकर्मरतं कुपुत्रं ॥
चंद्रः सुकीर्तिसुशना बहुवित्तयुक्तं रूपान्वित बुधगुरुः शुभकर्मभाजम१०

कुंडलींतल्या दहाव्या स्थानांत ह्मणजे कर्म स्थानांत रवि, मंगळ व शनि हे असतां मनुष्य वाईट आचरण करितो व त्याला वाईट पुत्र होतात. चंद्र कीर्तिमान्, शुक्र धनवान्, व रूपवान आणि बुध, गुरु हे सदाचरणी असा मनुष्य उत्पन्न करितात.

लाभस्थितो दिनकरोनृपलाभयुक्तं तारापतिर्बहुधनं क्षितिजःक्षितीशं॥
सौम्यो विवेकशुभगंच धनायुषीज्यः शुक्रःकरोति सुगुणं रविजःसुकीर्तिम्

कुंडलींतल्या ११ व्या स्थानांत ह्मणजे लाभस्थानांत रवि असतां राजापासून लाभ होतो, चंद्र असतां पुष्कळ धन मिळतें व

मंगळ असतां राजा होतो. बुध बुद्धि, धन व आयुष्य देतो. गुरु व शुक्र हे गुणसंपन्न करितात व शनि सत्कीर्ति देतो.

सूर्यः करोति पुरुषं व्ययगो विशीलं कोणे शशीक्षितिसुतो बहुपापभाजं॥
चंद्रांगजो गजधनं धिषणंकुशांगं शुक्रो बहुव्ययकरं रविजःसुतीव्रम् १२

कुंडलींतल्या बाराव्या स्थानांत ह्मणजे व्यय स्थानांत सूर्य असतां मनुष्य खर्चीक होतो. चंद्र, मंगळ व शनि असतां अनेक पापें करितो. बुध हा गजांत लक्ष्मी व बुद्धि देतो, शुक्र हा अतिशय खर्च करितो व शनि स्वभाव अतिशय कडक करितो.

जन्मस्थे राहु दुःखं धनभुवनगतो वित्तनाशं करोति ॥
दुश्चिक्ते भूपपूज्यो सुहृदिन विनयभ्रातृमित्रादि हानिः ॥
पुत्रभ्रंशो सुतस्थे रिपुभवनगते शत्रुसंतापहानिः ॥
जायस्थे स्त्रीविनाशो विधनभवनगे स्वच्छया भूपभूज्यः ॥ १३
धर्मस्थे धर्मनाशं दशमभवनगे पापबुद्धिर्ददाति ॥
लाभस्थाने विलासः भवति सुकविता वा सुलक्ष्म्यादि भोगं ॥
रूपत्वं द्वादशस्थो सुखपतिनितरां चक्षुरोगं प्रसूते ॥
भावानां द्वादशानां फलमिहगदितं सिंहिकेयस्य नूनं ॥ १४

या दोन श्लोकांत राहूचें फल सांगितलें आहे. लग्नीं--दुःख. धनांत -धननाश. तृतीयांत--राजपूज्य. चतुर्थांत्-उद्धट व भाऊ, मित्र इ०चा नाश. पंचमांत--पुत्रनाश. सहाव्यांत--शत्रूचा नाश सप्तमांत--पापबुद्धि--स्त्रीचा नाश. अष्टमांत--राजपूज्य. नवमांत--अधर्म. दहाव्यांत--पापबुद्धि. लाभांत--विलास, संपत्तीचा भोग व काव्य. बाराव्यांत--नेत्ररोग.

र. नं. बी. ४५५

कुंडलीविज्ञान.

दशाहिक

कालात्मा दिनकृन्मनस्तु हिमगुःसत्वं कुजोशोबचो
जीवो शनसुखं सितश्च मदनो दुःखं दिनेशात्मजः॥
राजानौ रविशीतगू क्षितिसुतो नेता कुमारो बुधः॥
सूरिर्वानवपूजितश्च सचिवौप्रेष्यःसहस्रांशुजः॥१

(बृ० जा०)

पुस्तक२रें.] ता. २१ अक्टोबर. [अंक१८
व १ नवंबर. सन १९०९

विषयानुक्रम

१ जन्मपत्रिका. २ ज्योतिर्वैद्यक. ३ पत्रव्यवहार
४ जैमिनीय सूत्र. पृ. ४९-५६ ५ सूचना. ६ जगदुत्त
(टायटलपेज.)

संपादक—विष्णु गोपाळ नवाथे.
पो० महाड, जि० कुलाबा.

हें पुस्तक गणेश गोपाळ नवाथे यांनी आपल्या "चंद्रकिरण" प्रेस मध्यें छापून महाड येथें नव्या पेठेतील जुन्या पोष्टाच्या घरांत "कुंडलीविज्ञान" ऑफिस मध्यें संपादकाकरितां प्रसिद्ध केलें.

वार्षिक वर्गणी ट. खं. सह २।१०
फुटकळ अंकास. १॥ आणा.

सूचना.—या खेपेस ता. २१ अकटंबर व ता. १ नवंबर या दोन तारखांचा अंक पाठविला आहे. अंक पाठविण्यास अपरिहार्य अडचणीमुळें उशीर झाला आहे. पुढील खेपेस ता. ११व ता. २१ नवंबरचा व ता० १ डिसेंबरचा असे तीन अंक ता० १ डिसेंबरला पाठविण्याची तजवीज होईल. पुढील सर्व अंकांत जैमिनीय सूत्राचें भाषांतर पूर्ण होणार आहे.

—संपादक—

जगद्वृत्त

—यूरोपियन ज्योतिषी प्रसिद्ध झडकील साहेब असें भविष्य करितात कीं, नाताळांत शनि मंगळ युति आहे त्यामुळें धर्मयुद्ध जुंपेल व बाबचे अत्याचार होतील.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम् ।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥

'भवभूति'

पुस्तक ९ वें.] आश्विन व० ४ सोमवार [अंक १८ वा

जन्मपत्रिका.

जन्म ता. २५ मार्च्य १८८७
शुक्रवार सकाळीं १० वा. ३३ मि.



सायन सगतिक स्पष्ट ग्रह

र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	हर्शल	नेप.	सहु
मेष	मेष	मेष	मीन	वृश्चिक	वृषभ	कर्क	तूळ	वृषभ	सिंह
४	१०	११	२८	४	०	१५	१०	२५	२६
१५	२३	१४	२८	१२	५२	३८	४३	४२	९
५९	७१६	४६	५९ व.	६ व.	७३	१	३	०	३ व.

या पुढें होरानवमांशादि कुंडल्या मांडावयाच्या.

रवि—सिंहासनांशीं. चंद्र—पारिजातांशीं. गुरू—पारिजातांशीं शुक्र—गोपुरांशीं. लग्न—पारिजातांशीं.

या पुढें महादशा, अंतर्दशा व उपदशा देऊन त्यांचीं फलें द्यावयाचीं.

द्वादशभाववर्णन

१ तनुभाव

१ तनुभावः—या भावारंभीं मिथुन राशि १९ अं. उदित असून तो मीन नवमांशीं आहे. लग्न स्वामी बुध हा दशमांत मीन राशींत वक्री असून तोही मीन नवमांशींच आहे. लग्नांत किंवा लग्नासमोर ग्रह नसून बुध कोणत्याहि ग्रहानें युक्त नाहीं. या वरून मीन राशीच्या धर्मा प्रमाणें शरीर ठेंगणें, अवयव सूक्ष्म व वर्ण साधारण गोरा आहे. या नवमांशाचें ग्रंथोक्त फल ॥ मध्वी क्षणः प्रलापी व्यस्त ललाटः समस्सुतनुः ॥ कितवश्चलश्च रुधिरोष्टरदः षष्ठेतु सत्वयुतः ॥ या प्रमाणें आहे. चंद्र हा मेष राशींत १० अं. २३ कला अश्विनींत असून तो मंगळाशीं युति करीत आहे त्या मुळें प्रकृति

उष्ण, मंगळाच्या दोषानें प्रकृतिला विकार, वर्णांत किंचित् तांबूस पणा, तेजस्वी, चलचित्त, प्रवास व स्थलांतरें विशेष. चालण्याच्या कामांत पटाईत, निष्ठावान्, श्रम करणारा, इ. गुण उत्पन्न होतात. मंगळाच्या दोषानें शरिराला नित्य पीडा, मंगळाला आवडणारे अर्थात तिखट पदार्थ प्रिय, मंगळासारखा नटणारा स्वभाव. चंद्र हा मंगळाशीं युति करीत असून हर्शल चंद्रावर पूर्ण पाहतो. त्यामुळें बालपणीं अपस्मारासारखे झटके, व पुढेंही अति विचाराच्या समयीं मूर्छेसारखी स्थिति. गळवें, ताप, जळवात, मूळव्याध आम्लपित्त, जखम होणें, पडणें, भाजणें, शस्त्र पीडा हे मंगळाचे दोष आहेत. यामुळें शरीर नेहमीं सडपातळ अवस्थेतच राहील. आंगीं वक्तृत्व असलें तरी मेष राशीचा स्वभाव असा आहे कीं, त्याला एकांत आवडेल. भाषण प्रसंग शिवाय न होणें अर्थात फार कमी. शरीरावर मंगळाचा परिणाम फार होत असल्यामुळें त्याच्याच दोषानें अखेरीस मृत्यु. याप्रमाणें तनुभावाचें वर्णन आहे.

२ धनभावः—या भावावर मुख्यत्वें संपत्तीचा सांठा, व संपत्तीचें संरक्षण, विद्या, वक्तृत्व, वाणी, नेत्र, भक्ष्य, कुटुंबसंबंधीं सुख व स्त्रीचा मृत्यु या गोष्टींचा विचार होतो. या भावारंभीं कर्क राशि १९ अं. उदित असून, भावारंभाबरोबरच शनि हा पापग्रह दुर्बलावस्थेंत उदित आहे. या ग्रहाची मध्यम गति २ क. असून येथें तो १ कलात्मक गतींत आहे. अर्थात तो अशक्त स्थितींत आहे. हा ग्रह वर्गोत्तमांशींही नाहीं. ह्मणून द्वितीयभावसंबंधीं फल कनिष्ट. व दुःखदर्शक दिसत आहे. वाणीमध्यें दोष, नेत्रांचें पाणी व शक्ति कमी, पुष्कळ वेळां असे प्रसंग यावयाचे कीं, त्या वेळीं कदान्न खाण्यास मिळावें अगर उपवास घडावा. शनिचा धर्म मधुर व उंची पक्वान्नें मिळण्याचा नसून तो मंगळाच्या नवमांशीं असल्यामुळें मंग-

ळाच्या धर्मानुरुप पदार्थावरच रुचि असावयाची. संपत्तीचा सांठा कमी असणार. प्राप्तीच्या मानानें उपस्थित प्रसंगानें संपत्तीचा लय हा शनीचा धर्म आहे. संपत्ति मिळविण्याचे जितके प्रयत्न होतील, तितके सांठा करण्याचे होणार नाहींत. किंबहुना तिकडे दुर्लक्ष असेल. संपत्ति पुष्कळ मिळेल तरच बचाव व्हावा. नाहींतर कर्जानें जीव बेजार व्हावा असा शनीचा स्वभाविक धर्म आहे. ठक आणि चोर हे संपत्तीचे लुटारु होण्याचा संभव आहे. वडिलार्जित संपत्तिचे संरक्षण फार साधधगिरीनें केलें पाहीजे. द्वितीय स्थान हें भांडागार आहे. त्या ठीकाणीं शनि हा लुटारु व गडप करणारा पापग्रह आहे. असें समजून तिजोरीच्या किल्या कोणाच्याही हातीं देतां कामा नये. चाकर माणसें, स्त्री अगर कुटुंबांतील माणसें संपत्तीचा अपहार करूं शकतील. अगर तशा वासनेनें प्रयत्न करितील. होरा कुंडलींत सर्व ग्रह लग्न व धन स्थानीं असून धन स्थानीं ग्रह जास्त आहेत. हा धनयोग चांगला आहे असें होरा कुंडलीवरून स्पष्ट दिसत आहे. धनाधिपति चंद्र असून तो स्वनवमांशीं व पारिजातांशीं आहे. व लाभेश जो मंगळ त्याच्या युतींत आहे. भाग्येश धन स्थानीं, पंचमेश लाभ स्थानीं, स्वगृहीं असून तो धनेशाच्या द्वितीय स्थानीं आहे. हे सर्व धनयोग चांगले आहेत. संपत्तीची प्राप्ती मोठी आहे. असें स्पष्ट दर्शवित आहेत. मोठ्या पगाराचे नोकर अगर मोठ्या उत्पन्नाचे श्रीमंत यांस जशी प्राप्ति असते. तशी होईल. कुटुंबांत सुख कमी मिळेल. व कुटुंबही फार लहान असेल. वक्तृत्व असेल पण हिंदुस्थानांत ज्याना आपण वक्ते ह्मणतों तसा लौकिक असणें शक्य नाहीं. या प्रमाणें द्वितीय भाव संबंधीं फलाचा विचार होतो.

३ तृतीयभावः—भावंडें, पराक्रम, शौर्य, धैर्य, कर्ण या गोष्टींचा विचार मुख्यत्वें या भावावर होतो. या स्थानांत सिंह राशि उदित

आहे. हा स्वभावतः सिंहा सारखाच आहे. अर्थात शौर्यादि गुण संभवतात. या स्थानांत राहू आहे. ॥ तृतीयस्थे सूर्य पुत्रे सिंहिका तनयेथवा । भ्रातृजन्यंसुखंनास्ति दृष्टिभिर्वा विलोकिते ॥१॥ भावंडांपासून सुख होण्याला राहु हा तृतीय स्थानीं चांगला नाहीं. भावामध्यें विशेष प्रकारचें प्रेम, ऐक्य, एकमेकांची एकमेकांस मदत या गोष्टी येथें दिसत नाहींत. सहोदर भावंडें फार कमी दिसतात. वडील व पाठीवरचें भावंड नसेल. या पेक्षां भावंड संबंधें जास्त कळण्यासारखें नाहीं. महत्वकांक्षा व कर्तृत्व विशेष आहे. छाती भरदार असेल कर्ण रोगाचा संभव नाहीं. या भावाचा अधिपति रवि हा उच्च असून सिंहासनांशीं आहे त्याचें फल ग्रंथकार असें देतात.

॥ शौर्याधिपे तुंगयुते बलाढ्ये केंद्र त्रिकोणे यदि सौम्यदृष्टे मूल त्रिकोणे स्वगृहेष्ट गेहे वैशेषिकांशे पुरुष सधीरः ॥१॥ सिंहासनांशें यदि विक्रमेशे पारावते गोपुर भौमयुक्ते । मृद्वंशके वा शुभदृष्टियोगे मनोत्सवो युद्ध विशारदःस्यात् ॥ २ ॥ याप्रमाणें तृतीय भावाचा विचार झाला.

४ सुहृद्भावः—या भावावर माता, मित्र, दायाद, गृह, क्षेत्र, वाहनें या गोष्टींचा मुख्यत्वें विचार होतो. या भावाच्या अंतीं हर्शल हा ग्रह आहे. भावारंभीं कन्येचे ९ अंश उदित आहेत. या भावावर गुरूची दृष्टि नाहीं. शनि पूर्ण दृष्टीनें पाहत आहे. भावाचा अधिपति बुध आपल्या नीचांत आहे. चंद्राच्या चतुर्थ स्थानीं कर्क राशीचा शनि आहे. हा योग माते संबंधाच्या सुखास कमीपणा आणणारा आहे. बालपणीं स्वतः व माता फार आजारी असा हा योग आहे. याच योगावर सापत्नमाता योगही संभवतो. लग्न व चतुर्थ यांचा अधिपति एकच बुध हा ग्रह असल्यामुळें मातेशीं ऐक्य दिसत आहे. पूर्व इष्टेट व संपत्ति पूर्णपणें हातांत येणें संभवनीय नाहीं. स्वतःला

वाहनांचा शोक मुळींच दिसत नाहीं. इतकेंच नाहीं तर शोक केल्यास खरोखरच शोक उत्पन्न होण्याचा संभव आहे. मोठाल्या इमारती किंवा मोठी इष्टेट संपादन होईल असा स्पष्ट योग चतुर्थ भावावरून दिसत नाहीं. जिवलग व ज्यांच्या पासून साह्य मिळेल असे मित्र क्वचित दिसतात. या पेक्षां या स्थानापासून जास्त बोध होऊं शकत नाहीं. चतुर्थेश, अस्तंगत, नीच व वक्री असून चतुर्थ स्थानीं ग्रह नाहीं व चंद्राचे चतुर्थ स्थानही बलवान् नाहीं. अशा स्थितींत या भावासंबंधीं फलाचें काय वर्णन करावें.

५ सुतभावः—या भावावर संतति, गर्भ, उपासना, विद्या, बुद्धि या गोष्टींचा विचार होतो. या भावारंभीं तूळ हा शास्त्रीय राशि उदित आहे. लग्नीं मिथुन हा शास्त्रीय राशि व नवम भावारंभीं कुंभ हा शास्त्रीय राशि उदित आहे. याप्रमाणें सर्व शास्त्रीय राशि कुंडलींत त्रिकोणस्थ आहेत. व यांपैकीं तूळ या शास्त्रीय राशींत हर्शल हा ग्रह आहे. त्यामुळें शास्त्रीय गोष्टींत बुद्धि उत्तम चालेल. व चांगली विद्वत्ता प्राप्त होईल. हर्शलामुळें बुद्धिचा प्रभाव विलक्षण तीक्ष्ण असेल. अद्भुत किंवा ज्याना अतींद्रिय ज्ञानाच्या विद्या ह्मणतात अशा विद्या प्राप्त होतील. अनेक विद्यांचा व्यासंग होईल, पण खरें खरें मन अद्भुत विद्यांच्याच ठिकाणीं आसक्त होईल. पंचमांत गुरु, द्वितीय स्थानांत शनि, बुधाच्या राशीचें लग्न व बुध हा गुरुच्या राशीस व गुरुच्याच नवमांशीं हा कायद्याच्या विद्येचा योग झालेला आहे. पंचमांतील गुरु संस्कृत व वाङ्मयात्मक विद्या दर्शवितो. वेदांत, ग्रंथकर्तृत्व यांचाही या गुरूपासून बोध होतो. शुक्र हा ललित कलांचा दर्शक आहे. व येथें पंचमेश असून एकादश स्थानीं स्वगृहीं आहे. ह्मणून गायन वादनादि कलांचाही शोक असला पाहिजे. गुरु व शुक्र हे एकमेकांस पहात आहेत त्यांचे ग्रंथोक्त फलः—(१) मंगळाच्या गृहीं शुक्राची दृष्टि असतां ॥गृहशयनवसन गन्धैर्माल्यालङ्कार युवतिभिर्विभवैः ॥ समुचितमतीव भीरू कुरुते शुक्रेक्षितो जीवाः ॥ १ (२) स्वगृहीं शुक्र असतां त्यावरील गुरूच्या दृष्टीचें फलः—। प्रमदा पुत्र गृहाणां भागिनमथ यान वाहनानांच ॥ स्वर्क्षेगुरुसन्दृष्टःकुरुते भृगुरिष्टचेष्टानां ॥२॥ वृश्चिक राशीच्या गुरूचें स्वभावतः फलः—व्याध्यार्तश्रमबहुलः प्रसक्त दोषो गुरौ भवत्या लिनि ॥ दंभेन धर्मविरतो जुगुप्सिताचार निरतश्च ॥ कर्क राशीच्या शनीचें स्वाभाविक फलः—सुभगान्वितो दरिद्रो बाल्ये रोगाति पीडितःप्राज्ञः ॥ जननि रहितोऽति मृदुर्विशिष्ठ निरतःसदातुरश्चापि ॥ परबाधको विशिष्टो बन्धु विरुद्धो विलोमशीलश्च मध्ये भूपति तुल्यः परिभोग विवर्षितः शशिभे ॥ पंचमस्थान हें उपासनेचें स्थान आहे. या स्थानांत गुरु आहे. नवम स्थानीं ग्रह नाहीं. नवमेश शनि शत्रुगृहीं आहे. दशम ह्मणजे कर्म स्थानचा अधिपति गुरु हा पंचमांत आहे. व कर्मेश व भाग्येश यांत नवपंचम योग साधारणतः झालेला आहे. यावरून आचार, उपासना, धर्मपालन यांचा विचार केल्यास कोणताही बरा अगर वाईट योग पूर्णपणें झालेला नाहीं. यामुळें असें वाटतें कीं, या मार्गांत जरी अश्रद्धा नाहीं तरी श्रद्धेच्या मानानें क्रिया नाहींच असे स्पष्ट दिसतें. क्रिया वारंवार पाळटेल. धर्मपालन लौकिक असेल, उपासना कमीच. सारांश अध्यात्मिक लाभ होणें शक्य नाहीं. भावारंभी तूळ हा पुरुष राशि उदित आहे. हा राशि संतति मध्यम प्रसवणारा आहे. या भावांत वृश्चिक राशींत गुरु वक्री आहे. हा गुरु कन्या संततीला जेवढा अनुकूल आहे तितका पुत्र संततीला नाहीं. तथापि पुत्र प्राप्ति होईल कारण एकादश स्थानीं स्वगृहीं शुक्र असून तो गुरुवर पाहत आहे. संतति निरोगी, सद्गुणी व अल्प वयांत होईल. संतति ८ होईल असें मानिल्यास सुमारें २ अगर ३ पुत्र व बाकी कन्या. सर्वच संतति

जगेल अशी खात्री नाहीं. कारण मंगळ हा एकादश भावारंभींच आहे. या पेक्षां जास्त विचार करण्यास स्त्रीची कुंडली पाहिजे. कारण गर्भ स्थान स्त्रीलाच असतें. संततीची संख्या वगैरेचा बोध माझ्या मतें स्त्रीच्याच कुंडलीवरून चांगला होतो. सन १९१० पुत्र प्राप्ति होण्याचा योग दिसत आहे. याप्रमाणें पंचम स्थानाचा विचार होतो.

६ रिपुभावः—अरिभवना दरिचोरक्षतविघ्नक्लेश नाभ्युदरदेशान्॥ मधुरादि षड्रुपदंशान् ग्रह राश्युदितान्वदेत्प्राज्ञः । षष्ठभावारंभीं वृश्चिक राशि १६ अं. उदित असल्यामुळें तो वृश्चिक नवमांशींच आहे. हा राशि स्वभावतः गुप्त रोग उत्पन्न करितो. षष्ठस्थानीं ग्रह नाहीं, व त्या स्थानावर कोणी ग्रहही पाहत नाहीं. त्या मुळें गुप्त रोगाचें भय नाहीं. या भावाचा अधिपति मंगळ असून एकादश स्थानीं चंद्राशीं युति करितो, ह्मणून कोणत्या तरी मंगळाच्या दोषानें शरीरावर कायमचा डाग अथवा निशाणी असली पाहिजे. जखम होऊन भाजून अगर विस्फोटकानें ही निशाणी झाली पाहिजे. आतां ती शरीराच्या कोणत्याभागीं आहे. हें सांगणें कठीण आहे. मंगळ एकादशस्थानीं व मेष राशींत असल्यामुळें मस्तकावर, अगर दोन्ही भागावर संभवनीय आहे. त्रिंशांश कुंडलींत तो धनु राशींत शनि चंद्रासह आहे. या राशीचें स्वामीत्व मांड्यावर आहे ह्मणून कदाचित् एथेंच असण्याचा संभव आहे. कोठेंही असो, असलें पाहिजे हें निश्चित आहे. ज्या तापामध्यें पित्ताधिक्य आहे. असे ताप आम्लपित्तासारखे शिरोभागावर पीडा करणारे व्याधि यांचा संभव विशेष आहे. शत्रु पराजित होण्याचा योग आहे. चोरांचा उपद्रव थोडाबहुत आहे. तो कुटुंबांतलाच आहे. शत्रु विशेष व जाणकारांत असें असण्याचा व उत्पन्न होण्याचा संभव नाहीं. याप्रमाणें सहाव्या स्थातावर विचार होतो.

षष्ठभावारंभीं वृश्चिक राशि आहे. त्याचें तात्विक वर्णनः— कौर्ष्ये रिपुस्थे प्रभवेच वैरं कार्यं सुधर्मस्य नरस्यकुर्यात ॥ सार्धं द्विजैर्दैस्य सरी सुपैश्च व्यालैर्मृगैश्चोर गणैर्सराणाम ॥ या भावाचा अधिपति लाभ स्थानीं आहे त्याचें तात्विक वर्णनः—वैर पतिर्लाभ गते क्रूरो मरणं विपक्षतो भवति ॥ तस्कर कृताच हानिः स्याच्चतुष्पादाल्लाभन्मनुजः ॥ दुसरें मत शत्रुभ नाथे सप्तम आथे वा तमुगे हे साहसवान्स्यात् पुत्रविहितो मान्य उदारः सद्गुणकीर्तिर्द्रव्य समेतः ॥ लग्नाच्य। स्थानीं ग्रह नाहीं, ह्मणून या भाव संबंधीं फलाचा या पेक्षां जास्त विचार होऊं शकत नाहीं.

७ जायाभावः—युवति पदादुद्वाहं भार्या पतिसूपदधि गुडक्षीरं ॥ आगम गमन मदार्सि त्रयान् मूत्राशयंच नष्टधनं ॥९॥ या भावारंभीं धनु राशि १९ अंश उदित असून तो बुध नवमांशीं आहे. अर्थात् शुभ ग्रहाचा राशि उदित आहे. या भावांत ग्रह नाहीं. भावाधिपति गुरु पंचमांत अर्थात त्रिकोणांत आहे. व शुक्र हा नैसर्गिक सुखाचा कारक ग्रह लाभस्थानीं स्वगृही आहे हे सर्व योग स्त्री सद्गुणी आणि सुंदर मिळण्यास व स्त्रीसुख चांगलें मिळण्यास कारणीभूत झालेले आहेत. विवाह अल्प वयांत होईल. स्त्री गौर वर्णी मिळेल. ती रोगी नसेल पण सशक्तही नसेल, नैसर्गिक स्त्रीला अनुरुप असाच तिचा बांधा असेल. तिला वात दोषानें मृत्यु येण्याचा संभव आहे विवाह अल्प वयांत झाला पाहिजे कुटुंबांत शनि आहे. हा ग्रह कुंडलींत सप्तमस्थानीं अगर मकर राशींत आपल्या सप्तमांत असतां विवाहाचा विशेष संभव आहे दुसऱ्या लग्नाचा संभव आहे. पण फारच उशिरां कारण एकतर कुटुंबस्थान शुद्ध नाहीं त्या स्थानांत शनि हा पाप ग्रह आहे त्या स्थानचा अधिपति चंद्र हा अस्तंगत असून मंगळानें युक्त आहे. दुसरी गोष्ट जाया स्वामी जो गुरु त्यावर पाहतो हे योग पुन्हा

लग्न करण्याचा प्रसंग आणणारच नाहीं असें ह्मणवत नाहीं. पुन्हा लग्न केलें जावो अथवा न जावो प्रसंग येणें संभवनीय आहे. या प्रमाणें जायाभावाचा विचार होत आहे.

८ अष्टमभावः—मरणाज्जिवित मरणं गुप्यस्थानंच मरण हेतुंच ॥ अन्न सुखं मृति दंशं परिभवमपि चिंतयेत्प्राज्ञः ॥ या गोष्टी अष्टमावर पाहवयाच्या ॥ बलविहिनो विलग्नेजीवे केंद्र त्रिकोणगे ॥ षष्ठष्टम व्यये पापे मध्यमायुयुदाहृतम ॥ लग्न स्वामी जो बुध तो नीच व अस्तंगत असल्या मुळें दुर्बल आहे. गुरु त्रिकोणांत आहे. ह्मणून मध्यमायु योग झालेला आहे अष्टमांत ग्रह नाहीं व अष्टमेशहि बलवान् नाहीं. त्यामुळें गुप्त धन, अनायासें प्राप्त होणारें धन, सासऱ्याकडून धन, बेवारशीधन इ० प्रकारचें प्राप्त होणें कठीण आहे. शनीच्या दोषानें मृत्यु येण्याचा संभव आहे. किंवा मंगळ चंद्र युति असल्यामुळें तापांतच वात होऊन मृत्यु येईल. याप्रमाणें अष्टमाचा विचार होतो

९ नवमभावः—शुभभवनाद्गुरुभाग्यं पितृपौत्रादयास्तपः प्राप्तिम् ॥ उरुस्थानं स्वांतं सहभोक्तृन् दान योग मपि त्रिद्यात् ॥ या प्रमाणें नवम भावावर विचार होतो. या भावांत एकही ग्रह नाहीं. चंद्राच्या नवमांतही ग्रह नाहीं. लग्नीं बलवान् ग्रह नाहीं. नवमेश शनि हा दुर्बल आहे. या गोष्टी मनुष्याच्या दिगंत कीर्ति देतील. असा संभव नाहीं. गुरु हा त्रिकोणांत आहे. व तो आणि शनि यांत कांहींसा नवपंचमयोग आहे. त्यामुळे साधारण किर्तिमान् होईल दुष्कीर्ति मात्र नाहीं. त्याच प्रमाणें आपलें नांव आपल्यामागें ठेवील असें परोपकाराचें कृत्य घडणार नाहीं. दाता असें ह्मणतां येणार नाहीं. साधारणतः कृपणाच्याच वर्गांत गणना होईल पण धन मात्र

कांहींतरी कारणानें इच्छा नसतां खर्च होईल. अध्यापन होणार नाहीं. बुद्धिपुरःसर यात्रायोग नाहीं. पण तो अन्य कारणानें घडेल यापेक्षां नवमभावावर जास्त विचार होत नाहीं.

१० कर्मभावः—दशमात् प्रवृत्तिमाज्ञां कीर्तिवृष्टि प्रवासपूर्तादीन् ॥ मानं कर्मा जीवं जानुस्थानंच निर्दिशेद्दासान् ॥ १ ॥

दशम भावारंभीं मीन राशि ९अं. उदित असल्यामुळें तो बुधाच्या नवमांशीं आहे. या नवमांशानुरूप बुद्धिसामर्थ्याच्या धंद्यानें उपजीविका होईल. या भावांत बुध हा गुरूच्या राशीस गुरूच्या नवमांशीं आहे. व भावाधिपती गुरु त्रिकोणांत आहे. कुंडलींत वकिलीचा योग स्पष्ट झालेला आहे. गुरु व बुध हे दोन्ही ग्रह हाच धंदा दर्शवितात. ह्मणून वकिलीच होणार असें स्पष्ट अनुमान निघतें. मग संस्थानांत वकिली मिळो किं ॲडव्होकेट होऊन हायकोर्टांत सनद मिळो. याबद्दल निश्चय करणें शास्त्र मर्यादेच्या बाहेर आहे. पराक्रम स्थानचा अधिपति रवि हा दशम भावांत उच्च व सिंहासनांशीं आहे. हा ग्रह राजा सारखें वैभव देणारा आहे असें समजावें. हाच ग्रह जर दशमांत मध्यवर्ती असता तर नोकरीच करावी लागती. कुंडलींत शुक्र व रवि हे दोन ग्रह अत्यंत बलवान् आहेत. यांत शुक्र हा गोपुरांशीं लाभ स्थानीं आहे. त्यामुळें मान मान्यता व लौकिक चांगला संपादन होईल. गुरु हा त्रिकोणांत आहे त्याचें फलः—जीवः पुनर्हित करं महत्तरंनय विदं सुखोपेतं ॥ मंगळ स्वगृहीं आहे त्याचें फलः—आढ्यं प्रचंडमचलं भौमः कुरुते स्वराशिगःपुरुषं ॥ शुक्र स्वगृहीं आहे. त्याचें फल—दानवपूज्यः कुरुते कृषीबलं स्फीत वित्तंच ॥ बुध नीच आहे त्याचें फल—कुरुते हिमकर पुत्रः क्षुद्रं स्वज्ञाति बद्ध वैरंच ॥ कुंडलींत दोन ग्रह स्वगृहीं आहेत त्याचें फल.—

द्वौ स्वगृहस्थौ कुरुतःकुलाधिकं बंधु पूजनं धन्यं ॥ वंशकरमर्थसहितं स्थान यशोभिख्ययोविहगाः ॥ रवि हा उच्च असून गोपुरांशीं आहे व गुरु त्रिकोणांत आहे. त्यामुळें पिता भाग्यवान् व दीर्घायु आहे. पितृ सुखहि फार उत्तम तर्‍हेचें. रवि अत्यंत बली असल्यामुळें व दशमाधिपति त्रिकोणांत असल्यामुळें राजभय नाहीं. दशमाधिप गुरु व दशमांत असलेला लग्नस्वामी नीच बुध हे दोन ग्रह वक्री आहेत. त्यामुळें राजकृपा किंवा अधिकारी वर्गाची कृपा वक्र स्थिति असणार व ती प्रत्येक हित संबंधाच्या वेळीं आडचण येणार. पण बंधन, दंड, वगैरची भीति नाहीं. ही गोष्ट निश्चित आहे. एकंदर आयुष्य स्वार्थ परायणतेंत जाईल. लोक कल्याण बुद्धिच्या, विद्वत्तेच्या व कर्तृत्व शक्तीच्या मानाने घडणार नाहीं याप्रमाणें दशम भावाचा विचार होतो.

११ **आयभावः**—आयेनार्थावाप्ति पादावपि पादावपिकामकर्ण चिंतांच ॥ जातावपिचकंकुजान् ज्येष्ठान् ब्रुयात्धनान्याशाम् ॥१॥ हां सर्वार्थ चिंतामणींतला श्लोक आहे. पण वास्तविक लाभ स्थानावर पाहावयाच्या गोष्टी पुढील श्लोकांत सांगितल्या आहेत त्या अशा-गजाश्व हेमांबर रत्नजात मांदोलिका मंगल मंडलानि ॥ लाभंकिलेषामसिलं विचार्य मेतत्तुलाभस्यगृहे गृहज्ञेः ॥ हत्ती, घोडे, सोन्याचे पदार्थ उंचीवस्त्रें रत्न व रत्नजडित पदार्थ, पालखी इ० वस्तूंची प्राप्ती मुख्यत्वें लाभस्थानावर पहावयाची आहे. या भावाचा अधिपति मंगळ हा लाभस्थानी स्वगृहीं आहे. व तो धनस्थानचा अधिपति जो चंद्र त्यानें युक्त आहे. शिवाय या स्थानीं गोपुरांशीं व स्वगृहीं असलेला शुक्र मध्यवर्ती आहे. ह्मणून लाभस्थानीं हें इतर सर्व स्थानांत अत्यंत बली झालें आहे अर्थात् भावो ऐश्वर्य प्राप्त झालें पाहिजे. असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. लाभस्थान हें अशा प्रकारें बलवान् असून पराक्रमाचा अधिपति रवि हा सिंहासनांशीं

दशमांत आहे. ह्मणून स्वपराक्रमानें मिळणाऱ्या संपत्तीचें मान बहिर्लाजित मिळणाऱ्या धनाशीं ताडून पाहिल्यास १ : १० असें सुद्धां प्रमाण बसेल. इतकी संपत्ति नोकरीनें मिळो किंवा स्वतंत्र धंद्यानें मिळो. मिळणार हें भविष्य खरें होईल यांत शंकाच नाहीं. याप्रमाणें आयभावावरून विचार होतो.

१ **लाभस्थ भौमफल**.—विधेय प्रियवाक् शूरो धनधान्य समन्वितां

२ **लाभस्थ चंद्रफल**.—विख्यातो गुणवान् प्राज्ञो भोग लक्ष्मी समन्वितः लाभस्थानगते चंद्रे गौरो मानववत्सलः

३ **लाभस्थशुक्र फल**.—। स्त्री रत्नवर रत्नाढ्यो स्वस्थःशोक विवर्जितः । संपन्न धन भृत्यश्च मर्त्यो लाभगते सिते ॥

४ **लाभेश फल**.—लाभाधिपो लाभगतः करोति दीर्घायुषं पुष्कल पुत्रयुक्तं ॥ सकर्मकं रूपयुतं सुशीलं जनप्रमोदप्रवणं पुमांसम् ॥

लाभ स्थानच्या ग्रहावरून कोणता ग्रह कितव्या वर्षी फल देतो या विषयीं:—

लाभे रविर्जित समामितलाभमिंदौ भूपाच्च लाभमसृजिर्जिनवर्ष लक्ष्मीम् ॥ ज्ञः पंचवेद धनमीज्य इंनाद्व लक्ष्मीशुक्रःकरोति धन मार्किफलं कुजोक्तम् ॥ लाभस्थ चंद्र २४ व्या वर्षी मंगळ २४ व्या व शुक्र १२ व्या वर्षी लाभ देतो असा वरील श्लोकाचा आशय आहे. अनुभव पहावा.

१२ **व्ययभाव**—या भावावर दंड कैद, हानि, धन, मरणानंतरची स्थिति, शयनादि सुखें इत्यादि गोष्टींचा विचार होतो. कुंडलींत या स्थानांत ग्रह नाहीं. व्ययस्वामी लाभस्थानीं बलवान् आहे ह्मणून मरणानंतर श्रेष्ठ लोक प्राप्त होईल. कारण ' उच्चस्थे श्रेष्ठलोकःस्यात् ' पर्यंकादि सुखें मिळतील असाहि योग आहे. कारण —व्ययेशे स्वोच्च राशिस्थे शुभवर्ग समन्विते ॥ शुभ ग्रहेण संदृष्टे पर्यंकशयनं वदेत् ॥

बंधन, दंड, कैद इ०ची भीति नाहीं यापेक्षां जास्त विचार या भावावर होऊं शकत नाहीं.

काल विचार.

जन्मकालीं द्वितीय स्थानीं जो शनि आहे तो चंद्राच्या चतुर्थ स्थानीं असल्यामुळें प्रकृतीस अपायकारक झाला. हर्शल चंद्रासमोर व चंद्र मंगळाशीं युति करितो त्यामुळें जन्म झाल्यावर एक महिन्याच्या आंतच झटके आले पाहिजेत. तिसऱ्या वर्षीं पुन्हा शनि व राहु हे बिघडले आहेत. राहु हा चंद्राला चवथा व शनि हा लग्नाला चवथा झाला होता. हा काल स्वतःला व मातेलाहि कष्टप्रद होतो. वयाच्या ९।१०।११ या वर्षांत शनि हा चंद्राला ८ वा असून १० व्या व ११व्या वर्षी तर षष्ठ स्थानीं होतो म्हणून फार अनिष्ट होता. शिवाय तो हर्शलशीं युति करीत होता व राहु अष्टमांत होता म्हणून या ग्रह स्थितीवरही फार कष्ट झाले असले पाहिजेत. १९०१।२ मध्यें शनि अष्टम स्थानीं होता व राहु हा चंद्राला आठवा होता. या वेळींही थोडे बहुत कष्ट संभवतात. सन १९०९ मध्यें साडेसातीस सुरवात झाली असून राहू हा चतुर्थ स्थानीं होता, व मंगळ वृश्चिक राशींत ७ महिने होता. त्यामुळें हें वर्ष कष्टाचें गेलें पाहिजे. यावरून ध्यानांत येईल कीं शनि, राहू, मंगळ व रवि हे ग्रह कर्क, कन्या, वृश्चिक, मकर व मेष राशींत असतां शारीरिक त्रास, कष्ट व आजार उत्पन्न होणें शक्य आहे. यासाठीं या राशींत ते ग्रह केव्हां असतील ते पुढील २० वर्षांचे दिल्यानें बोध होण्यासारखा आहे दोन किंवा अनेक ग्रह एकाच काळीं जेव्हां बिघडतील तेव्हां येणारें दुखणें

विशेष जाणावेळ. एका ग्रहानें साधारण जाणावेळ. किंवा दुखणें न येतां प्रकृती साधारण नादुरुस्त व अस्वस्थ राहील.

शनि २० वर्षांचा.

(१) १९०८ एप्रिल ते १९१० जून मेष राशींत
(२) १९१४ सपटंबर ते १९१६ नवंबर कर्क
(३) १९१९ आगष्ट ते १९२१ अकटंबर कन्या
(४) १९२३ डिसेंबर ते १९२६ नवंबर वृश्चिक

राहु २० वर्षांचा

[१] १९१२ ते १९१३ मेष
[२] १९१६ ते १९१७ मकर
[३] १९२० ते १९२१ वृश्चिक
[४] १९२२ ते १९२३ कन्या
[५] १९२६ ते १९२७ कर्क
[६] १९३१ ते १९३२ मेष

मंगळ २० वर्षांचा

[१] १९०९ आगष्ट ते १९१० फेब्रूवारी मेष.
(२) १९१० मे, जून—कर्क. आगष्ट, सपटंबर—कन्या. नवंबर डिसेंबर—वृश्चिक.
[३] १९११ फेब्रूवारी—मकर. जून, जुलई—मेष.
(४) १९१२ एप्रिल, मे-कर्क. आगष्ट-कन्या. नवंबर-वृश्चिक.
[५] १९१३ जानेवारी, फेब्रूवारी-मकर. जून-मेष. या वर्षी मंगळ कर्क राशींत वक्री आहे. त्यामुळें हें साल सांपत्तिक

कौटुंबिक व शारीरिक सुखाला कष्टप्रद होईल. १९१३ च्या सप्टेंबर अर्धापासून १९१४ एप्रिल अखेर पर्यंत मंगळ कर्क राशींत वक्री झालेला आहे. या मंगळाची जरूर जरूर आराधना करावी.

(६) १९१४ जुलै—कन्या. अक्टंबर—वृश्चिक.

[७] १९१५ जानेवारी-मकर. मे-मेष. सपटंबर-कर्क.

(८) १९१६ जून. जुलई—कन्या. अक्टंबर—वृश्चिक. या वर्षी मंगळ सिंह राशींत वक्री आहे. तो मातृसुखाला प्रतिकूळ होईल. डिसेंबर—मकर.

[९] १९१७ एप्रिल-मेष. आगष्ट-कर्क. डिसेंबर-कन्या.

(१०) १९१८ सपटंबर—वृश्चिक. डिसेंबर—मकर.

[११] १९१९ मार्च्य, एप्रिल-मेष. आगष्ट-कर्क. नवंबर-कन्या.

(१२) १९२० या साली मंगळ वृश्चीक राशींत वक्री आहे. या साठीं त्याची आराधना करावी. नवंबर—मकर

[१३] १९२१ मार्च—मेष. जुलई—कर्क. अक्टंबर—कन्या.

(१४) १९२२ या वर्षी मंगळ धनु राशींत वक्री आहे. तो स्त्रीला व स्त्री सुखाला अनिष्ट आहे.

[१५] १९२३ फेब्रूवारी—मेष. जून—कर्क. सपटंबर—कन्या.

(१६) ९२४ जानेवारी—वृश्चिक. एप्रिल—मकर.

[१७] १९२५ जाने. मेष. जून-कर्क. सप.-कन्या. डिसें.-वृश्चिक.

(१८) १९२६ मार्च—मकर. जुलई.

[१९] १९२७ मे-कर्क. आगष्ट-कन्या. नवंबर-वृश्चिक.

(२०) १९२८ फेब्रू.-मकर. जून-मेष. या वर्षी अक्टंबर पासून कर्क राशींत मंगळ वक्री आहे. ह्मणून त्याची आराधना करावी.

अभिवृद्धीचा काल

१ भाग्यभावारंभीं कुंभ राशि आहे ह्मणून या राशींत ज्या ज्या वेळीं शनि येईल, तो तो काल अभिवृद्धीचा किंवा भाग्याचा समजावा सन १९०३ च्या फेब्रूवारी पासून १९०९ च्या एप्रिल पर्यंत हा काल आहे. १९०१ मध्यें गुरु भाग्यस्थानीं, १९०४ मध्यें गुरु मेष राशींत लाभ स्थानीं, १९०५ मध्यें साडेसातीला मे पासून आरंभ झाला. मीन राशींत शनि असल्यामुळें साडेसातीच्या आरंभीं उदयच संभवतो. या सालीं शनि सर्व वर्षात भाग्यरथ आहे. १९०६ मध्यें गुरु तनु स्थानीं मिथुन राशींत, चंद्राला ३ रा आहे. व आगष्ट पासून तो कर्क राशीचा होऊन १९०७ मध्यें पूर्णपणें विद्यास्थानीं आल्यामुळें हा भाग्योदय काल होतो. सन १९०८ मध्यें शनि हा रवीवरून जातो. ह्मणून हें वर्ष राजकीय गोष्टींस त्रास दायक होतें. पण गुरु हा सिंह राशींत चंद्राला ५ वा झाला असल्यामुळें सर्व संकटें दूर होऊन भाग्योदयही होईल. शनि हा सन १९०८ च्या एप्रिल पासून १९०९ च्या एप्रिलपर्यंत रवि, चंद्र व मंगळ यांच्यांत वक्रगतीनें घोटाळत असल्यामुळें हा काल अति त्रास दायक झाला पाहिजे. साडेसातींत शनि मेष राशींत असतां कोणतेंही कार्य नीट रीतीनें तडीस न जातां मन उद्विग्न होईल. पुढें तो वृषभ राशींत एकादशस्थानीं जाईल. १९०२ पासून १९०६ पर्यंत गुरु व १९०३ पासून १९११ च्या अर्धापर्यंत शनि हे ग्रह नवमस्थानापासून एकादशस्थानापर्यंत भ्रमण करितात. ह्मणून आयुष्यांतल्या या वयांतल्या भाग्याच्या गोष्टी ह्मणजे विवाह, संतति व परीक्षा, उद्योग धंदा लागणें इ० घडणें स्वाभाविक आहे. कुंडलींत रवि,

मंगळ व शुक्र हे तीन ग्रह फारच बलवान् आहेत. यांत रवि उच्च आहे. उच्च रवीच्या दशाकालीं कोणत्या गोष्टी घडतात हें पुढील श्लोकांत वर्णिलेलें आहे.—

॥ पाके प्रदीप्तस्य धराधिपस्य मुत्साहशौर्यं धनवाहनेच ॥
॥ स्त्रीपुत्रलाभं शुभबंधुपूज्यं क्षितीश्वरान् मानमुपैति विद्वान् ॥

या ग्रहाची दशा ता० ८ अक्टंबर १९०८ पासून सुरू होते. ह्मणून या दशेचा काल परीक्षेचा शेवटचा रिझल्ट आणि धंद्याचा आरंभ व त्यांतच भरभराट असा गेला पाहिजे हें सिद्ध आहे. या दशेच्या पूर्वी शुक्राची महादशा होती. हा ग्रह लाभस्थानीं स्वगृहीं गोपुरांशीं आहे. या दशेचें फलः— ॥ स्वस्थस्य खेटस्य दशाविपाके स्वस्थोनृपाल्लब्ध धनादिसौख्यं ॥ विद्यांयशप्रीति महत्व माराद्दारार्थ भूम्यादिजधर्ममेति ॥ २ हीं सर्व या दशेंत चांगलीं अनुभवा आलीं पाहिजेत.

रविमहादशेंत रवि, मंगळ व गुरु यांच्या अंतर्दशा उन्नतीच्या जातील. चंद्र व बुध यांच्या मध्यम, आणि इतर दुःखदायक होतील. त्यांचे कालारंभ त्या त्या अंतर्दशांच्या खालीं दिले आहेत.

रविमहादशेनंतर चंद्राची महादशा सुरू होते. या ग्रहाची महादशा कित्येक गोष्टींत दुःखदायक जाईल. धनाची वाढ साधारण होईल, कारण हा ग्रह द्वितीय (मारक) स्थानाचा अधिपति असून पाप ग्रहानें युक्त व अस्तंगत असा आहे. या दशेचें फल पुढील श्लोकांत वर्णिलेलें आहे तशा प्रकारचें मिळेल.

॥ वैकल्यखेटस्य दशाविपाके । वैकल्यमायाति मनोविकारं । मित्रादिकानां मरणं विशेषात् स्त्रीपुत्रयानांबरचोरपीडा । कोपा-

न्वितस्यापि दशाविपाके पापाःसमायांति बहुप्रकारैं विद्या धन स्त्री सुत बंधुनाशं पुत्रादि कृच्छ्रात्त्वथनेत्ररोगं ॥

चंद्र महादशेनंतर मंगळाची अंतर्दशा आहे. ही दशा बरीच चांगली असून या दशेंत अनेक प्रकारचे लाभ होतील. या दशेचें फल शुक्राच्या दशे प्रमाणेंच आहे.

सन १९१० हें वर्ष संतति, विद्या व उद्योग दर्शविते सन १९११ हेंही वर्ष बरें आहे. पण शनि व्ययस्थानीं व गुरु चंद्राच्या अष्टमांत असल्यामुळें उन्नति होणें कठीण दिसतें.

सन १९१२ या वर्षी गुरु हा चंद्राला ९ वा असून शनि व्ययस्थानींच आहे. ह्मणून १९१२ या वर्षी गुरु चंद्राला ९ वा असून शनि व्ययस्थानीं आहे. ह्मणून या सालीं किंचित् भाग्योदय होईल. पण सांपत्तिक दुर्बलता असेल.

सन १९१३।१४ हीं दोन सालें उदयाचीं आहेत. त्यांत १४ हें साल अप्रतीम आहे. कारण गुरु भाग्यस्थानीं व शनि तनुस्थानीं मिथुनेंत अस्तंगत आहे व हर्शलही भाग्यस्थानीं गेला आहे. ह्मणून या सालासारखें मागील ९ वर्षांत उत्तम साल नाहीं.

सन १९१५च्या आरंभीं सुमारें ३।४ महिने ठीक जातील. पुढें विपत्ति, निर्धनत्व व सांपत्तिक आणि कौटुंबिक हानि होईल. शनीची आराधना करावी.

सन १९१६ हें साल लाभ व हानि या दोहोंचेंही समसमान दर्शक आहे. कारण गुरु लाभस्थानीं व शनि धनस्थानीं आहे. राहु अष्टमांत आहे. सन १९१६।१७ हीं वर्षें स्त्रीला चांगलीं जाणार नाहींत. मध्यें लाभ योग बरा आहे. माता पितरांचें सुख सन १८च्या पुढें मिळेलच असें दिसत नाहीं. त्यांत प्रथम माता व नंतर पिता असा योग आहे.

सन १९१७।१८ हीं वर्षें चांगलीं आहेत. पुष्कळ धन मिळून अभिवृद्धि होईल. भावंडा संबंधाला हा काल वाईट जाईल असें वाटतें.

सन १९१९।१९२० किंचित् शारीर कष्ट आहेत. धन लाभ चांगला.

सन १९२१।२२ मध्यें पुष्कळ मोठाले लाभ व राजयोगाप्रमाणें स्थिति.

सन १९२३ हें साल चांगलें नाहीं. गुरु ८ वा आहे.

सन १९२४ हें साल संपत्तीला चांगलें जाईल.

सन १९२५ साल अनिष्ट आहे.

सन १९२६ मध्यें शारीर कष्ट आहेत. पण सांपत्तिक उदयकाल आहे. सन १९२६।२७।२८।२९ हीं वर्षें उन्नत्तीचीं आहेत सन १९३३ पासून शनि भाग्यभुवनाकडे भ्रमण करूं लागेल. सन १९३३।३४ वर्षें फारच उत्तम स्थितींत जातील. व सन १९३५ च्या मार्च्य पासून साडेसाती लागेल.

सन १९२९।३०।३१ मध्यें हर्शल मेष राशींत असून शनि त्यांत त्याच्या दशमांत मकर राशींत आहे. व राहु मेष राशीला आहे. ह्मणुन हा काल शारीरिक व राजकीय गोष्टींत फार कठीण जाईल.

॥ इति शुभं भवंतु ॥

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम् ।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥

'भवभूति'

पुस्तक ९ वें.] अश्विन व० ४ सोमवार [अंक १८ वा

जन्मपत्रिका.

जन्म ता. २५ मार्च्य १८८७
शुक्रवार सकाळीं १० वा. ३३ मि.



सायन सगतिक स्पष्ट ग्रह

र.	चं.	मं.	बु	गु.	शु	श.	हर्शल	नेप.	राहु
मेष	मेष	मेष	मीन	वृश्चिक	वृषभ	कर्क	तूळ	वृषभ	सिंह
४	१०	११	२८	४	०	१५	१०	२५	२६
१५	२३	१४	२८	१२	५२	३८	४३	४२	९
५९	७१६	४६	५९ व.	६ व.	७३	१	३	०	३ व.

या पुढें होरानवमांशादि कुंडल्या मांडावयाच्या.

रवि—सिंहासनांशीं. चंद्र—पारिजातांशीं. गुरू—पारिजातांशीं. शुक्र—गोपुरांशीं. लग्न—पारिजातांशीं.

या पुढें महादशा, अंतर्दशा व उपदशा देऊन त्यांचीं फलें द्यावयाचीं.

द्वादशभाववर्णन

१ तनुभाव

१ तनुभावः—या भावारंभीं मिथुन राशि १९ अं. उदित असून तो मीन नवमांशीं आहे लग्न स्वामी बुध हा दशमांत मीन राशींत वक्री असून तोही मीन नवमांशींच आहे. लग्नांत किंवा लग्नासमोर ग्रह नसून बुध कोणत्याहि ग्रहानें युक्त नाहीं. या वरून मीन राशीच्या धर्मा प्रमाणें शरीर ठेंगणें, अवयव सूक्ष्म व वर्ण साधारण गोरा आहे. या नवमांशाचें ग्रंथोक्त फल ॥ मध्वी क्षणः प्रलापी व्यस्त ललाटः समस्तुतनुः ॥ कितवश्चलश्च रुधिरोष्टरदः षष्ठेतु सत्वयुतः ॥ या प्रमाणें आहे. चंद्र हा मेष राशींत १० अं. २३ कला अश्विनींत असून तो मंगळाशीं युति करीत आहे त्या मुळें प्रकृति

उष्ण, मंगळाच्या दोषानें प्रकृतिला विकार, वर्णांत किंचित् तांबूस पणा, तेजस्वी, चलचित्त, प्रवास व स्थलांतरें विशेष. चालण्याच्या कामांत पटाईत, निष्ठावान्, श्रम करणारा, इ. गुण उत्पन्न होतात. मंगळाच्या दोषानें शरिराला नित्य पीडा, मंगळाला आवडणारे अर्थात तिखट पदार्थ प्रिय, मंगळासारखा नटणारा स्वभाव. चंद्र हा मंगळाशीं युति करीत असून हर्शल चंद्रावर पूर्ण पाहतो. त्यामुळें बालपणीं अपस्मारासारखे झटके, व पुढेंही अति विचाराच्या समयीं मूर्छेसारखी स्थिति. गळवें, ताप, जळवात, मूळव्याध आम्लपित्त, जखम होणें, पडणें, भाजणें, शस्त्र पीडा हे मंगळाचे दोष आहेत. यामुळें शरीर नेहमीं सडपातळ अवस्थेतच राहील. आंगीं वक्तृत्व असलें तरी मेष राशीचा स्वभाव असा आहे कीं, त्याला एकांत आवडेल. भाषण प्रसंग शिवाय न होणें अर्थात फार कमी. शरीरावर मंगळाचा परिणाम फार होत असल्यामुळें त्याच्याच दोषानें अखेरीस मृत्यु. याप्रमाणें तनुभावाचें वर्णन आहे.

२ धनभावः—या भावावर मुख्यत्वें संपत्तीचा सांठा, व संपत्तीचें संरक्षण, विद्या, वक्तृत्व, वाणी, नेत्र, भक्ष्य, कुटुंबसंबंधीं सुख व स्त्रीचा मृत्यु या गोष्टींचा विचार होतो. या भावारंभीं कर्क राशि १९ अं. उदित असून, भावारंभावरोबरच शनि हा पापग्रह दुर्बलावस्थेत उदित आहे. या ग्रहाची मध्यम गति २ क. असून येथें तो १ कलात्मक गतींत आहे. अर्थात तो अशक्त स्थितींत आहे. हा ग्रह वर्गोत्तमांशींही नाहीं. ह्मणून द्वितीयभावसंबधीं फल कनिष्ठ. व दुःखदर्शक दिसत आहे. वाणीमध्यें दोष, नेत्रांचें पाणी व शक्ति कमी, पुष्कळ वेळां असे प्रसंग यावयाचे कीं, त्या वेळीं कदान्न खाण्यास मिळावें अगर उपवास घडावा. शनिचा धर्म मधुर व उंची पक्वान्नें मिळण्याचा नसून तो मंगळाच्या नवमांशीं असल्यामुळें मंग-

ळाच्या धर्मानुरुप पदार्थावरच रुचि असावयाची. संपत्तीचा सांठा कमी असणार. प्राप्तीच्या मानानें उपस्थित प्रसंगानें संपत्तीचा लय हा शनीचा धर्म आहे. संपत्ति मिळविण्याचे जितके प्रयत्न होतील, तितके सांठा करण्याचे होणार नाहींत. किंबहुना तिकडे दुर्लक्ष असेल. संपत्ति पुष्कळ मिळेल तरच बचाव व्हावा. नाहींतर कर्जानें जीव बेजार व्हावा असा शनीचा स्वभाविक धर्म आहे. ठक आणि चोर हे संपत्तीचे लुटारु होण्याचा संभव आहे. वडिलार्जित संपत्तिचे संरक्षण फार सावधगिरीनें केलें पाहीजे. द्वितीय स्थान हें भांडागार आहे. त्या ठीकाणीं शनि हा लुटारु व गडप करणारा पापग्रह आहे. असें समजून तिजोरीच्या किल्ल्या कोणाच्याही हातीं देतां कामा नये. चाकर माणसें, स्त्री अगर कुटुंबांतील माणसें संपत्तीचा अपहार करूं शकतील. अगर तशा वासनेनें प्रयत्न करितील. होरा कुंडलींत सर्व ग्रह लग्न व धन स्थानीं असून धन स्थानीं ग्रह जास्त आहेत. हा धनयोग चांगला आहे असें होरा कुंडलीवरून स्पष्ट दिसत आहे. धनाधिपति चंद्र असून तो स्वनवमांशीं व पारिजातांशीं आहे. व लाभेश जो मंगळ त्याच्या युतींत आहे. भाग्येश धन स्थानीं, पंचमेश लाभ स्थानीं, स्वगृहीं असून तो धनेशाच्या द्वितीय स्थानीं आहे. हे सर्व धनयोग चांगले आहेत. संपत्तीची प्राप्ती मोठी आहे. असें स्पष्ट दर्शवित आहेत. मोठ्या पगाराचे नोकर अगर मोठ्या उत्पन्नाचे श्रीमंत यांस जशी प्राप्ति असते. तशी होईल. कुटुंबांत सुख कमी मिळेल. व कुटुंबही फार लहान असेल. वक्तृत्व असेल पण हिंदुस्थानांत ज्याना आपण वक्ते म्हणतों तसा लौकिक असणें शक्य नाहीं. या प्रमाणें द्वितीय भाव संबंधीं फलाचा विचार होतो.

३ तृतीयभावः—भावंडें, पराक्रम, शौर्य, धैर्य, कर्ण या गोष्टींचा विचार मुख्यत्वें या भावावर होतो. या स्थानांत सिंह राशि उदित

आहे. हा स्वभावतः सिंहा सारखाच आहे. अर्थात शौर्यादि गुण संभवतात. या स्थानांत राहू आहे. ॥ तृतीयस्थे सूर्य पुत्रे सिंहिका तनयेथवा । भ्रातृजन्यंसुखंनास्ति दृष्टिभिर्वा विलोकिते ॥१॥ भावंडांपासून सुख होण्याला राहु हा तृतीय स्थानीं चांगला नाहीं. भावामध्यें विशेष प्रकारचें प्रेम, ऐक्य, एकमेकांची एकमेकांस मदत या गोष्टी येथें दिसत नाहींत. सहोदर भावंडें फार कमी दिसतात. वडील व पाठीवरचें भावंड नसेल. या पेक्षां भावंड संबंधें जास्त कळण्यासारखें नाहीं. महत्वकांक्षा व कर्तृत्व विशेष आहे. छाती भरदार असेल कर्ण रोगाचा संभव नाहीं. या भावाचा अधिपति रवि हा उच्च असून सिंहासनांशीं आहे त्याचें फल ग्रंथकार असें देतात.

॥ शौर्याधिपे तुंगयुते बलाढ्ये केंद्र त्रिकोणे यदि सौम्यदृष्टे मूल त्रिकोणे स्वगृहेष्ट गेहे वैशेषिकांशे पुरुष सधीरः ॥१॥ सिंहासनांशें यदि विक्रमेशे पारावते गोपुर भौमयुक्ते । मृद्वंशके वा शुभदृष्टियोगे मनोत्सवो युद्ध विशारदःस्यात् ॥ २ ॥ याप्रमाणें तृतीय भावाचा विचार झाला.

४ सुहृद्भावः—या भावावर माता, मित्र, दायाद, गृह, क्षेत्र, वाहनें या गोष्टींचा मुख्यत्वें विचार होतो. या भावाच्या अंतीं हर्शल हा ग्रह आहे. भावारंभीं कन्येचे ९ अंश उदित आहेत. या भावावर गुरूची दृष्टि नाहीं. शनि पूर्ण दृष्टीनें पाहत आहे. भावाचा अधिपति बुध आपल्या नीचांत आहे. चंद्राच्या चतुर्थ स्थानीं कर्क राशीचा शनि आहे. हा योग माते संबंधाच्या सुखास कमीपणा आणणारा आहे. बालपणीं स्वतः व माता फार आजारी असा हा योग आहे. याच योगावर सापत्नमाता योगही संभवतो. लग्न व चतुर्थ यांचा अधिपति एकच बुध हा ग्रह असल्यामुळें मातेशीं ऐक्य दिसत आहे. पूर्व इष्ट व संपत्ति पूर्णपणें हातांत येणें संभवनीय नाहीं. स्वतःला

वाहनांचा शोक मुळींच दिसत नाहीं. इतकेंच नाहीं तर शोक केल्यास खरोखरच शोक उत्पन्न होण्याचा संभव आहे. मोठाल्या इमारती किंवा मोठी इष्टेट संपादन होईल असा स्पष्ट योग चतुर्थ भावावरून दिसत नाहीं. जिवलग व ज्यांच्या पासून साह्य मिळेल असे मित्र क्वचित दिसतात. या पेक्षां या स्थानापासून जास्त बोध होऊं शकत नाहीं. चतुर्थेश, अस्तंगत, नीच व वक्री असून चतुर्थ स्थानीं ग्रह नाहीं व चंद्राचे चतुर्थ स्थानही बलवान् नाहीं. अशा स्थितींत या भावासंबंधीं फलाचें काय वर्णन करावें.

५ सुतभावः—या भावावर संतति, गर्भ, उपासना, विद्या, बुद्धि या गोष्टींचा विचार होतो. या भावारंभीं तूळ हा शास्त्रीय राशि उदित आहे. लग्नीं मिथुन हा शास्त्रीय राशि व नवम भावारंभीं कुंभ हा शास्त्रीय राशि उदित आहे. याप्रमाणें सर्व शास्त्रीय रा। कुंडलींत त्रिकोणस्थ आहेत. व यांपैकीं तूळ या शास्त्रीय राशींत हर्शल हा ग्रह आहे. त्यामुळें शास्त्रीय गोष्टींत बुद्धि उत्तम चालेल. व चांगली विद्वत्ता प्राप्त होईल. हर्शलामुळें बुद्धिचा प्रभाव विलक्षण तीक्ष्ण असेल. अद्भुत किंवा ज्याना अतींद्रिय ज्ञानाच्या विद्या ह्मणतात अशा विद्या प्राप्त होतील. अनेक विद्यांचा व्यासंग होईल, पण खरें खरें मन अद्भुत विद्यांच्याच ठिकाणीं आसक्त होईल. पंचमांत गुरु, द्वितीय स्थानांत शनि, बुधाच्या राशीचें लग्न व बुध हा गुरुच्या राशीस व गुरुच्याच नवमांशीं हा कायद्याच्या विद्येचा योग झालेला आहे. पंचमांतील गुरु संस्कृत व वाङ्मयात्मक विद्या दर्शवितो. वेदांत, ग्रंथकर्तृत्व यांचाही या गुरूपासून बोध होतो. शुक्र हा ललित कलांचा दर्शक आहे. व येथें पंचमेश असून एकादश स्थानीं स्वगृहीं आहे. ह्मणून गायन वादनादि कलांचाही शोक असला पाहिजे. गुरु व शुक्र हे एकमेकांस पहात आहेत त्यांचे ग्रंथोक्त फलः—(१) मंग-

ळाच्या गृहीं शुक्राची दृष्टि असतां ॥गृहशयनवसन गन्धैर्माल्यालङ्कार युवतिभिर्विभवैः ॥ समुचितमतीव भीरूं कुरुते शुक्रेक्षितो जीवाः ॥ १ (२) स्वगृहीं शुक्र असतां त्यावरील गुरूच्या दृष्टीचें फलः—। प्रमदा पुत्र गृहाणां भागिनमथ यान वाहनानांच ॥ स्वर्क्षेगुरुसन्दृष्टःकुरुते मृगुरिष्टचेष्टानां ॥२॥ वृश्चिक राशीच्या गुरूचें स्वभावतः फलः—व्याध्यार्तश्रमबहुलः प्रसक्त दोषो गुरौ भवत्या लिनि ॥ दंभेन धर्मविरतो जुगुप्सिताचार निरतश्च ॥ कर्क राशीच्या शनीचें स्वाभाविक फलः—सुभगान्वितो दरिद्रो बाल्ये रोगाति पीडितःप्राज्ञः ॥ जननि रहितोऽति मृदुर्विशिष्ट निरतःसदातुरश्चापि ॥ परबावको विशिष्टो बन्धु विरुद्धो विलोमशीलश्च मध्ये भूपति तुल्यः परिभोग विवर्षितः शशिभे ॥ पंचमस्थान हें उपासनेचें स्थान आहे. या स्थानांत गुरु आहे. नवम स्थानीं ग्रह नाहीं. नवमेश शनि शत्रुगृहीं आहे. दशम ह्मणजे कर्म स्थानचा अधिपति गुरु हा पंचमांत आहे. व कर्मेश व भाग्येश यांत नवपंचम योग साधारणतः झालेला आहे. यावरून आचार, उपासना, धर्मपालन यांचा विचार केल्यास कोणताही बरा अगर वाईट योग पूर्णपणें झालेला नाहीं. यामुळें असें वाटतें कीं, या मार्गांत जरी अश्रद्धा नाहीं तरी श्रद्धेच्या मानानें क्रिया नाहींच असे स्पष्ट दिसतें. क्रिया वारंवार पालटेल. धर्मपालन लौकिक असेल, उपासना कमीच. सारांश अध्यात्मिक लाभ होणें शक्य नाहीं. भावारंभी तूळ हा पुरुष राशि उदित आहे. हा राशि संतति मध्यम प्रसवणारा आहे. या भावांत वृश्चिक राशींत गुरु वक्री आहे. हा गुरु कन्या संततीला जेवढा अनुकूल आहे तितका पुत्र संततीला नाहीं. तथापि पुत्र प्राप्ति होईल कारण एकादश स्थानीं स्वगृहीं शुक्र असून तो गुरुवर पाहत आहे. संतति निरोगी, सद्गुणी व अल्प वयांत होईल. संतति ८ होईल असें मानिल्यास सुमारें २ अगर ३ पुत्र व बाकी कन्या. सर्वच संतति

जगेल अशी खात्री नाहीं. कारण मंगळ हा एकादश भावारंभींच आहे. या पेक्षां जास्त विचार करण्यास स्त्रीची कुंडली पाहिजे. कारण गर्भ स्थान स्त्रीलाच असतें. संततीची संख्या वगैरेचा बोध माझ्या मतें स्त्रीच्याच कुंडलीवरून चांगला होतो. सन १९१० पुत्र प्राप्ति होण्याचा योग दिसत आहे. याप्रमाणें पंचम स्थानाचा विचार होतो.

६ रिपुभावः—अरिभवना दरिचोरक्षतविघ्नक्लेश नाभ्युदरदेशान्॥ मधुरादि षड्पदंशान् ग्रह राश्युदितान्वदेत्प्राज्ञः । षष्ठभावारंभीं वृश्चिक राशि १६ अं. उदित असल्यामुळें तो वृश्चिक नवमांशींच आहे. हा राशि स्वभावतः गुप्त रोग उत्पन्न करितो. षष्ठस्थानीं ग्रह नाहीं, व त्या स्थानावर कोणी ग्रहही पाहत नाहीं. त्या मुळें गुप्त रोगाचें भय नाहीं. या भावाचा अधिपति मंगळ असून एकादश स्थानीं चंद्राशीं युति करितो, ह्मणून कोणत्या तरी मंगळाच्या दोषानें शरीरावर कायमचा डाग अथवा निशाणी असली पाहिजे. जखम होऊन भाजून अगर विस्फोटकानें ही निशाणी झाली पाहिजे. आतां ती शरीराच्या कोणत्याभागीं आहे. हें सांगणे कठीण आहे. मंगळ एकादशस्थानीं व मेष राशींत असल्यामुळें मस्तकावर, अगर दोन्ही भागावर संभवनीय आहे. त्रिंशांश कुंडलींत तो धनु राशींत शनि चंद्रासह आहे. या राशीचें स्वामीत्व मांड्यावर आहे ह्मणून कदाचित् एथेंच असण्याचा संभव आहे. कोठेंही असो, असलें पाहिजे हें निश्चित आहे. ज्या तापामध्यें पित्ताधिक्य आहे. असे ताप आम्लपित्तासारखे शिरोभागावर पीडा करणारे व्याधि यांचा संभव विशेष आहे. शत्रु पराजित होण्याचा योग आहे. चोरांचा उपद्रव थोडाबहुत आहे. तो कुटुंबांतलाच आहे. शत्रु विशेष व जाणवतील असें असण्याचा व उत्पन्न होण्याचा संभव नाहीं. याप्रमाणें सहाव्या स्थानावर विचार होतो.

षष्ठभावारंभीं वृश्चिक राशि आहे. त्याचें तात्विक वर्णनः— कौर्य्ये रिपुस्थे, प्रभवेच्च वैरं कार्यं सुधर्मस्य नरस्यकुर्यात ॥ सार्धं द्विजैर्दैस्य सरी सुपैश्च व्यालैर्मृगैश्चोर गणैर्सराणाम ॥ या भावाचा अधिपति लाभ स्थानीं आहे त्याचें तात्विक वर्णनः—वैर पतिर्लाभ गते क्रूरे मरणं विपक्षतो भवति ॥ तस्कर कृताच हानिः स्याच्चतुष्पादाल्लाभन्मनुजः ॥ दुसरें मत शत्रुभ नाथे सप्तम आये वा तमुगे हे साहसवान्स्यात् पुत्रविहितो मान्य उदारः सद्गुणकीर्तिर्द्रव्य समेतः ॥ लग्नाच्या स्थानीं ग्रह नाहीं, ह्मणून या भाव संबंधीं फलाचा या पेक्षां जास्त विचार होऊं शकत नाहीं.

७ जायाभावः—युवति पदादुद्वाहं भार्या पतिसूपदधि गुडक्षीरं ॥ आगम गमन मदार्ति ब्रयान् मूत्राशयंच नष्टधनं ॥९॥ या भावारंभीं धनु राशि १९ अंश उदित असून तो बुध नवमांशीं आहे. अर्थात् शुभ ग्रहाचा राशि उदित आहे. या भावांत ग्रह नाहीं. भावाधिपति गुरु पंचमांत अर्थात त्रिकोणांत आहे. व शुक्र हा नैसर्गिक सुखाचा कारक ग्रह लाभस्थानीं स्वगृहीं आहे हे सर्व योग स्त्री सद्गुणी आणि सुंदर मिळण्यास व स्त्रीसुख चांगलें मिळण्यास कारणीभूत झालेले आहेत. विवाह अल्प वयांत होईल. स्त्री गौर वर्णी मिळेल. ती रोगी नसेल पण सशक्तही नसेल, नैसर्गिक स्त्रीला अनुरुप असाच तिचा बांधा असेल. तिला वात दोषानें मृत्यु येण्याचा संभव आहे विवाह अल्प वयांत झाला पाहिजे कुटुंबात शनि आहे. हा ग्रह कुंडलींत सप्तमस्थानीं अगर मकर राशींत आपल्या सप्तमांत असतां विवाहाचा विशेष संभव आहे दुसऱ्या लग्नाचा संभव आहे. पण फारच उशिरां कारण एकतर कुटुंबस्थान शुद्ध नाहीं त्या स्थानांत शनि हा पाप ग्रह आहे त्या स्थानचा अधिपति चंद्र हा अस्तंगत असून मंगळानें युक्त आहे. दुसरी गोष्ट जायास्वामी जो गुरु त्यावर पाहतो हे योग पुन्हा

लग्न करण्याचा प्रसंग आणणारच नाहीं असें ह्मणवत नाहीं. पुन्हा लग्न केलें जावो अथवा न जावो प्रसंग येणें संभवनीय आहे. या प्रमाणें जायाभावाचा विचार होत आहे.

८ अष्टमभावः—मरणाज्जिवित मरणं गुत्यस्थानंच मरण हेतुंच ॥ अल्प सुखं मृति दंशं परिभवमपि चिंतयेत्प्राज्ञः ॥ या गोष्टी अष्टमावर पाहवयाच्या ॥ बलविहिनो विलग्नेजीवे केंद्र त्रिकोणगे ॥ षष्ठष्टम व्यये पापे मध्यमायुयुदाहृतम ॥ लग्न स्वामी जो बुध तो नीच व अस्तंगत असल्या मुळें दुर्बल आहे. गुरु त्रिकोणांत आहे. ह्मणून मध्यमायु योग झालेला आहे अष्टमांत ग्रह नाहीं व अष्टमेशहि बलवान् नाहीं. त्यामुळें गुप्त धन, अनायासें प्राप्त होणारें धन, सासऱ्याकडून धन, बेवारशीधन इ० प्रकारचें प्राप्त होणें कठीण आहे. शनीच्या दोषानें मृत्यु येण्याचा संभव आहे. किंवा मंगळ चंद्र युति असल्यामुळें तापांतच वात होऊन मृत्यु येईल. याप्रमाणें अष्टमाचा विचार होतो

९ नवमभावः—शुभभवनाद्गुरुभाग्यं पितृगौत्रदयास्तपः प्राप्तिम् ॥ उरुस्थानं स्वांतं सहभोक्तृन् दान योग मपि विद्यात् ॥ या प्रमाणें नवम भावावर विचार होतो. या भावांत एकही ग्रह नाहीं. चंद्राच्या नवमांतही ग्रह नाहीं. लग्नीं बलवान् ग्रह नाहीं. नवमेश शनि हा दुर्बल आहे. या गोष्टी मनुष्याच्या दिगंत कीर्ति देतील. असा संभव नाहीं. गुरु हा त्रिकोणांत आहे. व तो आणि शनि यांत कांहींसा नवपंचमयोग आहे. त्यामुळे साधारण किर्तिमान् होईल दुष्कीर्ति मात्र नाहीं. त्याच प्रमाणें आपलें नांव आपल्यामागें ठेवील असें परोपकाराचें कृत्य घडणार नाहीं. दाता असें ह्मणेतां येणार नाहीं. साधारणतः कृपणाच्याच वर्गांत गणना होईल पण धन मात्र

कांहींतरी कारणानें इच्छा नसतां खर्च होईल. अध्यापन होणार नाहीं. बुद्धिपुरःसर यात्रायोग नाहीं. पण तो अन्य कारणानें घडेल यापेक्षां नवमभावावर जास्त विचार होत नाहीं.

१० कर्मभावः—दशमात् प्रवृत्तिमाज्ञां कीर्तिवृद्धिं प्रवासपूर्तादीन् ॥ मानं कर्मा जीवं जानुस्थानंच निर्दिशेद्दासान् ॥ १ ॥

दशम भावारंभीं मीन राशि ९अं. उदित असल्यामुळें तो बुधाच्या नवमांशीं आहे. या नवमांशानुरूप बुद्धिसामर्थ्याच्या धंद्यानें उपजीविका होईल. या भावांत बुध हा गुरूच्या राशीस गुरूच्या नवमांशीं आहे. व भावाधिपती गुरु त्रिकोणांत आहे. कुंडलींत वकिलीचा योग स्पष्ट झालेला आहे. गुरु व बुध हे दोन्ही ग्रह हाच धंदा दर्शवितात. ह्मणून वकिलीच होणार असें स्पष्ट अनुमान निघतें. मग संस्थानांत वकिली मिळो कि ॲडव्होकेट होऊन हायकोर्टांत सनद मिळो. याबद्दल निश्चय करणें शास्त्र मर्यादेच्या बाहेर आहे. पराक्रम स्थानचा अधिपति रवि हा दशम भावांत उच्च व सिंहासनांशीं आहे. हा ग्रह राजा सारखें वैभव देणारा आहे असें समजावें. हाच ग्रह जर दशमांत मध्यवर्ती असता तर नोकरीच करावी लागती. कुंडलींत शुक्र व रवि हे दोन ग्रह अत्यंत बलवान् आहेत. यांत शुक्र हा गोपुरांशीं लाभ स्थानीं आहे. त्यामुळें मान मान्यता व लौकिक चांगला संपादन होईल. गुरु हा त्रिकोणांत आहे त्याचें फलः—जीवः पुनर्हित करं महत्तरंनय विदं सुखोपेतं ॥ मंगळ स्वगृहीं आहे त्याचें फलः—आढ्यं प्रचंडमचलं भौमः कुरुते स्वराशिगःपुरुषं ॥ शुक्र स्वगृहीं आहे. त्याचें फल—दानवपूज्यः कुरुते कृषीबलं स्फीत वित्तंच ॥ बुध नीच आहे त्याचें फल—कुरुते हिमकर पुत्रः क्षुद्रं स्वज्ञाते बद्ध वैरंच ॥ कुंडलींत दोन ग्रह स्वगृहीं आहेत त्याचें फल.—

द्वौ स्वगृहस्थौ कुरुतःकुलाधिकं बंधु पूजनं धन्यं ॥ वंशकरमर्थसहितं स्थान यशोभिस्त्रयोविहगाः ॥ रवि हा उच्च असून गोपुरांशीं आहे व गुरु त्रिकोणांत आहे. त्यामुळें पिता भाग्यवान् व दीर्घायु आहे. पितृ सुखहि फार उत्तम तऱ्हेचें. रवि अत्यंत बली असल्यामुळें व दशमाधिपति त्रिकोणांत असल्यामुळें राजभय नाहीं. दशमाधिप गुरु व दशमांत असलेला लग्नस्वामी नीच बुध हे दोन ग्रह वक्री आहेत. त्यामुळें राजकृपा किंवा अधिकारी वर्गाची कृपा वक्र स्थिति असणार व ती प्रत्येक हित संबंधाच्या वेळीं आडचण येणार. पण बंधन, दंड, वगैरची भीति नाहीं. ही गोष्ट निश्चित आहे. एकंदर आयुष्य स्वार्थ परायणतेंत जाईल. लोक कल्याण बुद्धिच्या, विद्वत्तेच्या व कर्तृत्व शक्तीच्या मानाने घडणार नाहीं याप्रमाणें दशम भावाचा विचार होतो.

११ आयभावः—आयेनार्थावाप्तिं पादावपि पादावपिकामकर्ण चिंतांच ॥ जातावपिचककुजान् ज्येष्ठान् ब्रुयात्धनान्याशाम् ॥१॥ हा सर्वार्थ चिंतामणींतला श्लोक आहे. पण वास्तविक लाभ स्थानावर पाहावयाच्या गोष्टी पुढील श्लोकांत सांगितल्या आहेत त्या अशा- गजाश्व हेमांबर रत्नजात मांदोलिका मंगल मंडलानि ॥ लाभंकिलेषामसिलं विचार्य मेतत्तुलाभस्यगृहे गृहज्ञेः ॥ हत्ती, घोडे, सोन्याचे पदार्थ उंचीवस्त्रें रत्न व रत्नजडित पदार्थ, पालखी इ० वस्तूंची प्राप्ती मुख्यत्वें लाभस्थानावर पहावयाची आहे. या भावाचा अधिपति मंगळ हा लाभस्थानी स्वगृहीं आहे. व तो धनस्थानचा अधिपति जो चंद्र त्यानें युक्त आहे. शिवाय या स्थानीं गोपुरांशीं व स्वगृहीं असलेला शुक्र मध्यवर्ती आहे. ह्मणून लाभस्थानीं हें इतर सर्व स्थानांत अत्यंत बली झालें आहे अर्थात् भावो ऐश्वर्य प्राप्त झालें पाहिजे. असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. लाभस्थान हें अशा प्रकारें बलवान् असून पराक्रमाचा अधिपति रवि हा सिंहासनांशीं

दशमांत आहे. ह्मणून स्वपराक्रमानें मिळणाऱ्या संपत्तीचें मान वडिलार्जित मिळणाऱ्या धनाशीं ताडून पाहिल्यास १ : १० असें सुद्धां प्रमाण बसेल. इतकी संपत्ति नोकरीनें मिळो किंवा स्वतंत्र धंद्यानें मिळो. मिळणार हें भविष्य खरें होईल यांत शंकाच नाहीं. याप्रमाणें आयभावावरून विचार होतो.

१ लाभस्थ भौमफल.—विधेय प्रियवाक् शूरो धनधान्य समन्वितां

२ लाभस्थ चंद्रफल.—विख्यातो गुणवान् प्राज्ञो भोग लक्ष्मी समन्वितः लाभस्थानगते चंद्रे गौरो मानववत्सलः

३ लाभस्थ शुक्र फल.—। स्त्री रत्नवर रत्नाढ्यो स्वस्थःशोक विवर्जितः । संपन्न धन भृत्यश्च मर्त्यो लाभगते सिते ॥

४ लाभेश फल.—लाभाधिपो लाभगतः करोति दीर्घायुषं पुष्कल पुत्रयुक्तं ॥ सकर्मकं रूपयुतं सुशीलं जनप्रमोदप्रवणं पुमांसम् ॥

लाभ स्थानच्या ग्रहावरून कोणता ग्रह कितव्या वर्षी फल देतो या विषयीं:—

लाभे रविर्जित समामितलाभमिंदौ भूपाच्च लाभमसृजिर्जिनवर्ष लक्ष्मीम् ॥ ज्ञः पंचवेद धनमीज्य इंनाद्व लक्ष्मींशुक्रःकरोति धन मार्किफलं कुजोक्तम् ॥ लाभस्थ चंद्र २४व्या वर्षी मंगळ २४ व्या व शुक्र १२ व्या वर्षी लाभ देतो असा वरील श्लोकाचा आशय आहे. अनुभव पहावा.

१२ व्ययभाव—या भावावर दंड कैद, हानि, धन, मरणानंतरची स्थिति, शयनादि सुखें इत्यादि गोष्टींचा विचार होतो. कुंडलींत या स्थानांत ग्रह नाहीं. व्ययस्वामी लाभस्थानीं बलवान् आहे ह्मणून मरणानंतर श्रेष्ठ लोक प्राप्त होईल. कारण ' उच्चस्थे श्रेष्ठलोकःस्यात् ' पर्यंकादि सुखें मिळतील असाहि योग आहे. कारण —व्ययेशे स्वोच्च राशिस्थे शुभवर्ग समन्विते ॥ शुभ ग्रहेण संदृष्टे पर्यंकशयनं वदेत् ॥

बंधन, दंड, कैद इ०ची भीति नाहीं यापेक्षां जास्त विचार या भावावर होऊं शकत नाहीं.

काल विचार.

जन्मकालीं द्वितीय स्थानीं जो शनि आहे तो चंद्राच्या चतुर्थ स्थानीं असल्यामुळें प्रकृतीस अपायकारक झाला. हर्शल चंद्रासमोर व चंद्र मंगळाशीं युति करितो त्यामुळें जन्म झाल्यावर एक महिन्याच्या आंतच झटके आले पाहिजेत. तिसऱ्या वर्षी पुन्हा शनि व राहु हे बिघडले आहेत. राहु हा चंद्राला चवथा व शनि हा लग्नाला चवथा झाला होता. हा काल स्वतःला व मातेलाहि कष्टप्रद होतो. वयाच्या ९।१०।११ या वर्षांत शनि हा चंद्राला ८ वा असून १० व्या व ११व्या वर्षी तर षष्ठ स्थानीं होतो म्हणून फार अनिष्ट होता. शिवाय तो हर्शलशीं युति करीत होता व राहु अष्टमांत होता म्हणून या ग्रह स्थितीवरही फार कष्ट झाले असले पाहिजेत. १९०१।२ मध्यें शनि अष्टम स्थानीं होता व राहु हा चंद्राला आठवा होता. या वेळींही थोडे बहुत कष्ट संभवतात. सन १९०५ मध्यें साडेसातीस सुरवात झाली असून राहू हा चतुर्थ स्थानीं होता. व मंगळ वृश्चिक राशींत ७ महिने होता. त्यामुळें हें वर्ष कष्टाचें गेलें पाहिजे. यावरून ध्यानांत येईल कीं शनि, राहू, मंगळ व रवि हे ग्रह कर्क, कन्या, वृश्चिक, मकर व मेष राशींत असतां शारीरिक त्रास, कष्ट व आजार उत्पन्न होणें शक्य आहे. यासाठीं या राशींत ते ग्रह केव्हां असतील ते पुढील २० वर्षांचे दिल्यानें बोध होण्यासारखा आहे. दोन किंवा अनेक ग्रह एकाच काळीं जेव्हां बिघडतील तेव्हां येणारें दुखणें

विशेष जाणावेल. एका ग्रहानें साधारण जाणावेल. किंवा दुखणें न येतां प्रकृती साधारण नादुरुस्त व अस्वस्थ राहील.

शनि २० वर्षांचा.

(१) १९०८ एप्रिल ते १९१० जून मेष राशींत
(२) १९१४ सप्टेंबर ते १९१६ नवंबर कर्क
(३) १९१९ आगष्ट ते १९२१ अकटंबर कन्या
(४) १९२३ डिसेंबर ते १९२६ नवंबर वृश्चिक

राहु २० वर्षांचा

[१] १९१२ ते १९१३ मेष
[२] १९१६ ते १९१७ मकर
[३] १९२० ते १९२१ वृश्चिक
[४] १९२२ ते १९२३ कन्या
[५] १९२६ ते १९२७ कर्क
[६] १९३१ ते १९३२ मेष

मंगळ २० वर्षांचा

[१] १९०९ आगष्ट ते १९१० फेब्रुवारी मेष.
(२) १९१० मे, जून—कर्क. आगष्ट, सप्टेंबर—कन्या. नवंबर डिसेंबर—वृश्चिक.
[३] १९११ फेब्रुवारी—मकर. जून, जुलई—मेष.
(४) १९१२ एप्रिल, मे-कर्क. आगष्ट-कन्या. नवंबर-वृश्चिक.
[५] १९१३ जानेवारी, फेब्रुवारी-मकर. जून-मेष. या वर्षी मंगळ कर्क राशींत वक्री आहे. त्यामुळें हें साल सांपत्तिक

कौटुंबिक व शारीरिक सुखाला कष्टप्रद होईल. १९१३ च्या सप्टेंबर अर्धापासून १९१४ एप्रिल अखेर पर्यंत मंगळ कर्क राशींत वक्री झालेला आहे. या मंगळाची जरूर जरूर आराधना करावी.

(६) १९१४ जुलै—कन्या. अक्टंबर—वृश्चिक.

[७] १९१५ जानेवारी-मकर. मे-मेष. सप्टंबर-कर्क.

(८) १९१६ जून. जुलई—कन्या. अक्टंबर—वृश्चिक. या वर्षी मंगळ सिंह राशींत वक्री आहे. तो मातृसुखाला प्रतिकूळ होईल. डिसेंबर—मकर.

[९] १९१७ एप्रिल-मेष. आगष्ट-कर्क. डिसेंबर-कन्या.

(१०) १९१८ सप्टंबर—वृश्चिक. डिसेंबर—मकर.

[११] १९१९ मार्च्य, एप्रिल-मेष. आगष्ट-कर्क. नवंबर-कन्या.

(१२) १९२० या सालीं मंगळ वृश्चीक राशींत वक्री आहे. या साठीं त्याची आराधना करावी. नवंबर—मकर

[१३] १९२१ मार्च—मेष. जुलई—कर्क. अक्टंबर—कन्या.

(१४) १९२२ या वर्षी मंगळ धनु राशींत वक्री आहे. तो स्त्रीला व स्त्री सुखाला अनिष्ट आहे.

[१५] १९२३ फेब्रूवारी—मेष. जून—कर्क. सप्टंबर—कन्या.

(१६) १९२४ जानेवारी—वृश्चिक. एप्रिल—मकर.

[१७] १९२५ जाने. मेष. जून-कर्क. सप.-कन्या. डिसें.-वृश्चिक.

(१८) १९२६ मार्च—मकर. जुलई.

[१९] १९२७ मे-कर्क. आगष्ट-कन्या. नवंबर-वृश्चिक.

(२०) १९२८ फेब्रू.-मकर. जून-मेष. या वर्षी अक्टंबर पासून कर्क राशींत मंगळ वक्री आहे. ह्मणून त्याची आराधना करावी.

अभिवृद्धीचा काल

१ भाग्यभावारंभीं कुंभ राशि आहे ह्मणून या राशींत ज्या ज्या वेळीं शनि येईल, तो तो काल अभिवृद्धीचा किंवा भाग्याचा समजावा सन १९०३ च्या फेब्रूवारी पासून १९०९ च्या एप्रिल पर्यंत हा काल आहे. १९०२ मध्यें गुरु भाग्यस्थानीं, १९०४ मध्यें गुरु मेष राशींत लाभ स्थानीं, १९०५ मध्यें साडेसातीला मे पासुन आरंभ झाला. मीन राशींत शनि असल्यामुळें साडेसातीच्या आरंभीं उदयच संभवतो. या सालीं शनि सर्व वर्षांत भाग्यरथ आहे. १९०६ मध्यें गुरु तनु स्थानीं मिथुन राशींत, चंद्राला ३ रा आहे. व आगष्ट पासून तो कर्क राशीचा होऊन १९०७ मध्यें पूर्णपणें विद्यास्थानीं आल्यामुळें हा भाग्योदय काल होतो. सन १९०८ मध्यें शनि हा रवीवरून जातो. ह्मणून हें वर्ष राजकीय गोष्टींस त्रास दायक होतें. पण गुरु हा सिंह राशींत चंद्राला ९ वा झाला असल्यामुळें सर्व संकटें दूर होऊन भाग्योदयही होईल. शनि हा सन १९०८ च्या एप्रिल पासून १९०९ च्या एप्रिलपर्यंत रवि, चंद्र व मंगळ यांच्यांत वक्रगतीनें घोटाळत असल्यामुळें हा काळ अति त्रास दायक झाला पाहिजे. साडेसातींत शनि मेष राशींत असतां कोणतेंही कार्य नीट रीतीनें तडीस न जातां मन उद्विग्न होईल. पुढें तो वृषभ राशींत एकादशस्थानीं जाईल. १९०२ पासून १९०६ पर्यंत गुरु व १९०३ पासून १९११ च्या अर्धापर्यंत शनि हे ग्रह नवमस्थानापासून एकादेशस्थानापर्यंत भ्रमण करितात. ह्मणून आयुष्यांतल्या या वयांतल्या भाग्याच्या गोष्टी ह्मणजे विवाह, संतति व परीक्षा, उद्योग धंदा लागणें इ० घडणें स्वाभाविक आहे. कुंडलींत रवि,

मंगळ व शुक्र हे तीन ग्रह फारच बलवान् आहेत. यांत रवि उच्च आहे. उच्च रवीच्या दशाकालीं कोणत्या गोष्टी घडतात हें पुढील श्लोकांत वर्णिलेलें आहे.—

॥ पाके प्रदीप्तस्य धराधिपत्य मुत्साहशौर्यं धनवाहनेच ॥
॥ स्त्रीपुत्रलाभं शुभबंधुपूज्यं क्षितीश्वरान् मानमुपैति विद्वान् ॥

या ग्रहाची दशा ता० ८ अक्टोंबर १९०८ पासून सुरू होते. ह्मणून या दशेचा काल परीक्षेचा शेवटचा रिझल्ट आणि धंद्याचा आरंभ व त्यांतच भरभराट असा गेला पाहिजे हें सिद्ध आहे. या दशेच्या पूर्वी शुक्राची महादशा होती. हा ग्रह लाभस्थानीं स्वगृहीं गोपुरांशीं आहे. या दशेचें फलः— ॥ स्वस्थस्य खेटस्य दशाविपाके स्वस्थोनृपालब्ध धनादिसौख्यं ॥ विद्यांयशप्रीति महत्व मादादारार्थ भूम्यादिजधर्ममेति ॥ २ हीं सर्व या दशेंत चांगलीं अनुभवा आलीं पाहिजेत.

रविमहादशेंत रवि, मंगळ व गुरु यांच्या अंतर्दशा उन्नतीच्या जातील. चंद्र व बुध यांच्या मध्यम, आणि इतर दुःखदायक होतील. त्यांचे कालारंभ त्या त्या अंतर्दशांच्या खालीं दिले आहेत.

रविमहादशेनंतर चंद्राची महादशा सुरू होते. या ग्रहाची महादशा कित्येक गोष्टींत दुःखदायक जाईल. धनाची वाढ साधारण होईल, कारण हा ग्रह द्वितीय (मारक) स्थानाचा अधिपति असून पाप ग्रहानें युक्त व अस्तंगत असा आहे. या दशेचें फल पुढील श्लोकांत वर्णिलेलें आहे तशा प्रकारचें मिळेल.

॥ वैकल्यखेटस्य दशाविपाके । वैकल्यमायाति मनोविकारं । मित्रादिकानां मरणं विशेषात् स्त्रीपुत्रयानांबरचोरपीडा । कोपान्वितस्यापि दशाविपाके पापाःसमायांति बहुप्रकारै र्विद्या धन स्त्री सुत बंधुनाशं पुत्रादि कृच्छ्रात्त्वथनेत्ररोगं ॥

चंद्र महादशेनंतर मंगळाची अंतर्दशा आहे. ही दशा बरीच चांगली असून या दशेंत अनेक प्रकारचे लाभ होतील. या दशेचें फल शुक्राच्या दशे प्रमाणेंच आहे.

सन १९१० हें वर्ष संतति, विद्या व उद्योग दर्शविते सन १९११ हेंही वर्ष बरें आहे. पण शनि व्ययस्थानीं व गुरु चंद्राच्या अष्टमांत असल्यामुळें उन्नति होणें कठीण दिसतें.

सन १९१२ या वर्षी गुरु हा चंद्राला ९ वा असून शनि व्ययस्थानींच आहे ह्मणून १९१२ या वर्षी गुरु चंद्राला ९ वा असून शनि व्ययस्थानीं आहे. ह्मणून या सालीं किंचित् भाग्योदय होईल. पण सांपत्तिक दुर्बलता असेल.

सन १९१३।१४ हीं दोन सालें उदयाचीं आहेत. त्यांत १४ हें साल अप्रतीम आहे. कारण गुरु भाग्यस्थानीं व शनि तनुस्थानीं मिथुनेंत अस्तंगत आहे व हर्शलही भाग्यस्थानीं गेला आहे. ह्मणून या सालासारखें मागील ९ वर्षांत उत्तम साल नाहीं.

सन १९१५च्या आरंभीं सुमारें ३।४ महिने ठीक जातील. पुढें विपत्ति, निर्धनत्व व सांपत्तिक आणि कौटुंबिक हानि होईल. शनीची आराधना करावी.

सन १९१६ हें साल लाभ व हानि या दोहोंचेंही समसमान दर्शक आहे. कारण गुरु लाभस्थानीं व शनि धनस्थानीं आहे. राहु अष्टमांत आहे. सन १९१६।१७ हीं वर्षें स्त्रीला चांगलीं जाणार नाहींत. १७ मध्यें लाभ योग बरा आहे. माता पितरांचें सुख सन १८च्या पुढें मिळेलच असें दिसत नाहीं. त्यांत प्रथम माता व नंतर पिता असा योग आहे.

सन १९१७।१८ हीं वर्षें चांगलीं आहेत. पुष्कळ धन मिळून अभिवृद्धि होईल. भावंडा संबंधाला हा काल वाईट जाईल असें वाटतें.

सन १९१९।१९२० किंचित् शारीर कष्ट आहेत. धन लाभ चांगला.

सन १९२१।२२ मध्यें पुष्कळ मोठाले लाभ व राजयोगाप्रमाणें स्थिति.

सन १९२३ हें साल चांगलें नाहीं. गुरु ८ वा आहे.

सन १९२४ हें साल संपत्तीला चांगलें जाईल.

सन १९२५ साल अनिष्ट आहे.

सन १९२६ मध्यें शारीर कष्ट आहेत. पण सांपत्तिक उदयकाल आहे. सन १९२६।२७।२८।२९ हीं वर्षें उन्नतीचीं आहेत सन १९३३ पासून शनि भाग्यभुवनाकडे भ्रमण करूं लागेल. सन १९३३।३४ वर्षें फारच उत्तम स्थितींत जातील. व सन १९३५ च्या मार्च्य पासून साडेसाती लागेल.

सन १९२९।३०।३१ मध्यें हर्शल मेष राशींत असून शनि अष्टमांत त्याच्या दशमांत मकर राशींत आहे. व राहु मेष राशीला आहे. ह्मणून हा काल शारीरिक व राजकीय गोष्टींत फार कठीण जाईल.

॥ इति शुभं भवंतु ॥

नूतन प्रश्नपद्धति.

अनेक वेळां प्रयोग करून आह्मी एक प्रश्नपद्धति बसविली आहे. या पद्धतींत एकही आंकडा मोडावा लागत नाहीं, त्यामुळें तिचा गणिताचें यत्किंचित्ही ज्ञान नसतां उपयोग करून घेतां येतो. ही पद्धति वर वर पाहणारास निरर्थक दिसेल, परंतु तींत एक चमत्कार आहे, त्यामुळें ती सत्य असून अचूक फल देणारी आहे असें सहज सिद्ध करितां येतें. वेळेवरून कुंडली तयार करून अथवा इतर कोणत्याही पद्धतीनें प्रश्न पाहण्यापेक्षा या नूतन पद्धतीनें पाहणें सुलभ आहे, इतकेंच नाहीं तर अनुभवही चांगला येतो. ह्मणून तिचें स्वरूप काय आहे तें सांगण्याचें योजिलें आहे. प्रश्न पाहणारा जर चतुर व उत्तम कल्पक असेल तर या एकाच पद्धतीनें वाटेल त्या प्रश्नास ज्योतिष्याला उत्तर देतां येईल.

रीति.—एका कागदावर प्रश्न पाहणारानें आपल्या उपास्य देवतेचें चित्र काढावें अथवा त्या चित्राचे फार्मच तयार करून ठेवावे. नंतर त्या खालीं एक कुंडली आखावी. याप्रमाणें एक कागद तयार करून तो प्रश्न विचारणाराच्या पुढें ठेवावा. व त्याच्याकडून त्याच्याच उपास्य देवतेचें स्मरण करवून कुंकुम, फूल, पुष्प व विडा त्या कागदावर त्यास ठेवण्यास सांगावें. मग तो कागद दुसऱ्या एखाद्या मनुष्याच्या पुढें ठेवून त्याकडून त्या कुंडलींत त्याच्या इच्छेप्रमाणें राशि व ग्रह भरून घ्यावे. कुंडली भरणाराने राशींचे अंक मात्र कुंडलींत लग्नानुक्रमानें घालावे व ग्रह

मनास वाटतील तेथें घालावे हें काम विचार न करितां फारच जलदीनें झालें पाहिजे. अशा पद्धतीनें जी कुंडली तयार होईल तीच प्रश्नकुंडली मानून ज्योतिष्यानें ग्रहबलानुसार उत्तर द्यावें.

सूचना.—उत्तर घाईनें देऊं नये. पूर्ण विचार करून द्यावें. तोंडी उत्तर देण्यापेक्षां तें त्याच कागदावर लिहून काढावें. कारण मनुष्य लिहितांना स्वाभाविकच पुष्कळ विचार करितो.

चमत्कार.—अशा पद्धतीनें मांडलेल्या कुंडलींत एक चमत्कार दृष्टीस पडतो. ज्या मनुष्यासाठीं ही कुंडली मांडली असेल, त्या मनुष्याची जन्मकुंडली जर आपण पाहिली तर तिच्यांत व या प्रश्नकुंडलींत पुढील एक अथवा अनेक साम्यें आढळण्यांत येतील.

१ लग्न एकाच राशींत किंवा एकमेकांच्या सप्तम राशींत.

२ त्रिकोणस्थ राशि एकच.

३ चंद्र एकाच राशींत किंवा एकमेकांच्या सप्तम राशींत.

४ चंद्राचे त्रिकोणराशि एकच.

५ कित्येक ग्रह उभय कुंडल्यांत एकाच राशींत किंवा एकाच स्थानांत.

६ कित्येक ग्रह एकमेकांपासून एका कुंडलींत जितक्या अंतरावर असतात तितक्याच अंतरावर ते दुसऱ्या कुंडलींत असतात.

७ केंद्रीं किंवा त्रिकोणांत असलेले ग्रह व्यत्यासानें दुसऱ्या कुंडलींत असतात.

८ कित्येक ग्रह एकमेकांच्या सप्तमांतही असतात.

प्रश्नकथन.—याच कुंडलीवरून प्रश्नकर्त्तो काय विचारणार तेंही सूक्ष्म विचारानें सांगतां येईल. पण, विचाराची दिशा मात्र

चुकतां कामा नये, हा विचार अमुकच एका पद्धतीनें करावा असें सांगतां येणें शक्य नाहीं. हे ज्याच्या त्याच्या चातुर्यावर व कल्पकतेवर अवलंबून आहे. लग्न, लग्नस्वामी व चंद्र यांच्या स्थितीवरून प्रश्नकर्त्याच्या प्रश्नाची कल्पना करावयाची असते. लग्नांत कोणता ग्रह आहे व तो कोणत्या स्थानाचा स्वामी आहे, अथवा कोणत्या स्थानाचा स्वामी लग्नावर पाहतो आहे व चंद्र कोणत्या स्थितींत आहे हें पाहून पृच्छकाच्या प्रश्नाची कल्पना करावी. उदाहरणार्थ पुढील कुंडली पहा.



वरील कुंडली प्रश्नकाळीं एका मनुष्यानें भरून दिली. या कुंडलींत सिंह लग्न उदित असून त्याचा अधिपति जो रवि तो चतुर्थ स्थानीं बसला आहे, व त्याच्या समोर त्याचा शत्रु जो शनि तो दशमांत बसला आहे. यावरून आपणास असें दिसून येईल कीं, प्रश्नकर्त्ता मोठ्या विपत्तींत पडला असून अत्यंत भयभीत झालेला आहे. चंद्रानें व्यय स्थानाचें आधिपत्य घेतलें असून तो लग्नस्वामीच्या धनस्थानीं बसला आहे व त्याच्या धनस्थानीं मंगळ आहे. यावरून प्रश्नकर्त्याचा प्रश्न संपत्तीच्या अडणीचा असला पाहिजे असें अनुमान होतें. शिवाय प्रश्नकर्त्याला सावकाराचा भयकर तगादा असला पाहिजे किंवा त्याचें धन त्याच्याजवळून कोणत्यातरी निमित्तानें नाहींसे झाल्यामुळें आतां

काय करावें, अब्रू कशी बचावते, आपणास पुनः धन मिळेल कीं नाहीं अशा प्रकारच्या त्यास विवंचना पडल्या असाव्या. या प्रमाणें प्रश्नकुंडलीवरून प्रश्नाचें अनुमान होत आहे. वस्तुस्थिति अशीच आहे. या मनुष्याच्या दुकानांत चोरी होऊन सुमारें ७५ तोळे सोनें व कांहीं रोकड इतका ऐवज नाहींसा झाला. प्रश्नकर्त्याचें जें ऐश्वर्य तें इतकेंच असून शिवाय तें सावकाराचें होतें. त्यामुळें त्याची अब्रू जाण्याची वेळ आलेली आहे या ऐवजाची फेड करण्यास त्यास अन्य कांहींच साधन नसल्यामुळें तो भयंकर चिंतेत पडला आहे.

या कुंडलींत चंद्र धनु राशींत आहे. प्रश्नकर्त्याचाही चंद्र याच राशींत लग्नीं आहे. त्याची जन्मकुंडली मिळाली नाहीं. ती मिळाली असती तर आणखी एखादा चमत्कार पहण्यास मिळाला असता!

लग्नस्वामी रवि हा आपल्या शत्रूच्या पूर्ण दृष्टींत आहे, त्यामुळें चोरी सांपडणें कठीण आहे. तथापि कुंडलींत पूर्ण मालायोग झालेला आहे व तो चतुर्थ स्थानापासून दशम स्थानापर्यंत झालेला आहे, आणि चंद्र व शुक्र हे त्रिकोणस्थ असून बुध लग्नावर पूर्णपणें पाहत आहे, म्हणून दीर्घ कालानें या चोरीचा पत्ता लागावा असें अनुमान होतें.

शनि हा सप्तमेश व षष्ठेश आहे, म्हणून स्वतःचे चाकर अगर ठेवलेली स्त्री यांपैकीं कोणीतरी चोरी केलेली असावी. षष्ठ व सप्तम या स्थानावर ज्यांचा विचार होतो अशा एखाद्या व्यक्तीकडून ही चोरी झालेली असली पाहिजे. चोराचा वर्ण व त्याचें रूप शनीच्या धर्माप्रमाणें असेल, किंवा सप्तम स्थानीं बुध आहे म्हणून त्याच्याप्रमाणें चोर असेल असें वाटतें. याप्रमाणें या नूतन पद्धतीनें प्रश्न व त्याचें उत्तर देतां येतें. वाचकांनीं अनुभव घेऊन आपलें मत कळवावें.

कुंडलीविज्ञान

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥

'भवभूतिः'

पुस्तक ७ वें.] मार्गशीर्ष कृ. २, शनिवार [अंक २९ वा

आयुष्याचे विभाग.

जन्मपत्रिका वर्तविणारास आयुष्याच्या विभागांचें ज्ञान अवश्य पाहिजे. एरवीं पत्रिका मुद्देसूद तयार होणार नाहीं; म्हणून आम्हीं आपल्या बुद्धयनुसार आयुष्याचे विभाग केले केले आहेत, ते असे.—

१ ला.— शिशुपर्व. जन्मापासून ८ वर्षांपर्यंतचा काल. या कालांत जन्मणारानें खावें, प्यावें, यथेच्छ खेळावें व झोंप घ्यावी.

२ रा.— विद्यापर्व. ९ या वर्षापासून २० वर्षांपर्यंतचा काल. या कालांत जन्मणारानें गुरूजवळ अध्ययन करावें.

३ रा.— उद्योगपर्व. २१ व्या वर्षापासून ३० वर्षांपर्यंतचा काल. 'विशी विशा, आणि तिशी धन' अशी एक म्हण आहे. तिला अनुसरून हे भाग केले आहेत. या कालांत जन्मणारानें उद्योगधंदा करावा व विवाह करावा.

४ था.— लौकिकपर्व. ३१ व्या वर्षापासून ६० वर्षांपर्यंतचा काल. या कालांत जन्मणारानें सर्वत्र लौकिक संपादन करावा.

५ वा.—वृद्धपर्व. ६ व्या वर्षापासून ९० वर्षापर्यंतचा काल. या कालांत जन्मणारानें आजपर्यंत मिळविलेल्या धनावर उपजीविका करून ईश्वरभक्ति करावी.

६ वा.— मृतपर्व. ९१ व्या वर्षापासून १२० वर्षापर्यंतचा काल. या कालांत जन्मणारानें परस्वाधीन होऊन मृतवत् खाटेवर पडावें.

शिशुपर्वांत बुद्धीचा कल खेळण्याकडे असतो. ह्मणून या कालांत त्यांच्यावर विद्येचें दडपण टाकणें आयुष्यास हानिकारक आहे. विद्यापर्व सुरू झालें ह्मणजे बुद्धीला ग्राहकशक्ति प्राप्त होते, वरेवाईट कळू लागतें, ह्मणून या पर्वांत मुलाच्या शिक्षणाची हयगय करूं नये. ज्याप्रमाणें शिशुपर्वांत विद्येचें जोखड वाटतें त्याचप्रमाणें विद्यापर्वांत धंद्याचें जोखड वाटतें. उद्योगपर्वांत बुद्धीचा कल विद्याभ्यासावरून उडून उद्योगधंद्याकडे वळतो. या कालांत लौकिकाची विशेष पर्वा नसते. तारुण्याची भर ज्वानी असल्यामुळें गर्व आणि मद यांचें प्राबल्य विशेष असतें, त्यामुळें साहजिक लौकिकाचें जोखड वाटतें. लौकिकपर्वांत जगांत नांव मिळविण्याकडे बुद्धीचा कल असतो. शक्ति कमी होत चालल्यामुळें व व्यवहारांत हजारों अडचणींचा अनुभव आल्यामुळें गर्व आणि मद कमी होत जात असतो. लोकांनीं आपणांस चांगलें ह्मणावें अशी इच्छा प्रबल झाल्यामुळें लौकिकासाठीं या कालांत फारच हापापलेला असतो. वृद्धपर्वांत परमेश्वराकडे लक्ष अधिक लागूं लागतें. कामधंदा होत नाहींसा होतो व त्यामुळें जें मिळविलेलें असेल, त्यावरच निर्वाह करावा लागतो. मृतावस्थेंत शरीर परस्वाधीन झालेलें असतें. त्यामुळें खाटेवर पडून कालक्रमणा करण्याशिवाय गत्यंतर नसतें. या प्रमाणें आयुष्याचे विभाग ठळक आहेत. या विभागांस आह्मीं पर्व असें ह्मटलें आहे शिशु, कुमार, तरुण व वृद्ध या चार अवस्था प्रसिद्ध आहेत. तरुण आणि वृद्ध यांच्या मध्येंही एक अवस्था आहे तिला प्रौढ असें ह्मणतात. या पांच अवस्था आणि आमच्या पांच अवस्था यांत बरोबर साम्य आहे. ६ वी अवस्था मात्र आह्मीं जास्त कल्पिलेली आहे व तिच्यांत आणि वृद्धावस्थेत स्पष्ट फरकही आहे.

एकशें वीस वर्षांच्या आयुर्मर्यादेंत नेपच्यूनची $\frac{२४}{३३}$ ह्म० सुमारें पाऊण प्रदक्षिणा होते; हर्शलची सुमारें १॥ होते. शनीच्या सुमारें ४ प्रदक्षिणा होतात; राहूच्या सुमारें ७ प्रदक्षिणा होतात. व गुरूच्या १० प्रदक्षिणा होतात.

शनीच्या प्रदक्षिणेंत पहिलीं तीन पर्वें पुरीं होतात. दुसऱ्या प्रदक्षिणेंत लौकिकपर्व पूर्ण होतें. तिसऱ्या प्रदक्षिणेंत वृद्धपर्व पूर्ण होतें. आणि चवथ्या प्रदक्षिणेंत मृतपर्व पूर्ण होतें.

कुंडलींत १२ घरें असतात. ह्मणून प्रत्येक पर्वाचे दोन दोन भाग होतात. अष्टमस्थान हें मृत्यस्थान आहे. ह्मणून पर्व व भाव यांची वांटणी अशी होते.—

पर्व	भाव
१ शिशुपर्व	नवम व दशम
२ विद्यापर्व	एकादश व द्वादश
३ उद्योगपर्व	लग्न व द्वितीय
४ लौकिकपर्व	तृतीय व चतुर्थ
५ वृद्धपर्व	पंचम व षष्ठ
६ मृत्युपर्व	सप्तम व अष्टम

---

१ शिशुपर्व.—या पर्वांत मुख्यत्वें शारीरिक सुखदुःख, मातृपितृसुख व विद्यारंभ इतक्याच गोष्टींचा विचार होईल.

२ विद्यापर्व.—या पर्वांत शारीरिक क्लेश, मातृपितृसुख, विद्या आणि क्वचित् विवाह या गोष्टींचा विचार होईल.

३ उद्योगपर्व.—या पर्वांत, स्त्रीसुख, संतति, धंदा, पैसा, शारीरिक क्लेश व मातृपितृसुख या गोष्टींचा विचार होईल.

४ लौकिकपर्व.— या पर्वांत मुख्यत्वें संपत्ति आणि वैभव व कीर्ति यांचा विचार होईल. त्याचप्रमाणें स्त्री, संतती व शरीर यांच्या सुखाचाही विचार होईल.

५ वृद्धपर्व. — यांत मुख्यत्वें शारीरपीडा, वैभव व कुटुंबांतील माणसांचें सुख या गोष्टींचा विचार होईल.

६ मृत्युपर्व.— यांत मुख्यत्वें मृत्यूचें वर्णन येईल.

यापमाणें सहाही पर्वांचें पद्धतशीर वर्णन पत्रिकेंत केलें पाहिजे. हें वर्णन शनि, गुरु इ० ग्रहांच्या परिभ्रमणावरून व विंशोत्तरी दशांच्या शुभाशु-

भत्वावरून करावें, ह्मणजे ती पद्धतशीर पत्रिका झाली.

विद्यापर्वाचा विचार फक्त सुधारलेल्या जातींत होईल. कित्येक जातींत विद्या मुळींच शिकवीत नाहींत व कित्येकांत लिहिण्यावाचण्यापुरतीच विद्या शिकवितात. या दोन्ही प्रकारच्या जातींचा कल विद्येकडे नसून धंद्याकडेच असतो. ह्मणून या पर्वाचा विचार फार नाजूक होईल. लिहितां वाचतां येणें किंवा इंग्रजी अगर मराठी ७व्या यत्तेपर्यंत शिकणें या गोष्टी विद्या सदरांत येत नाहींत. कॉलेजांतील शिक्षण व परीक्षा, वेदशास्त्रपठण किंवा दुसऱ्या भाषेचें अध्ययन या गोष्टींचा समावेश विद्येंत होईल. ह्मणून विद्येचें विवेचन करितांना अमुक मनुष्य अमुक विद्येच्या मर्यादेस जाण्यास पात्र आहे, इतकाच आपणांस बोध होईल. मारवाडी लोकांत शिक्षण लिहिण्या वाचण्यापेक्षां अधिक नसतें. हजारांत एखादा सातव्या यत्तेपर्यंत व डिग्री मिळवीपर्यंत अध्ययन करितो. अशा मनुष्याची कुंडली जात न कळतां वर्णन करावयाचा प्रसंग येईल तेव्हां विद्यादर्शक ग्रहस्थिति असतांही तो यत्किंचितही शिकलेला नाहीं, असें आढळून येईल. तेथें इतकें मात्र खरें आहे कीं, तो जर शिकला असता तर विद्वान् झाला असता. ब्राह्मणादि जातींत अशी ग्रहस्थिति असतां विद्वान् होईल असें सांगतल्यानें बहुधा खोटें ठरत नाहीं. तरी पण खेडेगांवांत ब्राह्मणांचेंही शिक्षण कालेजपर्यंत गेलेलें फारसें आढळणार नाहीं. ह्मणून विद्यापर्वाचा विचार परिस्थितीला अनुसरूनच केला पाहिजे. ज्योतिःशास्त्रच असें आहे कीं, तें स्वतंत्रतेनें फक्त तत्व सांगतें. व्यवहार सांगत नाहीं. ज्योतिष्यास व्यवहार कळेल तर तो पत्रिकेचें वर्णन ज्योतिःशास्त्राच्या तत्वांच्या आधारानें बरोबर करील. ज्योतिःशास्त्रांत लिहिण्यावाचण्यापुरतें शिकेल कीं कालेजांत अध्ययन करील कीं मोठा जाडा विद्वान् होईल हें सांगितलेलें नाहीं. फक्त अमुक प्रकारची व मर्यादेची योग्यता प्राप्त करून घेण्याचें सामर्थ्य आहे अथवा नाहीं इतकेंच कुंडलीवरून कळेल. एखाद्या मनुष्याचा गळा उत्तम असतो, पण तो गाण्यास न शिकल्यामुळें गवई हें पद त्याला प्राप्त होत नाहीं. पण तो जर गाण्याचा अभ्यास करील तर गवई होईल असें ज्याप्रमाणें आपण ह्मणतों तसेंच त्याची कुंडलीही सांगेल.

एका नामांकित ज्योतिष्यानें एकाला सांगितलें कीं, 'तुह्मांला येवलें येथें १५ रु० पगाराची कारकुनीची जागा मिळेल' ज्योतिःशास्त्रांत इतकें सांगतां येईल, असा कोणता ग्रंथ त्या अगडबंब ज्योतिष्यास माहीत असेल तो असो. प्रश्न विचारणारा शाळामास्तर आहे. तो नाशिक जिल्ह्यांतला आहे, त्याची त्याच जिल्ह्यांत रेव्हेन्यूकडे नोकरी मिळविण्याची खटपट आहे, ह्मणून या धोरणानें वरील उत्तर दिलेलें दिसतें. दहा रु० पगाराच्या शाळामास्तरास रेव्हेन्यूकडे प्रथमतःच १५ रु० पगार मिळेल ही गोष्ट असंभवनीय आहे, असें वाटतें! पहावें जोशीबुवा नाव गमावतात कीं कमावतात तें!

ही गोष्ट सांगण्याचें कारण इतकेंच कीं असल्या गोष्टी सांगण्याचें सामर्थ्य ज्योतिःशास्त्रांत नाहीं. हा अंतर्दृष्टीचा विषय आहे. पंधरा रुपयांचीच रेव्हेन्यूकडे लागेल हें सांगणें तर अशक्य आहे! इतकेंच नव्हे तर 'लागेल' इतकें सांगणेंही असंभवनीय आहे. असो-सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं ज्योतिःशास्त्राचें सामर्थ्य मर्यादित असून तात्विक आहे. ह्मणून तत्वें व व्यवहार विचारांत घेऊन शिशुपर्वादि पर्वांचें ज्योतिःशास्त्राच्या मर्यादेंत वर्णन करावें, असें आमचें मत आहे.

राष्ट्रीय सभा.

या वर्षाच्या २१ व्या अंकांत यंदाच्या राष्ट्रीय सभेसंबंधानें जें विवेचन केलें होतें, त्याचा आतांचांगला अनुभव आला आहे. नागपुरास बखेडा होऊन ही सभा सुरतेस गेली आहे. तरी पण शनीमंगळांच्या युतीचा परिणाम वास्तविक ही सभा ज्या वर्षी भरणार त्या वर्षीच असल्यामुळें ती सुरक्षित पार पडेल असें वाटत नाहीं. शनि व मंगळ यांची युति ता. ३० डिसेंबर रोजीं सायंकाळीं ४॥। वाजतां आहे. ही युति होऊन गेल्यावर जर सभा झाली असती तर ती अनिष्ट स्थितीतून बचावली असती. तात्पर्य, नागपूरची जरी सुरत झाली तरी सभा सुरक्षित

झाली असें म्हणतां येत नाहीं. शनि हा दशमाचा व मंगळ हा लग्नाचा स्वामी असल्यामुळें मुख्य वाद अध्यक्षाचा पडला आहे, ही गोष्ट चमत्काराची आहे! शनि हा दशमाचा स्वामी असून तो जन्मकालींच दुर्बळ आहे. हा दुर्बळ शनि या वर्षी संस्थेच्या व्ययस्थानीं आला असून त्यांत विशेष हें कीं तो जन्मस्थ मंगळाच्या अगदीं समोर आला आहे! आणि मंगळ त्याच्याशीं युति करणार आहे!! अर्थात् ही स्थिति फार अनिष्ट झालेली आहे व तिचा अनिष्टपणा अद्याप सरला नाहीं, मंगळ हा तमोगुणी असल्यामुळें निष्कपटी व पूर्ण जहाल असा आहे. व शनि हा रजोगुणी असल्यामुळें पूर्ण कपटी व कांहींसा जहाल आहे. आज जे जहाल पक्षाचे गुण दृष्टीस पडत आहेत ते सर्व मंगळाप्रमाणें आहेत. व मवाळ पक्षाचे गुण शनीप्रमाणें आहेत. या दोन मवाळ आणि जहाल ग्रहांचा योग या वर्षी व्यय स्थानीं होत असल्यामुळें तो संस्थेच्या नाशास कारण झाला आहे. मंगळ हा प्राण गेला तरी मागें न सरणारा जहाल ग्रह आहे, म्हणून रजोगुणानुरूप जरी नागपूरची सुरत झाली असली तरी नागपूर इतकाच किंबहुना सरसच तमोगुणाचा प्रभाव दृग्गोचर होऊन जहाल पक्ष विजयी होण्याचा रंग आहे.

दैवयोगाची गति मोठी विचित्र आहे! ज्या तारखांस राष्ट्रीय सभा भरणार त्या तारखांस चन्द्र षष्ठस्थानीं आहे. व तो बुधाच्या क्षेत्रीं आहे. जर चंद्र सुस्थितींत असता, तर शनि-मंगळ युतीचे परिणाम भोगावे लागले नसते. परंतु परमेश्वरी संकेतच कांहीं निराळा दिसतो! यंदाची राष्ट्रीय सभा जर २२।२३।२४ तारखांस भरविली असती, तर ती सुरळीत पार पडली असती. परंतु हें सुचावें कोणाला व कसें? आमची राष्ट्रीय पुढाऱ्यांस अशी विनंति आहे. कीं त्यांनीं यंदाची काँग्रेस २२।२३।२४ तारखांस भरवावी.

२२ व्या तारखेस रात्रीं गुरुचंद्र युति आहे. या युतीवर सर्व राष्ट्रांतील जहालपक्षाचें समेलन होणार आहे त्यास मुहूर्त चांगला मिळाला असल्यामुळें या पक्षास पुष्कळच लोकमत मिळेल असें वाटतें. अर्थात् चालू तंट्यांत जहालपक्ष जितका मिळवील तितकें मवाळपक्षाला खास मिळत नाहीं.

शनिमंगळाची युति व्ययस्थानीं असल्यामुळें ती राजयोगाची हानि करिते. यासाठीं अध्यक्ष कोणीही होवो, त्यानें आपलें भाषण जपून करावें अशी विनंति आहे.

कुंडलीविज्ञान

यदाकिंचिज्ज्ञोऽहं द्विप इव मदान्धः समभवं।
तदा सर्वज्ञोऽस्मीत्यभवदवलिप्तं मम मनः॥
यदा किञ्चित्किञ्चिद्बुधजनसकाशादवगतं।
तदा मूर्खोऽस्मीति ज्वर इव मदो मे व्यपगतः॥

पुस्तक ७ वें.] चैत्र शु० ८, रविवार [अंक ६ वा.

वर्षफल.

मागील अंकीं आश्वासन दिल्याप्रमाणें आज वर्षफल कसें तयार करावें, याबद्दलचे विचार वाचकांस सादर करण्याचें योजिलें आहे. हे विचार जुन्या ज्योतिषी लोकांस किंवा त्यांच्या अनुयायांस कितपत रुचतील, तें सांगवत नाहीं. जुन्या मताचे ज्योतिषी ताजिकच्या पद्धतीनें वर्षफलें तयार करितात. त्यांच्या मतें जन्मकालचा राश्यादि स्पष्ट रवि जितका असेल, तितका ज्या दिवशीं ज्या वेळीं होतो, ती वेळ धरून त्या दिवसाची कुंडली तयार केली म्हणजे तिच्यावरून त्या वर्षाच्या फलांचे ज्ञान होतें. या पद्धतींत जन्मकालच्या कुंडलीचें महत्व नसतें. आमच्या वाचकांस आह्मीं जी पद्धति सांगणार आहों तिला वरील प्रकारची कुंडली तयार करण्याचें कारण नाहीं. जें फल वर्तवावयाचें तें या पद्धतीनें जन्मकालच्या कुंडलीवरूनच वर्तवितां येतें. अशी आमची समजूत आहे. या पद्धतीचीं—

साधनें

१ जन्मकालाची भावचलित कुंडली

२ रोजच्या स्पष्ट ग्रहांचें पुस्तक

३ कुटुंबांतील सर्व मनुष्यांच्या कुंडल्या.

आतां, या तीन साधनांचा कसा उपयोग करावयाचा त्याचा विचार करूं.

१ भावचलित कुंडली

या कुंडलीच्या प्रत्येक भावांत बहुधा दोन राशींचें स्वामित्व असतें. क्वचित् तिसऱ्या राशीचेही अंश सांपडतात. ह्मणून या कुंडलींत प्रत्येक भावाचा स्वामी कोण, हें ठरविणें जास्त महत्त्वाचें आहे. जुन्या मताचे ज्योतिषी या गोष्टीचा विचार करीत नाहींत. जसें.— लग्न ३।२९।५७।५९ आहे अशी कल्पना करूं. एथें लग्नांत कर्क राशीचा फक्त ० अं. २ क. १ वि. इतका भाग उदित आहे, बाकी भाग सिंह राशीचा आहे. तरी जुन्या मताचे ज्योतिषी लग्न स्वामी चंद्रच आहे असें समजतात. वास्तविक सिंह राशीचेच अंश बहुतेक असल्यामुळें लग्नस्वामी रवि मानिला पाहिजे, हें उघड आहे.

भावाचा स्वामी मानण्याचे तीन प्रकार संभवतात ते असे—

१ भावारंभीं जो राशि उदित असेल त्याचा स्वामी.

२ भावांत असलेल्या दोन राशींपैकीं ज्या राशीचे अंश अधिक त्या राशीचा स्वामी.

३ भावाचा मध्य ज्या राशींत असेल त्याचा स्वामी.

यांपैकीं सयुक्तिक कोणतें, व ग्राह्य कोणतें हें ठरविणें आपलें कर्तव्य आहे. आमच्या मतें दुसरा प्रकार सयुक्तिक आहे. परंतु जेव्हां दोन्ही राशींचे अंश बहुतेक सारखेच असतील तेव्हां त्या भावाचे दोन्ही अधिपति मानावे.

आपल्या शरीरावर त्या दोन राशींपैकीं कोणत्या राशीचा अंमल आहे हें पाहूनही भावस्वामीचा निर्णय करितां येण्यासारखा आहे. राशींचे धर्म सुलभजातक भाग १ ला यांत सांगितले आहेत.

भावचलित कुंडलींत आणखी एक गोष्ट विचार करण्यासारखी

आहे. भावारंभावरोबर उगवलेला ग्रह, भावमध्यप्रदेशीं असलेला ग्रह व भावांतीं असलेला ग्रह या प्रत्येकाच्या फलांत फरक आहे. या तीन ग्रहांचीं फलें उत्तरोत्तर कमी कमी प्रमाणाचीं आहेत. तरी भावमध्य सोडून गेलेला ग्रह दुसऱ्या भावाचें फल देतो, असें ह्मणणें गैर हिशेबी दिसतें. आमचा असा तर्क आहे कीं, वेळ सूक्ष्म समजण्यास पूर्वीच्या काळीं सुलभ (घड्याळातारखें) साधन उपलब्ध नसल्यकारणानेंच संधींची कल्पना निघाली असावी. पुढील भावारंभापेक्षां सुमारें १४।१५ अंशपर्यंत कमी असलेला ग्रह, पुढील भावाचेंच फल देतो, व मागल्याचें देत नाहीं हें ह्मणणें चमत्कारिक दिसतें. पाश्चात्य पद्धतींत भावांतापेक्षां ५।७ अंशपर्यंत कमी ग्रह असेल, तर तो पुढील भावाचें फल देतो, असें मानितात. कारण, सांप्रत सूक्ष्म वेळ समजण्यास घड्याळांचें साधन आहे. जर बरोबर लाविलेल्या घड्याळावरून काल घेतला असेल, तर एक अंश अलीकडे ग्रह असतां सुद्धां तो मागील भावाचेंच फल देणारा असेल, हें उघड आहे. परंतु जरी घड्याळें आहेत तरी वेळ अगदीं बरोबर साधतां येणें कठीण आहे, ह्मणून ५।४ अंश अलीकडे असलेला ग्रह पुढील भावाचें फल देतो, असें मानण्यास चिंता नाहीं. सारांश वेळ जशी सूक्ष्म अथवा स्थूल असेल, त्या मानानें थोडे कमी जास्त अंश मानिले पाहिजेत, असें सिद्ध होतें. वर्षफल करणारांनीं या गोष्टीकडे अवश्य लक्ष दिलें पाहिजे.

ताजिकच्या पद्धतीनें जी वर्ष प्रवेशाच्या वेळची भावचलित कुंडली मांडितात, तींत हे संधि मुळींच विचारांत घ्यावयास नकोत. जन्मकालचा वेळ अजमासाचा असल्यामुळें १५ अंशपर्यंतची मर्यादा ठरविणें कांहींसें योग्य आहे. वर्षप्रवेशाचा वेळ अगदीं बरोबर समजतो, ह्मणून त्या वेळच्या कुंडलींत संधि विचारांत घेण्याची जरूर राहत नाहीं.

२ दैनिक स्पष्ट ग्रह.

सर्व वर्गणीदारांस वर्षारंभीं एक

सालच्या दररोजच्या स्पष्ट ग्रहांचें पुस्तक दिलें जातें, त्यावरून पुढील टांचण एका कागदावर करून ठेवावें. तें असें:—

१ कोणता ग्रह कोणत्या वेळीं राश्यंतर करितो.

२ कोणता ग्रह कोणत्यावेळीं दुसऱ्याशीं युति करितो, किंवा त्याच्या समोर येतो.

३ कोणता ग्रह कोणत्यावेळीं दुसऱ्यास पूर्ण दृष्टीनें पाहतो.

४ कोणता ग्रह कोणत्यावेळीं कुंडलींतल्या भावांत प्रवेश करितो, भावाच्या मध्यें येतो व भावांतीं जातो.

५ कोणता ग्रह कोणत्या वेळीं जन्मकालच्या ग्रहाशीं युति करितो समोर येतो व दृष्टि करितो.

आपल्या ज्योतिषांत जेव्हां ग्रह आपल्या स्थानापासून तिसऱ्या व दहाव्या स्थानावर पाहतो, तेव्हां त्या दृष्टीचे फल $\frac{1}{4}$ मिळतें असें सांगितलें आहे. हा नियम शनीला नाहीं. त्याचें या दृष्टींत पूर्ण फलच मिळतें. यांत तिसऱ्या ह्मणजे ६० अंश अंतरावर असलेल्या व दहाव्या ह्मणजे २७० अंश अंतरावर असलेल्या असा या दृष्टीचा अर्थ आहे.

जेव्हां एक ग्रह आपल्या स्थानापासून ५ व्या व ९ व्या स्थानीं असलेल्या ग्रहास पाहतो, तेव्हां त्या दृष्टीचें फल अर्धें असतें. पण हा नियम गुरूला नाहीं. त्याच्या या दृष्टीचें फल पूर्णच असतें. यांत ५ व्या ह्मणजे १२० अंश अंतरावरच्या व ९ व्या ह्मणजे २४० अंश अंतरावरच्या असा अर्थ होतो.

जेव्हां एक ग्रह आपल्या स्थानापासून ४ थ्या व ८ व्या स्थानच्या ग्रहावर पाहतो, तेव्हां त्या दृष्टीचें फल $\frac{3}{4}$ असतें, पण हा नियम मंगळाला नाहीं. त्याच्या या दृष्टीचें फळ पूर्णच असतें. यांत ४ थ्या ह्मणजे ९० अंश अंतराच्या व ८ व्या ह्मणजे २१० अंशावरच्या असा अर्थ होतो.

सर्व ग्रह आपल्या स्थानापासून ७ व्या स्थानावर पूर्ण दृष्टीनें पाहतात. यांत ७ व्या ह्मणजे १८० अंश अंतरावरच्या असा अर्थ होतो.

यावरून ६०, ९०, १२०, १८०, २१०, २४० व २७० इतक्या अंशांच्या दृष्टि आपल्यांत आहेत. पाश्चात्य पद्धतींत ३०, ३६, ४५, ६०, ७२, ९०, १२०, १३५, १५०, १८०, व २१६ इतक्या अंशांच्या दृष्टि आहेत.

एका राशीचे ३० अंश होतात. ह्मणून ३०, ६०, ९०, १२०, १५०, १८०, २१०, २४०, २७०, ३६० इतक्या अंशाच्या दृष्टि असल्या पाहिजेत. ह्मणजे त्यांपैकीं ३० व १५० या दोनच अंशांच्या दृष्टि आपल्यांत नाहींत व पाश्चात्यांत आहेत. त्या घेऊन हें दृष्टिचक्र पूर्ण होतें. ह्मणून तसें करण्यास हरकत नाहीं.

वर्तुलाचे ३६० अंश असतात. ह्मणून राशिचक्राचे $\frac{1}{6}$, $\frac{1}{8}$, $\frac{1}{9}$, $\frac{1}{12}$, $\frac{7}{12}$, $\frac{2}{3}$, $\frac{3}{4}$ इतके भाग आपल्या ज्योतिषाच्या दृष्टींत आले आहेत. व $\frac{5}{12}$, $\frac{5}{10}$, $\frac{2}{5}$, $\frac{1}{6}$, $\frac{5}{8}$, $\frac{3}{4}$, $\frac{3}{5}$, $\frac{7}{12}$, $\frac{1}{2}$ व $\frac{3}{5}$ हे भाग पाश्चात्यांच्या ज्योतिषांत आहेत. ह्मणजे त्यांच्या पद्धतींत द्वितीयांश, तृतीयांश, चतुर्थांश इ. भाग साधले आहेत. सप्तमांश व एकादशांश हे दोन भाग बरोबर बसत नाहींत. ह्मणून घेतले नसावेत.

या दोन्ही पद्धतींकडे तात्विक दृष्टीनें पाहिल्यास आपणांस एक नवीनच कल्पना सुचते. ग्रहांच्या दृष्टीचे जितके प्रकार अधिक असतील, तितका सूक्ष्म विचार करितां येईल. राशि चक्राचा २७ वा भ.ग तो नक्षत्रसञ्ज्ञक होय. व एका नक्षत्राचे चरण ४ असतात, ह्मणून चरणदृष्टींची कल्पना केल्यास १०८ प्रकार होतील. ते असें:—

३ अं. २० क.	६ अं. ४० क.	१० अं.
१३ अं. २० क.	१६ अं. ४० क.	२० अं.
२३ अं. २० क.	२६ अं. ४० क.	३० अं.
३३ अं. २० क.	३६ अं. ४० क.	४० अं.
४३ अं. २० क.	४६ अं. ४० क.	५० अं.
५३ अं. २० क.	५६ अं. ४० क.	६० अं.
६३ अं. २० क.	६६ अं. ४० क.	७० अं.

७३ अं. २० क.	७६ अं. ४० क.	८० अं.
८३ अं. २० क.	८६ अं. ४० क.	९० अं.
९३ अं. २० क.	९६ अं. ४० क.	१०० अं.
१०३ अं. २० क.	१०६ अं. ४० क.	११० अं.
११३ अं. २० क.	११६ अं. ४० क.	१२० अं.
१२३ अं. २० क.	१२६ अं. ४० क.	१३० अं.
१३३ अं. २० क.	१३६ अं. ४० क.	१४० अं.
१४३ अं. २० क.	१४६ अं. ४० क.	१५० अं.
१५३ अं. २० क.	१५६ अं. ४० क.	१६० अं.
१६३ अं. २० क.	१६६ अं. ४० क.	१७० अं.
१७३ अं. २० क.	१७६ अं. ४० क.	१८० अं.
१८३ अं. २० क.	१८६ अं. ४० क.	१९० अं.
१९३ अं. २० क.	१९६ अं. ४० क.	२०० अं.
२०३ अं. २० क.	२०६ अं. ४० क.	२१० अं.
२१३ अं. २० क.	२१६ अं. ४० क.	२२० अं.
२२३ अं. २० क.	२२६ अं. ४० क.	२३० अं.
२३३ अं. २० क.	२३६ अं. ४० क.	२४० अं.
२४३ अं. २० क.	२४६ अं. ४० क.	२५० अं.
२५३ अं. २० क.	२५६ अं. ४० क.	२६० अं.
२६३ अं. २० क.	२६६ अं. ४० क.	२७० अं.
२७३ अं. २० क.	२७६ अं. ४० क.	२८० अं.
२८३ अं. २० क.	२८६ अं. ४० क.	२९० अं.
२९३ अं. २० क.	२९६ अं. ४० क.	३०० अं.
३०३ अं. २० क.	३०६ अं. ४० क.	३१० अं.
३१३ अं. २० क.	३१६ अं. ४० क.	३२० अं.

३२३ अं. २० क.	३२६ अं. ४० क.	३३० अं.
३३३ अं. २० क.	३३६ अं. ४० क.	३४० अं.
३४३ अं. २० क.	३४६ अं. ४० क.	३५० अं.
३५३ अं. २० क.	३५६ अं. ४० क.	३६० अं.

यांत ३६० अंश दृष्टि म्हणजे युति होय. पाहणारा ग्रह दुसऱ्या ग्रहांतून वजा देऊन बाकी राश्यादि राहील, तिचे अंश करावे. ते वरील कोष्टकांत एखाद्या अंकांशी जुळले म्हणजे त्याची त्या ग्रहावर दृष्टि आहे असें म्हणावें. उदाहरण —

चंद्र ३ रा. २६ अं. ३६ क.
—मंगळ१० रा. ३ अं १६ क.

बाकी ५ रा. २३ अं. २० क.
= अंश १७३अं. २० क.

इतक्या अतरावर मंगळापासून चंद्र आहे. म्हणून मंगळाची चंद्रावर इतके अंश दृष्टि आहे, असें म्हणावें. यांचा विचार सूक्ष्मते करिता तांच केला पाहिजे. कल्पना करा – वरील चंद्र आपल्या जन्मकाळाचा आहे. व मंगळ भ्रमणानें आलेला आहे· म्हणून दृष्टियोग ज्या काळीं घडेल, त्या काळीं आपणास लहानसान दुखापती होतील, असें भविष्य करण्यास हरकत नाहीं. ठेंच लागणें, कुसूं बोचणें इ०प्रकार या दृष्टींत घडतील असें भविष्य करण्यास जागा आहे. ही जागा इतर दृष्टींत नाहीं.

चंद्र ३ अं. २० क. सुमारें ८ तासांत जातो. म्हणून या पद्धतीनें प्रत्यहीं ८ तासाच्या अंतरांत आपणांस आपलें लाईफ सांपडेल. शिवाय त्या अवधींत तो जन्मकालाच्या सर्व ग्रहांवर व फिरतीच्या सर्व ग्रहांवर दृष्टि करील तेव्हां या भागाच्या अगदीं सूक्ष्म विभागांतही आपला प्रवेश होऊं शकेल.

कल्पना जरी बरोबर दिसली तरी ती अनुभवास आली पाहिजे म्हणून तिचा वांचकांनीं अनुभव घ्यावा.

३ कुटुंबांतील कुंडल्या

संततियोग किंवा निधनयोग पाहण्यासाठीं कुटुंबांतील मनुष्यांच्या कुंडल्यांची आवश्यकता आहे.

जेव्हां आपल्या स्वतःच्या निधनाचा विचार करावयाचा असेल तेव्हां आपली स्त्री, मुलें व भावंडें या सर्वांच्या कुंडल्या पाहिल्या पाहिजेत. आपणांस पापग्रह अनिष्ट आले असूं जर मुलांच्या कुंडल्यांत बाराला मारक योग झाले आहेत, स्त्रीच्या कुंडलांत पतीला मारक योग झाले आहेत, व भावाच्या कुंडल्यांत तृतीय स्थान अगर त्याचा स्वामी बिघडला आहे असें दृष्टीस पडेल तर आपलें स्त्रीनें निधन होईल असें समजावें. आणि जर आपणासच पापग्रह अनिष्ट आले आहेत, परंतु इतरांस नाहींत तर निधन न होतां दुखणें मात्र येईल, असें समजावें. निरोगी माणसास पाप ग्रह अनिष्ट आले तरी त्यास दुखणें जाणवत नाहीं. पण रोगट माणसांवर चांगला परिणाम घडतो.

संततीचा विचार करितांना नवरा व बायको यांच्या कुंडल्या पाहिल्या पाहिजेत. जर स्त्रीस अगर पतीस गर्भपाताचा योग जन्मकालींच दृष्टीस पडेल तर त्यांच्या संततिदायक स्थानांत गर्भकालीं पाप ग्रह येईल, तेव्हां गर्भपात होईल असें समजावें.

गर्भपाताचा जन्मकालीं योग नसेल तर संततिदायक स्थानांत गर्भकालीं पाप ग्रह असला तरी गर्भपात होत नाहीं. तथापि थोडीबहुत गर्भपीडा झाल्याशिवाय राहत नाहीं. गर्भ राहतांना ग्रहस्थिति कशी असावी लागते याचें विवेचन पूर्वी झालेलें आहे. त्याचें नीट मनन करून गर्भकाल ठरवावा. स्त्रियांना ऋतुस्नात झाल्यापासून जितक्या दिवसांनीं प्रथम अपत्य होतें, तितक्याच सुमारें दिवसांनीं पुढील गर्भ राहतात. ह्मणून पुढील गर्भाची कल्पना यावरून करावी.

विवाहकाल व स्त्रीनिधन यांचा विचार कसा करावा, त्याचप्रमाणें मातृपितृनिधनाचा विचार कसा करावा याबद्दल पूर्वी बरेंच विवेचन झालें आहे, त्याला अनुसरून या गोष्टी पहाव्या.

शरीरसंपत्ति, संतति, स्त्रीसुख, मातृपितृसुख, भ्रातृसुख व संपत्ति आणि उदयकाल इतक्या गोष्टी

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥

'भवभूति'

पुस्तक ८ वें.] मार्गशीर्ष शु० ८, मंगळवार [अंक ३ रा

वर्षफल.

आजच्या अंकांत वर्षफल कसें असावें याचा विचार करावयाचा आहे. वर्षफल तीन प्रकारांनीं होऊं शकतें. एक दशांवरून, दुसरें रोजच्या स्पष्ट ग्रहांवरून व तिसरें ताजिकच्या पद्धतीनें. जर ग्रंथांस महत्व द्यावयाचें असेल तर हे तीनही प्रकार खरेच आहेत असें मानावयास पाहिजे. महादशांच्या सूक्ष्म दशा केल्यानें दिवसापर्यंत व प्राणदशा केल्यानें घटकांपर्यंतही वर्षफल सूक्ष्म होऊं शकेल. सूक्ष्मदशा किंवा प्राणदशा यांचीं कोष्टकें मात्र तयार पाहिजेत. यावरून आज कोणत्या ग्रहाची सूक्ष्मदशा किंवा प्राणदशा आहे याचा बोध होऊन रोजचें फल वर्तवितां येईल. पण अमुक ग्रहाच्या दशेचें फल अमुक हें वर्तवितां आलें पाहिजे. सूक्ष्म आणि प्राण या दशांचीं फलें कोणत्याही ग्रंथांत सांगितलेलीं नाहींत. त्यामुळें गणितानें दशा समजली तरी तिचें फल समजण्यास फार अडचण पडेल. जन्मकालीं जो ग्रह जें फल उत्पन्न करीत असेल तेंच फल तो आपल्या प्राणदशेंत देतो कीं त्या दिवशीं तो ग्रह आकाशांत ज्या स्थितींत असेल

ल्या स्थित्यनुरूप फल देतो याचा निर्णय कोणत्याही ग्रंथकारांनीं केलेला नाहीं. दशाप्रवेशकालीं ग्रह ज्या स्थितींत असेल त्याप्रमाणें तो फलदायक होतो असेंही एक मत आहे. विचार केला असता हें मत कांहींसें ग्राह्य आहे. स्थानफल, राशिफल, भावाधिपत्यफल, युतिदृष्टिफल, नैसर्गिक फल अशीं पांच प्रकारचीं दशांचीं फलें असून तीं जन्मकालच्या व दशाप्रवेशकालींच्या या दोन्हीं प्रकारच्या ग्रहांस अनुसरून पाहण्याच्या पद्धति आहेत. पण यांपैकीं कोणती पद्धति ग्राह्य व कोणती त्याज्य यांचा अद्यापि कोणी विचार केलेला आहे असें दिसत नाहीं. ज्योतिषी तर या सर्वांची खिचडीच करितो किंवा केव्हां एका पद्धतीनें तर केव्हां दुसऱ्या पद्धतीनें फलें सांगून कसा तरी वस्तुस्थितीशीं मेळ घालतो. दशा तर ४०।४२ प्रकारच्या आहेत. सारांश दशाप्रकार हा घोटाळ्याचा व अनिश्चित आहे ह्मणून तो त्याज्य आहे हें उघड आहे. यासाठीं दशापद्धतीनें वर्षफल बनविण्याच्या खटपटींत पडूं नये असें सिद्ध होतें.

सर्व ज्योतिषी ताजिकच्या पद्धतीनेंच वर्षफलें बनवितात. वाचकांसाठीं या पद्धतीचें विवेचन नीलकंठीच्या आधारानें या वर्षी पूर्ण केलें जाणार आहे. ही पद्धति मूळची मुसलमानांची आहे तरी कित्येक ज्योतिर्विदांनीं तिचें संस्कृतमध्यें रूपांतर केलें आहे. ही पद्धति अर्वाचीन आहे. वर्षफलें बनविण्याच्या कामांत ही पद्धति सोईची आहे. पण उपकरणांचा खटाटोप भयंकर आहे. ज्योतिषी लोक फक्त वर्षकुंडली व मासकुंडल्या मात्र देतात. पण सूक्ष्म वर्षफल दिनकुंडल्या केल्याशिवाय होणार नाहीं. याही पद्धतींत दशांचें बंड आहेच! या पद्धतीनें वर्षफल करण्यास पुष्कळ श्रम घ्यावे लागतात. बरें इतकेंही करून अनुभव यथातथाच! यासाठीं याही पद्धतीनेंच वर्षफल तयार करण्याच्या भरीस पडूं नये हा उत्तम पक्ष.

आमच्या मतें रोजच्या स्पष्ट ग्रहांवरूनच वर्षफल बनवावें. या पद्धतीनें श्रम मुळींच नसून अनुभवही चांगला येईल. जन्मकालची स्पष्ट ग्रहांची कुंडली व रोजच्या स्पष्ट ग्रहांचें पंचांग हीं दोनच या पद्धतीचीं उपकरणें आहेत. जन्मकालची स्पष्ट ग्रहांची कुंडली स्वतःला करितां येत नसेल तर ती ज्योतिष्यापासून करून घ्यावी. स्पष्ट ग्रहांचें पुस्तक आयतें मिळतेंच त्यांत ग्रहांचे योग व प्रतियोग दिलेले असतात. त्यांवरून ते योग प्रतियोग आपल्या कुंडलींत कोणत्या स्थानांत जन्मकाळच्या कोणत्या ग्रहाजवळ अथवा समोर अथवा दृष्टींत होतात हें पाहून ते काय फल उत्पन्न करूं शकतील याचा निर्णय करावा. या पद्धतींत जातकांच्याच तत्वांचा पूर्णपणें उपयोग होत असतो. जातकशास्त्र ज्यास चांगलें अवगत असेल तो या पद्धतीनें अमुक कालीं अमुक गोष्ट घडेल असें बिनचूक सांगूं शकेल. या पद्धतींत खिचडी नाहीं. जींत अनेक मतांस थारा नाहीं, श्रम मुळींच नाहींत व अनुभव चुकत नाहीं अशी ही एकच पद्धति आहे. युरोपियन फलज्योतिष्यांनीं हिला बरेंच सूक्ष्म स्वरूप दिलेलें आहे. त्या करितां त्यांनीं एक राश्यंतर, द्विराश्यंतर वगैरे अनेक प्रकारच्या शुभाशुभ दृष्टि कल्पिलेल्या आहेत. आमच्या मतें इतक्या दृष्टि कल्पिण्याचें विशेष अगत्य नाहीं. ग्रहांच्या पूर्ण दृष्टींवरच सर्व भागवितां येईल. या पद्धतीनेंच आह्मीं बारा वर्षें वर्षफलें करीत आलों आहों. ज्या मनुष्याचें वर्षफल बनवावयाचें त्याची वर्तमान स्थिति व त्याच्या भावी आशा या गोष्टींचें जर पूर्वी ज्ञान होईल तर वर्षफल चांगलें अनुभवास येईल, अशी खात्री झाली आहे. आतां, अनंत व्यवसायांमुळें हेळसांड होऊन चुका होतील तर तें स्वाभाविक आहे हें कोणीही निःपक्षपाती मनुष्य कबूल करील. ह्मणूनच आह्मीं ह्मणतों कीं ज्योतिःशास्त्र प्रत्येकानें शिकावें. आपलें भविष्य आपण जितकें बिनचूक करूं तितकें दुसऱ्यास करितां येणार नाहीं. वैद्यशास्त्राचेंही असेंच

आहे. आपण वैद्यास हात दाखवून परीक्षेचा बोजा सर्व त्यावर टाकितों. पण जर आपणास वैद्यशास्त्राची माहिती असली तर आपलें निदान आपण जितकें करूं तितकें वैद्यास करितां येईल काय? वैद्य नाडी पाहून कोणता दोष वाढला आहे हें जाणील परंतु तो दोष कशानें वाढला, आचरणांत कोणती चूक झाली, पथ्यापथ्यविचार कोठें सुटला इत्यादि गोष्टी त्यास समजतील काय? सारांश आपलें निदान आपणासच चांगलें होईल, दुसऱ्यावर हवाला टाकल्यास चुका होणारच. आपली परिस्थिति कशी आहे, आपल्या भावी आशा कोणत्या आहेत व त्या पूर्ण होण्यास कोणत्या अडचणी आहेत यांचा विचार करून आपण कोणत्या वेळीं कसें वागावें याचें निदान ज्योतिष्यापेक्षां ज्याचें त्यालाच उत्तम होईल. यासाठीं प्रत्येकानें व्यवहारापुरतें तरी हें शास्त्र शिकावें. कुंडलीविज्ञान हें पुस्तक आशासाठींच प्रसिद्ध होत आहे. नमुन्यासाठीं इकडून प्रत्येक वर्णणीदाराचें स्थूल वर्षफल जात असतें. परंतु आह्मांस एका दिवसांत १०।१२ वर्षफलें करावीं लागतात. त्या मुळें तीं जितकीं बरोबर उतरावीं तितकीं उतरणार नाहींत हें उघडच आहे. आमचा हेतु मार्ग दाखविण्याचा आहे. प्रत्येकाचें वर्षफल बारकाईनें होणें शक्य नाहीं. चांगला विचार करून काम केल्यास एका दिवसांत एकच वर्षफल होऊं शकेल. पण तसें करून भागत नाहीं. या कामासाठीं आह्मीं १।२ विद्यार्थी तयार केले आहेत त्यांच्याकडून कित्येक वर्षफलें तयार केलीं जातात. सर्वच कामें एकट्याला होणें अशक्य आहे. आह्मीं वेपर्वाईनें वागतों किंवा हेळसांड करितों हें ह्माणणें चुकीचें आहे. असो. पुढील अंकांत एक कुंडली घेऊन तीवरून वर्षफल कसें करावें हें दाखविण्याचा हेतु आहे. वर्गणीदार गतसालचा आमच्या वर्षफलांचा अनुभव कळवितील अशी आशा धरून आजचा लेख पुरा करितों.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥

'भवभूति'

पुस्तक ८वें.] मार्गशीर्ष कृ० ४, शुक्रवार [अंक ३२ वा

वर्षफलाचा नमुना.

जन्म—ता. २६ मे १८६८ मंगळवार रात्रीं १२ वाजतां.

सायन भावचलित.



या कुंडलींत लग्न आणि ग्रह खालीं लिहिल्याप्रमाणें नक्षत्रांत आहेत.—

लग्न—पूर्वाभाद्रपदा. **चंद्र**—आश्लेषा. **गुरु**—अश्विनी.
मंगळ—कृत्तिका. **रवि**—मृग. **बुध**—आर्द्रा.
शुक्र—पुष्य. **हर्शल**—पुष्य. **राहु**—उत्तरा.
शनि—मूळ.

कृत्तिका हें अग्निनक्षत्र असून या नक्षत्रांत मंगळ हा अग्नि तत्वाचा ग्रह आहे. त्यामुळें शरीर अति उष्ण आहे. स्वभाव फार तापट व माथेफिरू आहे. राग लवकर येतो व तो सहन होत नाहीं. प्रतिपक्षाचें तोंड न पाहण्याची इच्छा करितो. अपमान सहन होत नाहीं. उष्ण पदार्थ सोसत नाहींत. मूळव्याध लहानपणीं झालेली होती. राग आला असतां तुटून पडतो. तेलकट व तिखट पदार्थ जितके भक्तीनें आवडतात तितके गोड पदार्थ आवडत नाहींत. पण ते पदार्थ शरीरास मानवत नाहींत. या प्रमाणें कृत्तिका नक्षत्र जन्मतःच मंगळानें विद्ध झाल्यामुळें स्वाभाविक धर्म उत्पन्न झालेले आहेत. या वरून या नक्षत्रांत जेव्हां जेव्हां मंगळ येईल तेव्हां तेव्हां वरील गुणांची अभिवृद्धि झालेली आढळेल. सन १९०९ मध्यें हा योग येत नाहीं.

जन्मकाळीं शनि हा मंगळाच्या पूर्ण दृष्टींतून नुकताच सुटला होता. हा शनि धनु या अग्निराशींत वक्री आहे. सन १८८१ सालीं तो जेव्हां मंगळाजवळ कृत्तिका नक्षत्रांत गेला त्या वेळीं मूळव्याधीचा भयंकर उपद्रव झाला होता. यावरून तो जेव्हां जेव्हां त्या नक्षत्रांत येईल तेव्हां तेव्हां शरीरांत बिघाड केल्याशिवाय राहणार नाहीं. सन १९१० मध्यें हा योग येतो. ह्मणून त्या वेळीं सावधगिरी ठेविली पाहिजे असें सिद्ध होतें.

ज्या प्रमाणें शनि हा मंगळाच्या ठिकाणीं गेल्यावर शरीरप्रकृति बिघडवितो त्या प्रमाणेंच मंगळ हा शनीच्या ठिकाणीं आल्यावरही प्रकृति बिघडून गेली पाहिजे. सन १९०९ च्या जानेवारीच्या दुसऱ्या पंधरवड्यांत हा योग

होतो. परंतु हा योग सौम्य आहे. कारण, शनि कृत्तिकेंत जसा घातक तसा मंगळ मूळांत घातक नाहीं. त्रास व दगदग मात्र विशेष होईल.

जन्मकालीं रवि व शनि हे बहुतेक समोरासमोर आहेत त्यामुळें बापलेकांचें प्रेम तितक्याच महत्वाचें होतें. वयाच्या ११ व्या वर्षापासूनच स्वतःच्या कर्तबगारीनें विद्याभ्यास झाला. व नोकरी लागल्यावर [२२ व्या वर्षी] ४।५ महिन्यांच्या आंतच पितृनिधन झालें. त्यामुळें उभयतांनाही एकमेकांचा उपयोग काडीमात्र घडला नाहीं. रवि हा चतुर्थ स्थानीं असून शनि नवमाच्या शेवटीं आहे. हा योग जसा पितृसुखाला तसाच सरकारी नोकरीलाही अनिष्ट झाला. शनि हा अंशतः तनुस्वामी असल्यामुळें त्याच्या जवळ रवि ज्या ज्या वेळीं येईल त्या त्या वेळीं प्रकृति बिघडल्याशिवाय रहाणार नाहीं. अपमान, शत्रुपीडा, आळ, हानी व वातपित्तात्मक ज्वर हे येथील रवीचे परिणाम आहेत. प्रत्येक वर्षी नवंबरच्या २९ व्या तारखेच्या सुमारास हा योग येतो व त्याचा अनुभवही आजपर्यंत आला आहे. या नक्षत्रांत जर अमावास्या होईल तर ती फार वाईट जाणावी.

चतुर्थ स्थानांतील रवीजवळ ज्या कालीं शनि गेला होता त्या कालीं झाडाची फांदी पायावर पडून करंगळीचा चुराडा झाला होता. हें दुखणें २।३ महिने काढावें लागलें!

शनि व गुरु हे दोघेही तनुभावाचे अधिपति असून उभयतांत त्रिकोण दृष्टियोग आहे. त्यामुळें शरीरप्रकृति कसल्याही दुखण्याला तोंड देणारी आहे. शनि हा लाभस्वामीही आहे व गुरु हा दशमाचा स्वामी आहे. शनि हा भाग्यस्थानीं व गुरु हा धनस्थानीं असल्यामुळें हा उत्तम भाग्ययोग झाला आहे. जेव्हां जेव्हां शनि हा गुरूच्या ठिकाणीं जाईल व गुरु हा शनीच्या ठिकाणीं येईल तेव्हां तेव्हां मोठाल्या महत्वाच्या गोष्टी घडल्या शिवाय राहणार नाहींत. हा मनुष्य भाग्यवान् असल्यामुळें गुरूच्या प्रत्येक फेऱ्यास

विशेष गोष्ट घडून पुढें पाऊल पडलें पाहिजे विशेषेंकरून तो दशमाचा अधिपति असल्यामुळें व धनस्थानीं त्यानें वास केल्यामुळें उद्योगधंद्याची वाढ व त्यांत चांगली किफायत झाली पाहिजे. त्याप्रमाणें अनुभव आलेला आहे.

गुरूचे तीन फेरे झाले असून चवथा १९१६ मध्यें होणार आहे.

गुरु हा शनीच्या ठिकाणीं गेल्यावर जितका उत्कर्ष होईल त्यापेक्षां शनि हा गुरूच्या ठिकाणीं गेल्यावर झाला पाहिजे. सांप्रत हा योग आहे. पण शनि वक्र असतां अनुभव येणार नाहीं. सन १९०८ च्या डिसेंबर ता. ७ पासून शनि मार्गी झाला ह्मणून यापुढेंच या शनीचा अनुभव मिळूं शकेल. फेब्रुवारींत तो गुरूला येऊन मिळेल. ह्मणून जानेवारी–फेब्रुवारी मार्च्य या तीन महिन्यांत धनाची व उद्योगधंद्याची मोठी घडामोड व्हावयाची आहे. ता. ६ आगष्टपासून शनि पुनः वक्री होईल. ह्मणून तोंपर्यंतचेच दिवस मोठ्या महत्वाचे होतील. भाग्यस्थानीं उदित असलेला ग्रह सांप्रत धन स्थानीं आल्यामुळें कर्जमुक्त होण्याची मोठी आशा आहे. हा ग्रह कुटुंब स्थानीं आल्यामुळें कुटुंबसंबंधाचें सुख मात्र कमी मिळणार. व स्त्रीही सदा दुःखी अशी राहणार असें वाटतें. हा ग्रह संपत्ति पुष्कळ देईल पण संग्रह मात्र होऊं देणार नाहीं. मग तें द्रव्य कोणत्याही कारणानें जावो. शनि धनस्थानीं आहे तोंपर्यंतच कर्जमुक्त होण्याची आशा आहे. यासाठीं द्रव्याचा व्यय तिकडेच करावा. एप्रिलच्या ९ वीला शुक्र हा शनीला मिळतो व १३ वीला बुध हा शनीला मिळतो, या वरून हा महिना मोठ्या किफायतीचा दिसतो. तरीपण या महिन्याचा पहिला आठवडा चांगला नाहीं. कारण रवि हा शनीशीं युति करितो. ही युति कुटुंबसंबंधी सुखाला प्रतिकूल आहे. व धनाचा नाश करणारी आहे. कुटुंबांत कदाचित् भांडणेंही लागतील.

ता. ४ मार्च्य पासून ता. २८ मार्च्यपर्यंत शुक्र हा तनुस्थानीं विराजमान असा उचांत आहे. ह्मणून या कालांत शरीर तेजस्वी होऊन ऐषआराम

बाढेल. नटण्याकडे प्रवृत्ति होईल. एखादा नवीन ग्रंथ प्रसिद्ध होईल किंवा सुंदर लेख लिहिला जाईल. शुक्राचे जितके विषय आहेत तितके जागृत होऊन परिस्थितीच्या अनुरोधानें प्रकट होतील. मन आनंदी व प्रसन्न होईल.

ता० २२ एप्रिलपासून ता० १६ मेपर्यंत शुक्र स्वगृहीं बलवान् आहे तो व गुरु यांत नवपंचम योग आहे. ह्मणून हा कालही चांगलाच जाईल. एकंदरीत ४ मार्च्य पासून १६ मे पर्यंतचे दिवस सुखासमाधानतां व निष्काळजीपणांत जातील.

चतुर्थ स्थानाचा अधिपति बुध हा ता० ६ मेपासून ता० १३ जुलईपर्यंत चतुर्थ स्थानीं आहे. याच स्थानांत शुक्र ता. १६ मेपासून ९ जूनपर्यंत आहे. ह्मणून हेही दिवस बरे आहेत असे वाटतें. ता. ९ जूनपासून १५ जुलईपर्यंतचा काल विद्येसंबंधाचा आहे. या कालांत गर्भसंभव असून चांगले लेख लिहिले जातील.

गुरु हा या वर्षी जायास्थानीं स्त्रीचें संरक्षण करणारा असून उन्नति करणाराही आहे. शिवाय तो गर्भस्थानीं असल्यामुळें गर्भदाताही आहे, ह्मणून या वर्षी स्त्री निश्चयानें गर्भवती होणार. शुक्र गर्भस्थानीं असतां गर्भसंभवकाल जाणावा.

जुलई महिना चांगला नाहीं. ता० २९ जुलईपासून ता० २२ आगष्टपर्यंत शुक्र सप्तमांत गुरूसह आहे. व याच अवधींत ता. १४ आगष्टपासून ता. ३१ आगष्टपर्यंत बुध आपल्या उचांत आहे ह्मणून आगष्ट महिना सुखाचा, आनंदाचा व किफायतीचा आहे. परंतु हा लाभ फार थोडे दिवसच मिळेल. कारण जुलईच्या २१ तारखेपासून मंगळ मेष राशीचा धनस्थानीं झाला आहे. हा ग्रह धन व भाग्य यांचा अधिपति आहे. ता. २४ आगष्टपासून हा वक्री आहे. व तो अश्विनी आणि रेवती या दोन नक्षत्रांस वक्रगतीनें पीडा करीत आहे. अश्विनी हें नक्षत्र धनभावारंभीं उदित आहे. ह्मणून ता. २४ आगष्ट पासून ता. २४ अक्टंबरपर्यंत धनासंबधानें दिवस चांगले जाणार नाहींत असें वाटतें. शनि आणि मंगळ हे दोन पाप ग्रह धनस्थानीं आल्यामुळें धन व कुटुंब यां संबंधी ते दुःख व चिंताच उत्पन्न करि-

तील असें वाटतें. शनि हा लाभ व्यय यांचा अधिपति असून त्याचें मंगळाशीं वैर असल्यामुळें या दोन ग्रहांच्या युतीमुळें सांपत्तिक चिंताच उत्पन्न झाली पाहिजे असें वाटतें ता. २९ डिसेंबरला यांची युति आहे. तात्पर्य धनाधिपति जरी ६ महिने स्वगृहीं आहे तरी धनाची वृद्धि न होतां ऱ्हासच होईल असें वाटतें. ह्मणून तसें चिन्ह दिसल्यास शनि व मंगळ यांची आराधना करणें जरूर आहे.

अकटंबरच्या १३ व्या तारखेला रवि हा शनीच्या समोर होईल त्या वेळीं प्रकृति बिघडून सांपत्तिक चिंता उत्पन्न होईल व भांडणें होतील.

जूनच्या ९ व्या तारखेला गुरु व मंगळ हे समोरासमोर येतील त्या मुळें धंद्याची वृद्धि होऊन विजय व लौकिक प्राप्त होईल. कारण गुरु हा लग्न व दशम यांचा अधिपति असून मंगळ धन व भाग्य यांचा अधिपति आहे. मंगळ वक्र गतीनें ता. ३ अकटंबरला व ता० २० डिसेंबरला पुनः गुरूसमोर येईल. ह्मणून याचाही परिणाम चांगला घडेल.

एप्रिल व मे या दोन महिन्यांत मंगळ व्ययस्थानीं कुंभ राशींत चंद्राला आठवा होणार आहे. ह्मणून या महिन्यांत त्रास, कष्ट व हानि होईल. याच महिन्यांत बुध व शुक्र बलवान आहेत. तरी लाभ व हानि या दोन्ही गोष्टी या कालीं घडतील. चित्ताचें आकर्षण इतर गोष्टींवर झाल्यामुळें निष्काळजीपणा उत्पन्न होईल व धंद्याची हानि होईल. यासाठीं तसें होणार असें दिसूं लागल्यास धंद्याकडे विशेष लक्ष पुरविण्याची खटपट केली पाहिजे. कोणताही ग्रह बरें करण्याच्या स्थितींत असतां पाप ग्रह अनिष्ट असेल तर बरें झालें असतांही दुसऱ्या बाजूनें तोटाच होईल. तशीच स्थिति एप्रिल व मेमध्यें घडेल असें वाटतें.

हर्शलचें भ्रमण लाभस्थानीं होत आहे. हा ग्रह सन्मुख झाला आहे ह्मणून आतां पूर्वस्थितीच्या क्रांतीचे दिवस आले आहेत. हा ग्रह संततीला व गर्भाला अनुकूल नाहीं. तो या स्थानांत आल्यावर एक गर्भपात झाला आहे या हर्शलला ता० ८ जानेवारीला रवि मिळतो व २७ मार्च्यला मंगळ मिळतो. या युतींचा परिणाम गर्भावर स्त्रीच्या गर्भाशयावर व संततीवर चांगला घडणार नाहीं.

जन्मकाळीं रवीनें षष्ठ स्थानाचें आधिपत्य घेतलें असून तो चतुर्थ स्थानीं चतुर्थेशानें युक्त झालेला आहे. त्यामुळें मित्र, माता, वाहनें, घर, इष्टेट व दायाद यांच्या सुखांत पारिणामीं दुःख आहे.

ताजिकच्या पद्धतीनें ४१ व्या वर्षाचा आरंभ पंचम स्थानावर होतो. ह्मणून त्या वर्षी उत्तम ग्रंथ व उत्तम लेख बाहेर पडतील. व विद्येंत प्राविण्य मिळून नवीन शोध लागतील. त्या मुळें मोठा लौकिक होईल. एकंदरींत ४१ व्या वर्षी बऱ्याच महत्वाच्या गोष्टी घडाव्या असें वाटतें.

प्रत्येक महिन्यांत चंद्र मीन आणि मेष राशींत असतां पैसा जास्त मिळावयाचा. कर्क, कन्या, मकर, वृषभ व मिथुन या राशींतला चंद्र एकापेक्षां एक कमी याग्यतेचा आहे. वृश्चिक राशींतला बरा. सिंह, धनु व कुंभ या राशींतला बाईट जाणावा.

आतां ग्रहांच्या युतींचे दिवस कोणत्या प्रकारचें जातील तें सांगतों. या तारखांस युति कोणत्या आहेत त्या स्पष्ट ग्रहाचे पुस्तकावरून कळून येतील ह्मणून त्या येथें दिल्या नाहींत.

२ जाने– लाभ	२१ मा.–हानि	२० मे–मध्यम	७ आ-मध्य	१८ अ म.	
११ — ,,	२२ —मध्यम	२१ —हानि	१२-लाभ	२१-लाभ	
१८ — ,,	२७ —हानि	२७ —लाभ	१६-हानि	२६- ,,	
२० — ,,	२९.—लाभ	७ जू.- ,,	१७-मध्य.	२८-मध्य	
२१ — ,,	३ —हानि	,, — ,,	१८-लाभ	२८- ,,	
२२ — हानि	९ —मध्यम	१० — ,,	,, -स्त्री	१२-लाभ	
२३ — ,,	१३ —लाभ	१३ —मध्यम	२५-लाभ	१३-हानि	
३० — विद्या	,, — ,,	१५ —हानि	२७- ,,	१७-लाभ	
७ फे.—लाभ	१४ —हानि	१७ — ,,	२८- ,,	,, - ,,	
११ — हानि	१९ —मध्यम	१८ — ,,	३-मध्यम	२३- ,,	

१६ —लाभ	२० — ,,	१९—विद्या	१४-हानि	२४-म.
१७ — ,,	,, —लाभ	२३—लाभ	१५ लाभ	६डि.हा
१९ —हानि	,, —मध्यम	४जु.- ,,	१७-हानि	७ म.
,, — ,,	,, —हानि	८ — ,,	१८-लाभ	१३-हा.
२० — ,,	२२ — ,,	१०—मन्यम	,,-हानि	,,- ,,
२३ —मध्यम	२८ — ,,	१६— ,,	२४ लाभ	१५-लाभ
६मा—लाभ	२९ —लाभ	१७—हानि	२९- ,,	१६-हा.
१६ — ,,	१०मे.— ,,	१९—हानि	३०-मध्य	२१-लाभ
१७ — ,,	१३ —हानि	२१—लाभ	१२अ -,,	,,-म.
२० — ,,	१७ —मध्यम	४औ-हानि	१४ हानि	२८-लाभ
२१ — ,,	१९ —हानि	९—लाभ	,, ,,	२९-हा.

लाभ व हानि कोणत्या प्रकारें होणार हें त्या ग्रहांची युति ज्या स्थानांत व्हावयाची त्या स्थानानुरूप व ते ग्रह कोणत्या स्थानांचे अधिपति आहेत त्याला अनुसरून कल्पावें.

याच रीतीनें ग्रहांच्या प्रतियोगांचेंही फल तयार करितां येईल. शिवाय जन्मस्थ ग्रहाशीं कोणता ग्रह कोणता योग करितो हें पाहून त्यावरूनही फलें पाहतां येतील. अशा प्रकारें केलेलें वर्षफल पाहिजे तितकें सूक्ष्म होईल. प्रत्येक दिवस कोणत्या प्रकारचा जाणार हेंही ठरवितां येईल. पण हें काम ज्योतिष्यावर सोंपविण्यापेक्षां ज्याचें त्यानें करावें. या शिवाय आणखी दृष्टिविचार घेतल्यास फारच सूक्ष्म गति झाल्याशिवाय राहणार नाहीं. ही पद्धति आपली असून विश्वसनीय आहे. तिला उपकरणांचा खटाटोपही लागत नाहीं. जन्मकालची कुंडली (नकाशा) व स्पष्ट ग्रहांचें पुस्तक हीं दोनच या पद्धतीचीं उपकरणें आहेत.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥
'भवभूति'

पुस्तक ८वें.] भाद्रपद कृ० ११, सोमवार [अंक २४ वा

दशांचें महत्व.

पत्रिका करितांना दोन गोष्टींचा विचार करावा लागतो. एक कुंडलींत जे ग्रह पडले असतील ते कोणकोणतीं फलें उत्पन्न करूं शकतात व त्या मनुष्याला इहलोकचीं सर्व प्रकारचीं सुखें ते कशा प्रकारें देऊं शकतात? आणि दुसरी, ते ग्रह जीं फलें उत्पन्न करीत असतील तीं केव्हां? जातकशास्त्रांतले हे मुख्य दोन्ही भाग अत्यंत बिकट आहेत. या दोन्ही भागांत प्रवीण असा ज्योतिषी क्वचितच आढळेल. कित्येक पहिल्या भागांत निष्णात असतात तर कित्येक दुसऱ्यांत असतात. या दोन भागांपैकीं पहिल्या भागाचेंच विवेचन केलेले सर्व जातक ग्रंथ आहेत. दुसऱ्या भागाचा हवाला त्यांनीं दशांवरच दिलेला आहे. बृहत्पाराशरी मध्यें बेचाळीस प्रकारच्या दशा सांगितल्या आहेत! या दशा भिन्न भिन्न मताच्या ग्रंथकारांनीं आपापल्या मतानुसार बनविलेल्या आहेत. त्यांचा एकमेकांशीं कांहीं संबंध नाहीं. त्या दशांनीं नावें येणें प्रमाणें आहेत.—

मैत्रेय उवाच

दशा कतिविधाः संति ह्येतन्मे ब्रूहि तत्वतः ॥
महर्षे त्वं समर्थोसि कृपया करुणानिधे ॥

पराशर उवाच

अथातः संप्रवक्ष्यामि दशाभेदाननेकशः ॥
विंशोत्तरीदशा चोक्ता दशा तु षोडशोत्तरी ॥
द्वादशोत्तरिका ज्ञेया तथैवाष्टोत्तरीदशा ॥
पंचोत्तरी दशा तद्वद्दशा शतसमाः स्मृताः ॥
दशाहिचतुरशीतिः प्राहचाथद्विसप्ततिः ॥
तथा षष्टिसमाचोक्ता दशा षड्त्रिंशतिः समाः ॥
नवमांशनवदशा राश्यंशकदशाः स्मृताः ॥
दशाकालाभिधा चक्रदशा शक्रमुनीश्वरैः ॥
चरपर्यादशाविप्र दशास्थिराद्विजोत्तम ॥
अथोत्तरदशाविप्र ब्रह्मतामपरा दशा ॥
केंद्रादिच दशा ज्ञेया कारकादिग्रहा दशा ॥
मंडूकं च दशा प्रोक्ता तथा शूलदशाविधः ॥
योगार्द्धच दशा विप्रदृग्दशाकथयाम्यहम् ॥
दशा त्रिकोण नाम्नावै राशीनांच दशा तथा ॥
तारादशा तथा ज्ञेया दशा ज्ञेया च वर्णदा ॥
पंचस्वरदशा विप्र योगिनीच दशा स्मृता ॥
ततःपैंड्यदशा ज्ञेया तथांशश्च दशा द्विज ॥
नैसर्गिकदशा विप्र अष्टवर्गदशास्मृता ॥
द्विचत्वारिंशद्भेदाः स्युः कथयामि तवाग्रतः ॥

१ विंशोत्तरी	२ षोडशोत्तरी	३ द्वादशोत्तरी
४ अष्टोत्तरी	५ पंचोत्तरी	६ शताब्दिक

७ चतुरशीत्यब्दक	८ द्विसप्ततिका	९ षष्ठिहायनि
१० षड्त्रिंशतिका	११ नवमांशदशा	१२ राश्यंशक
१३ कालदशा	१४ चक्रदशा	१५ चरपर्या
१६ स्थिरदशा	१७ प्राणदशा	१८ ब्रह्मदशा
१९ केंद्रदशा	२० कारकग्रहदशा	२१ मंडूकदशा
२२ शूलदशा	२३ योगार्द्धदशा	२४ दृग्दशा
२५ त्रिकोणदशा	२६ राशिदशा	२७ तारादशा
२८ वर्णददशा	२९ पंचस्वरदशा	३० योगिनी
३१ पैंड्यदशा	३२ अंशदशा	३३ नैसर्गिकदशा
३४ अष्टवर्गदशा	३५ संध्यादशा	३६ पाचकदशा
३७ नवमांशस्थिरद.	३८ कारकेंद्रदशा	३९ नक्षत्रदशा
४० कालचक्रदशा		

या प्रमाणें चाळीस प्रकारच्या दशांची माहिती बृहत्पाराशरींत आहे. आणखी दोन प्रकारच्या दशा कोणत्या राहिल्या तें कळत नाहीं. यांपैकीं विंशोत्तरी, अष्टोत्तरी व योगिनी या तीन प्रकारच्या दशाच सर्वत्र पत्रिकेंत वर्तवितात. त्यांतही विंशोत्तरी दशेचा प्रसार अधिक आहे असें दिसतें. विंशोत्तरी आणि अष्टोत्तरी यांत अनुभवास कोणती येते या विषयीं ठिकठिकाणीं मतभेद आहे. कोणी ह्मणतो विंशोत्तरीचा अनुभव जास्त येतो तर कोणी ह्मणतो अष्टोत्तरीचा त्या पेक्षां अधिक येतो. आमच्या मतें दोहोंतही विशेष अर्थ नाहीं. कारण, अमुक ग्रहाची दशा चांगली आहे व अमुक ग्रहाची वाईट आहे, हें ठरविणेंच कठीण आहे. विंशोत्तरीमध्यें रवि, चंद्र, मंगळ, राहु, गुरु, शनि, बुध, केतु व शुक्र असा ग्रहांचा क्रम आहे व अष्टोत्तरीमध्यें रवि, चंद्र, मंगळ, बुध, शनि गुरु, राहु आणि शुक्र असा अनुक्रम आहे. मनुष्याला सुखांतीं दुःख व दुखांतीं सुख प्राप्त

होत असतें, याच तत्वावर ग्रहांचा अनुक्रम दिसतो. शुभ ग्रहाची दशा झाल्यावर पाप ग्रहाची दशा येते व ती झाल्यावर पुनः शुभ ग्रहाची येते हा क्रम विंशोत्तरी पेक्षां अष्टोत्तरींत फार चांगला साधला आहे विंशोत्तरींत मंगळापुढें राहु आल्यानें सुखदुःखाची सांगड बिघडली आहे. शुभ ग्रहाच्या दशेची फलें शुभ व पाप ग्रहाच्या दशेचीं फलें अशुभ अशीच साधारणतः कल्पना केलेली आहे. लोकांचीही अशीच कल्पना असते. आतां शुक्राची दशा आहे, तेव्हां माझा भाग्योदय होऊन सर्व प्रकारचीं सुखें मला प्राप्त होतील अशी आशा बिचारा मनुष्य करीत असतो, पण अनुभव उलट येऊन ज्योतिःशास्त्रावरची श्रद्धा मात्र त्याची उडून जाते !

याचीं कारणें अशीं आहेत.—१ अमुक राशींतल्या ग्रहांची फलें अमुक. २ अमुक भावांतल्या ग्रहांचीं फलें अमुक. ३ अमुक भावाच्या अधिपतीचीं फलें अमुक. ४ अमुक अवस्थेतील ग्रहांचीं फलें अमुक. ५ मित्र, अधिमित्र, शत्रु, अधिशत्रु, सम या गृहींच्या ग्रहांची फलें अमुक. ६ अस्तंगत, पापयुक्त, पापदृष्ट ग्रहांचीं फलें अमुक. इतक्या प्रकारांनीं कोणता ग्रह कोणतीं फलें उत्पन्न करील अशी ज्योतिष्यास कल्पना करावी लागते. आणि ही कल्पना करितांना त्याची तारंबळ उडून निश्चयात्मक असें कांहींच सांगतां येत नाहीं म्हणून कित्येक कारणांची घरसोड करून कसें तरी आपलें मत तो प्रस्थापित करितो व सरासरीनें अनुभवाशीं मेळ घालून देतो. यावरून दशा हें एक जातकांतलें थोतांड आहे असें ठरतें. या दशांवरून अमुक काळीं अमुक गोष्ट घडेल असें समजणें शक्य नाहीं. पत्रिकेतला हा भाग निरर्थक आहे. ज्योतिषी विनाकारण श्रम घेऊन कोष्टकें भरून काढितो व या त्याच्या श्रमाबद्दल ग्राहकास विनाकारण जास्त मोबदला द्यावा लागतो.

पत्रव्यवहार.

[१]

नवग्रहदशा.

श्रीयुत कुंडलीविज्ञानकर्ते मु० महाड यांसी सा. नमस्कार.

वि. वि.—चालू वर्षीच्या अंक २ मध्यें अनुभव पाहण्याकरितां ज्या काल्पनिक (नवग्रह) दशा कशा तयार करावयाच्या हें दाखविलें आहे त्या संबंधीं अनुभविक दोन शब्द लिहून पाठवित आहे त्यास स्थळ मिळण्याची मेहेरबानी व्हावी.

सायन कुंडली.



ह्या कुंडलीतील ग्रहांच्या भोग्य अंशांवरून दशा अंक २ मध्ये सांगितल्याप्रमाणें तयार केल्या त्या पुढील प्रमाणें होत.

	चं	ने	श	गु	र	ह	बु	मं	श
व	४	४	१	१	९	५	२	९	३
म	०	१०	९	४	९	४	८	९	१

एकंदर आयुर्दाय ह्यामानानें ४२ वर्षें ६ महिने निघतो.

जन्म ता. १ सप्टेंबर १८८२ रोजीं आहे म्हणून हल्लीं बुधाची महादशा सुरू आहे.

जन्म कुंडलींत चंद्र भाग्य भुवनांत मित्रगृहीं शुक्रानें विलोकित आहे. ह्या दशेंत सर्व कुटुंब एकत्र नांदत होतें. कुटुंबांत सुमारें १० माणसें होतीं सांपत्तिक स्थितीसंबंधानें भरभराट होती व अपयश स्वप्नांत टाऊक नसे.

पुढें नेपचूनची दशा लागल्यावर कुटुंबांत तंटे उपस्थित झाले. विभक्तपणा झाला. सांपत्तिक स्थिती खालावली. वडील काळजीत पडले. मातृत्रयी, पितृत्रयी ह्यापैकीं २ मृत्यु झाले. पित्यास राज्यभुवनांत पैशाची ठोकर बसली व अधिकाऱ्याची गैरमर्जी झाली. पित्यास १ वर्ष क्षयासारखा आजार होता.

कुंडलींत ने० व शनि दशमांत व चंद्राचे कुटुंबस्थानीं आहेत. नेपचून पापग्रह असून शनीनें युक्त व राहूनें दृष्ट म्हणून त्याची दशा अनिष्ट गेली.

शनिची दशा बरी गेली कुंडलींत हा ग्रह मित्रगृहीं असून बुध व ह्यामध्यें नवपंचम योग झाला आहे.

पित्याची ह्या दशेंत लांब बदली झाली परंतु बदलीचे डोहाळे नेपचूनचे दशेंतच झाले होते. ही दशा पुष्कळ सुखावह झाली.

कुंडलींत गुरु सन्मुख राशींत समगृहीं आहे. गुरु शुक्र ह्यांत नवपंचम योग झाला आहे. ह्यादशेंत नेपचूनचे दशेंत घडलेल्या अनिष्ट गोष्टींचा विसर पडला. संसारांत कुटुंबांतील मंडळीचें पाउल पुढें सरसावलें. पित्यास एक बढती मिळाली. स्वतःच्या विद्याभ्यासांत क्रांती झाली म्हणजे इंग्रजी विद्या शिकण्यास आरंभ झाला. सन्मित्र मिळाले.

नंतर रवीची महादशा सुरू झाली. हा ग्रह कुटुंबस्थानीं समगृहीं आहे. ह्या दशेच्या आरंभीं वडीलांची जी पूर्वी लांब बदली झाली होती तेथून पुन्हा आमचे गांवीं बदली झाली त्यांस १ मोठा आजार गेला. ३ मंगल कार्ये झालीं कुटुंबांत २ मृत्यु झाले. पित्यास २ बढत्या मिळाल्या. संसारांत क्रांती झाली म्हणजे स्वतःच्या नोकरीस आरंभ झाला. सांपत्तिक उत्पन्न वाढलें. मातुश्रीपासून सुमारें ५०० रुपये पर्यंत वेळोवेळीं एकंदर मदत झाली. व सर्व कुटुंब चंद्राच्या दशेप्रमाणें एकत्र नांदत होतें. व्यवहारीं दोन वेळां अनिष्ट परिणामकारक तटा झाला. मामा मृत्यु पावला.

रवि लग्नस्वामी, असून बुध व हर्शल ह्या ग्रहानें युक्त आहे. रविच्या दशेंत चांगलीं व वाईट परंतु त्यांत चांगलीं फलें जास्त अनुभवास आलीं.

नंतर हर्शलची दशा सुरू झाली. ह्यादशेंत कुटुंबाची पांगापांग झाली. बापलेकांच्या बदल्या झाल्या. बापास ३ मोठे आजार गेले. स्वतःस कायम नौकरी लागून ज्योतिर्विद्येस आरंभ झाला. पित्याच्या वारंवार प्रकृति बिघडण्यानें सर्व कुटुंबांत काळजी उत्पन्न झाली. ह्यादशेंत स्वतःस संततीआरंभ होऊन २ अपत्ये झालीं. ह्या ग्रहाची दशा तारीख ३१ आगष्ट १९०९ रोजीं संपली व पित्यास ता. २० मे १९०९ रोजीं मृत्यु आला. त्यामुळें भयंकर हानी झाली.

हर्शलचे दशेंत अनिष्ट गोष्टीच जास्त घडल्या. हा ग्रह रविजवळ असल्यामुळें कुटुंबसुख बिघडून बापाचे आजार व मृत्यु झाला. द्रव्यस्थिती खालावली.

बुधाची महादशा ता. १ सप्टेंबर १९०९ पासून सुरू झाली. ह्याच दिवशीं अधिकाऱ्यांची मर्जी होऊन पगाराची बढती झाली. कुंडलींत बुध धनेश व लाभेश असून धनस्थानीं उच्च आहे. ही दशा कुटुंबसुखास व सांपत्तिक सुखास चांगली जाईल असें वाटतें.

बुधाच्या अंतर्दशा खालीलप्रमाणें आहेत.

बुध	मंगळ	शु	चंद्र	ने	श	गु	र	ह
म २	७	२	३	३	१	१	७	३
दि ०	१०	१०	०	१०	१०	०	१०	२८

मंगळ हा बुधाशीं सम असून तो कुंडलींत संमुख राशींत शत्रूगृहीं आहे. ह्या ग्रहाची अंतर्दशा सुरू होतांच त्रास व कष्ट ह्यास आरंभ झाला. प्लेगमुळें परगावीं राहण्यास जाऊन रोज प्रवास सुरू झाला. द्रव्यखर्च जास्त होऊं लागला. एक कामावरून दुसऱ्या कामावर बदली झाली लहान अधिकाऱ्यांशीं तंटा होऊन वैमनस्य उत्पन्न झालें. व मर्जीतले मोठे अधिकाऱ्याची बदली झाली ह्यामुळें दिलगिरी प्राप्त झाली. मंगळाची अंतर्दशा ता. ११ जून १९१० पर्यंत आहे. हा ग्रह भाग्य स्थानांतील मेष या चर राशीचा स्वामी असून तो तृतीयस्थानीं तूळ या चर राशींत आहे ह्मणून तो आपल्या अंतर्दशेंत बदली करील असें वाटतें.

येणें प्रमाणें अनुभव लिहून पाठविला आहे कळावें

लोभवृद्धि ठेवावी हे विनंती

आपला वर्गणीदार

गणेश दामोदर ग्रंथे.

झटपट ज्योतिष.

ही एक भविष्यत कालबोधक पद्धति आहे. आमच्या एका मित्राचा या पद्धतीवर पूर्ण विश्वास आहे. या पद्धतीनें फारसा गणिताचा खटाटोप न करितां बरीं वाईट वर्षें भरामर सांगतां येतात. जातक सांगण्याचे मुख्य दोन भाग आहेत. १ ला–कुंडलींत जे ग्रह पडले आहेत, ते त्या मनुष्यास कोणकोणतीं फलें उत्पन्न करितात हें सांगणें २ रा.–तीं फलें वयाच्या कोणत्या–काळीं अनुभवास येतील हें सांगून आयुष्यांतलें प्रत्येक वर्ष कसें जाणार व त्या वर्षांत कोणत्या महत्वाच्या गोष्टी घडणार हें सांगणें हे दोन्ही भाग सारख्याच योग्यतेचे आहेत. पहिल्या भागाला द्वादशभाववर्णन असें म्हणतात. या भागावर जातकग्रंथकारांनीं पुष्कळ मेहनत घेतली असल्यामुळें पुष्कळांस या भागाचें तात्विक ज्ञान असतें. व्यावहारिक ज्ञान मात्र फारच थोडक्यांस असतें. जातक ग्रंथाच्या वाचनानें तात्विक ज्ञान मात्र निःसंशय होतें, पण व्यावहारिक ज्ञानाला पुष्कळ अनुभव ध्यावा लागतो. त्याच प्रमाणें त्याला देशकालवर्तमानाचीही उत्तम माहिती असावी लागते. तत्व आणि व्यवहार हीं दोन भिन्न आहेत. केवळ तत्वज्ञानी मनुष्याला एखाद्या व्यक्तीचें जातक वर्तवितां येईल असें वाटत नाहीं. त्याचप्रमाणें केवळ व्यवहारज्ञ मनुष्यालाही जातक वर्तवितां येणार नाहीं. हें उघड आहे. ज्योतिषी जर तत्वज्ञ आणि व्यवहारज्ञ असेल तरच तो जातक उत्तम रीतीनें वर्तवील. विवाहकाळीं अमुक प्रकारचे ग्रह येतात हें सांगणें तत्वज्ञान्याचें काम आहे. पण अमुक

एका व्यक्तीचा विवाह अमुक कालीं घडेल हें सांगतां येण्यास तत्व आणि व्यवहार या दोहोंचेंही ज्ञान असलें पाहिजे. अमुक एका कुंडलींत विवेला ग्रह चांगले पडले आहेत हें तत्वज्ञानी सांगू शकेल, पण तो मनुष्य विद्वान् असला पाहिजे. हें त्यास सांगतां येणार नाहीं. कारण, तो व्यवहाराच्याच बाजूनें सोडविला पाहिजे. मात्र तो सोडवितांना तत्वांचें साहाय्य घेण्याचें असतें. तिहास दोन तर सहांस चार हा प्रमाणगणिताचा सिद्धांत आहे. पण तो लागू करितांना व्यवहाराचा विचार करावा लागतो. कारण, मनी तीन वर्षांची असतां तिला दोन भाऊ होते पण सहा वर्षांची असतां चार भाऊ असले पाहिजेत हा प्रमाणगणिताचा सिद्धांत येथें लागू होत नाहीं. तात्पर्य, ज्योतिष्यास केवळ तत्वज्ञानच असून चालत नाहीं. तो उत्तम प्रकारचा व्यवहारज्ञही असावा लागतो. कित्येकांस ही गोष्ट चांगली न समजल्यामुळें ते शास्त्राला दूषणें देतात. परंतु हें त्यांचें केवळ अज्ञान होय.

कुंडलींत जे ग्रह पडले ते अमुक फल देतात, इतकें कळल्यावर कधीं देतात हें ठरविण्याचें काम फार बिकट आहे. जातकाच्या पहिल्या भागावर जसे ग्रंथ आहेत तसे या दुसऱ्या भागावर नाहींत. फक्त दशाविचार ग्रंथकारांनीं दिला आहे. पण, दशा अनेक प्रकारच्या असून त्यांची फलें पाहण्याचे मार्गही अनेक आहेत, व त्या सर्वांचें एक कोडबोळें झालेलें आहे ? ग्रहांच्या निरनिराळ्या अवस्था, त्यांचें स्थानबल, राशिबल व भावाधिपत्यबल नैसर्गिक बल यापैकीं कोणत्या फलानें दशाफल ठरवावें हा विचारी ज्योतिष्याच्या पुढें मोठा बिकट प्रश्न येऊन पडतो. उच्च रवीची दशा उत्तम व नीच अथवा शत्रुयुक्त रवीची दशा अधम म्हणावें तर उच्च रवि षष्ठाधिपति आहे किंवा तो व्यय स्थानीं आहे तेव्हां ती दशा उत्तम कां जावी ? अथवा रवि नीच आहे पण तो त्रिकोणाधिपति आहे किंवा केंद्रांत पडला आहे तर त्याची दशा

अधम कां जावी ? असले बिकट प्रश्न या दशाप्रकरणीं पडतात. शिवाय एखादा ग्रह आपल्या दशाप्रवेशकालीं जसा असेल तसें फल देतो अशीही बचनें आहेत. तेव्हां आपण काय करावें हा विषय विचारकरण्यासारखा आहे. बहुतेक ज्योतिषी कालविचार दशांवरून करितात व तो चांगला जुळतो असें म्हणतात. लोकांचीही तशीच समजूत आहे. पण, जो ग्रह एखादें फल उत्पन्न करितो तो ग्रह आपल्या दशाकालीं तें फल देईल अशा भरंशावर बसण्यास पुष्कळ वेळां तोंडघशीं पडण्याचा प्रसंग येतो. कारण, सर्व आयुष्यांत त्याची दशाच येत नाहीं ! किंवा आली तर ज्या वयाच्या भागांत ती गोष्ट होण्याचा संभव त्या भागांत न येतां भलत्याच भागांत येते ! सारांश, आपणास कालफल सांगण्याच्या कामीं दशांचा जितका उपयोग झाला पाहिजे असें वाटतें तितका होत नाहीं, हा सिद्धांत आहे.

दशाविचारापेक्षां गोचरपद्धति चांगली असें आम्हांस वाटतें. चर ग्रह (दरसालचे पंचांगांतले ग्रह) हे स्थिर ग्रहांच्या (कुंडलींतल्या ग्रहांच्या) अनुरोधानें पाहिल्यास फलानुभव चांगला येतो किंवा आला पाहिजे असें आमचें मत आहे. या मताचा अनुवाद कुंडलीविज्ञानांत आजपर्यंत आम्ही करीत आलों आहों. ही पद्धति अद्यापि प्रयोगावस्थेंत आहे हें विसरतां कामा नये. तिला सिद्धांतस्वरूप देण्याचा आम्हीं प्रयत्न करीत आहों. कालांतरानें त्याला यश मिळेल अशी आशा वाटत आहे.

झटपटज्योतिषाची पद्धति गंमत करून दाखविण्यास बरी आहे हिला दशा पहाव्या लागत नाहींत कीं चर ग्रहाची जरुरी पडत नाहीं ! कुंडली पुढें धरून भराभर अमुक वर्ष अमक्या प्रकारचें, अमुक वर्ष अमक्या प्रकारचें असें बेधडक सांगत सुटावें. या

पद्धतीला भावचलिताची जरूर नसते किंवा सायन निरयनाचाही तींत घोटाळा नाहीं ! ही पद्धति अशी.—

कुंडलींतलें जें पहिलें स्थान तें पहिलें वर्ष, दुसरें स्थान तें दुसरें वर्ष, तिसरें स्थान ते तिसरें वर्ष याप्रमाणें पुन्हा तेराव्या वर्षी पहिलें स्थान, १४ वर्षी दुसरें स्थान, पंधराव्या वर्षी तिसरें स्थान, या प्रमाणें प्रत्येक वर्षास एकेक स्थान घेऊन तें स्थान जन्मकालीं जसें बलवान् असेल तसें त्या त्या वर्षी फल सांगावयाचें. उदाहरणार्थ —



पहिल्या स्थानांत केतु आहे व या स्थानाचा स्वामी दशमांत शत्रुगृहीं शत्रूच्या (रवीच्या) दृष्टींत आहे. म्हणून हें स्थान बलवान् नाहीं. यावरून १।१३।२९।३७।४२।६१ या वर्षी शारीरिक व मानसिक कष्ट जाणावे. हें तनुस्थान असल्यामुळें शरीर व मन यांचा इष्टानिष्टपणा याच स्थानावर मुख्यत्वें अवलंबून असतो.

दुसऱ्या स्थानांत स्वगृहीं गुरु आहे, म्हणून हें स्थान फार बलवान् आहे. म्हणून २।१४।२६।३८।५०।६२ या वर्षी सुप्रसन्न, विद्येंत जय किंवा वाणी व विद्या यांची कर्तबगारी, धनाचा संग्रह, विवाह किंवा स्त्री आणि कुटुंबसंबंधानें सुख व भाग्योदय या गोष्टी प्राप्त होतील.

तिसऱ्या स्थानांत स्वगृहीं मंगळ आहे, म्हणून हेंही स्थान फार

बलवान् आहे. तेव्हां ३।१५।२७।३९।५१।६३ या वर्षी भावंडांचे जन्म अगर मृत्यु अगर त्यांचा आजारीपणा, कडाक्याचीं भांडणें, कर्तबगारीचीं व धाडसाचीं कामें, मंगळ हा दशमाधिपति असल्यामुळें सरकार किंवा यजमान यांची कृपा, उद्योगांत सिद्धि व त्याची भरभराट इत्यादि गोष्टी घडतील.

चतुर्थ स्थानीं रवि आणि बुध हे ग्रह आहेत. यांत रवि हा जायास्वामी असून तो शनीच्या दृष्टींत असल्यानें बिघडलेला आहे. बुध हा पंचमेश आणि अष्टमेश आहे. यावरून ४।१६।२८।४० ९२।६४ या वर्षी मातेला कष्ट, स्त्रीला पीडा, मोठें संकट, दारिद्र्य, धंद्याची हानि, अपमान या गोष्टी घडतील.

पंचम स्थानीं चतुर्थेश शुक्र आहे व जवळच हर्शल आहे शुक्र हा चतुर्थ व भाग्य यांचा अधिपति आहे, म्हणून ५।१७।२९।४१ ५३।६५ या वर्षी विद्येंत जय, विद्येची कर्तबगारी, संतति भाग्योदय या गोष्टी घडतील.

षष्ठस्थानीं स्वगृहीं चंद्र आहे. हा ग्रह जरी स्वगृहीं असला तरी तो या स्थानांत अनिष्ट फलेंच उत्पन्न करितो. म्हणून ६।१८ ३०।४२।५४।६६ या वर्षी शत्रुपीडा, शारीरक्लेश, पुष्कळशा कामांत अपमान व पराजय, संकट व धंद्याचें नुकसान या गोष्टी घडतील.

सप्तम स्थानीं राहू आहे, हा ग्रह स्त्रीला मारक आहे. म्हणून ७।१९।३१।४३।५५।६७ या वर्षी स्त्रीला क्लेश अगर तिचा मृत्यु, गर्भपात, युद्धांत व वादांत जय, धंद्यांत हानि, द्रव्याची तूट या गोष्टी घडतील.

अष्टमांत ग्रह नाहीं. अष्टमेश बुध साधारण बली आहे. हा ग्रह मारकेश जो रवि त्यानें युक्त आहे, व या स्थानावर गुरु पाहतो.

म्हणून हें स्थान विशेष जोरांत नाहीं यास्तव ८।२०।३२।४४।५६ ६८ या वर्षी शरीराला बाधा, सांपत्तिक व औद्योगिक स्थिति साधारण, कष्ट व दगदग अशा गोष्टी घडतील.

नवमांत ग्रह नाहीं. या स्थानावर मंगळ हा कर्मेश पाहतो. भाग्याधिपति शुक्र पंचमांत आहे. म्हणून ९।२१।३३।४५।५७।६९ हीं वर्षें भाग्योदयाचीं, कीर्ती, यश, लाभ, मांगलिक उत्सव, धर्मसंबंधीं कर्में, ईश्वरोपासना, विद्वेत कर्तबगारी, पुत्रप्राप्ति व पुत्रसुख वगैरे गोष्टी घडतील.

दशमांत लग्नस्वामी शनि हा मंगळाच्या गृहीं असून रवीच्या समोर आहे, यास्तव तो फार आनेष्ट आहे. म्हणून १०।२२।३४ ४६।५८।७० हीं वर्षें राजभय, दुर्लौकिक, धंद्याची हानि, दुष्कर्मांचीं कृत्यें, बापाचा मृत्यु किंवा बापाला कष्ट, संपत्तीचा नाश, शरीराला पीडा अशा प्रकारचीं येतात.

लाभ स्थानीं ग्रह नाहीं. या स्थानावर शुक्र पाहतो. लाभस्वामी गुरु हा धनस्थानीं बलवान् आहे. यास्तव ११।२३।३५।४७।५९ ७१ हीं वर्षें अत्यंत लाभाचीं व धनसंग्रहाचीं असून सर्व प्रकारें श्रेष्ठ अशीं आहेत पुष्कळ दिवसांचे हेतु व आरंभलेल्या कार्याची सिद्धि या कालांत होईल.

व्ययस्थानीं ग्रह नाहीं. व्ययेश शनि फार बिघडलेला आहे. यास्तव १२।२४।३६।४८।६०।७२ हीं वर्षें धनाच्या नाशाचीं, संकटाचीं व फिकिरीचीं आहेत. व्ययेश दशमांत पडल्यामुळें हीं वर्षें राजभयाचीं किंवा अधिकाऱ्याच्या वक्रदृष्टीचीं आहेत.

याप्रमाणें या पद्धतीनें गणिताचा खटाटोप न पडतां सर्व आयुष्य बऱ्या रीतीनें वर्तविता येतें. या पद्धतीला आपण **मुंथापद्धति** किंवा **उदयपद्धति** असें नांव देऊं. या पद्धतीनें सर्व कुंडल्या मिळतात.

असें माझ्या मित्राचें म्हणणें आहे. परंतु ही पद्धति उपपत्तीला नीटशी जुळत नाहीं. प्रत्येक स्थानास एक वर्ष कां कल्पावयाचें याचा उलगडा झाल्याशिवाय या पद्धतीला महत्व येणार नाहीं. ताजिकमध्यें जो मुंथा घेत असतात तोच या पद्धतींत स्वीकारला आहे. पहिल्या वर्षी मुंथा लग्नांत असतो, दुसऱ्या वर्षी तो द्वितीय स्थानांत असतो याप्रमाणें तो कित्येक वर्षांस एकेक स्थान भोगतो. मुंथा हा शब्द आमच्या भाषेंतला नाहीं त्यामुळें त्याचा उलगडा नाहीं.

सूक्ष्मविचारानें असें वाटतें कीं, गुरु हा प्रत्येक वर्षास एकेक स्थान किंवा एकेक रास भोगितो, म्हणून कुंडलींत तो स्थानास वर्ष याप्रमाणें भ्रमण करितो. १३ व्या वर्षी तो पुनः स्वस्थानीं येतो. भाग्यस्थानीं तो जर बलवान् असेल, तर गोचरपद्धतीनें १३ २९।३७।४९।६१।७३ इ० वर्षी त्या मनुष्याचा निश्चयानें भाग्योदय होतो, असा अनुभव सर्वत्र येतो. यावरून वरील मुंथा पद्धति या गुरूच्या भ्रमणानें उत्पन्न झाली असावी. आणि हें जर खरें असेल तर तींत एक दोष उत्पन्न झालेला आहे. वास्तविक गुरूवरून जर हिची उत्पत्ति आहे तर वर्षें पाहण्याची पद्धति गुरुवासूनच पाहिजे. वर उदाहरणार्थ जी कुंडली घेतली आहे तींतील फलें मुंथापद्धतीनें एकेक वर्षाच्या फरकानें उत्तम अनुभवास येतात म्हणजे गुरूपासून वर्ष गणना केल्यास फलें तंतोतत मिळतात. यावरून मुंथापद्धतिपेक्षां गुरुपद्धति उपपत्तीला व युक्तिलाही योग्य आहे असें म्हणावें लागतें.आमच्या मतें याच पद्धतीनें वर्षांचें ढोबळ मान ठरवावें हें बरें. या पद्धतीला **आंगिरसपद्धति** असें नांव द्यावें.

कोणत्याही शास्त्रांत पद्धति अनेक असल्या तरी कांहीं बिघडत नाहीं. परमेश्वरप्राप्तीचे मार्गही अनेक आहेत. एखाद्या स्थलीं जाऊन पोहोंचण्यास मार्ग पुष्कळ असले तर फार उत्तम. कोण-

त्याही स्थितीच्या मनुष्याला तें स्थल गाठण्यास सुलभ पडावें अशी इच्छा असल्यास मार्ग निराळेच पाहिजेत. मुथापद्धतीनें फलानुभव बरोबर येत असेल तर तीच पद्धति स्वीकारावी, आंगिरस पद्धतीनें सत्य गांठत असेल तर ती पद्धति घ्यावी, दशापद्धतीच बरोबर वाटत असेल तर तिनेंच फलादेश पहावा किंवा गोचर पद्धति बरी वाटत असेल तर तिचाच अंगिकार करावा. कालफल सांगण्याची पाश्चात्य विद्वानांची जी डायरेक्शनची अथवा सायक्लिक पद्धति आहे तिचाही अनुभव येतो असें कित्येक तदनुयायी म्हणतात. जीवनराव चिटणीस यांनींही एक पद्धति शोधून काढिली आहे. तात्पर्य, आज आपणापुढें कालफल पाहण्यासाठीं ६।७ पद्धति आहेत. या सर्व पद्धति खऱ्याच आहेत. परंतु फलांची कल्पना करितांना मात्र घोटाळा होतां कामा नये जी पद्धति आपण स्वीकारली तिच्याच पद्धतीनें फलांची कल्पना केली पाहिजे. फलांची कल्पना सशास्त्र असावी. तींत लटपट उपयोगी नाहीं. एकदां एक बोलावयाचें व दुसऱ्या वेळीं अनुभव जुळविण्यापाठीं दुसऱ्या रीतीनें बोलावयाचें ही लटपटंची ज्याला पचेल त्यानें खुशाल करावी.

असो, वरील कोणतीही पद्धति झाली तरी ती व्यंग आहे, कारण, साडेसाती, नवपंचम, एकादश गुरु, शत्रुग्रहांचें एकमेकांवरून व एकमेकांच्या संमुख जाणें, ग्रहांच्या स्थानपरत्वें होणाऱ्या युति, चतुर्थाष्टम शनि इत्यादि गोचर गोष्टींचा जेव्हां अनुभव येणार नाहीं तेव्हांच वरील कोणत्याहि पद्धति अव्यंग आहेत, असें म्हणतां येईल. परंतु असें होणें अशक्य आहे. सर्व पद्धति गोचरपद्धतीवर मुख्यत्वें अवलंबून आहेत असें आम्हांस वाटतें, म्हणूनच आम्ही गोचरपद्धतीचे प्रयोग करीत आहों.

आंगिरसपद्धति.

झटपटज्योतिष हा धेडगुजरी समास आहे. व असले नवीन शब्द लेखकांनीं बनवूं नयेत असें आमच्या एका सन्माननीय व विद्वान् गृहस्थांचें म्हणणें आहे, म्हणून यापुढें आम्ही या पद्धतीचा "**आंगिरारस पद्धति**" या शब्दानें उल्लेख करणार आहों. ता. १ सपटंबरच्या अंकांत हेंच नांव आम्ही या पद्धतीस दिलें आहे. जन्मकाळीं कुंडलींत जे ग्रह असतात ते प्रारब्ध कर्म सुचवितात, याबद्दल वाद नाहीं. मनुष्यानें जन्मास येतांना जें गाठोडें बरोबर आणलें असतें त्यांत काय काय चिजा आहेत, हें पाहण्याचें कुंडली हें साधन आहे. हे ग्रह प्रारब्ध कर्म केव्हां घडवून आणितात हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे, पण तो तितकाच बिकट आहे. कित्येकांच्या मतें दशाकाळीं ते ग्रह फलप्रद होतात. हें म्हणणें सर्वथा त्याज्य आहे असें आमचें म्हणणें नाहीं. परंतु एखादा ग्रह योगकर्ता असून त्याची सर्व आयुष्यांत दशाच येत नाहीं म्हणून या ठिकाणीं निरुत्साह व्हावें लागतें. महादशेंत फल न मिळेल तर अंतर्दशेंत किंवा अंतर्दशेंत न मिळेल तर उपदशेंत असली लटपट करून सत्य पाहणाराचें समाधान होत नाहीं. शिवाय अमुक एका ग्रहाची दशा कसें फल उत्पन्न करील हें ठरविण्याचें कामही बाट्यावर खुर्ची ठेवून तीवर कसरत करणारा इतकें कौशल्याचें आहे. विंशोत्तरी घ्याव्या, किंवा अष्टोत्तरी घ्याव्या किंवा योगिनी पहावा. किंवा या तिहींची जरूर आहे हें कोठेंही निश्चित झालेलें नाहीं. पत्रिका करणारे जोशी तर या तीनही दशा पत्रिकेंत ठेवून देतात ! असो. या दशांपेक्षां आंगिरसपद्धति जर निश्चित होईल तर प्रारब्ध

कर्माच्या कालचा बराच उलगडा होईल असें वाटतें, म्हणून तिचा आणखी विचार करण्याचें आजच्या अंकीं योजिलें आहे.

केवळ आंकडे कुंडली फलभाग पाहण्यास निरुपयोगी ठरलेली आहे. म्हणून भावचलित कुंडली घेऊन तीवरूनच आंगिरसपद्धतीनें वर्षे ठरवावीं असें आमच्या मित्राचेंही म्हणणें आहे. परंतु भावचलितावरून वर्षे ठरवितांना गुरु हा एखाद्या भावांत राशीच्या आरंभींच असला तर भानगड पडत नाहीं. पण तो तसा नसला म्हणजे काय करावें अशी मुख्य अडचण येते. उदाहरणार्थ, खालील कुंडली पहा.—

जन्म.—ता. २२ जुलई सन १८७३ रात्रीं १२ वा. ४० मि.

सायन भावचलित कुंडली



या कुंडलींत चतुर्थ भावाचा आरंभ सिंह राशीच्या ९ अंशांत आहे. व गुरु हा कन्येंत २ अं. ५० क. आहे. या भावाचा मध्य सिंह राशीच्या २४ अंशांत आहे व त्याच्या पुढें सुमारें ९ अंश

गुरु आहे त्यामुळें गुरु चतुर्थ भावाचें फल देत नाहीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं. तेव्हां वर्षगणना करावयाची ती चतुर्थ स्थानापासून कीं पंचमापासून हा येथें मुख्य प्रश्न आहे. आमच्या मतें वर्षगणना स्थानानुरोधें करणेंच चुकीचें आहे. ती राश्यनुरोधें करावी. गुरु ज्या राशींत असेल, त्या राशीचें वर्ष १ लें, तेथून दुसऱ्या राशीचें दुसरें. याप्रमाणें वर्षगणना करावी व तो ज्या राशींत येईल त्या राशीचा जो अधिपति तोच वर्षाधिपति समजावा, म्हणजे भानगड पडत नाहीं. वरील कुंडलींत गुरु कन्येंत आहे, म्हणून पहिल्या वर्षाचा अधिपति बुध होतो. दुसऱ्याचा शुक्र, तिसऱ्याचा मंगळ याप्रमाणें अधिपति होतील. या हिशेबानें वरील कुंडलींतील वर्षाधिपति खालील प्रमाणें होतात.—

वर्षाधिपति.

बुध.— १।१३।२५।३७।४९।६१।७३।८५।९७
शुक्र.— २।१४।२६।३८।५०।६२।७४।८६।९८
मंगळ—३।१५।२७।३९।५१।६३।७५।८७।९९
गुरु— ४।१६।२८।४०।५२।६४।७६।८८।१००
शनि.—५।१७।२९।४१।५३।६५।७७।८९।१०१
,,— ६।१८।३०।४२।५४।६६।७८।९०।१०२
गुरु.—७।१९।३१।४३।५५।६७।७९।९१।१०३
मंगळ—८।२०।३२।४४।५६।६८।८०।९२।१०४
शुक्र.—९।२१।३३।४५।५७।६९।८१।९३।१०५
बुध.—१०।२२।३४।४६।५८।७०।८२।९४।१०६
चंद्र.—११।२३।३५।४७।५९।७१।८३।९५।१०७
रवि —१२।२४।३६।४८।६०।७२।८४।९६।१०८

याप्रमाणें, राश्यनुरोधानें वर्षाधिपति होतात. नंतर हे अधिपति जन्मकाळीं जीं फलें उत्पन्न करितात, तींच फलें ते आपापल्या वर्षीं देतील अशी कल्पना करावयाची.

वरील कुंडलींत रवि आणि शनि हे गोल परस्पर सप्तम आहेत व ते अंशपूर्ण आहेत, ह्मणून हा योग फार जोराचा झाला आहे. ही कुंडली ज्या मनुष्याची आहे त्याच्या बापाला अंधत्व प्राप्त झालेलें आहे. पित्याला अंधत्व येण्यास हाच योग कारणीभूत आहे. शनिमहात्म्यांत जी शनीच्या जन्माची कथा दिली आहे तिचा येथें पूर्ण अनुभव येत आहे. वरील कुंडलींत शनि हा नवम व दशम यांचा अधिपति आहे. व रवि हा पितृकारक ग्रह आहे. हे पूर्णपणें शनीनें समोरासमोर आल्यामुळें पित्याला अंधत्व प्राप्त झालें.

शनि हा रवीनें दूषित होऊं शकत नाहीं, पण रवि हा शनीनें मात्र दूषित होतो असा अनुभव येतो रवि आणि शनि हे ग्रह जेव्हां योग अगर प्रतियोग करितात. तेव्हां रवि बलहीन होतो, शनि होत नाहीं. शनि हा जर राशिबली नसेल तर मनुष्याला दुःख व आपदा भोगाव्या लागतात, आणि तो जर रवीनें युक्त असेल तर तो आपले गुण जास्त प्रसवतो. मेष, सिंह, धन हे अग्निराशी कर्क आणि वृश्चिक इतके राशी शनीला अनिष्ट आहेत, या राशींतील शनि स्वाभाविकच अरिष्टसूचक असतो. हा शनि जर रवीनें दूषित झाला असला तर मग बोलावयासच नको तो भयंकर संकटें व्याधि, दुःख व दारिद्र्य उत्पन्न केल्याशिवाय राहात नाहीं.

शनि हा जर राशिबली असेल, तर तो मनुष्याचें कल्याणच करितो. कुंभ, तूळ, मिथुन, कन्या, मीन, मकर, वृषभ या राशींत तो कल्याण दर्शवितो. या राशींत शनि जरी रवीनें दूषित असला तरी तो रवीला मारक होतो, स्वतःच्या गुणांचा लोभ होत नाहीं. पण त्याचें लक्ष रवीकडे गेल्यामुळें कल्याण करण्याच्या कामीं थोडें दुर्लक्ष होतें. वरील कुंडलींत शनि हा स्वगृहीं असल्यामुळें

बलवान् आहे. ह्मणून त्यानें भाग्य व दशम या स्थानांची उत्तम प्रकारें वृद्धिच केली पाहिजे. परंतु त्याचें सामर्थ्य शत्रूचा नाश करण्याच्या कामीं खर्च होत असल्यामुळें भाग्यवृद्धि करण्याच्या कामीं त्याचें दुर्लक्ष होत आहे. बलवान् शनि हा रवीचा बलवत्तर नाश करणार हें उघड आहे. ह्मणूनच त्यानें बापाला जग नाहीं-सारखें करून सोडलें आहे !

यावरून रवीचीं वर्षें बापाला अनिष्ट गेलीं पाहिजेत. शनीचीं वर्षें भाग्याला आड येतील. धंद्याच्या कामीं दुर्लक्ष होईल, धर्माचरणाला अडथळे येतील, संकटें येतील, शत्रूशीं झगडावें लागेल व भाग्योदयाच्या प्रसंगीं कोणी तरी आड येईल.

कुंडलींत चंद्र हा स्वगृहीं असल्यामुळें बलवान् आहे. या ग्रहाला राहू, शनि आणि हर्शल हे ग्रह बिघडवितात. चंद्राला कोणीही शत्रु नाहींत. पण तो शनि, राहू, बुध, शुक्र आणि हर्शल याचा शत्रु आहे. वरील कुंडलींत तो आपल्या शत्रूंनीं बिघडलेला नाहीं ह्मणून चंद्रचीं वर्षें शुभ असून कल्याणप्रद आहेत. याप्रमाणें प्रत्येक ग्रहावरून फलें ठरवावीं.

आंगिरस पद्धतीनें महिने व दिवस यांचींही फलें पाहतां येतात. ज्या ठिकाणीं जें वर्ष बसेल त्या ठिकाणीं त्याच्या पहिल्या महिन्याची कल्पना करून पुढें अनुक्रमानें दुसरे महिने पहावे. त्याच प्रमाणें, महिना ज्या ठिकाणीं बसेल त्या ठिकाणीं त्या महिन्याच्या १ ल्या दिवसाचें फल पाहून तेथून अनुक्रमानें पुढील दिवस पहावे. जन्म ज्या तारखेस असेल तीच तारीख प्रत्येक महिन्याच्या आरंभीं ध्यावी. वरील कुंडलींत जन्माची तारीख २२ जुलई आहे. ह्मणून प्रत्येक वर्ष २२ जुलईला व प्रत्येक महिना २२ तारखेला सुरू होईल असें कल्पावें.

वरील कुंडलींत २१ जुलई १९१० ला ३७ वर्षें पुरीं होऊन ता. २२ जुलईला ३८ वें वर्ष सुरू झालें आहे. हें वर्ष तूळ राशींत बसतें. म्हणून याचा अधिपति शुक्र आहे. हा ग्रह जन्मकाळीं बुधाच्या घरीं असून तो कशानेंही बिघडलेला नाहीं. तो धनस्थानाच्या जवळच असल्यामुळें कुटुंबसुख, स्त्रीसुख, सुप्रास अन्न व सुवर्णादि संपत्ति देणारा आहे. म्हणून हें वर्ष उत्तम जाईल असें अनुमान होईल.

या वर्षाचा पहिला महिना तूळ राशींतच आहे, दुसरा वृश्चिक राशींत, तिसरा, धनु राशींत असें पुढील महिने आहेत. पहिल्या महिन्याची जुलईची २२ वी तारीख तूळ राशींत, २३ वी वृश्चिक राशींत , २४ वी धनु राशींत याप्रमाणें या महिन्याच्या अनुक्रमानें तारखा पहाव्या. दुसरा महिना आगष्ट २२ ला सुरू होतो व त्याची पहिली तारीख वृश्चिक राशींत, दुसरी धनु राशींत याप्रमाणें त्या महिन्याच्या तारखा पहाव्या. याप्रमाणें आंगिरस पद्धतीनें आपणास दिवसापर्यंत शुभाशुभ फल कळूं शकतें.

वर्ष, महिना अगर दिवस याचा आरंभ प्रत्येक राशींत गुरूच्या अंशा इतक्या अंशांतच होतो असें समजावें. तीस अंशांत एक वर्ष म्हणजे प्रत्येक महिन्यास २॥ अंश वाढणीस येतात. या अडीच अंशांत जर एखादा ग्रह असेल तर तो त्या वर्षाच्या पहिल्या महिन्याचेंही फल दर्शवील. उदाहरणार्थ—वरील कुंडलींत ३९ वें वर्ष वृश्चिक राशीच्या २ अं. ९० क. त बसलें. या राशींत मंगळ ९ अं. २३ क. आहे. म्हणजे वर्षारंभापासून ६ अं. ३३ क. वर मंगळ आहे. म्हणजे तो त्या वर्षाच्या ३ ऱ्या महिन्यांत येतो. म्हणून तिसऱ्या महिन्यांत तो मंगळ आपलें षष्ठस्थ फल देऊं शकेल

असें समजावें. २॥ अंशांस एक महिना, ह्मणून एक दिवसास ५ कला बसतात. या हिशोबानें तो मंगळ तिसऱ्या महिन्याच्या १९ व्या दिवशीं त्या मंगळाचा परिणाम घडेल असें ठरतें. पांच कलांस दिवस या हिशोबानें एक कलेस १२ घ. येतात. ह्मणून वरील मंगळ तिसऱ्या महिन्याच्या १९ व्या दिवशीं ३६ घ. नीं फलप्रद होईल असें आपणास समजलें. या प्रमाणें कोणताहि राशि पाहतां येतो.

आंगिरस पद्धतीनें याप्रमाणें आपणांस वेळेपर्यंत सूक्ष्म फल तयार करितां येतें. फलांची कल्पना मात्र बरोबर झाली पाहिजे. कल्पना चुकेल तर अनुभवही चुकेल हें उघड आहे. मंगळाचें वर्ष असतां तो कोणतें फल उत्पन्नकर्त्ता आहे, हें जर समजलें नाहीं तर वरील सर्व खटाटोप व्यर्थ आहे. हें फल ज्याचें त्याला उत्तम रीतीनें ठरवितां येईल. ज्योतिषी चुकण्याचा विशेष संभव आहे. कोणता ग्रह आपणावर कोणता परिणाम करितो हें आपलें आपणास जितकें चांगलें कळेल तितकें दुसऱ्यास कळणार नाहीं. ज्योतिषी अनुमान करणार व आपण प्रत्यक्ष पाहणार इतका उभयतांत फरक आहे. ज्योतिष्यानें जर एखाद्याच्या कुंडलीचा अनेक प्रसंगीं अनुभव घेतला असेल तर तोही बिनचूक फल पाहूं शकतो. हा अनुभव आह्मांला स्वतःला आहे. एखादा रोगी जर एकाच डॉक्टरचें नेहमीं औषध घेण्याचा निश्चय करील तर त्याच्या प्रकृतीचें निदान डॉक्टरला फार उत्तम होतें. आपण जेऊं लागलें ह्मणजे आपणाला मात किती लागतो हें जितकें स्वतःचा कळतें तितकें दुसऱ्यास कळत नाहीं. पण, वाढणारा जर नेहमीं एकच असेल तर त्यालाही आपण इतकेंच ज्ञात होतें. तद्वतच कुंड—

लीचेंही आहे. नारळाचें पाणी मधुर असतें हें शास्त्र सांगेल, पण तें माधुर्य कसें आहे हें पाणी पिणारालाच कळेल. शास्त्र जाणणारा ज्योतिषी अमुक ग्रह अमुक प्रकारचें फल देईल इतकें सांगूं शकेल, पण प्रत्यक्ष फल त्याला कळणार नाहीं. हें फल अनुभव घेणारास चांगलें कळेल.

प्रत्येक मनुष्य डॉक्टर होणें शक्य नाहीं किंवा प्रत्येक मनुष्य ज्योतिषी होणेंही शक्य नाहीं, ही निरुपायाची गोष्ट आहे. तथापि निदान मनुष्यानें इतकें तरी केलें पाहिजे कीं, आपला अनुभव ज्योतिष्यास वेळोवेळ दिला पाहिजे व नंतर त्याला योग्य मोबदला देऊन त्याच्या पासून भविष्य घेतलें पाहिजे. एक रुपयाच्या किंवा आठ आण्याच्या मोबदल्यानें ज्योतिषी सर्व आयुष्याचा नकाशा कितीसा विचार करून रेखाटणार हें दिसतेच आहे ! डॉक्टरांस प्रकृती दाखविण्यास १० रुपये द्यावे लागले तरी त्याबद्दल कांहीं वाटत नाहीं. पण ज्योतिष्याच्या पंचांगावर **एक दिडकी** ठेवितांना डोळ्यांतून टिपें पडतात ! ही स्थिति जोंवर सुधारणार नाहीं तोंवर फलज्योतिष व ज्योतिषी अविश्वसनीयच वाटणार हें उघड आहे.

ज्याप्रमाणें कित्येक रोग असाध्य आहेत, त्याचप्रमाणें कित्येक भविष्येंही असाध्यच आहेत. पण, डॉक्टर मरेपर्यंत रोग्याच्या घशांत जर बाटल्या कोंबतो तर ज्योतिष्यानेंही असाध्य भविष्य वर्तविण्याचा प्रयत्न करावा हा न्याय आहे. तो अद्यापि कित्येकांच्या डोक्यांत उतरत नाहीं हें आश्चर्य आहे.

दोन प्रश्न !

सन १९०४ साली आमच्या पुढें नोकरी सोडावी कीं मासिक बंद करावें असे दोन प्रश्न उभे राहिले होते. कारण दोन धंदे पुढें चालणें शक्य नव्हतें. शेवटीं, विपत्ति प्राप्त झाली तरी चालेल पण मासिक पुस्तक बंद करावयाचें नाहीं असा विचार कायम करून नोकरीला राम राम ठोकला ! त्याचप्रमाणें आजही तसेच दोन प्रश्न आमच्या पुढें दत्त उभे राहिले आहेत ! चमत्कार असा कीं, पहिल्यावेळीं गुरु ज्या राशींत होता त्याच्याच सप्तमांत आज आहे ! हल्लीं आमचें दोन व्यवसाय आहेत. एक, प्रपंचाच्या सोयीसाठीं ज्योतिषचा धंदा व दुसरा कुंडलीविज्ञान पुस्तक चालविणें आणि नवीन ग्रंथ तयार करणें. हे दोन्ही व्यवसाय विशेषेंकरून स्वतःलाच करावे लागतात. सांप्रत ते दोन्हीं सारख्याच महत्त्वाचे झाले असून एकट्याला करणें अशक्य झाले आहेत. कुंडलीविज्ञानचे वाचक आतां वरच्या क्लासांतले विद्यार्थी झाले आहेत त्यामुळें संपादकावर फार मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. नित्य नव्या नव्या विषयांची मांडणी करून पुढें गति दिल्याशिवाय गत्यंतर नाहीं अशी स्थिति झाली आहे. पण प्रपंचाचा भार वाढत जाऊन अस्मानी सुलतानी संकटांचीही त्यांत भर पडत चालली असल्यामुळें वाचकांची तृप्ति करण्यास असमर्थता उत्पन्न झाली आहे. म्हणून पुस्तक बंद करावें कीं धंदा बंद करावा असे दोन महत्त्वाचे प्रश्न उत्पन्न झाले आहेत.

सूक्ष्म विचारानें असें दिसून आलें आहे कीं संपादकाचा जन्म धंद्यासाठीं नाहीं. पण सांपत्तिक अडचणी हात टेंकण्याचा प्रसंग

आणतात. "आधीं पोटोबा" ही म्हण प्रापंचिकाला चांगली लागू पडते. पोटच भरत नाहीं तर विठोबाकडे लक्ष लागावें कसें? कुंडलीविज्ञानचा वसूल जेमतेम छापखाना व ऑफिस खर्च भागवतो. संपादकाला त्यांतून एक पैही मिळत नाहीं, त्यामुळें धंदा करावा लागतो. पण धंदाही नीट होत नाहीं व कुंडलीविज्ञानकडे लक्षही देण्यास सवड होत नाहीं. म्हणून काय करावें अशी अडचण येऊन ठेपली आहे.

कुंडलीविज्ञान बंद केलें तर संपादक प्रापंचिक दृष्टीनें सुखी होईल यांत तिलप्राय शंका नाहीं, पण त्याला मानसिक सुख मिळणार नाहीं. नव्या नव्या विषयांची मांडणी करितांना व ती वाचकांस आवडली असें ऐकतांना जो आल्हाद होतो तो धंद्यांत होत नाहीं, म्हणून पुस्तक बंद करवत नाहीं पण यापुढें विपत्ति भोगण्याचेंही सामर्थ्य राहिलेलें नाहीं. शेवटीं तूर्त एक विचार कायम केला कीं आजच पुस्तक बंद करावयाचें नाहीं. आमच्या कित्येक हितचिंतकांचेंही मत पडलें आहे. म्हणून ११ व्या पुस्तकासाठीं एक व्यवस्था योजिली आहे. तिला पुरेशीं अनुकूल मतें मिळतील तर आम्ही हें पुस्तक चालविण्यास एक पायावर तयार आहों.

वर्गणीदारांस वर्षफलें दिलीं तर पुस्तकाचा व्यवसाय नीट चालतो असा अनुभव आहे. समाजांत असे लोक बरेच आहेत व त्यांस पुस्तकापेक्षां वर्षफलांचीच आवश्यकता विशेष आहे. केवळ ज्ञानार्थ वर्गणीदार थोडे आहेत. आम्ही वर्गणीदारांस वर्षफल देऊं म्हणून जाहिर करितों, परंतु प्रापंचिक अडचणीपुढें निरुपाय होऊन कित्येकांचीं वर्षफलें जातात व कित्येकांचीं जात

नाहींत. ज्यांची जात नाहींत त्यांस १० ओळींत समाधान होत नाहीं. यासाठीं ११ व्या पुस्तकासाठीं आम्ही योजना केली आहे ती अशी.—पुस्तकाची वर्गणी २ रु. ७ आहे, ती वाढविण्याची आमची इच्छा नाहीं. पण ज्यांस वर्षफल पाहिजे असेल त्यांस एक रुपया अधिक पडेल. व तें ३ रु. ७ आणे व्ही. पी. नें पाठवूं. स्पष्ट ग्रहांचें पुस्तक रीतिप्रमाणें बक्षीस मिळेलच.

वर्षफलाचा नमुना

जन्म —ता० ७ नवंबर सन १८७९ सकाळी.



या कुंडलींत ता० ७ नवंबर सन १९१० पासून ३२ वें वर्ष बसेल. आंगिरस पद्धतीनें या वर्षाचा अधिपति तूळ राशीचा स्वामी जो शुक्र तो आहे. हा ग्रह जन्मकाळीं तूळ राशींत स्वगृहीं अस-

ह्यामुळें बलवान् आहे. हा ग्रह षष्ठेश व लाभेश आहे. ह्यामुळें शत्रपासून धनलाभ होण्याचा योग आहे. जें येणें दुष्प्राप्य आहे, तेंही हातीं येण्याचा संभव आहे किंवा ज्याच्या साठीं बाद उत्पन्न झाला तेंही मिळण्याचा याच वर्षी योग आहे. शुक्राच्या सप्तमांत वक्री शनि असल्यामुळें व तो स्त्री आणि स्त्रीसुखाचा कारक ग्रह असल्यामुळें स्त्रीसुखांत व्यत्यय येतील व स्त्रीची प्रकृति ना दुरुस्त राहील. शुक्र हा लाभकारक असल्यामुळें उत्तम प्रकारचें प्रारब्ध-नुसार घडणारे लाभ होतील. शुक्राचे धंदे किफायतीचे होतील, व त्यांचीच उलाढाल विशेषेंकरून होईल. ऐषआरामाचे पदार्थ मिळतील किंवा त्यांचा भोगही मिळेल.

पितृस्थानीं चंद्र आहे व त्याच्या दशमांत मंगळ वक्री आहे या मंगळाच्या राशींत सांप्रत शनि आला आहे, ह्मणून या शनीवर पितृपक्षाकडील जें हयात असेल तें आजारी होण्याचा किंवा त्याचे आयुष्य सरलें असल्यास मृत्यु पावण्याचाही संभव आहे. १९११ च्या मेच्या आरंभीं रवीच्या समोरून शनि जाईल व तो नेपच्यून आणि मंगळ यांच्या मध्यें येईल आणि चंद्राशीं केंद्रयोग करील, हा योग वरील गोष्टीस कारण होण्याचा संभव आहे.

षष्ठस्थानीं भ्रमण करणारा शनि जर पापकर्तरींत येईल किंवा पापयोग करील तर शत्रु उत्पन्न होईल, मानसिक स्थिति बिघडेल, काय करावें तें सुचणार नाहीं. धंदा व पैसा यासंबंधानें बिकट प्रश्न उभा राहील. येथें जन्मकालचा शनि योगकारक नसल्यामुळें त्याच्या अनिष्ट स्थितींत बिकट स्थितीच प्राप्त झाली पाहिजे. याप्रमाणें या वर्षी शनीचें फल आहे.

गुरूचें भ्रमण व्ययस्थानीं होणार आहे. तो चंद्राला चवथा आहे. ह्मणून गुरुबल कमी आहे. ह्यामुळें व्यवहार नीट जुळणार नाहीं. तथापि चंद्राच्या एका केंद्रांत गुरु व एका केंद्रात शनि हा कांहीं सामान्य योग नाहीं. जर शनि निर्दोष असता व गुरूचें भ्रमण व्ययस्थानीं नसतें तर योगाला फार मोठी किंमत आली असती.

यावरून क्रियमाणापेक्षां प्रारब्ध या वर्षी बरें आहे. ह्यामुळें कित्येक गोष्टी जरी फसल्या तरी उणीव पडणार नाहीं. मात्र क्रियमाण विचारानें व योग्य संधि पाहून केलें पाहिजे. एकंदर वर्षाचा हिशेब ठेविल्यास जमेची बेरीज खर्चाच्या बेरजेपेक्षां विशेष वाढलेली दिसेल असें ह्मणवत नाहीं. प्राप्तीच्या रकमा जशा मोठाल्या आढळतील तशाच खर्चाच्या रकमाही आढळतील असें वाटतें.

नवंबरच्या दुसऱ्या पंधरवड्यापासून डिसेंबरच्या शेवटल्या आठवड्यापर्यंत खर्च फार होईल किंवा दुसऱ्याचें देणें होईल किंवा कोणत्या तरी रूपानें पिशवी सैल होईल. कारण, व्ययस्थानीं मंगळ आहे.

फेब्रुवारीपासून मार्च्यच्या दुसऱ्या पंधरावड्यापर्यंत मंगळ कुटुंबस्थानीं असेल. यावेळीं स्त्री व कुटुंबसंबंधानें सुख कमी मिळेल, व्यर्थ खर्च फार होईल. पैसा जमतांना मारामार पडेल.

अनिष्ट युति.

रवि हर्शल.—ही युति ता० १५ जानेवारीला धनस्थानीं आहे. ती धनहानि व कुटुंब संबंधें दुःख दर्शविते.

मंगळ हर्शल.—ही युति ता० १० मार्च्य या दिवशीं धन स्थानींच आहे व तिचा परिणाम वरील रविहर्शलयुतीपेक्षां कडक आहे.

रविशनि.—ता० ३० एप्रिल या दिवशीं ही युति आहे. ही युति नेपच्यूनच्या जवळच होत आहे. म्हणून तिचा परिणाम पितरें आणि धंदा यांस सुखावह नाहीं. त्याच प्रमाणें मानसिक अस्वस्थता होऊन शत्रुपीडा होण्याचा संभव विशेष. ही युति कलह व पराजय दर्शवितें.

सूर्यग्रहण.—एप्रिलच्या २८ व्या तारखेला सूर्यग्रहण आहे. त्याचा परिणाम रविशनि यांच्या युतिप्रमाणेंच अनिष्ट आहे.

एका महिन्यांत दोन योग अनिष्ट झाल्यामुळें एप्रिलचे अखेरचे व मेचे १ ले दिवस अरिष्टसूचक दिसतात.

चंद्रग्रहण.—ता० १२ मेला चंद्र ग्रहण आहे, तें व्ययस्थानीं आहे. हें मातेला कष्ट, स्वतःला फिकीर व धनाचा अपव्यय दर्शवितें.

या वर्षाचे लाभाचे महिने,—१ ला, तिसरा, सहावा, नववा, दहावा. आणि बारावा.

दररोजचा चंद्र.

सिंह.—लाभ, यश, कीर्ति, सत्समागम, शुभ वार्ता, सदाचार व पुण्य.

कन्या.—या राशींत ८ अंशाजवळ असतां भय, बिनसाबिनशी व उदासीनता.

तूळ.—लाभ, उत्साह.

वृश्चिक.—खर्च, नुकसान, अपयश, अडचणी.

धनु.—आरोग्य, चांगलीं, स्वप्नें, प्रवास, लाभ व उत्साह.

मकर.—नुकसान, त्रास.

कुंभ.—साधारण. फारशा महत्वाच्या गोष्टी घडणार नाहींत.

मीन.—वाहनसुख, तीन अंश असतां मित्रभेट, लाभ, सुख.

मेष.—लाभ, जय, सुख. शनीजवळ असतां अनिष्ट.

वृषभ.—व्यर्थ खर्च, नाउमेद, कंटाळा, त्रास.

मिथुन.—स्त्रीसुख, प्रवास, साधारण लाभ.

कर्क—साधारण. महत्वाच्या गोष्टी घडणार नाहींत.

अशा प्रकारचें वर्षफल करून मिळेल. ज्यांना तें पाहिजे असेल त्यांनीं खालील माहिती दिली पाहिजे.

१ जन्मशक, मिती, पक्ष, तिथि, वार, जन्माची वेळ व जन्माचें ठिकाण.

२ कुंडलीचे परीक्षेसाठीं ठळक माहिती.

३ सायन कुंडली तयार असेल तर तिचा उतारा.

४ धंदा कोणता आहे व या वर्षीं कोणता करावयाचा आहे.

५ विशेष प्रश्न असतील ते प्रश्न.

सोबत फार्म पाठविला आहे, त्यावर ही माहिती भरून पाठवावी, म्हणजे व्यवस्थित रीतीनें काम करावयास सांपडेल. आमच्याजवळ कुंडली आहे किंवा माहिती पूर्वी दिली आहे ही सबब निरुपयोगी समजावी.

ज्यांना पुढील सालीं पुस्तक बंद ठेवणें असेल त्यांनीं आतांच कळविण्याची कृपा करावी.

कुंडली संग्रह.

जन्म ता. २८ आगष्ट १८४८ सकाळीं १० वा.

सायन.



प्रकृति सशक्त, धंदा हुंडीचा व कापडाचा व्यापार. संतति विपुल असून १ पुत्र व बाकी सर्व मुली. सर्व ग्रह दशम व एकादश स्थानांत आला आहेत. दशमांत सिंह राशींत गुरु-चंद्र असल्यामुळें. सरकारांत सुमारें १ लाख ८० हजारांची पत आहे. नेहमी पैशाची उलाढाल चालत असते.



ग्रहांचे योग

—:o:—

केंद्रयोग, त्रिकोणयोग, एकत्रयोग व परस्पर सप्तमयोग हे चार प्रकारचे योग असतां ग्रहांचे एकमेकांवर विशेष परिणाम घडतात व तेच परिणाम जीवमात्राला भोगावे लागतात. कुंडलींत जव्हां ग्रह स्थानबली व राशिबली नसतात, तेव्हां जर ते एकमेकांशीं वरील प्रकारचे कोणतेही योग करीत असतील तर ती एक विशेष प्रकारची कुंडली होते स्थान व राशी या दोहोंच्याच अनुरोधानें फलें वर्तविणें ही सामान्य पद्धती आहे. केव्हां केव्हां या सामान्य पद्धतीनें पाहूं गेल्यास एखादा मनुष्य मोठ्या योग्यतेचा असावा किंवा नसावा असा बोध होतो, परंतु वस्तुस्थिति त्याच्या उलट असते, याचें कारण वरील प्रकारचे योग होत.

ग्रह जेव्हां एकमेकांपासून चतुर्थदशम असतात, तेव्हां त्यांचा केंद्रयोग होतो. हा योग अंशपरत्वें जितका तंतोतंत होईल, तितका विशेष स्पष्ट फल देतो. उदाहरण



या कुंडलींत रवि व गुरु यांचा केंद्रयोग झाला आहे. कारण, रवि मीन राशींत असून गुरु त्याच्या पासून ४ थ्या स्थानीं मिथुन राशींत आहे, व गुरु पासून रवि दशम स्थानीं आहे. येथें रवि व गुरु यांचे जर अंश सारखे किंवा किंचित कमजास्त असतील, तर या केंद्रयोगाचा परिणाम स्पष्टपणें अनुभवास येईल. अंशांत फारच

तफावत असेल तर त्या केंद्रयोगांत विशेष अर्थ नाहीं. त्याचा परिणाम इतका सूक्ष्म घडेल कीं तो जाणणें फारच कठीण जाईल.

केंद्रयोग कुंडलींत कोठेंही झाला तरी तो फलदायक होतो, पण त्याला राशिबल व स्थानबल मिळेल तर जास्त महत्वाचा होतो असें मसजावें.

सामान्यत्वें या योगाचें फल—घरांत, लोकांत, सरकारी ऑफिसांत व राजदरबारांत वजन, पत, मानमान्यता; गाड्या, घोडे, मेणे, पालख्या वगैरे वाहनांचें सुख, सुंदर घरें व मोठाल्या इमारती यांची प्राप्ती, उत्तम असें मातापितरांचें सुख, मित्रांपासून सुख व धनप्राप्ति.

वरील सामान्य फल ध्यानांत घेऊन ते ग्रह ज्या स्थानांचे अधिपति असतील त्या स्थानसंबंधी सुखांचा अगर दुःखांचा विचार केला पाहिजे. शनि, मंगळ, हर्शल व नेपच्यून हे दुःखदायक ग्रह आहेत. ह्मणून त्यांच्याशीं केंद्रयोग दुःखदर्शक होतो. त्यांत त्यांच्या शत्रूंशीं जर हा योग होईल तर भयंकर संकटें, अपघात, दारिद्र्य, नापत, अपमान दंड, कैद, आईबापांचे मृत्यु वगैरे गोष्टी प्राप्त होतील. गुरु व शुक्र यांच्याशीं होणारे केंद्रयोग उत्तम फलें देतात. उत्तम फल दर्शविणारा केंद्रयोग हा **राजयोगच** आहे असें समजलें पाहिजे. रवि व चंद्र यांच्याशीं होणारे शनि, हर्शल व नेपच्यून यांचे केंद्रयोग दुःख, दारिद्र्य संकटें, भय, राजदंड, सर्वांशीं वैर, वाहनांपासून दुःख आईबापांचे मृत्यु इ० अनिष्ट फलें दर्शवितात. मंगळ व शनि, हर्शल, नेपच्यून यांचे केंद्रयोग घातक अपघात करणारे, सदा दुःख व काळजी, भय, दारिद्र्य इ० दर्शवितात. शनि, व हर्शल, नेपच्यून यांचे केंद्रयोग राज्यभ्रष्ट, पदभ्रष्ट, अपमान, पीछेहाटी, धंद्यांत वारंवार बदल, नुकसान, भय, दंड, कैद, इ० अनेक प्रकारचीं दुःखें उत्पन्न करितात.

ग्रह जेव्हां एकमेकांपासून नवपंचम असतात, तेव्हां त्यांचा त्रिकोणयोग होतो. उदाहरण—



वरील कुंडलींत शुक्र, चंद्र व गुरु या तीन ग्रहांत त्रिकोणयोग झालेला. कारण, यांतील कोणताही एक ग्रह दुसऱ्या पासून पांचवा किंवा नववा आहे. या योगांतही ग्रहांचे अंश सारखे किंवा किंचित न्यूनाधिक असावे लागतात. अंशांत मोठी तफावत असेल तर या योगाचें फल फारच सूक्ष्म अनुभवास येईल. हा **लक्ष्मीयोग** आहे.

सामान्यत्वें या योगाचें फल.—दिगंत कीर्ति, फार लोकांत प्रसिद्ध, दूर दूरच्या गांवी किंवा प्रांतांत नामांकित, प्रत्येक कामांत जय, भाग्यवान् व मोठा संपत्तिमान, नित्य नवी संपत्ति जोडणारा, धार्मिक, ईश्वरोपासना करणारा, विद्वान, सर्व जग ज्याला वश असा, संस्था स्थापन करणारा व आपलें नांव जगांत अमर राहील अशीं कृत्यें करणारा या प्रमाणें या योगाचें फल आहे.

हा योग कोणत्याही ग्रहांनीं झाला तरी चांगला. शुभ ग्रहांनीं झालेला योग सत्कीर्ति व निरंतर यशआणि संपदा यांची जोड देईल, त्या मानानें पाप ग्रहांनीं झालेला देणार नाहीं. तथापि केंद्रयोगाइतकें याचें अनिष्ट फल प्राप्त होणार नाहीं. कारण हा मूळचाच शुभयोग आहे. रवि व चंद्र त्यांच्याशीं जर शनि, हर्शल, नेपच्यून हे त्रिकोण योग करितील तर संपत्ति मिळेल, कीर्ति होईल, पण तोच जर गुरु किंवा शुक्र हे त्रिकोणयोग करितील तर तो फार महत्वाचा होईल. दुष्कीर्ति कधींही होणार नाहीं. व अपयशही कधीं मिळणार नाहीं.

सदां सारखी वृद्धि होतच जाईल. तसा प्रकार वरील पाप ग्रहांनीं होणार नाहीं. कित्येक वेळां दुष्कीर्तीही होईल, अपयशही मिळेल व पीछेहाटीही होईल.

पापग्रहांनीं झालेला त्रिकोणयोग संतति सुखाला चांगला नाहीं. गुरु व शनि, हर्शल, नेप्ट्यून यांच्यांत जर त्रिकोणयोग होईल तर संतति उशीरानें होईल किंवा मुळींच होणार नाहीं. व झाल्यास अल्पायु होईल. अधर्माचरण होईल व ईश्वरोपासना घडणार नाहीं. अशा प्रकारचीं कित्येक वाईट फलें अनुभवास येतील.

एकत्र योग किंवा युतियोग व परस्पर सप्तम योग किंवा प्रतियोग यांचीं फलें स्थानपरत्वें व राशिपरत्वें मिळावयाचीं असतात. रवि व चंद्र यांच्याशीं शनि, हर्शल व नेप्ट्यून यांचे युतियोग किंवा प्रतियोग दुःख व दारीद्र्य उत्पन्न करितात. व गुरु आणि शुक्र यांचे संपत्ति, मान, वैभव व सुख देतात.

युति अगर प्रतियोग, ग्रहांचे मूळचे धर्म, राशि आणि स्थानें या त्रयीला अनुसरून चांगलीं अगर वाईट फलें देतात, या फलांची कल्पना प्रत्येकानें आपापल्या बुद्धीनें करावी. युतिकाळीं किंवा प्रतियोगकाळीं दोन विरुद्ध धर्मांच्या ग्रहांचा संबंध असता त्यांचे परिणाम मनुष्याला मोठें दुःख उत्पन्न करितात. दोन विरुद्ध शक्ति एखाद्या पदार्थावर लाविल्यानें तो पदार्थ जसा मधलाच मार्ग धरितो किंवा जास्त बलवान् असेल तिकडे वळतो त्याच प्रमाणें दोन विरुद्ध धर्माच्या ग्रहांनीं फल प्राप्त होतें. शनि व मंगळ हे ग्रह विरुद्ध धर्माचे आहेत. या दोन ग्रहांची जेव्हां युति होते, तेव्हां मंगळ हा शनीचे धर्म कमी करीत असतो व शनि हा मंगळाचे धर्म कमी करीत असतो. शनि हें वाततत्व असून मंगळ हा अग्नितत्व आहे. या दोन तत्वांच्या संयोगानें एखाद्या वेळीं तिसराच दोष उत्पन्न होतो किंवा जें तत्व बलवान् असेल तेंच तत्व वृद्धि पावतें. परंतु काहीं झालें तरी यांचा योग फार भयंकर हानि करितो हें खरें आहे. याच प्रमाणें इतर योगांचीं फलें पहावीं

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम् ।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥ 'भवभूति'

पुस्तक ८ वें.] आश्विन कृ० १२, बुधवार [अंक २७ वा

शनिभौमयोग.

शनि हा रजोगुणी असून मंगळ तमोगुणी आहे. त्याच प्रमाणें शनि हें वाततत्व असून मंगळ हें अग्नितत्व आहे. ह्मणून या दोन ग्रहांचा योग ज्या कालीं होतो तो काल अनर्थसूचक होय. या योगापासून फूट पडून नाश होतो. सन १९०७ सालीं या दोन ग्रहांचा योग असतां सुरतेस भरलेल्या राष्ट्रीय सभेची काय स्थिति झाली हें सर्वांस माहीत आहेच. सन १९०८ सालीं यांचा योग होत नाहीं. पण सन १९०९ मध्यें मेष राशींत डिसेंबरच्या २९ व्या तारखेला दोन ग्रहांची पुनः युति होणार आहे. ही युति कांग्रेसच्या तनुस्थानीं होणार असल्यामुळें तिचा परिणाम फार अनिष्ट होईल असें अनुमान होत आहे. मंगळ हा तनुस्वामी असून शनि हा दशमाचा अधिपति आहे. मेष राशींत शनि बलहीन असतो व मंगळ अत्यंत बलवान् असतो. यावरून रजोगुणाचा पूर्ण पाडाव होऊन तमोगुण विजयी होणार एक किंवा संस्थेचा समूळ नाश होणार हें दुसरें अशीं दोन अनुमानें निघतात. सन १९०८ सालीं या ग्रहांचा मुळींच योग होत नाहीं, हें एक प्रकारें चांगलें आहे. त्यामुळें

मवाळ आणि जहाल [राष्ट्रीय] यांत या वर्षी तरी खडाजंगी उडत नाहीं असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. निदान सुरतेसारखा तरी प्रकार होत नाहीं हें खास आहे. मवाळांची कांग्रेस (?) या वर्षी मद्रासेस भरण्याचें ठरलें आहे. समेट होत नाहीं हें ठरलेलेंच आहे. इरसाल मवाळ व इरसाल जहाल यांचा समेट म्हणजे अंधकार व उजेड यांच्या समेटा इतकेंच अशक्य आहे हें तात्विक दृष्टीनें कोणीही कबूल करील, अर्धवट मवाळ व अर्धवट जहाल हे मात्र समेटाला कांहींसे योग्य असल्यामुळें कित्येक जहालांस मिळतील व कित्येक क्रीडचें लोढणें गळ्यांत बांधून मवाळांत सामील होतील. सारांश या वर्षी मवाळांचें कनव्हेन्शन व राष्ट्रीयांची कांग्रेस अशा दोन संस्था अलग झालेल्या दृष्टीस पडणार हें निःसंशय आहे. राष्ट्रीय सभा ही सर्व राष्ट्राची असून कन्व्हेन्शन हें फक्त मवाळांचेंच क्रीडाभुवन आहे; म्हणून त्याला महत्व प्राप्त होणें अशक्य आहे. राष्ट्रीय सभेंत स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण यांचा खणखणाट व्हावयाचा असून कन्व्हेन्शनमध्यें बागड्यांचाच आवाज ऐकूं येणार आहे! राष्ट्रीय सभा ही मर्दानी बाण्याची तरुण सुंदरी असून कन्व्हेशन ही खप्पड म्हातारी आहे! मंगळ हा तरुण, जहाल व सेनानी असा ग्रह असल्यामुळें त्याच्याच अनुरोधानें राष्ट्रीयांच्या चळवळी व्हावयाच्या आहेत. आणि शनि हा म्हातारडा, मवाळ व बंडा गुलाम असा ग्रह असल्यामुळें त्याच्याच अनुरोधानें मवाळांचा नाच व्हावयाचा हेंही ठरलेलेंच आहे. हा ग्रह या वर्षी अश्विनी नक्षत्रांत आहे. हें नक्षत्र जरी सर्व नक्षत्रांत पहिलें असलें तरी तें अगदीं अजागळ असें आहे. अर्थात् या वर्षी मवाळांचा पक्ष अजागळच बनणार हें उघड आहे. अजागळ मनुष्याची सर्वत्र जशी टर उडते तशीच स्थिति या पक्षाची होईल हें उघड आहे. या

पक्षांत म्हाताऱ्या कोताऱ्यांची व अजागळ तरुणांची खोगीरभरती झालेली दृष्टीस पडेल.

मंगळ ज्येष्ठा नक्षत्रांतून भ्रमण करीत आहे. या नक्षत्रांत हा ग्रह अत्यंत बलवान् असतो. ज्येष्ठा नांवावरूनच राष्ट्रीय पक्ष ज्येष्ठ ठरणार आहे. वृश्चिक हा गूढ राशि आहे. व तो अष्टमांत उदित असल्यामुळें या राशींत मंगळ असतां जर यंदाची राष्ट्रीय सभा झाली तर तींत अनेक गुप्त कारस्थानें होतील, आणि न झाली तरी राष्ट्रपक्ष आपले सर्व विचार गुप्त रीतीनें सर्वत्र पसरील. लिहिण्याचा आशय इतकाच कीं या पक्षांत या वर्षी पुढें काय व कसें करावें हे विचार जे ठरतील ते बाहेर फुटणार नाहींत. असें होण्याचें कारण बहुधा सरकारचें दडपशाहीचें धोरण हेंच होईल. सरकार राष्ट्रीय पक्षाच्या हात धुवून पाठीस लागलेलें स्पष्ट दिसत आहे. कुंडलीवरूनही या गोष्टीचा बोध होत आहे. दशमांत [राज्यभुवनांत] रवि हा मकर राशींत शत्रुगृहीं आहे व तनुस्थानीं दशमाचा अधिपति शनि हाही मेष राशींत शत्रुगृहीं आहे. या प्रमाणें राजकारक ग्रह रवि व दशमाधिप शनि हे या वर्षी कांग्रेसच्या वेळीं शत्रुगृहीं असल्यामुळें राष्ट्रीय पक्षाला सरकारचें भय आहे. या प्रमाणें कुंडलीच्या दोन प्रमुख केंद्रीं हर्शल सह तीन पाप ग्रह असतां, गुरु षष्ठ स्थानीं व मंगळ अष्टम स्थानीं असतां होणाऱ्या राष्ट्रीय पक्षाच्या कांग्रेसला सरकारापासून अडथळा होण्याचा विशेष संभव आहे. यासाठीं राष्ट्रीय पक्षाच्या पुढाऱ्यांस आमची अशी सूचना आहे कीं, त्यांनीं या वर्षी कांग्रेस भरवूं नये. एप्रिलमध्यें रवि वृषभ राशीचा झाल्यावर शुभ दिवस पाहून त्या वेळीं भरवावी. व पुढेंही तोच क्रम ठेवावा. डिसेंबरपेक्षां हा महिना सोईचा व फलदृष्ट्या हितावह आहे. दुसरें, लोकमान्य टिळक हे कैदेंत असून अरविंद

बाबूंचीही सुटका अद्यापि झालेली नाहीं; लालाजी, बिपिन बाबू व खापर्डे ही मंडळी विलायतेस गुंतली आहे. अशा स्थितींत यंदा डिसेंबरमध्यें कांग्रेस न भरविली तरी कांहीं बिघडणार नाहीं. कांग्रेसचा हा महिना बदलला च पाहिजे. तेणेंकरून पुढील सालचें अरिष्टही कदाचित् टळेल. राष्ट्रीय पक्षानें विनाकारण संकटांत पडूं नये ह्मणून ही शास्त्रदृष्ट्या सूचना केली आहे.

मंगळाच्या स्थितीवर राष्ट्रीय सभेचें ठिकाण अवलंबून अ.हे. १९०६ सालीं मंगळ वृश्चिक राशींत, असतां कलकत्त्यास सभा झाली. १९०७ सालीं तो मीनेंत असतां सुरतेस सभा झाली. १९०८ सालीं मंगळ वृश्चिक राशींत आहे. कर्क, वृश्चिक, मकर व मीन हे चार जल-राशी आहेत. यावरून १९०८ ची कांग्रेस डिसेंबरमध्यें झाल्यास तीही एखाद्या प्रख्यात नदीच्या काठींच होईल किंवा समुद्रकांठीं होईल असें वाटतें. वृश्चिक राशीचें निवासस्थान "खडकाळ जमीन व विषारी प्राण्यांचीं बिळें" असें शास्त्रांत सांगि-तलेलें असून हा जलराशी आहे असेंही ह्मटलेलें आहे. त्यामुळें निश्चित स्थल ठरवितां येत नाहीं. परंतु इतकें खरें कीं, यंदाची कांग्रेस नागपुरास भरावी ह्मणून जें कित्येक ह्मणत आहेत तें तरी साध्य नाहीं यांत शंका नाहीं.

गोलयोग.

निमच येथील पं. भवानीशंकर शर्मा यांनीं जें संवत् १९६७ चें भविष्यफल 'चंद्रीका' नामक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे त्यांत ता. १ नवंबर सन १९१० या दिवशीं सप्त ग्रह एकत्र होत असून तो गोलयोग होतो असें ह्मटलें आहे. योगकालचे त्यांनीं ग्रहांचे अंश दिले आहेत ते येणें प्रमाणें—

रवि	चंद्र	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	केतु
६।१४	६।०	६।२	६।७	६।६	६।९	६।२६

ह सर्व ग्रह तूळ राशींत आले असून त्यांच्या समोरच्या राशींत शनि ०।५ व राहु ०।२६ आहे. या वेळची त्यांनीं कुंडली तयार केली आहे, ती अशी—



या योगाचें फल आर्यग्रंथात सांगितलें आहे, तें असें—

ग्रहाणां यन्मासे ननु भवति सप्ता निवसति—
स्तदा गोलो योगः प्रलयपदमिन्द्रोपि लभते ॥
नृपाणां नाशः स्याज्वलति वसुधा शुष्यति नदी
भवेल्लोको रंकः परिहरति पुत्रं च जननी ॥
रव्यादौ शनिपर्यंतं क्रूराक्रूरौ व्यवस्थितौ ॥
एकराशिगता येच गोलो योगः प्रजायते ॥

पीडयन्ति महीं सर्वां तदा भूमिभयं भवेत् ॥
देवताः पतनं यान्ति पीडनं शेषमंडले ॥
अवर्षणं छत्रभंगं महामारी तदा भवेत
दुर्भिक्षं रौरवाकारा जायते सर्व मेदिनी ॥
राजनाशः प्रजायेत सेनयो रुभयोरपि ॥
अग्निदाहो जन्तुपीडा तथा द्विपाच्चतुष्पदाम् ॥
जायते नात्र संदेहो शिवस्य वचनं यथा ॥
अतिवृष्टिरनावृष्टि र्मूषकाः शलभाः शुकाः ॥
स्वचक्रं परचक्रं वा सप्तेता ईतयः स्मृताः ॥
अकालेपि फलं पुष्पं वृक्षाणां तत्र जायते ॥
स्वज्ञातीय मांसभक्षाः दुर्भिक्षं तत्र रौरवम् ॥
ऋतो र्विपर्ययं तत्र दुर्भिक्षं मंडले भवेत् ॥
भूमिकंपो रजःपातो रक्तवृष्टिश्च जायते ॥
देशध्वंसः प्रजापीडा मृत्युः परवधस्तथा ॥
परचक्रागमं तत्र दुर्भिक्षं स्वस्वराजके ॥
अतिचारगते शुक्रे देवेज्ये चंद्रजस्तथा ॥
एकराशौ सप्तमे वा शनिराहू यदा तदा ॥
महामारीभयं याति राजयुद्धं परस्परं ॥

याप्रमाणें या गोलयोगाचें फल सांगितलें आहे. पं. भवानीशंकर यांचें हें मत बरोबर नाहीं असें वाटतें. वास्तविक ग्रह ७च आहेत. राहु व केतु यांची ग्रहांत गणना होत नाहीं. वराहमिहिराच्या ग्रंथांत राहु व केतु यांचा संग्रह केलेला नाहीं. त्याच्या नंतर हे दोन ग्रह (?) फलितासाठीं घेऊं लागले. प्राचीन ऋषींच्या नांवांवर विकणाऱ्या ग्रंथांत यांचा समावेश करून ग्रंथकारांनीं लोकांत भ्रम पसरविला आहे. क्रांतिवृत्त (ज्या मार्गानें पृथ्वी सूर्याभोवतीं प्रदक्षिणा करिते तो मार्ग.)

आणि चंद्राचा भ्रमणमार्ग हे दोन मार्ग ज्या दोन ठिकाणीं एकमेकांस छेदितात त्या छेदनबिंदूपैकीं एकास राहू व दुसऱ्यास केतु ह्मणतात. अर्थात हे गोल नसून बिंदुमय आहेत. त्यांस प्रकाश नाहीं, गति मात्र आहे. या गतीवरूनच त्यांची ग्रहांत गणना झालेली दिसते. राहूच्या समोर नेहमीं केतु असतो. आणि ही जोडी घड्याळाचा मिनिट कांटा दुसऱ्या बाजूस वाढविलेला असला ह्मणजे त्याचीं दोन्ही टोकें जशीं एकदम फिरतात, तसें त्यांचें क्रांतिवृत्तांत भ्रमण होतें. राहू व केतु यांत राहूचा अनुभव चांगला येतो, केतूचा येतच नाहीं ह्मटलें तरी चालेल. असो, सप्तग्रहांत राहूची व केतूची गणना होत नाहीं हें निःसंशय आहे. शिवाय श्लोकांत ' रव्यादौ शनिपर्यंतं ' असें स्पष्ट ह्मटलें आहे, ह्मणून जर रवि, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र व शनि हे सात ग्रह एका राशींत एकत्र येतील तर गोलयोग होईल. पं. भवानीशंकर यांनीं शनीच्या जागीं केतु धरून सप्तग्रही बनविली आहे हें सशास्त्र नाहीं. फार झालें तर ही षड्ग्रही होईल.

ग्रह कितीही एका राशीवर असल्यानें कोणताही योग होऊं शकत नाहीं. जर ते एकमेकांशीं युति करितील अगर युतीच्या स्थितींत असतील तरच तो महत्वाचा योग होतो. गुरु व चंद्र यांच्या युतिकाळीं ज्या प्रकारचा मनुष्य निपजेल, त्या प्रकारचा ते एका राशीवर कोठें तरी असल्यानें निपजणार नाहीं, हें निःसंशय आहे. एखादा ग्रह अमक्या ग्रहानें युक्त आहे असें जेव्हां ह्मणण्यांत येतें त्या वेळीं त्या दोन ग्रहांची युति झालेली अगर होणारी तरी असली पाहिजे, ह्मणजे त्या दोन ग्रहांत फारच थोडें अंतर असलें पाहिजे. जर अंतर अधिक असेल तर त्यांच्या योगाचें फल मुळींच मिळणार नाहीं आमच्या ज्योतिषांच्या भावचलीत कुंडलींत तर ते ग्रह एका राशीवर सुद्धां असावे लागत नाहींत! ही पद्धति सदोष आहे. या पद्धतिचा अनुभव येतो असें ह्मणणें वेडेपणाचें आहे. हा

निवळ भ्रम आहे! संवत् १९१७ मध्यें होणाऱ्या षड्ग्रहींत बुध व गुरु हे मात्र युति करीत आहेत, शुक्र आणि मंगळ हे त्यांच्यापासून किंचित् दूर आहेत, चंद्र व सूर्य हे अधिक दूर असून सूर्य तर बराच दूर आहे. हे सर्व सूर्याच्या मागें एकत्र झालेले आहेत. ह्मणून हा गोलयोग होत नाहीं असें आह्मांस वाटतें. गोलयोग हा प्रळयकाळाचा निदर्शक आहे. प्रळयकाळ इतक्यांत आला असें वाटत नाहीं!

एकराशौ सप्तमे वा शनिराहू यदा तदा ॥
महामारीभयं याति राजयुद्धं परस्परं ॥

यांत जें सप्तमे असें पद आहे त्याचा अर्थ वरील सप्तग्रहीच्या सप्तमांत असा अर्थ पंडितजींनीं केला आहे, तोही आमच्या मतें बरोबर आहे. 'वा' या पदावरून त्यांचा सप्तग्रहीशीं संबंध नसून हा योग स्वतंत्र आहे, असें स्पष्ट दिसतें. जर शनि आणि राहू हे एका राशीवर (एकत्र) होतील अगर एकमेकांच्या सप्तमांत येतील तर महामारी व राजांचीं युद्धें या गोष्टी घडतील. ता १ नवंबराला पंडितजींच्या मतानें शनि [निरयन] मेष राशींत ५ अंश असून राहु २६ अंश आहे! केवढें अंतर या ग्रहांत? इतकें अंतर असतां हा योग व्हावा असें सदसद्विवेकबुद्धीला खरें वाटत नाहीं. जर या योगांत एकत्रता पाहिजे असेल तर तो १९१० सालीं होऊं शकत नाहीं. १९११ मध्यें योग येईल.

असो, गोलयोगासंबंधानें आमचें ह्मणणें अशा प्रकारचें आहे. पुढें केव्हां हा योग आहे, या संबंधानें सवडीनें विवेचन करूं.

आर्तवज्ञान.

स्त्रिया ज्या वेळीं अस्पर्श होतात, त्या वेळीं ग्रहस्थिति कशी असते, कोणते ग्रह या गोष्टीचे सूचक आहेत, त्यांत पतीच्या कुंडलींत ते कसे असतात व स्त्रीच्या कुंडलींत कसे असतात वगैरे विचार महत्वाचा असून करमणुकीचा आहे. गांवीं जातांना अगर एखाद्या मंगल कार्यांत या अडचणींतून निभावण्यास हा विचार सोयीचा होईल, ह्मणून या बद्दल आज जास्त विचार करण्याचें ठरविलें आहे. विषयाचें पूर्ण विवेचन होण्या करितां त्याचे खालील भाग केले आहेत—

(१) ज्योतिषशास्त्रदृष्ट्या ऋतुचीं मूलतत्वें.
(२) प्रथम ऋतुस्नात होण्याचें कारण व त्याचा काळ.
(३) ऋतुकालचें लग्न.
(४) ऋतुचें वर्णन (प्रवाह, रंग वगैरे.)
(५) प्रातमासिक ऋतुकाल

या प्रत्येक भागाचा आजच पूर्णपणें विचार करितां येईल असें वाटत नाहीं. तरी पण जितका करितां येईल तितकाच वाचकांच्या पुढें मांडिल्यानें त्यांच्या मदतीनें पुढें जास्त विचार करण्यास ठीक पडेल. या विषयाचा ज्याला पूर्ण विचार करावयाचा असेल, त्याच्या जवळ नवरा व त्याची बायको यांच्या स्पष्ट ग्रहांच्या कुंडल्या, ऋतुकाल, वर्ण, व त्याची स्थिति इतक्या गोष्टींचें रेकार्ड (टिपणबुक) जवळ असलें पाहिजे. या माहिती वांचून कोणी ह्मणेल कीं, मी हें जाणूं शकेन तर तें अशक्य व अविश्वसनीय आहे. आह्मांला (मुंबई) येथील एका शोधक व वैद्यक अशा गृहस्थां जवळ लहा-

नसा संग्रह होता तो त्यांजकडून मिळाला आहे व त्यावरूनच आजचे विचार सुचले आहेत. ते बरोबर आहेत असें आम्ही म्हणत नाहीं, कदाचित् सर्वच चुकीचे असतील. तथापि जे इतक्याच संग्रहावरून सुचले ते लिहिणें अगत्याचें वाटलें म्हणून लिहीत आहों. अनुभव कळविल्यास आभारी होऊं.

(१) ज्योतिषशास्त्रदृष्ट्या ऋतूंचीं मूलतत्त्वें.

ऋतूची स्त्रीच्या गर्भाशयापासून उत्पत्ति आहे व त्याचा प्रवाह तिच्या जननेंद्रियाच्या द्वारें होतो. हा रक्तवर्ण आहे, आणि त्याचा जोर तिच्या प्रकृतीच्या कमजास्त उष्णतेवर अवलंबून आहे. मूळचा गर्भाशय अशक्त व अत्युष्ण असेल तर ती स्त्री अल्पवयांत ऋतुस्नात होईल व पुष्ट आणि शुद्ध (समोष्ण) असेल तर तिला ऋतुस्नात होण्यास कालावधि लागेल. रक्तवर्ण रवि व मुख्यत्वें मंगळ या ग्रहांचा आहे, म्हणून हे दोन ग्रह आपणास विचारांत घेतले पाहिजेत गर्भाशयाचा विचार तिच्या सप्तमावरहोतो जननेंद्रिय तिच्या अष्टमावर किंवा चंद्राच्या अगर शुक्राच्या अष्टमावर पहावयाचें. तूळ हा गर्भाशय व वृश्चिक हा जननेंद्रिय दर्शक आहे. लग्न व चंद्र हें तिचें शरीर असून शुक्र तिचें रेत आहे. या गोष्टी शास्त्रसिद्ध आहेत, म्हणून इतक्या गोष्टींवरून आर्तवाचा विचार केला पाहिजे. सारांश ज्योतिषशास्त्रदृष्ट्या ऋतूंचीं मूलतत्त्वें खालील प्रमाणें आहेत—

लग्न, चंद्र } शरीर रवि, मंगळ } ऋतु सप्तम, तुळ } गर्भाशय अष्टम, वृश्चिक } जननेंद्रिय

व शुक्र—रेत.

(२) प्रथमऋतुस्नात होण्याचें कारण व त्याचा काल

सामान्यतः कोणत्याही स्त्रीला वयाच्या ११ व्या वर्षापासून १८ व्या वर्षापर्यंत केव्हां तरी ऋतु प्राप्त होतो. उष्ण प्रकृतीच्या किंवा

तिचा गर्भाशय उष्ण आहे अशा स्त्रीला लवकर ऋतु प्राप्त होतो, म्हणून तिचा विचार त्या दृष्टीनें केला पाहिजे.

कित्येक मुलींस ऋतु पूर्वीच प्राप्त झालेला असतो, पण तो कोणत्याही कारणानें उघड होत नाहीं; म्हणून असल्या मुलींचा आपणास विचार सोडून दिला पाहिजे.

वयाच्या ११ व्या वर्षी शनि हा स्वस्थानापासून सुमारें १२० अंशावर येतो व १८ व्या वर्षी २१० अंशांवर येतो. यावरून शनि स्वस्थापासून १२० अंश गेला कीं, तेव्हां पासून त्याचे २१० अंश पूर्ण होईपर्यंतचा जो काल तो ऋतुकाल होय. या मर्यादेंत तो केव्हा झाला पाहिजे याचा आतां विचार करूं

असें अनुमान होतें कीं, रवि अगर मंगळ यांच्या जवळ, समोर, अगर त्यांच्या अष्टम स्थानीं शनि आला म्हणजे ऋतु प्राप्त होण्याचा समय आला असें मानावयास हरकत नाहीं. क्वचित् शुक्र व चंद्र यांच्या अष्टमांत आल्यावर ऋतुप्राप्ति झाल्याचें उदाहरण नजरेस येईल. हा विचार करीतांना कुंडलींतलें लग्न, सप्तम व अष्टम या स्थानासही विसरतां कामा नये.

(३) ऋतुकालचें लग्न

लग्न—सप्तम; चंद्र,—सप्तम; शुक्र—सप्तम किंवा निदान रवि—सप्तम यांपैकीं कोणतें तरी एक लग्न असलें पाहिजे. उभयतांच्या कुंडल्या पुढें धरून उभयतांस जुळता जो राशि त्या राशीचें लग्न असतां ऋतु प्राप्त झाला पाहिजे.

(४) ऋतुचें वर्णन

ऋतुकाली चंद्र, शुक्र, रवि व मंगळ यांपैकीं ज्यांचा संबंध अगदी निकट असेल (म्हणजे ऋतु होण्यास जो कारण असेल) त्याच्या राशिपरत्वें धर्मप्रमाणें स्त्रावाची स्थिति असेल. ग्रहांचे व राशींचे वर्ण आमच्या वर्णबोध नामक पुस्तकांत पहावे.

मूलचा गर्भाशय उष्ण असून त्या स्थानांत ऋतुकाळीं जर रवि किंवा मंगळ यांचें (अग्निराशींत) प्राबल्य असेल तर स्त्राव फार होईल. (गर्भाशयाचा विचार करितांना पंचम स्थानही विचारांत घ्यावें.)

(५) ऋतुचें वर्णन

१ रवि किंवा मंगळ हे शुक्राच्या अगर चंद्राच्या राशीस, किंवा यांच्या सप्तमांत अथवा अष्टमांत असतां.

२ शुक्र हा लग्न, सप्तम या स्थानीं किंवा चंद्र, सप्तम या स्थानीं किंवा शुक्र ,सप्तम या स्थानीं असतां

३ चंद्र हा मंगळ, शुक्र अगर चंद्र यांच्या राशींत किंवा यांच्या सप्तम राशीवर असतां.

प्रत्येक महिन्यांत अशा प्रकारची स्थिति असतां स्त्रिया ऋतुस्नात झाल्या पाहिजेत. आतां हें म्हणणें कितपत बरोबर आहे हें मिळालेल्या संग्रहावरून उदाहरणानें स्पष्ट करितों. विषय बिकट व घोटाळ्याचा आहे, तरी त्याचें सर्वसाधारण स्वरूप असें आहे.

उदाहरण १ लें

पति—१७९१ मार्ग कृ. १ शुक्र पत्नी १८१० अ. चैत्र कृ.१

घ० १४ प. २० घ० ५८ प. २५



रवि–वृश्चिक २१	रवि–मीन १६
चंद्र–मिथुन ११	चंद्र–तूळ ५
मंगळ–मकर २०	मंगळ=कन्या२६
शुक्र–वृश्चिक २	शुक्र–कुंभ १९
शनि–मकर ९	शनि–कर्क ८

याप्रमाणें उभयतांचे जन्मकालचे ग्रह आहेत. लग्न ता. १० डिसेंबर १९०५ रोजीं होऊन ऋतुप्राप्ति ता. १४ डिसेंबर १९०५ रोजीं सकाळीं ९॥ ते ६ या सुमारास झाली. यावेळचे ग्रह—

रवि–वृश्चिक २९	मंगळ–मकर २७	शनि–कुंभ ९
चंद्र–मिथुन २१	शुक्र–वृश्चिक १४	

आतां स्त्रीच्या कुंडलीकडे अवलोकन करा शनि कर्क राशींत पंचमांत आहे. वृश्चिकच्या ८ अंशांपर्यंत तो ऋतुकाळीं असला पाहिजे, असें आपल्या मागील नियमांवरून दिसून येतें. त्याप्रमाणें तो शुक्राच्या राशीस ९ अंश गेल्यावर ऋतुदर्शन झालें आतां हें ऋतुदर्शन पहिलेंच असेल कीं काय याची शंका येते. वयाच्या मानानें व लग्नीं रवि आणि सप्तमांत मंगळ असल्यामुळें ऋतुदर्शन इतक्या उशीरानें होईल असें वाटत नाहीं. लग्न १० वीला होतें व ऋतुदर्शन १४ वीला होतें, यावरून हा प्रथम ऋतुकाल नसावा. पुरुषाचा मंगळ मकर राशींत २० अंश आहे व स्त्रीच्या मंगळापासून १२० अंश मकर राशीच्या २६ अंशांत होतात. म्हनून २० ते २६ अंशांत शनि असतां तिला प्रथमतः ऋतुदर्शन झालेलें असलें पाहिजे. असो. वरील ऋतुकाळीं शुक्र व रवि वृश्चिक राशींत आहेत. व मगळ मात्र स्त्रीच्या मंगळाच्या १२० अंशांवर बरोबर आहे. आणि तो पुरुषाच्या मंगळाच्या राशीस आहे. त्या वेळचा

चंद्र त्या वेळच्या शुक्राच्या अष्टमांत आहे. परंतु शुक्र १४ अंश असून चंद्र २० अंश आहे, म्हणजे ७ अंश पुढें आहे, यावरून कदाचित् ती २।३ तास पूर्वीच ऋतुस्नात झालेली असूं शकेल. सारांश, लग्न व रजोदर्शन एकाच काळीं आल्यामुळें या कुंडलींत निश्चयात्मक कांहीं समजण्याचा मार्ग नाहीं.

याच स्त्रीचे पुढील रजोदर्शनकाल येणें प्रमाणें आहेत.

(१) ता. १९ जानेवारी १९०६ या दिवशींचे ग्रह

रवि	चंद्र	शुक्र—	मंगळ
मकर २	सिंह—२६	वृश्चिक २५	कुंभ—२२

या वेळीं नक्की काल टिपलेला नव्हता. परंतु ज्या अर्थी मंगळ कुंभेंत २२ अंश आहे, त्या अर्थी चंद्राचे अंश तितकेच असूं शकतील. या दिवशीं चंद्र १९ अं. पासून २२ अंशांपर्यंत रजोत्पत्तिदर्शक स्थितींत आहे.

(२) ता. १८ फेब्रुवारी १९०६

रवि	चंद्र	मंगळ	शुक्र
कुंभ ६	धनु ७	मीन १८	कुंभ ७

या वेळीं मंगळ आपल्या स्वतःच्या सप्तमांत आहे. रवि व शुक्र हे जन्मशुक्राच्या सप्तमांत युति करीत आहेत. व चंद्रापासून शुक्र बरोबर ९० अंशावर आहे. हा काल पतीच्या चंद्राच्या बरोबर सप्तम चंद्र असतांचा असावा असें अनुमान होतें.

(३) ता. १८ मार्च १९०६ सायं. ६ वाजतां

रवि	चंद्र	मंगळ	शुक्र
मीन—४	धनु २२	मेष ८	मीन १२

या वेळचा मंगळ जन्मचंद्राच्या सप्तमांत आहे. आणि शुक्र जन्म मंगळाच्या सप्तमांत आहे. चंद्र पुरुषाच्या चंद्राच्या सप्तमांत व स्त्रीच्या मंगळापासून ९० अंशांवर आहे.

(४) ता. १४ एप्रिल १९०६ सकाळीं ८ वाजतां.

रवि	चंद्र	मंगळ	शुक्र
मेष १	धनु ९	मेष २२	मेष १६

या दिवशीं मुद्दां चंद्र पुरुषाच्या चंद्राच्या बरोबर सप्तमांत आहे।

(५) ता. ९ मे १९०६ सायं. ४ वाजतां.

रवि	चंद्र	मंगळ	शुक्र
मेष २५	वृषभ ९	वृषभ १९	वृषभ १७

या दिवशीं पुरुषाच्या शुक्राच्या सप्तमांत आहे. शुक्र मंगळ स्त्रीच्या चंद्राच्या अष्टमस्थानीं जवळ जवळ आलेले आहेत.

(६) ता. ४ जून १९०६ रात्रीं ९ वाजतां.

रवि	चंद्र	मंगळ	शुक्र
वृषभ २४	तूळ १९	मिथुन ३	मिथुन १८

पुरुषाच्या चंद्राच्या सप्तमांत मंगळ व शुक्र आहेत व चंद्र स्त्रीच्या राशीला आहे. पुरुषाचा मंगळ व या दिवशींचा चंद्र यांत बरोबर ९० अंश अंतर आहे. व शुक्र आणि चंद्र यांत १२० अंश अंतर आहे.

(७) ता. २९ जून सन १९०६

रवि	चंद्र	मंगळ	शुक्र
मिथुन १४	कन्या २६	मिथुन २०	कर्क १९

येथें चंद्र हा मंगळाच्या राशीस गेला आहे. शुक्र व मंगळ १२० अंश अंतरावर आहेत.

वरील सर्व उदाहरणांवरून रजोदर्शनाचें सामान्य स्वरूप वाचकांच्या ध्यानांत येईल.

उदाहरण २ रें

पति—श. १८०७ ज्ये. कृ. ४ मग. घ.



पत्नी—श. १८१७ फा. कृ. १ घ. ४८ प. ४१



रवि—वृषभ १९	रवि—कुंभ १८
चंद्र—मकर १	चंद्र—कन्या ८
मंगळ—मेष २१	मंगळ—मकर ९
शुक्र—वृषभ २८	शुक्र—मकर १५
शनि—मिथुन ४	शनि—तूळ २७

या स्त्रीला ता. २७ जानेवारी १९१० रोजीं प्रथमरजोदर्शन झालें या वेळचे ग्रह.

रवि	चंद्र	मंगळ	शुक्र	शनि
मकर १४	सिंह ९	मेष ९	कुंभ ८	मीन २५

आपल्या नियमाप्रमाणें शनि कुंभेच्या २७ अंशापासून वृषभ २७ अंशांपर्यंत असतां ऋतुकाल आहे. ऋतुकालीं शनि हा चंद्राच्या सप्तमांत आला. या वेळचे शुक्र चंद्र परस्पर सप्तम आले. मंगळ हा तिच्या चंद्राला बरोबर अष्टम झाला, आणि या वेळचा चंद्र तिच्या शुक्राला अष्टम झाला. या वेळचा मंगळ तिच्या मंगळापासून ९० अंशांवर आहे.

साधारणतः असें ठरतें कीं, प्रथम रजोदर्शनकालीं शनि हा स्वस्थानापासून १२० ते २१० अंशांच्या मर्यादेंत असुन तो लग्न, चंद्र, मंगळ शुक्र किंवा रवि यांच्या राशींस अगर यांच्या सप्तमांत येऊन इतर योग होतील त्या वेळीं प्रथम रजोदर्शन व्हावयाचें.

पत्रव्यवहार

श्रीयुत कुंडलीविज्ञान कर्ते यांस—

सा. न. वि. वि.—प्रवासासंबंधाचा माझा स्वतःचा अनुभव आपणास कळवीत आहें. त्यास येत्या अंकीं स्थळ मिळावें.

जन्म—ता० २० डिसेंबर सन १८९० सायं. ४ वा. १९ मि.



ता. २६ सप्टेंबर रोजीं मी मुंबईहून बाणकोटच्या बोटीनें प्रवासास निघालों. या दिवशीं रवि, मंगळ, बुध व गुरु हे चार ग्रह पंचम स्थानीं तूळ या चर राशींत होते, चंद्र कर्क या जल व चर अशा राशींत द्वितीयस्थ होता. फलज्योतिषाच्या दृष्टीनें हा प्रवासयोग बरोबर ठरतो. कारण, लग्नेश बुध, सप्तमेश गुरु आणि दोनक चंद्र हे सर्व चर राशींतच होते. जन्मकालचा चंद्र व त्याच वेळेचा लग्नेश बुध हे दोन्हीं ग्रह अनुक्रमें मेष व मकर या चर राशींत असल्यामुळें मला प्रवासयोग आहे. माझा जन्मसुद्धां माझी माता मार्गस्थ असतां झाला आहे! कारण, लग्नेश तोच चतुर्थेश

आहे व तो मकर या चर राशींत आहे. चंद्र हा ग्रह मातृकारक आहे व तोही चर राशींतच आहे. सर्व ग्रहांत गुरु आणि हर्शल हे दोन ग्रह मात्र स्थिर राशींत आहेत, बाकीचे सर्व चर व द्विस्वभाव राशींत आहेत. माझ्या प्रवासकाळीं चंद्र व बुध हे चर अथवा द्विस्वभाव राशींत असावयाचेच असा मी अनेक वेळां अनुभव घेतला आहे. आजही ते चर राशींतच होते हें वर लिहिलेंच आहे. दुसरा महत्वाचा योग या दिवशीं झाला आहे तो असा.— गुरु हा सप्तमेश असून तो या दिवशीं जन्माच्या चंद्राच्या पूर्णीशानें सप्तमांत होता, म्हणून मी त्याच्याच जोरावर प्रवासास निघालों होतों. वास्तविक हा दिवस चांगलासा नव्हता. कारण, चंद्र कर्क राशींत असल्यामुळें तो जन्मचंद्राला चवथा होण्यास पात्र होता. म्हणजे त्याच दिवशीं तो जन्म चंद्राशीं पूर्ण केंद्रयोग करीत होता. आणि या चर चंद्राच्या चतुर्थांत रवि बुध व मंगळ हे युति करीत असून निघतांना तर बुधमंगळ यांची युतीच होती! हे योग प्रवासाला सुखकर नव्हते. परंतु प्रसंगच असा येऊन ठेपला कीं, मला प्रवास करणें भाग पडलें. यामुळें पुढें घडणारी आपत्ति मला टाळतां आली नाहीं ही निरुपायाची गोष्ट होय!

निघाल्यापासून ठिकाणावर जाईपर्यंत फारसा त्रास झाला नाहीं. बोटीवरून जमिनीवर पाय ठेवला आणि पावसाला सुरवात झाली. मंगळवारीं सायंकाळीं ६ वाजण्याचा हा समय होता. या दिवशीं सकाळीं ११ वाजून ३९ मि. नीं. हर्शल व चंद्र यांचा प्रतियोग होता व तो मार्गीतच घडणारा होता. हा प्रतियोग सुखकारक नाहीं, याचा अनुभव मला त्या वेळीं चांगला आला. पावसानें माझी दुर्दशा झाली. बिऱ्हाडीं जाईपर्यंत माझा एकही कपडा कोरडा राहिला नाहीं. जातेवेळीं मला इतकाच त्रास झाला.

शुक्रवारीं मी मुंबईस येण्यासाठीं परत फिरलों. या वेळीं मूर्तिमंत काळ मला दिसत होता, पण सोमवारीं आईचें वर्षश्राद्ध असल्यामुळें त्याच्या जबड्यामध्यें उडी घेतल्याव चून सोयच नव्हती नद्या तुडुंब भरून चालल्या होत्या. पावसाची मुसळधार सुरू होती. शहरांत जिकडे तिकडे पाणीच पाणी होऊन गेलें असून नद्यांनींही आपली मर्यादा सोडली होती. गाड्या बंद होत्या. अशा स्थितींत मला परत फिरावें लागलें. बोटीच्या धक्यावर पुरुषभर पाणी आलें होतें, म्हणून या दिवशीं खाडीतली लहान बोट बंद होती. तेव्हां निरुपायानें पांच रुपये खर्च करून एक होडी (जालीबोट] केली या होड्यांत कांटेतोल बसावें लागतें, जरा झोंक गेला कीं " नद्यस्तृप्यंतु " होण्यास उशीर नाहीं! अशा होडींत दहा मनुष्यें बसलीं. वारा झपाट्याचा, समुद्राला ओहोट व पुराचा जोर अनुकूल म्हणून दोन तासांत त्या होडीनें सुमारें १८ मैल प्रवास केला. पुढें सुमारें ६ मैलांचा प्रवास होता त्याला ६ तास लागले! हाच दिवस तुफानाचा. या तुफानानें समुद्रांत किती कहर केला, हें वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेंच आहे. तीन दिवस फेरी बोटी बंद होत्या, यामुळें हरेश्वरास वस्ती करावी लागली. आईचें वर्षश्राद्ध अंतरलें! तुफानाच्या वेळीं चंद्र हा चतुर्थ स्थानीं शनीजवळ आला होता. हें स्थान वाहनाचें आहे म्हणून हा चंद्र वाहनभय उत्पन्न करणारा झाला. बुधवारीं चंद्र तूळेचा झाल्यावर मुंबईस सुरक्षित येऊन दाखल झालों. जातांना व येतांना समुद्रांतला प्रवास मात्र सुखकर झाला. याप्रमाणें माझ्या प्रवासाची हकीकत आहे.

ही हकीकत प्रसिद्ध करण्याचे माझे दोन हेतु आहेत. १ ला.— फलज्योतिषाची सत्यता सिद्ध व्हावी व २ रा.—प्रवास करणारांनीं यापासून धडा घ्यावा. कळावें लोभ असावा हे विनंति.

—ज्योतिषविद्यार्थी—मुंबई.

---

* वरील पत्रव्यवहार फार उपयुक्त आहे. प्रवास केव्हां होतात

व प्रवासकाली मह बिघडलेले असले तर कसा त्रास होतो हा बोध या पत्रावरून चांगला होईल.

ज्यांना जन्मकाली अपघाताचे व दुखापतीचे योग झाले असतील त्यांनीं प्रवास करितांना ग्रहस्थितीचा विचार केलाच पाहिजे इतरांनीं न केला तरी एक वेळ चालेल. तथापि त्यांचे जर ग्रह बिघडलेले असतील तर थोडा तरी त्रास झाल्याशिवाय राहणार नाहीं हा सिद्धांत आहे. वरील कुंडली ज्या मनुष्याची आहे त्याला पाण्यापासून दोन वेळां त्रास भोगावा लागला होता. वयाच्या तिसऱ्या वर्षी श्रावणाच्या महिन्यांत पाण्यानें तुडुंब भरलेल्या विहिरींत पडून तीन तासपर्यंत त्याचा पत्ता नव्हता! या वेळीं हर्शल हा षष्ठस्थानीं वृश्चिक या जलराशींत चंद्राला आठवा होता व शनि हा चंद्राच्या समोर होता. या वेळीं मेलेला जिवंत झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. याच हर्शल जवळ मंगळ षष्ठ स्थानीं सन १९०९ सालीं असतां हा मनुष्य पुराच्या पाण्यांत दुसरे दिवशीं पडून हाताचें हाड मोडलें! हा हात सांप्रत निर्बली आहे. जन्मकालाचा चंद्र मेष राशींत मंगळाच्या घरीं असून अंशपरत्वें तो वृश्चिकांशांत आहे. व चतुर्थ स्थानीं शनि असून दशमांत मंगळ आहे. मंगळ हा षष्ठेश असून शनि अष्टमेश आहे व षष्ठेशाच्या सप्तमांत अष्टमेश आहे. कुंडलीच्या चारही केंद्रांत पाप ग्रह आहेत हे सर्वयोग अपघात व दुखापत दर्शवितात. आणि लग्नस्वामी बुध हा अष्टमांत जलराशींत असल्यामुळें पाण्यापासूनच विशेषतः भय आहे असें ही कुंडली सांगते. आजचा हर्शल अष्टमांत बुधाजवळच आहे व चर बुध मंगळानें दूषित झाला होता. स्पष्टेसाती आहेच व तो शनि जन्महर्शलच्या समोर आहे! गुरु मात्र नवमांत पडल्यामुळें सर्व आपत्तींतून पार नेण्यास समर्थ आहे, व तो यावेळीं जन्मचंद्राच्या पूर्ण सप्तमांत होता. म्हणून इतक्याही संकटांतून बचाव झाला. नाहींपेक्षां 'तत्सत्' होण्याचीच ही वेळ होती.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम् ।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥

'भवभूति'

पुस्तक ९ वें.] अ. श्रावण शु० ४ बुधवार. [अंक ११ वा

धंदा काय करावा.

हिंदुपद्धति.

हा प्रश्न फार महत्वाचा आहे. कुंडलीवरून अमुक मनुष्य अमुक धंदा करील हें सांगण्याची आमच्या ग्रंथांत एक पद्धति आहे, ती वरूनच पत्रिकाकरणारे जोशी पत्रिकेंत धंद्यासंबंधानें लिहित असतात. ती पद्धति अशी.—

१ भेंदूर्कास्पदपातिगांशनाथवृत्त्या ॥
२ कर्मेशस्थनवांशराशिपवशाद्वृत्तिं··· ॥

याप्रमाणें या नियमाचीं दोन मतें आहेत. पहिलें मत असें आहे कीं, रवि व चंद्र हे ज्या नवमांशीं असतील, त्या नवमांशस्वामीच्या धर्माप्रमाणें धंदा करावा. दुसरें मत असें आहे कीं, कुंडलींत दश-

माचा अधिपति ज्या नवमांशीं असेल त्या नवमांशस्वामीच्या धर्मा-प्रमाणें धंदा करावा. यांत लग्न व चंद्र यांपैकीं जें बलवान् असेल त्याच्या दशमाचा अधिपति घ्यावयाचा आहे. कित्येक रवि, चंद्र व लग्न यांपैकीं जें बलवान् असेल त्याच्या दशमाधीशाच्या नवमांश स्वामीवरून धंद्याची कल्पना करितात. हीच कल्पना बहुतेक रूढ आहे. केशवीच्या पद्धतीनें लग्न व ग्रह यांचीं बलें काढून त्यावरून कोण अधिक बलवान् आहे हें ठरवितात व ज्याच्यापासून जो दहावा असेल त्याचा अधिपति नवमांश कुंडलींत ज्या राशींत असेल त्या राशीच्या स्वामीच्या धर्माप्रमाणें धंद्याची कल्पना करितात. ग्रहांचे धर्म येणेंप्रमाणें आहेत.—

रवि.—वैद्यकी, लोकरीचींवस्त्रें, गवत, लांकडें, धान्य, सोनें यांचा व्यापार हे रवीचे धंदे आहेत. लग्न, चंद्र अथवा रवि यांचा दशमाधिपति जेव्हां नवमांश कुंडलींत सिंह राशींत असेल तेव्हां तो मनुष्य वरील प्रकारचा धंदा करून निर्वाह करील.

चंद्र.—शेतकाम, बागबगीचे पाण्यासारखे पातळ पदार्थ व पाण्या पासून उत्पन्न होणारे पदार्थ यांचा व्यापार, राजांगनांचा आश्रय व वस्त्रांचा व्यापार हे चंद्राचे धंदे आहेत. लग्न, चंद्र अथवा रवि यांचा दशमाधिपति जेव्हां नवमांश कुंडलींत कर्क राशींत असेल तेव्हां तो मनुष्य या प्रकारचे धंदे करून निर्वाह करील.

मंगळ.—धातुकाम, अग्नीच्या साह्याचीं कामें, धाडसाचीं कृत्यें, लढाई, वादविवाद व चोरी हे मंगळाचे धंदे आहेत. लग्न, चंद्र अथवा रवि यांचा दशमाधिपति जेव्हां नवमांशकुंडलींत मेष अगर वृश्चिक राशींत असेल तेव्हां तो मनुष्य वरील धंदे करण्यास योग्य समजावा.

बुध.—कलाकौशल्याचीं कामें, लेखन, वक्तृत्व, काव्य, शास्त्राध्ययन, ज्योतिष अशा प्रकारच्या बुद्धिसामर्थ्याच्या धंद्यानें उदरनिर्वाह करणें हे बुधाचे धर्म आहेत. ह्मणून लग्न, चंद्र व रवि यांचा दशमाधिपति नवमांशकुंडलींत मिथुन व कन्या राशींत असल्यास तो मनुष्य असले धंदे करूं शकेल असें समजावें.

गुरु.—देव व ब्राह्मण यांची भक्ति करणारा, शिक्षक, पुराणीक, शास्त्री, धर्मोपदेशक, संन्यासी, वेदांती, योगी, हरदास हे गुरूचे धर्म आहेत. ह्मणून लग्न, चंद्र व रवि यांचा दशमाधिपति नवमांश कुंडलींत धनु व मीन राशींत असल्यास तो मनुष्य वरील धंदे करूं शकेल.

शुक्र.—सोनें, रुपें, रत्नें, गज, अश्व, गाई यांचा व्यापार, दूध, दहीं, गुळाचे व खारट पदार्थ यांची विक्री हे शुक्राचे धर्म आहेत. ह्मणून लग्न, चंद्र व रवि यांचा दशमाधिपति नवमांश कुंडलींत वृषभ व तूळ राशींत असल्यास तो असले धंदे करील.

शनि.—श्रमाचीं कामें (हमाली, मजुरी), खून व हिंसा, चोरी, भामटेगिरी, घाणेरडीं कामें हे शनीचे धर्म आहेत. ह्मणून लग्न, चंद्र व रवि यांचा दशमाधिपति नवमांश कुंडलींत मकर व कुंभ राशींत असल्यास तो मनुष्य वरील प्रकारचे धंदे करील.

१ लग्न आपल्या स्वामीनें युक्त, शुभ ग्रहानें युक्त अथवा दृष्ट असून तें पाप ग्रहानें युक्त अथवा दृष्ट नसेल तर तें बलवान् समजावें.

२ चंद्र व रवि हे ग्रह, स्वगृहीं, उच्च, मित्रगृहीं, केंद्रीं, त्रिकोणांत शुभ ग्रहानें युक्त अथवा दृष्ट, स्वनवमांशीं असे असले ह्मणजे बलवान् समजावे.

केशवीच्या पद्धतीनें बलें काढण्यास श्रम फार पडतात, ह्मणून वरील प्रमाणें स्थूल दृष्टीनें लग्न, चंद्र व रवि यांत कोण बलवान् आहे तें ठरविल्यास हरकत नाहीं, असें वाटतें.

उदाहरण.

लग्नकुंडली



नवमांश कुंडली.



या कुंडलींत लग्न कुंभ आहे. तें आपल्या स्वामीनें युक्त नाहीं, लग्नीं शुभ ग्रह नाहीं, शुभ ग्रहाची त्याच्यावर दृष्टि नाहीं व पाप ग्रहही कोणी पाहत नाहीं, अशी लग्नाची स्थिति आहे.

चंद्र हा स्वगृहीं आहे, पण तो केंद्रीं अगर त्रिकोणांत नाहीं, तो शुभ ग्रहानें युक्त नाहीं, गुरूची त्याच्यावर दृष्टि आहे व तो मित्र-नवमांशीं आहे, याप्रमाणें चंद्राची स्थिति आहे.

रवि हा शुभ ग्रहानें युक्त असून केंद्रीं आहे, शत्रुगृहीं असून त्याच्यावर शनीची दृष्टि आहे, याप्रमाणें रवीची स्थिति आहे.

या वरून लग्नाचीच स्थिति बरी आहे असें ह्मणावें लागतें. ह्मणून पाचा दशमाधिपति मंगळ हा नवमांश कुंडलींत कर्क राशींत आहे. या राशीचा स्वामी चंद्र, तेव्हां या मनुष्यानें चंद्राचे मागें सांगितलेले धंदे करावे असें या पद्धतीनें ठरतें.

कित्येक ज्योतिषी दशमांत जो ग्रह असेल तो ज्या ग्रहाच्या नवमांशीं असेल त्या ग्रहाच्या धर्मानुरूप धंद्याची कल्पना करितात; जसें वरील कुंडलींत दशमांत शनि असून तो नवमांश कुंडलींत कन्येंत आहे, व कन्येचा स्वामी बुध आहे ह्मणून बुधाच्या धर्मानुरूप धंदा करील. दशमांत जर अनेक ग्रह असले तर त्यांत जो विशेष बलवान् असेल तो घ्यावा असें ह्मणतात.

आरंभीं जें दुसरें मत दिलें आहे त्यांत दशमाचा अधिपति ज्या ग्रहाच्या नवमांशी असेल त्या ग्रहानुरूप धंदा सांगावा असें सांगितलें आहे. ह्मणजे उदाहरणार्थ घेतलेल्या कुंडलींत दशमांत वृश्चिक रास आहे, तिचा स्वामी मंगळ तो चंद्राच्या नवमांशीं आहे ह्मणून चंद्राच्या धर्मानुरूप धंदा सांगावा असें ह्मटलें आहे.

या प्रमाणें आमच्या ज्योतिष्यांचीं निरनिराळीं मतें आहेत. यांतील कोणतें मत खरें व कोणतें खोटें हें ठरविणें फार बिकट आहे. वास्तविक विचार केला असतां कुंडलींतलें जें दहावें स्थान त्याच स्थानावर विचार केला पाहिजे. कारण—**" व्यापारमुद्रादृपमानराज्यं प्रयोजनंचापि पितुस्तथैव ॥ महत्पदाप्तिः खलु सर्वमेतद्राज्याभिधाने भवने विचार्यं ॥ "** या प्रमाणें दशम भावावरून विचार करावा असें सर्व ग्रंथ सांगतात. दशम स्थानामध्यें जर ग्रह असेल तर त्या ग्रहावरून व नसेल तर त्याच्या स्वामीवरून धंद्याचा निर्णय करावा ही एकच पद्धत असावी. पण या पद्धतीनें कित्येक वेळां अनुभव येत नसल्या कारणानें दशमाच्या जोडीस रवि व चंद्र यांचीं दशम स्थानें विचारांत घ्यावीं असा बूड निघाला असावा.

पाश्चात्य पद्धति

कुंडलीविज्ञान वर्ष ३ अंक ६ वा यांत रा. आत्माराम शिवराम डिवाडकर यांचा—उद्योगधंदा—हा लेख छापलेला आहे. त्यावरून आमच्या जुन्या वर्गणीदारांस या पद्धतीचें स्वरूप ध्यानांत येईल. तथापि नवीन वर्गणीदारांकरितां त्याचा सरांश येथें देणें जरूर आहे. या लेखांत राशि व ग्रह यांचे धर्म सांगितले आहेत ते असे.—

मेष, वृषभ, सिंह व मकर हे राशि धातु, इमारती बांधणें, सोनारकाम व यांत्रिक विद्या यांचा बोध करितात.

मिथून, तूळ व कुंभ हे शास्त्रीय राशि आहेत. म्हणून ते ज्या कामांत तर्कशास्त्र व बुद्धिचातुर्य यांचा जास्त उपयोग आहे असे लोक उत्पन्न करितात.

कर्क, वृश्चिक व मीन हे राशि खाणावळीचे धंदे करणारे, निरनिराळ्या प्रकारची दारू व मादक पदार्थ विकणारे अगर तयार करणारे, दारूचे व्यापारी, खलाशी, त्याचप्रमाणें मासे मारणारे व विकणारे लोक उत्पन्न करितात.

वृश्चिक हा राशि फार करून रसायनशास्त्रवेत्ते व प्रसिद्ध असे वैद्य आणि भानगडीचे धंदे करणारे लोक तयार करितो.

कन्या व धन हे निरोपे, किरकोळ व्यापारी, बुकें विकणारे व छापणारे, खोदकाम करणारे कलाभिज्ञ लोक तयार करितात.

वृषभ, कन्या व मकर हे राशि शेतकीची व बागायतीची ज्यांस विशेष माहिती आहे असे लोक तयार करितात.

मेष, सिंह व धनु हे अग्नीनें अगर वाफेनें चालणारे धंदे, करणारे, हत्यारांचे कारखाने चालवणारे, लढाऊ व भयंकर रीतीनें सूड घेणारे लोक तयार करितात.

जर बरेच ग्रह जल (कर्क, वृश्चिक, मीन) राशींत असतील तर तो मनुष्य कलाल, जकातदार व निरनिराळ्या प्रकारची मिश्र दारू करणारा व मासळीचा व्यापारी होईल.

जर बरेच ग्रह शास्त्रीय राशींत असतील, तर तो चांगला कारकून लेखक किंवा कपड्यांचा व्यापारी होईल.

जर बरेच ग्रह पृथ्वी [वृषभ, कन्या, मकर] राशींत असतील तर तो इमारती बांधणें, शेतकी, गवंडीकाम व भूमीसंबंधानें व्यवसाय यांत प्रवीण होतो.

जर अग्नि (मेष, सिंह व धनु) राशींत बरेच ग्रह असतील तर लव्हार, सुतार, सोनार, कारागीर, गुरांचा व्यापारी, चाबुकस्वार, इंजिनियर व लोखंडाचें काम करणारा, घोड्याचा व्यापारी व दलाल आणि सैन्यांत हरएक प्रकारची नोकरी करणारा होतो.

बुध.—लेखक, ग्रंथकर्त्ता, हिशोबी, शिक्षक, बुकसेलर, कागदांचा व्यापारी, वर्षासन अगर नेमणूक घेऊन राहणारा.

शुक्र.—दारूच्या कामांत असणारा, कपडे, सुगंधी पदार्थ व फुलें विकणारा, नाटकांत पार्ट करणारा, अलंकार अगर दागदागिने विकणारा अगर तयार करणारा.

मंगळ.—शिपाई, लोखंड व अग्नि यांसंबंधी नेहमीं कामें करणारा, आचारी, खाटीक, आरमार तयार करणारा, सुतार इ०

गुरु.—वकील, मसलतदार, भक्त, साधु, अंमलदार, न्यायाधीश व लोकांचा पुढारी.

शनि.—छापखान्याचा मालक अगर त्यांत नोकर, शेतकीचें व बागायतीचें काम करणारा, देवालयांतील नोकर व कधीं कधीं ईश्वरभक्त.

हर्शल.—ज्योतिषी, जुन्या गोष्टींचा माहीतगार, चित्तवेधक पदार्थांचा व्यापारी, आश्चर्यजनक व असाधारण अशीं कामें करणारा.

बुध, मंगळ व शनि हे बलवान् असून एकत्र असतील तर तो मनुष्य चोर, लुटारू, भामट्या, बेकायदेशीर काम करणारा व बऱ्याच वाईट लोकांचा पुढारी होतो.

शुक्र, बुध व मंगळ हे एकत्र असल्यास खोदकाम करणारा, चितारी, कारागीर अशा तऱ्हेचा मनुष्य होतो.

चंद्र हा शनीनें दूषित झाला असेल तर त्या मनुष्यानें स्वतंत्र धंदा करूं नये. भागीदार असल्यास पुढारी होऊं नये. असल्या मनुष्यानें नोकरी केल्यास त्यांतच भाग्योदय होतो.

पाश्चात्य ज्योतिषी या तत्वांवरून धंद्याची कल्पना करितात. राशि व ग्रह यांचीं वरील तत्वें अनुभवाला चांगलीं येतात. तरी इतक्याच माहितीवरून धंद्याची बरोबर कल्पना करितां येत नाहीं. एखाद्या अपरिचित मनुष्याची कुंडली पाहिली असतां तीवरून तो अमुकच धंदा करील हें या माहितीनें बिनचूक सांगतां येणार नाहीं, पण ज्याचें त्यास मात्र बिनचूक अनुमान करितां येईल. आपणास फक्त निरनिराळे मार्ग दाखवितां येतील.

जर आपणास ज्योतिषशास्त्राला याच्या पुढें न्यावयाचें असेल तर प्रथम निरनिराळे धंदे करणारांच्या कुंडल्या मिळवून त्यांवरून सर्वसाधारण अशा कांहीं नवीन नियमांची त्यांत भर घातली पाहिजे. धंद्यांचे मुख्य वर्ग होतात, ते असे.—१ शेतकी, बागायती व व्याजबट्ट्याचा धंदा म्हणजे जमीन व जवळचा पैसा यांच्या साह्यानें जो उद्योग तो. २ व्यापार म्हणजे दुकानदारी. कोणताही माल खरेदी करून त्याची कोणत्याही प्रकारें विक्री करणें. ३ कारखाना यंत्रांच्या साह्यानें माल तयार करून तो विकण्याचा धंदा. ४ बुद्धिसामर्थ्यानें व कलाकौशल्यानें चालणारे धंदे. जसें.—वैद्यकी, ज्योतिष, शास्त्री, पुराणीक, वकील, घड्याळें नीट करणें, चित्रें काढणें, सुतारकाम, लोहारकाम, तांबट, कुंभार, हजाम वगैरे. ५ नोकरी. ६ भिक्षा. ७ राजा. असें धंद्यांचे मुख्य ७ वर्ग होतात. यांपैकीं कोणत्या वर्गांत कुंडली येते हें समजलें पाहिजे. ज्योतिष्यास इतका स्थूल बोध जरी झाला तरी पुरे आहे. स्थूल ज्ञान झाल्यानंतर मग सूक्ष्म होऊं शकेल. म्हणून प्रत्येक शोधकानें आपल्याजवळ या सात प्रकारच्या धंदेवाल्यांच्या कुंडल्या वर्गवारीनें संग्रहित केल्या पाहिजेत. नंतर त्यांवरून नवीन नियम बसवून ज्योतिःशास्त्राला पुढें गति दिली पाहिजे.

आजची ज्योतिषशास्त्राची स्थिति अपुरी आहे. तीवरून ज्योतिष्यास निश्चयात्मक असें कांहींच सांगतां यावयाचें नाहीं. कुंडलीवरून ज्योतिष्यास बिनचूक धंदा कळतो हा सामान्य लोकांचा समज भ्रामक आहे. त्यास फक्त अंधुक अंधुक असें ज्ञान होतें व तेंही सर्वांस हे तेंच असें नाहीं.

---

४ वकील.

[लेखक—विठ्ठल पुनाजी कुवल ज्योतिषी.]

(१) यांचा जन्म शके १७९१ श्रावण व० १३ रोजीं [illegible] लग्नीं झालेला आहे.

ज. ल.



हे एका संस्थानांत वकील आहेत. यांचे वडील एका संस्थानचे दिवाण होते; त्यांनीं चांगला लौकिक व संपत्ति मिळविली होती; हे जरी वकील आहेत, तरी वडिलांसारखी कीर्ति नाहीं, व पैसाही धंद्यांत चांगला मिळत नाहीं. यांच्यावर कांहीं वर्षांपूर्वी एक वेळ खुनाचा आरोप येऊन हे तुरुंगांतही होते. पण अखेरीस ईश्वरी कृपेनें त्या दोषांतून मुक्त झाले. यांस भावंडांचें उत्तम सुख नाहीं. यांची बी चांगली गुणी आहे. संततीचें सुख आहे, लोक प्रीति फार कमी; सार्वजनिक कामांत लक्ष फार कमी. वडिलांनीं मिळविलेल्या संपत्तीचे भोक्ते आहेत. स्वभाव साधारण. अति विक्षिप्तेचा नाद नाहीं.

(२) यांचा जन्म शके १७९१ आश्विन शु० १५ बुधवारीं सूर्योदयाच्या वेळीं आहे.

ज. ल.



हे एका संस्थानांत वकील आहेत. विद्वान साधारण; धंदाही साधारण चालतो. अंगानें सडपातळ, यांस चुलत्यास दत्तक दिले आहेत, यांचे

सखे भाऊ पांच असून ते सर्व तरतरीत व पराक्रमी आहेत, यांस संततीचें सुख उत्तम आहे. दत्तक वडिलांची स्थावर इस्टेट मिळाली. बायकोचा स्वभाव फार चांगला असून ती गुणी आहे. यांची देवतांवर जास्त श्रद्धा असून सांपत्तिक स्थिति चांगली नाहीं. लोकांत मिसळून वागणारे आहेत.

(३) यांचा जन्म शके १७९० ज्येष्ठ शु० १० रविवारीं मकर लग्नीं झाला आहे.

ज० ल०



हे एका तालुका कोर्टात वकील आहेत. यांचा स्वभाव साधा. मनमिळावू, लोकप्रिय असून मायाळू आहेत. यांच्या चुलत्यानें वडिलार्जित सर्व इस्टेट आपण घेतली. यांस कांहीं दिली नाहीं; घरांतून बाहेर काढिलें, तरी हे शांतपणानें कोणास समजू न देतां व चुलत्यास त्रास न देतां आनंदानें बाहेर निघाले आणि सुखानें संसार करून राहिले. यांचे वडील आहेत, आई नाहीं. पहिली बायको मयत. तिच्यापासून एक मुलगी आणि एक मुलगा झाला. तीं दोन्ही मुलें हयात आहेत. दुसरी बायको लग्नाची केली आहे, तिला मुलें होत आहेत. तिचा स्वभाव बरा आहे. प्राप्ति सरासरी शंभर रुपये दरमहा असेल. मित्रवत्सल आहेत, उत्पन्न आणि खर्च सारखाच पण शिल्लक कमी. सार्वजनिक कृत्यांत चांगलें लक्ष असतें. निर्व्यसनी आहेत. अति खर्चाळू नाहींत, व्यवस्थेनें खर्च करणारे आहेत.

(४) यांचा जन्म शके १७८८ फाल्गुन वद्य ११ सूर्योदयानंतर २ घ० प० २९ वेळीं झाला आहे.

ज० ल०



हे एका तालुक्यांत चांगले वकील आहेत. यांचा स्वभाव फारच उत्तम असून गोड आहे. खर्च फार नाहीं. व्यवस्थेशीरपणाचा आहे. यांस दत्तक दिलेले आहेत. स्त्रियेवर फारच प्रेम ठेवितात. यांचीं दोन लग्नें झालीं. पहिली स्त्री मयत. दुसरी हयात असून तिच्यापासून मुलें होत आहेत मुलें चांगलीं देखणीं असून गुणी आहेत. सार्वजनिक कामांत फारसे नाहींत. यांचे एक बंधु मोठे अ-म्मलदार आहेत. वडिलार्जित इस्टेट चांगली. सांपत्तिक स्थिति चांगली. प्राप्तीबद्दल फारच उत्तम आहे. अग्नीनें एक वेळ यांचें राहण्याचे घर जळालें व त्यांत त्यांची बरीच हानी झाली.

(५) ही कुंडली मुंबईतील एका प्रसिद्ध हायकोर्ट वकिलाची आहे. जन्म टाईम वगैरे मिळाला नाहीं. जशी कुंडली मिळाली तशी लिहितों. कुंडली चुकीची नाहीं.

ज. ल.



हे हायकोर्ट वकील होते. यांची पूर्वीची वडिलार्जित इस्टेट नव्हती. पण यांनीं स्वतः पुष्कळ मिळविली यांच्या नांवाच्या मुंबईत मोठ्या चाळी आहेत. त्यांचे उत्पन्न पुष्कळ येतें. स्वभाव चांगला, सार्वजनिक कृत्यांत साधारण लक्ष. संतती व संपत्ती होती. स्त्रिसुख उत्तम होतें पराक्रमानें धंदा करून त्यांत पुष्कळ फायदा करून घेतला.

(६) ही कुंडली मुंबईतील एका प्रख्यात हायकोर्ट वकिलाची आहे. हिचा टाईम मिळाला नाहीं.

कुंडली बरोबर आहे.

ज. ल.



हे हायकोर्ट वकील असून आपल्या कामांत अति प्रख्यात होते. बुद्धि अति उत्तम होती. लाखों रुपये मिळविले. बोलके अतिउत्तम, कल्पकता उत्तम. तें सुधारक होते, खाणेपिणें व वागण्यांत सुधारकपणा होता. स्त्रियांचा नाद अति होता. शत्रु पक्षास सहजी जिंकीत. यांच्या नांवाच्या मुंबईत मोठमोठ्या चाळी असून त्यांचें भाडें हजारों रुपये येत असतात. संतति अल्प. लोकांत व सरकारांत मान होता.

(७) यांचा जन्म शके १७९६ मार्गशीर्ष शु॥ १ बुधवार रात्रौ सुमारें २० घ. जन्म आहे.

ज. ल.



हे एका जिल्ह्याच्या शहरांत वकील आहेत. प्रथम हे कारकून होते. पण प्रयत्नानें वकील झाले. स्वभाव चांगला, प्राप्ती चांगली, आईबाप हयात. दोन लग्नें होऊन पहिली स्त्री मरण पावली. दुसरी हयात आहे. वडिलार्जित इष्टेट चांगला. लौकिक चांगला. सार्वजनिक कृत्यांत जास्त लक्ष. संततीचें सुख चांगलें. पित्ताची विकृती आहे. भावंडें थोडीं, संसारांत जास्त लक्ष. धातुस्थानास पीडा किंचित असते. मित्रपणास उत्तम.

(८) यांचा जन्म शके १७९४ आश्विन शु० ७ सौम्यवार श्रीसूर्योदयात

घ० १० वेळां जन्म.

जं० ल०



हे एका जिल्ह्याच्या मुख्य शहरांत चांगले वकील आहेत. यांस नेत्रविकार आहे. मागें शुक्र दशेंत डोळ्यांत फूल पडलें होतें. यांच्या बायकोस सुद्धां डोळ्यांचा विकार असून पायांनीं अधू आहे. ही दुसरी बायको. पहिली स्त्री लहान पणांत मृत्यु पावली. यांस संतति आहे. भाऊ आहेत. कुटुंब मोठें असून सर्व एकत्रांत आनंदानें आहेत घरदार वतनवाडी संतति संपत्तीनें युक्त असून मान चांगल आहे. धंद्यांत प्राप्ती चांगली आहे. मित्रसुख साधारण चांगलें.

(९) यांचा जन्म शके १८९७ वैशाख व० २ मंगळवार रोजीं श्री सूर्योदयात घ. ० प. ५

ज० ल०



हे एका जिल्ह्यांत चांगले वजनदार वकील आहेत. स्वभाव फार उत्तम. वर्तन सदाचरणाचें मित्रसुख उत्तम सरकारी मान चांगला. हे म्युनिसिपालिटीचे व्हा० प्रेसिडेंट आहेत. लोक व सरकार दोन्ही पक्षांस प्रिय आहेत, प्राप्ती चांगली आहे, पण खर्चहि जास्त आहे. आईबापांचे सुख उत्तम होतें, पण सन १९०६ सध्यें वडील मयत. आई आहे, दोन लग्नें. पहिल्या स्त्रियेपासून दोन मुलगे आणि एक मुलगी आहे दुसरी स्त्री हयात. भाऊ बहिणी आहेत. बोलके उत्तम आहेत.

(१०) यांचा जन्म शके १७७४ आश्विन शु० ११ मंदवार रोजीं सूर्योदयात घ. २३ प. १७ वेळीं झालेला आहे.

ज. ल.



हे मुंबईत हायकोर्ट वकील आहेत. पूर्वी यांचा धंदा उत्तम चाले. हल्ली प्राप्ती कमी आहे. यांचे वजन मुंबईत चांगलें असून स्नेही मोठमोठे आहेत. स्वभाव उत्तम असून दोन मुलगे उत्तम विद्वान हयात आहेत. यांची स्त्री अति सुंदर होती, ती मयत झाल्यावर यांनीं लग्न केलें नाहीं. यांच्या मनांस समाधानीं नसते, संसारीक काळजी फार. यांचें कुटुंब मोठें होतें, पण ह्रेगामुळें पुष्कळ मृत्यु पाऊन यांस दुःखभूत झालीं बुद्धि उत्तम, प्रेमालु, सभ्य, ईश्वरावर श्रद्धा. रजोगुणी स्वभाव.

(११) यांचा जन्म शके १७९७ मार्गशीर्ष शु० नंतर षष्ठी. शुक्रवार रोजीं सूर्योदयापूर्वी घ० २ प० १८ वेळीं जन्म आहे.

ज० ल०



हे एका तालुक्यांत वकील आहेत, स्वभाव मुत्सद्दी व कारस्थानीं आहे. भावंडांचें सुख आहे. मित्रलोभी असून सांपत्तिक स्थिति बरी आहे. गोत्रजांपासून भूमीच्या संबंधानें त्रास फार होतो. खर्चाच्या संबंधानें व्यवस्थेशीरपणा जास्त आहे. स्त्रीसुख साधारण चांगलें. पराक्रमी व निश्चयी स्वभाव आहे.

[१२] यांचा जन्म शके १७७७ पौष शु० ४ सूर्योदयात् घ. ४ प० ३० वेळीं जन्म आहे.

३ वकील.

(१२) यांचा जन्म शके १७७७ पौष शु० ४ सूर्योदयात् घ० ४ पळें ३० वेळीं आहे.

ज. ल.



हे प्रसिद्ध मुंबई हायकोर्ट वकील असून कांहीं वर्षें कायदे कौन्सिलांत होतें. यांचा लौकिक फार असून सार्वजनिक कृत्यांत जास्त लक्ष, सरकार जज्जांची जागा देत असतां नको म्हणाले बोलके चांगले. विलायतचा प्रवास केला. बोलके सुधारक नसून कृतीचे सुधारक आहेत. जगप्रसिद्ध मनुष्यांचे स्नेही आहेत. संतति संपत्ति, विद्या, उत्तम असून स्वभाव चांगला व मन मिळावू, आहार विहारांत धरबंद नाहीं. प्राप्ति हजारों रुपये दरमहा. शत्रु नाश होतो. मादक द्रव्यें आवडतात. बायकोचा स्वभाव जुन्या चालीचा व उत्तम असून प्रेमवत्सल आहे.

(१३) यांचा जन्म शके १८०१ आश्विन शु० १३ सूर्योदयात् घ० २७ प० ३५ वेळीं आहे.

ज. ल.



हे वयाच्या २३।२४ च्या सुमारास बी. ए. एल्. एल्. बी. होऊन वकिली करितात. व पुढील अभ्यास करितात. बाप मुनसफ असून चार पांच भाऊ इंग्रजी शिकत आहेत. स्वभाव फारच चांगला असून यांची आई मृत्यु पावली. बाप हयात. सावत्र आई आहे. बायको चांगली आहे.

(१४) यांचा जन्म शके १७९५

पौष व० १४ शनिवार रोजीं सूर्योदयात् घ० २७ प. ५७ वेळीं जन्म झाला आहे.

ज. ल.



हे एका तालुक्यांत उत्तम नामांकित वकील होते. यांची प्राप्ति उत्तम होती. कल्पना उत्तम, मन मिळावू, प्रेमळ, सरळ, बाणेदार होते. भाऊ पराक्रमी आहेत. हे सन १९०६ सालांत धातुक्षयाच्या विकारानें मरण पावले. दोन वर्षां पूर्वी यांची बायको बाळंतपणांत मेली. हे नेहमीं सीक असत यांचीं सर्व मुलें मरण पावलीं. यांस सासऱ्याकडील इष्टेट हक्कानें मिळाली. स्वार्जित पुष्कळ मिळविली. दुसरें लग्न केलें नाहीं. विम्याचे तीन हजार रुपये मिळविले.

(१५) यांचा जन्म शके १७९६ फाल्गुन शु० १ रोजीं वृश्चिक लग्नीं झाला आहे.

ज. ल.



हे पूर्वी एका शहरांत प्रसिद्ध वकील होते. कीर्ति चांगली होती स्वभाव उत्तम, मन मिळावू आणि गोडा, सर्वांशीं सारखे. धंद्यांत लाभ उत्तम होतो. पण हल्लीं ते एका प्रांतांत मुनसफ आहेत, न्यायाच्या कामांत उत्तम आहेत, सदाचरणी असून आईबापांचें सुख उत्तम, पूर्वीची गरिबी होती, आतां स्थिति उत्तम आहे. संतति चांगली आहे. पण बायकोपासून यांस फार त्रास होत असतो. बायको कजाग आहे. हे शांत आहेत. हे सार्वजनिक कामांतून अलग असतात. विद्याव्यासंगी आहेत.

---

(२)

वि. वि.—वर्ष ७ च्या कुंडली विज्ञानच्या २ व ३ अंकांत रा. कुबलज्योतिषी यांचेकडून कांहीं वकीलाच्या योगाच्या कुंडल्या आल्या होत्या. परंतु त्या अंशात्मक नसून कित्येकांचा तर स्पष्ट जन्मकाल न देतां नुसते आंकडे भरून पाठविल्या होत्या. भाव. चलितांचा तर पत्ताच नाहीं वे उपपत्तीचा मागमूसही नाही. अशा कुंडल्यांपासून तादृश उपयोग नाहीं हें उघड आहे.

आज कांहीं प्रसिद्ध हायकोर्ट वकिलांच्या विश्वसनीय सायन भावचलित कुंडल्या वकिलीच्या योगाच्या उपपत्तीसह पाठवीत आहें. त्याला स्थळ मिळेल अशी आशा आहे. याकुंडल्यांचे इतर अनुभवही तंतोतंत मिळवून पाहिले असल्यामुळें याच्या खरेपणा विषयीं बिलकूल संशय नाहीं.

(१)



लग्नदशमाचा अधिपति बुध हा वाणीकारक ग्रह असून तो भाग्यस्थानीं स्वगृहीं आहे. त्यामुळें हे गृहस्थ उत्तम वक्ते आहेत. लाभस्थानीं चतुर्थदशमाचा अधिपति गुरु हा उच्च असून तो व्यवसायधनाचा अधिपति शुक्र यांच्या पूर्ण युतींत असल्यामुळें पूर्वीची स्थिति चांगली असून स्वतःची प्राप्ति दरमहा एक हजार रुपयांच्या वर आहे! नवमांतील रवि व दशमाधिपति बुध हे हर्शलनें दूषित झाल्यामुळें सरकारी नोकरी देऊं केली असतां योग आला नाहीं. निरयन कुंडलींत हा अनुभव इतका चोख मिळत नाहीं.

(२)



लग्न–मिथुन २८	सुत–तूळ २१	भाग्य–कुंभ १८
धन–कर्क २१	रिपु–वृश्चिक २२	दशम–मीन १८
सहज–सिंह १८	जाया–धनु २८	लाभ–मेष २१
सुख–कन्या १८	मृत्यु–मकर २२	व्यय–वृषभ २२
रवि–कर्क २०	गुरु–कन्या २६	हर्शल–सिंह १०
चंद्र–कर्क २।३०	शुक्र–सिंह २६	
मंगळ–कर्क १८	शनि–वृषभ १३ व	
बुध–सिंह ९ व	राहू–वृषभ २	

येथेंही लग्नस्वामी बुधच असून तो द्वितीयांत म्हणजे वाक्स्था-

नांत आहे. दशमाधिपति गुरू असून तो बुधाच्या गृहीं चतुर्थांत आहे व दशमावर पूर्ण दृष्टीनें पाहतो. भाग्यस्थानीं शनि हा कार्यधाचा कारक ग्रह कुंभ या शास्त्रीय राशींत स्वगृहीं आहे.

बुध हा वरील कुंडलीप्रमाणेंच हर्शलानें दूषित झाल्यामुळें नोकरी टिकली नाहीं. शनि हा भ्रमणानें भाग्यस्थानीं आल्यावर मुनसफीची नोकरी धरिली. परंतु तो दशमांत नीचींचा होऊन आल्याबरोबर २ वर्षांतच अधिकाऱ्यांशीं तंटा होऊन सुटली. आतां हे गृहस्थ वकिलीच करितात. (३)



लग्न–धनु २९	सुत–वृषभ ८	भाग्य–कन्या ९
धन–कुंभ ०	रिपु–मिथुन ४	राज्य–तूळ ९
सहज–मीन ५	जाया–मिथुन २८	आय–वृश्चिक ८
सुख–मेष ९	मृत्यु–सिंह ०	व्यय–धनु ४
रवि–मेष १०।२१	गुरु–तूळ २९ व	राहू–मेष १८।३०
चंद्र–मकर १४।२५	शुक्र–कुंभ २७।९१	हर्शल–सिंह १२व
बुध–मीन १३।२७	शनि–कुंभ २३	

मकर रास लग्नीं लुप्त झाल्यामुळें वरील कुंडली मकर लग्नापासून मांडली आहे व तींत चलित कुंडलीप्रमाणेंच ग्रह बसतात.

लग्नस्वामी गुरु हा दशमांत आहे, नवमाचा स्वामी बुधच आहे. द्वितीय म्हणजे विद्यास्थानांत कार्यधाचा ग्रह शनि हा कुंभेंत स्वगृहीं आहे व तोंच पंचमेश शुक्राशीं युति करितो, लग्नस्वामी गुरु

आणि भाग्यविद्यास्वामी शनि व पंचमेश शुक्र यांच्यांत नवपंचम योग झाला आहे. द्वितीय स्थानांत शनि असल्यामुळें हे बोलतांना थोडे अडखळतात. (४)



लग्न--मकर१२ सुत--वृषभ २० धर्म--कन्या १८
धन- कुंभ १४ रिपु--मिथुन १६ कर्म--तूळ २२
सहज--मीन १८ जाया- कर्क १२ आय--वृश्चिक२०
सुख--मेष २२ मृत्यु- सिंह १४ व्यय--धनु १६
रवि--वृषभ १७ बुध--मिथुन १ व राहू--तूळ ७
चंद्र--कन्या १५ गुरु--कर्क २४
मंगळ- सिंह शनि--मिथुन ९

लग्न व वाक्स्थानाचा स्वामी शनि असून तो पंचम म्हणजे विद्यास्थानीं भाग्यस्वामी बुध या वाणीकारक ग्रहानें युक्त आहे. दशमांत राहू असल्यामुळें सरकारी नोकरी मिळणें शक्य आहे, तरी करण्याचा इरादा नाहीं. (५)



लग्न--मिथुन २३ सुत तूळ १७ धर्म--कुंभ १४

धन--कर्क १८ रिपु--वृश्चिक २१ कर्म- मीन १४
सहज--सिंह १४ जाया--धनु २३ आय- मेष १७
सुख--कन्या १४ मृत्यु--मकर १८ व्यय वृषभ २१
रवि--तूळ ६ बुध--कन्या २१ शनि--मिथु २४
चंद्र--मकर २२ गुरु--सिंह २७ राहू--तूळ १५
मंगळ--वृश्चिक १० शुक्र--सिंह २१ हर्शल--कन्या२९

लग्नचतुर्थाचा स्वामी बुध हा बुद्धिदर्शक ग्रह मुखस्थानीं उच्च आहे. भाग्यस्वामी शनि हा कायद्याचा ग्रह लग्नीं मिथुन या बुध-गृहीं मित्रक्षेत्रीं आहे, व त्याच्यांत आणि बुधांत केंद्रयोग आहे.

(६)



लग्न--मिथुन १+३८ सुत--कन्या २२ धर्म--मकर २३
धन--मिथुन २८ रिपु- तूळ २७ कर्म--कुंभ २१
सहज--कर्क २३ जाया--धनु १ आय--मीन २२
सुख सिंह २१ मृत्यु--धनु २८ व्यय--मेष २७
रवि--कुंभ २३ बुध--मकर २८ राहू--कुंभ २३
चंद्र--मिथुन ४।२९ गुरु- मकर २३ हर्शल -सिंह२८
मंगळ--वृषभ ६ शनि--मीन १९ शुक्र--मीन३ व.

भावचलितांत बुधशुक्र नवमांत व रविराहू दशमांत बसतात. लग्न, वाक्स्थान व पंचम या तिहींचा स्वामी बुध हा ग्रह असून भाग्य व दशम यांचा अधिपति शनि हा कायद्याचा कारक ग्रह लाभभावारंभींच आहे. व दशमांत शुक्र उच्च आहे.

हे गृहस्थ १० वर्षांपूर्वी २९ रु. दरमहावर होते. परंतु अधिकाऱ्यांशीं खटका उडून नोकरी सोडली व पुढें अभ्यास करून वकील झाले. प्राप्ति दरमहा ४०० रुपयेपर्यंत आहे.

दशमांत शनिगृहीं रवि व राहू आहेत. त्या रवीवर हर्शल पूर्णपणें पाहतो. त्यामुळें सरकारी अधिकाऱ्यांशीं तंटा झाला हें साहजिकच झालें. २९ रुपयांचा कारकून एवढ्या योग्यतेला येण्याचें कारण नवमांतील बुधगुरु होत हें उघडच आहे.

(७)



लग्न–मीन १२	सुत–कर्क १९	भाग्य–वृश्चिक २८
धन–मेष २८	रिपु–सिंह १७	कर्म–धनु २४
सहज–वृषभ २८	जाया–कन्या २२	आय–मकर १९
सुख–मिथुन २४	मृत्यु–तूळ २८	व्यय–कुंभ १७
चंद्र–सिंह १५	गुरु–धनु २ व	राहू–मीन २८
मंगळ–वृषभ २५	शुक्र–वृषभ २८	हर्शल–सिंह १७
बुध–मीन २७	शनि–मीन ३	

लाभस्वामी शनि व चतुर्थेश बुध हे एकाच राशीवर आहेत. बुध लग्नीं आहे. दशमाधिपति गुरु असून तो भाग्यस्थानीं स्वगृहीं आहे. लाभस्वामी शनि व्ययस्थानीं व लग्नीं बुध नीच असल्यामुळें प्राप्ति बेताचीच आहे.

(८)



लग्न–कुंभ १६	सुत–मिथुन २२	धर्म–तूळ २७
धन–मीन २४	रिपु–कर्क १८	कर्म–वृश्चिक २७
सहज–मेष २७	जाया–सिंह १६	आय–धनु २२
सुख–वृषभ २७	मृत्यु–कन्या २४	व्यय–मकर १८
चंद्र–मिथुन ०	शुक्र–धनु १०	हर्शल–वृषभ १७
मंगळ–तूळ १०	शनि–मिथुन २४ व	
गुरु–मिथुन ४	राहू–वृषभ ०	

लग्नस्वामी शनि हा कायद्याचा ग्रह पंचमांत म्हणजे विद्यास्थानीं बुधाच्या गृहीं आहे. लाभस्वामी गुरु हा लग्नीं चंद्रानें युक्त आहे व त्यांत आणि लग्नस्वामींत केंद्रयोग आहे. दशमांत गुरूच्याच घरीं शुक्र आहे. * * *

वरीलप्रमाणें प्रतीति पाहून व अनुभव घेऊन सोपपत्तिक कुंडल्या पाठविल्या आहेत. त्यांत सायनानें जसा चोख अनुभव मिळतो तसा निरयनानें केव्हांही मिळणार नाहीं. शास्त्रीय उपपत्तीची सत्यता कसोटीला लावण्यास देखील वरील कुंडल्या भक्कम पुरावा आहेत हें कोणीही कबूल करील.

वरील अनुभवावरून असें निष्पन्न होतें कीं, शनि हा कायद्याचा दर्शक ग्रह, बुध हा बुद्धि व वाणीकारक ग्रह आणि गुरु हा विद्येचा कारक ग्रह यांच्या शुभ संमेलनानें अथवा पारस्पर्यानें लग्न, नवम, दशम व पंचम या स्थानरूपी शुभ संमेलनानेंच वकील उत्पन्न होतात. कळावें लोभ असावा हे वि. आपला

एक 'वकील' बी. ए. एल् एल् बी.

वर्षतु पर्जन्याः

सांप्रतच्या कोणत्याही निरयन पंचांगांत सायनाचे दोन पुरावे अद्यापि सर्व निरयनवाद्यांनां कायम ठेविले आहेत. १ ला, मकरसंक्रमण आणि उदगयनारंभ यांची सांगड. २ रा, आर्द्राप्रवेशफल. हे दोनही प्राचीन (शके ४४४ च्या पूर्वी) कालीं प्रलित असलेल्या सायन पद्धतीचे साक्षीदार अद्यापि आहेत. यांपैकीं ज्यो. केतकरांनीं पहिला साक्षीदार फोडला आहे! तरी पण दुसरा साक्षीदार अद्यापि त्यांना फितला नाहीं, ही आनंदाची गोष्ट आहे.

आर्द्राप्रवेशफल हें सायन रवीवरून पहावयाचें आहे. आर्द्रानक्षत्रांत रवीनें प्रवेश केला म्हणजे पर्जन्यकालाला आरंभ होतो. म्हणून त्याच्या शुभाशुभ वेळेवरून पावसाचें निदान करण्याची हिंदु ज्योतिष्यांची पद्धत आहे. हें नक्षत्र सायन आहे असें मानण्यास खालील कारणें आहेत—

१ लें–निरयन आर्द्रा नक्षत्रावर आज पर्जन्यारंभ नाहीं, व सदासर्वकाल होणेंही शक्य नाहीं. कारण, संपात चल आहे. त्यामुळें निरयन गणनेंत पर्जन्यारंभ मागें मागें येत जाणार. आज तो रोहिणींत आला आहे. म्हणून निरयनवाद्यांनीं आपल्या पंचांगांत **'रोहिणी प्रवेशफल'** वास्तविक दिलें पाहिजे. कालांतरानें **'कृत्तिका प्रवेशफल'** ही देण्याचा प्रसंग येईल. ६०० वर्षांपूर्वी मृगामध्यें पर्जन्यारंभ होत होता व शके ४४४ ला आर्द्रावर पर्जन्यारंभ होता. या वेळीं सायन व निरयन आर्द्रानक्षत्रविभाग एकच होते. एका नक्षत्राचा फरक पडण्यास साडेसहाशें पासून आठशें वर्षांचा काल जावा लागतो. व सुमारें ५० ते ६० पर्यंत वर्षांनीं एक दिवस मागें पर्जन्यारंभ होतो.

२ रें–आर्द्रा हें नांव सार्थ आहे. हें आकृतीवरून दिलेलें नाहीं. ज्या नक्षत्रांत सूर्यानें प्रवेश केला म्हणजे हवा आर्द्र होते तो नक्षत्र विभाग आर्द्रासंज्ञक होय. अर्थात् तो चिरकाल अबाधित आहे. म्हणून तो सायनविभागाशिवाय असणें शक्य नाहीं.

३ रें.–

आर्द्रादौ दशस्त्रीणां विशाखास्त्रीनपुंसका।
शेषाश्चतुर्दशपुरुष एवमृषिभिः प्रयुज्यते॥

यांत आर्द्रापासून दहा नक्षत्रें स्त्रीसंज्ञक आहेत, विशाखांपासून तीन नक्षत्रें नपुंसक आहेत व बाकीचीं १४ पुरुषसंज्ञक आहेत असें स्पष्ट सांगितलें आहे. हीं नक्षत्रें निरयन आहेत असें म्हणतां येत नाहीं. प्रसूति स्त्रियांनाच होते, पुरुषांना झाल्याचें निरयन वाद्यांस माहीत असल्यास न कळे! रोहिणी व मृग हीं पुरुष-नक्षत्रें आहेत, त्यांस प्रसूति होणें अशक्य आहे. अर्थात् पर्जन्यारंभ आर्द्रापासून असून त्यापासूनच दहा नक्षत्रें पावसाचीं आहेत व तीं सायनच आहेत असें सिद्ध होतें.

४ थें–आर्द्रा हें नांव विभागाचें आहे, नक्षत्रपुंजाचें नाहीं. निरयन विभाग घेतला तरी त्यांत या नांवाचा नक्षत्रपुंज नाहीं, तो वरील विभागाच्या मागें आहे! अर्थात् नक्षत्रपुंजांचा आणि त्या नांवाच्या विभागाचा कांहीं संबंध नाहीं. म्हणून आर्द्रा हें नांव निरयन विभागाचेंच आहे असें म्हणण्यास आधार नाहीं.

५ वें–याच नक्षत्राला "रौद्र" असें म्हटलें आहे. अर्थावरून याची उपपत्ति लावूं लागल्यास पर्जन्यारंभीं मोठालीं वादळें, विजांचा लखलखाट, मेघांचा गडगडाट हीं लक्षणें मनुष्यमात्रास व सर्व प्राण्यांस भयभीत करून रडवणारीं आहेत म्हणून या विभागाला रौद्र म्हणजे रुद्र जो लयकर्ता शंकर त्याचें निवासस्थान अशा अर्थानें नांव दिलेलें आहे. हें नांव सायन विभागालाच चिरकाल अबाधित असें योग्य आहे.

वरील पांच कारणांनीं पावसाचा आरंभ सायन आर्द्रावर व्हावयाचा व त्या नक्षत्रापासून दहा नक्षत्रें पावसाचीं आहेत या गोष्टी सिद्ध होतात, म्हणून हीं नक्षत्रें या वर्षी केव्हां निघतात तें खालीं सांगितलें आहे.

सायन आर्द्रा.

हें नक्षत्र ता. २८।२९ मे शनिवार मिती वैशाख कृष्ण ४ या दिवशीं रात्रीं ३ वाजून ९ मि. नीं निघतें. याचा प्रवेश भरतीवर झाला आहे.

चंद्र दक्षिण गोलार्धांत भ्रमण करणार आहे. त्यामुळें पक्की वरसात गुदस्त सालाप्रमाणें २ जूनला न होतां ७ जूनच्या सुमाराला व्हावी असें अनुमान होतें. पृथ्वीनें धूमकेतूच्या पुच्छांतून नुकतेंच गमन केल्यामुळें हें नक्षत्र लागण्याच्या पूर्वीच हवेंत मोठा फेरफार होण्याचा व त्यामुळें वादळें आणि पाऊस पडण्याचा विशेष संभव आहे.

आर्द्रा याति रविस्त्वन्हि जलान्नक्षयकारकः ॥
जगत्क्षेमकरौ बहुसस्यजलप्रदः ॥

हें नक्षत्र रात्रीं निघत आहे, त्याचें फल जगाला क्षेम व धान्योत्पत्ति आणि पाऊस यांची विपुलता प्राप्त होईल असें आहे.

या वर्षी शनि कृत्तिका नक्षत्रांत आहे, त्याचें फल—

कृत्तिकांच गतः सौरिरशेषाणि धनानिच ॥
सुभिक्षं भवते तत्र काष्ठे लाभश्चतुर्गुणः ॥

यावरून या नक्षत्रतला शनि सुभिक्ष करील असें वाटतें. गुरुपुढां तूळ राशींत असल्यामुळें सुभीक्ष उत्पन्न करणारा आहे. यावर्षी पावसाचें मान बरें राहील इतकेंच नाहीं तर गुदस्त सालापेक्षां तो अधिकच कोसळेल असें वाटतें.

१ सायन पुनर्वसु—ता. ११।१२ जून रात्रीं १ वाजून २९ मि.
३ सायन पुष्य—ता. २५।२६ जून रात्रीं १२ वाजून ४८ मि.
४ सायन आश्लेषा—ता. ९ जुलई रात्रीं १२ वाजून १३ मि.
५ सायन मघा—ता. २३ जुलई रात्रीं ११ वाजून ४७ मि.
६ सायन पूर्वा—ता. ६ आगष्ट रात्रीं १० वाजून ७ मि.
७ सायन उत्तरा—ता. २० आगष्ट रात्रीं ७ वाजून ३४ मि.
८ सायन हस्त—ता. ३ सपटंबर दुपारीं २ वाजून ३० मि.
९ सायन चित्रा—ता. १७ सपटंबर सकाळीं ७ वाजून ५२ मि.
१० सायन स्वाती—ता. ३० सपटंबर रात्रीं १० वाजून २४ मि.

या वर्षी पावसाचें मान जून व जुलईत फारच दिसतें. आगष्ट मध्यें कमी पडेल. व सपटंबरमध्यें फारच कमी पडेल असा संभव आहे.

डॉक्टर.

वकिलीप्रमाणेंच हाही धंदा कुंडली वरून कळण्यासारखा आहे. लग्न, चंद्र, दशम, मंगळ, वृश्चिक राशि आणि दशमांतील ग्रह इतक्यांच्या धोरणानें या धंद्याचें अनुमान करावें लागतें. वृश्चिक हा राशि रसायनिक द्रव्यें व विषारी (पायझन्) पदार्थ यांचा द्योतक आहे, म्हणून डॉक्टरी धंद्याला या राशीची आवश्यकता विशेष आहे. लग्न, दशम, चंद्र किंवा मंगळ यांपैकीं एक अथवा अनेक सायन वृश्चिक राशींत अथवा कुंडलीविज्ञानांत मागें जें अंशवर्णन केलें आहे त्यांपैकीं जे अंश या राशीच्या गुणाचें आहेत. त्या अंशांत असल्यास मनुष्य डॉक्टर होतो. ही गोष्ट कांहीं उदाहरणें देऊन दाखवितों. **उदाहरण १ लें**

जन्म—ता. २७ मार्च्य सन १८८४ रात्रीं ९ वा. ३९ मि.



या कुंडलींत लग्न वृश्चिक राशींचें आहे. व तें २६ व्या अंशांत उदित आहे. पण, वास्तविक तें २५ व्या अंशांतच पाहिजे. एक अंशाच्या चुकीनें जन्मकाल असूं शकेल हें उवड आहे. मंगळ सिंह राशींत चवथ्या अंशांत आहे. हे अंश वृश्चिक राशीच्या गुणाचे आहेत. दशम केंद्राचा अधिपति रवि असून तो मेष राशींत आठव्या अंशांत आहे, हेही अंश वृश्चिक राशीच्या गुणाचेच आहेत. येथें लग्न, लग्नाधिपति व दशमाधिपति वृश्चिक राशीच्या गुणाचे झाल्यामुळें हे डॉक्टर होणार आहेत.

या शिवाय या कुंडलींत एक चमत्कार आहे. तो असा कीं, चतुर्थ केंद्राचा अधिपति शनि हा मिथुन या शास्त्रीय राशींत सहाव्या अंशांत आहे, हा अंश वृश्चिक गुणाचाच आहे! व सप्तम केंद्राचा अधिपति जो शुक्र तो स्वगृहीं विसाव्या अंशांत आहे, ह्मणजे वृश्चिक गुणांतच आहे! याप्रमाणें चारही केंद्रांचे अधिपति जे मंगळ रवि व शनि, शुक्र ते वृश्चिकांशांत आहेत, ह्मणून या मनुष्याचा जन्म डॉक्टरी धंदा सुचवितो असें सिद्ध होतें. **उदा० २ रें**

जन्म—ता. १९ फेब्रुवारी सन १८५२ रात्रीं १२. ३१ मि.



या ठिकाणीं वृश्चिक राशि हा चंद्राच्या दशमांत पडला आहे व त्या राशींत लग्न व चतुर्थ या दोन केंद्रांचा अधिपति जो गुरु तो तेविसाव्या अंशांत आहे. हे अंश कन्येच्या गुणाचे ह्मणजे हस्तकलाकुशल असे आहेत. याशिवाय दुसरा योग दिसत नाहीं. ह्मणून पहिल्या कुंडलीवरून जसें आपणास बिनचूक अनुमान बांधतां आलें, तसें येथें बांधतां येणार नाहीं. यासाठीं आपणास आणखी जास्त विचार केला पाहिजे.

डॉक्टरी धंद्यांत जसा वृश्चिक राशि प्रधान आहे तसेच अग्निराशि सुद्धां प्रबल आहेत. भाजणें, कापणें वगैरे गुण अग्निराशींत आहेत, ह्मणून ज्याप्रमाणें आपण वृश्चिक राशीचा विचार केला, तसाच अग्निराशींचाही केला पाहिजे. चंद्र कुंभ या शास्त्रीय राशींत असून तो २८ व्या अंशांत आहे. हे अंश मेष राशीच्या गुणाचे आहेत. ह्मणून चंद्र हा अग्निराशीचे गुणाचा दर्शक आहे. मंगळ हा कर्क राशीच्या २६ व्या अंशांत आहे. हे अंश सिंह राशीचया गुणाचे आहेत. सिंह हा अग्निराशि आहे. लग्न धनु या अग्निराशींतच आहे, तें तिसऱ्या अंशांत आहे त्या ठिकाणीं ९ व्या अंशांत पाहिजे, याबद्दल शंका नाहीं. याप्रमाणें लग्न, चंद्र व मंगळ हे अग्निराशीच्या गुणाचें आहेत. ह्मणून हे गृहस्थ डॉक्टर झाले. हे मुंबईतले नामांकित डाक्टरांपैकीं एक आहेत.

उदाहरण ३ रें.

जन्म ता. १६ नवंबर सन १८८२ रात्रीं ३ वा. ३३ मि.



या कुंडलींत विद्या (दुसऱ्या) स्थानीं वृश्चिक राशि असून मागील उदाहरणाप्रमाणेंच चंद्राच्या दशमांत आहे व त्याचे १८ अंश लग्नांत आहेत. या राशींत रवि, राहू व बुध असे तीन ग्रह आहेत. यांत रवि २९ व्या अंशांत आहे, ह्मणून ७ व्या अंशांत शिंहांशांत आहे. व मंगळ धनु या अग्निराशींत आहे. लग्न चवदाव्या अंशांत उदित पाहिजे. याप्रमाणें येथें स्पष्ट योग आहेत, ह्मणून हे गृहस्थ डॉक्टर झाले.

उदाहरण ४ थें

जन्म—ता. ४ मे सन १८८२ रात्रीं ८।३९



ल. धनु १९ रवि—वृषभ १४।२ गुरु—मिथुन २।४८ चं.-वृ.२९।३८
रा.धनु०।४४श.—वृषभ १९।२६शु.-मिथुन २।१९
बुध-वृषभ १६।४८ मंगळ—कर्क २७।५६
नेप्—वृषभ १६।११ हर्शल=कन्या १४।३३ व

या उदाहरणांत चंद्र वृश्चिक राशींत तिसाव्या अंशांत आहे. हर्शल हा कन्येंत असून वृश्चिकांशांत आहे. गुरु शुक्र हे मिथुन राशींत सिंहांशांत आहेत, यांत गुरु हा लग्नेश आहे. या कुंडलींतें मंगळ बलहीन आहे. या गृहस्थांचा धंदा नीटसा चालत नाहीं, कारण, अग्न्यंशांत नाहीं.

उदाहरण ५ वें.

जन्म—ता० २८ डिसेंबर १८७९ सकाळीं ७ वा. ५७ मि.



लग्न—मकर २६।६ मंगळ—वृषभ १३।५४ हर्शल—कन्या ८।५६व.
गुरु—मीन ८।२२ नेप्च्यून—वृषभ ९।३९ व शुक्र—वृश्चिक २०।३७
शनि—मेष ९।११ चंद्र—मिथुन— २८।२८ बुध—धनु ११।३२
रवि—मकर ५।५६ राहु-मकर १६।१०

या कुंडलींत कुंभ राशि लग्नांत पूर्ण आहे, ह्मणून या राशीपासूनच कुंडली मांडली आहे. दशमांत वृश्चिक राशि आहे. चंद्राच्या दशमांत गुरु आहे व तो मीन राशींत ९ व्या अंशांत आहे, ह्मणजे वृश्चिकांशांतच आहे. लग्नस्वामी मेष या अग्निराशींत आहे. या प्रमाणें या गृहस्थांस डॉक्टरीचे योग झालेले आहेत.

उदाहरण ६ वें.

जन्म—ता. ९ फेब्रुवारी सन १८७२ प्रातः ९ वा. नंतां



लग्न--मकर २०।३९ रवि--कुंभ १९।३४ हर्शल कर्क २८।३४ व
बुध- ,, २३।९ मंगळ—मीन ९।४३ गुरु- ,, २२।१७ व
शनि- ,, १६।४ नेप्—मेष २१।३७ चंद्र-धनु १२।८
शुक्र- ,, ९।५० राहू- मिथुन १८।९०

या कुंडलींत तृतीय स्थानीं मेष राशि पूर्ण आहे, ह्मणुन कुंभ राशीपासून कुंडली मांडिली आहे. दशमारंभीं वृश्चिक राशि २ अंश उदित आहे. मंगळ मीनेंत दहाव्या अंशांत आहे. ह्मणजे धनांशांत आहे. चंद्राचा दशमाधिपति बुध हा मकर राशींत २४ व्या अंशांत आहे, ह्मणून तोही दशमांतच आहे. धनु हा अग्नि-राशि असून त्यांत लग्नचंद्रांचे दशमाधिपती आहेत. याप्रमाणें या गृहस्थांस डॉक्टरीचे योग झाले आहेत. **उदा० ७ वें.**

जन्म—ता० १ अक्टंबर सन १८७८ पहांटेस ३ वा ५९ मि.



लग्न—कन्या १०।३३ रवि—तूळ ८।३८ ने.-वृषभ ९।१२ व
मंगळ-- ,, ४। ८ चंद्र—धनु२२।१३

हर्शल- ,, २।१४ गुरु--मकर २७।२६
शुक्र-- ,, २२।२२ राहू—कुंभ १०।७
बुध- ,, २२।२८ शनि--मीन२८।४५ व

या कुंडलींतलें लग्न १५ व्या अंशांत उदित असलें पाहिजे. हे गृहस्थ एम. डी. च्या परीक्षेस जाणारे आहेत. या कुंडलींत चतुर्थ स्थानीं धनु राशींत चंद्र आहे. पराक्रम स्थानीं वृश्चिक राशि उदित आहे, त्याचा डॉक्टरीशीं संबंध पोहोंचत नाहीं. चंद्राच्या दुसऱ्या स्थानांत गुरु आहे, तो मेषांशीं आहे व चंद्राच्या दशमांत बुध, शुक्र, व मगळ हे चार ग्रह आहेत. त्यांत बुध व शुक्र यांची युति आहे व तिचा चंद्राशीं बरोबर केंद्रयोग झालेला आहे. या चार ग्रहांपैकीं हर्शल मात्र अग्न्यंशांत आहे. कुंडलींत दिसेला योग चांगलें झाले आहेत व ती मोठ्या हुद्याच्या मनुष्यास शोभेशी आहे इतकें आपणास सहज कळतें; पण त्याने डॉक्टर च व्हावें हें निश्चयात्मक कळत नाहीं. ही कुंडली एल्. एल्. बी. लाही अनुकूळ आहे. **उदाहरण ८ वें**

जन्म—शके १८०३ चैत्र शु० ७ बुधवार घ० २४।३२



लग्न—कन्या ११।३४ मगळ--मीन २।२१ ने.-वृषभ १३। ०
हर्शल- ,, १०।२० रवि—मेष १६।१९ शुक्र- ,, २०।४४
राहु—धनु २१।३३ गुरु-- ,, २८।४३ चंद्र-कर्क १४।३१
बुध—मीन १९।१३ शनि- वृषभ ०। ५

याहीं कुंडलींत पराक्रम स्थानीं वृश्चिक रास आहे. चंद्र कर्क राशींत आहे. मेष या अग्निराशींत रवि आणि गुरु हे ग्रह आहेत यांत रवि सिंहांशांत आहे व गुरूही सिंहांशात आहे. याशिवाय

दुसरा योग झालेला नाहीं. ह्मणून ही कुंडली बिकट आहे. चंद्राच्या दशमांत हे रवि व गुरु असून मेष राशींत सिंहांशीं आहेत, इतक्या-वरूनच हे गृहस्थ डॉक्टर आहेत हें ठरविणें कठीण आहे **उ०९वें.**

जन्म—शके १८०४ आश्विन कृ० ३ रविवार घ०३०।३२



लग्न-वृषभ २०।१२ गुरु--कर्क १।१६ राहू—वृश्चिक२१।१९
ने.— ,, १७।४९ व हर्शल-कन्या २१.४९मंगळ ,, १८।१२
शनि--,, २४। १ बुध--तूळ २३–२६ रवि ,, ६। २
चंद्र--मिथुन १९।२१ शुक्र--धनु १६।४५

या कुंडलींत मात्र वृश्चिक राशींत राहु मंगळ व रवि इतके तीन ग्रह आहेत. चंद्राचा दशमाधिपति गुरु हा कर्क राशींत सिंहांशीं आहे. इतकाच योग येथें डॉक्टरीचा झालेला आहे. तथापि ही वरून थोडा तरी धंद्याचा बोध होतो.

हे गृहस्थ एल् एम्. एन्ड एस् असून विलायतेस एल्, आर,सी,पी, झाले आहेत. या कुंडलींत एक चमत्कार आहे तो असा कीं, यांची पत्नी सुद्धां एल् एम. एन्ड एस् झालेली आहे व ही गोष्ट ही कुंडली स्पष्ट दर्शविते. कारण, जायास्थानीं वृश्चिक राशि असून त्या राशींत रवि. मंगळ व राहू हे तीन ग्रह आहेत.

बारा राशींत कन्या हा एकच राशि हस्तकौसल्याचा दर्शक आहे. ह्मणून ज्या डाक्टरांस हा राशि अनुकूल असेल ते फाडणें कापणें व शिवणें या कामांत मोठे पटाईत असतील. वृश्चिक राशि बलवान् असेल तर ते औषधीक्रियेंत निपुण असतील. मंगळ बलवान् असेल तर ते उत्तम सर्जरी करितील. कुंभ राशि बलवान् असेल तर चिकि-त्सेच्या कामांत त्याची बुद्धि विशेष चालेल. गुरु बलवान् असेल तर त्यांच्या हाताला उत्तम यश असेल.

शेतकी, बागायत, जिराईत

इत्यादि गोष्टींचा

फलज्योतिषदृष्ट्या विचार.

[लेखकः—यशवंत केशव प्रधान.]

प्रत्येक गोष्टीला हंगाम असतोच किंवा प्रत्येक कार्यास विवक्षित काळ असलाच पाहिजे. जन्मकाळ, मृत्युकाळ, लाभकाळ, हानिकाळ, पेरणीचा काळ, लढाईचा काळ इ० याप्रमाणें विश्वांतील चराचर गोष्टी सर्व कालाधीन आहेत. या कालाचा महिमा अगाध आहे ह्मणूनच जो मनुष्य कालाच्या अनुरोधानें आपलें वर्तन ठेवितो त्यास प्रश्चात्तापाचा प्रसंग क्वचित्च येईल. याप्रमाणें या कालाची महती प्राचीन आर्यांस पूर्ण माहीत होती. कालाचें ज्ञान होण्यास ज्योति-षशास्त्र हाच राजमार्ग होय व ह्मणूनच आपल्या पूर्वजांनीं या शास्त्राची महती गाइली व यास वेदाचें चक्षुत्व दिलें. ग्रह व तारे अमुक स्थितींत असतां अमुक कार्में करावीं हें ज्योतिःशास्त्रच शिक-वितें. या सर्व गोष्टी अनुभवानें ठरवावयाच्या असतात परंतु हें काम आज आह्मांस नवीनच केलें पाहिजे असें दिसत नाहीं. कारण, पूर्व ऋषींनीं हें काम बहुतेक अंशीं करून ठेविलें आहे. आतां फक्त आह्मांस त्या नियमांचा अनुभव घेऊन स्वार्थी लोकांनीं ज्या गोष्टी घुसडविल्या आहेत त्या काढून टाकणें आहेत. व पूर्व ऋषींचे वच-नावरून कल्पनेनें व अनुभवानें नवीन नियम बांधणें हें आमचें कर्त्तव्यकर्म आह्मी केलें पाहिजे.

पंचांग हें ज्योतिषशास्त्राचें एक मुख्य अंग आहे. त्या पंचांगाची स्थिति सध्या किती शोचनीय आहे हें वाचकांस सहज आढळून

येईल. अलीकडे किती तरी निरनिराळीं नवीन पंचांगें झालीं आहेत याची कल्पनाच करावी लागते. या पंचांगकर्त्यांनीं खरोखर आपले पंचांगांत कांहीं सुधारणा केली असेल तर ती गोष्ट बोलणेंच नको. एक ह्मणतो —" आम्हीं पंचांगकमेटीनें अधिकाराचे जोरावर ठरविलेले अमुक अयनांश घेतले आहेत, वर्षमान सूर्यसिद्धांतांतील आहे. " दुसरा ह्मणतो—" आमचें पंचांग दृक्तुल्य असून नाटिकलचे बरोब आहे. " नाटिकल पंचांग किती जणांस समजत असेल तें असो ! आह्मीं मात्र एकनी दोन तीन करण्याचे व दुसऱ्याचे पुस्तकांतील लागेल तसे उतारे घेऊन पंचांग बरेंच मोठें व अज्ञजनास जणूं काय कल्पवृक्षच असें केलें आहे. या पलीकडे जास्त कांहीं असेल असें या लेखकास दिसत नाहीं. वरील विचार सुचण्याचें कारण आज आमचे पुढें दोन वर्षांपासून टिटवाळ्याचे ज्योतिषी इंदुप्रकाश छापखान्यांत रा. दामोदर सावळाराम आणि मंडळी यांचे आश्रयानें छापून प्रसिद्ध करीत असलेलें नूतन पंचांग होय. संपादक हुषार व कल्पक आहेत, त्यांस कांहीं सूचना केल्या असतां पुढील सालीं ते खात्रीनें सुधारणा करितील. या पंचांगांत अगदींच सुधारणा नाहींत असें मुळींच नाहीं. इतर पंचांगापेक्षां त्यांत बऱ्याच सुधारणा केल्या आहेत, परंतु त्याच सुधारणा निराळ्या रीतीनें केल्या असतां तेंच पंचांग तेवढ्याच किंमतीस देऊन लोकांत जास्त खप होईल. संपादकांनीं चुली घालण्याचे मुहूर्तापासून तों कान टोचणें इ०सर्व मुहूर्तांचीं चक्रांवर चक्रें दिलीं आहेत. यांचा मुंबापुरस्थ जनास किती उपयोग होत असेल हें कांहीं कळत नाहीं ! खरोखर या कामांत मोठी मेहनत केली आहे त्याबद्दल संपादक स्तुतीस पात्र आहेत हें कोणीही कबूल करील. संपादकांनीं तितक्यांतच जात्याची टाकी गेली असतां काय करावें, पोट दुखत असल्यास ओवा खावा,

नंतर जारज योग, राजयोग, लगेच प्रश्नविचार, सामुद्रिक याप्रमाणें सगळ्या शास्त्रांचा गोंधळ करून अव्यापारेषु व्यापार केला आहे असें मेव्या कष्टानें ह्मणावें लागतें. या असल्या अपरिपक्व ज्ञानानें कित्येकांस जुलाब उलट्या होऊन बरेंच लोळत राहण्याचा प्रसंग येऊन शास्त्राची दुर्दशा मात्र खात्रीनें उडेल. या असल्या खिचडींतून निवडानिवड करणें किती कठीण आहे हें प्रत्येकास अनुभवानें कळेल. संपादकांनीं प्रत्येक ग्रह बदलला असतां त्या दिवसाची प्रातःकालची कुंडली दिली आहे. यापासून ज्योतिषविद्यार्थ्यास कांहीं महत्वाची मदत होत असेल असें ह्मणतां येत नाहीं. नवशिके विद्यार्थी एकदा मोडणी समजावून दिली असतां सहज कुंडली मांडतील. प्रत्येक महिन्याचें भविष्य वर्तविलें आहे. असला प्रयत्न ह्याच पंचांगकर्त्यांनीं केला असल्यामुळें ते स्तुतीस पात्र आहेत. परंतु दिशा चुकली आहे असें ह्मणणें ओघास येतें. अशा रीतीनें वर्तविलेल्या भविष्यापासून कांहीं फायदा होत असेल असें वाटत नाहीं. जुनी असलेलीं प्रांतांचीं किंवा शहरांचीं नांवें टाकून प्रचारांतील चालू असलेलीं नांवें उपयोगांत आणलीं असतां फार बरें. भाराभर असलेली माहिती काढून टाकून थोडीच पण पूर्ण अशी क्रमवार विषयरचना करितील तर त्या पंचांगाचा फार उपयोग होईल. सामुद्रिक वगैरे विषयांची त्रोटक माहिती वाचून कोणासही उपयोग होणार नाहीं. जारज सारख्या ज्या विषयावर हल्लीं वादविवाद चालू आहेत असे उतारे किती चांगले असले तरी गाळणें हें शहाणपणाचें नव्हे काय ? पंचांग ह्मणजे काय, तें कसें पहावें, त्यांतील प्रत्येक कोष्टकाचा उपयोग कसा करावा अशी विषयरचना असून सर्व माहिती अगदीं नवशिक्या करितांच तयार करीत आहों असें समजून संपादक लिहितील तर तें

पंचांग जास्त उपयुक्त होणार नाहीं काय? शेवटीं मुंबईचे अक्षांशावरून—नाक्षत्रकालावरून—किंवा प्रथम सायन रवीवरून भावसाधनाचें कोष्टक दिलें असतां तें सायन व निरयन अशा दोन्ही वाचकांस उपयोगीं पडेल. कारण, चालू सालाचे अयनांश वजा केले असतां निरयन स्पष्ट भाव होतात व त्यास वेळ थोडा लागून ते आपल्या जुन्या रीतीनें काढलेल्या भावांबरोबर असतात असा अनुभव येतो. रोजचा अहर्गण दिला असून सर्व ग्रह विकलेपर्यंत दिले आहेत. रोजचा अहर्गण दिला नाहीं तरी चालेल. रवि व चंद्र यांखेरीज बाकीचे ग्रह कलेपर्यंतचे दैनिक दिले असतां चालतील. असो, विषयांतर फार झालें आतां आपण आपल्या विषयाकडे वळूं.

विवेचनापूर्वी आपल्या प्राचीन आर्य ऋषींनीं जे राशींचे गुणधर्म सांगितले आहेत त्यांकडे वळूं. आपणांस राशींचे गुणधर्म पूर्ण कळले असतां आपल्या कल्पनेच्या जोरावर फलादेशाचा संसारांत कसा उपयोग करून घेतां येतो याची थोडीशी ओळख करून देण्याचें मनांत आहे. तो कल्पनारूपी वाहनाचा आश्रय घेऊन उंच आकाशांत तारकामंडळांत इतस्ततः भ्रमण करणार आहे. त्यामुळें त्याचे हातून चुका होणें मानवी स्वभावास योग्यच आहे.

हा लेख लिहितांना सायन व निरयन या दोन पिशाचांस—जीं बरेच जणांस मताभिमानास पेटवून गालिप्रदानापर्यंत आणून त्यांचे ज्ञानाचा जगास उपयोग होऊं देत नाहींत त्यांस—बाजूस सारून राशींचे गुणधर्म सांगितले आहेत.

१ सूर्य पृथ्वीभोंवतीं [वस्तुतः पृथ्वी सूर्याभोंवतीं] ज्या दीर्घ वर्तुळ मार्गानें फिरतोसा दिसतो त्यास क्रांतिवृत्त म्हणतात. याचे १२ भाग केले म्हणजे त्या प्रत्येक भागास राशि म्हणतात. प्रत्येक राशि ३० अंशांचा असतो, मेष वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्या,

तूळ, वृश्चिक, धनु, मकर, कुंभ व मीन असे बारा राशि आहेत.

राशींचे स्वामी.

मेष,	वृश्चिक	मंगळ
वृषभ,	तूळ	शुक्र
मिथुन,	कन्या	बुध
धनु,	मीन	गुरु
सिंह		रवि
कर्क		चंद्र

हल्लीं पाश्चात्य विद्वानांनीं नवीन शोधून काढलेले ग्रहही आपण विचारांत घेऊं.

कुंभ स्वामी हर्शल (प्रजापति)
मीन स्वामी नेप्च्यून (वरुण)

२ राशींचे गुणधर्म.—

पृथ्वीराशि—वृषभ, कन्या, मकर
जलराशि—कर्क, वृश्चिक, मीन
अग्निराशि—मेष, सिंह, धनु
वायुराशि—मिथुन, तूळ, कुंभ
अतिप्रसवराशि—कर्क, वृश्चिक, मीन
मध्यम प्रसवराशि—वृषभ, तूळ, मकर
वंध्याराशि—मेष, सिंह, कन्या, कुंभ
मध्यम वंध्याराशि—मिथुन, धनु

३ यावरून अंशी सहज कल्पना करितां येईल कीं, जर आपण वंध्या राशींत रजनीनाथ व वनस्पतिपोषक जो चंद्र तो असतां बीं पेरलें तर त्यास त्या राशीचे धर्माप्रमाणें तें झाड फार फळें देणार नाहीं. परंतु तेंच बीं आपण चंद्र प्रसव राशींत असतां लावलें तर

होणारें झाड मोठ्या जोमानें वाढून पुष्कळ फळें व पुष्पें देईल. त्याच प्रमाणें वंध्या राशींत चंद्र असतां शेतांतील किंवा बागेंतील लहान लहान उपद्रवी झाडें झुडपें उपटून टाकलीं तर तीं पुन्हा कमी जोमानें उगवतील, परंतु तींच प्रसव राशींत असतां उपटून टाकलीं तर पुन्हा प्रसव राशीचे संजीवनी धर्माप्रमाणें कमी न होतां जास्तच वाढलेलीं आढळतील. चंद्र हा अमावास्येपासून शुक्ल पक्षांत पंधरा दिवसपर्यंत हळू हळू वाढत असतो व पुढें कृष्ण पक्षांत रोज तेज कमी होत जाऊन जणूं काय रोगग्रस्त झाला आहे असा भासतो. यावरून कल्पना करितां येईल कीं, कांहीं विशिष्ट वनस्पति किंवा धान्यें शुक्लपक्षांत लाविलीं तर जास्त फलद्रूप होतील. बहुतेकांच्या अनुभवास आलेंच असेल कीं कांहीं विशिष्ट दिवसांत धान्याचा साठा केला असतां त्यास कीड वगैरे लागत नाहीं. असो, आतां प्रत्येक राशींत चंद्र असतां आपण शेतीचें किंवा बागायतीचें काय काम करावें याची कल्पना करूं.

४ मेष.—ही रास आर्द्ररहित व वंध्या या गुणांनीं युक्त आहे. ह्मणून या राशींत चंद्र असतां झाडें लावणें, लावणी अगर पेरणी हीं कामें उपयोगाचीं दिसत नाहींत. परंतु या दिवसांत निरुपयोगी झाडें उपटून टाकणें, शेतांत बेणणी करणें इ० कामें केलीं असतां चालतील. कित्येक या राशींतील चंद्र कांद्याची लागवड करण्यास चांगला मानतात.

५ वृषभ.—ही बरीच आर्द्ररास आहे. यांतील चंद्र पृथ्वी तत्वांत असतो. या कारणानें हे दिवस कोणत्याही प्रकारची लागवड करण्यास उत्तम झटल्यास हरकत नाहीं. त्यांत बटाटे, कोबी किंवा रताळ्यासारखे कंदमय व लवकर वाढणाऱ्या झाडांची लागवड करण्यास फार उत्तम.

६ मिथुन.—हा शुष्क व वंध्या राशि असल्या कारणानें या राशींत चंद्र असतां पेरणी किंवा लावणी करणें अथवा एखादें झाड उपटून दुसरीकडे लावणें फायदेशीर होणार नाहीं. परंतु या दिवसांत बेणणी करणें, उपद्रवी रानटी झाडें उपटून टाकणें, राब करणें इ० गोष्टी करण्यास हरकत नाहीं.

७ कर्क.—ही क्रांतिवृत्तांतील सर्व राशींत अतिप्रसव, फलद्रूप व आर्द्र रास असल्या कारणानें या राशींत चंद्र असतां कोणतेंही बीं पेरलें तर त्यापासून उत्तम झाडें, फळें व फुलें मिळालीं पाहिजेत.

८ सिंह.—ही रास वंध्यात्म असल्या कारणानें या दिवसांत बीं पेरणें कधींही फायदेशीर होणार नाहीं. बेणणी, नाशकारक झाडें झुडपें तोडणें, उपटणें, झाडांच्या मुळांचा नाश करणें, मोठे मोठे वृक्ष तोडणें या गोष्टी शास्त्रसिद्ध होतील.

९ कन्या.—ही वंध्या रास आहे. पण थोडी आर्द्र असावी असें वाटतें. तरी पण ही बीं पेरण्यास, रोप करण्यास, किंवा एका ठिकाणचीं झाडें उपटून दुसरीकडे लावण्यास उपयोगी नाहीं. बेणणी रावणी, झाडांचा नाश इ०कृत्यांस मात्र योग्य आहे.

१० तूळ.—ही रास ह्मणण्यासारखी प्रसवशील नाहीं. या राशींत चंद्र असतां पेरलेल्या बियांचे रोपास धान्य ह्मणण्यासारखें पुष्कळ येत नाहीं, परंतु झाड मात्र सुरेख रीतीनें पोसलेलें पाहण्यांत येतें. ह्मणून दिखाऊ झाडें, विलायती गवत, कडबा किंवा गुरांचे चाऱ्याचें बीं पेरलें असतां शास्त्रोक्त होणार नाहीं काय? कित्येकांचे मतें या दिवसांत कोबी, बटाटे यांची लागवड करावी. परंतु वृषभ राशींतील चंद्र हा कंदमय पदार्थांस फारच पोषक आहे, तितका तूळेंतील दिसत नाहीं.

११ **वृश्चिक.**—या राशींतील चंद्र जरी कर्केंतील चंद्रा इतका प्रसव नाहीं तरी पुष्कळ अंशीं प्रसव असल्या कारणानें जीं कामें करावीं म्हणून वर म्हटलें आहे तीं करण्यास हरकत नाहीं.

१२ **धनु.**—ही वंध्या रास आहे, म्हणून या दिवसांत कांदे, विलायती गवत इ०ची लागवड करावी.

१३ **मकर.**—ही रास पृथ्वी तत्वाची असून शेवटील थोडा भाग जलतत्वाचा मानला आहे व ही प्रसवशील आहे, त्यामुळें या राशींत चंद्र असतां बटाटे वगैरेची लागवड करावी, व वृषभस्थ चंद्र असतां सांगितलेल्या गोष्टी कराव्या.

१४ **कुंभ.**—ही वंध्या रास असल्या कारणानें पेरणी किंवा रोप करण्यास हरकत नाहीं. बेणणी, झाडें उपटणें या कामांस या राशीचा चंद्र फायदेशीर होईल.

१५ **मीन.**—ही रास अतिप्रसव आहे, त्यामुळें कोणत्याही प्रकारची लागवड करण्यास या राशींत चंद्र असतां ते दिवस योग्य आहेत. कर्कस्थ चंद्र असतां जीं कृत्यें करावयास सांगितलेलीं आहेत तीं करावीं.

१६ यावरून आपणास सहज कल्पना करितां येईल कीं, कोणत्याही प्रकारची लागवड करणें किंवा रोप करणें असल्यास ज्या दिवशीं चंद्र कर्क, वृश्चिक व मीन या राशींत असेल ते दिवस उत्तम होत, वृषभ व मकर राशीच्या चंद्राचे दिवस मध्यम व इतर राशींचे कनिष्ठ होत.

१७ शुक्ल पक्ष हा पेरणी किंवा रोप करण्यास उपयोगांत घ्यावा अशी कल्पना करितां येईल. चंद्राच्या रोज कला जशा वाढत जातात, त्याच प्रमाणें धान्याचीं रोपेंही वाढत जातील. कृष्णपक्षांत धान्य साठवून ठेवणें, राब करणें, खळ्यांत धान्य नेणें, वाईट झाडें टाकणें इ०कामें केल्यास फायदा होईल.

१८ आतां आपण मळ्यांत होणाऱ्या भाजीपाल्याकडे वळूं—मेथी, बटाटे, कोबी, मुळे, अलकोल, फ्लावर, वांगीं इ० ची लागवड चंद्र जेव्हां कर्क, वृश्चिक, मीन व वृषभ राशींत असेल ते दिवस उत्तम मानण्यास हरकत नाहीं.

१९ जीं झाडें आपणास नुसतीं दिखाऊ व पोसलेलीं पाहिजे असतील—गुरांच्या चाऱ्याची लागवड, गाजरें, मुळे, बिटरुट इत्यादि—त्यांची लागवड चंद्र तूळ व मकर राशींत असेल तेव्हां करावी. परंतु चंद्र ज्या दिवशीं कर्क, वृश्चिक व मीन या राशींत असेल त्या दिवसांत कोणत्याही प्रकारची करण्यास मुळींच हरकत नाहीं.

२० मेथी वगैरे पालेभाजी लावणें ती चंद्र ज्या दिवशीं तूळ राशींत असेल त्या दिवशीं लावावी. कारण, या दिवसांत लावलेली भाजी फार लवकर वाढते. शुक्ल पक्षांत तूळ राशींत चंद्र असतां पालेभाजी लावली असतां ती अति जोमानें वाढलेली आढळेल.

२१ योग्य हंगामांत जेव्हां चंद्र जलराशींत (विशेषतः शुक्ल पक्षांत) असतां ज्यांच्यांत रस अथवा आर्द्रता प्राधान्य आहे अशा भाजांची लागवड करावी. कलिंगडें, कोहोळे, भोपळे, काकड्या इ० अशा प्रकारच्या वनस्पति आहेत.

२२ ज्या रोपांचीं धान्यें किंवा फळें झाडावर येतात तीं आमावास्येपासून पौर्णिमेपर्यंतचे दिवसांत लावावीं. व ज्यांचीं फळें जमिनींत येतात त्यांची लागवड कृष्णपक्षांत करावी.

२३ झाडांची छाटाछाट किंवा कलमें करणें तीं शुक्ल पक्षांत करावीं.

२४ चांगल्या जोमदार व फळें, फुलें भरपूर देणाऱ्या वृक्षांचीं कलमें योग्य हंगामांत करावीं आणि तीं चांगल्या थंड व काळोखाचे जागेंत ठेवावीं, त्यांस पाणी बेतायेंच देत असावें. कलम कधींही खुरटट व रोगट झाडापासून करूं नये, जेव्हां चंद्र जल, प्रसव व चर रास जी कर्क तींत वृश्चिक राशींत असतां करावें. कृष्ण पक्षांत प्रसव व जल रास जी मीन ती उपयोगांत आणावी, नच जमल्यास चर व पृथ्वी रास जी मकर ती उपयोगांत घ्यावी.

२५ सर्व तऱ्हेचीं रोपें, झाडें किंवा भाजी वगैरे शुक्ल पक्षांत लावणें फार चांगलें. त्यांत लावण्यास दिवस वर सांगितल्या प्रमाणें पसंत करावा.

२६ बागेंतील लहान व रानटी झाडें किंवा निरुपयोगी झाडें तोंडून टाकणें असल्यास कृष्ण पक्षांत चंद्र जेव्हां सिंह या वंध्य राशींत असतां त्या दिवशीं तोडावीं. झाडास जर कीड लागली असेल तर त्याच दिवसांत कीड मारण्याच्या औषधींचा उपयोग करावा.

२७ जर आपणास आंबे, सफरचंद वगैरे फळांस काढतांना ठेंचून झालेले वण राहूं नयेत अशी इच्छा असेल तर तीं कृष्ण पक्षांत झाडांवरून उतरावीं. शुक्ल पक्षांत उतरलीं तर खात्रीनें डाग राहतात. या वरून आपण सहज कल्पना करूं कीं, ज्यास शुक्ल पक्षांत आंब्या देखी येतात किंवा छापवितात त्यांचे वण चांगले ठळक आढळण्यांत येतील!

२८ भुइमुगासारखीं जीं पिकें जमिनींत येतात त्यांचीं कापणी कृष्ण पक्षांत करावी.

२९ जर धान्य किंवा बीं पेरण्यासाठीं ठेवणें असेल तर तें कृष्ण पक्षाचे पहिल्या ७ दिवसांत जमिनींतून काढून ठेवावें, म्हणजे जास्त दिवस टिकेल.

३० धान्य बियासाठीं ठेवणें असतां अमावास्येस कापावें.

३१ कृष्ण पक्षांत तोडलेल्या सागाचे लाकडास कीड किंवा बाळवी कमी लागलेली आढळते. व जळतांना तडतड असा आवाज होत नाहीं.

३२ कुंपणाचे बासे डांबर लावून कृष्ण पक्षांत पुरले असतां जास्त दिवस टिकतात.

३३ कोंबडीं, बदकें वगैरेंचीं आंडीं फुटून पिलें होण्याकरितां उबत ठेवणें तीं अशा बेतानें ठेवावीं कीं, तीं ज्या दिवशीं फुटतील तो दिवस शुक्ल पक्षांतला असून त्या दिवशीं चंद्र प्रसव राशींत असेल अशा रीतीनें झालेलीं पिकें लवकर पोसतात व लवकरच आंडीं घालण्यास सुरवात करितात.

३४ कोणतेंही जनावर खची करणें असल्यास चंद्र कन्या, तूळ किंवा वृश्चिक यांशिवाय अन्य राशींत असतां तें काम करावें.

या प्रमाणें शेतकी व बागायत या विषयाचें ज्योतिषशास्त्रास धरून थोडक्यांत जितकें विवेचन करणें इष्ट वाटलें तितकें केलें आहे. असल्या प्रकारचा प्रयत्न पहिलाच असल्या कारणानें यांत पुष्कळ गोष्टी वाचकांस कमी वाटतील. तरी पण विषयाचें महत्व व वेळ यांकडे लक्ष देऊन वाचक वर्ग खात्रीनें रागावणार नाहीं.



कुंडलीविज्ञान.

पुस्तक १० वें.]आश्विन शु०१२शनिवार[अंक १७ वा

सेव्यसेवकसंबंध.

कुंडलीविज्ञानांत आजपर्यंत आह्मीं जन्यजनक संबंध, भ्रातृसंबंध, व दांपत्यसंबंध कसे असतात याबद्दल नियम प्रसिद्ध केले आहेत व ते सत्य आहेत असें वाचकांस दिसून आलें आहे. हे संबंध नास्तिकवाद्याला निरुत्तर करणारे आहेत व ग्रहांचा मनुष्यांशीं संबंध आहे असें सिद्ध करणारे आहेत. याबद्दल आतां शंका नाहीं. आज सेव्यसेवक संबंध कसे असतात हें दाखवावयाचें आहे.

मालक आणि त्याचा चाकर व हेड आणि त्याचा असिष्टंट यांचे योग कसे असले पाहिजेत याचा विचार करितां खालील नियम बसतात.

१ एकाचें दशम तें दुसऱ्याचें लग्न. २ एकाचें दशम तो दुसऱ्याचा चंद्र. ३ दोघांचें लग्न एकच. ४ दोघांचा चंद्र एकच. ५ एकाचा दशमाधिपति तो दुसऱ्याचा लग्नेश. ६ दोघांचा दशमाधिपति एकच. ७ एकाचें लग्नाचें दशम तें दुसऱ्याचें चंद्राचें दशम. ८ एकाचें चंद्राचें दशम तें दुसऱ्याचें लग्न अथवा चंद्र. ९ एकाचा दशमाधिपति तोच दुसऱ्याचा चंददशमाधिपति.

याप्रमाणें लग्न, चंद्र व त्यांचीं दशमें यांच्यांत कांहीं तरी वरील प्रकारचें साम्य असलें पाहिजे असें शास्त्रीय मार्गानें ठरतें.

सेव्य उदा० १ लें. सेवक



वरील उदाहरणांत मालकाचें लग्न मीन असून तेंच सेवकाचें दशम आहे. ह्मणुन या ठिकाणीं पहिला नियम लागूं पडतो.

मालकाचा दशमाधिपति गुरु व सेवकाचाहि दशमाधिपति गुरुच आहे. ह्मणून येथें सहावा नियम लागूं पडतो.

मालकाच्या चंद्राच्या दशमांत मेष रास असून त्यांत मंगळ आहे. त्यामुळें सेवकाचा चंद्र त्याच राशींत आहे. या ठिकाणीं आठवा नियम चांगला लागू पडतो.

या शिवाय आणखीही साम्य येथें दिसून येतें. शनि व राहू हे दोन ग्रह मालकाच्या ज्या स्थानांत आहेत त्या स्थानांच्या समोरच्या स्थानांत ते सेवकाच्या कुंडलींत आहेत.

सेव्य उदा० २ रें सेवक



मालकाचें व सेवकाचें लग्न कर्क हें एकच आहे, ह्मणून या ठिकाणीं तिसरा नियम लागूं पडतो.

उभयतांचा दशमाधिपति मंगळच आहे [नियम ६ प्रमाणें]

मालकाचा दशमाधिपति मंगळ व सेवकाचा चंद्रदशमाधिपति शुक्र हे ग्रह तूळ या एकाच राशींत आहेत. हा एक या ठिकाणीं विशेष नियम आहे.

मालकाचें भाग्य जर एखाद्या सेवकामुळें (सेवकाच्या मदतीनें) उदयास आलें असेल तर भाग्यस्थानांतही साम्य असूं शकेल. वरील

कुंडलींत भाग्यस्थानांचे अधिपति एकच आहेत व ते वृश्चिक या एकाच राशींत दोघांच्याही कुंडलींत आहेत.

वरील मालकाच्या आणखी एका चाकराची कुंडली खालील प्रमाणें आहे. सेवक २ रा.



या कुंडलीचाही दशमाधिपति मंगळच आहे! या सेवकाचा चंद्र लग्न सप्तम राशींत पडला आहे व लग्न मालकाच्या चंद्रदशम राशींचें पडलें आहे.

अशा प्रकारचा सेव्यसेवकसंबंध आहे. हा संबंध ईश्वरी संकेताचा आहे असें ह्मणावें लागतें. हा संबंध जर पूर्वी कळेल तर चाकरीची इच्छा करणाराला आपण कोणाकडे अर्ज करावा याचा उलगडा तेव्हांच होईल. त्याचप्रमाणें ज्याला चाकर ठेवावयाचे असतील त्यांनीं अर्ज करणारांच्या कुंडल्या मागविल्यास कोणता अर्जदार आपणाकडे नोकरी करूं शकेल याचाही निर्णय करितां येईल. कोणता चाकर चोर आहे, कोणता भाग्यवान् आहे, कोणता चाकर पायगुणाचा आहे, कोणता चाकर पुष्कळ दिवस टिकेल किंवा कोणता तंटा करून चालता होईल वगैरे प्रश्नांचा उलगडा एक ज्योतिःशास्त्रच करूं शकेल असें आम्हीं खात्रीनें सांगतों. इतक्या सर्व गोष्टी यथाशास्त्र जाणणारा शास्त्रज्ञ मात्र पाहिजे.

ज्याप्रमाणें एखादा बॅरिस्टर आपली बाजू सिद्ध करण्यासाठीं अनेक पुरावे देतो तसे पुरावे ज्याला देतां येतील तोच शास्त्रज्ञ होय. असला शास्त्रज्ञ आज हिंदुस्थानांत एकही नाहीं, त्यामुळें नास्तिकवाद बळावला आहे. ज्योतिष्याला पुरावे देतां येत नाहींत व पुरावे दिल्याशिवाय नास्तिकाचें तोंड बंद होत नाहीं. " मी अमुक कारणासाठीं अमुक क्षणतों व त्याबद्दल माझ्याजवळ असे असे पुरावे आहेत " असें ज्याला ठांसून सांगतां येईल तोच **ज्योतिषी** या संज्ञेला पात्र आहे. इतर शास्त्रांच्या तोडीचेंच ज्योतिष हें शास्त्र आहे असें सिद्ध करणें अवघड नाहीं. पण प्रत्येक गोष्टीचें पुरावे मिळवून तें समाजाच्या पुढें सोपपत्तिक व सोदाहरण मांडणें फार कठीण असल्यामुळें पूर्वीच्या सर्व ज्योतिष्यांचा कल गणिताकडे वळला. जसें गणित सत्य आहे तसें फलितही सत्यच आहे पण गणितावर परिश्रम जसे स्वतःच्या जोरावर करितां येतात तसे फलिताचे करितां येत नाहींत. पुरावे गोळा करण्यास राजाश्रय लागतो किंवा संपत्तीचें बळ लागतें. समाज पैसे खर्च करण्यास तयार आहे पण तो स्वतःकरितां आहे. एखाद्या ज्योतिष्याला पत्रिकेसाठीं **पंचवीस** रुपये तो हसत देतो पण शास्त्राच्या अभिवृद्धयर्थ प्रयत्न करणारीं वर्षाचे **दोन** रुपये देतांना अश्रु टाकतो ! ही दुःखद स्थिति टळणार नाहीं असें नाहीं, पण तिला अवधि आहे. सर्व जगाला वश करणारा पुरुष निर्माण झाला पाहिजे. व त्यासाठीं जगाला इच्छा झाली पाहिजे. आमचें काम इच्छा करून देण्याचें आहे व तें आम्ही यथाशक्ति चालविलें आहे.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥
' भवभूतिः '

पुस्तक ८वें.] भाद्रपद शु० ५, मंगळवार [अंक २३ वा

राजकीय घडामोडी

राशिचक्रांत सिंह हा राशि राजे, राज्य, सिंहासन व अधिकारी वर्ग यांचा दर्शक आहे. ज्यांच्या कुंडलींत हा राशि बलवान् असतो तीं माणसें मोठ्या योग्यतेचीं असतात, असें आढळून येतें. या राशींत शनि व राहू ह्या दोन ग्रहांशिवाय इतर कोणताही ग्रह असतां व तो लग्न, दशम, नवम आणि चतुर्थ स्थानांपैकीं एखाद्या स्थानीं असतां बलवान् समजला जातो. रवि, गुरु. बुध, शुक्र, मंगळ व चंद्र हे ग्रह या राशींत उत्तरोत्तर हीनबली असतात, तरी त्यांपैकीं कोणताही ग्रह सिंह राशीला महत्वच देतो. इतके सर्व ग्रह एकाच कालीं या राशींत एकमेकांशीं युति करीत असतां जो पुरुष जन्मास येईल तो जगांत राजासारखें वैभव भोगील किंवा सिंहासनारूढही होईल. मात्र असा हा राशि वर सांगितलेल्या ठिकाणींच पाहिजे. वरील सहा ग्रहांपैकीं कोणतेही दोन किंवा अधिक ग्रह जरी या राशींत असले तरी मनुष्याला महत्व प्राप्त झाल्याशिवाय राहणार

नाहीं. असा मनुष्य राजकीय घडामोडी करणारा होतो. लोकमान्य बाळ गंगाधर **टिळक** यांच्या कुंडलींत लग्नीं सिंह राशींत **रविशुक्र** योग आहे व बाबू **अरविंद** यांच्या कुंडलींत लग्नीं याच राशींत गुरुहर्शल योग असून शिवाय याच राशींत रवि आहे! या वर्षी आगष्ट महिन्यांत रवि, मंगळ, बुध, गुरु हे चार ग्रह या राशीवर आलेले आहेत! ता० १४ ला गुरु मंगळ योग होता, ता० १९ ला बुधगुरु योग होता, ता० २० ला रविबुध योग होता, ता० २१ ला बुधमंगळ योग होता, व ता० २२ ला रविमंगळ योग होता! हे सर्व योग मनुष्यास मोठेपणा देणारे आहेत. ह्मणून या दिवशीं ज्यांचा जन्म झाला असेल तीं मुलें कर्तृत्ववान् कुलदीपक व राजयोगी आहेत, हें उघड आहे. सर्वांत गुरुमंगळ व रविबुध हे योग प्रबल आहेत.

जगांतल्या राजकीय घडामोडी सुद्धां याच राशींतल्या ग्रहांवर अवलंबून आहेत. या वर्षी हा योग असल्यामुळें बऱ्याच ठिकाणीं राजकीय घडामोडी होत आहेत. तुर्कस्तानचे सुलतान साहेब **अबदूल हमीद** यांनीं तुर्की प्रजेला पार्लमेंट देऊन पार्लमेंटच्या सनदशीर राज्यव्यवस्थे प्रमाणें राज्यकारभार हांकण्याची शपथ कुराणावर हात ठेवून घेतली आहे! हा चमत्कार याच वेळीं याक्षिणीच्या कांडीप्रमाणें बिनबोभाट घडून येण्याचें कारण काय असेल बरें? याच वेळीं इराणांत मोठी धामधूम उडून शेवटीं तेथील शाहानें सुद्धां मोडलेलें पार्लमेंट पुनः जिवंत केलें आहे! हिंदुस्थानांत मात्र याच वेळीं उलट प्रकार घडला! राजकीय चळवळ करणारे कित्येक पत्रकर्ते व वक्ते दडपशाहींत गडप झाले असून कित्येक होण्याच्या पंथांत आहेत! या ग्रहस्थितीचा परिणाम जसा तुर्कस्तान अगर इराण यांवर घडला तसाच हिंदुस्थानावरही घडावयास पाहिजे आहे.

आमच्या मतें तो थोड्याबहुत प्रमाणानें घडेलही. युतींचा परिणाम बहुधा युति होण्या पूर्वीच घडतो हें जरी खरें आहे, तरी कित्येक प्रसंगीं तो मागाहूनही घडतो असा अनुभवही आहे. हिंदुस्थान जर इतर सर्व देशांच्या मागें पडलेलें आहे तर त्यावर युतींचा परिणाम मागाहूनच कां घडूं नये? केव्हांही घडो, पण घडणार खास! इंग्लंडचे मुत्सद्दी या महिन्यांत हिंदुस्थानसंबंधीं विचारांत अगदीं गढून गेलेले असले पाहिजेत. हिंदुस्थानचे व्हॉईसराय सुद्धां हिंदुस्थानला कांहीं तरी हक्क दिले पाहिजेत ह्मणून विचार करीत असतील खास. आपणास निराश होण्याचें कारण नाहीं. अमृताचे परिणाम सर्वांस सारखेच व्हावयाचे. सिंहराशींतील ग्रहांच्या युति हें अमृत आहे. त्याचा वर्षाव जसा तुर्कस्तानावर झाला तसाच तो इंग्लंड व हिंदुस्थान यांवरही झाला असला पाहिजे. मग निराश होण्याचें काय कारण? तुर्कस्तानच्या सुलतानाला जसें एकदम वाटेल तें करितां येत होतें तसें इंग्रजी मुत्सद्द्यांना करितां येत नसेल, ह्मणून थोडा अवधि लागणार आहे इतकेंच. यावरून उघड आहे कीं, हिंदुस्थानाला सुद्धां या वर्षी थोडेबहुत राजकीय हक्क लवकरच मिळणार आहेत.

या युतींचा परिणाम लोकमान्य टिळकांवरही चांगला घडेल. त्यांचे सर्व अनिष्ट ग्रह अद्यापि सरले नाहींत, हें खरें. तथापि सप्टंबर ९ वीपासून शुक्र सिंह राशीचा झाल्यावर त्यांना अनुकूल अशा गोष्टी घडू लागतील. द्वितीय स्थानचा अधिपति बुध हा ता.२२ आगष्ट पासून ता० ८ सप्टंबरपर्यंत द्वितीय स्थानीं उच्च आहे. या स्थानावर लेखनाचा विचार होतो. जन्मकाळीं हा ग्रह शत्रुगृहीं व्ययस्थानीं आहे, ह्मणून त्यांचे लेख त्यांस कारागृहवास भोगावयास लावितात. हा ग्रह सप्टंबर ८ पर्यंत बलवान् असून याच अवधींत फुलबेंचासमोर परवानगी अर्जाचा निकाल लागावयाचा आहे. मंग-

ळवार ता० २९ ला रवि, बुध व मंगळ इतके ग्रह कन्येंत आहेत व चंद्र सिंहेंत लग्नीं आहे. ही ग्रहस्थिति त्यांस बरीच अनुकूल अशी आहे. अक्टंबरमध्यें त्यांचें स्थलांतर आहे. मग तें कोणत्याही कारणानें व कोठेंही होवो!

अक्टंबर महिना हिंदुस्थानास चांगलासा नाहीं. शनीसमोर रवि व मंगळ आल्यानें असंतोष व अस्वस्थता यांचा विशेष फैलाव होईल असें वाटतें.

यंदाच्या वर्षी चंद्र व हर्शल यांच्या युतिकालीं उभयतांत दक्षिणोत्तर अंतर शून्य होत असल्यामुळें त्या त्या वेळीं शोककारक गोष्टी घडत आहेत! ता० १६ जूनला ही युति होती. त्यामुळें तिच्या मागील आठवड्यांत दे. परांजपे यांस पकडलें व नंतरच्या आठवड्यांत टिळकांस पकडलें. त्या नंतर जुलईच्या १३ व्या तारखेस युति होती. या वेळींहीं तिच्या पूर्वीच्या आठवड्यांत दे. परांजप्यांस शिक्षा झाली व पुढील आठवड्यांत टिळकांस शिक्षा झाली. आगष्टमध्यें १० व्या तारखेस ही युति झाली, तेव्हां काय ऐकूं येतें इकडे लक्ष होतें तों प्रो० विजापूरकरांस वारंट सुटल्याचें वर्तमान प्रसिद्ध झालें.ता.११ला खुदीरामाला फांशीं दिलें. या पुढें चंद्र व हर्शल यांच्या होणाऱ्या युति येणें प्रमाणें आहेत.—सपटंबर ता० ६ अक्टंबर ता० ३ व३० अक्टंबरमध्यें दोन वेळां युति होत आहे, यावरून हा महिना जनतेला कोणत्या दुःखांत सोडतो पहावें!



कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥
'भवभूतिः'

पुस्तक ८वें.] ज्येष्ठ कृ० ८, रविवार [अंक १६ वा

राजकीय संकट

१ दशम स्थान हें राज्यभुवन होय. या स्थानावर सर्व प्रकारच्या राजकीय गोष्टींचा विचार होतो. शनि व हर्शल हे दोन ग्रह राजकीय संकटें उत्पन्न करणारे आहेत. व्ययस्थान हें राजदंड, कैद वगैरे संकटें उत्पन्न करणारें स्थान आहे. ह्मणून राजकीय संकटांचा विचार करितांना दशम आणि व्यय हीं दोन स्थानें आणि शनि व हर्शल हे ग्रह विचारांत घेणें आवश्यक आहे.

२ यांशिवाय दशमाचा स्वामी व त्याचें दशमस्थान, साडेसाती आणि रवि यांचाही विचार केला पाहिजे. साडेसातीच्या पुस्तकामध्यें राजकीय संकटें उत्पन्न करणारी साडेसाती कोणती तें सांगि-

तलें आहे. रवीचे शनि आणि शुक्र हे शत्रु आहेत. म्हणून कुंडलींत रवि हा शनीनें व शुक्रानें युक्त, अथवा त्यांच्या राशीस किंवा शनीच्या दृष्टींत असल्यास अशा प्रकारचीं संकटें उत्पन्न होण्याचा संभव असतो, असें मानण्यास हरकत नाहीं. मकर आणि कुंभ हे दोन शनीचें राशि आहेत. यां पैकीं मकर राशींत रवि विशेष अनिष्ट सुचवितो. त्याचप्रमाणें वृषभ आणि तूळ हे शुक्राचे राशि आहेत, पण तूळ राशीचा रवि विशेष घातक होतो. लो. मा. टिळकांच्या कुंडलींत रवि हा शुक्रानें युक्त आहे, म्हणून तो राजाच्या अवकृपेस कारण झाला आहे. हें कारण जरी विशेष महत्वाचें नाहीं, तरी इतर कारणांत त्याची भर पडली आहे. प्रो० परांजपे यांच्याही कुंडलींत हे ग्रह एका राशीवर बरेच जवळ जवळ आहेत. रवि आणि शनि यांचा योग लग्नीं, चतुर्थ, दशम किंवा व्यय स्थानीं होणें अगर ते त्या स्थानांत समोरासमोर होणें राजकीय संकटास कारण आहे. शनीच्या दशमांत रवि अगर रवीच्या दशमांत शनि हाही योग चांगला नाहीं. प्रो० परांजपे यांचा शनि तूळ राशींत व रवि कर्क राशींत चतुर्थ स्थानीं असल्यामुळें रवि हा शनीच्या दशमांत आला. शनि हा मेष, कर्क, सिंह, वृश्चिक व धनु या राशीचा लग्न, चतुर्थ, दशम व व्यय इतक्या स्थानचा राजकीय संकटें उत्पन्नकर्त्ता व दुःखदाता आहे. शनीचे रवि, चंद्र, मंगळ हे शत्रु आहेत. म्हणून तो या ग्रहांनीं युक्त असतां कामा नये. शनि हा लग्नाच्या व्यय स्थानीं जशीं राजकीय संकटें आणितो तशींच तो रवीच्या व्ययस्थानीं असतांही आणूं शकेल.

३ कुंडलींतलें ६ वें स्थान हें शत्रुस्थान आहे. या स्थानांत पाप ग्रह असले तर ते शत्रुनाश करितात. पण तेच जर आपल्या शत्रू-

च्या घरचे, शत्रूनें युक्त अथवा दृष्ट असे असतील तर ते शत्रुनाश न करितां शत्रुभय मात्र उत्पन्न करितील. प्रो० परांजपे यांचा शनि अशा प्रकारचाच आहे. परंतु तो षष्ठ स्थानीं उच्च आहे त्या मुळें लो. मा. टिळकां इतके त्यांस वैरी नाहींत व देहदंडही त्यांच्या इतका त्यांस भोगावा लागणार नाहीं.

४ प्रो० परांजपे यांच्या प्रमाणेंच लो. मा. टिळकांस साडेसाती आहे. पण त्यांची साडेसाती नवम स्थानची आहे, त्यामुळें जो प्रसंग पराजप्यांवर आला तो टिळकांवर येण्यासारखा नाहीं. लो. टिळकांच्या कुंडलींत बुध हा शनीसह व्ययस्थानीं शत्रुगृहीं आहे. सांप्रत हा ग्रह त्याच स्थानीं आगष्टच्या ७ व्या तारखेपर्यंत आहे. आणि दशमाधिपति शुक्र हाही त्याच ठिकाणीं सपटंबर ता० ९ पर्यंत आहे. जुलईच्या ८ व्या तारखेपर्यंत मंगळही त्याच राशींत असून ता० २२ जून पासून ता. २३ जुलईपर्यंत रवि सुद्धां त्याच राशींत आहे. हर्शल हा षष्ठ स्थानीं त्यांच्या समोर आहे. यावरून सपटंबरपर्यंत टिळकांचें ग्रह प्रतिकूल आहेत. व त्यांवरून टिळकांसही परांजपे यांप्रमाणें राजकीय भय उत्पन्न होण्याचा संभव आहे, असें अनुमान होतें. म्हणून त्यांनीं सावधगिरीनें असावें हें बरें. तथापि मागील २ अनुभवांवरून आमचें मत असें आहे कीं या वेळची ग्रहस्थिति जरी राजकीय संकट सुचवीत आहे तरी त्याचें भय बाळगण्याचें कारण नाहीं. ही ग्रहस्थिति प्रतिपक्षाकडून टिळकांवर 'घोरपड' आणण्याचा प्रयत्न करील; पण तिच्यानें तुरुंगवास भोगावयास लावणार नाहीं हें निश्चित आहे.

६ एका गृहस्थाच्या जन्मकाली व्ययस्थानीं वृश्चिक राशीचा शनि आहे. ह्मणून त्यास निरंतर शत्रु आहेत. रवि धनस्थानीं मकर राशींत आहे, ह्मणून त्यांस राजकीय संकटांचें भय आहे, हें उघड आहे. सांप्रत हे अशाच प्रकारच्या संकटांत आहेत. कारण जन्मकाली मीन राशीचा चंद्र चतुर्थ स्थानीं असल्यामुळें साडेसाती आहे. जन्मकालचा रवि या शनीच्या दशमांत हर्शलासह आहे व दशमाधिपति बुध व षष्ठेश शुक्र हे कर्क राशींत शत्रुगृहीं आहेत आणि ते वरील हर्शल आणि रवि यांच्या समोर, ह्मणून या ग्रहस्थितीचा परिणाम थोडाबहुत तरी त्यांस भोगावा लागेल असें स्पष्ट दिसतें !

या एकंदर विवेचनावरून राजकीय संकटें केव्हां उत्पन्न होतात व तीं कोणास बाधक होतात, याचा वाचकांस विचार करितां येईल.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥

'भवभूति'

पुस्तक ९ वें.] माघ व० ६, गुरुवार [अंक ५ वा

बंधनयोग.

जन्म— ता. २८ एप्रिल सन १८७५ रात्रीं १२ वा. २६ मि.

सायन भावचलित



या गृहस्थावर 'खुनाचे प्रवर्तक' ह्मणून आरोप असून तो अटकेंत आहे व ता. १९ फेब्रूवारीस सेशनमध्यें त्याचा खटला चालावयाचा आहे. तेव्हां त्याचा निकाल काय होईल व आरोप येण्यास कोणतें कारण याचा शास्त्रीय दृष्टीनें विचार करूं.

सन १९०८ च्या सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यांत वारंटानें पकडून काम चाललें व अखेर तो खटला सेशनकमीट झाला. या आठवड्यांत रवि, मंगळ व बुध कन्येंत आहेत, शनि मेष राशींत वक्री असून हर्शल मकर राशींत वक्री आहे. अशा ग्रहस्थितीवर त्यास पकडण्यांत आलें आहे.

षष्ठेश चंद्र हा जन्मकाळीं तनुस्थानीं आहे व त्याच राशींत शनि आहे. शनि हा तनुस्वामी आहे. तनुस्वामी हा षष्ठेशासह असणें शत्रुत्वदर्शक आहे. षष्ठस्थानावर शत्रुचा विचार करितात. ह्मणून या मनुष्यास शत्रु उत्पन्न होऊन ते त्याला मोठ्या संकटांत टाकतील असें अनुमान होत आहे व तें अक्षरशः खरें आहे. सिंह या राजराशींत हर्शल असून तो लग्नावर व चंद्रावर वक्रदृष्टीनें पाहत आहे. हा हर्शल राजकोप व बंधनयोग दर्शवितो हीं दोनच कारणें या मनुष्यावर मोठें संकट येणार असें जन्मकाळीं दर्शवितात यांत शंका नाहीं. हीं कारणें जन्मकाळींच जाणणें फार कठीण आहे, तीं सर्वांनाच सहजगत्या समजतील असें नाहीं.

जन्मकालांत थोडी चूक असावी. कारण मंगळ व्ययस्थानीं पाहिजे. मंगळ हा दशमाचा स्वामी आहे. तो मकर राशींत उच्च आहे. त्या प्रमाणें हा गृहस्थ मोठा उलाढाल्या व कारस्थानी आहे. जन्मकालांत चूक नसली तरी तो मंगळ व्ययभावारंभापेक्षां सुमारें ५ अंशच कमी आहे ह्मणून तो व्ययभावाचेंच फल देईल हें उघड आहे. दशमाधिपति व्ययभावांत गेल्यामुळें त्याचीं कारस्थानें त्याच्या बंधनास कारण

होणें साहजिक आहे. मकर हें शनीचें गृह आहे व शनि आणि मंगळ यांचें परस्पर शत्रुत्व आहे, असें असतां या राशींत मंगळ उच्च कसा काय झाला अशी तें सांगवत नाहीं. मंगळ मकर राशींत राजयोग करितो असा अनुभव येतो हें खरें आहे. पण तो शत्रुगृहीं असतां राजयोग को करील याचा उलगडा तात्विक रीतीनें होत नाहीं. या राशींत तो २८ व्या अंशांत असतां परमोच्च असतो; असें शास्त्रांत सांगितलें आहे. तसा येथें नाहीं. तो फक्त २ अंश आहे. ह्मणून राजयोग करीत नाहीं असें ह्मणणें भाग आहे. आपण तात्विक दृष्टीनेंच या शास्त्राचा विचार करणार. ह्मणून मंगळ मकर राशींत शत्रुगृहीं आहे असें च कल्पिणें योग्य आहे. तो राजयोग करीत असेल तर त विशिष्ट अंशच असतील. त्या अंशांचा शोध लावावयाचा आहे. एखादा मनुष्य उलाढाल्या असला ह्मणजे त्याला राजयोग आहे असें ह्मणतां येणार नाहीं. मोठ्या दर्जाचा नोकर (अंमलदार किंवा हुद्देदार), अब्रूदार किंवा मानकरी यालाच राजयोग ह्मणतात. अशा मनुष्यांचा मंगळ मकर राशींतल्या कोणत्या अंशांत असतो हें पाहिलें पाहिजे. हा मनुष्य राजयोगी नाहीं. ह्मणून मंगळ उच्च नाहीं हें उघड आहे. खून करणें अगर खुनास मदत करणें या गोष्टी मंगळावर अवलंबून आहेत. या कुंडलींत दशमाधिप मंगळ व्ययस्थानीं शत्रुगृहीं असल्यामुळें तशा प्रकारचे आरोप त्याच्यावर ठेवले गेले आहेत असें दिसतें.

जन्मकाळीं राजकोप उत्पन्नकर्त्ता ग्रह जो हर्शल तो सांप्रत मकर राशींत आहे. हा ग्रहच मुख्यत्वें बंधनयोगास कारण झाला आहे. दशमाधिपति जो मंगळ त्याच्या राशीस व्ययस्थानीं तो जेव्हां गेला तेव्हांच हा मनुष्य संकटांत पडला!

संकटकाळीं तनुस्वामी शनि हा मेष राशींत आपल्या नीचांत असून वक्री आहे. मेष हें मंगळाचें गृह आहे. व मंगळ हा शनीचा

दुष्मन आहे, ह्मणून तो शत्रुगृहीं आहे. व त्याच्या दशमांत राजकोप उत्पन्नकर्त्ता ग्रह हर्शल हा मंगळाच्या राशीस आहे.

या प्रमाणें जन्मकाळीं व संकटकाळीं ग्रहस्थिति आहे. चतुर्थेश शुक्र मीनेंत असून गुरु हा भाग्यस्थानीं आहे ह्मणून या संकटांतून त्याची सुटका होईल अशी आशा वाटते. कारण गुरुसारखा ग्रह नवमस्थानीं बसून अपयश देईल असें वाटत नाहीं. शिवाय जी ग्रहस्थिति जन्मकाळीं व संकटकाळीं आहे ती विशेष जोरांतली नसल्यामुळें केवळ आरोप यावा इतकाच तिचा परिणाम असावा असें समजून आह्मीं तूं या संकटांतून मुक्त होशील असें कळविलें आहे. अनुभव काय येतो पहावा.

ता. १५ फेब्रुवारीची ग्रहस्थिति अनिष्ट दिसते. रवि हा शनीचा शत्रु आहे व तो त्या दिवशीं कुंभ राशीच्या २६ व्या अंशांत आहे. जन्मकाळचा शनि २४ अंश आहे, ह्मणजे तो या शनीवरून आदल्या दिवशींच गेला आहे! व याच दिवशीं षष्ठेश चंद्र व दशमाधिप मंगळ यांची युति धनु राशीच्या २९ व्या अंशात व्हावयाची आहे या दोन्ही ही गोष्टी अशुभ आहेत. परंतु इतक्यावरून त्याची सुटका होणार नाहीं असें वाटत नाहीं. रवि हा शनीवरून गेला आहे ही एकच गोष्ट आह्मीं महत्वाची समजतों.

या ठिकाणीं आणखी एक चमत्कार होणार आहे तो असा कीं ज्या वेळीं त्यास पकडलें त्या वेळीं शनि मेष राशींत ८ अं. वक्री होता व तो आतां खटल्याच्या वेळींहीं मार्गी होऊन त्या अंशाजवळ आला आहे. यावरून त्याची सुटकाही त्याच अंशांत गेल्यावर होईल असें स्पष्ट दिसत आहे शनि मार्गी झाल्यामुळें त्यास आतां भय राहिलें नाहीं अशी आमची ठाम समजूत आहे.

कुंडलीविज्ञान

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यते ऽस्ति मम कोऽपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥
'भवभूतिः,

पुस्तक ७ वें.] वैशाख शु० ८, मंगळवार [अंक ९ वा

१ पंजाब आणि बंगाल

या वर्षाच्या जानेवारीच्या अंकांत सन १९०७ चें वर्षफल वर्तविलें आहे. त्याचा अनुभव पंजाब आणि बंगालकडे तूर्त येत आहे. त्यांत आरंभींच 'हें वर्ष इतिहासांत नमूद होण्याचा संभव आहे' असें ह्मटलें आहे. त्याप्रमाणेंच हिंदुस्थानांत गोष्टी घडत आहेत. तें वर्षफल जरी सर्व जगाचें आहे तरी सांप्रतच्या चळवळी व सरकारनें अंगीकारलेलें धोरण याकडे सर्व जगाचे डोळे लागतील किंवा लागले असतील ह्मांत शंका नाहीं. मंगळानें ता. २ एप्रिल या दिवशीं मकर राशींत प्रवेश केला. तेव्हां पासूनच तेथील अस्वस्थतेच्या ज्वाला सर्वत्र भडकूं लागल्या. त्या वर्षफलांत आणखी असें ह्मटलें होतें कीं— "ज्या भागांत मोठाल्या नद्या आहेत किंवा आखातें, उपसागर इ० जलाशय आहेत अथवा जलमय अण्यें आहेत, असलें पृथ्वीचे भाग लढाया, कत्तल, खून, मारामारी, अपघात यांनीं प्रसिद्धीस येतील. ..... मकर राशीचें स्वामित्व बं-

हा काल विचार करण्यासारखा आहे. या कालांत पंजाब आणि बंगाल किंवहुना सर्व हिंदुस्थानांत काय काय बऱ्या वाईट गोष्टी घडतात त्या पहावयास मिळतील!

दे. लाला लजपतराय ज्या काली पकडले गेले तो काल द्विस्वभाव लग्नाचा आहे. हा काल असवा तितका चांगला नाहीं. ह्मणून ते बऱ्याच अवधीनंतर पुन्हा हिंदुस्थानांत येतील अशी आशा करण्यास जागा आहे. या कालाची मर्यादा आजच सांगतां येण्यासारखी नाहीं. परंतु इतकें खचित वाटतें कीं त्याची मर्यादा मोठी आहे. रवि आणि लग्नस्वामी बुध हे ग्रह नवम स्थानीं आहेत, ह्मणून त्यांच्याबद्दल सरकारच्या मनांत पूज्य बुद्धि उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं.

आह्मीं ज्या वेळीं ज्योतिर्बोध हें पुस्तक प्रसिद्ध केलें होतें त्यावेळीं त्यांत पृष्ठ ८९ मध्यें असें झटलें आहे.-

"सांप्रत हिंदुस्थानांतील लोकांस ज्या हाल अपेष्टा भोगाव्या लागत आहेत त्या त्याच हर्शल नामक बुवामुळें!! शनीची साडेसाती असेत, परंतु त्याची २१ शी असते हल्लीं शनीची साडेसाती व हर्शलची एकविशी आल्या देशास आली आहे. ह्या २१ वर्षांत हिंदुस्थानची काय स्थिति होईल हें सांगतां येत नाहीं!!"

हें पुस्तक सन १८९३ सालीं छापलेलें आहे. आमच्या मतें हर्शल कुंभ राशींत गेल्यावर हिंदुस्थानच्या आपदा दूर होतील. सन १९१२ पर्यंत तो मकर राशींत आहे. या कालांत हिंदुस्थानांत बरेंच स्थित्यंतर होण्याचा रंग आहे!

कुंडलीविज्ञान

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यते ऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥

'भवभूति:,

पुस्तक ७ वें.]ज्येष्ठ शु० १, मंगळवार [अंक ११ वा

नेपच्यून आणि राज्यक्रांति

नेपच्यून (वरुण) या ग्रहास सूर्याभोंवती प्रदक्षिणा करण्यास १६४.७८ वर्षें लागतात. ह्मणजे एका राशीवर तो सुमारें १४ वर्षें असतो! शनीची साडेसाती तर या बुवाची चेचाळीशी!! या ग्रहावर राज्यक्रांति अवलंबून असावी, असें एक अनुमान होतें. याला पुढील कारणें आहेत.

१ सन ११९३ मध्यें दिल्लीचा प्रख्यात सार्वभौम राजा पृथ्वीराज चव्हाण त्याचा नाश झाला आणि हिंदुस्थानांत मुसलमानांचा शिरकाव पूर्णपणें झाला.

२ सन ११९३ + १६४ = १३५७ या कालीं ब्राह्मणी राज्य संस्थापित झालें. [इ. १३४७]

३ सन १३४७+१६४=१५११ या कालीं ब्राह्मणीराज्य मोडून त्याचे पांच तुकडे झाले [सन १५००]

४ सन १५००+१६४=१६६४ या कालीं शिवाजीनें मराठी राज्याची

संस्थापना केली !

५ सन १६६४+१६४=१८२८ या काळीं मराठी राज्याचा नाश होऊन इंग्रजी सत्ता गाजूं लागली.

६ सन १८५७ मध्यें हिंदुस्थानांत बंड होऊन इंग्रजी सत्ता डळमळूं लागली होती. यापूर्वी १६४ म्हणजे १६९३ च्या सुमारास मराठी राजसत्ता डळमळूं लागली होती ! सन १८५७ सालीं नेपच्यून मीन राशींत स्वगृहीं होता.

७ अकबरापासून अवरंगजेब मरेपर्यंत मोंगलाई गाजली. हा कालही तितकाच आहे. किंचित् अधिक आहे. पण अवरंजेबाची कारकीर्द म्हणजेच मोंगलांचा विनाशकाल आहे.

वरील गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत. मराठी राज्याचा नाश झाला तेव्हां [१८१८ त] नेपच्यून हा मकर राशींत होता. मोंगलांच्या विनाशकालीं, मराठी राज्याच्या नाशकालीं, आणि ब्राह्मणी राज्याच्या संस्थापनाकालीं तो मकर राशींतच असला पाहिजे. यावरून मकर राशींतला नेपच्यून हा हिंदु स्थानांतील साम्राज्यांच्या घडामोडींस कारण होतो. असें सिद्ध होतें. सन १९०३ च्या आगष्टमध्यें तो कर्क राशींत गेला. कर्क आणि मकर हे समोरासमोरचे राशि आहेत. यावरून तो सन १९८५ च्या सुमारास मकर राशींत जाईल. म्हणूस त्या कालापर्यंत जो जगेल त्याला काय होतें तें पाहतां येईल !

सन १९०३ मध्यें या ग्रहानें कर्क राशींत प्रवेश केला, असें वर सांगितलें आहे. त्यापूर्वी तो सन १७३९ त याच राशींत होता. त्यावेळीं हिंदुस्थानांत दोन महत्वाच्या गोष्टी घडल्या आहेत. नादिरशहाची स्वारी व चिमणाजी अप्पाचा पराक्रम. उत्तरेस नादिरशहानें आपलें शस्त्र हिंदूवर चालावलें तर दक्षिणेस चिमणाजी अप्पानें फिरंग्यावर चालविलें ! १९०७ मध्यें तो याच राशींत आहे. या वेळीं पंजाब, बंगाल वगैरे उत्तरेकडील हिंदुलोक संकटें भोगीत आहेत ! दक्षिणेंत मात्र पूर्ण शांतता दिसत आहे.

इ० स० १७५७ मध्यें बंगाल्यांत प्लासीची लढाई होऊन इंग्रजी राज्याचा पाया बसला त्यास १९२१ मध्यें १६४ वर्षें पूर्ण भरतील. या वेळीं नेपच्यून (वरुण) हा सिंह राशींत आहे. म्हणून प्लासीच्या लढाईच्या वेळीही तो याच राशींत असला पाहिजे. सन १९२१ मध्यें काय होतें तें मात्र पाहणारे बरेच मिळतील.

नेपच्यून सिंह राशींत असतां उत्तरेस जशी प्लासीची लढाई झाली तशीच पानिपताचीही लढाई झाली आहे. ही लढाई होऊन १९२५ मध्यें १६४ वर्षें पुरीं होतील. दोन्ही लढायांत मुसलमानाचा फडशा उडाला.

हर्शलचा प्रदक्षिणा काल ८४ वर्षांचा आहे. म्हणून नेपच्यूनच्या एका प्रदक्षिणेंत त्याचे दोन फेरे होतात. त्यामुळें हर्शलच्या स्थानांत बदल होत नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. सन १९२१ मध्यें हर्शल मीनेंत आहे. शनि त्याच्या समोर आहे. १७५७ मध्यें ज्या कालीं प्लासीची लढाई झाली त्या कालीं तो मीनेंतच असला पाहिजे

हिंदुस्थानची रास मकर मानितात. या राशींत सांप्रत हर्शल आहे व त्याच्या समोरच्या राशींत नेपच्यून आहे, आणि मीनेंत शनि आहे. ही ग्रहस्थिति हिंदुस्थानचें वातावरण बिघडून टाकणारी आहे, हें उघड आहे. अनुभवही तसाच येत आहे. इंग्लंडचे मुत्सद्दी व हिंदुस्थानसरकार हिंदुस्थानांत बंड झालें आहे अशी कल्पना करून साप साप म्हणून दोरीच बडवीत आहेत ! त्यामुळें हिंदुस्थानच्या लोकांस मोठा कठीण काळ प्राप्त झाला आहे. या वेळीं सर्वांनीं हर्शल (प्रजापति) व नेपच्यून (वरुण) यांची आराधना करावी, हें बरें ! !

विवाहकाल.

वर	वधू
ता. १८ नवं. १८८५ बुध	ता. ३ अक. १८९३ मंग.
स. ६ वा. ३८ मि.	सकाळीं १० वाजतां





या वधूवरांचा विवाह ता. २५ मे १९०७ शनिवारीं सकाळीं ११ वाजून २६ मि. नीं झाला.

उभयतांचा लग्नेश गुरु, सप्तमेश बुध, कुटुंबेश शनि आहे. विवाहकालीं शनि मीनेंत होता, गुरु कर्केंत व बुध मिथुनेंत होता. आणि शुक्र वृषभेंत असून चंद्र वृश्चिकेंत होता. वृश्चिक राशि हा वराच्या लग्नेशाच्या कुटुंबस्थानीं व वधूच्या सप्तमेशाच्या अगर कुटुंबेशाच्या कुटुंबस्थानीं आहे. अगर वधूच्या शुक्र स्थानीं आहे.हा वराच्या चंद्राला ८ वा येतो. यावरून चंद्र ६।८।१२ वाही विवाहकालीं असूं शकेल. विवाहकालाचा बुध उभयतांच्या सप्तमांत आहे. बुध वराच्या बुधाच्या सप्तम स्थानीं व शुक्र वधूच्या शुक्राच्या सप्तमस्थ आहे. बाकीच्या ग्रहांचा विचार वाचकांनीं आपल्या मनाशीं करावा.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥

'भवभूतिः'

पुस्तक ८ वें.] पौष शु. ८, शनिवार [अंक २ रा

खरे देशभक्त

परम पूज्य लोकमान्य बाळ गंगाधर टिळक.

"अहोदुरंता बलवद्विरोधिता"

–किरात–

बलवंताशीं विरोध करणें अत्यंत कठीण आहे, हें मेथाप्रभृति राजमान्यांच्या घमेंडी डोक्यांत आलें नाहीं, याबद्दल आश्चर्य वाटतें! मेथादिकांची मूळ चूक झाली ती येथेंच. हे. लोकमान्य बळवंतरावांच्या बळाची मेथादिकांस कल्पना नव्हती हेंच खरें. झालेल्या प्रकारावरून टिळक हे बंडखोर आहेत, ते दुराग्रहास पेटून अखेर मारामारी करितील, म्हणून तितकी सावधगिरी आपण ठेविली म्हणजे झालें, अशी इंग्रजी समजूत मेथाकळपाची असली पाहिजे, म्हणूनच त्यानें गुंड लोक जमवून [illegible]यत तयारी ठेविलेली होती. परंतु [illegible]वंतरावांचें बळ कशांत आहे हें त्यास समजलें नाहीं, म्हणून अखेर सर्व कल्प फजित पावला! बळवंतराव हे

बदमाष नसून विलक्षण बुद्धिमत्तेचे, खुत्सद्दी व कायदेपंडित असून आपलें मत कायदेशीर पद्धतीनेंच सिद्ध करून दाखविणारे आहेत, हें मेथाकळपाशिवाय सर्वांस अवगत आहे. ह्मणूनच त्यांस लोकसमुदाय चाहतो व पूज्य मानितो. ते जर बदमाष असते तर त्यांस बदमाषाइतकेंच लोकांनीं तुच्छ मानिलें असतें. अशा पुरुषाचा पराभव त्याच गुणांच्या माणसांकडून झाला असता. तसा झाला नाहीं, यावरूनच मेथाकळपाच्या बुद्धिमत्तेची आज परीक्षा होत आहे. असो— आपला तो विषय नाहीं. आपणांस त्यांच्या कुंडलीवरून कोणकोणत्या गोष्टींचा बोध होतो, याचा विचार करावयाचा आहे. यासाठीं आतां आपण तिकडे वळूं.

सायन



सिंह हा राशि विलक्षण धैर्याचा आहे. त्याचप्रमाणें तो राजराशिही आहे. टिळकांच्या ठिकाणीं हे गुण स्पष्ट दिसतात. दशमाचा स्वामी शुक्र हा लग्नस्था मीसह लग्नीं सिंह राशींत उदित असतां जन्म झाला आहे. या एकाच गोष्टीनें त्यांस राजासारखा मान मिळतो, हें ह्मणणें सर्वस्वी खरें नाहीं. हें अनेक कारणांतलें एक आद्य कारण आहे. हा योग अनेक माणसांच्या कुंडल्यांत आढळून येईल, ह्मणून त्या सर्वांस राजासारखा मान मिळतो कीं काय? अर्थात् या योगाला आणखी कांहीं कारणें असलीं पाहिजेत. आणि तीं येथें आहेतहीं. दुसरें कारण असें आहे कीं, भाग्य व चतुर्थ या स्थानांचा अधिपति मंगळ हा स्वगृहीं आहे. टिळकांच्या ज्या सामर्थ्याची आपण इतकी स्तुति करितों व जे सुरतेच्या राष्ट्रीय सभेच्या प्लॅट फॉर्मवर सर्वांच्या दृष्टीस पडलें तें सामर्थ्य याच ग्रहाचें होय. टिळकांवर या ग्रहाचा परिणाम विशेष घडतो, हें सर्वांस ठाऊक आहेच. टिळकांची गाडी अनेक प्रसंगीं मनुष्यांनींच ओढलेली आहे. गाडींतून त्यांची अनेकदां भिरवणूक निघालेली आहे. कारण, चतुर्थ स्थान हें वाहनस्थान आहे.

याचा अधिपति मंगळ स्वगृहीं आहे ह्मणूनच या गोष्टी घडल्या व घडतात. चतुर्थ व भाग्य यांचें आधिपत्य मंगळानें घेतलें हें त्यांच्या राजमानास शोभेसें झालें, हें खरें, पण त्या मंगळामुळें त्यांचे मित्रच त्यांचे शत्रु होतात व त्यांच्याकडून टिळकांच्या नाशाचे प्रयत्न होतात, हें ही ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. हा दोष त्या मंगळाच्या स्वभावाचा आहे. राजासारखा मान मिळण्यास तिसरें कारण नवम स्थानचे गुरुचंद्र. नवम हें कीर्तिस्थान आहे. या स्थानचे ग्रह मनुष्याची कीर्ति चहोंकडे पसरवितात. हें शिक्षण स्थानही आहे. या स्थानावर गुरूचा विचार होतो. टिळकांचे गुरु त्यांच्यासारखेच कीर्तिमान होते. केसरी पत्र ही या नवमस्थ ग्रहांची साक्ष देत आहे. परंतु या गुरुचंद्राच्या जोडीला राहूनें थोडा काळीमा आणिलेला आहे तो वाचकांस अवगतही आहे.

यांच्या कुंडलींत एक मात्र फार अनिष्ट योग झालेला आहे, तो असा कीं, द्वितीय आणि एकादश यांचा अधिपति बुध तो व्ययस्थानीं शत्रुक्षेत्रीं षष्ठेश जो शनि त्यानें युक्त झाला! द्वितीय आणि एकादश हीं दोन्हीं स्थानें विद्या, बुद्धिमत्ता आणि मुत्सद्दीपणा यांचीं दर्शक असून त्याचें आधिपत्य बुधानें घेतलें, हें त्यांच्या या गुणांस योग्य झालें. पण तो ग्रह कर्क राशींत शत्रुगृहीं पडला व शत्रुस्थानाच्या अधिपतीनें युक्त झाला, त्यामुळें त्यांचे तेच गुण त्यांस कारागृहवास भोगण्यास कारण झाले! व्ययस्थानीं शनि हा त्यांस गुप्त शत्रु उत्पन्न करितो. ही गोष्ट 'जास्टिस' च्या पत्रावरून उघड आहे.

यंदाच्या कॉंग्रेसच्या वेळीं टिळकांस गुप्त शत्रु उत्पन्नकर्ता ग्रह जो शनि तो त्यांच्या अष्टम स्थानीं होता. व राजासारखा मान देणारा ग्रह जो मंगळ तो त्या शनीशीं युति करणार होता. शनि व मंगळ या दोन ग्रहांची युति निसर्गतःच मारक आहे. त्यामुळें त्यांस त्यांच्या गुप्त शत्रूंकडून यावेळीं फार त्रास झाला, इतकेंच नव्हे तर त्यांच्या जिवावर प्रसंग आला. परंतु मंगळाच्या पुढें शनीचें चाललें नाहीं, ह्मणून बरें झालें. नाहीं पेक्षां त्यांच्या जिवास कांहीं तरी अपाय होण्याचा संभव होता. ही गोष्ट आमच्या पूर्वीच ध्यानांत आली होती. पण, नवमस्थानीं असलेला गुरु हा या वेळीं

तनुस्थानीं असल्यामुळें तो त्यांचें खात्रीनें रक्षण करील असें वाटलें होतें, ह्मणूनच त्यांस सूचना दिली नाहीं.

यावेळीं तनुस्थानाचा स्वामी जो रवि तो शत्रुस्थानीं मकर राशींत शत्रुगृहीं होता, जोंपर्यंत राष्ट्रीय सभा डिसेंबरांत भरणार तोंपर्यंत तो त्याच ठिकाणीं असणार. ह्मणून राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षाचा मान त्यांस महिना बदलल्याशिवाय मिळणें फार कठीण आहे.

सांप्रत टिळकांस ग्रहस्थिति अनुकूल नाहीं. राहू हा चंद्राला ४ था असा व्ययस्थानीं असून साडेसाती आहे. यासाठीं त्यांनीं जें जें करणें तें तें पूर्ण विचारानें करावें. मार्च्यच्या २१ व्या तारखेस मेष राशींत शनि व रवि यांची युति होईल. ह्मणून तोंपर्यंत त्यांस शत्रुपीडा व शारीरपीडा बरीच होणार आहे. इतकें सुचवून आजचें वर्णन पुरें करितों.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥

'भवभूतिः'

पुस्तक ८वें.] फाल्गुन व. ३०, बुधवार [अंक ९।१०

कुंडलीविज्ञान.

अनुक्रमांक ४.

लो. मा. बाळ गंगाधर टिळक.

कुंडलीविज्ञानचे ता. ११ जानेवारीच्या अंकांत जी दे. टिळकांची कुंडली दिली होती, ती चुकीची आहे, असें रा. केसकरांनीं प्रसिद्ध केल्यावरून आज ती दुरुस्त करून देण्याचें योजिलें आहे. केसरीकर्त्यांनीं त्यांचा खरा जन्मकाल शके १७७८ आषाढ कृ० ६ बुधवार या दिवशीं सूर्योदयानंतर २घ. ९प. दिला आहे व केसकरांनीं २घ. १५प. दिला आहे. रा. जीवनराव चिटणीस यांनीं वाई-मधुवृत्त-ता. ६ नवंबर १८९७च्या अंकांत सुमारें २० मि. जन्म मागें घेतला आहे. त्यांनीं सायन सिंह राशीच्या ६अं. ४क. त लग्न धरून कुंडली केली आहे. कोणतीही वेळ धरिली तरी लग्न सायन सिंहच येतें. पण उदित अंशांचें

वर्णन चिटणीसांच्या मतें २०मि. जन्मकाल मागें घेऊन जमतें. ते ह्मणतात, " आ. बाळ गंगाधर टिळक यांचे जन्मवेळीं सिंह राशीचा ७ वा अंश उदित आहे. या अंशावर जन्मणारा मनुष्य अधिकार, प्रसिद्धत्व व श्रेष्ठत्व पावतो. हा आपल्या गुणांनीं आणि मानसिक धैर्यानें सर्वांत श्रेष्ठ अशा पदापर्यंत जाऊन पोहोंचतो. हा विलक्षण धैर्याचा, जोमाचा, व सहनशीलतेचा एक पुतळाच होतो. व आपल्या भाग्योदयकालीं आपल्या गुणांनीं सर्व जगामधील अचाट व विलक्षण होणाऱ्या गोष्टींचा एक केंद्रच होतो. या उदित अंशाबरोबर **आसेलस** नांवाचा एक तारा उदयास आला आहे. या ताऱ्याचा स्वभाव रविमंगळाप्रमाणें आहे. ह्मणजे तो अशुभ असून अग्निरूपी आहे. व त्याच्या परिणामामुळें जन्मणारा आकस्मिक मृत्यूनें अथवा अपघातानें अथवा अग्नीपासून मृत्यु पावेल. " याप्रमाणें चिटणिसांचें मत आहे. यांच्या मताच्या कुंडलींत रवि व शुक्र हे ग्रह व्ययस्थानीं बसतात व चंद्र अष्टमस्थानीं बसतो. आमच्या मतें रवि व शुक्र हे लग्नावरोबरच उदित असले पाहिजेत व चंद्र नवमस्थानीं पाहिजे. ह्मणून आह्मी त्यांचा जन्मकाल आणखी २६ मि. मागें धरितों. ह्मणजे केसरीनें प्रसिद्ध केलेल्या जन्मकालाच्या मागें सुमारें २ घ० धरितों. अर्थात् सूर्योदय कालींच त्यांचा जन्म असला पाहिजे असें आह्मांस वाटतें. जन्मकालांत इतकी चूक संभवणार नाहीं, असें कित्येकांस वाटण्याचा संभव आहे. पण आह्मांस जो अनुभव आहे, त्यावरून इतकी चूक होणें अशक्य नाहीं, असें वाटतें. गर्भांत गर्भस्थान सोडलें कीं त्याचा जन्म झाला, असें मानण्यास काय हरकत आहे? कल्पना करा, आपणास पुण्याहून मुंबईस जावयाचें आहे तर प्रवासाची वेळ आपण कोणती धरूं? घराच्या बाहेर पाऊल ठेविलें ती धरूं कीं, मुंबईच्या हद्दींत ठेविलें ती धरूं, कीं बिऱ्हाडांत पाऊल ठेविलें ती धरूं? वास्तविक आपण घराच्या बाहेर पाऊल ज्या कालीं टाकिलें तीच प्रवासाची वेळ

धरूं हें उघड आहे. जन्म ह्मणजे प्रवासच आहे. गर्भाशयाच्या बाहेर येणें ह्म० घराच्या बाहेर पाऊल ठेवणें होय. जननेंद्रियाच्या द्वारांत येणें ह्मणजे मुंबईच्या हद्दींत येणें आहे व भूमीवर येणें किंवा इंद्रियाच्या बाहेर दृश्यमान होणें ह्मणजे मुंबईच्या बिऱ्हाडांत पाऊल टाकणें आहे. अर्थात् गर्भाशय सोडण्याचा जो काल, तोच जन्मकाल मानिला पाहिजे. इतका सूक्ष्म विचार सर्वदाच करावा लागतो असें नाहीं. पण केव्हां केव्हां लग्नाची संधि व ग्रहांची भावसंधि ज्या वेळीं असते त्या वेळीं इतका सूक्ष्म विचार केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. टिळकांचा जन्मकाळ २ घ. ५ प. हा अजमासाचाच असला पाहिजे. ह्मणून तो थोडाबहुत चुकीचा असण्याचा संभव आहे. तथापि त्यावरून इतकें सिद्ध आहे कीं, सूर्योदय झाल्यावर त्यांचा भूमिप्रवेश झाला असला पाहिजे. अर्थात् तो होण्याच्या संधीस गर्भस्थानाचा त्याग झाला असला पाहिजे. ह्मणून आह्मीं त्यांचा जन्मकाल ५ वाजून ३४ मि. किंवा सूर्योदयानंतर घ० प० हा मानितों. या कालची स्पष्ट कुंडली.—

सायन भावचलित



र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	के.	ह.	ल.
४	११	६	३	०	४	३	११	५	१	४
०	२८	२५	१२	९	०	७	१३	१३	२४	०
१६	४४	३०	५३	४	५६	०	१०	१०	२४	५६

होरा.



नवमांश.



लग्न, होरा, द्रेष्काण, सप्तमांश, द्वादशांश, दशांश व षोडशांश इतक्या कुंडल्यांत रवि स्वगृहीं येतो व नवमांशांत आणि त्रिंशांशांत उच्च येतो, ह्मणजे रवीला ९ वर्ग मिळाले. ह्मणून तो **ऐरावतांशीं** आहे ! यांचें फल— **"ऐरावते सार्वभौमः सर्वैश्वर्यसमन्वितः"** असें सर्वार्थचिंतामणींत दिलें आहे. या वरून टिळकांची यौग्यता किती आहे, याचा वाचकांनीं विचार करावा. जर टिळकांचा जन्म राजकुलांत झाला असता तर ते **सार्वभौम** राजे झाले असते ! ते साधारण कुलांत उपजले असतांही हिंदुस्थानांत त्यांचें महत्व किती आहे याचा सर्वांनीं विचार करावा. सर्वैश्वर्यसंपूर्ण अशा एखाद्या सार्वभौम राजाला आपण जितका मान दिला असता, तितकाच आज लोक त्यांस देत आहेत !

रवि व शुक्र हे एकाच अंशांत आहेत व त्यांची नुकतीच युति होऊन

गेलेली आहे. रवि हा ग्रहेश असून शुक्र हा दशमाचा अधिपति आहे. दशम हें राज्यभुवन होय. यांचें आधिपत्य दैत्यगुरु जो शुक्र त्यानें घेतलें असून तो लग्नस्वामीशीं युत झाला आहे, हा योग राजकीय घडामोडी कर्त्या पुरुषास साजेसाच झाला आहे असें नव्हे काय ! ज्याच्या जन्मकुंडलींत रविशुक्र लग्नीं उदित असतील तीं माणसें कोणत्याही स्थितींत उपजलीं असलीं तरी तीं बुद्धिमत्ता, श्रेष्ठत्व व पुढारीपणा यांत प्रसिद्ध असल्याशिवाय राहणार नाहींत. शरीराचा काटकपणा व धैर्य हे गुण टिळकांच्या अंगीं विशेष आहेत व ते सिंह लग्न आणि त्या राशींत रवि व शुक्र यांचा योग यामुळें उत्पन्न झाले आहेत. हे गुण अमानुष आहेत व ते हजारांत एखाद्याच्याच अंगीं असतील !

धनस्थानाचा अधिपति बुध हा शनीनें युक्त असा कर्क राशींत व्ययस्थानीं आहे. कर्क हा चंद्राचा राशि असल्यामुळें बुध हा शत्रूच्या घरीं असा व्ययस्थानीं आहे. यावरून त्यांची मूळची स्थिति गरिबीची असून त्यांचें धन शत्रुत्वामुळेंच त्यांच्याजवळ टिकत नाहीं. आजपर्यंत त्यांच्यावर जे मोठाले तीन खटले झाले, ते या गोष्टीची साक्ष देत आहेत.

बुध आणि शनि यांचा योग कायद्याचा अभ्यास दर्शवितो. ते एल. एल. बी. आहेत हें प्रसिद्धच आहे व त्यांचे कायदेपांडित्यही वर्णनीय आहे. हा योग व्ययस्थानीं झाल्यामुळें ते एल्. एल्. बी. होऊनही वकिली करीत नाहींत. धनस्थानावरच विद्या व वाणी यांचा विचार होतो. या स्थानाचें आधिपत्य बुधानेंच घ्यावें. हा बुध शत्रुक्षेत्रीं असल्यामुळें त्यांची विद्याच त्यांना घातक झाली आहे.

तृतीयस्थानीं मंगळ आहे. हा ग्रह या स्थानीं भावंडांचें सुख देत नाहीं. पण मनुष्याच्या अंगीं जी लोकविलक्षण कर्तबगारी असते, आचाट धैर्य व साहस असतें तें याच ग्रहामुळें. हा ग्रह तिसऱ्या स्थानीं असतां मनुष्य

हट्टी व भांडणांत मागें न हटणारा असा होतो. या ग्रहानें टिळकांच्या या वरील गुणांस योग्य असें स्थान स्वीकारिलें ही एक लग्नस्थ ग्रहांस विशेष बळकटी आहे.

नवमस्थानीं गुरु आहे व दशमाचा अधिपति शुक्र व पितृकारक ग्रह रवि हे ग्रह लग्नीं बलवान् आहेत, ते त्यांच्या वडिलांची विद्वत्ता व प्रसिद्धि यांची साक्ष देतात. यांचे वडील यांच्या वयाच्या १७ व्या म्हणजे इ. स. १८७२ च्या आगष्ट किंवा डिसेंबर महिन्यांत परलोकवासी झाले. यावेळीं शनि मकर राशींत षष्ठस्थ होता. व दशमांतील हर्शल सिंह राशींत रवीच्या स्थानीं होता. राहू दशमांत होता. आगष्ट अखेर मंगळ सिंह राशींत होता. याप्रमाणें सर्व पापग्रह त्यांच्या पितृसुखाला प्रतिकूळ होते. जन्मकाळीं चंद्र व राहू हे एका राशीवर असून शनि हा चंद्राच्या चतुर्थस्थानीं आहे व दशमांतील हर्शल चतुर्थ भावावर पूर्ण पाहत आहे. त्यामुळें त्यांची माता बालपणींच कैलासवासी झाली.

सन १८७३ त गुरु कन्येंत द्वितीय स्थानीं असतां म्याट्रिकची परीक्षा उतरली. सन १८७६ त तो धनु राशींत स्वगृहीं पंचमांत असतां बी. ए. ची परीक्षा झाली. व सन १८७९ त गुरु मीन राशींत स्वगृहीं आल्यावर एल्. एल्. बी. पसार झाली. या प्रमाणें गुरूचा त्यांच्या विद्याभ्यासावर यथायोग्य परिणाम घडला.

सन १८८० च्या जानेवारीच्या २ ऱ्या तारखेस **न्यू इंग्लिश स्कूलची** स्थापना झाली. या वेळीं गुरु मीन राशींतच होता. सन १८९० सालीं त्यांनीं सोसायटीशीं असलेला आपला संबंध तोडिला. या वेळीं गुरु कुंभ राशींत चंद्राला १२ वा होता.

सन १८९१ च्या जूनमध्यें त्यांनीं पुणें येथें **लॉ क्लास** काढिला. या वेळीं गुरु मीनेंतच होता. म्हणजे न्यूस्कूलच्या स्थापनाकाळीं ज्या राशींत

होता, त्याच राशींत त्या वेळींही होता ! यानंतर १९०३मध्यें गुरु याच राशींत होता व पुढें १९१५ मध्यें येईल.

सन १८९४ च्या नवंबरपासून २॥ वर्षें शनि चतुर्थस्थानीं वृश्चिक राशींत होता. या स्थानावर मित्रांचा विचार होतो. म्हणून या स्थानांत शनि आल्यावर त्यांचे विद्वान् साह्यकर्ते स्नेही आगरकर व नामजोशी हे मयत झाले.

गुरु मीनेंत असतां संमति बिलासंबंधीं त्यांनीं आपलें प्रतिकूल मत देऊन लोकसेवा केली. व मेषेंत असतां मोहाच्या फुलांच्या संबंधाच्या कायद्याविरुद्ध व ज्यूरीच्या कायद्याविरुद्ध लेख लिहिले. १८९९ त गुरु सिंह राशीचा झाल्यावर त्यांस मध्यभागतर्फे लोकनियुक्त सभासद नेमिलें

सन १८७८ पासून १८८१ पर्यंत शनि मेषेंत होता. म्हणजे यावेळीं साडेसाती होती. याच राशींत १९०८ पासून शनि आला आहे. म्हणून साडेसातीची काळजी करण्याचें कारण नाहीं, इतकेंच नव्हे तर आंतां उत्तरोत्तर मोठालीं कार्यें घडून येण्याचा समय प्राप्त झाला आहे असें वाटतें. नवमस्थानीं मेष राशीचा शनि झाल्यावर त्यांनीं ज्याप्रमाणें न्यूस्कूलची संस्था काढिली त्याचप्रमाणें सांप्रत **राष्ट्रीय शिक्षणाची** शाळा स्थापण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे. तो मागील अनुभवांवरून फलद्रूप होणार यांत शंका नाहीं. हा शनीचा दुसरा फेरा आहे.

गुरु सिंह राशीचा झाल्यावर त्यांस लोकपक्षाकडून मागें मोठा मान मिळाला होता. त्याचप्रमाणें सांप्रतही मिळत आहे. परंतु यंदाच्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं तो या राशींत नाहीं, त्यामुळें त्यांस अध्यक्षाचा मान मिळेल असा फार कमी संभव आहे. गेल्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं गुरु सिंह राशींतच होता व त्या वेळीं अध्यक्षासंबंधानें किती घोटाळा उडाला व त्यांत यांचा संबंध कसा होता, हें सर्वांस माहीत आहेच.

१९०८ या वर्षी सप्टंबरपासून गुरु कन्येचा होईल. तेव्हां यांचे विद्वत्ताप्रचुर अनेक महत्वाचे लेख प्रसिद्ध होतील. व त्यावेळीं कदाचित् एखादा मोठा कारखानाही निघेल. किंवा एखादें अद्वितीय पुस्तक प्रसिद्ध होईल.

दशम स्थानीं हर्शल असल्यामुळें शनि जेव्हां जेव्हां वृषभ आणि वृश्चिक राशीचा झाला तेव्हां तेव्हां त्यांस राजकीय संकटें भोगावीं लागलीं आहेत. या मागील अनुभवावरून १९१० च्या जून पासून शनि वृषभ राशीचा झाल्यावर त्यांनीं आपलें धोरण सावधगिरीचें ठेवावें अशी सूचना देतों.

गुरु व चंद्र हे नवमांत असतील, तर कित्येक वर्षें नांव राहील अशीं सत्कृत्यें होतात. यावरून टिळकांच्या हातून जें राष्ट्रकार्य होणार आहे तें इतकें **बलवत्तर आहे कीं, त्याची गणना शिवाजी**–रामदासासारख्यांच्या कृत्यांत होऊं शकेल. 'रामदासाचे १२०० शिष्य होते तसे शिष्य आह्मांस तयार करावयाचे आहेत' असे जे त्यांनीं सोलापूरच्या व्याख्यानांत उद्गार काढिले ते अक्षरशः खरे होतील असें वाटतें. त्यांच्या कृत्यांस धार्मिक व राजकीय शक्तकर्त्या पुरुषांप्रमाणें स्वरूप येऊन अखेरीस ते **संन्यास** घेतील.

विंशोत्तरी महादशा

बुध	केतु	शुक्र	रवि	चंद्र	मंगळ	राहू
१	८	२८	३४	४४	५१	६९
७	७	७	७	७	७	७
११	११	११	११	११	११	११

या वरून शुक्र महादशेंत उदय होऊन पुढें उत्तरोत्तर वृद्धि होत गेली. सांप्रत राहूची महादशा चालू आहे. ईश्वर त्यांस या दशेंत सुखी करो, अशी त्याजवळ प्रार्थना करून विश्रांति घेतों.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥
'भवभूतिः'

पुस्तक ८वें.] आषाढ शु० ३, बुधवार [अंक १७ वा

सिंहाला पकडलें !

गेल्याच अंकांत लो. मा. टिळक यांनीं सावध असावें, म्हणून सूचना दिली होती, त्याप्रमाणें त्यांच्यावर ता० २४ जून रोजीं राजकीय प्रसंग आल्याचें प्रसिद्ध झालें आहे. १४ व्या अंकांत " या वर्षी बुध आणि शुक्र हे कर्क राशींत फार दिवस आहेत. बुध हा जून व जुलई आणि शुक्र हा मेपासून सप्टंबरपर्यंत या राशींत आहे. कर्क हा चंद्राचा राशि असल्यामुळें ते शत्रुगृहीं दुर्बल आहेत. अर्थात् कवि, ग्रंथकार, वक्ते व वर्तमानपत्रकार यास या काळीं फार त्रास सोसावा लागणार आहे " असें जें लिहिलें होतें त्याचा अनुभव जून महिन्यांत चांगला आला आहे. आतां पर्यंत महाराष्ट्रांत एकंदर ६ वर्तमानपत्रकर्त्ते संकटावस्थेंत आहेत ! व आणखी किती या दडपशाहीच्या तडाक्यांत सांपडतील, तें सांगवत नाहीं. कालच मोठा चमत्कारिक आला आहे. शनि राशिचक्राच्या आरंभीं असून हर्शल दशमात भ्रमण करीत आहे, ही स्थिति आहे तोंपर्यंत सर्वत्र हाहाकारच उडणार असें स्पष्ट दिसत आहे ! मर्जी ईश्वराची !! असो.

आज ज्या जगन्मान्य साधुपुरुषावर त्याच्या वृद्धापकाळीं प्रसंग आला आहे, त्याच्या कुंडलीचें आणखी निरीक्षणकरणें जरूर आहे.

व्यय स्थानीं कर्क राशींत शनि व बुध असून दशमांत वृषभ राशीचा हर्शल आहे. बुध हा द्वितीय स्थानचा आधेपति असून शनि हा शत्रुस्थानचा अधिपति आहे. कर्क राशीचा अधिपति चंद्र आहे व तो शनि आणि बुध या उभयतांचाही शत्रु आहे. बुध आणि द्वितीयस्थान यांवर लेखन व वक्तृत्व यांचा विचार होत असतो आणि शनि व षष्ठ स्थान यांवर शत्रु व संकटें यांचा विचार होतो. हे दोन्ही ग्रह व्ययस्थानीं शत्रूच्या गृहीं असतां जन्म झाल्यामुळें आजन्म शत्रुमय भोगावें लागणार असा योग झाला. व्ययस्थानावर बंधनाचा विचार होतो, ह्मणून हा योग मुख्यत्वें बंधनास कारण झाला. शनि ७ अंश व बुध १२ अंश असल्यामुळें त्यांचा एकमेकांवर परिणाम घडत आहे.

दशम स्थान हें राज्यभुवन आहे. या स्थानांतील हर्शल राजाची अवकृपा संपादन करितो व व्ययस्थानची वर सांगितलेली ग्रहस्थिति त्या अवकृपेनें बंधनयोग उत्पन्न करिते. एकंदरींत दशमांतील हर्शल व व्यय स्थानचे शनि बुध हेच ग्रह यांच्या कुंडलींत राजकीय संकटें उत्पन्न करितात, हें निश्चित आहे

टिळकांचा जन्मकाल कोणताही असो, हीं ग्रहस्थिति त्यांस तुरुंगवास भोगावयास लाविते यांत संशय नाहीं. आह्मीं ता. १ एप्रिलच्या अंकांत जन्म सूर्यदयाचा असावा असें गृहीत धरून कुंडली मांडिली ती कित्येकांस संमत नाहीं. टिळकांच्या पत्रिकेंत जन्मकाळ २ घ. ५ प. आहे. पण त्या वेळच्या कुंडलींत रविशुक्र योग लग्नीं न होतां व्ययस्थानीं होतो. त्यांस आज जो लोकांत विलक्षण मान आहे त्याकडे व त्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेकडे आणि अचा धैर्याकडे लक्ष्य दिलें असतां रविशुक्रयोग लग्नींच पाहिजे असें फलज्योतिषाच्या दृष्टीनें दिसतें. शिवाय त्या जन्मकालावरून बुधशनियोग

व्ययस्थानीं न होतां लाभस्थानीं होतो. ह्मणून आमच्या मतें जन्मकाल सूर्योदयावरोबर असावा. यावर वादविवाद करण्याची आमची इच्छा नाहीं. त्यांच्या कुंडलीकडे दोन दृष्टींनीं अवलोकन केलें पाहिजे. एक त्यांस लोकांत मिळत असलेला मान व दुसरी वारंवार घडणारा तुरुंगवास. अशा दृष्टि विचारांत घेतल्यास त्याचा जन्मकाल आह्मीं ह्मणतों तोच संभवतो.

आजच्या प्रसंगीं तुरुंगवासाचाच विचार करावयाचा आहे. तुरुंगवास भोगण्यास लावण्याचीं कारणें मागें सांगितलींच आहेत. आतां असा प्रसंग केव्हां यावयाचा त्याचा विचार करूं. शनि, बुध व हर्शल यांच्या राजकीय संकट उत्पन्न करणाऱ्या स्थिति पुढील प्रमाणें संभवतात —

१ हर्शल दशमांत.
२ हर्शल व्ययस्थानीं कर्क राशींत जन्मस्थ शनीजवळ.
३ हर्शल चतुर्थस्थानीं स्वसंमुख राशींत.
४ हर्शल षष्ठ स्थानीं मकर राशींत जन्मस्थ शनीच्या समोर.
५ शनि कर्क राशींत व्ययस्थानीं.
६ शनि वृश्चिक राशींत हर्शलच्या समोर.
७ शनि दशमांत हर्शलच्या राशीस.
८ बुध व्ययस्थानीं कर्क राशींत
९ शनिहर्शलयोग, लग्नीं, चंद्राजवळ, दशमांत, चतुर्थस्थानीं, लग्नाच्या व्ययस्थानीं अगर चंद्राच्या व्ययस्थानीं आणि षष्ठ स्थानीं.
१० शनीच्या दृष्टींत हर्शल.

या प्रमाणें १० स्थिति त्यांस संकट सुचवितात असें तात्विक दृष्टीनें ठरलें. मागें जेव्हां शनि दशमांत हर्शलच्या राशीस असून हर्शल जन्मस्थ शनीच्या दृष्टींत होता तेव्हां त्यांस पहिला प्रसंग आला होता. त्यानंतर दुसऱ्या प्रसंगाच्या वेळीं शनि आणि हर्शल हे दोन्ही ग्रह चतुर्थ स्थानीं वृश्चिक राशींत एकत्र होते. त्यावरून

शनि हा मेष राशींत साडेसातीचा असून त्याच्या दशमांत मकर राशींत हर्शल असतां प्रसंग आला पाहिजे हें उघड आहे. शनि हा सन १९०८ च्या मार्च्यपासून १९१० च्या जूनपर्यंत मेष राशींत आहे व हर्शल हा १९१२ च्या फेब्रूवारीपर्यंत मकर राशींत आहे. ह्मणून १९०८ ते १९१० या दरम्यान राजकीय संकट आलें पाहिजे हें तर सिद्धच आहे. अंक ९ मध्यें टिळकांची कुंडली वर्तवितांना हें संकट १९१० मध्यें येईल असें जें ह्मटलें होतें त्यांत हर्शल हा मेषस्थ शनीच्या बरोबर पूर्ण दृष्टींत येणार अशी कल्पना केली होती. १९०८ मध्यें हा योग होत नाहीं. वास्तविक पाहूं गेलें असतां ग्रहांचे योग अगर त्यांच्या दृष्टि ज्या कालीं पूर्ण होणार त्याच कालीं त्यांचा परिणाम घडला पाहिजे. पण तसें न होतां आगें मागें त्यांचे परिणाम होतात असें अनेक वेळां अनुभव आले आहेत. असें कां व्हावें तें समजत नाहीं ! कदाचित् ही किल्ली मनुष्याच्या स्वाधीन केल्यास आपल्या संकेतानुरूप गोष्टी घडून येणार नाहींत असें तर परमेश्वराला वाटलें नसेलना ?

१९०८ मध्यें शनीच्या दशमांत हर्शल आहे, पण दृष्टींत जरी नाहीं, तरी इतर कारणें बरींच बलवत्तर आहेत व तीं गेल्या अंकांत सूचना देतांना कळविलींच आहेत. राहु, रवि, मंगळ, बुध व शुक्र हे पांच ग्रह एकाच कालीं त्यांच्या व्ययस्थानीं कर्क राशींत चंद्राला ४ थे आले आहेत व त्यांच्या समोर हर्शल असून दशमांत शनि आला आणि साडेसाती असून शनीच्या दशमांत हर्शल आहे ही ग्रहस्थिति भयंकर असून दुःख भोगावयास लावणारी आहे खचित ! या वेळीं त्यांचे संरक्षणकर्ता गुरु हा चंद्राला ९ वा व लग्नीं सिंह राशींत आहे तो त्यांस या संकटांतून पार पाडो इतकी प्रार्थना करून स्थलाभावास्तव हा विषय आज पुरा करितों.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥

' भवभूतिः '

पुस्तक ८वें.] आषाढ शु० १२, शनिवार [अंक १८ वा

टिळकांच्या कुंडलीचा आणखी विचार.

गेल्या अंकांत टिळकांच्या कुंडलींत जे शनिबुध व हर्शल पडले आहेत तेच राजकीय संकटें उत्पन्न करितात, असें सांगून अशा प्रकारचीं संकटें केव्हां केव्हां उत्पन्न होण्याचा संभव आहे याचा विचार केला. शनि, हर्शल व बुध यांच्या १० प्रकारच्या स्थिति त्यांस राजभय उत्पन्न करितात यांत तिलप्राय शंका नाहीं. तथापि केवळ एकच स्थिति अपरिहार्य संकट आणूं शकेल असें समजूं नये. एकच प्रकारची स्थिति फार तर सरकारची अवकृपा मात्र संपादन करील, यापेक्षां तिच्यानें कांहीं जास्त होणार नाहीं. अपरिहार्य

संकटाच्या वेळीं हे तीनही ग्रह बिघडले पाहिजेत. मागील दोन्ही संकटकालीं अशीच स्थिति होती व आतांही तशीच आली आहे. दृष्टि अगर योग ज्या कालीं पूर्ण होतात, त्याच कालीं वास्तविक एखादी गोष्ट घडली पाहिजे. परंतु सर्वदा तसा अनुभव येत नाहीं, ह्मणून भविष्याच्या वेळा चुकतात. दृष्टि अगर योग ज्या कालीं पूर्ण होणार त्याच कालीं जर परिणाम घडले असते तर भविष्य कालीन गोष्टींच्या तिजोरीची किल्ली मनुष्याच्याच स्वाधीन राहिली असती व मग मनुष्य पाहिजे तें करूं शकता! परंतु ही किल्ली परमेश्वरानें आपल्या हातांत ठेविली आहे, असें जरी आहे तरी मनुष्यांस कालमर्यादा ठरवितां यावी अशी योजना त्यानें करून ठेविली आहे हे त्याचे आमच्यावर अनंत उपकार आहेत हीं कालमर्यादा दृष्टि आणि योग यांवरच अवलंबून आहे. ग्रहांचा अंशपरत्वें अनुभव येईल तर वेळा नेमक्या सांपडतील व तशा केव्हां केव्हां सापडतातही. पण साधारणपणें नक्षत्रपरत्वें कालमर्यादा ठरविल्यास तिच्या बाहेर क्वचित्च गोष्टी घडतील असें वाटतें. या कुंडलींत तसा विचार करितां यावा, ह्मणून त्यांचे ग्रह कोणत्या नक्षत्रांत आहेत व त्यांतील राजकीय उत्पन्न करणारे ग्रह कोणत्या नक्षत्रांत गेल्यावर संकट सुचवितात यांचा विचार प्रथम केला पाहिजे.

टिळकांच्या कुंडलींत खालीं लिंहिल्याप्रमाणें नक्षत्रस्थ ग्रह आहेत.—

रवि—मघा. चंद्र—अश्विनी. मंगळ—विशाखा
बुध—पुष्य. गुरु—अश्विनी. शुक्र—मघा.

शनि—पुष्य हर्शल—मृग. राहु—भरणी.

शनीची तृतीय, सप्तम व दशम स्थानावर पूर्ण दृष्टि असते, ह्मणजे तो ज्या नक्षत्रांत असेल त्यापासून ६ व्या, १४ व्या व २२ व्या नक्षत्रावर पूर्णत्वें पाहतो असें सिद्ध होतें टिळकांचा शनि **पुष्य** नक्षत्रांत आहे ह्मणून तो **हस्त, उत्तराषाढा** आणि **भरणी** इतक्या नक्षत्रांवरील ग्रहांस पूर्णपणें पाहील हें उघड आहे. सन १९०८ च्या मार्च्यच्या १९ व्या तारखेला शनि **अश्विनी** नक्षत्रांत गेला तेथें तो सन १९०९ च्या एप्रिल पर्यंत असेल. या नक्षत्रापासून २२ वें नक्षत्र **श्रवण** येतें. या नक्षत्रावर हर्शल सन १९०७ च्या मार्च्यपासून सन १९१० च्या मार्च्यपर्यंत आहे, अर्थात् हा हर्शल शनीच्या दशमांत व पूर्ण दृष्टींत आला. ह्मणून आपणास १९०८ च्या मार्च्यपासून १९०९ च्या एप्रिलपर्यंतची राजकीय संकट उत्पन्न होण्याची कालमर्यादा आहे असें ठरवितां येईल. या कालमर्यादेंतच प्रस्तुतचें संकट उत्पन्न झालें आहे, ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

तथापि केवळ याच एका योगावर हें संकट आलें असें नाहीं. यास आणखीही अनेक योग कारणीभूत झाले आहेत, ते असे.—

१ जन्मकालाचा चंद्र अश्विनी नक्षत्रांत असून त्याच नक्षत्रांत शनि आला.

२ जन्मकालीं दशमांत हर्शल आहे व सांप्रत तो चंद्राच्या दशमांत आला आहे.

३ जन्मकालच्या बुधाप्रमाणेंच याही वेळीं तो व्ययस्थानीं शत्रु-

गृहीं आला आहे. व तो ता० १६ जूनपासून आश्लेषा नक्षत्रांत असून ता. २२ जूनपासून वक्री झाला आहे ! हा वक्री झालेला बुध हर्शलच्या समोरच्या नक्षत्रांत आला. हा ग्रह ता. १८ जुलईला मार्गी होतो. व पुनः ता. २९ जुलईपासून हर्शलच्या समोर होतो. व्ययस्थानीं शत्रुगृहीं वक्री झालेला बुध फार अनिष्ट होय. ह्मणूनच वक्री झाल्यावर त्यांस दुसऱ्याच दिवशीं पकडण्यांत आलें !

४ सिंहासारखे पराक्रम घडवून आणणारा व कलह उत्पन्न करणारा मंगळ जन्मकालींच दशमस्थ हर्शलावर पूर्णपणें पाहत आहे. हा ग्रहही ता. १७ जूनपासून आश्लेषा नक्षत्रांत असून त्याच्या पूर्ण दृष्टींत हर्शल आहे. कुंडलींत केव्हांही व्ययस्थानीं मंगळ आला, ह्मणजे तो विशेषेंकरून सांपत्तिक हानि करितो असा सामान्य नियम आहे. या कालींही टिळकांची सांपत्तिक हानि होणार हें स्पष्ट आहे. हा मंगळ जेव्हां व्ययस्थानीं शनि हर्शल यांनीं युक्त होतो किंवा त्यांच्या समोर होतो तेव्हां शत्रुभय वं शारीरकष्ट उत्पन्न करितो, हेंही ज्योतिषी वाचकांस अवगत असेल. ता० ८ जुलईपर्यंत तो या नक्षत्रांत आहे.

हीं चार कारणें मुख्यतः संकट उत्पन्न करण्यास कारणीभूत झालीं आहेत. शिवाय दशमाधिपति शुक्र हाही जून मध्यें आश्लेषा नक्षत्रांत असून ता० १५ पासून वक्री आहे. रवि आणि राहू हे कर्क राशीच्या आरंभींच आहेत व ते चंद्राच्या सुखस्थानीं आहेत. या दोन कारणांचीही अंशतः भर पडली आहे. त्यांची चंद्रकुंडली मांडिल्यास ती अशी होते.—

जून ता. २४ बुधवार.



चंद्र हा शनीनें दूषित होऊन त्याच्या सुखस्थानीं ४ पाप ग्रह व २ शुभग्रह—पण ते ही शत्रुगृहीं—आले आहेत व दशमांत—राज्य भुवनांत—हर्शल आला आहे. ही सर्व ग्रहस्थिति संकट व दुःख सुचविते हें ज्योतिःशास्त्राच्या दृष्टीनें उघडच आहे.

आतां आपल्यापुढें महत्वाचा प्रश्न असा आहे कीं या संकटांतून त्यांची मुक्तता होईल कीं कारागृहवास भोगावाच लागेल? ज्योतिःशास्त्राच्या दृष्टीनें संकटाचें अनुमान जसें बिनचूक करितां आलें तसें वरील प्रश्नाचें अनुमान अगदीं बरोबर करितां येणें कठीण आहे. हल्लींच्या दडपशाहीच्या धोरणाकडे आपण लक्ष पुरविल्यास त्यांची सुटका होईल असें मानणें वेडगळपणाचें होईल. तथापि आपणास ज्योतिःशास्त्राच्या दृष्टीनेंच विचार करावयाचा असल्यामुळें वरील गोष्ट आपण बाजूस ठेवूं. या वेळच्या कुंडलींत गुरु मात्र त्यांचें रक्षणकर्त्ता आहे. हा ग्रह मार्गी असून तो वाढत्या गतीनें चालत आहे. हा ग्रह चंद्राला ५ वा असून त्यांच्या कुंडलींत लग्नीं आहे. ह्मणून तो त्यांचें संरक्षण करणारा आहे, यांत शंका नाहीं.

साहस, धैर्य, शत्रूला चीत करण्याचें सामर्थ्य इ० गुण उत्पन्न करणारा ग्रह जो मंगळ तो जुलईच्या ८ व्या तारखे पासूनच सिंह राशीचा झाला. या राशींत हा ग्रह अत्यंत बलवान् असतो. खट-

त्याच्या वेळीं तो याच राशींत असल्यामुळें वरील गुण त्या वेळीं चांगले दृष्टीस पडतील हें स्पष्ट आहे. गुरूच्या मदतीला हा दुसरा बलवान् ग्रह आला आहे त्यामुळें गुरूचें सामर्थ्य वाढणार आहे.

ता. १८ जुलईपासून बुध मार्गी झाला. त्यामुळें तो आतां विशेष अनिष्ट राहिलेला नाहीं. तथापि ता. २७ ला तो हर्शलच्या समोर येणार आहे व अद्यापि त्यानें कर्क राशि सोडिला नाहीं म्हणून तो कल्याणकारक आहे असें म्हणतां येत नाहीं. ता. ७ आगष्टला तो सिंह राशींत येईल नंतर तो त्यांस यशस्वी करणारा होईल.

शुक्र ता. २८ जुलईपासून मार्गी होईल. हा ग्रह सपटंबरच्या ९ वी पर्यंत कर्क राशींतच आहे. त्यामुळें तोही टिळकांस अनुकूल नाहीं.

ता. २४ जुलईपासून रवि सिंह राशींत जाईल व तेव्हांपासून तो गुरु व मंगळ यांस साह्यकर्त्ता होईल.

सर्वांत वाईट गोष्ट अशी आहे कीं शनि हा ता. २३ जुलईपासून ता. ७ डिसेंबरपर्यंत वक्री आहे. हा ग्रह जर वक्री नसता तर त्याची विशेष काळजी नसती. परंतु दुर्दैव आमचें तो ७ माहेने **अश्विनी** नक्षत्रांत वक्री आहे. सन १९०९ च्या एप्रिलपर्यंत तो हें नक्षत्र सोडित नाहीं. !

या सर्व गोष्टी विचारांत घेतल्या म्हणजे असें अनुमान होतें कीं टिळकांवर जरी **तीन** आरोप ठेवण्यांत आले आहेत, आणि सरकारची दृष्टि जरी वक्र झाली आहे, तरी ते आपली बाजू त्यांच्या लौकिकाप्रमाणेंच उत्तम रीतीनें सिद्ध करितील, व प्रतिपक्षाला जेरीस आणितील. त्यामुळें ते लोकांस अधिकच पूज्य होतील. परंतु त्यांस थोडाबहुत तरी कारागृहवास भोगावा लागणार यांत तिलप्राय शंका

नाहीं ! जर शनि वक्र नसता तर मात्र ते अजीबात दोषमुक्त झाले असते. त्यांस सुमारें नऊ महिने तरी शिक्षा व्हावी असें वाटतें. शिक्षेची मुदत नेमकी सांगतां येणें शक्य नाहीं. वरील लिहिण्याचा आशय इतकाच आहे कीं त्यांस फार थोडी शिक्षा होईल. **गुरु** मंगळ, व रवि या तीन बलिष्ठ ग्रहांचा या वेळीं बराच चांगला परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीं. अजीबात दोषमुक्त होतील अशी मात्र आमची मनोदेवता आह्मांस सांगत नाहीं. यासाठीं सर्व टिळभक्तांस अशी **सूचना** आहे कीं प्रत्येकानें यथाशक्ति शनीची आराधना करावी. टिळकांस निळ्या रंगाच्या पोषाखानें कोर्टांत हजर ठेवावें. **अंगरखा** व **पगोटें** यांचा रंग जरूर जरूर **निळा** असावा. अंगावर जरीकांठी उपरणें किंवा निळ्या रंगाची **शाल** असावी. एका हातांत **हिऱ्याची** व एका हातांत इंद्रनीळाची आंगठी असावी कपाळाला **कस्तूरीचा** टिळा असावा. अशा पोषाखानें जर ते आपलें काम चालवितील तर न्यायाधीशाच्या व सरकारच्या दृष्टींत खचित फरक पडेल. दृष्टींत फरक झाला कीं खटल्यास सौम्य स्वरूप आलेंच पाहिजे. इकडे त्यांचे हितकर्ते व सल्लामसलतगार लक्ष देतील काय ?

शास्त्रीय चमत्कार.

आमच्या वाचकांस माहितच आहे कीं, कोर्टातील खटल्यांचा विचार सप्तम स्थानावर होत असतो. म्हणून खटल्याच्या दिवशीं **चंद्र** पुढील स्थितींत असलाच पाहिजे.—

१ लग्नाच्या सप्तमांत.
२ चंद्राच्या सप्तमांत.
३ जन्मकालच्या अगर त्या दिवशींच्या लग्नस्वामीच्या सप्तमांत.

४ जन्मकालच्या अगर त्या दिवशींच्या सप्तमेशाच्या सप्तमांत.

या चार स्थितींतून कोणत्यातरी स्थितींत चंद्र असला पाहिजे. त्याचप्रमाणें खटल्याच्या वेळचें **लग्नही** अशाच स्थितींत असलें पाहिजे. लग्न व चंद्र अथवा निदान दोहोंपैकीं एक तरी वरील स्थितींत नसेल तर फलज्योतिष **खोटें** व **बेभरंशाचें** आहे असें मानण्यास हरकत नाहीं.

दे० भ० परांजपे यांचा खटला ता१ जुलईपासून चालावयाचा असें प्रसिद्ध झालें आहे. या दिवशींचा चंद्र सायन तूळ राशींत आहे, ह्मणजे तो त्यांच्या कुंडलींत लग्नाच्या, लग्नेशाच्या व चंद्राच्याही **सप्तमांत** आहे!

लो० टिळक यांचा खटला ता० १३ ला चालणार असें प्रसिद्ध झालें आहे. या दिवशींचा चंद्र सायन मकर राशींत आहे, ह्मणजे तो त्या दिवशींच्या लग्नेशाच्या सप्तमांतच आहे, टिळकांचा लग्नेश रवि असून तो त्या दिवशीं कर्क राशींत आहे. त्याचें सप्तमस्थान मकर राशि होय.

खटल्याचा दिवस अशुभ आहे!

ता. १३ चा चंद्र मकर राशींत असल्यामुळें तो षष्ठ (शत्रु) स्थानीं शत्रूच्या गृहीं आहे. षष्ठ स्थानचा चंद्र अपयश देतो असा या शास्त्राचा सामान्य नियम आहे. तशांत तो शत्रूच्या गृहीं असला तर खात्रीनें अपयश येणार ह्मणून समजावें. हा चंद्र शनीच्या पूर्ण (दशम) दृष्टींत असून हर्शलाशीं युति करीत आहे! त्यामुळें खटल्याचा आरंभ अशुभ मुहूर्तावर होणार आहे. कोणतेंही कारण लावून हा दिवस टाळण्याचें टिळकपक्षाच्या हातांत असेल तर त्यानें तो अवश्य टाळावा अशी आमची आग्रहाची सूचना आहे.

दे. भ. परांजपे यांचा चंद्रही तशाच प्रकारचा आहे. तोही त्यांच्या कुंडलींत षष्ठ स्थानीं शत्रुगृहीं व शनीच्या पूर्ण दृष्टींत आहे. ह्मणून त्यांसही अशुभ मुहूर्तच दैवयोगानें प्राप्त झाला आहे! त्यामुळें अपयशाचाच वांटा अखेरीस मिळणार असें सिद्ध होतें.

लोकांची दुर्दशा

फलज्योतिषांत सामान्य जनतेचा कारक ग्रह चंद्र आहे. लोकमत या ग्रहावर अवलंबून आहे. खट्ल्याचया दिवशीं चंद्र अत्यंत दुर्बल व त्रस्त झालेला आहे. त्या दिवशीं सायंकाळीं ४ वाजून २२ मि. नीं तो हर्शलवरून जाणार आहे, व हर्शलशीं त्याची एकरूपता होणार आहे. त्याचप्रमाणें ४ वाजून ३७ मिनिटांनीं तो नेप्च्यूनच्या समोर येणार आहे. शिवाय तो शनीच्या दृष्टींत आहेच! यावरून असें अनुमान होतें कीं, या दिवशीं लोकांचा विलक्षण समुदाय जमेल व त्या योगानें त्यांस बरेच हाल सोसावे लागतील. हर्शल हा विलक्षण गोष्टी घडवून आणितो असा त्याचा स्वाभाविक धर्म आहे.

स्पेशल ज्यूरी

टिळकांच्या खटल्यासाठीं स्पेशल ज्यूरी नेमण्यांत येणार आहे. या ज्यूरींत फार तर दोन विद्वान् नेटिव्ह असण्याचा संभव आहे. त्यांत एक ग्रंथकर्ता किंवा कवि असून दुसरा उत्तम लेखक किंवा वक्ता असेल. हे दोघेही उत्तम विद्वान् असतील. पण त्यांचा आरोपीला विशेष उपयोग होईल असें वाटत नाहीं. कारण तद्दर्शक ग्रह शत्रुगृहीं आहेत.

ता. १५।१६ हे दिवस त्यांस अनुकूल आहेत. १७।१८ हे दिवस सामान्य आहेत. १९ पासूनचे दिवस विपत्तीचे आहेत.

या प्रमाणें त्यांच्या कुंडलीवरून पुढें दिसणाऱ्या गोष्टींचा विचार केला आहे. ता. २१ जूनच्या अंकामध्यें " ही ग्रहस्थिति प्रतिपक्षाकडून टिळकांवर घोरपड आणण्याचा प्रयत्न करील, पण तिच्यानें तुरुंगवास भोगावयास लावणार नाहीं हें निश्चित आहे. " असें झटलें होतें. परंतु त्या वेळीं इतका सूक्ष्म विचार केलेला नव्हता. आजच्या अंकांतील विचार आमच्या समजुतीनें बरोबर असून आतां त्यांत फेरबदल करण्याचें प्रयोजन नाहीं.

रस्ता बंद.— मुंबई पोलिस कमिशनर मि. एच. जी. जेल यांनीं एक जाहिरनामा काढून असें प्रसिद्ध केलें आहे कीं, ता. ६ जुलै सन १९०८ पासून हायकोर्टाचें चालू फौजदारी सेशन्स कोर्टापर्यंत ट्रेचर आणि कंपनींच्या इमारतीच्या कोपऱ्यांपासून युनिव्हर्सिटीपर्यंत जाणारा एल्डन रोड आणि उत्तरेस पब्लिक वर्क्स ऑफिसापासून सुरू होऊन दक्षिणेस युनिव्हर्सिटी कंपौंडपर्यंत हायकोर्टाच्या इमारतीशीं समांतर जाणारा मेयो रोडचा भाग आणि पायरस्ते दररोज सकाळीं दहा वाजल्यापासून सायंकाळीं सात वाजेपर्यंत सार्वजनिक व्यवहारासाठीं बंद ठेवण्यांत येतील.



पत्रव्यवहार.

रा रा. कुंडलीविज्ञानकर्त्ते यांस.—

वि. वि आपण ता. १ ली एप्रिल १९०८ च्या कुंडलीविज्ञानाच्या अंकांत रा. रा. बाळ गंगाधर टिळक यांची भावचालित कुंडली दिली आहे, ती चुकीची दिसते. प्रथम चंद्र मीन राशींत २८ अंश व ४४ कला आपल्या कुंडलींत दिला आहे, तो तसा नसून सायन मेष राशींत २ अंश व ३९ कला येतो. तसेंच राहू मीन राशींत १३ अंशाचा दिला आहे, तो तसा नसून सायन मेष राशीचा १९ अंश व १८ कलेचा आहे अर्थात् आपण दर्शविलेल्या दशा चुकीच्या ठरतील. शिवाय लग्नाची संधि व ग्रहांची भाव संधि ठरविण्याकरितां आपण जन्मकाल २ घटका मागें धरला आहे. रा. टिळकांनीं त्यांचा खरा जन्मकाल शके १७७८ आषाढ कृ० ६ बुधवार या दिवशीं सूर्योदयानंतर २ घ. ५ प दिला आहे. तेव्हां त्यांच्या जन्मकालांत इतकी चूक संभणार नाहीं. आपण पुढें असें झणतां कीं, " गर्भात गर्भस्थान सोडलें कीं त्याचा जन्म झाला असें मानण्यास काय हरकत आहे, अर्थात् गर्भाशय सोडण्याचा जो काल, तोच जन्मकाल मानिला पाहिजे. " आपलें हें झणणें जसें वेदांतमतास तसेंच तें युरोपीय ज्योतिष मतास ही मुळींच अनुसरून नाहीं. प्राणोत्क्रमण होतां वेळीं ज्या प्रमाणें शेवटला श्वास एकदां सोडला झणजे पृथ्वीवरील यात्रा संपली असें आपण झणतों, त्याच प्रमाणें मूल गर्भाशयाच्या बाहेर येऊन तो जेव्हां पहिला श्वास ओढतो तेव्हांच तो त्याचा वास्तविक जन्मकाल होय व फलज्योतिषांत हाच काल धरला पाहिजे. शिवाय आपणास एवढा सूक्ष्म विचार करण्याचें कारण, अपल्या मतें रवि व शुक्र

हे लग्नाबरोबर उदित असले पाहिजेत व चंद्र नवमस्थानीं पाहिजे. आमच्या मतानें हे ग्रह तसे येतात व एवढी ओढाताण करण्याची जरूर पडत नाहीं. आम्ही सायन व निरयन कुंडल्या खालीं देत आहों व फलांचा मेळ बसण्यापुरता केसरीकर्लीनीं दिलेल्या काला मागें आम्हीं फक्त १० पलें काल धरला आहे म्हणजे रा. रा. टिळकांचा जन्म रत्नागिरी येथें बुधवार ता. २३ जुलै १८५६ रोजीं सकाळीं ६ वाजून २० मिनिटांनीं झाला. या कालची स्पष्ट कुंडली.

सायनभावचलित.



निरयन



भावचलित



आमच्या मतें निव्वळ राशी वा विचार करितांना सायन राशी घेणें बरें, पण त्यांचे स्वामी व ग्रहांचे उच्च नीच पहातांना निरयन राशी घेणें बरें. फलें अधिक चांगलीं मिळतात. या प्रमाणें पाहिलें म्हणजे रा. टिळकांच्या कुंडलींत सिंह राशीचे ७ अंश उदित असून रवि व शुक्र त्याच राशींत येतात व ते लग्नींच धरले पाहिजेत. अनुभवावरून युरोपीय ज्योतिषी राशीच्या शेवटील दहा अंशांपर्यंतचे ग्रह पुढील राशींत आहेत असें मानतात. अर्थात्, कुंडलींत रवि व शुक्र लग्नींच मानले पाहिजेत. चंद्र नवमस्थानीं येतोच. सिंह राशीचा ७ वा अंश उदित आहे व या उदित अंशाबरोबर आसेलस तारा उदयास आला आहे. या ताऱ्याचें फल रवि मंगळाप्रमाणें आहे. सर्व राशींमध्यें या अंशावर जन्मणारा मनुष्य अत्यंत थोर पदास चढतो. असा मनुष्य जन्मतः अधिकारी, अत्यंत दूरदर्शी व विलक्षण धैर्याचा असून सकल राष्ट्राचा तारक होतो.

सदर कुंडलींत मंगळाखेरीज सर्व ग्रह आकाशांत उदित आहेत. लाभस्वामी व धनाधिपति एकत्र लग्नांत व लग्नस्वामी व भाग्यस्थानाधिपति एकत्र भाग्यस्थानीं हा राजयोग आहे. तृतीय स्थानीं मंगळ, बुध व गुरु स्वगृहींचे व गुरु चंद्र युति आहे.

अशी जरी ग्रहस्थिति आहे तरी कुंडलींत कांहीं योग चांगलेसे नाहींत. कुंडलींत मंगळ उदित नाहीं किंवा तिसऱ्या स्थानीं उच्च किंवा स्वगृहींचा नाहीं. दशमांत हर्शल व बाराव्यांत शनी आहे. हे योग रा. टिळकांस राजकीय संकटें भोगावयास लावतात. कुंडलींतील इतर सर्व ग्रहांप्रमाणें मंगळ आकाशांत उदित असता तर रा. टिळकांस राजकीय बाबतींत पूर्ण यशप्राप्ति झाली असती.

सांप्रत साडेसाती दशेचा पूर्ण मध्य आहे. शनी चंद्रावर असून स्वस्थानाकडे वर्तुळपाद दृष्टीनें पाहत आहे. शुक्र, बुध, मंगळ, रवि राहू व नेपच्यून हे ग्रह हल्लीं कुंडलींतील शनीवर व्ययस्थानीं असून हर्शल षष्ठस्थानीं त्यांच्या समोर आहे. पुढील सप्टंबर पर्यंत ग्रहस्थिति बदलत नाहीं. या गोष्टी राजकीय भय, हानी व मानसिक त्रास उत्पन्न करतात; निदान पुढील वर्षाच्या एप्रिलपर्यंत तरी साडेसातीचा पहिला झटका आहे, असें मानलें पाहिजे. त्यानंतर शनी दशमांत व हर्शलावर येतो अर्थात् यापुढील २ वर्षें ही चिंता उत्पन्न करण्यासारखीं आहेत. तरी गुरु कुंडलींत चंद्रासमावेत आहे व हल्लीं तनुस्थानांत आहे, ह्मणून रा. टिळकांच्या शरीरास अपाय होण्याची धास्ती नाहीं.

मुंबई
ता. १ ली जुलै १९०८.

आपला
युझील सालोमन.

सांवतवाडी संस्थानचे रा. नारायणबुवा ओरोसकर यांनीं पुढें लिहिल्याप्रमाणें भविष्य केलें आहे ता. १ जुलई १९०८ पासून १९०९ अखेरपर्यंतचे दिवस हिंदी लोकांना फारच अरिष्टकारक असून प्रवास, स्त्रीपुत्रादिकांचा विरह, दैन्य, चिंता आणि बंधन इत्यादि कारणांनीं त्रास पोंचण्याचा संभव आहे. सन १९१० पासून हिंदी लोकांना अनेक कर्मीचें भारवाहित्व पत्करावें लागून द्रव्यादिकांची हानि होण्याचा संभव आहे. हे दिवस इंग्रजांना अनेक शोचनीय लहरींनीं व्यापक होण्याचा योग आहे. सन १९१३ पासून १९१५।१६ पर्यंतचे दिवस हिंदी लोकांना तेजोवर्धक व लाभदायक होतील. १९१५।१६ चे सुमारास हिंदुस्थानांत अशी एक अपूर्व घटना होईल कीं, ती साऱ्या स्मारकांवर अग्रगण्यता पावेल!

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥

'भवभूतिः'

पुस्तक ८वें.] आषाढ व० ८, मंगळवार [अंक १९ वा

दे. भ. अभ्यंकरांचें पत्र

ता० ८ जूनच्या राष्ट्रमतांत दे. भ. महादेव गोविंद अभ्यंकर यांनीं एक पत्र प्रसिद्ध करून २५ रुपयांचें बक्षीस लाविलें आहे. त्यांत ज्योतिषी लोकांस त्यांनीं पुढील प्रश्न विचारिले आहेत.—

१ खटल्याचा निकाल कोणत्या तारखेस होईल?
२ शिक्षा किती होईल?
३ साधी कीं सक्तमजुरी?
४ दंड झाल्यास किती?
५ ज्यूरींत एकमत होईल कीं मतभेद?
६ मतभेद झाल्यास त्यांची संख्या?

या प्रमाणें सहा प्रश्न विचारिले असून त्यांचीं उत्तरें ता० १९ जुलईच्या आंत मागितलीं आहेत. व ज्याचें अनुमान बरोबर जमेल त्यांस २५ रुपये बक्षीस देईन असें औदार्य प्रगट केलें आहे! हें बक्षीस अनुमानांस ग्रंथांचा आधार स्पष्ट असेल तरच दिलें जाणार

आहे ! त्यांच्या मतें या प्रश्नांचीं उत्तरें जर कोणास देतां आलीं नाहींत तर ज्योतिष हें **खरें नव्हे**. हें शास्त्र खरें आहे कीं खोटें आहे याबद्दल त्यांस शंका असून त्याची परीक्षा पाहण्यासाठींच त्यांनीं वरील बक्षीस लाविलें आहे.

दे. भ. अभ्यंकरांचा लेख भाषासरणीवरून प्रामाणिकपणाचा दिसतो. परंतु त्यांनीं जे प्रश्न विचारिले आहेत त्यांवरून कुचेष्टेचाही कित्येकांस बोध होणें संभवनीय आहे. याचें प्रत्यंतर ता. ११ जुलईचा राष्ट्रमताचा अंक पहा. त्यांत चवथ्या पेजवर दे. भ. केसकरांनीं यथायोग्य उत्तर दिलें आहे. अभ्यंकरांनीं खरोखरच प्रामाणिकपणानें प्रश्न विचारिले असतील तर ज्योतिःशास्त्राविषयीं त्यांच्या काल्पनिक महत्वाचें कोणासही हसूं येईल ! त्यांनीं या शास्त्राचा थोडासा अभ्यास केला आहे व त्यावरून रा० टिळक हे अगदीं **निर्दोषी** ठरतील असें अनुमान काढिलें आहे. परंतु या अनुमानास त्यांनीं ग्रंथांचा **आधार** दिला नाहीं, हें आश्चर्य आहे ! दे. भ. अभ्यंकरांनीं ज्योतिषचा ज्या पद्धतीनें अभ्यास केला आहे त्याच पद्धतीनें सर्व ज्योतिष्यांनीं केलेला असला पाहिजे आणि ते ज्याप्रमाणें अनुमान बांधितात त्याप्रमाणेंच इतर ज्योतिषीही बांधितात. सर्व ज्योतिषी नऊ किंवा अकरा ग्रह, बारा राशि व बारा भाव यांवरूनच अनुमानें बांधीत असतात. व चांगल्या अथवा वाईट ग्रहस्थितीवरून कोणत्याही प्रश्नाचें उत्तर देत असतात. उत्तर देतांना कोणत्या ग्रहाला महत्व अधिक दिलें पाहिजे हें ज्याच्या त्याच्या मतावर अवलंबून राहतें. त्यामुळें कित्येकांचीं उत्तरें बरोबर येतात व कित्येकांचीं चुकतात. उत्तरें बिनचूक देतां येणें हें शास्त्रावर नसून मनुष्याच्या अनुभवावर अवलंबून आहे. एकाच गोष्टींचा ज्यानें अनेक वेळां अनुभव घेतला असेल त्याचें अनुमान बरोबर उतरतें. ह्मणून अनुमान चुकलें कीं शास्त्रच **खोटें** असें ह्मणतां येणार नाहीं. एखाद्या

रोगाची मी मी ह्मणाविणाऱ्या वैद्यास सुद्धां परीक्षा होत नाहीं व त्यानें दिलेल्या **रामबाण** औषधांचाही कांहीं उपयोग होत नाहीं, पण तेवढ्यावरून **वैद्यशास्त्रच खोटें** असें कोणी ह्मटलें आहे काय ? रोगाची बरोबर परीक्षा होईल व त्याला यथायोग्य औषध मिळेल तर रोगी उतरलाच पाहिजे, हा वैद्यशास्त्राचा सिद्धांत आहे. कित्येक वेळां रोगाची परिक्षाच होत नाहीं. परीक्षा झाली तरी रोग्याला काय मानवेल व काय न मानवेल हें कळत नाहीं त्यामुळें रामबाण औषधेंही व्यर्थ जातात, याला वैद्यशास्त्रानें काय करावें ? तात्पर्य अनुमान चुकलें ह्मणून शास्त्र खोटें ठरवितां येणार नाहीं. आमच्यामतें हा दोष ज्योतिष्यांचा आहे. ज्योतिषी ज्या कारणावरून अनुमान बांधितो तें कारणच चुकीचें असेल तर भविष्य बरोबर कसें उतरेल ? कारण हुडकून काढणें हें ग्रंथाधीन नाहीं, तें मनुष्याच्या अनुभवावर अवलंबून आहे. या प्रमाणें वास्तविक स्थिति आहे. ही स्थिति अभ्यंकरांनीं मनांत आणावयास पाहिजे होती. अभ्यंकरांस वाटतें कीं ज्योतिष्यानें वाटेल त्या प्रश्नाचें उत्तर दिलें पाहिजे. पण मग वैद्यानें वाटेल तो रोग बरा केला पाहिजे, आणि वकिलानें वाटेल तो खटला जिंकला पाहिजे असें कां ह्मणूं नये ? या प्रश्नाचें ते उत्तर देऊं शकतील काय ; तात्पर्य अभ्यंकरांचे प्रश्न सांप्रतच्या मनुष्यस्थितीच्या बाहेरचे आहेत व ह्मणूनच त्यांबद्दल हसूं येतें ! अभ्यंकरांचे प्रश्न जसे असंभवनीय आहेत तसे केसकरांनीही त्यांना असंभवनीय प्रश्न केले आहेत. ते जशास तसेच आहेत, असें आह्मांस वाटतें.

असो. खटल्याचा निकाल अद्यापि लागलेला नाहीं. तो लागल्यावर वरील बक्षीस कोणता यक्षकिन्नर उपटतो, तो कोणकोणत्या ग्रंथांच्या आधारें आपलें ह्मणणें सिद्ध करितो व दे. भ. अभ्यंकर या संबंधानें काय काय प्रसिद्ध करितात तें पाहून नंतर अधिक

लिहिणें बरें. कदाचित् असा एखादा **सहदेव** निघेलही, नाहीं कोणी ह्मणावें ?

टिळकांवर खटला झाल्यानंतर कित्येक ज्योतिष्यांनीं भविष्यें आपापल्या मतानुसार प्रसिद्ध केलीं आहेत. त्या सर्वांचाही यथावकाश पुढें विचार करावयाचा आहे. टिळकांसंबंधानें आह्मी विचारपूर्वक केलेल्या भविष्यांपैकीं आज जीं आमच्या समजुतीनें बरोबर उतरलीं आहेत, तीं अशीं.—

१ **ता. २१ जूनचें भविष्य.**—" टिळकांवर घोरपड येणार "

२ **ता ११ जुलईचें भविष्य.**—" ते आपली बाजू त्यांच्या लौकिका प्रमाणेंच उत्तम रीतीनें सिद्ध करितील, व प्रतिपक्षाला जेरीस आणितील. त्यामुळें ते लोकांस अधिकच पूज्य होतील ! "

३ **ता. ११ जुलईचें २ रें भविष्य.**—" ज्यूरींत **फार तर** दोन नेटिव्ह असण्याचा संभव आहे ! "

आतां बाकीच्या भविष्याचा अनुभव घेणें आहे. नं० ३ चें भविष्य विशेष महत्वाचें आहे. फार तर या शब्दावरून वाचकांच्या ध्यानांत येईल कीं, टिळकांस नेटिव अधिक किंवा बरेच अशी ज्यूरी मिळण्याचा योग नाहीं असें ध्वनित होतें. दोन ही संख्या जुळण्यांत महत्व नाहीं. युरोपियन बरेच असतील हें सुचविणें बहुमोल नव्हे काय ? परांजप्यांस पांच नेटिव्ह व चार यूरोपियन अशी ज्यूरी मिळाली असतां टिळकांस ७ युरोपियन व २ नेटिव मिळावे ? या बद्दल अभ्यंकरांस काय वाटतें ?

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥
' भवभूतिः '

पुस्तक ८वें.] श्रावण शु० ४, शनिवार [अंक २० वा

खग्रास ग्रहण

परम दैदीप्यमान महाराष्ट्रखीला ता० २२ रोजीं रात्रीं अकालीं खग्रास सूर्यग्रहण लागल्याची बातमी येतांच सर्व लोक सखेदाश्चर्यानें थक्क झाले असतील यांत संशय नाहीं ! ग्रहण वर्तविण्याच्या कामांत **ज्योतिषी** लोकांचा हातखंडा आहे; पण ता.२२ बुधवार आषाढ शु० ९ ला ग्रहण लागेल व तेंही खग्रास असेल अशी एकाही ज्योतिष्यास अटकळ झाली नाहीं ! खग्रास सूर्यग्रहणाच्या वेळीं पशु आणि पक्षी हे जसे भयभीत होऊन सैरावैरा धांवत सुटतात व आपापलें निवासस्थान पकडतात त्याच प्रमाणें या **बालरवीच्या** खग्रास ग्रहणाच्या कालीं अखिल भरतभूमीवरील मनुष्यमात्राची स्थिति झाली असली पाहिजे ! हें ग्रहण ६ **वर्षें** सुटावयाचें नाहीं, ही वार्ता ऐकून तर प्रत्येकाचें हृदय हदरलें असेल व कांहीं वेळ त्याची क्रियाही बंद पडली असेल ! ग्रहणाच्या वेळीं आमचे हिंदु लोकच आपला व्यवहार बंद ठेवतात पण या ग्रहणाच्या स्पर्शकालींच हिंदु, पारशी, मुसलमान, वगैरे सर्व जातीच्या

भारतपुत्रांनीं एक दिवस आपापले व्यवहार बंद ठेवण्यांत आले होते! अथवा असें ह्मणण्यापेक्षां आपोआपच बंद पडले होते असें ह्मणणें जास्त सयुक्तिक होईल. अशा प्रकारचें ग्रहण महाराष्ट्रांत किंबहुना सर्व हिंदुस्थानांत कोणत्याही रिसायतींत आजपर्यंत लागलें नव्हतें! या ग्रहणाचा परिणाम पुरुष, स्त्रिया व मुलें या सर्वांवर झाला असला पाहिजे. कित्येकांनीं ही एक पर्वणीच आहे असें समजून स्नान दान जप, उपवास वगैरे गोष्टी केल्या असतील. कित्येकांनीं आजन्म **स्वदेशी** व्रताचेंच अवलंबन करीन अशा शपथा घेतल्या असतील. जे जे लोक आजपर्यंत स्वदेशीच्या विरुद्ध होते त्यांनीं त्यांनीं सुद्धां याच व्रताचें अवलंबन करण्याचा निश्चय केला असला पाहिजे. असो—ग्रहणकाळीं आमच्या **बालरवीनें** जे निर्वाणीचे शब्द उच्चारिले आहेत, ते प्रत्येक **हिंदपुत्रानें** [मग तो कोणत्याही जातीचा असो.] आपल्या हृत्पटलावर खोदून ठेवण्यासारखे आहेत. ते असे.—

जरी ज्यूरीनें बहुमतानें मला अपराधी ठरविलें आहे, तरी माझी मनोदेवता मीं निरपराधी आहें असेंच सांगत आहे! सर्व लोकांवर व सर्व राष्ट्रांवर जिचा अंमल चालू आहे अशी श्रेष्ठतर शक्ति खास आहे! माझ्या लिहिण्यानें व बोलण्यानें माझ्या अंगीकृत प्रिय कार्याचा जितका उत्कर्ष व्हावयाचा त्या पेक्षां मला कष्ट भोगून त्या कार्याचा जास्त उत्कर्ष व्हावा असा ही ईश्वरी संकेत असेल. (इं. प्र.)

या ग्रहणाचा परिणाम राष्ट्रीय पक्षावरच झाला असेल असें नाहीं इंदुप्रकाशनेंही ता० २३ च्या अंकांत "कोणाचे कांहींही विचार असोत, परंतु रा० टिळक हे **असामान्य पुरुष** आहेत ही गोष्ट कोणीही नाकबूल करूं शकणार नाहीं" असे उद्गार काढिलेले आहेत. केसरीचा **कट्टा** प्रतिस्पर्धी ज्ञानप्रकाश तोही असें ह्मणतो कीं,

"केसरीवरील खटल्याचा भयंकर निकाल ऐकून ज्याच्या काळजास दुःखोद्वेगानें विद्युद्वेगाप्रमाणें धक्का बसला नाहीं असा एक तरी मनुष्य नेणतीं मुलें खेरीज करून महाराष्ट्रांत सांपडेल असें आह्मांस वाटत नाहीं. व्यक्तिविषयक मतवैचित्र्याचा आज प्रश्न नाहीं. तेव्हां कोणी कोणत्याही मताचा किंवा पंथाचा असला तरी त्याला गुणवंताचे गुण घेण्यास यत्किंचित्ही दिक्कत वाटतां कामा नये. कै. न्या. रानडे निवर्तले त्या वेळीं साऱ्या महाराष्ट्रभरच नव्हे साऱ्या हिंदुस्थानभर ज्या प्रमाणें दुःखाचें घनदाट आस्तरण लोकांच्या हृत्पटलावर पसरलें होतें तशाच प्रकारचा किंवा त्याहूनही अधिक शोकमय असा आजचा प्रसंग आहे. अशा प्रकारचा बुद्धिमान्, पोळदार, निधड्या छातीच्या पुरुषाच्या देशसेवेस अशा वयांत अंतरणें ह्मणजे फार दुःखाची गोष्ट आहे! रा. टिळक यांस हिंदुस्थान देश पारखा झाल्यामुळें महाराष्ट्रांतील **कर्त्या पुरुषांत** जी **खिंड** पडली आहे ती ते मुक्त होऊन पुनः परत येईपर्यंत दुसरा कोणी भरून काढूं शकेल असें आह्मांस वाटत नाहीं." सारांश, प्रतिपक्षाला सुद्धां या कल्पनातीत ग्रहणामुळें अत्यंत वाईट वाटलेलें आहे.

ता० २३ जुलईपासून शनि वक्र झाला व त्याच दिवसापासून आमच्या बालरवीचा कारागृहवास सुरू झाला! हा ग्रह ता. ७ डिसेंबरपर्यंत वक्री आहे. फुलबेंचा समोरचा अर्ज तर नामंजूर झालाच. परंतु प्रिव्ही कौन्सील पुढें अर्ज जातो कीं काय पाहणें आहे. तोंपर्यंत ज्योतिषी लोकांचीं भविष्यें चुकलीं असें ह्मणतां येत नाहीं. कदाचित् प्रिव्हीकौन्सीलमध्यें टिळकांस न्याय मिळेल व त्यांची सुटका होईलही. कारण त्यांनीं सहा वर्षें शिक्षा भोगावी असें एकही ज्योतिषी ह्मणत नाहीं.

सप्तम स्थानाचा अधिपति शनि हा मेष या चर राशींत नवम स्थानीं आल्यामुळें त्यांचा स्थलांतर योग आलेला आहे ही गोष्ट खरी पण तेवढ्यावरून त्यांस काळ्या पाण्यावरच जावें लागेल असें अनुमान काढणें अत्यंत धाडसाचें आहे ! नवम स्थानीं गेलेला शनि कीर्तियोग उत्पन्न करितो. त्याप्रमाणें त्यांची कीर्ति पूर्वापेक्षां किती तरी पटीनें वाढणार आहे. आह्मांस अद्यापिही असें वाटतें कीं त्यांस इतकी मोठी शिक्षा भोगावी लागूं नये, मग परमेश्वरी संकेत काय असेल तो खरा.

ता० २४ जून रोजीं बुधवार असून चंद्र वृषभ राशींत होता. टिळकांचा हर्शल याच राशींत दशमांत २४ अंशावर आहे. ह्मणून हा दिवस त्यांस राजकीय भय उत्पन्न करणारा होता. त्याचप्रमाणें ज्या दिवशीं निकाल झाला त्या दिवशीं सुद्धां चंद्र त्याच राशींत जन्मकालच्या हर्शलशीं युति करीत होता. प्रोफेसर परांजपे यांस ज्या दिवशीं धरणें आलें त्या दिवशीं चंद्र वृश्चिक राशींत होता, व ज्या दिवशीं शिक्षा झाली त्या दिवशीं सुद्धां त्याच राशींत तितके अंश होता ! हा एक उभयतांच्या कुंडलींत चमत्कार आहे ! एका ज्योतिष्यानें टिळकांस शिक्षा बुधवारीं होईल व त्यांची सुटकाही बुधवारींच होईल असें वर्तविलें होतें. मागल्या खटल्याच्या वेळीं त्यांच्यावर मंगळवाराचा परिणाम घडला होता. आतां बुधवारचा घडणार असें वाटतें. वार सांगतां येण्यास ज्योतिःशास्त्रांत आधार नाहीं, ही केवळ कल्पना आहे. हें निवळ ठोक ज्योतिष आहे. त्याच प्रमाणें एकानें ता० २२ ला खटल्याचा निकाल होईल, ह्मणून वर्तविलें होतें तेंही अनुभवास आलें. कोणत्याही खटल्याची नेमकी तारीख अथवा नेमका वार सांगतांच येणार नाहीं असें जरी आमचें मत नाहीं तरी त्यांत सामान्य नियम नसल्यामुळें अशक्य आहे असें वाटतें. टिळ-

कांच्या खटल्याचा निकाल ८।१० दिवसांत लागला पाहिजे हा व्यवहार माहीत होता, ह्मणून गोष्ट निराळी. परंतु जे खटले कित्येक महिने किंवा कित्येक वर्षे चालतात त्यांची तारीख कशी जाणावी ता० १९ जुलईपासूनचे दिवस त्यांचे विपत्तीचे आहेत हें विधान आह्मी ता० ११ जुलईच्या अंकांत केलें होतें. खटल्याला सुरवात ता० १३ वीला होणार होती. त्या पूर्वीचें हें भविष्य आहे. परांजप्यांच्या खटल्याचा निकाल जसा दोन दिवसांत झाला तसाच टिळकांचाही व्हावा हें त्या वेळचें साधारण अनुमान होतें. इतके दिवस खटला चालेल असें कोणासही वाटलें नव्हतें. आह्मी सुटकेचा दिवस नेमका सांगितला नव्हता, तरी अनुमान बांधिलें होतें. जर ज्यूरीनें सुटी घेतली नसती तर आमचें अनुमान तंतोतंत उतरलें असतें, ह्मणजे १९ वी पासूनच त्यांस बंधन झालें असतें. आह्मीं नेमकी तारीख सांगण्याचा प्रयत्न केला नाहीं. याचें कारण तो प्रयत्न अशक्य किंवा अवघड आहे. ज्योतिःशास्त्रानुरोधानें बांधलीं जाणारीं अनुमानें फार थोडीं आहेत. बहुतेक अनुमानें कल्पनेनेंच बांधावीं लागतात. तत्वांस धरून जीं अनुमानें असतात तीं बरोबर उतरलींच पाहिजेत, यांत तिलप्राय शंका नाहीं. काल्पनीक अनुमानें मात्र कधीं जुळतील तर कधीं चुकतील. हा त्या शास्त्राचा दोष नाहीं. टिळकांच्या खटल्यांत त्यांस शिक्षा होईल कीं ते सुटतील हा प्रश्न ज्योतिःशास्त्राला धरून होता, ह्मणून त्यांस शिक्षा होणार हें अनुमान बरोबर उतरलेंच पाहिजे. त्याप्रमाणें आमचें व कित्येकांचें उतरलेंही आहे ! शिक्षा किती होईल वगैरे अभ्यंकरांनीं केलेले प्रश्न ज्योतिःशास्त्राच्या तत्वांनीं सोडविण्यासारखे नाहींत—निदान आज तरी अशी स्थिति आहे—ह्मणून त्यां विषयींचें भविष्य सर्वांचेंच चुकलें किंवा चुकणार. यांत शास्त्राला किमपिही कमीपणा येत

नाहीं. दे. अभ्यंकर हे या शास्त्रास खोटें म्हणांत. पण ज्यांनीं ज्यांनीं याचा व्यासंग केला आहे—मग ते ज्योतिषी असोत किंवा नसोत—त्यांना तरी हें खोटें म्हणून सोडून द्यावेसें वाटणार नाहीं. जे या शास्त्राचा तिरस्कार करितात त्यांस याचें रहस्यच कळलेलें नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं.

लो. टिळकांस सांप्रत तीन ग्रह अनिष्ट आहेत. राहू हा चंद्राला चवथा आहे, व तो व्ययस्थानीं आहे. चतुर्थ स्थान हें सुखस्थान आहे. सुखस्थानीं राहू असतां चिंता व क्लेश प्राप्त होतात. त्याच प्रमाणें साडेसाती असून शनि वक्री आहे. मेष राशींत शनि शत्रु-गृहीं असतो, म्हणून साडेसातीच्या वेळीं तो मनुष्यास क्लेश देतो. आणि ३ रा ग्रह हर्शल जो राजकीय संकटें उत्पन्न करितो तो चंद्राच्या दशमांत आहे. या ग्रहाचा प्रकृतीवर विशेष परिणाम होत नाहीं. पण शनि आणि राहू यांचा मात्र प्रकृतीवर वाईट परिणाम होतो. शनि एप्रिलपर्यंत व राहू अकटंबरपर्यंत अनिष्ट आहे. त्यामुळें निदान अकटंबरपर्यंत तरी त्यांस शारीरयातना भोगाव्या लागणार आहेत. सन १९१२ च्या अर्धानंतर साडेसाती पूर्ण होईल. आमच्या मतें **त्यांस १९१२ साल कठीण आहे.** या वर्षीं शनि हा दशमांतील जन्मकालच्या हर्शवर जाईल, व राहू हा चंद्राजवळ येईल. या हर्शलवरून शनि जातांना त्यांस राजकीय भय उत्पन्न न होईल तर तें एक प्रकारचें आश्चर्य होईल! सांप्रतच्या संकटाचा परिणाम सुमारें वर्ष सहा महिनेच भोगावा लागणार. डिसेंबर सुमारास या गोष्टीचा अनुभव येईल, असें खात्रीशीर वाटतें.

व्ययस्थानीं कर्क राशींत नेप्च्यून हा पाप ग्रह आहे. हा ग्रह १९१४ अक्टंबरपर्यंत त्या स्थानीं त्या राशींत आहे. या ग्रहावर जर टिळकांची शिक्षा अवलंबून असली तर मात्र ती ६ वर्षें भोगावी

लागावयाची. परंतु या ग्रहाचे गुणधर्म अद्यापि निश्चित झालेले नाहींत,* म्हणून त्याबद्दल कांहींच खात्री देववत नाहीं. न्यायमूर्तींच्या तोंडून ६ वर्षें हीं अक्षरें बाहेर पडण्यास मात्र त्या ग्रहाशिवाय अन्य कारण दिसत नाहीं. साडेसाती फक्त ५ वर्षेंच आहे. व हर्शल १९१२ च्या फेब्रुवारीपर्यंतच मकरेंत आहे, म्हणजे सुमारें ३ वर्षें त्या राशींत आहे. नेप्च्यून मात्र ६ वर्षें कर्क राशींत आहे!

सांप्रत सिंह राशींत मंगळ प्रबल झाला आहे. हाणामारी, रक्तपात, आगी लागणें, लढाया व अपघात इ० गोष्टी घडवून आणण्यास तो समर्थ आहे. ता० ८ जुलईपासून ता० २४ आगष्टपर्यंत तो या राशींत आहे. याच कालमर्यादेंत टिळकांसारख्या साधुपुरुषावर भयंकर प्रसंग आला असल्यामुळें ठिकठिकाणीं दंगेधोपे होण्याचा संभव आहे. मुंबईस तर अनर्थ उडाल्याचें वर्तमानपत्रांवरून दिसत आहे! काळाच्या पोटांत अणखी काय काय भयंकर गोष्टी असतील हें कोणी सांगावें?

रा. टिळक यांस सध्यां बारामती तुरुंगांत ठेवलें आहे. तेथून त्यांना देशाबाहेर नेण्यांत येईल. त्यांना एडनला नेण्यापूर्वी त्यांची व त्यांच्या कुटुंबाची भेट करवितील.

कायद्यांत असें सांगितलें आहे कीं, काळ्यापाण्याची शिक्षा झालेल्या माणसांचें वय जर ४५ वर्षापेक्षां जास्त असेल तर त्याला अंदमान येथें पाठविण्यांत येत नाहीं, आणि रा. टिळक यांची पन्नाशी उलटून गेली असल्यामुळें त्यांना अंदमानला न नेतां एडन येथें ठेवण्यांत येईल.

तुरुंगांतील जेवणखाण.

ज्या अर्थी रा० टिळकांना शिक्षा झालेली आहे त्या अर्थी त्यांना इतर कैद्यांप्रमाणेंच तुरुंगांतले अन्नच दिलें जाईल. फक्त त्यांची प्रकृति बिघडल्यास तुरुंगावरील डाक्टराच्या हुकुमाप्रमाणें त्यांच्या खाण्यांत बदल करण्यांत येईल.

कामकाज.

बहुतकरून रा. टिळकांना अल्प श्रमाचें काम देण्यांत येईल. पण त्यांची प्रकृति तपासून डाक्टरनें शिफारस केल्यास त्यांना दुसऱ्या वर्गांत घालण्यांत येईल. त्या वर्गांतील कैद्यांना कापूस साफ करणें, कातणें, व विणणें वगैरे कामें करावीं लागतात.

कुटुंबाची भेट.

कायद्याप्रमाणें असें आहे कीं, दर सहा महिन्यांनीं कैद्याला कुटुंबाची भेट घेऊं देण्यांत येते. परंतु ह्या सहा महिन्यांच्या दरम्यान कैद्याला आपल्या कुटुंबाकडे कांहीं घरगुती बाकीसंबंधानें पत्रव्यवहार करावयाचा असल्यास ही मुलाखत झाल्यावर तीन महिन्यांनीं त्याला तसें करतां येतें. पणत्या नंतर पुनः सहा महिने कुटुंबाची भेट घेतां येणार नाहीं.

चांगल्या वर्तणूकीचा फायदा.

तेथें चांगली वर्तणूक करणाऱ्या कैद्याच्या शिक्षेतून कांहीं दिवस कमी केले जातात. ते येणें प्रमाणें:—कैदी—वर्षाला १० दिवस, बॉचमन—४० दिवस, ओव्हरसियर—६० दिवस व वार्डर असेल तर एका वर्षाला चार महिने कमी केले जातात. आजपर्यंत कोणालाही काळ्यापाण्याची शिक्षा सात वर्षापेक्षां कमी झालेली नव्हती. पण रा. टिळकांच्या बाबतींत ती कमी करण्यांत आली आहे.

—जा. ज.—

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥ 'भवभूति'

पुस्तक ८ वें.] कार्त्तिक शु०, ८ रविवार [अंक २८ वा

लोकमान्य टिळकांची सुटका.

सध्या सर्वांचीं तोंडीं हा एकच विषय आहे. लोकमान्य टिळक नवंबरांत सुटणार असें पुष्कळ लोक अनुमान करीत आहेत. कोणी ह्मणतात, या महिन्यांत प्रिव्हीकौन्सिलमधल्या अपिलाचा निकाल होऊन सुटतील तर कोणी ह्मणतात, राणीच्या जाहीरनाम्यास या महिन्यांत ५० वर्षे पूर्ण होणार असून बादशहाचा जन्मही याच महिन्यांत आहे ह्मणून त्यांची सुटका होणार! व दुसरे कोणी ह्मणतात कीं आ. ना. मोर्लेसाहेब या महिन्यांत हिंदुस्थानांत येणार आहेत व दिल्ली येथें बडा दरबार भरणार आहे त्या वेळीं ते बादशाहाच्या हुकुमानें सर्व राजकीय कैद्यांची सुटका करणार आहेत व हिंदुस्थानाला कांहीं हक्कही देणार आहेत. त्यांतच लो. टिळकांचीही सुटका होणार आहे. एकंदरींत लोकांच्या दृष्टीनें नवंबर महिना फार महत्वाचा असून त्याकडे सर्वांचे डोळे लागले आहेत. लो. मा. टिळक व अरविंद बाबू यांच्या सुटके इतकी तूर्त महत्वाची दुसरी

गोष्ट नाहीं यांत शंका नाहीं. राजकीय चळवळीचे पुढील मार्ग यांच्याच सुटकेवर विशेषतः अवलंबून आहेत म्हणून परमेश्वर सर्वांची इच्छा तृप्त करो अशी त्याजवळ अनन्य भावानें प्रार्थना करितों.

टिळक सहा वर्षे कैद भोगीत नाहींत यांत तर संशय नाहींच. पण लोकांच्या इच्छेप्रमाणें घडून येणार कीं काय याचा ज्योतिःशास्त्राच्या दृष्टीनें आणखी एकदां विचार केला पाहिजे. टिळकांस शिक्षा होण्यापूर्वी त्यांस शिकस्त ९ महिने कारागृहवास भोगावा लागेल असें वर्तविलेलें होतें तें अगदीं खरें आहे. कारण शनि वक्री आहे तोंपर्यंत तो त्यांस अनुकूल नाहीं. हा ग्रह जुलईच्या २३ व्या तारखेला वक्री झाला तोंच ता. २२ बुधवारला रात्रीं त्यांस शिक्षा झाली. अर्थात् शनि वक्र झाला त्याच वेळीं त्यांस अरिष्ट प्राप्त झालें. म्हणून तो जेव्हां मार्गी होईल तेव्हांच ते अरिष्टांतून मोकळे झाले पाहिजेत. ता. ७ डिसेंबरला तो मार्गी होणार आहे. आतां तो मार्गी झाल्यावर त्यांची सुटका होणार कीं तत्पूर्वी थोड्या अवकाशानें होणार हा प्रश्न आहे. कारण कोणत्याही ग्रहस्थितीचे परिणाम पुष्कळ वेळां अगोदर होतात असें अनेक वेळां अनुभवास येतें. रवि ता. २३ सप्टंबरला तूळ राशीचा होणार त्याच्या पूर्वीच त्यांची मंडालेस रवानगी झाली! (तरी ता. २३ लाच ते मंडाल्यास पोहोंचले आहेत हें विसरतां कामा नये.) शनि ता. २३ जुलईला वक्री होणार तोंच ता. २२ ला रात्रीं ते काळ्या पाण्याचे कैदी बनले! तसाच प्रकार सुटकेच्या वेळींही होऊं शकेल, नाहीं कोणी म्हणावें? त्यांच्या शिक्षेच्या वेळीं हर्शल वक्री होता व तो २३ सपटंबरला मार्गी होणार त्याच सुमाराला काळ्या पाण्याची शिक्षा रद्द होऊन साध्या कैदेची झाली! त्याच्या

कुंडलींत याच दोन ग्रहांमुळें बंधनयोग झालेला आहे असें मागें सांगितलेंच आहे. यांपैकीं हर्शल मार्गी होण्याच्या सुमारास जर शिक्षेचें स्वरूप सौम्य झालें तर शनी मार्गी होण्याच्या सुमारास ती अजी माफ कां होऊं नये? डिसेंबर ता० ७ ला जर शनि मार्गी होणार तर त्या पूर्वी ८।१५ दिवसांत त्यांची सुटका झाल्यास नवल नाहीं.

वरील अनुमानाला बळकटी येण्याला आणखीही २।३ कारणें आहेत. १ लें.—मंगळ तूळ राशींतून ता० २६ ला वृश्चिक राशींत प्रवेश करितो. हा ग्रह चतुर्थ व नवम यांचा अधिपति आहे. चतुर्थ स्थानावर स्वगृहाचा विचार होतो. नवंबरमध्यें लग्नस्वामी रवि हा चतुर्थ स्थानीं ता० २३ पर्यंत आहे व चतुर्थेशही चतुर्थ स्थानी येणार आहे, त्या मुळें आपले लोकमान्य टिळक या महिन्यांत परत स्वगृहीं येतील असें मानण्यास हरकत नाहीं. २ रें.—बुध हा ता० ८ पासून मार्गी झाला असून शुक्र ता. ३ पासून ता. २९ पर्यंत तूळ राशींत तृतीय स्थानीं स्वगृहीं आहे.

वरील दोन्ही कारणें त्या च्या सुटकेला अनुकूल आहेत. परंतु मागील अनुभव पाहतां रवि हा मेष व तूळ राशीचा असतांच त्यांची सुटका झालेली आहे. १८९८ मध्यें त्यांची सपटंबरांत सुटका झाली व १९०४ मध्यें मार्च्य मध्यें सुटका झाली. म्हणजे अनुक्रमें तूळ व मेष राशीच्या रवीवर सुटका झाल्या आहेत. त्यावरूनें रवि हा या वेळींही मेष राशीचा झाल्यावर [अगर त्या सुमारास] ते सुटतील असें आमचें पूर्वीचें अनुमान असून खात्रीचें आहे हें वाचकांनीं विसरूं नये. नवंबरचें भविष्य खात्रीचें नाहीं.

कैद्याची सुटका अमुक एका ग्रहस्थितीवर अवलंबून असते असें समजल्या जेरीज बिनचूक भविष्य कोणासही करितां यावयाचें नाहीं. ग्रंथ चाळून पाहिल्यास या बद्दल सांगितलेलें कोठेंही आढळणार

नाहीं. कल्पनेनें रचलेलीं अनुमानें कधीं बरोबर येतात तर कधीं चुकतात. सिद्धांतानें मात्र बांधलेलीं अनुमानें बरोबर उतरतात. आह्मीं जें भविष्य केलें आहे तेंही तार्किक आहे. परंतु बरेंच सयुक्तिकही आहे. ह्मणून बहुधा चुकणार नाहीं अशी खात्री आहे.

कुंडलीविज्ञानाच्या २९ व्या अंकांत रवि मकर या चर राशीचा झाल्यावर (अगर) त्या सुमारास सुटतील असें लिहिलेलें असून तेंही खात्रीचें नाहीं असें ह्मटलें आहे. आमचा एकंदर लिहिण्याचा झोंक पहिल्यापासून एकाच तत्वावर आहे. तें तत्व असें आहे कीं, **शनि हा मार्गी झाल्यावर अगर त्या सुमारास लो. मा. ची सुटका होणार.** हें तत्व सुज्ञांनीं ध्यानांत ठेवावें व मग महिना कोणता येतो तें पहावें. आह्मी आपल्या मतानें **१ रवि वृश्चिक राशींत असतां २ मकर राशींत असतां** (अगर त्या सुमारास) आणि ३ तो **मेष राशींत असतां** [अगर त्या सुमारास] त्यांची सुटका झाली पाहिजे असें निवळ ज्योतिःशास्त्राच्या दृष्टीनें ठरविलें आहे. यांपैकीं कांहींच जुळलें नाहीं तर आमचें भविष्य चुकलें असें समजावें.

लो. टिळक नवंबरांत सुटतील तर राष्ट्राचें एक पाऊल आणखी पुढें पडेल व मार्च्यांत सुटतील तर राष्ट्रीय पक्ष कसोटीस उतरेल. दोहोंपैकीं कोणतेंही घडलें तरी राष्ट्राच्या दृष्टीनें फायद्याचेंच आहे. पण त्यांतही नवंबरांत सुटतील तर 'दुधांत साखर' पडणार हें उघडच आहे.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम् ।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥

'भवभूति'

पुस्तक १०.वें.] ज्येष्ठ व० ९ शुक्रवार [अंक ११ वा

संपादकीय स्फुट लेख.

टिळकांच्या कुंडलीचा शास्त्राच्या प्रतीतीसाठीं विचार करीत असतां एक विलक्षण चमत्कार दृष्टीस पडला ! हा चमत्कार विचार करण्यासारखा असल्यामुळें तो येथें द्यावयाचा आहे. त्यांच्या जन्मकालच्यां सायन चंद्रावरून त्यांच्या विंशोत्तरी दशा तयार केल्या त्या अशा.

सायन विंशोत्तरी महादशा.

केतू–१ व. ११ म. ६ दि.	आरंभ	ता. २३ जुलई	१८५६
शुक्र–२१ व. ११ म. ६ दि.	,,	ता. २४ जून	१८५८
रवि–२७ व. ११ म. ६ दि.	,,	ता २४ जून	१८७८
चंद्र–३७ व. ११ म. ६ दि.	,,	ता. २४ जून	१८८४
मंगळ–४४ व. ११ म. ६ दि.	,,	ता. २४ जून	१८९४
राहू–६२ व. ११ म. ६ दि.	,,	ता. २४ जून	१९०१
गुरु–८० व. ११ म. ६ दि.	,,	ता. २४ जून	१९१९

रवीच्या अंतर्दशा.

रवि–२२ व. २ म. २४ दि.	आरंभ	ता. २४ जून	१८७८
चं–२२ व. ८ म. २४ दि.	,,	ता. १५ अक.	१८७८
भौम–२३ व १ म. ० दि.	,,	ता. १३ एप्रिल	१८७९
राहू–२३ व. ११ म. २४ दि.	,,	ता. २२ आगष्ट	१८७९
गुरु–२४ व. ९ म. १२ दि.	,,	ता. १२ जुलई	१८८०
शनि–२५ व. ८ म. २४ दि.	,,	ता. १ मे	१८८१
बुध–२९ व. ७ म. ० दि.	,,	ता. १३ एप्रिल	१८८२
केतु–३६ व. ११ म. ६ दि.	,,	ता. १८ फेब्रू	१८८३
शुक्र–३७ व. ११ म. ६ दि.	,,	ता. २४ जून	१८८३

मंगळाच्या अंतर्दशा.

भौम–३८ व. ४ म ३ दि.	आरंभ	ता. २४ जून	१९०१
राहू–३९ व. ४ म. २१ दि.	,,	ता २३ नवं.	१८९४
गुरु–४० व. ३ म. २७ दि.	,,	ता. ११ डिसें.	१८९५
शनि–४१ व. ९ म. ६ दि.	,,	ता. १७ नवं.	१८९६
बुध–४२ व. ५ म. ३ दि.	,,	ता. २६ डिसें.	१८९७
केतु ४२ व. १० म. ० दि.	,,	ता. २३ डिसें.	१८९८
शुक्र–४४ व. ० म. ० दि.	,,	ता. १९ मे	१८९९
रवि–४४ व. ४ म. ६ दि.	,,	ता. २३ जुलई	१९००
चंद्र–४४ व. ११ म. ६ दि.	,,	ता. २६ नव.	१९००

राहूच्या अंतर्दशा.

राहू–४७ व. ७ म. १८ दि.	आरंभ	ता. २४ जून.	१८९८
गुरु–५० व. ० म. १२ दि.	,,	ता. ८ मार्च्य	१९०४
शनि–५२ व. १० म. १८ दि.	,,	ता. ४ आग.	१९०६
बुध–५५ वं. ५ म. ६ दि.	,,	ता. ६ जून	१९०९
केतु–५६ व ५ म. २४ दि.	,,	ता. २६ डिसें.	१९११
शुक्र–५९ व. ५ म. २४ दि.	,,	ता. १३ जाने.	१९१३
रवि–६० व. ४ म. १८ दि.	,,	ता. १३ जाने.	१९१६

चंद्र–६१ व. १० म. १८ दि.	,,	ता. ८ डिसें.	१९१६
भौम–६२ व. ११ म. ६ दि.	,,	ता. ६ जून	१९१८

यांत रवि, मंगळ व राहू या तीन ग्रहांच्या महादशेंत शिक्षा झाल्या. कोल्हापूर प्रकरणांत प्रथमतः १७ जुलई १८८२ मध्यें शिक्षा झाली. ती सुमारें ३॥ महिन्याची साधी कैद होती. ही शिक्षा रवीच्या महादशेंत बुधाची अंतर्दशा असतां झाली व सुटकाही याच दशेंत झाली. जातकपारिजातांत या अंतर्दशेचें फल दिलें आहे, तें असें—

बंधुपीडा मनोदुःखं सत्रोत्साहं धनक्षयं ॥
किंचित् सुखमवाप्नोति रवेरंतर्गते बुधे ॥

वास्तविक पाहूं गेलें असतां या अंतर्दशेपेक्षां याच्या पूर्वीची शनीची अंतर्दशा फार भयंकर होती. परंतु या वेळीं त्यांच्या शिक्षेचें स्वरूप भयंकर नसल्यामुळें ती बुधाच्या अंतर्दशेंतच झाली तथापि तिचा उपक्रम शनीच्या अंतरदशेंतच झाला होता यांत शंका नाहीं.

या नंतर ता. १४ सपटंबर १८९७ मध्यें राजद्रोहाच्या आरोपावरून १॥ वर्षाच्या सक्तमजुरीची शिक्षा झाली. यावेळीं मंगळाची महादशा असून तींत शनीची अंतर्दशा होती. या दशेचें फल जातकपारिजातांत खालीलप्रमाणें दिलें आहे.

बहुदुःखाकरं व्याधिमरिचोरनृपै र्भयं ॥
धनक्षयमवाप्नोति शनौ भौमदशांतरे ॥

मंगळ हा चतुर्थेश असून शनि षष्ठेश आहे, म्हणून त्याच्या दशेंत कारागृहवास घडला.

यानंतर पुन्हा खटला सन १९०३ मध्यें झाला व २३ आगष्ट रोजीं शिक्षा झाली. या वेळीं राहूच्या महादशेंत राहूचीच अंतर्दशा होती.या अंतर्दशेंत विषादबुद्धि उत्पन्न होते असे जातकपारिजातांत आहे.

शेवटला राजद्रोहाचा खटला सन १९०८ मध्यें चालून ता.२२जुलई रोजीं हद्दपारीची शिक्षा झाली. या वेळीं राहूच्याच महादशेंत शनीची

अंतर्दशा होती. या दशेचें फल जातकपारिजातकांत दिलें आहे, तें असें

वातपित्तकृतं रोगं बंधुमित्रादिपीडनं ॥
दूरदेशनिवासं च शनौ राहुदशांतरे ॥

या वचनाचा अनुभव तर आश्चर्य करण्यासारखाच आहे. यांत "**दूरदेशनिवासं**" हें पद किती आश्चर्यकारक मिळतें आहे ? राजद्रोहाचे जे मोठाले दोन खटले झाले, त्या प्रत्येक वेळीं कुंडलींतला **षष्ठेश** जो **शनि** व जो कारागृह–वास दर्शवितो त्याचीच अंतर्दशा होती. व ज्या वेळीं सुटका झाली त्या प्रत्येक वेळीं बुधाचीच अंतर्दशा होती, आतां, या शिक्षेच्या सुटकेच्या वेळीं बुधाचीच अंतर्दशा येते कीं काय तें पहावयाचें आहे. ही अंतर्दशा ता. ६ जून १९०९ पासून सुरू झाली आहे.

आणखी एक चमत्कार असा घडला आहे कीं, पहिला राजद्रोहाचा खटला जेव्हां झाला तेव्हां शनीच्या अंतर्दशेंत मंगळाची उपदशा होती व दुसऱ्या खटल्याच्या वेळींही याच ग्रहाची उपदशा होती. आणि पहिल्या सुटकेच्या वेळीं बुधाच्या अंतर्दशेंत गुरूची उपदशा ता. ९ सप्टेंबर १८९८ पासून २७ अकटोबर १८९८ पर्यंत होती. दुसऱ्या खटल्यांत बुधाच्या अंतर्दशेंत जर सुटका होणार असेल तर ती गुरूच्या उपदशेंतच होणार नाहीं काय ? ही उपदशा ता. २८ मार्च्य सन १९११ पासून ता. २ आगष्ट सन १९११ पर्यंत आहे. पहावें काय होतें तें. जर बुधाच्या अंतर्दशेंत सुटका झाली नाहीं तर पुढें पूर्ण शिक्षा भोगावी लागणार असें दिसतें. कारण मग शुक्राच्या अंतर्दशेशिवाय सुटका होण्यास दुसरा अनुकूल काळ नाहीं. सन १९१० च्या अकटोबरमध्यें त्याच्या चंद्राच्या सप्तमांत व लग्नाच्या तृतीयांत गुरु, रवि, मंगळ, बुध, शुक्र अशी पंचग्रही येत आहे ती कोठें स्थलांतर करविते कीं काय हें पाहिलें पाहिजे.

वरील सर्व वर्णनावरून वाचकांच्या ध्यानांत येईल कीं यांस शिक्षा होणें व सुटका होणें यांत कांहीं तरी नियम आहे व हा नियम खरा कीं खोटा याचा निर्णय आतां होणाऱ्या सुटकेवर अवलंबून आहे.

देशभक्त प्रो० परांजपे.

जन्म— ता. २६ माहे जून सन १८६४
रात्रीं १२ वाजून ४७ मि.

सायनभावचलित कुंडली.



स्प. ग्र.

र.	चं.	मं	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.	ने.
३	०	०	२	७	३	६	७	२	०
९	६	२०	२०	२१	१	१९	११	२६	२
४६	४२	९७	१६	३१	८	२६	३३	०	०

महादशा.

	केतू	शुक्र	रवि	चंद्र	मंगळ	राहू
व.	३	२३	२९	३९	४६	६४
म.	५	५	५	५	५	५
दि.	२३	२३	२३	२३	२३	२३

मंगळाच्या अंतर्दशा

मं.	श.	गु.	श.	बु.	के.	शु.	र.	चं.
३९	४०	४१	४२	४३	४४	४५	४६	४६
१०	११	१०	११	११	४	६	१०	५
२०	८	१४	२३	२०	१७	१७	२३	२३

तारीख ११ जून सन १९०८ या दिवशीं सकाळीं ५ वाजतां प्रोफेसर साहेबांस सरकारचें धरणें आलें. या वेळीं मिथुन लग्न असून चंद्र वृश्चिक राशींत होता. लग्नस्वामी बुध व व्ययस्वामी शुक्र हे कर्क राशींत शत्रुगृहीं होते. चंद्र हा जन्मकालीं चतुर्थ स्थानाचा अधिपति असून या दिवशीं तो नीच असल्यामुळें सुखाची हानि करण्यास समर्थ होता. जन्मलग्नाचा स्वामी मंगळ हा चतुर्थ [सुख] स्थानीं नीच असून शनि हा चंद्राला पीडा करीत होता.

ता॰ १५ मेचा शनि ६ अंश ३४ कला असल्यामुळें तो जन्मकालच्या चंद्राला येऊन मिळाला होता. साडेसातीचें पुस्तक पृ॰ २७ पहा– यांत मेष राशीचा चंद्र व्ययस्थानीं असतां "साडेसातीचा आरंभ चांगला आहे. मध्य वाईट आहे. त्या काळीं

राजकीय, व्यावहारिक, सांपत्तिक व औद्योगिक हानि होईल. मिथ्यारोप व दुष्कीर्त्ति होईल. शेवट बरा आहे." असें सांगितलें आहे. गेल्या २॥ वर्षांत प्रोफेसरांस चांगले दिवस गेले. व दुसऱ्या २॥ स सुरवात होतांच राजकीय संकट उत्पन्न झालें. राष्ट्रीय पक्षाच्या दृष्टीनें त्यांच्यावर मिथ्यारोप प्राप्त झाला आहे. यांत त्यांची सांपत्तिक व औद्योगिक हानि होणार हें स्पष्टच आहे. ता॰ १५ मेलाही चंद्र वृश्चिक राशींतच होता. यावरून वृश्चिक राशीचा चंद्र त्यांस सुखावह होत नसावा असें दिसतें.

बुध मिथुन राशींत स्वगृहीं आहे, त्यामुळेंच त्यांची उत्तम वक्त्यांत व उत्तम लेखकांत गणना आहे. हा बुध जरी स्वगृहीं आहे, तरी त्याला हर्शल या पाप ग्रहानें पछाडलेलें आहे. त्यामुळेंच त्यांचे लेख व त्यांचीं भाषणें सरकारच्या अवकृपेस व त्यांच्या नाशास कारणीभूत झालेलीं आहेत. द्वितीय स्थान हें विद्यास्थान असून या भावांत वृषभ राशीचे ८ अंश व मिथुन राशीचे २० अंश उदित आहेत, ह्मणून या भावाचें आधिपत्य बुधाकडेच आहे. द्वितीय स्थान हें वाक्स्थान आहे ह्मणून त्याचें स्वामीत्व बुधाकडेच असावें. कारण बुध हा वाणीचा कारक ग्रह आहे [ज्ञो वचः]

लग्न मेष राशीचें असून तें आपल्या स्वामीनें युक्त आहे, ह्मणून बलवान् आहे. मंगळ व बुध हे स्वगृहीं असून शनि उच्च आहे. त्यामुळें ते राजयोगी आहेत. तनुस्थानीं मंगळ आहे तो त्यांच्या राष्ट्रीय पक्षाची चांगली साक्ष देत आहे. हा ग्रह भरणी नक्षत्रांत असून त्याच्या समोर स्वाती नक्षत्रांत शत्रुस्थानीं शनि आहे. हे दोन ग्रह एकमेकांस पाहात असल्यामुळें तो जसा राजयोग झाला आहे तसाच बंधनयोगही झाला आहे! शनि हा दशमाचा स्वामी असून मंगळ लग्नस्वामी असल्यामुळें राजयोग झाला. पण शनि मंगळ हे एकमेकांचे शत्रु असल्यामुळें तोच बंधनयोगही झाला. मंगळ हा जसा लग्नस्वामी आहे तसाच तो व्ययस्वामीही आहे. किंबहुना

मेष राशीचे अंश लग्नापेक्षां व्ययस्थानीं अधिक असल्यामुळें तो व्ययाधिपतिच मानिला पाहिजे. बंधनाचा विचार व्यय स्थानावर होतो. त्याचा अधिपति मंगळ हा राज्याधिपतीनें दूषित झाला. शिवाय चंद्रही व्ययस्थानींच आहे.

सांप्रत हर्शल दशमांत असून बुध हा हर्शलच्या समोर आहे. आणि शनि व्ययस्थानीं चंद्राच्या जवळ आहे. मंगळ, शुक्र, बुध व राहु हे कर्क राशींत दुर्बल आहेत, ही ग्रहस्थिति अनिवार्य संकट सुचवीत आहे. कोणासही अशा प्रकारची स्थिति प्राप्त झाली तर त्यास दुःख भोगावें लागेल यांत शंका नाहीं. ह्मणून प्रस्तुतच्या संकटांतून त्यांची सुटका होणें अशक्य आहे! ता १४ जूनच्या रात्रीं बुध हा हर्शलच्या समोर झाला. आणि १६ जूनच्या रात्रीं मंगळ हा हर्शलच्या समोर होणार ही ग्रहस्थिति अरिष्ट सुचविते.

हल्लीं सरकारनें जें दडपशाहीचें धोरण स्वीकारिलें आहे, त्यावरून खटल्याचा निकाल काय लागेल हें जाणण्यास ज्योतिषची जरूर नको. प्रोफेसरांस तुरुंगवास भोगावा लागणार!!! व त्याची मुदत निदान शनि मेष राशींत आहे तोंपर्यंत तरी सरत नाहीं. त्यांस मंगळाची महादशा असून तींत केतूची अंतर्दशा आहे. तिचा काल या पुढें ४ महिने १७ दिवस आहे. पुढें शुक्राची अंतर्दशा लागेल व ती ४५ व० ६ म० १७ दिवसपर्यंत असेल. यावरूनही त्यांची सुटका १॥ वर्षापासून २॥ वर्षेपर्यंत होत नाहीं, हें स्पष्ट आहे. या वर्षीं त्यांस गुरुबल फारच उत्तम आहे. त्याचा परिणाम थोडाबहुत तरी शुभ झाल्याशिवाय राहणार नाहीं. ह्मणूनच शिक्षेची मुदत २॥ वर्षांपेक्षां अधिक होणार नाहीं, असें खात्रीनें वाटतें. दंडाची रकमही भरपूर भरावी लागेल, असें अनुमान होतें.

महाड येथील राष्ट्रदेवतेला दुसरा बळी.

गेल्या अंकांत येथील "राष्ट्रमुख" वर्तमानपत्राचे संपादक दे० बाळकृष्ण रावजी पालवणकर यांस १२४ अच्या अपराधावरून वारंटानें पकडून नेल्याचें व त्यांच्या ऑफिसचा झाडा घेतल्याचें प्रसिद्ध केलें होतें. मागाहून असें समजतें कीं, त्यांच्यावर १५३ अचाही आरोप ठेवण्यांत आलेला आहे. यांची कुंडली खालील प्रमाणें आहे. तिचा या अंकांत ज्योतिःशास्त्राच्या दृष्टीनें विचार करावयाचा आहे.

जन्म—ता. ३।४ एप्रिल सन १८८० रात्रीं ४ वाजून १८ मि.

सायन भावचलित कुंडली.



जन्मकाळ त्यांच्या अस्सल टिपणावरून घेतला आहे. त्यांत थोडी चूक असण्याचा संभव आहे. कारण व्ययस्थानाचा आरंभ कुंभ राशीच्या ११ अंशांत असल्यामुळें चंद्र व्ययस्थानीं येत नाहीं. वास्तविक तो व्ययस्थानीं असावा असें अनुमान होतें.

दशम स्थान अगर रवि या दोहोंवर राजकीय सुखदुःखाचा विचार होतो. या कुंडलींत दशमांत पाप ग्रह नाहीं किंवा शुभ ग्रहही नाहीं. परंतु त्यावर मंगळाची दृष्टि आहे. मंगळाच्या दृष्टीचा परिणाम तीव्र असून नाशक असतो. ह्मणून सरकारी अधिकाऱ्यांवर वक्रदृष्टि असावी असें हा ग्रह स्पष्ट सुचवीत आहे. त्याप्रमाणें येथील मामलेदारांच्या कृतीवर त्यांनीं वेळोवेळ कडक टीका केलेली आहे. परंतु दशम स्थानावरून अगर त्या मंगळाच्या दृष्टीवरून ते सांप्रतच्या राजद्रोहाच्या साथीनें पछाडले जातील असें अनुमान करण्यास जागा नाहीं.

दशमाप्रमाणेंच रवीवरही राजकीय सुखदुःख अवलंबून आहे, असें वर सांगितलें आहे. त्या प्रमाणें रवि हा मेष राशींत १४ अंश असून आपल्या उच्चांत आहे. व याच राशींत भय व संकट उत्पन्नकर्त्ता ग्रह जो शनि तो १८ अंश आहे. ह्मणजे रवि व शनि यांत सुमारें ४ अंश अंतर आहे. हें अंतर फारच कमी असून रवि हा शनीशीं सुमारें ३ दिवसांनीं युति करणार होता अशा वेळीं जन्म झाला आहे. रवि व शनि यांची युति राजकीय भय, अधिकाऱ्यांशीं द्वेष व बापाशीं शत्रुत्व दर्शविणारी आहे, ज्यांच्या ज्यांच्या कुंडलींत ही युति असेल त्या सर्वांना वरील परिणामाचा अनुभव आलाच पाहिजे. ही होत असतां अगर होणार असतां जन्म होणें चांगलें नाहीं. युति झाल्यानंतर जर जन्म होईल तर त्याला वरील परिणाम बहुधा भोगावे लागणार नाहींत. तथापि एकंदरींत हे दोन ग्रह जवळ असणें चांगलें नाहीं यांत शंका नाहीं. सांप्रतचें संकट याच युतीमुळें आलेलें आहे हें वाचकांनीं ध्यानांत ठेवावें.

या वर्षीं शनि हा मेष राशींत आला असून तो डिसेंबरच्या ७ व्या तारखेपर्यंत वक्रगतीनें चालत आहे. दे. परांजपे, लोकमान्य टिळक इ० स ही त्याची वक्रगति कशी जाचक झाली हें सर्वांस महशूरच आहे! हा शनि आतां जन्मस्थ रवीवरून जाणार आहे. जन्मस्थ रवीवरून शनि जातांना मनुष्यास शारीरिक दुःख भोगावें लागतें असा सामान्य नियम आहे.

दशमाचा अधिपति गुरु हा वक्री बुधासह मेष राशींतच अश्विनी नक्षत्रांत आहे व याच नक्षत्रांत शनि वक्र झालेला आहे. बुध हा मुख्यत्वें लेखांचा द्योतक ग्रह आहे ह्मणूनच वर्तमानपत्रांतील एका लेखानें प्रसंग ओढवला आहे. बुध हा मंगळाचा शत्रु असून तो जन्मकाळीं मेष राशींत मंगळाच्याच गृहीं आहे ह्मणून दुर्बल आहे. दुर्बल ग्रह मनुष्यास दुःखदायकच होतात. ता० १ नवंबर या दिवशीं वक्री झालेला शनि मेष राशींत ४ अंश असल्यामुळें तो जन्मस्थ बुधाजवळ आला व याच दिवशीं त्यांस वारंटानें पकडून नेलें! या प्रमाणें या कुंडलींत हा एक चमत्कार घडून आला आहे! या वेळीं ही बुध वक्री असून तो अष्टमांत भ्रमण करीत आहे.

जन्मकाळचा चंद्र कुंभ राशींत ६ अंश आहे कुंभ हा शनीचा राशि असल्यामुळें तो शत्रुगृहांच आहे. चमत्कार असा झाला आहे कीं वारंटाच्या वेळींही तो त्याच राशींत तितकेच अंश होता.

या वर्षीं त्यांस गुरुबल चांगलें नाहीं. तो कन्येंत असल्यामुळें चंद्राला ६ वा आहे. सहावा गुरु मनुष्यास विपत्ति देतो असें शास्त्र सांगतें.

ज्याप्रमाणें लेखांचा विचार बुधावर होतो त्याचप्रमाणें तो द्वितीय स्थानावरही होतो. या स्थानाचा अधिपति मंगळ हा ता० ९ ला जन्मस्थ शनीच्या समोर आला होता व ता० १ ला जन्मस्थ रवीच्या समोर होता!

वरील विवेचनावरून राजकीय संकट येण्याचें कारण शास्त्रदृष्टीनें अगदीं बरोबर आहे असें वाचकांच्या ध्यानांत येईल. आतां मात्री स्थितीविषयीं विचार करावयाचा. सांप्रत राहू हा सुख स्थानीं असून अष्टमांत मंगळ आहे व दशमांत हर्शल असून गुरु ६ वा आहे. शनि तर बिघडलेलाच आहे. ही ग्रहस्थिति चांगली नसल्यामुळें व सरकारनें दडपशाहीचें धोरण स्वीकारल्यामुळें त्यांस थोडाबहुत तरी देहदंड भोगावा लागणार असें अनुमान करणें चुकीचें होणार नाहीं. वास्तविक त्यांची योग्यता व वर्तमानपत्राचा खप यांकडे लक्ष देऊन

जर कदाचित् त्यांचा लेख कायद्याच्या मर्यादेच्या बाहेर गेलेला असेल तर मेहेर नजरेनें व थोर मनानें सरकारनें त्यांस सोडूनच दिलें पाहिजे. पालवणकरांनीं एखादी डिग्री मिळविलेली नाहीं किंवा एखाद्या शास्त्राचा अभ्यासही विशेष केलेला नाहीं, लोकांवर त्यांचें विशेष वजन नाहीं व त्यांच्या पत्राचा विशेष खपही नाहीं- अशा स्थितींत त्यांस पकडण्यांत व खटला करण्यांत सरकारनें मोठासा पुरुषार्थ केला असें आह्मांस वाटत नाहीं. जातीवंत सिंह कितीही भुकेलेला असला तरी कुत्र्यामांजरावर झडप घालीत नाहीं! परशुरामानें ज्याप्रमाणें निःक्षत्रिय पृथ्वी करण्याची प्रतिज्ञा केली होती किंवा जनमेजयानें सर्पसत्र करून एकूण एक सर्प अग्नेय स्वाहा करण्याचा पण केला होता त्या प्रमाणेंच सरकारनेंही राष्ट्रीय पक्षाच्या मताचे लेखक व वक्ते यांचा स्वाहा करण्याचेंच मनांत आणलें असेल तर कांहीं ह्मणणें नाहीं!

ता. २३ नवंबर या दिवशीं अमावास्या आहे व ता. २७ ला चंद्र-हर्शल-युति आहे. ह्मणून ता. २३ ते २७ पर्यंतचे दिवस त्यांस प्रतिकूल आहेत. याच अवधींत त्यांच्या खटल्याचा निकाल होईल असें वाटतें. ता. २६ सकाळपासून ता. २८ सकाळपर्यंत चंद्र मकर राशींत आहे. ह्मणून याच चंद्रावर निकाल लागला पाहिजे. फार झालें तर मागील अनुभवाप्रमाणें कुंभ राशीचा जन्मकालचा चंद्र जितका आहे तितका ह्मालयावर ता. २८ ला निकाल लागेल.

शिक्षा किती होईल हें शास्त्रीय दृष्ट्या सांगणें बरेंच कठीण आहे. तथापि शनि हा लवकरच [ता० ७ डिसेंबरला] मार्गी होणार असल्यामुळें त्याचा वक्रदोष कमी झालेला आहे ह्मणून शिक्षा कमीच ह्माली पाहिजे असें वाटतें. शनि हा एप्रिल १९०९ च्या १३ तारखेला जन्मस्थ रवीवरून जाईल व रवीही जन्मस्थ शनीवरून जाईल तेव्हां अनिष्ट ग्रहस्थितीचा जोर नाहींसा होईल. यावरून त्यांस दीड वर्षापेक्षां कमी व ५ महिन्यांपेक्षां अधिक इतकी फार तर शिक्षा होईल.

४ ना. दादाभाई नवरोजी एम्. पी.

[विठ्ठल पुनाजी कुबल.]

जन्म — शके १७४७ श्रावण व० ७ रविवार
ता. ४ सप्टेंबर सन १८२५ रात्रीं ८ वाजून ४ मि.

निरयन.



सायन.



रा. विठ्ठल पुनाजी कुबल यांनीं निरयन कुंडलीचें वर्णन पाठविलें आहे. त्यांत सूर्य स्वक्षेत्रीं असून चंद्र आणि बुध उच्च आहेत, व श. मं. शु. हे ग्रह मित्रक्षेत्रीं आहेत ह्मणून राजयोग आहे, असें ह्मटलें आहे. परंतु वरील वेळेवरून निरयन मेष लग्न येत नाहीं, मीन येतें. त्यामुळें त्यांनीं दिलेलें वर्णन प्रसिद्ध करणें बरें वाटलें नाहीं. ना. दादाभाईंची कुंडली सायन मांडा कीं निरयन मांडा त्या दोहोंतही राजयोग स्पष्ट आहे. सायन कुंडलींत चतुर्थेश चंद्र हा धनस्थानीं उच्च असून त्याच्या चतुर्थ स्थानीं सिंह या सिंहासनदर्शक राशींत लग्नेश (मं.), भाग्येश (गु.) व धनेश (शु.) यांचा योग ह्मालेला आहे. ह्मणून हा श्रेष्ठाधिकार योग ह्माला आहे.

ना. दादाभाई नवरोजी यांची विद्वानांत गणना करितां येत नाहीं हें त्यांच्या कुंडलीवरून स्पष्ट दिसतें. ते राजकीय मुत्सद्दी ह्मणून प्रसिद्ध

आहेत. त्यांचा सर्व प्रयत्न त्याच धाजूचा आहे, हा प्रभाव दशमांतील हर्शलचा आहे. हा ग्रह पूर्ण परिभ्रमण करून सांप्रत याच राशींत आला आहे. सन १९०६ च्या डिसेंबर मध्यें गुरु आणि हर्शल हे समोरासमोर असतां त्यांस हिंदुस्थानांत राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांचा मान मिळाला हें योग्य झालें. सन १९०७ सालींही त्यांस मोठा मान मिळण्याचा संभव आहे सन १९१२ मध्यें गुरु व हर्शल यांचा योग दशमांत होईल त्यावेळीं कधींही झाला नाहीं इतका गौरव होईल. जन्मकालीं साडेसाती होती. एक वर्षानें येणारी साडेसाती ३ री आहे. या साडेसातींत राहु हा चंद्राजवळ येईल. म्हणून त्यांना साडेसाती आल्यावर आपण त्यांच्या आरोग्यासाठीं ईश्वराराधना केली पाहिजे. हर्शल दशमांत आहे तोंच त्यांच्याकडून जें कांहीं होण्यासारखें आहे तें होणार आहे, कारण तोच ग्रह राजकीय महत्वाकांक्षेस कारण आहे.

रा. कुबल यांनीं त्यांचें पुढील भविष्य वर्तविलें आहे ते येणेप्रमाणें – " ८३ वें वर्ष अति उत्तम जाईल. बहुतेक मनोरथ सिद्धीस जातील. यांच्या मसलतीनें हिंदुस्थानचें व इंग्रजी राष्ट्राचें उत्तम हित होईल. हिंदुस्थानांतील विद्यार्थ्यांस चांगलें साह्य मिळेल. दीर्घ प्रवास घडतील. अमेरिका व आशिया या देशांत प्रवास घडण्याचा योग असून त्यांत लोकांकडून व राजांकडून उत्तम मान मिळण्याचा संभव आहे. यूरोपांतील इतर देशांतसुद्धां प्रवास घडण्याचा योग येईल. फायदाही चांगला होईल. (प्रवासाचें भविष्य कर्क राशीच्या गुरूस अनुसरून केलेलें आहे असें दिसतें. ए. कुं.) वाहनादिकांचें व वस्त्रालंकाराचें सुख उत्तम मिळेल. लढाईच्या खात्यासंबंधानें लेख प्रसिद्ध होतील, व त्यांचा परिणामही साधारण घडेल. व्यापारासंबंधानें पुष्कळ भाषणें होतील व त्यांत यशही मिळेल. प्रतिस्पर्ध्यांपासून त्रास होईल, पण ते पराभव पावतील. न्यायदरबारांतील कृत्यांत उत्तम यश मिळेल. अनेक मंडळ्यांचे पुढारीपणाचे योग येतील. नवीन संस्था काढण्यांत येतील. वैयक्तिक खात्यासंबंधानें चर्चा होईल. हिंदुस्थानांतील मजुरांच्या स्थितीबद्दल वादविवाद होऊन यश मिळेल.

पत्रव्यवहार

[१]

कै० न्या० महादेव गोविंद रानडे यांचें ज्योतिषशास्त्राधारें धार्मिक, राजकीय, औद्योगिक, सामाजिक व शिक्षणात्मक गोष्टींचें वर्णन.

जन्म—ता. १८ जानेवारी
सन १८४२ सूर्यास्तानंतर
घ० २ प० ३१

निरयन जन्म कुंडली.



॥ त्रिकोणकेंद्रे यदि लग्ननाथे
शुभान्विते शोभनवीक्षितेवा ॥
॥ शुभग्रहागारगते बलाढ्ये
चतुःसमुद्रांतयशः समेति ॥

रानडे यांचा जन्म इ० स० १८४२ च्या जानेवारी महिन्याच्या १८ वे तारखेस निफाड येथें सिंह या बलाढ्य लग्नावर झाला. आपल्या अंगच्या अविश्रांत उत्साहानें व तरतरीत बुद्धिमत्तेनें जे उत्तमपद पावलेले कांहीं थोडे लोक आज या भूमीस भूषणभूत होऊन राहिले आहेत त्यांतीलच रानडे हे एक होत. व अशा लोकांचा जन्म बहुधा कर्क, सिंह, किंवा धन या लग्नांवर होतो असें स्वानुभवावरून दिसतें. त्यांचें भव्य डोकें, विशाळ छाती, रागीट मुद्रा वगैरे सिंह लग्न दाखवीत आहे.

ज्यावेळीं सिंह लग्नाचे बरेच अंश उदित असून लग्नीं कोणताही ग्रह नसतो त्यावेळीं आमचे स्वानुभवावरून ठरलेलीं खालीं दिलेलीं सिंह लग्नाचीं लक्षणें अनुभवास येतात व त्यां पैकीं बहुतेक रानडे यांचे आयुष्यक्रमांत घडून आलेलीं आहेत.

स्वानुभवावरून ठरविलेलीं सिंह लग्नाचीं लक्षणें

स्वपराक्रमानें मोठा हुद्दा व

कीर्ति मिळविणें, विद्वान व अधिकारी लोकांबरोबर सहवास असणें मोठ्या पदवीस चढण्याची इच्छा असणें, कोणासही लगट शब्द न बोलणें, मोकळ्या व उदार मनाचा, महत्वाकांक्षी, क्षुद्र व लहान कृत्यांचा तिरस्कार करणें, राजमार्गानें होणाऱ्या गोष्टींची आवड, राग लवकर येणें व फार वेळ न टिकणें, दुसऱ्यानें द्वेषबुद्धीनें सूड घेण्याचा प्रयत्न केला तरी त्याचेपाशीं उदार मनानें व प्रेमानें वागणें, शांतपणें काम करणें, अंतकाल अल्प कालांत व आनंदानें होणें, जी गोष्ट हातांत घेतली ती पुरी करण्याबद्दल दृढ निश्चय असणें, मनोविकार बलवान असणें परंतु त्याला ताब्यांत ठेवण्याची शक्ति असणें, दृढमताचा व कधीं कधीं मताग्रही, स्वपराक्रमानें द्रव्य संचय करणें, नातेवाईक व पुरस्कर्ते लोकांकडून फसले जाणें, बाप अधिकारी असणें व त्यांचे लहान पणींच त्याचा मृत्यु होणें, वडिलोपार्जित इष्टेटींत भानगड, जमिनीवरील प्रवासांत अपघात परंतु मोठी दुखापत न होणें संतति सौख्य नसणें द्विभार्या योग, ह्या राशीचें मुख्य रोग हार्ट डिसीस पाठीच्या कण्याला कांहीं तरी त्रास असणें, संधीवात रक्त व हाडें यांना कांहीं तरी विकृती असणें पत्नी व ह्याला बरेच दिवसाचा कांहीं तरी प्रकृतिमध्यें दोष असणें, नोकरी मोठ्या हुद्याची व तींत कीर्ति व मान.

लग्नपति रवि कुंभ ह्या शास्त्रीय राशींत शत्रुगृहीं बुध शुक्र ह्या पाप ग्रहांनीं युत व राहु मंगळ यांचे कर्तरींत आहे.

॥ मन्दसौम्य सिताः पापाः
कुजएव शुभावहः ॥

शुक्र १०।३ व बुध २।११ या स्थानांचे स्वामी असल्यामुळें अशुभ फल देणारे झाले व यांचा रवीला योग झाल्यामुळें त्यांचे भव्य शरीरप्रमाणें त्यांची प्रकृती निरोगी व मजबूत होती असें ह्मणतां येणार नाहीं. रंध्र स्थानीं मंगळ असल्यामुळें त्यांना गुह्य रोग पीडा किंवा मूळव्याधी सारखे रोगापासून पीडा असणें संभवनीय आहे.

चतुर्थाधिपति मंगळ रंध्रस्थानीं शनीचे त्रिराश्यंतर दृष्टींत आहे हा जन्मतः अशुभ योग वाहन सौख्यास बरा नव्हता, ज्यावेळीं मंगळ स्वराशी सन्मुख परिभ्रमण कालानें दशमस्थानीं तिसरे वर्षी आला तो काल वाहनापासून अपघात किंवा मातेस कष्टकारक आहे असें खात्रीनें सांगतां आलें असतें. ह्या वर्षी माधवरावजी कोल्हापुरास बैल गाडींतून राणीचे आईसह जात असतां कोणास न समजतां गाडींतून खालीं पडले. कांहीं वेळानें त्यांचे चुलते मागाहून घोड्यावरून बसून येत होते त्यांनीं रस्त्यांत कोणी रडत आहे असें पाहिल्यावर खालीं उतरून पाहतात तों ही स्वारी! त्याला त्यांनीं घोड्यावर घेऊन गाडीजवळ आले व त्याचे आईस सर्व मुलें आहेत काय ह्मणून विचारलें. ती गडबडीनें उठून पाहते तों महादेव नाहीं तेव्हां तिनें दुःखानें आरोळी फोडली परंतु त्याला लगेच गाडींत ठेवल्यामुळें आईचे आनंदास पारावार नाहींसा झाला. वर सांगितलें आहे कीं हा काल मातृकष्ट व वाहनापासून अपघात होण्याचा यांना योग होता परंतु तो त्यांना घातुक कां झाला नाहीं? जरी शनी मंगळ योग वाहन सौख्यास घातुक आहे तरी मंगळावर गुरूची शुभ दृष्टि आहे. या शुभ दृष्टीनें त्यांना सुरगुरूनें एक दोन वाहनांचे संकटांतून पार पाडिलें. मंगळानें संकट आणिलें. त्याचें निवारण सुरगुरूनीं केलें. तिसरें वर्षी गुरु सप्तमस्थानीं असून मंगळास दशमस्थानीं पहात होता व रवि आयुष्याधि पति भाग्य स्थानीं उच्च होता यामुळें हा अपघात जिवाला घातुक झाला नाहीं.

॥ शुक्रेण युक्तो यदि नेत्रनाथः
शुक्रस्य वार्क्षादिग्रहत्रयस्य ।
॥ संबंधवान्स्यात्यदि देहपेन
नेत्रं विधत्ते विपरीत भावम् ॥१॥

यांचा नेत्राधिपति किंवा व्य० नेत्राधिपति बुध सप्तमस्थानीं र० शुक्रानें युत आहे व मंगळाची पूर्ण दृष्टि द्वितीय स्थानावर आहे. हे योग उजव्या नेत्राची शक्ति कमी करून निरुपयोगी करू

णारे होते. त्याप्रमाणें माधवराव-जींचा उजवा डोळा वयो वर्षे २४ पासून बहुतेक निरुपयोगी झाला तरीही त्यांचा विद्याव्यासंग कमी न होतां "कीं तोडिला तरु फुटे आणखी भरानें" या उक्तीप्रमाणें दिवसें दिवस जास्त वाढला.

पंचमाधिपति गुरु त्रिकोणामध्यें स्वगृहीं बलवान् असून षष्ठ व व सप्तमाधिपति शनीनें युत आहे धनेचा गुरु असल्यामुळें त्यांची बुद्धि तीव्र व विलक्षण होती व राज्यकारभारामध्यें प्रमुखत्व मिळालें कुंभेला रवि बुध शुक्र योग व मिथुन राशीच्या समोर गुरु शनि योगानें अनेक विषयांमध्यें त्यांचीं बुद्धि विलक्षण तऱ्हेची चालत होती. शनि हा रोग, शत्रू व स्त्रीसुख अभाव यांचा कारक असल्यामुळें गुरूला त्याचे योगानें थोडा मंदपणा आला व या त्रयीपासून त्यांचे बुद्धीस बराच त्रास होत असे असें दिसतें.

॥ सुतेशे पंचमे यस्य तस्य
पुत्रो न जीवति ॥

पंचमस्थानीं धनेचा गुरु असल्यामुळें संततिसौख्य नष्ट झालें. व सप्तमस्थानीं र. बु. शु. योग व अष्टमस्थानीं (मारकस्थानीं) मंगळ योगानें स्त्रीसौख्यावर घाला आणिला.

यांचा इंग्रजी विद्याभ्यास थोडा कोल्हापूर येथें होऊन नंतर ते मुंबईत एलफिस्टन स्कूलमध्यें शिकूं लागले. तेथें त्यांची विलक्षण तऱ्हेची बुद्धिमत्ता पाहून शिक्षक लोकांस त्यांचें फार कौतुक वाटत असे. ज्यांचा धनाधिपति किंवा लाभाधिपति गुरु असून बलवान असेल किंवा त्रिकोणाधिपति असून केंद्रीं किंवा त्रिकोणीं बलवान असेल त्यास १६ वे वर्षापासून द्रव्यप्राप्ति होऊं लागते. माधव रावजींच्या पंचमस्थानीं गुरु बलवान असल्यामुळें १६ वे वर्षापासून १५।२० रुपयांची स्कालरशीप मिळूं लागली. जेव्हां गुरु १७ वे वर्षी (१८५९) काल भ्रमण कालानें यांचे ९ नवम स्थानीं मेषेला आला तेव्हां ते मॅट्रीक परीक्षेंत उत्तीर्ण झाले. २० वे वर्षी (१८६२) गुरु कर्केला आला

त्यावेळीं बी. ए.ची परीक्षा पास झाले. २४ वे वर्षी (१८६६) धनेला आला त्यावेळीं एल. एल. बीची परीक्षा पास झाले. व अखेरची ऍडव्होकेटची परीक्षा २५ वे वर्षी (१८७१) गुरु नवम स्थानीं पुन्हा मेषेला आला त्यावेळीं झाली. सुदैवानें विश्वविद्यालयानें अधिक परीक्षा ठेविल्या नाहींत ह्मणून बरें झालें. नाहीं तर आणखीही परीक्षा त्यांनीं दिल्या असत्या. ज्या ज्या वेळीं गुरु बलवान झाला त्या त्या वेळीं त्यांना सरस्वतीनें यशाची माळ घातली व कीर्ति व मानमरातब वाढला. विद्यार्थी दशेत असतांना माधवरावजीनीं लिहिलेले इंग्रजी निबंध एतद्देशीयांस इंग्रजी किती उत्कृष्ट लिहितां येतें ह्याचा मासला ह्मणून त्यांचे प्रोफेसरांनीं आस्कफर्ड प्रोफेसरांकडे पाठवून दिले. ते वांचून तिकडील प्रोफेसर लोक इंडियन लोकांचे विद्वत्तेची व बुद्धिसामर्थ्याची तारीफ करूं लागले. माधवरावजी वर्तमान पत्रांतून जे लेख देत असत ते इतके विद्वत्ताप्रचूर व माहितीनें ओतप्रोत भरलेले असत कीं "टाईम्स" सारख्या प्रमुख आंग्लोइंडियन पत्रानें सुद्धां आपले अग्रलेखांत रानडे इतका इंग्लीश मध्यें लिहिणारा किंवा बोलणारा इंग्लीश मनुष्यसुद्धां मिळणें कठीण आहे" असें लिहिलें आहे. यावरून त्यांचे विद्वत्तेबद्दल इंग्लीश लोकांचे मनांत किती पूज्य बुद्धि होती हें दिसून येतें.

वयोवर्षे २४ (१८६६) मध्यें ज्यावेळीं गुरु पंचम स्थानीं आला व चंद्र दशमस्थानीं काल भ्रमण कालानें आला त्यावेळीं रानडे यांस विद्याखात्यांत मराठी ट्रॅन्सलेटरची जागा मिळाली. व या वर्षापासून त्यांचा खरा भाग्योदयाचा काल सुरूं झाला. वयोवर्षे २६ ते २९ (१८६८ ते १८७१) पर्यंत ते एलफिस्टन कालेजांत इंग्लिश भाषेचे असिस्टंट प्रोफेसर होते व ह्या मुदतींत ते अक्कलकोटास कांहीं दिवस कारभारी व कोल्हापुरास न्यायाधीश होते. वयोवर्षे २७

(१८६९) मुंबई हायकोर्टात थोडे दिवस असिस्टंट रिपोर्टरचें काम केलें. वर्ष २९ (१८७१) मुंबईच्या तिसऱ्या मॅजीस्ट्रेटच्या जागीं त्यांस नेमिलें. वर्ष ३९ (१८८१) मुंबई प्रेसिडेन्सी मॅजीस्ट्रेट होते. वर्ष ४५ (१८८७) शेतकऱ्याच्या कायद्यान्वयें त्यांस स्पेशल जज्जाचे हुद्यावर नेमलें. अखेर ५१ वे वर्षी (१८९३) हायकोर्ट जज्जाची जागा मिळाली.

मधवरावजी यांचे बुद्धीफतीला शनीनें दूषित केलें आहे व नवमाधिपति किंवा धर्माधिपति मंगळ हा मीन या द्विस्वभाव व जुळ्या राशींत आहे. यामुळें त्यांचीं धर्मासंबंधीं तत्वें दुटप्पी वर्तनाचीं होतीं असें दिसतें. मंगळावर गुरु शनीची त्रिराश्यंतर दृष्टि असल्यामुळें त्यांचीं धर्मतत्वें पुरातन तत्वांच्या विरुद्ध किंवा भ्रष्ट असणें स्वाभाविक होतें. ह्या तत्वांचा मंगळ अधिपति बलवान नसल्यामुळें त्यांचीं तत्वें दृढ नव्हतीं व त्यांनीं कितीही प्रयत्न केले असते तरी तीं अबाधित झालीं नसतीं व त्यापासून जनसमूहाचें कल्याण झालें नसतें. ज्या रानड्यांनीं मोरोपंतांच्या काव्यावर अरसिकता दर्शक अभिप्राय देण्यास चुकले नाहींत त्यांनींच विश्व विद्यालयांत मराठीचा शिरकाव होण्याचा प्रयत्न करावा, ज्यांनीं प्रार्थना समाजांत उपासना चालविण्याचेवेळीं प्रेमळ वाणीचा ओघ सुरू झाला कीं साक्षात् स्वर्ग सुख अनुभवित आहों, असें दाखवून इतर समाजावर कोरडे कोरडे ओढावे त्यांना गौड सारस्वत ब्राह्मणांच्या ठाकूरद्वारीं पुराणांवर टीका करतांना प्रार्थनासमाजाच्या तत्वांचे स्मरण राहूं नये, मूर्तीपूजा निंद्य आहे ह्मणून समाजांत ओरडावें व स्वग्रहामध्यें तुळशी वृंदावनाभोंवतालीं जमिनीची धूळ पाडावी जातिभेद विध्वंसं व पुनर्विवाहोपक्रम ह्या सारख्या सुधारणा इष्ट आहेत ह्मणून टाहो फोडावा व ईश्वर कृपेनें कसोटीस लागण्याची पाळी आली असतां पुनर्विवाहाचीं तत्वें खुंटीस गुंडाळून पुरातन पद्धतीनें शास्त्रोक्त विधि करावा ही खऱ्या खऱ्या सामाजिक व धार्मिक सुधारणा करणारांचीं लक्षणें नव्हेत. असल्या पुढाऱ्यांकडून आंधळा समाज फशीं पडतो. त्यांचीं धर्मासंबंधीं तत्वें सर्वव्यापी किंवा अबाधीत राहणारीं नव्हतीं व तीं हल्लींच्या स्थितींत अमलांत येणें शक्य नव्हतें.

माधवरावजींचा वाणीपती बुध रवीनें अस्तंगत आहे व मंगळाची द्वितीय स्थानावर पूर्ण दृष्टि असल्यामुळें त्यांचें अंगीं वक्तृत्वशक्ति विशेष नव्हती. व वाणीही मधुर नव्हती.

माधवरावजींनीं समाजाचें कल्याण करण्याविषयीं अविश्रांत श्रम घेतले परंतु त्यांचा बुद्धीपति गुरु व लोकपक्षाचा कारक चंद्र यांचा ६।८ योग असून पराक्रमाधिपति शुक्र निर्बळ आहे. ह्यामुळें त्यांचे विद्वत्तेचा व राज्यकार्यधुरंधरपणाचा लोकांना अल्प उपयोग झाला असें दुःखानें ह्मणावें लागतें. नोकरी सोडून जर ते कांहीं दिवस देशकार्य हातांत घेते तर समाजाचें फार कल्याण झालें असतें पण तशी त्यांस बुद्धि झाली नाहीं. हें ह्या देशाचें दुर्दैव होय. अखेर १९०१ च्या जानेवारीच्या १६ व्या तारखेस रात्रीं झोंपतेवेळीं छातींत कळ मारू लागली व वैद्य येतो न येतो इतक्यांत प्राणोत्क्रमण झालें.

डि. एस. दिवाडकर.

[२]

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस.–

सा. न. वि. वि. आपले ता.११ जून सन : मजकूरचे अंकांत रा० रामकृष्ण गंगाधर माईणकरांनीं आह्मांस उद्देशून लिहिलेलें पत्र पाहिलें त्यांतील एक एक वाक्य घेऊन त्यावर आतां उत्तरें देत बसणें ह्मणजे आपल्या मौल्यवान पुस्तकांतील पृष्ठें अडविणें होय. हा विषय शास्त्रीय आहे. यांत त्यांचें व आमचें अध्ययन किती आहे याची वाटा घाट करणें व्यर्थ आहे. पंचांगशोधन सभेमध्यें जेवढे ज्योतिषी जमले होते ते सर्व. रा. केतकरांचे दृष्टीनें दुराग्रही होतेच. सभेंत झालेला प्रकार माईणकरांचे दृष्टीला जसा पडला तसा तो त्यांनीं आतां मांडलाच आहे. तेव्हां ज्या

अर्थी माईणकर आतां आपले पक्षाचें समर्थन करण्यास तयार आहेत त्या अर्थी ह्या केतकर प्रभृति मंडळीनें त्यांचे त्यांसच जे योग्य लोक [ज्योतिषी व धर्मशास्त्री) वाटत असतील त्यांचीच निवड करून सभा कोठें, कधीं, किती दिवस करावयाची तें ठरवून प्रसिद्ध करावें ह्मणजे त्याठिकाणीं आह्मी हजर राहून माईणकरांनां हल्लीं जे जे प्रश्न विचारले आहेत ते व सभा होईपर्यंत आणखी जे तयार होतील ते, तसेंच गणितानें एकच एकादशी येते तेव्हां धर्मशास्त्रमुळींच पहात नसतात पण गणिताचे वेळांत कांहीं तफावत दिसल्यास दुसरी एकादशी होते व ती कांहीं लोक करितात तेव्हां मात्र धर्म शास्त्र उघडतात ह्या ह्मणण्याचा विचार, तद्वतच इन मण्डलांत मास अधिकमास निर्णया करितां घेऊं नये किंवा घ्यावा ह्याची वाटाघाट, धर्म शास्त्राशीं गणितशास्त्राचा मुळींच संबंध नाहीं हें ह्मणणें, आह्मीं दिलेलीं उत्तरें गणिताचा बिचार न करितां दिलीं असून खोटीं आहेत किंवा खरीं आहेत वगैरे वगैरे जीं जीं ह्या मंडळींचीं ह्मणणीं असतील त्या सर्वांचींच उत्तरें यथामती देऊं. कळावें लोभ असवा हे विनंति.

आपला

वासुदेव नारायण कट्टकर

---

* यापुढें व्यक्तिविषयक लेखास स्थल मिळणार नाहीं.

संपादक ' कुं. वि.'



आफ्रिकेंतीत एका मुसलमानी संस्थानांत [नांव आठवत नाहीं.] असेच पक्ष होऊन तंटे सुरू झाले.

अमेरिका—रूझवेल्ट हे दुबार प्रेसिडेंट निवडले गेल्यामुळें त्यांची जोडून १० वर्षांची कारकीर्द झाली.

व सर्व जगांत—धनी व सेवक या उभयतांचे तंटे होत आहेत. त्यामुळें संप होत आहेत.

वरील एकंदर हकीगतीवरून खालीं नमूद केलेल्या विषयांत क्रांति होऊन तिचा कांहीं एक निश्चित परिणाम १९१२ च्या अंतीं होईल?

१ सत्ता २ धर्म ३ शिक्षण ४ शास्त्रमत ५ व्यापार ६ समाज व संस्था ७ कुटुंबकलह ८ राष्ट्रकलह ९ अपघात १० साधनें व ११ प्लेग. कळावें ही विनंति.

दत्तात्रय कृष्ण देवधर.

देशभक्त
बाबू अरविंद घोस

यांचा जन्म ता० १५ आगष्ट सन १८७२ घ० ५७ प० २८ या दिवशीं झाला. त्या वेळची ग्रहस्थिति येणें प्रमाणें.—

सायन भावचलित.



निरयन



सायन चंद्रावरून महादशा

चं	मं.	रा.	गुरु	शनि
८	१६	३३	४९	६८
६	६	६	६	६
२२	२२	२२	२२	२२
३०	३०	३०	३०	३०

गुरूच्या अंतर्दशा.

गु.	श.	बु.	के.	शु.	र.	चं.	मं.	रा.
३९	३८	४०	४१	४४	४४	४६	४७	४९
८	२	५	५	१	१०	२	१	६
१०	२२	२८	४	४	२२	२२	२८	२२
३०	३०	३०	३०	३०	३०	३०	३०	३०

यावरून त्यांस सांप्रत गुरूच्या महादशेंत शनीची अंतर्दशा आहे. गुरु हा अंशतः षष्ठेश असून शनि पूर्णपणें आहे. ही अंतर्दशा ३८ व. २ म. २२ दि. ३० घ. पर्यंत आहे. यांच्या कुंडलींत जन्मकाळीं षष्ठ [शत्रु] स्थानीं चंद्र व शनि एकत्र आहेत, हा योग अत्यंत अनिष्ट आहे. सांप्रत हर्शल त्यांच्या स्थानीं आला असून शनि हा चंद्राच्या चतुर्थ स्थानीं आहे. राहू लग्नीं असून तो चंद्राला ८ वा आहे. अशा बिकट स्थितींतूनही कानपूरचे योगशास्त्री सपशेल सुटतील असें भविष्य करितात! (ही कुंडली मुंबईहून एका सन्माननीय गृहस्थांनीं पाठविली आहे)

कुंडलीविज्ञान

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥
'भवभूतिः,

पुस्तक ७वें.] श्रावण शु० २, रविवार [अंक १७ वा

मुंबई इलाख्याचे नवे गव्हर्नर

सर जार्ज सिडेनहॅम क्लार्क यांची नेमणूक झाल्याचें प्रसिद्ध झालें आहे. यांचा जन्म इंग्लंडांत लिंकन शायर परगण्यांत ता. ४ जुलई सन १८४८ रोजीं झाला. यांची कुंडली मांडण्यास साधन जें जन्मकाल तो माहित नसल्यामुळें लग्नकुंडली मांडितां येत नाहीं. परंतु राशि कुंडली मांडण्यास हरकत नाहीं. यांची कारकीर्द मुंबई इलाख्यास कोणत्या प्रकारें फलद्रूप होईल याचें अनुमान ज्योतिःशास्त्राच्या दृष्टीनें कसें काय होतें, तें पहावयाचें आहे. अशा तऱ्हेचा प्रयत्न हाच पहिला आहे, त्यामुळें तें कितपत जुळेल तें सांगवत नाहीं. तथापि हा प्रयत्न आहे. अमुक मनुष्याची कारकीर्द कशी होईल हें त्याच्या स्वभावावरून जाणतां येतें व स्वभाव कुंडलीवरून कळतो, ह्मणून प्रथम कुंडलीवरून स्वभाव ज्ञान काय होतें तें पाहूं.—

राशिकुंडली.



या दिवशीं ग्रीनीच १२ वाजतांचे ग्रह.

र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.	ने.
क.	सिं.	सिं.	सिं.	क.	क.	मी.	क.	मे.	मी.
१२	२८	१६	२	२७	७	२५	२४	२२	२ व.

लंदनचे अक्षांश ५१ अं. ३२ क. उत्तर आहेत. व मुंबईचे अक्षांश १८ अं. ५७ क. उत्तर आहेत. यांच्या जन्मकाळीं शनि व नेपच्यून यांवांचून सर्व ग्रह उत्तर गोलार्धांतच होते. त्यांची क्रांति अनुक्रम— २२, १०, १६, १७, २१, २३, ८, अशी आहे. शनीची द. ३ व ने. ची द. ११ आहे. राहूसुद्धां दहा ग्रहांपैकीं सात ग्रह उत्तर गोलार्धांत असतां याच गोलार्धांत जन्म होणें हें श्रेष्ठ भाग्याचें लक्षण होय. यांत मुंबईच्या अक्षांशाला मंगळ व हे ग्रह जवळ आहेत. हे ग्रह जन्मकाळीं सिंह या बादशाही राशींत चंद्रलग्नीं आहेत. अर्थात् यांची कारकीर्द मंगळ व बुध यांच्या स्वभावानुरूप जाईल असें एक दृष्टीनें अनुमान होतें.

सिंह राशींत चंद्र, मंगळ व बुध हे ग्रह त्यांस राजयोगास मुख्यत्वें कारण झाले आहेत. कर्क आणि सिंह हे बादशाही राशि आहेत व चंद्र आणि रवि हे राजे आहेत. हे ग्रह यांच्या जन्म काळीं या बादशाही राशींत असून आणखी ४ ग्रह आहेत. म्हणजे दहा ग्रहांपैकीं

६ ग्रह बादशाही राशींत असतां जन्म झाला. तेव्हां हे इलाखाधिपती कसे झाले हें सांगण्याची जरूर नाहीं !

सिंह हा स्वभावतःच मानी व महत्वाकांक्षी आणि अधिकार गाजविणारा असा राशि आहे. याच राशींत मंगळ आहे. म्हणून हे बादशाहीच्या मतांप्रमाणेच असले पाहिजेत असें वाटतें.

युद्धकौशल्य मंगळावर अवलंबून असतें. हा ग्रह सिंह राशींत फारच बलवान् असतो. म्हणून यांस युद्धाची व युद्धकलेची विशेष आवड असली पाहिजे. कुंडलीवरून दिसणारा हा गुण अगदीं तंतोतंत जुळतो. कारण, यांनीं लष्करी विषयांसंबंधानें कांहीं पुस्तकें लिहिलीं आहेत. १८८२ मध्यें हे ईजिप्तच्या स्वारीवर गेले होते. १८८५ सालीं ते सौदनच्या मोहिमेंत होते. स्वाकीन येथील मोहिमेबरहीं हे गेले होते. १९००–१ सालीं ते वॉर ऑफीस आर्गनायझेशन कमेटीचे सभासद होते. या हकीगतीशीं मंगळाचे धर्म अगदीं तंतोतंत जुळत आहेत.

हे ज्या कालीं मुंबई इलाख्याचा राज्यकारभार आपल्या हातीं घेणार त्या कालीं गुरु सिंह राशींत असणार आहे. या राशींतच जन्मकालीं चंद्र आहे. म्हणून यांचें मन यावेळीं उदार व थोर असेल. सिंह राशीचा गुरुच कालेजी इतकी मोठ्या योग्यतेची जागा देण्यास कारण झाला आहे, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

मंगळावरून यांच्या कारकीर्दीत कवायती व सैन्याच्या हालचाली विशेष होतील, असें वाटतें. सुशिक्षित वर्गास यांच्यापासून तादृश त्रास पोंचणार नाहीं असें वाटतें. यांची इलाख्यावर चांगली जरब असेल. पहिल्या वर्षी यांचा जिकडे तिकडे गौरव होईल व राजेलोकांकडून अनेक प्रसंगीं मान मिळेल. सार्वजनिक हिताचीं कामें होतील. राज्यकारभारांत विशेष ढवळा ढवळ होत नाहीं. वर्तमानपत्रकारांस विशेष भीति नाहीं. कारण, हे थोर अंतःकरणाचे व स्वतंत्र विचाराचे आहेत त्यामुळें त्यांच्या मनावर चुगलखोरांच्या चाहाड्यांचा विशेष परिणाम कधींच होणार नाहीं. जरब, टापटीप, करारीपणा, आपणास

लोकांत मोठा मान मिळावा ही इच्छा, नीटनेटकेपणा इ० गुण यांच्या अंगीं असतील. यावरून जरी हे दप्टशाहीच्या मताचे असले तरी प्रस्तुतच्या काळीं ते लोकांकडून चांगलेंच ह्मणवून घेतील असें वाटतें.

यांना जन्मकाळीं शनि आठवा होता. सांप्रतही तो याच राशींत आहे. त्यामुळें तो आठवा आहे. आठवा शनि प्रकृतीला चांगला नाहीं. ह्मणून त्यांस हिंदुस्थानची हवा कितपत मानवते हें पाहिलें पाहिजे. या शनीला डिसेंबर अखेर मंगळ मिळेल. ह्मणून डिसेंबर, जानेवारीमध्ये त्यांची प्रकृति नीट राहणार नाहीं, असें अनुमान आहे.

मीं नोकरीवर पुनः रुजू होईन काय ?

ता. २८ जानेवारी सन १९०७ या दिवशीं भानगड उत्पन्न झाली. ता. १६ मे १९०७ रोजीं सस्पेंडीचा हुकूम झाला व ता. २१ मे १९०७ रोजीं अंमल बजावणी झाली.

जन्म–ता. २४ फेब्रुवारी सन १८६८ सोमवार

पहांटेस ४ वाजून ३९ मि.

सायन.



द्वादशभाव.

लग्न–कुं. ३–१७ जाया–सिं. ३–१७

धन–मी. ९	मृत्यु–क. ९
सहज–मे. १४	धर्म–तू. १४
सुख–वृ. १५	कर्म–वृश्चि. १५
सुत– मि. १०	लाभ– ध. १०
रिपु– क. ७	व्यय– म. ७

स्प. ग्रह.

र.	च.	मं	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.
मी.	मी.	कुं.	मी.	मी.	मे.	ध.	क.	सिं.
६	२२	२८	१६	१४	१२	५	५	१०

ता० २८ जानेवारी १९०७ चे स्प. ग्रह.

र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा	ह.
कुं.	कर्क	वृश्चि	कुं.	कर्क	ध.	मी.	सिं.	म.
७	२३	२५	३	२७.	२१	१२	२	१०

प्रथमतः हें संकट येण्यास कोणती ग्रहस्थिति कारण झाली ती पाहूं. कारण, जी ग्रहस्थिति संकट उत्पन्न करण्यास कारण झाली, ती बदलल्याशिवाय या प्रश्नाचा निकाल लागणें शक्य नाहीं. जन्मकालचा योग व त्याच्या परिणामाचा काल यांचा विचार केल्याशिवाय प्रश्नाचें उत्तर देणें मूर्खपणाचें आहे. प्रथमतः रोग्याला रोग कां उत्पन्न झाला यांचें निदान जसें वैद्य करितो, तसेंच ज्योतिष्यानेंही केलें पाहिजे. निदान न करितां औषध देणारा वैद्य जसा शतमूर्ख तसाच निदान न करितां उत्तर देणारा ज्योतिषीही शतमूर्खच समजला पाहिजे. ह्मणून प्रथमतः आपण या रोग्याचें ज्योतिःशास्त्रदृष्ट्या निदान करूं.

लग्न कुंभ आहे, ह्मणून या राशीचा स्वामी जो शनि तो या लग्नाचा स्वामी आहे. लग्नांत या राशीचे थोडकेच अंश उदित आहेत, ह्मणून लग्नस्वामी शनि हा एकच ग्रह आहे.

दशम भावारंभी वृश्चिक राशीचे १५ च अंश उदित आहेत ह्मणून दशमाचा स्वामी मंगळ होय.

*

जन्मकालीं दशमाचा स्वामी जो मंगळ तो लग्नीं कुंभ राशींत आहे ह्मणजे शनीच्या गृहीं आहे. मंगळ हा शनीचा शत्रु आहे. ह्मणून हा योग नोकरींत संकट आणणारा आहे असें शास्त्रीय पद्धतीनें ठरतें.

धनु हा अग्निराशि आहे ह्मणून या राशींतला शनि क्लेश, दुःख व संकटें उत्पन्न करणारा आहे. एकादश भावाचा आरंभ धनु राशीच्या १० अंशांत असून शनि ५ अं. त असल्यामुळें तो दशम भावांतच राहतो. मात्र तो पूर्णपणें नाहीं. जन्मकालीं दशमांत अग्निराशींत किंवा शत्रुगृहीं शनि असणें नोकरीस चांगलें नाहीं. वारंवार नोकऱ्या सोडणें, नोकरींत संकटें येणें, अधिकाऱ्यांची गैरमर्जी असणें, सरकारी किचाट उत्पन्न होणें वगैरे गोष्टींस तो कारण होतो. हा ग्रह स्थानपरत्वें मंगळाच्या दशमांत आहे. हाही योग नोकरीस चांगला ह्मणतां येत नाहीं.

ता. २८ जानेवारीच्या दिवशीं शनि हा मीन राशीचे १२ अंश आहे. ह्मणजे जन्मस्थ चंद्राच्या मागें १० अंशांवर व रवीच्यापुढें ६ अंशांवर असा रवि व चंद्र ह्यांच्यांत मध्यवर्ती झाला. रवि व चंद्र हे दोन्ही ग्रह शनीचे शत्रु आहेत. त्यांत चंद्र हा षष्ठेश व रवि हा सप्तमेश आहे. ह्मणून स्वजातीयांच्या द्वेषामुळें अपवाद व संकटाची उत्पत्ति झाली. हें तंतोतंत शास्त्रानुसार घडलें, ही आश्चर्याची गोष्ट आहे! ज्योतिःशास्त्राचा वर वर विचार करणारांस या निदानाचा उलगडा होणें नाहीं.

या दिवशींचा चंद्र पहा. तो कर्क राशींत २३ अंश असून या कुंडलींत तो षष्ठेश आहे व तो या दिवशीं स्वगृहीं बलवान् झाला आहे ! हा ग्रह असें सुचवितो की, तुह्मीं आज चौऱ्यायशींच्या फेऱ्यांत सांपडलां आहां ! तुमच्यावर अपवाद येऊन तुह्मीं संकटांत पडणार आहां.

या ठिकाणीं वाचकांना अशी एक शंका येईल कीं, चंद्र हा दर महिन्यास त्या ठिकाणीं येतो, मग याच वेळीं तो असें कां सांगतो ? यास उत्तर— चंद्र प्रत्येक वेळीं त्या मनुष्यास हेंच सांगत असतो. ह्मणून ज्ञानें नेहमीं सावध राहिलें पाहिजे.

आहे. इतर ग्रहस्थिति जर अनुकूल असेल तर मोठें संकट मात्र येणार नाहीं. पण बारीक सारीक मात्र आल्याशिवाय कधींही राहणार नाहीं. शनीचा एक सामान्य नियम असा आहे कीं तो रवीच्या जवळ गेला ह्मणजे संकट आणितोच. त्यांतच साडेसाती असली ह्मणजे मग काय विचारितां ? संकट निश्चयानें यावयाचें असें समजावें. अशा स्थितींत चंद्र षष्ठ स्थानीं ज्या दिवशीं असेल तो प्रत्येक दिवस संकटाचा व दुःखाचा ह्मणून समजण्यास हरकत नाहीं.

सप्तमाचा स्वामी रवि हा तनुस्थानीं कुंभ राशींत शनीच्या गृहीं ह्मणजे शत्रुगृहीं आला आहे, तोही संकट सुचवीत आहे. एकाचकाळीं इतके ग्रह बिघडले हेंच या संकटाच्या उत्पत्तीचें निदान आहे. सप्तम स्थान हें न्यायाचें स्थान [कोर्ट] आहे. त्याचा अधिपति रवि हा शत्रुगृहीं असून या स्थानांत आहे. ह्मणून तत्संबंधीं कागदपत्रांच्या कामांत अपवाद उत्पन्न होणें साहजिक आहे.

जेव्हां एखादा योग जन्मकालींच असतो, तेव्हां संकटांतून पार पडणें, कठीण जातें. येथें कांहीं अंशीं तशीच स्थिति आहे. ह्मणून हें कष्टसाध्य आहे, असें समजावें. केवळ असाध्य आहे, असें ह्मणतां येत नाहीं. संकटकालीं मंगळ दशमांत स्वगृहीं आहे, ह्मणून संकटांतून मुक्तता होईल असें अनुमान होतें. त्रिवाय गुरु सप्टंबर पासून सप्तमांत जाणार आहे ह्मणून तो न्याय देईल असेंही खात्रीनें वाटतें.

ता. २१ मे १९०७चे स्पष्ट ग्रह.

र.	चं.	मं	बु	गु.
वृष.	कन्या.	म.	वृष.	कर्क
२९	७	१७	२५	१०
शु.	श.	रा.	ह.	
तू.	मीन	कर्क	म.	
२८	२५	२६	१२	

या दिवशीं मंगळ व्ययस्थानीं हर्शलच्या जवळ आहे, ह्मणून नोकरीचा पगार बंद होऊन घरीं स्वस्थ बसावें लागलें. हा ग्रह आगष्टच्या १० वी पर्यंत वक्री आहे;

वक्री मंगळ कधींही इष्ट करीत नाहीं. ह्मणून तोंपर्यंत कोणतीही गोष्ट साध्य नाहीं. त्याच प्रमाणें तो व्यय स्थानीं आहे, तोंपर्यंत ही नोकरीवर रुजू होतां येईल असें वाटत नाहीं. आगष्टमध्यें रवि, बुध शुक्र हे तीन ग्रह सप्तम स्थानांत आले आहेत, ह्मणून आगष्ट १० वी नंतर निकाल होईल, असें एका अर्थी वाटतें.

पण, याला एक अडचण आहे. ती अशी कीं, या वेळीं गुरु सप्तमांत प्रवेश करीत नाहीं. मंगळ व्यय स्थानींच असून तो आगष्टमध्यें २६व्या तारखेला हर्शलास येऊन मिळणार आहे, व शनि वक्री असून तो नवंबर अखेर मार्गी होतो. साडेसातींत वक्री शनि इष्ट नाहीं. या एकंदर गोष्टी विचारांत घेतल्यास जानेवारी १२ तारखेनंतर इष्ट गोष्ट घडून यावी असें अनुमान होतें.

अमुकच कालीं निकाल होईल, हें शक्य तितक्या विचारांनीं ठरविलें आहे. आतां अनुभव काय येतो, हें पाहणें आहे. अनुभवानंतर या गोष्टीचा जास्त विचार करूं.

मीं यंदा पास होईन काय ?

ता. २५ नवंबर १९०७ स्टँडर्ड १० वाजतां एल्. एम्. ॲन्ड एस् ची परीक्षा असून या परीक्षेस एक विद्यार्थी बसणार आहे. त्याचा जन्मकाल येणेप्रमाणें.–

जन्म–ता.१डिसेंबर सन १८८३
शनि. स. ८ वाजून ६ मि.
सायन



द्वादशभाव

ल–मकर १–४२	जा–कर्क १–४२
ध–कुंभ ४	मृ–सिंह ४
स–मीन९	ध–कन्या९
सु–मेष१३	क–तूळ१३
सु–वृषभ१२	ला–वृश्चिक१२
रि.—मिथुन७	व्य—धनु७

स्पष्ट ग्रह.

र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.
ध.	ध.	सिं.	ध.	सिं.	ध.	मि.	वृ.	क.
८	२३	१९	११	४	२६	६ व	०	२७

द्वादश भाव आणि स्प. ग्रह यांवरून कोणालाही सायन भावचलित कुंडली मांडितां येईल. छापण्याच्या गैरसोईमुळें लग्न कुंडलीच देण्याचा क्रम ठेविला आहे. यांत वाचकांची गैरसोय होते, पण या गोष्टीस तूर्त नाइलाज आहे. भावचलितांत राहू दशमांत व शनि पंचमांत येतो.

या परीक्षेंत पास होणारे विद्यार्थी पुढें डॉक्टरचा धंदा करणारे होतात. या विषयला अग्निराशि, वृश्चिक राशि व मंगळ हीं ग्रह यांची स्थिति अनुकूल असावी लागते. कापणें, सांधणें, रासायनिक मिश्रणें करणें हे धर्म अग्निराशि व मंगळ यांचे आहेत. वरील कुंडलींत सिंह आणि धनु या अग्निराशींत ६ ग्रह आहेत व वृश्चिक राशींत राहु आहे, ह्मणून हा विद्यार्थी डॉक्टर होण्याला पात्र झाला आहे. बरेच ग्रह अग्निराशींत व मंगळही अग्निराशींतच असल्यामुळें हा विद्यार्थी आपल्या कामांत बराच पटाईत होईल. नवम स्थानीं कन्येंत हर्शल असल्यामुळें तो आश्चर्यचकित कामें करून जिकडे तिकडे प्रसिद्ध होईल. सिंह राशींत गुरु व मंगळ असल्यामुळें मोठा मानी, हुद्देदार व अंमलदार होईल.

द्वितीय आणि पंचम हीं स्थानें विद्या दर्शवितात. अष्टम आणि एकादश हीं त्यांच्या समोरचीं स्थानें आहेत. ह्मणून परीक्षेच्या कालीं हीं स्थानें बलवान् असलीं पाहिजेत. सन १९०२ च्या नवंबरांत हा विद्यार्थी मॅट्रिक झाला. त्या वेळचे व आतांचे ग्रह पुढील प्रमाणें आहेत.

*

१९०२ चा नवंबर



१९०७ चा नवंबर



पहिल्या वेळीं गुरु कुंभ या शास्त्रीय राशींत आहे व तो विद्यास्थानीं असून बुध, शुक्र, रवि हे ग्रह वृश्चिक राशींत एकादश स्थानीं आहेत, ह्मणून त्या वेळीं मॅट्रिकची परीक्षा उतरली. आतां या परीक्षेच्या वेळीं विद्यास्थानीं मंगळ आला आहे व गुरु त्याच्या समोर अष्टमांत आहे. बुध पूर्वीप्रमाणेंच एकादश स्थानीं आहे. यावरून या वेळींही परीक्षा उतरली पाहिजे असें सिद्ध होते. या परीक्षेस मंगळाचेच महत्व अधिक आहे व तो त्याप्रमाणें विद्यास्थानीं शास्त्रीय राशींत आलाही आहे. जन्मकाळीं गुरुमंगळ एकत्र होते, ते या वेळीं समोरा समोर आहेत व ते तसेच येणें जरूर होतें. कारण त्याच ग्रहांवर ही परीक्षा मुख्यत्वें अवलंबून आहे. या खेपेस त्यास एल, एम् ॲंड एस् ही पदवी मिळावयाची आहे, ह्मणून गुरु सिंह राशींतच पाहिजे.

या कुंडलींत बरेच ग्रह अष्टम व व्यय स्थानीं आहेत, त्यामुळें ही एका साधारण मनुष्याची कुंडली असावी, असें जर कोणी अनुमान करील तर तें कसें चुकेल तें पहा. ह्मणून उदितार्धांतील ग्रहसंख्या, कर्क व सिंह हे राशि व लग्न, चतुर्थ, नवम आणि दशम हीं स्थानें यांवरून मनुष्याची योग्यता ठरविली पाहिजे. या कुंडलींत शनीवांचून सर्व मुख्य ग्रह उदितार्धांत आहेत व सिंह राशींत गुरु मंगळ आहेत, ह्मणून ही कुंडली मोठ्या भाग्यवान् मनुष्याची आहे असें ह्मटलें.

कुंडलीविज्ञान

यदाकिंचिज्ज्ञोऽहं द्विप इव मदान्धः समभवं ।
तदा सर्वज्ञोऽस्मीत्यभवदवलिप्तं मम मनः ॥
यदा किञ्चित्किञ्चिद्बुधजनसकाशादवगतं ।
तदा मूर्खोऽस्मीति ज्वर इव मदो मे व्यपगतः ॥

पुस्तक ७ वें.] मार्च्य ता. २१, १९०७ [अंक ३ रा.

१ कुंडलीसंग्रह

[गणेश अनंत सप्रे. वकील]

१



जन्मकाल मिळाला नाहीं. १७ व्या वर्षी म्याट्रिक, १८ व्या वर्षी पी. ई. १९ व्या वर्षी इंटरमिजियेट २१ व्या वर्षी बी. ए. २३ व्या

वर्षी एम्. ए. ला च वर्षी नोकरी. अकिंटग पोस्टल सुपरिंटेंडंट पगार २००

२



जन्मकाल मिळाला नाहीं. हे गृहस्थ ५६ वर्षांचे असून फर्स्टक्लास सबजज्ज आहेत. पगार ५०० रु. धर्मशील, आचारवान्.

३



जन्म ता. १६ डिसेंबर सन १८७३ हे एल् एल्. बी. असून हायकोर्ट वकील आहेत. कोणत्याही परीक्षेंत अपयश मिळालें नाहीं

४



जन्म — ९ जानेवारी सन १८७९ अतिशय शांत. एल् एल्. बी.

इंजिनियरची पहिली परीक्षा पास होऊन नं. १ चें बक्षीस मिळालें. जिल्ह्याच्या ठिकाणीं वकीली करितात.

५



जन्म — चैत्र शु. १० शके १८०६ इष्टकाल घ० ४० प० २५ हे गृहस्थ बी. एस्. सी. पास झाले आहेत. एक वर्ष फेलो असून एम्. ए. चा आभ्यास चालू आहे. बुद्धि अत्यंत तीव्र आहे.

६



जन्म — शके १८०१ फाल्गुन व० १३ सूर्यास्तानंतर घ० २६ प० २ ह्या गृहस्थांचा जन्म जहागीरदार कुळांत झाला आहे. विद्या बेताची. बुद्धि चांगली. लोअर हायर परीक्षेचा स्पेशल परवानगी मिळून २८ व्या वर्षी मामलेदार झाले. यांस पुढे मोठाल्या जागा मिळण्याचा संभव आहे.

[गो. प. कोडें]

७



जन्म — शके १७७५ ज्ये. शु. गुरुवार सू. नं. घ. ४ प. २० बलसाड जि. सुरत

हे जातीचे गुजराथी शिंपी आहेत. विद्या अल्प. २०।२५ वर्षांपूर्वी वडिलांबरोबर शिवण्याचा धंदा करण्यास मुंबईस आले. पुढें त्याच धंद्यांत बराच फायदा झाल्यावर कापडाचें दुकान काढून त्यातच कपडे शिवण्याची सोय केली. या धंद्यांत १० लक्ष रुपये मिळविले! दोन लक्षांच्या चाळी बांधून त्यांच्या उत्पनांतून सदावर्त ठेविलें आहे. मुलें बरींच झालीं, आतां एक मुलगी व एक मुलगा आहे. यांचे घशांत काहीं विकार होऊन ६ महिने आजारी होते. शेवटी शके १८२७ पो व. १३ रोजीं परलोकवासी झाले.

* वरील सर्व कुंडल्या निरयन आहेत. ए. कुं.

---

२ पत्रव्यवहार

[१]

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस:–

कृ. सा. न. वि. वि. खालील दोन ओळींस आश्रय द्याल अशी आशा आहे.

सायन कुंडली.



१९ वें शतकामध्यें प्रसिद्धीस आलेला ज्योतीषी जो रॉफेल त्याची ही जन्म कुंडली आहे. त्याचा जन्म ब्रिस्टलमध्ये तारीख १९ मार्च्य १७९५ सकाळीं तास ९ मि. ५ व सेकंद २० नीं मिथुन या शास्त्रीय राशीवर झाला. ह्याला लहानपणापासूनच ज्योतिष शास्त्राचा नाद होता. ब्रिस्टलमध्ये थोडा विद्याभ्यास झाल्यावर तो लंडनमध्यें गेला. लंडनची रास मिथुन ह्यांचें लग्न मिथुन मग काय विचारतां? याची येथें भरभराट होणारच मिथुन व कुंभ ह्या दोन शास्त्रीय राशी ह्याचे कुंडलींत पूर्ण बलवान् असून गुरु शुक्र युति त्रिकोणामध्यें कुंभ राशीला असल्यामुळें ह्याला शास्त्रीय विषयाचा एक सारखा नाद ठेवणारे होते. हर्शल हा ग्रह ज्याचे कुंडलींत बलवान् असेल त्याला ज्योतिषशास्त्राचें ज्ञान होतें जे लोक थोडें ज्ञान असून कुंडलींतील गुह्य गोष्टी सांगण्यामध्यें पारंगत असतात ते याच्याच पराक्रमामुळें. ह्याचे कुंडलींत हर्शल व बुध समोरासमोर आहेत, ते त्याला फलज्योतिषामध्यें पारंगत करणारे होते. परंतु रवीनें बुध अस्तंगत असल्यामुळें त्याची गणितामध्यें अक्कल चालत नसे. ज्या वेळीं गुरु हा ग्रह २० वे वर्षी परिभ्रमण कालानें याचे पंचम स्थानीं आला त्यावेळीं त्यानें एक ज्योतिष शास्त्रावर बुक लिहिलें व त्याच वर्षी त्याचें लग्न झालें. पंचमस्थानीं बुध आला त्यावेळीं

दुसरें बुक लिहिलें व २९ वे वर्षी बुध भाग्य स्थानीं आला त्यावेळीं ह्यानें अत्युत्तम ज्योतिष शास्त्रावर ग्रंथ लिहिला व त्याच वर्षी ह्याची कीर्ति फार झाली. व खरा भाग्योदयाचा काळ ह्या वर्षापासून सुरू झाला. पुन्हा गुरु ३१ वे वर्षी पंचमस्थानीं आला त्यावेळीं त्यानें फार मोठा फलज्योतिषावर ग्रंथ लिहिला व नवमस्थानीं आला त्यावेळीं अखेरचा ग्रंथ लिहिला.

ह्याचे कुंडलींत विशेष चमत्कारिक योग असा आहे कीं लग्नापासून चतुर्थ स्थानापर्यंतचे सर्व स्वामी ह्याचे दशमस्थानीं एकत्र आहेत. अशा चमत्कारिक योगावर जन्मलेले मनुष्य असामान्य व्हाव. याचेच. पंचमाधिपति शुक्र बलवान असल्यामुळें संतति ५।७ झाली परंतु शुक्राच्या पंचमांत शनि व पंचमस्थानासमोर मंगळ ह्या दोन कुयोगामुळें बरींच नष्ट झाली व व राहिलेली रोगी व अशक्त अशी होतीं.

रवि चंद्र अमावास्यायोग, तनुपति अस्तगंत, लग्नाला र. चं. बु ह्या तीन पापग्रहांची त्रिराश्यंतर दृष्टि व हर्शलाची ह्या तीन पापग्रहांवर पूर्ण दृष्टि हे सर्व योग ह्याची प्रकृति चांगले ठेवणारे नव्हते हें स्पष्ट दिसत आहे. त्याची प्रकृति फार नाजूक होती व चेहरा फिक्ट होता. अखेर प्रकृति क्षय रोगावर जाऊन वयाचे ३७ वे वर्षी तारीख २६ फेब्रुवारी १८३२ रविवारीं मृत्यु झाला. मरणसमयें रवि मीन राशींत ७ अंशावर होता.

डि. एस् दिवाडकर

---

(२)

स्वानुभव

[रा. गणेश दामोदर ग्रंथे]

१ ज्यांच्या कुंडलींत तृतीय स्थानीं मंगळ किंवा रवि असतो ते स्वतः वडील भावंड असतात किंवा ते भावंडांपासून अलग राहतात किंवा त्यांचीं भावंडें अल्पायु असतात.

२ दशाहिकांत विवाहाचे जे नियम प्रसिद्ध झाले आहेत, तेच

स्त्रियांचा मासिक ऋतुकाल पाहण्यासही लागू पडतात.

३ लग्नीं एकटा हर्शल असतां मनुष्य मध्यम ठेंगणा, गिड्डा व आखूड मानेचा असतो.

४ एक दिवस आयुष्याच्या एका वर्षाबरोबर आहे. ह्मणून ज्या वर्षाचें भविष्य पाहिजे असेल तितक्या दिवसांची जन्मानंतर जन्मवेळेची लग्नकुंडली मांडावी. चंद्राच्या रोजच्या गतीस १२ नें भागावें, ह्मणजे १ महिन्याची गति येईल. ह्यास पुन्हा ४ नें भागावें. ह्मणजे एक आठवड्याची गति येईल. या चंद्राचा वरील कुंडलींत उपयोग होतो. ही वर्ष फलाची रीति राफेलच्या बुकांत दिली आहे. उदा०— एकाचा जन्म ता. ११ डिसेंबर सन १९०६ रोजीं रात्रीं १० वाजतां आहे. त्याची ता० २० डिसेंबर १९०६ ची सदर वेळची कुंडली मांडिली व वरील रीतीनें तयार केलेला चंद्र व त्या दिवशींचे ग्रह भरले, ह्मणजे विसावे वर्षाची वर्ष फलाची कुंडली तयार झाली असें समजावें.

५ स्वभाव स्ट्रिक्ट असणें हा पापग्रहांचा धर्म होय. अशा लोकांच्या कुंडलींत लग्नीं, तृतीय अगर सप्तम स्थानांत पापग्रह असतात. सिंह लग्नाचाही असा स्वभाव असतो मात्र ह्या लग्नीं शनि नको.

खादाड, हावरा, दुसऱ्याचे गुण दोष काढणारा, हट्टी, खुनशी व खट्याळ असा वृश्चिक लग्नाचा स्वभाव आढळतो. मकर लग्नाचे गुण वृश्चिक लग्नाचे खालोखाल दृष्टीस पडतात. हीं दोन लग्नें मनुष्यास सद्गुणी करित नाहींत.

७ स्वदेशी चळवळींत पडणाऱ्या लोकांपैकीं बहुतेकांचीं कर्क व सिंह ह्यांपैकीं लग्नें आढळतात.

८ ग्रहांमध्यें गुरुशुक्र हे अत्यंत शुभ ग्रह आहेत ज्यांच्या कुंडलींत हे उत्तम ठिकाणीं बली असे असतात, ते लोक संसारांत बहुतकरून सुखी असतात. गुरु हा विद्या, आरोग्य, संतति, संपत्ति व शुक्र हा अन्न, विलासादि सुखें, पतिपत्नीसुख ह्यांचे कारक आहेत. संसारांत ह्याच नोष्टी मुख्य असतात.

(३)

राजयोग — रा. गोपाळ जगन्नाथ जोशी—डाणें

समाजीराव शिंदे



दत्ताजी शिंदे



झादजी शिंदे



जनकोजी शिंदे



दौलतराव शिंदे



कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥
'भवभूतिः'

पुस्तक ८ वें.] माघ कृ. ४, शुक्रवार [अंक ६ वा.

कुंडलीविज्ञान.

या पुस्तकास वरील नांव देण्याचें कारण कुंडल्यांचें विशेष सूक्ष्म ज्ञान झालें पाहिजे. हें आहे. हें ज्ञान होण्यासाठीं प्रथम सामान्य नियमांचें ज्ञान होणें जरूर होतें. त्यामुळें जितक्या कुंडल्या देणें जरूर होतें तितक्या देतां आल्या नाहींत. यांपुढें कुंडलीविज्ञानच्या मूळ हेतूस अनुसरून कुंडल्या देण्याचें ठरविलें आहे.

अनुक्रमांक १

जन्म—शक १८०३ पौष शु० १४ मंगळवार. ता. ३ जानेवारी सन १८८२ दिवसास १ वाजून ३० मिनिटांनीं.

सायन



निरयन



जन्मकाळीं मंगळ, गुरु, शनि हे ग्रह वक्री आहेत. वरील दोन्ही लग्नकुंडल्या आहेत.

वर्णन.— मातृपितृसुख उत्तम. भाऊ मुळींच नाहीं, पाठीवरची एक बहीण आहे. नेत्र पाणीदार आहेत. उंची ५ फूट ४ इंच आहे. वर्ण निमगोरा. नेत्र किंचित् लहान आहेत. प्रकृति सशक्त व सुदृढ आहे. स्वभाव महत्वाकांक्षी. प्रवासाची फार हौस. ८।१० दिवसांत प्रवासाचा योग खात्रीनें येतो. कोणत्याही प्रकारचें व्यसन नाहीं. **इलेक्ट्रिकल इंजिनियर व सब ओव्हरसीयर** या परीक्षा पास आहेत. हातीं घेतलेल्या कामांत अपयश सहसा येत नाहीं. पगार ६० रुपये दरमहा. विवाह होणें आहे.

सायन कुंडलींत लग्नेश शुक्र हा मकर या चर राशींत आहे, चंद्र कर्क या चर राशींत व सप्तमेश मंगळ हाही कर्क या चर राशींत असल्यामुळें प्रवासाची हौस आहे व नेहमीं प्रवास होतो. शनि लग्नीं असल्यामुळें नेत्र किंचित् लहान आहेत. लग्नीं गुरु व शनि हे दोन मोठे गोल असल्यामुळें महत्वाकांक्षा आहे. पंचमांत कन्येचा हर्शल व नवम स्थानीं रविबुधयुक्त यांचा योग आणि लग्नीं गुरु व शनि असल्यामुळें वरील परीक्षा झाल्या आहेत. भाग्यवान् मनुष्याची कुंडली असावी तशी आहे. जायास्वामी मंगळ हा आपल्या नीचांत व कुटुंबस्वामी अस्तंगत असल्यामुळें विवाह अद्याप होणें आहे. याप्रमाणें या कुंडलीवरून ज्ञान होतें.

अनुक्रमांक २.

जन्म—ता० १६ माहे जानेवारी सन १८७४ शुक्रवार सकाळीं १० वाजून ४२ मि०

सायन.



निरयन.



वर्णन.—शरीरसुख उत्तम. वर्ण साधारण गोरा. उंची ५फूट २इंच कमरेजवळ किंचित् दांडिल. छाती अरुंद. प्रकृति उष्ण. आंबट सोसत नाहीं. पित्त होतें. वयाचे दुसरे वर्षी डोकीवर भयंकर शस्त्रघात. वयाचे तिसरे चवथे वर्षाचे सुमारास उजव्या डोळ्यास रेड्यानें शिंग मारिल्यामुळें फार भयंकर दुखापत. त्यावेळीं डोळा साफ फुटण्याच्या बेतांत होता. ९ व्या वर्षाच्या सुमारास डाव्या डोळ्यावर भयंकर फटका बसला होता. पण इजा झाली नाहीं. वयाचे १३ व्या वर्षी विहिरींत बुडत होतों. मोठ्या प्रयासानें दुसऱ्यानें बाहेर काढिलें. वय वर्षें १७ पर्यंत. अंगावर नेहमीं खरूज असे. हल्लीं फक्त जांघेजवळ बारीक खरूज असते व कमरेवळ्याची इजा मधून मधून होत असते. डोकें साधारण मोठें. कानाजवळ दोन्ही बाजूला फुगलेला भाग. समोरचे दांत चांगले. चेहरा देखणा उजव्या बाजूची हाड लहानपणींच पडलीं असून पदार्थीचें चवर्ण एका बाजूनेंच होतें. १६ व्या वर्षी झाडावरून पतन. कमर आणि पाय शरीराचे मानानें जाड. आहेत. कुटुंबांतल्या माणसांबरोबर बेबनाव दोन भाऊ. एक वडील व एक धाकटा. धाकट्या तीन बहिणी आहेत. वडील भावाबरोबर आज ७ वर्षे बेबनाव आहे. स्वभाव भित्रा व संशयवृत्त असा आहे. आई हयात आहे. शेता, वाडी व जनावरें यांचें सुख उत्तम आहे. जास्त बोलण्याची संवय आहे. १८ व्या वर्षी मराठी ६ व्या यत्तेची परीक्षा पास झाली. १९ व्या वर्षी ७ रुपयांवर नोकरी लागली. ३० व्या वर्षी ट्रेनिंग कालेजची पहिल्या वर्षाची परीक्षा बाहेरून बसून दिली. हल्लीं १२ रुपयांवर शाळामास्तर. ज्योतिःशास्त्र व धर्मशास्त्र यांची अत्यंत आवड आहे. २६ वर्षी एक अपुऱ्या मासांचें अपत्य मयत झालें. २८ व्या वर्षी १मुलगी झाली. नंतर ३० व्या वर्षी दुसरी मुलगी झाली मातुलसौख्य कमी एक मामा आहे. पण सुख नाहीं. पहिलें लग्न २१व्या वर्षी झालें. ती स्त्री २३ व्या वर्षी मयत झाली. २५ व्या वर्षी ज्येष्ठांत पुनः लग्न झालें. दोन्ही बायका मोठ्या कुटुंबांतल्याच मिळाल्या. दुसरी स्त्री गौरवर्णी असून स्वभावानें तापट आहे. सासऱ्याकडून उत्तम मदत आहे. कीर्तन करण्याचा नाद आहे. २२ व्या वर्षी पितृनिधन झालें. खर्च करण्याबद्दल विशेष पर्वा वाटत नाहीं.

सायन कुंडलींत मेष या अग्नि राशींचें लग्न उदित असून धनु या अग्निराशींतच चंद्र आहे, त्यामुळें

प्रकृति उष्ण आहे. धनु राशीत चंद्र असतां शरीर मजबूत होते. अपघात करणारा राशि धनु आहे. या राशीचे शेवटले अंश अनिष्ट असतात. चंद्र या राशीत २८ अंशावर आहे व तो चतुर्थ स्थानाचा अधिपति असून त्याच्या चतुर्थ स्थानीं मंगळ आहे, त्यामुळें बरेच अपघात झाले. नेत्रस्थानीं राहू व मंगळ हे ग्रह असल्यामुळें नेत्रांस दुखापत होण्याचे प्रसंग आले. हे ग्रह जर अग्निराशीचे असते तर दुखापत चांगलीच झाली असती. धनु राशीपासून मीन राशीपर्यंत ६ ग्रह आहेत व ते कुंडलीतही ९ व्या स्थानापासून १२ व्या स्थानापर्यंत आहेत, ह्मणून पाय शरीराच्या मानानें जाड आहेत. व्ययस्थानीं मंगळ द्वितीय स्थानीं राहू व जायास्वामी शुक्र हा अस्तंगत आहे, ह्मणून एक स्त्री अल्प काळांत मृत होऊन दुसरा विवाह झाला २३ व्या वर्षी स्त्री-निधन व पितृनिधन झाले आहे, या वेळीं साडेसाती होती. नवम स्थानची साडेसाती आईबापांस बहुधा मारक होते. पहिलें लग्न २१ व्या वर्षी झालें तेव्हां गुरु हा चंद्राच्या सप्तमांत होता व दुसरें लग्न २५ व्या वर्षी झालें तेव्हां गुरु हा लग्नाच्या सप्तमांत होता. पंचमांत हर्शल असल्यामुळें व त्यासमोर शनि असल्यामुळें पहिलें अपत्य जगलें नाहीं. पंचम स्थानावर मंगळाची दृष्टि असल्यामुळें मातुलसुख कमी आहे. ज्य स्थानीं मंगळ आहे त्या स्थानीं शनि गेला यावर पहिले दोन अपघात झाले. तिसऱ्या दुखापतीच्या वेळीं राहू ज्या स्थानीं आहे त्या स्थानीं शनि होता. चवथ्या अपघाताच्या वेळीं शनि चतुर्थ स्थानीं कर्क या जलराशीत रवीच्या समोर व चंद्राच्या अष्टमांत असा होता. ५ व्या अपघाताच्या वेळीं सुद्धां तो चतुर्थ स्थानींच असला पाहिजे. द्वितीय स्थानीं राहू असल्यामुळें जास्त बोलण्याची संवय आहे. नवमस्थ चंद्र आहे त्यामुळें कीर्तनाचा नाद आहे. याच ग्रहामुळें शिक्षकाचा धंदा झाला. पंचमांत हर्शल असल्यामुळें ज्योतिःशास्त्राची आवड आहे. सप्तम स्थानाचें जें दशम स्थान तें सासऱ्याचें स्थान आहे. या स्थानाचा अधिपति चंद्र हा नवम स्थानीं आहे ह्मणून सासऱ्याकडून चांगली मदत होते. व्ययस्थानीं मंगळ असल्यामुळें खर्च करण्याबद्दल विशेष पर्वा वाटत नाहीं. एकादश स्थानीं खराशीचा शनि असून उदितार्धांत बरेच ग्रह आहेत ह्मणून सांपत्तिक स्थिति चांगली आहे.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥
'भवभूतिः'

पुस्तक ८ वें.] माघ कृ. १४, रविवार [अंक ७ वा.

कुंडलीविज्ञान.

अनुक्रमांक ३.

जन्म.—शके १७८८ कार्त्तिक व० १० शनिवार रात्रीं ४ वाजून ३० मि०

सायन.



निरयन.



सायन ग्रहांचे अंश.—शनि१७ रवि९ शुक्र२४ बुध२१ गुरु० नेपच्यून१० हर्शल७ मंगळ० राहु२९ चंद्र१२

हे गृहस्थ मांत्रिक आहेत. सर्पासारखे विषारी प्राणी चावलेले बरेच लोक यांनीं केवळ मंत्रसामर्थ्यानें १।२ तासांत उतरलेले आहेत. ज्या मनुष्यांस दंश झाला असेल त्या मनुष्यांस झाडाशीं उभें बांधून नंतर दोन भुवयांच्यामध्यें हातानें पाणी मारण्याचा सपाटा चालवितात. पाणी जोरानें मारितात. तें इतकें कीं चांगल्या मनुष्यास तें एकवारही सहन करवणार नाहीं ! परंतु रोगी एकेक तास सहन करूं शकतो. सुमारें १५।२० मिनिटांनीं तो रोगी नको, नको, सोड, सोड, जातों, जातों असें बोलूं लागतो. परंतु हें त्याचें बोलणें बरकरणी असतें. मंत्री या त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवित नाहीं. रोग्याचा डोळा मंत्र्यावर असतो, तो मंत्र्याला शत्रूसारखा मानीत असतो व त्याच्या अंगावर धांवून दंश करण्याच्या प्रयत्नांत असतो, ह्मणून रोग्याला बांधून ठेविल्याशिवाय गत्यंतर नसतें. रोगी सुटा असतां तो जरी बेशुद्ध होऊन निश्चेष्ट पडलेला असला तरी मंत्र्याची चाहूल लागतांच तो डोळे उघडतो, व त्याच्या अंगावर धांवून जाण्याचा प्रयत्न करितो. रोगी बोलूं लागला ह्मणजे कित्येक वेळां संतापानें असें ह्मणतो कीं "चांडाळा, घात केलास रे, घात केलास. थोडा वेळ नसता आलास तर मी आपला पराक्रम कसा आहे तो दाखविला असता" मंत्र्याचा रोग्यावर एकदां पगडा बसला ह्मणजे तो मंत्र्याच्या अगदीं कह्यांत येतो. मग त्यास वाटतील ते प्रश्न करावे. तो आपलें नांव सांगून दंश करण्याचें कारणही सांगतो. इतकेंच नव्हे तर माझा देह ह्या वेळीं अमुक अमुक ठिकाणीं आहे असेंही सांगतो. परंतु हा प्रश्न मंत्री सहसा विचारीत नाहीं. कारण कित्येक लोक त्या ठिकाणीं जाऊन त्या प्राण्यास ठार करितात ! मंत्री हे विषारी प्राणी कधींही मारीत नाहींत. रोगी आपल्या व मंत्र्याच्या गुरूचें नांव अचूक सांगतो ! जसजसा विषार कमी होऊं लागतो तसतसा तो मनुष्य सावध

होत जातो, त्यामुळें पुढें प्रश्न बरोबर उतरत नाहींत. तो विषारी प्राणी रोगी खुला करितांना पुष्कळच आढेवेढे घेत असतो, शपथ लवकर घेत नाहीं व तुळशीपत्र अगर गाईचें शेण उजव्या हातावर एकाएकीं घेत नाहीं. वारंवार डावा हात पुढें करितो. असे त्याचे लपंडाव चालू असतात. अखेरीस तो चांगला शुद्धीवर येतो ! हा चमत्कार अनेकांनीं पाहिलेला आहे.

या गृहस्थांनीं महाडापासून जवळच्या एका आढी नामक गांवीं एक जंगल घेतलें असून त्याच्या तोडीचें काम सुरू केलें आहे. ता. २२ फेब्रुवारी सन १९०८ शनिवार या दिवशीं सायंकाळीं दिवस मावळतांना जंगलांतून घरीं येत असतां वाटेंत या गृहस्थांस वाघानें गाठलें. जवळपास आसपास एकही मनुष्य नव्हतें, अशा स्थितींत वाघ चवताळून आंगावर आला. तेव्हां त्यांनीं आपल्या अंगांतील कोट काढून तो हातांत वर धरिला. त्या बरोबर वाघानें झडप टाकून तो कोट उचलून जवळच १०।२० हातांवर नेला व तेथें त्याचे राई राई एवढे तुकडे केले ! या वेळीं हे गृहस्थ बेशुद्ध होते. त्यांचें आयुष्य सबळ होतें, संरक्षक परमेश्वर जवळच होता. त्याची लीला अगाध आहे. कितीही भयंकर संकट आलें तरी त्यांतून जर एखाद्यास त्याच्या मनांत सोडवावयाचें असलें तर तो अशा कांहीं गोष्टी घडवून आणितो कीं तें संकट सहज टळावें. असाच प्रकार या वेळीं घडला. वरील वाघाची स्वारी ज्या ठिकाणीं झाली त्या ठिकाणापासून सुमारें अर्ध्या मैलावर सडकेवरून याच वेळीं एक लग्न चाललें होतें, त्यांत एक बंदुकीचा बार झाला. त्याबरोबर वाघानें तेथून लांब प्रयाण केलें. आवाजासारखे ते गृहस्थ सावध झाले व वाघ नाहीं असें पाहून सडकेवर धांवत आले ! अशा रीतीनें त्यांची काळाच्या जबड्यांतून सुटका झाली.

ी आतां, त्यांची कुंडली पहा. लग्नस्वामी मंगळ हा सिंह राशींत असून चतुर्थेश शनि वृश्चिक राशींत लग्नीं आहे. शनि मंगळ हे एकमेकांच्या दृष्टांत आहेत, हेंच वरील संकटाचें मूळ कारण असावें. या दिवशीं चंद्र मूळ राशींत व्यय स्थानीं असून त्याच्या समोर षष्ठ स्थानीं मंगळ होता. चंद्र व मंगळ हे त्या दिवशीं दुपारीं ३ वाजून ६ मि. नीं समोरासमोर होते, अर्थात् हा दिवस अपघातास रखा होता, हें निर्विवाद आहे. रवि चतुर्थ स्थानीं मीन राशींत मध्यवर्ती होता, चतुर्थेश शनि हाही मीन राशींतच पण पंचम स्थानीं होता. मकर, मीन व मेष या राशींत अनुक्रमें हर्शल, रवि, शनि व मंगळ हे ग्रह असून त्यांनीं चतुर्थस्थान वेढून टाकिलें होतें. याप्रमाणें सर्व सामान्य कारणेंच झालेलीं होतीं. गुरु हा दशमांत सिंह राशींत होता, तो या वेळीं मुख्य संरक्षक होता. म्हणून जसें सहज संकट आलें तसेंच लवमलही इजा न करितां सहजच निघून गेलें. वरील संकटकाळीं चंद्र हा तूळ राशींतून वृश्चिक राशींत जात होता व मंगळ मेष राशींतून वृषभ राशींत जात होता. चंद्र आणि मंगळ हे ग्रह समोरा समोर येऊन राशयंतर करीत होते, म्हणून ही वेळ प्रयाणाला घातक होती. या पेक्षां ज्योतिःशास्त्र अधिक सांगूं शकणार नाहीं.

बुध व शुक्र हे ग्रह अगदीं जवळ जवळ असून द्वितीयस्थानीं आहेत, त्यामुळें हे गृहस्थ मांत्रिक झाले. मंत्रक्रिया हा विषय शुक्राचा आहे. हा शुक्र विद्यास्थानीं बुधानें युक्त झाला, म्हणूनच हे गृहस्थ मांत्रिक झाले. भावचालित कुंडलींत लग्नस्वामी मंगळ हा नवमस्थानीं सिंह राशींत असून पंचमाचा व द्वितीयस्थानाचा अधिपति जो गुरु त्याच्यासमोर आहे, म्हणून ते वरील गुणानें सर्वत्र प्रसिद्ध आहेत. नवमस्थान हें कीर्तिस्थान आहे. अपमृत्यूचें कारण मात्र अस्पष्ट आहे, असें म्हटल्यावांचून गत्यंतर नाहीं. केवळ चंद्रासमोर षष्ठस्थानीं मंगळ आल्यानें इतका प्राणावरचा प्रसंग

यावा, हें आश्चर्य आहे. ज्योतिष्यानें इतका भयंकर प्रसंग येईल असें खात्रीनें सांगितलें नसतें. फार तर आजचा दिवस वाईट आहे इतकेंच सांगतां येणें त्यास शक्य होतें.

वारिप्रीतिकूरकमामयानां चिंता शंका मातुलानां विचारः ॥
होरापारावारपारप्रयातै रेतत्सर्वं शत्रुभावे विचिंत्यम् ॥

याप्रमाणें षष्ठस्थानावर कोणकोणत्या गोष्टींचा विचार होतो तें जातकाभरणांत सांगितलें आहे. परंतु प्रस्तुतचें संकट यावें असें या श्लोकावरून दिसत नाहीं.

अरिभवनादरिचोरक्षत विघ्नक्लेशनाभ्युदरदेशान् ॥
मधुरादि षड्रुपदंशान् ग्रहराश्युदितान् वदेत्प्राज्ञः ॥

हा सर्वार्थचिंतामणींतला श्लोक आहे. यावरून षष्ठस्थानीं विघ्नाचा विचार होतो असें होतें. वरील गृहस्थांस घरीं येतांना हें विघ्नच आलें होतें !

रिपौमातुलमांद्यारिचतुष्पाद्व्रंधभीव्रणान् ॥

असें ताजिक नीलकंठींत आहे. शत्रु, मातुल, रोग, चतुष्पाद जनावरें प्रतिबंध, भय व व्रण या गोष्टी सहाव्या स्थानावर पहावयाच्या, या वरून अशा प्रकारचे अडथळे उत्पन्न व्हावे असा तो काल होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. या कुंडलींत मंगळ हा षष्ठेश आहे. म्हणून तो त्या स्थानांत चंद्रासमोर आल्यानें प्रतिबंध, भय, चिंता या गोष्टी घडल्या. मंगळ हा लग्नेश असून तो व चंद्र हे या वेळीं चर राशींत होते, म्हणून हे गृहस्थ वाट चालत होते. जंगलांतून सायंकाळीं एकटें घरीं येणें सर्वदा सुरक्षित नाहीं हें प्रत्येकानें कबूल केलेंच पाहिजे. त्यांत षष्ठस्थानीं मंगळ हा चंद्रासमोर आला असतां तर प्रवास करणें शहाणपणाचें नाहीं, इतकी इशारत ज्योतिःशास्त्रानें दिली असती.

हें संकट ज्या वेळीं आलें, त्या वेळची कुंडली अशी आहे.—



सप्तमस्थान हें प्रवासाचें स्थान आहे. या स्थानांत या कालीं दोन क्रूर ग्रह आहेत व मृत्युस्थानीं मंगळ हा चंद्रासमोर आहे. अर्थात् आजची संध्याकाळ रानांतून एकटें जाण्यास सोईची नाहीं असें ज्योतिष सांगतें.

ज्योतिषशास्त्राचा उपयोग नाहीं असें ह्मणणारांनीं वरील गोष्ट विचारांत घ्यावी. वेळ अशी आहे कीं, प्रवास करणें सुरक्षित नाहीं, असें ज्यो. शा. सांगतें. ह्मणून विचार करून जर बरोबर सोबत घेतली असती अथवा ती वेळच टाळली असती तर हें संकट आलें नसतें असें ह्मणण्यास जागा आहे. अर्थात् हें उपयोगीं शास्त्र आहे असें कबूल केलेंच पाहिजे. विचारानें चालणाऱ्यास या शास्त्रासारखी कोणाचीही मदत नाहीं. विचारी मनुष्यच जगांत खरा सुखी प्राणी आहे. 'अविवेकः परमापदां पदं' असें भारवीचें ह्मणणें आहे, तें सर्वांनीं निरंतर ध्यानांत ठेवावें.

ज्योतिःशास्त्रावरच सर्वस्वी अवलंबून रहावें असें आमचें ह्मणणें नाहीं. कारण तितकें तें पूर्णावस्थेस जाऊन पोहोंचलेलें नाहीं, अथवा तितकें जाणणाराही कोणी नाहीं. परंतु असें जरी आहे तरी त्यांत कांहीं सामान्य तत्वें आहेत, व तीं निखालास सत्य आहेत. त्यांचा धिक्कार करून चालणार नाहीं. सर्वशास्त्रें मनुष्याच्या सुखासाठींच आहेत. ह्मणून सुख इच्छिणारांनीं हें शास्त्र शक्य तितकें विचारांत घ्यावें असें आमचें ह्मणणें आहे.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥
'भवभूतिः'

पुस्तक ८वें.] चैत्र कृ० ५, मंगळवार [अंक १२वा.

कुंडलीविज्ञान.

अनुक्रमांक ५.

जन्म—ता. १७ एप्रिल सन १८८८ मंगळवार
सकाळीं ५ वाजतां

सायनभावचलित कुंडली



या कुंडलींत लग्नीं रवि असून सप्तम स्थानीं हर्शल आणि वक्री मंगळ आहे. ही ग्रहस्थिति आपणास काय सुचविते बरें ? हर्शल हा ग्रह अकस्मात् विलक्षण व भयंकर गोष्टी घडवून आणणारा ग्रह आहे, ह्मणून स्त्रीच्या संबंधांत अशा प्रकारची गोष्ट घडून येईल असें भविष्य आपणास करितां येईल. मंगळ व रवि हे ग्रह स्त्रीला मारक आहेत, ह्मणून प्रथम स्त्रीचें सुख मिळणार नाहीं आणि द्वितीय संबंध करण्याचा प्रसंग येईल इतकेंही आपण खात्रीनें सांगितलें असतें. रवि व मंगळ हे ग्रह ताप, रक्तदोष, उष्णतेचे विकार, अग्नि व शस्त्र यांची पीडा अशा प्रकारचे दोष उत्पन्न करितात हेंही आमच्या वाचकांस सांगितलें पाहिजे असें नाहीं. वाचक हो, आपलें अनुमान अगदीं खरें आहे. या गृहस्थांची पत्नी ता. १३ फेब्रुवारी इ० स० १९०८ रोजीं सकाळीं ८ वाजतां लुगडें पेटून भाजली. ती इतकी कीं, त्यामुळें ती ता. १५ फेब्रुवारीला सकाळीं ५ वाजतां मृत्यु पावली ! हा योग विवाहानंतर सुमारें ११ महिन्यांनी आला !! आतां या दिवशींचे ग्रह कसे होते ते पाहूं [स्प. ग्र. पुस्तक पहा]

मंगळ मेष राशींत तनुस्थानीं बलवान् होता. मेष हा अग्निराशि आहे. तो २३ अंशांत होता ह्मणजे जन्मस्थ रवीच्या सान्निध गेला होता. अर्थात् स्वतःला व स्त्रीला अग्निभय करण्यास समर्थ होता.

जायास्वामी व कुटुंबस्वामी शुक्र हा मीन राशीच्या २९ व्या अंशांत होता, आणि शनि त्याच्या जवळ होता. हा ग्रह फारसा बिघडलेला नव्हता. तथापि कोणत ही ग्रह राशीच्या शेवटीं एखाद्या पाप ग्रहाच्या जवळ असेल तर तो अनिष्ट गोष्टींचा सूचक होतो यांत शंका नाहीं.

हर्शल मकर राशींत दशमांत असून रवि कुंभ राशींत एकादश

स्थानीं आहे राहू कर्क राशींत चतुर्थ [सुख] स्थानीं आहे. या प्रमाणें राहू चंद्राच्या राशीस असून समोर हर्शल व त्या चंद्राच्या अष्टमांत रवि असा पापग्रहांचा योग झाल्यामुळें जन्मणारावर दुःखदायक प्रसंग ओढवला. हयातींत एखादा भयंकर दुःखकारक प्रसंग यावा असें जन्मतःच शनि सुचवित आहे.

जायास्वामी जो शुक्र तो किति कचाटांत सांपडला आहे पहा. त्याच्या जवळ शनि हा पाप ग्रह असून पुढील राशीवर मंगळ आणि मागील राशीवर रवि याप्रमाणें तो पापग्रहांच्या कर्त्तरींत आहे. अर्थात् तो स्त्रीबंधानें दुःखदर्शक झाला आहे. हें उघड आहे. स्त्रीच्या मृत्युकाळीं तो मेष राशीचा झाला होता.

ज्यावेळीं हा भयंकर प्रसंग ओढवला ती वेळ अशी होती कीं शनीची उदयाचा समय असून लग्नीं शुक्र होता. आणि द्वितीयस्थानीं मंगळ व व्ययस्थानीं रवि होता. मृत्युकाळीं हर्शल उदय पावत होता.

या कुंडलींत आणखी दोन वाईट योग झाले आहेत. पंचमांत सिंह राशीचा राहू आहे. तो गर्भपात अगर स्त्रीला गर्भापासून भय सुचवितो. आणि चतुर्थ स्थानचा शनि विपत्ति दर्शवितो. हा शनि मातृसुखालाही चांगला नाहीं १९०१ सालीं माता निधन पावली. ह्मणजे १३ व्या वर्षीच मातृसुख नष्ट झालें. व बप १८९८ सालीं वारला ह्मणजे ८ व्या वर्षीच पितृसुख नष्ट झालें. पितृनिधनकालीं शनि हा चंद्राला ४ था असून रवीच्या समोर होता व मातृनिधनकालीं तो नवम [पितृ] स्थानीं होता. जन्मणारानें शनीची जन्मभर आराधना करावी. पहिल्या स्त्रीचा मृत्यु अग्निपीडेनें झाला. त्याचप्रमाणें दुसऱ्या स्त्रीला गर्भपीडेपासून भय होईल असा संभव आहे. जाया-

स्थानीं दोन पाप ग्रह असल्यामुळें विवाह ३ किंवा अधिकही होण्याचा संभव दिसतो. तनुस्थानीं मेष राशीच्या २७ अंशांत रवि आहे ह्मणून १९१० सालीं शारीरिक क्लेश होतील व स्त्रीलाही पीडा होईल. कारण कुटुंब स्थानीं राहू येईल. हर्शल आणि मंगळ हे ग्रह असे पडले आहेत कीं कोणत्याही कारणानें स्त्रीचा वियोग घडावा. साडेसातीच्या मध्यकालीं अनेक प्रकारें दुःख होईल व दारिद्र्य प्राप्त होईल. सांप्रत हर्शल दशमांत आहे, तो १९११ सालीं जेव्हां शनीच्या समोरून जाईल तेव्हां नोकरीसंबंधानें किंवा राजकीय कारणानें एखादें संकट येईल, असा संभव आहे.

ज्योतिःशास्त्रानें अमुकच होईल, हें समजणें बरेंच कठीण आहे. पण अमुक प्रकारचीं कार्यें घडतील इतकें अनुमान करण्यास हरकत नाहीं. सप्तमस्थानीं हर्शल व मंगळ असल्यामुळें स्त्री आल्पवकाशांत, अग्नीनें, तापानें अगर अपघातानें अकस्मात् मृत्यु पावेल. स्त्रीशीं बेबनाव होऊन ताटातूट होईल, बाळंत होतांना अडेल. व कदाचित् तत्काल मरण पावेल, एकापेक्षां अधिक विवाह करण्याचा प्रसंग येईल. शेवटीं विधुर स्थिति प्राप्त होईल. वगैरे अनुमानें करितां येतात. पण यांतून अमुकच एक गोष्ट घडेल हें सांगतां येणें कठीण आहे. तथापि इतकें जरी कुंडलीवरून अनुमान झालें तरी मनुष्याला आपली दिशा ठरवितां येईल. वास्तविक अशा मनुष्यानें विवाहच करूं नये हें उत्तम. वरील अनिष्ट गोष्टी टाळण्यास हाच एक रामबाण उपाय आहे. हा निश्चय आरंभींच ठरविण्याचें सामर्थ एखाद्याच्याच आंगीं असेल हें खरें. पण एकदां अनुभव आल्यावर तरी सावध राहण्यांस कोणालाही हरकत नाहीं. असो. या गृहस्थांनीं आतां दुसरें लग्न तर केलें. तरी त्यांनीं आपलें धोरण सावधगिरीचें ठेवावें आणि पुनः असा प्रसंग आल्यास विवाहाच्या फंदांत पडूं नये इतकें सुचवून हें वर्णन पुरें करितों.

स्पष्टग्रह

ग्रह	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.
राशि	७	८	९	७	२	६	१०	४
अंश	६	५	१५	१७	४	१०	२६	२६
कला	१२	०	५८	५५	३४	३२	१२	२७
विकला	१२	३२	०	३०	०	०	०	०

बुध मात्र इष्ट कालचा स्पष्ट केला बाकीचे ग्रह सन १९०५ पुस्तकांतून उतरले आहेत. ग्रह इष्ट कालचे तयार केले तरी ते वर लिहिलेल्या घरांतून दुसऱ्या घरांत जात नाहींत ह्मणून स्पष्ट केले नाहींत.

ह्या दोन कुंडल्यांत भ्रातृयोग बरेच आहेत ह्मणून मुद्दाम ते प्रसिद्धी करितां आपलेकडे पाठविले आहेत ह्यांत नंबर २ ची कुंडली बरीच महत्वाची दिसते. तरी आपले सवडीप्रमाणें, दाशाहिकांत स्थळ मिळावें. कळावें.

भ्रातृयोग मागील बाजूस लिहिले आहेत.

आपला

वा. भ. भावकर मु. खिर्डी

जि० पूर्व खानदेश.

जन्म तारीख १२ नोव्हेंबर सन १९०८ रात्रीं ११ वाजून १८ मिनिटांनीं मुंबई टाईम अक्षांश २० चे भावसाधनावरून सायन कुंडली [दत्तु गणेश कु.]

सायन लग्नकुंडली
नं० २



स्पष्ट ग्रह.

	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.	ने.	
राशि	७	३	६	७	५	६	०	२	९	५	हे ग्रह पुस्तकांतूनच उतरलेले आहेत.
अंश	१९	७	२१	०	११	१०	३	१७	१४	१६	
कला	३०	२८	२१	२७	२	३०	५४	४३	१	५८	
वि, क.	५८	२५	०	०	०	०	०	०	०	०	

ह्यांतील भ्रातृयोग खालीं लिहिल्याप्रमाणें दिसतात.

[१] पहिलीच्या लग्नराशीस दुसरीचा चंद्र [२] पहिलीच्या तिसऱ्या राशीस दुसरीचें लग्न [३] एकाच राशीस शुक्र (४) पहिलीच्या लग्नाचे तृतीयस्थान व दुसरीच्या चंद्राचें तृतीय स्थान एकच राशि [५] पहिलीच्या मंगळाच्या सप्तम राशीस दुसरीचा चंद्र [६] पहिलीचा मंगळ दुसरीच्या पंचमस्थानच्या राशीस [७] पहि-

लीचा मंगळ दुसरीच्या मंगळाच्या तृतीय स्थानीं यांत विशेष हें आहे कीं पहिलीच्या तृतीय स्थानचा आरंभ आणि दुसरीच्या लग्नाचा आरंभ हीं अगदीं जवळ जवळ [फक्त ७ कलांचा फरक] आहेत हा मोठा चमत्कार आहे. येणें प्रमाणें भ्रातृयोग कळविले आहेत या पेक्षां जास्त असतील तेही प्रसिद्ध व्हावे.

९

श्रीयुत रा. रा. कुंडलीविज्ञान कर्ते यांस.

सा. न. वि. वि.—फार दिवसांनीं आपली भेट घेत आहें. आपणाकडे माझ्या एका मित्राची कुंडली पाठवीत आहें त्या कुंडली वरून व आपले आठवणींच्या माहिती वरून सदर मित्रचा विवाह कालाचा निर्णय यथाशक्ति ४ ओळी केला आहे तो आपल्या तारीख १० चे अंकांत छापाल अशी आशा आहे " चूक होणें हें मनुष्य जातीस अनुसरून आहे " तरी या कुंडलींत कांहीं चूक असल्यास ती कळविण्याची मेहेरबानी व्हावी.

लग्नकुंडली.



वर्षकुंडली.



वरील कुंडल्या निरयन पद्धतीनें मांडल्या आहेत. यावरून मी निरयनवादी आहे असें मात्र नाहीं. माझ्या मतें कोणी कोणाच्याही पद्धतीनें मांडो. मात्र निरयन कुंडली मांडल्यास त्यांत सर्वच निरयन पाहिजे व सायन मांडणें झाल्यास सर्व सायन पाहिजे.

लग्नेश–बुध. कुटुंबेश चंद्र. सप्तमेश–गुरू. असें आहे. आतां सदर गृहस्थाचें लग्न इतके दिवस कां झालें नाहीं याचा ज्योतिषदृष्ट्या विचार करण्याचें जरी कारण नाहीं तरी ठोकळ नियमानें देखील ज्योतिषी सांगूं शकेल कीं–पहा जायाधिप–गुरू. तो दशमांत वक्री. या गुरूच्या कुटुंबस्थानांत शनी शत्रुगृहीं असोन वक्री. तसेंच कुटुंबेश–चन्द्र, याच्या कुटुंबस्थानीं देखील मंगळ असोन तो शत्रुगृहीं आहे. इतकेंच नसोन तो मंगळ जायास्थानावर व जायास्थानाच्या स्वामीवर पूर्ण दृष्टीनें पाहत आहे. त्या मंगळानें आपला २८ वर्षे पर्यंत पूर्ण अंमल चालविला. आतां २८ वर्षांच्या पुढें लग्न होणें शक्य आहे काय ? असल्यास केव्हां ?

[शके १८३१ सालीं कन्येचा गुरू आहे] राहूच्या महादशेंत बुधाची अंतरदशा आहे व जन्मकाळीं राहु सप्तमांत व लग्नाधिपति बुध जन्मकाळीं मित्रगृहीं पंचमांत आहे म्हणून या अंतरदशेंत विवाह होईल असें ज्योतिषशास्त्रदृष्ट्या अनुमान केलें तर चुकीचें होणार नाहीं.

लग्नेश बुध हा मित्रगृहीं त्रिकोणांत आहे. जायास्थानाचा स्वामी गुरू तो वक्री आहे. म्हणून गुरू वक्री असतांच विवाह झाला पाहिजे असें एकमतानें वाटतें.

गुरू कन्येंत म्हणजे जन्मकालच्या गुरूच्या सप्तमांत आला आहे. जायास्थानचा स्वामीहि आहे. परंतु जन्मकालच्या गुरूंत म्हणजे मीनेंत शनी मंगळ आहे. गुरू हा जन्मकाळच्या चंद्राच्या द्वितीयांत आला आहे व हा नियम वर्ष लग्न कुंडलींतहि जन्मकाळच्या गुरूच्या सप्तमांत व चंद्राच्या द्वितीयांत आहे. म्हणोन कन्येच्या गुरूंत विवाह होईल असें म्हणोन मार्गशीर्षांतील विवाह मुहूर्त पाहूं.

कुंडलीविज्ञान

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम् ।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥
' भवभूति : ,

पुस्तक७ वें.] कार्त्तिक कृ. ११, रविवार [अंक २७वा

हर्शल आणि शास्त्रीय शोध.

मिथुन, तूळ आणि कुंभ हे मुख्य शास्त्रीय राशि आहेत. कन्या हा राशिही बहुतेक याच प्रकारचा आहे. जगांत जेव्हां शोध लागावयाचे त्यावेळीं हे राशि ग्रहानें युक्त असले पाहिजेत. हर्शल हा लोकोत्तर गोष्टी घडवून आणणारा आहे. म्हणून तो ज्या ज्या वेळीं या राशींत असेल त्या त्या वेळीं शास्त्रीय शोधकांस विलक्षण गोष्टींचा शोध लागण्याचा संभव असतो. हें दाखविण्यासाठीं गतकलाकडे नजर टाकूं.

इसवी सन १७७६ पासून १७९६ पर्यंतच्या कालांत डॉ० जेनर यांनीं देवींच्या लसीचा शोध लाविला असें इतिहासावरून कळतें. हा शोध अति महत्वाचा आहे. याच शोधावरून प्लेगपासून रक्षण होण्यासाठीं प्लेगची लस तयार करून ती टोंचून घेण्याच्या शोधाची कल्पना सांप्रत निघाली आहे. ही कल्पना सिद्धीस जाण्याचा केव्हां संभव आहे, हें ज्योतिषशास्त्रावरून

आजच्या अंकांत ठरवावयाचें आहे. वर देवींच्या लसीच्या शोधाचा जो काल दिला आहे, त्याकाळीं हर्शल मिथुन राशींतच होता. व पूर्णावस्थेच्या वेळीं कन्येंत होता, असें गणितानें सिद्ध आहे. यावरून तो ग्रह शास्त्रीय राशींत असतां शास्त्रीय शोधकांस एखादा विलक्षण शोध लागतो, असें अनुमान होतें.

इ० स० १३३० मध्यें हर्शल कुंभ राशींत होता, यावेळीं बाराच्या दारूची अर्वाचीन शोधकांस कल्पना झाली ! इ० स० १२३०, १४१४, १४९८, १५८२, १६१६, १७५०, १८३४ व १९१८ या वर्षीं हर्शल या शास्त्रीय राशींत आहे. यां पैकीं शेवटलें वर्ष १९१८ आहे, या वेळीं कांहीं तरी शास्त्रीय शोध लागला पाहिजे, असें सिद्ध होतें. याच्या मागील १८३४ हें साल आहे. या वेळींही एक शोध लागलेला आहे. इ० स० १८३० मध्यें प्रकाशापासून चित्रें तसबिरी वगैरे काढण्याची युक्ति निघाली आहे, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

इ० सन १५४९ त हर्शल तूळ या शास्त्रीय राशींत होता त्यावेळीं दुर्बिणींची कल्पना निघाली.

इ. सन १७७३ व १७७८ या वर्षी हर्शल हा सायन मिथुन राशींत असतां अनुक्रमें सूत काढण्याचें यंत्र निघालें व रासायनिक विजेची कल्पना निघाली.

इ० सन १८०४ मध्यें धुराच्या दिव्याची कल्पना निघाली व १८७९ मध्यें विजेचे दिवे उपयोगांत आले. या वेळीं हर्शल कन्येंत होता ! याच राशींत हर्शल असतां इ० सन १७१० मध्यें वाफेचें यंत्र न्यूकोंब साहेबानें काढिलें.

याप्रमाणें हर्शल कुंभ, तूळ व मिथुन या शास्त्रीय राशींत असतां शास्त्रीय शोध लागले आहेत. सांप्रत हर्शल हा मकर राशींत आहे. सन १९१२ पासून तो कुंभ राशींत असेल. त्या वेळीं जगांत कांहीं विलक्षण शोध लागतील असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. कित्येकांच्या मतें इनाक्युलेशन हें प्रयोगावस्थेंत आहे, तें कांहीं अंशीं खरें दिसतें. सन १९१२ पर्यंत या प्रयोगाचा निःसंशयपणा कायम होईल असें दिसत नाहीं. सन १९१४ मध्यें शनि मिथुन राशींत, हर्शल कुंभ राशींत व गुरूही कुंभ राशींत आहे, ह्मणून या काळीं कांहीं तरी विलक्षण शोध लागेल असें दिसतें. ह्रेगवरही रामबाण उपाय त्याच वेळीं निघण्याचा विशेष संभव आहे. सारांश अद्यापि ४।५ वर्षें कोणताही उपाय सिद्ध होईल असा रंग नाहीं.

इ. स. १९०३।४।५ मध्यें शनि कुंभ राशींत व १९०२ सालीं गुरु कुंभ राशींत होता, ह्मणून १९०२ ते १९०५ पर्यंतचा काल शास्त्रीय शोधकांस बराच महत्वाचा होता. हाफकिनच्या प्रयत्नास याच वेळेपासून यश येण्याचें चिन्ह दिसूं लागलें १९०७ सालीं इनाक्युलेशनवाले बऱ्याच जोरानें आपलें मत प्रसिद्ध करूं लागले आहेत. या वर्षी मंगळ कुंभ राशींत असतां ना. गव्हर्नर साहेबांकडून वर्तमानपत्रकर्त्यांस पत्रें गेलीं. तथापि लोकमत इनाक्युलेशन संबंधानें अद्यापि संशयित आहे. १९०९ आणि १९१० सालीं गुरु कन्या व तूळ राशींत असतां या मताचा बराच फैलाव होईल असें वाटतें. व १९१२ पासून १९१४ पर्यंतच्या कालांत इनाक्युलेशनास पूर्णपणें यश तरी येईल किंवा ह्रेगवर एखाद्या नवीन उपायाचा शोध लागेल असें ठरतें.

या वर्षाच्या आगष्टच्या १७ व्या अंकांत मुंबई इलाख्याचे नवे गव्हर्नर ना. क्लार्क यांच्या स्वभावाविषयीं व कार्कीर्दीविषयीं दिग्दर्शन केलें आहे. त्यांत पहिल्या वर्षी बांचा जिकडे तिकडे गौरव होईल व आरंभीं त्यांचें मन उदार व थोर असेल असें सांगितलें आहे. त्याचा प्रत्यय बरोबर आला आहे. इनाक्युलेशनच्या कामीं यांचे प्रयत्न लोकांच्या पुढाऱ्यांस अनुकूल करून चाललेले आहेत. त्या मुळेंच ते बरेच लोकप्रिय होतील असें अनुमान आहे. यांच्या कार्कीर्दीच्या आरंभींच एक सुशिक्षित वर्तमान कर्त्ता दोन वर्षांच्या कैदेला गेला आहे तथापि हा दोष त्यांच्याकडे येऊं शकत नाहीं. लोकांचे पुढारी लोक हे जर खऱ्या खऱ्या गोष्टी नामदारांस समजावून सांगतील तर त्या पत्रकर्त्यांची लवकरच सुटका होण्याचा संभव आहे.

वरील वर्णनावरून शास्त्रीय रा-

शीतील ग्रह विशेषतः हर्शल शास्त्रीय शोध कसा लावूं शकतो हें ध्यानांत येईल. शास्त्रीय शोधकाच्या जन्मकाळीं शास्त्रीय राशि व हर्शल यांचा अशाच प्रकरचा संबंध असतो. त्यामुळें ज्या राशींत हर्शल आला ह्मणजे त्यांच्याकडून एखादा विलक्षण शोध लागतो, यांत आश्चर्य काय ? नामदार साहेबांच्या कुंडलींत हर्शल शास्त्रीय राशींत नाहीं, त्यामुळें यांच्याच काकदींत हेगवर रामबाण उपाय सिद्ध होईल असा संभव फार कमी आहे.

---

[३]

रा. रा. संपादक 'कुंडलीविज्ञान' यांस.—

वि० वि०— पुस्तक ७ अंक व० ७ में रा. गो. ह. के. पुना. के कथनानुसार जो मैंने साहस किया है उसे आशा है कि आप कृपा करके स्थानप्रदान करेंगे.

आर्यज्योतिष ग्रंथो मे से केवळ तीन पुस्तकों मे विद्यासंबंधी योग मेरे दृष्टिगोचर हुअे है. बृहज्जातक, जैमिनीयसूत्र और सर्वार्थ चिंतामणि. इन ग्रंथों मे केवल एक ग्रह से योग नहीं कहे है. न ऐसा कहना संभव है. साधारणतः द्वितीय, पंचम, नवम, कारक, ग्रहयोग, ग्रहदृष्टि, उक्त भावेश, केंद्रत्रिकोणगत ग्रह, उच्चादि बल, राशिशील, नवांश, मित्रक्षेत्री इ० नियामों से फल कहा गया है व योग बांधे गये है. इन तीनों ग्रंथों के योग देखने से ऐसा प्रतीति होता है कि निम्न लिखित विद्या इ० इन इन ग्रहों से संबंध रखती है.

१ **वेद**— गुरु.

२ **वेदांग**— गुरु.

३ **ज्योतिष**— शुक्र, बुध, गुरुशुक्रदृष्ट सूर्य. गुरुशुक्रदृष्ट भौम.कर्कस्थ चंद्र. मिथुनस्थ सूर्य.

४ **व्याकरण**— सूर्यशुक्रदृष्ट गुरु.

५ **छंदशास्त्र** — शुक्र. धनस्थ चंद्र. मकरस्थ चंद्र. कन्यास्थ सूर्य. बुधदृष्ट कर्कस्थ चंद्र. शुक्र नवांशक चंद्र बुधदृष्ट. शुक्र-नवांशक चंद्र गुरुदृष्ट. बुधनवांशक चंद्र बुधदृष्ट.

६ **वेदांत**– सूर्य. चंद्रशुक्र. बुध गुरु शनि.
७ **षट्शास्त्र**– बुध गुरु शुक्र.
८ **मीमांसा**– बुध.
९ **न्याय**– सूर्य भौम दृष्ट गुरु शुक्र. भौम [तर्क]
१० **सांख्ययोग*** चंद्र
११ **आयुर्वेद**– धनस्थ सूर्य.
१२ **धनुर्वेद**– वृश्चिकस्थ सूर्य.
१३ **मल्लविद्या**– भौमनवांशक चंद्र बुधदृष्ट. सूर्य शुक्र.
१४ **रणोपदेश**– गुरुनवांशक चंद्र भौमदृष्ट
१५ **गांधर्ववेद**– बुधक्षेत्री भौम. चंद्र. वृषभस्थ सूर्य. शुक्रदृष्ट बुधनवांशक चंद्र.
१६ **नृत्य**– बुधगुरु. मिथुनस्थ चंद्र.
१७ **वाद्य**– वृषभस्थ सूर्य
१८ **शिल्प**– धनस्थ चंद्र. बुधनवांशक चंद्र शनिदृष्ट
१९ **शस्त्रवेद**– सूर्य शुक्र
२० **यंत्र**– सूर्य चंद्र
२१ **धातुकर्म**– सूर्य शनि
२२ **भांडप्रकार**– सूर्य शनि
२३ **ऐंद्रजाल**– शुक्रक्षेत्री भौम
२४ **गणित**– भौम केतु कन्यास्थ सूर्य बुध शुक्र गुरु बुध गुरु शनि बुधदृष्ट चंद्रमंगल
२५ **साहित्य**– चंद्र
२६ **द्यूत**– मिथुनस्थ चंद्र

२७ **शास्त्र**– मिथुनस्थ चंद्र मिथुनस्थ बुध
२८ **शास्त्रार्थ**– कन्यास्थ चं०
२९ **कला**– कन्यास्थ चं० मिथुनस्थ बुध. मिथुनस्थ शुक्र.
३० **लेख्य**– कन्यास्थ सूर्य
३१ **वस्त्र**– चं० शुक्र
३२ **क्रयविक्रय**– तुलास्थ चं०
३३ **ग्रंथकर्तृत्व**– चं० गुरु चं० शुक्र. चं० बुध
३४ **सभाजडत्व**– शनि
३५ **वाग्मी**– शुक्र
३६ **शास्त्रसंप्रदाय**– गुरु

उत्तरोक्त योगों से स्थूल नियम इस प्रकार ज्ञात होता है:—

१ सूर्य—वेदांत उपवेद (अल्प) वेदांग अल्प कौशलकर्म

२ चंद्र—सांख्ययोग ज्योतिष अल्प छंदशास्त्र. शिल्प. गांधर्ववेद अल्प साहित्य ग्रंथकर्तृत्व.

३ भौम—युद्धविद्या. न्याय. गणित.

४ बुध—कला, विद्या, ज्योतिष, शास्त्र, मीमांसा, गणित.

५ गुरु—वेद, वेदांग, व्याकरण, सद्विद्या,

६ शुक्र—काव्य, कामशास्त्र ज्योतिष, छंदशास्त्र गायन.

७ शनि—शिल्प अल्प विद्या अभाव.

पाश्चात्य ज्योतिषके मतानुसार किस विद्या का किस ग्रह से संबंध है यह यदि कोई सज्जन कृपा करके बतलावेंगे तो मै उनका बडा आभारी होऊंगा.

प्रेमशंकर दुबे.
जबलपूर

[४]

कृ० सा० न० वि० वि०

आपले कुंडलीविज्ञान पुस्तक ६ अंक ४।५ यांत पत्रव्यवहार ह्या सदराखालीं मीं पाठविलेलीं कुंडली छापली आहे. तिचें वर्णन मुसावळ येथील गृहस्थानें मजकडे पाठविलें आहे तें जसेंच्या तसेंच खालीं देतों. तें छापावें व आपलेंही मत यांत प्रसिद्ध करण्यांत यावें अशीं विनंति आहे.

मुसावळ ॥ श्री ॥

पुस्तक ५ अंक ८ मध्यें पृष्ठ ५ यांत प्रश्नांचीं उत्तरें देणाऱ्यांपैकीं नंबर ४ च्या मनुष्यानें हें वर्णन करून पाठविलें. हें कुंडलीविज्ञानांत पसंत पडल्यास छापण्यास पाठवावें. ता. १२।९।१

ता. ४ एप्रिल १७९७ रोजीं रात्रीं १० वाजतां.



कै. वे. शा. सं. वामनाचार्य हरिशास्त्री वळे ह्यांचें सायन कुंडलीनें वर्णन—

लग्नीं कोणीही ग्रह नाहीं. लग्न धनुराशीचें व चं कर्क या राशींत ह्मणून वर्ण गोरा. बांधा धिप्पाड उंच होता. लग्नस्वामी मेष

या चरराशींत असून चं. ही चर राशींत आहे. मंगळाखेरीज दुसरे ग्रह कांहीं चर राशींत आहेत व कांहीं स्थिरभाव राशींत आहेत. ह्मणून स्वभाव अस्थिर होता. तृतीयाधिपति शनि राहूनें युक्त आहे. तृतीयस्थानांत कोणी ग्रह नाहीं. कुंभ राशि अल्पप्रसव आहे ह्मणून त्यांना एखाद्या भावंडाचें सौख्य मिळालें असेल त्यांचाही यांच्या अगोदर अंत झाला असेल. पितृकारक रवि त्रिकोणांत उच्चीचा बलवान् आहे. परंतु दशमाधिपति बुध नीच असून रवि शुक्र या शत्रुग्रहानें युक्त आहे ह्या दोन ग्रहांमध्यें अंतर फार थोडें ह्मणजे ८ अंशांचें आहे. ह्मणून युति धरण्यास कांहीं हरकत नाहीं. ह्मणून सुमारें वयाचे २५ वर्षें पर्यंत पितृसौख्य असेल. मातृस्थानांत ३ शुभग्रह असून स्वामी गुरु तेथेंच केंद्रांत आहे व कारक चंद्र स्वराशींत मध्यम बली आहे. त्यापासून ४थ्या व ८ व्या राशींत कोणीही ग्रह नाहीं. ह्मणून माता पित्यापेक्षां जास्त दिवस जगली असेल ह्मणजे बापानंतर सुमारें ८ वर्षें. सप्तमांत श० रा० २ पापग्रह आहेत. राहू उच्चीचा आहे. कारक शुक्र रवीनें युक्त आहे. स्त्री त्यांच्या अगोदर वारली असेल व नंतर त्यांनीं दुसरा विवाह केला नसेल. शुक्र गुरूनें युक्त आहे ह्मणून स्त्री चांगल्या गुणाची पतिसेवा करणारी असेल. सप्तमांत २ ग्रह असून राहू उच्च आहे. स्त्रीकडून हुंडा द्रव्यलाभ झाला असेल. अष्टमांत चंद्र आहे, ह्मणून स्त्री अनेक दुखण्यांतून वांचली असेल. कारण, अष्टमस्थान हें स्त्रीचें द्वितीयस्थान आहे. पंचमांत रवि असून स्वामी मंगळ ६ वे स्थानांत आहे. संततिकारक गुरु शुक्रानें युक्त आहे. प्रथम संतान वांचलें नसेल. संतति थोडी झाली असेल. ह्मणजे दोन तीन त्यांत पाठीमागें १ मुलगा व १ मुलगी असेल. षष्ठस्थानांत मंगळ आहे. शत्रुगृहीं आहे. स्वामी शुक्र

गुरूनें युक्त आहे. ह्मणून आईस भावंडें ह्मणजे मामा मावशा झाल्या असतील. परंतु ते सर्व अल्पायु झाले असतील. चर व द्विस्वभाव राशींत ग्रह असल्यामुळें प्रवासही पुष्कळ केला असेल. आतां यांना कोण कोणते योग होते ते पाहूं.

गुरुर्यदा शुक्रयुतश्च केन्द्रे सुखी मनुष्यः खलु रत्नरागः ॥१॥
चतुष्टये विक्रमगेहनाथे स्यात्पारिजाते नृपपूजितश्च ॥२॥
केन्द्रे बालाभगेहे वा कोणे वाम्बुपतिर्यदा ।
मुक्तादामाख्ययोगः स्याद्बहुभोगधनप्रदः ॥३॥
स्वोच्चस्थः सिंहिकापुत्रः कोणे वा कण्टकालये ।
पूर्णचंद्राह्वये योगे तदा श्रीमान्भवेन्नरः ॥४॥
कुर्वन्ति खेटा जलबुद्धियाताः ।
श्रुताख्ययोगं मनुजोऽत्रशास्त्री ॥५॥
धने धनेशो भवगो भवेशः ।
केन्द्रेऽथवा तौ बहुवित्तदौ स्तः ॥६॥
नित्यं कल्याणकृत्स्यात्सुतगतखचरा ।
श्रेष्ठन्यायाख्ययोगः ॥७॥
अथ दामोदरो विद्याप्रदयोगोऽम्बुगे गुरौ ॥८॥
भाग्याधिनाथो गुरु वीक्षितश्च परोपकारं सततं करोति ॥९॥
चंद्रात्तात गृहप्राप्ता बुधगीष्पतिभार्गवाः ।
संन्यासस्य तदा योगो जातकस्य भवेद्ध्रुम् ॥१०॥
एकालये ता यदि सर्वखेटा बलान्विता योगपरायणोना॥११

चार ग्रह एके ठिकाणीं आले असतां व त्यांत गुरु बलवान् असेल तर

प्रव्रज्यायोग होऊन संन्यास घडतो. प्रव्रज्यायोगावर मनुष्य नीच स्थितीस जन्मला तरी उत्तम स्थितीस जाऊन पोचतो. बुध मीनेच्या अंतीं आहे व गुरु, शुक्र व रवि हे मेष ह्या एका राशींत आहेत. रवीनें ग्रह अस्तंगत नसून गुरु बलवान् आहे व श्लोक १० चे योगानेंही संन्यास योग घडला आहे. भाग्यस्वामी व लग्नस्वामी लाभस्वामी व दशमाधिपति हे एके ठिकाणीं केंद्रांत जमले आहेत व सुखस्थानापासून मृत्युस्थानापर्यंत ग्रहांची मालिका आहे. हा राजयोग आहे. श्लो० ९।८।११ ह्या योगें बुद्धि विद्या, योग कसा प्राप्त झाला हें कळेल. श्लो० ९ चे योगानें धार्मिकपणा किती होता हें कळेल. बाकीचे श्लोकांवरून स्थिति व सौख्य कसें प्राप्त झालें हें समजेल. इतके योग ज्यास होते तो पुरुष कुंडलीविज्ञान पुस्तक ६ अंक ४। पृष्ठ ७ मध्यें वर्णन केल्याप्रमाणें व असलाच पाहिजे हें उघड आहे. अष्टमांत चंद्र क्षीण नसून तो स्वगेहीं आहे व लग्नस्वामी गुरु बलवान् असून केंद्रांत ३ शुभग्रह आहेत. ह्मणून दीर्घायु झाले. राहु व रवि हे दोन ग्रह उच्च होते ह्मणून राजमान व द्रव्यस्थिति अशी कां झाली त्याची आपोआप कल्पना होईल. भाग्यस्वामी उच्च आहे ह्मणून व तो गुरुशुक्र ह्या शुभग्रहानें दृष्ट आहे ह्मणून नित्य ब्रह्मकर्म व भजन पूजन ह्यांत काळ जात असे.

येणें प्रमाणें पत्राची नक्कल पाठविली आहे. त्यांत फलें जुळत नाहींत तीं– हे उंच धिप्पाड नसून ठेंगणे असावेत. त्यांना २ भाऊ होते. ते ह्यांच्या पूर्वी गत झाले. ३ लग्नें झालीं. तिसऱ्या कुटुंबाचा वंश सांप्रत आहे. यांना एकंदर मुलें ९ झालीं. दुसऱ्या बायकोस १ मूल. पैकीं ह्यांच्या पाठीमागें एक मुलगा व तीन मुली राहिल्या, ३ मुलगे व ६ मुली मिळून ९ मुलें. स्वभाव अस्थिर नसून स्थिर असावा. प्रवास मुळींच नाहीं. ह्यांची माता अगोदर मृत झाली व मातेनंतर पितृसुख ह्यांना पुष्कळ लाभलें. बाकीचीं फलें बरोबर येत जाहेत. आपणही फलें ज्योतिःशास्त्रदृष्ट्या योग्य वर्तवावीं व प्रसिद्ध करावीं. व अंक पाठविण्याची कृपा व्हावी.

व्यंकटेश अनंत वळे.

संशोधक शास्त्री, श्रीकृष्णमुद्रणालय.

वांई जि. सातारा.

कुंडलीसंग्रह.

[रा. ग. दा. ग्रंथे यांजकडून]

१

जन्म––ता. २।१।१८८३ सूर्योदयीं (अक्षांश १८)



र–९-११ चंद्र–६-२२ मं–९-६ बु–९-१९ गु–२-२३ व शु–८–७ श–१-२०व रा–७-१६ ह–९-२३ ने–१-१६

हा मनुष्य दत्तक आहे. जन्मदाते आईबाप हयात नाहींत. जन्म घरचे २ भाऊ आहेत. दत्तक आई आहे. स्थावर इष्टेट नाश पावली जन्मघरीं एक शेत आहे. रेव्हेन्यू खात्यांत कारकून. विवाह १९०२ सालीं झाला. संतति २ कन्या. नोकरीचा आरंभ कुंभेचा शनि झाल्यापासून. बांधा उंच सडपातळ. या कुंडलींत दत्तकाचे योग दत्तकाच्या नियमांप्रमाणें आहेत.

२

जन्म—ता. १९–१–१८७२ सकाळीं ६ वा. (अ. २०)



र–९-२९ चं–१-१९ मं–१० २७ बु–९-३ गु–३-२७
शु–८-१६ श–९-१३ रा–२ २० ल–९-१६

धंदा वकील. प्रथम स्त्री मृत. तिची एक कन्या आहे. दुसऱ्या स्त्रीस झालेली संतति मृत. भावंडें २ भाऊ व ३ बहिणी. आईबाप हयात. वडिलार्जित थोडें कर्ज आहे. दोन शेतें व एक घर आहे. वर्ण काळा. वात प्रकृति.

शनि स्वगृहीं लग्नीं असून बुधानें युक्त आहे व गुरु त्यांच्या समोर आहे हा वकिलीचा योग बरोबर आहे. (कुटुंबस्थानीं मंगळ असल्यामुळें प्रथम स्त्री मृत झाली, व जायास्थानीं गुरु असल्यामुळें प्रथम स्त्रीचें सुख मिळून एक अपत्य झालें व नंतर दुसरें लग्न झालें. सं. कुं. वि.)

३

जन्म—ता. ३ मे सन १८७३ दुपारीं २ वाजून ३१ मि. (अ.२०)



ल–९-१८ र–१-१३ चं–४-१ मं–७-५व बु–०-१९ गु–४ २३
शु–१-७व श–१० ३ रा–१-२५ ह–४-३ ने–०-२५

देशमुखाच्या घराण्यांत जन्म. आई. बाप. १ भाउ व २ बहिणी हयात. संतति ५ मुलें १९०७ सालीं स्त्रीला प्रसूतीचे कष्ट व गर्भाचा मृत्यु त्यानंतर स्त्री वारंवार आजारी होते. वडिलार्जित स्थावर इष्टेट चांगली. धंदा सावकारी व शेती. कुटुंब मोठें पण बेबनाव. भावाशीं बनत नाहीं.

(१९०७ सालीं हर्शल पंचमांत असून राहू त्याच्या समोर कर्क राशींत एकादश स्थानीं होता. या प्रमाणें दोन्हीं गर्भस्थानीं पाप ग्रह आल्यानें प्रसूतिकष्ट व गर्भनाश या गोष्टी घडल्या. सिंह या राजराशींत गुरु, चद्र, व हर्शल हे ग्रह असल्यानें खानदानीच्या कुळांत जन्म झाला. तृतीय स्थानीं मंगळ असल्यानें भावाशीं बेबनाव होतो. सं. कुं. वि.)

४

जन्म—ता. १८-१२-१८५९ सकाळीं ४ वा. (अ. १८)



ल—७:२२ र-८-२६ चं—६-१४ मं—७-३ बु—८ २३ व
गु–३-२३ व शु–९-१९ श–४-२६ व रा–१०-१३ ह–२-६ व

हे गृहस्थ न्यायाधीश आहेत. पगार रुपय ५०० प्रथम पत्नी मृत. हल्लीं दुसरी पत्नी असून तिला २ कन्या आहेत. पन्नास अपस्माराची व्यथा आहे. बंधू ४ वडिलार्जित स्थावर इष्टेट चांगली. कायद्याचें ज्ञान चांगलें स्वभाव व गुणधर्म वृश्चिक लग्न व मंगळ ह्याप्रमाणें एक दोन वेळां अधिकाऱ्यांची गैरमर्जी झाली होती.

(दशमांत शनि हा शत्रुगृहीं असून वक्री आहे. त्यामुळें अधिकाऱ्यांची गैरमर्जी होते. हा योग नोकरीला चांगला झाला नाहीं. सं. कुं. वि.)

५

जन्म —ता. ३०-९-१८८४ सकाळीं १० वा. १मि. [अ.२२]



ल–८-९ र–६-७ चं–१०-१० मं–७-१२ बु–९-२३ गु-४-२७ शु–४-२२ श–२-२४ रा–६-१५ ह–१-२८ ने–१-२३

प. व. खात्यांत नोकर पगार रुपये ६०. अकौंटंटची परीक्षा पास अधिकाऱ्यांशीं वैमनस्य. शत्रु फार. आजपर्यंत दोन तीन नोकऱ्या झाल्या. वढती लवकर लवकर मिळत गेली. संतति झालेली जिवंत नाहीं. स्थावर इष्टेट नाहीं. बांधा उंच. वर्ण निमगोरा. ह्या कुंडलींत उदित गोलार्धांत रांगेनें ७ ग्रह आहेत.

(दशमांतील हर्शल, शनीप्रमाणें नोकरींत व्यत्यय आणतो. भाग्यस्थानीं सिंह राशींत गुरु व शुक्र असून दशमांत बुध उच्च आहे हा राजयोग आहे. एकादशस्थानीं रवि व राहू असून ते पंचमास पाहत आहेत त्यामुळें संतति जगत नाहीं. सं. कुं. वि.)

६

जन्म— ता. २१-१०-१८७९ सूर्योदयीं (अ.२०)



ल–६-२१ र–६-२९ चं-९-१० मं-१-२०व. बु-७-१ गु-११-३व. शु–५-१७ श–०-१२व रा–९-१९ ह–५-७ ने–१-११व.

धंदा शाळामास्तर. पगार रुपये १८ प्रथम स्त्री मृत. दुसरा विवाह १९०२ मध्यें झाला. संतति २ मुलें मृत झालीं हल्लीं एक कन्या आहे. स्त्रीचा मृत्यु प्रसूतीनें झाला होता. दुसरी पत्नीही १९०७ सालीं प्रसूतिकष्टानें फार आजारी होती. चुलते ३ पैकीं १ मृत. भाऊ एक आहे व एक बहीण होती. आई आहे. बाप १०।१२ वर्षें झालीं तेव्हां वारला. कुळकर्णीपणाचें वतन, २ शेतें व एक घर आहे. कुटुंब मोठें. प्रकृति पित्तकर, बांधा रोड.

(जायास्थानीं मंगळाच्या घरीं असा वक्री शनि असून अष्टमांत मंगळ आहे. त्यामुळें प्रथम स्त्री प्रसूतीनें मयत झाली व दुसरीचीही तीच अवस्था आहे. पंचमेश शनि असून तो जायास्थानीं नीच, वक्री व शत्रुगृहीं असल्यामुळें हा प्रकार झाला असावा. से. कुं. वि.)

७

जन्म.— ता. १२–१–१८७८ रात्रीं १ वाजतां (अ.१६)



ल–७-४ र–९-२१ चं–१-६ मं–०-१६ बु–९-२१व गु–९-१७ शु–११-३ श–११-१६ रा–१०-२३ ह–४-२८व ने–१-४

सन १९०६ सालीं पोलिस ट्रेनिंग स्कूलमध्यें प्रवेश होऊन पुढें रु. ५० वर सब इनस्पेक्टरची जागा मिळाली. त्या पूर्वी १५ रुपयांवर

शाळा मास्तरची नोकरी होती! आईबाप नाहींत. बाप मामलेदार होता. भाऊ एक १ लहान व बहिणी ३. वातबद्ध प्रकृति. बांधा उंच व धिप्पाड. वाणी मिष्ट. वडिलार्जित जंगम इष्टेट चांगली आहे. सासरा मामलेदार आहे. संतति अद्यापि झाली नाहीं. विवाह उशीरां झाला.

शाळा मास्तरचा सब इनस्पेक्टर झाला याचें कारण, भाग्यस्वामी चंद्र हा उच्च आहे, शुक्रही उच्च असा पंचमांत आहे. शिपाई बनविणारा ग्रह मंगळ हा षष्ठ स्थानीं मेष राशींत स्वगृहीं आहे. या ग्रहस्थितीमुळें तो अंमलदार झाला. दशमांत सिंह राशीचा हर्शल आहे, हा ग्रह दशमांत असला ह्मणजे मनुष्याला मोठ्या योग्यतेला नेतो व नोकरींत क्रांति करितो. या हर्शलवरून शनि ज्या काळीं जाईल त्या काळीं नोकरींत संकट उत्पन्न होण्याचा संभव आहे असें जाणावें. सं. कुं. वि.]

८

जन्म.—ता. २१-११-१८७४ दुपारीं ४ वाजतां [अ.१६]



७–१-६ र–७ २९ चं–०-११ मं–१-१० बु–७-१९व गु-६-२० शु–८-१४व श–१०-९ रा–१-१३ ह–४-१५ ने–०-२८

धंदा वकिली. आईबाप हयात. २ भाऊ त्यांपैकीं १ दत्तक दिला आहे. भाऊ पोलीस सब इनस्पेक्टर. मामाचा आश्रय आहे. मामा सबजज्ज आहेत. द्विभार्य. दुसरीस २ मुलगे व १ मुलगी आहे.

घराणें भिक्षुकीचें, स्थावर इष्टेट नाहीं. वकिली चांगली चालत नाहीं.

९

जन्म.—ता. १९-८-१८४४ सकाळीं ११ वा. ४५ (अ.१८)



ल–७-१९ र–४-२६ चं–७ १४ मं–४-२२ बु-१-१८ गु-०-३व शु–३-१८ श–१०-३व रा–८-१२ ह–०-६व.

धंदा मराठी वकील. शिवाय १९०३ पासून गांवमुनसफचा अधिकार. स्वतःचे कर्तबगारीनें शेतें, घर वगैरे इष्टेट संपादन केली आहे. सावत्र भाऊ २. स्त्रिया तीन झाल्या. हल्लीं तिसरी स्त्री हयात असून तिला ८ वर्षांचा एक मुलगा आहे. भाऊबंदांचें बेवारसी धन मिळालें आहे. प्रकृति उष्ण. वक्तृत्वकला चांगली अवगत असून लोकांत मानही चांगला मिळतो.

(वरील दोन्ही कुंडल्यांत शनि स्वराशीचा आहे. या कुंडलींत बुध उच्च असून तो लाभस्थानीं आहे त्यामुळें संपत्तीचे लाभ चांगले होतात. दशमांत सिंह राशींत रवि व मंगळ हे ग्रह असल्यामुळें मानमान्यता चांगली आहे. चतुर्थ स्थानावर इष्टेटीचा विचार होतो. या स्थानांत स्वगृहीं असून लाभस्थानीं उच्च बुध आहे त्यामुळें इष्टेट स्वतःसंपादन केली गेली. जायास्वामी शुक्र असून तो नवम स्थानीं शत्रुगृहीं आहे हेंच बहुभार्यायोगाचें प्रधान कारण होय. या कुंडलींतही हा बहुभार्यायोग सर्वांस सहज उमगणारा नाहीं! सं. कुं. वि.)

१०

जन्म.— ता. १०-९-१८८९ रात्रीं २॥ वाजतां [अ.१८]



ल. ४-१ र. ९-१८ चं. ९ २६ मं. ३-२५ बु. ५-२ व गु. ५-१८
श. ६-२९ श. ३-७ रा. ९-२६ ह. ६-२ ने. १-२९

सन १९२७ साली बी. ए. ची परीक्षा पास. धंदा शाळा मास्तर. १९०८ साली वडील एक भाऊ वकील होता तो वारला. त्याच साली मार्च्य महिन्यांत विवाह झाला. आईबाप हयात आहेत. संतति झालेली नाही लहानपणीं पायावरून वात गेल्यानें दोन्ही पावलें लुळी आहेत.

[व्ययस्थानच्या शनि पावलें व पाय या संबंधाचे विकार उत्पन्न करितो असा पुष्कळ ठिकाणीं अनुभव येतो. सं. कुं. वि.]

११

जन्म—ता. २-९-१८७८ सकाळीं ५॥ वाजतां (अ. १८



कुंडलीसंग्रह.

[अंक ८ वरून पुढें चालू.]

हे गृहस्थ बी. ए. असून हेडक्लार्क आहेत. आईबाप हयात. बहिणी धाकट्या चार. प्रथम स्त्री १९०५।६ मध्यें मयत. दुसऱ्या स्त्रीस अद्याप संतति झाली नाहीं. पहिलीस २ मुलगे व २ मुली झाल्या. त्यांत १ मुलगा व १ मुलगी आहे. सांपत्तिक स्थिति बरी आहे. प्रथम विवाह वयाचे १२ वे वर्षी झाला. अधिकाऱ्यांशीं चांगलें जुळत नाहीं.

१२

जन्म—ता० १२।१०।८२ दुपारीं ३ वाजतां (अक्षांश २०)



धंदा भिक्षुकी. वडील १ भाऊ आहे. स्थावर इष्टेट बरी आहे. प्रथम स्त्री ३।४ वर्षांपूर्वी मयत झाली. तिला एक मुलगी आहे. अद्यापि दुसरा विवाह झाला नाहीं. कुटुंबांत तंटे आहेत. भाऊबंदांशीं बेबनाव. प्रकृति सशक्त. भाऊ खर्चीक. गायनविद्या आहे.

१३

जन्म०—ता० १७।५।१८५७ सकाळीं ३-३० वाजतां (अक्षांश २०)



धंदा दिवाणी खात्यांत नौकरी. पगार रुपये १०० आहे. योगाभ्यासाची आवड आहे. संतति ४ कन्या. १९०५ सालीं एकदम ५० रुपये बढती मिळाली. प्रकृति वातानें लठ्ठ. स्थावर इष्टेट एक घर आहे.

१४

जन्म—ता० २६-८-१८८४ दुपारीं ४ वाजतां (अ०२०)



शाळा मास्तर. पगार रुपये १८ दोन भाऊ मोठे आहेत. एक बहीण मयत. आई आहे. ८।९ वर्षांपूर्वी बाप मयत झाला. एक मुलगा वर्षाचा आहे. अधिकाऱ्यांची चांगली मर्जी आहे. शक्ति-प्रमाणेंच स्त्रीही आहे. तिला गंडमाळा हा रोग झाला होता तो आतां बरा झाला आहे.

१५

जन्म—ता० २४-३-१८६७ रात्रीं ८ वाजतां (अ०२०)



स्थिति गरिबीची. थोडें कर्ज आहे. एक घर आहे. वडील हयात आहेत. आई लहानपणीं वारली. एक बहीण होती ती ४।५ वर्षांपूर्वी वारली. कुटुंब मोठें होतें, ह्मणनें कमी झालें. तीन मुलगे व एक मुलगी आहे. धंदा खासगी नोकरी. दंतपीडा आहे. अक्षर चांगलें आहे.

१६

जन्म—ता० २०-९-१८७७ दुपारीं ५॥ वाजतां (अ० २०)



वतनदार कुलकर्णी. १९०६ मध्यें कामावरून दूर. आई आहे. मुलें दोन मुलगे. राज्यभुवनांत गुरू असल्यामुळें गावांत वजन चांगलें आहे.

१७

[नरहर सखाराम डिगरे यांजकडून]

निरयन.



ही कुंडली महत्भाग्य दर्शवीत असून वस्तुस्थिति सर्वतोपरी दुःख-दर्शक आहे, ती अशी.—

वर्ण काळा, बांधा मध्यम, कृश, वातपित्तप्रकृति, कुरूप, डोळे साधारण मोठे. कुटुंबांत माणसें पुष्कळ पण सर्वांशी बेबनाव. वडि-लोपार्जित वतन, शेत, घर, पैसा इत्यादींचें यत्किंचितही सुख नाहीं. तिघे धाकटे बंधु पण विभक्त. इष्टमित्रविरोध. अपयश. मातृसुख सर्वांत उत्तम. विद्या अल्प. पहिल्या स्त्रीस झालेली दोन अपत्यें मरण पावलीं. शत्रुपीडा फार. पहिली स्त्री २२ व्या वर्षी मरण पावली. पुढें आठ वर्षांनीं दुसरें लग्न होऊन तीही सहाव्या महि-

न्यांनीं मरण पावली. हल्लीं विधुर आहे. सदोदित वातपित्तप्रकोपानें आजारी. तीन वेळां जिवावरचीं दुखणीं गेलीं. पहिलें लग्न १६ वे वर्षीं व पुढें २ वर्षांनीं दुसरें झालें. दहा रुपयांवर शाळामास्तर आहे! हल्लीं नोकरीविरहित असून दुपारची चिंता आहे. बाप लहानपणांच मृत्यु पावला. खर्च वाढल्यामुळें एक हजाराहून जास्त कर्ज आहे.

ग्रह चांगले पडले असून अशी स्थिति कां? याचें खुलासेवार उत्तर देणारास २ रुपयेपर्यंत बक्षीस देण्यांत येईल. पत्ता—नरहर सखाराम डिगरे—दिवाण देवडी, औरंगपुरा, मु० औरंगाबाद.



७ पत्रव्यवहार.

(१)

वि० वि.— आपल्या मासिक पुस्तकांत एक राजयोगाची कुंडली पाठवित आहे. तिला स्थल मिळेल अशी आशा आहे.

जन्म. शके १७३९ भाद्रपद
कृष्ण— सूर्योदयानंतर
घ. ० प० ५



वरील गृहस्थांस दर महिना १२०० रु० पगार होता. शिवाय सरदार अशी पंदवी होती. पूर्वी इंग्लिश सरकारचे नोकर होते. नंतर एका संस्थानिकानें मागणी करून बोलावून घेतलें. विद्या फक्त मराठी ६ यत्ता. इंग्रजी येत नव्हतें. दिशेबी कामांत अति उत्तम. आयुष्य ७० च्या जवळ जवळ. पूर्वी खाजगीमध्यें फक्त तीन रुपये दरमहा पगार होता! स्त्रिया तीन. परोपकारी फार होते.

परशुराम रघुनाथ गुप्ते

* ही कुंडली फार मजेदार आहे. ही कुंडली कोणत्याही ग्रहापासून मांडा, तीन राजयोग आहेच. प्रथम गुरुपासून मांडा– म्हणजे त्याच्या केंद्रीं शनि, चंद्र, मंगळ व शुक्र हे ग्रह येतील, व षष्ठ स्थानीं राहू व लाभस्थानीं रवि, बुध येतील. आतां शनीपासून मांडा– म्हणजे त्याच्या केंद्रीं चंद्र, मंगळ, शुक्र व गुरु हे ग्रह येतील आणि पराक्रम स्थानीं राहु व अष्टम स्थानीं रवि, बुध येतील. चंद्रापासून किंवा मंगळापासून मांडिल्यास केंद्रीं शुक्र, गुरु, व शनि येतील. आणि पंचमांत रवि, बुध येतील शुक्रापासून धनस्थानीं रवि,

बुध आणि केंद्री गुरु, शनि व चंद्र, मंगळ हे ग्रह येतील व नवमस्थानीं राहु असेल. याप्रमाणें कोणत्याही ग्रहापासून कुंडली मांडली तरी राजयोग होतो. ह्मणून हे हीन स्थितींतून उच्चपदाला गेले.

(सं. कु)

---

(२)

वि० वि.— पुढील कुंडली प्रतिकृती करितां पाठविली आहे, तिला अवश्य स्थल मिळावें—

महाभागवद्भक्त श्री नामदेव.

जन्म— शके ११९२ कार्तिक शु० ११ रविवार अरुणोदयीं जन्म. सायन.



समाधिस्थ— शके १२७२ आषाढ व० १३ वय ८० वर्षे जन्मसूर्यकाल नामदेव चरित्रांतून घेतला आहे.

(२) मंगळ एक वर्षाआड वक्री होत असतो. सन १९०३ साली तो मकर राशींत जून व जुलई या दोन महिन्यांत वक्री आहे. मकर राशि हा मंगळाचा दर्शक आहे. याच राशींत हर्शल आहे. वरील महिन्यांत रवि हा मंगळातमोर व ६।८ असा असेल. ह्याचा परिणाम समुद्रावर लढाया, पाण्यांत अपघात व विलक्षण प्रकारच्या चळवळी या गोष्टी घडाव्या असा सुमार दिसतो. मकर राशीचे स्वामित्व ज्या ज्या स्थलां असेल त्या त्या ठिकाणी वरील गोष्टी घडण्याचा संभव आहे.

गणेश दामोदर ग्रंथे.

पत्रव्यवहार.

१

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस—

वि. वि.— आपलेकडे प्रसिद्ध सायनफलज्योतिषपटु कै. रा. रा. जीवनराव चिटणीस यांची कुंडली प्रसिद्धीकरितां पाठवित आहें. कुंडलींचें संक्षिप्त वर्णन दिलें आहे. आणि त्यांचे स्वतः बद्दलची माहिती त्यानीं रा. गणेश दामोदर ग्रंथे यांस एका पत्रांत लिहून पाठविली होती ती तशीच आपणाकडे पाठविली आहे. कुंडलीवरून झालेल्या गोष्टींचा मेळ घालण्याचा प्रयत्न मी केला नाहीं. कारण, एक तर मला वेळ मिळत नाहीं व दुसरें हें काम आपल्या सारख्यांच्या हातूनच होणें योग्य आहे. आपणास पूर्वी कळविल्याप्रमाणें ता. २८ रोजीं दुपारचे तीन वाजण्याचे सुमारास सभा भरून तींत ८ ठराव पास झाले. त्यांतील मुद्याच्या गोष्टी आपणास कळवितों.

१ कै. जीवनरावांचे अकालीं मृत्यूबद्दल दुःख प्रदर्शित करून त्यांचे कुटुंबास एक दुखवट्याचें पत्र पाठविणें.

२ त्यांनीं सन १८९२ मध्यें मुंबई—ज्योतिर्विदमंडळ या नांवाची सभा स्थापना करून चार पुस्तकें प्रसिद्ध केलीं त्या सभेचें पुनरुज्जीवन करणें.

३ त्यांनीं आपल्या कुटुंबास कांहीं एक ह्मणण्यासारखी तजवीज करून ठेविली नाहीं व आपल्या हयातींत कोणाजवळूनही ज्योतिषाबद्दल फी घेतली नाहीं, ह्मणून त्यांचे कुटुंबास शक्य तितकी मदत करण्यासाठीं फंड गोळा करणें.

बाकीचे ठराव मंडळासंबंधाचे होते. कुंडलीविज्ञानचे वाचक शक्य ती मदत करितीलच, त्याच प्रमाणें त्यांनीं छापलेलीं पुस्तकें कोणास

घेणें असेल अगर दुसरी कांहीं माहिती पाहिजे असेल, तर खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा. त्यांनीं आणखी बरेच ग्रंथ लिहिले आहेत, ते छापण्याची मंडळ व्यवस्था करणार आहे, त्याची सविस्तर हकीकत मागाहून कळवीन. सध्या फंड गोळा करण्याचें काम सुरू आहे. माझे प्रिय ज्योतिषीबंधु या सत्कृत्यास हातभार लाविताल अशी आशा आहे! पुढें सवडीप्रमाणें त्यांचे लंडन येथील अस्ट्रालाजर्स मागेझीन मधील व दुसरे कित्येक लहान लहान लेख प्रसिद्ध करण्याचा विचार आहे.

कै० जीवनराव चिटणीस यांची

सायन भावचलित कुंडली.



क्रांति–रवि १४ उ ३८ चंद्र १८ द० मंगळ १८ उ २ बुध ३ उ १९ गुरु २२ उ ४० शुक्र १९ उ ७ शनि १६ उ ४६ हर्शल २१ उ २७

जन्मकाळीं पूर्व क्षितिजावर कर्क लग्नाचे १९ अंश १७ कला उदय पावत होते. या अंशावर व्यासंगी माणसें, भयंकर विचारी पुरुष, मोठमोठ्या विषयांत प्रवीण अशा माणसांचा जन्म होतो. हीं माणसें आपला विद्याव्यासंग केवळ स्वतःचे करमणुकीकारितांच करितात. त्यावर उपजीविका करणें किंवा पुस्तकें छापून लोकांत प्रतिष्ठा मिळविणें हा त्यांचा आवडता विषय नसतो. या अंशाचें स्वरूप—"एक वृद्ध मनुष्य आपले पुढें प्राचीन हस्तलिखित ग्रंथ वाचण्यांत गर्क झाला आहे असें आहे."

लग्न कर्क राशीचें असून त्यांत गुरूसारखा ग्रह उदित आहे व लग्नाधिपति चंद्र, कुंभ या शास्त्रीय राशींत अष्टमांत स्थित आहे व तो राहूनें युक्त असून शनि, रवि, मंगळ यांच्याशीं पूर्ण दृष्टियोग करीत आहे. रवि हा शनि व मंगळ या दोन पाप ग्रहांनीं युक्त आहे. गुरु हा हर्शलशीं क्रांतिदृष्टि करीत आहे. पाश्चात्य पद्धतीप्रमाणें येथें चंद्र किंवा रवि आयुष्यवर्धक स्थानीं नाहींत तरी चंद्र व लग्न यांचा जास्त विचार केला पाहिजे, कारण ते आयुष्यदायक असतात. लग्नीं गुरु हा शुभ ग्रह आहे व लग्नावर कोणत्याही ग्रहाचा अशुभ दृष्टियोग झालेला नाहीं. तरी रवि व चंद्र अति दूषित असल्यामुळें व कांहीं अंशीं गुरुही दूषित असल्यामुळें मध्यमायु झाले. जर गुरु हा लग्नीं उदित नसता, तर जन्मतःच मृत्यु झाला असता! स्थिर राशींतून व स्थिर स्थानांतून चंद्रास वाईट दृष्टियोग त्याचप्रमाणें आत्मकारक रवि अति बिघडल्यानें लहाणपणचें दिवच मोठ्या कष्टानें गेले पाहिजेत.

लग्नीं गुरु बलवान् असून लग्नाधिपति चंद्र कुंभ राशींत असून शनीनें दृष्ट आहे ह्मणून शरीर रोड असून फार गौरकांति नव्हती. कर्क लग्नाचे स्वभावाप्रमाणें एके ठिकाणीं फार वेळ न राहणें, चाल-

तांना इकडे तिकडे बारकाईनें पाहणें व मन एका गोष्टीकडे फार काळ न टिकणें असे होते.

धनस्थानांत अथवा कुटुंबस्थानांत तीन पाप ग्रह! मग कुटुंबात माणसें किती असलीं पाहिजेत हें विचारणेंच नको. धनस्थानांत एकटा मंगळ असला ह्मणजे मनुष्य लागेल तसा पैसा मागचा पुढचा विचार न करितां खर्च करितो. मग येथें तर तीन पाप ग्रह आहेत! फार पैसे मिळत नसतांही प्रत्येक पुस्तकाचे किंवा शास्त्रीय खर्चाचे बाजूस हे अति सढळ हाताचे होते. सप्तमाधिपति शनि हा सिंह या शत्रुराशींत व धन स्थानांत मंगळ, शनि व रवि हे पाप ग्रह शुक्राचे सन्निध असा योग झाल्यामुळें प्रथम स्त्री अल्पायु झाली.

ज्या प्रमाणें चतुर्थ, अष्टम व द्वादश हे भाव गूढ विद्या दर्शवितात (यांचे मदतीस तृतीय व नवम हे दोन भाव जास्त ध्यावे लागतात) त्याच प्रमाणें कर्क, वृश्चिक व मीन हे गूढ शास्त्राचे अथवा गूढ ज्ञानाचे राशि आहेत. ग्रहांत हर्शल, बुध व चंद्र एकापेक्षां एक कमी योग्यतेचे मानलेले आहेत. या कुंडलींत तृतीय स्थानांत शास्त्रीय राशींतं बुध, हर्शल व चंद्र हेही शास्त्रीय राशींत आहेत व गूढ राशींत शुक्र आणि नेपच्यून आहेत. गुरुनेपच्यून १२० अं., त्रिकोणदृष्टियोग अथवा नवपंचम योग, त्याच प्रमाणें चंद्रहर्शल, हर्शलशुक्र द्विराश्यंतर व हर्शलबुध यांचा वर्तुलपाद दृष्टियोग झाला असतां मनुष्य ज्योतिष, सामुद्रिक, हिपनाटिझम वगैरे गुप्त विद्यांचा केंद्र होतो. यांत बुधहर्शल यांच्या वर्तुलपाद दृष्टियोगानेंच ह्यांच्या लेखानें पैशासंबंधीं फायदा करूं न देतां पुष्कळ वादविवाद माजविला व स्वतःस त्रास देऊन लोकांत पुढें आणलें नाहीं! धनस्थानांत पाप ग्रह, चंद्रदूषित शुक्र व रवि बिघडला असल्यानें नेत्रपीडा झाली असली पाहिजे.

तृतीय स्थानाचा स्वामी बुध असून त्या बरोबर हर्शल हा वर्तुलपाद दृष्टि करीत आहे व नेपच्यून हा तृतीय स्थानावर पाहत आहे त्यामुळें यांस बंधुसुख मिळालें नाहीं. तृतीय स्थानांत बुध हा आपले स्वगृहीं असून बलवान् असल्या कारणानें शेजारी पाजारी यांच्याशीं अति स्पष्ट बक्तेपणाचा विचार केला तरी फार बरेपणा होता. गुरु व बुध यांचा तृतीयैकादश योग झाल्यामुळें नवम व तृतीय भावाबद्दलचें पूर्ण फळ मिळालें पाहिजे.

पंचम भावारंभीं प्रसव राशीपैकीं स्त्रीराशि उदित असून गुरु हाही प्रसव राशींत असून स्त्रीराशींत आहे. त्यामुळें कन्यासंतति जास्त झाली पाहिजे. पंचमाधिपति मंगळ हा सिंह या अग्नि व वंध्या राशींत असून दोन पाप ग्रहानें युक्त आहे यामुळें बरींच मुलें अल्पायु झालीं पाहिजेत.

अष्टमांत चंद्र पापदृष्ट असला ह्मणजे त्या माणसास जलघात, पाण्यांत बुडून मरण्याची किंवा अकस्मात् मृत्यू होण्याची भीति असते त्याच प्रमाणें श्वासोच्छवास एकदम कोंडल्यानें मृत्यू होतो. येथें धनस्थान व अष्टमांत चंद्र दूषित आहे. धन स्थानाचा अंमल कंठावर असतो त्याप्रमाणें यांचा मृत्यू ता. १३ फेब्रुवारी दुपारचे ३ वाजण्याचे सुमारास दोन दिवस घसा दुखण्यास लागून घटसर्पासारखा विकार होऊन मृत्यू झाला!

नवम स्थानावर धर्म व स्वप्नें यांचा विचार होतो. या कुंडलींत नवम स्थानांत स्वगृहींचा नेपच्यून असून नवमाधिपति गुरु हा कर्क राशींत उच्च आहे व या दोघांत नवपंचम योग होत आहे. या व आणखी बऱ्याच गोष्टींचा विचार केला असतां यांना विचित्र स्वप्नें पडत असत असें दिसून येतें. यांचे बहुतेक विलक्षण शोध स्वप्नवत् स्थितींतून काढलेले होते. इंग्रजींत ज्यास क्लेरेव्हायंटपावर—द्विव्यदृष्टि ती यांस नवम स्थानांतून होणाऱ्या त्रिकोणदृष्टियोगानें मिळाली व

त्याच योगानें फलज्योतिषांत त्यांस विचित्र शोध लागले. .नवम स्थानावरून विद्यादानाचाही विचार होतो. त्याप्रमाणें सन १८९२ मध्यें ज्योतिर्विदमंडळ स्थापून त्यांतून त्यांनीं फलज्योतिष शिकविण्याचा एक वर्ग काढला होता. या संस्थेचे हे प्रिन्सिपाल असून रा. बापूजी नवलकर हे हेडमास्तर होते. पुढें तें स्कूल सायननिरयन या भेदामुळें मोडलें. मंडळांत प्रथम विद्यार्थी ७५ होते! परंतु हे कट्टे सायनवादी असल्यामुळें हळू हळू विद्यार्थ्यांची संख्या कमी होऊं लागली, तरी पण त्यांनीं आमरण आपला विद्यादानाचा प्रयत्न सतत चालू ठेवला होता, हें सर्व गुरूचेंच फळ होय. महाराष्ट्रांत जर कोणी सायन गणना शास्त्रसिद्ध असून तींच फलें पाहण्याकारितां घ्यावी असें अनुभवानें प्रतिपादन केलें असेल तर त्याचें श्रेय यांसच द्यावें लागेल. फलज्योतिषावर प्रकाश पाडण्याचा प्रथम मान यांनाच द्यावा लागतो.

कर्क हें बादशाही लग्न उदित आहे. लग्नांत गुरु नवमाधिपति अति बलवान् आहे. लग्नेश, दशमेश व पंचमेश हे धनस्थानांत सिंह या राज राशींत आहेत. त्यामुळें हे सरदार घराण्यांत जन्म पावले. यांचे वडील सरदार होते. सरदार ही पदवी त्यांस देऊन कांहीं पूर्वीचें वतन द्यावें अशी खटपट चालू झाली होती. परंतु यांचे अकालीं मृत्यूनें सर्व जागचे जागींच राहिलें!

यांची सायन फलज्योतिषपटुता व गणितपटुता इ० गुणांसंबंधानें पाश्चात्य लोकांत बरीच कीर्ति आहे. त्याच प्रमाणें आपलेकडील सायनवादी कै. विसाजी रघुनाथ लेले व कै शंकर बाळकृष्ण दीक्षित यांच्या खाजगी पत्रव्यवहारावरून त्यांचें यांच्या विषयीं उत्तम मत पडलें होतें असें दिसतें. कर्क व सिंह या बादशाही राशींनीं आपलीं कामें पूर्ण बजावून दाखविलीं. या राजयोगांत सर्व ग्रह अनुदित गोलार्धांत असून शनि हा बरेच ग्रहांस दूषित करीत आहे त्यामुळें बराच कमीपणा आला आहे. यांचें स्पष्टवक्तेपणामुळें उपरी अधिकारी वर्गाशीं मुळींच पडत नसे.

एकादश स्थानांत हर्शल हा गूढ शास्त्रद्योतक ग्रह आहे. त्यामुळें यांचे सर्व मित्र विचित्र तऱ्हेचा अभ्यास करणारे म्हणजे मांत्रिक, ज्योतिषी, अंगांत देव आणणारे, साधू व कर्णपिशाच जाणणारे असे होते.

स्वतःची हकीकत त्यांच्या पत्रावरून:—

"माझी प्रकृति चांगली असते. आईबापांचें सुख चांगलें लाभलें. माझी आई सन १८८६ चे सुमारास व बाप १८९६ चे सुमारास मयत. प्रथम लग्न १८७७ मध्यें झालें. २ रें १८८३ मध्यें झालें. दुसरे स्त्रीस ४ मुली. पैकीं २ मेल्या. पुत्रसंतति नाहीं. घराणें अत्यंत श्रीमान व बलाढ्य होतें. हल्लीं गरीब आहे. कुटुंबांत सर्व मिळून ४ मनुष्यें आहेत. माझा शुक्र सिंह राशींत असतां तुझी कर्केत धरिला. राफेलचे पद्धतीस अनुसरून सप्तम स्थानचें जें वर्णन दिलें तें चुकीचें आहे इंग्रजी रिवाजाप्रमाणें हिंदु रिवाज नसल्यामुळें लग्नाचा काळ, स्त्री वर्णन कधींही जुळणार नाहीं. मला वाचनाचा नाद आहे. व पुष्कळ पुस्तकें वाचलीं आहेत. पुरातन शोध काढून त्यांचेवर लेख लिहिणें वगैरे कामें करितों. वैद्यकीचा नाद नाहीं. तथापि कांहीं पुस्तकें पाहिलीं आहेत. बहिणी व बंधु नाहींत. प्रथम मुलगी १८८९ मध्यें झाली व ती १८९७ मध्यें प्लेगनें मेली. दुसरी १८९९ मध्यें होऊन त्याच सालीं मृत झाली. १९०१ हें मात्र त्रासाचें गेलें. या खेरीज त्रास माहीत नाहीं. नेत्रांस विकार म्हणजे चष्मा लावावा लागतो रात्रीं २ वाजेपर्यंत वाचण्याचा नाद असल्यामुळें नेत्रविकार होतात. पगार रुपये ३२ थोडी जमीन आहे. शेतकीवर जरी निर्वाह नाहीं. तथापि शेतींत बरेच पैसे मिळतील. ज्योतिषशास्त्रावर मी पैसे घेत नाहीं. हस्तसामुद्रिक, मस्तुलिंग इ. गुप्त शास्त्रांचा पूर्ण नाद असून त्यांत कित्येक नवीन शोध लावले आहेत. पैसा हा आवडता विषय नाहीं. माझें भाषण कडक व निस्पृहतेचें असतें. लेखही तसेच असतात म्हणून ते वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होत नाहींत. सभेंत भाषण करण्यासही परवानगी मिळत नाहीं."

२

सा. न. वि. वि.—आपणाकडे आज एका मुलाची कुंडली पाठवीत आहें. हा मुलगा ता. २७।१०।०८ रोजीं मंगळवारीं सायंकाळीं ६ वाजतां जन्मला. जन्मल्यापासून आईचें दूध मिळालें नाहीं. शरीर कृश, अशक्त व सुरकुत्या पडलेलें होतें. तो शके १८३० कार्त्तिक व० ९ मंगळवारीं सायंकाळीं ६ वाजतां मृत्यु पावला.

सायन



—विष्णु वामन मुळे—खोडाळें.

* मरणसमयीं फक्त चंद्र कन्येंत होता व शुक्र हा जन्मलग्नाचा स्वामी अष्टमस्थानीं मंगळाजवळ होता. बाकीचे ग्रह त्या त्या राशींतच होते. जन्मकाळचा चंद्र असा होता कीं तो वृश्चिक रास सोडून धनुराशींत प्रवेश करीत होता. यालाच राशिगंडांत असें ह्मणतात. कर्क, वृश्चिक व मकर या राशींचे राशिगंडांत मृत्युप्रद असतात. ह्मणूनच हें मूल अल्पायु झालें. मंगळ हा शनीचे समोरून पुढें ६ अंश गेला होता त्यामुळे त्याचा विशेष अनिष्ट परिणाम घडूं नये. विचार केला असतां ही कुंडली सामान्य प्रकारची नाहीं. ह्मणून तिचा ज्योतिषाला बहुधा उलगडा होण्यासारखा नाहीं. मातेचें दूध कां मिळालें नाहीं व तें मूल अशक्त कोणत्या कारणानें झालें याचा बोध होत नाहीं असेंच येथें ह्मणावें लागतें. केवळ चंद्राच्या राशि-गंडाच्या कारणाशिवाय दुसरें बलवत्तर कारण दिसत नाहीं.—संपादक—

कुंडलीसंग्रह

[अंक १० वरून पुढें चालू]

१८

जन्म—शके १७८३ भाद्रपद व. ११ सोमवार
इ० घ. ५४ पळें ४१



ता. २२-६-०८ रोजीं घोड्यावरून पडला. नंतर ८।९ दिवसांनीं कालरा होऊन पुढें मूळव्याधीचा उपद्रव झाला तो अद्याप त्रास देत आहे. जन्म जुळें. दोन्ही पुत्रजन्म. पैकीं एक दहा दिवसांचे आंत भिंत पडून मृत्यु पावला. बाळंतपणीं माता अत्यवस्थ होती. १८८३ मध्यें म्याट्रिक झाला. १८९१ मध्यें रेव्हेन्यूडिपार्टमेंट नोकरी. प्रथम कुटुंब १८९१ सालीं जुलईत आषाढ व० ६ ला मृत. १८९६ मध्यें ज्येष्ठ व० ७।८ ला माता मयत झाली. वडील हयात. बंधू ४ बहिण नाहीं. द्वितीय संबंधास दोन मुलगे व दोन मुली आहेत.

—त्रिं. बा. देशपांडे यांजकडून

१९

शके १७९९ फाल्गुन व. १४ शनीवार (अ० २२)

सायन



ल.	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.
१	११	१०	२	११	३	९	११	५	०
१६	८	२१	१०	२२	७	२४	९	२६	०

घरची स्थिति श्रीमंतीची. स्थावर इष्टेट पुष्कळ. धंदा फोटोग्राफर स्त्री १८९९ मध्यें वारली. २ मुलगे आहेत. जातींत चांगला मान असून चौधरीपणाचा हक्क आहे. प्रकृति सशक्त. बांधा धिप्पाड. कुटुंब लहान. व्यापार चांगला चालतो.

२०

ता. २३ जुलई सन १८९२ रात्रीं ३ वा. १५ मि. (अ. १८)

सायन



ल.	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.	ने.
२	४	२	०	३	६	२	९	८	२	०
२८	१	२७	६	९	२३	२८	१८	२६	१९	४

आईबाप लहानपणीं मयत. भाऊ १ आहे. ४ स्त्रिया वारल्या. पांचवा विवाह फेब्रुवारी १९०९ महिन्यांत झाला प्रथम स्त्रीची एक मुलगी आहे. व तिसरीचा एक मुलगा आहे. न्यायाधीश असून पगार दरमहा रुपये १८०० आहे. बी. ए. एल एल बी. पर्यंत शिक्षण. स्वभाव शांत, मनमिळावू व लोकप्रिय. वातप्रकृति. डोळे लहान. संतति एकंदर ८ झाली. चवथ्या स्त्रीचा बाळंतपणांत मृत्यु झाला.

२१

ता. २०-८ १८७७ दुपारीं १२ वाजतां (अ. २०)

सायन



ल.	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.	ने.
७	४	९	११	५	८	५	११	११	४	१
२३	२६	१६	१६	१८	२३	२८	१९	२	२४	०

आईबाप हयात आहेत. भाऊ ४ आहेत. धंदा भिक्षुकी व पुराण सांगण्याचा. संस्कृत भाषा चांगली येते. दोन वर्षांपूर्वी स्त्री वारली. संतति बांचली नाहीं. दुसऱ्या स्त्रीला अद्यापि संतति झाली नाहीं.

१९०८ सालीं राजद्रोहाचा आरोप आला होता तो टळला. स्वभाव रागीट. स्थावर इष्टेट घर आहे. कुटुंब मोठें प्रवास फार होतो.

२२

ता. १५-८-१८६२ रात्रीं १० वाजतां (अ. २०)

सायन



ल.	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.	ने.
११	४	०	०	४	९	३	९	८	२	०
२०	२१	२८	१९	१८	२८	२४	२२	१८	१९	३

प्रकृति अशक्त:वातरोगी. धंदा नोकरी, दिवाणी खात्यांत कारकून. सासऱ्याकडून वारंवार मदत झाली. बाप ९ महिन्याचा असतां वारला. आई १९०२ मध्यें मृत. जन्मापासून १६ वर्षें मामाचे येथें सहवास. गायनकला अवगत आहे. आजपर्यंत मोठ्या दुखण्यानें तीन अपमृत्यु झाले. संधिवात, अतिसार व पीनस. शेवटच्या रोगाची उत्पत्ति १९०६ सालीं होऊन तो अद्याप बरा झाला नाहीं. शनिमंगळ ६।८ असे असल्यानें प्रकृति कधींच नीट राहत नाहीं. वृश्चिक व धनु राशींचा शनि फार कष्टप्रद झाला, तेव्हां पहिले २ रोग झाले. येथें चंद्र नियमाप्रमाणें कृत्तिकेंत असून तो मंगळानें अग्निराशींत युक्त आहे!

कुंडलीसंग्रह.

[अंक ११ वरून पुढें चालू.]

२३

जन्म—शके १७८७ भाद्रपद व० १

सायन



सन १८८१ सालीं बाप मयत व १९०३ सालीं माता मयत. शनि दशमांत मेष राशींत असतां साडेसाती होती त्या वेळीं बाप मयत झाला. १९०३ सालीं चतुर्थ स्थानीं तूळ राशींत मंगळ वक्री होता, मातृस्थानचा अधिपति शुक्र त्याच्या समोर शनि होता व राहू चतुर्थ स्थानीं होता. येथें एक गोष्ट विशेष आहे कीं मातृस्थानीं तीन पाप ग्रह असून पितृनिधन मातृनिधनाच्या पूर्वी झालें व तें १६ व्या वर्षाच्या सुमारास झालें. वडिलार्जित इष्टेट नाश पावली. हल्लीं स्थिति गरिबीची आहे. विद्या—म्याट्रिक, फोटोग्राफी इलेक्ट्रो. प्लेटिंग व ज्योतिष. नोकऱ्या ४।५ झाल्या. हल्लीं रेलवेकडे आहे. द्वितीय स्थानीं शुक्र असल्यामुळें कला संपादन झाल्या. ३ भाऊ व १ बहीण इतकीं भावंडें होतीं. पैकीं २ भाऊ मयत असून एकाशीं बेबनाव आहे. नेत्रविकार आहे. संतति ८ मुलगे व २ मुली आहेत.

२४

जन्म.—शके १८०७ चै० शु० १२ रात्रौ घ० ४०

सायन.



ल.	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.
८	०	४	११	०	४	११	२	६
०	७	२९	२७	१८	२६	२७	१८	५
१०	.	.	.	.	.	.	.	.

धंदा शाळामास्तर. नवम स्थान हें शिक्षणाचें स्थान आहे. व या स्थानांत गुरुचंद्रयुति आहे. ट्रेनिंगचें तिसऱ्या वर्षाचें सर्टिफिकिट सन १९०८ सालीं मिळालें. ह्मणजे तें नवमस्थ गुरूवर मिळालें. बाप आहे. आई नाहीं. पंचमांत रवि असून समोर राहु व हर्शल असल्यामुळें २ गर्भपात झाले. बायकोच्या अंगांत येतें हा जायास्थानच्या शनीचा दोष असावा. ४ भाऊ व २ बहिणी आहेत.

२५

जन्म.—ता. १० जुलई सन १८८२ अक्षांश २४

सायन.



ल.	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.	ने.
११	३	१	५	२	२	४	१	७	५	१
१	१८	२३	५	२८	१९	२८	२३	२७	१५	१८
४७	२८	२८	३२	३४	३९	९६	११	११	२८	११

आईबाप हयात. स्थिति सुखवस्तु. भाऊ तीन होते ते महामारीनें मयत. तृतीय स्थानच्या साडेसातीच्या शनीचें हें फल असावें. विवाह शके १८२५ ज्येष्ठ व० ३ ला झाला. बायकोस सासऱ्यानें आजपर्यंत पाठविलें नाहीं. जायास्थानीं हर्शल व मंगळ हे ग्रह आहेत त्यामुळें स्त्रीचा सहवास अझून घडत नाहीं. त्या संबंधानें अनेक वेळां तंटे झाले. चतुर्थ स्थानचा गुरुबुधयोग मातापितरांच्या सुखाला व सुखवस्तूपणाला कारण आहे.

२६

जन्म.—ता.१७ ७-१८७२ सकाळीं ९-३२

सायन.



ल.	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.	ने.
३	३	८	३	४	४	३	९	२	४	०
२४	२९	५	८	१६	७	२९	१७	१०	१	२६
४४	०	२	०	०	०	०	व.	०	०	०

धंदा भिक्षुकी. शके १७९७ त पाठीवर भाऊ झाला. ज्येष्ठ शु० १४ रोजीं आई मयत. शके १८१४ मा० शु० ९ रोजीं बाप मयत. शके १८१५ आश्विन शु० ५ रोजीं वडील बहीण मयत. शके १८१२ ज्येष्ठ शु० १४।१५ रोजीं प्रथम विवाह. शके १८१७

ज्येष्ठ यांत प्रथम कन्याजन्म व तिचा मृत्यु. शके १८१९ आषाढ शु० १५ रोजीं दुसरे मुलीचा जन्म. शके १८१९ मार्गशीर्ष शु० १२ रोजीं पहिली बायको मयत. शके १८२० त सावत्र आईचा मृत्यु. शके १८२४ आश्विन ते पौषपर्यंत उपदंशाचा आजार व माघ–फाल्गुनांत प्लेगनें आजारी. द्रव्यहानि रुपये ४००, शके १८२५ त नवीन घर ६०० रुपयांचें बांधलें. शके १८२६ त वेश्यासहवास एक वर्ष. १८२७ त तिचे पायीं कोर्टांत दावे, नुकसान ३०० रु. शके १८२६ माघ व० ९ स द्वितीय विवाह. तिच्या कबजाबद्दल १९०७ सालीं कोर्टांत दावा. नुकसान रुपये २०० वेश्येपासून एक मुलगा झाला तो मयत. दुसरी पत्नी वागत नाहीं. हल्लीं २००० रु० कर्ज आहे. तिसरा विवाह करण्याचा विचार आहे. नेत्रदोष. वर्ण गोरा. बांधा उंच व मजबूत.

२७

जन्म शके १८०७ श्रावण शु० ९ शनवार सकाळीं ६ वाजून ५० मि.



वर्ण सांवळा. चेहरा लांबट. नाक सरळ. डोळे मोठे व पाणीदार स्वभाव आनंदी, शांत, सत्यप्रिय व दयाळू असून जबर महत्वाकांक्षी आहे. उंची ५॥ फूट. राहणी साधी असून अत्यंत धार्मिक आहे. २ऱ्या, ३ऱ्या, वर्षी दृष्टीच्या विकारानें अत्यवस्थ. तेथून ७ वर्षेपर्यंत पोटदुखी. पुढें ३ वर्षें हिमज्वर. १ वर्ष पानथरी. सातव्या वर्षी डाव्या मांडींत गज शिरून इजा झाली. १५व्या वर्षी उंचावरून पडून डावा हात मोडला तो ६ वर्षांनीं बरा झाला. विद्या साधारण. २वर्षें वैद्यकीचा अभ्यास केला परंतु त्याकडे लक्ष नाहीं. बुद्धि अत्यंत तीव्र आहे. शके १८२८ मार्गशीर्ष व० ९ सोमवार रात्रौ विवाह झाला. स्त्री सुंदर आहे. ती मानी व सद्गुणी अशी आहे. वर्ण गोरा, चेहरा बाटोळा व बांधा ठेंगणा असून गोंडस आहे. शके १८३१ चैत्र व० १३रवौ स्टँ. ९-८ला प्रसूत होऊन मुलगी झाली आहे. पहिली माता सन १९०२ च्या पौष शु० ७ ला रात्रीं ८ वाजतां मयत. १९०३च्या वैशाखांत सापत्न माता झाली ती १९०८ मार्गशीर्ष शु.९ शनवारीं दुपारीं १२ वाजतां देवलोकीं गेली. भावंडें एकंदर ८पैकीं ३ बहिणी. त्यांत एक सावत्र. भाऊ पांच. पैकीं एक सावत्र. यांत १ सावत्र व सहोदर ३, बहीण नाहीं. मातुल व चुलता यांचें सुख नाहीं.

कुंडलींत षष्ठ स्थानीं कर्क राशीचा ९ अं. १२ क. मंगळ नीचस्थ आहे. व त्याच्या जवळच [सुमारें ५ अंशांच्या फरकानें] शनि आहे. हे दोन्ही ग्रह या राशींत असतां अनिष्ट परिणाम उत्पन्न करितात. व ते एकत्र असले तर फारच अनिष्ट गोष्टी घडवून आणितात. त्या प्रमाणें येथें गोष्टी झाल्या आहेत. सप्तमेश रवि हा स्वगृहीं असल्यामुळें स्त्री सुंदर मिळाली आहे, पण त्याच्या व्यय स्थानीं मंगळ आहे म्हणून द्विभार्ययोग खात्रीनें आहे. मातृकारक ग्रह

चंद्र असून तो दशमांत नीच आहे, कर्क राशींत २ पाप ग्रह अनिष्ट आहेत व मातृस्थानीं नेप्च्यून आहे ह्मणून सापत्न माता झाली. षष्ठ स्थानीं मंगळ नीच असल्यामुळें मातुलसुख नाहीं. कर्क राशीचा अंमल पोटावर आहे त्यामुळें उदरस्थ दुखणीं येऊन गेलीं. पंचमांत व द्वितीय स्थानांत ग्रह नाहीं, ह्मणुन विद्यायोग नाहीं. कन्येंत बुध आहे या साठीं वैद्यकीचाच अभ्यास श्रेयस्कर आहे.

२८

जन्म.—ता० ३० आगष्ट सन १९०१ सकाळीं ८ वाजतां

सायन



ल.	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.	ने.
६	६	११	६	६	९	६	९	७	८	३
७	६	९	२८	८	३	७	९	१७	१२	१
१४	२	४८	५७	१२	१३	५९	५८व	५	५४व	९

ही कुंडली एका मुक्याची आहे. कानानें ऐकूं येतें पण बोलतां येत नाहीं. या वरून याच्या जिभेंतच दोष असला पाहिजे. जिभेच्या साह्यानें वाणीचा उगम आहे. द्वितीय स्थानावर वाणीचा विचार होतो. या स्थानांत वृश्चिक राशीचा राहू आहे. द्वितीय स्थानचा राहु असले वाणीचे दोष उत्पन्न करितो, त्यामुळें या मुलास मूकत्व प्राप्त झालें आहे.

२९

जन्म.—ता० ३।११।१८६० रात्रो ११-१७

सायन



ल	र	चं	मं	बु	गु	शु	श	रा	ह	ने
४	७	३	१०	८	४	६	५	९	२	११
७	११	१०	२२	९	२७	०	११	२७	२१	२७
.	३	४२	५८	१०	०	३०	१	१	.	.

वातप्रकृति. अंगावर केश फार. नांवाचे इनामदार. स्थाईक उत्पन्न वर्षास रु० १००, बंधु तीन, पैकीं एक वर्डाल मयत व एक दत्तक. बहिणी २ मयत. घर साधारण. मित्र कमी. ५व्या वर्षी माता मयत. विद्या अल्प. पुत्र २ (मंयत) कन्या ३. मातुलसौख्य कमी. शत्रु बरेच. वातरोग. स्त्रिया २ झाल्या. पहिली हयात अशक्त व पांगळी. दुसरी ता० १।१।९५ रोजीं मयत. काशीयात्रा १७।२।७९ रोजीं झाली. पिता ता. ९।१।७९ रोजीं मयत धंदा शाळामास्तर. पगार रुपये १०ते१५ सदैव चिंतातूर. थोडे कर्ज. यश कमी. बंधूत विरोध. १९०८ मध्यें कन्येचा विवाह झाला.

कर्क राशींतला चंद्र व लग्नीं गुरु यामुळें वातप्रकृति. व्ययस्थानीं चंद्र व धनस्थानीं शनि यामुळें गारिबी. चतुर्थ स्थानीं रवि, यामुळें या रवीवरून शनि जातांना माता मयत झाली. सप्तम स्थानीं मंगळ

व कुटुंब स्थानीं शनि यामुळें स्त्रीसुखाची वाताहत झाली.

३०

जन्म—शके १८०६ मार्गशीर्ष व० ९ इ.घ.४८ प. ४०



ल.	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.	ने.
६	८	४	९	९	५	७	२	६	६	१
२१	१९	१८	१	३	९	११	२१	१०	२	२१
५६	.	.	.	.	.	.	व	.	.	.

सव्या चुलत्याला दत्तक दिला आहे. कुटुंब एकत्र आहे सन १८९९ सालीं दत्तक झाला. पूर्व घराण्यांतील भावंडें ९।६ आहेत. दत्तक घराण्यांतील फक्त २ बहिणी आहेत. माता ६ वर्षांपूर्वी मयत झाली. दत्तक माता आहे धंदा व्यापार. जन्मदाता बाप श्रीमंत आहे. धंदा दुकानदारी. संतति १ मुलगा आहे. प्रथम २ अपत्यें गेलीं. विवाह १७।१८ वर्षाचे सुमारास झाला. दांत अधू आहेत. मलावरोध व अग्निमांद्य हे विकार आहे.

दत्तकयोग बरोबर जुळतात. चतुर्थ स्थानीं मकर रास असून तींत मंगळ आहे, नवमस्थानीं रवि व शनि हे समोरासमोर आहेत, हे योग दत्तकाचे आहेत. शनि चतुर्थ स्थानीं आल्याबर माता मयत झाली.

कुंडलीसंग्रह.

[अंक १२ वरून पुढें चालू.]

३१

जन्म—ता. २८ मार्च्य स. १८८३ सायं. ९ वाजतां



ल.	र.	चं	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.	ने
५	०	७	११	११	२	१०	१	७	५	१
१	२८	२९	११	२२	२४	२५	२२	१३	११	१७
२८	.	.	.	.	.	.	.	.	व	.

विवाह आजपर्यंत झाला नाहीं. चंद्र राहूनें दूषित असल्यामुळें साडेसातींत माता वारली. सांपत्तिक स्थिति चांगली.

३२

जन्म—ता० २६ अकटंबर १८८० रा. ८ वा. १९ मि.



ल.	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.	ने.
२	७	३	७	७	०	८	०	८	५	१
१२	२	२७	३	२९	१४	२	२५	२९	१०	१३
.	.	.	.	.	व	.	व	.	.	व

एकादशस्थानीं गुरु व शनि असून ते वक्री आहेत, त्यामुळें आजपर्यंत झालेल्या ७।८ मुलांत एक मुलगी हयात आहे. सांपत्तिक स्थिति चांगली. नोकरी अपकारी खात्यांत-कुटुंब स्थानीं चंद्र स्वगृहीं असल्यामुळें कुटुंब मोठें आहे. अद्यापि द्विभार्ययोग घडून आलेला नाहीं.

३३

जन्म—ता० १३ जून १८७४ सकाळीं ४ वा.



ल.	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.	ने.
२	२	२	२	३	५	३	१०	१	४	०
२	२३	५	२९	११	२३	२०	१३	३	८	२९
.	.	.	.	.	.	.	व	.	.	.

आजपर्यंत संतति झाली नाहीं. धंदा नोकरी. वैद्यकाचा गुण आहे विवाह एकच. शत्रु फार भाऊबहिणी आहेत. सांपत्तिक स्थिति मध्यम.

'साँ फ्रानसेस्को झेव्हीअर' आगबोट.

धी इन्डियन कोऑपरेटिव्ह नॅव्हिगेशन आणि ट्रेडिंग या कंपनीची वरील नांवाची पहिली आगबोट ता० ६ मार्च्य सन १९१० रविवार या दिवशीं सकाळीं स्टं. टा. ११ वाजून ३७ मि. नीं सफरीसाठीं मुंबईहून चालू झाली, हें कळविण्यास साभिमान आनंद वाटतो! या आगबोटीचा फोटा आजच्या अंकासोबत दिला आहे. हिची लांबी १७५ फूट आणि रुंदी २६॥ फूट असून ती सुमारें ७ फूट पाण्यांत चालूं शकते. तिची गति सुमारें १३ नाट आहे व ती १५१ टण वजन नेऊं शकते. कष्टमपास ९७५ पासिंजरचा मिळाला आहे. उतारू लोकांसाठीं जितक्या सोई करितां येणें शक्य आहेत तितक्या करण्याच्या कामीं कंपनीनें पूर्ण काळजी घेतली आहे. हेलकावे बसूं नयेत ह्मणून बोटीचा गुरुत्वमध्य खालीं जाईल अशी व्यवस्था केली आहे. थर्डक्लास व सेकंडक्लास येथीन पायखाने स्वतंत्र आहेत. फर्स्टक्लासमध्यें उतारूसाठीं ४।५ केबिनी आहेत. एखाद्या वेळीं थर्डक्लासमध्यें गर्दी झाल्यास तेथील उतारू सेकंडक्लासमध्यें बसविण्याची योजना निराळी केली असल्यामुळें सेकंडक्लासच्या उतारूस त्यांचा उपसर्ग होणार नाहीं. पाण्याची व फराळाच्या दुकानाचीही बोटीवर चांगली व्यवस्था केली आहे. ही आगबोट तूर्त रविवार व बुधवार या दिवशीं आठवड्यांतून दोन वेळ मुंबईहून गोव्यापर्यंत सफर करणार आहे. व ती हर्णईपासून पुढील बंदरें घेणार आहे. साधल्यास एक वेळ मधल्या बंदरीं सफर करण्याचा

इरादा आहे. हल्लीं चालू असलेल्या दुसऱ्या कंपनीच्या जुन्या दरा-प्रमाणेंच दर कायम केले असून या कंपनीची चढाओढ कर-ण्याची इच्छा नाहीं, यामुळें दुसऱ्या कंपनीनें जरी कितीही दर कमी केले तरी ही कंपनी आपल्या दरांत (तशीच वेळ येईपर्यंत) फरक करणार नाहीं असें समजतें. उतारूंचे बोजे चढवणें व उतरणें हें काम कंपनी आपल्या खर्चानें करणार आहे.

या कंपनीनें ही आगबोट बांधण्याविषयींचा विलायतच्या काँट्रा-क्टरशीं ता० २३ आगष्ट १९०९ रोजीं करार केला. या दि-वशीं चंद्र वृश्चिक या जलराशींत होता. हाच या बोटीचा गर्भ-काल होय. पण, सह्या केव्हां झाल्या तें टाईम मिळालें नसल्या-मुळें आधानकुंडली मांडतां येत नाहीं. या दिवशीं गुरु हा चं-द्राला बरोबर ११ वा होता. तिच्या नांवावरून तिची कुंभ रास येते. व आधानकालावरून वृश्चिक रास येते. कुंभ राशीला गुरु नववा येतो. यामुळें बोट बांधण्याच्या कामीं व्यत्यय न येतां ती शक्य तितकी लवकर बांधली गेली.

करार आल्यानंतर बरोबर १९ दिवसांनीं म्हणजे ता० ६ सप्टेंबरला तिचा पहिला कणा मांडला. या दिवशीं चंद्र मिथुनेंत होता व शुक्र तूळेंत होता. कुंभ व मिथुन हे एकमेकांचे त्रिकोण-राशि आहेत. व ते शास्त्रीय राशि असल्यामुळें व तिच्या नव-मांत शुक्र वसल्यामुळें कारागीरीचें काम शास्त्रीय पद्धतीचें व वि-शेष कौशल्याचें झालें असलें पाहिजे.

ता० १ डिसेंबर १९०९ रोजीं ती पाण्यांत तरती केली. हाच तिचा जन्मकाल मानावा असें वाटतें. या वेळची कुंडली खालील प्रमाणें आहे.—



सिंह राशींत चंद्र आहे व धनु राशींत रविबुध युति आहे, म्हणून तिचा बांधा धिप्पाड, मजबूत व टिकाऊ असला पाहिजे.

नवमांत हर्शल आहे, यामुळें २२ वें वर्ष तिच्या संकटाचें व कदाचित् नाशाचेंही आहे.

बाराव्या स्थानांत शनि व मंगळ हे पापग्रह आहेत, यामुळें तिला बऱ्याच हालअपेष्टा भोगाव्या लागतील व प्रतिपक्षाकडूनही पुष्कळ त्रास पोहोंचून नुकसान होईल. तरी दशम केंद्रावर शुक्र असल्यामुळें ती सर्व संकटांशीं झगडून विजयी होईल अशी खात्री वाटते.

शनि बाराव्या स्थानांत असून त्याच्या दशमांत हर्शल आहे. म्हणून ती हल्लींच्या राजकीय परिस्थितींत न सांपडण्याविषयीं कंपनीच्या चालकांनीं विशेष खबरदारी ठेवावी. सन १९१० च्या एप्रिलच्या ५।६ तारखेस शनि व हर्शल यांचा बरोबर केंद्रयोग होत आहे हा वरील गोष्टीचा दर्शक दिसतो.

सन १९११ पासून हर्शल हा दशमांत येईल व शनि हा चंद्राच्या दशमांत येईल. यावरून सन १९११ साल पार पडलें ह्मणजे पुढें तिच्या २२ व्या वर्षापर्यंत तिला व कंपनीला कसलेंच भय नाहीं. आरंभीं २ वर्षें मात्र तिला व कंपनीच्या चालकांना बराच त्रास सोसावा लागेल असें दिसतें.

बाराव्या स्थानांत दोन पापग्रह पडल्यामुळें या बोटीपासून कंपनीला कमाई न होतां खर्च व कदाचित नुकसानही सोसावें लागेल. सारांश कंपनीचें हें पहिलें अपत्य विशेष भाग्यवान् दिसत नाहीं.

ता० ११ जानेवारी सन १९१० रोजीं दुपारीं २ वाजून ३० मि. नीं हिनें विलायतेहून हिंदुस्थानास येण्यास प्रयाण केलें. या वेळची कुंडली खालील प्रमाणें आहे.

विलायतेहून प्रवास.



कर्क हा जलराशि उदित असून मकर या जलराशींत चंद्र असतां तिनें जलप्रवास केला हें शास्त्रानुरूपच घडलें आहे! हे दोन्ही राशी तिच्या जन्मकुंडलींत तृतीयनवम (प्रवास) स्थानींच आहेत व ते चर आहेत हें लक्षांत घेण्यासारखें आहे.

प्रवासकाळीं कुयोग होता. कारण, चंद्र हा प्रवासकुंडलींत अष्टमस्थ असून तो रवि आणि हर्शल या दोन पाप ग्रहांच्या जवळ होता, त्यामुळें ती भयंकर तुफानांतून मोठ्या शिकस्तीनें बचावली! चंद्र हा प्रवासकालचा लग्नस्वामी आहे व तो अष्टमांत शनीच्या राशीस शत्रुगृही आहे. त्याचप्रमाणें सप्तमेश जो शनि तो मेष राशींत नीच असून मंगळाच्या जवळ आहे. तिसऱ्या स्थानाचा स्वामी रवि हा हर्शलशीं युति करण्याच्या स्थितींत आहे व नवमाचा स्वामी शनि हा मंगळाशीं युति करून नुकताच सुटलेला आहे. चंद्र, रवि व हर्शल यांच्या केंद्रांत शनि व मंगळ हे पाप ग्रह आहेत. हे सर्व फार अनिष्ट असे कुयोग आहेत.

वरील सर्व कुयोगांतून बचावण्यास पंचमस्थ गुरु व नवमस्थ बुध आणि दशमस्थ शुक्र हे तीन शुभ ग्रह कारण झाले असले पाहिजेत. शिवाय चंद्र हा हर्शलशीं युति करून सुमारें ७ अंश मागें राहिला होता. जर हे तारक योग झाले नसते तर कदाचित् तिची दुःखवार्ताच ऐकण्याचा प्रसंग आला असता!

ता. १ मार्च्य सन १९१० रविवार सकाळीं ११-३७ वाजतां तिनें आपल्या उद्योगास आरंभ केला. या वेळची कुंडली पुढील प्रमाणें आहे.—

'सॉं फ्रानसेस्को झेव्हीअर' आगबोट [पुस्तक १० वें उद्योगारंभ.



उद्योगारंभी मिथुन लग्न ८ व्या अंशांत उदित आहे. हेंच लग्न जन्मकुंडलींत उदित आहे. लग्नाधिपति बुध हा नवम (भाग्य) स्थानीं शुक्रासह आहे व त्याच्या नवमांत गुरु आहे. हा यशस्वी योग झालेला आहे. या योगामुळें कंपनीचें आरंभीं कितीही नुकसान झालें तरी अखेरीस ती यशस्वी झाल्या शिवाय राहणार नाहीं.

धनाधिपति चंद्र हा मकर या जलराशींत अष्टमस्थानीं शत्रु-गृहीं आहे व मंगळ बाराव्या (व्यय) स्थानांत आहे. त्यामुळें इतर कंपन्यांशीं झगडण्यांत पैशाचा बराच चुराडा होईल व बरीच पदर-मोडही करावी लागेल.

या पहिल्या अपत्याच्या वेळीं कंपनीकडून चांगला मुहूर्त पाह-ण्याच्या कामीं दुर्लक्ष झालेलें आहे, ही खेदाची गोष्ट होय. तथापि कंपनीला आमची आग्रहाची विनंति आहे कीं तिनें दुसऱ्या अपत्याच्या वेळीं प्रत्येक कामास चांगला मुहूर्त मिळविण्यास हयगय करूं नये.

वरील सर्व वर्णन आम्ही शास्त्राचा अनुभव घेण्यासाठीं ज्योति-षशास्त्राच्याच दृष्टीनें केलें आहे.

२ सायनसंक्रमणाचे काल.

३ कोणत्याही वेळचा या पंचांगावरून येणारा सायन रवि व इतर सायन ग्रह यांचा नाटिकलशीं तंतोतंत मेळ असावा.

४ सायन मकरारंभीं उत्तरायन आहे हेंच शेवटपर्यंत कायम.

५ सायन व निरयन असा दोन्ही प्रकारचा आर्द्रापवेश काल.

६ सायन आर्द्रापासून १० नक्षत्रें.

आमचे मित्र वे० विष्णु कृष्ण पुराणिक हे आपल्या पंचांगांत तूर्त इतकी सुधारणा करितील अशी आशा आहे. अयनाश व अयनगति वाटेल तितकी गौण्य बाबतींत आहेत बिलकूल नाखुष होणार नाहीं.

श्रीयुत अनंत श्रीधर कोटीभास्कर यांची कुंडली.

जन्म—ता. १४ फेब्रुवारी सन १८७९ सकाळीं ८।३६ वाजतां



हे गृहस्थ सर्वांच्या परिचयाचे आहेत. अलेंबिक केमिकल वर्क्स् हा कारखाना यांच्या प्रयत्नानें निघून तो अत्यंत भरभराटींत आहे. हे गृहस्थ एम्. ए. आहेत. प्रथम स्त्री मयत झाल्यावर त्यांनी दुसरा विवाह केला नाहीं! नुकतेच हे यूरोपांत इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी वगैरे देशांतून धंदेशिक्षणाबद्दल माहिती मिळवून आले आहेत. सांप्रत ते बरेच आजारी असून त्यांच्या जीविताची काळजी वाटत आहे.

यांनीं इंग्लंडांत प्रवास केला, याचें कारण, मेष हें चर लग्न उदित असून सप्तम स्थानीं चंद्रही तूळ या चर राशींतच आहे. निरयनानें हा योग जुळत नाहीं हे लक्षांत ठेवण्यालायखें आहे.

जन्मकाळीं मंगळ, गुरु व शनि हे तीन ग्रह स्वगृहीं असून शुक्र उच्च आहे. भाग्येश गुरु हा भाग्यस्थानाजवळच स्वगृहीं आहे. तो धनु राशीच्या पहिल्याच अंशांत असल्यामुळें अत्यंत बलवान् आहे. त्यामुळें हे भाग्यवान व कीर्तिमान् निपजले.

आमच्या मतें लग्न शुक्राच्या उदयांत पाहिजे, व त्याचे अंश मीनेचे २९ असावे. अशा कुंडलींत शुक्र लग्नीं येतो व गुरु नवमांत बसतो, यांचा वर्ण तांबुस गोरा आहे. चेहेऱ्यावर मंगळाप्रमाणें लाली असून शुक्राप्रमाणें तेजही आहे. आवाज मर्दानी असून ता मेष राशीला साजेसा आहे.

कुंभ या शास्त्रीय राशींत रवि, बुध व शनि असे तीन ग्रह आहेत व त्यांचा चंद्राशीं त्रिकोणयोग झालेला आहे. तूळ राशीचा २१ वा अंश विद्वत्तादर्शक आहे हें अंशवर्णनावरून कळून येईल, या अंशांत चंद्र आहे त्यामुळें ते विद्वान् झाले. पंचमाचा अधिपति रवि हा कुंभ राशीच्या २९ व्या अंशांत आहे.

हाही अंश विद्वत्तादर्शक आहे. बुधाचें अंशवर्णन मात्र चांगलेसें जुळत नाहीं. कुंभ राशीचा २२ वा अंश ज्या गुणाचा आहे ते गुण यांच्या ठिकाणीं पूर्ण वास करितात, म्हणून या अंशात बुध पाहिजे होता, पण तो एक अंश पुढें आहे. हा फरक कां येतो तें कळत नाहीं. याच राशीच्या २९ व्या अंशांत शनि आहे, हा अंशही विद्वत्तादर्शकच आहे.

पंचम स्थानीं हर्शल असतां मनुष्य विलक्षण बुद्धीचा होतो व आपल्या बुद्धिसामर्थ्यानें तो मनुष्य सर्व जगाला चकित करितो. हर्शलचें अंशवर्णनही बुधाप्रमाणेंच नीट जुळत नाहीं. त्याचें वर्णन १७ व्या अंशाशीं बरें जुळेल. बुध व हर्शल हे ग्रह वक्री असल्यामुळें ते ज्या अंशाकडे जात आहेत त्या अंशाचें फल देतात की काय असें वाटतें!

मंगळ हर्शल व गुरु हे, ग्रह अग्निराशींत असून ते एकमेकांच्या त्रिकोणांत आहेत. मंगळ हा रसायनशास्त्राचा प्रवर्तक आहे. हा ग्रह लग्नीं स्वराशींत उदित झाल्यामुळें व त्याच्या त्रिकोणांत हर्शल व गुरु हे ग्रह अग्निराशींतच बसल्यामुळें एम्. ए. झाल्यानंतर रसायनशास्त्राच्या कारखान्याकडे मनाची प्रवृत्ति झाली व तींतच उत्तम यश मिळालें. मंगळ व गुरु हे आपापल्या राशींत एकाच गुणाच्या अंशांत आहेत व हर्शल १७ व्या अंशांत मानिला तर तोही त्याच गुणाच्या अंशांत येतो, हा चमत्कार ध्यानांत ठेवण्यासारखा आहे.

चंद्र व मंगळ, यांचा प्रतियोग होऊन अल्पावकाशांतच जन्म झाला आहे. जन्मकाल आम्ही म्हणतों तसा घेतल्यास प्रतियोगकालींच

जन्म संभवतो. त्यामुळें शरीरावर मंगळाचा परिणाम विशेष घडला आहे. बुद्धि व मनाचे कल मंगळाप्रमाणेंच आहेत.

जायास्थानीं चंद्र हा मंगळाच्या पूर्ण दृष्टीत असल्यामुळें पुन्हा विवाह झाला नाहीं. वास्तविक जायास्वामी शुक्र उच्च असल्यामुळें हा बहुभार्यायोग व होतो. परंतु ते पुन्हा लग्नाच्या भानगडीत न पडल्यामुळें एकाच विवाहावर भागलें.

नवम स्थानीं गुरु असला म्हणजे मनुष्य आपल्या मागें आपलें नांव ठेवितो असा साधारण नियम आहे. तो जर बलवान् असेल तर जगाच्या उपयोगीं पडेल अशी संस्था निर्माण होते. अलौकिक केनिकळ वर्क्स ही संस्था याच्या नवमस्थ गुरूची साक्ष आहे हें विसरतां कामा नये.

हें गृहस्थ हल्लीं क्षयासारख्या विकारानें अतिशय आजारी आहेत व त्यांच्या आरोग्याकडे सर्वांचे डोळे लागले आहेत. शनि हा लग्नीं मेष राशींत आल्यानंतर आतां पर्यंत तो तीन वेळां जन्मस्थ मंगळावरून गेला, त्यामुळें त्यांची प्रकृति क्षयानें बिघडली. ता. १७ मेला शनि सायन वृषभ राशीचा होईल व तो नेपच्यून करून जाईल. राहू हा चंद्राला ८ वा होईल. व मंगळ हा चतुर्थस्थानीं नीच होऊन तेथून चंद्रावर जूनच्या चवथीला पूर्ण पाहील, आणि हर्शलही त्या मंगळावर पूर्ण पाहील, हे सर्व योग अनिष्ट आहेत, म्हणून शनि, राहू व मंगळ या तीन पाप ग्रहांची आराधना करावी म्हणून त्यांच्या घरीं कळविलें आहे. त्यांना दीर्घायु करो अशी आपणही परमेश्वराची सर्वांनीं प्रार्थना करूं. यांच्या भावी आयुष्याची फार मोठी किंमत आहे. असलीं माणसें जगांत जितकीं वर्षे वांचतील तितकीं लोकांस थोडींच होतील. परमेश्वरी सूत्र मात्र काय असेल तें खरें !

कुंडलीविज्ञान.

> • ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम् ।
> जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
> उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
> कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥
>
> 'भवभूति'

पुस्तक १० वें.]अषाढ व०११ सोमवार [अंक १३ वा

श्रीमत्परमहंस वासुदेवानंदसरस्वती (टेंबे) स्वामी महाराज

श्रीयुत कृष्णाजी दत्तात्रय कागलकर यांनीं वरील स्वामीमहाराजांचें चरित्र पुस्तक रूपानें प्रसिद्ध केलें आहे. त्यांत स्वामीचा जन्मकाल दिला आहे तो विश्वसनीय असावा असें समजून येथें घेतला आहे. त्या कालची सायनकुंडली खालील प्रमाणें होते.—

जन्म--शक १७७६ श्रा.शु.५ इ.व.२६ ता.३० माहे जुलै सन १८५४



चरित्रकारांनीं स्वामीच्या गर्भस्थ स्थितीचें वर्णन केलें आहे तें असें.—'एकदां रमाबाई एकांतांत बसल्या असतांना गणेशभटजी तेथें आले. व दोहदनिमित्तानें तुला काय पाहिजे, तुझी काय इच्छा आहे असें विचारूं लागले. हें ऐकून रमाबाई किंचित् हांसून म्हणाल्या 'मी नित्य' चित्स्वरूप, निरिच्छ आहें. माझ्या ठायीं इच्छा येईल कुठून? मी निर्विकार, निर्मम, शुद्ध, सर्वांतर्यामी, निर्गुण, स्वयंप्रकाश बाह्याभ्यंतरसाक्षी असा आहें. संपूर्ण स्थिरचर विश्वाला व्यापून मी दशांगुलें उरलों आहें, पण त्यापासून अलिप्त आहें. दृश्यादृश्य सर्व वस्तु माझ्या ठायींच उद्भवल्या आहेत. तथापि त्यांच्या पासून मी दूर आहें. पण ज्ञानीजनास मात्र मी जवळ आहें.' इतकें बोलून रमाबाई नासाग्र दृष्टि ठेवून स्तब्ध बसल्या. अशी ही अश्रुतपूर्व वाणी ऐकून गणेशभटजी आश्चर्यचकित होऊन रमाबाईकडे निरखून पाहतात तों रमाबाईच्या ठिकाणीं कोणी तरी सिद्धासनारूढ, काषायांबर परिधान केलेले, दंडधारी, अत्यंत तेजःपुंज एक संन्यासी दिसूं लागले. हें पाहून भीति व आश्चर्य यांही गणेशभटजींची चित्तवृत्ति भांबावून गेली, व सहजींच त्यांचे डोळे मिटले.' या नंतरची हकीकत अशी आहे कीं, गणेशभटजी आपल्या स्त्रीनें दिलेल्या उत्तराचा विचार करीत झोंपीं गेले असतां पहांटेच्या सुमारास त्यांना एक स्वप्न पडलें तें असें—'एक दैदीप्यमान दिगंबर मूर्ति समोर उभी आहेसें पाहून तत्काळ उठून साष्टांग प्रणिपात करून हात जोडून म्हणाले सर्वेश्वरा, माझी भार्या विवाह झाल्या दिवसापासून आज तागायत असें कधींच बोलली नसून आजच असें कां बोलली! त्यामुळें मला कांहीं सुचेनासें झालें आहे. या सर्वांचें कारण काय? याला उपाय काय करावा? परमेशांनीं या अनाथावर कृपा करून या संकटांतून सोडवावें.

असें ह्मणून गणेशभटजी त्या दिगंबर मूर्तीच्या पायावर लोळण घेऊं लागले. त्यावर ती दिगंबर मूर्ति हास्य करून म्हणाली 'बा द्विजश्रेष्ठा, पूर्वजन्मीं तूं आपणाला सत्पुत्र व्हावा ह्मणून भगवान् श्रीविष्णूची आराधना केलीस. त्यामुळें संतुष्ट होऊन तो सर्वेश्वरच तुझ्या पत्नीच्या उदरीं उद्भवला आहे. तुझ्याशीं पत्नीचें जें कांहीं भाषण झालें तें तिचें नसून तें सारें त्या सर्वेशाचें समज. मनांत कुकल्पना आणून भिऊं नको. तुला जो मुलगा होईल तो मातापितरांच्या कुलांचा उद्धार करील. नामांकित ब्रह्मवेत्ता होऊन जगामध्यें श्रीहरीचा भक्तिमार्ग वाढवील. स्वतः चारही आश्रमांचा स्वीकार करून वैदिक धर्माचा प्रसार करील.'

वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल कीं, गणेशभटजी हे स्वामी महाराजांचे जनक असून रमाबाई या जननी होत. पुढें बालक ज्या गुणाचें जन्मावयाचें त्या त्या गुणानुरूपच मातेला डोहाळे होत असतात ही गोष्ट सर्वांस महशूर आहे. पहिल्या बाजीरावांच्या गर्भसमयीं त्यांच्या मातेला असेच त्यांच्या गुणानुरूप डोहाळे झाले होते! डोहाळे कां होतात याचा अर्वाचीन शास्त्रवेत्त्यांनीं शोध लावल्याचें ऐकिवांत नाहीं. गर्भस्थितींत असतां मुलाविषयीं भविष्यकालीन ज्ञान मातेला होतें हा एक चमत्कार आहे! जर या चमत्कारांत खरेपणा असेल तर पूनर्जन्म आणि प्रारब्धकर्म यांचा चांगला उलगडा होतो. एकनाथात्मजांसारखे अर्वाचीन चावीक जर या गोष्टीचा उलगडा करितील तर लोकांवर त्यांचे मोठे उपकार होतील! स्त्रियांना डोहाळे होतात व ते जन्माला येणारें मूल अमुक प्रकारचें निपजणार असें दर्शवितात ही गोष्ट सत्य असेल तर मनुष्यप्राणी जन्मतःच प्रारब्धाचें गाठोडें बरोबर घेऊन

आलेला असतो हें सिद्ध आहे. प्रारब्ध मानलें कीं पुनर्जन्म मानण्याशिवाय गत्यंतरच नाहीं. प्रारब्धानुरूप तो जन्मांत आपला व्यवहार करणार ही गोष्ट जर सत्य आहे तर फलज्योतिषाला नाक मुरडण्याचें कारण नाहीं हें उघड आहे जी गोष्ट डोहाळ्यावरून समजते तीच जन्मकालीन ग्रहांवरून समजते कीं नाहीं याचा उलगडा झाला म्हणजे एखादें कर्म करीत असतां ग्रह कसा आडवा पडतो आणि जन्माच्या वेळीं कसा टपून बसलेला असतो हें सहज कळेल. तथापि याही गोष्टीला तपश्चर्या करावी लागते. ज्योतिषसार किंवा असलेंच एखादें पुस्तक वाचून हें ज्ञान होत नसतें. ज्यांनीं एकेक दोन दोन तपें ज्योतिषाचा अभ्यास केला आहे त्यांस सुद्धां हें ज्ञान पूर्णांशानें झालेलें नाहीं. पण होणारच नाहीं असें मात्र ज्याने ज्यानें म्हणून या शास्त्राचें यथाक्रम अध्ययन केलें आहे त्याच्यानें म्हणवणार नाहीं. मग तो एखादा झाड असो कीं एम्. ए. असो!

जन्मकालीन ग्रहांवरून केवळ प्रारब्धाचाच बोध होतो असें नाहीं तर क्रियमाणाचाही बोध होत असतो. पण प्रारब्ध कोणतें व क्रियमाण कोणतें याचा उलगडा मात्र व्हावा तसा होत नाहीं. मुलें होणें तीं जगणें अथवा मरणें किंवा गर्भपात होणें वगैरे कित्येक गोष्टी प्रारब्धाधीनच आहेत आपण बॅरिस्टर झालों किंवा एल् एम्. ॲन्ड एस्. झालों

म्हणून आपण लक्षावधि रुपये कमवूं अशी खात्री देणें मूर्खपणाचें आहे. किंवा सोम्यानें व्यापार करून कोट्यावधि रुपये मिळविले तसे गोम्या म्हणेल कीं मीही मिळवीन तर तेंही घडणें अशक्य आहे. तात्पर्य मनुष्याचें बहुतेक जीवित प्रारब्धाधीन आहे व ही गोष्ट जन्मकालचे ग्रह सुचवितात यांत तिलप्राय शंका नाहीं. असो,आतां आपण वरील कुंडलीचा ज्योतिःशास्त्राधारें विचार करून जन्मकालीन ग्रह प्रारब्धकर्म सुचवितात कीं नाहींत हें पाहूं.

या कुंडलींत मकर लग्न उदित असून त्या राशींत गुरु २०अं. ४४ क. वक्री आहे. गुरु हा ॥ वाग्धोरणी मंत्रराजतंत्र नैष्ठिक गजतुरंगयाननिगमबोधकर्मपुत्रसंपज्जीवनोपायकर्मयोग सिंहासनकारकोगुरुः ॥ इतक्या गोष्टींचा कारक आहे. हा २१ व्या अंशांत म्हणजे कन्यांशांत आहे. मकर राशीचा गुण मुद्राज्योतिषांत सांगितला आहे. हा राशि ईश्वरभक्ति घडवून आणणारा आहे. या राशींत गुरु असतां मनुष्य भक्तिमार्ग किंवा कर्ममार्ग स्वीकारणारा होतो. या राशींत चंद्र किंवा गुरु असतां मनुष्य कर्मठ होतो ही गोष्ट अनेक कुंडल्यांत दिसून आलेली आहे. स्नानसंध्या, भजनपूजन, सोंवळें, शुचिर्भूतपणा, धर्मविहितकर्में, तीर्थयात्रा, स्तोत्रपाठ वगैरे गोष्टींत विशेष मन ज्यांचें गुंतलेलें असेल अशी माणसें आपण निवडून काढिल्यास त्यांच्या कुंडलींत मकर रास लग्नीं असेल किंवा या राशींत चंद्र अथवा गुरु असेल. हा गुण धनु राशींत नाहीं. स्वामी महाराजांचें लग्न मकर व गुरूही मकर राशींत आहे त्यामुळें ते ईश्वरभक्त झाले. यांच्या लहानपणाचे खेळ म्हणजे बहुतेक देवपूजा करणें, उत्सव करणें असे असत. पांचव्या वर्षापासूनच आजोबाजवळ बसून शिक्षा, अष्टाध्यायी वगैरे उपग्रंथ पाठ करूं

लागले होते ! यांच्या बुद्धीचें सामर्थ्य इतकें होतें कीं, त्यांनीं एक वर्षांत संहिता, ब्राह्म हे दोनही ग्रंथ संपविले, आणि पुढील दशग्रंथ आपल्या बुद्धिसामर्थ्यानें स्वतःच तयार केले ! कोणा एका शास्त्री-बुवाजवळ काव्याचे सुमारें १५ श्लोक घटले. पण, लेवढ्यानेंच त्यांचा संस्कृत भाषेंत इतका प्रवेश झाला कीं, पाहिजे तो श्लोक लावतां येऊं लागला. वयाच्या ८ व्या वर्षापासून १२ व्या वर्षा-पर्यंत त्रिकालसंध्या, पूजा, गुरुचरित्र पाठ व गीतापाठ वगैरे नित्य-कर्मे करून इतर वेळीं ते संसारसंबंधी कामकाज पहात असत. पुढें १२ वर्षेपर्यंत विद्यार्थीवर्गाला वेद, शास्त्र, याज्ञिक हे विषय ते पढवूं लागले, म्हणून त्यांना शास्त्रीबुवा हें नांव प्राप्त झालें होतें. हा सर्व प्रभाव केवळ गुरूचाच आहे असें नाहीं, तर त्याला आणखी दोन योगांची मदत मिळाली आहे. तूळ हा सत्व-गुणाचा राशि दशमकेंद्रीं उदित असून या राशींत चंद्र नवमस्थ आहे. त्याचप्रमाणें पंचम स्थानीं हर्शल आहे. पंचमांत ज्यांच्या हर्शल असतो त्यांस आणखी कांहीं बुद्धियोग अनुकूल असतील तर तीं मनुष्यें आश्चर्यचकित विद्या संपादन करितात व त्यांच्या बुद्धीचा प्रभाव अत्यंत तीक्ष्ण असतो. स्वामीमहाराज विलक्षण बुद्धीचे होण्यास व योगी आणि ज्योतिषी होण्यास हर्शलच कारण आहे.

११ व्या वर्षी यांचे आजोबा वारले. या वेळीं शनि नवम म्हणजे पितृस्थानीं असून साडेसाती होती. नवम स्थानची साडेसाती असतां बहुधा बाप, आजा, आजी अगर पणजा अथवा पणजी यांचा मृत्यु होतो असा सामान्य नियम आहे. हें साडेसातीच्या पुस्तकावरून दिसून येईल. त्याचप्रमाणें नवम हें गुरुस्थान अस्-ल्यामुळें गुरुचाही मृत्यु होण्याचा संबंध असतो. स्वामीमहाराजांचे

आजोबाच होते !

बाविसाव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. या वेळीं गुरु हा सप्त-मेश जो चंद्र त्याच्या राशीस असून शनि कुंभेंत द्वितीय स्थानीं होता. शनि हा लग्न व कुटुंब या स्थानांचा अधिपति आहे. कुंभेंत हा ग्रह मनुष्याची उन्नति व भाग्योदय करितो. हा ग्रह या काळीं आपल्या स्वतःच्या नवमांत होता, म्हणून याच काळीं विवाह घडून आला. सप्तम स्थानीं शुक्र असतां विवाह फार उशी-रानें होत नाहीं. असो. याप्रमाणें त्यांचा दुसरा आश्रम शके १७९७ मध्यें घडला. पहिला शके १७८५ मध्यें घडला होता. अर्थात् याही वेळीं गुरु तूळ राशींतच शनीसह होता. म्हणजे या वेळीं गुरु आपल्या नवमांत व शनि आपल्या पंचमांत होता !

स्वामींचे वडील शके १७९९ मध्यें शनि सायन मीनेंत शु-क्राच्या नवमांत असतां हर्शल सिंह या पितृराशींत असतां वारले ! शुक्र हा दशमाचा अधिपति आहे, म्हणून याच्या नवमांतल्या शनीव-र पितृनिधन झालें.

लग्न झाल्यापासून स्वामी नरसिंहवाडीस श्रीदत्तदर्शनार्थ येऊं लागले. पुढें त्यांना दत्तदर्शन झालें आणि श्रीमत्परमहंस ब्रह्मण्य-स्वामी व श्री मौनी स्वामी यांचा समागम घडला ! पुढें ज्योतिष-शास्त्राचें अध्ययन केलें. ही विद्या त्यांना इतकी साधली होती कीं ते अचूक फलें सांगत असत !

नवम स्थानचा चंद्र बहुधा कांहीं तरी संस्था स्थापन करीत असतो. त्याचप्रमाणें यांनीं श्रीदत्ताचें मंदिर बांधलें. ज्योतिर्विद्येंत प्राविण्य मिळविल्यानंतर एक वर्षानीं त्यांनीं योगाभ्यास सुरू केला.

ही विद्याही त्यांनीं स्वतःच आपल्या बुद्धिसामर्थ्यानें व ईश्वरीप्रसादानें संपादन केली.

यानीं संस्कृतांत गुरुचरित्राचा एक ग्रंथ केला आहे. पुढें ते नरसोबाच्या वाडीस राहण्यास आले. तेथें त्यांचें कुटुंब प्रसृत झालें. पुत्र झाला होता पण तो तत्काल मृत झाला! पंचमस्थानीं हर्शल व राहू असतां संतति जगणें अशक्यच होय.

शके १८१२ वैशाख कृ० १४ या दिवशीं त्यांच्या पत्नी अन्नपूर्णाबाई कॉलऱ्याच्या उपद्रवानें पंचत्व पावल्या! यावेळीं जायास्वामी जो चंद्र त्याच्या राशीस हर्शल असून कुटुंबस्वामी जो शनि त्याच्या राशीस (मिथुनेंत) राहु होता! साडेसाती नुकतीच लागली असून शनि वक्रगतीनें कुटुंबस्थानाच्या सप्तमांत आला होता. याप्रमाणें सर्व बाजूंनीं पापग्रह अनिष्ट आले होते त्यामुळें स्त्रीचें निधन, नंतर तेराव्या दिवशींच ते सन्यस्त होऊन "श्रीवासुदेवानंदसरस्वती" हें नामाभिधान पावले. हा दत्ताचा चवथा अवतार असें मानतात!

नवमस्थानीं चंद्र असून त्याच्या पंचमांत गुरु व नवमांत शनि असे दोन मोठाले गोल आहेत, म्हणून हे महाराज असामान्य झाले. यांचें चरित्र वाचल्यानें त्यांच्या योग्यतेची पूर्ण खात्री पटेल.

पत्रव्यवहार.

१

वि. वि.—खालील मजकूर येत्या अंकांत प्रसिद्धीसाठीं पाठविला आहे.

सायन कुंडली.



या गृहस्थाच्या ४ स्त्रिया झाल्या. पैकीं प्रथम दोन वारल्या. बाकी २ हयात आहेत. त्यापि त्याहीं नित्य दुखणाईत असतात. स्त्रियांचे मृत्युकाळीं ग्रह येणेप्रमाणें होते—

प्रथम स्त्रिचा मृत्यु ता. १०।१२।९९ या दिवशीं झाला. त्या दिवशीं ग्रह येणेप्रमाणें होते.—

रवि-धनु १७ मंगळ-धनु २८ बुध-धनु १४ व. राहू-धनु २१ हर्शल-धनु ११ शनि-धनु २५ गुरु-वृश्चिक २५ शुक्र-मकर ९

वरील कुंडलींत जाया (सप्तम) स्थानीं धनु राशि आहे. या राशींत

मृत्यूचाळी षड्ग्रही होती! त्यांत पांच पाप ग्रह असून एक लग्नस्वामी बुध स्वसंबुध राशींत दुर्बळ होता. जायास्वामी गुरु हा षष्ठस्थानी वृश्चिक राशींत मंगळाच्या घरीं व जन्मस्थ मंगळाच्या समोर होता व त्याच्या कुटुंबस्थानीं वरील पांच ग्रह होते. हे सर्व योग स्त्रीचे मृत्यूस कारणीभूत झालेले आहेत हें कोणीही कबूल करील.

दुसऱ्या स्त्रीचा मृत्यु ता. २४।१।०१ या दिवशीं झाला. त्या दिवशीं ग्रह येणेप्रमाणें होते.-

राहु-धनु १ हर्शल-धनु १२ शनि-मकर १० गुरु-मकर १० शुक्र-मकर ११ मंगळ-कन्या ९ व बुध-कुंभ ९ व रवि कुंभ ३.

राहू व हर्शल हे धनु राशींतच आहेत. राहू जन्मस्थ जायास्वामी जो गुरु त्याला येऊन मिळाला आहे. अष्टम स्थानीं शनि व जायास्वामी गुरु हे युतींत आहेत व शुक्रही त्यांच्याच सन्निध आहे. लग्नस्वामी जो बुध त्याच्या पूर्ण अष्टमांत मंगळ आहे. हे योग दुसऱ्या स्त्रीला मारक झाले. ही स्त्री पटकीनें मृत्यु पावली!

या प्रमाणें सायन पद्धतीनें अनुभव चोख येतो. निरयन पद्धतीनें अनुभव येत नाही. इतर बाबतींतही मी सायन व निरयन पद्धतींची तुलना करून पाहिली आहे. परंतु सायनानें जसा वस्तुस्थितीशीं बिनचूक मेळ बसतो तसा निरयनानें बसत नाही. माझे एक मित्र मुनसफ आहेत, ते पूर्वी निरयनवादी होते परंतु आतां पूर्ण सायनवादी झाले आहेत! कळावें लोभ असावा हे विनंति.

आपला

मुन्नालाल दुबे, नागपूर.

☞ सायनपद्धतीसंबंधानें आमच्या वरील वर्णनीदारांनीं जो अनुभव कळविला आहे त्यावरून पुष्कळ फायदा होण्यासारखा आहे. अद्यापि पुष्कळ लोक निरयनला चिकटून आहेत. पण ते जर राशिपरत्वें सूक्ष्म निरीक्षण करितील तर त्यांचीही खात्री झाल्याशिवाय राहणार नाहीं. राशींचे जे स्वाभाविक धर्म आमच्या प्राचीन ग्रंथकारांनी दिले आहेत ते सायनांत तंतोतंत अनुभवास येतात. पण, पुष्कळ लोक ग्रहांचा फक्त स्थानपरत्वेंच विचार करितात त्यामुळें ही सूक्ष्मता त्यांच्या ध्यानांत येत नाहीं. ग्रहांचा विचार राशींना धरून केला पाहिजे. राशि सायन आहेत.

हें कुंडलीविज्ञानांत आम्ही अनेक वेळां सिद्ध केलेलें आहे. फलज्योतिषांत जो राशींचा विचार केलेला आहे, तो ताऱ्यांच्या आकृतीला धरून केलेला नाही. हें बृहज्जातकांतील द्रेष्काणवर्णनावरून स्पष्ट होतें. सर्व ज्योतिषी राशि विभागात्मक मानितात. राशि जर तारात्मक आहेत असें म्हणावयाचें तर फलांचा विचार करितांना आणि पंचांगांतही विभागात्मक राशि कां घेतात? 'क्रांतिवृत्ताचा ३० अंशाचा जो एक भाग त्याला राशि म्हणतात' हें लक्षण तारात्मक राशींचें आहे काय? सारांश, राशि सायन असून त्यांना अनुसरून फळांचा अनुभव घेत गेलें पाहिजे, म्हणजे फलज्योतिषाची सत्यता सहज दृष्टीस पडते.

वरील कुंडलींत शुक्र स्वगृही असून त्याचा मंगळाशीं योग आहे. त्यामुळें एक स्त्री हयात असतां दुसरा विवाह झालेला आहे. शुक्रमंगळ योग अनेक स्त्रियांचा भोग दर्शविणारा आहे. व्यभिचारी मनुष्यालाही हा योग असतो. अशा योगावर जन्मलेल्या मनुष्याची गणना कामी जनांत होते. त्याची विषयवासना सदा अतृप्त असते. "भौमांशकगते शुक्रे भौमक्षेत्रे गतेऽथवा। भौमयुक्तेक्षदृष्टे च भगचुंबनमाप्नुयात्॥" असें या शुक्राचें ग्रंथकार वर्णन करितात. कित्येक लोक बहुधा द्वीसंगेच (स्त्रीलालसेनेच) अनेक विवाह करितात, कित्येक समाजांतच गुप्त रीतीनें व्यभिचार करितात व कित्येक लग्नाची स्त्री असूनही वेश्यांचा उपभोग घेतात. लग्नाच्या स्त्रिया घुशणीनें किंवा क्षयानें किंवा आतेपानें पीडित असतात.

"कलत्रेशे बहुगुणे तुंगवक्रादि हेतुभिः। बहुभार्यांतरं विद्याच्छत्रुणीचास्तगेषुच॥" या वचनाचा या ठिकाणीं चांगला अनुभव येतो. कारण, जायास्वामी गुरु असून तो स्वगृही असल्यामुळें व वक्री असल्यामुळें बहुभार्यायोग घडला. हा ग्रह धनुराशीच्या दुसऱ्या अंशांत असल्यामुळें तो नीचांशांत आहे. हा योग विवाहित स्त्रीच्या सुखास अनिष्ट झाला आहे. त्याचप्रमाणें कुटुंबेश चंद्र हा मिथुन राशीच्या २२ व्या अंशांत असल्यामुळें रिष्यशीं आहे म्हणून कुटुंबसंबंधानें अनिष्ट फल उत्पन्न करणारा आहे, त्यामुळें ज्या स्त्रिया हयात आहेत त्यांच्या पासूनही सुख नाहीं हें उघड आहे.

कोणतेही स्थान किंवा कोणताही ग्रह अनेक पाप ग्रहांनीं दूषित होईल किंवा अन्य अनेक अनिष्ट योग घडतील तर त्या स्थानसंबंधी प्राप्त

होणाऱ्या सुखाचा निश्चयानें नाश होईल, हा या शास्त्राचा सामान्य सिद्धांत आहे. याचा अनुभव या कुंडलींत स्पष्ट आलेला आहे.

फलज्योतिष हें शास्त्र घेण्याला सोपें आहे, पण, भविष्याला कठीण आहे. वरील कुंडलीवरून शास्त्राशीं मेळ बिनचूक बसला, पण हेंच भविष्य पूर्वी करण्यास कठीण गेलें असतें. तें सर्वांनाच करितां आलें नसतें. या गृहस्थाच्या चारहि स्त्रियांच्या कुंडल्या पाहण्यास मिळाल्या असत्या तर बरें झालें असतें.

—संपादक कुंडलीविज्ञान—



नामदार बादशहा सातवे एड्वर्ड

यांची

आकस्मिक दुःखकारक निधनवार्ता !



आपले प्रिय बादशहा सातवे एड्वर्ड यांच्या स्वर्गस्थ आत्म्यास शांति मिळो अशी सृष्टिनियंत्याजवळ प्रार्थना करितों ! तसेंच त्यांच्या पत्नी व मुलें वगैरे नातेवाइकांस झालेल्या असह्य दुःखाचे आम्हीं राजनिष्ठ प्रजाजन वांटेकरी आहों असें अत्यंत नम्रतेनें कळवितों ! सृष्टीच्या राहटीकडे लक्ष देऊन त्यांनीं आपल्या दुःखाचें सांत्वन करणें भाग आहे, याबद्दल फार वाईट वाटत आहे ! !

यांची कुंडली

जन्म.—ता. ९ नवंबर सन १८४१ स्थानिक वेळ सकाळचे १० वाजून ४८ मि. राज्यारोहण सन १९०१ जानेवारी ता. २२



मृत्यु.—ता. ६ मे १९१० रात्रीं ११।४५ मुं. टा. ता.६।७ रात्रीं ४।३७.

वरील कुंडलीवरून दिसून येईल कीं, त्यांस शनि हा आठवा होता व हर्शल हा तनुस्थानीं शनि मंगळाच्या राशीस होता. चंद्र आठवाच असून तो शनीशीं युति करण्यास जात होता. मृत्युकाळीं मकर लग्न उदित असून हर्शलचा उदय होणार होता ! घूमकेतूचें दर्शन हें राजाला अरिष्टसूचक आहे हें म्हणणें सत्य दिसतें. रवि हा मृत्युकाळीं आपल्या सप्तमांत म्हणजे अस्तकेंद्रांत होता, व तनुस्थानचा मंगळही तसाच होता ! निधनवार्ता अकस्मात् आली हा अष्टमावर दृष्टि करणाऱ्या व हल्लीं तनुस्थानीं आलेल्या हर्शलचा परिणाम असावा.

राजजन्म

एक राजा ज्या कालीं मयत होतो, त्याच कालीं राष्ट्राच्या दृष्टीनें दुसऱ्या राजाचा जन्म समजला पाहिजे. व्यक्तीच्या दृष्टीनें त्याचा जन्म निराळा असेल, पण राष्ट्राच्या दृष्टीनें वरील जन्मकाल नव्या राजाचा मानिला पाहिजे हें उघड आहे. कारण, अराजक राष्ट्र कधींच राहूं शकत नाहीं. या कल्पनेनें खालीं कुंडल्या मांडिल्या आहेत.

महाराणी व्हिक्टोरिया यांचा मृत्यु.

ता. २२ जानेवारी १९०१ मंगळवार संध्या. ६–३०



महाराणी व्हिक्टोरिया यांचा जो मृत्युकाल तोच एड्वर्ड ७ वे यांचा राज्यसंबंधी जन्मकाल आहे. या राजपुरुषावर मंगळवाराचा परिणाम विशेष घडत असे असें मागें एका अंकांत लिहिलें होतें. हा अनुभव येथेंही आला आहे. कारण या जन्मदिवशीं मंगळवा-

रच होता. यांचा मृत्यु या कालापासून ९ वर्षांनीं झाला! यांनीं राज्य पदाचा उपभोग फार कमी दिवस घेतला, हें वरील कुंडलीवरून दिसून येण्यासारखें आहे.

ना. सातवे एडवर्ड यांचा मृत्यु.

ता. ९ मे सन १९१० रात्रीं ११।४५



ना. सातवे एडवर्ड यांचा जो मृत्युकाल तोच हल्लींचे राजेसाहेब यांचा राज्यसंबंधी जन्मकाल होतो. या वेळची कुंडली वरील प्रमाणें होते. दशमाधिपति मंगळ हा सातव्या स्थानाच्या जवळ आपल्या नीचांत आहे व लग्नस्वामी शनि हाही मेष राशींत आपल्या नीचांतच आहे. याप्रमाणें लग्नदशमांचे अधिपति आपापल्या नीचांत आहेत. लग्नेश व सप्तमेश या दोन ग्रहांची युति मंगळाच्या दशमांत आहे. कुंडलींत बुध पंचम स्थानीं स्वगृहीं असल्यामुळें अत्यंत बलवान् आहे. लग्नांत हर्शल आहे, चतुर्थ स्थानीं रवि आहे व सप्तम स्थानीं नेप्च्यून आहे.

आतां, ना. पांचवे जार्ज यांची जन्मकुंडली मांडूं.

ना. पांचवे जार्ज यांची जन्मकुंडली.

ता. ३ जून सन १८६९ रात्रीं ११८



या कुंडलींत मेष लग्न २ अं. ३० क. उदित आहे व लग्नीं या राशींत नेप्च्यून १० अं. ९ क. आहे. आणि वृषभ राशींत बुध १८ अं. ३३ क. व शुक्र ९ अं. ३८ क. आहे धनस्थानीं मिथुन राशींत रवि १२ अं. २६ क. असून तिसऱ्या स्थानांत हर्शल २८ अं ३७ क. आहे. पंचम स्थानीं सिंह राशींत मंगळ ५ अं.३५क. आहे. सातव्या भावाच्या आरंभाजवळ तूळ राशींत चंद्र १ अं.३क. असून सातव्या भागांत शनि आणि राहू हे दोन पापग्रह आहेत. भाग्य भावारंभीं धनु राशींत गुरु २५ अं. ४० क वक्री आहे. याप्रमाणें शनि उच्च, गुरु आणि शुक्र हे स्वगृहीं आहेत. लग्नस्वामी मंगळ सिंह राशींत त्रिकोणांत आहे.

दशमाधिपति शनि आपल्या नीचांत व हर्शल त्याच्या दशमांत गेल्याकर पितृनिधन झालें आहे. गुजराथी पंचांगांत यांची हिंदुस्थानांतील निरयन कुंडली खालील प्रमाणें मांडलेली आहे.

शके १७८७ज्ये शु.९सू.इ.घ.२५.४२ यांच्या पत्नीची नि कुं. खालील प्र.आहे
ता.२६मे रवि वैशा.व.७सू.इ.घ.५८.५





यांचा विवाह पूर्वीचे प्रिन्स ऑफ वेल्स ' प्रिन्स व्हिक्टर ' यांच्याशीं व्हाव-याचा होता.

गुजराथी पंचांगांत यांच्या राज्यप्राप्तीचा समय दिला होता तो अगदीं बरोबर उतरला, ह्मणून त्यांतीलच पुढील भविष्याचा उतारा या खालीं देतों त्याचा ज्योतिषी वाचकांनीं आपल्या मनाशीं विचार करावा.

" नामदार प्रिन्स यांचा अंमल चौखंड पृथ्वीभर शांत राहील परंतु जर्मनीच्या बरोबर वारंवार खटपट होईल. ग्रेट ब्रिटनची मेष रास असून या राशींत शुभ ग्रह असल्या कारणानें जर्मन प्रजेनें किती जरी प्रयत्न केले तरी सरतेशेवटीं ग्रेट ब्रिटनच्या बाजूलाच जय मिळेल. जर्मनीच्या बादशहाची कुंडली ग्रेट ब्रिटनबरोबर वैर दाखवीत आहे, तरी ना. प्रिन्स यांस त्यांच्या पासून कांहींएक नुकसान पोहोंचणार नाहीं. जर्मनीच्या बादशहाच्या ४७ व्या वर्षी राहूच्या महादशेंत राहूची अंतर्दशा येते, त्या दशेंत जर्मनीला ग्रेटब्रिटन एक मोठा फटका मारील असा योग आहे. केसरच्या कुंडलींत राहू मारक स्थानांत आहे. केसरच्या ५४ व्या वर्षी राहूच्या महादशेंत मंगळ येईल व ना. प्रिन्स यांच्या ४८ व्या वर्षी गुरुमध्यें मंगळ येईल त्यावेळीं केसर आपल्या प्रजेच्या विरुद्ध ग्रेटब्रिटनशीं खटपट करील, परंतु त्याच्या आरमाराचा पुरापुर नाश होईल व त्याच्या देशाची कीर्ति जाईल. पुढें राहू कुंभ राशीचा झाल्यावर शांतता होईल "

एकंदरींत आपल्या नूतन बादशहांना फार उत्तम योग झालेले आहेत, हे त्यांच्या सायन कुंडलीवरूनही दिसून येईल. कारण, युद्धदर्शक ग्रह मंगळ सिंह राशींत अत्यंत बलवान् आहे. ह्मणून ईश्वरी संकेतानें जर संकेतानें जर जर्मनीशीं युद्ध जुंपेल तर त्यात आमचे बादशहा विजयी होतील अशी पूर्ण खात्री वाटत.

---

(२)

एंका थोर पुरुषाचे चरित्राचा ज्योतिष-दृष्ट्या विचार.

रा, रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांसः —

सा. न. वि. वि. खालील चार ओळींस आपल्या सर्वमान्य मासिकांत स्थळ मिळेल अशी आशा आहे.

॥ जन्मकुंडली ॥



जन्मकाल शके १७१२ कार्तिक शु० ९ शततारका नक्षत्र.

निधनकाल शके १७९२ आषाढ शु० ११ सोमवार प्रातःकाळ.

वरील निरयन कुंडली १२० वर्षांपलीकडची असून ती कै० वे. शा. सं. रा. रामकृष्ण जगन्नाथशास्त्री आठल्ये यांची होय.

कै. रामकृष्णशास्त्री यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यांत देवळें येथें झाला. नंतर त्यांनीं जवळच असलेल्या शिपोशी नामक गांवीं आपलें कायमचें वास्तव्य केलें. हा गांव आठल्येकुळास वंशपरंपरेनें इनाम आहे. शास्त्रीबुवांचे वडील ते दीडवर्षांचे असतांनाच निवर्तले. (हा पितृवियोग दशमस्थानीं राहू अस-

ह्यामुळें घडला.) त्यामुळें त्यांचे आजोबा वेदमूर्ति रा. महादेव भट्टजी आबा यांनीं त्यांचा प्रतिपाळ केला. महादेवभट्टजी महा-तपस्वी, कर्मनिष्ठ, व दशग्रंथी विद्वान् ब्राह्मण असल्यामुळें शास्त्रीबुवांतही तेच गुण उतरले. अल्पवयांतच त्यांनीं वेद, याज्ञिक, इ. संपवून न्याय, व्याकरण, अलंकार, वगैरे शास्त्रांचें अध्ययन कोल्हापुरीं जाऊन सुरू केलें, ही गोष्ट त्यांचे आजो-बांस रुचली नाहीं. कारण ते कट्टे वैदिक होते. त्यांच्या मतें शास्त्राध्ययनांत लक्ष लागल्यास, वेदाध्ययनास फुरसत न मिळुन तें मलीन होईल. परंतु शास्त्रीबुवांनीं आपल्या बुद्धिमतेनें त्यांच्या निदर्शनास असें आणून दिलें कीं, हा समज आपल्याबाबतींत तरी निराधार आहे. एकेदिवशीं महादेवभट्टजी देवगृहांत पूजा करीत बसले असतां शास्त्रीबुवांनीं बाहेर बसून पंचिकेचीं कांहीं खंडें म्हणण्यास प्रारंभ केला. अथ पासुन इतिपर्यंत विनचूक झटलेलें पाहून महादेवभट्टजींनीं प्रश्न केला 'सगळे दशग्रंथ असेंच तयार आहेत कारे? शास्त्रीबुवांनीं 'होय' असें उत्तर केलें. 'तर मग इतर कोणत्याही शास्त्राचें अध्ययन करण्यास माझी हरकत नाहीं. अशी आजोबांची संमति मिळवून त्यांनीं अल्पावकाशांत वरील शास्त्रांत प्राविण्य संपादन केलें. (धारणाशक्ति इतकी तीव्र असण्यास कारण पंचमस्थानावर गुरूची पूर्णदृष्टि हें होय.)

विद्याभ्यासानंतर मोठ्या कुटुंबाच्या निर्वाहासाठीं शास्त्रीबुवा मुंबईस आले. त्यावेळीं तेथें इतकी स्वस्ताई होती होती कीं, रुपयाचें तूप सात शेर मिळत असून माणशीं दरमहा १॥।- रुपयापर्यंत खर्च येत असे. पुराण सांगून व इतर भिक्षुकी करून

द्रव्य संपादन करावें. आणखी शेषकाळ ईश्वरभजनांत व शास्त्रावलोकनांत घालवावा. असा त्यांचा क्रम चालू असतां रत्नागिरीचे अदालतींत दोन शास्त्र्यांच्या जागांपैकीं एक जागा रिकामी झाली. या शास्त्रांचीं कामें म्हणजे हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें मुकदम्यांचा निवाडा देणें हें होतें. त्या जागेसाठीं शास्त्रीबुवांनीं अर्ज केला. व परीक्षा देणेसाठीं खुष्कीच्या मार्गानें ते सुरतेस जाण्यास निघाले. त्यावेळीं अगगाडीची सोय नव्हती. सुरतेस जात असतां मार्गांत झाडाझाडीं विश्रांति घेत बसले असतां, सहजगत्या त्यांची व एका गृहस्थाची गांठ पडली. नमस्कारादि भाषण झाल्यावर त्यांचें नांव भवानीशंकर जोशी आहे. हें कळतांच शास्त्रीबुवांनीं त्यांना विचारलें कीं 'आपण केवळ नांवाचे जोशी कीं कांहीं पढलां आहां?' 'थोडेंबहुत शास्त्रही पाहिलें आहे.' असें जोशीबुवा बोलले. तेव्हां शास्त्रीबुवांनीं प्रश्न केला, 'मी कांहीं कार्याकरितां सुरतेस जात आहें, तें कधीं होईल.?' जोशीबुवांनीं क्षणभर विचार करून उत्तर दिलें 'आपलें कार्य स्त्रीवाचक आहे, आजपासून १३ दिवसांत होईल.'

शास्त्रीबुवा पुढें निघाले ते सुरतेस थोडे उशीरां म्हणजे परीक्षेसाठीं नेमलेल्या दिवसानंतर दोन दिवसांनीं पोंचले. परंतु विशेष मौजेची गोष्ट ही कीं, इतर सर्व शास्त्री पूर्वीच हजर असतां फक्त हेच तेरावे यावयाचे राहिले होते, व एवढ्या साठींच साहेबांनीं परीक्षा थांबविली होती. झालें परीक्षा सुरू झाली. त्यांत परीक्षकानें (साहेबानें) 'ब्राह्मणास दंड कोठपर्यंत असावा' असा प्रश्न प्रत्येकास केला. 'वर्णांत ब्राह्मण श्रेष्ठ त्याला दंडच करितां येत नाहीं' अशाप्रकारचीं निरानिराळीं इतरांनीं उत्तरें दिल्यावर

शास्त्रीबुवांची पाळी आली. त्यांनीं साहेबास विषय कोणता आहे हें कळण्याकरितां पुस्तकाचें एक पान नुसतें उलटून पाहण्याची परवानगी मागितली, व तें मौंजीप्रकरण आहे हें कळतांच 'ब्राह्मणास दंड (पालाशदंड) कानापर्यंत असावा' असें दत्तर दिलें. असो. याप्रमाणें आणखी इतर प्रश्नांचीं उत्तरें दिल्यावर परीक्षेस बसलेल्या १३ उमेदवारांपैकीं शास्त्रीबुवाच एकटे लायक ठरून त्यांना रत्नागिरीस शाळेच्या जागीं दरमहा शंभर रुपयांवर सेराव्या दिवशींच नेमण्यांत आलें. व जोशीबुवांचें भविष्य खरें ठरलें. त्यावेळीं शास्त्रीबुवा ३२ वर्षांचे होते. (हें फळ गुरु भाग्यस्थानीं असल्यामुळें मिळालें.)

कांहीं दिवस त्यांनीं तेथें काम केल्यावर दोन शास्त्र्यांपैकीं एकच ठेवण्याचा सरकारी ठराव झाला. त्याप्रमाणें हे दुसरे नवीन शास्त्री कमी करण्यांत आले.

आपलें कुटुंब मोठें म्हणून व पूर्वी सरकारी काम केल्याचें दाखवून दुसरी जागामिळण्याबद्दल त्यांनीं अर्ज केला. यावरून त्यांस दरमहा २५० रुपयांवर १९ वे वर्षी मुनसफ नेमण्यांत आलें. (हें शनीचें फळ होय.) त्यावेळीं मुनसफाचा अधिकार हल्लींच्या अधिकारापेक्षां फारच मोठा होता.

नोकरींतून मोकळे झाल्यावर या कुलदीपक पुरुषानें सुमारें २० वर्षें पेनशन रु. १०० भोगून वयाच्या ८० व्या वर्षी देह ठेविला. दक्षिणायन दुसरेच दिवशीं लागलें. आषाढी एकादशीचा निराहार करून साधनद्वादशी सोडिली व दुसऱ्या दिवशीं

म्हणजे १३ स [आषाढ शुद्ध] सकाळीं ते कैलासवासी झाले. हा पुण्ययोग होय.

शास्त्रीबुवांची कांति पिकलेल्या लिंबासारखी सतेज होती. त्यांचे अंगीं अखेरपर्यंत पांच कोशपर्यंत चालण्याचें सामर्थ्य होतें. [हें फळ गुरूची दृष्टि तनुस्थानावर पूर्ण असल्याचें होय. सप्तमेश चंद्र त्या स्थानापासून अष्टम आहे. आणि मरणाचा दिवसही सोमवार आहे.] (हा चमत्कृतिजनक योग होय.) मंगळ बारावा असल्यामुळें त्यांना ३ स्त्रिया झाल्या. या ३ विवाहसंबंधापासून त्यांना २ मुली व ४ पुत्र झाले. पैकीं २ पुत्र शास्त्रीबुवा हयात असतांनाच हें नश्वर जग सोडून गेले. [पुत्रस्थानापासून मंगळ आठवा पडल्यामुळें पुत्रशोक झाला.] शनि व मंगळामुळें हे आईबापांचे एकुलते एक होते. शास्त्रीबुवांचा स्वभाव शांत, सरळ असून करारी व निश्चयी होता. ते निरभिमानी होते. त्यांची राहाणी फारच साधी असून त्यांना व्यसन म्हणून कोणतेंच नव्हतें. (याचें कारण गुरूची तनुस्थानावर पूर्ण दृष्टि] शास्त्रीबुवांची ज्ञानलालसा इतकी तीव्र होती कीं, त्यांनीं आपल्या वृद्धवयांतही कोल्हापुरचे विद्वद्वर्य वे. शा. सं. रघुनाथशास्त्री पर्वते यांजकडे मीमांसा म्हणण्याकरितां जाण्याची तयारी केली होती. परंतु इतक्यांतच त्यांचा अंत झाला. आणि त्यांचा हेतु तडीस गेला नाहीं. कुटुंबाचें ५००० रु. ऋण फेडून व १० माणसांचें मोठें कुटुंब चालवून शास्त्रीबुवांनीं आपल्या कुळांतील मंडळीस ऊर्जितदशेस आणिलें. मुनसफ असतांनाहीं कोर्टाचा वेळ सोडून त्यांचा शेषकाळ भागवतादि ग्रंथ वाचण्यांत जाई. प्रातःस्नान, स्मार्ताग्निहोम, वेदघोष, रुद्राभिषेक, सप्ताह

बगैरे धर्मकृत्यांत नेहमीं त्यांचा कालक्षेप होत असे, धर्मशाळा, रस्ते, देवालयें बांधणें, व गरिबांस साह्य करणें, इत्यादि लोकोपयोगी व मंगल कार्यें करून शास्त्रीबुवांनीं उत्तम कीर्ति संपादन केली. (हें सर्व कर्मस्थानच्या गुरूचें फल आहे.)

हल्लीं त्यांचे एक चिरंजीव रा. त्रिविक्रम रामकृष्ण आठल्ये हे सरकारी नोकरी वगैरे करून आतां मध्यप्रांतांत स्वतंत्रपणें सुखवस्तु राहिलेले आहेत. [हे ब्रह्मदेशांत असतांना यांचे लेख कांहीं वर्षांपूर्वी केसरींत प्रसिद्ध होत असत.] व दुसरे वे. शा. सं. रा. श्रीकृष्णशास्त्री आठल्ये हे वैय्याकरणी असून उत्तम गवय्येही आहेत.

कै० वासुदेव हरी आठल्ये, रत्नागिरीचे प्रसिद्ध वकील, व त्यांचे बंधु जगन्मित्र छापखान्याचे मालक रा. जनार्दन हरी आठल्ये हे शास्त्रीबुवांचे चुलत बंधु होत. हे उभय बंधू भरभराटीस येण्याचें यश शास्त्रीबुवांकडे आहे. तसेंच शास्त्रीबुवांचे ज्येष्ठ चिरंजीव कै० रा. वैजनाथ रामकृष्ण आठल्ये, क्लार्क ऑफ् दि कोर्ट रत्नागिरी, रावबहादुर यशवंत वासुदेव ऊर्फ बापूसाहेब आठल्ये, नायबदिवाण, बडोदें, व रावसाहेब, मिरजमळ्याचे कारभारी, ही पुढील पिढीची मंडळीही नांवालौकिकास येण्यास शास्त्रीबुवाच बहुतांशीं कारण झाले, म्हणण्यास हरकत नाहीं.

वरील चरित्रलेखकाचे निरनिराळे उद्देश आहेत.

सायनमतानें व निरयनमतानें एकाच कुंडलीचा विचार केला असतां फलितदृष्ट्या दोहोंत कितपतसा मेळ जमतो हें पहाणें.

फलज्योतिष हें अनुभवशास्त्र असल्यामुळें निरनिराळ्या पुरुषांच्या चरित्राचें सूक्ष्मावलोकनकरून त्यांच्या कुंडलीवरून तीं तीं फलें तशीं कां घडावींत हें ठरविणें व कांहीं नवीन सिद्धांत काढण्याचा प्रयत्न करणें (अशाप्रकारची सूचना आपणच केली आहे व त्यामुळें ह्या लेखनाची स्फूर्ती मला झाली.)

एकनाथात्मजासारख्या महापुरुषांच्या आक्षेपाचें व शंकांचेंही आणखी थोडेंसें प्रत्यक्ष प्रमाणानें दूरी करण करणें. (आपण दिलेलें उत्तर ' शुनःकपाले लगुडप्रहारः ' पैकीं आहेच यांत शंका नाहीं)

तत्कालीन परिस्थितीचें अल्प दिग्दर्शन करणें. शिवाय थोर पुरुषांच्या चारित्रवाचनापासून समाजावर किती इष्ट आणि हितकर परिणाम होतो. हें मी सांगणें नलगे. कळावें लोभ असावा हे विनंति.

आपला
एक वर्गणीदार

निवडक वर्तमानसार.

स्वामी शंखपूर तार्तार्य मद्रासचे प्रख्यात केरळ ज्योतिषी हे तूर्त मुंबईस आले आहेत. हे केरळ ज्योतिषांत प्रवीण असून भूत भविष्य वर्तमान सांगणें, कुंडलीची फोड करून ग्रहांचीं सर्व फलें सांगणें, मुहूर्त सांगणें नष्ट वस्तु मिळेल किंवा नाहीं, हें सांगणें वगैरे सर्व ज्योतिषांतील विषयांत त्यांचा हात खंडा आहे. कांहीं दिवसांपूर्वी ट्रिएस्टी नांवाची विलायतची आगबोट नाहींशी झाली होती, त्यांतील एका उतारूच्या आतांनां यांनीं ती बोट नक्की आमक्या दिवशीं व अमक्या वेळीं त्याचें आप्त उतारू घरीं येतील असें नक्की सांगितलें होतें. अशा तऱ्हेचे ठोकताळे पुष्कळांना मिळाले आहेत. कांहीं शिष्यमंडळीच्या आग्रहावरून त्यांनीं दिपवाळीपर्यंत मुंबईस राहण्याचें कबूल केलें आहे. भेटण्याची वेळ शनिवार शिवाय सकाळीं ८ ते १० व संध्याकाळीं ४ ते ६ अशी असून, त्यांचा राहण्याचा पत्ता— मुगभाटांत जीवनजी महाराजाच्या चाळी समोर केरळ ज्योति-विलास नांवाची पाटी आहे. जिज्ञासूंनीं आपली खात्री करावी.

[सयाजीविजय वरून]

थोरपणा.

—:o:—

नवम स्थानापासून धनस्थानापर्यंतचा जो कुंडलीचा भाग त्यास धनभाग म्हणावयाचें असें मागील अंकांत सांगितलें आहे. या धन भागांत ग्रहमालेंतले मोठाले गोल जन्मकाळीं असतील तर तो मनुष्य समाजांत, देशांत अगर सर्व पृथ्वींत प्रसिद्ध असेल. हा अनुभव कुंडल्या पाहणाऱ्यांस असेलच. रवि, शनि, गुरु, हर्शल व नेपच्यून हे फार मोठाले गोल आहेत. भूमीचें आकारमान एक मानिल्यास ग्रहांचीं आकारमानें खालीं लिहिल्या प्रमाणें आहेत.

पृथ्वी—१	बुध—·०५
रवि—१२८१२९४	शुक्र—·९
गुरु—१२८१	मंगळ—०१५
शनि—७०१	चंद्र—·०२
नेपच्यून—८३	
हर्शल—६४	

वरील आकारमानें सुमारचीं आहेत, पण तेवढ्यावरून कोणता ग्रह आकारमानानें कोणापेक्षां मोठा आहे हें समजून येईल.

सर्व ग्रहांत रवीचें आकारमान फारच अधिक आहे, ह्मणून हा ग्रह धनभागांत अवश्यमेव पाहिजे. विशेषें करून लग्नांत अगर दशमांत किंवा दशमकेंद्रापासून लग्नकेंद्रापर्यंत कोठें तरी पाहिजे. लग्नापेक्षां दशमांत त्याची योग्यता अधिक आहे.

रवीच्या खालोखाल मोठा ग्रह गुरु आहे. हा धनभागांत असल्याशिवाय मनुष्याला मोठेपणा प्राप्त होणें फार कठीण आहे. नवमांत व दशमांत या ग्रहाचें विशेष माहात्म्य आहे. लग्न, लाभ, धन व व्यय या स्थानांत एकापेक्षां एक कमी योग्यतेचा आहे.

गुरूच्या खालोखाल शनि आहे. या ग्रहाचें भाग्यस्थानीं माहात्म्य अधिक आहे. लग्न, नवम, दशम, धन व व्यय या स्थानांत तो उत्तरोत्तर कमी योग्यतेचा आहे.

शनीपेक्षां नेपच्यूनचें आकारमान कमी आहे. हा ग्रह धनभागांत कोठें तरी पाहिजे. या ग्रहाचा फलानुभव विशेष नाहीं. तरी थोरपणा पाहण्याच्या कामीं त्याचा चांगला उपयोग होईल.

हर्शल हा ग्रह वरील सर्व ग्रहांपेक्षां आकारमानानें कमी आहे तरी योग्यतेनें विलक्षण आहे. हा ग्रह धनभागात जरूर पाहिजे. निरनिराळ्या स्थानांत तो निरनिराळे पण आश्चर्ययुक्त धर्म उत्पन्न करितो. दशम हें राज्यभुवन आहे. ह्मणून या स्थानांत तो असेल तर मनुष्य कोणत्याही स्थितींत जन्म घेवो, तो मोठा कारस्थानी पुरुष झाल्याशिवाय राहणार नाहीं.

ही पंचग्रही धनभागांत असेल तर तो मनुष्य फार मोठ्या योग्यतेला गेल्याशिवाय राहणार नाहीं. दारिद्र्यभागांत असेल तर थोरपणा प्राप्त होण्याला अवधि लागेल. ज्याला धनभागांत पंचग्रहीचा योग होईल तो मनुष्य सर्व जगांत प्रसिद्ध असेल व त्याला राजा सारखा मान असेल किंवा राजा असेल.

ग्रहांनी राशिबल, स्थानबल, दृष्टिबल व योगबल असल्याशिवाय व हे सर्व योग धनभागांत झाल्याशिवाय महत्व प्राप्त होणें शक्य नाहीं.

कुंडलींत कोठेंही शनि मंगळ, शनि रवि, शनि हर्शल, हर्शल रवि किंवा हर्शल मंगळ किंवा हर्शल शनि यांचा योग, दृष्टि संबंध किंवा केंद्र संबंध असेल तर इतर सर्व चांगले योग फुकट जातात.

धनभागात हे ग्रह धन किंवा व्यय स्थानांत असतील व ते युति अगर दृष्टिसंबंध करितील तर दारिद्र्ययोग जाणावा.

मेष, वृषभ, मिथुन, कर्क, सिंह व कन्या यांस मेषादि षट्क व बूळ, वृश्चिक, धनु, मकर, कुंभ व मीन यांस तुलादि षट्क असें ह्मणतात.

ज्या वेळीं मेषादि षट्कांत सर्व मोठाले गोल असून ते धनभागाकडे असतील त्यावेळीं जन्मणारे पुरुष हिंदुस्थानात मोठ्या योग्यतेला चढतील व तुलादि षट्कांत तसे असतील तेव्हां इंग्लंड वगैरे उत्तरेकडील देशांत प्रसिद्ध होतील

सर्व ग्रह मेषादि षट्कांत असण्याचा काल तूर्त नाहीं. शनि व नेपच्यून हे मात्र मेषादि षट्कांत आहेत. बाकीचे ग्रह तुलादि षट्कांत आहेत, ह्मणून मोठ्या योग्यतेचीं माणसें जन्मण्याचा हल्लींच्या काळांत योग नाहीं असें वाटतें.

नवम, दशम, एकादश व लग्न हीं धनभागाकडील ठिकाणें व तृतीय, चतुर्थ, पंचम हीं दारिद्र्यभागाकडील ठिकाणें. यांपैकीं कोणत्याही दोन ठिकाणीं किंवा एकाच ठिकाणीं दोन मोठाले गोल असल्याशिवाय मनुष्य मोठ्या योग्यतेचा झाला असें दृष्टीस पडणें शक्य नाहीं.

उच्च व स्वराशीचे ग्रह मनुष्यास महत्पद देतात हें सामान्य तत्व आहे. परंतु कित्येक कुंडल्यांत एकही उच्च ग्रह नसतां मनुष्य मोठ्या योग्यतेला गेलेला आढळेल. याचें कारण, धनभागाकडे अधिक ग्रह, मोठाले गोल, एकाच अर्धांत किंवा ग्रहांचे योग हें मुख्य आहे.

मिथुन, कन्या, धनु व मीन हीं लग्नें विशेष प्रकारचीं आहेत. कारण, यांपैकीं कोणतेंही एक लग्न असतां लग्नदशम, लग्नचतुर्थ, सप्तमदशम किंवा सप्तमचतुर्थ यांचे अधिपति एकच असतात. एक बुध तर दुसरा गुरु, ह्मणून अशा प्रकारची कुंडली चांगली समजावी. अशा कुंडलींत लग्नांत अगर दशमांत बुधशुक्रांचा योग होईल किंवा एक दशमांत व दुसरा लग्नांत असा योग होईल तर त्या एकाच योगानें मनुष्य मोठ्या योग्यतेला जाऊन पोहोंचेल.

एखाद्या कुंडलींत सर्व ग्रह जर एकमेकांच्या केंद्रीं अगर त्रिकोणांत असतील तर तो योग फारच उत्तम. मग ते ग्रह उच्च किंवा स्वराशीचे असोत वा नसोत. फार काय सांगावें, ते शत्रुक्षेत्रीं असले तरी देखील चालतील.

अशा प्रकारें थोर माणसांच्या कुंडल्यांची निवड करावी असें वाटतें. आपणासमोर नेहमीं दरिद्री माणसांच्या कुंडल्या येतात, त्यामुळें थोर माणसांच्या कुंडल्यांचें महत्त्व फारसें समजण्यांत येत नाहीं. राजे, महाराजे, संस्थानिक, जाहागीरदार, पेटीटसारखे मोठे कारखानदार, लक्षाधीश (ह्मणजे ज्यांच्या जवळ एकच लक्षाची संपत्ति आहे ते नव्हत.) कोट्यधीश, राज्यकारभारांतले मोठे मुत्सद्दी, व्हाईसराय, गव्हर्नर जनरल अशा साऱ्यांच्या कुंडल्या दृष्टीस पडतील तर त्यांत कसे विलक्षण योग असतात हें नजरेस येईल. नाहींतर " उडदामाजी काळें गोरें, काय निवडावें निवडणारें "

कुंडलीविज्ञान

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥

' भवभूति : ,

पुस्तक ७वें.] आषाढ कृ० ८, गुरुवार [अंक १६ वा

गर्भश्रीमंत व गर्भदरिद्री.

कुंडलीवरून अमुक मनुष्यानें अमुक प्रकारच्या सांपत्तिक स्थितींत जन्म घेतलेला आहे, हा प्रश्न सोडविणें बरेंच अवघड आहे. जन्मदरिद्री जर श्रीमंत झाला असेल तर त्याची ज्या प्रकारची ग्रहस्थिति असेल त्याच प्रकारची गर्भश्रीमंताला असणार नाहीं. गर्भश्रीमंताची कुंडली एखाद्या सामान्य मनुष्याप्रमाणेंही असूं शकेल. कारण ती स्थिति त्यानें स्वपराक्रमानें मिळविलेली नाहीं. केव्हां केव्हां तर ती एखाद्या भिकाऱ्या सारखीही असूं शकेल. कारण, त्याच्याच हातून ती सर्व संपत्ति जावयाची आहे. अशा मनुष्याचे ग्रह जन्मकालीं दारिद्र्यच दर्शवितील. उलट पक्षीं जो दरिद्री मनुष्य पुढें श्रीमंत होणार असेल, त्याचें कुंडली एकाद्या जाहगीरदाराप्रमाणेंही दिसेल जो जन्मभर दारिद्र्य भोगणारा असेल, त्याची कुंडली मात्र दारिद्र्यच दर्शवील. जो गर्भश्रीमंत पुढें आपली श्रीमंत होणार असेल त्याची

कुंडली आणि जो गरीब पुढें मोठा श्रीमंत होणार असेल, त्याची कुंडली या दोन्ही सारख्याच योग्यतेच्या दिसतील. सारांश हा प्रश्न ज्योतिःशास्त्रांतल्या इतर 'पुरुष आहे कीं स्त्री आहे, पशु आहे कीं मनुष्य आहे, ब्राह्मण आहे कीं सिद्धी आहे' इ० प्रश्नांच्या मालिकेंतलाच आहे, अशी आमची समजूत आहे.

धन स्थानीं बरेच ग्रह असतील तर गर्भश्रीमंत असेल, हें एक मत आहे, परंतु तो पुढें श्रीमंत होणारा आहे असें कां म्हणूं नये या प्रश्नास उत्तर नाहीं. म्हणून तें मत खरें नाहीं, असें सिद्ध होतें. धन स्थान हें वडिलार्जित इष्टेटीचें स्थान आहे. या स्थानांत शुभ ग्रहांचा योग, शुभ ग्रहांची दृष्ट, व त्या स्थानचा स्वामी बलवान् शुभ ग्रहानें युक्त व दृष्ट असा असतां तो मनुष्य गर्भ श्रीमंत आहे, असें सर्व ज्योतिष्यांचें मत आहे व या मताचा अनुभवही केव्हां केव्हां येतो. पण, या स्थानीं पाप ग्रहांचा योग, पाप ग्रहांची दृष्टि व त्या स्थानचा स्वामी बलहीन पाप ग्रहानें युक्त व दृष्ट असतांही एखादा मनुष्य गर्भश्रीमंत असेल, त्यामुळे हा नियम संशयात्मक आहे. निश्चयात्मक नाहीं. हें उघड आहे. गर्भश्रीमंतांच्या एकाच कुटुंबांतल्या कुंडल्या पाहिल्यानें ही गोष्ट सहज व्यक्त होईल. या प्रमाणें आमचें मत आहे. आतां ज्योतिष ग्रंथांत काय सांगितलें आहे, तें पहा. श्लोक सर्वार्थचिंतामणींतले आहेत.

* लग्नेश्वरस्थांशपतिस्थराशि-
नाथस्थितांशाधिपतौ ब-
लाढ्ये ॥
वेशेषिकांशे शुभदृष्टियुक्ते
योगे बहुत्वे धनलाभमाहुः ॥१

या श्लोकांत असें सांगितलें आहे कीं – लग्नाचा स्वामी ज्या नवमांशीं असेल त्या नवमांशाचा स्वामी ज्या नवमांशीं असेल त्या नवमांशाचा स्वामी बलाढ्य [उच्च, स्वगृहीं, मित्रगृहीं, इ०] असेल व तो पारिजातादि योगांत असून त्याच्यावर शुभ ग्रहाची दृष्टि असेल तर धनलाभ जाणावा. योग अनेक पाहिजेत तरच हा धनयोग होतो.

* वित्तेश्वरेणसहिते भवराशिनाथे
कर्माधिपस्थनवभागपदृष्टियुक्ते ॥
वैशेषिकांशकयुतेपरमोच्चभागे
योगे बहुत्वधन लाभमिहाहुरार्याः ॥ २

या श्लोकांत असें सांगितलें आहे–दुसऱ्या स्थानाचा स्वामी व ११ व्याचा स्वामी एकत्र असून त्यांच्यावर दशमाधिप ज्या नवमांशीं असेल त्या नवमांशाच्या स्वामीची दृष्टि असेल व तो ११ व्याचा स्वामी पारिजातादि योगांत परमोच्च असेल तर धनयोग होतो.

धर्माधिपेनसहिते धनराशिनाथे
लग्नेश्वरस्थितनवांशपतीश्वरेण ॥
दृष्टे चतुष्टयगते शुभदृष्टियोगे
जातस्तु भूरिधनलाभमुपैतिबाल्ये ॥ ३

या श्लोकांत असें आहे कीं— नवमाचा स्वामी व धनेश हे एकत्र असून त्यांच्यावर लग्नेश ज्या नवमांशी असेल त्या नवमांशाच्या स्वामीची दृष्टि असेल व तो धनेश केंद्रीं शुभ ग्रहाच्या दृष्टींत असेल तर बालपणीं मोठा धनलाभ होतो.

लग्नार्थलाभवनेशुभखेचरेंद्रे
स्वोच्चे सुहृद्गृहगतेत्रविशेषितांशे ॥
तुर्यांशके धनपतिस्थनवांशनाथ–
दृष्टे बहुत्वधनलाभ मुपैतिबाल्ये ॥ ४

लग्न, द्वितीय व एकादश या स्थानीं शुभ ग्रह असेल व तो उच्च, मित्रगृहीं पारिजातादि योगांत, उच्चनवमांशी, धनेश ज्या नवमांशीं असेल त्या नवमांशाच्या स्वामीच्या दृष्टींत असतां बालपणीं मोठा धनलाभ होतो. असें या श्लोकांत सांगितलें आहे.

लग्नेशे धनराशिस्थे
धनेशे लाभराशिगे ॥

लाभेशे वापि लग्नस्थे
बहुनिध्यादिकं भवेत् ॥ ५

लग्नेश धनस्थानीं, धनेश लाभस्थानीं व लाभेश लग्नीं असा अन्योन्य क्षेत्रसंबंध झाला असतां मोठा ठेवा प्राप्त होतो.

सर्वग्रहादतिबली यदिलग्ननाथः
केंद्रस्थित स्त्रिदशपूजितसंयुतश्च ॥
वैशेषिकांशक युते धनराशिनाथे
वित्तं स्ववीर्यबलतो ज्ञितमाहुरार्याः ॥ ६

हा योग पूर्वार्जित धन प्राप्तीचा नाहीं. सर्व ग्रहांपेक्षां लग्नस्वामी बलवान् असून केंद्रीं गुरूनें युक्त असेल व धनस्वामी पारिजातादि योगीं असेल तर स्वतःच्या सामर्थ्यानें श्रीमंत होतो असें या श्लोकांत सांगितलें आहे.

लग्नेशसंयुतनवांशपतिस्थराशि—
नाथो बलेन सहितो धनपस्य मित्रम् ॥
केंद्रत्रिकोणसहितःस्वगृहेथयद्वा
जातःस्ववीर्यधनमेति बहुप्रकारैः ॥ ७

हाही धनयोग स्वकष्टार्जित धनाचा आहे. लग्नस्वामी ज्या नवमांशीं असेल त्या नवमांशाचा स्वामी ज्या राशींत असेल त्या राशीचा स्वामी बलवान् धनेशाचा मित्र, केंद्रीं, त्रिकोणांत स्वगृहीं असा असतां अनेक प्रकारें स्वतःच्या पराक्रमानें धन प्राप्त होतें असें या श्लोकांत सांगितलें आहे.

वितेश्वरो लाभविलग्नपाभ्यां
युक्तस्त्रिकोणे यदि केंद्रराशौ ॥
शुभेक्षितः कालबलान्वितश्च
जातः स्ववीर्याद्धनमेति मध्ये ॥८

हा योग स्वतः च्या सामर्थ्यानेंच धनप्राप्ति होण्याचा आहे. धनेश हा लग्न व लाभ यांच्या स्वामीनें युक्त केंद्रीं किंवा त्रिकोणांत शुभ ग्रहानें दृष्ट व कालबली असा असतां मध्य वयांत स्वतःच्या सामर्थ्यानें धन प्राप्त होतें, असें यांत सांगितलें आहे.

अंत्ये धनं याति धनेशयुक्त—
राशौ विलग्नेशयुते ससौम्ये ॥
तद्दीश्वरे लग्नगते बलाढ्ये
लाभेश्वरादेवमुदाहरंति ॥ ९

एकादश भावांचा स्वामी लग्नीं बलवान् असेल व त्याच्या धन स्थानीं धनेश व लग्नेश सौम्य ग्रहानें युक्त असतील तर स्वकष्टानें वयाच्या अंत्य भागीं धन प्राप्त होतें असा या श्लोकाचा अर्थ दिसतो. दुसरा अर्थ होणें शक्य नाहीं.

तृतीयराशौ धनलग्ननाथौ
बलान्वितौ पुंग्रहदृष्टि युक्तौ ॥
तद्दीश्वरेणापि युतौ प्रदृष्टौ
भ्रातुर्धनं याति विशेषितांशे ॥ १०

जर धन व लग्न यांचे अधिपति तृतीय स्थानीं बलवान् असून त्याच्यावर पुरुष ग्रहाची दृष्टि असेल किंवा पुरुष ग्रहानें युक्त असतील त्यांचप्रमाणें तृतीय भावाचा स्वामीही त्यांच्यासीं युत असेल किंवा त्यांच्यावर दृष्टि करील व तो पारिजातादि वर्गी असेल तर भावापासून धनप्राप्ति होते, असें यांत सांगितलें आहे.

तृतीयभावाधिपतौ धनस्थे
तत्रस्थिते कारकखेचरेंद्रे ॥
दृष्टे युते वा तनुपेन जातो
भ्रातुर्धनं याति विशेषितांशे ॥११

तृतीय स्थानाचा स्वामी धनस्थानीं असेल व तेथेंच भ्रातृकारक ग्रह [मंगळ] असेल व ते ग्रह लग्नस्वामीनें युक्त किंवा दृष्ट असतील व तो तृतीयाधिप पारिजातादि वर्गी असेल तर भावापासून धनप्राप्ति होते. हा दुसरा धनयोग आहे.

परस्परं वित्तपलग्ननाथौ
निरीक्षितौ केंद्रयुतौ शुभांशे ॥
निरीक्षितौ लग्नशुभेश्वराभ्यां
जातो धनं याति बहुप्रकारैः ॥ १२

या श्लोकांत अनेक प्रकारें धन प्राप्त होणारा धनयोग सांगितला आहे तो असा—लग्न आणि धन यांचे स्वामी केंद्रीं शुभ ग्रहाच्या नवमांशीं असून एकमेकांस पाहत असतील किंवा लग्नेश व नवमेश यांच्या दृष्टींत असतील तर अनेक प्रकारें धन प्राप्त होतें असें समजावें. या श्लोकांत ' लग्नशुभेश्वराभ्यां ' असें पद आहे, त्या ठिकाणीं ' कर्मशुभेश्वराभ्यां ' असें पद पाहिजे ह्मणजे संगति चांगली जुळेल, किंवा या पदाचा अर्थ ' लग्न आणि नवमेश यांच्या दृष्टींत असतील असा अर्थ केला पाहिजे. परंतु स्थानांस किंवा राशींस दृष्टि नाहीं, ह्मणून दुसरा अर्थ गौण आहे. जैमिनीय पद्धतींत मात्र राशींना दृष्टि कल्पिलेली आहे. ह्मणून दुसरा अर्थ घेणें असेल तर श्लोक जैमिनीय पद्धतींत मात्र उपयोगांत आणिला पाहिजे. नाहींपेक्षां 'लग्न' याच्या ठिकाणीं 'कर्म' हें पद घालून त्याचा दशमेश असा अर्थ केला पाहिजे, एरवीं गत्यंतर नाहीं.

वित्तेश्वरं पश्यति लग्ननाथे
युते स्ववीर्याद्धनमेतिजातः ॥
तृतीयभावाधिपकारकाभ्यां
दृष्टे युते तादृशमेति वित्तं ॥१३

या श्लोकांत स्वकष्टानें मिळणाऱ्या धनाचे दोन प्रकारचे योग सांगितले आहेत.

१ ला.— जर लग्नेश धनपतीला पाहील किंवा त्यानें युक्त असेल.

२ रा.—व जर लग्नेश, तृतीयेश व भ्रातृकारक ग्रह [मंगळ] यांनीं युक्त किंवा दृष्ट असेल, तर स्वकष्टानें धनप्राप्ति होते.

दृष्टे युते वित्तपतौ बलाढ्ये
सुखेश्वरेणापि धनं जनन्याः ॥
बंधोःसकशादथवा कृषेश्च
धनं प्रयात्यत्र विशेषितांशे ॥१४

या श्लोकांत आई, दायाद व शेतकी यांच्या पासून धनप्राप्तीचा योग दिला आहे. या योगावर या तिहींपैकीं कोणाकडून तरी धनप्राप्ति होते असें 'अथवा' या पदावरून ध्यावयाचें आहे. तो योग असा—धनेश बलवान् असून जर तो पारिजातादि वर्गी असेल व तो सुखेशानें [चतुर्थ स्थानच्या स्वामीनें] युक्त किंवा दृष्ट असेल, तर आई, दायाद किंवा शेतकी यांपासून धनप्राप्ति होते असें जाणावें.

दृष्टे युते वित्तपतौ धनस्थे
तत्रस्थिते कारकखेचरेंद्रे ॥
दृष्टे युते वा तनुपेन जातो
भ्रातुर्धनं याति विशेषितांशे ॥१५

हा श्लोक चुकीचा असून तो मागील 11 व्या श्लोकाचेंच चुकीचें रूपांतर आहे हें उघड आहे.

पुत्रेशतत्कारकखेचराभ्यां
तथाविधे वित्तपतौ बलाढ्ये ॥
दृष्टे युते लग्नपतौ बलाढ्ये
वैशेषितांशे सुततो धनं स्यात् ॥ १६

धनस्वामी बलवान असून त्याच्यावर पंचमाचा स्वामी व पुत्रकारक ग्रह [गुरु] यांची दृष्टि असेल किंवा यांनीं युक्त असेल आणि लग्न–स्वामी बलवान पारिजातादि वर्गी असेल तर मुलांपासून धन प्राप्त होतें.

वैशेषिकांशे यदि लग्ननाथे
जातः स्वपुत्रार्जितमेव वित्तम् ॥
षष्ठेशतत्कारकखेचराभ्यां
तथाविधे वित्तपतौ बलाढ्ये ॥ १७

लग्नस्वामी पारिजातादि वर्गी असतां पुत्रापासून धन मिळतें. व धनस्वामी बलवान् असून तो षष्ठेश व बुध यांनीं युक्त किंवा दृष्ट असतां शत्रूपासून धनप्राप्त होतें असा याचा अर्थ आहे. यांत षष्ठ–स्थानचा कारक बुध मानिला. कारण तें मातुलस्थान आहे. हें शत्रु–स्थानहीं आहे ह्मणून शत्रुकारक ग्रह शनि मानिला तरीही हरकत नाहीं. किंवहुना तोच मानिला पाहिजे, असें वाटतें.

शत्रोः सकाशाद्धनं प्रयाति
वैशेषिके लग्नपतौ बलाढ्ये ॥

याचा संबंध वरील श्लोकाशीं आहे. ह्मणजे वरील योगांत लग्नस्वामी बलवान् असून पारिजातादि वर्गी असला पाहिजे ह्मणजे शत्रूपासून धनप्राप्ति होते.

कलत्रतत्कारकयोस्तथैव
वित्तं कलत्रालुभते हिजातः ॥ १८

त्याचप्रमाणें लग्नस्वामी बलवान् असून धनस्वामी हा जायास्वामी व शुक्र यांनीं युक्त किंवा दृष्ट असतां स्त्रीपासून धनप्राप्ति होते, असें ग्रंथकार सांगतात.

पितुर्धनं कारकभावपाभ्यां गुरोः सकाशादपि धर्ममूलात्
कर्मेशतत्काकदृष्टियोगा द्धनं स्वदानग्रहणा त्स्वकीर्त्या
लाभेशतत्कारकदृष्टियोगादेवं वदंत्यत्र धने बहुत्वं ॥ १९

नवमाचा स्वामी व रवि यांनीं युक्त किंवा दृष्ट असा धनपति असून लग्नस्वामी बलवान् असेल तर गुरूपासून धन मिळतें किंवा धर्मसंबंधानें मिळतें. दशमाचा स्वामी व रवि यांनीं युक्त किंवा दृष्ट असतां दान घेऊन धन मिळतें. लाभस्वामी व गुरु यांनीं युक्त असतां किंवा दृष्ट असतां पुष्कळ धन मिळतें.

तात्पर्य, लग्नस्वामी बलवान् असून धनस्वामी हा ज्या भावाच्या स्वामीनें व कारक ग्रहानें युक्त किंवा दृष्ट असेल त्या भावापासून धनप्राप्ति होते, असें जाणावें.

सद्यो धनी धनेशेन कर्मनाथो युतो यदि
कर्मेशस्थांशपतिना लाभनाथस्तथाविदुः॥ २०

यांत दोन धनयोग आहेत. १ ला—धनस्वामी व लाभस्वामी एकत्र असतां. २ रा-दशमाचा स्वामी ज्या नवमांशीं असेल, त्या नवमांशाचा स्वामी व लाभ स्वामी एकत्र असतां.

लग्नेशे धनराशिस्थे लाभेशे कर्मसंयुते ॥
धनेशस्थांशपे सौम्ये धनिको नामतो भवेत्॥२१

लग्नेश धनस्थानीं, लाभेश दशमांत व धनेश ज्या नवमांशीं असेल त्याचा स्वामी शुभ ग्रह असतां श्रीमंत, सावकार अशी प्रसिद्धि होते.

सहस्रनिष्कभर्तास्या–ल्लग्नेश स्थनवांशपे ॥
धनेशस्थांशपे सौम्ये गुरुणा वा निरीक्षिते ॥ २२
सहस्रनिष्कभर्तास्या–ल्लग्नेशस्थनवांशपे ॥
गोपुरांशगते कर्म– नाथेन सति वीक्षिते ॥ २३

यांत एक हजार निष्कांचा [५००० रु. चा] मालक कसा असतो

त्याचे योग आहेत. ते असे— १ ला. लग्नस्वामी अथवा धनस्वामी ज्या नवमांशीं असतील त्यावा स्वामी गुरूच्या दृष्टांत असेल तर. २ रा.– लग्नस्वामी ज्या नवमांशीं असेल त्या नवमांशाचा स्वामी गोपुरांशांत असेल व त्यावर दशमाधिपतीची दृष्टि असेल तर एक हजार निष्कांचा [५००० रु. चा] मालक असतो.

कर्मेशसंयुक्तनवांशनाथ संयुक्तसप्तांशपतौ बलाढ्ये ॥
शुक्रेण देवेंद्रपुरोहितेन दृष्टे सहस्रद्वयनिष्कभर्ता ॥

दशमाचा स्वामी ज्या नवमांशीं असेल त्या नवमांशाचा स्वामी ज्या सप्तमांशीं असेल त्यावा स्वामी जर शुक्र व गुरु यांच्या दृष्टांत असेल तर दोन हजार निष्कांचा [१०००० रु. चा] मालक असतो.

सौम्यषष्ठ्यंशसंयुक्ते धनलाभे बलान्विते ॥
तदीशे पि तथायुक्ते सहस्रत्रयनिष्कयुक् ॥२१

धनेश व लाभेश हे षष्ठ्यंशाच्या सौम्य भागीं असून धन व लाभ हीं स्थानें बलवान् असतां तीन हजार निष्कांचा (१५,००० रु. चा) मालक होतो.

वैशेषिकांशगे वित्त- नाथे गुर्विंदुभास्करे ॥
तथाविधो भवेशोपि बलवांश्चेत्तथा धनी ॥२६

धनेश, लाभेश, गुरु, चंद्र व रवि इतके ग्रह पारिजातादि वर्गीं असतां तीन हजार निष्कांचा (१५,००० रु. चा) मालक होतो.

धनस्थेशदृक्काणेश- संयुक्त नवभागपः ॥
सर्वोत्तमबलोपेत- स्त्वष्टसाहस्र निष्कयुक्

धनस्वामी, द्रेष्काणस्वामी व नवमांशस्वामी हे अत्यंत बलवान्

असून एकत्र असतील तर आठ हजार निष्कांचा [४०,००० रु. चा] मालक होतो.

लग्नेशस्थ दृक्काणेश संयुक्तमुनिभागपः॥
वैशेषिकांशकगतस्त्वयुतं धनमाप्नुयात् ॥ २८

लग्न, द्रेष्काण व सप्तमांश यांचे स्वामी एकत्र असून पारिजातादि वर्गीं असतील तर दहा हजार निष्कांचा (५०,००० रु. चा) मालक होतो.

व्यये शुक्रे धने जीवे स्वांशे वैशेषिकांशके ॥
लग्नेशेपि तथायुक्ते तदूर्ध्वमुपयातिसः ॥२९

व्यय स्थानीं शुक्र व धन स्थानीं गुरु हे स्वनवमांशीं व पारिजातादि वर्गीं असून लग्नेशानें युक्त असतील तर पन्नास हजारांपेक्षांही जास्त रुपयांचा मालक होतो.

गुरौ लग्नेशसंयुक्ते धनेवैशेषिकांशके ॥
केंद्रत्रिकोणगे वापि तदूर्ध्वं वित्तमश्नुते ॥३०

गुरु आणि लग्नेश हे धनस्थानीं किंवा केंद्रीं किंवा त्रिकोणांत पारिजातादि वर्गीं एकत्र असतां पन्नास हजारांपेक्षां अधिक रुपयांचा मालक होतो.

कर्मेशस्थ दृक्काणस्थ नाथसंयुक्तसप्तमः ॥
ऐरावतांशसंयुक्तो धनलक्षं समश्नुते ॥ ३१

कर्म, देष्काण व व सप्तमांश यांचे स्वामी ऐरावतांशीं असून एकत्र असतील तर एक लक्ष निष्कांचा [५ लक्ष रु. चा] मालक होतो.

लक्षद्वयं धनं याति चतुष्केंद्रे शुभान्विते
सिंहासने धनेशेपि सति पारावतांशके ॥ ३२

चारही केंद्रीं शुभ ग्रह असून ते सिंहासनांशीं असतील व धनेश

पारावतांशीं असेल तर लक्ष निष्कांचा [१० लक्ष रु. चा] मालक होतो.

लक्षत्रयाधिकारीस्या लाभलग्नधनाधिपे ॥
वैशेषिकांशकगते मृद्वंशादि युतेथवा ॥३३

लाभ, लग्न व धन यांचे स्वामी पारिजातादि वर्गी किंवा षष्ट्यंशाच्या मृदु संज्ञक भागीं असतां तीन लक्ष निष्कांचा [१५ लक्ष रु. चा] मालक होतो.

तदूर्ध्वे वित्तपःस्यातु धनलाभपती यदा ॥
वृद्धिकेंद्रगतौ तौ चेद्बलिनौ भाग्यपस्तथा ॥ ३४

धन आणि लाभ यांचे स्वामी व भाग्यस्वामी हे बलवान् असून ते केंद्रीं असतां पंधरा लक्षांपेक्षां अधिक रु. चा मालक होतो. एथें 'वृद्धि' या पदाचा अर्थ नीट जुळत नाहीं.

केंद्रत्रिकोणभेवीर्य स्त्वथवा भवनाथयुक् ॥
वैशेषिकांशगश्चेत्तु धनलक्षं समश्नुते ॥ ३५

जर लाभेश बलवान् असा केंद्रीं किंवा त्रिकोणांत पारिजातादि वर्गी असेल तर एक लक्ष निष्कांचा [५ लक्ष रु. चा] मालक होतो.

लग्नांशनाथभाग्येशाः परमोच्चांशसंयुताः
वैशेषिकांशे लाभेशे तदा कोटीश्वरो भवेत् ॥ ३६

नवमांशपति व भाग्येश हे परमोच्च असून लाभेश पारिजातादि वर्गी असतां एक कोटी निष्कांचा [५ कोटी रु. चा] मालक होतो,

---

कुंडलीविज्ञान

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥
'भवभूति :,

पुस्तक ७वें.] श्रावण शु० १३, बुधवार [अंक १८ वा

गर्भ श्रीमंत व गर्भ दरिद्री

नं. २

अंक १६ मध्यें सर्वार्थचिंतामणींतले श्लोक दिले आहेत. त्यांत 'पारिजातादि वर्गी' ह्मणजे काय हें कित्येकांस कळलें नसेल असें वाटतें. कारण आमच्या पुस्तकाचे कित्येक ग्राहक अगदीं नवीन आहेत. हा विषय पुस्तक १ अंक ५ मध्यें दिला आहे, तो असा —

लग्न, होरा, द्रेष्काण, नवमांश, द्वादशांश व त्रिंशांश यांच्या समुदायास 'षड्वर्ग' ह्मणतात. हे आणि सप्तमांश मिळून होणाऱ्या समुदायास 'सप्तवर्ग' अशी संज्ञा आहे.

एखादा ग्रह वरील कुंडल्यांत जेव्हां स्वगृहीं, मूलत्रिकोणीं व उच्च असतो, तेव्हां तो, विशेष बलवान् असतो ह्मणून कोणत्याही दोन प्रकारच्या कुंडल्यांत एखादा ग्रह तसा असेल तर तो पारिजातांशीं आहे असें ह्मणतात. तीन प्रकारच्या कुंडल्यांत असेल तर **उत्तमांशीं** आहे, असें ह्मणतात. त्याचप्रमाणें चार प्रकारच्या कुंडल्यांत असतां **गोपुरांशीं**, पांच प्रकारच्या कुंड–

ल्यांत असतां **सिंहासनांशीं**, सहा प्रकारच्या कुंडल्यांत असतां **पारावतांशीं**, सात किंवा आठ प्रकारच्या कुंडल्यांत असतां **देवलोकांशीं** आणि नऊ प्रकारच्या कुंडल्यांत असतां **ऐरावतांशीं** तो ग्रह आहे, असें ह्मणतात.

लग्न, होरा, द्रेष्काण, सप्तमांश, नवमांश, दशांश, द्वादशांश, षोडशांश त्रिंशांश व षष्ट्यंश इतक्या कुंडल्यांच्या समुदायास 'दशवर्ग' ह्मणतात. या दहा प्रकारच्या कुंडल्या मांडून झाल्यावर त्यांत कोणता ग्रह किती कुंडल्यांत बलवान् आहे तें पाहून नंतर संख्येच्या मानानें तो कोणत्या अंशीं आहे, हें ठरवावें. वरील योग हे एकापेक्षां एक चढ आहेत. सर्वांत ऐरावतांशीं असलेला ग्रह अत्यंत बलाढ्य जाणावा. या योगांचीं फलें जातक पारिजातांत सांगितलीं आहेत, तीं अशीं—

सपारिजातद्युचरः सुखानि
नीरोगता मुत्तमवर्गयातः ॥
सगोपुरांशो यदि गोधनानि
सिंहासनस्थः कुरुते विभूतिं ॥
करोति पारावतभागयुक्तो
विद्यायशश्री विपुलं नराणाम्।
सदेव लोको बहुयान सेना-
मैरावतस्थो यदि भूपतित्वं ॥

अर्थ.— पारिजात—सुखप्राप्ति. उत्तम—आरोग्य. गोपुर—गाईंची संपत्ति सिंहासन—श्रेष्ठाधिकार. पारावत—विद्या, यश व लक्ष्मी यांची विपुलता. देवलोक—अनेक प्रकारचीं वाहनें व सैन्य यांची प्राप्ति. ऐरावत—राजा. याप्रमाणें या योगांचीं फलें आहेत. असो आतां आपल्या मुख्य विषयाकडे वळूं. अमुक मनुष्य गर्भश्रीमंत आहे कीं गर्भ दरिद्री आहे, हा प्रश्न सोडविणेंच असेल तर प्रथम पुढील प्रश्न सोडवावे व नंतर त्या प्रश्नांचें उत्तर द्यावे, हें बरें.

१ पूर्वार्जित धनाचाच उपभोक्ता आहे काय ?

२ पूर्वार्जित धनांत अधिक भर घालील काय ?

३ पूर्वार्जित धन उपभोगील किंवा नाहीं ?

४ पूर्वार्जित धन उडवील कीं काय ? अथवा ते त्याच्या हातून जाईल कीं काय ?

५ स्वतःच्या सामर्थ्यानें श्रीमंत होईल किंवा दैवयोगानें आयतेंच धन मिळेल ?

६ जन्मभर दारिद्र्य भोगणार काय ?

७ आजन्म श्रीमंती भोगणार काय ?

या ७ गोष्टी प्रथम सोडविल्या पाहिजेत. तर मुख्य प्रश्नाचा उलगडा होण्याचा संभव आहे. जो मनुष्य जन्मभर श्रीमंती भोगणार किंवा पूर्वार्जित धनाचेंच रक्षण करणार, किंवा तें वाढविणार किंवा त्याचा उपभोग घेणार नाहीं अथवा घेईल किंवा जो तें धन उडविणार अथवा तें त्याच्या हातून जाणार तो गर्भश्रीमंत जाणावा. तसें नसेल तर गर्भदरिद्री जाणावा. असें अनुमान करणें शहाणपणाचें होईल.

श्रीमंत हा शब्द सापेक्ष आहे. खाऊन पिऊन चार पैसे बाळगून असणारा, लोकांकडे ज्याचे चार पैसे येणें आहेत, कर्ज नाहीं, अन्नवस्त्राची ददात नाहीं, घरदार, शेतवाडी, जमीनजुमला वगैरे ज्याच्या जवळ आहे तो श्रीमंत असें साधारणतः सर्व लोक समजतात. ज्यांच्या जवळ वेळेला खाण्यास नाहीं, कुटुंबपोषण होत नाहीं, अंगभर वस्त्र नाहीं ते दरिद्री होत. परंतु जे कधीं उपाशीं राहत नाहींत, कुटुंबपोषण जेमतेम करितात. वाजवी वस्तूंचा उपयोग ज्यांस घेतां येतो, कोणाचें कर्ज नाहीं, अथवा असल्यास तें काळजी करण्यासारखें नाहीं, कोणाकडे येणेंही नाहीं व असल्यास तें पोषणापेक्षां जास्त नाहीं, शिल्लक बाकी पूज्य, आदा आणि व्यय बरोबर, उंची दागदागिना ज्यांच्या जवळ नाहीं, इष्टेट असेल तर तिच्यावर जेमतेम निर्वाह होतो अशा प्रकारचे लोक मध्यम स्थितींतील होत. ह्मणून कुंडलीवरून तो कोणत्या वयांत कोणत्या स्थितींत असेल हें जर कळलें नाहीं व वरील ७ प्रश्नांचा उलगडा झाला नाहीं, तर मुख्य प्रश्न जो गर्भ श्रीमंत कीं गर्भ दरिद्री तो कधींही सुटणार नाहीं.

कुंडलींत दुसऱ्या, चवथ्या, नवव्या, दहाव्या किंवा ११ व्या स्थानांत बलवान् ग्रह असले तर तो गर्भ श्रीमंत आहे, असें ह्मणतां येणार नाहीं. कदाचित् तो जन्मदरिद्री असून पुढें श्रीमंत होणार असेल ! मधुकरी मागून निर्वाह करणारा

जेव्हां लक्षाधीश होतो, तेव्हां त्यास ग्रह काय वाईट असतील ? त्याच्या धनस्थानीं उच्च ग्रहही असतील. अथवा भाग्य दशमांतही बलवान् ग्रह असतील. एरवीं तो इतका श्रीमंत होतो कसा ?

इतका विचार प्राचीन ज्योतिष्यांनीं केलेला सांप्रतच्या उपलब्ध जातक ग्रंथांत नाहीं. ह्मणून हा प्रश्न छाती ठोकून कोणी ह्मणेल कीं 'मीं सोडवितों' तर तें त्याचें ह्मणणें अविचाराचें आहे, हें उघड आहे. जातक ग्रंथांत राजयोग व धनयोग सांगितलेले आहेत. पण ते कोणते वयांत तें सांगितलेलें नाहीं, त्यामुळें एखाद्याच्या कुंडलींत जरी ते योग दृष्टीस पडले तरी तो ज्या कालीं आपणास प्रश्न करील त्या कालींच तो श्रीमंत असेल असें कसें ह्मणावें ?

जन्मकालीं अथवा इतर कालीं अमुक एका ग्रहाची दशा आहे, ह्मणून तो त्या कालीं श्रीमंत अगर गरीब आहे, असें ह्मणणेंही ठीक नाहीं. जे जन्मभर दारिद्र्य भोगणारे आहेत, त्यांस शनीची दशा आली तरी तेंच आणि शुक्राची आली तरी तेंच. स्वाक्षप्रमाणें जे जन्मभर श्रीमंती भोगणारे आहेत, त्यांस केतूची दशा आली तरी बिघडत नाहीं. किंवा शुक्राची आली तरी मोठेंसें कार्य होत नाहीं. ह्मणून दशांवरूनही हा प्रश्न सुटणार नाहीं अशी आजची आमच्या जातकशास्त्राची स्थिति आहे.

गेल्या अंकांत जे धनयोग दिले आहेत ते मासल्या करितां आहेत. राजयोग आणि धनयोग यांची संख्या फार मोठी आहे. ती सर्व सांगत बसल्यास एक मोठा प्रचंड ग्रंथ होईल. ह्मणून ते योग ज्या तत्वांनीं तयार होतात, तीं तत्वें वाचकांस सवडी प्रमाणें सांगण्याचा विचार आहे.

दांपत्ययोग
आणि
विवाहकाल

नवरा आणि त्याची [विवाहित] बायको यांच्या कुंडल्यांत कोणत्या

कुंडलीविज्ञान

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥

' भवभूति : ,

पुस्तक ७वें.] भाद्रपद शु० ४, बुधवार [अंक २० वा

दारिद्र्ययोग

राजयोग किंवा धनयोग यांस दारिद्र्ययोग प्रतिबंधक आहेत. लक्षाधीश किंवा कोट्यधीश माणसांस दारिद्र्ययोग असणार नाहींत व जर असतील तर त्यांचें तें धन टिकणार नाहीं. जीं श्रीमंत घराणीं पुढें खालावत जातात, त्यांस दारिद्र्ययोग असतात. ज्यांस दारिद्र्ययोग मुळींच नाहींत, तो मनुष्य जन्मभर श्रीमंतीचा उपभोग घेतो. राजयोग असून दारिद्र्ययोग असतील तर तो राजयोग दुर्बल जाणावा. दरमहा ५०० रु. पगार मिळविणाऱ्या मनुष्यास राजयोग असेल, पण जर त्यास दारिद्र्ययोग असतील तर त्याला ते रुपये खर्चासही पुरणार नाहींत. तेणेंकरून तो सावकाराचा मिंधा असेल. अर्थात् राजयोग असूनही तो दुःखी व दरिद्री होय. असलीं माणसें मरण पावलीं ह्मणजे त्यांच्या कुटुंबांस उपाशीं मरण्याची पाळी येते ! जिवंत असतां ज्यांच्या दाराशीं हत्ती डुलत होते तेथें त्यांच्या मरणानंतर कुत्र्यांच्या भुंक-

ष्याशिवाय कांहीं दृष्टीस पडत नाहीं. ही स्थिति अत्यंत शोचनीय होय. ह्मणून राजयोगी मनुष्यास दारिद्र्य योग असतां कामा नयेत. या दारिद्र्ययोगाबद्दल ग्रंथांतून काय सांगितलेलें आहे तें पाहूं.

सर्वार्थचिंतामणि

ऋणग्रस्तो धने पापे लग्नेशे व्ययसंयुते ॥
कर्मेशे लाभनाथेन युते दृष्टे विशेषतः ॥

अर्थ.– धनस्थानीं पापग्रह असून लग्नेश व्ययस्थानीं असतां मनुष्य कर्जबाजारी होतो. व हा योग असून जर दशमाचा स्वामी लाभस्वामीनें युक्त किंवा दृष्ट असेल तर अत्यंत कर्जबाजारी होतो.

यांतील पहिल्या अर्धीतला दारिद्र्ययोग बरोबर दिसतो. पण दुसऱ्या अर्धीत जें सांगितलें आहे कीं, दशमाचा अधिपति लाभेशानें युक्त किंवा दृष्ट असतां अत्यंत कर्जबाजारी होतो, हें ह्मणणें चमत्कारिक दिसतें. कारण हा धनयोग आहे. यावरून दारिद्र्ययोग असून जर धनयोग असेल तर तो अत्यंत वाईट असा ग्रंथकाराचा आशय दिसतो. दूध हें पौष्टिक आहे, पण तें तापकऱ्याला दिल्यास त्याचा आजार दुणावतो, हें जें आर्यवैद्यकांचें मत आहे, त्याच मताप्रमाणें वरील मत दिसतें.

दिनेशकरलुप्तस्तु धनेशो नीचराशिगः ॥
पापान्विते धने रंध्रे ऋणग्रस्तो भवेन्नरः

धनेश नीच राशींत अस्तंगत असेल व धनस्थानीं आणि अष्टम स्थानीं पापग्रह असतील तर तो मनुष्य कर्जबाजारी होतो.

अष्टम स्थान हें धनस्थानच्या समोरचें स्थान आहे. या स्थानांतील ग्रह धनस्थानास पूर्ण पाहतात. ह्मणून वरील योगांत अष्टमस्थानीं पापग्रह सांगितला आहे.

धनेशे नीचराशिस्थे क्रूर षष्ठ्यंशसंयुते ॥
लाभेशेऽपि तथा युक्ते ऋणग्रस्तो भवेन्नरः ॥

अर्थ.— धनेश नीच राशींत षष्ठ्यंशाच्या क्रूर भागीं असेल व लाभस्वामीही तसाच असेल तर मनुष्य कर्जबाजारी होतो.

लाभेशस्थितभांशनाथे दुःस्थेऽशुभान्विते ॥
क्रूरषष्ठ्यंशसंयुक्ते ऋणग्रस्तो भवेन्नरः ॥

अर्थ.— लाभस्वामी ज्या नवमांशीं असेल त्या नवमांशाचा स्वामी ६।८।१२ स्थानीं पाप ग्रहानें युक्त व षष्ठ्यंशाच्या क्रूर भागीं असतां मनुष्य कर्जबाजारी होतो.

क्षेत्रेश्वरे नीचगते विमूढे पापांतरे पापनिरीक्षिते वा ॥
पापग्रहक्षेत्रगतेऽरिगेहे क्षेत्रादिनाशं कथयंति तज्ज्ञाः ॥

अर्थ.— चतुर्थ स्थानाचा अधिपति नीच राशींत, अस्तंगत, पापग्रहांच्या मध्यें किंवा दृष्टींत, पाप ग्रहाच्या राशीस, शत्रुक्षेत्रीं असा असतां इष्टेट नाश पावते असें ज्योतिषी सांगतात.

पापांतरस्थे यदि भूमिपुत्रे पापांतरे पापनिरीक्षिते वा ॥
पापग्रहक्षेत्रगतेऽथवा स्यात् क्रूरांशके भूमिविनाशमाहुः ॥

अर्थ.— मंगळ हा पाप ग्रहांच्या मध्यें, त्यांच्या दृष्टींत किंवा त्यांच्या राशीस व षष्ठ्यंशाच्या क्रूर भागीं असतां इष्टेट नाश पावते.

क्रूरादिषष्ठ्यंशगते तदीशे क्षेत्रे त्वपापे यदि नीचभे वा ॥
दुःस्थेऽरिगेहे त्वतिभीषणांशे क्षेत्रादिनाशं कथयंति तज्ज्ञाः ॥

अर्थ.— चतुर्थ स्थानचा अधिपति षष्ठ्यंशाच्या क्रूर भागीं असेल किंवा चतुर्थ स्थानीं पापग्रहानें युक्त असेल किंवा नीच राशींत असेल अथवा ६।८।१२ स्थानीं, शत्रुगृहीं व क्रूर नवमांशीं असेल तर इष्टेट नाश पावते असें ज्योतिषी सांगतात.

क्षेत्रेश्वरे पापयुते धनस्थे नीचारिभे क्षेत्रविनाशमेति स्वोच्चस्थिते तद्भवनेश्वरे तु पापन्विते विक्रयमेति भूमेः ॥

अर्थ.— चतुर्थेश पापग्रहानें युक्त

धनस्थानीं नीच राशींत किंवा शत्रुगृहीं असतां इष्टेट नाश पावते. तो चतुर्थेश उच्च असून पापग्रहानें युक्त असतां भूमीचा विक्रय होतो.

आज्ञाक्षयात् क्षेत्र विनाशमाहु
राज्येश्वरे क्षेत्रगते सपापे ॥
क्रूरांशके मृत्यु यमादि भागे
कर्मेश्वरेणापि युते तथैव ॥

अर्थ.— दशमाचा स्वामी चतुर्थ स्थानीं पाप ग्रहानें युक्त असा षष्ठ्यंशाच्या क्रूर भागीं असतां राजाज्ञेनें इष्टेटीचा नाश होतो.

आज्ञाक्षयाद्भूमि विनाशमेति
राज्येशतत्कारकभूमिनाथे
क्रूरांशके वा त्ववरोहभागे
नाशस्थिते मृत्युयमादि भागे ॥

दशमाचा स्वामी, राज्यकारक ग्रह किंवा मंगळ हे षष्ठ्यंशाच्या मृत्यु, यम, इ० क्रूर भागीं व नीच असतां राजाज्ञेनें इष्टेट नाश पावते.

राजाज्ञया क्षेत्रविनाशमेति
भानौ तदीशेन युतेपि निम्ने ॥
धनेश संयुक्त नवांशनाथ-
युक्तांशपेनापि युते सपापे ॥

अर्थ.— रवि नीच असून तो चतुर्थस्थानच्या अधिपतीनें युक्त असेल अगर धनस्वामी ज्या नवमांशीं असेल त्या नवमांशाच्या स्वामीनें व पाप ग्रहानें युक्त असेल तर राजाज्ञेनें इष्टेटीचा नाश होतो.

बृहत्पाराशरी

लग्नेशे वै रिष्फगते रिष्फेशे
लग्नमागते ॥
मारकेशयुते दृष्टे जातः
स्यान्निर्धनो नरः ॥

अर्थ.— लग्नस्वामी व्यय स्थानीं व व्ययस्वामी लग्नीं असून ते जर मारकेशाच्या दृष्टींत असतील तर मनुष्य निर्धन होतो.

[द्वितीय आणि सप्तम हीं मारक स्थानें आहेत. या स्थानांचे जे स्वामी ते मारक होत.]

लग्नाधिपे शत्रुगृहं गते वा
षष्ठेश्वरे लग्नगते पि वा चेत् ॥
विलग्नपे मारकनाथ दृष्टे
जातो भवेन्निर्धनकोपि
मुख्यः ॥

कुंडलीविज्ञान

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम् ।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥
' भवभूति : ,

पुस्तक ७ वें.] आश्विन शु० ४, शुक्रवार [अंक २२ वा

दारिद्र्ययोग

[अंक २० वरून पुढें]

अर्थ.— लग्नस्वामी षष्ठ स्थानीं, षष्ठेश लग्नीं असून लग्नेशावर मारकेशाची दृष्टि असेल तर मनुष्य निर्धन होतो.

लग्नेंदू केतुयुक्तौ वा लग्नेशे निधनं गते ॥
मारकेशयुते दृष्टे जातो वै निर्धनो भवेत् ॥

अर्थ.— लग्न चंद्र केतूनें युक्त असून लग्नेश अष्टमस्थानीं मारकेशानें युक्त किंवा दृष्ट असतां निर्धन होतो.

षष्ठाष्टमव्यगते लग्नेशे पापसंयुते ॥
मारकेशयुते दृष्टे राजवंद्योऽपि निर्धनः॥

अर्थ.— लग्नस्वामी पापग्रहानें युक्त ६।८।१२ स्थानीं असेल व तो

मारकेशानें युक्त अगर दृष्ट असेल तर राजाच्या वंशांत जन्म असला तरी निर्धन होईल.

विलग्ननाथेऽरि विनाश रिष्फ-
नाथेन युक्ते यदिपापदृष्टे ॥
मंत्रात्मजे नाथयुतेऽपि दृष्टे
शुभै र्न दृष्टे स भवे दरिद्रः ॥

अर्थ.— लग्नाधिपति ६।८।१२ या स्थानांच्या अधिपतीनें युक्त असून त्यावर पापग्रहाची दृष्टि असेल किंवा ५।११ च्या स्वामीनें युक्त अथवा दृष्ट असून त्यावर शुभ ग्रहांची दृष्टि नसेल तर मनुष्य दरिद्री होतो.

मित्रेशो धर्मनाथश्च षष्ठकर्मस्थितौ क्रमात् ॥
दृष्टौ चेन्मारकेशेन जातः स्यान्निर्धनो नरः ॥

अर्थ.— चतुर्थेश षष्ठस्थानीं व नवमेश दशमांत असून त्यांच्यावर मारकेशांची दृष्टि असेल तर मनुष्य निर्धन होतो.

पापग्रहे लग्नगते राज्यधर्माधिपौ विना ॥
मारकेशयुते दृष्टे जातः स्यान्निर्धनो नरः ॥

अर्थ.— लग्नीं पापग्रह असून तो फक्त मारकेशानें युक्त अथवा दृष्ट असेल व नवम किंवा दशम यांच्या स्वामींनीं युक्त किंवा दृष्ट नसेल तर मनुष्य निर्धन होतो.

यद्भावेशो रंध्ररिष्फारिसंस्थो
यद्भावस्था रंध्ररिष्फारिभेशाः ॥
पापै र्दृष्टे मंददृष्टेऽथवा चेद
दुःखाक्रांतश्चंचलो निर्धनः स्यात् ॥

अर्थ.— ज्या भावाचा स्वामी ६।८।१२ स्थानीं असेल व ६।८।१२ यांचा स्वामी ज्या भावांत असून त्याच्यावर पाप ग्रहांची किंवा शनीची

दृष्टि असेल तर अत्यंत दुःखी व निर्धन होतो. [हा श्लोक अर्थाला चांगला जुळत नाहीं.]

चंद्राक्रांतनवांशेशो मारकेशयुतो यदि ॥
मारकस्थानगो वाऽपि जातोऽसौ निर्धनो नरः ॥

अर्थ.— चंद्र ज्या नवमांशीं असेल त्या नवमांशाचा स्वामी मारकेशानें युक्त असेल किंवा तो मारक स्थानांत असेल तर तो मनुष्य निर्धन होतो.

धनसंस्थौ च भौमेंदू कथितो धननाशकौ ॥
बुधेक्षितौ महावित्तं कुरुतस्तत्रगः शनिः ॥

अर्थ.— मंगळ आणि चंद्र धन स्थानीं असतील तर ते धनाचा नाश करितात. जर त्यांच्यावर बुधाची दृष्टि असेल तर मनुष्य श्रीमंत होतो. धन स्थानीं शनि असतां निर्धन होतो.

निःस्वतां कुरुते तत्र रविर्नित्यं यमेक्षितः ॥
महाधनयुतख्यातं शन्यदृष्टः करोत्यसौ ॥

अर्थ.— जर धन स्थानीं रवि असून त्यावर शनीची दृष्टि असेल तर मनुष्य नेहमीं निर्धन होतो. पण जर त्यावर शनीची दृष्टि नसेल तर मोठा श्रीमंत व प्रख्यात होतो.

धनभावगताः सौम्याः कुर्वंत्येव धनं बहु ॥
बुधदृष्टे गुरुस्तत्र निर्धनं कुरुते नरं ॥

अर्थ.— धन स्थानीं शुभ ग्रह असतील तर पुष्कळ धन प्राप्त होतें त्या स्थानीं गुरु असून त्यावर बुधाची दृष्टि असतां मनुष्य निर्धन होतो.

बुधश्चंद्रेक्षितस्तत्र सर्वस्वं हंति निश्चितम् ॥
क्रूरखेटादि योगेऽत्र दारिद्र्यं संभवेन्नृणाम् ॥

अर्थ.— धनस्थानीं बुध असून त्यावर चंद्राची दृष्टि असतां सर्व धन निश्चयानें नाश पावतें. धनस्थानीं अनेक क्रूर ग्रह असतील तर मनुष्य दरिद्री होतो.

ये ये ग्रहा धर्मधबुद्धिपाभ्यां
युक्ता च दृष्टा बहुदुःखदास्ते ॥
रंध्रे व्ययादि व्ययपै र्युतास्ते
व्ययप्रदा मारकनायकेन ॥

अर्थ.— जे जे ग्रह नवम व पंचम यांचे स्वामींनीं युक्त किंवा दृष्ट नसतील ते ते ग्रह पुष्कळ दुःख उत्पन्न करितात. त्याचप्रमाणें जे जे ग्रह अष्टमांत व्ययस्वामीनें किंवा मारकेशानें युक्त असतील ते ते दुःखदायक जाणावे.

प्रोक्त योगे यदा भावे दरिद्री जायते ध्रुवम् ॥
शुभस्थानगताः पापः पापस्थाने गताः शुभाः ॥

अर्थ.— ६।८।१२ स्थानीं शुभ ग्रह, केंद्रीं किंवा त्रिकोणांत पापग्रह असतां अथवा शुभ ग्रह पापग्रहाच्या राशीस व पापग्रह शुभ ग्रहाच्या राशीस असतां दरिद्री होतो.

वरील सर्व वर्णनावरून दारिद्र्ययोगांची कल्पना होईल. स्वानुभवानें स्थूल योग पुढील प्रमाणें आढळून येतात.—

१ धन स्थानीं किंवा व्यय स्थानीं पाप ग्रह.
२ चतुर्थ स्थानी पाप ग्रह.
३ लग्न दशमांत्रे स्वामी नीच, शत्रुगृहीं, शत्रुग्रहानें युक्त वगैरे.
४ धन, चतुर्थ, भाग्य व लाभ यांचे स्वामी दुर्बल [नीच शत्रुगृहीं, वगैरे किंवा ६।८।१२ स्थानीं.]
५ (६।८।१२) चे स्वामी धनस्थानीं.
६ सर्व ग्रह अस्तकेंद्राकडे. (६।८।१२ स्थानीं)
७ होरा कुंडलींत व्यय स्थानीं ग्रहसंख्या अधिक.

श्रीमंत आणि गरीब हे सापेक्ष शब्द आहेत. ह्मणून धनयोगांवरून अथवा दारिद्र्ययोगांवरून या स्थितीचें ज्ञान समाधानकारक होणार नाहीं. यासाठीं निरनिराळ्या कुंडल्यांशीं आपली कुंडली ताडून धनयोगाची कल्पना करावी.

कुंडलीविज्ञान

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम् ।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥
' भवभूति : ,

पुस्तक ७वें.] श्रावण कृ० ९, रविवार [अंक १९ वा

राजयोग आणि धनयोग यांचीं तत्वें

गेल्या अंकांत राजयोग आणि धनयोग हे कोणत्या तत्वांनीं तयार होतात, तीं तत्वें सांगण्याचें अभिवचन दिलें होतें, त्याप्रमाणें या अंकांत त्यांचा यथाशक्ति विचार करण्याचें ठरविलें आहे. राजयोग हा शब्द अत्यंत व्यापक आहे. राजयोग ह्मणजे राज्यपदप्राप्तीचा योग असा अर्थ आह्मीं करित नाहीं. राजयोग असतां राज्यप्राप्ति होणें शक्य नाहीं. शिवाजीला राज्य मिळालें, ह्मणून त्याला तीन ग्रह उच्च होते की तीन ग्रह उच्च होते ह्मणून त्याला राज्यप्राप्ति झाली, या गोष्टीचा विचार केला असतां असें वाटतें कीं, तो राजा झाला ह्मणून त्याला राजयोग होता ! राजयोग पुष्कळ लोकांच्या कुंडल्यांत दृष्टीस पडतात, पण ते राजे नसतात, हें कुंडल्या पाहणारांस माहित आहेच. ह्मणून राजयोग ह्मणजे राज्यप्राप्तीचा योग असा अर्थ करून चालणार नाहीं. मनुष्याला राजयोग असेल तरच त्याचें आयुष्य महत्वाचें होईल.

सत्ता, अधिकार, हुकूम चालविणें, राजाकडून किंवा लोकांकडून मान, ऐश्वर्य, संपत्ति इ० गोष्टी, राजयोगाशिवाय प्राप्त व्हावयाच्या नाहींत. दरमहा ४ रुपये पगाराचा पोलीस पाटील जरी असला तरी तो अधिकारी असल्यामुळें त्याला राजयोग हा असलाच पाहिजे. समाजावर हुकमत चालविणारा व समाजांत तेजस्वी वृत्तीनें व्यवहार करणारा मनुष्य राजयोगी होय. राजयोगाची व्याप्ति मोठी आहे, व त्याचें वर्णन करणेंही बरेंच कठीण आहे.

राजयोगांत धनयोगाचा अंतर्भाव होतो. परंतु धनयोगांत राजयोगाचा अंतर्भाव होऊं शकत नाहीं. धनयोगांत अधिकार किंवा हुकमत नसते. पुष्कळ व्यापारी श्रीमंत असतात, पण जो राजयोग सामलेदाराला असेल, तो त्याला असणें शक्य नाहीं. ना. दादाभाई नवरोजी लो. टिळक, बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी इ० माणसें राजयोगी आहेत. त्याचप्रमाणें कायदे कौन्सिलचे सभासद व्हाईस प्रेसिडेंट, प्रेसिडेंट, चेअरमन कोणत्याही ऑफिसांतील मुख्य अधिकारी, हायकोर्टातील जज्ज वगैरे माणसेंही राजयोगीच होत. दिवाण, सर, डॉक्टर, रावसाहेब, रावबहादूर वगैरे हुद्दे सरकारांतून ज्यांस मिळतात, त्यांचाही समावेश राजयोगांतच होतो यावरून राजयोगाची कल्पना वाचकांस होईल. आतां राजयोग कसे उत्पन्न होतात, यांचा विचार करूं.

लग्न, चतुर्थ, दशम व त्रिकोण [नवपंचम] हीं राजयोगांतलीं मुख्य स्थानें आहेत. कुंडलींतल्या १० व्या स्थानास राज्य ही संज्ञा आहे. तरी या स्थानांप्रमाणेंच वरील स्थानेंही राजयोग उत्पन्न करितात. हीं स्थानें पुढील गोष्टींनीं राजयोग करितात.

१ या स्थानांत एक अथवा अनेक उच्च ग्रह.

२ या स्थानांत एक अथवा अनेक स्वगृहीं ग्रह.

३ या स्थानांत एक अथवा अनेक मूलत्रिकोणीं ग्रह.

४ या स्थानांत एक अथवा अनेक मित्रक्षेत्रीं ग्रह.

५ या स्थानांपैकीं एकांत किंवा अनेकांत सर्व अथवा बरेच ग्रह.

६ या स्थानांपैकीं कोणत्याही दोन अथवा अधिक स्थानांचे स्वामी एकत्र किंवा एकमेकांच्या दृष्टींत.

७ ग्रह एकमेकांपासून वरील स्थानांत असतांही राजयोग होतो.

जितके योग अधिक तितका राजयोग बलवान् जाणावा. जेव्हां एखादा ग्रह शत्रुग्रहानें युक्त किंवा दृष्ट असतो, तेव्हां तो राजयोग करीत नाहीं. राजयोगदर्शक स्थानांत कर्क आणि सिंह राशींची योग्यता विशेष असे. त्याचप्रमाणें या राशींत रवि, चंद्र व गुरु असतां ते विशेष बलवान् असतात असें समजावें. ग्रह नीच असतांही राजयोग होतो, पण तो दुर्बल होय. त्या राजयोगांत स्वातंत्र्य व तेजस्विता कमी असेल. ७ व्या पुस्तकाचा ६ वा अंक पहा. त्यांत महाराज शिंदे सरकार व त्यांची पत्नी यांच्या कुंडल्या आहेत. महाराजांच्या लग्नीं कर्क राशि असून चतुर्थ स्थानीं रवि, बुध व मंगळ हे ग्रह आहेत. नवम स्थानीं शनि आणि राहु हे ग्रह आहेत, व सिंह राशींत हर्शल आहे ! हीच कुंडली चंद्रापासून मांडिल्यास पुढील प्रमाणें होते.



यांत भाग्यस्थानाचा अधिपति गुरु हा लग्नस्वामीसह स्वगृहीं आहे. दशमाचा स्वामी मंगळ हा धनपति जो रवि त्यासह केंद्रीं आहे. हे सर्व राजयोग आहेत.

राणीसरकारच्या कुंडलींत सिंह राशीचा चंद्र लग्नीं आहे. भाग्यस्थानीं शनि व गुरु हे ग्रहमालेंतील दोन मोठे गोल आहेत. दशमाचा स्वामी शुक्र, भाग्यस्वामी मंगळ, लग्नस्वामी शुक्र व धनेश बुध हे चार ग्रह एकत्र आहेत. या प्रमाणें राजयोग झालेले आहेत.

धनयोगांत लग्न द्वितीय, भाग्य व लाभ हीं स्थानें विचारांत घ्यावयाचीं, व पुढील प्रमाणें या स्थानांतील ग्रहांवरून धनयोग पहावयाचे.

१ एक अथवा अनेक उच्च ग्रह

२ एक अथवा अनेक स्वगृहीं ग्रह

३ एक अथवा अनेक मूलत्रिकोणीं ग्रह.

४ एक अथवा अनेक मित्रक्षेत्री ग्रह.

५ या स्थानांपैकीं एकांत किंवा अनेकांत सर्व अथवा बरेच ग्रह.

६ या स्थानांपैकीं कोणत्याही दोन अथवा अधिक स्थानांचे स्वामी एकत्र किंवा एकमेकांच्या दृष्टींत.

७ या स्थानांचे स्वामी एकमेकांच्या राशीस

८ ग्रह एकमेकांपासून वरील स्थानीं असतांही धनयोग होतो.

जितके अधिक योग असतील, तितका धनयोग बलवान् जाणावा. जेव्हां एखादा ग्रह शत्रुग्रहानें युक्त किंवा दृष्ट असतो तेव्हां तो धनयोग करीत नाहीं. ग्रह नीच असतांही धनयोग होतात, पण दुर्बल जाणावे.

धनयोगांस दारिद्र्ययोग प्रतिबंधक आहेत, ह्मणून त्यांचा विचार पुढें करूं. जर धनयोग कमी व दारिद्र्ययोग अधिक असतील तर तो मनुष्य जेमतेम निर्वाह करील. धनयोगापेक्षां दारिद्र्ययोग कमी असतील तर तो मनुष्य चार पैसे बाळगून असेल. धनयोग व दारिद्र्ययोग समान असतील तर त्याला निर्वाहास अडचण पडणार नाहीं. दारिद्र्ययोग मुळींच नसतील तर तो मोठा श्रीमंत जाणावा. धनयोग होराकुंडलीवरूनही कळतो. याबद्दल मागें एका अंकांत सांगितलेलें आहे. लग्न आणि होरा या दोन्ही कुंडल्या जर धनयोग दाखवितील तर तो मनुष्य खात्रीनें श्रीमंत आहे, असें जाणावें. केवळ होराकुंडलीवरून श्रीमंतीचा बोध होईल, असें नाहीं. लग्नकुंडली मुख्य व होराकुंडली साह्यकारी आहे, असें समजावें.

धनयोग



ही कुंडली गणेश दामोदर प्रधे यांनीं पाठविली आहे, व ती सायन आहे. या गृहस्थांनीं स्वतः एक **लाखाची** कमाई केली आहे. धंदा मक्तेदारीचा. धन स्थानीं धनु [९] हा राशि उदित असून त्याचा स्वामी गुरु हा राज्यभुवनांत सिंह राशींत आहे. भाग्यस्थानीं कर्क [४] राशि उदित असून त्याचा स्वामी चंद्र सप्तमांत [हें स्वतंत्र धंद्याचें स्थान आहे] उच्च आहे.

हा दुसरा धनयोग झाला आहे. सप्तमेश शुक्र हा भाग्यस्वामीसह स्वगृहीं आहे, हा तिसरा धनयोग आहे. लाभस्वामी बुध व राज्यस्वामी रवि हे दोन्ही ग्रह कर्क राशींत भाग्यस्थानीं आहेत, हा चवथा धनयोग आहे. लग्नस्वामी मंगळ मेष राशींत षष्ठस्थानीं असल्यामुळें बलवान् आहे. मंगळ षष्ठ स्थानीं बलवान् असतो. लाभ स्थानीं राहू कन्येंत स्वगृहीं आहे, हा पांचवा धनयोग आहे. पराक्रम व सुख या स्थानांचा अधिपति जो शनि तो गुरुगृहीं त्रिकोणांत आहे व तो चंद्राच्या एकादश [लाभ] स्थानीं आहे, हा सहावा धनयोग आहे. याप्रमाणें या कुंडलींत सहा प्रकारचे धनयोग झाले असल्यामुळें स्वसामर्थ्यानें एक लाखाची इष्टेट मिळविली.

दशमांत गुरु असल्यामुळें यांस लोकांत चांगला मान मिळतो. शुक्र बलवान् असल्यामुळें मापें घेणें व नकाशे काढणें हेही गुण आहेत !

(२)



ही कुंडली पहा. हींत लग्नस्वामी शुक्र धनस्थानीं आहे, हा पहिला धनयोग. धनस्वामी मंगळ हा भाग्यस्वामी जो बुध त्यानें युक्त असा चतुर्थ स्थानीं आहे, हा दुसरा धनयोग. चतुर्थेश शनि हा भाग्यस्थानीं असून चतुर्थेश व भाग्येश हे अन्योन्य क्षेत्रीं आहेत, हा तिसरा धनयोग. दशमाचा अधिपति चंद्र हा सिंह राशींत गुरुसह लाभ स्थानीं आहे, हा चवथा धनयोग. लाभस्वामी रवि हा पराक्रम स्थानीं असून पराक्रम स्वामी गुरु हा लाभस्थानीं आहे, असे ते अन्योन्यक्षेत्रस्थ आहेत, हा पांचवा धनयोग आहे. याप्रमाणें या कुंडलींत पांच विनतोड धनयोग झालेले आहेत. हे गृहस्थ गर्भश्रीमंत असून स्वतः व्यापार करितात. हे दत्तक

*

आहेत. कुटुंब मोठें असून त्याचें सुख चांगलें आहे. रवीसमोर शनि व चंद्रावर शनीची दृष्टि असून चतुर्थ स्थानीं मंगळ आहे, हा दत्तकयोग आहे.

[३]



या कुंडलींत धनयोग पहा.— लग्नेश शनि चतुर्थ स्थानीं मित्र–क्षेत्रीं आहे. हा पहिला धनयोग. धनस्थानचा अधिपति गुरु हा भाग्यस्थानीं चंद्रासह आहे, हा दुसरा धनयोग. चतुर्थेश शुक्र हा लाभ स्थानीं आहे, हा तिसरा धनयोग. भाग्येश तोच चतुर्थेश असून तो लाभस्थानीं व लाभस्वामी गुरु हा भाग्यस्थानीं असे हे अन्योन्य क्षेत्रीं आहेत, हा चवथा धनयोग. लाभ. स्थानीं तीन व भाग्यस्थानीं दोन मिळून पांच ग्रह उदितार्धांत आहेत, हा पांचवा धनयोग. असे पांच धनयोग झाल्यामुळें या गृहस्थांनीं एक लाखांची इष्टेट मिळविली आहे ! धंदा सावकारी. या कुंडलींत पराक्रम आणि दशम यांचा स्वामी मंगळ हा नीच आहे, हें या कुंडलीला न्यून आहे. जर हा मंगळ इतर ग्रहांप्रमाणें बलवान् असता, तर अगणित संपत्ति प्राप्त झाली असती परंतु तसा ईश्वरी संकेत नाहीं. म्हणूनच मंगळ नीच असतां जन्म झाला असें झटलें पाहिजे. नवमांत गुरुचंद्र व लाभस्थानीं तीन ग्रह असतां मंगळ नीच असला तरी लक्षाधीश मनुष्य बनतो, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. या कुंडलींत मिथुन राशींत पंचम स्थानीं राहु उच्च आहे. म्हणून मंगळाशिवाय सर्व ग्रह मनुष्यास मोठेपणा देणारे पडले आहेत, कित्येक वृषभ राशीचा राहु उच्च मानितात. आम्हांस मिथुनेच्या राहूचें उच्चत्व विशेष अनुभवास येत.

(४)



ही कुंडली पहा. हींत धनेश शुक्र हा चतुर्थस्थानीं आहे, हा पहिला धनयोग. लग्नेश लग्नीं चतुर्थेशानें युक्त आहे, हा दुसरा धनयोग. भाग्येश गुरु लाभस्थानीं आहे, हा तिसरा धनयोग. दशम व एकादश यांचा स्वामी शनि उच्च असा अस्तकेंद्रीं आहे, हा चवथा धनयोग. पराक्रमाचा स्वामी बुध हा स्वगृहीं आहे, हा पांचवा धनयोग. याप्रमाणें या कुंडलींत पांच धनयोग झाले असल्यामुळें या गृहस्थांनीं स्वतः दीड लाखांची इष्टेट संपादन केली आहे ! या कुंडलींत ६ ग्रह केंद्रीं आहेत व गुरु लाभ स्थानीं आहे. दशमाधिप शनि उच्च असून लग्नेश मंगळ स्वगृहीं आहे म्हणून पूर्वी संस्थानांत नोकरी व नंतर सावकारी करून इतकें धन त्यांनीं मिळविलें.

[५]



ही कुंडली पहा– या गृहस्थांच्या वडिलांची नऊ लाखांची इष्टेट होती हल्लीं १।२ लाख राहिली आहे. धंदा व्यापार व सावकारी. लोकमान्य आहेत. प्रकृति अशक्त. धर्मश्रद्धा चांगली आहे. धन स्थानचा अधिपति शनि व लाभ स्थानाचा स्वामी मंगळ यांचा योग तृतीय स्थानीं आहे. दशमाचा स्वामी शुक्र सिंह राशींत अष्टमस्थ आहे. भाग्य स्वामी बुध सप्तमांत आहे. हे सर्व धनयोग आहेत, परंतु ते दुर्बल आहेत, म्हणून नऊ लाखांची इष्टेट १।२ लाखांवर येऊन ठेपली आहे ! व्यय स्थानीं गुरु आहे, म्हणून धर्मश्रद्धा आहे.

वरील सर्व कुंडल्या रा. ग्रंथे

यांजकडून आलेल्या आहेत, व त्या सर्व सायन आहेत. यावरून धनयोग कसे असतात, याची वाचकांस कल्पना होईल.

रा. गुप्ते [उमेदपुरा-बडोदें] यांजकडून एका असिष्टंट कलेक्टरची कुंडली आली आहे, ती अशी—

जन्म—ता. ४ मे १८६१ दि.
१० वा. १२ मि.
सायन.





भाग्यस्वामी गुरु असून तो सिंह राशींत धनस्थानीं आहे! शनि पराक्रम स्थानीं आहे. उदित अर्धीत ७ ग्रह आहेत! लग्नस्वामी चंद्र भाग्यस्थानीं आहे. दशमांत बुध असून दशमाधिपति मंगळ हा बुधाच्या क्षेत्रीं आहे. म्हणजे बुधमंगळ हे अन्योन्य क्षेत्रीं आहेत! लग्न कर्क राशीचें आहे. लाभस्वामी शुक्र हा स्वगृहीं धनस्वामीनें युक्त आहे. याप्रमाणें या कुंडलींत धनयोग व राजयोग झाले आहेत.

राजयोग आणि धनयोग

जन्म—शके १७५६ ज्येष्ठ व. १४ शनिवार
सू. नं. ध. ५२ प. २०
ता. ५ जुलई सन १८३४

निरयन सायन





सदरहू कुंडली आमच्या वर्गणीदारांपैकीं एकानें पाठविली आहे. या गृहस्थाची हकीगत अशी आहे.—

जन्म गरीब स्थितींत झाला. वडील पलटणींत हवालदार होते. या गृहस्थांस प्रथम दरमहा ४ रु. ची सरकारी नोकरी वयाच्या १३व्या वर्षी लागली. स्वपराक्रमानें, मेहनतीनें व विश्वासूपणानें पेनशन घेईपर्यंत त्याच खात्यांत दरमहा चारशें रुपये पगार झाला होता. व त्याच जागेवरून पेनशन घेतलें. पेनशन घेतल्यानंतर स्वस्थ न बसतां अफूचे मक्ते व अपकारी मक्ते दहा वर्षें केले. व त्यांत पैसा पुष्कळ मिळविला. हल्लीं लाखों रुपयांची इष्टेट इनाम व खोती गांव वगैरे आहेत. वाडिलार्जित कांहीं नव्हतें. इंग्रजी अभ्यास नोकरी लागल्यानंतर केला. व त्यांत एखाद्या बी. ए. स बोलण्यांत व लिहिण्यांत मागें काढितील. शिवाय मराठी, गुजराथी, व कानडी या भाषा चांगल्या येतात. याचा वडि-

लार्जित गांव मद्रास इलाख्यांत मंगळूर जिल्ह्यांत होता. परंतु यांचे वडील रत्नागिरी जिल्ह्यांत येऊन राहिले. जायासुख उत्तम. एक चिरंजीव कष्टम खात्यांत असिष्टंट कलेक्टर आहेत. तीन मुलगे व एक मुलगी अशीं त्यांस अपत्यें आहेत. कुटुंब मोठें आहे.

आतां या गोष्टींचा कुंडलीशीं मेळ कसा बसतो याचा विचार करूं. चतुर्थस्थानीं सिंह राशींत बुध व शुक्र हे जवळ जवळ आहेत. यांत शुक्र हा लग्नेश व बुध धनेश आहे. हा राजयोग व धनयोग आहे. त्यामुळें चारशें रुपये पगाराची योग्यता प्राप्त झाली. धन व कुटुंब स्थानीं गुरु व चंद्र आहेत. यांत लाभस्वामी आहे. त्यामुळें मक्के वगैरे करून लाखों रुपयांची इष्टेट मिळविली. कुटुंब मोठें असण्यासही हेंच कारण आहे. पराक्रमस्थानीं रवि व राहु असून शत्रुस्थानीं शनि उच्च आहे व तनुस्थानीं मंगळाचें प्राबल्य आहे, म्हणून लष्करी खात्यांत नोकरी झाली. बुद्धिस्थानीं मिथुन या शाब्दिय राशीचा गुरु असल्यामुळें अनेक भाषांचा अभ्यास झाला. कुटुंबस्थानीं गुरुचंद्रयोग असल्यामुळें जरी तनुस्थानीं मंगळ आहे, तरी द्विभार्यायोग न घडतां एकाच स्त्रीचें सुख चांगलें मिळालें. दशमस्थानीं कुंभ राशीचा हर्शल आहे व दशम व भाग्य यांचा स्वामी शनि उच्च असल्यामुळें गर्सब स्थितींत जन्म झाला असतांही मोठी योग्यता व श्रीमंती प्राप्त झाली. याप्रमाणें सायन कुंडलीवरून वस्तु स्थितीशीं मेळ बसत आहे. निरयन कुंडलींत हा मेळ बसत नाहीं.

गरीब स्थितींत जन्मलेल्या मनुष्यांचे ग्रह जर अनुदित गोलार्धांत बलवान् असतील तर तीं मनुष्यें उत्तर वयांत सुखी होतात. परंतु त्यांस जर उदित गोलार्धांत ग्रह पडले असतील, तर तीं पूर्व वयांतच नशीब काढितात, असा अनेक ठिकाणीं अनुभव आलेला आहे. वाचकांनीं या गोष्टींचा विचार करावा.

मासफल

[संपादक माधव पांडुरंग जोशी—एरंडोल]

आश्विन व कार्तिक

सांबव पांडुरंग जोशी देशकाल वर्तमान पत्राचे मालक एरंडोल यांचें आश्विन महिन्याचें भविष्य, व कार्तिक महिन्याचें भविष्य.

ज्योतिर्विद रा. रा. विष्णु गोपाळ नवाथे मु. महाड आपले जगमान्य दाशाहिक पुस्तकांत या पाठविलेल्या आश्विन व कार्तिक महन्यांच्या भविष्यास जागा मिळेल अशी अशा आहे.

मेष, सिंह, कन्या, धन या राशींतील लोकांस हा महिना बहुत सुखावह व लाभप्रद जाईल.

(२) वृषभ, तूळ, वृश्चिक या राशींचे लोकांस हा महिना मध्यमच जाणार आहे. (३) मिथुन, कर्क, मकर, कुंभ व मीन या राशीचे लोकांस हा महिना बहुत कष्टप्रद जाणार आहे. आश्विन महिन्यांत पांच मंगळवार येत आहेत. त्यांचें फल:— राजा प्रजेवर वक्र दृष्टि करील. हिंदुस्थानच्या बहुतेक भागांत धान्याची महर्गता होईल. उत्तरेकडील व पूर्वेकडील प्रजा प्रपीडीत राहील. ग्रेग राज वक्रदृष्टी करून ज्या गांवचें आद्य अक्षर—क, छ, घ, ह, ड,त. न, य, भो, ज, ख, ग, स, द, हें असेल त्या गांवांस विशेष त्रास होईल. आश्विन मासांत त्रयोदशी शनिवारीं असून सूर्यही पुढील राशींस गमन करितो. व शुद्ध पक्षांत शुक्रास्तही आहे. व शनीही वक्री झालेला आहे. सबब ज्वारी, बाजरी. गहू, तुरीचीडाळ, हरबऱ्याचीडाळ व तेल ह्या वस्तु फार महागतील. चाऱ्याची दुर्भिक्षता भासूं लागेल. तूप मात्र स्वस्त राहील. (साधारण) राष्ट्रीय सभे संबंधानें जरी वादविवाद होऊन आश्विन महिन्याचे अखेरीस प्रसिद्ध केल्या प्रमाणें राष्ट्रीय सभेचें अध्यक्ष स्थान ब्राह्मणासच मिळेल. बंगाल्यांत व पंजाबांत अस्वस्थता थोडी कमी होईल. बंगाल्यांतील एक, पंजाबांतील एक, मुंबई इलाख्यांतील एक, अशीं तीन रत्नें गमवतील. महर्गतेमुळें लोकांचें मन फारच अस्वस्थ राहील. प्रजा व

राजा या दोघांसही हा महिना कष्टप्रद जाईल. आश्विन महिन्यांत शु० ४।७।११।१३ या दिवशीं पावसांचे योग आहेत. निदान या दिवसांपैकीं शु० १५ पौर्णिमेपर्यंत दोन दिवस तरी पाऊस आल्यावांचून राहणार नाहीं बहुकृषींचें मतें या आश्विन माहन्यांत पाऊस यावा असें आहे. यावरून वरील पावसाचा योग निश्चित केला आहे. आश्विन माहन्यांत धान्यादिकांच्या व्यापाऱ्यांनीं बहुत धान्य खरेदी करण्याची हाव धरूं नये. बहुत हाव धरल्यास ते पुढ फशी पडतील. खरेदी व विक्री या महिन्यांतच झाली पाहिजे. आश्विन महिन्यांत चोऱ्यांचें विशेष प्राबल्य वाढेल. व लहान मुलांस डव्याचा [तुंतुनीचा] आजार उत्पन्न होऊन बरींच मुलें गमवतील. येणें प्रमाणें आश्विन महिन्याचें भविष्य आहे-

[१] मेष, वृषभ, सिंह, धन, ह्या राशींतील लोकांस कार्त्तिक महिना बहुत सुखावह जाईल. (लाभप्रदही होईल.) [२] कन्या, तूळ, व मकर या राशींचे लोकांस हा महिना मध्यमच जाणारें आहे [३] मिथुन, कर्क, वृश्चिक, कुंभ, मीन, या राशींचें लोकांस हा महिना बहुत कष्टप्रद जाईल.:— ज्या गांवचें आद्य अक्षर क, घ, ङ, छ, ह, प, म, तो, न, य, गु, गे, गो, स, द, झ, थ, या गांवास आश्विन पेक्षां प्लेगचा अम्मल करडा बसेल. कार्त्तिक महिन्यांत पांच बुधवार पांच गुरुवार येत आहेत. याचें फल शुभ आहे. व धान्यादिकांचे भाव उतरतील. या महिन्यांत शस्त्रक्रियेनें अपघात होण्याचा संभव आह. व इतर अपघातही होतील. कुंभ, कर्क वृश्चिक, कन्या, वृषभ, या राशींचें लोकांस हा महिना बहुत कष्टप्रद जाणार आहे. वातादिकांचे प्रकार, प्लेग, शस्त्रापासून भय, अग्निभय, चौरभय, हे वरील राशींचे लोकांस होण्याचा संभव फार आहे. करितां वरील राशीच्या लोकांनीं फारच दक्षतेनें वागावें. तरी मंगळाची आराधना करावी. या माहिन्यांत गुरांचे गर्भपात फार होतील. व म्हशी दूध फार देतील. मुंबई इलाख्यांतील एक, ब्रह्मांडांतील एक व गुजराथेंतील एक असे तीन प्रसिद्ध पुरुष गमवतील. मुंबई इलाख्यांतील एका संस्थानिकावर सरकारची वक्र दृष्टि होईल. त्यामुळें त्यांची फारच नुकसानी होईल. येणें प्रमाणें कार्त्तिकांचें भविष्य आहे.

पत्रव्यवहार.

ज्योतिर्विद कुंडलीविज्ञानकर्ते यांसी सा. न. वि. वि.

द्रव्ययोग व राजयोग त्यांसंबंधीं कांहीं निवडक श्लोक ग्रंथांतून घेऊन प्रसिद्धीकरितां पाठविले आहेत त्यांस मर्जीनुरूप सवडीनें स्थल अवश्य मिळावें.–

॥ द्रव्ययोगः ॥

सूर्याद्द्वितीयं शुभखेटयुक्तं ।
लग्नालयं स्याच्च निजांशयुक्तम् ॥
केंद्रं भवेत् सद्विहगान्वितंच ॥
जातस्तदा स्याद्धनवान् सुखीच ॥ १ ॥
लग्नाधिनाथो धनभावसंस्थो ।
धनालयेशो द्विजराजयुक्तः ।
द्वितीयगेहं भृगुणा च दृष्टं ।
तदा नरः स्याद्धनवान् सुखीच ॥ २ ॥
यदा तुंगं प्राप्तो भवसदनपश्चार्थनिलयं ।
युतं वा दृष्टं वा भवति गुरुणा शुक्रसहितम् ॥
यदा वा लाभेशो भृगुजसहितोऽगं गुरुयुतम् ।
तदा श्रीयोगः स्वं स्वगृहपतिदृष्टं च भवति ॥३॥

॥राजयोगः॥

तुंगे रवौ कुजयुते भवगेऽगगे वा ।
सौरौ द्युने धनगते च निशाधिनाथे ॥
अंबागृहे सुरगुरौ भृगुनंदने वा ।

राहौ तृतीयभवने च नरो नृपः स्यात् ॥१॥
उच्चे तनौ सुरगुरौ दशमेऽजगेने ।
लाभंगतेषु भृगुचंद्रज चंद्रमःसु ॥
वेंदौ वृषोदयगते रिपुगे शनौवा ।
जीवेर्थगे भवगतेषु परेषु भूपः ॥२॥
कन्योदये विधुसुते दशमे सिते च ।
जामित्रमंदिरगतौ यदि चंद्रजीवौ ॥
भौमेन पुत्रसहिते तनयालयेच ।
प्राप्नोति राजपदवीं मनुजो जगत्याम् ॥३॥
नक्रोदये रविसुते सहजे च चंद्रे ।
भौमे रिपौ व्ययगते च सुरौ शुभे ज्ञे ॥
किंवाजलग्नगइने हयगे गुरौच ।
कामे घटेतशनि युते नृपोवा ॥ ४ ॥
स्वोच्चाश्रितेषु बुधगीष्पतिचंद्रमस्तु ।
मत्स्यालये शिखिनि भूमिपतेः पदाप्तिः ॥
चापे गुरौच घटराशिगते शनौ वा ।
जूके कवौच यदि सिंहगसैंहिकेयः ॥ ५ ॥
कोदंडे सूर्य पुत्रेच नक्रगे भूमिनंदने ।
कन्याभिथुनकुंभेते राहौ जातो भवेन्नृपः ॥ ६ ॥
कुजसूर्यौ स्वराशिस्थौ केतुश्चापेच कुर्वते ।
महीपतिपदप्राप्तिं सर्वसौख्यप्रदायिनीम् ॥ ७ ॥
चंद्रेज्यौ तुंगयातौ सुतगृहभृगुर्विक्रमे मंगलश्च ।
मंदेंदूचौ चलग्नं निजपति दृगितं पंचमस्थः कविर्वा ॥
किंवा धर्मेच शुक्रो दशमगत कुजः स्वोचगौ विच्छनीचा





वरील दोन्हीं कुंडल्यांत सामान्य नियम सोडलेला आहे. पहिलींत पंचमाधिपति रवि व नवमाधिपति गुरु असून त्यांचा संबंध वगळलेला आहे, त्याच प्रमाणें दुसरींत पंचमाधिपति गुरु व नवमाधिपति चंद्र यांचाही संबंध वगळलेला आहे.

पहिलींत शुक्र हा धनाधिपति, शनि लाभस्वामी व बुध तृतीयेश आहे. यांत बुध षष्ठेशही असल्यामुळें व तृतीय स्थानावर धनाचा विचार होत नसल्यामुळें निरर्थक दिसत आहे. चतुर्थ स्थानीं शनि दुःख व दारिद्र्य उत्पन्न करीत असल्यामुळें त्या ठिकाणीं असतां जरी लग्नस्वामीवर दृष्टियोग घडत असला तरी व्यर्थ आहे. तो लाभस्थानीं उत्तम व सप्तमांत मध्यम प्रकारें धनयोग करील हें उघड आहे.

या योगांत गुरु हा पंचमाचा व मंगळ हा नवमाचा अधिपति असतो. हे दोन्ही ग्रह रवीचे मित्र आहेत. म्हणून ते रवीशीं लग्नीं युति करितील अगर दृष्टि करितील तर तो उत्तम प्रकारचा धनयोग होतो. या योगावरून एक सामान्य नियम असा निघतो कीं, लग्नेश लग्नांत असून तो पंचम व नवम यांच्या (त्रिकोणांच्या) अधिपतीनें युक्त अथवा दृष्ट असेल तर तो मनुष्य मोठा श्रीमंत होईल असें समजावें.

चंद्रक्षेत्रगते चंद्रे तस्मिन् चंद्रयुते यदि ॥
जीवभौमयुते यस्तु दृष्टेर्जातो धनी भवेत् ॥

अर्थ.—लग्नीं कर्क राशीचा चंद्र असून तो गुरु व मंगळ यांनीं युक्त अथवा दृष्ट असेल तर तो मनुष्य चांगला श्रीमंत होतो. जसें—



वरील कुंडलीकडे लक्ष द्या. हा योग वरील रवीच्या योगासारखाच आहे. कारण, गुरु हा नवमाचा व मंगळ हा पंचमाचा अधिपति आहे.

भौमक्षेत्रगते लग्ने तस्मिन्भौमयुते यदि ॥
सोमशुक्रार्कजै र्युक्ते दृष्टे श्रीमान्नरो भवेत् ॥

अर्थ.—मंगळ हा मेष अगर वृश्चिक राशींत लग्नीं असून तो बुध, शुक्र व शनि यांनीं युक्त अथवा दृष्ट असतां मनुष्य श्रीमंत होतो. जसें.—

पंचमे तु गुरुक्षेत्रे तस्मिन्गुरुयुते यदि ॥
लाभे तु चंद्रभौमौ चेद्बहुद्रव्यस्य नायकः ॥६

अर्थ.—पंचम स्थानांत धनु अगर मीन राशींत गुरु असून लाभस्थानीं चंद्र व मंगळ एकत्र असतील तर श्रीमंत होतो.





पहिल्या कुंडलींत मंगळ हा भाग्य आणि चतुर्थ स्थानाचा अधिपति असून तो लाभस्थानीं आहे. दुसऱ्या कुंडलींत मंगळ हा लग्नेश व षष्ठेश असून चंद्र हा भाग्येश आहे. दोन्ही कुंडल्यांत भाग्येश लाभस्थानीं आहे. अशा प्रकारचा हा धनयोग आहे.

भानुक्षेत्रगते तस्मिन् लग्ने भानुस्थिते यदि ॥
भौमेन गुरुणा युक्तो दृष्टिर्वा स्याद्युतो धनी ॥

अर्थ.—लग्नीं सिंह राशीचा रवि असून तो मंगळानें किंवा गुरूनें युक्त अथवा दृष्ट असतां मनुष्य धनवान् होतो. जसें.—





यांत गुरु हा भाग्यस्वामी असून लाभस्थानीं असल्यामुळें विशेष बलवान् आहे. हा योग फारच श्रेष्ठ झाला आहे.

पंचमे तु शनिक्षेत्रे तस्मिन् शनियुते यदि ।
लाभे भौमेन संयुक्ते बहुद्रव्यस्य नायकः ॥ ९

अर्थ.—पंचमांत शनि स्वगृहीं असून लाभस्थानीं मंगळ असेल तर मनुष्य पैसेवाला होईल. जसें.—



यांत मंगळ हा धनभावाधिपति आहे व तो लाभ स्थानीं सिंह राशींत आहे. सिंह राशींत मंगळ बलवान् असतो. शनि हा स्वगृहीं असून केंद्र व कोण यांचा अधिपति आहे. त्यामुळें हा श्रीमंतीचा योग झाला आहे. दुसरा योग कन्या लग्नावरही होतो, पण तो बलवान नाहीं. कारण, त्यांत शनि हा षष्ठेश व मंगळ हा अष्टमेश होतो.

अर्थ.—पंचमांत शनीच्या गृहीं (मकर अगर कुंभ राशींत) शनि असून लाभस्थानीं बुध असतां मनुष्य पुष्कळ धनवान् होतो.

या श्लोकाच्या दुसऱ्या अर्धांत जें 'वा' पद आहे तें परंपरेवरून निरर्थक आहे असें वाटतें. या योगाच्या कुंडल्या पुढील प्रमाणें होतात.—

१ २





पहिल्या कुंडलींत बुध लग्न व राज्य यांचा अधिपति लाभ स्थानीं आहे हें ठीक आहे. पण तो कर्क राशींत शत्रुगृही आहे. व शनि हा षष्ठेश आहे. म्हणून हा धनयोग सामान्य झाला आहे. दुसऱ्या कुंडलींतील योग त्या पेक्षां पुष्कळ चांगला आहे. कारण बुध हा भाग्येश असून शनि हा चतुर्थेश आहे. सिंह राशींत बुध व कुंभ राशींत शनि हे विशेष बलवान् असतात.

पंचमे तु रविक्षेत्रे तस्मिन् रवियुते यदि ॥ ४
लाभे रवींदुपूज्यस्थैः बहुद्रव्यस्य नायकः ।

अर्थ.—पंचमांत रवि हा स्वगृहीं असून लाभस्थानीं गुरु असेल तर श्रीमंत होतो.

यांतील तिसऱ्या चरणाचा अर्थ कांहींच होत नसल्यामुळें संदर्भावरून गुरु असा अर्थ केला आहे. जसें.—

चरणाचा अर्थ हाच असेल असें परंपरेवरून दिसत नाहीं. आमच्या मतें " पंचमांत बुधाच्या राशीस (मिथुन अगर कन्या या राशीस) बुध असेल " असा अर्थ करावा. जसें—



यांत बुध हा फारच बलवान् आहे. कारण, तो धनाधिपति असून आपल्या उच्चांत आहे. चंद्र व मंगळ हे परस्पर मित्र असून लाभस्थानीं गुरुगृहीं मित्रक्षेत्रीं आहेत. ह्मणून हा धनयोग चांगल्यापैकीं झाला आहे.

दुसरा योग कुंभ लग्नावर होतो. जसें.—



हा योग आमच्या मतें कमी योग्यतेचा आहे. कारण, चंद्र हा षष्ठेश आहे व बुध हा अष्टमेश आहे. ह्मणून या योगाचें महत्व वरच्या पेक्षां पुष्कळ कमी मानलें पाहिजे.

पंचमे तु शनिक्षेत्रे तस्मिन्सूर्यसुते यदि ॥३
लाभे सोमात्मजस्थे वा बहुद्रव्यस्य नायकः ।

या योगांत मकर लग्न उदित असतें, ह्मणून लग्नस्वामी शनि आहे. व धनस्थानीं कुंभ राशि असल्यामुळें त्याचाही स्वामी शनिच आहे. याप्रमाणें लग्न व धन यांचा अधिपति हा लाभस्थानीं स्थित झाल्यामुळें तो अनेक प्रकारचे धनलाभ करण्यास समर्थ झाला आहे. आणि शुक्र हा दशमाचा ह्मणजे राज्यभुवनाचा अधिपति असून तो त्रिकोणांत स्वगृहीं आहे व तेथून लग्नधनाधिपतीला पूर्ण दृष्टीनें पाहत आहे. ह्मणून हा मोठ्या श्रीमंतीचा योग झाला आहे.

हा योग मिथुन लग्नींही होतो. जसें.—



राशिपरत्वें विचार केल्यास हा योग बलवत्तर दिसत नाहीं. कारण यांत शुक्राला व्ययस्थानचें आधिपत्य असून शनीला अष्टमाचें आधिपत्य आहे. शिवाय मेष राशींत शनि नीच असल्यामुळें दुर्बळ आहे. तथापि तो नवमाचा ह्मणजे भाग्यभुवनाचा अधिपति असून शुक्र हा पंचमाचा अधिपति आहे व ते समोरासमोर आहेत ह्मणजे त्रिकोणांचे अधिपति समोरासमोर आहेत हा योग अगदींच कमी योग्यतेचा नाहीं.

पंचमे सौम्यनक्षत्रे तस्मिन्सौम्ययुते यदि ॥ २
लाभे च चंद्रभौमौ तु बहुद्रव्यस्य नायकः ।

अर्थ.—पंचम स्थानीं शुभ नक्षत्रीं शुभ ग्रह असून लाभ स्थानीं चंद्र व मंगळ हे एकत्र असतील तर तो मनुष्य श्रीमान् होतो. पाहिल्या

धनयोग.

धनयोग हा परिभाषिक शद्ब आहे. ज्याला आपण श्रीमंत ह्मणतों त्याच्या कुंडलींत जो संपत्तिदर्शक योग असेल तोच धनयोग समजावयाचा. कोट्याधीश, लक्षाधीश व जे निदान १० हजारांचे तरी मालक आहेत त्यांसच आपण श्रीमंत ह्मणतों. ह्मणून धनयोग पहावयाचे असतील तर त्यांच्याच कुंडल्यांत पाहिले पाहिजेत. आपल्या श्रीमंतीची मर्यादा किती आहे हें जर निश्चित करावयाचें असेल तर आपली कुंडली वरील श्रीमंत लोकांच्या कुंडल्यांशीं ताडून पाहिली पाहिजे. जातक ग्रंथांत जे धनयोग सांगितलेले आहेत ते आमच्या मतें असल्याच श्रीमंत लोकांचे आहेत. प्रत्येक मनुष्य धन मिळवीतच आहे, ह्मणून त्याला धनयोग हा असलाच पाहिजे. पण ग्रंथांत ज्याला धनयोग हें नांव आहे, तो हा धनयोग नव्हे. तेव्हां हे धनयोग कोणते आहेत याचा विचार करूं.

बृहत्पाराशरी.

अथातः संप्रवक्ष्यामि धनयोगं विशेषतः ।
पंचमे तु भृगुक्षेत्रे तस्मिन् शुक्रेण संयुते ॥१
लाभे शनेश्चरयुते बहुद्रव्यस्य नायकः ।

अर्थ.—पंचम स्थानांत शुक्राचा राशि [वृषभ अथवा तूळ] असून त्या राशींत शुक्र असेल व लाभस्थानीं शनि असेल तर मोठा श्रीमंत होतो. जसें.—



संपत्तिदर्शक स्थानें.—लग्न, धन, पंचम, नवम व एकादश.

संकेत.—लग्नेश—ल. धनेश—ध. पंचमेश—पं. नवमेश—न. एकादशेश—ए. अक्षरांचा पुरवठा होण्यासाठीं एखाद्या स्थानाचा स्वामी तेथेंच असतां तो , अशा खुणेनें दर्शविला आहे.

प्रत्येक योगास आह्मीं आपल्या कल्पनेनें नांवें दिलीं आहेत.

अ.	लग्न.	धन	पंचम	नवम	एकादश	योग
१	ल.	ध.	पं.	न.	ए.	श्री
२	ल.ध.		,	,	,	लक्ष्मी
३		ल.,	,	,	.	सरस्वती
४		,	ल,	,	,	धी
५		,	,	ल,	,	वैभव
६		,	,	,	ल,	गज
७	, पं	,	,	,	,	विष्णु
८	, न	,	,	,	,	भाग्य
९	, ए	,	,	,	,	लाभ
१०	,	पं,	,	,	,	नेत्र
११	,	न,	,	,	,	समुद्र
१२	,	ए,	,	,	,	तारका
१३	,		ध,	,	,	भूमि





वरील दोन्ही कुंडल्यांत शनि व बुध हे नवम व पंचम यांचे अधिपति असून ते लग्नस्वामीनें लग्नीं युक्त आहेत, ह्मणून हा श्रेष्ठ असा धनयोग झालेला आहे. युतियोगापेक्षां दृष्टियोगाचें फल कमीच मानलें पाहिजे.

येयें ग्रहा धर्मपबुद्धिपाभ्यां
युक्ताश्च दृष्टाश्च सुखप्रदास्ते ॥
रंध्रेश्वरादि व्ययपैर्युताः स्युः
शोकप्रदा मारकनायकैश्च ॥१३

अर्थ.—जे जे ग्रह नवम व पंचम यांच्या अधिपतींनीं युक्त अथवा दृष्ट असतील, ते ते मनुष्याला सुख उत्पन्न करितात. व जे ६।८।१२ या स्थानांच्या अधिपतींनें युक्त असतात किंवा मारकेशांनीं (द्वितीयेश व सप्तमेश यांनीं) युक्त असतात ते दुःख उत्पन्न करितात.

हा या शास्त्राचा सामान्य नियम आहे. व या नियमाला अनुसरूनच वरील बहुतेक धनयोग सांगितलेले आहेत. त्यांत जे या नियमाप्रमाणें नसतील ते कमी योग्यतेचे आहेत असें समजलें पाहिजे. या वर्षाच्या १४ व्या अंकांत संपत्तिदायक स्थानें सांगितलीं आहेत. त्यांवरून लाभकाळचे जे नियम सांगितले आहेत तेच नियम जन्मकाळीं योजिल्यास मनुष्याला पुढें प्राप्त होणाऱ्या सांपत्तिक स्थितीचें ज्ञान झाल्याशिवाय राहणार नाहीं. ह्मणून त्या नियमांस अनुसरून प्रत्येक लग्नाचे धनयोग येणें प्रमाणें होतात.

यांच्या स्वामीचा मुळींच विचार केलेला नाहीं. तथापि या कुंडलींतील योग पहिल्या कुंडलींतील योगापेक्षां श्रेष्ठ आहे.

बुधक्षेत्रयुते तस्मिन् लग्ने सौम्ययुते यदि ॥
शनिशुक्रयुते दृष्टे जातो यस्तु धनी नरः ॥ ११

अर्थ.—लग्नीं मिथुन अगर कन्या राशि असून त्या राशींत बुध असेल व तो शनि आणि शुक्र यांनीं युक्त अथवा दृष्ट असेल तर मनुष्य धनवान् होतो. जसें—





दोन्ही कुंडल्यांत बुध लग्नेश असून तो नवपंचम स्थानांच्या अधिपतींनें युक्त आहे, ह्मणून हा धनयोग श्रेष्ठ आहे. दृष्टियोगांत शनि चतुर्थ स्थानीं येतो, पण तो त्या स्थानांत दारिद्र्य देत असल्यामुळें तें स्थान वर्ज्य करून योग पहावा दुसऱ्या कुंडलींत शनि अशुभ आहे. कारण, तो षष्टेश आहे. तथापि तो पंचमेशही असल्यामुळें धनयोग होतो, पण त्याची योग्यता पहिल्या कुंडलींतील योगापेक्षां कमी मानिली पाहिजे.

भृगुक्षेत्रगते लग्ने तस्मिन् भृगुयुते यदि ॥
शनिसौम्ययुत दृष्टे जातो यस्तु धनी नरः ॥१२

अर्थ.—लग्नांत वृषभ अगर तूळ रास असून त्या राशींत शुक्र असेल व तो शनि आणि बुध यांनीं युक्त अथवा दृष्ट असेल तर धनवान् होतो. जसें.—

दुसरींत बुध लाभेश, शुक्र सप्तमेश व शनि चतुर्थेश आहे. परंतु यांत धनाधिपति वगळला जातो. ह्मणून या कुंडलींतला योग पहिलींतल्या पेक्षां पुष्कळ कमी योग्यतेचा आहे हें उघड आहे.

गुरुक्षेत्रगते लग्ने तस्मिन्गुरुयुते यदि ॥
सौम्यभौमयुते दृष्टेर्जातो यस्तु धनीश्वरः ॥१०

अर्थ.—लग्न धनु अगर मीन राशीचें असून गुरु तेथेंच असेल व तो बुध आणि मंगळ यांनीं युक्त अगर दृष्ट असेल तर मनुष्य श्रीमंत होतो. जसें.—



यांत मंगळ हा पंचमेश असून बुध हा सप्तम व दशम यांचा अधिपति आहे. पण यांत नवम, लाभ व धन यांच्या अधिपतींचा मुळींच विचार केलेला नाहीं.

आतां मीन लग्नीं कसा योग होतो तो पाहूं.—



या योगांत मंगळ हा धन व भाग्य यांचा अधिपति आहे व बुध हा चतुर्थ व सप्तम यांचा अधिपति आहे. पण यांत पंचम व लाभ

संपत्तिदर्शक स्थानें.—लग्न, धन, पंचम, नवम व एकादश.

संकेत.—लग्नेश–ल. धनेश–ध. पंचमेश–पं. नवमेश–न. एकादशेश–ए. अक्षरांचा पुरवठा होण्यासाठीं एकाद्या स्थानाचा स्वामी तेथेंच असतां तो , अशा खुणेनें दर्शविला आहे.

प्रत्येक योगास आह्मीं आपल्या कल्पनेनें नांवें दिलीं आहेत.

अं.	लग्न.	धन	पंचम	नवम	एकादश	योग
२४	ल.	ध	न.पं.		ए	श्रीनाथ
२५	,	,	ए. ,			ऐरावत
२६	,	,	,	ध ,	,	बापी
२७	,	,	,	पं. ,	,	माधव
२८	,	,	,	ए ,	,	विष्णु
२९	,	,	,	,	ध. ,	तडाग
३०	,	,	,	,	पं. ,	नारद
३१	,	,	,	,	न ,	इंद्र
३२	,	,	,	,	,	दुर्ग
३३	,	ध.पं	,	,	,	पर्वत
३४	,	ध न	,	,	,	रत्न
३५	,	ध.ए.	,	,	,	समीरण
३६	,	,	,	ध , पं.	,	मुकुट
३७	,	,	,	ध , न.	,	

संपत्तिदर्शक स्थानें.—लग्न, धन, पंचम, नवम व एकादश
संकेत.—लग्नेश–ल. धनेश–ध. पंचमेश–पं. नवमेश–न. एकादशेश–ए. अक्षरांचा पुरवठा होण्यासाठीं एखाद्या स्थानाचा स्वामी तेथेंच असतां तो , अशा खुणेनें दर्शविला आहे.

प्रत्येक योगास आह्मीं आपल्या कल्पनेनें नांवें दिलीं आहेत.

अ.	लग्न.	धन	पंचम	नवम	एकादश	योग
२७		ल , ए.	ल.पं.ध.	,	,	सुवर्ण व सेष्ठ
२८		,	ल.पं.न.	,	,	पाराशर
२९		,	ल.पं.ए.	,	,	गर्ग
३०		,	,	ल , ध.	,	क्षेत्र
३१		,	,	ल , पं.	,	यति
३२		,	,	ल , ए.	,	प्रासाद
३३		,	,	,	ल , ध.	बोधी
३४		,	,	,	ल , पं.	तुरंग
३५		,	,	,	ल , न.	रथ
३६		,	,	,	,	वत्स
२७	, पं.न.	,	,	,	,	शिव
३८	, पं.ए.	,	,	,	,	कृष्ण
३९	, न.ए.	,	,	,	,	

संपत्तिदर्शकस्थानें.—लग्न, धन, पंचम, नवम व एकादश.
संकेत.—लग्नेश–ल. धनेश–ध. पंचमेश–पं. नवमेश–न. एकादशेश–ए. अक्षरांचा पुरवठा होण्यासाठीं एखाद्या स्थानाचा स्वामी तेथेंच असतां तो , अशा खुणेनें दर्शविला आहे.

प्रत्येक योगास आह्मीं आपल्या कल्पनेनें नांवें दिलीं आहेत.

अ.	लग्न.	धन	पंचम	नवम	एकादश	योग
४०		ल , पं.		,	,	सूर्य
४१		ल , न.	,	,	,	चंद्र
४२		ल , ए.	,	,	,	भूप
४३	,	,	ध. , न.	,	,	ब्रह्मा
४४	,	,	ध. , ए.	,	,	पर्जन्य
४५	,	,	न. , ए.	,	,	मेघ
४६	,	,	,	ध. , पं.	,	समीरण
४७	,	,	,	ध. , ए.	,	यक्ष
४८	,	,	,	पं. , ए.	,	वरुण
४९	,	,	,	,	ध , पं.	गंधर्व
५०	,	,	,	,	ध , न.	रत्नाकर
५१	,	,	,	,	पं , न.	गजमुख
५२	,	ध. , पं.न.	,	,	,	अमात्य

संपत्तिदर्शकस्थानें.—लग्न, धन, पंचम, नवम व एकादश.

संकेत.—लग्नेश—ल. धनेश—ध. पंचमेश—पं. नवमेश—न. एकादशेश—ए. अक्षरांचा पुरवठा होण्यासाठीं एखाद्या स्थानाचा स्वामी तेथेंच असतां तो, अशा खुणेनें दर्शविला आहे.

प्रत्येक योगास आद्यीं आपल्या कल्पनेनें नांवें दिलीं आहेत.

अ.	लग्न.	धन.	पंचम	नवम	एकादश	योग
५३	ध., पं.ए.					कल्पद्रुम
५४	ध., पं.न.ए					कामदुघा
५५		ल, पं.न				प्रमोद
५६		ल, न.ए				महानंद
५७		ल.प, न.ए				ब्रह्म
५८			ल.ध, न.			लक्ष्मी
५९			ल.ध, पं.			ईश्वर
६०			ल.ध, न.ए			गोड
६१				ल, ध.पं		चक्र
६२				ल, ध.ए		ध्वज
६३				ल.न, पं.ए		हंस
६४					ल, ध.पं	वर्धमान
६५					ल, ध.न	पंकज

श्रीमंती व तिचें प्रमाण.

एखादा मनुष्य धनहीन आईबापांच्या पोटीं जन्मलेला आहे कीं श्रीमंतींत जन्मलेला आहे हें आमच्या मतें ज्योतिःशास्त्राधारें सांगतां यावयाचें नाहीं. केवळ कल्पनेच्या जोरावर सांगितलेली गोष्ट एखाद्या प्रसंगीं बरोबर जुळली तरी तें खरें नाणें नाहीं. हें शास्त्र नसून ठोक—ज्योतिष आहे! ठोक—जोशाला शास्त्राची फारशी जरूर नसते. त्याला एकच गोष्ट अवगत असते, ती ही कीं "ठोकून देतों ऐसाजे." अलीकडे असल्या ठोक—जोशांचा सुळसुळाट जिकडे तिकडे दृष्टीस पडतो. या जोशांस सामान्य लोकांना चकविण्याची विद्या उत्तम साधलेली आहे ज्या गोष्टींचा ज्योतिःशास्त्रांत थांग लागत नाहीं त्या गोष्टी हे लोक बेलाशक ठोकून देतात! असो. हा त्यांचा दोष नसून लोकांचें अज्ञान असल्या गोष्टी पसरवितें, ही नाइलाजाची बाब आहे!

जन्म कसल्याही स्थितींत होवो, पण इतकें निश्चित आहे कीं, गरीब स्थितींतून श्रीमंती प्राप्त होण्यास श्रीमंतींत जन्म घेणाऱ्या मनुष्या पेक्षां बलवत्तर धनयोग असले पाहिजेत. असल्या दोन मुलांच्या कुंडल्या पाहिल्यास आपणास पहिला श्रीमंत भासेल व दुसरा कितीही श्रीमंत असला तरी सामान्य भासेल. त्याच प्रमाणें जन्मभर सामान्य स्थिति भोगणारा पेक्षां किंवा जन्म दरिद्री मनुष्या पेक्षां जीं माणसें श्रीमंत स्थितींत उपजून पुढें अगदीं भिकेस लागतात त्यांचे दारिद्र्ययोग फार बलवत्तर असले पाहिजेत.

देशकाल परत्वें धनयोगाचें फल मिळावयाचें असतें. हिंदुस्थानांत जन्मलेल्या मनुष्यास जे उत्तम धनयोग आहेत तेच जर

आजच्या कालांत अमेरिका, जर्मनी अथवा इंग्लंड या देशांतील एखाद्या मनुष्यास असतील तर तो कोट्यधीश होईल व हिंदुस्थानांतला फार तर लक्षाधीश होईल! असेच ग्रह हिंदुस्थानांतच एखाद्या मिल्ला अथवा कातवड्याला असतील तर तो बिचारा फार तर निष्काळजी पणानें पोटभर खाईल, या पेक्षां त्याच्या श्रीमंतीची धांव पुढें जाणार नाहीं. सारांश, धनयोगाचें फल परिस्थिती प्रमाणें प्राप्त होईल. ज्योतिःशास्त्रानेंच हे प्रश्न सुटले पाहिजेत हें म्हणणें बरोबर आहे, पण इतकी सूक्ष्मता समजण्यास मनुष्यांत सामर्थ्य नाहीं, म्हणून आपणास परिस्थितीकडेच धांव घेतल्या शिवाय गत्यंतर नाहीं.

संकेत.—भाग्यभुवनापासून ६ स्थानांस "धनभाग" आणि सहज भावापासून ६ स्थानांस "दारिद्र्यभाग" असें म्हणावें.

१ धनयोग आणि दारिद्र्ययोग हे धनभागांत झाले असून धनयोगांची शक्ति जास्त असेल तर मनुष्य गरिबींतून डोकें वर काढल्या शिवाय राहणार नाहीं, पण दारिद्र्ययोगांची शक्ति जास्त असेल तर त्यानें कितीही उलांढाली केल्या तरी मूळच्या स्थितींत फारसा बदल होणार नाहीं. दारिद्र्ययोग मुळींच नसतील तर तो मनुष्य आमरण श्रीमंती भोगील अथवा एकदम रंकाचा राव होईल. धनयोग मुळींच नसतील तर कसें तरी पोट भरून असेल.

२ धनयोग व दारिद्र्ययोग हे दारिद्र्यभागांत झाले असतील अशा वेळीं धनयोगांची शक्ति जास्त असेल तर मनुष्य गरिबींतून डोकें वर काढील, पण त्याचें स्वरूप सामान्य असून कालही फार लागेल. असलीं मनुष्यें नं० १ च्या योगांतील मनुष्यांपेक्षां कमी योग्यतेचीं होतील. दारिद्र्ययोग मुळींच नसतील तर मात्र तो मनुष्य मूळचा

गरीब असला तर प्रयत्नानें धनवान् होईल व धनवान् असेल तर किंचित् धन वाढवील किंवा निदान आहे ती स्थिति कायम राहील. धनयोग मुळींच नसतील तर आमरण दारिद्र्य भोगील किंवा श्रीमान् कुळांत जन्म असेल तर तो दिवसें दिवस कंगाल होत जाईल. धनयोगापेक्षां दारिद्र्ययोगांची शक्ति जास्त असेल तर धनवान् खालावेल व दरिद्री "कुच रोटी कुच लंगोटी" अशी स्थिति भोगील.

३ धनयोग धनभागांत व दारिद्र्ययोग दारिद्र्यभागांत समसमान शक्तीचे असतील तर तो मनुष्य कांहीं दिवस गरिबी व कांहीं दिवस श्रीमंती भोगील. धनयोगांची शक्ति जास्त असेल तर गरिबींतून डोकें वर काढील व धनवान् असेल तर किंचित् धन वाढवील. दारिद्र्ययोगांची शक्ति जास्त असेल तर त्याच्या नशिबीं आजन्म दारिद्र्य चुकणार नाहीं. धनवान् असेल तर "बडे घरमें पोकळ वासा" अशा स्थितींत त्याचें आयुष्य जाईल.

४ धनयोग दारिद्र्यभागांत व दारिद्र्ययोग धनभागांत असतील तर तो मनुष्य मूळचा चांगला असल्यास पुढें दरिद्री होईल व दरिद्री असल्यास फार काळानें किंचित् वर डोकें काढील.

हे योग जसे लग्नावरून पहावयाचे तसेच चंद्रावरून पाहून तारतम्यानें सांपत्तिक स्थितीचा विचार करावा. इतक्या विचारानें ठरविलेलें अनुमान सहसा चुकणार नाहीं. ज्योतिष्या पेक्षां ज्याचा तो तर बिनचूक अनुमान बांधील.

वरील विचार स्पष्टपणें कळण्यासाठीं ते कोष्टक रूपानें खालीं दिले आहेत, त्यांचा वाचकांनीं विचार करावा व आपला अनुभव कळवावा. कल्पना नवी आहे, म्हणून तिचा अनुभव घेतला पाहिजे. ज्योतिःशास्त्र हें कल्पनाशास्त्र नसून अनुभवशास्त्र आहे, म्हणून अनुभवा शिवाय कल्पना खरी आहे असें म्हणतां येणार नाहीं.

धनभाग.	दा०भाग.	फल.
+ धनयोग	+ दारिद्र्ययोग	प्राप्ति कितीही मोठी असली तरी त्याच मानानें खर्च किंवा येणें देणें बरोबर.
+ ,,	− ,,	गरिबींतून डोकें वर काढील व संग्रह वाढवील.
− ,,	+ ,,	गरिबींतून सुटका होणें कठीण, दिवसें दिवस पाय खोलांत.
− ,, धनयोग	− ,,	मिळवून खाणारा, संग्रही कांहीं नाहीं. आजन्म धनसुख, भोगी, दैववान्.
.	दारिद्र्ययोग	आजन्म दरिद्री, अपयशी व दुर्दैवी.

+ दारिद्र्ययोग	+ धनयोग	वयाच्या उत्तर भागीं किंचित् चांगली स्थिति येईल
+ ,,	− ,,	दिवाळें काढील व कधींही डोकें वर काढूं शकणार नाहीं.
− ,,	+ ,,	मोठेपणीं चांगली स्थिति भोगील.
− ,, दारिद्र्ययोग	− ,, .	याला साधारण स्थितींत दिवस काढावे लागतील जन्मदरिद्री किंवा दिवाळें फुंकणारा.
.	धनयोग	मोठेपणीं फार उत्तम स्थितीला जाऊन पोहोंचेल.

+ धनयोग + दा. यो.	.	लवकरच नशीब काढील व तें सामान्य असेल.
+ ध. यो. − दा. यो.	.	लवकरच चांगला श्रीमंत होईल.
− ध. यो. + दा. यो.	.	लवकरच भिकेला लागेल.
− ध. यो. − दा. यो.	.	मिळवून खाणारा असेल.

.	+ ध. यो. + दा. यो.	मोठेपणीं कांहींशी स्थिति सुधारेल.
.	+ ध. यो. − दा. यो.	साधारण स्थिति भोगील व थोडेसें डोकें वर काढील.
.	− ध. यो. + दा. यो.	आजन्म दारिद्र्य भोगील.
.	− ध. यो. − दा. यो.	मिळवून खाणारा होईल.

धनयोग व दारिद्र्ययोग यांच्या शक्तींचें ज्ञान होण्यास आपण गुण [मार्क] ठेवूं.

स्थानगुण

ल—९	च—७	स—४	द—१०
द्वि—८	पं—६	अ—२	ए—१२
तृ—९	ष—१	न—११	द्वा—३

विशेष नियम—[१] द्वितीय स्थानीं पाप ग्रहाचे अर्धे गुण कमी करावे. [२] व्ययस्थानीं पाप ग्रहाचे संपूर्ण गुण कमी करावे. [३] चतुर्थ स्थानीं पाप ग्रहाचे अर्धे गुण कमी करावे व शनीला ० गुण द्यावा. [४] तृतीय स्थानीं पाप ग्रहास २ पट गुण द्यावे. (५) षष्ठ स्थानीं रवि, राहू व मंगळ यांस दसपट गुण द्यावे. (६) षष्ठ स्थानीं चंद्राला ० गुण मानावा. (७) नवम स्थानीं गुरु, दशमांत मंगळ व लाभ स्थानीं शनि यांस दुप्पट गुण द्यावे.

राशिगुण

उच्च —१२	नीच—६
स्वगृह—१०	स्वसंमुख—९
मित्रक्षेत्र—८	शत्रुक्षेत्र—४
समक्षेत्र ६	०

नियम—धनभागांतील राशिगुण व स्थानगुण धनयोगांत मिळवावे व दारिद्र्यभागांतील राशिगुण व स्थानगुण दारिद्र्ययोगांत वजा करावे.

धनयोगगुण.

(१) भाग्येशलाभेशयोग. ३० (१२) लाभेशधनेशयोग २०
(२) भाग्येशदशमेशयोग. ,, (१३) लाभेशचतुर्थेशयोग ,,
(३) भाग्येशचतुर्थेशयोग. ,, (१४) लाभेशलग्नेशयोग ,

(४) भाग्येशपंचमेशयोग. ,, (१५) लाभेशपंचमेशयोग ,,
(५) भाग्येशलग्नेशयोग. ,, (१६) लग्नेशधनेशयोग १९
(६) भाग्येशधनेशयोग. ,, (१७) लग्नेशचतुर्थेशयोग ,,
(७) दशमेशलाभेशयोग. २५ (१८) लग्नेशपंचमेशयोग ,,
(८) दशमेशचतुर्थेशयोग. ,, (१९) धनेशचतुर्थेशयोग १०
(९) दशमेशलग्नेशयोग. ,, (२०) धनेशपचमेशयोग ,,
(१०) दशमेशपंचमेशयोग. ,, (२१) चतुर्थेशपंचमेशयोग ,,
(११) दशमेशधनेशयोग ,,

विशेष नियम—हे एकवीस प्रकारचे मुख्य धनयोग आहेत. वरील सर्व योग व्यय स्थानाशिवाय धनभागांत झाले किंवा चतुर्थांत अथवा पंचमांत झाले तर पूर्ण गुण घ्यावे. षष्ठ स्थानीं चतुर्थांश, अष्टमांत व व्ययांत निमे आणि तिसऱ्या किंवा सातव्या स्थानांत पाऊणपट घ्यावे.

जेव्हां दोन ग्रह अगदीं जवळ जवळ [फार तर ९ अंशांच्या फरकानें] असतील तेव्हांच योगगुण घ्यावे, एरवीं घेऊं नयेत. अनेक ग्रहांचा योग झाला असेल तेव्हां प्रत्येक जोडीचे निरानिराळे गुण घेऊन त्यांची सरासरी घ्यावी.

हेच गुण ते ते स्वामी एकमेकांच्या राशीस असतांही घ्यावे.

दारिद्र्ययोगगुण

(१) षष्ठेशधनेशयोग २० [१२] व्ययेशसप्तमेशयोग २०
[२] षष्ठेशलग्नेशयोग ,, [१३] षष्ठेशभाग्येशयोग १९
(३) षष्ठेशचतुर्थेशयोग ,, (१४) षष्ठेशतृतीयेशयोग ,,
[४] व्ययेशधनेशयोग ,, [१५] व्ययेशभाग्येशयोग ,,
[२] व्ययेचतुर्थेशयोग ,, [१६] व्ययेशतृतीयेशयोग ,,
[६] व्ययेशलग्नेशयोग ,, [१७] षष्ठेशलाभेशयोग १०
[७] षष्ठेशदशमेशयोग २९ [१८] षष्ठेशअष्टमेशयोग ,,
[८] व्ययेशदशमेशयोग ,, (१९) व्ययेशलाभेशयोग ,,
(९) षष्ठेशपंचमेशयोग २० (२०) व्ययेशअष्टमेशयोग ,,
(१०) षष्ठेशसप्तमेशयोग ,, [२१] षष्ठेशव्ययेशयोग ९
[११] व्ययेशपंचमेशयोग ,,

हे २१ प्रकारचे मुख्य दारिद्र्ययोग आहेत. ते धनस्थानीं व दारिद्र्यभागांत झाल्यास पूर्ण गुण घ्यावे. व्ययस्थानीं पाऊणपट व इतरत्र धनभागीं अर्धे गुण घ्यावे.

धनयोग मित्र अथवा सम ग्रहांनीं झाले तर १० गुण अधिक द्यावे व शत्रु ग्रहांनीं झाले तर १९ गुण कमी करावे. दारिद्र्ययोग शत्रुग्रहांनीं झाल्यास १५ गुण अधिक द्यावे व मित्र अथवा सम ग्रहांनीं झाल्यास १० गुण कमी करावे

या प्रमाणें गुण देऊन झाल्यावर धनयोगांचे गुण व दारिद्र्ययोगांचे गुण यांची वजाबाकी करावी. येईल तें श्रीमंतीचें प्रमाण मानावें. हें प्रमाण वस्तुस्थितीशीं सर्वांशीं मिळतें येईल असें आम्ही म्हणत नाहीं. तथापि लोक प्रश्न विचारतात त्यास शास्त्रीय मार्गानें उत्तर देतां यावें म्हणून ही गुणांची योजना केली आहे आतां हें प्रमाण उदाहरणांनीं स्पष्ट करून दाखवितों.

उदाहरण १ लें.



स्थानगुण

चंद्र—८ मंगळ—१२ बुध—१२ गुरु—१२ शु—१२
शनि २ रवि १२ एकूण ७०

राशिगुण

चंद्र उच्च—१२ मंगळ उच्च—१२ बुधमित्रगृहीं—८गुरु नीच—१
शुक्र मित्रगृहीं—८शनि शत्रुगृहीं—४ रवि शत्रुगृहीं—४ एकूण—५४

धनयोगगुण.

१ भाग्येश मंगळ व दशमेश गुरु यांचा योग—[३०] नक्की गुण ४०
२ ,, ,, व लग्नेश ,, ,, ,, — ३० ,, ४०
६ दशमेश गुरु व धनेश मंगळ यांचा योग— २९ ,, ४०
४ लग्नेश गुरु व ,, ,, ,, — १५ ,, ४०
५ भाग्येश मंगळ व चतुर्थेश बुध यांचा योग— ३० ,, १९
६ धनेश ,, ,, ,, — १० ,, ५
७ दशमेश गुरु व ,, ,, — २९ ,, १०
८ लग्नेश गुरु व ,, ,, — १५ ,, ०
९ लाभेश शनि व भाग्येश मंगळ हे एकमेकांच्या राशीस ३० १९

वरील गुणांत मित्रयोग असतां १० मिळवून व शत्रुयोग असतां १५ गुण कमी करून नक्की गुण तयार केले व ते त्यांच्याच पुढें मांडले, त्यांची बेरीज १९९ झाली. या बेरजेंत धनभागांतील ग्रहांचे स्थानगुण व राशिगुण मिळविले व दारिद्र्यभागांतील ग्रहांचे स्थानगुण व राशिगुण वजा केले. तेव्हां ३१३ एकंदर गुण झाले.

या कुंडलीत दारिद्र्ययोग मुळींच नसून धनयोग धनभागांतच झाले आहेत. ह्मणून आपल्या नियमाप्रमाणें हा मनुष्य भोगी व दैववान् असून आजन्म धनसुख भोगील असें झालें. वस्तुस्थितिही तशीच आहे. हा मनुष्य ज्याचें सुमारें २।४ हजारांचें उत्पन्न अश स्थितींत उत्पन्न होऊन केवळ दैवयोगानें लक्षाधीश झाला!

उत्तम धनयोग.

यस्यास्ति वित्तं स नरः कुलीनः
स पंडितः सः श्रुतिमान गुणज्ञः ॥
स एव वक्ता सच दर्शनीयः
सर्वे गुणाः कांचनमाश्रयंति ॥ १

प्रत्येक मनुष्य पैशासाठीं धडपडत आहे. पैशावांचून प्रपंच अगदीं लंगडा पडतो. यासाठीं ज्योतिषशास्त्राची आवश्यकता निदान संपत्तीसाठीं तरी आहेच. लाभ आणि हानि मनुष्याच्या हातांत नाहीं ही गोष्ट एका दृष्टीनें खरी आहे. पण सर्वच व्यवहार कांहीं प्रारब्धाधीन नाहीं हें पण विसरतां कामा नये. जी लाभहानि मनुष्याच्या हातांत नाहीं, तिच्या बद्दल मनुष्याला आपण होऊन प्रयत्न करण्याची जरूर नाहीं. तथापि जर त्या काळाचें ज्ञान होईल तर मनुष्याचे दिवस आशेमुळें किंवा त्या कालांत अमुक प्रकारची व्यवस्था लावीन या बेतामुळें सुखासमाधानांत जाऊं शकतात. त्याच प्रमाणें जे व्यवहार आपल्या हातांतले असतात ते योग्य कालीं केल्यानें फायदेशीर होऊं शकतात. ह्मणून फलज्योतिषाची या कामीं प्रत्येकाला आवश्यकता असते. कुंडलीविज्ञानांत हे काल कधीं प्राप्त होतात याबद्दल विवेचन पूर्वी केलेलेंच आहे. आज ज्या माणसांनीं केवळ दैवयोगानेंच विपुल संपत्ति संपादन केली आहे अशा माणसांच्या कुंडल्या द्यावयाच्या आहेत. असलीं माणसें जगांत थोडींच आहेत व त्यांची गणना

दैववानांत असल्यामुळें तीं आपल्या कुंडल्या ज्योतिष्याला बहुधा दाखवीत नसतात. त्यामुळें त्यांचा संग्रह अत्यल्प होतो. भाग्य-हीनांच्या किंवा भरती ओहोटी होणारांच्या कुंडल्या सहस्रावधि मिळूं शकतात. पण त्या पाहण्यापासून विशेष उपयोग नसतो. असो. आम्हांस कांहीं उत्तम धनयोगाच्या कुंडल्या मिळाल्या आहेत, त्या सवडी संवडीनें आम्हीं देण्याचें ठरविलें आहे. नांव मात्र प्रसिद्ध करितां येत नाहीं या गोष्टीस आमचा इलाज नाहीं !

(१)



या कुंडलीचा जन्मकाल मिळाला नाहीं त्यामुळें ती सायन करून छापतां आली नाहीं. कुंडली निरयन असली तरी तींत बसलेल्या ग्रहांवरून आपणास सांपत्तिक स्थितीचें अनुमान होईल. या गृहस्थांना सरकारांतून **राजा** असा किताब असून ११०० १२०० गांवांची जहागीर आहे. सर्व संपत्ति स्वसंपादित आहे. मूळची स्थिति मध्यम होती. आज हे कोटयधीश आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हर्शल हा चतुर्थ स्थानीं ह्मणजे अनुदितार्धांत आहे. हा ग्रह आपल्या अर्ध्या भ्रमणांत येतांच एकदम

रूपांतर झालें. हाच ग्रह जर दशमांत असता तर फार वाईट परिणाम झाला असता.

वरील कुंडलींत लग्नेश मंगळ व भाग्येश चंद्र यांचा राज्य-भुवनांत सिंह या बादशाही राशींत झाला असून त्यांच्या धन-स्थानीं व कुंडलींत लाभ स्थानीं गुरू हा ग्रहमालेंतला प्रचंड गोल बसला आहे. हा ग्रह धन व पंचम यांचा अधिपति आहे ! लग्नीं शनीसारख्या प्रचंड गोलांचा उदय आहे. निरयन कुंडलींत लग्नेश बुध हा नीच आहे, परंतु तो सायनमध्यें मेष राशीचा येईल व रवीही मेष राशींत उच्च होईल. असो-निरयनांत बुध हा नीच आहे, परंतु त्याचा राज्येशाशीं योग झालेला आहे. तात्पर्य निरयन कुंडलीवरूनही उत्तम धनयोगाचें ज्ञान होत आहे.

दशमांत मंगळाचें माहात्म्य विशेष आहे. राजासारखें वैभव भोगणें अनेकांवर हुकमत चालवणें हा गुण दशमांतील मंगळांत विशेष आहे. या मंगळाचा चंद्राशीं योग झाला ही विशेष महत्त्वाची गोष्ट आहे.

सिंह ही रास नवम अगर दशम अगर लग्न यांत फार बलवान् आहे. राजासारखें वैभव भोगणारीं माणसें जर आपण पाहूं लागलों तर ही रास कोणत्या ठिकाणीं आहे अगर तींत कोणता ग्रह आहे हें प्रथम पाहूं. कारण, ती त्या कुंडलींत योग्य स्थलीं चमकल्याशिवाय राहणार नाहीं. सिंह राशींत रवि, राहू व हर्शल या ग्रहांशिवाय सर्व ग्रह मनुष्यास महत्व देतात असा फलज्योतिषाचा सिद्धांत आहे.

भाग्य, दशम व एकादश या तीन स्थानांत ज्यांच्या गुरु नाहीं तीं माणसें भाग्यहीन होत! लग्न, चतुर्थ व पंचम यौ तिनही स्थानांपेक्षां भाग्य दशम व एकादश या भावांतील गुरूची योग्यता अधिक आहे. या कुंडलींत तो लाभ स्थानीं पडला अहे म्हणून कोट्यवधि संपत्ति देण्यास पात्र झाला. प्रत्येक १२ व्या वर्षी या गुरूनें या गृहस्थांची सारखी उन्नति केली असेल. यांच्या २९ व्या वर्षी लाभस्थानीं शनि व गुरु हे दोन्ही गोल होते, या वेळीं त्यांना फार उन्नत स्थिति प्राप्त झाली असेल. सन १८८०।८१ मध्यें असाच योग झाला होता. हा योग चंद्राच्या दशमांत झाला, म्हणून या वेळींही त्यांची विशेष उन्नति झाली असेल. यांचें ५९ वें वर्ष तर फारच महत्वाचें दिसतें व याच वेळीं त्यांना किताब मिळाला असेल.

तात्पर्य, शनि, गुरु यांचे लग्नाच्या व चंद्राच्या लाभ व केंद्र या स्थानीं ज्या ज्या वेळीं योग झाले त्या त्या वेळीं त्यांची उत्तम भरभराट झाली असली पाहिजे. व हल्लींचें पूर्ण वैभव हर्शलच्या अर्ध्या भ्रमणानंतर प्राप्त झालें असलें पाहिजे.

उत्तम धनयोग.

नं. २

जन्म—ता. २९ नवंबर सन १८५९ अरुणोदय.

सायन भावचलित



धनु लग्नीं जन्म असून चंद्र सिंह राशींत आहे, त्यामुळें बांधा अद्यापि तरुणासारखा दिसत आहे.

लग्नीं रवि आहे व तो अग्निराशींत आहे आणि चंद्रही अग्निराशींतच आहे त्यामुळें प्रकृति उष्ण आहे. वर्ण तांबुस असून उजळ आहे. केश अल्प आहेत व ते कोमल आहेत. क्वचित् पिकलेले असे दिसतात. दांत मजबूत असून पचनशक्ति तीव्र आहे. मुद्रा मंदहास्य आहे. सौंदर्य साधारण आहे. नेत्रांत कोणत्याही प्रकारें दोष नाहीं. शरीर अव्यंग व काटक आहे. पोषाख साधा, नटण्याची आवड दिसत नाहीं. राग लवकर येतो व त्यावेळीं वर्ण विशेष तांबडा होतो!

हर्शल अनुदिन भागांत आहे. त्याच्या अर्ध्या भ्रमणानंतर पूर्व स्थितींत एकदम बदल झाला व ती स्थिति सारखी वृद्धिंगत होत जाऊन सुमारें १३।१४ वर्षांच्या अवधींत पाऊण लाखापेक्षां अधिक संपत्ति प्राप्त झाली! पूर्वीची स्थिति गरिबीची. पूर्व वय अतिशय अडचणींत गेलें. वडिलांच्या वेळचें कर्ज होतें तें स्वत: फेडून सांप्रत एका राजाचे दिवाण झाले आहेत! आरंभीं ९ रुपयावर नोकर होते, हल्लीं २०० रु. पगार आहे!

भाग्यस्थानीं सिंह राशीचा चंद्र आहे, दशमांत मंगळ असून लाभस्थानीं स्वराशीचा शुक्र आहे. चंद्राच्या दशमांत हर्शल असून एकादशांत शनि आहे. आणि भाग्यस्वामी रवि हा लग्नीं गुरुगृहीं असून लग्नेश पराक्रम स्थानीं आहे. याप्रमाणें ग्रहांचे योग झाल्यामुळें दारिद्र्यांत झाला असतांही अकल्पित भाग्य प्राप्त झालें! असल्या माणसांसच भाग्यवान् असें म्हणतात. भाग्यवानांचें भाग्य प्रयत्नानें उदयास येत नाहीं, तें आपोआप येतें. या गृहस्थानीं आपणास दिवाणगिरी मिळावी म्हणून कधींही धडपड केली नाहीं, इतकेंच नव्हे तर त्यांच्या पूर्वस्थितींत आपण दिवाण बनूं अशी कल्पनाही नव्हती. विद्येच्या योगानें ते इतक्या योग्यतेला जातील म्हणावें तर तेंही शक्य नव्हतें. कारण त्यांना युनिव्हर्सिटीची कोणतीच डीग्री मिळालेली नाहीं. असली डिग्री मिळालेला एखादा मनुष्य म्हणेल कीं मी राजाचा दिवाण होईन, तर तें शक्य आहे. परंतु ज्याची कोणतीच परीक्षा नाहीं किंवा ज्याला पैशांचेंही पाठबळ नाहीं अशा मनुष्याला इतकी मोठी योग्यता कां आली, याचें उत्तर एकनाथात्मज देतील काय?

नवम, दशम व एकादश आणि लग्न हीं तीन स्थानें ज्यांचीं

बलवान् ते भाग्यवान् होत. जातकांत दशमांतील मंगळाचें महत्त्व फारच मोठें सांगितलें आहे. 'प्रधानसेवक: शूर: प्रतापी धनपुत्रवान्॥ कर्मोद्युक्त: कुजे धृष्यो नर: स्यादशमस्थिते॥' या प्रमाणें दशमांतील मंगळाचे धर्म आहेत. गेल्या अंकांत जी धनयोगाची कुंडली दिली आहे तींत धनयोग असून राजयोगही आहे. त्या कुंडलींत दशम स्थानीं मंगळ हा चंद्रानें युक्त आहे, त्यामुळें या कुंडलीला विशेष महत्त्व मिळालें आहे.

गजाश्वकोशसंपत्तिर्मतियुक्तं शशी नरं॥
कुरुते भौमसंयुक्तो गगने विक्रमान्वितं॥

दशम स्थानीं चंद्र हा जर मंगळानें युक्त असेल तर तो मनुष्य अतिशय भाग्यवान् जाणावा. त्या मनुष्याला हत्ती, घोडे वगैरे राजाला शोभेल असें वैभव प्राप्त होतें असें या वचनांत सांगितलें आहे.

या कुंडलींत मंगळ एकटाच दशमांत आहे. तरी नवमांत चंद्र व लाभस्थानीं शुक्र असून चंद्राच्या एकादशांत शनि असल्यामुळें तो राजयोगाला कारण झाला.

लग्नापासून भाग्यापर्यंत प्रत्येक भाव ग्रहानें युक्त आहे. व ग्रहांचा अनुक्रमही ग्रहमालेसारखाच आहे. लग्नीं रवि, त्यापुढें त्याच्या जवळचा ग्रह बुध, त्याच्या पुढें शुक्र आणि त्याच्या पुढें मंगळ याप्रमाणें चार ग्रह यथानुक्रम आहेत. म्हणून हा एक प्रकारचा मायागोलासारखाच योग होतो.

स्त्रीरत्नवररत्नाढ्यो स्वस्थ: शोकविवर्जित:॥
संपन्न धनभृत्यश्च मर्त्यो लाभगते सिते॥

याप्रमाणें लाभस्थ शुक्राचें फल आहे. हा ग्रह स्वगृहीं असून

राजयोग झाला असल्यामुळें उंची वस्त्रें, मौल्यवान् दागदागिने, रत्नें वगैरे प्रकारची संपत्ति प्राप्त झाली.

दशमाधिपति बुध हा व्ययांत व व्ययाधिपति मंगळ हा दशमांत याप्रमाणें दशम व व्यय यांच्या अधिपतींचा परस्परस्थान संबंध झाला आहे, म्हणून हा योग चांगला नाहीं. या दोन ग्रहांत शत्रुत्व आहे त्यामुळें राजघराण्यांत शत्रु असले पाहिजेत व ह्यांची दिवाणगिरी नष्ट होण्यासाठीं कित्येक राजकारणी पुरुषांनीं प्रयत्नही केले असतील, असें या योगावरून एक अनुमान निघतें तें सर्वथा खरें आहे ही ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

सप्तम स्थानीं वक्री शनि आहे आणि सप्तमेश बुध हा व्यय स्थानीं शत्रुगृहीं आहे, यावरून हा बहुभार्यायोग दिसतो. सप्तमेश जो बुध त्याच्या सप्तमांत वक्री हर्शल आहे यावरून एक स्त्री मृत होऊन पुनः विवाह व्हावा असा हा योग आहे. यागृहस्थांच्या दोन स्त्रिया मृत झाल्या असून सांप्रत तिसरी स्त्री आहे. हिचें पहिलें अपत्य मुलगी आहे. दुसरें मूल व तिसरा गर्भ यांचा नाश झालेला आहे. या गृहस्थांस मुलें बरींच झालीं होतीं. पैकीं आज एकच मुलगी हयात आहे. पुत्रसुखाची अपेक्षा आहे. पंचमांत राहू असून गुरूच्या पंचमांत वक्री शनि आहे व पंचमेश मंगळ हा शत्रुगृहीं आहे त्यामुळें संततीचा नाश झाला. गुरु व शनि यांत त्रिकोणयोग झाल्यामुळें पुत्रचिंता झाली. पण आमच्या मतें गुरु हा शनिच्या दृष्टींत आलेला नाहीं व नवमांत सिंहेचा चंद्र आहे व एकादशांत तूळेचा शुक्र आहे, म्हणून पुत्रसुख मिळून वंशवृद्धि खात्रीनें होईल.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम् ।
जानन्तु ते किमपि तान्प्रंति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधि विंपुलाच पृथ्वी ॥

'भवभूति'

पुस्तक ९ वें.] आषाढ शु० १३, गुरुवार. [अंक १२ वा

सांपत्तिक अडचणी.

मनुष्याला सांपत्तिक अडचणी केव्हां प्राप्त होतात याचा विचार आपणास करावयाचा आहे. सर्व व्यवहार संपत्तीच्या जोरावरच चालावयाचे आहेत, ह्मणून संपत्तीची उणीव केव्हां प्राप्त होईल, याचा आगाऊ बोध होईल तर आपणास थोडीबहुत सावधगिरी ठेवितां येईल. नशीबावर हवाला ठेवून मोठे मोठे सट्टे मारणारे, मालाची खरेदी करणारे दुकानदार, हातावर पोट भरणारे धंदेवाले, यांना या गोष्टींचा विचार अवश्य केला पाहिजे. अमुक वेळीं आपणास संपत्तीची अडचण येण्याचा संभव आहे, असा विचार करून धंदेवाले वागतील तर ते सहसा गोत्यांत येणार नाहींत हें उघड आहे. मुंबईस घाडसानें धंदा करणारे लोक फार आहेत, ते ज्योतिष्याला विचारल्याशिवाय व्यापारांत घाडस करीत नाहींत. ज्योतिःशास्त्राची

जरूर या लोकास विशेष भासते. अमुक वेळीं एखाद्या मालाची खरेदी अगर विक्री केल्यानें अगर एखाद्या उद्योगाला आरंभ केल्यानें नफा होईल किंवा तोटा होईल हें सांगणारें एक ज्योतिःशास्त्रच आहे, ह्मणून अशा लोकांस स्वतःच्या साह्यानेंच विचार करितां यावा यासाठीं आजच्या विषयावर चार शब्द लिहावयाचे आहेत. मनुष्यानें पूर्णपणें ज्योतिःशास्त्रावर भरंसा ठाकावा असें ह्मणणें नाहीं, कारण तितक्या पूर्णतेला तें जाऊन पोहोंचलेलें नाहीं. तथापि सारासार विचार करितांना त्याचें साह्य घ्यावें हें उत्तम. पुढें खड्डा आहे असें आपणास स्पष्ट दिसत आहे, या वरून आपणास खात्रीनें उडी मारून जातां येईल असें वाटत असेल तर मनुष्य फारसा विचार करीत नाहीं, पण तशी खात्री नसली ह्मणजेच काय करावें याचा त्याला विचार पडतो. अशा वेळीं उडी न मारावी हाच शहाणपणाचा मार्ग नाहीं काय?



वरील कुंडली पहा. हींत दुसरें स्थान धनसंग्रहाचें आहे व १२ वें स्थान धननाशाचें आहे. ह्मणून या दोन स्थानांवर सांपत्तिक अडचणीचा मुख्य विचार होतो. या साठीं या दोन स्थानांतील ग्रहांवर पुढील प्रमाणें विचार करावा.

१ धन स्थानीं जर एखादा पाप ग्रह आला असेल तर धन कितीही मिळालें तरी तें शिल्लक राहणार नाहीं, इतकेंच नव्हे तर कदाचित् पदरमोडही करावी लागेल किंवा कर्ज काढावें लागेल.

आपल्या जवळचे दागदागिने विकावे लागतील, अगर गहाण ठेवावे लागतील किंवा ते कोणी तरी गिळंकृत करील. जेव्हां आपणास सावकाराचें कर्ज काढण्यास प्रसंग येईल अगर मिळविलेलें सर्व द्रव्य सावकारास द्यावें लागेल त्या वेळीं धनस्थानीं पाप ग्रह असेल. या स्थानांतील पाप ग्रहाचा मुख्य गुण हा कीं तो संग्रह ह्मणून होऊं द्यावयाचा नाहीं. तो पाप ग्रह जर त्याच स्थानाचा अधिपति असेल तर धन पुष्कळ मिळेल, पण अखेरीस बरोबरीच होईल. रवि, मंगळ शनि व राहु हे पाप ग्रह आहेत. रवि हा मकर, मेष, तूळ, कर्क, वृश्चिक या राशींत त्या स्थानीं चांगला नाहीं. मंगळ हा कर्क, सिंह, धनु, मकर या राशींत नुकसान अधिक करील व शनि हा मेष, कर्क, सिंह, वृश्चिक व धन या राशींत फार नुकसान करील. सन १९०९ सालीं शनि हा सायन मेष राशींत आहे, ह्मणून तो जर धनस्थानीं भ्रमण करणार असेल तर किती नुकसान होतें याचा अनुभव ज्याचा त्यानें घ्यावा ह्मणजे कळेल. राहू हा कन्या व मिथुन राशीशिवाय इतर सर्व राशींत धनसंग्रहाला अनिष्ट समजावा. या स्थानांत शनीशीं रवि अगर मंगळ जर युति करील तर तो ठोकर दिल्याशिवाय राहणार नाहीं. सन १९०९ सालीं डिसेंबरच्या २९ वीला मंगळ हा शनीशीं मेष राशींत युति करणार आहे त्या युतीचा अनुभव काय येतो तो पहावा ह्मणजे वरील ह्मणण्याची सत्यता कळेल.

२ व्यय स्थानीं जर पाप ग्रह आला असेल तर निष्कारण धन खर्च होईल. खर्च करण्याच्या अनेक बाबी उत्पन्न होतील. कदाचित् चोरी होईल, दागिना अगर पैसा गहाळ होईल, इष्टेटीचा एखादा दावा चालून निकाल लागण्याचा समय असेल तर तो प्रतिकूल होईल. लबाड लोक फसवतील, खरेदी केलेला माल कवडी किंमतीला जाईल, कर्ज मिळण्याची मारामार पडेल व दारिद्र्यावस्था प्राप्त होईल. धन-

स्थानापेक्षां हें स्थान फार महत्वाचें आहे. या स्थानांत पाप ग्रह आल्यावर तो नुकसान केल्याशिवाय जाणारच नाहीं. सर्वांत शनि व मंगळ हे या स्थानांत फार वाईट जाणावे. सन १९०९ सालीं शनि व मंगळ यांची या स्थानांत मेष राशींत जी युति होणार आहे ती मनुष्यास खाड्यांत टाकल्याशिवाय राहणार नाहीं.

३ धन स्थानीं पाप ग्रह व व्यय स्थानीही पाप ग्रह असा योग ज्या कालीं असेल तो काल तर फारच वाईट होय.

४ जन्मकालीं धनस्थानीं अगर व्यय स्थानीं पाप ग्रह असून ज्याचा शत्रु जेव्हां त्या स्थानांत त्याच्या जवळ येईल अगर त्याच्या समोरून जाईल तेव्हां कांहीं तरी तोटा झाल्याशिवाय राहणार नाहीं.

५ धनस्थानीं अगर व्यय स्थानीं कोणताही ग्रह नसतां त्यांचे अधिपती ६।८।१२ या स्थानीं दुर्बल होतील व ते पाप ग्रहानें युक्त अथवा दृष्ट होतील तेव्हां सुद्धां संपत्तीची अडचण उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं.

६ धनेश ज्या ठिकाणीं जन्मकालीं असेल त्याच्या धन अगर व्यय स्थानीं पाप ग्रह आले असतां तो काळ अडचणीचा जाईल.

७ चंद्राच्या धन अगर व्ययस्थानीं पाप ग्रह आले असतां त्या कालीं नफ्या पेक्षां नुकसानीच जास्त होईल.

याप्रमाणें ग्रह असतां कोणतीही उलाढाल नीट विचारानें केली पाहिजे. पण वर वर्णन केलेल्या स्थानांपैकीं एखाद्या स्थानीं बलवान् शुभ ग्रह येईल किंवा कुंडलींत ४।९।११ या स्थानीं अगर चंद्राच्या ४।९।११ या स्थानीं शुभ ग्रह अथवा पाप ग्रह बलवान् होतील तर तितका नाश होणार नाहीं व आलेलीं सर्व संकटें अनायासें (अभ्रे न जातां) दूर होतील असें समजावें.

कुंडलीविज्ञान.

पुस्तक ९ वें.] अ. श्रावण कृ० ११ बुधवार. [अंक १४ वा

सांपत्तिक लाभ

या वर्षाच्या १२व्या अंकामध्यें मनुष्याला सांपत्तिक अडचणी केव्हां प्राप्त होण्याचा संभव असतो याबद्दलचे नियम सांगितले. आतां सांपत्तिक लाभ केव्हां होतात याचा विचार करावयाचा आहे. लाभ व हानि यांचे काल खेरीज करून बाकीचे काल मध्यम स्थितीचे होत. ज्या कालीं व्यापारांत (व्यवहारांत) बरोबरी होते किंवा वास्तविक आदा व खर्च व्हावयाचा तो होतो, तो काल मध्यम स्थितीचा जाणावा. लाभकालांत आपल्या नित्याच्या व्यवहारांत जितका नफा व्हावयाचा तो होतोच, पण त्याशिवाय कल्पनातीत संपत्ति कोठून तरी प्राप्त होते. वास्तविक आद्यापेक्षां अधिक आदा ज्या कालीं होतो तोच लाभकाल होय. लाभकाळाचें महत्व नोकरांपेक्षां स्वतंत्र धंदेवाल्यांस अधिक आहे. नोकरांची प्राप्ति नियमित असते, त्यांच्या बढतीचे खाल्यानिहाय विशेष प्रकारचे नियम असतात, त्यामुळें त्यांस लाभकालींसुद्धां केव्हां केव्हां अधिक संपत्ति मिळत नाहीं. खेडेगांवांत १०रुपये पगाराचा एखादा मास्तर पहा. या बिचाऱ्यास प्रमोशनची आशाच नाहीं, बरें शिकवण्यांची येऊन जाऊन पगाराबाहेर प्राप्ति व्हावयाची तर त्यांचेंही खेडेगांवांत नांव नको! असल्या दुर्दैवी माणसांस लाभकाळ काय करणार? कदाचित् कोणत्याही कारणानें नेह-

मीपेक्षां खर्च वांचण्याचा मात्र संभव आहे. ह्मणून असल्या माणसांच्या लाभाची मर्यादा इतकीच असें समजावें. स्वतंत्रपणें धंदा करणाऱ्या मनुष्यांस मात्र लाभकाळाचा अनुभव आल्याशिवाय रहावयाचा नाहीं. अशा मनुष्यांनीं लाभकाळीं धाडसानें कोणताही धंदा करण्यास हरकत नाहीं. दैववान् मनुष्यें लाभकाळीं रंक असल्यास राव बनतात! ह्मणून लाभकाल कसा जाणावा यार्चे विवेचन करणें जरूर आहे.

कुंडलींत २ रें, ५वें, ९वें व ११वें हीं चार स्थानें संपत्तिदायक आहेत. १लें, ४थें, ७वें व १०वें हीं स्थानें मध्यम प्रकारें लाभदायक आहेत या चारांत १०वें श्रेष्ठ, त्याच्या खालोखाल १।४।७ हीं अनुक्रमानें स्थानें आहेत. उत्तम प्रकारच्या संपत्तिदायक स्थानांत ९वें श्रेष्ठ आहे. त्यापेक्षां ११।२।५ हीं अनुक्रमानें कमी प्रमाणाचीं स्थानें आहेत. ९व्या स्थानाला भाग्यस्थान ह्मणतात व ११व्याला लाभ स्थान ह्मणतात. ह्मणून कित्येकांच्या मतें ११वें स्थान श्रेष्ठ आहे. ९वें, ५वें व २रें हीं त्यापेक्षां अनुक्रमानें कमी योग्यतेचीं आहेत.

उत्तम संपत्तिदायक स्थानें



मध्यम संपत्तिदायक स्थानें



वरील कुंडल्यांत संपत्तिदायक स्थानीं फुल्या दिल्या असून त्यांचे योग्यतेनुरूप नंबर घातले आहेत. कुंडलींत या ठिकाणीं जे आकडे असतील ते ज्या राशि दर्शवितात त्यांचे जे स्वामी तेच त्या स्थानांचेही स्वामी होत. हें पुढील कोष्टकावरून कळून येईल.

राशि व त्यांचे स्वामी.

राशि	स्वामी	राशि	स्वामी
१ मेष	मंगळ	७ तूळ	शुक्र
२ वृषभ	शुक्र	८ वृश्चिक	मंगळ
३ मिथुन	बुध	९ धनु	गुरू
४ कर्क	चंद्र	१० मकर	शनि
५ सिंह	रवि	११ कुंभ	शनि
६ कन्या	बुध	१२ मीन	गुरू

कुंडलींत राशि आंकड्यानें दर्शवितात; उदाहरणार्थ एखाद्या स्थानीं ८ चा आंकडा असला ह्मणजे तो वृश्चिक राशि दर्शवितो व त्याचा स्वामी जो मंगळ तोच त्या स्थानाचा असतो. यावरून संपत्तिदायक स्थानांचे अधिपति कोणते ते ओळखतां येतील.

रवि, शनि, राहु, मंगळ हे पाप ग्रह व बाकीचे शुभ ग्रह आहेत. कृष्ण पक्षांतला चंद्र पाप फलें उत्पन्न करणारा जाणावा. याशिवाय ग्रहांचीं उचें व नीचें, त्यांचे मित्रामित्र, त्यांचें स्थानमहात्म्य इतक्या सर्व गोष्टी विचारांत घेऊन लाभकाळचे नियम जाणावयाचे आहेत. वरील माहिती नसेल तर लाभकाळ समजणार नाहीं. ह्मणून नवीन वर्गणीदारांनीं प्रथम फलज्योतिषाची परिभाषा शिकली पाहिजे. असो. आतां लाभकाळ कोणत्या गोष्टींवरून ठरवावयाचा यांचे नियम सांगतों.

१ संपत्तिदायक स्थानांचे स्वामी स्वगृहीं आले असतां

२ संपत्तिदायक स्थानांचे स्वामी संपत्तिदायक कोणत्याही स्थानांत आले असतां

३ संपत्तिदायक स्थानांचे स्वामी एकमेकांच्या घरीं संपत्तिदायक स्थानांतच आले असतां

४ संपत्तिदायक स्थानांच्या अधिपतीच्या युति कोणत्याही संपत्तिदायक स्थानांत झाल्या असतां

५ संपत्तिदायक स्थानांत गुरु आला असतां

वरील पांच नियमांवरून लाभकाल ठरवावयाचा आहे. हे नियम लग्न कुंडली व राशी (चंद्र) कुंडली या दोहोंच्या अनुरोधानें पाहिले पाहिजेत. जर दोन्ही कुंडल्या लाभकाल दर्शवीत असतील तर खात्रीनें उत्तम दिवस जातील. एकच दर्शवीत असेल तर तो काल नं० २ चा जाईल.

लाभकाल सिद्ध करितांना सांपत्तिक हानि दर्शविणारी ग्रहस्थिति आहे कीं काय हेंही पाहिलें पाहिजे. संपत्ति देणारी ग्रहस्थिति हानि करणाऱ्या ग्रहस्थितीपेक्षां बलवान् असेल तर कितीही हानि झाली तरी ती जाणवणार नाहीं, व अखेरीस आढावा पाहिल्यास शिल्लकच आढळेल. पण, हानि करणारी ग्रहस्थिति बलवान् असेल तर कितीही मोठाले लाभ झाले तरी अखेरीस कर्ज किंवा तोटा व अनुभवाला येईल. अशा प्रकारच्या धोरणानें लाभकाल किती जोराचा आहे हें ज्याचें त्यानें ठरवून व्यवहार करावा म्हणजे सुख व समाधान प्राप्त होईल.

आजारी मनुष्याला ज्याप्रमाणें मी या दुखण्यांतून बरा केव्हां होईन हें जाणण्याची उत्कंठा असते त्याचप्रमाणें विपत्ति भोगणाऱ्या मनुष्याच्या मनाची स्थिति झालेली असते. म्हणून अशा चिंतातूर मनुष्यांस धैर्य देण्यास एक फक्त हेंच शास्त्र आहे, म्हणून त्याचा प्रत्येकानें अभ्यास केला पाहिजे. अभ्यास न करितां शास्त्राला दूषण देणारा मनुष्य कितीही जाडा विद्वान् असला तरी तो **मूर्खच** होय! असल्या मूर्खांची संख्या दिवसें दिवस कमी होत चालली आहे हें पाहून आनंद होतो!

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रंति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥

'भवभूति'

पुस्तक ९ वें.] चैत्र शु० ११, गुरुवार. [अंक ८ वा

सासऱ्याकडून धनप्राप्ति.

आज आपणासमोर जी कुंडली आली आहे. ती ज्याची आहे, तो गृहस्थ मूळचा साधारण स्थितींतला असून पुढें लग्न झाल्यावर घरजांवई झाला. सासऱ्याची दौलत ९।६ लाखांची असून त्याला मुलगा नाहीं. एकुलती एक मुलगी असून तिच्या नवऱ्याला त्यानें घरजांवई केला व सर्व इष्टेट त्यानें त्यास दिली! अशा भाग्यवान् मनुष्याची कुंडली खालीं दिली आहे. तींत भाग्यकारक ग्रह कोणते आहेत व स्त्रीच्या माहेरची दौलत कोणत्या कारणानें मिळाली याचा विचार करावयाचा आहे. आपणास सासऱ्याकडून कांहीं दौलत मिळेल किंवा या नाहीं याचा विचार करण्यास या कुंडलीचा उपयोग होईल. ती कुंडली अशी.—

जन्म—ता. २ माहे आगष्ट सन १८५८ सकाळीं ९ वाजून ४४ मि.

सायन भावचलित



जाया भावारंभीं मेष राशीचे २ अंश उदित आहेत. व कुटुंब भावारंभीं वृश्चिक राशीचे तितकेच अंश उदित आहेत. मेष व वृश्चिक या दोन राशींचा अधिपति मंगळ हा एकच ग्रह असून तो कुटुंब स्थानींच स्वगृहीं आहे! या योगावरून असें अनुमान करितां येईल कीं स्त्रीपक्षाकडून आपल्या कुटुंबास चांगली मदत मिळेल. कारण जायास्वामी मगळ हा कुटुंबस्थानीं स्वगृहीं आहे.

शिवाय चंद्र हा जायास्थानीं आपल्या उच्चांत आहे, यावरूनही विवाह हा आपल्या भाग्यास कारण आहे असें अनुमान करितां येईल.

जायास्वामी जो मंगळ, त्याच्या दशम स्थानांत सिंह राशि असून त्याचा अधिपति रवि हा स्वगृहीं आहे, यावरून आपला सासरा चांगला श्रीमत व मोठा अब्रूदार असण्याचा संभव आहे. व हा ग्रह कुंडलींत लाभस्थानीं पडल्यामुळें त्याच्यापासून आपणास चांगला लाभ होण्याचा संभव आहे असें दिसून येईल.

नवम स्थान हें भाग्य व कीर्ति यांचें दर्शक स्थान आहे. या स्थानांत गुरूसारखा प्रचंड गोल आहे व तो चंद्र राशीच्या कुटुंब-स्थानीं पडला आहे, व या स्थानाचा अधिपति जो बुध तो लाभ-स्थानीं आपल्या उच्चांत आहे. त्याच प्रमाणें चंद्राच्या सप्तम स्थानीं वृश्चिक राशि असून त्याचा अधिपति मंगळ हाही स्वगृहीं असल्या-मुळें बलवान् आहे. या प्रमाणें चंद्रावरूनही त्याचें लग्न व कुटुंब स्थान स्त्रीपक्षाकडून धन मिळावें असा बोध करीत आहे.

याप्रमाणें लग्न व चंद्र या दोहोंचींही जाया व कुटुंबस्थानें बलवान् असून त्यांचे अधिपतीही बलवान् आहेत, म्हणून स्त्रीप-क्षाकडून आपला भाग्योदय होणार या बद्दल शंका नाहीं असें आपण अनुमान करूं शकूं

या कुंडलींत भाग्ययोगही चांगला झाला आहे त्यामुळेंच ९।६ लक्षाची संपत्ति अचानक मिळाली! भाग्याधिपति बुध हा लाभ स्थानीं उच्च आहे, दशमाचा अधिपति चंद्र हा सप्तम स्थानीं उच्च आहे, लाभस्वामी रवि हा त्याच स्थानीं स्वगृहीं आहे. आणि धनाधिपति मंगळ हाही त्याच ठिकाणीं स्वगृही आहे. याप्रमाणें दोन ग्रह उच्च व दोन ग्रह स्वगृहीं असून ते योग्य स्थानीं आहेत व भाग्यस्थानीं गुरु आहे त्या मुळें अशा प्रकारें नशीब उदयास आलें हें उघड आहे.

आपणास अमुक एक प्रकारचा लाभ होईल कीं नाहीं हा प्रश्न सोडवतांना प्रथम आपला भाग्ययोग किती महत्वाचा आहे हें पा-हिलें पाहिजे. नंतर लग्न व चंद्र या दोहोंच्या मेळानें तो प्रश्न सोडविला भाग्ययोग नसेल तर बहुधा लाभ होणारच नाहीं व झाला तरी तो फार अल्प प्रमाणानेंच होईल असें जाणावें.

चतुर्थ स्थानचा अधिपति शनि हा सिंह राशींत शत्रुगृहीं आहे व चंद्राच्या चतुर्थ स्थानीं सिंह राशींत रवि व शनि असे दोन पाप ग्रह आहेत यांवरून असें समजावयाचें कीं याची मूळची गरिबीची स्थिति असली पाहिजे. व आईबापांच्या धनाची त्याला मुळींच प्राप्ति

नसली पाहिजे. जर या मनुष्यास भाग्ययोग नसता तर त्याची स्थिति फार वाईट झाली असती. दारिद्र्ययोगापेक्षां भाग्ययोग बलवान् असेल तरच ऐश्वर्य भोगील, दारिद्र्ययोग बलवान् असेल तर श्रीमंत असला तरी विपत्ति भोगील असें समजावें.

असो. वरील एकंदर विवेचनावरून मनुष्याला स्त्रीकडून धनप्राप्ति होण्यास कशा प्रकारचे योग लागतात हें कळून येईल. या कुंडलींत जसा योग झाला आहे तसाच इतरत्र आढळेल असें नाहीं. पण जाया व कुटुंब या स्थानांतील ग्रह व त्यांचे अधिपति यांच्या व भाग्ययोगाच्या अनुरोधानें कल्पना करितां येण्यासारखी आहे.

जाया व कुटुंब या दोन्ही स्थानांचे अधिपति एकत्र असे फक्त मंगळ व शुक्रच असूं शकतात. तूळ लग्नीं जाया व कुटुंब यांचा अधिपति मंगळ असतो व मेष लग्नीं जाया व कुटुंब यांचा अधिपति शुक्र असतो. जर स्त्रीकडून धनप्राप्ति होऊन त्याच्याच वर निर्वाह व्हावयाचा असेल तर यांचे अधिपति एकत्र असतील असें वाटतें. निर्वाह न होतां जर फक्त धनप्राप्तिच व्हावयाची असेल तर ते अधिपति भिन्न असूं शकतील आमच्या मतें या संबंधांत खालील नियम अढळले पाहिजेत ते असे.—

१ जाया व कटुंब स्थानांचे अधिपति एकच.
२ तो अधिपति जाया अगर कुटुंब स्थानीं.
३ जायास्वामी कुटुंबस्थानीं व कुटुंबेश जायास्थानीं
४ हे दोन्ही अधिपति जाया अगर कुटुंबस्थानीं एकत्र.
५ हे दोन्ही अधिपति केंद्री, त्रिकोणांत, लाभस्थानीं अगर चंद्राच्या जाया अगर कुटुंबस्थानीं एकत्र.

असे योग असल्यास स्त्रीकडून धनप्राप्ति होण्याचा संभव आहे असें समजावें. या प्रमाणें आज सुचलेले विचार वाचकवर्गास सादर केले आहेत त्यांचा अनुभव घेऊन सत्यासत्य कळल्यास आनंद होईल.

———————

या गृहस्थास प्रसंगोपात सासऱ्याकडून पैक्याची मदत मिळाली आहे. मुलाचे दोन विवाहांचे वेळीं अनुक्रमें २०० व १०० रु. मुलीचे विवाहाचे वेळीं रु. १०० मुलाचे शिक्षणाचे कामीं ५०० रु. आजारी असतांना १०० रुपये येणें प्रमाणें ५००।६०० रु. मिळाले. द्वितीय व सप्तम स्थानचा स्वामी शुक्र हा एकच ग्रह आहे व तो केंद्रीं आहे, गुरु भावचलितांतील भावारंभी बसतो, तो भाग्येश [नवमाचा स्वामी] आहे. सासऱ्याकडून वारंवार मदत झाल्यामुळें कर्जाचा प्रसंग आला नाहीं.

जन्म—ता० ६ मे १८९१



लग्न	र.	चं.	ने.	मं.	शु.	बु.	गु.	श.	ह.	रा.
३	१	०	२	२	०	१	११	५	६	२
१५	१६	१६	५	११	१२	२०	१३	१०	२९	७
४०	.	.	.	.	.	व	.	व	व	.

या गृहस्थाचा लग्नापासून भाग्योदय झाला आहे. सासऱ्यानें जांवयास विद्याभ्यासाकारितां जवळ ठेवलें असून नोकरी वगैरे आपण लावून आपल्या जवळ ठेवावें असा मानस आहे. परंतु घरची स्थितीही चांगली असल्यामुळें या गृहस्थाचा तितका ओढा दिसत नाहीं. ९।१०।११ हीं स्थानें ग्रहांनीं भरून गेलीं आहेत. भाग्यस्थानीं गुरु बली आहे. रा. ने. मं. हे ग्रह चलितांत लाभस्थानींच बसतात.

———————

खालील कुंडलीवाल्यास एका श्रीमंत गृहस्थानें घरजांवई करून घेण्याचें कबूल करून लग्नाचा संकेत केला. परंतु मुलगा एकुलता असल्यामुळें मुलाचे बापानें लग्न नाकबूल केलें.

ता. २५ जुलई १८९० दुपारी ४॥ वाजतां (अ. २०)



ल.	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.	ने
९	४	७	८	४	१०	५	५	२	६	२
०	३	२८	३	२	८	१५	२	२५	२३	६
५५	.	.	.	.	व	.	.	.	.	.

कुटुंबस्थानीं गुरु असून वक्री आहे. जायेश चंद्र लाभस्थानीं नीच आहे. भाग्यस्थानीं शुक्र आहे परंतु तो नीच आहे. रवि मात्र जायास्थानीं स्वगृहीं आहे. या ग्रहामुळेंच फायदा आला होता. परंतु भाग्ययोग बली नसल्यामुळें चुकला.

जन्म—ता० १-९-१८८२ सकाळीं ४ वाजतां (अ. २०)



र.	चं.	मं.	बु.	ह.	गु.	शु	श.	रा.	ने.	ल.
९	०	६	९	९	२	६	१	७	१	४
८	२२	८	२४	१८	२७	२३	२६	२५	१९	१३

या गृहस्थास सासरा द्रव्य देऊं देऊं असें म्हणून लाडूच दाखवित आहे. आजपर्यंत कांहीं मिळालें नाहीं. कुटुंबेश बली असून त्यावर जायेश शनि याची ९।५ अशी शुभदृष्टि असून गुरु शुक्र हे नवपंचम आहेत. भाग्येश शुक्राजवळ असून भाग्यस्थानीं चंद्र आहे. लाभस्थानी गुरु आहे. हा अंशतः जायास्वामी आहे. भाग्ययोग बरा झाल्यामुळें मिळण्याचा संभव आहे. बुध हा मातुलकारक ग्रह असून उच्च असल्यानुळें आजपर्यंत मामाकडून चांगला फायदा होत आला आहे.

जन्म—ता. २१-१०-१८७९ सूर्योदयीं (अ. २०)



ल.	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु	श.	रा.	ह.	ने.
६	६	९	१	७	११	५	०	९	५	१
२१	२९	१०	२०	१	३	१७	१२	१९	७	११
			व		व		व			व.

या गृहस्थास पहिल्या बायकोकडून द्रव्य मिळणार होतें. कारण, सासरा बारला असून बायको खेरीज कोणी मूलवाळ नव्हतें. म्हणून

सासूनें आपलीं स्थावर जंगम इष्टेट जावयास देण्याचें ठरविलें होतें. परंतु बायको वारल्यामुळें सर्व जागच्या जागीं राहिलें!
कळावें लोभवृद्धि व्हावी हे विनंति.

गणेश दामोदर ग्रंथे.

श्री.

जन्म तारीख ३० अक्टोबर सन १९०९ रात्रीं ८ वाजून ३० मिनिटांनीं मुंबई टाईम.

गोविंद गणेश कुळकर्णी. मुकाम खिर्डी. अक्षांश २० चे भावसाधनावरून सायन कुंडली.

लग्न कुंडली.

नंबर. १



आजारीपणा.

कुंडलीवरून आजारीपणाचे काल कसे तयार करावे, हें मागें सांगितल्याचें वाचकांस स्मरत असेलच. आजारी पणाचा काळ प्राप्त झाला असतां मनुष्य आजारी पडतोच असें कित्येक वेळां खात्रीनें सांगतां येत नाहीं. जन्मतः जो निरोगी असतो त्याला आठवा शनि येवो कीं, चवथा राहू येवो, त्याला त्या कालीं मुळींच बाधा होत नाहीं. परंतु जो अशक्त प्रकृतिचा आहे, त्याला सामान्य ग्रह अनिष्ट असतांही तो आजारी झाल्याशिवाय रहात नाहीं. एखाद्या मनुष्याला सिंगल कप चहा सुद्रां सोसत नाहीं, पण कित्येक असें आहेत कीं ते दोन दोन तीन तीन डझन चहाचा फन्ना उडवतात! चहा हा जातीनें ऊष्ण असून प्रकृतीला अपायकारक आहे, तरी निरोगी मनुष्याला तो यत्किंचितही बाधा करूं शकत नाहीं. सोमल हा जात्या प्राणघातक आहे, तरीपण त्यालाही पचनीं पाडणारे खप्पी आहेत! तात्पर्य, जो जातीचा निरोगी त्याला कोणत्याही कारणानें बाधा होत नाहीं. त्याचप्रमाणें ज्याच्या कुंडलींत जन्मतःच आरोग्यप्रद ग्रह पडले असतील त्यांस अरिष्ट ग्रहांनीं जाणवत नाहीं. ह्मणून ज्योतिष्याला प्रथम प्रकृति कळली पाहिजे. प्रकृति नाजूक असेल तर ज्योतिष्याचें भविष्य कदापि चुकणार नाहीं. अशा मनुष्याला एक ग्रह बिघडला तरी तितकें निमित्त पुरे होतें. यासाठीं ज्योतिष्यानें प्रथम प्रकृतीचें निदान करण्यास शिकलें पाहिजे.

आतां समाजाच्या बाजूनें विचार करावयाचा ह्मणजे आजारी पणा ज्या कालीं प्राप्त होतो, त्या कालीं जर शास्त्रीय नियमानें ग्रह बिघडलेले दृष्टीस पडतात, तर ज्योतिषी ज्या कालीं शास्त्रीय नियमानेंच ग्रह बिघडले आहेत असें सांगेल त्या कालीं प्रत्येक

मनुष्यानें सावधगिरीनेंच वागावें हा उत्तम पक्ष. अशा वेळीं किर्रर् जंगलांतून जातांना जितकी सावधगिरी बाळगतो तितकीच बाळगली पाहिजे. जसें त्या जंगलांतून जातांना एखाद्या क्रूर वन्य पशूची गांठ पडून तत्सत् होण्याचा प्रसंग येणारच नाहीं असें विचारी पुरुष समजत नाहीं, तसेंच ग्रह बिघडले असतां प्रकृति बिघडणार नाहींच असें सुज्ञ मनुष्य कधींही मानणार नाहीं. कांहीं एक न होतां काल निघून गेला तर उत्तमच आहे, पण जर तसा प्रसंग आला तर सावधगिरी ठेवल्यानें किती समाधान होईल, याचा प्रत्येकानें विचार करावा.

कित्येक कुंडल्यांत असे कांहीं ग्रह पडलेले असतात कीं त्यांतले अमुक ग्रह आमक्या स्थानीं गेले कीं त्यांचा परिणाम अनुभवाला यावयाचाच. अशाच तऱ्हेची एक कुंडली आढळली ती अशी—

जन्म—ता० ८ एप्रिल सन १९०८ रात्रीं ११ वा. ३० मि.

सायन भावचलित



जन्मापासून १३ व. ४ म. २७ दि. बुधाची महादशा आहे.

बुधमहादशेच्या अंतर्दशा

बु.	के.	शु.	र.	चं.	मं.	रा.	गु.	श.
		२	३	४	५	८	१०	१३
		७	५	१०	१०	९	८	४
		२१	२७	२७	२४	१२	१८	२७
	८	२९	२	१	२१	१७	२२	

आरंभ तारीख	एप्रि.	न.	अ.	मा.	फे	स.	डि.
	१९०८	१०	११	१३	१४	१६	१८

ही मुलगी ता. १७ सप्टेंबर सन १९०९ रात्रीं सुमारें ११ वाजतां तापानें सीक झाली. ता. २८।२९।३० या रात्री जागून काढल्या व नंतर उतारा पडला. या गोष्टीचा शास्त्राशीं मेळ कसा बसतो, हें पहावयाचें आहे.

जन्मलग्न मकर १ अंशांत उदित आहे व या राशींत हर्शल आहे चंद्र हा नेप्च्यूनशीं योग व हर्शलशीं प्रतियोग करून सुटल्यावर जन्म झाला आहे. जन्मलग्नाचा स्वामी शनि हा मेष राशींत आपल्या नीचांत आहे. हे योग प्रकृतिला सुखकारक झालेले नाहींत.

सुखस्थानीं रवि मेष राशींत १८ अं. ३१ क. आहे. या ग्रहावरून शनि ज्या वेळीं जाईल त्या वेळीं प्रकृति बिघडल्या-शिवाय राहणार नाहीं. यावेळीं अपमृत्यूचाच विशेष संभव आहे. त्याचप्रमाणें लग्नीं उदित असलेला हर्शल जन्मचंद्राच्या समोरून जाईल व शनि हा त्याच्याचीं केंद्रयोग करील तो काल अपमृत्यूचा झालाच पाहिजे असें या कुंडलींत आपणास जोरानें सांगतां येण्या-सारखें आहे.

शनि हा मेषराशींत १६ अंश आला म्हणजे हर्शलशीं केंद्रयोग करील, १८ अंश आला म्हणजे रवीला मिळेल व १९ अंश म्हणजे चंद्राशीं केंद्रयोग करील.

त्याचप्रमाणें शनि व हर्शल हे फिरत फिरत ११ अंशांच्या पुढें कोठेतरी केंद्रयोग करितील. हे सर्व योग बहुधा एकाच वर्षी घडणारे आहेत, म्हणून जन्मापासून २ वर्षांच्या आंत एक वेळ अपमृत्यु घडला पाहिजे असें आपण अनुमान करूं.

सन १९०९ मध्यें शनि हा दोन वेळ जन्मस्थ रवीवरून जातो. पहिल्यानें मे मध्यें जाऊन नंतर वक्री होतो व तसा असतां नवंबर मध्यें पुन्हा रवीजवळ येतो. यावरून यावर्षी मे पासून नवंबरपर्यंतच्या कालांत अपमृत्यूचा काल संभवतो असें झालें. याच कालांत तो चंद्र आणि हर्शल या जन्मस्थ ग्रहांशी केंद्रयोग करितो, अर्थात ही स्थिति फार अनिष्ट झाली.

याच वर्षी मंगळ मेष राशींत वक्री झाला आहे, हा दुजोरा मिळाला. वक्रगतीनें आलेला मंगळ ता० १७ लाच जन्मस्थ शनीवरून गेला. म्हणून याच दिवशीं प्रथम ताप आला ही चमत्काराची गोष्ट नव्हे काय!

ता० २८।२९।३० या तारखा भयंकर स्थितींत गेल्या याचें कारण, चंद्र मेष राशींत असून तो मंगळ व शनि यांच्याशीं **अभेद** युति करीत होता. ही युति भयंकर आहे. शिवाय या दिवशींचा रवि हा जन्मशनीच्या समोरून जात होता. ही सर्व ग्रहस्थिति अपमृत्यु दर्शविते हें उघड आहे. ही स्थिति इतकी खात्रीलायक बडणारी होती कीं, तीबद्दल शंकासुद्धां येऊं नये.

कुंडलीविज्ञान.

पुस्तक ९ वें.] फाल्गुन शु० १०, सोमवार [अंक ६ वा

ज्योतिर्वैद्यक.

मागें सांगितल्याप्रमाणें या अंकापासून आजारीपणा रोग व त्याचा परिणाम यांचा ज्योतिःशास्त्राधारें विचार करण्यासाठीं "ज्योतिर्वैद्यक" हें सदर ठेविलें आहे. जशी जशी माहिती मिळेल तशी तशी कारणासह वरील सदराखालीं प्रसिद्ध होईल. हा विषय अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळें वाचकवर्ग वेळोवेळ माहिती पुरवील अशी आशा आहे.

१



ही ज्या गृहस्थांची कुंडली आहे ते गृहस्थ आपली माहिती स्वतः खालील प्रमाणें देतात.

"आपण ज्योतिर्वैद्यकासंबंधानें लिहिणार होतां, त्यास उपयोगी पडेल अशी माहिती कळवीत आहें. माझे कुंडलींत मंगळ ०–३–४२ आहे. गेलेवर्षी मेच्या आरंभी शनि ०–४ पासून ०–९–३० पर्यंत आक्रमण करीत असतां मला मलावरोध नांवाची विकृति झाली व बरेंच दुःख झालें. पुढें पुनः शनि वक्री होऊन त्याच अंशांतून भ्रमण करीत असतां मजला मूळव्याध उद्भवली, व ४ अंशावर आल्या नंतर बरी झाली. हा रोग अजीबात बरा होत नाहीं. पुनः जानेवारीमध्यें त्याच अंशांतून शनि जात असतां काय होतें हें पहावयाचें होतें म्हणून डिसेंबरमध्यें मीं जें पत्र लिहिलें त्यांत या गोष्टीचा उल्लेख केला नाहीं. ती मुदत जानेवारी ता० २५ पर्यंत आहे परंतु अद्याप कांहीं दिसत नाहीं, मग काय कारण असेल तें असो."

मूळव्याध कोणत्या कोणत्या कारणांनीं उत्पन्न होतें याचा विचार केला पाहिजे. मेष, सिंह व धनु हें अग्निराशि व गुह्येंद्रियावर अंमल करणारा वृश्चिक हा राशि; लग्न, द्वितीय, अष्टम, षष्ठ व द्वादश हीं स्थानें; रवि, मंगळ, शनि व राहू हे पाप ग्रह इतक्यांच्या योगानें हा रोग उत्पन्न होतो असा अनुभव आहे. वरील पाप ग्रह राशींच्या कोणत्या भागांत व कोणत्या स्थानांत असतां या रोगाची उत्पत्ति होते हें अद्यापि कोणीही निश्चित केलेलें नाहीं. साधारण अनुमानानें कित्येक ज्योतिषी केव्हां केव्हां हा रोग कुंडलीवरून ओळखूं शकतात. पण याला शास्त्रीय स्वरूप कोणी दिलेलें आढळांत नाहीं. या साठीं आपणास प्रथम कुंडलींत हे योग कसे कसे आढळतात हें पाहिलें पाहिजे. नंतर त्यावरून सामान्य नियम बसवून या विषयाला शास्त्रीय स्वरूप देतां येईल.

वरील कुंडलींत धनु राशीचें लग्न उदित आहे व या राशींत चंद्र ९ अंश ५५ कला आहे. हा चंद्र सायन मूळ नक्षत्रांत आहे. विभात्मक मूळ नक्षत्र हें फार अनिष्ट आहे. हें नक्षत्र या विकारास अंशतः कारण झालेलें आहे.

दुसरें, महत्वाचें कारण म्हटलें म्हणजे षष्ठ स्थानीं सूर्य हा कृत्तिका या अग्निराशींत आहे. षष्ठ स्थानावर रोगांचा विचार होत असतो. कृत्तिकेंतले रवि व मंगळ हे मूळव्याध उत्पन्न करितात असा बऱ्याच ठिकाणीं अनुभव आहे. हें मेष राशीच्या २६ अंश ४० कलांपासून वृषभ राशीच्या १० अंशांपर्यंत असतें. सायन विभागात्मक या नक्षत्राचा अनुभव वरील प्रमाणें चांगला येतो. पुस्तक ८ अंक ३२ मध्यें आरंभींच जी कुंडली आहे, तींत सुद्धां याच नक्षत्रांत द्वितीय स्थानीं मंगळ आहे! या वरून कृत्तिकेंतले सूर्यमंगळ हे विवक्षित स्थलीं मूळव्याध उत्पन्न करितात असें म्हटलें पाहिजे.

त्या कुंडलींत सुद्धां चंद्राच्या षष्ठस्थानीं मूळ नक्षत्रांत शनि आहे व तो मंगळाच्या पूर्ण दृष्टींत आहे. तेथेंही लग्न व चंद्र याच नक्षत्रांत आहेत! व चंद्राच्या षष्ठ स्थानीं कृतिकेंतला सूर्य आहे. हा सूर्य शनीनें युक्त आहे असें म्हणतां येणार नाहीं, कारण तो रवीच्या पुढें बराच दूर आहे. मंगळाची त्याच्यावर एकरा[illegible]ष्टि आहे, पण तिचीं फलें आपणास अनुभूत नाहींत. म्हणून फक्त रवीच या रोगास कारणीभूत झालेला आहे असें आपणास म्हटलें पाहिजे.

व्ययस्थानीं वृश्चिक राशींत राहु आहे व चतुर्थ स्थानीं मेष राशींत मंगळ आहे हे ग्रह अंशतः कारण आहेत. यांस विशेष महत्व देतां येत नाहीं कारण मंगळ अश्विनींत असून राहू हा अनुराधा नक्षत्रांत आहे. हे नक्षत्रविभाग विशेष अनिष्ट नाहींत.

ही कुंडली ज्याची आहे, त्यास अनुभव आलेला आरंभीं दिला आहे. शनि हा मंगळ, चंद्र, राहु व सूर्य यांवरून जातांना या रोगापासून पीडा होणें स्वाभाविक आहे. परंतु त्यांतही रवीवरून जातांना फार पीडा होईल असें वाटतें. कारण तोच ग्रह या विकारास मुख्यत्वें कारण आहे.

या विकाराची उत्पत्ती साडेसातींत झाली असावी. कारण, धनु राशीच्या चंद्राला साडेसातीचीं पहिलीं पांच वर्षें कठीण जातात. शनि हा रवीच्या समोर झाल्यावर किंवा तो लग्नीं चंद्रावर आल्यावर हा विकार उत्पन्न झाला असला पाहिजे. हा विकार बरा न होणारा आहे. कारण त्याचा बोध जन्मकालींच होत आहे.

मूळव्याधीचा उपद्रव पुष्कळांस असतो त्यामुळें या योगाचें निदान बांधण्यास बऱ्याच कुंडल्या मिळूं शकतील. तरी शोधकांनीं इकडे अवश्य लक्ष पुरवावें. शेंपन्नास कुंडल्या पाहिल्याशिवाय बिनचूक निदान होणार नाहीं.

मूळव्याधीचे प्रकारही निरनिराळे आहेत. कित्येकांस नुसतें रक्तच पडतें. कित्येकांस मोड आलेले असतात. कित्येकांच्या आंतला आंतड्याचा भाग वारंवार सुजतो तर कित्येकांच्या त्या भागावर फोड येतात. असे निरनिराळे प्रकार असल्यामुळें कुंडल्यांतही निरनिराळे योग दृष्टीस पडतील. यासाठीं अनुभव घेण्यासाठीं नुसतें मूळव्याध आहे इतकें कळून भागणार नाहीं. ती कोणत्या प्रकारची आहे, कधीं उत्पन्न झाली व कोणकोणत्या काळीं तिच्यापासून फार त्रास झाला ही सर्व माहिती मिळाली पाहिजे. इकडे आमच्या वाचकांचें लक्ष जाईल अशी आशा आहे.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥

'भवभूति'

पुस्तक ९ वें.] फाल्गुन कृ० ३०, रविवार [अंक ७ वा

उपजत व्यंग.

शरीराच्या कोणत्या भागांत व्यंग आहे व त्याची उत्पत्ति केव्हां आहे हा एक कुंडलीच्या वर्णनाचा महत्वाचा भाग आहे. व्यंग जाणण्यास हजारों कुंडल्यांचा अनुभव ज्यानें घेतला असेल तोच कांहींसा योग्य आहे. यदा कदाचित् व्यंग समजलें तरी त्याचा उत्पत्तिकाल जाणणें तर फार अवघड आहे. अमुक व्यंग उपजत आहे कीं पुढें होणारें आहे हा प्रश्न कुंडली पाहतां क्षणींच जो सोडवील तो सामर्थ्यवान् ज्योतिषी समजला पाहिजे. परंतु असलें सामर्थ्य क्वचित्च असेल अशी आमची समजूत आहे. आमचें काम अभ्यासी मनुष्याला साह्य देण्याचें आहे. त्याला अनुसरून आज एका मुलाची कुंडली खालीं दिली आहे. या मुलाचें डावें पाऊल वांकडें आहे! ह्मणजे तें उभें असावयाचें तें आडवें आहे. हें व्यंग उपजतच आहे. असा प्रकार कां झाला याचें ज्योतिःशास्त्राच्या

दृष्टीनें अवलोकन केलें पाहिजे. या मुलाच्या आईला ३ वर्षांपूर्वी प्लेगच्या गांठी उठून एक पाय अधू झाला व त्यामुळें ती चालतांना पाय वांकडा टाकूं लागली होती. याच कारणानें गर्भाशयांत त्या पायाच्या वाढीला प्रतिबंध होऊन असा प्रकार झाला असावा असें कित्येक लोक ह्मणत आहेत, कदाचित् तसेंच असेल. पण आपणास कोणती ग्रहस्थिति प्रतिकूल होती याचा विचार केला पाहिजे.

जन्म—ता. २७ फे. सन १९०९ स. ९ वाजून २७ मि. मुं. टा.

सायन भावचलित कुंडली



व्ययस्थान, मीन राशि व शनि हा ग्रह इतक्यांचा अंमल मनुष्याच्या पावलांवर असतो हें शास्त्रसिद्ध आहे. ह्मणून इतक्या गोष्टी कुंडलींत बिघडलेल्या असल्या पाहिजेत. या कुंडलींत व्ययस्थानीं शनि आहे व तो मेष राशीचा असून मंगळाच्या दृष्टींत आहे ह्मणून बिघडलेला आहे. मीन राशींत रवि हा पाप ग्रह असून तो व शनि

यांत एकराश्यंतर दृष्टियोग झालेला आहे. या प्रमाणें व्यय स्थान, मीन राशि व शनि हे पाप ग्रहानें दूषित आहेत ह्मणून या मुलाचें पाऊल उपजतच वांकडें झालें असावें असें ठरतें.

हें व्यंग उपजतच आहे. तरी तें तेव्हांच कां झालें व पुढें झालें असतें तर केव्हां या प्रश्नाचें उत्तर आपणास नीटसें देतां येणार नाहीं असें आमचें मत आहे.

जन्मकाळीं मंगळ व हर्शल हे चंद्राला ८ वे असल्यामुळें व ते कुंडलींत नवम स्थानांत असल्यामुळें मार्च्य व एप्रिलचा एक पंधरवडा या कालांत मातेची प्रकृति नीट राहणार नाहीं व त्यामुळें मुलालाही शारीरयातना होतील असें कळविलें होतें. त्या प्रमाणें अनुभव येत आहे! कारण ता. २७ मार्च्यला मंगळ हा हर्शलशीं व रवि हा शनीशीं ता. ३ एप्रीलला युति करणार आहे. या युति अनिष्ट दर्शक आहेत.

द्रेष्काण कुंडलीवरून व्यंग व शरीरावरील खुणा सांगण्याची एक ज्योतिष्यांची सामान्य पद्धति आहे. या पद्धतीनें हें वरील पायाचें व्यंग ठरवितां येत असेल तर तें कोणीं पहावें. विशेषतः कोणतेंही व्यंग स्थान, राशि व ग्रह यांच्या अनुरोधानेंच ठरणारें आहे अशी आमची समजूतच आहे.

जगद्वृत्त

[केसरीवरून]

रा. नारायण त्रिंबक जोशी मु. मुरुड यांचें भविष्य.—शके १८३१ सालीं पर्जन्य चांगला पडून भात, नागली, गहूं व मुईमुग यांचें पीक उत्तम येईल. कपाशीची स्वस्ताई होईल. तेल, गूळ, तूप वगैरे रस पदार्थांची महर्गहता होईल. चोर आणि अनेक प्रकारचे रोग यांपासून भीति जास्त. राजे अपसांत तंटे करतील; पण युद्धाचा प्रसंग कमीच येईल. मंगल व धार्मिक कृत्यें जास्त होतील. गोमहिष्यादिकांची वृद्धि होईल. कडवे, कुळीथ व तुरी यांचा नाश होईल. फळें व फुलें यांची वृद्धी होईल. जगांतील बरेच नामांकित गृहस्थ मृत्युवश होतील. इंग्लंडांतील प्रधानमंडळ बदलेल. बोअर व हिंदी लोक यांचा तंटा अपसांत मिटेल. हिंदुस्थानांत स्वस्थता कमी असेल, तुर्कस्थान, रशिया, चीन आणि अफगाण या देशांस हें वर्ष हानिकर असून जपान, अमेरिका व जर्मनी यांस लाभदायक आहे; आणि हिंदुस्थान, आयर्लेंद, इराण, इंग्लंड व फ्रान्स यांस मध्यम आहे. हें वर्ष मेष, मिथुन, कन्या आणि वृश्चिक या राशींस उत्तम लाभदायक होईल; सिंह, मकर व कुंभ यांस मध्यम आणि वृषभ, कर्क, तूळ, धन आणि मीन यांस अनिष्ट जाईल.



रोगनिदान.

[सभार्थचिंतामणीवरून]

व्रण.

रोगस्थानगते सूर्ये तद्भावे पापसंयुते ॥
पापदृष्टियुते नाभौ पैत्तिकाद्व्रणमादिशेत् ॥

अर्थ.—सहाव्या स्थानांत सूर्य हा पाप ग्रहानें युक्त व दृष्ट असा असेल तर नाभीच्या ठिकाणीं उष्णतेपासून व्रण रोग होतो. जसें.—



सहाव्या स्थानाचा नाभीवर अंमल असतो. व रवि हा तेथें पाप ग्रहानें युक्त व दृष्ट असतां त्या भागाच्या ठिकाणीं व्रण होतो असें ग्रंथकार सांगतो. रवि व मंगळ हे दोन्ही ग्रह व्रण उत्पन्न करितात. त्यांत रवीपेक्षां मंगळाचा या कामांत नंबर पहिला आहे. या योगांत राशि मुळींच विचारांत घेतला नाहीं. वास्तविकपणें तो रवि कोणत्या राशीचा असतां रोग उत्पन्न करितो हें पाहिलें पाहिजे. मेष व धनु हे राशि मुख्यत्वें असले रोग उत्पन्न करितात. ह्मणून या राशींत रवि हा मंगळानें युक्त असेल व त्यावर शनीची दृष्टि असेल तर व्रण उत्पन्न होण्याचा संभव आहे. त्याचप्रमाणें हा रोग जर झालेला असेल तर तो कधींही बरा व्हावयाचा नाहीं. श्लोकावरून रवि हा

शनींनें युक्त असून त्यावर मंगळाची दृष्टि असतांही हा रोग संभवतो असें समजावें.

तथाभूते निशानाथे क्रूरदृष्टे तदंशके ॥
वातार्दितो भवेज्जातो रक्तपित्तार्दितःकुजे ॥
श्लेष्मवातार्दिते सौम्ये तथाभूते विशेषतः ॥
जीवे तु विद्रधिर्वाच्यः शुक्रे मूलातिसाररुक् ॥
तथाभूते शनौ गुल्मरोगो वात्र विशेषतः ॥
राहुकेतुसमायुक्ते बाधा पैशाचिकी स्मृता ॥

अर्थ.—रवीप्रमाणेंच सहाव्या स्थानांत चंद्र हा पाप ग्रहानें युक्त व दृष्ट असून पापं ग्रहाच्या नवमांशीं असेल तर वातानें व्रण रोग उत्पन्न होतो. मंगळ तसा असेल तर रक्तपित्तानें व्रण रोगाचा उद्भव होतो. बुध तसा असेल तर कफापासून तो रोग होतो. गुरु तसा असेल तर विद्रधि होतो. शुक्र तसा असेल तर मूळव्याधि व अतिसार हे रोग होतात. शनि तसा असेल तर गुल्म नामक रोग होतो. षष्ठ स्थानचा ग्रह राहुकेतूंनीं युक्त असतां होणारी पीडा पिशाचापासून जाणावी.

या वरून षष्ठ स्थानीं प्रत्येक ग्रह जर पापयुक्त व पापदृष्ट असेल तर तो रोग उत्पन्न करितो असें ग्रंथकारांचें मत आहे. यांत तो राशींचा विचार मुळींच करीत नाहीं. युक्त व दृष्ट यांचा अर्थ जेव्हां दोन ग्रह जवळ जवळ एकाच अंशांत असतात तेव्हां ते युक्त आहेत व जेव्हां एक ग्रह जितक्या अंशांत असेल तितक्याच अंशांत असलेल्या ग्रहाला पाहील तेव्हां तो दुसरा ग्रह दृष्ट आहे असा करावयाचा. ग्रह फार दूर दूर असतील तर ते एकाच राशींत असले तरी युक्त असें ह्मणणें बरोबर नाहीं. तसे असतील तर त्यांचा परिणाम

प्रत्येकाचा स्वतंत्रपणें घडतो असा अनुभव येतो व तसें होणेंच योग्य आहे.

भ्रांति-पंडु.

षष्ठे चंद्रे कुजयुते भ्रांतिपंड्वादि रोगभाक्

अर्थ.—सहाव्या स्थानांत चंद्र हा मगळानें युक्त असेल तर पंडुरोग होतो किंवा भ्रमिष्ट होतो. जसें.—



पंडुरोग व भ्रमिष्टता हे दोन्ही रोग निरनिराळे आहेत. केव्हां कोणता रोग होतो हें यांत सांगितलेलें नाहीं. अनुभव असा आहे कीं जर चंद्र हा सहाव्या स्थानांत मंगळानें युक्त अथवा दृष्ट असेल तर झटके येतात, किंवा जन्माचा अपस्मार होतो. वर जो भ्रांति रोग दिला आहे तो अशाच प्रकारचा आहे. विशेषतः या योगानें स्मृति नष्ट होते असें समजावें. चंद्रमंगळ योग षष्ठ स्थानीं राशिपरत्वें निरनिराळे व्याधि उत्पन्न करितो, असा अनुभव येतो. कृष्ण पक्षांतला चंद्र कर्क राशींत मंगळानें युक्त असेल तर पंडुरोग उत्पन्न होण्याचा संभव जाणावा.

विसर्प.

सारे चंद्रे रवियुते विसर्पाः शूलरोगभाक् ॥

अर्थ.—षष्ठ स्थानीं चंद्र हा रवि व मंगळ यांनीं युक्त असतां विसर्प नामक रोग उत्पन्न होतो. जसें.—



विसर्प याला धांवरें असें ह्मणतात. यांत कित्येक प्रकार फार भयंकर असून प्राणघातक आहेत. हा योग अग्निराशीत झाल्यास फार भयंकर जाणावा.

क्षय.

षष्ठे कुजे बुधयुते भृगुचंद्रनिरीक्षिते ॥
क्रूरांशक समायुक्ते क्षयरोगं वदंतिहि ॥

अर्थ.—षष्ठ स्थानीं मंगळ हा बुधानें युक्त असून त्यावर शुक्र व चंद्र यांची दृष्टि असेल व तो मंगळ पाप ग्रहाच्या नवमांशीं असेल तर क्षयरोग होतो. जसें.—



शुक्र व चंद्र यांस एकच सप्तम दृष्टि आहे. ह्मणून या योगांत शुक्र हा बुधापासून ७व्या स्थानीं कल्पावा लागतो. पण हल्लींच्या भूमध्यस्थ पद्धतींत तो असा येणें अशक्य आहे. अर्थात् हा योग **सूर्यमध्यस्थ** पद्धतीनेंच पाहिला पाहिजे.

जन्मरोगी.

शन्यारसहिते षष्ठे रविराहुनिरीक्षिते ॥
लग्नेश्वरे हीनबले दीर्घरोगी भवेन्नरः ॥

अर्थ.—सहाव्या स्थानांत शनि व मंगळ असून त्यांवर रवि व राहु हे पाहत असतील, व लग्नस्वामी बलहीन असेल तर मनुष्य जन्माचा रोगी होतो. जसें



शनीचे मंगळ व रवि हे शत्रु असल्यामुळें हा योग प्रकृतीला फारच अपायकारक होतो. हा योग ज्याच्या कुंडलींत असेल त्याचें जीवित व्यर्थ होय.

श्वासकासादि.

षष्ठे शनौ सगुळीके रव्यारफणिवीक्षिते ॥
शुभैर्न दृष्टे युक्ते वा श्वासकासक्षयादियुक् ॥

अर्थ.—सहाव्या स्थानांत शनि हा गुलिकानें युक्त असून त्यावर रवि, मंगळ व राहु यांची दृष्टि असेल व तो शनि शुभ ग्रहानें युक्त अथवा दृष्ट नसेल तर दमा, खोकला, क्षय असले रोग होतात. जसें.—



मंगळ आपल्या स्थानापासून ४।७।८ या स्थानावर पाहतो, ह्मणून त्याच्या तीन स्थिति कल्पिल्या आहेत.

पीनस.

षष्ठे चंद्रे शनौ रंध्रे व्यये पापे त्रिलग्नपे ॥
पापांशकसमायुक्ते पीनसं रोगमादिशेत् ॥

अर्थ सहाव्या स्थानांत चंद्र, अष्टमांत शनि, व्यय स्थानीं पाप ग्रह व लग्नस्वामी पाप ग्रहाच्या नवमांशीं असतां पीनस नामक योग होतो. जसें.—



वरील प्रमाणें ग्रह असून लग्नाचा स्वामी नवमांश कुंडलींत पाप ग्रहाच्या राशीस पाहिजे.

अपस्मार.

षष्ठाष्टमे मानुसुते सभौमेजातोऽप्यपस्मारयुतो नरःस्यात् ॥

अर्थ.—शनि हा मंगळानें युक्त सहाव्या अगर आठव्या स्थानांत असेल तर अपस्मार होतो. जसें.—



उन्माद.

लग्ने गुरौ भूमिसुते कलत्रे उन्मादमाक् तत्र नरोहि जातः ॥

अर्थ.—लग्नीं गुरु असून मंगळ जर सप्तमांत असेल तर उन्माद होतो. जसें.—



यांत गुरु व मंगळ हे समोरासमोर असतां उन्माद होतो असें ह्मटलें आहे. हा योग शास्त्रीय तत्वाला जुळत नाहीं.

उन्मादयुग्भ्रंशयुतो विलग्ने शनौ कलत्रे सकुजे त्रिकोणे ॥

अर्थ.—लग्नीं शनि असून सप्तमांत मंगळ असतां उन्माद होतो किंवा मनुष्य भ्रमिष्ट होतो.

वरील कुंडलींत गुरूच्या ठिकाणीं शनि मांडल्यास हा योग स्पष्ट होतो. शनीसमोर मंगळ असतां उन्माद होऊं शकेल, ह्मणून हा योग बरोबर आहे.

लग्ने शनौ रिःफगते दिनेशे चंद्रे त्रिकोणे यदि वा धराजे ॥

अर्थ.—लग्नीं शनि, द्वादश स्थानीं रवि व चंद्र किंवा मंगळ त्रिकोणांत असतां उन्माद होतो. जसें.—



यांत मंगळ कोणत्याही घरांत घेतला तरी त्याची खवीवर दृष्टि पोहोंचते. शनीवर मात्र कोणत्याही ग्रहाची दृष्टि पडत नाहीं. त्याच प्रमाणें चंद्र व मंगळ हे एकत्रच पाहिजेत असें नाहीं. अशा प्रकारचें या योगाचें स्वरूप आहे. तें उपपत्तीला नीट जुळत नाहीं ह्मणून हा योग संभवनीय दिसत नाहीं.

लग्ने त्रिकोणे दिननाथचंद्रौ शौर्ये गुरौ केंद्रसमन्विते वा ॥
उन्मादबुद्धिः सभवेत्तदानीं शन्यारवारोयदि जन्मकाले ॥

अर्थ.—लग्नीं अथवा त्रिकोणांत रवि व चंद्र एकत्र असूत्र तृतीय स्थानीं अथवा केंद्रीं गुरु असेल व शनीवारीं किंवा मंगळवारीं जन्म झाला असेल तर मनुष्य उद्दाम बुद्धीचा होतो. जसें.—



अशा प्रकारचा हा योग होतो. यांत गुरूच्या स्थितीची उपपत्ति जुळत नाहीं. त्याच प्रमाणें रविचंद्र हे त्रिकोणांत असतां अशी स्थिति का व्हावी तें कळत नाहीं.

केंद्रस्थितौ सौम्यनिशाकरौ वा सौम्यांशहीनौ भ्रमसंयुतःस्यात् ॥

अर्थ.—बुध व चंद्र हे केंद्रीं एकत्र असतील व ते पाप ग्रहाच्या नवमांशीं असतील तर मनुष्य भ्रमिष्ट होतो. जसें.



या योगावरून बुध व चंद्र यांची युति असतां जन्म होणें चांगलें नाहीं असें दिसतें.

केंद्रस्थिता मंदनिशाकरार्का जडो भवेदन्यवसूपभोक्ता ॥

अर्थ.—शनि, चंद्र व रवि हे ग्रह केंद्रीं एकत्र असतील तर मनुष्य बुद्धिहीन [मूर्ख] होतो. जसें.—



ग्रंथकारानें हा योग केंद्रीं होतो असें ह्मटलें आहे. परंतु हे तीन ग्रह एकत्र असतां जन्म होणें सुखावह नाहीं, मग कुंडलींत ते कोठेंही असोत.

चंद्रे व्यये वा यदि वा दिनेशे मंदे त्रिकोणे मदरंध्रमेऽर्के ॥
मंदाक्षिरोगी सभवेत्तदानीं नीचारिशत्र्यंशगता स्तथैव ॥

अर्थ.—चंद्र किंवा रवि व्ययस्थानीं असून शनि त्रिकोणांत असेल व रवि २ऱ्या स्थानांत असेल, आणि ते ग्रह दुर्बल असतील तर नेत्र कमकुवत होतात. जसें.—



सुतांबुगौ पापखगौ विशेषाच्चंद्रेष्टारिःफारिगतेंधता स्यात् ॥
शुभग्रहाणामवलोकहीने त्वंधो भवत्येव शुभैर्नदोषः ॥

अर्थ.—पाप ग्रह ४ थ्या व ५ व्या स्थानीं असून चंद्र हा ६।८।१२ स्थानीं असतां व त्याच्यावर शुभ ग्रहाची दृष्टि नसतां मनुष्य अंध होतो. जसें.—



वरील प्रमाणें हा योग दिला आहे. पण या योगाचा नेत्रांशीं कसा संबंध पोंचतो तें कळत नाहीं. रवि, शुक्र व द्वितीय स्थान यांवर नेत्रविचार करावयाचा असतो, ह्मणून वरील योग उपपत्तीला जुळत नाहींत. कोणताही योग उपपत्तीला जुळेल तरच त्याचा चांगला अनुभव येईल. वरील कुंडलींत चंद्राची स्थिति प्रकृतीला अनिष्ट अशी आहे व चतुर्थ स्थानचा पाप ग्रहही दुःख उत्पन्नकर्ता आहे. पण यावरून नेत्रदोष उत्पन्न व्हावा असें अनुमान निघत नाहीं.

कुष्ठ

निशाकरे कार्मुकमध्यभागमृगांशकर्कीं वृषभागयुक्ते ॥
मंदारयुक्ते तदवेक्षगेवा कुष्ठी भवेःसोम्पदशाविहीने ॥

अर्थ.—चंद्र हा धनु राशीच्या मध्यभागीं, कर्क राशींत मकर नवमांशीं व वृषभ नवमांशीं असतां शनि व मंगळ यांनीं युक्त अथवा दृष्ट असेल तर व त्यावर शुभ ग्रहाची दृष्टि नसेल तर मनुष्य कुष्ठ रोगी होतो.

(बृहत्पाराशरीवरून.)

लग्नाधिपौ कुजबुधौ चंद्रेण यदि संस्थितौ ॥
राहुर्वा शनिना सार्द्धं कुष्ठं तत्र विनिर्दिशेत् ॥

अर्थ.—मंगळ व बुध हे लग्नस्वामी असून ते चंद्र, राहु किंवा शनि यांनीं युक्त असतां कुष्ठ रोग होतो.

यांत हा योग कोणत्या स्थानांत झाला पाहिजे असें जरी सांगितलेलें नाहीं तरी तो षष्ठ स्थानांत झाला पाहिजे असें समजावें.

लग्नाधिपं विना लग्ने स्थितश्चेत्तमपाशशी ॥
श्वेतकुष्ठं तदा कृष्णकुष्ठं च शनिनासह ॥

अर्थ.—लग्नस्वामी लग्नीं नसतां चंद्र हा राहूनें युक्त लग्नीं असेल तर पांढरें कोड होतें व शनीनें युक्त असतां काळें कोड होतें.

कुजेन रक्तकुष्ठंस्यात्तत्तद्देवं विचारयेत् ॥

अर्थ.—चंद्र हा मंगळानें युक्त लग्नीं असेल तर तांबड्या वर्णाचें कोड होतें.

षष्ठस्थानगते जीवे तद्गृहे चंद्रसंयुते ॥
द्वाविंशकोनविंशेब्दे कुष्ठरोगं विनिर्दिशेत् ॥

अर्थ.—सहाव्या स्थानांत गुरु हा चंद्रानें युक्त असतां १९ व्या अगर २२ व्या वर्षी मनुष्यास कुष्ठरोग होतो.

यांतील वर्ष संख्या कोणत्या आधारें दिली असेल ती असो.

क्षय.

रोगस्थानं गतो राहुः केंद्रे मांदिसमन्वितः ॥
लग्नेशे नाशराशिस्थे षड्विंशे क्षयरोगता ॥

अर्थ.—सहाव्या स्थानांत राहु असून केंद्रीं मांदि (गुलिक) असेल व लग्नस्वामी अष्टमांत असेल तर २६ व्या वर्षी क्षयरोग होतो.

गुल्म.

व्ययेशे रोगराशिस्थे तदीशे व्ययराशिगे ॥
त्रिंशद्वर्षैकोनवर्षे गुल्मरोगं विनिर्दिशेत् ॥

अर्थ.—सहाव्या स्थानाचा स्वामी बाराव्या स्थानांत व बाराव्या स्थानाचा स्वामी सहाव्या स्थानांत असतां २९।३० व्या वर्षी मनुष्यास गुल्मरोग होतो.

रक्तकुष्ठ.

रिपुस्थानगते चंद्रे शनिना संयुते यदि ॥
पंचपंचाशताद्वेषु रक्तकुष्ठं विनिर्दिशेत् ॥

अर्थ.—सहाव्या स्थानांत चंद्र हा शनीनें युक्त असतां ५५व्या वर्षी रक्तकुष्ठ होतें.

वातरोग.

लग्नेशे लग्नराशिस्थे मंदे शत्रुसमन्विते ॥
एकोनषष्टिवर्षेतु वातरोगार्दितो भवेत् ॥

अर्थ.—लग्नस्वामी लग्नीं असून शनि षष्ठस्थानीं असेल तर ५९व्या वर्षी मनुष्यास वातरोग होतो.

स्फोटक.

अष्टमे मंदसंयुक्ते रंध्राद्द्वादशमे कुजः ॥
त्रिंशाब्दं च दशेष्टे तु स्फोटकादि विनिर्दिशेत् ॥

अर्थ.—मृत्यु स्थानांत शनि असून त्याच्या दशमांत मंगळ असेल तर ६व्या, ८व्या किंवा ३०व्या वर्षी स्फोटकादि व्याधि होतात.

ज्योतिर्वैद्यक.

[रा. ग. दा. ग्रंथे यांजकडून]

१ सहावे स्थानीं गुरु असतां **अग्निमांद्य** होतें.

२ शनिगृहीं बुध असून त्यावर रवीची दृष्टि असतां अथवा शनीच्या अंतर्गत राहु असतां अथवा चंद्र किंवा शुक्र ६वे किंवा ८वे स्थानीं मंगळ असतां **अतिसार** होतो.

३ तृतीय स्थानीं गुरु असतां **अरुचि** रोग होतो.

४ गुरुस्थानीं बुध असून त्यावर रवीची दृष्टि असतां **प्रमेह** व **अश्मरी** [पानथरी] रोग होतो.

५ मीन लग्नीं रवि असून त्यावर मंगळाची दृष्टि किंवा वृश्चिक लग्नीं शुक्र असतां **वृषण** रोग किंवा **गुह्य** रोग होतो.

६ अष्टम स्थानीं गुरु असतां **आमवात** होतो.

७ सिंह लग्नीं चंद्र किंवा रविगृहीं चंद्र असतां उदर रोग होतो.

८ चंद्र ६वे स्थानीं, रवि शुक्रस्थानीं असतां **जलोदर** व **नेत्र** रोग होतो.

९ पाप ग्रहांच्या मध्यगत चंद्र अथवा सप्तम स्थानीं शनि असतां **उदावर्त, श्वास, विद्रधि, गुल्म, कवळ** इत्यादि रोग होतात.

१० मंगळ, चंद्र, गुरु एका राशींत असून अनिष्ट असतील किंवा गुरूवर मंगळाची दृष्टि असतां **व्रण** होतो.

११ अष्टम स्थानीं क्षीण चंद्र असतां **कृमि** रोग होतो. किंवा शत्रुगृहीं रवि असतां त्याचे दशेमध्यें **कृमि** रोग होतो.

१२ सिंह लग्नीं चंद्र असतां दंतरोग, भस्मरोग व **शोष** रोग होतो.

१३ लग्नीं मंगळ व सुखस्थानीं रवि असतां **दाह** होतो.

१४ अष्टमस्थ चंद्रावर मंगळाची पूर्ण दृष्टि असतां **शूल, शिरोरोग, गलरोग, कृष्ठ** व **ज्वरपीडा** हे विकार होतात.

१५ अष्टम स्थानीं शनि अथवा सिंहेचा चंद्र असतां **क्षय** व **पांडुरोग** होतो.

१६ अष्टमस्थानीं शनि व कर्क लग्नीं रवि असून त्यावर मंगळाची दृष्टि असतां **भगंदर, कुष्ठ, कंडू** व **क्षय** होतो.

१७ मंगळ, बुध, शुक्र हे एका राशींत असून अनिष्ट असतां **श्लीपद, मुखरोग** हे विकार होतात.

१८ गुरु नीच असून त्याची दशा आली असतां **शोथरोग, कर्णरोग** व **गुह्यरोग** होतो.

१९ शनि, मंगळ, रवि अनिष्ट स्थानींअसून एका राशींत असतां **नासिकारोग** व नाना व्याधि होतात.

२० बुधस्थानीं रवि असून त्यावर गुरूची दृष्टी असेल किंवा शुक्र कर्क किंवा वृषभ राशींत लग्नीं असतां अथवा ३।९ स्थानीं शनि असतां **उन्माद** होतो.

२१ सप्तम स्थानीं शनि असून त्यावर राहूची दृष्टि असेल तर **मूत्रकृच्छ्र** व **मूत्राघात** होतो.

२२ कर्क लग्नीं रवि असून त्यावर शनीची दृष्टि असतां **अर्श** (मूळव्याध) व **कुष्ठ** हे विकार होतात.

२३ बारावे स्थानीं शुक्र असतां **मेदोरोग** होतो.

२४ कर्क लग्नीं मंगळ असतां **रक्तपित्त** होतें.

२५ दशमांत मंगळ असून त्यावर शनीची दृष्टि असतां **वातरक्त** हा विकार होतो.

२६ कर्क लग्नीं रवि व त्यावर शनीची दृष्टि किंवा शनीवर मंगळाची दृष्टि असतां **वातरोग** होतो.

२७ षष्ठस्थानीं शुक्र किंवा बुध चंद्रानें दृष्ट असतां **वांति** नामक रोग होतो.

२८ रविस्थानीं शनि असतां **ऊरुस्तंभ** होतो.

२९ द्वितीय किंवा द्वादशस्थानीं शुक्र किंवा मंगळ, कर्क, मेष अथवा वृषभ या लग्नीं चंद्र असतां **कर्णरोग, पंगूपणा**, बधिरत्व हे विकार होतात.

३० सप्तमस्थानीं राहु, रवि, मंगळ अथवा मेष, वृश्चिक या लग्नीं रवि असून त्यावर शुक्राची दृष्टि असतां किंवा अष्टमस्थानीं शनि, सिंहेत रवि असून त्यावर शुक्राची दृष्टि असतां **कुष्ठरोग** होतो.

३१ लग्नीं रवि मेष, सिंह अथवा कर्क राशींत असतां किंवा बुध, गुरु व रवि हे एका राशींत असतां **रातांधळें** अथवा दुसरे **नेत्ररोग** होतात.

३२ दशमांत शनि अथवा चंद्रक्षेत्रीं किंवा शुक्रक्षेत्रीं बुध असतां **कुष्ठ** व **क्षय** हे विकार होतात.

३३ रवि सप्तमांत आणि चंद्र अष्टमांत अनिष्ट असतां **अग्निमांद्य** व **संग्रहणी** हे विकार होतात.

३४ लग्नीं वृश्चिक राशीचा क्षीण चंद्र असतां **स्वरभंग** होतो.

३५ सुखस्थानीं शनि अथवा रवि असतां **हृद्रोग** होतो.

———*———

श्रीयुत ग्रंथे यांनीं वरील रोगनिदान वैद्यक ग्रंथांतून पाठविलें आहे. त्याचा अनुभव घ्यावा. हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. ज्योतिःशास्त्राचा व्यवहारांत उपयोग करून घेण्यास या विषया इतका दुसरा महत्वाचा विषय नाहीं. ह्मणून तो जितका वाढवेल तितका वाढविला पाहिजे. एखाद्या रोगाचें निदान बांधितांना फार सावधगिरी ठेविली पाहिजे. भलतेंच कारण लावून फायदा होणार नाहीं. उदाहरणार्थ वरील वैद्यक ग्रंथांतलें ७वें, ८वें, व १२वें. निदान पहा. सिंहलग्नीं चंद्र असतां दंतरोग, उदररोग इ० रोग होणें केवळ असं-

भवनीय होय. ६व्या निदानांत अष्टमांत गुरु असतां आमवात होतो ह्मणून सांगितलें आहे तेंही अशक्यच आहे. असलीं वेडीविद्रीं निदानें करण्यापेक्षां सर्व कुंडलीच द्यावी हा उत्तम पक्ष होय. जेव्हां आपणास बरोबर निदान करितां येत नसेल तेव्हां त्या रोगाची सर्व कुंडली संग्रहित करावी. व तसल्या रोगाच्या दहापांच कुंडल्या संग्रहित झाल्यावर मग त्यांवरून सामान्य नियम बसवावा. ग्रहांच्या युत्या व त्यांच्या एकमेकांवर अंशात्मक पूर्ण दृष्ट्या यांकडे विशेष लक्ष पाहिजे. एकाच राशीवर अनेक ग्रह असण्यानें एखादा रोग असणें संभवनीय नाहीं. त्यांत एखादाच ग्रह एखादा विकार उत्पन्न करूं शकतो किंवा दोन ग्रह जे जवळ जवळ ह्मणजे युतिसंधींत असतील तेच एखादा विकार करण्यास समर्थ असतात. शुभ ग्रह शरीरास कधींच व्याधि करावयाचे नाहींत. ते जेव्हां पाप ग्रहानें युक्त अथवा दृष्ट असतात तेव्हांच उपद्रव करूं शकतात. हें तत्व ध्यानांत ठेवून नंतर निदानें बांधिलीं पाहिजेत. विशेषें करून हर्शल, शनि, मंगळ, रवि व क्षीण चंद्र हेच एखादा रोग उत्पन्न करितात. राहूचा तसा अनुभव नाहीं. राहू अनिष्ट स्थानीं असतां प्रकृति बेजार झालेली जेव्हां दृष्टीस पडते तेव्हां वरील पाप ग्रह बिघडलेले असतातच. सारांश आमच्या मतें राहू एखादा रोग उत्पन्न करीत नाहीं. वैद्यक ग्रंथांतील निदानावरूनही हेंच दिसून येतें. त्यांत राहूचा विचार केलेला नाहीं. हर्शल हा अपघात व विलक्षण रोग उत्पन्न करितो, शनि हा वातप्रधान रोग उत्पन्न करितो, मंगळ हा रक्तदोषाचे, उष्णतेचे, अपघाताचे व जखमांचे उपद्रव उत्पन्न करितो, रवि हा ज्वरादि उष्णतेचे व चंद्र हा पाप ग्रहांच्या सान्निध्यानें वाटेल तो विकार उत्पन्न करितो असा साधारण अनुभव आहे. हे ग्रह राशि, स्थान, युति व दृष्टि यांच्या अनुरोधानें निरानिराळे विकार उत्पन्न करितात. या गोष्टी ध्यानांत घेऊन रोगनिदानें ठरवावीं.

ज्योतिर्वैद्यक.

[रा. ग. दा. ग्रंथे यांजकडून]

१ सहावे स्थानीं गुरु असतां **अग्निमांद्य** होतें.

२ शनीगृहीं बुध असून त्यावर रवीची दृष्टि असतां अथवा शनीच्या अंतर्गत राहु असतां अथवा चंद्र किंवा शुक्र ६वे किंवा ८वे स्थानीं मंगळ असतां **अतिसार** होतो.

३ तृतीय स्थानीं गुरु असतां **अरुचि** रोग होतो.

४ गुरुस्थानीं बुध असून त्यावर रवीची दृष्टि असतां **प्रमेह** व **अश्मरी** [पानथरी] रोग होतो.

५ मीन लग्नीं रवि असून त्यावर मंगळाची दृष्टि किंवा वृश्चिक लग्नीं शुक्र असतां **वृषण** रोग किंवा **गुह्य** रोग होतो.

६ अष्टम स्थानीं गुरु असतां **आमवात** होतो.

७ सिंह लग्नीं चंद्र किंवा रविगृहीं चंद्र असतां उदर रोग होतो.

८ चंद्र ६वे स्थानीं, रवि शुक्रस्थानीं असतां **जलोदर** व **नेत्र** रोग होतो.

९ पाप ग्रहांच्या मध्यगत चंद्र अथवा सप्तम स्थानीं शनि असतां **उदावर्त, श्वास, विद्रधि, गुल्म, कवळ** इत्यादि रोग होतात.

१० मंगळ, चंद्र, गुरु एका राशींत असून अनिष्ट असतील किंवा गुरूवर मंगळाची दृष्टि असतां **व्रण** होतो.

११ अष्टम स्थानीं क्षीण चंद्र असतां **कृमि** रोग होतो. किंवा शत्रुगृहीं रवि असतां त्याचे दशेमध्यें **कृमि** रोग होतो.

१२ सिंह लग्नीं चंद्र असतां दंतरोग, भस्मरोग व **शोष** रोग होतो.

१३ लग्नीं मंगळ व सुखस्थानीं रवि असतां **दाह** होतो.

१४ अष्टमस्थ चंद्रावर मंगळाची पूर्ण दृष्टि असतां **शूल, शिरोरोग, गलरोग, कृष्ठ** व **ज्वरपीडा** हे विकार होतात.

१५ अष्टम स्थानीं शनि अथवा सिंहेचा चंद्र असतां **क्षय** व **पांडुरोग** होतो.

१६ अष्टमस्थानीं शनि व कर्क लग्नीं रवि असून त्यावर मंगळाची दृष्टि असतां **भगंदर, कुष्ठ, कंडू** व **क्षय** होतो.

१७ मंगळ, बुध, शुक्र हे एका राशींत असून अनिष्ट असतां **श्लीपद, मुखरोग** हे विकार होतात.

१८ गुरु नीच असून त्याची दशा आली असतां **शोथरोग, कर्णरोग** व **गुह्यरोग** होतो.

१९ शनि, मंगळ, रवि अनिष्ट स्थानींअसून एका राशींत असतां **नासिकारोग** व नाना व्याधि होतात.

२० बुधस्थानीं रवि असून त्यावर गुरूची दृष्टी असेल किंवा शुक्र कर्क किंवा वृषभ राशींत लग्नीं असतां अथवा ३।९ स्थानीं शनि असतां **उन्माद** होतो.

२१ सप्तम स्थानीं शनि असून त्यावर राहूची दृष्टि असेल तर **मूत्रकृच्छ्र** व **मूत्राघात** होतो.

२२ कर्क लग्नीं रवि असून त्यावर शनीची दृष्टि असतां **अर्श** (मूळव्याध) व **कुष्ठ** हे विकार होतात.

२३ बारावे स्थानीं शुक्र असतां **मेदोरोग** होतो.

२४ कर्क लग्नीं मंगळ असतां **रक्तपित्त** होतें.

२५ दशमांत मंगळ असून त्यावर शनीची दृष्टि असतां **वातरक्त** हा विकार होतो.

२६ कर्क लग्नीं रवि व त्यावर शनीची दृष्टि किंवा शनीवर मंगळाची दृष्टि असतां **वातरोग** होतो.

२७ षष्ठस्थानीं शुक्र किंवा बुध चंद्रानें दृष्ट असतां **वांति** नामक रोग होतो.

२८ रविस्थानीं शनि असतां **ऊरुस्तंभ** होतो.

२९ द्वितीय किंवा द्वादशस्थानीं शुक्र किंवा मंगळ, कर्क, मेष अथवा वृषभ या लग्नीं चंद्र असतां **कर्णरोग, पंगूपणा,** बधिरत्व हे विकार होतात.

३० सप्तमस्थानीं राहु, रवि, मंगळ अथवा मेष, वृश्चिक या लग्नीं रवि असून त्यावर शुक्राची दृष्टि असतां किंवा अष्टमस्थानीं शनि, सिंहेत रवि असून त्यावर शुक्राची दृष्टि असतां **कुष्ठरोग** होतो.

३१ लग्नीं रवि मेष, सिंह अथवा कर्क राशींत असतां किंवा बुध, गुरु व रवि हे एका राशींत असतां **रातांधळें** अथवा दुसरे **नेत्ररोग** होतात.

३२ दशमांत शनि अथवा चंद्रक्षेत्रीं किंवा शुक्रक्षेत्रीं बुध असतां **कुष्ठ** व **क्षय** हे विकार होतात.

३३ रवि सप्तमांत आणि चंद्र अष्टमांत अनिष्ट असतां **अग्निमांद्य** व **संग्रहणी** हे विकार होतात.

३४ लग्नीं वृश्चिक राशीचा क्षीण चंद्र असतां **स्वरभंग** होतो.

३५ सुखस्थानीं शनि अथवा रवि असतां **हृद्रोग** होतो.

———*———

श्रीयुत ग्रंथे यांनीं वरील रोगनिदान वैद्यक ग्रंथांतून पाठविलें आहे. त्याचा अनुभव घ्यावा. हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. ज्योतिःशास्त्राचा व्यवहारांत उपयोग करून घेण्यास या विषया इतका दुसरा महत्वाचा विषय नाहीं. म्हणून तो जितका वाढवेल तितका वाढविला पाहिजे. एखाद्या रोगाचें निदान बांधितांना फार सावधगिरी ठेविली पाहिजे. भलतेंच कारण लावून फायदा होणार नाहीं. उदाहरणार्थ वरील वैद्यक ग्रंथांतलें ७वें, ८वें, व १२वें. निदान पहा. सिंहलग्नीं चंद्र असतां दंतरोग, उदररोग इ० रोग होणें केवळ असं-

भवनीय होय. ६व्या निदानांत अष्टमांत गुरु असतां आमवात होतो ह्मणून सांगितलें आहे तेंही अशक्यच आहे. असलीं वेडीविद्रीं निदानें करण्यापेक्षां सर्व कुंडलीच द्यावी हा उत्तम पक्ष होय. जेव्हां आपणास बरोबर निदान करितां येत नसेल तेव्हां त्या रोगाची सर्व कुंडली संग्रहित करावी. व तसल्या रोगाच्या दहापांच कुंडल्या संग्रहित झाल्यावर मग त्यांवरून सामान्य नियम बसवावा. ग्रहांच्या युत्या व त्यांच्या एकमेकांवर अंशात्मक पूर्ण दृष्टया यांकडे विशेष लक्ष पाहिजे. एकाच राशीवर अनेक ग्रह असण्यानें एखादा रोग असणें संभवनीय नाहीं. त्यांत एखादाच ग्रह एखादा विकार उत्पन्न करूं शकतो किंवा दोन ग्रह जे जवळ जवळ ह्मणजे युतिसंधींत असतील तेच एखादा विकार करण्यास समर्थ असतात. शुभ ग्रह शरीरास कधींच व्याधि करावयाचे नाहींत. ते जेव्हां पाप ग्रहानें युक्त अथवा दृष्ट असतात तेव्हांच उपद्रव करूं शकतात. हें तत्व ध्यानांत ठेवून नंतर निदानें बांधिलीं पाहिजेत. विशेषें करून हर्शल, शनि, मंगळ, रवि व क्षीण चंद्र हेच एखादा रोग उत्पन्न करितात. राहूचा तसा अनुभव नाहीं. राहू अनिष्ट स्थानीं असतां प्रकृति बेजार झालेली जेव्हां दृष्टीस पडते तेव्हां वरील पाप ग्रह बिघडलेले असतातच. सारांश आमच्या मतें राहू एखादा रोग उत्पन्न करीत नाहीं. वैद्यक ग्रंथांतील निदानावरूनही हेंच दिसून येतें. त्यांत राहूचा विचार केलेला नाहीं. हर्शल हा अपघात व विलक्षण रोग उत्पन्न करितो, शनि हा वातप्रधान रोग उत्पन्न करितो, मंगळ हा रक्तदोषाचे, उष्णतेचे, अपघाताचे व जखमांचे उपद्रव उत्पन्न करितो, रवि हा ज्वरादि उष्णतेचे व चंद्र हा पाप ग्रहांच्या सान्निध्यानें वाटेल तो विकार उत्पन्न करितो असा साधारण अनुभव आहे. हे ग्रह राशि, स्थान, युति व दृष्टि यांच्या अनुरोधानें निरानिराळे विकार उत्पन्न करितात. या साठीं या गोष्टी ध्यानांत घेऊन रोगनिदानें ठरवावीं.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम् ।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥

'भवभूति'

पुस्तक ९ वें.] कार्त्तिक व० ४ बुधवार [अंक १९ वा

आयुर्दाय.

एखाद्या मनुष्याचें आयुष्य किती आहे हें समजणें अत्यावश्यक आहे. पुढील भविष्यें आयुष्यमर्यादेवरच मुख्यत्वें अवलंबून आहेत. कित्येक ज्योतिषी व साधारण जनसमूह यांची अशी समजूत आहे कीं, कुंडलीवरून मनुष्याचें आयुष्य सांगतां येतें. अशी त्यांची समजूत होण्यास कांहीं आधारही आहेत. कै० बाबाजीराव पटवर्धन ऊर्फ महाडकर ज्योतिषी हे मयत मनुष्यांच्या कुंडल्या पाहतां क्षणींच वेगळ्या काढीत असत असें आमच्याही ऐकिवांत आहे, पण प्रत्यक्ष अनुभव नाहीं. एकदां परीक्षेला जाणाऱ्या कित्येक विद्यार्थ्यांनीं कुंडल्या दाखवून प्रश्न विचारले असतां त्यांनीं कित्येकांस तुह्मी पास व्हाल तर कित्येकांस नापास व्हाल असें सांगितलें. एका मुलाला सांगितलें कीं, तुझी कुंडली बघण्याचें कारण नाहीं! पुढें चमत्कार असा झाला कीं, तो मुलगा परीक्षेच्या पूर्वीच अकस्मात् परलोकवासी झाला! असल्या गोष्टी पुष्कळ ऐकिवांत असल्यांमुळें आयुष्य समजतें

अशी सहजच समजून झाली आहे. आमच्या मतें या सर्वच गप्पा आहेत असें नाहीं, कित्येक प्रसंगीं आयुष्य समजतें, पण शेंकडा ९० कुंडल्यांत तरी समजत नाहीं. अमुक एका प्रकारची ग्रहस्थिति प्राप्त झाली, ह्मणजे मरण प्राप्त व्हावयाचेंच अर्से कोणत्याही ग्रंथांत सांगितलेलें आढळत नाहीं. कुंडलीविज्ञानांत मार्गे शारीरकष्ट प्राप्त होण्यास कोणत्या प्रकारची ग्रहस्थिति लागते, हें सांगितलें आहे. त्या प्रमाणें शारीरकष्टाचे काल निश्चित करतां येणें संभवनीय आहे. पण अमुक प्रसंगीं मरण येईलच असें सांगवत नाहीं. सारांश, कुंडलीवरून एखाद्याचें आयुष्य बिनचूक सांगतां येईल असा मार्ग ग्रंथांतरीं नाहीं. प्राचीन ज्योतिर्विदांनीं आयुर्दाय सिद्ध करण्याचे गणिती खटाटोप बरेच केले आहेत, पण त्यांत तथ्य नाहीं. पत्रिका करणारांना तिची वावडी करण्यास मात्र त्यांचा चांगला उपयोग आहे! निरनिराळ्या प्रकारच्या दशा, अष्टकवर्ग, जैमिनीय पद्धति व वराहमिहिराची बृहज्जांतकांतील पद्धति यांनीं आयुर्दाय सिद्ध करितां येतो, पण तो अनुभवाला येणारा नसल्या मुळें ते मार्ग व्यर्थ आहेत. गणिताच्या अवडंबरानें आयुष्य सिद्ध होणें अशक्य आहे.

सर्वार्थचिंतामणि वगैरे जातक ग्रंथांत उपजतांच मरणारीं, बारा वर्षांच्या आंत मरणारीं, पुढें ३२, ७० व १२० वर्षांच्या आंत मरणारीं माणसें यांचे कांहीं योग आहेत. ही पद्धति बरी आहे. पण ती एकेरी व पुष्कळ अपुरी असल्यामुळें जवळ जवळ निरुपयोगीच आहे. या पद्धतीचें प्रथमतः स्वरूप कसें आहे याचा सर्वार्थचिंतामणीवरून विचार करूं.

अध्याय १० वा.

केचित् योगं प्रशंसंति दशां केचिद्वदंतिहि ॥
तद्विना चायुषं ज्ञातुं न शक्यं तु मनीषिभिः ॥१

अर्थ.—कित्येक ग्रहांचे योग अनुभवास चांगले येतात असें ह्मणतात व कित्येक दशांवरूनच आयुष्य कळतें असें ह्मणतात. या दोन गोष्टींवांचून आयुष्य समजणें शक्य नाहीं.

त्रिविधा चायुषां योगाः स्वल्पायुर्मध्यमोत्तमाः ॥
द्वात्रिंशत्पूर्वमल्पं स्यात्तदूर्ध्वं मध्यमं भवेत् ॥२

अर्थ.—तीन प्रकारचे आयुष्याचे योग आहेत, ते असे.—१ स्वल्पायु २ मध्यायु व ३ दीर्घायु. यांत ३२ वर्षांपूर्वी जे मरतात ते अल्पायु समजावे. त्यानंतरचे ते मध्यायु होत.

आसप्ततेस्तदूर्ध्वं तु दीर्घायुरिति संमतम् ॥
उत्तमायुः शतादूर्ध्वमिह शंसंति तद्विदः ॥३

अर्थ.—७० वर्षांपर्यंत मध्यायु त्यानंतर जगणारे ते दीर्घायु व १०० वर्षांनंतर जगणारे ते उत्तमायु होत.

आद्वादशाब्दाज्जंतूनामायुर्ज्ञातुं न शक्यते ॥
जपहोमचिकित्साद्यैर्बालरक्षां तु कारयेत् ॥४

अर्थ.—बारा वर्षेपर्यंत मुलाचें आयुष्य जाणणें अशक्य आहे. जपहोदि प्रकारांनीं मुलाचें रक्षण करावें.

हें ग्रंथकाराचें मत ध्यानांत ठेण्यासारखें आहे. त्याच्या मतें असें होण्यास पुढील कारणें आहेत.

पित्रोर्दोषैर्मृताः केचित्केचिद्बालग्रहैरपि ॥
अपरेरिष्टयोगाच्च त्रिविधा बालमृत्यवः ॥५

अर्थ.—लहान मुलांचे मृत्यु तीन कारणांनीं होतात. १लें—बापाच्या दोषांनीं. २रें.—बालग्रहांनीं. ३ अरिष्टयोगांनीं.

जन्मतः प्रबलेनैव बालानां पुष्टिवर्धनं ॥
कथयेदेव शेषं तु तत्तद्योगानुरूपतः ॥६

अर्थ.-- जन्मकाली ग्रह प्रबल असतील तर तें मूल धष्टपुष्ट होतें. तसे नसतील तर त्या त्या योगानुरूप तें बालक होतें.

अल्पायुर्लग्नपे भानौ शत्रौ मध्यं तु मध्यमे ॥
मित्रे लग्नेश्वरे तस्य दीर्घमायुरुदाहृतम् ॥७

अर्थ.—जर लग्नस्वामी रवीचा शत्रु असेल तर तो अल्पायु होतो, सम असेल तर मध्यायु होतो व मित्र असेल तर दीर्घायु होतो.

याप्रमाणें आयुष्यविभागाची मर्यादा ठरविण्याची ही एक सोपी रीति आहे. रवीचे शनि व शुक्र हे शत्रु आहेत. शनीचे मकर व कुंभ आणि शुक्राचे वृषभ व तूळ हे राशि आहेत. ह्मणून मकर, कुंभ, वृषभ व तूळ या लग्नांचे मनुष्य सर्वच अल्पायु ठरतात! पण असें होणें अशक्य आहे, यासाठीं ही रीति कुचकामाची आहे हें उघड आहे.

अल्पायुर्योगजातस्य विपद्दाये मृतिं वदेत् ॥
जातस्य मध्यमे योगे प्रत्यरेस्तु मृतिर्भवेत् ॥८
दीर्घायु र्योगजातानां वधभे तु मृतिर्भवेत् ॥
त्रिषु योगेषु सर्वेषु प्रत्येकं त्रिविधं भवेत् ॥९

अर्थ.—अल्पायु योग असतां षष्टेशाच्या दशेंत. मृत्यु येतो. मध्यायु असतां व्ययेशाच्या व दीर्घायु असतां अष्टमेशाच्या दशेंत मृत्यु येतो. या प्रत्येक योगाचे पुनः पुनः तीन तीन प्रकार आयुर्दायाचे होतात.

चरस्थिरेति सूत्रेण दीर्घमध्याल्पकायुषः ॥
तयोरन्यतमं ज्ञात्वा चायुर्ज्ञानं प्रचक्षते ॥१०

अर्थ.—जैमिनीय पद्धतीनें प्रथम दीर्घ, मध्य किंवा अल्प असा आयुर्दाय सिद्ध करावा. त्या प्रत्येकांतले प्रकार पुढील प्रमाणें होतात.

अल्पायुरल्पमध्यं तु पूर्णायु स्त्रिविधं स्मृतम् ॥
मध्यमाल्पमध्यं तु पूर्णायु स्त्रिविधं भवेत् ॥११
दीर्घायुषोल्पमध्यं तु पूर्णायुस्त्रिविधं भवेत् ॥
एवं नवविधः प्रोक्तश्चायुषां तु विनिर्णयः ॥ १२

यां श्लोकांचा अर्थ नीट जुळत नाहीं. जैमिनीय पद्धतींत जे लग्नेश व अष्टमेश यांवरून नऊ प्रकार होतात असें सांगितलें आहे त्याला अनुसरून हे श्लोक असावे अथवा अल्प, मध्य व पूर्ण या प्रत्येकांतले पुनः तीन तीन भेद होतात, त्याला अनुसरून असावे. ते प्रकार असे.—

१	२	३
अल्पाल्प	मध्याल्प	दीर्घाल्प
मध्यमाल्प	मध्यमध्यम	मध्यदीर्घ
अल्प	मध्यम	दीर्घ

पंचम्यारदशा मृत्युं दद्यात्षष्ठी गुरोर्दशा ॥
शनेश्चतुर्थी मृत्युः स्याद्दशा राहोश्च सप्तमी ॥१३

अर्थ.—मंगळाची पांचवी; गुरूची सहावी, शनीची चवथी व राहूची सातवी या प्रमाणें दशा प्राप्त झाल्यास त्या मरण देतात.

विपत्पाकदशा कष्टा प्रत्यरीशदशा तथा ॥
वधभेशदशा कष्टा पापास्यादशुभेक्षिता ॥१४
नीचारांति विमूढस्य विपत्प्रत्यरिनैधनाः ॥
दशा दद्युर्मृतिं तस्य पापैर्युक्ता विशेषतः ॥१५

अर्थ.—षष्टेश, अष्टमेश व व्ययेश हे नीच, शत्रुक्षेत्रीं, अस्तंगत, पाप, पाप ग्रहानें दृष्ट किंवा युक्त असे असतील तर त्यांच्या दशेंत मृत्यु येतो.

राशिसंधिषु जातास्ते बाला मृतजीवनाः ॥
पापदृष्टा युता वापि निःसंशय मृतिःस्मृताः ॥१६

अर्थ.—जीं मुलें राशिसंधीवर उपजतात, तीं मोठ्या शिकस्तीनें बचावतात. पण जीं राशिसंधींत पाप ग्रह असतां अगर तेथें पाप ग्रहांची दृष्टि असतां उपजतात तीं निःसंशय मरण पावतात.

गंडांतेषूद्भवो मर्त्यः पितृ मातृ बलात्ततः ॥
यदि जीवेत्स्वर्गपालो गजवाजि समन्वितः ॥१७

अर्थ.—राशिगंडांत कांहीं किंवा नक्षत्रगंडांत कांहीं जन्मणारें मूल हत्ती, घोडे, अशा वैभवानें स्वर्गरक्षक होतें.

तृतीयगौ भानुनिशाकरौ वा क्रूररक्षगौ क्रूरनिरीक्षितौ वा ॥
व्याधि नरस्यापि वदंति तज्ज्ञा स्त्रिवर्षमात्रं त्वतिदुर्लभं तत् ॥१८

अर्थ.—तृतीय स्थानीं रवि व चंद्र हे क्रूर राशीस क्रूर ग्रहाच्या दृष्टींत एकत्र असतील तर तीन वर्षेपर्यंत तें बालक अति भयंकर दुखणीं भोगील.

चंद्रात्स्मरे वासरनाथभौमौ कुजोदये वा मरणं दशाहात ॥

अर्थ.—चंद्राच्या सप्तम स्थानीं रवि व मंगळ असून मेष अथवा वृश्चिक लग्न असेल तर दहा दिवसांत तें मूल मरण पावतें.

उद्यद्द्रेष्काणजामित्रे यस्य स्याद्दरुणो ग्रहः ॥१९
क्षणिचंद्रे विलग्नस्थे सद्यो हरति जीवितं ॥

अर्थ.—क्षीण चंद्र लग्नीं व द्रेष्काण कुंडलीच्या सप्तम स्थानीं क्रूर ग्रह असतां तें मूल ताबडतोब मरण पावतें.

आपोक्लीने स्थिताः सर्वे ग्रहा बलविवर्जिताः ॥
षण्मासं वा द्विमासं वा तस्यायुः समुदाहृतम् ॥२०

अर्थ.—जर बलहीन ग्रह सर्व आपोक्लीम स्थानीं असतील तर दोन अथवा सहा महिने आयुष्य जाणावें.

विलग्नाधिपतिर्नीचे निधने वार्कसंयुते ॥
कृच्छ्रेण जीवनं विद्यान्मृतप्रायो भविष्यति ॥२१

अर्थ.—लग्नस्वामी नीच असून अष्टमांत रवीनें युक्त असतां तें मूल मोठ्या कष्टानें जगेल. व मृतप्राय होईल.

केतोरुदयः पूर्वे पश्चादुल्कापतननिर्घाताः ॥
रौद्रे सति मुहूर्ते प्राणैः सत्यज्यते जंतुः ॥२२

अर्थ.—आर्द्रा नक्षत्रांत सूर्य असून प्रथम धूमकेतूचा उदय होईल व नंतर उल्कापात होऊन मोठें वादळ सुटेल तर एका घटकेंत मनुष्य मरण पावेल. [अशा वेळीं जन्मलेलें मूल तत्काल मरण पावेल]

ग्रहणपरिवेषकाले जातः पापान्विते विलग्नस्थे ॥
लग्नेशे बलहीने जीवति पक्षत्रयं त्रिमासं वा ॥२३

अर्थ.—ग्रहण कालीं सूर्याला खळें पडलें असतां लग्नीं पाप ग्रह असून लग्नस्वामी बलहीन असेल अशा वेळीं जन्मलेलें मूल तीन पंधरवडे किंवा तीन महिने फार तर जगतें.

अंशाधिपतिर्जन्मपतिर्लग्नपतिश्चास्तमुपगतो यस्य ॥
जन्मावसानमरणं तस्य भवेत्कतिपयाहेन ॥२४

अर्थ.—जर नवमांश कुंडलीचा लग्नस्वामी, चंद्रराशीचा अधिपति व लग्नेश हे सप्तम स्थानीं [अथवा अस्तंगत] असतील तर तें मूल जन्म होतांच मरण पावतें.

संधिचतुष्टयकाले जातो मृत्युं समादिशेत्त ज्ज्ञः ॥
पापयुते वा दृष्टे शीघ्रं सौम्यैरदृष्टयुते ॥२५

अर्थ.—सकाळ, संध्याकाळ, मध्यान्ह व मध्यरात्र अशा संधिकाळीं लग्नीं पाप ग्रह असेल किंवा त्याची दृष्टि असेल व तें लग्न शुभ ग्रहानें युक्त अथवा दृष्ट नसेल तर उपजत मृत्यु जाणावा.

राहौ केंद्रे पापयुक्तेक्षिते वा क्षिप्रं नाशं याति सौम्यैरदृष्टे ॥
पापःकेंद्रे वार्किलग्ने त्रिकोणे सौम्ये षष्ठे चाष्टमेत्येव बालः ॥२६

अर्थ.—राहू केंद्रीं पाप ग्रहानें युक्त अथवा दृष्ट असून शुभ ग्रहाची त्यावर दृष्टि नसेल व पाप ग्रह केंद्रीं असून शनि लग्नीं किंवा त्रिकोणांत असेल आणि शुभ ग्रह ६।८।१२ स्थानीं असतील तर तें मूल ताबडतोब मरण पावतें.

जातःक्षीणे शीतगौ लग्नसंस्थे पापैर्दृष्टे नाशमाशुप्रयाति ॥
उच्चक्षेत्रं मेषराशिं च हित्वा राहुर्युक्तस्तेष्वपि प्राणनाशः ॥२७

अर्थ.—क्षीण चंद्र लग्नीं पाप ग्रहांनीं दृष्ट असतां जन्मणारें मूल तत्काल मृत्यु पावतें, तो चंद्र उच्च अथवा मेष राशींत नसून इतर कोणत्याही राशींत राहूनें युक्त असेल तरी तें मूल तत्काल मरण पावतें.

लग्नात् सांत्यौ पापयुक्तौ यदिस्तःसप्तांत्यौ वा विनश्येत्क्षणेन ॥
लग्नाद्वाले चाष्टमे पापचारैःसोमे क्षीणे त्वष्टमाद्रुं च जीवेत् ॥२८

अर्थ.—द्वादश स्थानीं दोन पाप ग्रह असून षष्ठ स्थानीं दोन पाप ग्रह असतील तर एका क्षणांत तें मूल मरण पावतें. अष्टमांत पाप ग्रह असून चंद्र क्षीण असेल तर तें मूल ८ वर्षे पर्यंत जगतें.

केंद्रैश्चंद्रात् पापयुक्ते रसौम्यैः स्वर्गं याति प्रोच्यते वत्सरेण ॥
जन्माधीशे लग्नगे क्रूरयुक्ते पश्यत्यार्किश्चाष्टमे जीववर्ज्ये ॥२९

अर्थ.—चंद्राच्या केंद्रीं पाप ग्रह असून त्यांवर शुभ ग्रह पाहत नसतील, व चंद्रराशीचा स्वामी लग्नीं पाप ग्रहानें युक्त असून त्यावर शनीची दृष्टि असेल आणि अष्टमांत गुरूशिवाय ग्रह असेल तर एक वर्षीनें तें मूल मरण पावतें.

षष्ठे वर्षे द्वादशे वा दृमे वा संधौ राशेर्जातको मृत्युमेति ॥
षष्ठेऽष्टमे वा हिमगौ च यस्य क्षीणे व्यये पापयुतेथवापि ॥३०

अर्थ.—राशिसंधीवर जन्मलेलें मूल ६व्या, ८व्या अथवा १२व्या वर्षी मरण पावतें.

सौम्यैर्दृष्टे त्वष्टमाद्रुं च जीवे त्पापैः सौम्यै र्मिश्रितैस्तद्बलाढ्यम् ॥

अर्थ.—क्षीण चंद्र व्यय स्थानीं पाप ग्रहानें युक्त असून त्यावर शुभ ग्रहांची दृष्टि असेल तर ८ वर्षे आयुष्य जाणावें. व शुभ आणि पाप अशा दोन्ही ग्रहांची दृष्टि असेल तर ४ वर्षें आयुष्य जाणावें.

जीवे विलग्ने मिथुने तुलायां शुक्रेण युक्ते शशिसूनुनापि ॥३१
पापै र्दृष्टे मृत्युराशेरिथतै र्वा जीवे त्वर्षे चाष्टमं चैव बालः ॥

अर्थ.—मिथुन अगर तूळ राशीस गुरु लग्नीं असून तो बुध व शुक्र यांनीं युक्त असेल व अष्टम स्थानीं पाप ग्रह असून ते गुरूला पाहत असतील तर तें मूल ८ वर्षे पर्यंत जगतें. (अथवा त्या गुरूवर पाप ग्रह पातह असतील असाही अर्थ होऊं शकतो.)

लग्ने क्षीणे शशिनि निधनं रध्रकेंद्रेषु पापैः
पापांतस्थे निधनहिबुकनद्युयुक्ते च चंद्रे ॥३२
एवं लग्ने भवति मदनच्छिद्रसंस्थैश्च पापै
र्मात्रासार्धं यदि नच शुभै र्वीक्षितःशक्तिमद्भिः ॥३३

अर्थ.—क्षीण चंद्र लग्नीं असून केंद्रीं व अष्टमांत पाप ग्रह असतील अगर ८।४।७ या स्थानांत चंद्र पाप ग्रहांच्या मध्यें असेल किंवा लग्नीं व ७।८ या स्थानीं पाप ग्रह असतील व त्यांच्यावर बलवान् अशा शुभ ग्रहांची दृष्टि नसेल तर आईसह बालक मरण पावतें.

राहुग्रस्ते शीतरश्मौ विलग्ने क्रूरैर्युक्ते चाष्टमे भूमिपुत्रे ॥
मात्रासार्धं चंद्रवद्भास्करेपि शस्त्रैःपातेनाशु मृत्युं प्रयाति ॥३४

अर्थ.—लग्नीं रवि अथवा चंद्र ग्रहणपीडित असून क्रूर ग्रहांनीं युक्त असेल व अष्टमांत मंगळ असेल तर आईसह तें मूल शस्त्र पीडेनें मरण पावेल

अस्तंगते दिनपतौ रविजे विलग्ने
भौमेथवा निधनगे व्रजति तृतीयात् ॥
एवं स्थितेपि हिमगावशुभैरदृष्टे
राहुग्रहेंच निधनं भवतीह चाष्टौ ॥३५

अर्थ.—रवि सप्तमांत व शनि लग्नीं असून मंगळ अष्टमांत असेल तर तें मूल तीन वर्षांनीं मरण पावतें. याच प्रमाणें चंद्र सप्तमांत पाप ग्रहांनीं दृष्ट असून राहू अष्टमांत असेल तर ८ वर्षे आयुष्य प्राप्त होतें.

बृहस्पति र्भौमगृहेष्टमस्थःसूर्येंदुभौमार्कजदृष्टमूर्तिः ॥
अद्वै स्त्रिभिर्भार्गवदृष्टिहीनो लोकांतरं प्रापयति प्रसूतम् ॥३६

अर्थ.—जर गुरु हा मंगळाच्या घरचा अष्टमांत असेल व लग्नावर सूर्य, चंद्र, मंगळ व रवि यांची दृष्टि असेल व शुक्राची दृष्टि या गुरूवर नसेल तर तें मूल तीन वर्षांतीं मरण पावतें.

वक्री शनि र्भौमगृहं प्रपन्नश्छिद्रेच षष्टे च चतुष्टये वा ॥
कुजेन संप्राप्तबलेन दृष्टो वर्षद्वयं जीवयति प्रजातम् ॥३७

अर्थ.—वक्री शनि केंद्रीं, अष्टमांत अगर षष्ठांत असून तो मंगळाच्या घरचा असेल व त्यावर बलवान् अशा मंगळाची दृष्टि असेल तर तें मूल दोन वर्षे जगतें.

सौरे स्मरस्थे यदि वा विलग्ने
जन्मस्थलग्ने शशि वृश्चिके वा ॥
सौम्येषु केंद्रोपगतेषु सद्यो
जातस्य मृत्यु र्यवनोपदिष्टः ॥३८

अर्थ.—शनि हा लग्नीं किंवा सप्तमांत असून चंद्र वृश्चिक राशींत असेल व शुभ ग्रह केंद्रीं असतील तर तें मूल तत्काल मरण पावतें. [अथवा याचा दुसऱ्या रीतीनें अर्थः—वृश्चिक लग्नीं चंद्र असून शनि हा लग्नीं किंवा सप्तमांत असेल व शुभ ग्रह केंद्रीं असतील तरें तें मूल तत्काल मरण पावतें. हाच अर्थ विशेष संभवनीय आहे.]

नीचस्थे देवपूज्ये तु भौमक्षेत्रगतेथवा ॥
संधित्रयेपि जातस्तु मासान्मृत्युं प्रयच्छति ॥३९

गुरु आपल्या नीच राशीस अगर मंगळाच्या क्षेत्रीं असून संधिकाळीं जन्म झाला असेल तर तें मूल एक महिन्यानें मृत होतें.

क्षेत्रस्य संधौ तिथिराशिसंधौ एकत्रता तत्प्रसवस्त्रिधा स्यात् ॥
जातस्य मृत्युं समुपैति सद्यः शुक्रेन्हि जीवेदिति नंदिकोक्तम् ॥४०

अर्थ.—भावसंधि, तिथिसंधि व राशिसंधि असा तीन प्रकारचा योग एकाच कालीं असतां जन्म झाल्यास तें मूल तत्काल मरण पावतें. दिवसास शुक्र तेथें असेल तर मात्र तें मूल वांचतें,

षष्ठ्यां जातश्चार्कलग्ने कुजे वा गंडांते वा मृत्युयोगेथवापि ॥
भौमो हन्ति प्राणिनां तत्क्षणेन जीवेक्षिते चेन्नभवेत् प्रजातः ॥४१

अर्थ.—रवि किंवा मंगळ लग्नीं असून षष्ठीला गंडांतयोग किंवा मृत्युयोग असतां जन्म झाल्यास तें मूल तत्काल मरण पावतें. पण जर लग्नावर गुरूची दृष्टि असेल तर तसें होत नाहीं.

भौमोदये तद्दिवसे कृशेंदौ होरास्वामी लग्नकेंद्राद्बहिष्टः ॥
जातो योऽसौ क्षिप्रमेवैति मृत्युं भौमः सौरोप्येवमेवं विधत्ते ॥४२

अर्थ.—ज्या दिवशीं शनीचा अथवा मंगळाचा उदय होईल त्या दिवशीं चंद्र क्षीण असून होरास्वामी लग्न किंवा केंद्र यांच्या बाहेर असेल तर तें मूल तत्काल मरण पावतें.

सुतमदनवांत्यलग्नरंध्रे ष्वशुभयुतो मरणाय शीतरश्मिः ॥
भृगुसुतअत्रिपुत्रदेवपूज्ये यदि बालेभिर्न युतो विलोकितो वा ॥४६

अर्थ.—५।७।९।१२।१।८ या स्थानीं चंद्र हा पाप ग्रहानें युक्त असेल व त्यावर शुक्र, बुध किंवा गुरु हे बलवान् असून त्यांची दृष्टि नसेल किंवा त्यांनीं युक्त तो चंद्र नसेल तर मरण प्राप्त होईल.

हेरास्ताष्टमगेष्वसत्सु हिमगौ क्षीणे तु जातःशिशुः ।
स्वर्गं गच्छति सौम्यकेंद्ररहितो जीवो न चेद्वीक्षति ॥
लग्नांत्याष्टमधर्मभेषु सहिता श्चंद्रार्कभौमार्कजाः ।
क्षिप्रं गच्छति चांतकं सुरपते मैत्री न चेद्वीक्षितः ॥४४

अर्थ.—क्षीण चंद्र लग्न, सप्तम किंवा अष्टम स्थानीं असून केंद्रीं शुभ ग्रह नसतील व गुरूची त्या चंद्रावर दृष्टि नसेल तर तें मूल तत्काल मरण पावतें. व लग्न, द्वादश, अष्टम व नवम या स्थानीं क्षीण चंद्र, रवि, मंगळ व शनि असतील व त्यांच्यावर गुरूची दृष्टि नसेल तर तें मूल तत्काल मरण पावतें.

लग्ने चंद्रे भास्करे वा बलिष्ठे पापाःकेंद्रे नैधनेच त्रिकोणे ॥
शुक्रःसूर्यःशीतगुश्चैकसंस्था नाशं गच्छेद्योगमेवैति जातम् ॥४५

अर्थ.—लग्नीं चंद्र किंवा सूर्य बलवान् असून पाप ग्रह केंद्रीं, अष्टमांत किंवा त्रिकोणांत असतील व शुक्र, सूर्य व चंद्र हे एकत्र असतील तर त्या बालकाचा नाश होतो.

मेषे विंशति भागे स्यान्मृत्युं दद्यान्निशाकरः ॥
एकविंशतिभागस्तु सिंहे तच्चैस्तुगो वृषे ॥४६

अर्थ.—मेष राशीच्या विसाव्या भागांत चंद्र असेल तर तो मृत्युकारक जाणावा.

अष्टमो मेषचंद्रस्तु त्रयोविंशतिभागकः ॥
द्वाविंशतिः कुलीरे तु तुलायां वेदभागकः ॥४७
विंशति र्मकरे चंद्रःकन्यायां प्रथमांशकः ॥
धन्विन्यष्टादशो भागो मीने दशमभागयुक् ॥४८

वेड लागलेला मनुष्य.

जन्म.—ता० १८ माहे मे सन १८८५ दुपारीं

२ वाजून ५१ मि.

सायनभावचलित



या मनुष्याचें मार्थे सांप्रत भडकलें आहे. सुमारें ३ महिने झाले. उन्माद व्हावा किंवा पिशाचबाधा असावी तशी स्थिति झाली आहे. कुंडलीवरून पाहिल्यास हा विकार व्हावा असें अनुमान होत नाहीं. लग्न आणि मेष राशि यांचा अंमल शिरोभागावर असतो. यांपैकीं लग्नांतही कोणी ग्रह नाहीं व मेष राशींतही नाहीं. चंद्र पाप ग्रहानें

पीडित नाहीं. या वरून हा विकार जन्मभर राहणार नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. ग्रहांच्या परिभ्रमणानें हा उत्पन्न झाला असावा, म्हणून तो ग्रहस्थिति बदल्यानंतर नाहींसा होईल असें वाटतें.

सांप्रत हर्शल हा सुखस्थानीं चंद्राच्या समोर असून शनि हा सप्तम स्थानीं मेष राशीवर आहे. चंद्रासमोर हर्शल व लग्नासमोर मेष राशीचा शनि हेंच कारण उन्माद होण्यास झालें असलें पाहिजे. हें जर खरें असेल तर वरील ग्रह ज्या ज्या राशींतून जाई पर्यंत या मनुष्याच्या स्थितींत अंतर पडणार नाहीं. मंगळ हा बुधासह कृत्तिका नक्षत्रांत असल्यामुळें प्रकृति अत्यंत उष्ण आहे. हा मंगळ मकर राशींत हर्शलासह चंद्राच्या समोर आल्यावर शरीरांत उष्णता भडकून उन्माद झाला असला पाहिजे. या वर्षीं मंगळ मेष राशींत ता० २१ जुलई पासून आहे. म्हणून हें वर्ष या रोगास फार अनिष्ट जाईल असें वाटतें. डिसेंबरच्या अखेरीस शनि व मंगळ यांची युति होणार आहे, या युतिमुळें प्रकृति जास्त बिघडेल असें अनुमान होतें. या मनुष्यास शनि मेष व वृषभ राशींतून जाईपर्यंत सुख फारच कमी मिळणार आहे. या पुढें अनुभव पाहून जास्त विचार करूं.

विविधयोग.

उपजत मृत्यु.

जन्म—ता. १ जून १९१० सकाळीं ७ वा. ३० मि.



जन्मकालीं शनीची महादशा असून ती ६ व. ८ म. २८ दि. आहे. शनि हा सप्तमेश आहे म्हणून तो मारकेश आहे. हाच ग्रह अष्टमेशही आहे. मारकेश किंवा अष्टमेश यांच्या दशेंत मनुष्याला मृत्यु येण्याचा संभव असतो.

या शनीच्या महादशेमध्यें आरंभीं ० व. ३ म. १ दि. पर्यंत चंद्राची अंतर्दशा आहे. हा ग्रह लग्न स्वामी आहे. शनीचा चंद्र हा शत्रु आहे. म्हणून या दशेंत या मुलाचा मृत्यु झाला आहे.

तथापि आपणास यापेक्षां ग्रहांचा अनिष्ट योग कोणता झाला आहे हें समजलें पाहिजे. तनुस्थानीं नेपच्यून आणि मंगळ हे अगदीं जवळ जवळ आहेत. या दोन ग्रहांची नुकतीच युति होऊन गेली होती. ही युति मनुष्यास दुःख भोगावयास लावणारी आहे व ती तनुस्थानींच झाल्यामुळें तिच्या अनिष्टपणाची मजल मरणापर्यंत गेली आहे. हिचा इतका दुष्ट परिणाम होण्यास आणखीही एक कारण झालें आहे. तें असें कीं, ही युति हर्शलच्या समोर झालेली आहे. नेपच्यून व हर्शल हे दोन्ही ग्रह आश्चर्यकारक, अद्भुत, भयंकर व कल्पनातीत अशा गोष्टी घडवून आणितात. हे धर्म इतर कोणत्याही ग्रहांत नाहींत. ह्मणून आपणास इतक्या धर्मांपुरता यांचा स्वीकार केलाच पाहिजे. हें मूल मेलेलेंच जन्मास आलें ही अद्भुत व भयंकर गोष्ट वरील योगानें घडून आलेली आहे.

या ठिकाणीं चंद्र बिघडलेला नाहीं. तो जर बिघडलेला असता तर मातेसह बालकाचा मृत्यु झाला असता. चतुर्थ स्थानीं गुरु व नवमांत चंद्र हा योग चांगला असल्यामुळें माता **चार दिवस** पर्यंत तरी जिवंत होती. चवथ्या दिवशीं शनिचंद्रयुति आल्यावर तिचाही अंत झाला !

निरयन कुंडली.



याप्रमाणें निरयन कुंडली आहे. हिचा तज्ज्ञांनीं विचार करावा.

अपघात.

जन्म—ता. २७ एप्रिल सन १९०५ दि. ३ वा. ४५ मि.



हें मूल वैशाख शु० ११ रोजीं दिवसास ३ वाजतां मंडपाला शिडी लावलेली होती, त्या शिडीवर चढून पडलें व त्यामुळें डावा हात मनगटांत मोडला.

हें उच्चावरून पतन कोणत्या कारणानें घडलें याचा आपणास विचार करावयाचा आहे. उच्चावरून पतन होण्यास मुख्यत्वें लग्न व चंद्र यांचें **चतुर्थ स्थान** कारण आहे. या स्थानांत दुष्टांशांत असलेले पाप ग्रह उच्चावरून पतन करवितात. येथें चतुर्थ स्थानीं मकर राशीचा हर्शल ४ अं. वक्री आहे. हा ग्रह नेपच्यूनच्या समोर आहे, हा अंश दुष्ट आहे. त्यामुळें या मुलाचें उच्चावरून पतन झालें.

मंगळ वृश्चिक राशीच्या २२ व्या अंशांत वक्री आहे. हा अंश

दुष्ट आहे. शिवाय तो सायन ज्येष्ठांत आहे. त्यामुळें या अपघाताची मजल हाड मोडण्यापर्यंत गेली आहे.

हा अपघात ता. १९ मेला घडला. या दिवशीं चंद्र तूळ राशींत लग्नीं आहे. मंगळ कर्क राशींत दशम स्थानीं आहे. शनि वृषभ राशींत राहूसह अष्टमांत आहे. मंगळ हा नेपच्यूनशीं युति करण्यास जात आहे. व तो चंद्राशीं केंद्रयोग करीत आहे. अशा वेळीं हा अपघात झाला आहे. हा गुरुचंद्रयुतीवर झाल्यामुळें मूल दगावलें नाहीं.

ता. २४ मे मंगळवार रोजीं हातावर अपरेशन केलें. या दिवशीं चंद्र धनेंत होता. मंगळ कर्क राशीच्या १४ व्या अंशांत म्हणजे सिंहांशांत होता. यानंतर पुन्हा अपरेशन ता. १२ जून रविवारीं झालें. या दिवशीं चंद्र सिंहेंत होता. व मंगळ कर्क राशीच्या २६ व्या अंशांत म्हणजे सिंहांशांतच होता! अपघातानंतर मंगळ व हर्शल यांचा प्रतियोग व्हावयाचा होता, म्हणून तो होईपर्यंत एका अपरेशननें काम भागलें नाहीं. ता. १० जूनला हा प्रतियोग होता. आतां मुलाची प्रकृति सुधारली आहे. व दुसरें कारणही राहिलें नाहीं, म्हणून तो त्यांतून एक महिन्यांत चांगला बरा होईल हे उघड आहे.

या कुंडलींत जो चतुर्थ स्थानीं हर्शल पडला आहे, तो आणखी काय काय गोष्टी घडवून आणितो त्या पाहिल्या पाहिजेत.

लग्नांत घोटाळा.

जन्म—ता. २८ सप्टेंबर सन १८९७ रा. ८ वा. ४० मि.



याप्रमाणें मुलीची कुंडली आहे, लग्नाचा विचार सप्तम स्थानावर होतो. या भावारंभीं वृश्चिक राशि उदित आहे. या राशींत शनि आणि हर्शल हे एक अंशापेक्षांही कमी अंतरावर असून ते पूर्णपणें सप्तमाचें फल देतात. हा योग विवाहाला अगदीं प्रतिकूल आहे. शनि व हर्शल हे जवळ जवळ असणें फार वाईट. त्यांत ते वृश्चिक या मंगळाच्या घरीं तर फारच वाईट. असल्या योगावर विवाहकालीं घोटाळा होणें अगदीं साहजिक आहे.

हें लग्न ता. २४ मेला ठरलें होतें. या दिवशीं मंगळवार होता. मंगळवार हा विवाहाला शुभ वार नाहीं. या दिवशीं रवि हा मिथुन राशींत लग्नीं होता, व तिसऱ्या अंशांत सिंहांशीं होता चंद्र धनु राशींत सप्तमांत होता, मंगळ कर्क राशींत कुटुंब स्थानीं होता. मंगळ कर्क राशींत कुटुंब स्थानीं सिंहांशांत होता, म्हणून तो फार दुष्ट होता. व त्याच्या सप्तमांत हर्शल होता. मंगळ हा अंशतः जायास्वामी

आहे व तो या वेळीं आपल्या नीचांत असून त्याच्या सप्तमांत हर्शल आहे, हा योग विवाहांत विघ्न न आणील तर काय करील?

दुसरा जायास्वामी गुरु आहे. हा ग्रह जन्मकाळीं दुर्बल आहे व तो आपला शत्रु जो बुध त्यानें युक्त आहे, ह्मणून हा योग अनिष्ट प्रकार घडवून आणणारा आहे. विवाहकाळीं तो आपल्या कुटुंबस्थानीं होता. जन्मकाळीं त्याच्या कुटुंबस्थानीं रवि आणि मंगळ असें दोन पाप ग्रह होते. अशा ठिकाणीं वक्री होऊन रवीजवळ आलेला होता.

राहू हा लग्नांत शनीच्या समोर होता व शनि हा जन्मचंद्राच्या सप्तमांत होता. ह्मणून हेही योग विवाहाला अनिष्ट झाले.

सारांश, एकही अनुकूल योग नसतां विवाहाचा दिवस ठरला होता. त्यामुळें मुलीचें वऱ्हाड (मुलीकडील माणसें) वराच्या गांवीं आल्यानंतर वराच्या कुटुंबांत एका मनुष्याचा मृत्यु होऊन लग्न व्हावयाचें राहिलें!

असले कांहीं घोटाळे उडावे असें जन्मतःच ग्रह सांगत आहेत. ह्मणून विवाहाला असा दिवस शोधिला पाहिजे होता कीं, एकही अनर्थसूचक योग नसेल. शास्त्राकडे सर्वदा दुर्लक्ष करणें चांगलें नाहीं असें यावरून सिद्ध होतें. ढळढळीत दुष्ट योग असतां मुहूर्त धरणें व ज्योतिष्यानें तो देणें शहाणपणाचें आहे असें कोण ह्मणेल? ज्या मुलीला फारच अनिष्ट योग असतील त्या मुलीच्या बापानें लग्न उत्तम ग्रहयोगावरच धरलें पाहिजे व त्यासाठीं प्रथमपासून सावधगिरी ठेवली पाहिजे.

कित्येकांच्या मतें होणार तें जर टाळणें शक्य नाहीं तर सावधगिरी ठेवून काय फायदा? परंतु हें मत चुकीचें आहे. कारण, अमुक एक गोष्ट निश्चयानें होणारच असें कोणाला समजतें आहे? होणार हें अनुमान आहे, ह्मणून त्याला उपाय केलेच पाहिजेत.

मंगळ

ता. १९ जून पासून ता. ६ आगष्ट पर्यंत मंगळ सिंह राशीवर आहे. ता. २५ जूनला मंगळ व शनि यांचा केंद्रयोग होतो. हा योग या दिवशीं रात्रीं १० वाजून ३७ मि. नीं होतो, ह्मणून ही वेळ अनिवार्य गोष्टी घडवून आणणारी आहे. या वेळीं जन्मणारें मूल मोठ्या शिकस्तीनें वांचेल. त्याचप्रमाणें ही वेळ कित्येकांना कोणत्यातरी प्रकारानें संकटांत घालील अशी आहे. पृथ्वीवर ठिकठिकाणीं अपघात झाल्याचें ऐकूं येईल. सन १९०८ सालीं शनि मेष राशींत असतां जूनच्या पहिल्या आठवड्यांत असा शनि व मंगळ यांचा केंद्रयोग झालेला होता. हा योग शनि मेषराशींत असल्यामुळें विशेष भयंकर होता. तितक्या रूपाचा हा नाहीं, कारण शनि फारसा दुष्ट स्थितींत नाहीं. सन १९०९ च्या मार्च्यमध्यें केंद्रयोग होता. या योगांत शनि हा मंगळाच्या पूर्ण दृष्टींत होता. सन १९१० मध्यें जो केंद्रयोग होणार आहे. त्यांत शनि हा मंगळापासून दहावा व मंगळ हा शनीपासून चवथा असा आहे. दृष्टिपद्धतीनें यांत एकमेकांचीं किरणें एकमेकांस मिसळत नाहींत, तरी हा योग जनतेला व जन्मणाऱ्या बालकाला सुखावह नाहीं.

सिंह राशि ज्यांच्या धन स्थानीं असेल, त्यांस हा मंगळ सुखावह नाहीं. कित्येकांचे डोळे येतील किंवा डोळ्यांस इजा होईल, कित्येकांना कर्ज काढावें लागेल किंवा सावकाराची रकम द्यावी

लागेल. पैसा विनाकारण खर्च होईल व संग्रह मुळींच होणार नाहीं. कित्येक पैशाच्या मोठ्या फिकिरींत पडतील. कुटुंबांत कलह होतील किंवा कित्येक आजारी पडतील. स्त्रीशीं भांडण होईल किंवा ती सदा संतप्त असेल. जन्मकाळीं जर या राशींत शनि असेल तर हा काल फारच अनिष्ट जाईल व तो चांगलाच जाणवेल. त्याच प्रमाणें या राशींत जन्मकाळीं हर्शल असेल तर तो काल निश्चयानें कठीण जाईल.

ज्यांच्या सिंह रास तिसऱ्या स्थानीं आहे त्यांस हा काळ बरा जाईल. साहसकर्म घडेल. कर्तृत्वशक्तीचीं कार्यें होतील. वृत्ति तापट होईल व कलहाकडे प्रवृत्ति होईल. भावंडें नाखुष असतील किंवा हर्शल असेल तर भावंडें सीक होतील किंवा त्यांच्यापासून कोणत्या तरी प्रकारानें ताप होईल. ज्यांना कानाचा विकार असेल त्यांस तो अधिक जाणवेल, व वादांत अगर युद्धांत माघार घ्यावी लागेल.

ज्यांच्या चतुर्थ स्थानीं सिंह राशि असेल ते काळजींत पडतील. हृदयाची गति वाढेल. ज्यांना हार्डडिझिझ् असेल त्यांना काल कठीण जाईल. ज्यांना जन्मकाळीं अपघाताचे योग असतील त्यांनीं वाहनांत बसूं नये किंवा उंचावर चढूं नये. या कालांत वाहनांची खरेदी किफायतीची होणार नाहीं. जन्मकाळीं या राशींत जर गुरु असेल तर राजमान मिळेल किंवा मोठा गौरव होईल. शनि किंवा हर्शल असेल तर प्रकृति नादुरुस्त होईल, मित्र हें शत्रु बनतील दायादांशीं कलह होईल व माता सीक पडेल. सावत्र माता असेल तर तिच्यापासून फार त्रास होईल. एकंदरींत या कालांत कोणत्या ना कोणत्या प्रकारानें दुःख व काळजी उत्पन्न होईल. या कालांत

जमीन खरेदी करणें किंवा विकणें, इमारती बांधणें किंवा त्याची खरेदी विक्री करणें किंवा विकणें, किंवा त्या गहाण टाकणें फायदेशीर होणार नाहीं.

ज्यांच्या पंचमांत हा राशि असेल त्यांना संततीसंबंधानें हा काल तापदायक होईल. मुलें सदा किरकिर करितील. या कालांत जर गर्भ राहील तर तो सुरक्षित टिकणार नाहीं. हा योग स्त्रियांना असेल तर त्यांचा गर्भाशय बिघडेल. ज्यांचीं मुलें जगत नाहींत त्यांचा जर या कालांत प्रसूतिसंभव असेल तर फार काळजी घेणें जरूर आहे. जन्मकाळीं गर्भपाताचा योग असेल व या कालांत जर गर्भधारणा झालेली असेल तर गर्भपात होण्याचें भय आहे. ज्यांना वंध्यायोग आहे त्यांना या मंगळाचें मुळींच भय नाहीं.

ज्यांच्या ६ व्या स्थानांत हा राशि आहे त्यांना वादाला किंवा युद्धाला मंगळ अनुकूल आहे. शत्रुपराजीत होतील, व जय मिळेल पण, या राशींत जर जन्मकाळीं शनि किंवा हर्शल असेल तर शत्रुपीडा होईल, प्रकृति बिघडेल, धंदा त्रासदायक होईल व चाकरमाणसांपासून फार त्रास होईल. ज्यांना आम्लपित्ताची व्यथा आहे त्यांस हा काल चांगला नाहीं. चाकरमाणसें या कालांत नोकरीस ठेवणें तापदायक होईल.

ज्यांच्या सप्तमांत हा राशि असेल ते वादाला किंवा युद्धाला उभे राहतील. ज्यांचे या कालांत कोर्टांत खटले निघतील ते आपली बाजू सिद्ध करण्याच्या कामीं फार परिश्रम करितील व शेवटीं जय मिळवितील. या कालांत प्रवास करणें हितावह होणार नाहीं, केल्यास फार त्रास सहन करावा लागेल. स्त्रीची प्रकृति

नादुरुस्त होईल, ती संतप्त असेल किंवा तिचा वियोग होईल. जन्मकाळीं जर या राशींत शनि किंवा हर्शल असेल तर वादांत व युद्धांत जय मिळणें कठीण आहे. स्त्रीसंबंधानें हा काल सुखावह जाणार नाहीं. व प्रवासांत फारच ताप होईल.

ज्यांच्या अष्टमांत हा राशि असेल त्यांना प्रकृतिला स्वास्थ्य मिळणार नाहीं. ज्यांना मूळव्याधीचा उपद्रव असेल त्यांना त्या रोगापासून फार त्रास होईल. या राशींत जर जन्मकाळीं शनि किंवा हर्शल असेल तर आजारीपणांत व फार दगदगींत दिवस काढावे लागतील.

ज्यांच्या नवम स्थानीं सिंह राशि असेल त्यांना भाग्योदयाचे दिवस येतील. कीर्ति व यश मिळेल. या राशींत जन्मकाळीं शनि अगर हर्शल असेल तर उद्योगांत सिद्धि मिळणार नाहीं. कदाचित् अपकीर्ति होईल. अधर्माकडे प्रवृत्ति होईल. बापाला दुःख होईल. गुरु असेल तर मोठा लौकिक होईल व राजयोगासारखें फल मिळेल.

ज्यांच्या दशम स्थानीं सिंह राशि असेल त्यांना हा काल उत्तम जाईल. मानमरातब वाढेल. लौकिक होईल व नोकरी अगर धंदा यांत जय मिळेल. जर जन्मकाळीं या राशींत रवि, चंद्र अगर गुरु असेल तर मोठा सन्मान होईल व राजमान मिळेल. शनि अगर हर्शल असतील तर नोकरींत संकट उद्भवेल व ती त्रासदायक होईल. धंद्यांत पिच्छेहाटी होऊन अब्रू जाण्याचा प्रसंग येईल. बाप संकटांत पडेल किंवा आजारी होईल अथवा त्याच्याशीं बेबनाव होईल.

ज्यांच्या लाभस्थानीं हा राशि असेल त्यांना चांगला धनलाभ होईल. जन्मकाळीं रवि, चंद्र, गुरु या राशींत असतील तर पुष्कळच धनलाभ होईल. शनि किंवा हर्शल असेल तर गर्भपीडा किंवा गर्भपात होईल. धंद्यांत किफायत कमी होईल व कित्येक प्रसंगीं हातचा लाभ गमावेल. मित्रांपासून दुःख होईल.

ज्यांच्या व्ययस्थानीं हा राशि असेल ते पैशांच्या फिकिरींत पडतील. सट्ट्याचा व्यापार करणारांनीं फार सावधगिरी ठेविली पाहिजे. यत्किंचित् अविचार झाल्यास मोठें नुकसान होईल खर्च फार होईल व तो करावाच लागेल. पैसा हातांत येतांना मारामार पडेल, या ठिकाणीं जर जन्मकाळीं शनि अगर हर्शल असेल तर मोठें संकट उत्पन्न होईल. कित्येकांचें धन चोरीस जाईल किंवा गहाळ होईल व कित्येकांना राजदंड भोगण्याचा प्रसंग येईल. गुरु किंवा चंद्र असेल तर संकटें जाणवणार नाहींत. रवि असेल तर वृथा खर्च होईल.

ज्यांच्या लग्नीं सिंह रास असेल त्यांस या काळीं बल आणि आरोग्य प्राप्त होईल. प्रमुखत्व मिळेल व धाडशी मन होईल. लहानसहान दुखापती होतील. जर जन्मकाळीं या राशींत शनि अथवा हर्शल होईल तर मात्र शारीरयातना भोगाव्या लागतील. शत्रु उत्पन्न होतील व त्यांच्याशीं झगडावें लागेल. मन संतप्त व उद्विग्न राहील. असल्या माणसांनीं या काळांत प्रवास करूं नये. ज्यांना अपघात होतात. त्यांनीं तर फार जपलें पाहिजे.

अशा प्रकारचें मंगळाचें द्वादश स्थानाचें फल आहे. या फलांचा सायन कुंडलीवरून अनुभव घेतला पाहिजे. निरयन कुंडलीवरून अनुभव घेतांना मंगळही निरयनच घ्यावा. ता. १९ जूनपासून

ता० ६ आगष्टपर्यंत मंगळ सायन सिंह राशींत आहे. व ता०२६ जुलईपासून ता० १९ सपटंबरपर्यंत निरयन पंचांगांत तो सिंह राशींत आहे. या दोन प्रकारच्या मंगळांपैकीं कोणत्या मंगळाचा अनुभव चांगला येतो हें पहावें म्हणून आज हीं मंगळाचीं द्वादश स्थानचीं फलें दिलीं आहेत.

कोणत्याही ग्रहांचीं वार्षिक फलें तीन प्रकारांनीं पहावयाचीं असतात.

ग्रह दोन प्रकारचे आहेत. **स्थिर** आणि **चर**. जन्मकाळचे जे ग्रह ते **स्थिर ग्रह** व पंचांगांतले जे ग्रह ते **चर ग्रह** आहेत. म्हणून वार्षिक फलांचा विचार करितांना हे दोन्ही प्रकारचे ग्रह विचारांत घेतले पाहिजेत. चर ग्रह, स्थिर ग्रहांच्या योगानें पाहिल्यास फलानुभव चांगला येईल. स्थिर ग्रहांत चंद्र सर्व लोक विचारांत घेतातच, तसेच सर्व ग्रह घ्यावे. हें काम सूक्ष्म विचाराचें आहें. तें ज्याचें त्याला उत्तम करितां येईल तितकें दुसऱ्याला साधणार नाहीं.



कुंडलीविज्ञान

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥

' भवभूति : ,

पुस्तक ७ वें.] आश्विन शु. १५, सोमवार [अंक २३ वा

जन्मकालाचा गर्भकालाशीं संबंध

आजच्या विषयांत जन्मकालाचा गर्भकालाशीं संबंध दाखवावयाचा आहे. सुमारें २७९ दिवसांनीं गर्भ प्रसव पावतो, अशी कल्पना करून हा संबंध कसा असतो, हें दाखवावयाचें आहे. म्हणून हें विवेचन अपुऱ्या दिवसांच्या जन्मास उपयोगीं पडणार नाहीं.

जन्मकालाच्या पूर्वी २७९ दिवस मोजल्यानें जो दिवस येईल, त्या दिवशींचें ग्रह पाहिल्यास पुढील नियम दृष्टीस पडतील.

१ शुक्र आणि मंगळ हे एका राशींत.

२ शुकमंगळ हे एकमेकांच्या ठिकाणीं, दोघे किंवा दोहोंपैकीं कोणी तरी क्वचित् दृष्टींत.

३ शुक्र किंवा मंगळ हे गुरूच्या राशीस किंवा त्याच्या दृष्टींत.

४ शुक्र किंवा मंगळ हे आपापल्या ठिकाणीं-क्वचित् आपल्या समोर.

उदाहरण १ लें.

जन्म–ता. २८ फेब्रुवारी सन १८९६
रात्रीं ५ वाजून २१ मि.
सायन.



या जन्म तारखेच्या पूर्वी २७९ दिवस मोजल्यास ता. ५ मे सन १८९५ हा गर्भदिवस येतो. या दिवशीं शुक्र आणि मंगळ दोघेही सायन कर्क राशींत आहेत. असलीं उदाहरणें बरींच दृष्टीस पडतात.

उदाहरण २ रें.

जन्म–ता. २५ नवंबर सन १८७५
रात्रीं ४ वाजून ४१ मि.
सायन



या कुंडलीचा गर्भदिवस ता. १३ फेब्रुवारी सन १८७५ हा येतो. या दिवशीं मंगळ धनु राशींत आहे, ह्मणजे जन्मशुक्राच्या राशीस आहे. मंगळ हा शुक्राच्या राशीस गेल्याचीं जेवढीं उदाहरणें दृष्टीस पडतील, त्यापेक्षां शुक्र हा मंगळाच्या राशीस गेल्याचीं कमी आढळतील.

उदाहरण ३ रें.

जन्म–ता. २७ अकटंबर सन १८५६
रात्रीं ११ वाजून ७ मि.
सायन



याचा गर्भदिवस ता. २३ जानेवारी १८५६ हा येतो. या दिवशीं शुक्र धनु राशींत आहे. ह्मणजे तो जन्ममंगळाच्या अथवा आपल्या स्वतःच्याच राशीस आहे.

उदाहरण ४ थें.

जन्म–ता. ५ फेब्रुवारी सन १८८०
सायं. ६ वाजून ४० मि.
सायन



याचा गर्भदिवस ता. २ मे सन १८७९ येतो. या दिवशीं मंगळ मीन राशींत जन्म गुरूजवळ आहे.

उदाहरण ५ वें

जन्म—ता. ७ सप्टंबर सन १९०६
दि. १२ वाजून ३६ मि.
सायन



याचा गर्भ दिवस ता. २२नवंबर सन १९०५ येतो. या दिवशीं शुक्र मेष राशींत तो आपल्या समोर आहे. व मंगळ मकर राशींत गुरूच्या समोर आहे.

या तीन ग्रहांच्या स्थितीवरच मुख्यत्वें गर्भकाल अवलंबून असला पाहिजे. कारण गुरु, हा संतति–दायक ग्रह आहे. शुक्र हें पुरुषाचें शुक्र आहे. व मंगळ हें स्त्रीचें आर्तव आहे. यासाठीं या तीन ग्रहांचा यथायोग्य संबंध घडल्या–शिवाय गर्भ राहणार नाहीं. गुरु व शुक्र हे गर्भकाळीं एका राशीवर असल्याचीं उदाहरणें फार दृष्टीस पडतात. क्वचित ठिकाणीं शुक्र व गुरु यांत नवपंचम योग आढळतो जेव्हां २७९ दिवसांच्या हिशेबानें गुरु शुक्रांचा असा संबंध आढळणार नाहीं, व त्यांच्यांत थोड्या अंशांचा फरक दृष्टीस पडेल तेव्हां गर्भकाल २७९ दिवसांपेक्षां कमजास्त आहे, असें मानण्यास हरकत नाहीं.

बृहज्जातक व जातकपारिजात यांतील निषेक प्रकरणीं असें सांगितले आहे कीं "चंद्र हा स्त्रीच्या जन्म राशीच्या १।२।४।५।७।८।९ १२ या स्थानीं असतां त्यावर मंगळाची दृष्टि असेल तर तिला गर्भ

राहण्याचा संभव असतो. त्याचप्रमाणें पुरुषाच्या जन्मराशीच्या ३।६ १०।११ या स्थानीं चंद्र असतां त्याच्यावर गुरूची दृष्टि असतां गर्भ निश्चयानें राहतो.

यावरून गर्भकालाचा चंद्र निश्चित करितां येण्यासारखा आहे. पहिल्या उदाहरणाच्या गर्भकालीं मंगळ तूळ राशींत व गुरु मीन राशींत आहे. गुरूची दृष्टि आपल्या स्थानापासून५।७।९ स्थानीं असते. ह्मणून मीनेच्या गुरूची कर्क, कन्या व वृश्चिक राशीवर दृष्टि असेल. मंगळाची आपल्या स्थानापासून ४।७।८ स्थानीं दृष्टि असते. ह्मणून तूळ राशींतल्या मंगळाची मकर, मेष व वृषभ राशींच्या चंद्रावर दृष्टि असेल. ऐथें गुरूचे राशि व मंगळाचे राशि यांत मेळ नाहीं ह्मणून एक तर गर्भकाल चुकीचा असेल किंवा नियम खोटा असेल. आमच्या मतें नियम चुकीचा आहे. कारण गुरूचे व मंगळाचे दृष्टिराशि यांत सदासर्वदा मेळ राहणें शक्य नाहीं. जर मंगळ हा गुरूच्या १।२।३।६।१०।११।१२ स्थानीं असेल तर मात्र उभयतांचे दृष्टिराशि एक येतील, एरवीं कधींही येणार नाहींत. ह्मणून नियमच पंगू असला पाहिजे.

आमच्या मतें गर्भकालीं चंद्र हा मंगळाच्या दृष्टींत तर पाहिजेच, पण तो युक्त असला तरीही चालेल. त्याचप्रमाणें तो गुरु अथवा शुक्र यांनीं युक्त किंवा दृष्ट असला पाहिजे. हें जर खरें मानिलें तर ग्रहांवरून गर्भ रहाण्याचे दिवस कोणते ते ज्योतिष्यास ठरवितां येतील.

उदाहरण

बाप

जन्म-११ फेब्रुवारी१८७८
दि. २ वाजून ५८ मि.



आई

जन्म-४जानेवारी१८८४
दि. ८ वाजून ५८मि



मुलगा.

जन्म—२६ सप्टंबर १९०३
दि. ४ वाजून ३० मि.



मुलींच्या कुंडलीवरून २७९ दिवस मागें मोजतां गर्भदिवस २१ डिसेंबर १९०२ हा येतो. या दिवशींचे ग्रह —

शनि–मकर २६ गुरु–कुंभ–१६ मंगळ तूळ० शुक्र– मकर–४ रवि–धनु २८ चंद्र–कन्या २२

मंगळ तूळ राशींत असल्यामुळें त्याची दृष्टि मकर, मेष व वृषभ राशींवर पोहोंचते. व गुरूची मिथुन सिंह व तूळ राशींवर पोहोंचते व येथें उभयतांच्या राशींत मेळ नाहीं. पण शुक्र मकर राशींत असल्यामुळें गर्भकालाचा चंद्र शुक्रानें युक्त असला पाहिजे असें सिद्ध होतें. २१ व्या तारखेचा चंद्र कन्येंत आहे, ह्मणून गर्भ दिवस हा नसून ता. २९ अगर ३० डिसेंबर असला पाहिजे. ता. ३० या दिवशीं शुक्र व चंद्र यांची युति आहे. या युतीवरच गर्भ राहिला असला पाहिजे. आतां, दुसऱ्या मुलीचा विचार करूं.

जन्म—२० अक्टंबर १९०५ सा.
५ वाजून ३० मि.



या जन्मदिवसाच्या पूर्वी २७९ दिवस मोजल्यास गर्भदिवस १४ जानेवारी १९०५ येतो. या दिवशींचे ग्रह—

मंगळ–वृश्चिक शुक्र–तीन गुरु

मेष मंगळाचे गर्भराशि–वृश्चिक, कुंभ, वृषभ, मिथुन. गुरूचे गर्भराशि–मेष, सिंह, तूळ, धनु शुक्राचे गर्भराशि–मीन, कन्या.

या तिहींत मेळ नाहीं. पण गर्भदिवस १।२ दिवस मागें धरिल्यास मंगळ तूळ राशींत येतो. आणि मग त्याचे गर्भराशि तूळ, मेष वृषभ व मकर येतात. यांपैकीं मेष आणि तूळ हे राशि गुरु व मंगळ यांचे जुळते आहेत, ह्मणून यांपैकीं कोणता तरी गर्भराशि असला पाहिजे. तूळ धरिल्यास फार मागें जातो. ह्मणून मेषच धरिला पाहिजे ता. १३ वीला गुरुचंद्र युति आहे, ह्मणून याच युतीवर गर्भ राहिला असला पाहिजे, असें सिद्ध होतें.

बापाच्या कुंडलींत मकर आणि मीन हे स्त्री राशि गर्भस्थानीं आहेत. हे स्त्रीराशि आहेत. यांत शुक्र गेल्यावर राहिलेले दोन्ही गर्भ मुलींचेच होत, ही गोष्ट विचारणीय आहे. या गृहस्थाची पत्नी सांप्रत गरोदर आहे. गर्भकाल फेब्रुवारी १९०७ मध्यें येतो. या वेळीं शुक्र मकर राशींत आहे. ह्मणजे पहिल्या मुलीच्या गर्भकालीं शुक्र ज्या राशींत होता, त्याच राशींतआहे. आतां पहावें कन्या होते कीं मुलगा होतो. मागील अनुभवावरून मुलगी झाली पाहिजे, असें अनुमान होतें. वा कालीं गुरु कर्केत व शनि मीनेंत आहे.

जर आपणास गर्भकालाचें बरोबर ज्ञान झालें, तर स्त्रीसंभोगाचे असोघ दिवस ठरवितां येतील. वीर्यवान् प्रजा उत्पन्न करितां येईल. पुरुषांचें व स्त्रियांचें आयुष्य वाढवितां येईल व ज्यांस वर्षाऑड संतति होते, त्यांचा त्रास चुकवितां येईल.

वरील गृहस्थांस प्रथमापत्य पुत्र होता. त्याचा जन्मकाल नक्की माहीत नाहीं. अजमासावरून गर्भकाल १९०० चा सप्टंबर येतो. या वेळीं शुक्र हा सिंह राशींत होता. याच राशींत स्त्रीचा गुरु व मंगळ आहे. व पुरुषाच्या कुंडलींत हा राशि रवीच्या समोर आहे. हा पुरुष संज्ञक राशि असल्यामुळें पुत्रगर्भ राहिला. या कालीं गुरु धनेंत असून मंगळ सिंहेंतच असला पाहिजे. शनि धनेंतच होता. या प्रमाणें सर्व ग्रह पुरुष राशींतच होते, ह्मणून पुत्रगर्भ राहिला, असें ह्मणावें लागतें. हें खरें मानिलें तर शुक्र सिंह, तूळ, धनु, कुंभ, व मेष मिथुन या राशीवर असतां स्त्रीसंभोग केल्यास पुत्रप्राप्तीच झाली पाहिजे. हाच विषय आणखी पुढें चालवून त्यापासून कांहीं निष्पन्न होतें कीं काय हें पाहणें आहे. आमची अशी खात्री आहे कीं, जर गर्भकाल निश्चित झाला तर प्रसूतिकाल ठरवितां येईल व मुलगा होईल कीं मुलगी होईल याचाही विचार करितां येईल.

कुंडलीविज्ञान

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥

'भवभूतिः,

पुस्तक ७ वें.] आश्विन कृ. १, शुक्रवार [अंक २४ वा

जन्मकालाचा गर्भकालाशीं संबंध

नं. २

गेल्या अंकांत जन्मकालचे शुक्र व मंगळ हे गर्भकालीं कसे असतात हें पांच उदाहरणें देऊन दाखविले, व गर्भदिवस चंद्रावरून निश्चित कसा करावा हेंही सांगितलें. गर्भदिवस नेमका कळेल तर प्रसूतीचा दिवसही नेमका कळणें शक्य आहे. आह्मांस असें वाटतें कीं याचा जर कोणी या दिशेनें यत्न करील तर तो गर्भकाल निश्चित करूं शकेल. गर्भदिवस कळो कीं न कळो, तो २७९ दिवसांच्या सरळ हिशेबाचा जरी असला तरी तेवढ्यावरून प्रसूतीचा आठवडा किंवा निदान पंधरवडा तरी कळेल. येथील एका गृहस्थाची स्त्री गर्भवती होती. तिची प्रसूति समाधानकारक होणार नाहीं, डॉक्टर आणण्याचा प्रसंग येईल, यासाठीं सावध असावें अशी आह्मीं आगाऊ सूचना दिली होती, ती गर्भकालावरून प्रसूतिकालाचें अनुमान करूनच दिली होती. कर्मधर्मसंयोगानें त्या मनुष्यास तसाच प्रसंग आला. त्याच्या

स्त्रीला प्रथम एक मुलगी झाल्यावर दुसरा पिंड असला पाहिजे असें दिसून आलें, परंतु एक तास होत आला तरी प्रसूति होईना तेव्हां डॉक्टरला बोलावणें पाठविलें ! सदरचे गृहस्थ श्रद्धाळू आहेत. त्यांस राहू आणि मंगळ यांचा पूर्णपणें जप करण्यास सांगितलें होतें. त्या प्रमाणें त्यांनीं स्वतः जप केल्यामुळें डॉक्टर येण्यापूर्वीच दुसरी मुलगी उपजली ! पण ती तत्काल मृत झाली. नंतर दुसऱ्या दिवशीं प्रथम झालेली मुलगी मृत झाली. सूचनेचा उपयोग किती झाला तो पहा. सदरच्या गृहस्थांचें घर येथून २० कोसांवर आहे. ह्मणून ते प्रसूतीचे सुमारास येथील धंदा टाकून घरीं जाऊन बसले होते. इच्छा ही कीं संकटकाळीं आपण जवळ असावें. ईश्वरकृपेनें इच्छेनुरूप गोष्ट घडली. या अरिष्टांतून मुक्त झाल्यामुळें त्यांस आनंद होणें स्वाभाविकच आहे, पण कठून मुक्तता झाल्यानें अत्यंत समाधान वाटत आहे ! यांचा जन्मकाळ येणें प्रमाणें आहे.—

जन्म—ता. २२ जून सन १८६३
मंगळवार दिवसास ९ वाजून
३२ मि.
सायन.



पंचम भावाचा आरंभ धनेच्या २८ अंशांत असून या भावांत मकर राशीचे २७ अंश आहेत, ह्मणजे बहुतेक हाच राशि पंचमांत आहे. त्यामुळें पंचमाचा स्वामी शनि आहे. तो कन्येंत चंद्रासह आहे. ह्या प्रमाणें पंचमाचा स्वामी शनि त्याच प्रमाणें त्याच्या समोरचें जें एकादश स्थान त्याचा स्वामी चंद्र आहे. याप्रमाणें पंचमैकादशाचे स्वामी एकाच राशींत मीन या जुळ्या राशीसमोर आहेत. त्याच प्रमाणें मिथुन या जुळ्या राशींत बुध व हर्शल असून या राशीसमोर राहु आहे. ही ग्रहस्थिति जुळ्या संततीस कारण झाली, हें उघड आहे.

यापेक्षांही स्पष्ट योग स्त्रीच्या कुंडलींत असला पाहिजे, परंतु ती कुंडली उपलब्ध नाहीं.

एकादश स्थानीं मिथुन राशीचे २ च अंश असून कर्क राशीचे २७ अंश आहेत. या राशींत गर्भकालीं व प्रसूतिकालीं राहु होता. व याच्या समोरच्या मकर राशींत प्रसूतिकालीं मंगळ प्रबल होता. जाया स्थानीं कुंभ राशीचे ४ च अंश असून मीन राशीचे २५ अंश आहेत. या राशींत जायास्थानीं व प्रसूतिकालीं शनि होता व तो वक्री होता. या प्रमाणें जाया, पंचम व एकादश या स्थानीं क्रूर ग्रह प्रसूतिकालीं असणार होते, ह्मणूनच डाक्टर आणण्याचा प्रसंग येईल, असें आगाऊ सुचविलें होतें.

ता. १२ सप्टेंबर १९०७ या दिवशीं सकाळीं ११ वाजून ५ मि. हा प्रसूतिकाल झाला.

या वेळची कुंडली



मीन या जुळ्या लग्नीं जन्म असून या राशींत शनि वक्री आहे समोर र. बु. शु. हे ग्रह आहेत ह्मणून जुळ्यांचे नियम येथेंही आहेत. आतां गर्भकालाचा विचार करूं.

वरील जन्म दिवसाच्या मागें २७९ दिवस मोजल्यास गर्भ दिवस ६ जानेवारी १९०७ हा येतो. या दिवशींचें ग्रह.—

रवि—मकर१४ चंद्र—कन्या
मंगळ—वृश्चिक१२ बुध—धनु२८
गुरु—कर्क४ शुक्र—धनु४
शनि—मीन१० राहु—सिंह०

जन्मकालचा चंद्र वृश्चिक राशींत ११ अंश आहे. याच्याच जवळ मंगळ येतो. जन्मकालचा गुरु ४ अंश असून गर्भकालचाही त्याच राशींत तितकेंच अंश आहे. गुरूच्या दृष्टींत मंगळ आहे. परंतु या दिवशीं आपल्या नियमानें चंद्र जुळत नाहीं. ह्मणून गर्भदिवस ८ वीला रात्रीं धरिला पाहिजे. या दिवशीं मंगळानें युक्त व गुरूनें दृष्ट असा येतो, ह्मणून गर्भदिवस ८ जानेवारी धरणें योग्य आहे. या वरून एक सामान्य नियम दिसतो.

तो असा.—

नियम— शुक्र किंवा मंगळ हे जर गर्भकालीं जन्मकालच्या स्त्री राशींतल्या चंद्राजवळ असतील तर तो स्त्रीगर्भ असला पाहिजे.

या नियमाचा खरेखोटेपणा अद्यापि सिद्ध झाला नाहीं, हें ध्यानांत ठेवावें.

गेल्या अंकांत एक जुळ्या मुलीची निरयन कुंडली प्रसिद्ध केली आहे. त्यांच्या जन्मांत १ तासाचें अंतर आहे, ह्मणून दोन कुंडल्या निरनिराळ्या होतात.

१ ली.



२ री.



जुळ्याचे नियम येथें स्पष्ट दिसत नाहींत. असो. आपणास गर्भकालाचा विचार करावयाच आहे. हा जन्म ता. ३१ अक्टंबर १९०१ चा आहे. याच्या मागें २७९ दिवस मोजल्यास गर्भदिवस २५ जानेवारी १९०१ हा येतो. या दिवशींचे ग्रह—

रवि–कुंभ ४ चंद्र–मेष मंगळ–कन्या ११ बुध–कुंभ ७ गुरु–मकर १ शुक्र–मकर ११ शनि–मकर १० राहू वृश्चिक २८

शुक्र मकर राशींत गुरूनें युक्त आहे. मंगळ कन्या राशींत आहे. या दिवशी चंद्र मेषेंत असून तो मंगळाच्या दृष्टींत आहे, पण गुरूच्या दृष्टींत नाहीं, ह्मणून तो कन्येंत कल्पिला पाहिजे. ९ व्या तारखेस चंद्रमंगळ युति आहे, या युती वरच हा गर्भ राहिला असला पाहिजे. तेव्हां मंगळ चंद्रानें युत स्त्री राशींत झाला आणि शुक्र हा शनि व गुरु यांनीं युक्त मकर या स्त्रीराशींत झाला ह्मणूनच हा स्त्री गर्भ राहिला असला पाहिजे. हा गर्भ रात्रीं मीन या जुळ्या राशीच्या लग्नावर राहिला असला पाहिजे.

या उदाहरणांत चंद्र गुरूच्या दृष्टींत येण्यासाठीं त्याचा मंगळाशीं योग कायम करावा लागला. परंतु गर्भकाल १७ दिवस धरावा लागला, हें करणें गौण आहे. १९ व्या तारखेस चंद्राशीं गुरु व शुक्र यांचा योग होत आहे. हा योगही गर्भदाता झाला पाहिजे. याला एकच अडचण आहे. ती ही कीं तो चंद्र मंगळाच्या दृष्टींत येत नाहीं, त्रिकोणांत येतो. पण असा प्रसंग एक वेळ येतोच. उदाहरणार्थ—



या ठिकाणीं मंगळानें युक्त किंवा दृष्ट चंद्र फुलीच्या ठिकाणीं संभवतो पण यांपैकीं एकही ठिकाण गुरु किंवा शुक्र यांच्या दृष्टींत येत नाहीं. अशावेळीं गर्भदिवस नक्की कसा करावा? या ठिकाणीं चंद्र मंगळाच्या त्रिकोणांत (५ किंवा ९ येथें) कल्पिला तरी गुरु शुक्र यांनीं युक्त अथवा दृष्ट येत नाहीं! असा हा एकच प्रसंग आहे. ह्मणून जर गुरु व शुक्र हे एका राशीवर असतील व मंगळ त्यांच्या अष्टमांत असेल तर त्या वेळीं चंद्र गुरु व शुक्र यांनीं युक्त अथवा त्यांच्या त्रिकोणांत धरण्याव्यांचून गत्यंतर नाहीं. गुरु व शुक्र यांनीं युक्त धरून तो मंगळाच्या त्रिकोणांत येईल तर बरेंच आहे. निदान जन्मस्थ मंगळाच्या राशीस दृष्टींत अगर त्रिकोणांत येत असेल तर फार उत्तम. वरील उदाहरणांत मंगळ कन्येंत असल्यामुळें गर्भचंद्र त्याच्या त्रिकोणांत येतो, ह्मणून तो गुरुशुक्राशीं युक्त धरण्यास हरकत नाहीं. अर्थात् १९ जानेवारी हा गर्भदिवस नक्की झाला. या ठिकाणीं शुक्र हा कर्क या स्त्रीराशींतल्या चंद्रा

समोर आहे, ह्मणून आपण केलेला नियम थोडा सुधारूं व त्यास नियम १ असें ह्मणूं.

नियम १.—शुक्र किंवा मंगळ हे जर जन्मकालच्या स्त्रीराशींतल्या चंद्राजवळ अगर त्याच्या समोर असतील तर तो स्त्रीगर्भ असला पाहिजे.

आज इतकेंच पुरे. पुढील अंकीं याचा आणखी विस्तृत विचार करूं.

कुंडलीविज्ञान

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥
' भवभूति : ,

पुस्तक ७ वें.] कार्त्तिक कृ. २, गुरुवार [अंक २५।२६

जन्मकालाचा गर्भकालाशीं संबंध

नं २

कुंडलीविज्ञान पु० ४ अं. ३ '**जन्मलग्नाचे अंश शुद्ध करण्याची रीति**' या मथळ्याखालीं एक लेख प्रसिद्ध झाला आहे. या लेखाचा आज विचार करावयाचा आहे ह्मणून तो लेख या ठिकाणीं प्रथमतः देतों.–

"या रीति इंग्रजी पुस्तकावरून घेतलेल्या असल्यामुळें प्रथम आपल्या तिथीवरून तारीख तयार करावी लागते. या रीतीचें मूळतत्व एकच आहे. तें हें कीं जन्मलग्नाचे अंश कलादि आधानकाळीं या चंद्राच्या अंशादिकांबरोबर असतात. मात्र आधानकाल काढण्याचे मार्ग निरनिराळे आहेत, ते येणेप्रमाणें.–

मार्ग १ ला.

जन्ममास	आधानमास	जन्ममास	आधानमास
जानेवारी	एप्रिल	जुलई	अकटंबर
फेब्रुवारी	मे	आगष्ट	नवंबर
मार्च्य	जून	सपटंबर	डिसेंबर
एप्रिल	जुलई	अकटंबर	जानेवारी
मे	आगष्ट	नवंबर	फेब्रुवारी
जून	सपटंबर	डिसेंबर	मार्च्य

जन्ममास					जन्ममास				
चंद्र दृश्यगोलार्धी असल्यास सप्तम भावापासून	फेब्रुवारी	जाने. डिसें.	एप्रिल सप्.	बाकीचे महिने	चंद्र अदृश्य गोलार्धी असल्यास सप्तम भावापासून	फेब्रुवारी	जाने. डिसें.	एप्रिल–सप्.	बाकीचे महिने.
चंद्राचें अंतर	+	+	+	+	चंद्राचें अंतर	+	+	+	—
रा. अं.					रा. अं.				
६ ०	०	१	२	३	० ०	२३	१	१	०
५ १७	१	२	३	४	० १३	२२	१	०	१
५ ४	२	३	४	५	० २६	२१	०	१	२
४ २१	३	४	५	६	१ ९	२०	१	२	३
४ ९	४	५	६	७	१ २२	१९	२	३	४
३ २६	५	६	७	८	२ ५	१८	३	४	५
३ १३	६	७	८	९	२ १८	१७	४	५	६
३ ०	७	८	९	१०	३ २	१६	५	६	७
२ १७	८	९	१०	११	३ १५	१५	६	७	८
२ ४	९	१०	११	१२	३ २८	१४	७	८	९
१ २१	१०	११	१२	१३	४ ११	१३	८	९	१०
१ ८	११	१२	१३	१४	४ २४	१२	९	१०	११
० २६	१२	१३	१४	१५	५ ७	११	१०	११	१२
० १३	१३	१४	१५	१६	५ २०	१०	११	१२	१३
० ०	१४	१५	१६	१७	६ ०	९	१२	१३	१४

आधानमासामध्यें जन्मतारखेइतकी तारीख घ्यावी. नंतर वरील कोष्टकावरून चंद्राच्या अंतरासमोर व जन्ममासाखालीं जो आंकडा असेल तो घेऊन खुणेप्रमाणें आधानकालाची नक्की तारीख झाली. त्या तारखेचा जन्म झाल्यावेळचा स्पष्ट चंद्र करावा. त्याचे अंशइतकें खरें लग्न समजावें. लीप वर्ष असेल तेव्हां एक दिवस अधिक धरावा.

मार्ग २ रा.

चंद्राचें अंतर		दृश्य गोलार्धी	अदृश्य गोलार्धी
रा.	अं.		
०	०	२५८	२७२
०	१२	२५९	२७४
०	२४	२६०	२७५
१	६	२६१	२७६
१	१८	२६२	२७७
२	०	२६३	२७८
२	१२	२६४	२७९
२	२४	२६५	२८०
३	६	२६६	२८१
३	१८	२६७	२८२
४	०	२६८	२८३
४	१२	२६९	२८४
४	२४	२७०	२८५
५	६	२७१	२८६
५	१८	२७२	२८७
६	०	२७३	२८८

मागील रीतीप्रमाणेंच जन्मलग्नकुंडलीमध्यें चंद्र दृश्य किंवा अदृश्य गोलार्धी असेल त्याप्रमाणें सप्तमभावापासून त्याचे अंतर काढावें. व तें या कोष्टकांतील कोणत्या अंकापेक्षां अधिक आहे तें पाहीं. नंतर त्याचे मागील कोष्टकांतील राशि अंशांचा आंकडा त्या अंतरांत वजा द्यावा. अंतर अंशकलादि येईल. त्याचे २४ कलाकृत १२ अंश ह्या हिशोबानें

तास व मिनिटें करावीं. नंतर वजा दिलेले अंतरासमोर व चंद्राच्या स्थितीच्या (दृश्य किंवा अदृश्य) खालीं आंकडा इतके दिवस हिशेबानें आलेल्या तासमिनिटांनीं जकालापूर्वी आत्ध नकाल. त्या वेळच्या स्पष्ट चंद्राइतकें अंशकलादि लग्न झालें.

मार्ग २ रा

निमय १— जन्मकालीं शुक्लपक्ष असून चंद्र दृश्य गोलार्धी असला किंवा कृष्णपक्ष असून अदृश्य गोलार्धी असला, तर गर्भीत राहण्याचा वेळ ९ महिन्यांपेक्षां [इंग्रजी महिन्यांपेक्षां] कमी असतो.

नियम २— शुक्लपक्षीं जन्म असून चंद्र अदृश्य गोलार्धी असला किंवा कृष्णपक्षीं दृश्य गोलार्धी असला, तर गर्भीत राहण्याचा वेळ ९ महिन्यांपेक्षां अधिक असतो.

नियम ३— शुक्लपक्षीं जन्म असला तर आधान कालचा चंद्र जन्मलग्नाच्या राशीला असेल आणि आधानकालीं जन्मकालींच्या चंद्रा इतकें लग्न असेल.

नियम ४— कृष्णपक्षीं जन्म असल्यास आधानकालीचा चंद्र जन्मवेळेच्या सप्तम भावाच्या राशीला असेल आणि आधानकालीं जन्मकालींच्या चंद्रातुल्य सप्तम भाव असेल.

जन्ममासांत ९ महिने वजा करावे. येईल त्या महिन्यांत जन्म तारखे इतकीच तारीख हा आधानकालचा कुमाराच्च दिवस झाला. नंतर नियम १ किंवा २ प्रमाणें गर्भीत राहण्याचाकाल ९ महिन्यांपेक्षां कमी किंवा जास्त असेल त्याच्या अनुरोधानें सुमारच्या तारखेच्या मागें अथवा पुढें नियम ३ अथवा ४ प्रमाणें, चंद्राची ठरलेली रास असेल तो दिवस नक्की झाला. व त्या दिवशीं नियम ३ अथवा ४ प्रमाणें ठरलेलें लग्न किंवा सप्तम भाव असेल ती आधानाची नक्की वेळ समजावी. त्या वेळच्या स्पष्ट. चंद्राइतकें अंशादिक खरें लग्न.

हे तीन मार्ग जन्मलग्न खरें करण्याचे आहेत. या मार्गांनीं जन्मलग्नाचे अंश खरे करितां येतात. लग्न खरें करितां येत नाहीं. जर जन्मलग्न टाईम बरोबर घेऊन तयार केलेल असेल तर या मार्गांचा कांहीं उपयोग नाहीं. उलट जर या मार्गांनीं त्याचे अंश निराळेच येऊं लागले तर हे मार्ग फुकट आहेत हें उघड आहे. यासाठीं प्रथम या मार्गांनीं जन्मलग्नाचे अंश खरे कसे होतात, हें उदाहरण घेऊन पाहिलें पाहिजे. या वर्षाच्या २४ व्या अंकांत आईबापांच्या कुंडल्या दिलेल्या उदाहरणांत 'या गृहस्थांची पत्नी सांप्रत गरोदर आहे. गर्भकाल फेब्रुवारी १९०७ मध्यें येतो. त्या वेळीं शुक्र मकर राशींत आहे, म्हणून मुलगी व्हावी वगैरे' जो मजकूर प्रसिद्ध केला आहे, तो पहा—यांची पत्नी सोमवार ता. ११ नवंबर १९०७ रोजीं स्टँ. टा. १० वाजून ५० मि. नीं प्रसूत होऊन मुलगा झाला ! याच मुलाची कुंडली उदाहरणार्थ घेऊं. या वेळची सायन कुंडली—



लग्नाचे अंश. १२ अं १७ क. चंद्राचे अंश २७ अं. २७क. चंद्र अदृश्य गोलार्धी आहे. प्रथम मार्ग १ प्रमाणें पाहूं—जन्ममास नवंबर म्हणून आधानमास फेब्रुवारी आहे. या आधानमासामध्यें जन्म तारखे इतकी तारीख ११ ही घेतली. चंद्र इतकी ९–२७–२७– लग्न ९–१२–१७ अंतर १५ अं. १० क. म्हणून ० रा १३ अं. समोर बाकीचे महिने या सदराखालीं १ अंक आहे, तो वरील तारखेंत ऋण केला. तेव्हां ता. १० ही आधानकालाची तारीख नक्की झाली. या तारखेचा चंद्र मकर राशींत १५ अं. २० क. आहे. म्हणून जन्मलग्न ९–१५–१७ आलें पाहिजे. वेळेवरून ९–११–१७ आलें आहे. म्हणून ९–१५–१७ हें खरें लग्न झालें. हें लग्न स्टँ. ११ वाजून २।३ मिनिटांनीं सुमारें येईल वरील गृहस्थ वकील आहेत. तेव्हां

त्यांनें घड्याळ बहुधा बरोबर असलें पाहिजे. तथापि हीं खात्री त्यांची त्यांनाच. सुमारें १२ मि. ची घड्याळयांत चूक येते.

आतां दुसऱ्या मार्गाकडे वळूं. लग्नापासून चंद्राचें अंतर १५ अं. १० क. तें कोष्टकांतील ० रा. १२ अं. पेक्षां ३ अं. १० क. अधिक आहे. ह्मणून १२ अ. स २४ तास या हिशेबानें ६ ता. २० मि. आलीं. जन्मकाल—१०वाजून-५० आहे. यांत ६ ता. २० मि. वजा दिलीं. तेव्हां ४ ता. ३९ मि. हा आधानकाल आहे.

जन्मतारखेच्या पूर्वी २७४ दि. वस मोजून फेब्रुवारीची १० वी तारीख आली. ही पहिल्या मार्गाइतकीच आली. या वेळचा स्व. चं. ९।१२।२१ हा आला. जन्मलग्न ९ १२-१७ आहे. ह्मणून या रीतीनें जन्मलग्नाचे अंश ततोतत आले, यावरून घड्याळ बरोबर असलें पाहिजे असें दिसतें.

आतां तिसऱ्या मार्गाकडे वळूं.

जन्म शुक्रार्क्षीं असून चंद्र अदृश्य गोलार्धी आहे, ह्मणून नियम २ प्रमाणें गर्भांत राहण्याचा देळ ९ महिन्यांपेक्षां अधिक असतो.

शुक्रपक्षीं जन्म आहे. ह्मणून आधानकालचा चंद्र जन्मलग्नाच्या राशीला असेल आणि जन्मकालींच्या चंद्राइतकें लग्न असेल. नियम ३ प्रमाणें. आधानमास फेब्रुवारी आहे. त्यांत जन्म तारखे इतकी ११ हा तारीख घेतली. या तारखेला चंद्र कुंभेत आहे. जन्मलग्न मकर आहे. ह्मणून आधानचंद्र याच राशींत पाहिजे. आधानलग्न जन्मचंद्राइतकें ह्मणजे २७ अं. २७ क. असावयाचें ते केव्हां असेल तें पहावयाचें. ता. १० रोजीं सकाळीं ५ वाजून १४ मि. नीं व ता. ११ रोजीं ५ वाजून १० मि. नीं इतके अंश असतील. या दोन्ही दिवशीं चंद्र मकर राशींतच आहे. परंतु ११वी तारीख घेतल्यास या दिवशीं या वेळेस चंद्राचे अंश फार असल्यामुळें ता. १० च घेतली पाहिजे. ह्मणजे चंद्राचे लग्नाचे अंश मिळते येतील. ते १५ अं. २१ क. आले. ह्मणजे हे पहिल्या मार्गाजवळ आले

याप्रमाणें हे तीन मार्ग आहेत. प्रत्येक मार्गानें आधानाची तारीख एकच येते. पण अंश भिन्न येतात.

यांत ज्या गोष्टी गृहीत धरिल्या आहेत त्यांस आधार नाहीं. आपणांस या नियमांचा कांहीं उपयोग नाहीं. आपणांस आधानकाल समजला पाहिजे. नंतर त्यावरून पाहिजे तर या नियमांनीं प्रसूतिकाल काढावा. एखादी स्त्री फेब्रुवारींत गर्भवती झाली आहे पण ती कोणत्या तारखेस झाली असावी, हें निश्चित करावयाचें आहे. त्यास आजपर्यंत कोणीही मार्ग दाखविलेला नाहीं. हाच मार्ग महत्वाचा आहे याचा विचार मागील दोन अंकांत केला आहे, तोच आपणास कायम केला पाहिजे.

फेब्रुवारीच्या ६ व्या तारखेला मंगळ धनु राशीचा झाला व ७ वीला शुक्र याच राशीचा झाला. यावरून हा गर्भ ६ व्या तारखेलाच किंवा त्यापूर्वी संभवतो. पुत्रगर्भ आहे, ह्मणून मंगळ व शुक्र हे एकाच धनु पुत्रराशीत असतील किंवा शुक्र तरी धनु राशींत आहे ह्मणून गर्भकालीं ही त्याच राशींत संभवतो. [निबंध १ ला नि. २ पहा.] फेब्रुवारीच्या ७ व्या तारखेला चंद्र व मंगळ यांची सकाळी युति होती. यावरून याच युतिवर गर्भ राहिला असला पाहिजे. गर्भ युतिकालींच राहिला असला पाहिजे असें नाहीं. तो युतीच्या पूर्वीही राहूं शकेल. ६ व्या तारखेस मध्य रात्रीच्या पलीकडे चंद्रही धनु राशींत आहे. याप्रमाणें तीन ग्रह धनु राशींत असतां हा गर्भ राहिला असला पाहिजे व ह्मणूनच पुत्र प्राप्त झाला. २७९ दिवसांच्या हिशेबानें ५ वी तारीख येते. या तारखेच्याच पुढील गर्भतारीख आहे. त्या अंकांत शेवटीं असें ह्मटलें होतें कीं ' शुक्र, सिंह, तूळ, धनु, कुंभ, मेष व मिथुन या राशींवर असतां पुत्रप्राप्तिच झाली पाहिजे ' त्याचा अनुभव बरोबर मिळाला आहे.

गर्भकालावरून पुत्र होणार कीं कन्या होणार हें सांगणें बरेंच कठीण आहे, २४ व्या अंकांत जे विवेचन केलें आहे त्यावरून बरेंच बरोबर ज्ञान होईल असें वाटतें. पुरुष व त्याची स्त्री यांच्या कुंडल्यांत गर्भराशींचा मेळ तीन प्रकारांनीं असतो. ते प्रकार असे—

१ उभयतांचीं लग्नें एकच असतां

गर्भस्थानीं उभयतांचे राशि एकच असतात.

२ उभयतांचे चंद्र एकच असतां राशिकुंडलींत गर्भस्थानीं मेळाने राशि असतात.

३ जेव्हां लग्न व चंद्र यांत मेळ नसतो, तेव्हां एकाचे लग्नापासून गर्भ राशि व दुसऱ्याचे चंद्रापासूनचे गर्भराशि यांत मेळ असतो.

प्रथमतः स्त्रीपुरुषांच्या कुंडल्या या तीन प्रकारांपैकीं कोणत्या प्रकारांत मोडतात, तें पहावें. २३ व्या अंकांत ज्या आईबापांच्या कुंडल्या आहेत, त्यांत लग्नें व चंद्र भिन्न आहेत. ह्मणून त्या कुंडल्या तिसऱ्या प्रकारांत येतात. त्यांच्या कुंडल्यांत पुढें लिहिल्याप्रमाणें दोन प्रकारचे गर्भ राशि आहेत. जसें.-

१ पुरुषाचें लग्न व स्त्रीचा चंद्र यांवरून मकर, मीन, वृषभ, कर्क, कन्या व वृश्चिक हे सर्व कन्या राशि आहेत.

२ स्त्रीचें लग्न व पुरुषाचा चंद्र यांवरून कुंभ, मेष, मिथुन, सिंह, तूळ, धनु हे सर्व पुत्रराशि आहेत.

अशा प्रकारच्या जोड्यांचा गर्भकाल सांगणें फार कठीण असतें. कारण सर्वच राशि गर्भदाते ! ह्मणून अशा ठिकाणीं गर्भदिवस ठरविण्यास ज्योतिष्यास बुद्धिसामर्थ्य व व्यवहारचातुर्य बरेंच खर्च करावें लागेल. या ठिकाणीं आपणांस असा सिद्धांत आढळेल कीं, **गर्भकालीं शुक्र व मंगळ हे उभयतांच्या कुंडल्यांत गर्भस्थानीं असतात.**

असो आतांपर्यंत जें विवेचन केलें त्यावरून गर्भकाळ व प्रसूतिकाळ यांचें बरेंच जवळ जवळ बरोबर ज्ञान होईल. व हें ज्ञान अनुभवानें आणि अभ्यासानें वाढवितां येईल. यांत जर कोणास कांहीं शंका असतील तर त्या प्रसिद्ध कराव्या. ह्मणजे त्यांचें यथाशक्ति निरसन करितां येईल. इतकें सांगून आतां हा विषय पुरा करितों.

जारज जन्म.

[बृहत्पाराशरीवरून.]

तुर्यचंद्रेक्षितः खेटः शत्रुभिर्वा युतेक्षितः ॥
परेण जायते बालो निश्चितं च यथा पशुः ॥१

अर्थ.—चतुर्थ स्थानीं चंद्र असून त्यावर जो ग्रह पहात असेल तो ग्रह शत्रुग्रहानें युक्त अथवा दृष्ट असेल तर तें बालक अन्य पुरुषाच्या बीजाचें जाणावें. ज्याप्रमाणें पशुजन्म असतो त्याच प्रमाणें तोही जन्म समजावा. जसें.—



वरील कुंडलींत चंद्र हा चतुर्थ स्थानीं आहे व त्याच्यावर मंगळ पूर्ण दृष्टीनें पाहात आहे. (मंगळाची आपल्या स्थानापासून चवथ्या स्थानावर दृष्टि असते.) या मंगळावर शनीची दृष्टि असून शनि व मंगळ यांचें शत्रुत्व आहे. ह्मणून नियमाप्रमाणें हा जारज जन्म होतो. चतुर्थ स्थान हें मातृस्थान आहे, व चंद्र हा मातृकारक ग्रह आहे. त्यावर ही कल्पना बसविलेली दिसते. पण ती बरोबर नाहीं असें वाटतें. कारण, जारोत्पत्ति मातेच्या व्यभिचारानें उत्पन्न व्हावयाची ह्मणून वास्तविक चद्र किंवा चतुर्थ स्थान अथवा चतुर्थ स्थानचाच चंद्र दूषित पाहिजे. कोणताही ग्रह शत्रुगृहीं, शत्रुग्रहानें किंवा पाप

ग्रहानें युक्त अथवा शत्रु ग्रहाची किंवा पाप ग्रहाची त्याच्या वर दृष्टि असतां तो ग्रह दूषित होतो. त्याप्रमाणें या योगांत चंद्राची स्थिति पाहिजे. परंतु श्लोकांत ही स्थिति चंद्रावर दृष्टि करणाऱ्या ग्रहाची वर्णिलेली आहे! ह्मणून उपपत्तीला हा योग जुळत नाहीं.

या श्लोकाचा दुसरा असाही अर्थ होईल कीं—" चतुर्थ स्थानच्या चंद्राची ज्या ग्रहावर दृष्टि असेल तो ग्रह शत्रुग्रहानें युक्त अथवा दृष्ट असतां जारजन्म जाणावा " जसें.—



वरील कुंडलींत चंद्र चतुर्थ स्थानीं आहे व त्याची मंगळावर पूर्ण दृष्टि आहे. हा मंगळ शनीनें युक्त आहे किंवा दृष्ट आहे. ह्मणून हा जारपुत्र आहे. येथें शनि चार ठिकाणीं दाखविला आहे, याचें कारण या ग्रहाला तीन प्रकारची पूर्ण दृष्टि असते. हा ग्रह आपल्या स्थानापासून तिसऱ्या स्थानावर पाहतो ह्मणून तो अष्टमांत लिहिला आहे, सातव्या स्थानावर पाहतो ह्मणून तो चतुर्थ स्थानीं लिहिला, व दहाव्या स्थानावर पाहतो ह्मणून लग्नीं लिहिला. यां पैकीं कोणत्याही ठिकाणीं असला तरी त्याची मंगळावर दृष्टि पोंहोंचते. दशमांत तो मंगळाशीं युक्त आहे. अशा अर्थानें हा योग पाहिल्यास तो सोपपत्तिक आहे असें ठरतें. कारण, चंद्राला फक्त एकच दृष्टि आहे, ह्मणून चतुर्थस्थ चंद्राची दशमस्थ ग्रहावरच नेहमीं पूर्ण दृष्टि असावयाची. दशमावर बापाचा विचार होतो व चतुर्थावर मातेचा विचार होतो. हीं दोन्ही

स्थानें समोरासमोर आहेत. ह्मणून चंद्र ज्या ग्रहावर पहावयाचा तो दूषित नसला पाहिजे. दूषित असेल तर त्याचा जन्म बापापासून न होतां अन्य पुरुषापासून होणें शक्य आहे. ह्मणून हाच अर्थ बरोबर आहे असें समजावें. पहिला अर्थ कोणी केला असल्यास तो चुकीचा आहे असें उपपत्तीनें सिद्ध होतें.

त्रिषष्ठद्विसुताधीशो यदा लग्ने स्थितस्तदा ॥
तथापि परजातः स्याद्भृत्याद्यन्यसुतादिभिः ॥ ५

अर्थ.—३, ६, २ व ५ यांपैकीं एखाद्या स्थानाचा अधिपति जर लग्नीं असेल तर त्याचा जन्म चाकर वगैरे अन्य पुरुषापासून समजावा. जसें —



वरील कुंडलींत वृश्चिक लग्न उदित आहे. तृतीय स्थानीं मकर (१०वी) रास आहे, तिचा अधिपति शनि हा जर लग्नीं असेल किंवा षष्ठ स्थानीं मेष (१ली) रास आहे तिचा अधिपति मंगळ हा लग्नीं असेल अथवा द्वितीय स्थानीं धनु (९वी) रास आहे तिचा अधिपति गुरु हा लग्नीं असेल अथवा पंचम स्थानीं मीन (१२वी) रास आहे तिचा अधिपति गुरु लग्नीं असेल तर तो मनुष्य परजात आहे असें समजावें. असा अर्थ पाराशरीचें पुस्तक वाचणारा करील, पण तो अर्थ चुकीचा आहे. श्लोकांत पहिलें पद एकवचनी आहे तें बहुवचनी पाहिजे. ह्मणजे ' त्रिषष्ठद्विसुताधीशा '

असें पाहिजे व 'स्थितस्तदा' येथें 'स्थितास्तदा' असें पाहिजे. ह्मणजे ३, ६, २, व ५ या सर्वांचे अधिपति लग्नीं एकत्र असतील तरच हा योग होऊं शकेल एरवीं होणें शक्य नाहीं.

या योगाची उपपत्ति समजणें कठीण आहे. वरील स्थानेंही मातृस्थानाच्या मागें दोन व पुढें दोन आहेत. यांत २ रें व ६ वें हीं पित्याचीं गर्भस्थानें असून ३ रें हें पित्याचें सहावें व ५ वें हें त्याचें आठवें स्थान आहे. यावरून गर्भस्थानेश सहाव्या व आठव्या स्थानांच्या स्वामीनें दूषित होऊन ते सर्व ग्रह जन्मणाराच्या तनुस्थानीं स्थित झाल्यामुळें जारजन्म झाला अशी या योगाची उपपत्ति लागते.

लग्ने क्रूरोऽस्तगः सौम्यः कर्मस्थो रविनंदनः ॥
अस्मिन्योगेच यो जातो जायते वर्णसंकरः ॥३

अर्थ.—लग्नीं पाप ग्रह असून सप्तम स्थानीं शुभ ग्रह असेल व दशमांत शनि असेल तर तो मनुष्य अन्य वर्णाच्या पुरुषापासून झाला असें समजावें. जसें.—



दशम हें पितृस्थान आहे, तें शनीनें दूषित झालें व लग्न जन्मणाराचें स्थान असून तें मंगळ या पाप ग्रहानें दूषित झालें, ह्मणून हा अन्य वर्णाच्या पुरुषापासून जन्मला असें ह्मणतां येतें. पण सप्तमांत शुभ ग्रह असण्याचें कारण समजत नाहीं. कदाचित् सप्तम हें दशमाचें दशम व चतुर्थाचें चतुर्थ स्थान असल्यामुळें तें माता व

पिता यांचें द्योतक आहे आणि त्यांतील शुभ ग्रहावर लग्नस्थ पाप ग्रहाची व शनीची पूर्ण दृष्टि झाल्यामुळें उत्पत्तींत दोष उत्पन्न झाला असें ह्मणतां येण्यासारखें आहे.

सूर्तौचेन्दुश्च दुश्चिक्ये भूमिनंदनभार्गवौ ॥
यदा पंचादशावर्णे तदापि परबालकः ॥ ४

अर्थ.—लग्नीं चंद्र असून तृतीयस्थानीं शुक्र व मंगळ एकत्र असतील तर तें मूल अन्य पुरुषाच्या बीजाचें जाणावें. जसें.—



येथें चंद्र हा मातृकारक ग्रह लग्नीं असून मंगळ नवम व दशम या पितृस्थानांवर पाहतो व शुक्र हा बीजकारक ग्रह मंगळ या पाप ग्रहानें दूषित झाला ह्मणून हा जारजन्म होतो अशी या योगाची उपपत्ति लागते. श्लोकांतील तिसऱ्या चरणाचा अर्थ लागत नाहीं. हा योग औपपत्तिक दृष्टीनें फारसा महत्वाचा होत नाहीं.

ग्रहराजस्थिते लग्ने चतुर्थे सिंहिकासुतः ॥
स्वदेवरात्सुतोत्पत्तिर्जाता तस्य न संशयः ॥ ५

अर्थ.—रवि हा तनुस्थानीं असून चतुर्थ स्थानीं राहू असेल तर त्याच्या मातेनें आपल्या दिरापासून आपल्या ठिकाणीं पुत्रोत्पत्ति करविली असें निःसंशय जाणावें.



येथें मातृस्थानीं राहु हा पाप ग्रह आहे व रवि हा पितृकारक ग्रह तनुस्थानीं आहे, ह्मणून हा जारजन्म असला पाहिजे. यांत दिरापासून उत्पत्ति असण्याचें काय कारण असावें तें कळत नाहीं. उपपत्तीच्या दृष्टीनें हाही योग महत्वाचा नाहीं.

लग्ने राहुधरापुत्रौ सप्तमे चंद्रभास्करौ ॥
नीचेन आपगे बालो यदा रात्रिभवेदपि ॥ ६

अर्थ.—लग्नीं राहु व मंगळ असून सप्तम स्थानीं रवि व चंद्र असतील तर त्याची माता नीच मनुष्याच्या ठिकाणीं रममाण होऊन प्रसवली असें समजावें. जसें.—



रवि हा पितृकारक व चंद्र हा मातृकारक ग्रह असून ते दोघेही लग्नस्थ राहु व मंगळ यांच्या दृष्टींत आहेत ह्मणून हा जारजन्म होतो. येथें मंगळ हा मातृस्थानावरही पूर्ण दृष्टीनें पाहतो.

सूर्ययुक्तेंदुलग्नस्थे सप्तमे भौमभास्करौ ॥
अस्मिन्योगे यदा जन्म परेणैवहि जायते ॥ ७

अर्थ.—लग्नीं राहु व चंद्र असून सप्तम स्थानीं मंगळ व रवि हे ग्रह असल्यास तो जारजन्म जाणावा. श्लोकांत सूर्य दोन वेळां आला आहे, तो चुकीचा आहे, ह्मणून आरंभींच्या सूर्याच्या ठिकाणीं राहू असा शब्द घ्यावा असें वाटतें.

जसें.—



येथें तनुस्थानीं चंद्र हा मातृकारक ग्रह राहूनें युक्त असून रवि हा पितृकारक ग्रह मंगळानें युक्त आहे व ते सर्व एकमेकांवर पाहत आहेत ह्मणून हा जारजन्म होतो.

केंद्रं शून्यं भवेद्यस्य सोपिजातः परेणहि ॥
द्विषष्ठाष्टमारिःफेषु ग्रहा स्तिष्ठंति यस्य सः ॥८

अर्थ.—सर्व ग्रह २।६।८।१२ या स्थानीं असून केंद्रीं एकही ग्रह नसेल तर तो परजात समजावा. जसें:—



वरील कुंडलींत फुल्या मारल्याठिकाणीं मात्र सर्व ग्रह आहेत ह्मणून हा जारजन्म होतो. औपपत्तिक दृष्टीनें हा योग महत्वाचा नाहीं.

परजातो भवेत्सत्यमन्यत्रापिच संस्थितः ॥
एकस्थाने यदास्तेशलग्नेशौ सोपिजारजः ॥ ९

अर्थ.—जेव्हां लग्नस्वामी व सप्तमाचा स्वामी हे कोठेंही एकत्र असतील तेव्हां तो जारजन्म समजावा. जसें.—



येथें कर्क लग्न असून त्याचा स्वामी चंद्र व सप्तमेश शनि हे ग्रह षष्ठ स्थानीं एकत्र आहेत ह्मणून हा जारजन्म होतो. या योगाचीही उपपत्ति चांगली लागत नाहीं.

जीवो निशाकरं लग्नं नेक्षतोपि स जारजः ॥
जीववर्गविहीनांशे तदा योगः परेणजः ॥ १०

अर्थ.—जर गुरु हा लग्नावर किंवा चंद्रावर पाहत नसेल व लग्न किंवा चंद्र गुरूच्या नवमांशीं नसेल तर तो जारजन्म समजावा. जसें.—



लग्न मिथुन राशीचें असून तें गुरूच्या नवमांशांत नाहीं. व चंद्रही तसा नाहीं. गुरु हा तृतीय स्थानीं असल्यामुळें त्याची लग्नावर किंवा चंद्रावरही दृष्टि पोंहोंचत नाहीं ह्मणून हा जारजन्म जाणावा.

द्विशत्रूचैककेंद्रस्थवन्यग्रहविवर्जितौ ॥
तदापि परजातःस्यात्स्थिरलग्ने विशेषतः ॥ ११

अर्थ.—स्थिर राशीचें लग्न असून दोन व सहा या स्थानांचे स्वामी केंद्रीं एकत्र असतील व ते इतर कोणत्याही ग्रहानें युक्त नसतील तर तो जारजन्म समजावा. जसें.—



येथें सिंह हें स्थिर राशीचें लग्न असून द्वितीयेश बुध व षष्ठेश शनि हे एकत्र केंद्रीं आहेत ह्मणून हा जारजन्म समजावा. श्लोकांत द्विशत्रू असें पद आहे त्याचा अर्थ वरील प्रमाणें स्पष्ट होतोच असें नाहीं. कदाचित् दोन शत्रुग्रह केंद्रीं एकत्र असतील असाही अर्थ होऊं शकेल. कसेंही असलें तरी उपपत्तीला हा योग जुळत नाहीं, ह्मणून त्याच्या सत्यासत्यतेविषयीं कांहीं सांगतां येत नाहीं.

चतुर्थे दशमे लग्ने पापयुग् विधुसंस्थितः ॥
लग्नेशेनेक्षित लग्नं तदापि परबालकः ॥ १२

अर्थ.— चवथ्या, दहाव्या अथवा पहिल्या स्थानांत जर चंद्र हा पाप ग्रहानें युक्त असेल व लग्नावर त्याचा स्वामी पाहात नसेल तर तो जारजन्म समजावा. जसें.—



येथें वृषभ लग्न असून त्याचा स्वामी शुक्र हा अष्टमांत आहे, ह्मणून त्याची लग्नावर दृष्टि नाहीं. चंद्र हा मंगळानें किंवा अन्य पाप ग्रहानें युक्त असा कुंडलींत दाखविलेल्या ठिकाणांपैकीं कोठें तरी एका स्थानीं आहे, ह्मणून हा जारजन्म होतो. उपपत्तीला हा योग चांगला जुळतो हें मागील विवेचनावरून ध्यानांत येईल.

लग्नेशे संस्थिते लग्ने परजातं कदाचन ॥
भंगोऽयं सर्वयोगानामिति ते कथितं मया ॥ १३

अर्थ.—लग्नस्वामी जर लग्नीं असेल तर तो परजात समजूं नये. कोणताही जारजन्मयोग लग्नस्वामी लग्नीं असतां होत नाहीं.

(बृ. पा. पृ. १०० वरून)

सुतेशे नरराशिस्थे राहुणा सहितः शशी ॥
पुत्रस्थानगते मंदे परजातं वदेच्छुभम् ॥ १

अर्थ.—पंचमाचा स्वामी पुरुष राशीला असून चंद्र हा राहूनें युक्त असेल व पंचम स्थानीं शनि असेल तर त्या मनुष्याला होणारा पुत्र जारज समजावा.

सुतेशे राहुसंयुक्ते सुतस्थानं समाश्रितं ॥
न वीक्षेच्चंद्रगुरुणा परजातो भवेन्नरः ॥ २

अर्थ.—पंचमाचा स्वामी हा राहूनें युक्त असा पंचमांत असेल व चंद्रावर गुरूची दृष्टि नसेल तर त्याला होणारा पुत्र जारज समजावा.

लग्नाद्द्वादशगे चंद्रे लग्नादष्टमगो गुरुः ॥ ३
पापयुक्तेन संदृष्टे अन्यबीजं न संशयः ॥

अर्थ.—बाराव्या स्थानीं चंद्र व आठव्या स्थानीं गुरु असून तो पाप ग्रहानें युक्त अथवा दृष्ट असेल तर तो जारजन्म होतो.

वरील पहिल्या दोन श्लोकांतील योग पुढें होणाऱ्या संततीचे असावे असें समजून तसाच अर्थ दिला आहे. कारण त्यांत पंचम स्थानाचा संबंध विशेष आहे. या स्थानावर संततीचा विचार करितात. ग्रंथकर्त्यानेंही हे श्लोक पंचम भावफलांत दिले आहेत. परंतु तिसरा श्लोक जन्मणाराचाच अनुलक्षून असावा असें वाटतें. कारण, त्यांत सुतस्थाना संबंधें कांहींच उल्लेख नाहीं.

हे सर्व योग खरे आहेत अशी प्रत्यक्ष अनुभवानें खात्री करून घेतल्याशिवांचून ते कोणीही विश्वसनीय मानूं नये.

धर्मसंबंधानें धनाचा व्यय.

लग्नेशे व्ययराशिस्थे व्ययेशे लग्नसंयुते ॥
भृगुपुत्रेण संयुक्तें धर्ममूलाद्धनव्ययम् ॥ १

अर्थ.—लग्नाचा स्वामी व्ययस्थानीं व व्ययाचा स्वामी लग्नीं शुक्रानें युक्त असेल तर धर्मसंबंधानें धन खर्च होतें. जसें.—



धर्मसंबंधाचा विचार नवम स्थानावर होतो, व व्ययाचा विचार १२ व्या स्थानावर होतो. ह्मणून उपपत्तीच्या दृष्टीनें विचार केल्यास शुक्र हा नवमाचा स्वामी असला पाहिजे. फुली मारलेलें स्थान हें नवम (९वें) स्थान आहे. या स्थानांत वृषभ (२री) अगर तूळ (७वी) रास असेल तेव्हा नवमस्वामी शुक्र असेल. वृषभ रास असल्यास व्ययस्थानीं सिंह व लग्नीं कन्या रास येते. सिंह राशीचा स्वामी रवि हा लग्नीं व कन्येचा स्वामी बुध हा व्ययस्थानीं असे हे ग्रह बसतात. व्ययस्थानीं शुभ ग्रह असेल तरच सत्कारणीं द्रव्याचा व्यय होणें शक्य आहे. ह्मणून हा योग कन्या लग्नावरच होऊं शकतो. नवम स्थानीं तूळ रास कल्पिल्यास व्ययस्थानीं मकर व लग्नीं कुंभ राशि येतो. या दोहोंचाही स्वामी शनि हा एकच असल्यामुळें हा योग कुंभ लग्नीं होत नाहीं हें उघड आहे. या संबंधानें विचार करितां खालील गोष्टी सुचतात.

१ लग्नस्वामी शुभ ग्रह असून तो व्यय स्थानीं व नवमाचा स्वामी शुभ ग्रह असून तो लग्नीं व्ययस्वामीनें युक्त असा असेल तरीही धर्मसंबंधानें धनाचा व्यय होईल.

२ व्ययस्वामी लग्नीं असून लग्नस्वामी हा नवमाधिपानें युक्त असा व्ययस्थानीं असेल तर धर्मसंबंधानें व्यय होईल.

३ लग्न, व्यय व धर्म या तिघांचे स्वामी लग्नीं अगर व्ययस्थानीं असतील तर धर्माच्या संबंधानें व्यय होईल.

४ धर्मेश व्ययस्थानीं, व्ययेश लग्नीं व लग्नेश धर्मस्थानीं असतांही धार्मिक व्यय होईल.

याप्रमाणें वरील एका योगावरून हे चार योग सुचतात व ते उपपत्तीच्या दृष्टीनें अगदीं बरोबर आहेत.

लाभे जीवे धने शुक्रे तदीशे शुभसंयुते ॥
व्यये शुभग्रहयुते धर्ममूलाद्धनव्ययं ॥ २

अर्थ.—लाभ स्थानीं गुरु, धनस्थानीं शुक्र व धनेश शुभ ग्रहानें युक्त असून व्यय स्थानीं शुभ ग्रह असेल तर धर्मसंबंधानें धनाचा व्यय होतो. जसें.—



यांत व्यय स्थानीं चंद्र अथवा बुध असेल. कारण एकंदर शुभ ग्रह चारच आहेत. शुक्र ज्या स्थानांत लिहिला आहे तें धन स्थान होय. त्याचा स्वामी शुभ ग्रहानें (चंद्रानें अथवा बुधानें) युक्त असला पाहिजे असें श्लोकांत सांगितलें आहे पण तो कोणत्या ठिकाणीं पाहिजे हें सांगितलेलें नाहीं. आमच्या मतें तो धर्मस्थानीं असावा.

हा एक दुसऱ्या प्रकारचा योग आहे. यांत धन, व्यय व लाभ या तीनही ठिकाणीं शुभ ग्रह आहेत. यांत लग्नस्वामी व व्ययस्वामी हे कोणत्या स्थितींत पाहिजेत हें सांगितलेलें नाहीं, ह्मणून उपपत्तीच्या दृष्टीनें हा योग बरोबर नाहीं असें वाटतें. धर्मसंबंधानेंच धनाचा व्यय कां व्हावा, याचें समर्पक उत्तर देतां येत नाहीं. ह्मणून हा योग विश्वसनीय नाहीं.

मृत्युकालाचा जन्मकालाशीं संबंध

—:o:—

जन्म—शक १८२२ वैशाख शु. ०१३ शनिवार सू. नं. ९६।४३



ही एका मुलीची कुंडली आहे. हिचा मृत्यु ता० १ फेब्रूवारी १९१० रात्रीं ११॥ स्टँ.टा.ला झाला. आजारी ता० १७ जानेवारी १९१० सोमवार सायंकाळीं ७ वाजतां ताप आला. ताप मुदतीचा असून शेवटल्या दिवशीं १०६ होता! मरणापूर्वी दोन दिवस बेशुद्ध होती.

गुण- अशक्त, मितरी, बोलणें हळू, झोंप कमी. नेत्र काळे व त्यांस त्रास कमी. ५ वर्षेपर्यंत अशक्त.

मरणाच्या वेळची कुंडली



पूर्व केंद्रांत ग्रह व राशि यांचे उदय होतात व अस्तकेंद्रांत ते मावळतात. हाच नियम कोणत्याही उत्पत्तीला कां लागू होऊं नये? कोणत्याही प्राण्याच्या., वनस्पतीच्या अगर संस्थेच्या जन्मसमयीं पूर्व-केंद्रांत जो राशि अथवा जो ग्रह उदित असेल त्याच्या सप्तम राशींत त्या प्राण्याचा, वनस्पतीचा अगर संस्थेचा लय झाला पाहिजे. वरील जन्मकुंडलींत मेष राशीचे ८अंश. २१कला उदित असुन या राशींत मंगळ २६ अंशा आहे. ह्मणुन मृत्युकुंडलींत यांचा सप्तम बिंदु उदित असला पाहिजे असा शास्त्रीय नियम ठरतो. येथें सप्तम बिंदु २३ अंशांत उदित आहे,ह्मणुन येथें शास्त्रीय अनुमान खरें ठरतें. मृत्युकालचे लग्नाचे अंश २३आहेत.वास्तविक ८ किंवा मंगळा इतके २६अंश उदित झाले पाहिजेत. यावरून दोन अनुमानें निघतात. १ले जन्मलग्नाचे अंश तरी २३असले पाहिजेत किंवा मृत्युलग्नांत. सुमारें ३ अंशांची चूक असली पाहिजे. या दोन्ही गोष्टी संभवतात. तीन अंशांचा फरक सुमारें ९ मि.नीं पडेल व तो संभवनीय आहे.

जन्मासारख्या आनंदोत्सवाच्या प्रसंगीं जर कोणी घड्याळ घेऊन बसत नाहीं,तर मृत्यूच्या भयानक व दुःखकारक प्रसंगीं किती वाजले हें जाणण्याची स्मृति कोणा पाषाणहृदयी मनुष्यांत असेल? शास्त्रीय शोधक मनुष्या खेरीज दुसऱ्या कोणाचेंहीं काम नाहीं. हा मनुष्य रोग्याच्या जवळ घड्याळ लावून बसला असेल असें ह्मणता येत नाहीं. व निराशा झाल्या शिवाय रोगी मरण पावला असें मानीत नाहींत.तेव्हां मृत्युकालांत थोडी बहुत चूक पडणारच या मुळीचा मृत्युकाल बराच सूक्ष्म आहे असें शोधकाच्या तत्परतेवरून वाटतें. ह्मणुन मृत्यु लग्नाचे अंश जन्मकालच्या मंगळा इतके २६ अंश च असले पाहिजेत. जन्मकालचा मंगळ कृत्तिकेंत आरंभींच आहे,ह्मणुन याच ग्रहाच्या दोषानें मृत्यु झाला! मृत्युलग्नाचे खोखरच २३ अंश असतील तर तितकेच अंश लग्नाचे असतील असें मानण्यास हरकत नाहीं. तथापि येथें मंगळ प्रबळ असल्यामुळें त्याच्या अशा इतकेंच मृत्युलग्न असेल हें जास्त संभवनीय आहे.

केवळ जन्मकुंडलीवरून आयुष्य निश्चित होणार नाहीं. या ह्मणण्याचा अनुभव येथें स्पष्ट आहे.आयुष्य शोधून काढण्यास नातलगाच्या कुंडल्या पुढें धरिल्या पाहिजेत. या साठीं हिच्या पाठीवरील भाऊ व हिच्या पूर्वीची बहीण अशा उभयतांच्या कुंडल्या पुढें धरून काय बोध होतो, तो पाहूं.

पूर्वीची बहीण — पाठीवरचा भाऊ

जन्म-१८२०भा.कृ.१०श.सू.नं.३३।१५ जन्म-१८२३श्रा.कृ.७प.सू.नं.२।३५

सायन — सायन





ल–मेष६ गु–तूळ१३	ल–कन्या२३ गु–मकर३
र–कन्या१७ शु–वृश्चिक३	रवि–कन्या १२ शु–तूळ१९
चं–कर्क१४ श–धनु६	चं–मिथुन५ श–मकर९ व
मं–कर्क४ रा–मकर५	मं–वृश्चिक२ रा–वृश्चिक१६
बु–कन्या९ ह–वृश्चिक२९	बु–कन्या२० ह–धनु१२

पूर्वीच्या बहिणीच्या तृतीय स्थानीं नेपच्यून हा पाप ग्रह असून समोर धनु राशींत शनि आहे. हा योग तिच्या पाठीवरील संततीला अल्पायु करणारा झाला आहे. व पाठीवरील भावाच्या तृतीय स्थानीं हर्शल आहे, तो त्याच्या वडील संततीला मारक झाला. मंगळ आणि राहू हे भावचलितांत तृतीय स्थानीं बसत नाहींत. लग्नाच्या अंशांत ५।६ अंशांची चूक असल्यास राहू तृतीय स्थानीं बसेल. यावरून ही मुलगी अल्पायु कां व्हावी याचा उलगडा होतो. हा उलगडा तिच्या कुंडलीवरून होत नाहीं.

एखाद्याच्या कुंडलीवरून त्याचा आजारीपणाचा काल जितका बरोबर कळेल तितका मृत्यूचा कळणार नाहीं, ही गोष्ट अद्यापि पुष्कळांच्या ध्यानांत येत नाहीं. ते एकाच कुंडलीवरून मृत्यू शोधण्याचा व्यर्थ खटाटोप करितात. मृत्यू निश्चित करण्यास पुष्कळ साहित्यें गोळा करावीं लागतील. नंतर पुष्कळ विचार करून एखाद्या कुंडलींत तो बरोबर सांगतां आल्यास नकळे! आयुष्याची मर्यादा, मृत्यूचें वर्ष, महिना, तिथि व वेळ इतकें जाणण्याची शक्ति केवळ ज्योतिःशास्त्राच्या आधारानें ज्या दिवशीं मनुष्यामध्यें येईल त्या दिवशी जगाचें रूपांतर झाल्याशिवाय राहणार नाहीं. पण हा प्रयत्न व्यर्थ आहे असें वाटतें. कदाचित् मर्यादा समजली तरी आमचें भाग्य असें आहीं समजूं.

अकस्मात् मृत्यु.

कित्येक माणसांस अकस्मात् मृत्यु येतात, याचें कारण काय असावें, याचा आपण विचार करूं. आपणास माहीत आहे कीं, हर्शल हा अकस्मात्पणा उत्पन्न करितो. म्हणून ज्यांचे अकस्मात् मृत्यु होतात त्यांच्या कुंडलींत हा ग्रह कोणत्या स्थितींत असतो हें पाहिलें पाहिजे. मृत्यु कोणत्याही कारणानें येवो, पण त्या माणसाची स्थिति "काल होता आणि आज नाहीं" किंवा "सकाळीं होता आणि संध्याकाळीं नाहीं" अशी असते हा धर्म उत्पन्न करणारा ग्रह हर्शल आहे. अशा माणसांच्या कुंडल्या पाहिल्यास त्यांत हा ग्रह लग्नीं, चंद्राजवळ, अथवा लग्नचंद्रांच्या अष्टम स्थानीं असतो असा अनुभव आहे. एका मनुष्याच्या कुंडलींत अष्टम स्थानीं मीन राशींत हर्शल होता. तर तो गृहस्थ सकाळीं एक दोन जुलाब होऊन तात्कडतोब मरण पावला त्या वेळीं ही वार्ता ऐकून कित्येक म्हणाले कीं—खोटी गोष्ट आहे, अहो, तो आणि आम्हीं रात्रीं २ वाजेपर्यंत तंबोरा तबला लावून गात बसलों होतों! दुसरे कित्येक म्हणाले कीं—अहो आतां एक तासापूर्वी मी त्यास प्रत्यक्ष पाहिलें आहे! एक गृहस्थ जेवण झाल्यावर सुपारी खात असतां ठसका लागून मेला, दुसरा एक जण सरकारी नोकर होता, तो लिहीत असतां एकदम आडवा पडून मरण पावला! या सर्वांच्या कुंडलींत अष्टमांत हर्शल होता. कालरा, प्लेग, हार्टडिसीज विषप्रयोग, अपघात किंवा आत्महत्या आणि खून या सर्व प्रकारांनीं मनुष्यास अकस्मात् मृत्यु येतात, व या मृत्यूंचा दर्शक हर्शल असून तो लग्नीं, चंद्राजवळ किंवा लग्नचंद्राच्या अष्टमांत असतो. हा ग्रह जर रवि, मंगळ व शनि आणि क्षीण चंद्र यांनीं दूषित असेल तर मरण फारच अल्पावधींत येतें. फांशी जाणारांनाही हाच योग असला

पाहिजे नुसता हर्शल असेल तरी मृत्यु ताबडतोब येतो, पण मनुष्य १।२ दिवस तरी आजारी असतो. फार काल खितपत पडावें लागत नाहीं. रविहर्शल, मंगळहर्शल किंवा शनि हर्शल यांचे योग, लग्नांत, चंद्राजवळ किंवा लग्नचंद्राच्या अष्टमांत असणें अकस्मात् मृत्यूचें दर्शक आहे.

ज्यांच्या कुटुंब स्थानीं हर्शल असतो त्यांच्या कुटुंबांत असे अकस्मात् मृत्यु फार होतात, किंवा तो जर फार दुष्ट स्थितींत असला तर सर्व माणसांचे मृत्यु एकाच काळीं होतात. काल-ऱ्यानें किंवा प्लेगनें जेव्हां घरेंच्या घरें बसलेलीं दिसतात, तेव्हां तसल्या माणसांच्या कुंडल्या जर आल्या दृष्टीस पडतील तर हा अनुभव आल्याशिवाय राहणार नाहीं. विशेषकरून या स्थानाला हर्शल स्त्रीला मारक असतो. जेव्हां द्वितीय स्थानीं एखाद्याच्या कुंडलींत हा ग्रह द्वितीय (कुटुंब) स्थानीं दृष्टीस पडेल त्यावेळीं " तुमच्या कुटुंबांत कांहीं किंवा एखादा तरी अकस्मात् मृत्यु झाला असला पाहिजे " असें आपण सांगितल्यास तो बहुधा नाहीं असें म्हणणार नाहीं. गर्भपात किंवा उपजतांच मृत्यु, किंवा जन्मझाल्यावर ४।६ दिवसांतच होणारे मृत्यु याच प्रकारचे आहेत.

ज्यांच्या लग्नीं हर्शल असतो त्याच्या आयुष्यांत विलक्षण गोष्टी घडतात. त्याच्या मनाचे तरंग वारंवार बदलतात, ठरवलेले विचार अकस्मात बदलतात, असला मनुष्य जर अमक्या-वेळीं अमुक काम करील असें आपण अनुमान केलें, तर तें कधींही जुळावयाचें नाहीं. तो मनुष्य कितीही सात्विक असला तरी त्याचें बोलण्याप्रमाणें आचरण होणें अशक्य असतें. आज येथें तर उद्यां दिल्लीस अशा प्रकारचें त्याचें वर्तन असतें. असली माणसें भरंवशानें एखादें काम करितील अशी आशा करणें व्यर्थ आहे

चतुर्थ किंवा दशम केंद्रावर हर्शल असेल तर आई किंवा बाप यांचे मृत्यु अल्पकाळांत अकस्मात् होतात. तो जर रवीनें अगर चंद्रानें युक्त असेल तर आई व बाप यांचे मृत्यु फारच थोड्या फरकानें होतात. विशेषेंकरून हर्शल एका केंद्रावर असून दुसऱ्या केंद्रावर शनिचंद्र किंवा रविशनि किंवा शनिमंगळ असा योग असेल तर निश्चयानें आईबापांचे मृत्यु एकाच काळीं व्हावयाचे. याप्रमाणें कित्येक ठिकाणीं चांगला अनुभव आला आहे. चंद्राच्या चतुर्थ स्थानीं हर्शल असेल तर माता अल्पावधींत अकस्मात मृत्यु पावेल. चंद्राच्या नवमांत अगर दशमांत शनि असून लग्नाच्या दशमांत हर्शल असेल तर बापाचा अल्पावधींत अकस्मात् मृत्यु होण्याचा विशेष संभव असतो. जन्मकाळीं जर हर्शल नवमांत असेल, तर सात वर्षांच्या आंत पितरांपैकीं कोणाचा तरी मृत्यु संभवतो. मातृत्रयी व पितृत्रयी यांस पितरें म्हणावें.

सप्तम केंद्रावर हर्शल असेल तर लग्नें जुळलेलीं मोडतात, लग्नांत अनेक विघ्नें येतात व स्त्रीचा मृत्यु अकस्मात् होतो. बायकोला पिशाच्च बाधा असते, किंवा तिला फिट्स येतात, किंवा तिला नवऱ्यानें टाकून दिलेली असते. तो मनुष्य नेहमीं प्रवास करितो. त्याची बायको अस्थिर बुद्धिची असते. सप्तमांत व कुटुंबांत हर्शल व इतर पाप ग्रह असतां अशा गोष्टी निश्चयानें घडतात.

पंचमांत हर्शल असेल तर मुलांपैकीं कांहींचे किंवा एखाद्याचा तरी अकस्मात् मृत्यु होतो, किंवा गर्भपात होतात. मुलांस पिशाच्चबाधा होते किंवा झटक्याचे विकार होतात. तीं अस्थिर बुद्धीचीं होतात. सारांश, अशा प्रकारचा कोणता तरी परिणाम घडतो. असाच परिणाम एकादश स्थानच्या हर्शलाचाही घडतो एकादश स्थान हें मुलांच्या बायकांचें स्थान आहे व कित्येकांच्या

मतें मित्राचें स्थान आहे. ह्मणून एकादशस्थ हर्शलाचा परिणाम मुलांच्या बायकांवर किंवा मित्रांवरही घडतो.

सहाव्या स्थानचा हर्शल मावशा व मामा यांचे मृत्यु दर्शवितो. द्वादशस्थ मावशांचे नवरे किंवा मामांच्या बायका किंवा स्वतःचे चुलते अगर आत्या यांचे मृत्यु दर्शवितो तिसरें स्थान स्वतःच्या मावड्यांचे आहे,ह्मणून या स्थानांतील हर्शल भाऊ व बहिणी यांचे मृत्यु दर्शवितो असें समजावें.

हर्शलचें हें वरील वर्णन सामान्य आहे. प्रत्येकाच्या कुंडलींत इतर ग्रहांच्या अनुरोधानें पूर्ण विचार फरून त्याचें फल निश्चित केलें पाहिजे. नाहीं तर वेडेपणा पदरीं येईल. हर्शल हा राशिपरत्वें पाप अगर शुभ ग्रहांशीं जसा संबंध करील तसें त्याचें फल मिळेल. सांप्रतचें ज्योतिःशास्त्र विशेषेंकरून राशींवरच आहे. त्या मुळें येणारा अनुभव स्थूलमानाचा असतो. जेव्हां अंशांपर्यंत हें शास्त्र सूक्ष्म होईल तेव्हां या शास्त्राला नियंत्रित स्वरूप प्राप्त होईल.

ज्या प्रमाणें जन्मकालच्या हर्शलचें फल आहे त्याच प्रमाणें प्रत्येक भावांत तो ज्या ज्या कालमर्यादेंत असेल त्या त्या कालमर्यादेंत तो तशाच प्रकारचीं फलें उत्पन्न करील. उदाहरणार्थ—तृतीय स्थानीं हर्शल आला, ह्मणजे तेव्हां पासून ७ वर्षांच्या कालमर्यादेंत भाऊ अगर बहिणी यांचे मृत्यु होतील, व त्यांची आपणास अकस्मात् बातमी येईल, अथवा कांहीं तरी कारणानें त्यांची व आपली अकस्मात् ताटातुट होईल किंवा मनें कलुषित होतील व अकस्मात् भांडणें लागतील, तीं गर्भांतून अकस्मात् पतन पावतील अगर तीं अकस्मात् आजारी होतील किंवा संकटांत पडतील. अमुकच होईल हें ठरावणें कठीण आहे हें खरें तरी सूक्ष्म विचार केल्यास व अनुमानाची दिशा न चुकल्यास बरेंच बरोबर फल सांगतां येईल अशी खात्री वाटते.

कुंडलीविज्ञान

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यते ऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥

'भवभूति:,

पुस्तक ७वें.]आषाढ शु० १३, मंगळवार [अंक १५ वा

घोड्यानें लाथ मारिल्यामुळें मृत्यु

जन्म-ता० १६ जून १८९३ शुक्र. दि. ११ वाजून २५ मि. सायन



र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.
२	३	३	३	१	३	६	०	७
२५	२३	२१	८	१९	७	६	२५	६

या मुलाला ता० ३ मार्च १९०७ या दिवशीं घोड्यानें लाथ मारिल्यामुळें सुमारें २०।२५ मि. त त्याचा मृत्यु झाला! या दिवसाचे ग्रह.—

र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.
मी.	तू.	ध.	मी.	क.	म.	मी.	सिं.	म.
११	१८	१४	२९	१	२६	१६	०	११

शनि हा मीन राशींत २३ अं. पर्यंत जन्मस्थ चंद्राला ८ वा आहे. आठवा शनि मनुष्यास शारीरिक क्लेश देतो, हें सुप्रसिद्ध आहे. या शनीला ता. ९ मार्च्य रोजीं रवि मिळणार होता. या युतीचा परिणाम प्रकृतीवर अनिष्ट झाला पाहिजे होता. कारण, शनि षष्ठेश असून राव हा व्ययेश आहे; आणि यांचें परस्पर शत्रुत्व असल्यामुळें त्यांच्या युतीचा अनिष्ट परिणाम खात्रीनें भोगावा लागणार होता. युतींचे परिणाम बहुधा आधीं होत असतात. युति होऊन गेल्यावर क्वचित्च होतात.

तनुस्वामी बुध हा मीन राशींतून मेष राशींत अष्टमस्थानीं जन्मकालच्या शनीच्या समोर येणार होता. मेष हा मंगळाचा राशि असल्यामुळें या राशींत अष्टम [मृत्यु] स्थानीं गेलेला बुध मंगळाच्या दोषानें प्रकृतीला अपाय व्हावयाचा होता, हेंही शास्त्रानुरूप आहे.

अपघात मंगळानें होत असतो, हें कुंडलीविज्ञानच्या वाचकांस सांगितलें पाहिजे असें नाहीं. या दिवशीं मंगळ धनु राशींत चतुर्थस्थानीं आहे. चतुर्थ स्थानीं मंगळ विशेषतः धनु राशीचा वाहनांपासून भय करणारच! आमच्या वाचकांना धनु राशीचा मंगळ अपघात करण्याच्या कामांत अति प्रबळ असतो, हें अवगत आहेच. याचा अनुभव या कुंडलींत स्पष्ट येत आहे. चतुर्थ स्थानावर वाहनांचा विचार होतो. ह्मणून या कालीं घोड्यानें लाथ मारिल्यामुळें अपघात झाला.

या दिवशीचा चंद्र तूळ राशींत आहे. ह्मणजे जन्मकालच्या शनीच्या राशीस आहे. व तो जन्मकालच्या मंगळाच्या दृष्टींत आलेला आहे. अर्थात् चंद्र दोन पापग्रहांनीं दूषित झाला.

वरील ग्रहस्थिति शरीरास अपाय करणारी होती ह्मणूनच मृत्यु झाला.

आतां, या पेक्षां थोडा सूक्ष्म विचार करूं. जन्मकालीं हर्शल वृश्चिक या मंगळाच्या राशीस वक्री आहे. या मुलाचा जन्म कन्येच्या १६ अंशांवर झाला असल्यामुळें तो जन्मकाळीं द्वितीय स्थानीं मध्यवर्ती असून अष्टमावर पूर्ण पाहत होता हा ग्रह या दिवशीं मकर राशींत ११ अंश असल्यामुळें तो चतुर्थ स्थानाच्या अंतिम भागीं आहे. अकस्मात् मृत्यु येणें हा धर्म हर्शलचा आहे. मंगळानें चतुर्थ भावाचा आरंभ व हर्शलनें शेवट दूषित केल्या मुळें वाहना पासून अकस्मात् मृत्यु झाला!

या मुलाचे जन्मकालचे चंद्र व मंगळ हे अगदीं जवळ जवळ आहेत यांचा परिणाम अपघातानें मृत्यु हाच होणार असें एखादा अनुभविक ज्योतिषी सांगूं शकता. निदान मंगळाच्या दोषानें मृत्यु येणार असें तरी त्याला सांगतां आलेंच पाहिजे होतें.

ज्याला मंगळामुळें अशा प्रकारचें भय असेल त्यानें मंगळ धनु राशींत लग्नीं चतुर्थस्थानीं, अष्टमांत किंवा चंद्राजवळ आला असतां फार सावधगिरीनें वागावें, असा या शास्त्रापासून बोध होत नाहीं काय? पापग्रह अनिष्ट आले असतां शरीराला अपाय होणार असें समजून वागणूक ठेवणें शहाणपणाचें आहे. तसें न करितां जर अपाय झाला तर तो दोष कोणाचा? याचा वाचकांनीं विचार करावा.

बाराही राशींत शरीराची मोडतोड करण्याच्या कामांत वक्र राशींतल्या मंगळाची कमाल आहे. हा अनुभव शेंकडों ठिकाणीं घेतला आहे. मंगळाच्या खालोखाल शनीचा धर्म आहे. हा शनि जेव्हां रवीनें युक्त किंवा दृष्ट असतो, तेव्हां निश्चयानें अपघात होतो. एका कुंडलींत धनु राशींत दशमांत शनि होता व समोर चतुर्थस्थानीं रवि होता. त्या मनुष्याच्या पायावर झाड पडून करांगुलीच्या चिंधड्या उडाल्या होत्या! हें झाड तो मनुष्य १०।२० लोकांच्या मदतीनें गाडीवर चढवीत होता. या प्रमाणें धनु

राशीचें प्राबल्य आहे.

झटके

जन्म–ता. ३१ मार्च सन १९०७
दि. ११ वाजून ४० मि. टे. टा.
सायन



स्पष्ट ग्रह

	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	इ.
१	६	८	११	३	१०	११	३	९	
९	२७	२९	१८	२	२७	२०	२९	१२	

या मुलाला जन्म झाल्यावर ५ वे दिवशीं २ वाजल्या नंतर अपस्मारा सारख्या रोगानें पछाडलें. हें दुखणें २१ व्या दिवसापर्यंत विशेष होतें. त्यांत त्यास फार क्लेश झाले. २२ व्या दिवसापासून त्याची प्रकृति निरोगी होती. नंतर पुनः ता. २९ मे १९०७ दुपारचे २।२॥ वाजल्यापासून त्याच आजारानें सीक झाला. तो सुमारें १६ जून पावेतों एक सारखा आजारी होता. हल्लीं चांगला आहे. याप्रमाणें या मुलाची हकीगत आहे. आतां ह्या गोष्टींचा कुंडलीशीं कसा मेळ बसतो तो पहा.–

झटक्यांचा रोग मुख्यतः मंगळाच्या दोषानें होतो कुंडलींत मंगळ धनु राशीचा षष्ठस्थानीं आहे. धनु हा अग्निराशि असल्यामुळें या राशींत मंगळ प्रबळ असतो, षष्ठ स्थानावरें रोगाचा विचार करितात. म्हणून मंगळ हा उष्णतेचे रोग उत्पन्न करणारा झाला. झटके उत्पन्न होण्यास मंगळाला शनीची जोड लागत असते. शनि हा वातरोग उत्पन्न करितो. म्हणून शनि हा प्रबल मंगळाशीं युत असेल अगर ते एकनेकांच्या दृष्टींत असतील तर उष्णवाताचे रोग उत्पन्न व्हावयाचे हें उघड आहे. झटके हा रोग उष्णवातापासूनच होतो. एथें शनि हा मंगळाच्या चतुर्थ (पूर्ण) दृष्टींत

असून मंगळ हा ही शनीच्या दशम (पूर्ण) दृष्टींत आहे. म्हणूनच हा रोग उत्पन्न झाला हें उघड आहे.

तनुस्वामी चंद्र हा जन्मापासून ५ व्या दिवशीं षष्ठ स्थानीं धनु राशींत १२ वाजतां २५ अंश आहे. अर्थात् दोन वाजतां तो जन्मकाळच्या मंगळाजवळ गेला, तेव्हां प्रकृति बिघडली. या दिवशीं मंगळ मकर राशींत गुरु समोर येत आहे. २२ व्या दिवशीं चंद्र सिंह राशींत होता. त्या दिवशीं तो कोणत्याही प्रकारें दूषित नाहीं.

ता० २९ मे ला चंद्र १२ वाजतां वृश्चिक (मंगळाच्या क्षेत्रीं) २२ अंश आहे. ता० १६ जून पासून तो तनुस्थानीं स्वगृहीं आला. यावरून चंद्र हा वृश्चिक किंवा धनु राशीपासून कर्क किंवा सिंह राशी पर्यंत प्रकृतीला अनिष्ट होत गेला. ता० २ मेला मंगळ व हर्शल हे जवळ जवळ होते. यांचाही परिणाम तनुस्थानाला भोगावा लागला. मंगळ मीन राशींतून जाईपर्यंत अशाच प्रकारची भीति असेल. यावरून वाचकांच्या ध्यानांत झटक्याचें कारण व आजारीपणाचा काल यांची कल्पना आली असेल.

या मुलाचा जन्म कोणत्या वेळीं होईल हें जन्म होण्यापूर्वी बक्षीस दिलेल्या वर्षफलांत कळविलें होतें, तें तंतोतंत उतरलें!

मातृनिधन

१
जन्म–ता. १ आगष्ट १८८८
बुधवार दि. १० वाजतां
सायन



२
जन्म–ता. १० जुलई १८८७
रविवार दि. १०–५
सायन



पहिलीचे स्पष्ट ग्रह.

र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.
४	१	७	३	७	४	४	३	६
९	२४	५	२०	२६	१५	१०	२९	१३

दुसरीचे स्पष्ट ग्रह

र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.
३	११	२	४	६	५	३	४	६
१७	१४	२८	११	२६	३	२३	२०	८

पहिलीची हकीगत—ही एका स्त्रीची कुंडली आहे. ती ता० २५ मे १९०६ या दिवशीं रात्रीं ११–५५ स्टँ. टा. ला प्रसूत झाली व तिला मुलगा झाला. नंतर ता. ११ जून १९०६ रोजीं रात्रीं २॥ वाजतां ताप भरून २१ दिवसांनीं मयत झाली. हिचा मुलगा ता. २६ फेब्रुवारी १९०७ रोजीं निवर्तला.

दुसरीची हकीगत—ही ही त्याच स्त्रीच्या जावेची कुंडली आहे. या दोघी आतेबहिणी व मामेबहिणी होत्या. ही स्त्री ता० ५ आगष्ट १९०५ रोजीं रात्रीं १२ वाजून ४८ मि. नीं बाळंत झाली व मुलगा झाला. दुसऱ्या दिवशीं दिवसास तीं मयत झाली ! व मुलगा ता. ११ माहे आगष्ट १९०६ रोजीं रात्रीं १२ वाजण्याच्या सुमारास निवर्तला !

या दोघी स्त्रिया एकाच कुटुंबांतल्या असून एकाच वर्षांत समान स्थितींत मृत्यु पावल्यामुळें त्यांच्या कुंडल्या दिल्या आहेत.

पहिलीचा मुलगा
जन्म–ता. २५ मे १९०६
शु. रा. ११ वा. २१ मि.
सायन

दुसरीचा मुलगा
जन्म–ता. ५ आग. १९०६
रवि. रा. १२ वा. ४८



मृ. ता. २६ फे. १९०७



मृ. ता. ११ आग० १९०६
रा. १२ वाजतां

पहिल्या मुलाचा चंद्र नेपच्यून या पाप ग्रहानें युक्त असून समोर हर्शल आहे. हा योग त्याला व त्याच्या मातेला अनिष्ट झालेला आहे. कुंभ राशीच्या १५ अंशांत जन्म असल्यामुळे रवि व मंगळ हे ग्रह चतुर्थ [मातृ] स्थानीं बसतात. हा योग त्याच्या मातेला अनिष्ट झाला. मातेच्या कुंडलींत तनुस्थानीं उदित असलेला हर्शल हा तिच्या सुखस्थानीं आला आहे, व शनि षष्ठस्थानीं असून तेथून तो चंद्राला पाहत आहे. राहु एकादशस्थानीं असून तो चंद्राच्या सुखस्थानीं झाला आहे. हे योग तिला मारक झाले आहेत. म्हणून मुलाला मातेचें सुख न मिळतां तोही अल्पायु होऊन मरण पावला.

दुसऱ्या मुलाचा जन्म साडेसातींत झालेला आहे. चंद्र नवमस्थानीं असतां साडेसातींत जन्म झाल्यामुळें माता तत्काल मृत्यु पावली. जन्मकालीं शनि वक्री होता त्यामुळें तो फार अनिष्ट होता. तो स्वतःलाही मारक होता. त्याचप्रमाणें चंद्रासमोर त्याचा शत्रु जो बुध तो असून शिवाय रवि, राहु, मंगळ हे तीन ग्रह होते. म्हणून या मुलालाही

मातेचें सुख न मिळतां त्याचा अंत झाला !

मातेच्या जन्मकाळीं चंद्र मीन राशींत १४ अं. ३ क. आहे. व प्रसूतिकाळीं शनि याच राशींत १३ अं. वकी आहे. ह्मणून तिलाही साडेसाती असून हा तिच्या चंद्राजवळ आला होता. हा योग तिला मारक होता. याचवेळीं तिच्या एकादशस्थानीं सिंह राशींत अंशपरत्वें राहु, रवि मंगळ हे क्रूर ग्रह आले होते, ते तिच्या मुलाला मारक होते.

पहिलीच्या कुंडलींत एकादशस्थानीं जन्मकाळींच सिंह राशीचा [शत्रु स्थानचा] शनि आहे. तो असें सुचवितो कीं, हिला पुत्रसुख नाहीं. याच राशींत रवि आहे. तो व शनि यांत पुऱ्या एक अंशाचेंही अंतर नाहीं. ह्मणून तिला गर्भापासून भय आहे किंवा तिचा बालंतपणांत अंत आहे, असाही कल्पक ज्योतिष्याला बोध होतो. असाच योग दुसरीच्या एकादशस्थानींही आहे. फरक इतकाच कीं तिचा शनि कर्केंत आहे. व रवीपासून सुमारें ६ अंश दूर आहे. कर्क व सिंह हीं शनीचीं शत्रुस्थानें आहेत, ह्मणून तो शनीही वरील गोष्ट सुचवितो.

पहिलींत असा चमत्कार झाला आहे कीं तिचा लग्नस्वामी शुक्र हा जितक्या अंशांत आहे तितक्याच अंशांत प्रसूतिकाळीं राहू आला आहे. शनीप्रमाणेंच कर्क, सिंह हीं राहूचीं शत्रुस्थानें आहेत, ह्मणून तो तिला व तिच्या मुलाला मारक झाला ! दुसरींतही असाच चमत्कार झाला आहे. तिचा लग्नस्वामी बुध हा सिंह राशींत ११ अंश जन्मकाळीं होता. तितक्याच अंशांत प्रसूतिकाळीं राहु आला आहे ! वाचकांनीं या सर्व गोष्टींचें नीट मनन करावें, ह्मणजे या शास्त्रांतील चमत्कारांचें कौतुक वाटेल व आणखी चमत्कार पाहण्याकडे मनाची प्रवृत्ति होईल.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम् ।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥

'भवभूति'

पुस्तक ९ वें.] भाद्रपद शु० ७ मंगळवार [अंक १६ वा

अग्नीनें भाजून मरण.

[एस्. इ. रिपोर्टर हैदराबाद यांजकडून]



जन्म.—ता. २२ एप्रिल सन १८८९ रात्रीं ३वाजून १९मि.
मृत्यु.—ता. २७ नवंबर सन १९०८ दुपारीं १२वाजतां.

ही बाई ता० २४ नवंबर संध्याकाळीं जेवण करीत असतां नेसूंचें लुगडें पेटून कमरेपासून गुढग्यापर्यंत भाजून मेली. या गोष्टीचा ज्योतिःशास्त्राशीं मेळ कसा बसतो हें पहावयाचें आहे.

येथें स्थिर ताऱ्यांचा उपयोग केल्यास वरील गोष्टीचा चांगला उलगडा होतो. जन्मलग्नाचा आधिपति गुरु हा मकर राशींत नीच आहे ह्मणून तो दुर्बल आहे. हा ग्रह कॅप्रिकारनस नामक तांऱ्याजवळ आहे. या ताऱ्याचा धर्म रवि व मंगळ यांच्याप्रमाणें आहे. अर्थात् अग्नीपासून अपघात होण्याचा हा योग आहे.

सहाव्या स्थानांत शनि हा सिंह या अग्निराशींत चंद्राच्या अष्टमस्थ आहे. हा ग्रहही उत्तर असेलस व दक्षिण असेलस हे जे दोन तारे आहेत त्यांच्या जवळ आहे. या ताऱ्यांचा धर्म रवि व मंगळ यांच्या धर्माप्रमाणेंच आहे.

षष्ठस्थानीं जो सिंह राशि आहे त्या राशींतले सर्व स्थिर तारे अग्निमय दर्शवितात.

शनि य मंगळ हे एकमेकांस पूर्ण दृष्टीनें पहात आहेत. यांत मंगळाकडे लग्नाचें स्वामित्व येत आहे. कारण लग्नांत मेष राशीचे २३ अंश उदित आहेत.

मंगळ हा सेटी या ताऱ्याजवळ आहे व त्या ताऱ्याचा धर्म मंगळा प्रमाणेंच आहे.

षष्ठेश रवि हा मेषशृंगांतील ताऱ्याजवळ आहे. या ताऱ्याचा धर्म भीतिदायक व जखमा होणें असा आहे. शिवाय तो सायन कृत्तिका या अग्निदर्शक नक्षत्रविभागांत आहे.

या सर्व गोष्टींचा विचार केल्यास या बाईचा मृत्यु अकस्मात् व अग्निभयानें झाला पाहिजे असें ठरतें ! हर्शल हा अष्टम स्थानचें फल

देतो. हा ग्रह मृत्यु अकस्मात् आणणारा आहे. ज्यांच्या ज्यांच्या कुंडलींत हर्शल अष्टमांत आहे त्या सर्वांना अकस्मात् मृत्यु येण्याचा संभव आहे असें समजावें.

वरील स्थिर ताऱ्यांचा विचार सोडून दिला तरी सिंह या अग्निराशींतला षष्ठस्थ शनि हीच गोष्ट दर्शवीत आहे. हा शनि मंगळानें विलोकित असल्यामुळें त्याचा दुष्टपणा द्विगुणित झाला आहे.

ता. २७ नवंबर १९०८ या दिवशीं चंद्र व हर्शल हे दोन्ही गोल मकर राशींत असून त्यांची सकाळीं ७ वाजतां युति होती. या युतीमुळें त्याच दिवशीं तिला मरण प्राप्त झालें.

राहू हा मिथुन राशींत सुखस्थानीं आला ह्मणजे मनुष्यास दुःख भोगावयास लावतो असा सामान्य नियम आहे.

मंगळ अष्टम स्थानीं वृश्चिक राशींत जन्मस्थ रवीबरोबर समोर होता. शनि तनुस्थानीं मेष या अग्निराशींत होता. हा ग्रह चंद्राला चवथा होता ! चवथा शनि मनुष्यास अतिशय दुःख देतो हें प्रसिद्धच आहे. तनुस्थानीं अग्निराशींत चंद्राला ४था असा शनि व अष्टम स्थानीं मंगळ वृश्चिकेंत, रवि धनु या अग्निराशींत, हर्शल मकर राशींत चंद्राच्या जवळ व कुंडलींत सुखस्थानीं राहू ही ग्रहस्थिति मनुष्यास मारक होणार नाहीं, असें कोण ह्मणेल ?

ता. २४ नवंबर या दिवशीं रवि व चंद्र हे धनु या अग्निराशींत एकत्र होते. याच दिवशीं अपघात झाला. यावरून आपणास पुष्कळ गोष्टी शिकण्यासारख्या आहेत.

जन्मकाळचा चंद्र मकर राशींत २२अंश ४६ कला आहे ह्मणून दशाक्रम येणें प्रमाणें येतो.—

	चंद्र	मंगळ	राहू.
व.	०	७	२५
म.	५	५	९
दि.	३	३	३

यावरून हिचा मृत्यु राहूच्या महादशेंत झाला आहे. या दशेच्या अंतर्दशा—

राहूच्या अंतर्दशा.

रा.	गु.	श.	बु.	के.	शु.	र.	चं.	मं.
१०	१२	१९	१७	१८	२१	२२	२४	२५
१	६	४	११	११	११	१०	४	९
१५	९	१५	३	२१	२१	१५	१५	३

यांतील केतूच्या अंतर्दशेंत मृत्यु आला. या दशेचें फल.—

चौर्यत्वं मानहानिंच पुत्रनाशं पशुक्षयं ॥
सर्वोपद्रवमाप्नोति केतौ राहुदशांतरे ॥

या प्रमाणें या अंतर्दशेचें फल अनिष्ट आहे. सर्व प्रकारचे उपद्रव या अंतर्दशेंत होतात, त्याप्रमाणें मृत्यु प्राप्त झाला हें ठीकच झालें.

आणखी एका पद्धतीनें या गोष्टीचा विचार करूं. विसाव्या वर्षाचा आरंभ अष्टम स्थानावर होतो. आणि तनुस्थान हें वर्ष लग्नाचें सहावें स्थान येतें. या स्थानांत मेष या अग्निराशींत शनि आला. होता, ह्मणजे तो जन्मकाळसारखाच आला होता, मंगळ वर्षलग्नाच्या तनुस्थानीं आला व हर्शल सुखस्थानीं आला, एकंदरींत सर्व बाजूंनीं ग्रह बिघडले होते, ह्मणून मृत्यु आला असें दिसतें.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम् ।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥

'भवभूति'

पुस्तक ९ वें.] भाद्रपद व० १३ सोमवार [अंक १७ वा

यशापयश.

मनुष्याला उद्योग केलाच पाहिजे, याबद्दल वाद नाहीं. पण, केव्हां केव्हां उद्योग करूनही कार्यसिद्धि होत नाहीं हें आपण पाहतों. अशाच वेळीं मनुष्याला आपल्या दैवाचें स्मरण होतें. शाळेंत एखाद्याचा १ ला नंबर असतो, पण परिक्षेच्या वेळीं पहावें तों आपला नापास! मोठें भांडवल घालून नाक्यावर दुकान घालावें, पण अखेरीस दीवाळेंच! रूसोजपानी युद्धाच्या वेळीं सर्व जगाला वाटत होतें कीं अखेरीस विजयश्री रशियाच्याच गळ्यांत माळ घालील, पण अनुभव काय आला तो सर्वांस विदित आहेच! एखाद्या खटल्यांत पुराव्यावरून अमुक पक्षच विजयी झाला पाहिजे असें वाटत असतें पण ईश्वरी नेमानेम कांहीं निसळाच असतो! एखादा निराश्रित दरिद्री पुरुष मोठा श्रीमंत अगर राजयोगी झालेला जेव्हां पाहतो तेव्हां दैवाचें स्मरण झाल्याशिवाय राहत नाहीं. कार्यकारणांचा संबंध जोंपर्यंत

एकही अपयशाचा योग नसतां यशदायक योग ज्याच्या जन्मकाळीं तो मनुष्य मोठा भाग्यवान् समजला पाहिजे. आणि एकही यशदायक योग नसतां अपयशाचा मात्र बलवत्तर योग ज्याच्या जन्मकाळीं तो दुर्दैवी व अपयशाचा पुतळाच होय!

वर जे यशाचे योग दिले आहेत ते निश्चयात्मक फळ देणारे आहेत असें समजण्यास हरकत नाहीं. त्याशिवाय केंद्रीं असणारे ग्रहही यश देतात. पण एखाद्या महत्वाच्या कार्यांत ज्या वेळीं यश मिळतें त्यावेळीं त्या ग्रहांचा परिणाम घडलेला दिसणार नाहीं.

एखाद्या कार्याला आरंभ करितांना यशदायक वेळ पहावी हें खरें आहे, पण कार्यकर्त्या पुरुषाला जर यशदायक ग्रह आले नसतील तर वेळ उत्तम असूनही यश मिळणार नाहीं. ह्मणून प्रथम कार्यकर्त्या पुरुषाचे ग्रह पाहिले पाहिजेत व नंतर शोधून काढिली पाहिजे, कार्यकर्त्या पुरुषाची कुंडलीच नसेल तर निदान वेळ तरी चांगली पहावी. कुंडली अगर वेळ न पाहतां जो व्यवहार केला जातो तो **आंधळा** व्यवहार होय.

भलताच उद्योग कुंडली किंवा वेळ पाहून एखादा मनुष्य करील तर त्याला त्या उद्योगांत यश मिळेलं असें समजूं नये. तर तो मनुष्य तो उद्योग करण्यास पात्र असला पाहिजे. एखाद्या मनुष्याच्या मनांत आपणास गाणें शिकावें असें आलें, पण त्याला ती कला साध्य होण्यासारखी त्याच्या मेंदूची व कंठाची स्थिति नाहीं तर त्यानें यशदायक ग्रहस्थिति पाहून जरी कार्यारंभ केला तरी तो फुकट आहे! सारांश, कार्यकर्त्या पात्र पाहिजे व नंतर त्यानें यशदायक ग्रहस्थिति पाहिली पाहिजे. उत्तम जमिनींत उत्तम वेळीं धान्य पेरल्यास उत्तम उत्तम पीक येण्याचा संभव आहे, पण खडकाळ जमिनींत उत्तम वेळेवर पेरा केल्यानें काय निष्पत्ति होणार?

शनीचें भ्रमण.

सन १९१० च्या एप्रिलच्या १८ व्या तारखेपासून सन १९१२ च्या मे महिन्यापर्यंत शनीचें भ्रमण सायन कृत्तिका नक्षत्रांत होणार आहे. मेष राशीच्या २६ अं. ४० क. नंतर या नक्षत्राचा आरंभ असून वृषभ राशीच्या १० अंशांनंतर याचा शेवट आहे. राशीचक्रांतला हा भाग फार दुष्ट व कठोर आहे असा कुंडल्यांवरून अनुभव येतो. वेदामध्यें जें कृत्तिका नक्षत्राचें वर्णन आहे, तें या विभागाशीं ततोतंत जुळतें. हें अग्निनक्षत्र आहे व त्यामुळें त्याचा स्वभाव अतिशय तलख आहे. हें नक्षत्र प्रकृतिमान अति ऊष्ण ठेवितें, दांत अगर शिरोभागांतील एखादा अवयव यांतून नित्य रक्तस्राव होतो, कित्येकांना मूत्रव्याधींचाही उपद्रव असतो, घशाचे विकार याच्या पासूनच होतात. अति तापट, कठोर वाणी, अत्यंत चपळ असें याचे देहस्वभाव आहेत या नक्षत्रांत आतां शनीचें भ्रमण व्हावयाचें आहे. मेष राशीचे व याचे स्वभावसिद्ध गुण सारखेच आहेत, ह्मणून मेष राशींतील शनीचें अनिष्ट वर्णन या विभागांत जितकें चांगलें अनुभवास येईल, तितकें अश्विनी किंवा भरणी नक्षत्रविभागांत येणार नाहीं असें तात्विक दृष्टीनें ह्मणावें लागतें. सन १९०८ च्या मार्च्या ता० १९ पासून शनि अश्विनी विभागांत भ्रमण करूं लागला. व १९०९ च्या एप्रिलच्या ५ व्या तारखेपासून तो भरणींत आला आतां, १९१० च्या एप्रिलच्या १८ वीपासून कृत्तिकेत आला आहे! शनि हा वाततत्वाचा कारक ग्रह असल्यामुळें तो अग्नितत्वाशीं संयुक्त झाला असतां बिघडतो या दोन्ही तत्वांत वैरभाव आहे. त्यामुळें मोठाले अनर्थ झाल्याचें आढळून येतें. दुष्टपणाचे व निर्दयतेचें जिकडे तिकडे साम्राज्य होतें, कलह होतात, मृत्युसंख्या वाढते, फाटाफूट होते व रक्तपातही होतो. यावरून असें दिसतें कीं, शनीच्या दोषानें उत्पन्न झालेलें नष्टचर्य अद्यापि संपलें नाहीं, किंबहुना तें उग्रस्वरूपांत आलेंच नाहीं! त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट इतकीच आहे कीं, शनीच्या या स्थितींत त्याला मंगळ येऊन मिळत नाहीं!

आमच्या जुन्या मताच्या जोशांनीं या वर्षी गोलयोग आहे असें प्रसिद्ध केलें आहे. परंतु तितका तो जोरदार नाहीं, ज्याचप्रमाणें ग्रंथकारांनीं जें या योगाचें लक्षण दिलें आहे तें येथें लागू पडत नाहीं असें कुंडली-विज्ञानांत मागें लिहिलेंच आहे. परंतु शनि हा अनिष्ट विभागांत आला असल्यामुळें गोलयोगाच्या फलासारखेंच कांहींसें फल अनुभवास येण्याचा संभव आहे. यासाठी सर्वांनीं शनीची आराधना करावी.

आतां आपण भावानुक्रमानें किंचित् विचार करूं.

१ ज्यांच्या तनुभावारंभीं या विभागाचा उदय असेल, त्यांस शारीरिक व मानसिक त्रास विलक्षण भोगावा लागेल. एकही दिवस स्वस्थतेचा लाभ होणार नाहीं. तप्तता व उद्विग्नता यांनीं मनावर व शरीरावर अनिष्ट परिणाम होतील. कलह होतील, रणें माजतील, शत्रुभय होईल व सदा कष्टप्रद असे प्रवास होतील. या विभागांत जर तनुस्थानीं जन्मकाळीं रवि अगर मंगळ हे ग्रह असतील तर तो मनुष्य फार यातना भोगील असा संभव आहे.

२ ज्यांच्या धनभावारंभीं हा विभाग उदित असेल त्याला दारिद्र्य येईल, जवळची पुंजी क्षीण पावेल व प्रयत्नकरूनही संग्रह होताना मारामार पडेल. याप्रमाणें धनाची स्थिति होईल. व कुटुंबांतील मनुष्यांपासून कोणत्या ना कोणत्या तरी कारणानें दुःख व त्रास भोगावा लागेल. स्त्रीची प्रकृति नादुरुस्त राहील व किंवहुना वेळां तिच्याशीं किंवा तिच्या पायीं कुटुंबांतील माणसांशीं कलह होतील. सुग्रास अन्न मिळणार नाहीं. तोंडाचे व घशाचे विकार होतील व डोळ्यांचें पाणी कमी होईल.

३ ज्यांच्या तृतीयभावारंभीं हा विभाग उदित असेल त्यांची कठोरवृत्ति व तामसवृत्ति उद्दीपित होईल, अविचाराचीं कृत्यें होऊन पश्चात्तापची पाळी येईल. चांगलीं कर्में फारच थोडीं घडतील. भावंडांसंबंधानें (कल्हानें किंवा दुखण्याबाण्यानें) दुःख व त्रास होईल. कानांची शक्ति कमी होईल व ते उष्णवातानें सदा पीडित होतील.

४ ज्यांच्या चतुर्थभावारंभीं हा विभाग उदित असेल, ते सदा

दुःखांत व काळजींत निमग्न होतील. त्यांस अपघाताचें भय जास्त बाळगलें पाहिजे. जमीनजुमल्यांत नुकसान होईल, माता आजारी होईल, मित्र शत्रु बनतील, उत्तम वाहनें नाश पावतील. या स्थानाचा शनि दुःख व दारिद्र्य भोगावयास लावणारा आहे.

५ ज्यांच्या पंचम भावारंभीं या विभागाचा उदय असेल त्यांच्या स्त्रियांचे गर्भपात होतील अगर त्यांना गर्भस्राव होईल. मुलें दुखणाईत होतील किंवा परीक्षा नापास होतील.

६ ज्याच्या षष्ठभावारंभीं या विभागाचा उदय असेल त्यांचे मामा दुखणाईत होतील किंवा संकटांत पडतील. स्वतःवरही अनेक संकटें येतील, प्रकृति नादुरुस्त राहील, शत्रु बलवान् होतील व त्रास आणि दुःख होईल.

७ ज्यांच्या सप्तम भावारंभीं या विभागाचा उदय असेल त्यांचे कोर्टांत दावे चालतील, वादविवाद व कलह यांत पराभव होईल. प्रवासांत फार त्रास होईल. वस्तु चोरीस जातील. स्त्रीला आजार होईल. व वधूंचे विवाह जुळण्याची मारामार पडेल.

८ ज्यांच्या अष्टम भावारंभीं या विभागाचा उदय असेल ते मृत्युतुल्य उपाधि भोगतील, त्यांच्या स्त्रियाही विशेष सुरक्षित राहणार नाहींत. उद्योग धंद्यांत त्रास व कष्ट भोगावे लागतील.

९ ज्यांच्या नवम भावारंभीं या विभागाचा उदय असेल त्यांचे बाप व गुरु आजारी होतील किंवा संकटांत पडतील.

१० ज्यांच्या दशम भावारंभीं या विभागाचा उदय असेल ते अपमान पावतील. त्याच्या धंद्यांत पीच्छेहाटी होईल. सरकारच्या अधिकाऱ्यांशीं तंटे होतील व बापाला दुःख होईल.

११ ज्यांच्या एकादश भावारंभीं या विभागाचा उदय असेल त्यांच्या हातचे लाभ अंतरतील, मुलें व गर्भ यांस सुरक्षितपणा कमी असेल.

१२ ज्यांच्या द्वादश भावारंभीं या विभागाचा उदय असेल त्यांना मोठाले खर्च करण्याचा व कर्ज काढण्याचाही प्रसंग येईल.

कैद, दंड, गुप्तशत्रूंचा व ठगांचा उपद्रव व दुसरींही अनेक प्रकारचीं संकटें उभीं रहतील.

याप्रमाणें द्वादश स्थानीं या वर्षी भ्रमण करणाऱ्या शनीचें फल आहे. तात्पर्य हा शनि मनुष्यमात्राला संकटें भोगावयास लावील. जीं माणसें जन्मतःच एखाद्या गोष्टींच्या संबधानें फार नाजूक स्थितीचीं असतील तीं विशेष संकटांत पडतील, इतरांस त्यांचा अनुभव फार सूक्ष्म येईल. ज्याप्रमाणें मोडकळीस आलेल्या घराचा वादळांत किंवा मोठ्या पावसांत नाश होतो पण मजबूत घरें शाबूद असतात किंवा फारच थोडी इजा होते त्याच प्रमाणें छत्तिकेंतला शनि निरनिराळ्या माणसांस कमजास्त बाधक होईल. जन्मकाळीं हा नक्षत्रविभाग एखाद्या भावाच्या अर्धापलीकडे असेल किंवा आरंभी असून शुभ ग्रहानें युक्त असेल त्यांना हा शनि मुळींच जाचक होणार नाहीं. पण तो भावांत कोठेंही असून रविमंगळांनी किंवा हर्शलनेपच्यूनतीं युक्त असेल तर तीं मनुष्यें वर लिहिल्याप्रमाणें अतिशय दुःख व संकटें भोगतील.



३ पतिपत्नींचा मारक काल.

कुटुंब (२ रें), जाया (७ वें), कुटुंबस्वामी आणि जायास्वामी या चार गोष्टी पाप ग्रहांनीं ज्या कालीं बिघडतात, तो काल पतीला अगर पत्नीला दुखणें, संकट, वियोग अगर मृत्यु यांस कारण होतो.

एखाद्या व्यक्तीचा मृत्यु हा ती व्यक्ति आणि त्या व्यक्तीचीं आणि अगदीं जवळचीं नातलग माणसें या सर्वांच्या एकाच कालीं उत्पन्न झालेल्या अनिष्ट ग्रहस्थितीवर अवलंबून असतो. जेव्हां एकाच व्यक्तीला अनिष्ट ग्रह येतात. तेव्हां कोणाचाही मृत्यु होणें असंभवनीय आहे. अची बायको कधीं मरेल किंवा ईचा पति केव्हां मृत्यु पावेल याचा निर्णय जो कोणी ईच्याच अथवा अच्याच कुंडलीवरून करील तो अडाणी ज्योतिषी होय. पतीचा मृत्यु हा त्याची बायको व मुलें यांवर जसा अवलंबून आहे तसा स्त्रीचा मृत्यु तिचा पति व मुलें यांजवर अवलंबून असतो. ह्मणून कोणाच्याही मृत्युकाळीं सर्वांच्या कुंडल्या विचारांत घेतल्या पाहिजेत.

स्वतःच्या मृत्युकाळी व आई बापांच्या मृत्युकाळीं पाप ग्रह कसे येतात, हें कुंडलीविज्ञानाच्या वाचकांस पुन्हा सांगण्याची जरूर नाहीं. या गोष्टी विचारांत घेऊन पुढील योग पाहिल्यास पतिपत्नीचे मारक काल ठरवितां येतील. हें काम सहज होणारें नसून त्याकरितां अत्यंत श्रम घेऊन बरेच तास खर्ची घातले पाहिजेत.

पतिपत्नींस मारक योग.

१ दुसऱ्या स्थानांत पाप ग्रह किंवा त्यांची दृष्टि.

२ सातव्या स्थानांत पाप ग्रह किंवा त्यांची दृष्टि.

३ कुटुंबस्वामी पाप ग्रहानें युक्त किंवा दृष्ट.

५ जायास्वामी पाप ग्रहानें

युक्त किंवा दृष्ट.

५ कुटुंबस्वामीच्या २ ऱ्या स्थानांत पाप ग्रह किंवा त्यांची दृष्टि.

६ जायास्वामीच्या २ ऱ्या स्थानांत पाप ग्रह किंवा त्यांची दृष्टि.

७ कुटुंबस्वामीच्या ७ व्या स्थानांत पाप ग्रह किंवा त्यांची दृष्टि

८ जायास्वामीच्या ७ व्या स्थानांत पाप ग्रह किंवा त्यांची दृष्टि.

जायास्वामी व कुटुंब स्वामी हे जन्मलग्नाचे किंवा परिभ्रमणाचे किंवा दोन्ही प्रकारचेही बिघडल्याशिवाय पतीला किंवा पत्नीला कष्ट व्हावयाचे नाहींत व नातलगांच्या कुंडल्या बिघडल्याशिवाय त्यांचे मृत्यु व्हावयाचे नाहींत.

सायन.



या कुंडलींत कुटुंबस्वामी व जायास्वामी मंगळ आहे. हा ग्रह स्त्रीच्या मृत्युकालीं कुटुंब स्थानीं होता. व जन्मकालच्या मंगळाच्या कुटुंबस्थानीं मकर राशींत रवि आणि हर्शल हे दोन पाप ग्रह होते.

पत्रिका करणारांनीं हे विनाश-काल पत्रिकेंत नमूद केले पाहिजेत. मृत्युकाल सांगण्याच्या भानगडींत पडतां कामा नये. कारण, पतीच्या अगर पत्नीच्या कुंडलींत पत्नीला अगर पतीला जरी मारक योग आढळला तरी तो आईबापांच्या, भावंडांच्या, मुलांच्या अगर स्वतःच्या कुंडलींत आढळेलच असा नियम नाहीं.

फक्त पतीच्याच कुंडलींत अनिष्ट योग दिसला, तर त्याला स्त्रीसंबंधानें दुःख मात्र होईल, पण तिच्या जिवाला अपाय होणार नाहीं. त्याचप्रमाणें पत्नीला मात्र ग्रह अनिष्ट आले आहेत, पण पतीला अगर तिच्या मुलांना तसे आलेले नाहींत तर तिला लहान-सान दुखणीं मात्र येतील.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि विंपुलाच पृथ्वी॥

'भवभूति'

पुस्तक ९ वें.] माघ शु० ११, सोमवार [अंक ४ था

स्त्रीनिधन

जन्म—तारीख १४ मे सन १८७४ गुरुवार
सकाळीं ८—४६
सायन भावचलित



या कुंडलींत हर्शल कुटुंबस्थानीं सिंह राशींत आहे व या स्थानावर शनि पूर्ण दृष्टीनें पाहत आहे. ह्मणून प्रथम स्त्रीचा नाश व दुसऱ्या विवाहाचा संभव या गोष्टी निःसंशय आहेत. हा हर्शल जेव्हां सप्तमांत (जायास्थानांत) भ्रमण करूं लागेल त्या वेळीं स्त्रीचा मृत्यु व्हावयाचा हें निश्चित आहे. सप्तमांतला पाप ग्रह कुटुंबस्थानीं किंवा कुटुंबस्थानचा पाप ग्रह सप्तमांत आल्यावर स्त्रीला कष्ट व्हावयाचेच. शिवाय येथें जायास्वामी शनि आहे व तो हर्शलाच्या समोर आहे. त्यामुळें या शनीवरून हर्शल जातांना अगर हर्शलवरून शनि जातांनाही स्त्रीला कष्ट झाल्याशिवाय राहणार नाहींत. कुटुंबस्वामी रवि हा एकादशस्थानीं आहे. या रवीवरून शनि आणि हर्शल जातांनाही स्त्रीला आजारीपणा भोगावा लागेल यांत संशय नाहीं. या तीन प्रकारच्या काळीं जेव्हां स्त्रीला मृत्युकारक ग्रह येतील तेव्हां तिचा अंत झाल्याशिवाय राहणार नाहीं. केवळ याच कुंडलीवरून तिचा मृत्यु कळेल असें समजणें चुकीचें आहे. स्त्रीच्या निधनकाळीं तिला पाप ग्रह मारक असून तिच्या पतीच्या कुंडलींत ते स्त्रीला कष्टदर्शक व मुलांच्या कुंडलींत त्यांच्या मातेला कष्टदर्शक असावयाचेच. ह्मणून निधनकाल या सर्वांच्या मेळानें पाहिला पाहिजे.

सन १९०७ च्या आरंभापासून हर्शल सप्तमांत भ्रमण करूं लागला. यावरून सन १९०७ ते १९१४ पर्यंतचा काल स्त्रीला मारक आहे असें आपण अनुमान बांधूं शकूं. हर्शल एका राशीवर ७ वर्षें असतो, ह्मणून १९१४ पर्यंत त्याची सप्तमांतली कारकीर्द आहे. या कारकीर्दीत तो स्त्रीला मारक होऊं शकेल.

परंतु हर्शलवरच हें निधन अवलंबून नाहीं. जायास्वामी शनि आहे, तोही अनिष्ट पाहिजे. हा ग्रह १९०८ च्या एप्रिलपासून १९१० च्या

जूनपर्यंत मेष राशींत दुर्बल आहे. मेष राशींत शनि नीच असतो व त्याचा मारकगुणही तेथें प्रबळ असतो. ह्मणून मेषस्थ कारकीर्दीत तो स्त्रीला अनिष्ट आहे असें मानिलें पाहिजे. शिवाय याच राशींत जन्मकाळीं चंद्र असल्यामुळें साडेसाती आहे. व या राशींतील शनि सप्तमावर व सप्तमस्थ ग्रहावर पूर्ण पाहतो, ह्मणून हा शनि काळजी करण्यासारखाच आहे हें निःसंशय आहे.

या गृहस्थाच्या पत्नीचें निधन ता. १९ आगष्ट सन १९०८ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां झालें! या दिवशीं शनि ९ अंश असून वक्री होता. रवि व मंगळ हे सिंह राशींत कुटुंबस्थानीं होते. रवि व मंगळ यांची ता. २१ ला युति होणार होती. अर्थात् ही ग्रहस्थिति स्त्रीला अनिष्ट आहे असें सुचवित होती. इतकेंच नव्हे तर हर्शल व शनि यांच्या स्थितीवरून ती कदाचित् स्त्रीला मारकच होईल असेंही अनुमान दर्शवित होती. अशा वेळीं जर तिची कुंडली पाहिली असती तर निधनयोग खात्रीनें कळला असता.

ही स्त्री जुलई महिन्यांत तापानें आजारी झाली कारण, जुलईच्या ८ तारखेपासून मंगळ सिंह राशीचा झाला व तो कुटुंबस्थानाला पीडा देऊं लागला. जुलईच्या अखेरच्या तारखेला तो शनीच्या समोरून गेला. रवि हा ता. २४ जुलईला सिंह राशीचा होऊन ता. ७ आगष्टला तो शनीच्या समोरून गेला. रवि व मंगळ हे ग्रह शनीवरून किंवा त्याच्या समोरून जातांना स्थानपरत्वें अनिष्ट होत असतात. येथें ते दुसऱ्या स्थानांतून जात आहेत, ह्मणून स्त्री, कुटुंब व धन यांची हानि दर्शवितात हें उघड आहे. या वेळीं रवि, मंगळ, शनि हे अग्निराशींतच आहेत, ह्मणून ती तापानेंच सीक झाली असावी असें वाटतें.

आगष्टमध्यें बुध व गुरु हेही कुटुंबस्थानीं होते. हे शुभ ग्रह आहेत. या वेळीं गुरू सारखा ग्रहसुद्धां तिचें रक्षण करण्यास समर्थ झाला नाहीं यावरून तिचे ग्रह फारच बिघडलेले असले पाहिजेत.

हर्शल हा अकस्मात् (एकदम) मृत्यु देणारा ग्रह आहे हें वाचकांस अवगत आहेच. त्याचा अनुभव येथेंही आला आहे. मरतांना कांहीं क्लेश न होतां एकदम क्रिया बंद होऊन १५ मिनिटांत देहावसान झालें!

स्त्रीचें निधन कुंभ लग्नावर झालें. ह्मणजे शनि ज्या राशींत आहे त्याच राशीच्या लग्नावर झालें. स्त्रीच्या निधनकालीं कोणतें लग्न उदित असेल याचा विचार करण्यास हा अनुभव टिपून ठेवण्यासारखा आहे. आणखी कांहीं कुंडल्या अशा मिळाल्यास निधनलग्न ठरवितां येईल असें वाटतें. पूर्णविचारांतीं या विषयावर लेख लिहिण्याचा हेतु आहे.

आजच्या लेखावरून वर्षफल करणारांनीं स्त्रीला अनिष्ट काल कोणता आहे हें कसें ठरवावें याचा विचार करावा.



कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥

'भवभूति'

पुस्तक ९ वें.] चैत्र कृ० ३, रविवार. [अंक ९ वा

स्त्रीनिधन

[रा. ग. दा. ग्रंथे यांजकडून]

रा. गणेश दामोदर ग्रंथे यांजकडून प्रसिद्धीसाठीं बराच कुंडली संग्रह आला. त्यांपैकीं एक भाग ८ व्या अंकापासून सुरू केलाच आहे दुसऱ्या भागांत स्त्रीनिधन हा विषय असून त्या संबंधानेंही बऱ्याच कुंडल्या आल्या आहेत. रा. ग्रंथे यांचें फलज्योतिषाकडे बरेंच लक्ष लागलें असून ते जो कुंडलीसंग्रह करीत आहेत तो सार्वजनिक उपयोगाचा असल्यामुळें त्यांची स्तुति केल्याशिवाय राहवत नाहीं. कुंडलीविज्ञानांत स्त्रीनिधनकाळीं पुरुषाच्या कुंडलींत कसे कसे ग्रह येतात याचें विवेचन पूर्वी आलें आहे. ते नियम सत्य आहेत या विषयीं आतां कोणास शंका नसेलच. रा. ग्रंथे यांनीं त्या नियमांची सत्यता पाहूनच कुंडल्या प्रसिद्धीसाठीं पाठविल्या आहेत त्या क्रमाक्रमानें या अंकापासून देण्याचें ठरविलें आहे.

स्त्रीनिधनकाळीं जसे ग्रह येतात, तसे ग्रह एखाद्या कुंडलींत दृष्टीस पडल्यास स्त्रीनिधन झालेंच पाहिजे असें मात्र कोणीं समजूं नये. त्या पुरुषास जन्मकाळीं स्त्रीनिधनचा योग असेल किंवा त्याच्या स्त्रीचें आयुष्य सरलें असेल तर निधनकालचे ग्रह मृत्युप्रद होतात. एरवीं

ते तिला आजार मात्र उत्पन्न करितात असें समजावें. या निधनकालच्या ग्रहस्थितीच्या नियमांनीं जरी मृत्यु निश्चयात्मक सांगतां आला नाहीं तरी तो काल स्त्रीच्या प्रकृतीला अनिष्ट आहे असें समजून वागण्यास हरकत नाहीं. निश्चयात्मक मृत्यु सांगण्यास मनुष्याचें ज्ञान विस्तृत असलें पाहिजे. एखाद्या वेळीं पुरुषाच्या कुंडलींत एखादाच पाप ग्रह स्त्रीला मारक झालेला दृष्टीस पडतो, यांचे कारण तिच्या आयुष्यमर्यादेचें ज्ञान प्रथम झालें पाहिजे. नंतर तिच्या भर्त्याच्या कुंडलींत त्या कालीं कोणता ग्रह मारक होतो हें पाहून तिच्या मृत्यूचा निश्चय केला पाहिजे. पत्रिका करणारा जोशी इतका विचार बहुधा करीतच नाहीं, आणि केवळ पुरुषाच्याच कुंडलीवरून त्याच्या पत्नीचा मृत्युकाल ठरवितो ही अक्षम्य चूक आहे!

१

जन्म—ता. १-९-१८८२ सकाळीं ४ वा. अक्षांश २०

सायन भावचलित.



या गृहस्थाची प्रथम स्त्री ता. २० मार्च्य १८९९ रोजीं सकाळीं ८ वाजतां प्लेगनें मृत्यु पावली. या वेळीं शनि धनु राशींत होता. शनि वृश्चिकेंत असतां वास्तविक निधन व्हावयास पाहिजे होतें. कारण हा राशि शुक्राचे कुटुंबस्थानीं व जायास्वामी जो शनि त्याच्या जायास्थानीं आहे. कुटुंबस्थानीं असलेला पाप ग्रह हर्शल हा सुद्धां धनेंतच आहे. अशा ग्रहस्थितीवर तिचा मृत्यु कसा झाला, याचा आपणास विचार केला पाहिजे.

या दिवशीं शनि हा धनु राशींत २३ अंश आहे व मंगळ कर्क राशींत व्यय स्थानीं २१ अंश आहे. ह्मणून मंगळ हा शनीला ह्मणजे जायास्वामीला ८ वा झाला! कुटुंबस्वामी बुध हा मेष राशींत १७ अंश आहे त्याच्या चतुर्थ स्थानीं मंगळ आला! राहू मकरेंत ४ अंश आहे ह्मणून ता जायास्वमी जो जनि त्याच्या कुटुंबस्थानीं आला हीं तीन कारणें तिचा मृत्यु दर्शवितात. येथें जाया अगर कुटुंब स्थानीं पाप ग्रह न येतां किंवा त्यांचे जन्मकालीन स्वामी न बिघडतां मृत्यु झाला आहे. यावरून वार्षिक गतीनें येणारे स्वामी जर बिघडतील तर तोही काल अनिष्ट होतो असें दिसून येईल. ही गोष्ट पत्रिका करणाराच्या तर मुळींच ध्यानांत येणार नाहीं, पण वर्षफल करणारालाही एका एकीं उमगेल असें वाटत नाहीं. या दिवशीं हर्शल हा शुक्राच्या कुटुंबस्थानीं धनु राशींत ८ अंश असून वक्री आहे! हेंही एक चवथें कारण ध्यानांत ठेवलें पाहिजे. जन्मकालच्या चंद्राला या कालचा शनि आठवा असल्यामुळें हा काल या पुरुषास अनेक प्रकारचीं दुःखें भोगावयास लावणारा आहे हें उघड आहे. त्यांतच वार्षिक अधिपति बिघडले त्यामुळें स्त्रीसंबधाचें दुःख त्या मनुष्यास प्राप्त झालें हें योग्यच आहे.

ज्योतिः शास्त्र हें वर वर विचार करणारांचें नाहीं हें वरील विवेचनावरून कळून येईल. आपल्या पत्रिकेवरून आपल्या संबंधी माणसांच्या सुख दुःखाचा विचार करितांना त्यांच्या कुंडल्याही पाहिल्या पाहिजेत. या वेळीं स्त्रीच्या कुंडलीची आवश्यकता होती, परंतु ती मिळालेली नाहीं. तिच्या कुंडलींत तिला मारक योग झालेले असले पाहिजेत, हे योग प्रथम पाहून नंतर पुरुषाच्या कुंडलीचा विचार केल्यानें निधन होणार कीं नाहीं हें ठरविणें ज्योतिष्यास शहाणपणाचें आहे.

जन्मकालीं हर्शल हा कुटुंबस्वामी जो बुध त्याच्या सन्निध असा कुटुंबस्थानीं आहे, मंगळ हा शुक्राच्या राशीस आहे व जायास्वामी जो शनि त्याच्या सप्तम (जाया) स्थानीं राहू आहे हे योग पत्नी अल्पायु आहे असें दर्शवितात. यांत आपणास राहूकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. तो शनिच्या अगदीं समोर आहे. व तोच निधनकालीं वार्षिक शनीच्या कुटुंब स्थानीं आला होता! वरील सर्व गोष्टी जुळवून देण्यास जितक्या सोप्या आहेत तितक्या प्रथम हुडकून काढण्यास सोप्या नाहींत हें सर्व ज्योतिषी लोकांनीं प्रांजलपणें कबूल करणें भाग आहे.

निधन सकाळीं ८ वाजतां झालें आहे, ह्मणून तें बहुधा मेष लग्नावरच झालें असावें असें दिसतें. हा राशि शुक्राच्या सप्तमस्थानीं (जायास्थानीं) आहे हाही चमत्कार ध्यानांत ठेवण्यासारखा आहे! या दिवशीं चंद्र हा मंगळाशीं युति करणार होता. चंद्रमंगळांची युति सामान्यत्वें स्त्रीजातीला जाचक असते, ह्मणून हाही अनुभव या ठिकाणीं आला आहे!

स्त्रीनिधन.

[अंक ९ वरून पुढें चालू]

(२)

जन्म.—ता० १-९-१८८८ सायं. ७ वाजतां (अ.२०)



या गृहस्थाच्या स्त्रीचें निधन ता.९ मार्च्य १९०९ रोजीं ज्वरानें झालें. वृषभेचा शनि कुटुंबस्थानीं व चंद्राचे जायास्थानीं असतां स्त्रीपीडा होईल ही कल्पना बरोबर होती. परंतु मृत्यु अगोदर आलेला आहे. सप्तमांत असलेला बलाढ्य पाप ग्रह हर्शल हा स्थानपरत्वें शुक्राचे जायास्थानीं आला आहे. चंद्राचा कुटुंबाधिपति जो गुरु त्याच्या जायास्थानीं राहू व सप्तमेश बुध ह्याच्या जायास्थानीं लग्नीं शनि होता. सप्तमांतील हर्शल याच्या समोरून शनि जातांना स्त्रीपीडा झालेली आहे, हें येथें मुख्यत्वें लक्षांत ठेण्याजोगें आहे.

ता० ९ मार्च्य सन १९०९ चे ग्रह.

रवि	चंद्र	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि	राहू	हर्शल	नेप.
मीन	तूळ	मकर	कुंभ	कन्या	मीन	मेष	मिथुन	मकर	कर्क
१८	११	८	२०	८	९	९	२१	२०	१४

व.

जन्मकाळचे ग्रह.

कन्या	वृश्चिक	सिंह	कन्या	धनु	सिंह	सिंह	कर्क	तूळ	मिथुन
९	२४	१६	२९	२८	०	२५	९	२०	४

जायाभावारंभीं कन्येचे २४ अंश उदित आहेत व तूळ राशि या भावांत पूर्णपणें आहे, ह्मणून जायाभावाचें आधिपत्य शुक्राकडे आहे. व कुटुंब भावारंभीं वृषभ राशि पूर्णपणें उदित असल्यामुळें याचेंही आधिपत्य शुक्राकडेच आहे. या प्रमाणें शुक्र हा जाया व कुटुंब या दोन्ही स्थानांचा अधिपति झाला आहे. हा ग्रह जन्मकाळीं शनि मंगळ ज्या राशीस आहेत त्याच राशीस आहे, ह्मणून तो द्विभार्ययोगास कारण झाला आहे, जायास्थानीं बुध व हर्शल असे दोन ग्रह आहेत. यांत हर्शल हा पाप ग्रह असल्यामुळें तो स्त्रीला मारक आहे. पण बुध हा शुभ ग्रह असल्यामुळें स्त्री विवाहकालानंतर बरेच दिवसांनीं मृत झाली आहे. या प्रमाणें जन्मकाळीं स्त्रीमारक योग झाले आहेत.

स्थूल मानानें आपणास असें अनुमान करण्यास हरकत नाहीं कीं शनि हा तनुस्थानीं मेष राशींत आल्यावर तो स्त्रीला कष्टप्रद होईल. जायास्थानीं तूळ राशींत हर्शल २० अंश आहे ह्मणून त्याच्या समोर शनि मेष राशींत ज्या सालीं येईल तें साल स्त्रीला कठीण जाईल. कारण, हर्शल समोर शनि येणें धोक्याचें असतें. सन १९०८ सालीं शनि मेष राशीचा झाला पण तो त्या वर्षी त्या राशींत १० अंशाच्या पुढें गेला नाहीं. १९०९ सालीं मात्र तो हर्शलच्या समोर येतो. ह्मणून हेंच साल स्त्रीला जड जाणारें होतें. १९०९ सालीं जूनमध्यें तो हर्शलच्या समोर येतो, ह्मणून त्या सुमारास स्त्रीला कष्ट झाले पाहिजेत असें आपणास अनुमान करण्यास हरकत नाहीं. ग्रहांचे परिणाम युतिकाळीं अगर प्रतियोगाचे वेळीं होते तर ज्योतिःशास्त्राला नियत स्वरूप प्राप्त झालें असतें. पण तशी स्थिति नाहीं यामुळें सुमाराचाच काल समजतो. वास्तविक येथें जूनमध्यें स्त्री मरावयास पाहिजे होती पण ती पूर्वीच तीन महिने मेली! ग्रहांचे परिणाम योगप्रतियोगांचे पूर्वीच बहुधा घडतात.

तनुस्थानीं गेलेला शनि मेष राशींत ९ अंश असतां मंगळ मकर राशींत ८ अंश होता, त्यामुळें हे ग्रह परस्परांस पाहात होते. शनि व मंगळ हे परस्पर शत्रु असल्यामुळें ते जर एकमेकांस पाहतील तर कांहीं तरी दुःख उत्पन्न करितील असा सामान्य नियम आहे. त्याप्रमाणें तनुस्थानचा शनि, मंगळाच्या दृष्टींत आल्यामुळें तो मानसिक दुःखाला कारण झाला आहे.

जायास्वामी शुक्र हा मीन राशींत ५ अंश आला आहे. ह्मणजे तो जन्मरवीच्या समोर आला आहे व त्याच्या कुटुंब स्थानीं शनि आला आहे, ही गोष्टही चांगली झाली नाहीं.

हर्शल हा शुक्राच्या सप्तभांत आला असून त्याचेशीं मंगळ ता. २७ मार्च्यला युति करणार होता. ही युति सुद्धां तिला अंशतः मारक झाली आहे.

(३)

जन्म—ता. १८-१०-१८७१ सकाळीं ५। वाजतां [अं २०]



या गृहस्थाची प्रथम स्त्री जून १९०७ मध्यें व दुसरी एप्रिल १९०८ मध्यें निवर्तली. प्रथम स्त्री जिवंत असतांनाच दुसरी केली होती.

जायास्थानांत वक्री नेपच्यून असून जायेश व कुटुंबेश मंगळ ह्यांच्या २।७ स्थानीं शनि व राहू हे पाप ग्रह आहेत. प्रथम स्त्रीचे मृत्यूचे वेळीं मंगळ हा मकर राशींत चंद्राचे कुटुंबस्थानीं वक्री असून शनि हा शुक्राचे जायास्थानीं भ्रमण करीत होता. दुसरे स्त्रीचे निधनकाळीं जायास्थानीं राहु स्थानपरत्वें होता. प्रथम स्त्री सकाळीं ४ वाजतां व दुसरी सकाळीं ८ वाजतां मयत झाली. दोन्ही स्त्रिया वृषभ लग्नावरच वारल्या आहेत. हा राशी या कुंडलींत अष्टम स्थानीं ह्मणजे कुटुंब स्थानाच्या सप्तम स्थानीं आहे! पहिली प्लेगनें व दुसरी पटकीनें वारली.

जायाभावारंभीं मेष राशि १० अंश उदित असल्यामुळें त्याचा स्वामी मंगळ आहे. हा ग्रह कुटुंबस्थानाचाही अधिपति असून धनु राशींत चंद्रासह आहे. धनु राशींत मंगळ नाशकारक असतो हें आमच्या वाचकांस अवगत आहेच. हा ग्रह धनु राशींत कुटुंब अगर जायास्थानीं असेल तर किंतीही स्त्रिया वारल्या तरी त्या मरण पावतील! व त्यांच्या पासून यत्किंचित्ही सुख मिळणार नाहीं. येथें हा ग्रह चंद्रानें युक्त झाल्यामुळें एक असतां दुसरी स्त्री झाली. व तो धनु राशींत असून त्याच्या कुटुंब स्थानीं शनि व सप्तम स्थानीं राहु असून कुंडलींत जाया स्थानीं नेपच्यून असल्यामुळें त्या दोघी एक वर्षाच्या अंतरानें मरण पावल्या.

दुसरी स्त्री मरण पावली त्या वेळीं रवि हा जायास्थानीं आला होता. मंगळ हा जन्ममंगळाच्या जायास्थानीं आला असून हर्शल हा जन्ममंगळाच्या कुटुंब स्थानीं आला होता. शनीनें मेष राशींत नुकताच प्रवेश केला होता. व तोही या वर्षी जायास्थानीं जुळईत येणार होता. शनि मेष राशींत जाया स्थानीं आल्यावर स्त्रीला कष्ट दिल्याशिवाय जाणार नाहीं असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. ह्मणून हें वर्ष स्त्रीला कष्टप्रद आहे असें ज्योतिष्यास अनुमान करितां आलें असतें. तिचा मृत्यु तिच्या अनिष्ट ग्रहांवर अवलंबून असणारा असल्यामुळें मर्त्याच्या कुंडलीवरून नेमका काल मात्र सांगतां आला नसता. शिवाय ज्या प्रमाणें जन्ममंगळाच्या कुटुंबस्थानीं हर्शल होता तसाच फिरतीच्या मंगळाच्या कुटुंब स्थानीं राहू होतो. सारांश सर्व पाप ग्रह स्त्रीला अनिष्ट आले होते असें यावरून दिसून येईल.

पहिली स्त्री १९०७ च्या जूनमध्यें मरण पावली. या वेळीं शनि मीनेंत शुक्रासमोर होता. शुक्र हा स्त्रीचा कारक ग्रह असून या कुंडलींत तो लग्नस्वामी आहे. व त्याच्या सप्तम स्थानीं शनि आल्या-

मुळें तो तिला अनिष्ट झाला होता. रवि हा जन्ममंगळाच्या सप्तम स्थानीं असून हर्शल हा त्याच्या कुटुंब स्थानीं होता. व मंगळ मकर राशींत हर्शलच्या जोडीस होता.

या प्रमाणें या कुडलींत स्त्रीनिधनकाळीं ग्रह होते.

४

जन्म.—ता. ५-८:१८६० सकाळीं ८ वाजतां



प्रथम पत्नी सन १८९६ मध्यें मयत झाली. दोघी स्त्रिया डिसेंबरमध्येंच मयत झाल्या! व दोघींचेही वेळीं मंगळ वक्री होता. एकदां शुक्राचे व्ययस्थानीं व दुसऱ्यानें शुक्राचे कुटुंब स्थानीं. प्रथम वेळीं राहू कुंभ राशींत जायास्वामी जो गुरु त्याच्या सप्तमांत असून शनि हा वृश्चिक राशींत होता. शुक्र हा कुटुंब स्थानाचा स्वामी असून तो यावेळीं कुंभ राशींतच होता. राहू हा जन्मकाळींच गुरूच्या

सप्तमांत आहे व मंगळ शुक्राचे सप्तमांत आहे, त्यामुळें दोन्ही स्त्रिया मृत झाल्या.

दुसऱ्या वेळीं राहु मकरेंत शुक्राच्या सप्तम स्थानीं होता, व मंगळ गुरूच्या राशीस वक्री होता.

जन्मकाळीं जायास्वामी जो गुरु तो अस्तंगत आहे व त्याच्या कुटुंब स्थानीं शनि असून सप्तम स्थानीं राहु आहे म्हणून हा योग स्त्री सुखाला चांगला झालेला नाहीं. शिवाय जायास्थानीं नेपच्यून हा पाप ग्रह आहे तोही अनिष्ट आहे.

पत्रिका करतांना स्त्रीला अनिष्ट ग्रह केव्हां केव्हां आहेत हें पाहिलें पाहिजे. प्रत्येक पाप ग्रह जाया व कुटुंब हीं स्थानें, शुक्र, जायास्वामी व कुटुंबस्वामी यांस अनिष्ट केव्हां होतो हें पत्रिकेंत नमूद केलेलें असलें पाहिजे. पण अशा पत्रिका कोठें पाहण्यांत येत नाहींत ही दुःखाची गोष्ट आहे. मोठाल्या देणग्यांच्या पत्रिकांत तरी हें वर्णन अवश्य पाहिजे. इकडे आमचे ज्योतिषी लक्ष देतील अशी आशा आहे.



स्त्रीनिधन.

[अंक ११ वरून पुढें चालू]

(५)

जन्म.—ता. ३ सप्टंबर १८८४ सकाळीं १०–१



प्रथम स्त्री ता० ६ अक्टंबर १९०६ या दिवशीं बाळंत होऊन मृत्यु पावली. पुढें झालेला मुलगा १॥ महिन्यानें मयत झाला. एकादश स्थानीं राहू असल्यामुळें झालेले दोन्ही मुलगे जन्मतांच ६ महिन्यांच्या आंत मरण पावले. १९०७च्या फेब्रूवारी महिन्यांत दुसरें लग्न झालें आहे.

या कुंडलींत जायास्थानीं शनि व व्यय स्थानीं मंगळ हा योग स्त्री-नाश दर्शवीत आहे. जायास्वामी बुध हा कन्येंत असल्यामुळें उच्च आहे, हा बहुभार्या (दोहों पेक्षां अधिक विवाह) योग आहे. ह्मणून कदाचित्

तसाच अनुभव येणें शक्य आहे. हा ग्रह हर्शलनें दूषित असून त्याच्या कुटुंबस्थ राशींत रवि व राहू हे दोन पाप ग्रह आहेत. हे निदान दोन स्त्रियांचे तरी मृत्यु दर्शवितात.

पहिली स्त्री मरण पावली तेव्हां शनि हा मीनेंत जायास्वामीच्या समोरून वक्रगतीनें जात होता व हर्शल कुटुंब स्थानीं आला होता. आणि मंगळ हा जन्मबुधाच्या राशीस आला होता. याप्रमाणें जायास्वामी जो बुध तो दोन पाप ग्रहांनीं पीडित झाला होता, कुटुंबस्थान हर्शलनें दूषित केलें होतें व साडेसाती होती. अशा योगांत स्त्रीचें मरण होणें स्वाभाविक आहे. चतुर्थस्थानीं शनि येऊन साडेसाती असेल तर मनुष्य मोठ्या दुःखांत पडल्याशिवाय राहणार नाहीं. याचाही दाखला चांगला मिळाला.

हर्शल हा बुधाजवळ असल्यामुळें तो जसा कुटुंबस्थानीं स्त्रीनाशास कारण झाला, तसाच तो त्याच्या समोर चतुर्थ स्थानीं येईल तेव्हां स्त्रीनाश करूं शकेल. हा समय सन १९२०ते१९२३या कालाच्या मर्यादेंत येतो. कारण त्यावेळीं शनि हा बुधाच्या राशीस हर्शलवरून जाईल किंवा तो तूळ राशींत रवीवरून जाईल. याच कालांत राहु हा तूळ अगर कन्या राशींत येतो. हा एक स्त्रीनिधनाचा पुढील काळ आहे.

सन १९००मध्यें राहू हा जायास्थानीं असून हर्शल कुटुंबस्थानीं आहेत व मंगळ जून पासून चतुर्थ स्थानीं आहे, ह्मणून हा काल स्त्रीच्या कष्टाचा आहे. दुसऱ्या स्त्रीला या कालांत साडेसाती आहे ह्मणून विशेष काळजी घेतली पाहिजे.

सन १९१३।१४ मध्यें शनि जायास्थानीं येतो व राहू हा बुधाच्या सप्तमांत येतो, याच संधीस मंगळ अष्टम स्थानीं कर्क राशीस वक्री होत आहे त्यावरून हाही काल स्त्रीच्या काळजीचा आहे. हें सर्व पुढील भविष्य आहे, ह्मणून अनुभवानें त्याचा खरेपणा व्यक्त व्हावयाचा आहे.

गुरु हा सिंह या वंध्या राशींत असून तो शनीच्या पूर्ण दृष्टींत आहे व पंचमांत मेष राशि असून एकादश स्थानीं राहु आहे, त्यामुळें संततिसुख मिळणें फार कठीण आहे.

नवमस्थानीं सिंह राशींत गुरु व शुक्र हे ग्रह असून दशमांत बुध उच्च आहे. त्यामुळें या गृहस्थांस रेल्वेकडे ७९ रुपये दरमहा पगार आहे! याप्रमाणें ही कुंडली चांगली पाहण्यालायक आहे. असल्या कुंडलीवरून ज्योतिष्यास भविष्य चांगलें करितां येतें.

---

(६)

जन्म.—ता० १७ एप्रिल १८७१ सकाळीं ९–४२



सन १८८९ मध्यें प्रथम विवाह होऊन सन १८९३ मध्यें ती स्त्री मरण पावली व दुसरा विवाह झाला. सन १८९७ च्या मे मध्यें दुसरी पत्नी मयत झाली. १९०१ मध्यें तिसरा विवाह झाला व ती स्त्रीही सन १९०४ मध्यें मरण पावली. या प्रमाणें तीन विवाह होऊन

तिघी बायका सुमारें ४ वर्षांत विवाह झाल्यापासून मरण पावल्या आहेत.

जाया व कुटुंब या स्थानांचा अधिपति शुक्र हा कुटुंब स्थानीं स्वगृहीं आहे, ह्मणून पुनः पुनः विवाह झाले व बहुभार्यायोग घडला परंतु हा बहुभार्यायोग ज्योतिष्यास चांगला समजण्यासारखा नाहीं. जायास्वामी स्वगृहीं बुधानें युक्त असून पाप ग्रहानें युक्त अथवा दृष्ट नसतां व मंगळही स्त्रीमारक नसतां तिघी स्त्रिया इतक्या अल्पावधींत कशा मरण पावल्या हें कळण्यासारखें नाहीं. ह्मणून जन्मकालामध्यें थोडा तरी फरक असला पाहिजे. जन्मलग्न मीनेच्या २५ अंशांत किंवा त्यासुमारास असावें. एरवीं या कोड्याचा उलगडा होऊं शकत नाहीं. सुमारें पाऊण कलाक जन्म पूर्वी धरिला ह्मणजे सप्तम स्थानीं वक्री मंगळ येतो व कुटुंब स्थानीं उच्च रवि व नेपच्यून हे ग्रह बसतात. ही ग्रहस्थिति स्त्रीनाशाला चांगली जुळते.

सन १८९३ मध्यें शनि हा रवीच्या समोर होता व हर्शल हा बुधाच्या समोर होता. राहू हा कुटुंब स्थानीं आला होता. ह्मणून प्रथम स्त्रीचें निधन झालें.

सन १८९७ मध्यें शनि व हर्शल हे दोन्ही ग्रह शुक्राच्या व बुधाच्या समोर होते, त्यामुळें दुसऱ्या पत्नीचें निधन झालें.

सन १९०४ मध्यें साडेसाती होती व राहू जायास्थानीं आला होता, ह्मणून या वेळीं तिसरी स्त्री मरण पावली.

याप्रमाणें मीन लग्नाचे २९ अंश कल्पून निधनकाल यथायोग्य जुळतात. १९०६ च्या मार्च्य मध्यें पितृनिधन झालें. या वेळीं हर्शल हा शनीवरून जात होता व साडेसाती होती. सन १८९६ च्या सप्टंबर मध्यें मातृनिधन झालें. या वेळीं शनि व हर्शल हे दोन्ही ग्रह चंद्राच्या नवमांत होते, व राहू हा चंद्राच्या राशीला होता.

स्त्रीनिधन.

[अंक १३ वरून पुढें चालू]

(७)

बापू रामचंद्र कुळकर्णी वेणेगांवकर यांजकडून

जन्म—ता. २१-८-७५ सायंकाळीं ७ वाजतां,

निरयन.



प्रथम स्त्री ता. २ मे १८९७ मध्यें, दुसरी ता. २४ मे १८९९ व तिसरी ता. २३ मार्च्य १९०९ मध्यें मृत्यु पावली.

कुटुंब स्थानांत राहू हा पाप ग्रह असून कुटुंबेश गुरु हा शत्रुगृहीं शनी या पाप ग्रहानें पूर्ण विलोकित आहे. स्त्रीकारक शुक्र हा शनि व मंगळ या पाप ग्रहानें दृष्ट आहे. या कुंडलींत चंद्र, मंगळ व गुरु हे पाप फलें उत्पन्न करणारे आहेत. सप्तमांत सिंह राशीचा बुधानें युक्त असा रवि आहे. याप्रमाणें निरयन कुंडलीवरून बहुभार्या

योगाचा बोध होत आहे. कर्केचा शुक्र अगर चंद्र एकाहून अधिक स्त्रियांचें सुख प्राप्त करून देणारा आहे असें कुंडलीविज्ञानांत वाचलें आहे.

प्रथम स्त्रीचे निधनकाळीं जन्मस्थ शुक्राचे राशीस केतु व व्ययस्थ मंगळ आला. रवीचे कुटुंब स्थानीं वक्री बुध आला. कुटुंबेश गुरु हा सप्तमांत वक्री शनीचे पूर्ण दृष्टींत आला.

दुसरे स्त्रीचे निधनकाळीं जन्मस्थ शुक्राचे राशींत मंगळ व व्ययांत केतु आला. कुटुंबेश वक्री असा जन्म वेळेप्रमाणें असून चंद्र या पाप ग्रहानें युक्त असा आला.

तिसरे स्त्रीचे निधनकाळीं जन्मस्थ शुक्राची रास मंगळानें पूर्ण विलोकित आहे. कुटुंबेश गुरु वक्री असा जाया स्थानांत असून सप्तमेश रवि हा कुटुंबस्थानीं शनि व चंद्र या पाप ग्रहांनीं युक्त आहे व तो मंगळानें पूर्ण विलोकित आहे. त्याचप्रमाणें स्त्रीकारकही रवि, शनि, चंद्र यांनीं युक्त असून मंगळानें पूर्ण दृष्ट आहे. तिसरी स्त्री ही बाळंत होऊन सातवे दिवशीं निवर्तली. तिच्या मुलाची कुंडली पुढील प्रमाणें.—

जन्म—ता. १७-३-०९ रात्रौ ७-५३

सायन.



मातृस्थानीं मंगळ व हर्शल हे दोन पाप ग्रह असून चंद्रही तेथेंच

आहे. चंद्रापासून चतुर्थ स्थानीं शनि हा पाप ग्रह आहे. चंद्रावर व चतुर्थ स्थानावर पाप ग्रहाची दृष्टि असून कर्क राशींत नेपच्यून हा पाप ग्रह आहे. चतुर्थेश शनि हा नीच असून मंगळानें पूर्ण दृष्ट आहे. याप्रमाणें चंद्र, चतुर्थ स्थान, चतुर्थेश व कर्क राशि पाप ग्रहांनीं बिघडविल्यामुळें अगदीं अल्पकालांत मातृनिधन झालें. मृत्यु कुंभ लग्नावर आला.

निरयन कुंडलीवरून या मुलास सावत्र मातृयोग बसतो. म्हणजे चतुर्थ स्थानीं धनु ही रास येते व तिचा अधिपति व्ययांत येतो. तसा सायन कुंडलीवरून सावत्र मातृयोग बसत नाहीं. लिहिण्यास कारण—या मुलास सावत्र मातृयोग ता० २९ मे सन १९०९ या दिवशीं सिंह लग्नावर झाला.

* श्री० कुळकर्णी यांनीं सायन कुंडलीवरून सावत्र मातृयोग बसत नाहीं असें जें म्हटलें आहे, तें निरर्थक आहे. सापत्न माता अमुक कारणांनीं होते असें कोठें सांगितलेलें नाहीं. चतुर्थ स्थानीं धनु रास व चतुर्थेश व्यय स्थानीं हा सापत्न मातायोग असंभवनीय आहे. चतुर्थ स्थान, चंद्र व चतुर्थेश यांची दुर्बलता हेंच सापत्न मातायोगासही कारण आहे. जर कुंडलीवरून जननीसुख दिसत नसेल तर कदाचित् सापत्न माता होऊं शकेल. मुलाच्या कुंडलींत वास्तविक सापत्न मातेचा बोध होणेंच अशक्य आहे. जे योग जननीसुखाला विघातक आहेत तेच सापत्न माता किंवा दत्तक माता अगर पालनकर्त्री मातेसमान अन्य स्त्री यांचे दर्शक आहेत. हे योग वरील सायन कुंडलींत स्पष्ट दिसत आहेत, म्हणून सायन कुंडलीवरूनच सापत्नमातायोग संभवनीय आहे हें उघड आहे.

आतां स्त्रीनिधनाचा सायन कुंडलीवरून विचार करूं.

सायन भावचलित कुंडली.



या कुंडलींत सप्तमाचा अधिपति बुध हा (१) सहाव्या स्थानांत रवीच्या तेजांत अस्तंगत असा आहे, (२) तो रवि व हर्शल या पाप ग्रहांच्या मध्यें आहे, (३) त्याच्या सप्तमांत वक्री शनि आहे. याप्रमाणें सप्तमेश पूर्णपणें बिघडला आहे. (४) लग्नीं राहू व सप्तमांत केतु आहे. (५) स्त्रीकारक ग्रह जो शुक्र तोही अस्तंगत असून हर्शलनें युक्त व शनीनें दृष्ट आहे. (६) कुटुंबेश पाप ग्रह असून तो धनु राशींत मारक स्थितींत आहे. हीं सर्व कारणें तीन स्त्रिया मरण्यास झालीं. व कुटुंब स्थानचा चंद्र गुरुसंमुख आल्यानें पुनः पुनः विवाह होऊं शकले.

१ ल्या स्त्रीच्या मृत्युकाळचे ग्रह.

रवि-वृषभ १२ चंद्र-वृषभ १९ नेप-मिथुन १८ हर्शल-वृश्चिक २७

स्त्रीनिधन

[अंक १४ वरून पुढें चालू]

८

जन्म—ता. ९।१।१८५५ मध्यान्हीं अक्षांश १८



ही ज्यांची कुंडली आहे, त्यांनीं ती ७।८ नामांकित ज्योतिष्यांस दाखविली. त्यांपैकीं बहुतेकांनीं २ व ७ या स्थानांतील मंगळ, राहू व शनि हे ग्रह पाहून बहुभार्यायोग होऊन गेला असें सांगितलें आहे. परंतु चमत्कार असा कीं, प्रथम स्त्री अद्यापि जिवंत आहे! दुसऱ्या स्त्रिया नसून विवाहही एकापेक्षां जास्त झाले नाहींत. प्रथम

स्त्री कधींही आजपर्यंत जड दुखण्यानें आजारी झाली नाहीं. कुटुंब-स्थानारंभीं उच्च चंद्र असून त्यावर स्वगृहींचा गुरु स्थानपरत्वें अष्ट-मांतून पहात आहे व कुटुंबेश शुक्र मीन राशींत उच्च असून कोण-त्याही पापग्रहानें युक्त नाहीं म्हणून स्त्रीसंबंधानें अशी स्थिति असावी. उच्च चंद्रामुळें स्त्री जगली आहे हें म्हणणें कांहीं अंशीं खरें आहे, परंतु कुंडलींत जन्मकाळासंबंधें बरीच तफावत असावी असें वाटतें. कुटुंब स्थानांत मंगळ मध्यवर्ती व जायास्थानीं शनि व राहु हे मध्यवर्ती असतां व जायास्वामी उच्च असतां बहुभार्यायोग घडलाच पाहिजे. शास्त्राचा सामान्य नियम सुद्धां जेथें अनुभवास येत नाहीं, तेथें कुंडलीच चुकली असें म्हणणें भाग आहे.

९

जन्म—ता० ७।१२।१८६८ सकाळीं ८-५ अक्षांश २०



या गृहस्थांच्या **तीन** स्त्रिया वारल्या. हल्लीं विधुरस्थिति आहे. स्त्रियांचे मृत्युकाळ माहीत नाहींत. तिसरी स्त्री लग्नांतच प्लेगनें वारली!

आमच्या वाचकांस माहीत आहे कीं, हर्शल हा ग्रह ज्या स्थानांत असेल त्या संबंधी गोष्टींत कांहीं तरी विलक्षणपणा असतो. येथें तो जायास्थानीं मध्यवर्ती आहे त्यामुळें तीन स्त्रिया होऊनही स्त्रीसुख मिळालें नाहीं व तिसरी स्त्री लग्नांतच मृत्यु पावली.

जायास्वामी चंद्र हा मंगळानें युक्त आहे व कुटुंबस्वामी शनि हा धनु या अग्निराशींत अस्तंगत आहे, हे योग स्त्रियांस मारक झाले. शनि हा ग्रह अग्निराशींत असतां किंवा अस्तंगत असतां अनिष्ट गोष्टी घडवून आणितो. या प्रमाणें या कुंडलींत सामान्य नियमा प्रमाणें योग घडून आलेला आहे.

१०

जन्म—ता० २१।१०।१८८९



लग्न वृश्चिक राशीच्या आरंभींच बसतें, म्हणून अंशात्मक कुंडली मांडिली नाहीं. स्त्रीनिधन फेब्रुवारी १९०१ मध्यें झालें. त्या वेळीं शनि मकरेंत (साडेसातींत) राहु मकरेंत, हर्शल धनेंत कुटुंब स्थानीं व मंगळ कन्येंत असे ग्रह होते.

जन्मकाळीं जायास्थानीं मंगळ आहे व शुक्राजवळ किंवा कुटुंब स्वामी जो गुरु त्याच्या स्थानीं हर्शल आहे. स्त्रीच्या मृत्युकाळीं मंगळ हा शुक्राजवळ गेला व हर्शल कुटुंब स्थानीं गेला. मंगळ वक्री होता.

११

जन्म—ता० २१।४।१८५४



प्रथम स्त्री १८७२ मध्यें, दुसरी १८८४ मध्यें व तिसरी १८९४ मध्यें या प्रमाणें तीन स्त्रिया मृत्यु पावल्या.

जायास्वामी शुक्र उच्च असून कुटुंबस्थानीं शनि व राहू असे दोन पाप ग्रह आहेत व मंगळ सिंह राशीचा आहे त्यामुळें बहुभार्यायोग घडला आहे

प्रथम स्त्रीच्या मरणकाळीं शनि मकरेंत असल्यामुळें साडेसाती होती व राहू हा कुटुंब स्थानीं आला होता. जन्मकाळीं तो तेथेंच आहे.

दुसऱ्या स्त्रीच्या मरणकाळीं शनि कुटुंब स्थानीं जन्मस्थानीं गेला होता व राहू हा जायास्थानीं आला होता.

तिसऱ्या स्त्रीच्या वेळीं शनि जायास्थानीं आला होता. पण राहू मात्र शुक्राच्या कुटुंबस्थानीं होता.

पत्रव्यवहार.

[१]

कुंडलीविज्ञानकर्त्ते यांस:—

खालीं लिहिलेल्या कुंडल्या संग्रहार्थ पाठविल्या आहेत. आपले दाशाहिकांत प्रसिद्ध करण्याची कृपा करावी.

स्त्रीनिधन १

जन्म.—शके १७७८ वैशाख शु० १ सोमवार

३०·५४ इष्ट ४९-१० निरयन ग्रह व लग्न.



र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा	ल.
०	१	५	१	११	०	२	०	१०
१३	९	६	४	८	४	७	१	१
५२	४३	२४	३१	६	५	२९	४७	४४

स्त्रीस ता. २–३–०७ रोजीं तिसरे प्रहरीं प्लेगचा ज्वर आला. व ता. ६·३·०७ रोजीं रात्री १२–१९ला वारलीं. ते वेळीं लग्नांत सप्तमेश रवीची शत्रुगृहीं शनीशीं पूर्ण युती झाली होती, व त्याच वेळीं मंगळ वृश्चिक राशींतून रवीवर पूर्ण दृष्टीनें पहात होता. हा मंगळ जन्मकाळीं ह्या स्त्रीस अनिष्ट असा अष्टम भावांत असून सप्तमेश रवीलाही पूर्ण दृष्टीनें पहात होता. इतके दिवस त्यानें स्त्रीस

वांचूं दिलें यांचें कारण धनस्थानचा गुरूच होय. मृत्युकाळीं चंद्रही वृश्चिक राशीस आला होता.

नंबर २

जन्म.—शके १८०२ श्रावण शु० १ शनीवार

८-१८ मघा ४९-४२ इष्ट ४७-३३

निरयन.



र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ल.
३	४	४	३	११	४	०	८	१
२३	१२	१८	१२	२७	१	१	१२	१४
१३	४७	१	२२	५९	९	४६	१४	२९

स्त्री ता. १२-३-०२रोजीं पहिल्यानेंच प्रसूत झाली. प्रसुती वेळीं बरेंच कष्ट झाले. पुढें ज्वर उत्पन्न होऊन ता० १७-३-०२ रोजीं प्रातःकाळीं १० वाजतां वारली. चतुर्थांतील मंगळ व द्वादशांतील शनी हे बहुभार्यायोग दाखवितात. सप्तमेश मित्रगृही केंद्रांत शुभयुक्त व दृष्ट आहे. सबब स्त्रीवांचून राहण्याचा प्रसंग येणारच नाहीं असें दिसतें. तसेंच स्त्रियाही सुस्वभावाच्या मिळतील. स्त्रीचे मृत्युकाळीं रवि मंगळ मीन राशींत सप्तमेशास अष्टम होते. व शनी मकरीचा षष्ठस्थानीं होता. राहु तूळींचा. हा योग विशेष बलिष्ठ आहे. असें असतां स्त्रीचा मृत्यु कां व्हावा?

खालीं लिहिलेली कुंडली विशेष विचार करण्यालायक आहे.

जन्म —शके १७७७ कार्त्तिक शु० १ शनिवार

४९-४३ विशाखा २४-३२ इष्ट ५५-३४

निरयन ग्रह व लग्न



र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ल.
६	७	४	६	१०	५	२	०	६
२६	१०	१९	९	३	१४	९	११	२
५	४	२०	४८	१३	९	२५	१०	७

ह्या कुंडलींत ३ ग्रह म्हणजे शुक्र, रवि व चंद्र हे नीचीचे आहे. स्वगृहीं किंवा उच्च एकही ग्रह नाहीं. जन्म गरीब कुटुंबांत. लहानपणींच आईचे मावशीस दत्तक दिला. पूर्वीचे घरचे ४ भाऊ व १ बहिण होती. ज्या घरीं दत्तक दिला त्या घरचीही सांपत्तिक स्थिति चांगलीशी नव्हती. फक्त १५० रु. सालाचें शेताचें उत्पन्न होतें. विद्याभ्यास गरीबीमुळें इंग्रजी ४ यत्ता शिकून सोडून देणें व नोकरी धरणें भाग पडलें. हल्लीं पगार रु० ४०० दरमहा असून १००रु. दरमहा पेनशन आहे. इतकी सांपत्तिक स्थिति सुधारण्यास कोणते ग्रह कारण झाले? धनेश लाभीं असून स्वगृहास पूर्ण पाहतो. भाग्येश व लाभेश एकत्र लग्नीं आहेत व पंचमांत गुरू असून पंच-

मेश त्रिकोणांत आहे हें खरें. परंतु यापैकीं कोणताच ग्रह स्वगृहींचा किंवा उच्चीचा नाहीं. सप्तमस्थानीं राहु पडला आहे. नीचींचा रवि लग्नांतून त्या स्थानास पूर्ण दृष्टीनें पाहतो. शुक्रही नीचींचा द्वादश स्थानीं पाप ग्रहांचे कर्तरींत आहे. सप्तमेशावर शनी पूर्ण दृष्टीनें पाहतो. परंतु गुरूचीही त्यावर पूर्ण दृष्टि आहे. ह्या गृहस्थाच्या ३ स्त्रिया मरण पावल्या. हल्लीं ४ थी आहे. सर्व स्त्रिया सुस्वभावी व मनाप्रमाणें वागणाऱ्या मिळाल्या. चवथे स्त्रीचीही प्रकृति नीट राहत नाहीं. यंदा फाल्गुनांत षष्ठस्थानीं रवि, सप्तमांत शनि व अष्टमांत राहु मंगळ योग आहे, त्या वेळीं याही स्त्रीचा वियोग होईल काय?

चारीही स्त्रियांस मुलें झालीं. परंतु सर्वच अल्पायु होऊन मृत्यु पावलीं. हल्लीं मुळींच संतति नाहीं. हल्लींचे स्त्रीस नेहमीं गर्भपात होतात. यांसही दत्तक घेण्याचा योग येईल काय?

या कुंडल्यांस स्थळ मिळाल्यास आणखीही कुंडल्या पाठवावयाच्या आहेत.

आपला

एक वाचक.

कुंडलीविज्ञान

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यते ऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥

'भवभूति:,

पुस्तक ७ वें.] ज्येष्ठ कृ० ६, सोमवार [अंक १३ वा.

स्त्रीनिधन

या वर्षाच्या जानेवारीच्या अंकांत पतिपत्नींचा मारक काल केव्हां असतो, त्याबद्दल ८ नियम दिले आहेत. त्या नियमांनुसार निधन घडतें किंवा नाहीं, याचा अनुभव वाचकांनीं घेतलाच असेल. पुढील कुंडलींत या नियमानुसार स्त्रीनिधन घडलें कीं नाहीं तें पाहूं.

जन्म—ता. १४ फेब्रुवारी १८७९

शुक्रवार रात्रीं २ वाजून १५ मि.

सायन



या कुंडलींत कुटुंबस्थानीं उच्च मंगळ आहे व जायास्वामी बुध हा रवीनें व राहूनें युक्त असून वरील मंगळ त्याच्या व्ययस्थानीं आहे. कुटुंबस्वामी शनि हा आपल्या नीचांत असून त्याच्यावर मंगळ

पूर्ण पाहतो, ही ग्रहस्थिति प्रथम स्त्रीनाश व द्वितीय विवाहाचा संभव स्पष्ट दर्शविते. आतां हा स्त्रीनाश केव्हां होईल अथवा होणें संभवनीय आहे तें ठरवावयाचें.

१ कुटुंबस्थानीं व जायास्थानीं ह्मणजे मकर राशींत रवि, मंगळ, राहु व शनि अणि हर्शल केव्हां येतात, ते काल.

२ कुटुंबस्वामी शनि व जाया स्वामी बुध यांच्या राशीस ह्मणजे अनुक्रमें मेष व कुंभ राशींत पापग्रह केव्हां येतात अगर ते पापग्रहांच्या दृष्टींत केव्हां येतात ते काल.—

३ कुटुंबस्वामीच्या ह्मणजे शनीच्या दुसऱ्या किंवा सातव्या स्थानांत ह्मणजे वृषभ अथवा तूळ राशींत पापग्रह केव्हां येतात ते काल.

४ जायास्वामीच्या ह्मणजे बुधाच्या दुसऱ्या किंवा सातव्या स्थानांत ह्मणजे अनुक्रमें मीन अथवा सिंह राशींत पापग्रह केव्हां येतात ते काल.

हे सर्व काल शोधून नंतर त्यांतून निश्चयात्मक काल स्त्रीच्या कुंडलीवरून व मुलांच्या कुंडल्यांवरून ठरविणें हें विद्वान् ज्योतिष्याचें कर्तव्य आहे. केवळ याच कुंडलीवरून काल ठरविणें शहाणपणाचें नाहीं. वरील रीतीनें येणारे काल हे सर्व संभवकाल जाणावे. ह्मणजे स्त्रीनिधन ज्या कालीं घडेल तो काल वरील कालांपैकीं कोणता तरी असेल इतकेंच समजावयाचें. जेव्हां एकाच कालीं अनेक निधनयोग येतात, तो काल कठीण असें मानण्यास हरकत नाहीं. केवळ एकाच योगावर निधन घडेल असें मात्र नाहीं. वरील गृहस्थांच्या स्त्रीचें निधन ता० १ डिसेंबर सन १९०६ शनीवार या दिवशीं रात्रीं झालें. या कालीं ग्रहस्थिति निधनयोग्य होती किंवा नाहीं याचा विचार करूं. या दिवशींचे ग्रह पुढील प्रमाणें आहेत—

रवि-धनु. चंद्र-मिथुन. नेपच्यून कर्क. हर्शल-मकर. शनि-मीन. गुरु- कर्क. मंगळ-तूळ. शुक्र-धनु. बुध-धनु. राहु-सिंह.

कलम १ मध्यें सांगितल्याप्रमाणें मकर राशींत कुटुंब स्थानीं हर्शल व चंद्र सप्तम स्थानीं बुधाच्या राशीस ह्म० शत्रुगृहीं आहे. व मंगळ कुटुंब स्थानावर पाहतो.

या दिवशाचा मंगळ तूळ राशींत असल्यामुळें शनीला पाहतो. कारण मंगळाची आपल्या स्थानापासून चवथ्या व सातव्या स्थानावर पूर्ण दृष्टि असते. ही गोष्ट कलम २ प्रमाणें आहे.

कलम ३ प्रमाणें शनीच्या ७ व्या स्थानांत ह्मणजे तूळ राशींत मंगळ आहे.

कलम ४ प्रमाणें बुधाच्या दुसऱ्या स्थानांत ह्मणजे मीन राशींत शनि आला असून सातव्या स्थानांत ह्मणजे सिंह राशींत राहु आहे.

या प्रमाणें चारही कलमांत सांगितल्याप्रमाणें पापग्रह आले आहेत ह्मणून स्त्रीनिधन झालें हें उघड आहे. असा काल प्राप्त झाला असतां ज्यांना स्त्रीनाशाचा योग नसतो त्यांच्या स्त्रिया जबर दुखणाईत मात्र होतात, त्यांचें निधन होत नाहीं.

पत्रिका करणारांना हा काल बालपणींच समजला पाहिजे व वर्षफल करणारांना त्या वर्षाच्या आरंभींच समजला पाहिजे. हर्शल हा ग्रह सन १९०४ पासूनच मकर राशींत आला आहे. तेव्हां तो त्या सालापासून ७ वर्षांत कुटुंबांत कांहीं घडामोड करणार असें अनुमान सुज्ञ ज्योतिष्याला झालें असतें.

या स्त्रीचें निधन बाळंत होऊन झालें, व मुलगी उपजतांच मृत्यु पावली. कुंडलींत जन्मकालीं पंचम स्थानांत जो शनि पडला आहे. तोच मुख्यत्वें या गोष्टीस कारण आहे. शिवाय प्रसूतिकालीं नवमस्थानीं राहु व एकादश स्थानीं मंगळ होता. हे ग्रह झालेल्या मुलीस मारक झाले. प्रसूतिकालीं गर्भस्थानें पाप ग्रहांनीं दूषित नसावीं. निदान ५।९।११ हीं स्थानें तरी तशीं नसावीं. जर असतील, तर गर्भाला अथवा होणाऱ्या मुलाला कांहीं तरी अपाय आहे, असें समजावें. प्रसूतिकाल आणि स्त्रीनिधनकाल एकच असेल, तर तो विचार करण्यासारखा व सावध राहण्यासारखा आहे असें विचारी मनुष्य

कबूल करील हें उघड आहे.

— — —

२

जन्म–ता. ११सप्टेंबर सन१८७७
मंगळवार, दि० ४ वाजून ४८मि.
सायन



या कुंडलींत कुंभ लग्नाचे २७ अंश उदित आहेत. ह्मणून मीन लग्न धरून कुंडली मांडिली आहे. असें केल्यानें ग्रह बदलत नाहींत. या गृहस्थांची स्त्री ता. ९ सप्टेंबर सन १९०६ रविवार या दिवशीं सकाळीं ९ वाजतां निवर्तली. ता. ३१ आगष्ट शुक्रवार या दिवशीं रात्रीं १२ वाजतां ताप आला. ता. २ सप्टेंबर रविवारीं रात्रीं १ वाजतां प्रसूत झाली. मूल उपजतांच गेलें. या हकीकतीचा कुंडलीशीं मेळ कसा बसतो, तो पाहूं

ता. १२ आगष्टचे ग्रह.

रवि—कन्या. चंद्र–मकर. नेपच्यून —कर्क. हर्शल–मकर. व. शनि–मीन व. गुरु—कर्क. मंगळ–सिंह. शुक्र –तूल. बुध—सिंह. राहु—सिंह.

या कुंडलींत चतुर्थ स्थानीं मेष (१) राशि असून जायास्थानीं कन्या (६) राशि आहे व या राशींत रवि आहे. तनुस्थानीं मंगळ असून तो जाया स्थानावर व बुधशुक्रांवर पूर्ण पाहतो. कारण, मंगळ आपल्या स्थानापासून ७ व्या व आठव्या स्थानावर पूर्ण पाहतो. शिवाय जाया स्थानावर शनि, राहु हे ग्रहही पाहतात. ह्यामुळें प्रथम स्त्रीचा नाश व दुसऱ्या विवाहाचा संभव या गोष्टी या कुंडलींतहीं स्पष्ट दिसतात.

वरील तारखेच्या दिवशीं जाया स्वामी जो बुध तो राहु आणि मंगळ यांसह षष्ठ स्थानीं आहे. या स्थानांत जन्मकाळीं हर्शल आहे. ह्मणजे जायास्वामी बुध हा या कालीं पापग्रहांनीं दूषित झाला. परंतु केवळ इतक्याच कारणानें

हें दुखणें जड झालेलें नाहीं. ह्यास आणखी एका जबरदस्त कारणाची जोड मिळाली आहे. तें कारण असें कीं, या दिवशीं रवि हा कन्येंत जायास्थानीं असून ह्याच्या समोरच्या मीन राशींत शनि आला आहे. जन्मकालीं हे ग्रह असेच होते. या योगाची पहिल्या योगास जोड मिळाली, ह्यामुळेंच असें अनुमान करण्यास हरकत नव्हती कीं, स्त्रीला कठीण काल आलेला आहे.

ता० ५ सप्टेंबर या एकाच दिवशीं मंगळ हा बुधाशीं युति करितो व रवि हा शनीच्या समोर येतो. हे दोन योग पुढें होणारे असून ह्यांच्या अनिष्टेंतून स्त्रीची सुटका होणें कठीण होतें, हें उघड आहे.

नवव्या तारखेला बुध कन्येच्या ३ ऱ्या अंशांत आहे. सप्तम भावाचा आरंभ सिंहेच्या २७ अंशांत उदित असल्यामुळें मंगळानें याच दिवशीं सप्तमांत प्रवेश केला अर्थात् नियमाप्रमाणें मंगळ सप्तमांत (जायास्थानीं) आला, बुध पाप ग्रहानें दूषित झाला. आणखी एक चमत्काराची गोष्ट अशी घडली आहे कीं, जन्मकाळचा मंगळ मीनेंत ११ अं. आहे. हा ग्रह कुटुंब स्वामी आहे. त्याच्या अगदीं जवळ मरणकालचा शनि आला, तेव्हांच स्त्रीला मरण आलें! कारण या दिवशीं शनि मीनेंत ११ अंशच आहे! याप्रमाणें, मरणकाळीं कुटुंब स्वामीही पापग्रहानें दूषित झाला.

ता. १३ सप्टेंबर या दिवशीं बुध हा त्या दिवशींच्या शनीच्या समोर येणार होता; त्या पूर्वीच स्त्रीनिधन झालें. हा योग व वर सांगितलेले योग जर टळले असते तर ती स्त्री निभावली असें मानितां आलें असतें.

पंचमाचा अधिपति चंद्र हा प्रसूतीच्या दिवशीं मीनेंत शनी. जवळ आला होता. या ठिकाणीं जन्मकाळीं तीन पापग्रह आहेत! यांतून चंद्राला कांहीं; एक अनिष्ट न करितां जातां येणें शक्य नव्हतें. शिवाय हर्शल हे बुवा एकादश स्थानीं आ करून बसलेच आहेत. पंचमांत नेपच्यून आहे. याप्रमाणें ५।७।११।१ हीं गर्भस्थानें

पापग्रहांनीं धरून ठेविलेलीं असल्यामुळें प्रसूतिकाल गर्भाला कांहीं तरी अपाय करणार असें अनुमान करण्यास जागा स्पष्ट दिसत होती.

प्रसूतिकालीं चंद्र हा जर कोणत्याही पापग्रहाशीं युति करीत असेल तर त्या मुलाची आशा करणें ईश्वराधीन होईल. विशेषतः त्याची शनीशीं किंवा हर्शलशीं युति घात करणारी आहे! ही युति मुलालाच अपाय करिते असें नाहीं, तर आईसुद्धां बेजार होते. अशा वेळीं औषधोपचार जारीनें करणें व ग्रहांची आराधाना करणें हितावह होईल. प्रसूतिकालीं जे ग्रह अनिष्ट येणार असतील त्यांचे आवडते पदार्थ आपण स्वतः व स्त्रीनें स्वीकारावे. त्यांचे जप करावे किंवा करवावे, ते ते पदार्थ यथाशक्ति दान करावे असें हिंदुधर्मशास्त्र सांगतें. त्याची आज्ञा पाळणें हेंच मनुष्याच श्रेष्ठतम कर्त्तव्य आहे.

पांचवें आणि ११ वें हीं मुख्य गर्भस्थानें आहेत. ११ वें स्थान हें जायास्थानापासून ५ वें आहे, व तत्स्थान हें तनुस्थानापासून ५ वें आहे. ह्मणून हीं दोन्ही मुख्य गर्भ स्थानें ह्मटलीं पाहिजेत. स्त्री ज्या महिन्यांत प्रसूत व्हावयाची असेल, त्या महिन्यांत पुरुषाच्या अगर स्त्रीच्या कुंडलींत पांचव्या किंवा नवव्या स्थानांत राहु, मंगळ, शनि हर्शल जर असेल तर बाळंत होतांना पूर्वी ज्या ज्या गोष्टींची आवश्यकता असेल त्या त्या गोष्टी तयार ठेवाव्या. आयत्यावेळीं अमुक मिळालें असतें तर बरें झालें असतें असें ह्मणण्यास जागा ठेवूं नये. मनुष्याचें कर्त्तव्य इतकेंच. मनुष्यानें आपल्या कर्तव्याला चुकूं नये इतका या शास्त्राचा उपयोग करून घेतां येईल. होणें जाणें कोणाच्याही हातीं नाहीं. फक्त प्रयत्न हातीं आहे. ज्योतिःशास्त्राच्या अध्ययनानें प्रयत्न करूं इच्छिणाऱ्या मनुष्यास पूर्वी सावध राहतां येईल असें वाटतें.

---

७ विवाहयोग.

वर	वधू
जन्म — ता. ६ डिसेंबर १८८९ दि. ११ वा. ३६ मि.	जन्म — ता. ६ अक्टोबर १८९५ सा. ५ वा. ५४ मि.
सायन	सायन





उभयतांचा विवाह ता. ४ मार्च्य सन १९०७ रोजीं कन्या लग्नावर व्हावयाचा ठरलेलें आहे. हा राशि वराच्या जायास्थानीं व वधूच्या शुक्रस्थानीं उदित आहे! यावरून विवाहकालीं कोणतें लग्न उदित असेल याबद्दल विचार सुचतात तेः—

१ वधू अगर वर यांचा लग्नराशि
२ ,, चंद्रराशि
३ ,, शुक्रराशि
४ ,, सप्तमेश अगर कुटुंबेश यांचा सप्तम राशि
५ ,, लग्न, चंद्र, शुक्र, सप्तमेश अगर कुटुंबेश यांचा सप्तम राशि

ता. ४ मार्च्य या दिवशीं रवि मीनेंत आहे, व लग्न गोरज आहे. अर्थात् त्यावेळीं सूर्याचा सप्तम राशि जो कन्या तो लग्नीं उदित असेल.

या दिवशीं चंद्र वृश्चिक राशींत आहे. हा राशि वराच्या शुक्र-स्थानीं व वधूच्या चंद्राच्या सप्तम स्थानीं उदित आहे.

याच दिवशीं बुधानें मेष राशींत प्रवेश केला आहे. बुध हा वराचा सप्तमेश असून तो त्याच्या कुटुंब स्थानीं आहे व वधूच्या लग्नीं आहे. हाच ग्रह वधूचा शुक्रा-शिस्वामी आहे.

वराचा लग्नस्वामी गुरु हा कर्क राशींत आहे व वधूचा सप्तमेश शुक्र हा मकर राशींत आहे त्यामुळें ते एकमेकांच्या सप्तम स्थानीं आहेत.

वधूचा लग्नस्वामी मंगळ हा धनु राशींत आहे व वराचा सप्तमेश बुध हा मेष राशींत आहे. या उभयतांत नवपंचम हा त्रिकोणदृष्टियोग घडलेला आहे. व वधूचा जो लग्नस्वामी तोच वराचा कुटुंबस्वामीही आहे.

वधूचा सप्तमेश व कुटुंबेश शुक्र हा मकर राशींत ह्म० वराचा लग्नस्वामी जन्मकाली ज्या राशींत आहे त्याच राशींत आहे.

वराचा सप्तमेश बुध हा मेष राशींत ह्मणजे वधूच्या लग्नस्वामी जन्मकाली ज्या राशींत आहे त्याच्या सप्तमांत आहे.

वरील गोष्टींचें साम्य पाहून या दैविक चमत्काराचें आश्चर्य वाटल्या वांचून राहणार नाहीं. विवाहाचा मुहूर्त जरी मनुष्येंच ठरवितात, तरी तो केवळ त्यांच्याच हातीं असेलसें दिसत नाहीं. तो ईश्वरी सूत्राप्रमाणेंच ठरणारा आहे. ज्योतिःशास्त्र हें ईश्वरी सूत्र पाहण्याचें एक यंत्र आहे. ह्मणून या यंत्राची जितकी माहिती होईल तितकें मनुष्याचें कल्याण अधिक होईल, हें कोणीही समंजस मनुष्य कबूल करील.

आज जे हे विचार वाचकांच्या पुढें मांडले आहेत, त्यांचा त्यांनीं अनुभव घ्यावा. जर हे विचार चुकीचे आहेत. असें नजरेस येईल तर ते उदाहरणासह प्रसिद्ध करावे ह्मणजे त्यांच्या सत्यासत्यतेचा विचार करण्यास ठीक पडेल.

———

८ विवाहकाल.

सायन



ही एका मुलीची कुंडली आहे. हिचें लग्न आजतागायत जुळलें नाहीं. तथापि तें या वर्षी मंगळ मकर राशींत आहे, तों जुळणार हें खास आहे. मंगळ २ एप्रिलपासून १४ अक्टंबर पर्यंत मकर राशींत आहे. या अवधींत शुक्र आणि बुध हे कोणत्या राशीवर असले पाहिजेत हें ठरवावयाचें आहे.

बुध हा कुटुंबेश आहे. तो एप्रिल मध्यें मीन आणि मेष राशींत आहे व शुक्र बहुतेक मीनेंतच आहे. यांत शुक्र हा लग्नेश आहे. आतां बुध व शुक्र हे दोन्हीं या महिन्यांत एकाच राशीवर आहेत, ही गोष्ट खरी. पण या वेळीं विवाह न होण्यास कारणें आहे तीं अशीं—

१ लें.— या महिन्यांत विवाह मुहूर्त नाहींत.

२ रें.— बुध व शुक्र यांची युति होत नाहीं.

३ रें.— हे दोन्ही ग्रह लग्नेश सप्तमेश, कुटुंबेश, शुक्र अगर चंद्र या जन्मकालच्या ग्रहांशीं युत होत नाहींत, किंवा त्यांच्या सप्तमस्थ राशींतही येत नाहींत अथवा त्यांचा अन्योन्य क्षेत्रस्थ संबंधही घडत नाहीं.

या तीन कारणांनीं एप्रिलमध्यें विवाह होऊं शकत नाहीं हें सिद्ध आहे.

वैशाखांतील मुहूर्त व त्या दिवशींचा चंद्र

शु. २ — १४ मे. मीन
,, ३ — १५ ,, मीन
,, ८ — २० ,, सिंह
,, १० — २१ ,, कन्या
,, ११ — २३ ,, तूळ
,, १३ — २५ ,, वृश्चिक
,, १५ — २७ ,, धनु

कृ २ — २९ ,, मकर

मे मध्यें ता. २४ पर्यंत बुध वृषभ राशींत असून ता. २३ पर्यंत शुक्र मेष राशींत आहे.

वृषभ राशीचा बुध हा जन्मकालच्या बुधाच्या सप्तमांत व मेष राशीचा शुक्र हाही जन्मस्थ शुक्राच्या सप्तमांत येतो. नंतर शुक्र हा वृषभ राशींत लग्नीं जन्मस्थ चंद्राच्या सप्तमांत व बुध हा कुटुंब स्थानीं हाता तात्पर्य सर्व महिना विवाहास अनुकूलच आहे हें उघड आहे.

मीन, सिंह किंवा कन्येचा चंद्र हा विवाहास योग्य स्थितींत नाहीं फक्त तूळ आणि वृश्चिक राशीचा चंद्र विवाह घडवील असा आहे. कारण तूळ राशींत जन्मकाळीं शुक्र असून तो जायास्वामी जो मंगळ त्याच्या सप्तमांत आहे. परंतु तो षष्ठस्थ असून जन्म राशीला १२ वा येतो. तेव्हां कदाचित् या मुहूर्तावर विवाह होणार नाहीं. पण वृश्चिक राशीवर झाल्याशिवाय राहणार नाहीं. हा राशि सप्तम स्थानीं उदित असून याच राशींत जन्मकाळीं चंद्र व कुटुंबेश बुध आहे. तात्पर्य ता. २५ मे हा दिवस मुकरर असून ता. १४।१५ हे दोन दिवस संशयित आहेत. अनुभवाप्रमाणें पुढें दोन शब्द लिहूं. आज इतकेंच पुरे.

सूचना:— लग्नमास चालू आहे. व पुढ वैशाखांतही लग्नें बरींच होणार आहेत. यासाठीं शोधक वाचकांनीं वधूवरांचे जन्मकाल व मुहूर्तकाल मिळवून इकडे पाठविल्यास वर्णनासह प्रसिद्ध करितां येतील. अनेक प्रकारच्या कुंडल्या पाहिल्यावर कदाचित् जगदुपयोगी एखादा महत्वाचा सिद्धांत बाहेर पडेल. "ए. कुं. वि."

कुंडलीविज्ञान

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्ति ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यते ऽस्ति मम कोऽपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥
'भवभूतिः,

पुस्तक ७ वें.] चैत्र कृ० ४, बुधवार [अंक ७ वा.

१ विवाहकाल

पुस्तक ६ च्या अंक ४।५ मध्यें व नंतर अंक १२ मध्यें ज्या एका मुलीच्या विवाहकालाचा निर्णय केला होता, त्या मुलीचें लग्न ता. १४ एप्रिल या दिवशीं जमलें, हें कळविण्यास आनंद वाटतो. हें लग्न 'एप्रिलच्या ९ वी पासून १२ वी पर्यंत · जुळेल' असें अंक १२ मध्यें भविष्य केलें होतें. हा काल अति महत्वाचा होता वास्तविक याच कालांत विशेष घडामोड झाली. ३।४ ठिकाणांहून कोणतें तरी ठिकाण याच कालांत जुळण्याच्या रंगांत होतें. शेवटीं ता. १४ ला एका ठिकाणीं जुळलें यांत दोन दिवसांची तफावत पडली. ९ वी पासून १२ वी पर्यंतचा चंद्र मीन व मेष राशींत होता. हे दोन्ही राशि मुलीच्या सप्तमांत उदित होते, ह्मणून हा काल आह्मी सिद्ध केला होता. १३ वीला रात्रीं चंद्र वृषभ राशीला नवमस्थानीं बलवान् झाला, तेव्हां हें लग्न कायम झालें. तरी त्याची वाटाघाट ९ ते १२ पर्यंतच विशेष होती. ह्मणजे याच वेळीं कारण

उत्पन्न झालें व कार्याचा शेवट १४ वीला झाला. कार्याच्या शेवटापेक्षां आरंभ जास्त महत्वाचा आहे. शेवट जाणण्यास व्यवहार समजावा लागतो. आंपण घरांतून बाहेर केव्हां पडूं हें ज्योतिःशास्त्रानें ठरवितां येईल, पण विवाक्षित स्थलीं कधीं पोहोंचूं, हें ठरविण्यास व्यवहारच समजला पाहिजे. त्याचप्रमाणें वरील गोष्ट आहे हें उघड आहे. असो एथपर्यंत ४ महिने पूर्वी जरी भविष्य करितां आलें तरी तें स्तुतीस पात्रच आहे असें आह्मीं समजतों.

वर.	वधू.
जन्म — ता. १५ जाने. १८८६	जन्म — १३ एप्रिल १८९४
शु. सकाळीं ११ वाजून १६ मि.	दि. ३ वाजून ३० मि.



१ उभयतांचा शुक्र एकाच राशींत आहे.

२ वधूचा सप्तमेश गुरु हा वराच्या सप्तम स्थानीं व वराचा सप्तमेश शुक्र हा वधूच्या सप्तम स्थानीं आहे.

३ उभयतांचा कुटुंबस्वामी शुक्र हा एकच आहे.

४ वराचा लग्नेश मंगळ हा वराच्या कुंडलींत ज्या राशींत आहे, त्या राशींत वधूचें लग्न आहे.

५ वधूचा लग्नेश बुध हा वधूच्या कुंडलींत ज्या राशींत आहे तींत वराचा शुक्र आहे.

६ वराचा लग्नेश मंगळ हा वधूच्या कुंडलींत जेथें आहे, त्याच्या

कुटुंबस्थानीं वधूचा लग्नेश आहे याच ग्रहांत वराच्या कुंडलींत नवपंचम योग झाला आहे.

७ उभयतांच्या कुंडलींत मंगळ एकाच स्थानांत आहे.

८ वधूचा राहु वधूच्या कुंडलींत ज्या राशींत आहे, तो राशि वराच्या लग्नीं आहे व वराचा राहु वराच्या कुंडलींत ज्या राशींत आहे, त्या राशींत वधूचें लग्न आहे.

याप्रमाणें या दांपत्यांत ८ योग झाले आहेत. या वर्षाच्या अंक ५ मध्यें व अंक ६ मध्यें जे दांपत्ययोग दाखविले आहेत ते व वरील योग यांवरून एक सामान्य सिद्धांत दृष्टोत्पत्तीस येतो, तो असा—

१ लग्नेश लग्नेश एक
२ लग्नेश सप्तमेश एक
३ लग्नेश कुटुंबेश एक
४ लग्नेश चंद्रेश एक
५ लग्नेश शुक्रेश एक
६ सप्तमेश सप्तमेश एक
७ सप्तमेश कुटुंबेश एक
८ सप्तमेश चंद्रेश एक
९ सप्तमेश शुक्रेश एक
१० कुटुंबेश कुटुंबेश एक
११ कुटुंबेश चंद्रेश एक
१२ कुटुंबेश शुक्रेश एक
१३ चंद्रेश चंद्रेश एक
१४ चंद्रेश शुक्रेश एक
१५ शुक्रेश शुक्रेश एक

आतां, अंक ५ मधील योग पहा.—

वराचा लग्नेश मंगळ तोच वधूचा सप्तमेश आहे. किंवा वधूचा लग्नेश शुक्र तोच वराचा सप्तमेश आहे. व वधूचा शुक्रेश बुध तोच वराचाही शुक्रेश आहे. (चंद्रेश ह्मणजे चंद्र ज्या राशींत आहे, त्या राशीचा स्वामी व शुक्रेश ह्मणजे शुक्र ज्या राशींत आहे, त्या राशीचा स्वामी.)

अंक ६ मधील योग पहा.—

वराचा कुटुंबेश रवि तोच वधूचा लग्नेश आहे. उभयतांचा सप्तमेश शनि हा एकच आहे. व वधूचा कुटुंबेश बुध तो वराचा शुक्रेश आहे.

याच नियमानें आजचाही दांपत्ययोग आहे. कारण उभयतांचा शुक्रेश गुरु हा एकच आहे किंवा

उभयतांचा कुटुंबेश शुक्र एकच आहे.

वधूच्या कुंडलीवरून वराची कुंडली अगर वराच्या कुंडलीवरून वधूची कुंडली करितां यावी, हें आपलें मुख्य साध्य आहे, व त्याची सिद्धता पृथक्करणपद्धतीनें किंवा प्रयोगपद्धतीनें करावयाची आहे. आज आपणास मागल्यापेक्षां पुष्कळ समजलें असून साध्याच्या जवळ जवळ आपली गति झाली आहे. वाचकांस जें हें ज्ञान प्राप्त झालें आहे तें अपरिपक्व आहे, तरी त्याची किंमत जे जाणत नसतील, ते कृतघ्न होत. हें ज्ञान कोणत्या पुस्तकांत अगर ग्रंथांत आहे तें हे कृतघ्न जर दाखवून देतील तर त्यांच्या लेखाला किंमत येईल. 'राफेलचीं व सूर्यनारायणरावांचीं पुस्तकें वाचून कुंडलीविज्ञानाबद्दल जें काय अनुमान करावयाचें असेल तें करावें,' म्हणून उलट्या बोंबा मारणारांनीं कृतघ्नतेच्या दोषाला पात्र होऊं नये, हें बरें. असो असल्या कवडीमोल लेखांनीं कोणतीहि गोष्ट जरी सिद्ध होत नसली तरी ते प्रतिपक्षाच्या शांततेचा भंग करितात व तिरस्कार आणि उद्वेग उत्पन्न करितात. यामुळेंच हे शब्द या ठिकाणीं बाहेर पडले. वास्तविक चालू विषयांशीं यांचा कांहीं संबंध नाहीं. असो – आपलें साध्य सिद्ध करण्यासाठीं इतक्याच गोष्टी पुरेशा होतील कीं आणखी कांहीं गोष्टींची आवश्यकता आहे, या गोष्टींचा अद्यापि विचार करणें आहे. तोंपर्यंत वाचकवर्गाला झालेल्या ज्ञानाचाच प्रत्यय घेण्यास व देण्यास सवड देणें जरूर आहे.

या दांपत्याचा विवाह ता. २२ मे बुधवार या दिवशीं होण्याचें ठरलें आहे. त्या दिवसाचे प्रातःकालचे ग्रह मोठ्या अक्षरांनीं दाखविले आहेत, ते पुढील पृष्ठावर पहा.—

वर. वधू.





यावरून [१] या दिवशींचा चंद्र उभयतांच्या जन्मकालच्या शुक्राच्या सप्तमस्थ आहे. व तो वधूच्या लग्नीं आहे. [२] या दिवशींचा शुक्र उभयतांच्या जन्मकालच्या शुक्राच्या कुटुंबस्थानीं आहे. व तो वराच्या लग्नीं आहे. [३] वराचा लग्नस्वामी मंगळ व वधूचा सप्तमस्वामी गुरु हे या दिवशीं एकमेकांच्या सप्तम स्थानीं आहेत! [४] वधूचा लग्नेश बुध हा तिचाच कुटुंबेश जो शुक्र त्याच्या कुटुंबस्थानीं व वराच्याही कुटुंबस्थानीं आहे.

वधूच्या जायास्थानीं शुक्र व बुध हे दोन शुभ ग्रह आहेत, यावरून हिला जो पति मिळणार तो गुणसंपन्न, सुंदर व विद्वान् असेल असें पूर्वी साधारण ज्योतिष्यासही सांगतां येण्यासारखें होतें. वास्तविक स्थिति तशीच आहे. श्रीमंत घराण्यांतला जन्म असून युनिव्हर्सिटीच्या डिग्रीला आज पात्र आहे.

वधूच्या कुटुंबस्थानीं शनि असून समोर रवि आणि राहु हे दोन पाप ग्रह आहेत. त्यामुळें तिला कुटुंबांतील माणसांचें सुख अल्प आहे. वधूला सासू नाहीं हें वराच्या कुंडलीवरूनही समजेल. त्याच्या कुंडलींत चतुर्थ स्थानीं शनि असून समोर रवि आहे. हा योग उभयतांच्याही कुंडलींत स्पष्ट आहे. सासू हें मुलीच्या कुटुंबांतील एक

प्रमुख ममुष्य आहे. तें नाहीं असें मुलीची कुंडलीही दर्शविते. ज्याप्रमाणें मुलीला सासू नाहीं, त्याच प्रमाणें मुलालाही नाहीं. वराला किंवा वधूला सासूसासरे नाहींत व असल्यास त्यांचें सुख त्यांस कितपत मिळेल, हा विषय स्वतंत्र आहे. त्याचा विचार सवडीप्रमाणें व्हावयाचा आहे.

२

वर.

जन्म — शके १८०९ माघ शु. १४ शुक्रवार सू. घ. ९।२५ सायन



वधू.

जन्म – श. १८१६ माघ कृ. १४ शनिवार सू. घ. १३।५७ सायन



सदरहु दांपत्याच्या कुंडल्या रा. नथूराव गोखले यांच्याकडून आलेल्या आहेत. या दांपत्याचा विवाह ता. ८ मार्च्य १९०७ रोजीं रात्रीं १० घ.स झाला. याबद्दल ते लिहितात, "सखेद कळवितों कीं, फेब्रुवारीच्या अंकांतले योग येथें लागू पडत नाहींत." सबब त्यांचें विवेचन येथें करावयाचें आहे.

यांतील दांपत्य योग.

[१] वधूच्या कुटुंबस्थानीं जो कर्क राशि उदित आहे, त्या राशींत वराचा चंद्र आहे.

[२] वधूच्या सप्तमांत जो राशि उदित आहे त्या राशींत वराचा शुक्र [गुरूसह] आहे.

(३) वधूच्या लग्नीं व वराच्या शुक्राजवळ गुरु आहे.

(४) वराचा सप्तमेश शुक्र व वधूचा सप्तमेश गुरु हे दोन्ही ग्रह वराच्या कुंडलींत एकत्र आहेत.

(५) वधूचा कुटुंबेश चंद्र हा वधूच्या कुंडलींत ज्या राशींत आहे त्याच राशींत तिचा लग्नेश बुध हा वराच्या कुंडलींत आहे.

(६) वराचा कुटुंबेश शुक्र हा वराच्या कुंडलींत ज्या स्थानांत आहे, त्याच स्थानांत वधूचा कुटुंबेश वधूच्या कुंडलींत आहे.

विवाहकालीं चंद्र मकरेंत आहे. हा राशि वराच्या चंद्राच्या सप्तम स्थानीं व वधूच्या कुटुंब राशीच्या सप्तमांत आहे! अथवा वराचा कुटुंबेश जो शुक्र त्याच्या कुटुंब स्थानीं आहे.

वराचा लग्नेश मंगळ हा या दिवशीं धनु राशींत आहे. ह्मणजे वधूच्या कुंडलींत सप्तम स्थानीं आहे! अथवा वराच्या शुक्रस्थानीं आहे!

वधूचा लग्नेश बुध हा या दिवशीं मेष राशींत आहे. ह्मणजे वराच्या लग्नीं अथवा वराच्या लग्नेशाच्या सप्तम स्थानीं आहे! व परस्परांचे लग्नेश परस्परांच्या त्रिकोणांत आहेत.

वराचा कुटुंबेश शुक्र हा या दिवशीं वधूचा कुटुंबेश जो चंद्र त्याच्याच राशींत आहे. ह्मणजे उभयतांचे कुटुंबेश हे विवाहकालीं एकाच राशींत आहेत.

परस्परांचे सप्तमेश परस्परांच्या सप्तम स्थानीं आहेत.

यावरून ध्यानांत येईल कीं वधूवरांचे विवाहयोग नियमांस सोडून नाहींत. दांपत्ययोग हे जन्मकालच्या ग्रहांवर पहावयाचे व विवाहयोग हे जन्मकालाच्या व फिरतीच्या ग्रहांवर पहावयाचे हें ध्यानांत असावें. विवाहकालाचा आणखी थोडा विचार केला तर आपल्या ध्यानांत एक महत्वाची गोष्ट येते ती अशी.—

लग्नेश, कुटुंबेश किंवा सप्तमेश यांपैकीं एक अगर अनेक ग्रह हे विवाहकालीं जन्मकालच्या त्याच ग्रहांच्या कुटुंबस्थानीं (दुसऱ्यानीं) असावयाचेच.

वधूच्या कुंडलींत लग्नेश बुध, सप्तमेश गुरु व कुटुंबेश चंद्र आहे. यांपैकीं विवाहकालीं गुरु ककेंत होता. ह्मणजे जन्मगुरूच्या दुसऱ्या अर्थात् कुटुंबस्थानीं होता. व लग्नेश बुध हा त्याकालीं मेष राशींत ह्मणजे जन्मबुधाच्या दुसऱ्या अर्थात् कुटुंबस्थानीं होता. चंद्र मात्र तसा नव्हता.

आतां, वराची कुंडली पहा. हींत लग्नेश मंगळ असून कुटुंब व सप्तम यांचा अधिपति शुक्र हा एकच ग्रह आहे. तो त्या दिवशीं मकर राशींत असल्यामुळें जन्मशुक्राच्या कुटुंब स्थानीं होतो.

पहिल्या दांपत्य योगांत वराचा कुटुंबेश व सप्तमेश शुक्र हाही याचप्रमाणें त्या कुंडलींत जन्म शुक्राच्या कुटुंब स्थानीं आहे. व वधूच्या कुंडलींत कुटुंबेश शुक्र हा जन्मशुक्राच्या कुटुंब स्थानीं व सप्तमेश गुरु हा जन्मगुरूच्या कुटुंब स्थानीं आहे. यावरून हा नियम फार महत्वाचा दिसतो. या एका नियमावरूनही विवाहकाल कित्येक कुंडल्यांत ठरवितां येईल. सर्वच कुंडल्यांस हा नियम लागू होईल अशी खात्री नाहीं. तथापि वराच्या किंवा वधूच्या किंवा दोहोंपैकीं कोणा एकाच्या तरी कुंडलींत दृष्टीस पडलाच पाहिजे.

पुस्तक ७ अंक २ मध्यें वर व वधू यांच्या कुंडल्या आहेत, त्या पहाव्या. त्यांपैकीं वराच्या कुंडलींत विवाहकालीं सप्तमेश बुध हा कुटुंब स्थानीं आला आहे. ह्मणजे तो लग्नाच्या कुटुंबस्थानीं आला, लग्नेश गुरु हा जन्मचंद्राच्या कुटुंबस्थानीं आला व कुटुंबेश मंगळ हा जन्मशुक्राच्या कुटुंबस्थानीं आला ऐथें सर्वच योग लग्न, चंद्र व शुक्र यांस अनुसरून घडले.

आतां वधूची कुंडली पहा. हींत कुटुंबेश व सप्तमेश शुक्र हा एकच ग्रह आहे. लग्नेश मंगळ आहे. विवाहकालीं शुक्र मकरेंत व मंगळ धनु राशींत आहे. ह्मणजे सप्तमेश हा लग्नेशाच्या कुटुंबस्थानीं आला. पण हा योग जन्म ग्रहांशीं झाला नाहीं. ह्मणून ही कुंडली अपवादात्मक समजली पाहिजे. या दिवशीं चंद्र मात्र जन्ममंगळाच्या कुटुंबस्थानीं आहे.

असल्या कुंडल्यांत विवाहकाल शोधून काढण्यास ज्योतिष्यास आपलें बरेंच चातुर्य खर्च करावें लागेल. सहज बोध होणार नाहीं. या मुलीचा विवाह केव्हां होईल असा प्रश्न जर आपल्यास कोणी केला असता तर त्याचें उत्तर देण्यास फार कठीण गेलें असतें.

फार लांबच्या कालाची कल्पना गुरू किंवा शनिवरून करावयाची असते वरील वधूची जन्मकालींच आपण पत्रिका करीत आहों अशी कल्पना करूं. कुंडली अशी आहे—

जन्म–ता. ६ अकटंबर १८९५

सा. ५ वाजून ५४ मि.

सायन



विवाहकालाची मर्यादा जातीवर अवलंबून आहे. ही मुलगी ज्या जातीची आहे त्या जातीचें विवाहाची मर्यादा ८ पासून १४ वर्षांपर्यंत आहे. ह्मणून या मधील ७ वर्षांतला विवाहकाल आपणास निश्चित केला पाहिजे हें उघड आहे. ह्मणजे कुंभ राशीच्या गुरूपासून वृश्चिक राशीच्या गुरूपर्यंतचा काल विवाह मर्यादेचा आहे. यांतील कोणत्या राशीवर गुरू पाहिजे हें जर निश्चयानें सांगतां आलें तरच विवाहाचें वर्ष बिनचूक समजेल. परंतु विवाहकाल गुरूवरच केवळ अवलंबून नाहीं. त्यामुळें तो अगोदर १०।५ वर्षें ठरविणें फार अवघड आहे. ९ व्या अगर ११ व्या गुरुवरूनच हें सांगतां येईल असें नाहीं. आमच्या मतें प्रथम गुरूची कल्पना करावयाची ती पुढीलप्रमाणें करावी.

१ जन्मकालच्या गुरूंत, चंद्रांत अगर शुक्रांत नवपंचम योग

२ जन्मकालच्या गुरूच्या चंद्राच्या अगर शुक्राच्या कुटुंबस्थानीं त्याच राशींस अगर त्याच्या सप्तम राशींत.

वधू

सप्तमे लग्नीं, सप्तम स्थानीं अगर युद्धुंब स्थानीं.

४ जन्मकालचा गुरु विवाह-कालच्या गुरूच्या कुटुंबस्थानीं.

यांतील शेवटचा गौण पक्ष आहे. तरी तो कित्येक ठिकाणीं दृष्टीस पडतो. वरील कुंडलींत विवाहकालीं गुरु कर्क राशींत होता म्हणजे तो शेवटल्या नियमाप्रमाणें होता. हा गुरु पतीच्या कुंडलींत जन्मकालच्या सप्तमांत होता म्हणजे नियम २ प्रमाणें होता. आजच्या अंकांतील प्रथमच्या वराच्या कुंडलींत तो शुक्राच्या पंचमांत होता व वधूच्या कुंडलींत तो जन्मगुरूच्या कुटुंबस्थानीं (नि. २ प्रमाणें) होता. तिच्या कुंडलींतही त्याचा जन्म शुक्राशीं नवपंचम योग झाला आहे.

आतां नं. २ चें जोडपें पहा. यांतील वराच्या कुंडलींत तो चंद्र-स्थानीं (नि. २ प्रमाणें) होता. व वधूच्या कुंडलींत तो लग्नाच्या किंवा जन्मगुरूच्या कुटुंबस्थानीं (नि. ३ प्रमाणें) होता.

पुस्तक ७ अंक २ मध्यें ज्या एका मुलीच्या लग्नाचें भविष्य केलें आहे, तिच्या कुंडलींत तो गुरुस्थानीं असणार आहे. त्यामुळें तो व चंद्र यांत (नि. १ प्र.) नवपंचम योग होणार आहे.

फलज्योतिष हें शास्त्र आहे व त्यांतील गोष्टी विवक्षित नियमांनींच घडतात हें कोणासही नाकबूल करितां येणार नाहीं. तरी अमुक कुंडलींत अमुकच नियमानें एखादी गोष्ट घडेल हें ग्रंथकारास सांगतां येणार नाहीं. ज्योतिषी जितका अनुभविक, चतुर व कल्पक असेल तितकें त्याचें भविष्यही त्या प्रमाणांत उतरेल. आतां पर्यंत केलेलें विवेचन याच प्रकारचें आहे असें समजावें. हे नियम अनेक ठिकाणीं जो कोणी अनुभवून पाहील तो एखाद्याचा विवाहकाल विनचूक निश्चित करूं शकेल अशी आमची समजूत आहे.

आजचा विषय छापण्याचें काम चालू असतां रा० काशीनाथ घोंडो

लेले–नाशिक–यांच्याकडून एका दांपत्याच्या कुंडल्या आल्या आहेत. त्या त्यानींच वर्णन करून पाठविल्या असल्यामुळें एथें खालीं दिल्या आहेत. यावरून आमच्या लेखाची सत्यता सिद्ध होणार आहे.

वर.	वधू.
जन्म – १७९४ श्रा. शु. १५	जन्म – १७९८ फा. व. ७
सू. घ. ५२।३०	सू. घ. ३२।२४



१ उभयतांचा लग्नस्वामी एकच (बुध) आहे.

२ वराची रास कुंभ असून याच राशींत वधूचा शनि आहे.

३ वर व वधू यांचा सप्तमेश एकच (गुरु) आहे. व तो वधूच्या कुंडलींत वराच्या सप्तमस्थ जो राशि आहे त्यांत आहे.

४ वराचा चंद्र व वधूचा शुक्र एकाच राशींत आहेत.

५ वराच्या शुक्राच्या कुटुंबराशींत वधूचें लग्न आहे.

यांचा विवाह शके १८०७ मार्ग. व. ४ सायंकाळीं कर्क लग्नीं झाला आहे. या दिवशींचे ग्रह येणेंप्रमाणें आहेत.—

र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.
९	५	५	८	६	१०	३	५

या ग्रहांचा त्यांच्या कुंडल्यांशीं कसा मेळ बसतो तो पहा.—

पुरुषाच्या कुंडलींत सप्तमस्थ शनि आहे. तो या कालीं लग्नीं आला.

गुरु हा पुरुषाच्या कुंडलींत लग्नेश जो बुध त्याच्या अगर शुक्राच्या कुटुंबस्थानीं आला व स्त्रीच्या कुंडलींत लग्नीं आला.

चंद्र पहिलींत जन्मचंद्राच्या व दुसरींत जन्मशुक्राच्या सप्तमांत आला..

शुक्र पहिलींत जन्मगुरूच्या सप्तमांत व कुटुंब स्थानासमोर आला आणि दुसरींत जन्मगुरूच्या कुटुंबस्थानीं आला.

बुध पहिलींत मिळत नाहीं. दुसरींत मात्र तो जन्मचंद्राच्या राशींत आला.

वरील वर्णन आमच्या विवेचनाशीं तंतोतंत जुळत आहे. या कुंडल्या निरयन आहेत. तरी अनुभव बरा आला आहे. परंतु विवाहकालचा बुध हा या पद्धतींत वराच्या कुंडलींत जमला नाहीं. ह्मणून या कुंडल्या सायन करून त्यांचें विवेचन पुढील अंकीं करूं.



विवाहकाल

सातव्या पुस्तकाच्या १८ व्या अंकांत एक कुंडली घेऊन तीवरून त्या मुलीचा विवाह 'ता. १४ डिसेंबरला होईल. ता. ८।१४।१८।२३ २४।२७।३० या सर्व तारखांस चंद्र अनुकूलच आहे.' असें सांगितलें होतें. हें भविष्य आगष्टमधील ह्मणजे ४ महिने अगोदरचें आहे! या मुलीच्या बापाचें पत्र पुण्याहून आलें. त्यांत ता. १४ ला विवाह जुळून आला होता. पण आयत्या वेळीं फिसकटलें. तथापि तोच बर पुढें कायम होऊन ता. ३० ला विवाह झाला. स्थळ मनाप्रमाणें उत्तमोत्तम मिळालें, ज्या वारीं जन्म त्या वारींच लग्न झालें.

मुलीची कुंडली

जन्म-ता.२६।११।९४ इ. घ.१३।४०

सायन



लग्नस्वामी—गुरु. कुटुंबस्वामी—मंगळ
जायास्वामी—बुध

जन्मकालचे ग्रह.

गुरु—कर्क बुध—वृश्चिक
मंगळ—मेष शुक्र—धनु
चंद्र—वृश्चिक

विवाहकालचे ग्रह

गुरु—सिंह. बुध—मकर. मंगळ—मीन.
शुक्र—कुंभ. चंद्र—वृश्चिक

[१] लग्नस्वामी गुरु आपल्या कुटुंबस्थानीं आला.

[२] जायास्वामी बुध लग्नेशाच्या जायास्थानीं आला.

[३] जायास्वामी बुध शुक्राच्या कुटुंबस्थानीं आला.

[४] शुक्र हा या बुधाच्या कुटुंबस्थानीं आला.

[५] कुटुंबस्वामी मंगळ हा शुक्राच्या कुटुंबस्थानीं आला.

[६] चंद्र हा जायास्वामीच्या राशीसच आला.

ता० १४ ला चंद्र मेषेंत होता, ह्मणजे कुटुंबेशाच्या राशीस होता, ह्मणून आह्मीं या चंद्रावर विवाह होईल, ह्मसें अनुमान केलें. पण तो जायास्वामीच्या राशीस असतां झाला,

हेंही योग्यच झालें. विवाहकालाचा चंद्र अमुक एका राशीवरच असतो, असा नियम नाहीं. त्यामुळें विवाहाची तारीख सदासर्वदा ब्रह्मदेवाच्या बापालाही सांगतां येणार नाहीं. अंक २ मध्यें विवाहयोग दिला आहे, त्यांत विवाहकालाचा चंद्र वृश्चिक राशींत होता. ह्मणजे वराच्या शुक्रस्थानीं व वधूच्या चंद्राच्या सप्तम स्थानीं होता. पण येथें एक चमत्कार आहे. तो असा कीं, वराचा जायास्वामी बुध हा वधूच्या कुंडलींत वृश्चिक राशींत आहे व वधूचा लग्नस्वामी शुक्र हा वराच्या कुंडलींत वृश्चिक राशींत आहे. त्यामुळें त्यांचा विवाह वृश्चिक राशीच्या चंद्रावरच झाला. याच अकांत विवाहकाल या सदराखालीं एका मुलीचा विवाह ता. २५ मेला होईल असें भविष्य तीन महिने अगोदर केलें होतें, तें तंतोतंत खरें ठरलें. ही मुलगी महाडचीच आहे. हिचा चंद्र वृश्चिक राशींतच होता. ह्मणजे तो तिच्या सप्तमस्थानीं, जन्मस्थ चंद्राच्या व कुटुंबेश जो बुध त्याच्या राशीस होता.

अंक ७ मध्यें ज्या दांपत्ययोगाच्या कुंडल्या दिल्या आहेत, त्या पहा. त्यांत विवाहकालाचा चंद्र कन्येंत होता. ह्मणजे वराच्या लग्नेशाच्या राशीस व वधूच्या लग्नेशाच्या सप्तमांत व लग्नीं असा होता. त्याचप्रमाणें उभयतांच्या शुक्राच्या सप्तमस्थ होता. याच अंकांत नं. २च्या वधूवरांच्या कुंडल्या पहा. त्यांत विवाहकालीं चंद्र मकरेंत होता. ह्मणजे वराच्या चंद्राच्या सप्तमांत व वधूच्या कुटुंबस्थानाच्या सप्तमांत होता. त्याच अंकांत रा० काशिनाथ धोंडो लेले यांच्याकडून आलेल्या वधूवरांच्या कुंडल्या पहा. त्यांत विवाहकालाचा चंद्र वराच्या चंद्राच्या [कुटुंबेशाच्या] सप्तमांत व वधूच्या शुक्राच्या [कुटुंबेशाच्या] सप्तमांत आहे.

अंक ११ तील कुंडल्या पहा. त्यांत विवाहकालचा चंद्र वृश्चिक राशींत वधूच्या शुक्रस्थानीं व वराच्या लग्नेशाच्या कुटुंबस्थानीं होता. वरील सर्व उदाहरणांवरून विवाहकालीं वधूच्या कुंडलींत चंद्र कसा कसा आढळला तो पहा —

१ जायास्वामीच्या अथवा चंद्राच्या राशीस

२ चंद्राच्या सप्तमस्थानीं

३ जायास्थानीं चंद्राच्या व कुटुंबेशाच्या राशीस

४ लग्नीं लग्नेशाच्या सप्तमांत व शुक्राच्या सप्तमांत

५ कुटुंबस्थानाच्या सप्तमांत

६ कुटुंबेशाच्या सप्तमांत

७ शुक्रस्थानीं

इतके प्रकार चंद्राचे आढळतात. ह्मणजे शुक्र, चंद्र, लग्न, कुटुंबस्थान, लग्नेश व कुटुंबेश यांच्या राशीस किंवा सप्तमस्थानीं चंद्र असावयाचा. या चंद्राच्या १२ स्थितींतून कोणतीही एक स्थिति कायम करणें किती अवघड आहे, याचा वाचकांनीं विचार करावा. अशा बिकट स्थितींत सुद्धां १४ वी तारीख सांगतां आली, याबद्दल मुलीच्या बापास जरी समाधान झालें नसलें तरी आम्हांस झालें आहे !

विवाहकालाचा चंद्र जसा जन्मस्थ ग्रहांवरून जाणावयाचा तसाच तो विवाहकालच्या ग्रहांवरून जाणिला पाहिजे व या दोहोंचा मेळानें कायम केला पाहिजे. म्हणून अभ्यासी मनुष्यानें प्रथम चारपांचशें कुंडल्यांचा अनुभव घेतला पाहिजे, म्हणजे तो या कामांत चांगला वाकबगार होईल. आमचें काम अभ्यासी मनुष्यांस दिशा दाखविण्याचें आहे. व तें यथाशक्ति केलें आहे.

आम्हीं अगदीं खात्रीनें सांगूं शकतों कीं, या विवाहकालच्या चंद्राचें ज्ञान अलगूबलगू जोशास असणें शक्य नाहीं. दहापांच औषधें माहिती असणारा वैद्य जसा सर्जन नव्हे, तसाच कुंडलीचें वर वर ज्ञान असणारा ज्योतिषी नव्हे. ज्योतिषी हे उपपद विद्वान् व मार्मिक लोकांनां दिलेलें पाहिजे. आपणच आपणास ज्योतिषी म्हणवून घेणें हास्यास्पद आहे.

मुलीची जन्मभूमि त्रिपुटी असून मुलाची वांई आहे. ह्मणजे तिला वायव्य दिशेकडे स्थळ मिळालें. कुंडलात गुरु याच दिशेला आहे. हा ग्रह लग्नेश आहे. व जायास्वामी बुध नैर्ऋत्येस आहे. वास्तविक नैर्ऋत्येस स्थळ मिळावें, असें सांगणारानें सांगितलें असतें. या गोष्टींचा अनुभव घेणें आहे.

वराचें वर्णन.— चेहरा उत्तम. नाक सरळ. थोडें मोठें. गौर वर्ण. बुटकेपणा. स्थूल देही. वय सुमारें ३०।३२ म्याट्रिक पास. धंदा व्यापार गर्भश्रीमत. सांपत्तिक स्थिति उत्तम पहिल्या ३ बायका मृत. हा चतुर्थ संबंध. पहिली संतति. १ मुलगी.

व १ मुलगा. मातृपितृसुख उत्तम. कुटुंब मोठें पण विभक्त (तंटे)

लग्नस्वामी गुरु त्रिकोणांत उच्च असून धन व भाग्य यांचा स्वामी मंगळ स्वगृहीं आहे व उदितार्धांत ४ ग्रह आहेत, म्हणून स्थल उत्तम मिळालें. जायास्वामी बुध हा मंगळाच्या गृहीं आहे. मंगळाचा बुध हा शत्रु आहे व तो शनि आणि हर्शल या दोन पापग्रहांनीं युक्त आहे, म्हणून चतुर्थ संबंधाचा वर मिळाला. कुटुंबस्थानीं मंगळ असल्यामुळें कुटुंबात तंटे आहेत. याप्रमाणें वराचें वर्णन कुंडलीवरून बरें जुळतें. अशा तऱ्हेचें वर्णन करितां येण्यासही पुष्कळ अनुभव घेतला पाहिजे.

मुलीला स्थळ कोणत्या दिशेला मिळेल, सासूसासरा असतील किंवा नाहींत, सांपत्तिक स्थिति कशी असेल, प्रथमवर मिळेल कीं बिजवर मिळेल, तरुण मिळेल कीं वृद्ध मिळेल. इ. विवाहसंबंधाचे प्रश्न बरेच महत्वाचे आहेत. ते ज्योतिःशास्त्रानें सुटतील तर या शास्त्राचा व्यवहारांत पुष्कळ उपयोग होईल. जुन्या पद्धतीच्या कोणत्याही जोशास विचारलें तर तो हे प्रश्न सुटतात असेंच म्हणेल. आम्हीं भरवसा देत नाहीं. या संबंधाचे विचार चालू आहेत. पुष्कळशीं उदाहरणें मिळाल्या नंतर हा विषय हातीं घेण्याचा घेण्याचा मानस आहे.

विवाहकाल आणि दांपत्ययोग या दोन विषयांबद्दल आम्हांस वेळोवेळीं जे जे विचार सुचले ते ते वाचकांस कळविले आहेत हे विचार सशास्त्र व सयुक्तिक असून अनुभव पटविणारे आहेत, अशी आतां सर्वांची खात्री झाली असेल.



उपवर मुलीस बिजवर वर केव्हां मिळतो?

बिजवर या शब्दाचा पदशः अर्थ दुसऱ्या वेळीं विवाह करूं इच्छिणारा पुरुष असा होतो. बिज+वर या दोन शब्दांचा बिजवर हा धेडगुजरी समास बनला आहे. परंतु या शब्दामध्यें कांहीं तरी इतिहास असावा अशी अल्पना होते. जर आमच्या जातींमध्यें प्राचीन काळीं एक स्त्री मेल्यावर दुसरी स्त्री वरण्याची चाल असती, तर बिजवर हें सामासिक धेडगुजरी पद कदाचित् प्रचारांत नसतें असें मानावयास जागा आहे. ज्याप्रमाणें स्त्रियांनीं एकच पति वरावा, त्याचप्रमाणें पुरुषांनींही एकच स्त्री वरावी, असा प्राचीन निर्बंध असला पाहिजे. वंशवृद्धीस्तवचे दुसरी स्त्री वरण्याची शास्त्राज्ञा असली पाहिजे. कामवासनेच्या तृप्तीसाठीं एक मेली तर दुसरी व दुसरी मेली तर तिसरी ही असुरी चाल खचित आमची नसली पाहिजे. आमच्या संसाराची रचना पारमार्थिक आहे, कालांतरानें परकीयांच्या संसर्गानें तिला ऐहिक स्वरूप प्राप्त झालेलें आहे यांत शंका नाहीं. या ऐहिक स्वरूपाचाच वरील असुरी चाल हा परिणाम असावा असें वाटतें.

बिजवर या शब्दापासून वास्तविक पाहूं गेल्यास एकच अर्थ निघतो. तो हा कीं—" दुसऱ्या वेळीं लग्न करूं इच्छिणारा पुरुष." यावरूनही आमच्या वरील अनुमानास चांगली बळकटी येते. म्हणजे कारणपरत्वें एकदां लग्न झाल्यावरही दुसरें लग्न करण्याची मुभा असावी. पण " मागून पुढून बाप नवरा " ही

जी असुरी चाल तिला परकीयांच्या संसर्गाच्या परिणामाशिवाय कांहीं आधार असेल, असें वाटत नाहीं.

बिजवर यांतील 'बिज–बिजा' हें गुजराथी भाषेतलें पद असून वर हें संस्कृत पद आहे. या दोन पदांचा संबंध होण्यास कांहीं तरी कारण असलेंच पाहिजे. जर आमच्या मध्यें प्राचीन कालापासून पुन्हा लग्न करण्याची चाल असती तर 'द्वितीयवर' किंवा 'पुनर्वर' असा किंवा अशा अर्थाचा एखादा शब्द रूढ असता असें कां म्हणूं नये? अर्थात् हें आम्ही परकीयांचेंच अनुकरण केलेलें आहे यांत शंका नाहीं. धर्मशास्त्रांतील अर्कविवाहादि कृत्यांवरून पुरुषांनीं अनेक विवाह करण्याची चाल प्राचीन कालापासून आहे असें कोणी म्हणेल, परंतु कारणपरत्वें अनेक विवाहांस आज्ञा असली पाहिजे असें आम्हांस वाटतें. पुत्रसंतति झालेल्या किंवा 'कृतांतकटकामलध्वजजरा' फडकूं लागलेल्या किंवा 'दशनविहीनं जातं तुंडं' असल्या पुरुषानें केवळ कामवासनेसाठीं एखाद्या कुमारिकेच्या गळ्यांत जिवंत वैधव्याचें मंगलसूत्र बांधावें इतकी मोकळीक आमचें धर्मशास्त्र देईल असें वाटत नाहीं.

वरील दोन पुराव्यांवरून पुरुषांनीं अनेक विवाह करण्याची चाल परकीयांपासुनच आलेली आहे असें खात्रीनें म्हणतां येतें. असो. आपणास या वादाशीं कांहीं कर्तव्य नाहीं. आपणास ज्योतिःशास्त्राच्या दृष्टीनें या विषयाचा विचार करावयाचा आहे, म्हणून आपल्या मार्गाकडे वळूं.

उपवर मुलीला प्रथमवर मिळेल कीं बिजवर मिळेल, या

प्रश्नाइतकाच तिजवर मिळेल कीं चौथवर मिळेल, अथवा **बहुवर** मिळेल हाही प्रश्न महत्वाचा आहे. आमच्या एका व्यवसायबंधूनीं उपवर मुलीला बिजवर वर केव्हां मिळतो, या संबंधानें कांहीं नियम सांगितलें असून मुलींच्या पालकांनाही इशारत दिली आहे कीं—चला उठा विचार कसचा करितां, आपण आपल्या मुलीस बिजवर वर (?) पहा. आळस कराल तर फसाल.—हा लेख वाचून आमच्या एका नूतनाभ्यासी विद्यार्थ्यानें प्रश्न केला कीं—हे जे नियम दिले आहेत ते बिजवरालाच लागू आहेत कीं तिजवर वगैरे वरांचाही याच नियमावरून विचार होतो !—आमच्या विद्यार्थ्याचा हा खोंचदार प्रश्न ऐकून काय उत्तर द्यावें याचा मोठा विचार पडला ! या विद्यार्थ्याला एक उपवर बहीण आहे, यामुळें साहजिकच त्याचें या प्रश्नाकडे लक्ष वेधलें. प्रथमतः त्याला आपणाला एक उत्तम रस्ता मिळाला म्हणून पराकाष्ठेचा आनंद झाला. पण इतक्यांत त्याच्या पुढें दुसरा विचार उद्भवला कीं, जर हे नियम बिजवरालाच लागू असतील तर ठीक आहे, तसा प्रयत्न करितां येईल. पण माझ्या ऐकण्यांत असें आहे कीं चार--पांच बायका जरी एखाद्याच्या झाल्या असल्या तरी त्याला साधारणतः बिजवरच म्हणतात. तेव्हां याही वराचा यांत अंतर्भाव होतो कीं काय ?' आम्हीं त्याला तूर्त बिजवर म्हणजे बिजवरच असें उत्तर दिलें आहे. पण त्याचें इतक्यानें समाधान होत नाहीं. तो म्हणतो आम्हाला बिजवर मिळो–कीं तिजवर मिळो, या प्रश्नाचें फारसें महत्व नाहीं. कारण, तितक्यानेंच आम्हाला वाईट वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. **बिजवर** या शब्दामध्यें जो **घोडवर** असा अर्थ निघतो तो जर असेल तर माझ्या बहिणीचें लग्न न

झालें तरी चालेल. परंतु एखादा २५ वर्षांच्या आंत असून त्याला दुसरा विवाह कर्तव्य आहे, पहिल्या बायकोचा परिवार मुळींच नाहीं तर असा वर मिळाल्यास तो तिला योग्यच आहे. तिशी उलटलेला पुरुष जर असेल तर मात्र त्याला मी बहीण देण्यास तयार नाहीं. मग तो बिजवर असो कीं प्रथमवर असो. यासाठीं मला प्रथम असें समजलें पाहिजे कीं हिला जो पति मिळवयाचा तो २९ वर्षांच्या आंतल्या वयाचा असेल कीं यापेक्षां जास्त वयाचा असेल? ज्योतिःशास्त्रानें जर कांहीं समजण्यासारखें असेल तर तें वरीलप्रमाणें समजलें पाहिजे केवळ बिजवर सोधावा इतकें कळून कांहीं फायदा नाहीं.

आमच्या विद्यार्थ्याचें म्हणणें बरोबर आहे असें वाटतें. मुलीला जो वर मिळणार, तो तिला अनुरूप मिळणार किंवा एखादा थेरडा मिळणार, त्याचप्रमाणें तो एक स्त्री जिवंत असून विवाह करणार आहे किंवा ती मेलेली आहे, तिला कांहीं मुलेंबाळें आहेत कीं नाहींत, तो वर साधारणतः किती वयाचा असेल या प्रश्नांचीं उत्तरें ज्योतिःशास्त्रानें कोणास देतां येतील तर तीं फार महत्त्वाचीं आहेत. आमच्या मतें ज्योतिःशास्त्रांत इतकें सामर्थ्य नाहीं. फार तर वराच्या वयाचा अजमास कळेल. बिजवर मिळेल कीं तिजवर मिळेल याचा उलगडा होणें अशक्य आहे. ग्रहांच्या बाल्यादि अवस्था विचारांत घेतल्यास वराच्या वयाचा अजमास होतो असेंही कित्येक ज्योतिषी म्हणतात, परंतु त्यांतही तथ्य नाहीं, असें त्या अवस्थांचा विचार करणारांच्या ध्यानांत येईल. शिवाय अवस्थांचें ज्ञान होण्यास ग्रह स्पष्ट करावे लागतात, आंकडे कुंडलीवरून त्यांचा कांहीं बोध होणार नाहीं.

वरपरीक्षा.

आपणामध्यें नाडी, गण वगैरे वरून अमुक मुलीला अमुक वर पसंत करण्याची चाल आहे. परंतु याही पेक्षां मुलीच्या कुंडलीवरून वराची परीक्षा चांगली होण्यासारखी आहे असें दिसून आलें आहे. प्रथम मुलीचे सर्व ग्रह त्यांच्या त्रिकोण राशीसह मांडून घ्यावे व त्यांच्याच खालीं त्यांचे सप्तम राशि मांडावे. नंतर जो वर योजिला असेल त्याचेही तसेच ग्रह त्रिकोण राशि व त्यांचे सप्तम राशि मांडावे. जर मुलीचे ग्रहत्रिकोण राशि वराच्या सप्तम राशीशीं मिळते येतील, तसेंच मुलीचे सप्तम राशि वराच्या ग्रह त्रिकोण राशीशीं मिळते येतील तर तोच त्या मुलीचा वर होईल असें अनुमान करावें.

कुंडलीविज्ञानांत दांपत्ययोग सांगितले आहेत तेही पहावे. व या दोन प्रकारांनीं वर कायम करावा.

जे राशि एकमेकांपासून नवपंचम असतात, ते त्रिकोण राशि समजावे. जसें—मेष, सिंह व धनु हे त्रिकोण राशि आहेत.

वराची कुंडली.



ग्रहत्रिकोण राशि.

र	चं	मं	बु	गु	शु	श	रा
५	६	६	६	४	३	३	६
९	१०	१०	१०	८	७	७	१०
१	२	२	२	१२	११	११	२

यांचे सप्तम.

११	१२	१२	१२	१०	९	९	१२
३	४	४	४	२	१	१	४
७	८	८	८	६	५	५	८

या प्रमाणें एका मुलाची कुंडली आहे. तर ती आपल्या मुलीच्या कुंडलीशीं कितपत मिळते हें पाहणें आहे. दोन्ही कुंडल्या एकाच [निरयन] पद्धतीच्या आहेत.

वधूची कुंडली.



ग्रहत्रिकोण राशि.

र	चं	मं	बु	गु	शु	श	रा
७	२	७	७	४	६	७	११
११	६	११	११	८	१०	११	३
३	१०	३	३	१२	२	३	७

यांचे सप्तम.

१	८	१	१	१०	११	१	५
५	१२	५	५	२	४	५	९
९	४	९	९	६	८	९	१

यांत वराचे सप्तम राशि वधूच्या ग्रहत्रिकोण राशींशीं बहुतेक मिळते आहेत. फक्त शुक्रसप्तम व शनिसप्तम यांचे राशि मिळते नाहींत, तरी ते शनिसप्तम व राहुसप्तम यांच्याशीं मिळते आहेत. ह्मणून हाच वर या वधूचा ईश्वरनिर्मित आहे असें सिद्ध झालें.

शिवाय दांपत्ययोगाचा विचार केल्यासही एक गोष्ट ढळढळीत दिसत आहे. ती ही कीं, वधूच्या लग्नीं कर्क राशीचा गुरु आहे व तोच गुरु वराच्या कुटुंबस्थानीं आहे. ही गोष्ट फारच महत्वाची आहे.

वधूच्या कुंडलींत जायास्वामी शनि व कुटुंबस्वामी रवि हे एकत्र आहेत. यावरून एक अनुमान निघूं शकतें. तें असें कीं, जर वधूचे जायास्वामी व कुटुंबस्वामी एकत्र आहेत तर वराचेही तेच स्वामी एकत्र, परस्पर सप्तम अगर एक दुसऱ्याच्या कुटुंब स्थानीं असे असले पाहिजेत. आतां या अनुमानाप्रमाणें ते स्वामी आहेत कीं तें पहा. वराचा जायास्वामी गुरु व कुटुंबस्वामी चंद्र आहे. हे ग्रह वरील अनुमानाप्रमाणें नाहींत. तरी लग्नस्वामी व कुटुंबस्वामी बुध व चंद्र हे एकत्र आहेत.

वधूच्या कुंडलींत जायाधिपति शनि हा शुक्राच्या कुटुंब स्थानीं आहे. यावरून वराचा जायाधिपतिही शुक्राच्या कुटुंब स्थानीं अगर ते दोन्ही एकत्र अगर परस्पर सप्तम असे असले पाहिजेत. हें अनुमान तंतोतंत जुळतें. वराचा जायाधिपति गुरु हा त्याच्या कुंडलींत शुक्राच्या कुटुंबस्थानींच आहे!

या प्रमाणेंच आणखीही कित्येक गोष्टी विचारणीय आहेत. त्या सर्व विचारांत घेतल्यास या वधूनें हाच वर वरावा असें ठाम ठरतें.

आपणाजवळ वधूची कुंडली असतां तीवरून वराची कुंडली कोणत्या प्रकारची असेल याच्या अनुमानांचें एक टिपण करावें. व तें टिपण वरशोधार्थ निवतांना बरोबर घ्यावें. नंतर वराची कुंडली हातीं आल्यावर आपलें प्रत्येक अनुमान जुळतें कीं नाहीं तें पहावें व अशाच ठिकाणीं प्रयत्न करावा. ह्मणजे बरेच श्रम वांचतील व समाधान प्राप्त होईल. तें टिपण कसें करावें तें उदाहरण घेऊन सांगतों.

वधूची कुंडली.

शके १८१७ मार्गशीर्ष शु. ३ इ.घ. ३।७



यावरून वरपरीक्षेचें टिपण

१ शुक्राच्या कुटुंबस्थानीं शनि, बुध व मंगळ हे तीन ग्रह आहेत. ह्मणून हे (अगर यांपैकीं कांहीं) ग्रह शुक्राशीं युक्त अगर शुक्राच्या कुटुंबस्थानीं अगर त्याच्या सप्तम स्थानीं असावे.

२ यांत मंगळ हा लग्नस्वामी आहे, तो ग्रह वरील अनुमानाप्रमाणें असलाच पाहिजे.

३ शनि बुध व मंगळ हे लग्न अथवा कुटुंब अथवा सप्तम यांचे अधिपति असतील.

४ अथवा ते [अथवा कोणी तरी एक] ग्रह लग्नीं, कुटुंब स्थानीं, जायास्थानीं किंवा चंद्राजवळ असे असतील.

५ कुटुंबस्थानीं चंद्र आहे व जायास्वामी शुक्र आहे, त्यामुळें शुक्राच्या कुटुंबस्थानींच बहुधा चंद्र असला पाहिजे.

६ लग्नीं रवि आहे, ह्मणून हा ग्रह लग्नीं, कुटुंबस्थानीं किंवा सप्तम स्थानीं असेल

७ अथवा तो लग्नस्वामी, शुक्र अथवा चंद्र यांच्याशीं युक्त तरी असेल.

८ कुटुंबस्थानीं चंद्र आहे व त्याचा अधिपति गुरु हा भाग्यस्थानीं चंद्राच्याच राशीस आहे. त्या अर्थी गुरु व चंद्र हे असेच

मंगळाबद्दल गैरसमजूत.

टिपणें पाडून लग्न जुळविण्याची ज्या समाजांत रूढी आहे त्या समाजांत मंगळाबद्दल एक गैर समजूत सर्व साधारण झालेली आहे. या गैर समजुतीमुळें मुलीचा बाप मोठ्या संकटांत पडतो. त्याला आपल्या मुलीसाठीं मंगळाचा वर शोधण्याचा जबरदस्त खटाटोप करावा लागतो. मंगळाच्या मुलीला मंगळाचाच वर मिळविला पाहिजे अशी लोकांची पूर्ण समजूत झालेली असते या समजुतीचीं मुळें इतकीं खोल गेलेलीं आहेत कीं यावर आह्मी कितीही लिहिलें तरी तें व्यर्थ आहे! तथापि विचारी माणसांसाठीं चार शब्द लिहिणें हें आमचें कर्तव्य आहे असें समजून आज जे विचार सुचले आहेत ते वाचकांस सादर करीत आहों.

आपल्या मुलीला मंगळ आहे त्या अर्थी तिला मंगळाचाच वर शोधिला पाहिजे असा विचार करितांना मुलीचा बाप तीन गोष्टी गृहीत घेत असतो. १ ली—आपल्या मुलीची जन्मवेळ बरोबर आहे. २ री—वराचीही जन्मवेळ बरोबर आहे. ३ री—मुलाचा मंगळ असा आहे कीं, तो मुलीच्या मंगळाचें कांहीं चालू देणार नाहीं. या ज्या तीन गोष्टी तो गृहीत धरतो त्यांत कितपत शहाणपणा आहे हें आपणास पहावयाचें आहे.

जन्म होण्याच्या समयीं मुद्दाम घड्याळ बरोबर लावून ठेवावयाचें व आपणा जवळ नसेल तर कोणापासून मागून जन्म होई पर्यंत घरांत बाळगावयाचें हें जें जन्मदात्या आईबापांचें कर्तव्यकर्म तें किती आईबापें काळजीनें बजावतात बरें? शेंकंडा पांच सुद्धां असलीं मागसें असतील कीं नाहीं, याची शंका आहे. अलीकडे घड्याळें हा पुरुषांचा एक अलंकार बनला असून तो १॥ रुपया पासूनही विकत मिळूं लागला आहे, तरी सुद्धां अशीं शेंकडों गांवें आहेत कीं सबंध गांवांत एकही घड्याळ नाहीं! मनुष्यजन्मा

सारख्या दुर्लभ व बहुमोल गोष्टीची इतकी काळजी! जोशीबुवां कडून टिपण करून घेण्याची पाळी लग्नाच्याच वेळीं येते. त्या वेळीं बहुधा जन्माची आठवणच बुजालेली असते! आईला प्रसूति वेदनाच झालेल्या असतात, व ती पूर्वी बरेच दिवस प्रसूतीची काळजी करीत असते म्हणून तिला मात्र महिना, पक्ष, वार आणि बहुधा तिथि व जन्माची साधारण वेळ इतकी माहिती असते. मग तिला विचारावयाचें कीं, "काय ग, आपली बाळी किती वर्षांची झाली बरें?" आईला वयोमान चांगलें माहीत असतें. ती म्हणते "आपली बाळी किनई पौषांत ११ वर्षांची होईल व पौर्णिमेला तिला ११ वें सरून १२ वें लागेल." मग त्यावरून हिशोब करून जन्माचा शक तयार करावयाचा. आई जर वर्ष सांगण्यास चुकली असली तर बाळीचा अगोदर शकच चुकावयाचा! कित्येक आयांना तर इतकेंही ज्ञान नसतें. त्या म्हणतात "किनई, बाळी आणि त्या शंकरभटाची काळी एकाच दिवशींच्या आहेत! मग शंकरभटांची गांठ घ्यावयाची, त्यांचीही अशीच बहुधा स्थिति असावयाची! ही शकाची स्थिति झाली. पक्ष आणि वार यांची आईनें जर बरोबर माहिती दिली तर जन्माची तिथि बिनचूक कळेल, आणि वार माहित नसून केवळ तिथीच तिच्या ध्यानांत असली म्हणजे जन्माच्या दिवसाची बोंबच उडणार हें उघड आहे! आतां राहिली जन्माची वेळ विचाऱ्या बापाला 'बाळी दिवसाची झाली कीं रात्रीची झाली' इतकी सुद्धां माहिती नसतें. पण आईला मात्र सुमाराचा काळ माहीत असतो. ती म्हणते "माणसांची कांहीं निजानीज झाली नव्हती अशा वेळीं बाळीचा जन्म झाला आहे." या माहिती वरून जन्माची वेळ घ्यावयाची. आणि जोशीबुवांना सांगावयाचें कीं, "शके १८२० च्या पौ. शु. १५ च्या दिवशीं रात्रीं सुमारें १० ते ११ याच्या दरम्यान जन्मकाळ धरून या मुलीचें टिपण करा." मग जोशीबुवा याचें मध्यमान १०॥ घेतात, आणि कुंडली तयार करितात! गृहीत धरलेल्या पहिल्या दोन गोष्टींची ही स्थिति आहे.

बरें, या ज्या कुंडल्या तयार होतात त्या लग्नकुंडल्या असतात. फळांचा विचार भावचलिताशिवाय होत नाहीं. कोणताही ग्रह वास्तविक कोणत्या स्थानाचें फलें देणार आहे, याचा निश्चय भावचलिताशिवाय होत नाहीं. असें असून जोशी केवळ अदमासानें तयार केलेल्या लग्नकुंडलीवरून या मुलीला मंगळ आहे, सबब तिला मंगळाचाच वर शोधिला पाहिजे असें मुलीच्या बापास सांगतो, ही ज्योतिषी म्हणविणारास व मुलीच्या बापासही लाजिरवाणी गोष्ट नाहीं असें कोण म्हणेल?

कुंडली समोर धरिली असतां लग्न, व्यय, पाताल, सप्तम व अष्टम या पांच स्थानीं मंगळ असतां त्या बालकास मंगळ आहे असें म्हणतात. हीं स्थानें खालील कुंडलींत फुल्या मारून दाखविलीं आहेत.



या स्थानांपैकीं एखाद्या स्थानांत मंगळ असला तर स्त्रीला वैधव्य योग व पुरुषाला विधुरयोग उत्पन्न करितो. अनुभवानें हें खरें आहे. पण आपणास असें समजलें पाहिजे कीं, हा योग विवाह झाल्यावर थोडक्याच कालांत येईल कीं फार कालानें येईल? स्त्रियांना आजच्या कालांत वैधव्य येणें यासारखी मयंकर आपत्ति नाहीं. तथापि तेंच मुलें बाळें झाल्यानंतर उतार वयांत प्राप्त होईल तर फारसें वाईट नाहीं. यासाठीं ज्योतिष्याला हा वैधव्ययोग केव्हां आहे हें सांगतां आलें पाहिजे. पण असला ज्योतिषी आमच्या मतें फारच विरळा असेल. लग्नीं, पातालांत अगर अष्टमांत असलेला मंगळ केव्हां केव्हां स्वतःलाच मारक होतो. यावरून असें सिद्ध होतें कीं, मुलीच्या

कुंडलींत जर मंगळ असेल तर तो [१] स्वतःला मारक होईल? किंवा [२] नवऱ्याला मारक होईल व [३] तो कोणालाही केव्हां मारक होईल? या तीन गोष्टींचा बिनचूक विचार झाला पाहिजे. नंतर जो तिला वर पाहिला असेल त्याच्याही मंगळाचा असाच विचार केला पाहिजे. याप्रमाणें उभयतांचा निरनिराळा विचार झाल्यानंतर योग वाटल्यास विवाह जुळवावा. आमचें मत असें आहे कीं, मेष, सिंह, धनु, कर्क, व मकर इतक्या राशींतला मंगळ फार नाशकारक गोष्टी घडवून आणितो. इतर राशींत त्याचा प्रभाव प्रतिकूल असा दिसून येत नाहीं. लग्न, द्वियीय, सप्तम या तीन स्थानांत जर गुरु, शुक्र अथवा एकटा बुध असेल तर त्या मुलीला मंगळ असला तरी भिण्याचें कारण नाहीं. वास्तविक पाहिलें असतां ज्या मुलीला मंगळ आहे अथवा अन्य वैधव्य योग आहे, त्या मुलीला असा वर पाहिला पाहिजे कीं त्याला उत्तम आयुष्ययोग आहे. मंगळाचा वर पाहून मुलीचा वैधव्ययोग कसा दूर होतो हें एक कोडें आहे! मुलीचा मंगळ जर कडक असेल व तिच्या लग्नीं, द्वितीय स्थानीं किंवा सप्तम स्थानीं जर गुरु, शुक्र अथवा एकटा बुध यापैकीं कोणी नसेल तर मंगळाचा वर पाहिला तरी बालवैधव्य चुकणार नाहीं असें समजण्यास काय हरकत आहे? अशा मुलीला वैधव्य टळण्यासाठीं बरेच दिवस अविवाहित ठेवणेंच प्रशस्त आहे. स्त्रियांना इहलोकीं बालवैधव्यासारख्या नरकयातना भोगण्याचा प्रसंग जर टाळावयाचा असेल तर त्याला एकच उपाय, तो हा कीं त्यांचा विवाह प्रौढ वयांत करावा. मंगळाचा वर शोधून भागावयाचें नाहीं. सारांश, प्रथम जन्मकाल बरोबर पाहिजेत व ते जर बरोबर असतील तर मंगळ किती जोराचा आहे याचा विचार करून विवाह जुळवला पाहिजे. एखाद्या वेळीं मुलीला खरा खरा मंगळ असतो व मुलाला खरा खरा नसतो अशा वेळीं हल्लींच्या पद्धतीनें काय घोटाळा उडेल याचा वाचकांनीं विचार करावा.

पत्रव्यवहार.

[१]

रा० रा० कुंडलीविज्ञानकर्ते यांस.—

वि. वि.—आपल्या कुंडलीविज्ञानांत ता. १ डिसेंबर १९०९ इसवीच्या १९व्या अंकांत 'वरपरीक्षा' या विषयावर लिहिलेला लेख वाचून फार संतोष झाला. त्या मध्यें प्रसिद्ध झाल्याप्रमाणें नाडी, गण इ० घटितार्थावरून विचार केल्यापेक्षां वधूवरांच्या कुंडल्यावरून विचार केल्यास फार उत्तम होईल. आपले दांपत्ययोगही प्रसिद्ध करावे असें माझ्या समजुतीला वाटतें. असो खालील चार ओळींस जागा मिळावी अशी इच्छा आहे.

घटित करणें झाल्यास प्रथम वर्णवश्यादिकांचा विचार करून तदनंतर वधूवरकुंडल्यांचा विचार करावा. त्यांत वैधव्य योगाचें मनन करून घटणा होते किंवा नाहीं हें पहावें. नुसत्या घटिताचा विचार करून घटणा केल्यास फार अनर्थ होण्याचा संभव आहे. स्त्रियांस सासरा इ० ना मारक नक्षत्रें कशीं असतात हें समजून घेतलें पाहिजे. जे अनिष्ट योग असतील ते टाळून घटणा करावी हा उत्तम पक्ष.

विषकन्यालक्षण

मंदारार्किदिनेंबुपानि फणिभं भद्रातिथिश्चे दिहो —
दूभूता सा विषकन्यकाऽथ तनुगौ सौम्यौ रिपुक्षेत्रगौ ॥
एकः क्रूर इहेऽद्भवाप्यथ तनौ सौरी रविः पुत्रगो
धर्मस्थो धरणीसुतो यमपरो योगोऽपि तज्जाविषं ॥१

अर्थ.—(१) शनि, मंगळ, रवि हे वार; शततारका, कृत्तिका व आश्लेषा हीं नक्षत्रें; द्वितीया, सप्तमी, द्वादशी या तिथि या तिहींच्या मेळावर जी कन्या उपजते ती "विषकन्या" होय. (२) शत्रु-

गृहीं दोन शुभ ग्रह लग्नीं असतां विषकन्या योग होतो. (३) शत्रु-गृही एक पाप ग्रह लग्नीं असतां अथवा (४) लग्नीं शनि, पंचम स्थानीं सूर्य व नवम स्थानीं मंगळ हा विषयोग होतो.

विषयोगावर उपन्न झालेली कन्या नाशकारक होय. " यथा विषस्वीकारात् मृत्युर्भवतीति सूचितम् तस्मात्परीत्याज्येतिभावः ॥"

विधवायोग

यदि लग्नगतःक्रूरः तस्मात्सप्तमगः कुजः ।
विज्ञेयं मरणं पुंसः सप्तमाद्वांतरे यदि ॥१ (इति नारदः)

यदाहकश्यपः

एको लग्नगतः पापः पापोन्यः सप्तमराशिगः ।
आसप्तमाद्वान्मरणं पुरुषस्य न संशयः ॥ २

अथापरः

लग्नेंदुः तस्य सप्तम स्थाने भौमो भवेत्ततोष्टवर्षानंतरं रंडा स्यात् ॥

॥उक्तंच॥ यदि लग्नगतश्चंद्रः तस्मात्सप्तमगः कुजः ॥
विवाहानंतरं भर्ता त्वष्टवर्षे न जीवति ॥३
लग्ने व्यये च पाताले जामित्रे चाष्टमे कुजे ॥
कन्या भर्तुर्विनाशाय भर्तुः कन्याविनाशदः ॥४

यदि लग्नादिंदुश्चंद्रः षष्ठाष्टमस्थस्तदा कन्या अष्टसंवत्सरेण विवाह-वर्षादिति शेषः ॥ रंडा भर्तृनाशका स्यात् ॥ उक्तंच बृहज्जातके—॥

आग्नेयैर्विधवास्तराशिसहितै इति वचनात् ॥ आग्नेयैरिति एकैक स्मिन्नपापग्रहे सप्तमे फलमुक्तं ॥ यदि बहवः आग्नेयाःक्रूराःसप्तमस्था भवंति तदा प्रतिग्रहोक्तं फलं त्यक्त्वा तैराग्नेयै रस्तराशिसहितैः विधवै भवति ॥

स्त्रीच्या जन्मकाळीं चंद्रापासून किंवा लग्नापासून सप्तम स्थानीं एक पाप ग्रह असेल तर नवऱ्यास अनिष्टकारक होईल. अनेक पाप ग्रह सप्तमस्थ असतील तर ती स्त्री विधवा होईल.

इत्यादिकांचा विचार केला असतां वरील योगांत निपजलेल्या कन्येस लग्न होण्याचा संभव नाहीं असा कित्येकांचा तर्क होईल.

ज्योतिषमध्यें प्रसिद्ध ग्रंथकार मुहूर्तचिंतामणि नामक ग्रंथांत स्पष्ट सांगितलें आहे.

जन्मोत्थं च विलोक्य बालविधवा योगं विधायव्रतं ॥
सावित्र्या उत पैप्पलंहि सुतया दद्यादिमां वारहः ॥
सल्लग्ने च्युतमूर्तिपिप्पलघटैःकृत्वा विवाहं स्फुटं ।
दद्यात्तां चिरजीवनेऽनभवेद्दोषः पुनर्भूभवः ॥१

या प्रमाणं असल्यास वैधव्य परिहारार्थ सावित्रीनामक व्रत, पैप्पलीय व्रत आणि कुंभविवाह वगैरे करून तदनंतर कन्येचें लग्न करून दिलें असतां अखंड सौभाग्य राहील. ग्रंथांत लिहिल्याप्रमाणें पुनर्भूभवः म्हणजे पुनर्विवाह असा अर्थ होतो. पण असा अर्थ करूं नये असें टीकाकाराचें मत आहे. कुंभादि विवाहानंतर ' कन्यायाः पुनरायुष्मद्वरेण सह विवाहविषये पुनर्भूभवः पुनर्भूसंभूतदोषो नास्ति ॥उक्तंच॥ स्वर्णाब्जपिप्पलानांच प्रतिमा विष्णुरूपिणी ॥ तयासह विवाहेच पुनर्भूत्वं न जायते ॥१

॥ ऋग्वेद ॥

सोमः प्रथमो विविदे गंधर्वो विविद उत्तरः ॥
तृतीयो अग्नीष्टेपतिस्तुरीयस्ते मनुष्यजाः
सोमो ददद्गंधर्वाय गंधर्वो ददद्ग्नये ॥
रग्निं च पुत्रांश्चाददग्निर्मह्यं मथो इमाम्
अतो देवभोग्यानां कन्यानां पुरूषविवाहे न दोषः ॥

वा एकंदर प्रमाणांवरून विचार करून त्या कन्येस शास्त्रोक्त विधिपूर्वक व्रतादिकेंकरून विवाह करून दिला असतां शुभ होईल.

शिवाय उभतांच्या कुंडल्यांवरून आयुर्मर्यादेचाही विचार करावा. वर स्त्रीच्या आयुर्ध्यापेक्षां पुरुषाचें आयुष्य जास्त असलेली कुंडली पाहून त्या वराला ती मुलगी दिल्यास विशेष सुख होईल. कित्येकांच्या मतें कुंडलीवरून आयुर्दाय निश्चित होत नाहीं. पण जातकचंद्रिका ग्रंथांत आयुर्दायाध्यायांत विशेष विचार असून ग्रंथकर्त्याच्या तो

अनुभवाचा असल्यामुळें त्यावरून आयुष्याचा निर्णय करण्यास सोईचें आहे. त्याचा वाचकांनीं अनुभव घ्यावा.

कळावें लोभ असावा हे विनंति. आपला.

ज्योतिर्विद **'शंकरशास्त्री'**— होसारीति जि० धारवाड.

पोंच व अभिप्राय

१ निर्णयसागरचे मालकांकडून **सन १९१० सालची डायरी** आली आहे. ती दरसाल प्रमाणें सर्वांगसुंदर आहे.

२ **नवग्रहांची आराधना**—हें पुस्तक श्रीयुत विष्णु बळवंत थोरात मु० लोणखेडें पो० शहादें जि० खानदेश यांजकडून आलेलें पावलें. किंमत १ आणे व व्ही. पी. नें चार आणे. या पुस्तकांत ग्रहांच्या पीडानिवारणार्थ जप, दानें, स्नानविधि, अलंकार व स्तोत्रें असे उपाय सांगितले असल्यासमुळें तें संग्राह्य आहे.

३ **निर्णयसागरीयं चणुभार्तंडब्रह्मपक्षीयं ब्रह्मतुल्यस्य पंचांगं** हें पंचांग व **भविष्यफलचंद्रिका** हें पुस्तक ज्यो. भवानीशंकरशर्मा यांजकडून पावलें. भविष्यफलचंद्रिकेंत अफीम, रुई, अलसी, गहूं सोनें, चांदि इत्यादिकांची तेजीमंदी वगैरे संवत १९६७ संबंधी भविष्याचे विचार आहेत. गरजूनीं खालील पत्यावर पत्रव्यवहार करावा.

पत्ता—पं. भवानीशंकरशर्मा अध्यक्ष अनाथोपकारक आयुर्वेदीय औषधालय सह ज्योतिषशास्त्रकार्यालय—पोष्ट—निमच (प्रांत माळवा.)

☞ सदरहू पुस्तकें पाठविणारांचा संपादक फार फार आभारी आहे.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥

'भवभूतिः'

पुस्तक ८वें.] चैत्र शु० १०, शनिवार [अंक ११वा.

पुनर्विवाह

ब्राह्मण, परभू, शेणवी, सोनार, गुजर या जातींत स्त्रियांचा पुनर्विवाह रूढ नाहीं. इतर बहुतेक जातींत स्त्रियांचे पुनर्विवाह होतात. यास **पाट** अशी संज्ञा आहे. शूद्रादिकांच्या बायका एक नवरा असतांही पाट लाविताहेत व कित्येकांचे तर दोन दोन तीन तीन सुद्धां पाट लागतात! कुंडलीवरून अमुक स्त्री पुनर्विवाह करील कीं नाहीं हें सांगतां येणें शक्य नाहीं. कित्येकांस असें वाटतें कीं पुनर्विवाहित स्त्रीची कुंडली कांहीं विशेष प्रकारची असली पाहिजे. पण वरील व्यवहार पाहिल्यास हें म्हणणें बरोबर नाहीं असें वाटतें. पुनर्विवाहाचे विशेष योग असण्याचें कांहीं कारण नाहीं. पुरुषांच्या कुंडलीचेंही असेंच आहे. कुंडलींत फक्त स्त्रीमारक किंवा पतिमारक योग मात्र असतो. म्हणून ज्योतिष्यास तितकेंच सांगतां येणें शक्य आहे. पुरुषाच्या कुंडलींत स्त्रीमारक योग असला म्हणजे द्विभार्यायोग आहे असें आपण म्हणतों, याचें कारण पुरुष बहुधा एक स्त्री मृत झाल्यावर दुसरी करितोच असा व्यवहार आहे हें होय. जर व्यवहार तसा नसता तर पुरुषाच्या कुंडलीच्या वर्णनांत द्विभार्ययोग हा शब्द आला नसता

तात्पर्य पुनर्विवाहाचे योग स्वतंत्र नाहींत, व तसे असणेंही शक्य नाहीं. पतिमारक योग व व्यवहार पाहून विचार केला पाहिजे.

पुरुषाच्या कुंडलींत बहुभार्यायोग जसा असतो तसाच जर स्त्रीच्या कुंडलींत आढळला आणि व्यवहार जर अनुकूल असला तर ती स्त्रीही अनेक पति वरील किंवा अनेक पाट लावील असें समजावें. जर व्यवहार प्रतिकूल असेल तर यांपैकीं कांहींच घडणार नाहीं हें उघड आहे.

पुनर्विवाहित पुरुषाला आपलें कुटुंब सोडावें लागत नाहीं. [पुनर्विवाह ह्म० पुनःलग्न इतकाच अर्थ ध्यावयाचा] पण तशा नायकोला पहिलें कुटुंब व मुलें यांचा त्याग करावा लागतो. या गोष्टीची साक्ष कुंडलींतही असली पाहिजे असें वाटतें. पुनर्विवाहाचे योग जरी स्वतंत्र नाहींत तरी या गोष्टीचा विचार करितांना ती कुटुंबाचा त्याग करील किंवा नाहीं हें पाहिलें पाहिजे. पुढील गोष्टी कुटुंबत्यागास कारण अहेत.

१ कुटुंब [दुसऱ्या] स्थानीं पाप ग्रह.
२ शुक्राच्या २ ऱ्या स्थानीं पाप ग्रह.
३ चंद्राच्या २ ऱ्या स्थानीं पाप ग्रह.
४ सप्तमेशाच्या २ ऱ्या स्थानीं पाप ग्रह.

ज्या स्त्रीला अशा प्रकारचा योग असेल ती कुटुंबाचा त्याग करूं शकेल. व व्यवहार अनुकूल असून तिला जर वैधव्य असेल तर ती बहुधा पाट लावीलच असें मानण्यास हरकत नाहीं. वरील पाप ग्रह शत्रुक्षेत्रीं, अग्निराशींत किंवा नीच असे असल्यावर निश्चयानें पाट लावील.

स्त्रीच्या कुंडलींत जर सप्तम स्थानीं हर्शल असेल व इतर योग अनुकूल असतील तर तिचें पतीशीं पटत नाहीं व तेणेंकरून ती अन्य पतीची इच्छा करिते. अशा स्त्रीस जर व्यवहार अनुकूल असेल तर ती एक पति असतांही दुसरा वरिते.

---

२ पत्रव्यवहार

(१)

सा. न. वि. वि. :— खालील कुंडलीसंग्रह प्रसिद्धीसाठीं पाठविला आहे.

वराची कुंडली
जन्म — शके १८०१ आश्विन शु. ४ दि. ७॥ वाजतां

वधूची कुंडली
जन्म — शके १८१६ ज्येष्ठ व० १२ रात्रीं २ वाजल्यावर





उभयतांच्या कुंडल्या निरयन आहेत. शके १८२८ माघ व० ११ शुक्रवार रात्रीं कन्या लग्नावर झाला. चंद्र धनु राशीस होता. म्हणजे वराच्या चंद्राच्या द्वितीय स्थानीं लग्नेश जो शुक्र त्याच्या पंचमांत उदित असून वधूच्या चंद्राच्या व शुक्राच्या अष्टमांत असून वधूचे कुंडलींत नवम स्थानीं होता.

वराचा लग्नेश व वधूचा सप्तमेश जो शुक्र तो या दिवशीं वराच्या व वधूच्या अनुक्रमें लग्न कुंडलींत तृतीय व नवम स्थानीं होता.

वरील दांपत्यांत साम्य आहे तें असें.—

१ एकाच्या सप्तमांत जो राशि तो दुसऱ्याच्या लग्नीं आहे.
२ वधूच्या शुक्राच्या सप्तमस्थ राशींत वराचा चंद्र आहे.
३ उभयतांचा चंद्र एकाच स्थानांत आहे.

वराचें वर्णन :— उंची मध्यम. वर्ण गोरा. बुद्धिमान्. वडील बंधू ३ व बहिणी २ हयात आहेत. परीक्षा कोणतीच पास नाहीं. नोकरीवर निर्वाह. विवाह दुसरा. प्रथम स्त्री शके १८२८ चे मार्ग. व. ७ या दिवशीं बाळंतपणाच्या आजारानें मयत. एक कन्या. आई मयत होऊन ५ वर्षें झालीं. बापही मयत आहे.

वधूवरांच्या कुंडल्या पाहून हल्लींचें लग्न जुळविलें नव्हतें. तथापि हें साम्य ज्योतिःशास्त्राची सत्यता दाखवितें, व तें जगापुढें मांडणाऱ्याचे गौरवास कारणीभूत होतें!

वराच्या बापाचा मृत्युकाळ आश्विन व० ११ शके १८२१ मध्यें झाला.

काशिनाथ धोंडो लेले — नाशिक.

* वधूवर योगासंबंधानें जो चमत्कार आह्मीं वाचक वर्गास दाखविला होता, त्याकडे व शोधक व कल्पक वाचकांचें लक्ष गेलें असून त्याची सत्यताही दृगोचर झालेली पाहून समाधान होत आहे. याच कुंडल्या सायन केल्या, त्या अशाः—

वर **वधू**



वरील सायन कुंडल्या पहा. यांतही दांपत्ययोग स्पष्ट दिसत आहे. विवाह सायन कन्या लग्नावरच झालेला असला पाहिजे. वराचा सप्तमेश शुक्र हा जन्मकाळीं याच राशींत आहे.

विवाहकाळीं चंद्र मिथुनेंत आहे, तोहि योग्यच आहे. विशेष चमत्कार असा आहे कीं, वराचा कुटुंबेश जो गुरु तो त्याच्या नवमांत आहे व वधूचा कुटुंबेश जो बुध तो वधूच्या नवमांत आहे, इतकें असून चमत्कार हा कीं ते दोन्ही ग्रह परस्परांच्या सप्तमांत आले आहेत!

वराचा सप्तमेश शुक्र हा वराच्या कुटुंबस्थानीं चंद्रक्षेत्रीं आला व वधूचा सप्तमेश मंगळ हा तिच्या सप्तमांत आला! व यांत चमत्कार असा झाला कीं, मंगळाच्या म्हणजे वधूच्या सप्तमेशाच्या कुटुंबस्थानीं शुक्र म्हणजे वराचा सप्तमेश आला! आमच्या वाचकांनीं हे दोन्ही चमत्कार ध्यानांत घ्यावे. म्हणजे दिसून येईल कीं वधूवरयोग हा मानवी खटपटींचा नसून ईश्वरी नियमाचा आहे. असले चमत्कार ज्या शास्त्रांत पहावयास सांपडतात तें शास्त्र गंभीर व सत्य आहे असें कोण म्हणणार नाहीं?

यावरून असें एक सिद्ध होऊं पाहतें कीं केवळ वराच्या किंवा केवळ वधूच्याच कुंडलीवरून विवाहकाल निश्चित होणें फार कठीण आहे.

'ए. कृ. वि.'

---

(२)

अधिकमास.

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस :—

सा. न. वि. वि. कुंडलीविज्ञान ता. २१-३-१९०७ चे अंकांत रा. रामकृष्ण माईणकरांनीं वरील मथळ्याखालीं आह्मांस उद्देशून लिहिलेलें पाहिलें. माईणकरांनीं या अधिकमासाबद्दल ज्ञानप्रकाशांत पत्र लिहिलें आहे त्यांत आह्मीं सूर्यसिद्धान्ताचें व सिद्धांतशिरोमणीचें अध्ययन करीत आहोंत व आतां आपले पत्रांत ग्रहलाघवाचें करीत असून ज्योतिःशास्त्रानभिज्ञ आहोंत वगैरे मनास वाटेल तसें लिहिलें आहे. लोकांस हें ज्ञान नाहीं, तें ज्ञान नाहीं असें म्हणण्याचा अधिकार यांनीं कोठून मिळविला? पंचांगशोधन सभेंत जेव्हां

खुद केतकरांना अध्यक्षांनीं त्यांच्या ग्रंथावर आक्षेप घेणाराचें समाधान करा ह्मणून सांगितलें तेव्हां केतकर ह्मणाले माझी इच्छा नाहीं. तेव्हां हे विद्वान् तेथें हजर होतेच. मग यांनीं तरी त्यांची बाजू धरून बोलायाचें होतें. बरें तेव्हां नाहीं झालें तर नाहीं, आतां तरी तसें करण्यास तयार असल्याचें प्रसिद्ध करावें ह्मणजे पुढील व्यवस्था करण्यांत येईल. पुण्याचे सभेस बोलावण्यास ही मंडळी कां लाजली? अमुक दिवशीं सभा होणार हें वर्तमान प्रसिद्ध वर्तमानपत्रांत मुळींच कां प्रसिद्ध केलें नाहीं? ह्या सभेंत आह्मीं प्रसिद्ध केलेलीं विधानें चुकीचीं आहेत असा नि. काल झाल्याचें माईणकर लिहितात तर मग "केतकरांचेच अयनांश बरोबर असा अभिमान बाळगणाऱ्या लोकांखेरीज इतरांनीं चैत्रच अधिक धरावा. फाल्गुन अधिक धरूं नये" असा निर्णय कां झाला? असो, असा निर्णय प्रसिद्ध झाला ह्मणून ज्ञानप्रकाशांतील माईणकरांचे पत्रास व तटस्थाचे पत्रास (हें पत्र केतकी गणिताप्रमाणेच आहे) आह्मीं उत्तरें दिलीं नाहींत व आतांचे पत्रावर टीका करून आपले पत्राची जागा अडविणें व वाचकांचा वेळ व्यर्थ घालविणें ही आमची इच्छा नाहीं. कारण अधिक मासाचा निकाल लागला आहे. लोकांस काय करणें तें त्याप्रमाणें ते करीतच आहेत.

रा. केतकरांचा व आमचा या अधिक मासाबद्दल झालेला पत्रव्यवहार इंदुप्रकाश व नेटिवओपिनियनमधून ज्यांनीं पाहिला असेल त्यांस असें कळून आलें असेल कीं आह्मीं विचारलेले प्रश्नांचीं उत्तरें त्यांनीं दिलीं नाहींत. शेवटीं आपलें गणित सत्य आहे, असें सिद्ध करण्याकरितां ते विद्वान ज्योतिषी व शास्त्रीलोकांपुढें मांडावें त्यावेळेस आपले आक्षेपकारांस बोलावावें व आपलें ह्मणणें सिद्ध करून दाखवावें व विजयी व्हावें. या आमचे ह्मणण्यावर कांहीं उडवाउडवीचीं उत्तरें त्यांनीं दिलीं आहेत. तरी ते तसें करीपर्यंत वर्तमानपत्रांतून हवी तितकी कोल्हेकुई केली व लोकांस कांहीं ज्ञान नाहीं व आपणच कायते विद्वान् असें लिहिलें व आपले अनुयायी यांजकडून लिहविलें तरी या त्यांचे लिहिण्याकडे कोणीही लक्ष देणार नाहीं.

आमचें ह्मणणें आपले वाचकांस कळावें ह्मणून हा मजकूर आपणाकडे पाठविला आहे तरी कृपा करून त्यास स्थळ देण्याचें व्हावें कळावें लोभ असावा हे विनंति

मुंबई ता. २८ मार्च सन १९०७

आपला

वासुदेव नारायण कटकर.

३

प्र. कुंडलीविज्ञानकर्ते यांसः—

सा. न. वि. वि. :— मातृपितृनिधनाचा विचार १९०६ सालीं झाला आहे. आतां मातुलसुखाचा विचार कर्तव्य श्रेणीस आला आहे त्याबद्दल मीं आपल्या बुद्धयनुरूप चार शब्द लिहून पाठवित आहें सबबी प्रमाणें स्थल मिळावें

मातुलनिधन

सायन



ही एका मुलाची कुंडली आहे. यास एक मामा होता. तो त्याच्या १८ व्या वर्षी निधन पावला.

कुंडलीतलें ६ वें व चंद्राचें ६ वें ह्यावरून मामाचा विचार होतो. सहावें स्थानांत कोणी ग्रह नाहीं. पण चंद्राचे ६ वे स्थानीं हर्शल असून षष्ठेश शनि हा मेषच्यून ह्या वक्री पापग्रहानें युक्त आहे, व समोर राहु आहे. ह्यावरून या मुलास मातुलसुख अल्प मिळेल हें उघड ठरतें. शनीच्या ६ वे स्थानीं मंगळ हा पापग्रह आहे. त्यावरूनही हीच गोष्ट सिद्ध होते.

ता. १९ जानेवारी १९०१ पौष व० १४ रोजीं मामाचें निधन झालें आहे. या दिवशीं ग्रह कसे आले आहेत, याचा विचार करूं.

रवि हा लग्नाचे सहावे स्थानीं शत्रुक्षेत्रीं आहे.

२ चंद्रही मकर राशींत रवीनें दूषित आहे.

३ मंगळ जन्मस्थ चंद्राचे ६ वे स्थानीं वक्री आहे.

४ बुध, गुरु, शुक्र, शनि हे ग्रह मकर राशींत आहेत.

५ राहु हा मातुलाधिपति जो शनि त्याचे समोर आला आहे.

६ १९०१ चे जानेवारींत रवि-शनि युति झाली त्या दिवसापासून मामा आजारी झाला.

याप्रमाणें लग्न व चंद्र यांचा षष्ठ स्थानें व मातुलाधिपति पाप ग्रहांनीं दूषित झाल्यामुळें मातुल-निधन झालें. यावेळीं हर्शल हा मातुलाधिप जो शनि त्याच्या आसांत होता. ता. १० जानेवारी-पासून मंगळ वक्री झाला व त्याच दिवसापासून आशा सुटली.

गणेश दामोदर प्रंथे.

* कोणत्याही विषयाच्या विवेचनाची पद्धत कळली म्हणजे शोधक व कल्पक तिच्या अनुरोधानें आणखी कांहीं गोष्टींची सहज कल्पना करितात.

उत्तम शिक्षक यालाच म्हणतात कीं, जो आपल्या विद्यार्थ्यांस एक गोष्टीच्या शिक्षणावरून इतर गोष्टींची कल्पना सहज करावयास लावितो. आणि तोच विद्यार्थी उत्तम होय कीं, जो गुरूच्या एका कल्पनेवरून दुसऱ्या अनेक कल्पना करितो हाच शाळांतून जें वस्तुपाठाचें शिक्षण सरकार देत असतें त्याचाही उद्देश हाच आहे. उद्देश सिद्धीस गेल्यानें आनंद होणें साहजिक आहे. तसाच कुंडलीविज्ञानाच्या संपादकालाही होत आहे. भ्रातृनिधन, मित्रनिधन, पुत्रनिधन, भ्रातृस्त्रीनिधन, मित्रस्त्रीनिधन, पुत्रस्त्रीनिधन इ० आप्तवर्गीयांच्या निधनाची कल्पना यापुढें कल्पक वाचकांस करितां येईल. याच गोष्टी आम्हांलाही पुढें सिद्ध करावयाच्या आहेत तोंपर्यंत वाचकांना विचार करण्यास सवड देणें हें योग्य आहे.

मातुलसुखाचा षष्ठस्थान व त्याचा अधिपति यांवरच मुख्यत्वें विचार करावयाचा. चंद्र हा मातृसुखाचा कारक ग्रह असल्यामुळें त्याचें जें षष्ठ स्थान तें आईच्या मामाचें स्थान होय. आपला जो लग्नेश असेल त्याचें जें षष्ठ स्थान तें मातुल स्थान होईल. व चंद्रापासून तिसरें किंवा चतुर्थेशापासून तिसरें स्थान तेंही मातुलस्थानचा आहे. बुध हा मातुल सुखाचा कारक ग्रह आहे त्याचें ६ वें स्थान तें मातुलस्थान. याबद्दल पुढील वचनें आहेत.

अधुना संप्रवक्ष्यामि स्थिराणि कारकानिच ॥ सूर्यादीनां ग्रहाणांच वीर्यवान् कारको भवेत् ॥ वीर्यवान्जायते विप्र जन्मनि रविशुक्रयोः ॥ सपितृकारको ज्ञेयो निर्विशंकं द्विजोत्तम ॥ चंद्रारयोश्च बलवान् मातृकारक उच्यते ॥ भौमद्वयं विशेषेण भगिनीदारभ्रातृकौ ॥ बुधान्मातुलतो ज्ञेयो मातृतुल्यानपिद्विज ॥ गुरुणात्रयविज्ञेयाः पुत्रस्वामिपितामहाः स्वभार्या मातृपितरौ तथा मातामहीं द्विज ॥ भृगुद्वारा विजानीयां देतेषां शुक्रकारकः ॥ अर्यम्णः पुण्यभे तात इंदोर्माता चतुर्यतः ॥ कुजात्तृतीयो भ्राता मातुलो रिपुभाद्बुधात् ॥ देवेज्यात्पंचमा त्पुत्रो दैत्येज्यादूनभात्स्त्रियः ॥ मंदादष्टमतो मृत्युस्तातादीनां विचिंतयेत् ॥ रविः पिता शशी माता भ्राता भौमो बुधःसुहृत् ॥ मातुलेयः स्मृतो जीवो ज्ञानपुण्ये स्त्रियःसितः ॥ एषासूक्ष्मेच तत्काले मरणं कुरुते शनिः ॥ अर्कस्थितस्य नवमो राशिः पितृगृहं स्मृतं ॥ चंद्राच्चतुर्थगे मातुः प्रासादग्रामचिंतनम् ॥ भौमस्थितस्य सहजो राशिर्भ्रातृगृहं स्मृतं ॥ बुधात्तुर्यः कुटुंबंच धनपुत्रादि मातुलाः ॥ तत्पंचमे मंत्रविद्या लिपिकाव्यादि चिंतयेत् जीवात्पंचमतो ज्ञानं पुत्रधर्मधनादिकं ॥ शुक्राज्ज्ञामित्रतो लब्धिर्दारे शान्वितदिग्भवा ॥ शनेश्चरःस्थितस्थाना दृष्टमं मृतिरुच्यते ॥

वरील वचनांत प्रत्येक ग्रहावर कोणकोणाचा विचार होतो हें स्पष्ट सांगितलें आहे. यावरून मातुलसुखाचा विचार करणारांनीं बुध विचारांत घेतला पाहिजे.

बुधापासून ६ वें स्थान तें मातुलस्थान हें मत जितकें ग्राह्य आहे तितकें बुधापासून चवथें [बुधात्तुर्यः इ०] स्थान तें मातुलस्थान हें मत ग्राह्य वाटत नाहीं.

यावरून मातुलसुखाचा विचार करितांना लग्नकुंडली, षष्टेशकुंडली, व बुधकुंडली अशा तीन कुंडल्या

पृथक् मांडून त्यांवरून मातुलनिधनाचा अथवा मातुलसुखाचा विचार केला पाहिजे. असो. — पुढील अंकांत वर्षफल कसें तयार करावें याबद्दल विस्तृत लेख द्यावयाचा आहे त्यावेळीं या सर्व मुद्यांचा विचार होणार आहे. म्हणून या ठिकाणीं जास्त विवेचन करीत नाहीं.

संपादक कुंडलीविज्ञान

४

ता० १४ व १५ एप्रील या दोन दिवशीं रवि — मेष. चंद्र – वृषभ मंगळ — मकर. गुरु — कर्क. व शुक्र — मीन, याप्रमाणें ५ ग्रह उच्च आहेत. म्हणून या दिवशीं बलवान् लग्नीं एखाद्याचा जन्म झाल्यास तो विलक्षण पराक्रमी, वैभवशाली व राजयोगी होणार नाहीं काय? अवतारी किंवा पराक्रमी असे जे पुरुष होऊन गेले त्यांस बरेच ग्रह उच्च किंवा स्वगृहीचे होते. श्रीरामचंद्रास पांच, श्रीकृष्णास तीन उच्च व तीन स्वगृहीं, शिकंदर व अकबर यांस चार ग्रह उच्च होते.

गणेश दामोदर ग्रंथे.

* वरील दिवशीं कोणाचा जन्म झाल्यास तो आमच्याकडे संग्रहास पाठवावा व ज्याच्या पोटीं असलें नररत्न येईल त्याचें नांव प्रसिद्ध करण्याची त्याची परवानगी घ्यावी.

संपादक कुंडलीविज्ञान

३ जगद्वृत्त.

मुरूडचे ज्योतिषी रा. नारायण त्रिंबक जोशी, यांनीं शके १८२९ सालचें भविष्य गेल्या केसरींत प्रसिद्ध केलें आहे, तें असें:—

या वर्षी पर्जन्य फार पडेल, पण धान्यें, फळें, पुष्पें यांचा नाश होईल. कापशीचें पीक चांगलें येईल. राजाला युद्ध करण्याची आवश्यता भासेल. धान्यें व गोमहिषींची वृद्धि, चोर व अग्नि पासून भीति, रोगांची वृद्धि व मनुष्य क्षय होईल. तेल, गूळ, तूप, मांठ वगैरे रस पदार्थांची स्वस्ताई होईल लोक धर्मतत्पर असतील या वर्षी प्रजेला कांहीं हक्क मिळतील. राष्ट्रीयसभेची चळवळ सतत चालून अखेर यश नवीन पक्षाला येईल. महाराष्ट्रांतील दोन संस्थानिकांवर संकटें येतील, पण त्यांतून ते सुटतील चीन, आयर्लंड, इजिप्तवर संकटें येतील. रशियांतील अस्वस्थता कायम राहील. इंग्लंडला हें वर्ष सुखकर जाईल व जपानला सर्व जगाकडून धन्यता मिळेल.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥

'भवभूति'

पुस्तक ९ वें.] पौष कृ० ५ सोमवार [अंक २ रा

पतिपत्नीयोग.

पतिपत्नी यांपैकीं कोणाच्या तरी एका कुंडलीवरून दुसरी कुंडली तयार करितां यावी म्हणून शेंकडों कुंडल्या जमा करून अनेक प्रकारांनीं आजपर्यंत विचार केला. अखेरीस ही गोष्ट अगदीं अशक्य आहे असा सिद्धांत ठरवून तो प्रयत्न सोडून देणें भाग पडलें! हजारों कुंडल्यांचा संग्रह करून जरी कोणी भगीरथ प्रयत्न केला तरी त्यास अखेरीस निराशेशिवाय कांहीं ही प्राप्ति व्हावयाची नाहीं. जर कोणी अशी कुंडली तयार करणारा हल्लीं कोठें हयात असेल किंवा मागें होऊन गेला असेल तर त्याला खचितच कांहीं तरी दैवीसाधन अनुकूल असलें पाहिजे असें म्हणणें भाग पडतें! शास्त्रांत इतकें सामर्थ्य निःसंशय नाहीं. रोहें येथील एक गृहस्थ कळवितात कीं, येथें बापट ज्योतिषी आले होते त्यांनीं एका गृहस्थाच्या कुंडलीवरून त्यांच्या स्त्रीची रास सांगितली. आम्ही जो या गोष्टीचा विचार केला आहे त्यावरून असें वाटतें कीं, बापट यांनीं

रास सांगितली ह्मणजे फक्त चंद्रच सांगितला, पण केवळ चंद्रच सांगतां येईल असें नसून वाटेल तो ग्रह सांगतां येईल हें खरें आहे. पण सर्वत्र सांगतां येणार नाहीं असें, आह्मांस खात्रीनें वाटतें. नेहमीं याच गोष्टीचा जो व्यासंग करील तो केव्हां केव्हां एखादा ग्रह बिनचूक सांगेल, पण तो त्यानें ज्या नियमानें सांगितला त्याचानियमानें दुसऱ्या कुंडलींत कधींही सांगतां येणार नाहीं. तात्पर्य, ही विद्या शास्त्रीय नाहीं व असलीच तर दैवी आहे यांत शंका नाहीं. आतां, कोणी असें ह्मणेल कीं, जर नियम आढळत नाहीं तर परमेश्वरी सूत्र अनियमित आहे कीं काय? तर असें मात्र नाहीं. नियम असलाच पाहिजे. पण कोट्यवधि कुंडल्यांचें आकलन करून नियम हुडकून काढणें मनुष्यशक्तीच्या बाहेरचें आहे इतकेंच आह्मीं ह्मणतों. प्रत्येक लग्नाच्या शक्य तितक्या सर्व कुंडल्या मिळविल्यानंतर हें परमेश्वरी सूत्र जाणतां येईल. निरनिराळीं लग्नें आणि भिन्न भिन्न स्थानगत ग्रह यांच्या मानानें एकंदर कुंडल्यांची संख्या ७ कोटी ४६ लक्ष ४९ हजार ६ शें इतकी आहे. ह्मणजे प्रत्येक लग्नाच्या ६२ लक्ष २० हजार ८ शें इतक्या स्त्रीपुरुषांच्या कुंडल्या जवळ असल्यावर या परमेश्वरी सूत्राचा उलगडा झाल्याशिवाय राहणार नाहीं. इतक्या प्रयत्नानें हें सूत्र कोणी जाणलें असेल असें वाटत नाहीं, ह्मणूनच ही दैवी विद्या आहे असें आमचें ह्मणणें आहे.

आतां, एक गोष्ट शक्य आहे ती अशी कीं, एखाद्यानें दांपत्यांच्या कुंडल्यांचा पुष्कळसा संग्रह केला आणि त्याला जर त्यांतीलच एखाद्या कुंडलीबरहुकूम कुंडली आढळला तर तीवरून त्याला दुसऱ्या कुंडलीचें अनुमान करितां येईल असें मानण्यास हरकत नाहीं. बापट यांनीं जी रास सांगितली ती बहुधा याच धोरणानें असेल. पण पुढें जी प्रजा होणार तिच्या कुंडल्या जवळ असणें शक्य नाहीं. ह्मणून

कुंडल्यांचा संग्रह कितीही असला तरी तो नवीन होणाऱ्या दांपत्यांच्या कुंडल्या ठरविण्यास कुचकामाचा आहे. जर कांहीं सामान्य नियम आढळेल तरच त्याचा उपयोग आहे. असा सामान्य नियम कितीही संग्रह केला तरी आढळत नाहीं, ह्मणून एका कुंडलीवरून दुसरी तयार करण्याचा प्रयत्न निष्फळ आहे असें आमचें ह्मणणें आहे.

प्रयत्न निष्फळ खराच. परंतु शास्त्राची अभिवृद्धि करण्याकरितां ज्योतिष्यानें कुंडल्यांचा संग्रह निरंतर केला पाहिजे. कुंडल्यांचा संग्रह जितका जितका विस्तृत होईल तितकें तितकें ज्ञानही विस्तृत होईल. हा संग्रह तीन प्रकारांनीं उपयोगास येईल. १ संग्रहांतील कुंडलीसारखी कुंडली कोठें आढळल्यास तीवरून दुसरी सागतां येईल. २ रा वधूवरांच्या कुंडल्यांवरून यांचा विवाह होणें शक्य आहे कीं नाहीं याचा विचार करितां येईल. व ३ रा पति व पत्नी यांपैकीं कोणाची कुंडली चुकीची असल्यास ती बरोबर करूनही घेतां येईल. आमच्या जवळचासंग्रह एकंदर संखेच्या मानानें फारच अल्प आहे. यांपैकीं कित्येक कुंडल्या अकांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत. व त्यांवरून दांपत्ययोगाचें दिग्दर्शनही केलेलें आहे हा संग्रह आणखी पुष्कळसा वाढवून तो नवीन प्रसिद्ध होणाऱ्या '**विवाह**' नामक पुस्तकांत देण्याचा हेतु आहे. हें पुस्तक याच वर्षी प्रसिद्ध झालें पाहिजे. ह्मणून वाचकांस विनंति करितों कीं, **ता० १ फेब्रुवारीपर्यंत प्रत्येकानें दांपत्ययोगाच्या मिळतील तितक्या कुंडल्या पाठविण्याची मेहेरबानी करावी.** अशा संग्रहाच्या पुस्तकाची किती आवश्यकता आहे हें सांगावयास नको. पुढील पिढीच्या ज्योतिष्यांसाठीं या विद्येचा गाडा आपणास जितका

एढें नेववेल तितकी नेणें आपलें कर्त्तव्य आहे. सुमारें **दहाहजार** कुंडल्यांचा संग्रह प्रसिद्ध होऊ शकेल! थोडी खटपट करावी लागेल. पण कार्य केवढें मोठें होईल यांचा विचार करावा.

कुंडल्या पाठविणें त्या खालील पद्धतीनें पाठवाव्या.—

१ कुंडल्या फुलिस्केप कागदाच्या एका बंदावर एकाच बाजूनें लिहिलेल्या असाव्या.

२ वर पाठविणारानें आपलें नांव लिहावें. व तें प्रसिद्ध करावयाचें किंवा नाहीं तें कळवावें. गांवाचें नांवही असावें.

३ पति व पत्नी यांच्या कुंडल्या एकामुढें एक अशा असाव्या. एकाखालीं एक असूं नयेत एका आडव्या रांगेंत एकच जोडपें असावें.

४ प्रत्येक कुंडलीच्या वर जन्मकाल असावा. जन्मकाल नच मिळेल तर नुसत्याच कुंडल्या असाव्या.

५ विवाह कोणत्या वर्षी, कोणत्या महिन्यांत, कोणत्या दिवशीं व कोणत्या वेळीं झाला हेंही समजल्यास तें प्रत्येक जोडप्याखालीं लिहावें (ही माहिती शक्य तितकी मिळवावी. नच मिळेल तर उपाय नाहीं. नुसत्याच कुंडल्या पाठवाव्या.)

हा संग्रह पाठविणाराच्या नांवासह त्या पुस्तकांत छापावयाचा आहे. नांव प्रसिद्ध करण्याची इच्छा नसेल तर तसें स्पष्ट कळवावें. हें व आणखी पुस्तकें छापण्यासाठीं सुपररायल प्रेस गुदस्तां मे महिन्यांत आहीं विकत घेतला. पण जागेच्या व इतर अडचणींमुळें तो आतांपर्यंत चालवितां आला नाहीं. आतां सुरू केला असून क्रमाक्रमानें सर्व कामें छापून होतील व आजपर्यंतच्या वेड्या वांकड्या प्रयत्नाला चांगलें स्वरूप येईल अशी आशा वाटते.

परदेशगमन, प्रवास व जलपर्यटण.

[श्रीयुत यशवंत केशव प्रधान.]

वरील विषयाचा शास्त्रदृष्ट्या थोडक्यांत विवेचन करण्याचा यत्न केला आहे. विवेचन सविस्तर केलें नाहीं. कारण, त्यांस जागा फार लागून वेळही त्याच मानानें लागेल. ही माहिती बऱ्याच पाश्चात्य ग्रंथांतून घेतली आहे. विवेचन सायन किंवा निरयन या कोणत्याही पद्धतीस धरून केलेलें नाहीं. राशि व ग्रह यांच्या नैसर्गिक धर्मांस अनुसरून शक्य तो विचार केला आहे. अनुभव कोणत्या पद्धतीने येतो हें ज्यानें त्यानें ठरवावें.

१ जन्मकुंडलींतील मुख्यतः तृतीय, नवम हीं स्थानें, त्यांचे अधिपति व त्या स्थानांत असलेले ग्रह यांचा प्रवासाशीं जास्त संबंध आहे असें आढळतें. ग्रहांत चंद्र, बुध व मंगळ हे फारकरून आढळतात.

२ नवम स्थान हें दूरचे प्रवास, परदेशगमन किंवा जलपर्यटण दर्शवितें. आणि तृतीय स्थान हें रेलवेचे प्रवास किंवा देशांतल्या देशांत खुष्कीचे प्रवास दर्शवितें

३ ग्रहांपैकीं विशेषतः चंद्र, बुध, मंगळ आणि तृतीय व नवम स्थानचे अधिपति जर चर (मेष, कर्क, तूळ व मकर) राशींत अथवा द्विस्वभाव (मिथुन, कन्या, धनु व मीन) राशींत असतील तर पुष्कळ प्रवास किंवा स्थलांतरें घडतात. जर बरेच ग्रह जल (कर्क, वृश्चिक, मीन) राशींत असले किंवा तेच ग्रह तृतीय व नवम भावारंभीं असले तर ते जलपर्यटण दर्शवितात.

४ लग्न, दशम अगर द्वादश या स्थानांत जल राशींत ग्रह असतील तर लहानपणींच जलप्रवास घडलेला आढळतो.

५ ज्या माणसांचे बरेच ग्रह आपोक्लीम (३-६-९-१२) स्थानांत द्विस्वभाव राशींचे असतील तर तीं माणसें फार भटकणारीं आढळतात.

६ मिथुन किंवा धनु राशीचा चंद्र दशमांत असला तर दूर दूरचे प्रवास घडतात व परदेशांत राहण्याची विशेष आवड असते.

७ चंद्र जर लग्न, दशम अगर केंद्र यांत मेष, मिथुन, कर्क, कन्या, तूळ, धनु मकर व मीन राशीचा असेल तर तो मनुष्य वारंवार स्थलांतर करितो. नवमांतही तेंच फल उत्पन्न करितो.

८ जर तृतीय किंवा नवम या भावांचे आरंभीं वृषभ सिंह, वृश्चिक व मीन हे स्थिर राशी उदित असतील व बरेच ग्रह जर स्थिर राशींत असतील तर तो मनुष्य जास्त प्रवास करणार नाहीं.

९ जर नवम स्थानांत गुरु, शुक्र किंवा सूर्य, चंद्र शुभदृष्ट असतील तर त्या मनुष्यास परदेशांत फार फायदा होतो. परंतु जर पाप ग्रह नवमांत असतील किंवा सूर्य, चंद्र तेथें पापदृष्ट असतील तर फायदा न होतां तोटाच झालेला आढळतो.

१० शुभ ग्रह अथवा रवि, चंद्र शुभदृष्ट १।१०।९।१२ या स्थानांत असतील तर परदेशगमनापासून फायदा फार होतो. हा योग तृतीय किंवा चतुर्थ स्थानांत होत असतां स्वदेश किंवा जन्मभूमि सोडणें सूर्खपणाच होय. पण, पापग्रह जर चतुर्थांत असेल किंवा रवि, चंद्र तेथें पीडित असतील तर स्वदेश किंवा जन्मभूमि सोडण्या पासून खात्रीनें फायदा होतो.

११ ज्या राशींतून रवि, चंद्र, लग्न किंवा दशम पीडित असेल ती रास ज्या शहराचें किंवा देशाचें लग्न मानलें आहे तेथें होतां होईल तों जाऊं नये.

एका मनुष्याचे कुंडलींत मेष राशींत शनि, मंगळ व हर्शल असून चंद्रास पीडा करीत होते. ज्योतिःशास्त्रावर भरंसा नसल्यामुळें किंवा त्याचें ज्ञान नसल्यामुळें तो बर्मिंगह्याम येथें व्यापार करण्यास गेला. या शहराचें लग्न मेष मानतात. तेथें जवळ होतें नव्हतें तें सर्व व्यापारांत गेलें व अंगावरच्या देवी येऊन भयंकर स्थिति झाली!

कुंडलीविज्ञान

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥

'भवभूति:,

पुस्तक ७वें.] आषाढ शु० १, गुरुवार [अंक १४वा.

भोळा बिचारा गोविंदराव!

एके दिवशीं गोविंदराव आपल्या वाचनालयांत कसलेंसें एक पुस्तक वाचण्यांत अगदीं गर्क होऊन गेले होते. इतक्यांत 'दादा अंवदूं तुमच्या राशीला व्यस हाये' अंवदूं सरावनाच्या महिन्यांत लइ लाभ व्हनार हाये' असें ह्मणत एक ठोकजोशी त्यांच्या दाराशीं येऊन उभा राहिला. गोविंदरावांना ज्योतिषाची मोठी आवड असे. कोणीही ज्योतिषी भेटो, त्यांस आपली कुंडली दाखवावयाची व बरेचसे प्रश्न विचारावयाचे असा त्यांचा संप्रदाय असे. 'जन्मलग्न खरें कीं खोटें कसें जाणावें', कुंडलीवरून हा पुरुष आहे कीं ही स्त्री आहे हें कसें ओखळावें', 'ही कुंडली कोणत्या जातीच्या मनुष्याची असावी', 'मनुष्येतर प्राण्यांच्या कुंडल्या ओळखण्याचे नियम कोणते', वगैरे त्यांचे ठरीव प्रश्न असत. या प्रश्नांस समाधानकारक असें अद्यापपर्यंत कोणाकडूनच उत्तर मिळालें नव्हतें. तरी पण ते मोठे आशावादी होते. त्यांच्या

मतें या प्रश्नांचीं उत्तरें देणारा कधीं तरी कोणी भेटेलच. या वेळींही ते याच विचारांत असावे, असें त्यांनीं काढिलेल्या उद्गारांवरून अनुमान होतें ठोक जोशाची बडबड चालूच होती. इतक्यांत गोविंदराव ह्मणाले, अरे तें असो, पण तुला ज्योतिषशास्त्राची कांहीं माहिती आहे काय? असेल तर प्रथम 'अमुक लग्न खरें कीं खोटें हें कसें जाणावें' तें सांगशील काय? ठोक जोशाला वाटलें कीं आतांपर्यंत आपण आर्धा गांव भीक मागितली, पण असा मार्मिक प्रश्न कोणी केला नव्हता! या ठिकाणीं आपलें ज्ञान उघड केलें तर खचीत कांहीं तरी मोठा लाभ होईल, यांत शंका नाहीं. तो ह्मणाला— 'रावसाब, यांत हो काय हाये? ह्यं तर अगदींच सोपें हाये! ज्योतिषाला ह्यं जर सांगतां आलें नाय तर मंग तो जोशी कसला?' ठोक जोशाचें हें डौलदार भाषण ऐकून गोविंदराव थक्क झाले! ते मनांत ह्मणाले, मी आजपर्यंत जें ह्मणत होतों कीं, हें ज्ञान जुन्या पुराण्य जोशांनाच असलें पाहिजे, तेंच खरें आहे. ते जरा पुढें होऊन ह्मणाले अरे हें पहा, जर मला तूं ह्या प्रश्नांचें उत्तर दिलेंस तर तुला मी चांगलें बक्षीस देईन; आणि तुझें नांव वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करीन. ठोक जोशी ह्मणाला— 'रावसाब, मला कांहीं हत्तीघोडे नग, येक जुनें पुराणें वस्तर द्या ह्मणजे झालें.' गोविंदरावांनीं ताबडतोब एक गांठोड्यांतील पांढरा अंगरखा आणि एक पागोटें पुढें ठेविलें, आणि ह्मणाले, जर तुझें उत्तर बरोबर पटेल तर हें बक्षीस तूं घेऊन जावेंस, तें मी आनंदानें देतों. जोशी ह्मणाला— 'ऐका तर, सूर्य, चंद्र, मंगळ, बुध गुरु, शुक्र, शनि, आणि राहु यांपैकीं कोणाच्या तरी त्रिकोणांत, अथवा सप्तमांत अथवा ते ज्या राशीस असतील त्या राशींचे स्वामी ज्या राशींत असतील त्यांच्या सप्तमांत किंवा त्रिकोणांत जन्म लग्न असतें. घ्या पडताळा आणि द्या बक्षीस. मला आणखी दोन घरें मागायाचीं हैत.'

गोविंदराव ह्मणाले, शाबास! थांब जरा, माझ्याजवळ जें हें

पुस्तक आहे, त्यांतल्या कुंडल्या आर्धी जुळतात कीं नाहीं तें पाहतों जुळल्या तर बक्षीस ठेवलेलेंच आहे. बेलाशक उचलून घेऊन जावेंस. असें सांगून त्यांनीं आपल्या हातांतला फलज्योतिषादर्शाचा नुकताच आलेला ४ था अंक उघडिला. आणि ८२ पृष्ठांतली नं. ३ ची कुंडली कशी काय जुळते, तें प्रथम पाहिलें. कारण, ती कुंडली जुळविण्यास त्या पुस्तकाच्या संपादकांस बराच द्राविडी प्राणायाम करावा लागला होता! तेव्हां इतका खटाटोप केल्याशिवाय जर लग्न खरें करितां आलें तर ताबडतोब या हकीकतीचें पत्र त्या संपादकांस लिहूं, अशी त्यास उत्कंठा होती! ती कुंडली अशी.—



प्रथम रवि पाहूं. तो चतुर्थस्थानीं आहे, त्यामुळें त्याच्या सप्तमांत किंवा त्रिकोणांत लग्न येत नाहीं. पण रवि मकरेंत असल्यामुळें त्या राशीचा स्वामी जो शनि त्याच्या सप्तमांत लग्न आहे. बरें, चंद्राचा राशि स्वामीही तोच आहे, ह्मणून चंद्रावरूनही जुळलें. मंगळावरून, बुधावरून व गुरूवरून जुळत नाहीं. या सोडून! पण शुक्राच्या नवमांत आहे व राहूच्या पंचमांत आहे!! जुळलें. थोडक्यांत जुळलें शाबास! अरे, वा! यांत गुलिक, प्राणपद, नवमांश वगैरे कांहीं पहावें लागत नाहीं.! नामी युक्ति! अरे जा घेऊन तें बक्षीस बरें? पुढें कधीं इकडे आलास तर मला भेटल्याशिवाय जाऊं नको. कारण मला आणखी कांहीं प्रश्नांचा खुलासा तुझ्यापासून करून घेणें आहे. जा. घे तें बक्षीस. ठोक जोशालाही कृतकृत्य झालेंसें वाटलें. त्यानें हास्यमुद्रेनें लवून रामराम केला, आणि तो तें बक्षीस घेऊन आपल्या उद्योगाला गेला. गोविंदरावांनाही मोठी धन्यता वाटली. ही माहिती फलज्योतिषादर्शाच्या संपादकांस केव्हां पाठवीन अशी

त्यांस उत्कंठा झाली होती. लगेच त्यांनीं आपला रुमाल सोडला आणि कागद घेऊन लिहूं लागले तों पुन्हा शंका आली न जाणो कदाचित् हींच एक कुंडली जुळली असेल. पण दुसऱ्या जुळतात कीं नाहीं हें पाहिल्याशिवाय ही माहिती त्यांना देणें बरोबर नाहीं. म्हणून त्यांनीं सर्व कुंडल्या पाहिल्या तव्हां या नियमाची खात्री झाली आणि पत्र लिहिण्यास सुरुवात केली. इतक्यांत त्यांचा विनोदी मित्र वामनराव आला. तो म्हणाला कां गोविंदराव, 'आज कोणाचें नशीब पाहातां आहां ? गोविंदराव म्हणाले, तुम्ही अशीच नेहमीं थट्टा करा. अहो या शास्त्रासारखी मजा नाहीं मजा, समजलांत ! आज एक मला ठोकजोशानें नियम सांगितला आहे, तो किती सुलभ आणि किती खरा आहे म्हणून सांगूं ? तुम्ही बाटेल ती कुंडली पुढें आणा मी त्यांतील जन्मलग्न खरें कीं खोटें तत्काल सांगतों !

वामनराव थट्टेखोरच होता. तो म्हणाला— 'ऐकूं द्या तर तुमचा काय नियम आहे तो' ? मग कुंडल्या आणतों. त्या बरोबर गोविंदरावांनीं त्या नियमाचा पाढा वाचला. वाचतां वाचतांच वामनरावाला इतकें हसूं कोसळलें कीं, शेवटीं त्याच्यानें एक शब्दही बोलवेना ? तो म्हणाला, गोविंदराव, काय म्हणतां ? रवीवरून जुळलें नाहीं तर चंद्रावरून पहावें काय? आणि चंद्रावरून न जुळेल तर ? गोविंदराव , म्हणाले, 'मंगळावरून' आणि मंगळावरून न जुळेल तर असें हंसतच वामनराव म्हणाला. गोविंदरावांचें उत्तर ठरलेलेंच होतें ते म्हणाले— ' बुधावरून ' या पुढें वामनरावांचें हांसें आवरेना. तरी त्यांतच म्हणाले, आणि बुधावरून न जुळेल तर ? गोविंदराव भोळे होते. त्यांना वामनराव कां हसतो यांतलें इंगित कांहीं केल्या कळेना. ते हिरमुसले होऊन वामनरावाला म्हणाले, अरे हें तुला खोटें वाटतें कीं काय ? अनुभव घेऊन पहा, आणि मग हांस ! गोविंदराव आतां खास रागावतील या भीतीनें वामनरावानें आपलें हसें तत्काल आवरलें आणि तो हळूच म्हणाला— गोविंदराव, तूं भोळा रे भोळा !

अरे वेड्या नऊ ग्रह आणि त्यांवरून पहावयाचे चार प्रकार, यांतून कुंडली सुटेल असें तुला वाटतें तरी कसें ? अरे एखाद्यानें आपली कुंडली बदलून जरी तुझ्यापुढें ठेविली तरी ती तुझ्या नवग्रहांपैकीं कोणाच्या तरी सपाट्यांत सांपडणारच. ती या मतानें खरींच नाही का ठरणार ?

हें वामनरावाचें बोलणें ऐकतांच गोविंदरावांच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला ! वामनराव म्हणतो तें खरें. आपण विनाकारण फसलों! असो, पण वामनराव, या पुस्तकांत जे नियम आहेत ते तरी बरोबर आहेत असें तुला वाटतें काय ? कारण नं. ३ च्या कुंडलीचा खरेपणा दाखवित असतां तूं म्हणतोस असाच प्रकार संपादकांचा झालेला आहे !

वामनराव म्हणाला, तेंही अशातलेंच खूळ आहे. चंद्रावरून न जुळेल तर प्राणपदावरून, प्राणपदावरून न जुळेल तर गुलिकावरून लग्नकुंडलीवरून न जुळेल तर नवमांशकुंडलीवरून, सप्तमांत नाहीं तर त्रिकोणांत तसेंही नसेल तर त्यांच्या स्वामीच्या सप्तमांत किंवा तें न जुळेल तर त्रिकोणांत जन्मलग्न येणारच. ६०,००० सैन्याचा गराडा दिल्यावर डिव्हेटसारखाच एखादा वीर सुटावयाचा !

वरील भाषणानें गोविंदराव खिन्न झाले, आणि 'मला वाटतें शारीर लक्षणें, नातलगांच्या कुंडल्या व पूर्वी घडलेली हकीकत हींच लग्न ठरविण्याचीं मुख्य साधनें आहेत हेंच खरें.' असें म्हणून दोघेही कांहीं वेळ स्तब्ध बसले !

भ्रातृयोग

जन्मलग्नाचा खरेखोटेपणा निश्चित करण्याचे सशास्त्र व खात्रीचे मार्ग तीन आहेत. १ ला– शारीरलक्षणांवरून. २ रा– नातलगांच्या कुंडल्यांवरून, आणि ३ रा– पूर्वी घडलेल्या ठळक माहितीवरून. या तीन मार्गांशिवाय जन्मलग्नाचा खरेखोटेपणा निश्चित होणें अशक्य व असंभवनीय होय, असें आह्मीं मागें अनेक वेळां प्रतिपादन

केलें असून वाचकांनीं त्याचा अनुभवही घेतलेला आहे. चंद्रराशिस्वामी, गुलिक किंवा प्राणपद यांवरून खरेखोटेपणा सिद्ध होणार नाहीं, कारण त्यांच्या नियमांत 'अव्याप्ति' हा दोष आहे, असें गेल्या वर्षाच्या शेवटच्या अंकांत सिद्ध केलें आहे. तरी पण मृगजळानें तहान भागणें शक्य आहे, असें प्रतिपक्षाकडून पुन्हा पुन्हा प्रतिपादन केलें जात आहे, याचें आश्चर्य वाटतें! असो, आमच्या वाचकांनीं घोटाळ्यांत व मोहजालांत सांपडूं नये ह्मणून ते नियम ह्मणजे शुद्ध मृगजल आहे असें स्पष्ट दाखवून दिलें आहे. त्यावरून व आजच्या अग्रलेखांतील गोष्टींवरून प्रतिपक्षाचें बिंग वाचकांच्या ध्यानांत येईल अशी उमेद आहे.

आह्मीं प्रतिपादन केलेल्या तीन मार्गांपैकीं १ ला मार्ग अत्यंत श्रेष्ठ आहे. याच मार्गानें चेहऱ्यावरून कुंडली मांडतां येणें शक्य आहे. या मार्गाचें विवेचन सुलभजातकाच्या १ल्या भागांत यथामति केलें असून कुंडलीविज्ञानांतही ठिकठिकाणीं निरनिराळीं लक्षणें सांगितलीं आहेत. हीं लक्षणें स्वानुभवावरून ठरविलेलीं आहेत. कोणत्याही ग्रंथाचें किंवा ग्रंथकारांचें उष्टें घेतलेलें नांहीं. बृहज्जातकाचा राशिशील हा अध्याय आह्मीं वाचलेला आहे. त्यांतील लक्षणांनीं कुंडली मांडण्यास विशेष नव्हे पण यत्किंचितही उपयोग होणार नाहीं, अशी आमची ठाम खात्री आहे. या अध्यायाचें निरीक्षण पुढें केव्हां तरी करूं, त्यावेळीं वाचकांची खात्री होईल. जुनें तेवढें सर्व खोटें असें आह्मी आजपर्यंत कधीं ह्मटलें नाहीं व ह्मणण्याचें कारणही नाहीं. जुन्यापैकीं उपलब्ध ग्रंथ घोटाळ्याचे व एकदेशीय आहेत, त्यांत अनेक पद्धतींचें मिश्रण आहे, त्यामुळें त्यांचा उपयोग जितका व्हावा तितका होत नाहीं, यांत तिलप्राय शंका नाहीं. सूर्य मध्यस्थपद्धति, जैमिनीयपद्धति, अष्टकवर्गपद्धति, केरलपद्धति, केशवीची पद्धति इत्यादि पद्धतींच्या मिश्रणानें बनलेल्या ग्रंथांचा फलें सांगण्याच्या कामीं तादृश उपयोग न होतां मन बुचकळ्यांत मात्र पडतें. हें जातकालंकाराच्या टीकेत

दाखविलें आहे. आतां या बोटावरची थुंकी त्या बोटावर नाचविणाऱ्या जादूगार ज्योतिष्याला आपलें ह्मणणें या पद्धतींत नाहीं तर त्या पद्धतींत व तींत नाहीं तर तिसऱ्याच पद्धतींत आहे, असें दाखविण्याच्या कामीं मात्र सोळा आणे उपयोग करून घेतां येतो ही गोष्ट खरी! हें बिंग आह्मीं बाहेर काढिल्यामुळें जुन्या मताच्या ज्योतिषांचा आमच्यावर मोठा रुसवा झाला आहे. त्यांच्याच मतावें एक पिल्लूं नाशिकपंचवटीस वाढत आहे याबद्दल दिलगिरी वाटते! फलज्योतिषावर दुसऱ्या कोणीं ग्रंथ प्रसिद्ध करूं नये अशी मत्सरबुद्धि आमच्या ठिकाणीं आहे, असें तें पिल्लूं कंठरवानें सांगत आहे! जगूं काय मासिक पुस्तक चालविल्याच्या योगानें आह्मांस इंद्रपद मिळणार आहे, तें कदाचित् दुसराच कोणी लटकावील अशी आह्माला भीति पडली आहे! वा आदर्शा भिऊं नकोस. तें तुला मिळालें तरी कांहीं चिंता नाहीं. विनंति इतकींच आहे कीं तें पाश्चिमात्य पंडित जर तुझ्या आधीं मिळविण्याच प्रयत्न करीत असतील तर तितक्याला मात्र जप ह्मणजे झालें.

कुंडलीचा खरेखोटेपणा सिद्ध करण्याचा दुसरा मार्ग फारच गमतीचा व चमत्काराचा आहे. पितापुत्रयोग, मातापुत्रयोग, भ्रातृयोग व पतिपत्नीयोग किंवा दांपत्ययोग हीं या मार्गाचीं ४ मुख्य साधनें आहेत. या साधनांचेंही आमच्या वाचकांस आह्मांला जितकें कळलें तितकें ज्ञान दिलें आहे व पुढेंही दिलें जाईल. हें ज्ञानही स्वसंपादित आहे, हें आदर्शास बजावून सांगतों. संबंधी मनुष्यांचे जन्म ईश्वरी संकेतानेंच होतात व तो संकेत त्यांच्या कुंडल्यांत स्पष्ट दृग्गोचर होतो, ही गोष्ट आह्मींच प्रथम आमच्या समाजास सांगितली आहे!

दत्तकयोग, निपुत्रिकयोग, गर्भयोग, अपघात, रोग, अपमृत्यु, कायदेपांडित्य, प्रवासयोग, द्विभार्यायोग, बहुभार्यायोग इ० प्रकारांनीं जन्मलग्न

सिद्ध करण्याचा तिसरा मार्ग आहे. या मार्गाचा प्रयत्नही पूर्वी झाला आहे व होत आहे. यांतील बऱ्याच गोष्टी स्वसंपादित आहेत, हेंही आमचे कृतज्ञ वाचक जाणत आहेत.

आजपर्यंत या तीनही मार्गांचें जें विवेचन झालें आहे तें जरी सर्वांशीं पूर्ण झालेलें नाहीं, तरी जन्मलग्न सिद्ध करण्याच्या कामीं त्यांचा पुष्कळच उपयोग झाला पाहिजे अशी आमची खात्री आहे. असो- आजा-दुसऱ्या मार्गापैकीं भ्रातृयोगाचें विवेचन करावयाचें आहे, इकडे शोधक वाचक लक्ष पुरवितील अशी आशा आहे.

भावांच्या कुंडल्यांत पुढील चमत्कार दृष्टीस पडतात.

भ्रातृयोग

(१) एकच लग्न
(२) एकच चंद्र
(३) एकच मंगळ
(४) लग्न, चंद्र, मंगळ यांचे तृतीय, सप्तम अथवा त्रिकोण राशि
(५) लग्नीं एकच ग्रहस्थिति.

आईबापांचीं भिन्न शरीरें व त्यांचे भिन्न धर्म यांच्या संमिश्रणानें प्रजा उत्पन्न होत असते. ह्मणून एकाच नियमानें सर्व प्रजेच्या कुंडल्या असूं शकत नाहींत. तृतीय स्थानावर भावंडांचा विचार होतो, ह्मणून त्या राशींत दुसऱ्याचें लग्न असतें किंवा चंद्र असतो अथवा मंगळ असतो.

सप्तम हा समोरचा राशि होय. तृतीय स्थानाच्या समोर नवम स्थान असतें. पंचम हें तृतीय स्थानाचें तृतीय स्थान आहे, सप्तम हें पंचमाचें तृतीय असून नवम हें सप्तमाचें तृतीय आहे. यांत नवमाचें तृतीय जें एकादश तें स्थान वगळल्यासारखें होतें. कदाचित् त्याचाही स्वीकार करावा लागेल. हीं सर्व गर्भस्थानें आहेत. ह्मणून या स्थानानुरोधानेंच भावंडांचीं लग्नें, चंद्र व मंगळ असणें शास्त्रीय

तत्वानें योग्य आहे. चेहऱ्यावरून जसें हा अमक्याचा भाऊ असावा, असा संशय येतो तसाच कुंडल्यांवरूनही आला पाहिजे. निश्चयात्मक उत्तर देतां येणें हें ज्याच्या त्याच्या प्राविण्यावर अवलंबून राहील.

कित्येकांच्या मतें आह्मीं जीं ही प्रमाणें सांगतों तीं सायन पद्धतीचीं आहेत. निरयन पद्धतीला त्यांचा कांहीं उपयोग नाहीं. परंतु हा समज चुकीचा आहे. हीं प्रमाणें तात्विक आहेत. ह्मणून जी पद्धति खरी असेल तींत तीं चांगलीं अनुभवास येतील. सायन पद्धतींत हीं सर्व निःसंशय आढळतात, ह्मणूनच ही पद्धति खरी आहे असें आह्मीं ह्मणतों. जसें गोडी हा साखरेचा स्वाभाविक धर्म आहे, त्याच प्रमाणें वरील नियम हे स्वाभाविक होत. साखरांमध्यें ज्याप्रमाणें सरस-निरस पणा असतो त्याच प्रमाणें सायननिरयन पद्धतींतही आहे. शिवाय देशी साखर जशी पवित्र आहे, तशीच सायन पद्धतीही पवित्र आहे. ती यूरोपियनांची नाहीं. असो. आतां वरील नियम भावंडांच्या कुंडल्यांत कसे आढळतात तें पहा.—

उदाहरण

जन्म-श. १८१४ आश्वि. शु. ५
सोम. सू. नं. घ. ५ प. ५
सायन



जन्म-श. १८१७ कार्तिक शु. १४
शुक्र. रात्रौ शेष घ. ६ प. ५
सायन



वरील कुंडल्या भावंडांच्या आहेत. पहिली थोरल्याची व दुसरी धाकट्याची. यांतील साम्य-

१ दुसरीचें लग्न पहिलीच्या मंगळाच्या त्रिकोणांत आहे.
२ पहिलीचें लग्न दुसरीच्या मंगळाच्या राशीस आहे.
३ दुसरीच्या तृतीय स्थानीं उदित असलेल्या राशींत पहिलीचा चंद्र आहे.
४ पहिलीच्या तृतीय स्थानीं व दुसरीच्या मंगळाच्या तृतीय स्थानीं एकच राशि आहे.
५ दुसरीचा चंद्र पहिलीच्या सप्तमांतील राशींत आहे.

उदाहरण २ रें

जन्म–श. १८१० का. कृ. ७
रवि. दि. २ वाजून ३० मि.
सायन



जन्म–श. १८१४ वै. शु. २
सू. नं. घ० ८ प० १०
सायन



जन्म–श. १८१५ भा. कृ. १
दि. ७ वाजून ४५ मि.
सायन



जन्म– श. १८१८ फा. शु. ६
मंग. घ. ५१ प. ५
सायन



या चार कुंडल्या भावंडांच्या आहेत.
१ पहिलीचें लग्न दुसरीच्या मंगळाच्या तृतीय स्थानीं आहे.
२ पहिलीच्या मंगळाच्या सप्तम राशीस दुसरीचें लग्न आहे.
३ पहिलीचा चंद्र दुसरीच्या मंगळाच्या सप्तम राशीस आहे.
४ पहिलीच्या चंद्राच्या त्रिकोण राशीस अथवा तृतीयस्थ राशीच्या सप्तम राशीस दुसरीचा चंद्र आहे.
५ पहिलीचें लग्न व तिसरीचा चंद्र एक आहे
६ पहिलीचा मंगळ तिसरीच्या तृतीयस्थ राशींत आहे.
७ पहिलीच्या मंगळाच्या त्रिकोण राशीस तिसरीचा मंगळ आहे.
८ पहिलीच्या तृतीयस्थ राशीस चवथीचा चंद्र आहे.
९ पहिलीच्या मंगळाच्या राशीस चवथीचें लग्न आहे.
१० पहिलीचा मंगळ चवथीच्या लग्नराशीस आहे.
११ पहिलीचा चंद्र चवथीच्या चंद्राच्या अथवा मंगळाच्या तृतीय राशीस आहे.
याच प्रमाणें कोणत्याही दोन कुंडल्यांत भ्रातृयोग आहेत.

उदाहरण ३ रें

श. १८२४ माघ व. ६
मंग० दि० ४ वाजतां
सायन



श० १८२६ चै० शु० ८
शुक्र. दि. १२ वाजून २५ मि.
सायन



शके १८२८ भाद्रपद व० २
मंग. दि. ४ वाजून ४७ मि.



यांतील पहिल्या दोन बाहिणीच्या आहेत, तिसरा त्यांचा भाऊ आहे. या तिहींत नियमांप्रमाणें साम्य आहे असें दिसून येईल.

ऐथें एक गोष्ट वाचकांनीं ध्यानांत ठेवावी कीं, अशा प्रकारचें साम्य भावंडांशिवाय इतरांच्या कुंडल्यांत असूं शकणार नाहीं किंवा असेल तर तीं भावंडेंच असलीं पाहिजेत असें आह्मीं सिद्ध केलेलें नाहीं. फक्त जीं भावंडें असतील त्यांच्या कुंडल्यांत मात्र वरील नियम असतात असें सिद्ध केलें आहे. गळ्यांत जानवें आहे ह्मणून तो ब्राह्मणच असला पाहिजे असें नाहीं पण जर ब्राह्मण आहे, तर मात्र त्याच्या गळ्यांत जानवें असलें पाहिजे हें उघड आहे.

ज्योतिर्विभूषण

'विवेकभ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः'

अमुक कुंडली 'पुरुषाची आहे कीं स्त्रीची आहे,' 'मनुष्याची आहे कीं मनुष्येतर वृक्षपशुपक्षी इत्यादिकांची आहे,' व ती ब्राह्मणाची आहे कीं ब्राह्मणेतर जातीचा आहे' हे फलज्योतिषांतील अत्यंत बिकट किंबहुना असाध्य असे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न प्राचीन ज्योतिर्विदानीं केलेले आहेत. परंतु त्यांनीं समाधान होत नाहीं, असें आमचें ह्मणणें आहे. कुंडलीविज्ञानांत पूर्वी या संबंधानें बराच ऊहापोह झालेला आहे. पु. ४ अं. ७ मध्यें जें एक नक्षत्रविभागांचें कोष्टक दिलें आहे, त्यावरून पहिल्या दोन प्रश्नांचा निकाल लागणार आहे. इतकें जरी आहे, तरी ज्योतिष्याचें समाधान तितक्यानें कधींही व्हावयाचें नाहीं. पाहिजे तर असें

ह्मणावें कीं 'या या प्रमाणें पूर्व ज्योतिष्यांनीं प्रयत्न केले आहेत.' पण, तेच खरे आहेत असें दिसाखानें प्रतिपादन करण्यांत अर्थ नाहीं. त्याचा लंगडेपणा ध्यानांत येईल असे आमच्यासारखे अडाणी हजारों आहेत. त्यांच्यापुढें ही दिमाखी क्षणभरसुद्धां टिकणार नाहीं, हें ज्योतिर्विभूषणांनीं पक्कें ध्यानांत ठेवावें. असें ह्मणण्यांत आह्मीं पूर्वीच्या आचार्यांस नांव ठेवितों असें होत नाहीं. त्यांना जितकें करितां आलें तितकें त्यांनीं केलें. त्यांचे प्रयत्न पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्याचें ओझें मात्र आमच्यावर सांप्रत येऊन पडलें आहे. तें काम नवीन ग्रंथकारांनीं करावें अशी आमची इच्छा आहे. लांब्या शेपटाची थोरवी गाण्यांत शहाणपणा नाहीं.

ज्योतिर्विभूषण ४ थ्या अंकांत आह्मांस ह्मणतात—"अहो, ग्रंथकार अद्याप या भरतभूमीवर ज्योतिषशास्त्रज्ञसमूह बराच असल्यानें त्यांचे पुढें आपल्या ग्रंथकर्तृत्वाचा डौल कितपर्यंत टिकणार? बरें असो." खरेंच. हें आमच्या ध्यानांत मुळींच नव्हतें! वेळींच सावध केलेंत याबद्दल अभार मानतों. पण काहो–तुह्मी आपल्या अंक २ मध्यें एक उदाहरण घेऊन त्याचें विवेचन असें केलें होतेंत.–

"सदर कुंडलींत कर्क [समस्त्री] लग्न उदित असून जन्मचंद्रही स्त्री राशींत आहे. तसेंच जन्मलग्नीं राहू शुक्र हे स्त्री ग्रह आहेत, जन्मलग्नेश चंद्र स्त्रीग्रह असून त्यानें जन्मलग्न दृष्ट आहे, सबब नियम २ प्रमाणें ही कुंडली स्त्रीची ठरते व ती स्त्रीचीच आहे.'

या तुमच्या नियमाचा खोटेपणा आह्मीं कुंडलीविज्ञान–पुस्तक ७ अंक १मध्यें जेव्हां सिद्ध केला, तेव्हांच तुमचें ज्योतिषज्ञान जागृत होऊन बृहज्जातकांतले श्लोक अंक ४ मध्यें देऊन फुटक्या आरशांची दुरुस्ती करण्याचा प्रयत्न केला, हें कसें काय? जर तुमचें ज्योतिषज्ञान अगाध होतें तर तें प्रथमतःच कां दृष्टीस पडलें नाहीं? यावरून तें केवळ पुस्तकी असलें पाहिजे असें सिद्ध होत नाहीं काय? जर तें अनुभविक असतें तर अशी गफलत झाली नसती. गुलिक

प्राणपदासंबंधानें सुद्धा हीच स्थिति झाली आहे ! असो. आतां तरी ह्या फुटक्या आरशांची दुरुस्ती कशी काय झाली आहे व तिचा कितपत उपयोग होणारा आहे तें पाहूं.

दुरुस्ती

१ लग्न, सूर्य, गुरु, चंद्र हे विषम राशीस पुरुष नवांशीं असतां, 'पुरुषजन्म'दायक होतात व समराशीस असून स्त्री नवांशीं असतां 'स्त्रीजन्म' दायक होतात. हा पहिला नियम आहे.

२ गुरु, सूर्य, हे विषम राशीस असतां 'पुरुषजन्म' दायक होतात. आणि चंद्र, शुक्र व मंगळ हे स्त्री राशीस असतां 'स्त्रीजन्म' दायक होतात. हा दुसरा नियम आहे.

यावर एक टीप दिली आहे–विषम लग्न व विषमांशीं सूर्यादि ग्रह असून लग्नाचा समांश उदित असतांही पुरुषजन्म होतो. तसेंच, समलग्न असून विषमांशीं संपूर्ण ग्रह असतांही, लग्नाच्या विषमांशीं पुरुषजन्म होतो.

संपादक महाराज, यावर आमच्या शंका आहेत. कारण, श्लोकांत **'लग्नार्क गुर्विंदुभिः'** **'गुर्वर्कौ'** **'शशिसितौ वक्रश्च'** अशीं पदें आहेत पण त्यांत **'वा'** **'अथवा'** यांपैकीं एकही पद नाहीं, म्हणून शंका येतात त्या—

१ लग्न— सम, विषमांश.
ग्रह— विषम, विषमांश. } यावरून काय समजावें ?

२ लग्न— विषम, समांश.
ग्रह— विषम, विषमांश. } ,,

३ लग्न— विषम, विषमांश.
ग्रह— सम, विषमांश. } ,,

४ लग्न— विषम, विषमांश.
ग्रह— विषम, समांश. } ,,

५ लग्न— विषम, समांश.
ग्रह— सम, समांश. } ,,

६ लग्न— सम, विषमांश.
ग्रह— सम, समांश. } ,,

७ लग्न— सम, समांश.
ग्रह— विषम, समांश. } ,,

८ लग्न— सम, समांश.
ग्रह— सम, विषमांश. } ,,

९ ग्रह विषम किंवा सम राशींत अथवा नवांशीं सर्व असावे लागतात किंवा एखादा असला तरी चालतो ?

१० गुर्वर्कौ असें म्हटलें आहे, त्या ठिकाणीं गुरु आणि रवि हे दोन्ही विषम राशीस पाहिजेत किंवा एकच असला तरी चालतो ?

११ शशिसितौ वक्रश्च यांत चंद्र, शुक्र व मंगळ हे तीनही ग्रह सम राशीस पाहिजेत किंवा एखादा असला तरी चालेल ?

पुरुषजन्माचे व स्त्रीजन्माचे दोन दोन प्रकारचे योग असावे लागतात, असें श्लोकावरून दिसतें तें खरें कीं दोहोंपैकीं कोणत्याही एका प्रकारचा योग असला म्हणजे झालें ?

१३ हा श्लोक वराहमिहिरानें निषेकाध्यायांत सांगितला आहे, तेव्हां तो गर्भकालाला लागू करावयाचा किंवा जन्मकालाला ?

१४ निषेककालीं ज्या प्रकारची ग्रहस्थिति असेल त्याच प्रकारची जन्मकालींही असूं शकली पाहिजे ?

तूर्त या चवदा शंका उत्पन्न झाल्या आहेत. श्लोकावर जरी आपण टीप दिली आहे, तरी तितक्यानें भागत नाहीं. हीच टीप जरा विस्तृत असती म्हणजे इतक्या शंका आल्या नसत्या ! या गोष्टीस आमचा निरुपाय आहे. थांबा, थांबा. आणखी एक शंका राहिली ! पृ० ९० मध्यें **'खुलासा'**— वर दर्शविलेल्या स्त्रीपुरुष जननिदानाचा विचार करितांना स्त्रीपुरुष ग्रहयोगजन्य दृष्टीचा विचार शक्य तितका

करावा.' असें ह्मणून एक दृष्टीचा श्लोक दिला आहे. तेव्हां १५ वी शंका अशी येते कीं, शक्य तितका ह्मणजे काय? ही शंका आली नसती. पण आपण जीं स्त्रीपुरुषजन्मांचीं ८ उदाहरणें सोडवून दाखविलीं आहेत त्यांत दृष्टीचा विचार केलेला नाहीं! तेव्हां हा विचार केव्हां करावयाचा? कदाचित् कांहींच जुळेनासें झालें ह्मणजे तर हा निर्वाणीचा बाण नसेलना?

संपादक महाराज, आपण त्या ८ कुंडल्यांचा खरेपणा सिद्ध करून दाखवितांना पुंगी वाजवून नजरबंदी केली आहे, याबद्दल आपणास मोठें अगडबंब बक्षीस देणें जरूर आहे. कदाचित् कोणीं देईलही. पण जर तसें न होईल, तर इकडून फूल नाहीं फुलाची पाकळी ह्मणून 'एक आंवळ्याएवढें पूज्य' बक्षीस देण्याचा विचार आहे!! कारण त्या कुंडल्यांचा खरेपणा व्यक्त करितांना वाचकांच्या डोळ्यांत धूळ टाकून आपला कार्यभाग उरकून घेतलेला आहे! मनुष्य एकदां विचारभ्रष्ट बनला, ह्मणजे त्यानें सावरण्याचा कितीही प्रयत्न केला तरी ठिकठिकाणीं घसरतोच. त्याचप्रमाणें ज्योतिर्विभूषणांची स्थिति झालेली पाहून त्यांची कींव येते! प्रथम "ओजर्क्षे गुरुसूर्यौ" हा श्लोक देऊन 'कुंडलीवरून स्त्री पुरुषज्ञान' होतें असें वाचकांस सांगितलें. व ते 'अलीकडे ज्योतिषी वर्गांत असले प्रश्न सोडविण्याचे प्रकार बाजूला राहून "दुनिया झुकती है लेकिन झुकानेवाला चाहिये" असे प्रकार वाढत्या प्रमाणावर आहेत, अशानें लवकरच फलज्योतिष लयास जाण्याचा संभव आहे,' इ० डौलानें लिहून गेले. नंतर जेव्हां आह्मीं त्याचा खोटेपणा दाखविला, तेव्हां ती बाजू सोडून 'ओजर्क्षे पुरुषांशकेषु' हा श्लोक आपल्या चवथ्या अंकांत पुढें केला. आणि मिशीला पीळ देऊन आपली लटकी बाजू सांवरून धरूं लागले! व आवेशाच्या भरांत असेंही ह्मणून गेले कीं, हे नियम ह्मणजे रत्नें आहेत.' आह्मीं ह्मणतों, होय. खरोखर हीं रत्नेंच आहेत. पण त्यांची परीक्षा करणारा मात्र रत्नपारखी नसून गाजरपारखी

आहेत! "जातौ जातौ यदुत्कृष्टं तद्रत्नमिति कथ्यते" हें रत्नाचें लक्षण आहे. त्याप्रमाणें बृहज्जातकांतले हे नियम ह्मणजे रत्नेंच आहेत. त्यांचा उपयोगही रत्नांप्रमाणेंच केला पाहिजे. गाजरा प्रमाणें त्याची भाजी करणें हा महामूर्खपणा होय.

ज्योतिर्विभूषणांना वाटलें कीं, आतां या रत्नांपुढें कुंडलीविज्ञानकारांचीं रत्नें गाजरांच्या योग्यतेचीं ठरतिल. ह्मणून तीं साफसूफ करून ज्या ठिकाणीं त्यांना कमीपणा होता तो स्वतः त्यांनीं टीप देऊन दुरुस्त केला. परंतु अखेरीस त्यांचा गाजरांसारखाच उपयोग केला! जमेल तितकें घेतलें आणि न जमेल तें सोडून दिलें. यांना ह्मणावें ज्योतिर्विभूषण!!! उदाहरणार्थ ८७ पृ. उवडा. त्यांत कुंडलीचा खरेपणा दाखवितांना ते ह्मणतात– "अं. २ पृ. ४८ नि. १ प्रमाणें सूर्य, गुरु बलवान् असून नि. १ प्रमाणें लग्न, सूर्य, गुरु, चंद्र हे पुरुष नवांशीं असल्यामुळें पुरुष जन्म झाला."

अंक २ पृ. ४८ यांतील नि० १ एथें लागू पडतो. पण अं. ४ पृ. ८५ यांतील नि. १ येथें कसा लागू होतो, कळत नाहीं. त्यांत 'ओजर्क्षे पुरुषांशकेषु' असें आहे. आणि कुंडलींत सूर्य तर स्त्री राशीला आहे! ८८ पृ.तल्या दुसऱ्या कुंडलींत तर फक्त गुरु आणि सूर्य मात्र विषम राशीला आहेत, पण चंद्र सम राशीला आहे. त्याचप्रमाणें गुरुही विषमांशीं नसून समांशीं आहे! याचप्रमाणें प्रत्येक कुंडलींत इष्ट वाटेल तशी घरसोड करून येन केन प्रकारेण आपलें ह्मणणें सिद्ध करण्याचा आव घातला आहे. पण तो निरर्थक आहे. आपणाला अनुकूल अशी उदाहरणें घेऊन सुद्धां ज्या अर्थी घरसोड करावी लागली आहे, त्या अर्थी हे नियम एकदेशीय असून ते सर्वांशीं जेथें लागू पडतील तेथेंच स्त्रीपुरुषज्ञान निश्चयात्मक व्यक्त होणार आहे.

ज्योतिर्विभूषण ह्मणतात, "विज्ञानकार यांनीं केवळ द्वेषबुद्धीनें असत्यता दाखविण्याकरितां नुसत्या शक, मिती, घटी, पळें वर्ज्य करून

कुंडल्या प्रसिद्ध केल्या आहेत, त्या त्यांस खऱ्या कशा भासणार?" हें निवळ तर्कट आहे! कसें तें पहा— आह्मीं ज्या कुंडल्या दिल्या होत्या त्या आसच्या वर्गणीदारांकडून आलेल्या होत्या. अंक २ पृ० ४७ यांतील नियमांची सत्यासत्यता दाखविण्यासाठीं त्या दिल्या होत्या. हे नियम पडताळून पाहण्यास त्यांच्या जन्मकालाची आवश्यकता नव्हती. या नियमांत नवमांशांची जरूरी नव्हती. 'पुरुष राशीचें असेल तर पुरुष जन्म जाणावा, अशा तऱ्हेचे ते नियम होते. तेव्हां त्यांचे काल दिले नाहींत यांत द्वेषबुद्धि कसली आणि अज्ञानचष्मा कसला? आह्मांला कधी चष्माच लावावा लागत नाहीं. आमची दृष्टि शाबूत असून ज्योतिर्विभूषणांना (ज्ञानचष्मा लाविलेल्या संपादकांना) ज्या गोष्टी दिसत नाहींत किंवा दिसणें शक्य नाहींत, त्या आह्मांला स्पष्ट दिसतात. पण आंधळ्यांना वाटतें कीं आमच्या सारखेंच सर्व जग आंधळें आहे, याला काय करणार? असो. आह्मीं दिलेल्या कुंडल्या खोट्या होत्या असें त्यांच्या मनानें घेतल्यामुळेंच या खेपेस त्यांच्याच कुंडल्यांचें निरीक्षण केलें आहे. उदाहरणें देतांना जरी त्यांनीं सावधगिरी ठेविली होती तरी ती एकाही कुंडलींत सिद्धीस गेली नाहीं. अशीं सहस्रावधि उदाहरणें देतां येतील कीं ते नियम अंशतः सुद्धां लागू पडणार नाहींत. असो या गोष्टींचा विचार ज्ञानचष्मा लाविलेले ज्योतिर्विभूषण करितील, आणि आपण मोठे जाडे ज्योतिषी आहों हा अभिमान सोडतील अशी आशा आहे!



२ संततिकाल.

फलज्योतिषावरील कोणताही ग्रंथ घ्या. त्यांत संततिसुखासंबंधानें मात्र सांगितलेलें आढळतें. पण संततिकालासंबंधानें एक अक्षरही आढळत नाहीं. प्रथम संतति होणार किंवा नाहीं याचा पूर्ण विचार करावा व नंतर पुढील गोष्टी ध्यानांत घेऊन संततिकाल निश्चित करावा.

या कालाचा विचार करण्यासाठीं स्त्री व पुरुष अशा उभयतांच्या कुंडल्या पुढें धरिल्यास संततिकालाचा निर्णय थोडक्या श्रमानें अल्प काळांत बिनचूक होईल. कारण, एखाद्या वेळीं पुरुषाच्या कुंडलींत संततियोग दिसतो, परंतु त्याची प्रथम स्त्री वंध्या असल्यामुळें अथवा ती अल्पायु असल्यामुळें तिच्या हयातींत संतति होत नाहीं. पुरुषाच्या कुंडलींत संतति आहे आणि स्त्रीच्या कुंडलींत नाहीं असें दिसून आल्यास त्यांपैकीं कोणी तरी अल्पायु आहे किंवा स्त्री वंध्या आहे असें समजावें.

संतति कालांत होणारें मूल पुरुषाच्या वळणाचें असेल तर संततिकाल त्याच्याच कुंडलींत मिळेल व स्त्रीच्या वळणाचें असेल तर स्त्रीच्या कुंडलींत मिळेल. स्त्रीच्या कुंडलीवरून संततिकाल शोधणें सोपें असतें. कारण, स्त्रियांना संतति होते तो काल मर्यादित आहे. तसा पुरुषांचा नाहीं. बालविवाह रूढ असलेल्या जातींत स्त्रियांचा सं० का० १३ ते २० याच्या दरम्यान असावयाचाच. ऋतुस्नात झाल्यापासून ५ वर्षांत बहुतेक स्त्रियांना मूल होतें. ह्मणून संततिकाल स्त्रीच्या कुंडलीवरूनच ठरवावा. पुरुषाच्या कुंडलींत तो अत्यंत दुर्बोध असतो. एकाच कुंडलीवरून सर्व गोष्टी सांगतां आल्या पाहिजेत या मताच्या लोकांस हें ह्मणणें रुचणार नाहीं. परंतु अनेक अनुभव घेऊन हें मत चुकीचें आहे असें आह्मीं ठरविलें आहे.

कुंडलींतलीं १, ३, ५, ७, ९, ११ हीं सहा स्थानें गर्भोत्पादक आहेत. त्यांत ५ वें व ११ वें ही दोन स्थानें प्रमुख आहेत. या स्थानांत शनि आणि गुरु हे जेव्हां प्रवेश करितात, तेव्हां ते गर्भ उत्पन्न करितात. जेव्हां हे दोन्ही गोल वरील स्थानांत भ्रमण करितात तेव्हां निश्चयानें गर्भ राहतो. उदाहरणार्थ पुढील कुंडली पहा.

गर्भोत्पादक स्थानें



वरील कुंडलींत फुली मारिलेलीं स्थानें गर्भोत्पदक आहेत. कुंडलीविज्ञानाच्या जुन्या वर्गणीदारांस ही माहिती आहेच. या स्थानांतून शनि किंवा गुरु अथवा दोन्ही गर्भकालीं भ्रमण करितात.

पुरुषाची कुंडली

जन्म—ता. ३ जुलई सन १८७०
दि. ३ वाजून ४६ मि.



स्त्रीची कुंडली

जन्म—१ फेब्रुवारी सन १८७८
शुक्रवार



स्त्रीची कुंडली पहा. हींत गुरु पंचमांत व शनि सप्तमांत आहे. गुरूचा फेरा प्रत्येक राशीवर एक वर्षानें होतो. ह्मणून १।३।५।७।९।११।१३।१५।१८।१९ या वर्षी तो संततिदायक स्थानांत असेल. अर्थात् यांतून एखाद्या वर्षी गर्भ राहिला पाहिजे असें गुरूवरून सिद्ध होतें. शनि हा मीन राशींतून सरत आलेला आहे. तो पहिल्याच वर्षी मेष राशीचा होतो. ह्मणून २॥ ते ५; ७॥ ते १०, १२॥ ते १५, व १७॥ ते २० या कालांत तो संतति दायक स्थानांत असेल. अर्थात् गर्भकाल यांपैकीं एखादा असला पाहिजे, असें शनीवरून सिद्ध होतें. यांतील अगदीं पहिला संभवकाल १२॥ ते १५ आहे. या कालांत १३ व्या आणि १५ व्या वर्षी गुरु गर्भदायक आहे असें प्रथम दाखविलें आहे. ह्मणून १३ वें किंवा १५ वें वर्ष गर्भाचें आहे, असें स्त्रीच्या कुंडलीवरून सिद्ध होतें. १३ व्या वर्षी गुरु पत्रमांत असेल व १५ व्या वर्षी तो सप्तमांत असेल. या दोन कालांत दुसरा जितका संभवनीय आहे, तितका पहिला नाहीं. कारण, पहिला ऋतुकाळ आहे. या कालांत स्त्रिया गर्भवती फारच थोड्या होतात. ह्मणून १५ वें वर्षच आपणास निश्चित केलें पाहिजे.

स्त्रीचें १५ वें तें पुरुषाचें २३ वें वर्ष आहे. या वर्षी गुरु पंचम स्थानीं मेष राशींत येतो. पुरुषाच्या कुंडलींतले गर्भोत्पादक राशि व स्त्रीच्या कुंडलींतले गर्भोत्पादक राशि भिन्न आहेत. परंतु स्त्रीचे लग्नापासूनचे व पुरुषाचे चंद्रापासूनचे गर्भोत्पादक राशि एकच आहेत. कारण स्त्रीचें लग्न कन्या असून पुरुषाचा चंद्र याच राशींत आहे. यावरून गुरु मीन राशीवर असतां प्रसूति होईल असें जर आपण भविष्य केलें तर तें नव्याण्णव हिश्शानें चुकणार आतां वास्तविक स्थिति पहा —

या दांपत्यास प्रथमतः मुलगी झाली. तिचा जन्म शके १८१४ वै० शु० ६ या दिवशीं धनु लग्नावर झाला. तिची कुंडली येणेंप्रमाणें.



हें प्रथमच अपत्य असल्यामुळें स्त्रीच्या कुंडलींत बुध — गुरु, रवि – राहु व शुक्र आहेत त्याच प्रमाणें या मुलीच्या कुंडलींत आहेत! बापाचें लग्न तेंच या मुलीचें आहे. बापाचा रवि व मुलीचा चंद्र हे एकाच राशींत आहेत.

रवीसंबंधानें असा एक नियम आढळतो कीं, पुरुषाच्या व स्त्रीच्या कुंडलींत शनि, गुरु, चंद्र, लग्न व रवि हे जन्मकाळीं ज्या राशींत असतील, त्या राशींत तो जेव्हां असेल तेव्हां गर्भ राहील उदाहरणार्थ–मागील पुरुषाच्या कुंडलींत वरील ग्रह ९, ३, ४, ६ या राशींत व तिच्या कुंडलींत १२, १०, ११, ६ व ११ या राशींत अनुक्रमानें आहेत. ह्मणून या राशींत रवि असतां गर्भधारणा झाली पाहिजे.

मुलीच्या कुंडलींत रवि वृषभ (२) राशींत आहे. या राशीपासून मागें ९ राशि मोजले तर रवि कन्येचा येतो. या राशींत पुरुषाचा चंद्र व स्त्रीचें लग्न आहे. यावरून कन्येचा रवि असतां ह्मणजे सायन भाद्रपद मासाच्या सुमारास गर्भ राहिला असावा. मुलीचा जन्म ता. २ मे १८९२ या दिवसाचा आहे. याच्या मागें नऊ महिने मोजल्यास आगष्ट महिना नववा येतो. आगष्टच्या २३ व्या तारखेस कन्या संक्रमण होतें, ह्मणून या तारखेनंतर गर्भकाल येतो. शके १८१३ चा श्रावण वद्यपक्ष पहा. यांत शुक्र हा पुरुषाच्या कुंडलींत नवमांत आहे. व स्त्रीच्या कुंडलींत चंद्राच्या सप्तमांत आहे. अर्थात् तो संभोगकाळीं गर्भोत्पादक स्थानांत आहे. ह्मणूनच गर्भ राहिला.

कुंडलीविज्ञान

यदाकिंचिज्ज्ञोऽहं द्विप इव मदान्धः समभवं ।
तदा सर्वज्ञोऽस्मीत्यभवदवलिप्तं मम मनः ॥
यदा किञ्चित्किञ्चिद्बुधजनसकाशादवगतं ।
तदा मूर्खोऽस्मीति ज्वर इव मदो मे व्यपगतः ॥

पुस्तक ७ वें.] फाल्गुन कृ० १४, गुरुवार [अंक ५ वा.

१ संततिकाल

मागील अंकांत स्त्रीच्या कुंडलीवरून संततिकाल कसा निश्चित करावा याचें दिग्दर्शन केलें आहे. त्याला धरूनच पुढील दांपत्याच्या संततिकालाचा विचार करावयाचा आहे.

पुरुष
जन्म—ता. ७ आगष्ट १८६७
सं १ वाजून १४ मि.
सायन

स्त्री.
जन्म—ता. ९ आगष्ट १८७४
दि. १ वाजून ४० मि.
सायन





यांत दांपत्ययोग विलक्षण आहे.

१ पुरुषाचें लग्न कुंभ आहे. या राशीचा स्वामी जो शनि तो स्त्रीच्या कुंडलींत त्याच राशींत आहे.

२ पुरुषाचा सप्तमांत सिंह राशि आहे. याचा स्वामी जो रवि तो स्त्रीच्या कुंडलींत त्याच राशींत आहे.

३ पुरुषाचा लग्नेश तो पत्नीचा कुटुंबेश आहे.

४ पुरुषाच्या कुटुंबेश गुरु व लग्नेश शनि यांत जसा नवपंचम योग आहे, तसाच पत्नीचा लग्नेश गुरु व कुटुंबेश शनि यांच्यांतही तिच्या कुंडलींत तोच योग आहे.

५ पुरुषाचा सप्तमेश रवि व स्त्रीचा सप्तमेश बुध हे एकमेकांच्या कुंडलींत एकाच राशींत आहेत.

६ पुरुषाच्या शुक्राच्या कुटुंबस्थ राशींत (कन्येंत) स्त्रीचा शुक्र आहे. व त्या शुक्राच्या कुटुंबांत पुरुषाचा कुटुंबेश गुरु आहे.

७ पुरुषाचा लग्नेश जो शनि त्याच्या कुटुंबस्थ राशींत स्त्रीचें लग्न आहे. व स्त्रीचा लग्नेश जो गुरु त्याच्या कुटुंबस्थ राशींत पुरुषाचा चंद्र आहे.

याप्रमाणें या दांपत्यांत लग्न, सप्तम, कुटुंब हीं स्थानें व त्यांचे अधिपति यांचा ईश्वरी नेमानेम स्पष्ट दिसत आहे.

वरील विवेचनावरून उभयतांच्या कुंडल्या खऱ्या आहेत, असें स्पष्ट झालें. आतां यांचा संततिकाल शोधून काढूं.

संततिदायक राशि उभयतांचे ११।३।५।९।११ असे सारखेच आहेत. स्त्रीचा शनि ११ मध्यें आहे. ह्मणून या ग्रहावरून १ ते २॥; ५ ते ७॥ १० ते १२॥ व १५ ते १७॥ हा काल येतो. व गुरु ७ मध्यें आहे. ह्मणून १, ३, ५, ७, ९, ११, १३, १५, १७ असा गुरूवरून काल येतो. यांत १२॥ पर्यंत ऋतुकाल आहे. पुढील १३, १५, १७ हा संततिकाल गुरूचा आहे, पण शनिचा नाहीं. ह्मणून १५ ते १७॥ ह्या कालांत कोणता तरी काल असला पाहिजे. अर्थात् १५ का १७ इतकेंच ठरवावयाचें राहिलें.

१५ व्या वर्षी गुरु उभयतांच्या कुंडल्यांतही गर्भदायक होतो. पण १७ व्या वर्षाच्या सुमारास स्त्रीच्या कुंडलींत गुरु ज्या स्थानांत आहे त्याच स्थानांत शनि जातो व गुरु हा शनि ज्या स्थानांत आहे त्या स्थानांत जातो ह्मणून या काळाला जितकी बळकटी येते तितकी दुसऱ्या कोणत्याही काळाला नाहीं, ह्मणून शनि तूळ राशीवर व गुरु कुंभ राशीवर असतांच प्रथम गर्भ राहिला पाहिजे असें आपण अनुमान केलें पाहिजे. हिला प्रथम अपत्य ता. १४ डिसेंबर सन १८९१ सोमवार सकाळीं ७ वाजून २२ मि. नीं कन्यारत्न झालें आहे. या कालची सायन कुंडली अशी—

सायन



या कुंडलींचें आईबापांच्या कुंडल्यांशीं दिसून येणारें साम्यः—

१ बापाच्या पंचमांत जी राशि आहे, त्या राशीवर मुलीचा चंद्र आहे. व आईच्या लग्नीं जो राशि आहे, त्या राशींत मुलीचा रवि आहे.

२ बापाच्या सप्तमांत बुधशुक्र असून तेच मुलीच्या लग्नीं आहेत.

या मुलीचा गर्भकाल कोणता येतो, हें तिच्या व आईबापांच्या कुंडल्यांवरून ठरवूं.

आपल्या ऐकण्यांत असें आहे कीं, ९ म० ९ दि० मातेच्या उदरांत गर्भ असतो. हें स्थूल मान आहे. तथापि तें सर्वसाधारण आहे असें ह्मणावयास हरकत नाहीं. ९ म० ९ दि० ह्मणजे २७९ दिवस होतात. इतके दिवस मुलीच्या जन्मकाळापूर्वी माजल्यास मागील वर्षाच्या मार्च्यच्या ९।१० तारखेस गर्भकाल येतो. या तारखेचीं ग्रहस्थिति अशी आहे.

चंद्र — कुंभ, मीन
शुक्र — कुंभ
रवि — मीन
गुरु — कुंभ

शनि — कन्येंत असून वक्र गतीनें सिंहेंत आहे.

बुध — कुंभ

मंगळ — धनु

यावरून वरील तारखेला चंद्र शुक्र, गुरु आणि बुध हे चार प्रमुख ग्रह कुंभ या संततिदायक राशींत आल्यामुळें व रवि हा पुरुषाच्या गुरूच्या राशीस असल्यामुळें शनि हा जरी पूर्णपणें संततिदायक राशींतला नाहीं, तरी वक्र गतीनें तो सिंहेंत ह्मणजे स्त्रीचा पंचमेश मंगळ हा तिच्या कुंडलींत ज्या राशींत आहे त्या राशींत किंवा पुरुषाचा पंचमेश बुध हा त्याच कुंडलींत ज्या राशींत आहे त्याच राशींत जणूं काय गर्भ देण्यासाठींच आला आहे!

पण एथें आपण केलेलें शनीचें अनुमान चुकलें असें ह्मणावें लागतें. ग्रहांच्या वक्रगतीचा विचार न केल्यामुळें असें होणें साहजिक आहे. सातही ग्रह ज्या काली गर्भदायक झाले, तोच गर्भकाल खरा समजला पाहिजे. यावरून वाचकांस गर्भकालाचें अनुमान बरेंच करितां येईल असें वाटतें. तथापि निश्चयासाठीं उदाहरणार्थ आणखी कांहीं कुंडल्यांचें विवेचन केलें पाहिजे. तें सवडी सवडीनें होईल. प्रथमतः कोणत्याही गोष्टीची मनुष्यापुढें कल्पना उभी राहते, नंतर ती खरी कीं खोटी याचा तो अनुभव घेऊं लागतो. आणि असे अनुभव प्रत्येक ठिकाणीं येऊं लागले ह्मणजे त्याच्या पासून ठाम सिद्धांत बाहेर पडतो. याच तत्वाला अनुसरून आह्मीं आपल्या वाचकांस प्रथमतः कित्येक गोष्टींच्या कल्पना सादर केल्या आहेत. व त्यांचा अनुभव घेण्यासाठीं मध्यें बरेच दिवस सवड दिली आहे. त्याप्रमाणें वाचकांनीं अनुभव घेतलेच असतील. तथापि अनुभव कसे घेतले पाहिजेत हेंहीं आह्मांस अनेक उदाहरणें घेऊन दाखविलें पाहिजे. दांपत्ययोग, पितापुत्रयोग, भ्रातृयोग, संततिकाल, विवाहकाल, निधनकाल, मातृनिधन, पितृनिधन, स्त्रीनिधन इ. अनेक गोष्टींच्या नवीन कल्पना वाचक वर्गास सादर केल्या आहेत, व आणखीहि वेळोवेळीं ज्या ज्या सुचतील त्या त्या पुढें सादर करूंच.

———

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥

'भवभूतिः'

पुस्तक ८वें.] फाल्गुन शु. ९, बुधवार [अंक ८ वा.

संततियोग.

जातकांत हा विषय चमत्काराचा आहे. लग्न, पंचम, गुरु व चंद्र यांवरून संततियोगाचा विचार होतो. संततीची संख्या सांगण्यास हें शास्त्र असमर्थ आहे अशी आमची समजूत आहे. ग्रंथकारांनीं संख्या सांगण्याचे प्रकार दिले आहेत, त्यांचा अनुभव येत नाहीं. ते केवळ ज्योतिषी लोकांस पत्रिका भरून काढितां यावे व सर्व कांहीं या शास्त्रानें सांगतां येतें असें ह्मणतां यावें ह्मणूनच आहेत. त्यावर कित्येकांचा विश्वास आहे. ग्रंथकारांनीं सांगितलें तें खोटें कसें असेल अशी त्यांची समजूत आहे. ही समजूत मनुष्यास व्यर्थ भ्रमांत मात्र पाडते. त्यांची सत्यता व असत्यता अनुभवानें कळण्यासारखी आहे, ह्मणून आह्मीं त्याबद्दल जास्त कांही सांगत नाहीं. आह्मांस यांत जें कांहीं सत्य दिसतें तेंच वाचकांपुढें मांडावयाचें आहे. १ संततीचा अभाव. २ तिचें आयुर्मान व सामर्थ्य. ३ मुलींची संख्या विशेष किंवा सर्व. ४ मुलांची संख्या विशेष किंवा सर्व. ५ एकंदर संततीची संख्या विशेष किंवा अल्प. इतक्या गोष्टी कुंडलीवरून ज्योतिष्यास सामान्यतः कळण्यासारख्या आहेत, ह्मणून त्यांचा विचार आजच्या अंकांत करावयाचा आहे.

राशिविचार.

मेष—हा पुरुषराशि आहे. तो स्त्रीसंग अल्प करणारा असून प्रजाही अल्पच देतो.

वृषभ.— हा स्त्रीराशि आहे. तो स्त्रीसंग मध्यम करणारा व प्रजा मध्यमच देणारा आहे.

मिथुन.— हा पुरुषराशि आहे. तो प्रजा मध्यम देतो.

कर्क.– हा स्त्रीराशि आहे. तो प्रजा पुष्कळ देतो.

सिंह.– हा पुरुषराशि आहे. तो प्रजा मुळींच देत नाहीं किंवा फारच अल्प देतो.

कन्या.– हा स्त्रीराशि आहे. तो प्रजा मध्यम देतो.

तूळ.– हा पुरुषराशि आहे. तो प्रजा अल्प देतो.

वृश्चिक.– हा कन्याराशि आहे. तो प्रजा मध्यम देतो.

धनु.– हा पुरुषराशि आहे. तो प्रजा अल्प देतो.

मकर.—हा स्त्री राशि आहे. तो प्रजा विशेष देतो.

कुंभ—हा पुरुषराशि आहे. तो प्रजा मुळींच देत नाहीं किंवा फारच अल्प देतो.

मीन.—हा स्त्रीराशि आहे. तो प्रजा मध्यम देतो.

ग्रहविचार.

रवि.—पुत्र देतो. संततीला व गर्भाला अपाय करितो. सर्व मुलें जगूं देत नाहीं. संख्या अल्प देतो.

चंद्र.—बहुतेक मुलीच देतो. संतति लवकर लवकर उत्पन्न करितो व संख्या विशेष देतो.

मंगळ.—संततीला प्रतिबंधक व मारक आहे. गर्भपात करितो, बाळंत होतांना मुलें कापण्याचा प्रसंग आणितो. किंवा बाळंतणीलासुद्धां मारितो.संख्या फार अल्प देतो. व विशेषेंकरून पुत्रच देतो.

बुध.—संतति लवकर लवकर देतो. मुलगे व मुली अशी मिश्र प्रजा

उत्पन्न करितो. दिवस भरण्यापूर्वीच केव्हां केव्हां जन्म देतो. हा ग्रह संततीला विशेष अनिष्ट नाहीं.

गुरु.—संतति उत्तम व निरोगी देतो. अनेक सद्गुणी व दीर्घायु पुत्र उत्पन्न करितो. बहुतेक पुत्रच देतो. संख्या मध्यम देतो. हा ग्रह संततीला उत्तम आहे.

शुक्र.—संतति विशेष देतो. मुलें सुंदर व कलाकुशल उत्पन्न करितो. पुत्र व कन्या अशी मिश्र संतति देतो. संतति लवकर देतो. हाही ग्रह संततीला उत्तमच आहे.

शनि.—संततीला प्रतिबंध व मारक आहे. संतति अल्प देतो. व दिनावधीनें देतो. विशेषें करून पुत्रच देतो. संतति रोगी, किंवा दुष्ट किंवा दुराचरणी उप्तन्न करितो. हा ग्रह मंगळा इतका अनिष्ट नाहीं.

राहुकेतू.—हे संततीला व गर्भाला मारक आहेत. विशेषेंकरून पुत्रच देतात. पण ते अल्पायु, व रोगी असे देतात. हेच ग्रह जुळे किंवा अन्य प्रकारचे जन्मदाते आहेत.

हर्शल.– (प्रजापति.) संततीला प्रतिबंधक व मारक आहे. गर्भाला पीडा देणारा व विशेषेंकरून पुत्र देणारा आहे.

१ संततीचा अभाव.

१ पंचमस्थानीं बहुधा केवळ कुंभ अगर सिंह राशि.

२ गुरु, चंद्र अगर लग्न, सिंह अगर कुंभ राशींत असून शनीनें युक्त. आणि पंचमस्थानीं राहु किंवा मंगळ.

३ पंचमांत अगर एकादशांत पापग्रह असून गुरु हा शनीनें युक्त अगर त्याच्या दृष्टींत.

४ गुरु हा अस्तंगत असून पंचमाचा स्वामीही नीच, अस्तंगत, शत्रुक्षेत्री, पापग्रहानें युक्त अथवा दृष्ट अशा प्रकारचा असेल व पंचम स्थानीं केवळ अल्प संतति देणारा राशि असेल.

वरील ४ प्रकारचे योग संततीचा अभाव उत्पन्न करितात.

२ संततीचें आयुर्मान व सामर्थ्य

१ पंचमांत अगर एकादश स्थानीं बरेच पाप ग्रह असतील तर संतति अल्पायु व रोगी होईल.

२ पंचमांत अगर एकादश स्थानीं रवि, मंगळ, राहु अगर हर्शल हे ग्रह असतील तर गर्भपात होतील. कांहीं मुलें अल्पायु होतील. पहिले मूल बहुधा अल्पायु.

३ गुरु अगर पंचमाचा स्वामी मंगळानें युक्त, अस्तंगत, अगर मंगळाच्या दृष्टींत असतां संतति कांहीं अल्पायु अगर रोगी होईल.

४ पंचम स्थानीं अगर एकादशांत फक्त शुभग्रह असतील तर मुलें सुंदर निरोगी व आयुष्यमान् होतील.

५ गुरु, चंद्र लग्न शुभ ग्रहानें युक्त अगर दृष्ट असून पंचमांत अगर एकादशांत पाप ग्रह नसतील तर मुलें बळकट व दीर्घायु होतील.

अशा प्रकारें संततीचें आयुर्मान व सामर्थ्य यांचा बोध होण्यासारखा आहे.

३ मुलींची संख्या विशेष किंवा सर्व

१ पंचम स्थानीं कन्या देणारा राशि उदित असून कन्या देणारे ग्रह त्या स्थानांत किंवा एकादशांत असतील, गुरु व चंद्र हेही कन्या देणाऱ्या राशीतच असतील तर मुलींची संख्या विशेष किंवा सर्वच असेल असें जाणावें.

२ मिश्र स्थिति असतां कांहीं मुलगे व कांहीं मुली होतील.

४ मुलांची संख्या विशेष किंवा सर्व

१ पंचमस्थानीं पुत्र देणारा राशि उदित असून ग्रहही पुत्र देणारे तेथें अगर एकादश स्थानी असतील व गुरु आणि चंद्र हेही पुत्र देणाऱ्या राशींतच असतील तर मुलांची संख्या विशेष असेल किंवा सर्वच मुलगे होतील असें जाणावें

२ मिश्र स्थिति असतां कांहीं मुलगे व मुली होतील.

५ संततीची संख्या.

१ कर्क आणि मकर हे राशि संतति देतात. म्हणून या राशींत पंचम स्थानीं चंद्र, गुरु, शुक्र किंवा बुध हे ग्रह असतां संतति लवकर लवकर व फार होते.

२ वृश्चिक व मीन हे राशि पंचमांत असतां चंद्र, गुरु, शुक्र व बुध हे जरी या राशींत कांहीं व कर्क आणि मकर राशींत कांहीं असे असतील तरीही संतति पुष्कळ होईल.

३ कन्या किंवा वृषभ हे राशि पंचमांत असून चंद्र, गुरु, शुक्र व बुध कांहीं या राशींत व कांहीं कर्क आणि मकर राशींत असतील तर संतति बरीच होते. पण ती वरील दोन कलमांत सांगितल्यापेक्षां कांहीं कमी होते.

४ कन्या किंवा वृषभ हे राशि पंचमांत असून चंद्र, गुरु, बुध, शुक्र यांपैकीं कांहीं या राशींत व कांहीं वृश्चिक आणि मीन राशींत असतील तर संतति मध्यम होईल.

५ मिथुन, तूळ, धनु व मेष हे राशि एकापेक्षां एक कमी संतति देणारे आहेत. व ते सर्व प्रजा अल्प देतात. म्हणून ते पंचमांत असतां वरील चार ग्रहांपैकीं कांहीं ग्रहानें युक्त असतां अल्प संतति देतात.

पांचांपर्यंत संतति अल्प, १०।१२ पर्यंत मध्यम व त्यापेक्षां अधिक असल्यास तिला विशेष असें म्हणावें,

संततीचा विचार पुरुषाच्या व स्त्रीच्या कुंडल्यांच्या मेळानें होतो. स्त्री हें क्षेत्र व पुरुष हें बीज आहे. केवळ बीजावरून किंवा क्षेत्रावरून उत्पन्नाची परीक्षा होणार नाहीं, ती उभयतांच्या मेळानेंच केली पाहिजे. बीज चांगलें व क्षेत्रही चांगलेंच असेल तर उत्पत्तिही चांगलीच होणार हें उघड आहे. सुपीक क्षेत्रांत योग्य काली उत्तम बीजाचा पेरा होईल तर उत्पत्ति विपुल होईल. या प्रमाणें जो न्याय जमीन व धान्य यांस व्यवहारांत लागू आहे तोच स्त्रीपुरुषांसही झाला पाहिजे. मूल न होणें हा

पुरुषाचा दोष नसून मुख्यत्वें स्त्रीचा आहे. म्हणून स्त्री वंध्या नसावी. पुरुषाच्या कुंडलींत संततियोग चांगला असला तरी त्याची स्त्री वंध्या असेल तर संतति कधींही होणार नाहीं.

प्रथमतः पुरुषांच्या कुंडलीवरून संततीचें अनुमान करून तें टिपून ठेवावें. व नंतर स्त्रीच्या कुंडलीवरून होणारें अनुमान निराळें टिपावें. इतकें झाल्यावर क्षेत्र कसें आहे व बीज कसें आहे, हा विचार करून या स्त्रीपासून या पुरुषास अमुक प्रकारची अमुक संतति होईल असें ठरवावें. अशा हजारों कुंडल्या ज्यानें पाहिल्या असतील तो संततीचें अनुमान बरेंच बिनचूक करील.

पुरुषाच्या कुंडलींत जर ५ मुलें होण्याचा योग असला तर त्याच्या स्त्रीच्या कुंडलीतही तितकाच असला पाहिजे, हें म्हणणें खरें नाहीं. निदान खरें मानिलें तरी तसा बोध होत नाहीं. पुरुषाच्या कुंडलींत पंचमांत पुरुष राशि उदित असल्यास स्त्रीच्याही तोच असेल असा नियम नाहीं. अथवा पुरुषाच्या पंचमांत ज्या प्रकारचे ग्रह असतील त्याच प्रकारचे स्त्रीच्या पंचमांत असतील असाही नियम नाहीं. दुसरें, पुरुष अनेक स्त्रिया करितो व त्याला प्रत्येकीपासून निरनिराळ्या प्रकारची संतति होत असते. त्यांत एखादीला मूल मुलींच होत नाहीं, एखादीला सर्व मुलीच होतात तर एखादीला मुलगेच होतात. स्त्रिया पुष्कळ करिल्यास मुलें पुष्कळ होण्याचा संभव आहे. राणा भीमदेव यास १०० मुलें झालीं होतीं, तीं अनेक स्त्रियांमुळेंच. बंगाल्यांत अनेक स्त्रिया करण्याचा प्रघात आहे, असें ऐकितों. अशा प्रकारचा जगांत व्यवहार असल्यामुळें केवळ पुरुषाची कुंडली पाहून तीवरून तुला अमुक मुलें होतील असें जे कित्येक ज्योतिषी सांगतात त्यांत तथ्य नाहीं, हें उघड आहे.

फलज्योतिष आणि व्यवहार हीं एकमेकांपासून भिन्न आहेत. ज्याला व्यवहारज्ञान नाहीं, त्याला फलज्योतिषाचा उपयोग काडीमात्र करितां येणार नाहीं. म्हणून प्रथम व्यवहार ध्यानांत घेऊन नंतर त्याला फलज्योतिषाचीं तत्वें लागू केलीं पाहिजेत. व्यवहारी मनुष्य या शास्त्राच्या ज्ञानानें डोळस होतो, व त्यामुळें तो सर्वदा समाधानी असतो. जे लोक या शास्त्रास नांवें ठेवितात, ते अनभिज्ञ होत. त्यांस शास्त्राचा उपयोग

कसा करावयाचा यांचें ज्ञान नसतें, म्हणून त्या ओरडीची ज्योतिषी लोक विशेष किंमत मानीत नाहींत. आपणास संतति होत नाहीं व आपल्या कुंडलीवरूनही संततीचा अभाव दिसतो, अशा मनुष्यानें दुसरी स्त्री अशी करिली पाहिजे कीं तिला पुष्कळ संततीचा योग आहे. तात्विक दृष्ट्या विचार केल्यास अशा प्रयत्नानें त्यास मूल होऊं शकेल. नाहीं कशावरून ? शास्त्रज्ञ पुरुष याचा अवलंब करील व अनभिज्ञ व्यर्थ लग्न करीत बसेल दैवावर हवाला टाकणारा जर कोणी असेल तर तो अनभिज्ञच होय. तो आपणास उद्योगवादी भासवितो खरा, पण कृति दैववाद्याचीच असते. ज्योतिषी दैववादी नाहीं, व ज्योतिःशास्त्र दैववादासाठींही नाहीं. मनुष्याच्या प्रयत्नाला साह्य करणारें या शास्त्रासारखें अन्य शास्त्रच नाहीं, असें आमचें ठाम मत आहे. आपणास संततीचा योग नाहीं, सबब आपण लग्नच करूं नये असें मानणारा पुरुष मूर्ख आहे. आपली परीक्षा या वर्षी पास होत नाहीं असें आपली कुंडली सांगते तर अभ्यासच करूं नये किंवा परीक्षेसही बसूं नये असा विचार करणारे विद्यार्थी दैवाला जास्त महत्व देतात. आमचें मत असें नाहीं. जर कुंडली प्रयत्नाला अपयश दर्शविते तर प्रयत्न इतका जोराचा केला पाहिजे कीं, त्यांत स्त्रीनें यश मिळेल आपल्या कुटुंबांत कलह होतील असा जर आपल्या कुंडलींत योग असेल तर आपण अशी शिस्त ठेविली पाहिजे कीं जेणेंकरून सर्व कुटुंब गुण्यागोविंदानें नांदेल. आपली स्त्री जारिणी निघेल असें जर आपल्या अगर तिच्या कुंडलीवरून दिसून येईल तर आपण असें केलें पाहिजे कीं ती योग्य बंदोबस्तानें राहील. सारांश ज्योतिःशास्त्रानें जी अनिष्ट गोष्ट घडून येईल ती टाळण्याचे जर यथा कालीं प्रयत्न केले तर सफल होण्याचा संभव असतो. केवळ दैवावरच भरंवसा ठेविला व कांहींच प्रयत्न केले नाहींत तर अनिष्ट गोष्ट टळावी कशी? याला कोणी समर्पक उत्तर देईल काय! ज्योतिःशास्त्र ज्यास अवगत नाहीं ते सर्व दैववादी आहेत, "होईल तें होईल" असें म्हणणारांस जर शहाणें म्हणावयाचें असेल तर खुशाल म्हणा! आम्ही टाळण्याचेच नेहमीं प्रयत्न करणारे आहोंत. असो आतां, उदाहरणार्थ कांहीं कुंडल्या घेऊन संततीचा विचार कसा करावा ते दाखवितों.

उदाहरण १ लें.

पति–ता. ५ जून १८६७ दि. ७ वा. ५७ मि.

पत्नी–ता. ४ अक. १८७८ रा. ७ वा. ९ मि.



प्रथम पतीच्या कुंडलीवरून काय दिसतें तें पहा.—

पंचम स्थानीं वृश्चिक राशि उदित आहे. हा स्त्रीप्रजा देणारा असून संतति मध्यम उत्पन्न करितो.

२ पंचमांत वक्री शनि आहे. हा ग्रह संततीला व गर्भाला अपाय करितो.

३ पंचमासमोर एकादश स्थानीं शुक्र स्वगृहीं आहे. तो संततिसुख देणारा आहे व शनीच्या अनिष्टतेस निवारण करणारा आहे.

४ चंद्र कर्क राशींत लग्नीं आहे. तो संतति लवकर लवकर, मुलींची व बरोचशी देतो.

५ गुरु कुंभ या वंध्या राशींत असल्यामुळें तो अल्पशी पुत्रप्राप्ति करितो.

या पांच गोष्टींवरून असें अनुमान होईल कीं बहुतेक मुलीच होतील, पुत्र अल्प होतील, मुलें मध्यम संख्याक होऊन कांहीं अल्पायु होतील व कांहीं गर्भपात होतील.

आतां पत्नीची कुंडली काय दर्शविते पहा—

१ पंचमांत कन्या राशि उदित आहे. हा मुली उत्पन्न करितो व संतति मध्यम देतो.

(२) पंचमांत बुध, शुक्र हे ग्रह संतति लवकर लवकर देणारे व प्रजा सुंदर निर्माण करणारे आहेत. हर्शल हा संततीला व गर्भाला मारक आहे.

(३) पंचमासमोर एकादश स्थानीं वक्री शनि मीन राशीचा आहे. तो मुलींची संतति बरीच देतो. पण संततीला व गर्भाला अपाय करितो.

(४) गुरु व चंद्र हे दोन्ही ग्रह मकर या पुष्कळ प्रजा देणाऱ्या स्त्रीराशींत आहेत.

या चार गोष्टींवरून हिला पुष्कळशा मुली होतील, पुत्र क्वचित् होतील, संख्या बरीच असेल, कांहीं मुलें अल्पायु व कांहीं गर्भपात होतील.

क्षेत्र व बीज यांत बहुतेक साम्य आहे. ह्मणून संततीचें नक्की अनुमान असें निघतें कीं, संतति लवकर लवकर, बरीच, विशेषतः मुलींची, कांहीं मुलें अल्पायु, कांहीं गर्भपात व पुत्र कमी.

आतां वस्तुस्थिति कशी आहे, तें पहा— १ ली मुलगी. (मयत) २ री मुलगी (हयात) ३ रा मुलगा (मयत) ४ थी मुलगी (मयत) ५ वी मुलगी (हयात) ६ मुलगा हयात असून ७ व्या खेपेस पत्नी गरोदर आहे. ह्मणजे आजपर्यंत ६ मुलें झालीं, त्यांपैकीं ३ हयात व ३ मयत आहेत. त्यांत ४ मुली व २ मुलगे झाले. सर्व मुलांचे जन्मकाल मिळाले नाहींत. पण २ री मुलगी शके १८१९ च्या भाद्रपदांत झाली. ५ वी शके १८२५ च्या श्रावणांत झाली व ६ वा मुलगा १८२७ च्या कार्त्तिकांत आला. ह्मणजे २ दोन वर्षांआड मूल झालें आहे, ह्मणजे लवकर लवकरच झालें हें उघड आहे. आपल्या अनुमाना प्रमाणेंच तीन मुलें अल्पायु झालीं. गर्भपाताबद्दल मात्र कांहीं समजलें नाहीं.

उदाहरण २

पति–ता.२ एप्रील १८६९ रा. ९ वाजून २२मि.

पत्नी–ता.१८ आगष्ट१८७९ सकाळीं ९ वाजतां



प्रथम पतीची कुंडली पहा.

[१] पंचमांत मेष राशि आहे तो अल्पशी संतति देतो.

[२] पंचमांत २ पापग्रह व दोन शुभ ग्रह आहेत. ह्मणून कांहीं मुल अल्पायु होतील.

[३] चंद्र पुरुष राशींत आहे. तो अल्प प्रजा देणारा असून शनीनें युक्त असल्यामुळें दुर्बल आहे.

[४] नवमस्थानीं राहू व मंगळ हे ग्रह आहेत ते संततीला मारक आहेत.

यावरून अनुमान होईल कीं, प्रजा अल्प होईल. पुत्र अधिक होतील. संतति अल्पायु होईल व कांहीं गर्भपात होतील. एकंदरींत संततिसुख दुर्बल आहे.

आतां पत्नीची कुंडली पहा.

[१] पंचमांत कुंभ हा वंध्या राशि आहे.

[२] एकादश स्थानीं रवि व चंद्र वंध्या राशींत आहेत.

[३] गुरु स्त्रीराशींत पुष्कळ संतति देणारा आहे.

[४] पंचमाचा स्वामी शनि आपल्या नीचांत आहे.

[५] लग्न अल्प संतति देणारें असून शुक्रानें युक्त आहे, ह्मणून पुत्र व कन्या अल्प होतील.

यावरून अनुमान होईल कीं, क्षेत्रही चांगलेंसें नाहीं. संतति मध्यम होऊन सुख कमी मिळेल. कांहीं कन्या होतील व कांहीं पुत्र होतील. कांहीं अल्पायु होतील.

आतां वस्तुस्थिति कशी आहे पहा— १ ली मुलगी. २ रा मुलगा [१५ वे दिवशीं मृत] ३ री मुलगी. ४ थी मुलगी. या प्रमाणें आजपर्यंत ३ मुली व एक मुलगा अशी संतति झाली आहे. एक मूल मयत आहे. पहिली मुलगी १८९५ त झाली. व ५ व्या खेपेस १९०७ मध्यें गरोदर आहे. ह्मणजे सुमारें १२ वर्षांत ५ मुलें झालीं. हा मध्यम योग झाला. संततीसंबंधानें यांत अनुभव यावा तसा येत नाहीं. याचें कारण, पतीचा जन्म वृश्चिक लग्नाच्या २८ व्या अंशावर झाला असून धनु लग्नाची कुंडली मांडिली आहे. वृश्चिक हा राशि अनेक कन्या देणारा आहे, व तसाच अनुभव आहे. पंचमांतील ग्रहस्थिति बदलूं नये ह्मणून धनु-

लग्नाची कुंडली मांडिली. त्याच प्रमाणें पत्नीच्या कुंडलींतही पंचमांत मीन या बहुप्रजा देणाऱ्या राशींत गुरु येतो. या साठीं भावचलित कुंडल्या खऱ्या करून नंतर त्यांवरून फलें पाहिलीं पाहिजेत. नाहींपेक्षां अनुमान चुकेल.

केवळ पुरुषाच्याच कुंडलीवरून कसें अनुमान होतें, तें दाखवितों—

जन्म—ता. २१ एप्रिल सन १८७५
बुधवार रात्रीं ९ वाजून २२ मि.



भावचलित कुंडलींत पंचमांत बुधराहू येत नाहींत. ते चतुर्थस्थानीं आहेत. व शनि आणि नेपच्यून हे पूर्णपणें पंचमांत येतात. चंद्र एकादश स्थानीं येतो.

या कुंडलींत पंचमांत मेष राशीचे १० अंश उदित आहेत. व वृषभ राशीचे २० अंश आहेत. ह्यामुळें मिश्र संतति होईल. संतति मध्यम होईल. पंचमांत शनि व नेपच्यून हे संततीला व गर्भाला सुखावह नाहींत. ते मुलींची संतति देतात. एकादश स्थानींचा गुरु पुत्रसंतति देतो. हा ग्रह संततीला विशेष अनुकूल नाहीं. कारण तो वक्री आहे. एकादश भावांत वृश्चिक राशीचा चंद्र आहे, तो मुली देतो. यावरून संतति लवकर लवकर होऊन मुली अधिक व पुत्र कमी होतील. मुलें अशक्त, व अल्पायु होतील. अशा प्रकारें संतति होईल.

आतां वस्तुस्थिति कशी आहे, पहा— १ ला मुलगा शके १८२१ त २ री मुलगी शके १८२४ त, ३ रा मुलगा शके १८२५ त, ४ था मुलगा शके १८२८ त व ५ वा गर्भ शके १८२९ तला या प्रमाणें आजपर्यंत मुलें

झालीं आहेत. त्यांत ४ था **मृतजन्म** झालेला आहे. ३ रा मुलगा हा-तानें लुला आहे. पहिला मुलगा लहानपणीं अतिशय अशक्त होता.

यावरून संतति लवकर लवकर झाली हें खरें ठरलें. पण मुली अधिक व्हाव्या हें अनुमान चुकलें. तथापि त्या विषयीं आतांच निश्चय करवणार नांहीं. मुलें अशक्त व अल्पायु व्हावीं हें ही अनुमान ठीक झालें. आज-पर्यंत ५ मुलें झालीं आहेत, पुढें अधिक होण्याचा संभव आहे, ह्मणून संख्या मध्यम होईल हेही अनुमान बरेंच खरें होणार आहे. एकंदरींत अनुमान चांगलें उतरलें. पण सर्वत्र असें उतरेल असें समजूं नये. संतति पाहणें ती उभयतांच्या मेळानेंच पहावी. मग तें अनुमान चुकलें तरी हरकत नाहीं. भविष्य शास्त्रशुद्ध व व्यवहारशुद्ध असावें, असें आह्मांस वाटतें.



जुळें.

१

जन्म —तारीख १७ नवंबर सन १९०८ रात्रीं ११॥ वाजतां

सायन भावचलित



कुंडलीविज्ञानांत जुळ्या मुलांच्या कुंडल्या वेळोवेळ प्रसिद्ध केल्या आहेत, त्यावरून काहीं नियम दिसून येतो कीं काय हें पाहणें आहे. राशिचक्रांत मीन आणि मिथुन हे दोन जुळे राशि आहेत, ह्मणून जर हें शास्त्र खरें असेल तर या दोन राशींचा संबंध या गोष्टीशीं अवश्यमेव असला पाहिजे. या दोन राशींचे कोणते अंश व त्या अंशांत कोणते ग्रह जुळें उत्पन्न करितात याचा विचार अनेक कुंडल्यांवरूनच केला पाहिजे. ग्रंथ धुंडाळून कांहीं निष्पन्न व्हावयाचें नाहीं. वरील कुंडलींत फक्त मिथुन राशींत राहू २७ अंश आहे. हा अंश पुनर्वसू नक्षत्राचा आहे. मीन राशींत मुळींच ग्रह नाहीं हा राशि अष्टमांत पडला आहे. याच्या समोरचा राशि जो कन्या त्यांत मात्र गुरु व चंद्र हे दोन ग्रह आहेत. व ते हस्त नक्षत्रांत आहेत. यांच्या

समोर उत्तराभाद्रपदा नक्षत्र आहे. या जुळ्यांत प्रथम मुलगा व नंतर सुमारें २० मिनिटांनीं मुलगी झाली. मातेला क्लेश झाले नाहीत. दोन्ही मुलांचा नाळ एकत्र होता. याच्या पूर्वी २७९ दिवस मोजल्यास शनि बुध व शुक्र हे मिनेंत येतात व चंद्र मिथुनेंत येतो. गर्भकालीं चंद्र पुनर्वसू नक्षत्रांत मानला तर बुध उत्तराभाद्रपदा, शनि व शुक्र हे रेवतींत येतात. शुक्र व शनि यांची युति फेब्रूवारीच्या १० व्या तारखेस झाली. युतिकालीं चंद्र आर्द्रा नक्षत्रांत येतो. यावरून ता० १० ते १२ फेब्रूवारीपर्यंतचाच गर्भकाल असावा. व शनिशुक्रांच्या युतीमुळेंच तो जुळा झाला असावा! शुक्राचा पुरुषाच्या रेताशीं संबंध आहे. आणि शनि हें वाततत्व आहे. या दोन ग्रहांच्या संयोगामुळें पुरुषाचें रेत हें वायूनें विभागलें गेलें व जुळा गर्भ राहिला. यावेळीं मंगळ हा हर्शलासह मकर राशींत श्रवण नक्षत्रांत होता. मंगळाचा स्त्रीच्या रजाशीं संबंध आहे. हें तत्व हर्शलासन्निध आल्यानें चमत्कृतिपूर्वक गर्भ राहिला असावा असें अनुमान होतें!

२

जन्म— ता. १२ सपटेंबर सन १९०७ सकाळीं ११ वाजून ५ मि.

सायन भावचलित.



या जुळ्यांत दोन्ही मुलीच जन्मल्या. प्रथम मुलगी झाल्यावर एक तासानें दुसरी झाली. दुसरी तत्काल मृत झाली व पहिली दुसऱ्या दिवशीं मृत झाली.

जुळ्या राशींपैकीं फक्त मीन या राशींत शनि २४ अंश वक्री आहे. व तो रेवती नक्षत्रांत आहे. समोर कन्येंत शुक्र, रवि व बुध आहेत. हे सर्व हस्त नक्षत्रांत आहेत. शनि व बुध हे समोरासमोर आहेत. मिथुन या जुळ्या राशीसमोरचें लग्न उदित आहे. या कुंडलींत शनि ज्या अंशांत जन्मकाळीं आहे त्याच अंशांत नं. १ च्या कुंडलींत गर्भकालीं होता. या कुंडलीचे २७२ दिवस मागें मोजल्यास ग्रह येणें प्रमाणें येतात—

रवि—मकर १४	बुध—धनु २८	शनि—मीन १०
चंद्र—कन्या	गुरु—कर्क ४	राहु—सिंह ३
मंगळ—वृश्चिक १२	शुक्र—धनु ४	हर्शल—मकर ९

यांत मीन या जुळ्या राशींत फक्त शनि असून तो रेवती नक्षत्रांत आहे. नं. १ च्या कुंडलीच्या गर्भकालीं रेवती नक्षत्र होतें व या नक्षत्रांत या शनीच्या अंशा इतकेच सुमारें अंश होते. पहिलीच्या गर्भकालीं हर्शल ज्या अंशांत होता त्याच अंशांत येथें रवि आहे.

या वरून असें अनुमान होतें कीं मीन राशीचे अमुकच अंश गर्भ देण्यास योग्य होतात असें नाहीं. पण गर्भकालीं अगर जन्मकालीं सुमारें २४ वा अंश शनीनें युक्त असतां व शुक्र हा मीन राशींत शनीनें युक्त अथवा दृष्ट असतां राहणारा गर्भ जुळ्याचा असतो. पहिल्या कुंडलीच्या गर्भकालीं शुक्र हा शनीनें युक्त होता व दुसरीच्या गर्भकालीं तो शनीच्या दृष्टींत होता.

मिथुन व मीन यांपैकीं मीन हाच राशि जुळ्या गर्भाला मुख्य कारण असेल असें वाटतें. या राशींत शनि अथवा शुक्र हे युक्त अथवा शनीनें दृष्ट शुक्र असेल तर जुळा गर्भ राहण्याचा संभव आहे असा नियम केल्यास हरकत दिसत नाहीं.

जन्मकुंडलीवरून मात्र जुळ्याचा बोध होईल असें वाटत नाहीं फक्त संशय येईल. त्या संशयावरून गर्भकालची ग्रहस्थिति पाहिल्यास जुळ्याचा बोध बऱ्याच अंशानें व्हावा असें अनुमान होत आहे.

३

जन्म— ता. २४ अकटंबर सन १८८१ सकाळीं ८ वा. १७ मि.



जन्मकालीं मीन किंवा मिथुन यांपैकीं एकाही राशींत ग्रह नाहींत. फक्त यांच्या समोरच्या राशींत ग्रह आहेत. मीन राशीसमोरच्या राशींत हर्शल हस्त नक्षत्रांत असून मिथुन समोरील धनु राशींत राहू मूळ नक्षत्रीं लग्नीं आहे. इतक्यावरूनच ही कुंडली जुळ्याची असवी अशी शंका घेण्यास हरकत नाहीं. याच्या मागें २७९ दिवस मोजल्यास खालीलप्रमाणें ग्रह येतात.

रवि	२८	मकर	शनि	२२	मेष	शुक्र	१२ मीन
चंद्र	१	कन्या	गुरु	१२	मेष	बुध	२३ मकर
हर्शल	१३	कन्या	मंगळ	३	मकर	राहू	२९ धनु

या दिवशीं चंद्र हर्शलशीं कन्येंत हस्त नक्षत्रांत युति करणार असून शुक्र मीन राशींत चंद्रासमोर व हर्शलसमोर येणार होता. शुक्र उत्तराभाद्रपदा नक्षत्रांत आहे. आणि बुधावर शनि पूर्ण दृष्टीनें पाहत आहे. अशा योगावर हा गर्भ राहिला असावा. यांत शुक्र आपल्या नियमाप्रमाणें मीनेंत आहे, पण तो शनीच्या दृष्टींत नाहीं, हर्शल व चंद्र यांच्या दृष्टींत आहे

या जुळ्यांत दोन्ही मुलगेच आहेत.

कुंडलीविज्ञान

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यते ऽस्ति मम कोऽपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥
'भवभूतिः',

पुस्तक ७ वें.] वैशाख कृ० ५, शनिवार [अंक १० वा

दत्तक योग

एखाद्या मुलाला दत्तक बसण्याचा योग आहे किंवा नाहीं, हें त्याच्या कुंडलीवरून कसें ठरवावें याचें विवेचन कर्त्तव्य आहे. या योगांत मुलगा आपल्या जनक आईबापांस सोडून दुसऱ्यांस आईबाप म्हणवितो म्हणून आईबापांच्या सुखावरूनच दत्तक योगाची कल्पना करावी लागते. कुंडलीवरून अशा वेळीं दोन अनुमानें निघू शकतात. एक या मुलास आईबापांचें सुख नसलें पाहिजे किंवा दुसरें तो दत्तक असला पाहिजे. अमुक एक दत्तक योगच आहे असें निश्चयात्मक सांगतां येणें शक्य नाहीं. हीं अनुमानें करण्यास पुढील कारणें असावीं लागतात.

२ कर्क राशींत पाप ग्रह हा राशि मातृसुखाचा कारक आहे.

२ सिंह राशींत पाप ग्रह हा राशि पितृसुखाचा कारक आहे.

३ चंद्र हा पाप ग्रहानें युक्त

अथवा दृष्ट. हा ग्रह मातृसुखाचा कारक आहे व तो कर्क राशीचा स्वामी आहे.

४ रवि हा पापग्रहानें युक्त अथवा दृष्ट. हा ग्रह पितृसुखाचा कारक आहे व तो सिंह राशीचा स्वामी आहे.

५ चतुर्थ स्थानीं पाप ग्रह त्यावर पाप ग्रहाची दृष्टि या स्थानावर मातृसुखाचा विचार करितात.

६ दशम अगर नवम स्थानीं पाप ग्रह अगर त्यावर पाप ग्रहाची दृष्टि. या स्थानावर पितृसुखाचा विचार करितात.

मंगळ, शनि, राहु आणि हर्शल हे पाप ग्रह वरील योग उत्पन्न करितात. केवळ एकाच कारणानें दत्तक योग घडत नाहीं. त्यास दोन किंवा अधिक कारणें लागतात. हें लक्ष्यांत ध्यावें.

७ मेष, सिंह, धनु आणि मकर हे राशि चतुर्थ अगर दशम स्थानीं असतां हा योग घडलेला आढळण्यांत येतो.

८ चतुर्थ अगर दशम यांचे स्वामी पाप ग्रहानें युक्त अथवा दृष्ट. या स्थानांत जे राशि असतात, त्यांचे जे स्वामी तेच त्या भावाचे स्वामी होत. अथवा ते शत्रुक्षेत्रीं शत्रुग्रहानें युक्त अथवा दृष्ट अगर नीच.

९ चंद्र अगर रवि हे शत्रुस्थानीं शत्रुग्रहानें युक्त किंवा दृष्ट, अथवा ते आपल्या नीचांत.

१० चंद्रापासून चतुर्थ स्थानीं पाप ग्रह.

११ रवीपासून दशम अगर नवम स्थानीं पाप ग्रह.

वरील अकरा प्रकारच्या कारणांनीं मातृपितृसुखाची हानि अगर दत्तकत्व या गोष्टी घडतात. हीं सर्व कारणें सुशिक्षितांनीं अनुभवून पहावीं आणि मग पाहिजे तर हें शास्त्र खरें कीं खोटें तें ठरवावें. उदाहरणासाठीं खालीं कांहीं कुंडल्या दिल्या आहेत, त्या आमच्या वाचकवर्गापैकींच आहेत, काल्पनिक नाहींत.

एथें वाचकांस सांगणें जरूर आहे कीं, आपण या शास्त्रावर विचार करून जें कांहीं अगदीं नवीन असें संपादन केलें आहे, त्यांतच आजच्या विषयाची गणना

होते. हें कोणाचेंही उष्टें घेतलेलें नाहीं.

उदाहरणें:—

[१] जन्म–ता. १३ एप्रिल १८७० बुधवार, सकाळीं ११ वाजून १ मि. सायन



नि. १ प्रमाणें या कुंडलींत कर्क राशींत हर्शल. आणि राहु हे दोन पापग्रह आहेत.

नि. ६ प्रमाणें दशम स्थानीं मंगळ आणि नेपच्यून हे दोन पाप ग्रह आहेत.

नि. ७ प्रमाणें दशम स्थानांत मेष राशि आहे.

नि. ९ प्रमाणें चंद्र हा शत्रुक्षेत्रीं आहे कारण तो कन्येंत आहे. कन्येचा स्वामी बुध असून त्याचा चंद्र हा शत्रु आहे. या चंद्रास मोर शुक्र आहे (समोर म्हणजे लाच्यापासून ७ व्या स्थानीं) शुक्राचा चंद्र हा शत्रु आहे.

नियम १० प्रमाणें शनि धनु राशींत असून तो चंद्राच्या चतुर्थ स्थानीं आहे. (चंद्रापासून मोजून पहा.)

नियम ११ प्रमाणें तोच शनि रवीच्या नवम स्थानीं आहे. (रवीपासून पहा.)

याप्रमाणें या कुंडलींत ६ कारणें घडलीं आहेत. म्हणून हे गृहस्थ शके १८११ त दत्तक झाले.

(२) जन्म–ता. १६ मार्च्य १८८१ रात्रीं ८ वाजून १४ मि. सायन



नि. ७ प्रमाणें या कुंडलींत लग्नाच्या व चंद्राच्या चतुर्थ स्थानीं मकर राशि आहे

नि. ८ प्रमाणें चतुर्थ स्थानाचा स्वामी शनि हा आपल्या नीचांत

आहे. (चतुर्थ स्थानीं जो मकर राशि आहे त्याचा स्वामी शनि म्हणून तोच चतुर्थ भावाचा स्वामी होय. मेष राशीचा शनि नीच असतो. ही ज्योतिषशास्त्राची सामान्य परिभाषा नवीन शिकणारांनी आमच्या सुलभजातक भा. १ वरून शिकावी. परिभाषा समजल्याशिवाय असले लेख कधींही समजणार नाहींत)

नियम ३ प्रमाणें चंद्रावर शनीची दृष्टि आहे.

निमम ११ प्रमाणें रवीपासून दशमस्थानीं धनु राशीचा राहु आहे.

नियम ९ प्रमाणें चंद्र हा शुक्राच्या राशीस असल्यामुळें शत्रुक्षेत्रीं आहे.

नियम ४ प्रमाणें रवीवर हर्शलची दृष्टि आहे.

(३) जन्म-शके१७९१ ज्ये. शु. १५ गुरुवार सूर्योदयानंतर घ. प. ३४

सायन



नि. १ प्रमाणें कर्क राशींत हर्शल हा पाप ग्रह आहे.

नि. ८ प्रमाणें चतुर्थ स्थानाचा स्वामी शत्रुगृहीं असून २ पापग्रहांनीं युक्त आहे.

नि. २ प्रमाणें सिंह राशींत राहु हा पापग्रह आहे.

नि. ८ प्रमाणें दशमाचा स्वामी मंगळ शत्रुक्षेत्रीं आहे. कारण तो कन्येंत असल्यामुळें कन्येचा स्वामी जो बुध तो मंगळाचा शत्रु आहे, शिवाय त्यावर शनीची पूर्ण दृष्टि आहे.

नि. ७ प्रमाणें दशमांत मेष राशि आहे.

नि. ६ प्रमाणें दशमावर व नवमावर मंगळ पूर्ण पाहतो.

नि. ९ प्रमाणें चंद्र शनीच्या क्षेत्रीं असल्यामुळें शत्रुगृहीं आहे.

याप्रमाणें ७ कारणांनीं हा दत्तक झाला.

(४) जन्म-शके १८०७ अ. ज्ये व.७ सू. नंतर घ. ५६ प. ४९

सायन



नि. ४ प्रमाणें व ८ प्रमाणें चतुर्थ स्थानाचा स्वामी जो रवि तो शनीनें युक्त आहे. रवि आणि शनि यांचें परस्पर हाडवैर आहे.

नि. ७ प्रमाणें चतुर्थ स्थानीं सिंह राशि आहे.

नि. ८ प्रमाणें दशमाचा स्वामी शनि हा रवीनें युक्त आहे.

नि. १० प्रमाणें चंद्राच्या चतुर्थ स्थानीं पापग्रह आहेत.

नि. ३ प्रमाणें चंद्रावर हर्शल आणि शनि असे दोन पापग्रह पाहतात.

नि. ५ प्रमाणें मंगळ चतुर्थ स्थानाला पाहतो.

वरील सात कारणांनीं हा दत्तक झाला.

(५) जन्म-श. १८०४ आषा. शु. ८ सू. नं. घ. २० प. ३५

सायन



नि. २ प्रमाणें सिंह राशींत मंगळ आहे.

नि. ७ प्रमाणें चतुर्थ स्थानीं मकर राशि आहे.

नि. ९ प्रमाणें चंद्र हा शत्रुक्षेत्रीं आहे.

नि. ४ प्रमाणें रवीवर शनि पाहतो. कारण, त्याची आपल्या स्थानापासून तिसऱ्या स्थानावर पूर्ण दृष्टि असते.

या चार कारणांनीं दत्तक झाला.

(६) जन्म-ता. १६ मार्च्य सन १८८१ रात्रीं ८ वाजून १४ मि.

सायन



नि. ९ प्रमाणें चंद्र शत्रुक्षेत्रीं आहे.

नि. ३ प्रमाणें चंद्रावर शनि पाहतो.

नि. ७ प्रमाणें चतुर्थ स्थानीं मकर राशि आहे.

नि. ८ प्रमाणें चतुर्थेश शनि हा नीच आहे.

नि. ९ प्रमाणें रवीवर हर्शल पाहतो.

नि. ११ प्रमाणें रवीच्या दशमांत राहु आहे.

या सहा कारणांनीं हा दत्तक झाला.

(७) जन्म ता. ७ मे सन १९०७ मंगळवार सकाळीं ६ वाजून २१ मि.

सायन



हे गृहस्थ आपल्या चुलत्याच्या मांडीवर दत्तक बसावयाचे आहेत. अद्यापि दत्तविधान झालें नाहीं. चुलत्याची तीन लक्षांची इष्टेट असून चुलीमध्यें यांस दत्तक घेण्याविषयीं लिहून ठेविलेलें आहे. जनक आईबाप अनुक्रमें ७ व्या व १३ व्या वर्षीं मृत झाले आहेत. चुलताही मृत आहे. दत्तक आई मात्र हयात आहे.

या कुंडलींत नि. १ प्रमाणें कर्क राशींत राहु आहे.

नि. २ प्रमाणें सिंह राशींत शनि आहे.

नि. ३ प्रमाणें चंद्र शनीनें युक्त व मंगळानें दृष्ट आहे.

नि. ४ प्रमाणें रवि मंगळानें युक्त आहे.

नि. ५ प्रमाणें चतुर्थ स्थानीं पापग्रह आहे.

नि. ६ प्रमाणें दशमावर पापग्रह पाहतो.

नि. ७ प्रमाणें चतुर्थ स्थानीं सिंह राशि आहे.

नि. ८ प्रमाणें दशमाचा स्वामी शनि हा रिपुगृहीं आहे.

या आठ कारणांनीं हा दत्तक योग घडणार आहे.

हे सर्व योग पाठ करितां यावे म्हणून ते पद्यांत ग्रथित केले आहेत.

कर्के वा सिंहगे पापे निशानाथे दिनाधिपे ॥
चतुर्थे दशमे पापे पापदृष्टेऽथवा यदि ॥ १
मेषे सिंहेऽथवा चापे मकरे सुखमानगे ॥
सुखेशे दशमाधीशे पापदृष्टेऽथवा युते॥२
अरिभे शत्रुयुक्ते वा दृष्टे वा नीचराशिगे ॥
सूर्ये वा रजनीनाथे शत्रौ शत्रुयुतेऽथवा॥ ३
दृष्टे वा नीचगे चंद्रा त्सुखगे पापखेचरे ॥
सूर्या ज्ञानौ गुरौ पापे दत्तयोगा इमे स्मृताः ॥४

ज्या ज्या कुंडलींत अशा प्रकारचे योग आढळतील त्या त्या वेळीं ज्योतिष्यानें या दोन प्रकारच्या गोष्टी सांगण्यास हरकत नाहीं. जेव्हां दत्तकाचींच कुंडली पाहण्याचा प्रसंग येईल तेव्हां त्यास हे नियम लागू करून दाखवावे.

ज्या दत्तकाचे जनक आईबाप व दत्तक आईबाप यांचा अल्प काळांतच मृत्यु होतो त्याची कुंडली वरील बरींच कारणें दर्शवील. जर जनक व दत्तक आईबाप जिवंत असतील व त्यांचें सुखही उत्तम प्रकारचें असेल तर कारणें थोडकीं असतील. चतुर्थ दशम स्थानें, रवि चंद्र ग्रह आणि कर्क सिंह राशि हे जनक आईबापांचें सुख दर्शवितात. दत्तक आईबापांचा विचार कसा करावा याबद्दल ठाम सिद्धांत ठरल्यावर लिहिणें बरें.

हे योग पाहण्यास सायन कुंडली श्रेष्ठ होय. निरयन कुंडलीवरून अचूक बोध होईल असें वाटत नाहीं. एक वाचक आह्मांला असें लिहीतात कीं सायन निरयन यांतील खरें खोटें मत निवडण्याचें काम वाचक वर्गाचें आहे संपादकाचें नाहीं. गोष्ट खरी. पण संपादकानें तेंच मत सिद्ध करण्यासाठीं एवढा खटाटोप चालविला आहे, तेव्हां त्यानें जर ही बाजू सिद्ध करावयाची नाहीं तर कोणीं ? वांचकांनी निर्णय करावाच. त्यांना कोण मनाई करीत

आहे? आह्मीं आपलें काम आह्मीं करणार आहों. वाचकांनीं त्याचा अनुभव घेऊन खोटें असेल तर प्रसिद्ध करावें.

आजचे योग अमुक एका माला अनुसरून दिले आहेत असें नाहीं. ते तात्विक आहेत. ह्मणून ते कोणत्या कुंडलींत मिळतात तें वाचकांनीं अनुभव घेऊन ठरवावें. सायन कुंडली जसा चोख अनुभव देईल तसा निरयन कुंडली देणार नाहीं असें आह्मीं जोरानें प्रतिपादन करितों.

दत्तक योगाच्या आणखी कांहीं कुंडल्यांची उदाहरणासाठीं जरूर आहे. पांचपन्नास कुंडल्यांत हे नियम दृष्टीस पडल्यास हा विषय सशास्त्र ठरेल. वरील योग हे दत्तक बसणाराचे झाले. आतां, दत्तक घेणारास कोणते योग लागतात व घेणारा व बसणारा यांच्यांत कोणतें साम्य असतें याचें विवेचन करावयाचें आहे. पण कुंडल्यांचा संग्रह होईपर्यंत स्वस्थ बसणें भाग आहे.



कुंडलीविज्ञान

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यते ऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥

'भवभूति:,

पुस्तक ७ वें.]ज्येष्ठ शु० १०, शुक्रवार [अंक १२ वा

दत्तक योग.

या वर्षाच्या १०व्या अंकांत दत्तक-योगाचें विवेचन केलें. ह्या योगांचा कित्येक वाचकांनीं अनुभव घेऊन आह्मांस कळविलें आहे. यावरून आतां त्यांत शंका घेण्याचें कांहीं कारण राहिलें नाहीं. या योगांतून कांहीं सामान्य नियम निघण्याचा संभव आहे. परंतु अनेक कुंडल्या पाहिल्या शिवाय निश्चयात्मक सांगतां येत नाहीं.

चंद्र हा बुध, शुक्र आणि चंद्र यांचा शत्रु आहे. ह्मणून मिथुन-कन्या, वृषभ-तूळ आणि मकर-कुंभ या राशींतला चंद्र दत्तक योगास कारण होतो. दहाव्या अंकांतील १ ल्या उदाहरणांत तो कन्येंत आहे; दुसऱ्यांत व ६व्यांत तुळेचा आहे; तिसऱ्यांत मकरेचा आहे; चवथ्यांत मात्र मीनेचा आहे! व सातव्यांत सिंहेचा आहे! याप्रमाणें सातांत दोन अपवाद आपणास आढळले. तथापि इतकी शंका घेण्यास हरकत नाहीं कीं, एखाद्या

दत्तकाची रास वरील पैकीं एखादी असेल! व सुलभजातकाच्या आधारें ती अमुकच असेल असेंही केव्हां केव्हां निश्चयात्मक कळेल.

रा. दामोदर विनायक कोटी-भास्कर—बडोदें—यांनीं एक दत्तकाची कुंडली वर्णनासह पाठविली आहे, ती अशी.—

जन्म—शके १७९० माघ व० ३० गुरुवार, सू० नंतर घ० ५।७।३०

(८) निरयन



वरील गृहस्थ मामाचे वंशांत दत्तक दिले आहेत. कुंडली निरयन आहे, तरी आपले नियमाप्रमाणे बरेंच जुळत आहे.

[१] कर्क व सिंह राशींत पापग्रह आहेत.

[२] रवि व चंद्र मंगळाच्या दृष्टींत आहेत.

[३] मेष राशि चतुर्थस्थ आहे.

[४] दशमाचा स्वामी शुक्र हा राहु व मंगळ यांचे पूर्ण दृष्टींत आहे.

[५] रवीच्या दशमांत शनि आहे.

वरील नियम जुळतात. फक्त ५।६।१० हे नियम जुळत नाहींत त्यांचीं कारणें अशीं असावीं.—

चतुर्थ व दशमांत पापग्रह नाहींत, ह्मणून आईबाप अद्यापि हयात आहेत. परंतु त्यांच्याशीं उदासीनता आहे.

बापापेक्षां आईवर थोडीशी अधिक प्रीति आहे.

सप्तमांत राहु व हर्शल असल्यामुळें चार लग्नें झालीं. हल्ली पांचवें कुटुंब आहे.

या प्रमाणें त्यांनीं वर्णन केलें आहे आतां हीच कुंडली सायन करून मांडिली ती अशी.—

सायन



या पद्धतीप्रमाणेंही चंद्र शत्रुगृहीं आहे. कर्क व सिंह राशींत पाप ग्रह आहेत. मात्र चतुर्थ दशम स्थानीं जे राशि असावयाचे ते नाहींत. 'कलत्रेशे बहुगुणे तुंगवक्रादि हेतुभिः ॥ बहुभार्यातरं विद्याच्छत्रुनीचास्तगेषुच ॥' सप्तम स्थानाचा स्वामी रवि हा शनीच्या गृहीं आहे. ह्मणून बहुभार्यायोग झाला. सप्तमांत मंगळ व राहु हे ग्रह त्रासारक आहेत. हे ग्रह सिंह राशींत प्रबल मारक असतात. शिवाय रवीवर शनि पूर्ण पाहतो. हीं कारणें पांच लग्नें होण्यास कारण झालीं. रवीच्या, चंद्राच्या अगर लग्नाच्या चतुर्थ दशम स्थानीं पाप ग्रह नाहींत ह्मणून आईबाप हयात आहेत.

जन्म—ता. १७ नवंबर सन १८६१ सायंकाळीं ६ वाजून ३६ मि०

(९) सायन



ही कुंडली एका दत्तकाची आहे. हींत पुढील योग आहेत.

(१) नि. ५ प्रमाणें चतुर्थ स्थानीं शनि आहे.

(२) नि. ६ प्रमाणें दशमांत नेपच्यून आहे.

(३) नि ९ प्रमाणें चंद्र शत्रुगृहीं आहे.

(४) नि. ३ प्रमाणें चंद्रावर मंगळ पाहतो.

(५) नि. ४ प्रमाणें रवीवर शनि पाहतो.

[६] नि. ८ प्रमाणें चतुर्थ स्थानाचा स्वामी बुध व दशमाचा स्वामी गुरु हे दोन्ही पापग्रहांनीं युत आहेत.

या कुंडलींत चंद्र जरी उच्च असा दिसतो, तरी तो शुक्राच्या राशीस असल्यामुळें शत्रुगृहीं आहे व त्यावर मंगळ पाहतो. त्याच प्रमाणें चतुर्थ स्थानीं शनि असून तो चतुर्थेश जो बुध त्याला पाहतो, ह्मणून माता जन्मापासून १० वे दिवशीं मृत झाली!

आतांपर्यंत दत्तकाच्या नऊ कुंडल्या प्रसिद्ध झाल्या आहेत. यां-

पैकीं चंद्र शत्रुगृहीं नाहीं, अशा दोन कुंडल्या आढळल्या, बाकी सर्वांत तो शत्रुक्षेत्रीं आहे असें दृष्टोत्पत्तीस आलें म्हणून **दत्तकाचा चंद्र शत्रुगृहीं असतो व जेव्हां तो तसा नसतो, तेव्हां तो शत्रुग्रहानें युक्त किंवा दृष्ट असा असतो, अथवा त्याच्या चतुर्थस्थानीं शत्रुग्रह तरी असतोच.** इतका सामान्य सिद्धांत बांधण्यास हरकत नाहीं.

मागें ज्या १० व्या अंकांतील अपवादात्मक दोन कुंडल्या सांगितल्या आहेत, त्यांपैकीं नं. ४ च्या कुंडलींत चंद्राच्या चतुर्थस्थानीं बुध आणि शुक्र हे शत्रुग्रह आहेत. व नं. ७ च्या कुंडलींत चंद्र हा शनि या शत्रुग्रहानें युक्त आहे.

दुसरी एक कल्पना वाचकांच्या पुढें मांडण्यासारखी दिसते. दत्तकांचीं लग्नें कर्क, सिंह अगर बुध, शुक्र व शनि यांचे राशि हीं असण्याचा विशेष संभव आहे. कर्क व सिंह लग्नें असतील तर तीं पापग्रहांनीं युक्त असतील. नं. १ च्या कुंडलींत कर्क लग्न असून तें राहु व हर्शल यांनीं युक्त आहे. नं. २ मध्यें शुक्राचा राशि (७) आहे. नं. ३ मध्यें कर्क लग्न असून तें हर्शल व रवि यांनीं युक्त आहे. नं. ४ मध्यें शुक्राचा (२) राशि आहे. नं. ५।६।७मध्यें शुक्राचाच राशि आहे. नं. ८ मध्यें शनीचा व नं. ९ मध्यें बुधाचा राशि आहे. यांत शुक्राचा राशि फार ठिकाणीं आढळण्यांत येतो. यावरून दत्तक होणाऱ्या मुलानें विशिष्ट प्रकारच्या राशीवरच जन्मास आलें पाहिजे, असें सिद्ध होत नाहीं काय ?

पत्रव्यवहार

पुरुष.

जन्म.—शके १८०० वैशाख व० १ इ. घ. ६



हे गृहस्थ बी. ए. एल्. एल्. बी. असून वकिलीचा धंदा करीत असतात. पांच्या कुंडलीवरून संततीचा व संपत्तीचा विचार कर्तव्य आहे. शनि मीनेंत, गुरु कुंभेंत हे वकिलीचा योग दर्शवितात. निरयन कुंडलींत मिथुन लग्न, शनि मीनेंत व गुरू मकरेंत आहे. एकंदरींत हे वकील झाले हें नियमास अनुसरूनच आहे.

संततीसंबंधानें विचार करितां लग्न, लग्नांतील ग्रह, पंचम, पंचमांतील ग्रह, गुरु व चंद्र हे विचारांत घ्यावयाचे असतात. लग्नीं कर्क रास उदित असून मंगळ त्याच राशींत ८ व्या अंशांत

आहे. लग्नस्वामी चंद्र ज्येष्ठांत आहे. पंचमांत तूळ रास ४ अंश व वृश्चिक पूर्ण आहे. ह्मणून शुक्र व मंगळ हे पंचमाधिपति होतात गुरु कुंभेंत ९ व्या अंशांत व शनि २९ व्या अंशांत आहे.

पंचमांत वृश्चिक रास व त्याच राशींत चंद्र हा योग कन्यासंतति दर्शवितो. गुरु हा कुंभ या वंध्या पुरुष राशींत आहे. पंचमाचा स्वामी मंगळ हा कर्क या बहुप्रसव अशा स्त्रीअंशांत आहे. त्याची गुरूवर पूर्ण दृष्टि आहे. या एकंदर स्थितीवरून संतति बरीच, कन्या विशेष, गुरु हा मंगळानें दूषित असल्यामुळें कांहीं मुलें अल्पायु, गर्भपात व प्रसूतिसमयीं क्लेश इत्यादि गोष्टींचा बोध होतो.

पण, यावरून निर्वंश होईल अर्थ ह्मणतां येणार नाहीं. कारण पंचमांत चंद्र व लग्नांत मंगळ यांत अन्योन्यस्थानाश्रय हा संबंध झालेला असून पंचमावर कोणताही पाप ग्रह पाहत नाहीं. फक्त या कुंडलींत अशुभ योग ह्मटला ह्मणजे संततिकारक ग्रह जो गुरु तो वंध्या राशींत अष्टमांत असून मंगळाच्या पूर्ण दृष्टींत आहे. गुरु हा मंगळाच्या पूर्ण दृष्टींत असतां मुलें फार मरतात. याप्रमाणें पुरुषाची कुंडली संतति सुख दर्शविते.

आतां स्त्रीच्या कुंडलीवरून काय बोध होतो पाहूं.

स्त्री

जन्म—१८०७ वैशाख शु. १० इ. घ. १७ प. ६



पंचमांत धनु ही अग्निरास असून स्वामी गुरु लग्नीं आहे. धनु ही पुरुष रास असून प्रजा अल्प देते. पंचमाधिपति गुरु हाही पुत्रच देतो. पंचमावर शनि पाहतो, हा संततिप्रतिबंधक ग्रह आहे. हा ग्रह पुत्रसंततीच देतो. शनीचा अनिष्टपणा लग्नस्थ गुरूनें समूळ नाहींसा केला आहे. कारण, पंचम हें गुरूचेंच स्थान असून त्यावर त्याची पंचम दृष्टि आहे. पुरुषाच्या कुंडलींत कन्यासंतति बरीच असून पुत्रसंतति अल्प आहे. पण स्त्रीच्या कुंडलींत पुत्रसंततिचाच योग आहे. याप्रमाणें क्षेत्र शुद्ध असून बीज मात्र बिघडलेलें आहे. फक्त क्षेत्राचा अनिष्ट योग असता तर एवढाच आहे. कीं, गर्भस्थानांत अग्निरास असून गर्भाधिपति अग्निराशींतच आहे. एकंदरींत उभयतांच्या कुंडल्यांवरून असा बोध होतो कीं, संतति बरीच व अल्पायु, कांहीं पुत्र व कांहीं कन्या. पण, एवढ्यावरून अनपत्यत्वाचा बोध होत नाहीं हें निःसंशय आहे.

वस्तुस्थिति वर लिहिल्याप्रमाणेंच आहे. या गृहस्थांना एकंदर पांच मुलें झालीं. ३ मुली व २ मुलें पैकीं हल्लीं एकही हयात नाहीं.

पुरुषाच्या कुंडलींत गुरुमंगळ संततिला अनिष्ट आहेत हें मागें सांगितलेंच आहे. ह्मणून यांनीं गुरुमंगळांची आराधना करावी, हा उत्तम पक्ष होय. जातकालंकार श्लोक १९ मध्यें कोणता ग्रह अनिष्ट असतां काय करावें हें सांगितलेलें आहे.

"गुरुर्मंत्रयंत्रैषधिनाम्" आणि मंगळ अनिष्ट असतां "शिखितर्क्षी तत्र वंशेज पूजा" असें सांगितलें आहे.

सन १९१० मध्यें नवंबरांत गुरु, रवि, मंगळ व शुक्र हे पुरु-

षाच्या कुंडलींत पंचमांत वृश्चिक राशींत येतात व स्त्रीच्या कुंडलींत तृतीय स्थानांत येतात. गुरु, मंगळ. रवि व शुक्र हे सर्व गर्भस्थानांचे अधिपति आहेत, ह्मणून या महिन्यांत गर्भ राहिला पाहिजे व कन्येचाच असला पाहिजे असें पुढील अनुमान आहे. अनुभव मागाहून कळवीनच.

चंद्र व हर्शल या दोन ग्रहांशिवाय सर्व ग्रह उदित अर्थात आहेत. म्हणून सांपत्तिक योग बरा आहे. वयाच्या ३५ व्या वर्षी भाग्योदय होईल. कारण, दशमांत शनि आहे.

याप्रमाणें कुंडलीविज्ञानच्या वाचनानें मला जें समजलें तें गुरूच्या दृष्टीनें अवलोकन करावें अशी विनंति करून हें पत्र पुरें करितों.

एक वर्गणीदार (नागपूर)

☞ संततीसंबंधानें विचार करण्याची आपली पद्धति बरी आहे. परंतु या पद्धतींत एक दोष राहतो. तो असा कीं, आपण अंशविचार न केल्यामुळें स्त्रीच्या कुंडलींत सर्वच पुत्र व्हावे असें अनुमान निघालें. पण हा पुरुषाच्या कुंडलीशीं विरोध येतो. हल्लींच्या सुधारलेल्या काळांत विरोध दृष्टीस पडेल तर या शास्त्रावर कोणी विश्वास ठेवणार नाहीं, ह्मणून विरोध असेल तेथें त्याचें कारण सांगितलें पाहिजे व तें सशास्त्र असलें पाहिजे.

प्रथमतः आपण विचारासाठीं ज्या कुंडल्या घेणार त्या दोन्हीं खऱ्या असल्या पाहिजेत. येथें पुरुषाच्या कुंडलींत कर्क राशि २ ऱ्या अंशांत उदित आहे. हा राशि व हे अंश एल्. एल्. बी. चा योग दर्शवीत नाहींत. ह्मणून मिथुन लग्नीं जन्म असण्याचा संभव आहे. हें लग्न २९ व्या, २८ व्या, किंवा २९ व्या अंशां तही उदित असूं शकेल. जन्मकाळांत १०।९ मिनिटांचा फरक नसेल असें सांगवत नाहीं. अथवा स्त्रीची कुंडली कर्क लग्नीं उदित नसेलच असें ह्मणतां येत नाहीं. यासाठीं प्रथम कुंडल्या खऱ्या करून घेतल्या पाहिजेत.

आतां, कदाचित या दोन्ही कुंडल्या खऱ्याही असतील. कारण जोंपर्यंत आपणास त्यांच्या खऱ्याखोट्याचा निर्णय करण्यास पुरावा नाहीं तोपर्यंत त्या खोटया आहेत असें तरी कसें ह्मणावें ? खऱ्या असें धरून चाललो तर उभयतांत मेळ कसा आहे तो पहा— पुरुषाचा पंचमेश जो मंगळ तो जरी कर्क या स्त्रीराशींत असला तरी तो आठव्या ह्मणजे कुंभ या पुरुषांशांत आहे व चंद्र हा जरी वृश्चिक या स्त्रीराशींत असला तरी तो २८ व्या ह्मणजे कुंभ या पुरुषांशांतच येतो. चंद्र हा पूर्णपणें पंचमांत बसत नाहीं ह्मणून पंचमावर त्याचा अंमल नाहीं असें ह्मणण्यास हरकत नाहीं. लग्नीं उदित असलेला मंगळ हा तर पुरुष ग्रहच आहे. यावरून पुरुषाच्या कुंडलींत पुत्रपुत्री असा मिश्रयोग आहे हें उघड आहे. आतां स्त्रीची कुंडली पहा—पंचमेश गुरु हा सिंह या पुरुष राशींत २१ व्या अंशांत ह्मणजे कन्यांशांत आहे. यावरून तो कन्या प्रजा देऊं शकतो. चंद्र हा सिंहेच्या १२ व्या अंशांत ह्मणजे कर्कांशांत आहे. यावरून तोही कन्या प्रजा देऊं शकतो. पंचमावर दृष्टि

करणारा शनि हा मिथुनेच्या १२ व्या अंशांत म्हणजे वृषभांशांत आहे. यावरून स्त्रीची कुंडलीही पुत्रपुत्री असा मिश्रयोग स्पष्ट दर्शविते.

संततीसंबंधानें पुरुषाची कुंडली स्त्रीच्या कुंडलीशीं सर्वदा मिळती असेल असें म्हणतां येणार नाहीं. पुरुष हा दीर्घायु मानिला तरी त्याला जेव्हां अनेक स्त्रिया होतात तेव्हां एखादीला मुलींच मूल होत नाहीं, तर एखादीला सर्वच मुली होतात किंवा सर्वच पुत्र होतात आणि एखादीला तर मुलगे व मुली अशी मिश्र संतति होते किंवा एखादीला गर्भपात होतात किंवा मुलें अल्पायु होतात. हे सर्व योग एका पुरुषाच्या कुंडलीवरून कसे कळावे ? व पुरुषाची कुंडली संततीसंबंधानें प्रत्येक स्त्रीच्या कुंडलीशीं कां मिळती असावी ? एखाद्या पुरुषाच्या विवाहित स्त्रीला मुलींच मूल होत नाहीं पण ठेवलेल्या स्त्रीला पुष्कळ मुलें होतात, तेव्हां हा फरक पुरुषाच्या कुंडलींतून हुडकून काढण्यास कोण समर्थ आहे ?

सारांश, पुरुषाच्या कुंडलीवरून संततीसंबंधानें केलेला विचार स्त्रीच्या कुंडलीवरून केलेल्या विचाराशीं मिळता असण्याचें कारण नाहीं हें वरील विवेचनावरून सिद्ध आहे. एका प्रसंगीं मात्र पुरुषाची कुंडली स्त्रीच्या कुंडलीशीं मिळती असेल. तो प्रसंग म्हणजे जेव्हां तो एकाच स्त्रीशीं समागम करणारा असतो तेव्हांचा आहे. या ठिकाणीं सुद्धां स्त्री व्यभिचारी असतां कामा नये. तात्पर्य जेव्हां एखादें दांपत्य अव्यभिचारी असतें तेव्हां उभयतांचाहीं संततियोग मेळानें असला पाहिजे असा सिद्धांत निघतो. असल्या प्रसंगीं कोणाच्याही एकाच कुंडलीवरून संततीचें बिनचूक निदान होऊं शकेल.

पुरुषाच्या कुंडलीवरून होणारें संततीचें ज्ञान विश्वसनीय नाहीं, याचीं आणखीही कारणें आहेत. पुरुष हा षंढ असला तरी त्याला मुलें झालेलीं आढळतात, त्याचप्रमाणें वृद्ध पुरुषालाही दरसाल मुलें होतात ! अर्थात् हा स्त्रीच्या व्यभिचाराचा परिणाम आहे. यावरून पुरुषाच्या कुंडलींचें वर्णन करितांना संततीचा भाग गाळावा असें वाटतें. फक्त तो पुरुष हीनबीज आहे किंवा कसा इतकाच विचार करावा. हीनबीज षंढ. कारण जो पुरुष आहे तो हीनबीज असत नाहीं. बीज निर्जीव असेल तर तें उत्तम क्षेत्रातही उत्तम पीक देणार नाहीं, अर्थात् अशा पुरुषाला होणारीं मुलें अल्पायु, कमजोर आणि रोगी अशीं होतील. बीज निर्दोष असेल तर त्याला होणारीं मुलें सुदृढ व दीर्घायु होतील. पण या सर्व गोष्टी क्षेत्रावर अवलंबून राहणार हें उघड आहे. क्षेत्र स्त्रीच्या कुंडलींत पहावें. स्त्रीचें क्षेत्र जर स्त्री संतति दर्शवीत असेल, व पुरुषाचें बीजही स्त्रीदर्शकच असेल तर तिला त्या पुरुषापासून सर्व मुलीच झाल्या पाहिजेत, पण स्त्री कन्या दर्शविते व पुरुष पुत्र दर्शवितो किंवा स्त्री पुत्र दर्शवीत असून पुरुष कन्या दर्शवीत असेल तर कन्या व पुत्र अशी मिश्र संतति झाली पाहिजे. तात्विक दृष्टीनें असें झालें पाहिजे असें जरी म्हणतां येतें तरी स्त्रीच्या कुंडलीला संततीसंबंधानें प्राधान्य आहे, यांत शंका नाहीं.

तात्पर्य—(१) संततीसंबंधानें स्त्रीची कुंडली मुख्य व पुरुषाची कुंडली गौण. (२) स्त्री पुरुष हीं दोन्ही जर अव्यभिचारी असतील तर उभयतांच्या कुंडल्या संततियोग मेळानें दर्शवितील.

आपणास जेव्हां ब्राह्मणादि उच्च वर्गांच्या स्त्रीपुरुषांच्या कुंड-

लीवरूनही पुष्कळ ठिकाणीं संततीचा बोध होऊं शकेल. कारण, या वर्गात विवाहाचे व राहणीचे निर्बंध कडक आहेत. या वर्गात स्त्रियांच्या अंगीं पातिव्रत्याचे गुण नैसर्गिक आहेत. या साठीं संततीचा विचार करितांना जातीचा विचार प्रथम केला पाहिजे. याप्रमाणें संततीसंबंधाने आमचे तात्विक विचार आहेत.

—संपादक—



संतानफल.

बृहत्पाराशरीमध्यें मुलें न होण्यांचीं व तीं मृत होण्याचीं दैविक कारणें दिलीं आहेत व संतानसुख मिळण्यास दैवी उपाय सांगितले आहेत. त्यांची वाचकांस माहिती व्हावी म्हणून आजच्या अंकांत ते श्लोक अर्थासह देतों.

गुरुर्लग्नेशदारेश पुत्रस्थानाधिपेषुच ॥६
सर्वेषु बलहीनेषु वक्तव्या त्वनपत्यता ॥

अर्थ.— गुरु, लग्नस्वामी, सप्तमेश व पंचमेश हे चार ग्रह जर बलहीन असतील तर अनपत्यता योग जाणावा.

या ठिकाणीं बलहीन म्हणजे काय तें समजलें पाहिजे. केशवीच्या पद्धतीनें बलें काढून बलहीनता पहावयाची असें त्या पद्धतीचे अभिमानी म्हणतील. व नीच, शत्रुक्षेत्रीं, शत्रुग्रहानें युक्त किंवा दृष्ट, अस्तंगत आणि ६।८।१२ स्थानीं असा ग्रह असला म्हणजे तो बलहीन आहे असेंही कित्येक म्हणतील. यांतून कोणत्या मताचा स्वीकार केला पाहिजे हें ज्याचें त्यानें अनुभवानें ठरवावें.

रव्यारराहु शनयः पुत्रस्था बलसंयुताः ॥७
कारकाद्यात्क्षीणबलादनपत्यत्वमादिशेत् ॥

अर्थ.— रवि, मंगळ, राहु व शनि हे ग्रह पुत्रस्थानीं बलवान् असतील व संतातिकारक ग्रह क्षीणबली असेल तर अनपत्यता योग जाणावा.

ग्रह उच्च, मित्रक्षेत्रीं, मित्र ग्रहानें युक्त अथवा दृष्ट केंद्रीं किंवा त्रिकोणांत असतां ते बलवान आहेत असें समजावें. अथवा केशवीच्या पद्धतीचीं बलें ध्यावी. पंचमेश आणि गुरु हे संततिकारक ग्रह आहेत, ते निर्बली असले पाहिजेत.

पुत्रस्थानगते राहौ कुजेनापि निरीक्षिते ॥ ८
कुजक्षेत्रगते वापि सर्पशापात्सुतक्षयः ॥

अर्थ.— पंचम स्थानीं राहू हा मंगळाच्या [मेष, वृश्चिक] राशीस असेल किंवा मंगळाची त्या राहूवर दृष्टि असेल तर सर्पशापानें पुत्र जगत नाहींत.

पुत्रेशे राहुसंयुक्ते पुत्रस्थे भानुनंदने ॥ ९
चंद्रदृष्टे युते वापि सर्पशापात्सुतक्षयः

अर्थ.— पंचमाचा स्वामी राहूनें युक्त असेल व पंचम स्थानीं शनि हा चंद्रानें युक्त किंवा दृष्ट असेल तर सर्पशापानें पुत्र जगत नाहींत.

कारके राहुसंयुक्ते पुत्रेशे बलवर्जिते ॥
विलग्नेशे भौमयुते सर्पशापात्सुतक्षयः ॥ १०

अर्थ.— पुत्रकारक ग्रह जो गुरु तो राहूनें युक्त असून पंचमाचा अधिपति बलहीन असेल व लग्नस्वामी मंगळानें युक्त असेल तर सर्पशापानें पुत्रक्षय होतो.

कारके भौमसंयुक्ते लग्नेच राहुसंयुते ॥
पुत्रस्थानेश्वरे दुःस्थे सर्पशापात्सुतक्षयः ॥ ११

अर्थ.— संततिकारक ग्रह जो गुरु तो मंगळानें युक्त असून

लग्नीं राहु असेल आणि पंचमाचा स्वामी ६।८।१२ स्थानीं असतां सर्पशापानें पुत्रक्षय होतो.

भौमांशे भौमसंयुक्ते पुत्रेशे सौमनंदने ॥
राहु मांदियुते लग्ने सर्पशापात्सुतक्षयः ॥ १२

पंचमाचा स्वामी बुध हा मंगळाच्या नवमांशीं मंगळानें युक्त असेल व लग्नीं राहु आणि गुलिक असतील तर सर्पशापानें मुलें जगत नाहींत.

पुत्रस्थाने कुजक्षेत्रे पुत्रे राहुसमन्विते ॥
सौम्यदृष्टे युते वापि सर्पशापात्सुतक्षयः

अर्थ.— पंचम स्थानीं मंगळाच्या [मेष, वृश्चिक] राशीस राहु असून बुधानें युक्त अथवा दृष्ट असतां सर्पशापानें मुलें जगत नाहींत. [सौम्यदृष्टे याचा शुभ ग्रहानें दृष्ट असाही अर्थ होऊं शकेल. पण तो बरोबर नाहीं असें वाटतें.]

पुत्रस्था भानुमंदाराः स्वर्भानुः शशिजांगिराः ॥
निर्बलौ पुत्रलग्नेशौ सर्पशापात्सुतक्षयः ॥ १४

अर्थ.— पंचमांत रवि, शनि, मंगळ किंवा राहु, बुध व गुरु असतील आणि पंचमेश व लग्नेश बलहीन असतील तर सर्पशापानें मुलें जगत नाहींत.

लग्नेशे राहुसंयुक्ते पुत्रेशे भौमसंयुते ॥
कारके राहुसंदृष्टे सर्पशापात्सुतक्षयः ॥ १५

अर्थ.— लग्नस्वामी राहूनें युक्त असून पंचमाचा स्वामी मंगळानें

युक्त असेल आणि गुरु राहूच्या दृष्टींत असेल तर सर्पशापानें मुलें जगत नाहींत.

उपाय.

तद्दोषपरिहारार्थं नागपूजां समारभेत् ॥
स्वगृह्योक्त विधानेन प्रतिष्ठां कारयेत्सुधीः
नागमूर्तिं सुवर्णेन कृत्वा पूजां समाचरेत् ॥ १७
गोभूतिलहिरण्यादि दद्याद्वित्तानुसारतः ॥
एवं कृते तु नागेंद्रप्रसादा द्वर्धते कुलम् ॥१८

अर्थ.—सर्पशापानें सुतक्षय होत असेल तर नागपूजा धर्मशास्त्रांतल्या विधीप्रमाणें करावी. नागाची मूर्ति सुवर्णाची करावी. गाय, जमीन, तीळ व सोनें हे पदार्थ दान करावे. याप्रमाणें केल्यास सर्पराज संतुष्ट होतात. व कुलाची वृद्धि होते.

पुत्रस्थानं गते भानौ नीचे मंदांशकस्थिते ॥
पार्श्वयोः क्रूरसंबंधे पितृशापात्सुतक्षयः ॥ १९

अर्थ.—पंचमस्थानीं आपल्या नीचांत व शनीच्या नवमांशीं रवि असेल आणि तो दोन क्रूर ग्रहांच्या मध्यें असेल तर पितरांच्या शापानें मुलें जगणार नाहींत.

पुत्रस्थानाधिपे भानौ त्रिकोणे पापसंयुते ॥
क्रूरान्तरे पापदृष्टे पितृशापात्सुतक्षयः ॥ २०

अर्थ.— पंचमाचा स्वामी रवि हा त्रिकोणांत पाप ग्रहांच्या नवमांशीं पाप ग्रहांनीं युक्त अथवा दृष्ट असतां पितरांच्या शापानें मुलें जगणार नाहींत.

भानुराशिस्थिते जीवे पुत्रेशे भानुसंयुते
पुत्रें लग्ने पापयुते पितृशापात्सुतक्षयः ॥२१॥

अर्थ.— सिंह राशीस गुरु असून पंचमाचा स्वामी रवीनें युक्त असेल आणि पंचमांत व लग्नांत पापग्रह असतील तर पितरांच्या शापानें संतति जगत नाहीं.

लग्नेशे दुर्बले पुत्रे पुत्रेशे भानुसंस्थिते ॥
पुत्रे लग्ने पापयुते पितृशापात्सुतक्षयः ॥२२॥

अर्थ.— लग्नस्वामी दुर्बल असून पंचमांत असेल व पंचमांचा स्वामी सिंह राशीस असेल; आणि लग्नीं व पंचमांत पापग्रह असतील तर पितरांच्या शापानें मुलें जगत नाहींत.

पितृस्थानाधिपे पुत्रे पुत्रेशे वा तथा स्थिते ॥
लग्ने पुत्रे पापयुते पितृशापात्सुतक्षयः ॥२३॥

अर्थ.— नवमाचा [किंवा दशमाचा] स्वामी पंचमांत असेल किंवा पंचमेश पंचमांतच असून लग्नीं आणि पंचमांत पापग्रह असतील तर पितरांच्या शापानें मुलें जगत नाहींत.

पितुः स्थानाधिपो भौमः पुत्रेशेन समन्वितः ॥
लग्ने पुत्रे पितृस्थाने पापात्संततिनाशनम् ॥२४॥

अर्थ —नवमाचा [किंवा दशमाचा] स्वामी मंगळ हा पंचमाच्या स्वामीनें युक्त असेल आणि लग्नीं, पंचमांत व नवमांत [किंवा दशमांत] पापग्रह असतील तर संततीचा नाश जाणावा.

*

पितृस्थानाधिपे दुःस्थे कारके पापराशिगे ॥
पुत्रे लग्नेश्वरे पापे पितृशापात्सुतक्षयः ॥२६॥

अर्थ.—नवमाचा [किंवा दशमाचा] स्वामी ६।८।१२ स्थानीं असून गुरु हा पापग्रहाच्या राशीस असेल, आणि पंचमांत पाप ग्रह असून लग्नस्वामीही पाप ग्रह असेल तर पितरांच्या शापानें संतति जगत नाहीं.

लग्नपंचमभावस्था भानुभौमशनैश्चराः ॥
रंध्रे रिःफे राहुजीवौ पितृशापात्सुतक्षयः ॥२६॥

अर्थ.—लग्न आणि पंचम यांत रवि, मंगळ व शनि हे ग्रह असतील आणि अष्टमांत अथवा व्ययस्थानीं राहू व गुरु एकत्र असतील तर पितरांच्या शापानें संतति जगत नाहीं.

लग्नादष्टमगे भानौ पुत्रस्थे भानुनंदने ॥
पुत्रेशे राहुसंयुक्ते लग्न पापे सुतक्षयः ॥२७

अर्थ.— लग्नापासून अष्टम स्थानीं रवि असून पंचमांत शनि असेल आणि पंचमाचा स्वामी राहूनें युक्त असेल व लग्नीं पाप ग्रह असेल तर संतति जगत नाहीं.

व्ययेशे लग्नभावस्थे रंध्रेशे पुत्रराशिगे ॥
पितृस्थानाधिपे रंध्रे पितृशापात्सुतक्षयः ॥२८

अर्थ.— व्ययस्वामी लग्नीं असून अष्टमाचा स्वामी पंचमांत असेल व नवमाचा (किंवा दशमाचा) स्वामी अष्टमांत असेल तर पितरांच्या शापानें संतति जगत नाहीं.

रोगेशे पुत्रभावस्थे पितृस्थानाधिपे तथा ॥
कारके राहुसंयुक्ते पितृशापात्सुतक्षयः ॥२९

अर्थ.— षष्ठेश किंवा नवमेश [अथवा दशमेश] पंचमांत असेल तर पितरांच्या शापानें संतति जगत नाहीं

उपाय.

तद्दोषपरिहारार्थं गयाश्राद्धंच कारयेत् ॥
ब्राह्मणान्भोजयेदत्र अयुतं वा सहस्रकं ॥३०

अर्थ.— पितरांच्या शापांतून मुक्त होण्यासाठी गयाश्राद्ध करून एक हजार किंवा एक लक्ष ब्राह्मणांस त्या ठिकाणीं भोजन घालावें.

कन्यादानं ततःकृत्वा गांच दद्यात्सवत्सकाम् ॥
एवं कृते पितुःशापान्मुच्यते नाऽत्रसंशयः ॥३१

अर्थ.— त्या नंतर कन्यादान करून सवत्सक गाई दान कराव्या-याप्रमाणें केल्यास पितरांच्या शापांतून मुक्तता होते यांत संशय नाहीं.

वर्द्धते च कुलं तस्य पुत्रपौत्रादिभिस्तदा ॥
दृष्टियोगपदैः सर्वं फलं ब्रूयाद्विचक्षणः ॥३२

अर्थ.— त्याला पुत्रपौत्रादि प्राप्त होऊन त्याचें कुल वृद्धि पावतें. याप्रमाणें ग्रहांच्या दृष्टि, योग आणि स्थान यांहींकरून विद्वानांनीं फलें सांगावीं.

पुत्रस्थानाधिपे चंद्रे नीचे वा पापमध्यगे ॥
हिबुके पंचमे पापे मातृशापात्सुतक्षयः ॥३३

अर्थ.— पंचमाचा स्वामी चंद्र हा नीच किंवा पाप ग्रहांच्या कर्त्तरींत असेल आणि चतुर्थ व पंचम यांत ग्रह असेल तर मातेच्या शापानें संतति जगत नाहीं.

लाभे मंदसमायोगे मातृस्थाने शुभेतरे ॥
नीचे पंचमगे चंद्रे मातृशापात्सुतक्षयः ॥३४

अर्थ.— लाभस्थानीं शनि असून चतुर्थस्थानीं पाप ग्रह असेल आणि चंद्र पंचमांत नीच असेल तर मातेच्या शापानें मुलें जगत नाहींत.

पुत्रस्थाधिपे दुःस्थे लग्नेशे नीचराशिगे ॥
चंद्रपापसमायोगे मातृशापात्सुतक्षयः ॥३५॥

अर्थ.— पंचमाचा स्वामी ६।८।१२ स्थानीं असून लग्नस्वामी नीच असेल व चंद्र पापग्रहानें युक्त असेल तर मातेच्या शापानें मुलें जगणार नाहींत.

पुत्रस्थानाधिपे दुःस्थे चंद्रे पापांशसंयुते ॥
लग्ने पुत्रे पापयुते मातृशापासुतक्षयः ॥३६॥

अर्थ.— पंचमेश ६।८।१२ स्थानीं असून चंद्र पापग्रहाच्या नवमांशीं असेल आणि लग्नीं व पंचमांत पापग्रह असतील तर मातेच्या शापानें मुलें जगणार नाहींत.

पुत्रस्थानाधिपे चंद्रे मंदराव्हारसंयुते ॥
भाग्ये वा पुत्रराशौ वा कारके पुत्रनाशनम् ॥३७

अर्थ.— पंचमाचा स्वामी चंद्र हा शनि, राहु व मंगळ यांनीं युक्त असेल आणि गुरु हा पंचमांत किंवा नवमांत तसाच असेल तर पुत्रनाश जाणावा.

अर्थ.— दशमाचा अधिपति तृतीय स्थानीं असून पंचमांत शुभ ग्रह पाप ग्रहानें युक्त असेल आणि पंचमांत मंगळ असेल तर भावंडांच्या शापानें संततिक्षय जाणावा.

पुत्रस्थाने बुधक्षेत्रे शनिराहुसमन्विते ॥
रिःफे विदारौ शापत्वाद् भ्रातृशापात्सुतक्षयः॥१६

अर्थ.— पंचमांत मिथुन किंवा कन्या राशींत शनि व राहु एकत्र असतील आणि व्ययस्थानीं बुध व मंगळ असतील तर भावंडांच्या शापानें संततीचा क्षय जाणावा.

लग्नेशे भ्रातृराशिस्थे भ्रातृस्थानाधिपे सुते ॥
लग्नभ्रातृसुते पापे भ्रातृशापात्सुतक्षयः ॥५७

अर्थ.— लग्नस्वामी तृतीयस्थानीं असून तृतीयेश पंचमांत असेल व लग्न, तृतीय व पंचम या स्थानांत पापग्रह असतील तर भावंडांच्या शापानें संततीचा क्षय जाणावा.

भ्रात्रीशे नाशराशिस्थे पुत्रस्थे कारके तथा ॥
राहुमांदियुते दृष्टे भ्रातृशापात्सुतक्षयः ॥१८॥

अर्थ.—तृतीय स्थानाचा स्वामी अष्टमांत असून पंचमांत गुरु असेल व तो राहु आणि गुलिक यांनीं युक्त अथवा दृष्ट असेल तर भावंडांच्या शापानें संततीचा क्षय जाणावा.

नाशस्थानाधिपे पुत्रे भ्रातृनाथेन संयुते ॥
रंध्रे आरार्किसंयुक्ते भ्रातृशापात्सुतक्षयः ॥१९॥

*

अर्थ.—अष्टमाचा स्वामी पंचमांत तृतीयेशानें युक्त असेल व अष्टमांत मंगळ व शनि असतील तर भावंडांच्या शापानें संततीचा नाश जाणावा.

उपाय

भ्रातृशापविमोक्षार्थं श्रवणं विष्णुकीर्तनं ॥
चांद्रायणं चरेत्पश्चात्कावेर्यां विष्णुसन्निधौ ॥६०॥
अश्वत्थस्थापनं कार्यं दशधेनुः प्रदापयेत् ॥
प्राजापत्यं चरेत्तत्र भूमिदद्यात्फलान्विताम् ॥६१॥
एवं यः कुरुते भक्त्या पुत्रवृद्धिःप्रजायते ॥६२॥

अर्थ.—भावंडांच्या शापांतून मुक्त होण्यासाठीं कथा श्रवण कराव्या. चांद्रायण प्रायश्चित आचरून नंतर कावेरी नदीच्या कांठीं विष्णूच्या देवळानजीक पिंपळाचा वृक्ष लावावा. नंतर दहा गाई दान कराव्या. व प्राजापत्य प्रायश्चित घेऊन भूमिदान द्यावें. याप्रमाणें उपाय केल्यानें पुत्रवृद्धि होते.

पुत्रस्थाने बुधे जीवे कुजराहुसमन्विते ॥
लग्ने मंदसमायोगे मातुलात्सुतनाशनम् ॥६३

अर्थ.—पंचमांत बुध व गुरु हे मंगळ व राहू यांनीं युक्त असून लग्नीं शनि असतां मातुलशापानें संततीचा नाश जाणावा.

लग्नपुत्रेश्वरौ पुत्रे बुधभौमसमन्विते ॥
मंदे मातुलशापत्वात्पुत्रसंततिनाशनम् ॥६४

अर्थ.— लग्न आणि पंचम यांचे स्वामी पंचमांत असून शनि

हा बुध व मंगळ यांनीं युक्त असतां मातुलशापानें पुत्र जगत नाहींत.

लुप्ते पुत्राधिपे लग्ने सप्तमे भानुनंदने ॥
लग्नेशे बुधसंयुक्ते तस्य संततिनाशम् ॥६५

अर्थ.— पंचमाचा अधिपति लग्नीं अस्तंगत असून सप्तम स्थानीं शनि असेल व लग्नेश बुधानें युक्त असेल तर त्याची संतति जगत नाही.

ज्ञातिस्थानाधिपे लग्ने व्ययेशेन समन्विते ॥
शशिसौम्यकुजे पुत्रे तस्य संततिनाशनम् ॥६६

अर्थ.— षष्ठेश लग्नीं असून तो व्ययस्वामीनें युक्त असेल व पंचमांत चंद्र, बुध आणि मंगळ एकत्र असतील तर संतति जगत नाही.

पुत्रलग्नाधिपौ युक्ता वन्योन्यं वाथ वीक्षितौ ॥
पुत्रे परस्परस्थौ वा पुत्रयोगा इमे स्मृताः ॥६७

अर्थ.— पंचम व लग्न यांचे अधिपति एकत्र असतील किंवा एकमेकांस पाहत असतील अथवा पंचमेश लग्नीं व लग्नेश पंचमांत असेल तर हा पुत्रयोग होतो.

उपाय.

तदोषपरिहारार्थं विष्णुस्थापनमच्युते ॥
वापीकूपतडागादिबंधनं सेतुदर्शनम् ॥६८
पुत्रवृद्धिर्भवेत्तस्य संपद्वृद्धिः प्रजायते ॥
इदं योगपहेणैव फलं ब्रूयाद्विचक्षणः ॥६९

अर्थ.– मातुलशापांतून मुक्त होण्यासाठीं विष्णूचें देऊळ बांधावें, तळीं, विहिरी, पाणपोया स्थापाव्या. व सेतुबंध रामेश्वराचें दर्शन घ्यावें, ह्मणजे पुत्र व संतति यांची वृद्धि होते.

गुरुक्षेत्रे यदा राहुः पुत्रे जीवारभानुजः ॥
धर्मस्थानाधिपे नाशे ब्रह्मशापात्सुतक्षयः ॥७०॥

अर्थ.—नवमांत राहु व पंचमांत गुरु, मंगळ व शनि असतील आणि नवमाचा स्वामी अष्टमांत असेल तर ब्रह्मशापानें संततीचा नाश जाणावा.

विद्यागर्वेण यो मर्त्यो ब्राह्मणानवमन्यते ॥
तद्दोषं ब्रह्मशापत्वात्संतते स्तस्य नाशनम् ॥७१॥

अर्थ.—जो विद्येच्या गर्वानें ब्राह्मणांची अवज्ञा करितो त्याची संतति त्या ब्राह्मणाच्या शापानें नष्ट होते.

धर्मेशे पुत्रभावस्थे पुत्रेशे नाशराशिगे ॥
जीवारराहुमृत्युस्थे ब्रह्मशापात्सुतक्षयः ॥

अर्थ.— नवमाचा स्वामी पंचमांत असून पंचमाचा स्वामी अष्टमांत गुरु, मंगळ व राहु यांनीं युक्त असेल तर ब्रह्मशापानें संतति नष्ट होते.

धर्माधिपे नीचगते व्ययेशे पुत्रराशिगे ॥
राहुयुक्तेक्षिते वापि ब्रह्मशापात्सुतक्षयः ॥७२

अर्थ.– नवमाचा स्वामी नीच असून व्ययस्वामी पंचमांत राहूनें युक्त अथवा दृष्ट असेल तर ब्रह्मशापानें सुतक्षय होतो.

जीवे नीचगते राहुर्लग्ने वा पुत्रराशिगे ॥
पुत्रस्थानाधिपे दुःस्थे ब्रह्मशापात्सुतक्षयः ॥७४॥

अर्थ.— गुरु नीच असून राहु हा पंचमांत किंवा लग्नीं असेल आणि पंचमाचा स्वामी ६।८।१२ स्थानीं असेल. तर ब्रह्मशापानें संततीचा नाश जाणावा.

पुत्रस्थानाधिपे जीवे रंध्रे पापसमन्विते ॥
पुत्रेशावर्कचंद्रौ वा ब्रह्मशापात्सुतक्षयः ॥७५

अर्थ.– पंचमाचा स्वामी गुरु असून तो अष्टमांत पापग्रहानें युक्त असेल किंवा पंचमाचे स्वामी रवि अथवा चंद्र असतील [व ते अष्टमांत पापग्रहानें युक्त असतील] तर ब्रह्मशापानें संततीचा नाश जणावा.

मंदांशे मंदसंयुक्ते जीवे भौमसमन्विते ॥
पुत्रेशे व्ययराशिस्थे ब्रह्मशापात्सुतक्षयः ॥७६॥

अर्थ.– गुरु हा शनीच्या नवमांशीं, शनीनें किंवा मंगळानें युक्त असून पंचमेश व्ययस्थानीं असतां ब्रह्मशापानें संततीचा क्षय जाणावा.

लग्ने पापयुते मंदे भाग्ये राहुसमन्विते ॥
व्यये गुरुसमायोगे ब्रह्मशापात्सुतक्षयः ॥७७

अर्थ.— लग्नीं गुरूनें युक्त शनि असून नवमस्थानीं राहु असेल किंवा व्यय स्थानीं गुरु असेल (?) तर ब्रह्मशापानें संततीचा नाश जाणावा

उपाय

तस्य दोषस्य शांत्यर्थं कुर्याच्चांद्रायणं नरः ॥

*

ब्रह्मकूर्चत्रयं कृत्वा धेनुं दद्यात्सदक्षिणां ॥७८
पंचरत्नानि देयानि सुवर्णेन समन्वितं ॥
अन्नदानं ततःकुर्यादयुतं वा सहस्रकं ॥७९
एवं कृते तु सत्पुत्रं लभते नाऽत्रसंशयः ॥
मुक्तशापो विशुद्धात्मा सपुमान्सुखमेधते ॥८०

अर्थ.— ब्रह्मशापाच्या दोषांतून मुक्त होण्याकरितां चांद्रायण प्रायश्चित्त घ्यावें. तीन ब्रह्मकूर्च करून गाई दक्षिणा देऊन दान करावें. सुवर्णासहित पांच रत्नें देऊन सहस्रभोजने किंवा लक्षभोजन घालावें. या प्रमाणें उपाय केल्यास चांगले पुत्र प्राप्त होतात यांत संशय नाहीं. त्याच प्रमाणें तो या शापांतून मुक्त होऊन त्याचें मन पवित्र होतें व तेणेंकरून तो सुख पावतो.

दारेशे पुत्रभावस्थे दारेशस्थांशपे शनौ ॥
पुत्रेशे नाशराशिस्थे पत्नीशापात्सुतक्षयः ॥८१

अर्थ.— सप्तमाचा स्वामी पंचमांत असून तो शनीच्या नवमांशीं असेल, आणि पंचमाचा स्वामी अष्टमांत असेल तर पत्नीच्या शापानें संततीचा नाश जाणावा.

कलत्रे नाशसंस्थे रिःफेशे पुत्रराशिगे ॥
कारके पापसंयुक्ते पत्नीशापात्सुतक्षयः ॥८२

अर्थ.— सप्तमाचा स्वामी अष्टमांत असून व्ययस्वामी पंचमांत असेल व गुरु पाप ग्रहानें युक्त असेल तर पत्नीच्या शापानें संततीचा नाश जाणावा.

पुत्रस्थानगते शुक्रे कामपे रंध्रमाश्रिते ॥
कारके पापसंयुक्ते पत्नीशापात्सुतक्षयः ॥८३

अर्थ — पंचमांत शुक्र असून सप्तमेश अष्टमांत असेल व गुरु पाप ग्रहानें युक्त असेल तर पत्नींच्या शापानें संतति जगत नाहीं.

कुटुंबे पापसंबंधे कामेशे नाशराशिगे ॥
पुत्रे पापग्रहैर्युक्ते पत्नीशापात्सुतक्षयः ॥८४

अर्थ.— द्वितीय स्थानीं पाप ग्रह असून सप्तमेश अष्टमांत असेल व पंचमांत पाप ग्रह असेल तर पत्नीच्या शापानें संततीचा नाश जाणावा.

भाग्यस्थानगते शुक्रे दारेशे नाशराशिगे ॥
लग्ने पापे सुते पापे पत्नीशापात्सुतक्षयः ॥८५

अर्थ.— नवमांत शुक्र असून सप्तमेश अष्टमांत असेल, व लग्नीं आणि पंचमांत पापग्रह असतील तर पत्नीच्या शापानें संततीचा नाश जाणावा.

भाग्यस्थानाधिपे शुक्रे पुत्रेशे शत्रुराशिगे
गुरुलग्नेशदारेशा दुःस्था संततिनाशनम् ॥८६॥

अर्थ— नवमाचा स्वामी शुक्र असून पंचमाचा स्वामी शत्रुगृहीं असेल, गुरु, लग्नस्वामी व सप्तमेश ६।८।१२ या स्थानीं असतील तर संततीचा नाश जाणावा.

पुत्रस्थाने भृगुक्षेत्रे राहुचंद्रसमन्विते॥
व्यये लग्ने धने पापे स्त्रीशापात्सुतनाशनम् ॥८७

अर्थ. — पंचमांत वृषभ अगर तूळ राशींत राहू आणि चंद्र एकत्र असतील आणि व्यय, लग्न, धन या स्थानांत पापग्रह असतील तर स्त्रीशापानें संततीचा नाश जाणावा.

सप्तमे मंदशुक्रौ च रंध्रेशे पुत्रगे रवौ ॥
लग्ने राहु समायोगे पत्नीशापासुतक्षयः ॥८८॥

अर्थ.— सप्तमस्थानीं शनि व शुक्र एकत्र असतील व अष्टमेश पंचमांत असून लग्नीं रवि हा राहूनें युक्त असतां पत्नीच्या शापानें संततीचा नाश जाणावा.

धने कुजे व्यये जीवे पुत्रस्थे भृगुनंदने ॥
राहुयुक्ते क्षिते वापि पत्नीशापात्सुतक्षयः ॥८९॥

अर्थ.— द्वितीयस्थानीं मंगळ असून व्ययस्थानीं गुरु असेल व पंचमांत शुक्र असून तो राहूनें युक्त अथवा दृष्ट असेल तर पत्नीच्या शापानें संततीचा क्षय जाणावा.

नाशस्थौ वित्तदारेशौ पुत्रे लग्ने कुजे शनौ ॥
कारके पापसंयुक्ते पत्नीशापासुतक्षयः ॥९०॥

अर्थ.— द्वितीय आणि सप्तम यांचे स्वामी अष्टमांत असून पंचमांत मंगळ व लग्नीं शनि असेल व गुरु पापग्रहानें युक्त असेल तर पत्नीच्या शापानें संततीचा क्षय जाणावा.

लग्नपंचमभाग्यस्था राहुमंदकुजाःक्रमात् ॥
रंध्रस्थौ पुत्रदारेशौ पत्नीशापात्सुतक्षयः ॥९१

अर्थ.— लग्नीं राहु, पंचमांत शनि व नवमांत मंगळ असेल

आणि अष्टम स्थानीं पंचम व सप्तम यांचे स्वामी असतील तर पत्नीच्या शापानें संततीचा नाश जाणावा.

उपाय.

तस्य दोषस्य शांत्यर्थं कन्यादानं समाचरेत् ॥
लक्ष्मीनारायणं देवं सर्वाभरणभूषितम् ॥९२
मूर्तिदानं च कर्त्तव्यं दशधेनूःप्रदापयेत् ॥
शय्यां च भूषणं चैव दंपत्योदापयेत्सुधीः ॥९३
पुत्रं प्रसूयते तस्य भाग्यवृद्धिश्च जायते ॥
मंत्रशापमिदं मर्त्यः पिशाचं बाध्यते सदा ॥

अर्थ — पत्नीच्या शापांतून मुक्त होण्यासाठीं कन्यादान करावें. लक्ष्मीनारायणाची मूर्ति सर्व प्रकारचे अलंकार घालून तिचें दान करावें, दहा गाई द्याव्या. दांपत्याला शय्या आणि अलंकार द्यावे म्हणजे त्या मनुष्यास पुत्र होतो व त्याचें भाग्य-वृद्धीस पावतें.

कर्म लोपं पितृभ्यश्च तच्छापाद्वंशनाशनम् ॥
पुत्रस्थितौ मंदसूर्यौ क्षीणचंद्रस्तु सप्तमे ॥९५॥
लग्ने व्यये राहुजीवौ प्रेतशापात्सुतक्षयः ॥

अर्थ.— पितरांचीं कर्मे न केल्यास त्यांच्या शापानें वंशाचा नाश होतो. पंचमांत शनि व चंद्र असून क्षीण चंद्र सप्तमांत असेल, लग्नीं राहू आणि व्ययस्थानीं गुरु असेल तर प्रेतशापानें संतति जगत नाहीं.

पुत्रस्थानाधिपे मंदे नाशस्थे लग्नगे कुजे ॥
कारके नाशराशिस्थे प्रेतशापात्सुतक्षयः ॥९६

*

अर्थ.— पंचमाचा स्वामी शनि असून तो अष्टमांत व लग्नीं मंगळ असेल आणि गुरु अष्टमांत असेल तर प्रेतशापामुळें संतति जगत नाहीं.

लग्ने पापे व्यये भानौ सुते चारार्किसोमजाः ॥
पुत्रेशे रंध्रभावस्थे प्रेतशापात्सुतक्षयः ॥९७

अर्थ.— लग्नीं पापग्रह असून व्ययस्थानीं रवि असेल, पंचमांत मंगळ, शनि व बुध असतील व पंचमाचा स्वामी अष्टमांत असेल तर प्रेताच्या शापानें संततीचा क्षय जाणावा.

लग्ने राहुसमायोगे पुत्रस्थे भानुनंदने ॥
कारके नाशराशिस्थे प्रेतशापात्सुतक्षयः ॥९८

अर्थ.— लग्नीं राहु असून पंचमांत शनि असेल व गुरु अष्टमांत असेल तर प्रेतशापानें संततीचा नाश जाणावा.

लग्ने राहौ च शुक्रेज्ये चंद्रेमंदयुते तथा ॥
लग्नेशे मृत्युराशिस्थे प्रेतशापात्सुतक्षयः ॥९९

अर्थ.— लग्नी राहु; शुक्र, गुरु, किंवा चंद्र हे शनीनें युक्त असून लग्नस्वामी अष्टमांत असेल तर प्रेतशापानें संततीचा क्षय जाणावा.

लग्ने राहुसमायोगे पुत्रस्थे भानुनंदने ॥
कुजदृष्टे युते वाऽपि प्रेतशापात्सुतक्षयः ॥१००

अर्थ.— लग्नीं राहु असून पंचमांत शनि असेल व तो मंगळानें युक्त अथवा दृष्ट असेल तर प्रेतशापानें संततीचा क्षय जाणावा.

कारके नीचराशिस्थे पुत्रस्थानाधिपे स्थिरे ॥
नीचदृष्टे नीचयुते प्रेतशापात्सुतक्षयः ॥१०१

अर्थ.— गुरु नीच असून पंचमेश स्थिर राशीस नीच ग्रहानें युक्त अथवा दृष्ट असेल तर प्रेतशापानें संततीचा नाश जाणावा.

लग्ने मंदे सुते राहौ रंध्रे भानुसमन्विते ॥
व्यये भौमसमायोगे प्रेतशापात्सुतक्षयः ॥१०२

अर्थ.— लग्नीं शनि पंचमांत राहु अष्टमांत रवि आणि व्ययस्थानीं मंगळ असतां प्रेतशापानें संततीचा क्षय जाणावा.

कामस्थानाधिपे दुःस्थे पुत्रे चंद्रसमन्विते ॥
मंदमांदियुते लग्ने प्रेतशापात्सुतक्षयः ॥१०३

अर्थ.— सप्तमेश ६।८।१२ स्थानीं असून पंचमांत चंद्र असेल व लग्नीं शनि व गुलिक असतील तर प्रेतशापानें संततीचा नाश जाणावा.

बाधास्थानाधिपे पुत्रे शनिशुक्रसमन्विते ॥
कारके नाशराशिस्थे प्रेतशापात्सुतक्षयः ॥१०४

अर्थ.— अष्टमेश पंचमांत शनि व शुक्र यांनीं युक्त असून गुरु अष्टम स्थानीं असतां प्रेतशापानें संततीचा नाश जाणावा.

उपाय.

तदोषस्य प्रशांत्यर्थं विष्णुश्राद्धं च कारयेत् ॥
रुद्रस्नानं प्रकुर्वीत ब्रह्ममूर्त्तिं प्रजापयेत् ॥१०५

धेनूरजतपात्रं च नीलं चैव प्रदापयेत् ॥
एतत्कर्मकृते तत्र शापमोक्षःप्रजायते ॥१०६

अर्थ.— प्रेतशापांतून मुक्त होण्यासाठीं विष्णुश्राद्ध व रुद्राभिषेक करून ब्रह्ममूर्ति दान करावी. गाई, रुप्याचें पात्र, नीलमणी यांचें दान करावें.

पुत्रे राहुरविसौम्याः कारके शुभसंयुते ॥
शुभेन वीक्षिते वाऽपि बहुपुत्रं समादिशेत् ॥१०७

अर्थ.— पंचमांत राहु, रवि व बुध हे ग्रह असून गुरु शुभ ग्रहानें युक्त अथवा दृष्ट असेल तर पुष्कळ पुत्र होतील.

पुत्रेशे शुभराशिस्थे शुभदृष्टिसमन्विते ॥
कारके केन्द्रभावस्थे बहुपुत्रं समादिशेत् ॥१०८

अर्थ.— पंचमाचा स्वामी शुभ ग्रहाच्या राशीस असून शुभ ग्रहाच्या दृष्टींत असेल व गुरु केंद्रीं असेल तर अनेक पुत्र होतील.

लग्नेशे पुत्रराशिस्थे पुत्रेशे लग्नमाश्रिते ॥
केन्द्रत्रिकोणगे जीवे बहुपुत्रं समादिशेत् ॥१०९

अर्थ.— लग्नस्वामी पंचमांत असून पंचमाचा स्वामी लग्नीं असेल आणि गुरु केंद्रांत किंवा त्रिकोणांत असेल तर अनेक मुलगे होतात.

पुत्रस्थानगते राहौ मंदांशकविवर्जिते ॥
बहुपुत्रं नरं विद्या च्छुभग्रहानिरीक्षिते ॥११०

अर्थ.— पंचमांत राहू असून तो जर शनीच्या नवमांशीं नसेल व त्यावर शुभ ग्रह पहात असेल तर अनेक पुत्र होतात.

पुत्रस्थानाधिपे स्वोच्चे लग्नेशे शुभसंयुते ॥
कारके शुभसंयुक्त बहुपुत्रं समादिशेत् ॥१११

अर्थ.— पंचमाचा स्वामी उच्च असून लग्नस्वामी शुभग्रहानें युक्त असेल व गुरूही शुभ ग्रहानें युक्त असेल तर अनेक मुलगे होतात.

पुत्रस्थाने तदीशे वा गुरौ वा शुभवीक्षिते ॥
शुभेन सहिते वाऽपि बहुपुत्रं समादिशेत् ॥ ११२

अर्थ— पंचम स्थानावर किंवा त्याच्या स्वामीवर अथवा गुरूवर शुभ ग्रह पहात असेल अगर त्यांच्याशीं युक्त असेल तर अनेक पुत्र होतात.

परिपूर्णबले जीवे लग्नेशे पुत्रराशिगे ॥
पुत्रेशे बलसंयुक्ते बहुपुत्रं समादिशेत् ॥११३

अर्थ.— गुरु पूर्ण बलवान् असून लग्नस्वामी पंचमांत असेल आणि पंचमेशही बलवान् असेल तर अनेक पुत्र होतात.

पुत्रस्थानगते जीवे परिपूर्णबलान्विते ॥
लग्नेशे बलसंयुक्ते पुत्रयोगे इमे स्मृताः ॥११४

अर्थ.— पंचमांत पूर्ण बलवान् असा गुरु असेल आणि लग्नस्वामीही बलवान् असेल तर हे पुत्रयोग होतात.

वर्गोत्तमांशगे जीवे लग्नेशस्यांशपे शुभे ॥
पुत्रेशेन युते दृष्टे पुत्रयोगा इमे स्मृताः ॥११५

अर्थ.— गुरु वर्गोत्तमांशीं [स्वद्रेष्काणीं, स्वनवमांशीं इ.] असेल

लग्नस्वामी शुभ ग्रहाच्या नवमांशीं असेल व तो पंचमाच्या स्वामीनें युक्त अथवा दृष्ट असेल तर हे पुत्रयोग होतात.

वित्तेशे पुत्रभावस्थे परिपूर्ण बलान्विते ॥
वैशेषिकांशके जीवे पुत्रयोगा इमे स्मृताः ॥११६

अर्थ.— द्वितीय स्थानाचा स्वामी पंचमांत पूर्ण बलवान् असेल व गुरु वैशेषिकांशीं [पारिजातादि योगीं] असेल तर हे पुत्रयोग होतात.

लग्नपुत्राधिपे स्वोच्चे अन्योन्यत्वादि वीक्षिते ॥
परस्परस्थानगते पुत्रयोगा इमे स्मृताः ॥११७

अर्थ.— पंचमाचा स्वामी उच्च असून तो व लग्नस्वामी हे एकमेकांस पाहत असतील किंवा एकमेकांच्या स्थानीं असतील तर हे पुत्रयोग जाणावे.

पुत्रस्थानाधिपस्थांशराशीशे शुभसंयुते ॥
शुभेन वीक्षिते वाऽपि पुत्रयोगा इमे स्मृताः ॥११८

अर्थ.— पंचमाचा स्वामी ज्या ग्रहाच्या नवमांशीं असेल तो ग्रह शुभ ग्रहानें युक्त अथवा दृष्ट असेल तर हे पुत्रयोग होतात.

लग्नपुत्राधिपौ केंद्रे शुभग्रहसमन्विते ॥
कुटुंबेशे बलाढ्ये तु पुत्रयोगा इमे स्मृताः ॥११९

अर्थ.— लग्न आणि पंचम यांचे स्वामी केंद्रीं असून ते शुभ ग्रहानें युक्त असतील व कुटुंबस्वामी बलवान् असेल तर हे पुत्रयोग होतात.

लग्नेशे दारभावस्थे दारेशे लग्नमाश्रिते ॥
द्वितीयेशे विलग्नस्थे पुत्रयोगा इमे स्मृताः ॥१२०

अर्थ.— लग्नस्वामी सप्तमांत व सप्तमेश लग्नीं आणि द्वितीय स्थानाचा अधिपति लग्नीं हे पुत्रयोग जाणावे.

दारेशग्रहसंयुक्ते नवांशभवनाधिपे ॥
पुत्रवित्तविलग्नेशाः पुत्रयोगा इमे स्मृताः ॥१२१

अर्थ.— नवमांशाचा स्वामी सप्तमेशानें युक्त असेल किंवा लग्न द्वितीय व पंचम यांचे स्वामी एकत्र असतील तर हे पुत्रयोग होतात.

पुत्रवित्तकलत्रेशाः संयुक्ता नवभागपाः ॥
पापांशकाः पापयुता अनपत्यत्वमादिशेत् ॥१२२

अर्थ.— पंचम, द्वितीय व सप्तम यांचे स्वामी नवमांशस्वामीनें युक्त असतील किंवा ते पापग्रहाच्या नवमांशीं व पापग्रहानें युक्त असतील तर अनपत्यता योग होतो

गुरुर्लग्नेशदारेशपुत्रस्थानाधिपेषु वा ॥
सर्वेषु बलहीनेषु वक्तव्या ह्यनपत्यता ॥ १२३

अर्थ.— गुरु, लग्नेश, सप्तमेश व पंचमाचा अधिपति हे सर्व ग्रह जर बलहीन असतील तर अनपत्यता योग होतो.

व्ययेशसंयुतांशेशे मृत्युराशौ स्थिते यदि ॥
पुत्रेशे क्रूरषष्ठयंशे अनपत्यत्वमादिशेत् ॥१२४

अर्थ.— व्ययस्वामी ज्या ग्रहाच्या नवमांशीं असेल त्या नवमांशाचा स्वामी अष्टमांत असेल आणि पंचमाचा स्वामी षष्ठवंशाच्या क्रूर भागीं असेल तर अनपत्यता योग होतो.

लग्नपुत्रेश्वरौ दुःस्थे कारके नीचराशिगे ॥
अनपत्यग्रहे पुत्ते अनपत्यत्वमादिशेत् ॥१२५

अर्थ.— लग्न आणि पंचम यांचे स्वामी ६।८।१२ स्थानीं असून गुरु आपल्या नीचांत असेल व पंचम स्थानीं वंध्याग्रह असेल तर अनपत्यता योग होतो.

क्रूरषष्ठयंशके जीवे पुत्रस्थे नाशराशिगे ॥
पुत्रेशे नाशराशिस्थे अनपत्यत्वमादिशेत् ॥१२६

अर्थ.— गुरु हा क्रूरषष्ठयंशीं असून तो पंचमांत किंवा अष्टमांत असेल व पंचमेश अष्टमांत असेल तर अनपत्यता योग होतो.

लग्नाधिपे कुजे स्वोच्चे रंध्रे मंदयुते रवौ ॥
शुभदृष्टिसमायोगे चिरात्पुत्रमुपैति सः ॥१२७

अर्थ—लग्नस्वामी मंगळ आपल्या घरांत असून रवि हा अष्टम स्थानीं शनीनें युक्त असेल व तो शुभ ग्रहाच्या दृष्टींत असेल तर दीर्घ कालानें पुत्र होतो.

लग्ने मंदे गुरौ रंध्रे व्यये भौमसमन्विते ॥
शुभदृष्टे स्वतुंगे वा चिरात्पुत्रमुपैति सः ॥१२८

अर्थ.— लग्नीं शनि, अष्टमांत गुरु आणि व्ययस्थानीं मंगळ शुभ ग्रहानें दृष्ट किंवा उच्च असेल तर दीर्घ कालानें पुत्र होतो.

सुते राव्हर्कशुक्रेज्याः शुभर्क्षेशुभवीक्षिते ॥
पुत्रेशे शुभराशिस्थे चिरात्पुत्रमुपैति सः ॥१२९

अर्थ.— पंचम स्थानीं राहु, रवि, शुक्र व गुरु हे शुभ राशीस व शुभ ग्रहाच्या दृष्टींत असतील व पंचमाचा स्वामी शुभ राशीस असेल तर दीर्घ कालानें पुत्र होतो.

लग्ने सौम्ये धने पापे तृतीये पापखेचरे ॥
पुत्रेशे शु राशिस्थे चिरात्पुत्रमुपैति सः ॥१३०

अर्थ.— लग्नीं शुभ, धनस्थानीं व तृतीय स्थानीं पाप ग्रह असून पंचमाधिपति शुभ राशीस असेल तर दीर्घ कालानें पुत्र होतो.

पुत्रस्थाने कुजे मंदे बुधक्षेत्रे विलग्नपे ॥
बुधदृष्टे युते वाऽपि तदा दत्ताःसुतादयः ॥१३१

अर्थ.— पंचम स्थानीं मंगळ किंवा शनि असून लग्नस्वामी बुधक्षेत्रीं [मिथुन अगर कन्या राशींत] असेल व तो बुधानें युक्त अथवा दृष्ट असतां दत्तक घ्यावा लागतो.

पुत्रस्थाने बुधक्षेत्रे मंदक्षेत्रेऽथवा भवेत् ॥
मंदमादियुते दृष्टे तदा दत्ताःसुतादयः ॥१३२

अर्थ.—पंचमांत बुधाचा अथवा शनीचा राशि असून तो शनि व गुलिक यांनीं युक्त अथवा दृष्ट असेल तर दत्तक घ्यावा लागेल.

*

पुत्रस्थानें बुधक्षेत्रे बुधसंस्थेक्षितेपिवा ॥
लग्नाधिपे शनौ वाऽपि दत्तपुत्रा भवंति हि ॥१३३

अर्थ.—पंचमांत बुधाचा राशि असून त्या ठिकाणीं बुध असेल किंवा त्याची दृष्टि असेल व लग्नस्वामी शनि असेल तर दत्तक घेणें जरूर आहे.

पुत्रेशे मंदसंयुक्ते कुजे सौम्यनिरीक्षिते ॥
लग्नाधिपे बुधांशे वा दत्तपुत्रा भवंति हि ॥१३४

अर्थ.—पंचमाचा स्वामी शनीनें युक्त असून मंगळावर बुधाची दृष्टि असेल किंवा लग्नेश बुधाच्या नवमांशीं असेल तर दत्तक व्यावा लागेल.

कामेशे लाभभावस्थे पुत्रेशे शुभसंयुते ॥
पुत्रे मंदे बुधे वाऽपि दत्तपुत्रा भवंति हि ॥१३५

अर्थ.—सप्तमाचा स्वामी लाभस्थानीं, पंचमाचा स्वामी शुभ ग्रहानें युक्त, पंचमांत शनि किंवा बुध असा योग असतां दत्तक व्यावा लागेल

पुत्रेशे भाग्यभावस्थे भाग्येशे कर्मराशिगे ॥
पुत्रे मंदजदृष्टे तु दत्तपुत्रेण संततिः ॥१३६

अर्थ.—पंचमाचा स्वामी नवमांत व नवमाचा स्वामी दशमांत असून पंचमावर गुलिकाची दृष्टि असेल तर दत्तक व्यावा लागेल.

लग्नाधिपे भृगोश्चोचे पुत्रे मंदसमन्विते ॥
कारके बलसंयुक्ते दत्तपुत्रातु संततिः ॥१३७

अर्थ.—लग्नस्वामी शुक्र असून तो उच्च असेल व पंचमांत शनि असेल; पुत्रकारक गुरु हा बलवान् असेल तर दत्तक व्यावा लागेल.

पुत्रस्थानाधिपे चंद्रे लग्ने पुत्रे शनैश्चरे ॥
वारिपूर्णबले जीवे दत्तपुत्रा सुतं भवेत् ॥१३८

अर्थ.—पंचमाचा स्वामी चंद्र असून लग्नीं किंवा पंचमांत शनि असेल व गुरु संपूर्ण बली असेल तर दत्तक व्यावा लागेल.

पुत्राधिपे रवौ लग्ने पुत्रस्थौ शनिसोमजौ ॥
पुत्राधिपे बलयुते दत्तपुत्रात्सुतावहः ॥१३९

अर्थ.—पंचमाचा स्वामी रवि हा लग्नीं असून पंचमांत शनि व बुध हे ग्रह असतील आणि पंचमाचा स्वामी बलवान् असेल तर दत्तक व्यावा लागेल.

लग्नाधिपे गुरौ पुत्रे शनिदृष्टिसमन्विते ॥
पुत्रेशे भौमराशिस्थे दत्तपुत्राभवंतिहि ॥१४०

अर्थ.— लग्नस्वामी गुरु पंचमांत शनीच्या दृष्टींत असून पंचमाचा स्वामी मंगळाच्या राशीस असेल तर दत्तक व्यावा लागेल.

उपाय

हरिवंशो रविणा शशीत्रिपुरहा भौमेच रुद्रीक्रिया
सौम्ये संपु कांस्यपात्रविधिवज्जीवे च पैत्र्यातिथिः ॥

शुक्रे गोप्रतिपालनं च कथितं मंदे च मृत्युंजयः
कन्यादान भुजंग केतु कपिला संतानसौख्यप्रदा ॥१४१
यावत्संख्याभवे द्राशिस्तावद्वारं विनिर्दिशेत् ॥
शिवविष्णुस्थापना ग्रालक्षयोगात्सुखं भवेत् ॥१४२

अर्थ.—रवीला विष्णूची उपासना, चंद्राला शंकराची, मंगळाला शक्तीची, बुधाला कांग्रेच्या पात्राची विधीप्रमाणें, गुरूला पितृतीर्थि, शुक्राला गाईची सेवा, शनीला मृत्युंजयाचा जप, राहूला कन्यादान व केतूला कपिला गाईची सेवा व दान केल्यास संतानसुख प्राप्त होतें. पंचमांत जी राशिसंख्या असेल तितके दिवस उपासना करावी. किंवा शंकर व विष्णु यांच्या लक्ष मूर्ति कराव्या. ह्मणजे संतानसुख मिळतें.



ग्रहचार.

आपल्या ग्रहमालेंतील ग्रह पृथ्वीपासून कोट्यवधि मैलांवर जरी असले तरी ते आपआपल्या हालचालीप्रमाणें पृथ्वीवर अनेक प्रकारच्या घडामोडी घडवून आणीत आहेत किंवा त्यांच्याबद्दल सूचना करीत आहेत. भूमीपासून अगदीं जवळ सुमारें २॥ लक्ष मैलांवर चंद्र आहे. हा ग्रह उगवला ह्मणजे प्रत्येक वेळीं समुद्राला भरती येते. तिचें टाईम ठराविक असतें पण प्रमाण कमजास्त असतें तें कां? एका अमावास्येला ज्या ठरविलेल्या वेळेला भरती येते त्याच वेळेला दुसऱ्या अमावास्येस येते. पण पहिलीला ज्याप्रमाणें भरती आली त्याचप्रमाणानें दुसरीला येत नाहीं. असें कां व्हावें? पृथ्वी क्रांतिवृत्तांतून फिरते किंवा सूर्य त्याच वृत्तांतून फिरतोसा दिसतो त्यामुळें पृथ्वीवर ऋतु होतात. हे ऋतु दर वर्षी सारख्या प्रमाणांत व्हावयास नकोत काय? आज जी ह्वेंत उष्णता आहे तितकीच प्रत्येक वर्षी त्या दिवशीं असण्यास काय हरकत आहे? कधीं रोहिणी लागण्यापूर्वीच पाऊस पडतो तर कधीं मृग सुद्धां कोरडे ठणठणीत जातात ते कां? मुंबईत एका तारखेला एका वर्षी जितका पाऊस पडला तितकाच त्या तारखेला पुढील सालीं कां पडत नाहीं? यंदा गुजराथेंत पावसानें डोळे वटारावे तर पुढील सालीं बंगाल्याला माती खाण्याची पाळी यावी! सूर्यचंद्रांच्या गतींत जर नियम आहे तर असला अनियमितपणा कां व्हावा? हा प्रश्न कोणी सोडवीत नाहींत. फलज्योतिषी हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करितो. त्याच्या मतें बुधादि सर्व ग्रहांच्या गति हे फेरफार होण्यास कारण आहेत. चंद्र हा पृथ्वीच्या जवळ असल्यामुळें तो जरी इतर ग्रहांत लहान आहे तरी तो समुद्राचें पाणी आकर्षून घेतो व त्यामुळें भरती येते, हें खरें. आहे. तरी पण त्याला सूर्याची जोड मिळाल्यावर ती फार मोठी येते. अष्टमीला सूर्यचंद्रांचीं आकर्षणें काटकोनांत असतात त्यामुळें त्या तिथीची भरती कमजास्त येण्यास सूर्याचें आकर्षण कारण आहे असें सिद्ध आहे. पण जर चंद्राला आणखी कांही ग्रहांची मदत मिळाली तर अष्टमीलाही भरती अधिक कां येणार नाहीं? आणि ह्मणून मागल्या अष्टमीपेक्षां पुढील अष्टमींत न्यूनाधिक्य कां असणार नाहीं, दुसरी गोष्ट अशी आहे कीं, पदार्थांचीं

एकमेकांवर जीं आकर्षणें आहेत, तीं आकार मानाच्या सम प्रमाणांत व अंतराच्या वर्गाच्या व्यस्त प्रमाणांत अशीं असतात, हें खरें मानिलें तरी विशिष्ट पदार्थांवर विशिष्ट प्रकारचें आकर्षण असतें असा अनुभव आहे. लोखंडाच्या जवळ लोहचुंबकाचा दगड नेला कीं तो तात्काल त्या लोखंडाला अपणाकडे ओढितो हें आपण पाहतों. त्याच लोखंडा जवळ त्या लोहचुंबकापेक्षां कितीही मोठा पदार्थ घेऊन कितीही जवळ नेला तरी त्याचा काडीमात्र परिणाम होत नाहीं. त्याच प्रमाणें ग्रहांची स्थिति नसेल कशावरून ? या दिशेनें आजपर्यंत कोणी प्रयत्न केले आहेत ? समुद्रावर जसें सूर्यचंद्रांचें आकर्षण आहे, तसेंच इतर ग्रहांचें नसेल कशावरून व त्या मुळेंच एकाच तिथीच्या भरती सदा सर्वदा सारख्या येत नसतील कशावरून ?

सूर्याच्या उष्णतेनें पृथ्वीची हवा तापते वगैरे पावसाचें तत्व खरें आहे. पण त्या हवेशीं जर लोहचुंबकासारख्या इतर एखाद्या ग्रहाचा संबंध असेल तर त्या हवेंत चलबिचल होणार नाहीं काय ? पृथ्वीपासून सूर्य ९॥ कोटी मैल आहे व शनि १ अब्ज मैल दूर आहे, त्याच प्रमाणें तो सूर्यापेक्षांही बराच लहान आहे ही गोष्ट खरी. पण त्या शनींत जर वाताकर्षणशक्ति अधिक असली तर हवेवर सूर्यापेक्षांही त्याचा अधिक परिणाम घडेल, हें उघड आहे. एखादें मूल हजारों कोशावर जरी असलें तरी त्याला दुःख झालें कीं त्याच्या मातेला झालेंच पाहिजे. त्या मुलाच्या जवळ इतर कोणी केवढाही अगडबंब पुरुष असला तरी त्याच्या मातेच्या शतांशही त्याला उमाळा येणार नाहीं, हें उघड आहे. तात्पर्य, फलज्योतिष्याच्या दृष्टीनें सूर्यचंद्रांप्रमाणेंच इतर ग्रहांचाही पृथ्वीवरील पदार्थांशीं संबंध असला पाहिजे.

फलज्योतिषांत चंद्राला जलतत्व झटलें आहे. कोरड्या ठणठणीत गोलाला ज्योतिर्विदांनीं जलतत्वांत ढकललें यांचें कारण कोणास सांगितलें पाहिजे काय ? चंद्र उगवला असतां समुद्राला भरती येते त्या अर्थी चंद्राचा जलतत्वाशीं निकट संबंध आहे हें उघड आहे. सूर्य जरी चंद्राच्या शेकडों पटीनें मोठा आहे तरी त्याच्या उदयकालीं समुद्र त्याच्याकडे ढुंकूनसुद्धां पाहत नाहीं. तो चंद्र उगवण्याचींच वाट पाहत असतो.झणूनच

त्याला जलतत्वांत घातला. चंद्राप्रमाणेंच शुक्रालाही जलतत्वाचा स्वामी झटलें आहे. या शुक्राचा भरतीशीं कांहीं संबंध आहे कीं नाहीं, हें पाहिलें पाहिजे. जर असेल तर शुक्र व चंद्र हे एकाच वेळीं ज्या दिवशीं उगवतील त्या दिवशीं भरती मागील पंधरवड्यांतील त्याच तिथीपेक्षां जास्त मोठी झाली पाहिजे. हा अनुभव कोणी घेतला आहे काय ?

रवि आणि मंगळ हे अग्नितत्वाचे ग्रह आहेत. झणून त्यांच्या संयोगवियोगामुळें पृथ्वीवरील उष्णतेंत फरक होत असला पाहिजे. उन्हाळ्याच्या दिवसांत हे दोन्ही ग्रह जर एकाच राशींत असतील तर त्या कालीं उष्णता विशेष चमकली पाहिजे. या वर्षी रवि व मंगळ हे दोन्ही गोल विषुवाच्या उत्तरेस एकाच कालीं आहेत, त्यामुळें उन्हाळा कडक होईल असें ठरत नाहीं काय! उन्हाळा अधिक झाल्यास पाऊस पुष्कळ पडेल व तो दरसालपेक्षां आधीं पडेल. सुमारें एप्रिलच्या १६ व्या तारखेला मंगळ आर्द्रा प्रवेश करितो व रवि मेच्या २७ वीला करील. यावरून या अवधींत यंदाचा पावसाळा सुरू होण्याचा संभव दिसतो. यंदा मे महिन्यांतला उन्हाळा असह्य झाला पाहिजे.

शनीला वाततत्व झटलें आहे. शनि व रवि यांचा संगम झाल्यास पृथ्वीवर अग्नीनें अपघात फार झाले पाहिजेत व वारे झपाट्यानें वाहले पाहिजेत. या वर्षी मार्च्य ता. २१ला रवि व शनि यांचा मेष राशींत (विषुवावर) संगम झाला होता. व त्या वेळीं इकडे थोडासा पाऊसही पडला, रात्रीं आकाशांत वीज चमकत होती. यावरून त्या कालीं इतरत्रही थोडाबहुत पाऊस पडला असेल.

बुधाचें पृथ्वीतत्व असून गुरूचें आकाशतत्व शाहे. हीं तत्वें एकमेकांस भेटलीं असतां त्यांचा काय परिणाम होतो, हें पहावयास नको काय राजाश्रित मोठ्या पगाराचे वेधशाळेवरील ज्योतिषी या तत्वांचा विचार करितील तर त्यांचीं पावसाची भविष्यें बहुधा चुकणार नाहींत.

या भौतिक घडामोडी जशा ग्रहांच्या हालचालींनीं होतात तशाच इतरही होत असतात, असें फलज्योतिष सांगतें. ता. १३ मार्च्यला तिणवेल्ली येथें मोठा दंगा झाला. त्या दंग्यांत राजकीय पक्षाची बरीच हानि झाली. अशा स्वरूपाचा हिंदुस्थानांतला हा पहिलाच दंगा होय.

हा दंगा रवि व शनि यांच्या युतीचाच परिणाम आहे. रवि हा राजपक्ष असल्यामुळें त्याची शनीशीं होणारी युति राजपक्षास अनिष्ट झाली. युतीचा परिणाम युतिकालींच घडतो असें नाहीं. तो अगोदरच घडतो.

ता० १५ एप्रिल या दिवशीं बुध व शनि यांची युति होणार आहे. पृथ्वीतत्वाचें वाततत्वाशीं सख्य आहे, ह्मणून ही युति शुभ-परिणामी आहे. तिणवेल्लीच्या दंग्यांत बऱ्याच वकील लोकांस धरिलें आहे. परंतु बुधशनीच्या युतीकडे लक्ष दिलें असतां ते निर्दोषी ह्मणून सुटतील असा बराच संभव आहे. आतां ही युति ज्या राशींत होत आहे तो मेष राशि शनीला व बुधालाही चांगला नाहीं. त्यामुळें त्यांस थोडा-बहुत त्रास पोहोंचणारच. पण तो त्रास पंजाबच्या बकिलांच्या त्रासाशीं ताडून पाहिल्यास बराच कमी आहे, असें दिसून येईल.

ता. ४ एप्रिल या दिवशीं शुक्रमंगळ युति आहे. या युतीमुळें ऐषआराम वाढेल. स्त्रिया व पुरुष रतिसुख यथेच्छ घेतील. सुंदर वस्तूंचे बाजार भरतील, नाटकवाले आपला धंदा जोरांत चालवितील. युद्धखात्याचे प्रधान आणि सेनापति यांचें खलव्रत चालेल. राजनीति कापट्याचा मार्ग स्वीकारील. चिदंबर पिले यांचें विशेष वांकडें होईलसें वाटत नाहीं. तिणेवेल्लीला लवकर शांतता होईल, असें दिसतें. अशा तऱ्हेनें ग्रहांच्या संयोगवियोगांचा विचार केल्यास बराच फायदा झाला पाहिजे.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥
'भवभूतिः'

पुस्तक ८वें.] श्रावण शु० १४, मंगळवार [अंक २१ वा

शास्त्राचें सामर्थ्य

बहुतेकांचें असें मत बनून गेलें आहे कीं, ज्योतिःशास्त्रानें वाटेल त्या प्रश्नाचा उलगडा होतो. भूत, भविष्य, वर्तमान या तीनही स्थिति ज्योतिष्यास स्पष्ट दिसतात. त्या मुळें असे लोक ज्योतिष्यास वाटेल तो प्रश्न विचारतात. तेव्हां असा त्यांचा समज होण्यास काय कारणें असावीं याचा विचार केला पाहिजे. आमच्या मतें पुढील तीन कारणें मुख्य आहेत —

१ लें.—मुहूर्त आणि प्रश्न यांचे ग्रंथ.

२ रे.—ज्योतिष्यांचीं आश्चर्यचकित करणारीं भविष्यें.

३ रें.—ज्योतिःशास्त्राच्या वास्तविक ज्ञानाचा अभाव.

मुहूर्त व प्रश्न ग्रंथांत भविष्य सांगण्याचे जे कित्येक प्रकार दिले आहेत त्यांवरून कोणाही पृच्छकाला उत्तर देतां येतें. उदाहरण— एका गर्भिणीनें प्रश्न केला कीं, मला मुलगा होईल कीं मुलगी

होईल? तर ज्योतिषी त्या वेळची कुंडली मांडितो, आणि "लग्नाचे ३।७।९।५ या स्थानीं किंवा लग्नीं रवि, मंगळ किंवा गुरु असतील तर पुत्र होईल आणि अन्य ग्रह असतील तर कन्या होईल', या नियमानें देतो उत्तर ठोकून! दैवयोगानें केव्हां केव्हां भविष्य खरेंही ठरतें. त्यामुळें पृच्छकाला वाटतें कीं मुलगा होईल कीं मुलगी होईल' या प्रश्नाचें उत्तर स्वतःची अगर स्त्रीची कुंडली नसतांही ज्योतिष्यास देतां येतें! ज्योतिष्यानेंही शास्त्राच्या वास्तविक स्थितीचा विचार केलेला नसल्यामुळें उत्तर बरोबर आलेंच पाहिजे असा त्याला भ्रम उत्पन्न होतो! मुलगा होईल कीं मुलगी होईल हें सांगणें इतकें सोपें नाहीं. किंबहुना अनेक प्रसंगीं अशक्यच आहे. तथापि लोक विचारतात, ह्मणून ज्योतिषीही कांहीं तोडगा करून त्यावरून उत्तर देतो. अशा तऱ्हेचे जे मार्ग आहेत ते चिठ्या टाकून पाहण्याच्या मार्गाच्याच तोडीचे आहेत. रमल ह्मणून जें मुसलमानी शास्त्र आहे, तें अशाच प्रकारचें आहे. कांहीं कोष्टकें असतात व त्यांत कांहीं अंक असतात. पृच्छकानें त्या अंकांपैकीं कोणत्यातरी अंकावर सुपारी ठेवावी. ह्मणजे जोशीबुवा त्या अंकाचें जें फल ठरलेलें असेल त्यावरून झपाट्यासरसें उत्तर देऊं शकतात. प्रश्न कितीही बिकट असेना, त्याचें उत्तर असल्या यंत्रांनीं तत्काल देण्याची सोपी युक्ति अनेक प्रश्नग्रंथांत सांगितलेली आहे. गांवास गेलेला मनुष्य केव्हां येईल, या प्रश्नाचें उत्तर देण्याचें एक तंत्र प्रसिद्ध आहे, तें असें.—"शुक्ल पक्षाच्या प्रतिपदेपासून तिथि गणून ज्या दिवशीं प्रश्न पाहणें असेल त्या दिवसाचे सूर्योदयापासून त्या वेळपर्यंतचे प्रहरही मिळवावे. नंतर दिवस नक्षत्राची संख्या मिळवून वारांची संख्याही मिळवावी. याप्रमाणें तिथि, वार, नक्षत्र, व प्रहर यांच्या एकत्र केलेल्या संख्येस सातांनीं भागावें.

शेष उरेल त्याचें फळ.—एक उरला तर स्थानींच आहे. दोन उरले तर येण्याच्या विचारांत आहे. तीन उरले तर अर्ध्या मार्गांत आला आहे. चार उरले तर नजीक आला असें समजावें. पांच उरले तर माघारा गेला. सहा उरले तर कांहीं व्याधीनें क्लेश भोगीत आहे. व जर बाकी शून्य राहील तर निश्चयेंकरून येत नाहीं असें सांगावें" अशा प्रकारच्या तांत्रिक पद्धतीला ज्योतिःशास्त्राचें अगाध ज्ञान लागत नाहीं. साधारण मनुष्य सुद्धां ज्योतिषी बनतो. वास्तविक शास्त्रांत इतकें सामर्थ्य नाहीं. आणि आहे, असें जरी मानिलें तरी त्याचे मार्ग घोटाळ्याचे व अत्यंत बिकट आहेत. त्यांचा विचार कोणींच केलेला दिसत नाहीं. वास्तविक पद्धतीनें ज्या प्रश्नांचीं उत्तरें देतां येत नाहींत त्या सर्वांची सोय तांत्रिक पद्धतींत आहे. त्यामुळें समाजाची गैरसमजूत झालेली आहे.

तांत्रिक पद्धतीनें ह्मणा अगर दुसऱ्या कोणत्याही पद्धतीनें ह्मणा ज्योतिषी लोक कित्येक प्रसंगीं तंतोतंत गोष्टी सांगतात. त्यामुळें समाज थक्क होऊन जातो व ज्योतिःशास्त्रानें वाटेल तें सांगतां येतें व भूतभविष्यवर्तमान स्थिति आरशांत पाहिल्यासारखी स्पष्ट दिसते, ज्योतिःशास्त्र हा भविष्याचा एक आरसाच आहे अशी त्याची समजूत होते. टिळकांस बुधवारीं शिक्षा होईल, हें भविष्य वर्तविणारानें कोणता ग्रंथ विचारांत घेतला होता बरें? हें भविष्य तांत्रिक पद्धतीचेंच नव्हतें काय? वास्तविक शास्त्रांत वार सांगतां येईल असें सामर्थ्य खचित नाहीं. मग अभिमानानें कोणीं कांहीं ह्मणो! अशा प्रकारचीं आश्चर्यचकित भविष्यें ज्योतिषी केव्हां केव्हां करितात, त्यामुळें ज्योतिःशास्त्रानें सर्व समजतें हा गैरसमज झालेला आहे.

शेंकडा ९९ लोकांस वास्तविक मार्गाचें ज्ञान नाहीं. तांत्रिक मार्गाला सुद्धां ते ज्योतिषशास्त्रच समजतात. सात, नऊ किंवा अकरा ग्रह, बारा राशि, सत्तावीस नक्षत्रें, बारा भाव, ग्रहांचे योग प्रतियोग, त्यांच्या एकमेकांवरील दृष्टि यांच्या साह्यानें जें सयुक्तिक भविष्य तेंच वास्तविक भविष्य होय. अशा रीतीनें होणारीं बिनचूक भविष्यें फार थोडकीं आहेत. या वास्तविक मार्गाचें ज्ञान झाल्यावर ज्योतिःशास्त्रानें किती सांगतां येईल हें सहज कळेल. आधुनिक सुशिक्षितांनीं हा भेद ध्यानांत घेतल्यास त्यांच्या मनांत ज्योतिषी व ज्योतिःशास्त्र यांबद्दल आदरबुद्धि उत्पन्न झाल्या शिवाय राहणार नाहीं. तांत्रिक मार्ग हा नामधारी ज्योतिष्यांच्या उदरनिर्वाहाचें एक साधन असून पृच्छकाच्या जिज्ञासेची कशी तरी समजूत आहे. आह्मांस हे मार्ग पसंत नाहींत व कोणाही सुशिक्षितास ते मान्य होणार नाहींत अशी खात्री वाटते.



कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥
'भवभूतिः'

पुस्तक ८वें.] श्रावण व० १०, शुक्रवार [अंक २२ वा

शास्त्राचें सामर्थ्य

२

गेल्या अंकांत तीन कारणांनीं ज्योतिःशास्त्रानें वाटेल त्या प्रश्नाचा उलगडा होतो अशी लोकांची समजूत झालेली आहे, असें सांगितलें. ह्या समजुतीनें लोक ज्योतिष्यास प्रश्न विचारतात व ज्योतिषी शास्त्राच्या सामर्थ्यापेक्षां अधिक उत्तरें देतात, त्यामुळें तीं बहुतेक चुकतात. ही ज्योतिष्यांची कृति सुशिक्षितांच्या अनादरास पात्र होऊन त्यांच्याकडून शास्त्र व ज्योतिषी यांची तुच्छता दर्शविली जात आहे. हिंदु लोकांत ह्या शास्त्राचें महत्व प्राचीन काळापासून आहे. पूर्वीचे राजे ह्या शास्त्राला मान देत होते. त्यांच्या पदरीं उत्तमोत्तम ज्योतिषी होते व हरएक राजकीय अगर खासगी कामांत ते त्यांचा सल्ला घेत होते. ज्योतिषी लोकांस वेतन होतें व हल्लींही संस्थानांतून आहे. सर्व समाजावर ह्या लोकांचा एक प्रकारचा हक्क प्राचीन कालापासून चालत आलेला आहे. ज्योतिषी लोक राजे लोकांचें

जातक वर्तवीत असत. गर्गानें कृष्णाचें जातक वर्तविलें होतें. वराहमिहिर हा एक ज्योतिषी विक्रमाच्या नऊ रत्नांतला एक होता. पांडवकालीं फलज्योतिषाचें महत्व होतें हें भारतावरून दिसतें. सारांश प्राचीन काळापासून हिंदुस्थानांत ह्या शास्त्राला मान आहे. इंग्रज लोक भौतिक शास्त्रांचे भोक्ते आहेत. अध्यात्मिक व दैविक विषयांवर त्यांनीं विचार केलेला नसल्यामुळें त्यांचा विश्वास नाहीं. इंग्लिश राजांनीं किंवा धर्माधिकाऱ्यांनीं या शास्त्रास थारा दिलेला नाहीं. त्या मुळें त्यांचें राज्य झाल्यापासून ह्या दोन्ही शास्त्रांवरचा आमच्या लोकांचा विश्वास उडत गेला! इंग्रजी विद्यांनीं आमच्या विद्या ऱ्हास पावत गेल्या व कित्येकांचा तर नायनाट झाला! कोणत्याही विद्येस राजाश्रय लागत असतो. आमच्या विद्यांस राजाश्रय नाहींसा झाल्यामुळें नवीन शोधक उत्पन्न होत नाहींसे झाले. फलज्योतिष ह्मणजे ढोंग व ज्योतिषी ह्मणजे ढोंगी ह्या कल्पना आधुनिक आहेत. या कल्पना या विद्येस राजाश्रय मिळाल्या वांचून दूर होणार नाहींत.

या शास्त्रानें वाटेल त्या प्रश्नाचें उत्तर देतां येणें शक्य नाहीं, हें जरी खरें असलें तरी त्याचें वास्तविक सामर्थ्य इतकें आहे कीं, तेवढ्यावर आपली भविष्यकालीन जीवनयात्रा सुखावह होईल. शरीर, रोग, संकटें, संपत्ति, दारिद्र्य, कर्ज, कुटुंबीय मनुष्यांचीं सुखें, शत्रु, मानमरातब, विद्या, बुद्धिसामर्थ्य, लौकिक वगैरे गोष्टींचें ज्ञान या शास्त्रावरून होण्यासारखें आहे. मनुष्य कितीही नास्तिक असला तरी त्याला हें शास्त्र खरें आहे अशी कबुली द्यावी लागेल. बाबाजीराव पटवर्धन यांनीं ज्योतिःशास्त्राचा शरीराशीं संबंध व्यक्त केला आहे, त्यावरून ग्रह व राशि हे विशिष्ट प्रकारचेंच शरीर बनवितात हें सिद्ध झालें आहे. ज्या शास्त्रांत शरीरावरून ग्रह व राशि यांचें

ज्ञान होतें किंवा ग्रह व राशि यांवरून शरीराचें ज्ञान होतें ती विद्या **तिरस्काराहं** आहे असें कोण ह्मणेल? शिकलें पाहिजे, अनुभव घेतला पाहिजे व पूर्ण विचार केला पाहिजे, ह्मणजे अविश्वास दूर होईल. ज्योतिष्यानें प्रश्नाचें उत्तर दिलें व तें चुकलें तर शास्त्रच खोटें असें ह्मणणारांची निर्णय करितांना त्रेधा तिरपिट उडाल्याशिवाय राहणार नाहीं! कारण, कित्येक वेळां उत्तर बरोबरही येईल, त्या वेळेस त्याला शास्त्र खरें आहे अशी कबुली द्यावी लागेल! उत्तर बरोबर जमणें न जमणें यावरच शास्त्राच्या खरे खोटेपणाचा निर्णय करणें मूर्खपणाचें होईल. रोगी बरा झाला तर वैद्यशास्त्र खरें व मेला तर खोटें असें कोणी प्रतिपादन केलें आहे काय? सारांश फलज्योतिष हें वास्तविक असून त्याची सामान्य स्थिति आपल्या उपयोगास येण्यासारखी आहे.

भृगुसंहिते सारखे अचूक फलें सांगणारे ग्रंथ प्राचीन काळीं हिंदुस्थानांत असले पाहिजेत. पण परकीय अंमलाखालीं त्यांचा नायनाट झालेला आहे. जे ग्रंथ आज उपलब्ध आहेत, त्यांवरून जें ज्ञान होतें तें अपुरें आहे. या ग्रंथांत त्या जुन्या ग्रंथांतील कित्येक गोष्टी घेतलेल्या आहेत व त्यांतही अनेक पद्धतींचें मिश्रण झालेलें आहे. त्यामुळें त्यांच्या अध्ययनानें कित्येक अचूक फलें सांगतां येत नाहींत. हा दोष शास्त्राचा नाहीं. हजार पांचशें वर्षांत या शास्त्राच्या उन्नतीचा प्रयत्न झालेला नाहीं. त्यामुळें या शास्त्राला आज जितकें महत्व पाहिजे होतें तितकें आलें नाहीं. ही विद्या जरी योगशास्त्राच्या तोडीची नाहीं, तरी तिला त्याची बरीच बरोबरी करितां येण्यासारखी आहे व योगाभ्यासावांचूनही साधारण व्यवहारोपयोगी अंतर्दृष्टि प्राप्त होणारी आहे.

आपण जें करितों त्याचापरिणाम कसा होईल ही जिज्ञासा ह्याच विद्येनें दृष्ट होणारी आहे. अथवा आपण कोणत्या वेळीं कसें वर्तन ठेवावें हेंही याच विद्येनें समजणारें आहे. इतकें यांत खचित सामर्थ्य आहे. ह्मणून आह्मीं त्याचा अभ्यास केला पाहिजे व त्यावर नवीन शोध लाविला पाहिजे. जुन्या मताच्या ज्योतिष्यांच्या मतें शोधाची आवश्यकता नाहीं, सर्व कांहीं आहे इतक्यावरच भागण्यासारखें आहे. हें त्यांचें मत शास्त्राची वाढ खुंटविणारें असल्यामुळें तिकडे आपणास लक्ष देतां कामा नये. जें प्रत्यक्ष अनुभवास येईल व जें सर्व बाजूंनीं विचार करून ठरविलेलें असेल त्यावरच आह्मीं विश्वास ठेविला पाहिजे.

इतर विद्यांप्रमाणेंच हीही एक अनंत व अपार अशा महासागराप्रमाणें आहे. ती पूर्णत्वाला पोंचली आहे हें ह्मणणें शुद्ध अज्ञान आहे. ती मागें पूर्ण झाली नाहीं व पुढेंही जगाच्या अंतापर्यंत पूर्ण होणार नाहीं. यूरोपीय व अमेरिकन ज्योतिषी या विद्येचा अभ्यास करीत आहेत. त्यांनीं तिला आधुनिक स्वरूप देऊन सजविली आहे. कालांतरानें ते आमच्या कडील प्राचीन ज्योतिर्विदांप्रमाणें अचूक व आश्चर्यचकित भविष्यें करूं लागतील व या बाबतींतही आह्मांस त्यांचें शिष्यत्व पतकरावें लागेल! यासाठीं आह्मांसही आधुनिक पद्धतीनें या विद्येला अलंकृत केली पाहिजे व आपलें नांव राखिलें पाहिजे. आमच्या विद्येचें सामर्थ्य आह्मींच वाढविलें पाहिजे. दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याचे दिवस आतां राहिलेले नाहींत. ही विद्या अज्ञानी ज्योतिष्यांच्या हातीं आहे ती सुशिक्षितांनीं आपल्या हातीं घेऊन तिचें परीक्षण करावें इतकें सुचवून हा विषय पुरा करितों.

मानसिक दुर्बलता.

[एका इंग्रज ग्रंथकाराचे विचार]

बुध अथवा चंद्र अथवा हे दोन्ही ग्रह कांहीं विविक्षित राशीमध्यें असतां ते जर दूषित झाले तर मानसिक दुर्बलता उत्पन्न होते.

बुध चंद्र व जन्मलग्न हीं जर एकमेकांच्या दृष्टींत नसलीं व त्यांची परस्पर सहानुभूति (परस्पर स्थान संबंध, युति किंवा समक्रांतियुति) नसली तर मानसिक दुर्बलतेचें लक्षण समजावें. जर त्याच वेळीं नेप्च्यून, हर्शल, शनि अथवा मंगळ ह्यांच्या युतींत किंवा अशुभ दृष्टींत बुध असेल तर वेडा पर्यंत मजल जाईल. ह्या अशुभ दृष्टि जेव्हां केंद्रांतून होतात तेव्हां परिणाम कडक घडतात.

दिवसा जन्म असतां, ह्मणजे सूर्य क्षितिजाच्या वर असतां शनि बुधाचा अशुभ दृष्टिसंबंध घडला तर अपस्मार, फेंपरें उत्पन्न होतें, व मंगळ बुधाचा अशुभ दृष्टि संबंध घडला तर वेड उत्पन्न होतें.

रात्रीं जन्म असतां शनि बुधाचा अशुभ दृष्टींत संबंध असतां वेड, व मंगळ बुधाचा अशुभ दृष्टि संबंध असतां अपस्मार, फेंपरें उत्पन्न होतें.

बुध हा मीन राशींत असून केंद्रांत असतां रवीचा अगर मंगळाचा त्याच्याशीं अशुभ दृष्टी संबंध घडला तर जन्मणारा धर्म वेडा होतो. सूर्य मकरेंत असून ह्या प्रमाणें अशुभ दृष्टी संबंध घडला असतां असाच परिणाम होतो. मंगळाचा व गुरूचा असा अशुभ दृष्टि संबंध घडल्यास जन्मणारा धार्मिक बाबीमध्यें अत्युत्साही असतो, व असेच दुसरे कांहीं योग असले तर तो एखाद्या विविक्षित धर्म पंथाचा अनुयायी होतो.

रवि अथवा बुध द्विस्वभाव राशींत असतां शनि, हर्शल, मंगळ अथवा नेप्ट्यून ह्यांच्या अशुभ दृष्टींत असतां वेड किंवा मानसिक दुर्बलता उत्पन्न होते.

वरील योगांत गुरूच्या अथवा शुक्राच्या शुभ दृष्टीचा संबंध घडला तर कित्येक प्रसंगीं वरील दुष्परिणाम होण्याचे कांहीं वेळ-पर्यंत थांबतात, आणि कित्येक ठिकाणीं अनिष्ट परिणाम होणार नाहींत. ग्रह आपल्या उच्चांत, स्वगृहांत अथवा मित्र गृहांत नसतात, किंवा जेव्हां हे अशुभ दृष्टी संबंध केंद्रांतून घडतात त्यावेळीं अनिष्ट परिणाम खात्रीनें घडतात.

बुध आपल्या अशुभ दृष्टीनें चंद्रास दूषित करीत असून बुधावर जर पाप ग्रहाची अशुभ दृष्टी असेल तर मानसिक अस्वस्थता असते.



कुंडलीविज्ञान

यदार्किंचिज्ज्ञोऽहं द्विप इव मदान्धः समभवं ।
तदा सर्वज्ञोऽस्मीत्यभवदवलिप्तं मम मनः ॥
यदा किञ्चित्किञ्चिद्बुधजनसकाशादवगतं ।
तदा मूर्खोऽस्मीति ज्वर इव मदो मे व्यपगतः ॥

पुस्तक ७ वें.] फाल्गुन कृ० ३, सोमवार [अंक ४था.

१ मातृसुख

जन्म — ता. १० नवंबर सन १८९९

सोमवार — रात्रीं १ वाजून १ मि.

सायन



वाचकहो, वरील कुंडलींत मातृस्थानीं आपणास बरेच पापग्रह दिसतात. ह्यावरून तुह्मांस काय वाटतें ? कुंडलींत हें चतुर्थ स्थान आहे.

या स्थानांत नवाचा अंक आहे ह्मणजे नववी रास जी धनु ती आहे. नाश करण्याच्या कामांत ह्या रा. शीचा नंबर पहिला! या राशींत शनि, राहु, मंगळ व हर्शल असे ४ प्रमुख पापग्रह आहेत. ह्मणून मातृसुखासंबंधानें तुमच्या मनांत नीच कल्पना उभ्या राहतील. त्या अशा — १ ली. माता बाळपणांतच मृत झाली असेल. २ री, माता यद्यपि जिवंत राहिली असली तरी ती असून नसून सारखी अशा स्थितींत असेल. ३ री सापत्न माता योग असेल. ह्या तीन कल्पना जर तुह्मांस झाल्या असतील तर या शास्त्रांत तुमची गति झाली आहे असें ज्ञानण्यास हरकत नाहीं.

या नंतर तुह्मीं जर सूक्ष्म विचार करूं लागाल तर पुढील विचार खात्रीनें सुचेल. कारण, धनु हा अपघात करणारा राशि असून या राशीस मंगळादि पाप ग्रह जव्हां असतात तेव्हां स्थान परत्वें अपघात खात्रीनें घडतात, असें अनेक वेळां या पुस्तकांत सांगितलेलें आहे. त्याचप्रमाणें हर्शल हा नेहमीं विलक्षण गोष्टी घडवून आणीत असतो हेंही तुह्मांस माहीत आहे. ह्मणून या मुलाची आई बालपणींच अपघातानें मृत्यु पावली असेल असें तुह्मीं अनुमान काल अर्थात् हें उत्तर ऐकून विचारणारा आश्चर्यचकित झाला पाहिजे, हें उघड आहे. तुमची शक्ति इतकीच. यापेक्षां तिचा मृत्यु अमुकच अपघातानें झाला असेल असें सांगतां येणें अशक्य आहे.

वाचकहो, तुमचें अनुमान बरोबर आहे. या मुलाची माता ४ थ्या वर्षी ह्मणजे साडेसातींत आजारी झाली, ती पुढें १ वर्षांनीं बरी झाली. परंतु शके १८२६ ज्ये. कृ. ६ या दिवशीं तिनें विहिरींत आत्महत्या केली! शास्त्राची सत्यता पटल्याबद्दल तुह्मांस आनंद झाला असेल नव्हे काय? खालील मृत्युकालचे ग्रह पहा.

मृत्युकालचे ग्रह



मृत्युकालाची तारीख अमुकच असें तुह्मांस सांगतां यावयाचें नाहीं पण, हर्शल धनु राशींत आहे. तोंच तिचा मृत्यु झाला पाहिजे असें सांगतां येईल. ह्मणजे सात वर्षांच्या आंत मृत्युकाल असेल असें स्थूल मानानें तुह्मी सांगू शकाल. आतां, शनि कोठें असला पाहिजे याचा जेव्हां विचार कराल तेव्हां तो एक तर चतुर्थ स्थानीं असेल किंवा मातृस्थानाचा अधिपति जो गुरु त्याच्या तरी चतुर्थ स्थानीं असेल असें अनुमान कराल वरील मृत्युकाळीं तो कुंभ राशींत षष्ठस्थानीं होता. ह्मणजे गुरुच्या चतुर्थ स्थानींच होता! या काळांत राहु तनुस्थानीं होता. व गुरु अष्टम स्थानीं होता. शनीची दृष्टि त्याच्या स्थानापासून तिसऱ्या स्थानावर पूर्ण असते. ह्मणून या वेळीं गुरु हा शनीच्या पूर्ण दृष्टींत आला व मातृसुखाचा कारक ग्रह जो चंद्र तोही षष्ठस्थानीं शनीनें बिघडला. ह्मणजे चंद्र व मातृस्थानाचा स्वामी हे दोन्ही ग्रह बिघडले. चतुर्थ स्थान हर्शलनें धरून ठेविलेंच आहे. आतां मंगळ पहा. हा ग्रह याकाळीं कर्क राशींत आहे ह्मणजे मातृस्थानाधिप जो गुरु त्याच्या चतुर्थ स्थानीं आहे! व त्याची जन्मस्थ चंद्रावर पूर्ण दृष्टि आहे. अर्थात् मंगळानें मातृस्थानाधिपाचें चतुर्थ स्थान व मातृसुखाचा कारक ग्रह जो चंद्र. तो बिघडवून टाकिला. इतकेंच नव्हे तर मातृसुखाचा राशि जो कर्क तोही बिघडविला.

आतां राहूनें काय केलें तें पहा. या दिवशीं चंद्र मीन राशींत आहे. व राहु कन्येंत आहे असें वर सांगितलेंच आहे, ह्मणजे हे बुवाही कांहीं स्वस्थ बसलेले नाहीत. तो या दिवशींच्या चंद्राला पूर्ण पाहत आहेत.

आतां रवि काय करीत आहे तेंही पहा. ते मंगळानें युक्त आहे. त्यामुळें गुरूच्या चतुर्थ स्थानाला दुजोरा मिळाला आहे.

शनि आणि हर्शल हे दोन्ही ग्रह वक्री आहेत त्यामुळें ते नाश करण्यास बलवत्तर झाले आहेत.

तात्पर्य, या दिवशीं सर्व ग्रह मातृनिधन सुचवितात, हें स्पष्ट आहे.

या कुंडलींत आणखी दोन गोष्टी पाहण्यासारख्या आहेत. चतुर्थ स्थान हें उदर स्थान आहे. या स्थानांत अग्निराशि उदित असून तो मंगळानेंयुक्त आहे. ह्मणून या मुलाच्या पोटांत कांहीं विकार झाल्यामुळें पोटावर डाग द्यावा लागला आहे.

तृतीय स्थानाचा स्वामी मंगळ हा अनेक पाप ग्रहांनीं युक्त आहे. ह्मणून दोन सावत्र बहिणी मुक्या आहेत!

याप्रमाणें सर्व बाजूनीं ही कुंडली पाहण्यासारखी आहे. मुकेपणा केवळ मंगळाच्या अनिष्टतेवरच आहे असें नाहीं, व कुंडलीवरून तो कोणास सांगतांही यावयाचा नाहीं. मुकेपणा हा ज्याच्या त्याच्या कुंडलींतच दृष्टीस पडावयाचा. एथें फक्त आपणांस इतकेंच समजेल कीं, भावांतांत कांहीं विलक्षणपणा असेल. दोन बहिणी मुक्या असतील असें शास्त्रीय पद्धतीनें समजणार नाहीं.

आई अथवा बाप यांचे निधन काल शोधून काढणें हें सहज होणारें काम नाहीं. प्रथम कुंडली-वरून संभव काल शोधून काढावे त्यांच्या निधनकालीं पाप ग्रह जितक्या प्रकारांनीं निधनास्पद वसतील तितक्या प्रकारच्या कुंडल्या मांडून ठेवाव्या. याचप्रमाणें आपल्या भावांच्या कुंडल्यांवरूनही निधनास्पद कुंडल्या तयार कराव्या. नंतर आईबापांच्या कुंडल्या घेऊन त्यांवरून त्यांच्या निधनास्पद कुंडल्या तयार कराव्या. व शेवटीं या तिहींचा मेळ घालून निधनकाल कायम करावा. इतक्या विचारानें ठरविलेला निधनकाल नव्याण्णव हिश्शानें चुकणार नाहीं. मात्र इतकें करण्यास श्रम फार घ्यावे लागतील, व दिवसही बरेंच मोडावे लागतील. हें काम ज्याचें त्यानेंच करावें हें उत्तम. जोशांना विचारून तादृश फायदा नाहीं. कारण धंदा करणाऱ्या जोशांनीं एकाच गोष्टीवर इतके परिश्रम घेतल्यास त्यांच्या पोटाची तारंबळ उडेल हें उघड आहे. पुढें एखाद्या खेपेस या गोष्टी उघड करून दाखवूं. आज इतकेंच पुरे.

मातृपितृसुखांत न्यूनाधिक्य.

आईबापांपैकीं कोणाचें सुख मिळणार किंवा कोण अधिक वर्षे जगणार, हा प्रश्न दिसण्यांत सोपा पण वस्तुतः अत्यंत कठीण असा आहे. चतुर्थ स्थानीं पाप ग्रह असतां मातृसुख कमी व दशमांत पाप ग्रह असतां पितृसुख कमी हें ह्मणणें स्थूल आहे. आपणा समोर अशा कांहीं कुंडल्या येतील कीं, चतुर्थ स्थानीं पाप ग्रह असतांही मातृसुख अधिक मिळालें आहे किंवा दशमांत पाप ग्रह असूनही पितृसुख अधिक मिळालें आहे! अथवा अशाही कुंडल्या आढळतील कीं, चतुर्थ स्थानीं पाप ग्रह नसतांही मातृसुख कमी मिळालें व त्याच प्रमाणें दशमांत पाप ग्रह नसतांही पितृसुख कमी मिळालें! केव्हां केव्हां तर चतुर्थदशम स्थानीं शुभ ग्रह असूनही मातापितरांचें सुख कमी मिळालें! तेव्हां अशा बिकट स्थितींतून नक्की उत्तर ठरविण्याचें काम किती चातुर्याचें, विचाराचें व अनुभवाचें आहे बरें? हा प्रश्न कोणत्याही फलित ग्रंथांत सोडविलेला नाहीं. ह्मणून आपणास त्याचा यथाशक्ति विचार केला पाहिजे. प्रथमतः मातृसुख बरें अगर वाईट हें कसें ठरवावें याचा विचार करूं.

बरें	वाईट
१ चतुर्थ स्थानीं शुभ ग्रह अगर शुभ ग्रहाची दृष्टि.	१या स्थानीं पाप ग्रह अगर पाप ग्रहाची दृष्टि.
२ चतुर्थेश शुभयुक्त अगर शुभदृष्ट	२तोच पापयुक्त अगर पापदृष्ट
३ चतुर्थेश बलवान् *	३तोच बलहीन +

* ग्रह उच्च, मूलत्रिकोणीं, स्वगृहीं, मित्रक्षेत्रीं, मित्रयुक्त अथवा मित्रदृष्ट, केंद्रीं, त्रिकोणांत असा असतां बलवान् होय.

+ग्रह नीच, अस्तंगत, शत्रुगृहीं, शत्रुयुक्त अथवा शत्रुदृष्ट ६ | ८ | १२ स्थानीं असा असतां बलहीन होय.

४	चंद्रबलवान्	४ चंद्र बलहीन.
५	चंद्राचें चतुर्थ स्थान शुभयुक्त अथवा शुभदृष्ट	५ तेंच पापयुक्त अथवा पापदृष्ट
६	कर्क राशींत शुभ ग्रह	६ कर्क राशींत पाप ग्रह.

या प्रमाणें सहा प्रकारच्या नियमांनीं मातृसुख बरें आणि वाईट ठरवावें. ज्या बाजूचे गुण अधिक त्या बाजूप्रमाणें वास्तविक स्थिति धरावी.

आतां, पितृसुख बरें अगर वाईट कसें ठरवावें तें सांगतों.—

बरें	वाईट
१ दशमांत शुभ ग्रह अगर शुभ ग्रहाची दृष्टि	१ दशमांत पाप ग्रह अगर पाप ग्रहाची दृष्टि
२ दशमाधिपति शुभयुक्त अगर शुभदृष्ट	२ दशमाधिपति पापयुक्त अगर पाप दृष्ट
३ दशमेश बलवान् [उच्च वगैरे]	३ दशमेश बलहीन [नीच वगैरे]
४ रवि बलवान् [उच्च वगैरे]	४ रवि बलहीन [नीच वगैरे]
५ रवीचें दशमस्थान शुभयुक्त अगर शुभदृष्ट	५ रवीचें दशम स्थान पापयुक्त अगर पापदृष्ट
६ रवीचें नवम स्थान शुभयुक्त अगर शुभदृष्ट	६ रवीचें नवम स्थान पापयुक्त अगर पापदृष्ट
७ नवमांत शुभ ग्रह अगर शुभ ग्रहाची दृष्टि	७ नवमांत पाप ग्रह अगर पाप ग्रहाची दृष्टि
८ सिंह राशींत शुभ ग्रह	८ सिंह राशींत पाप ग्रह.

या प्रमाणें आठ प्रकारच्या नियमांनीं पितृसुख बरें व वाईट ठरवावें. व ज्याबाजूला गुण अधिक त्या बाजूचें फल कायम करावें. गुण देण्याचा प्रकार येणें प्रमाणें.—

उच्च—२	मूलत्रिकोणीं—१	स्वगृहीं—१	मित्रगृहीं—१
समगृहीं—१	शत्रुगृहीं—१	नीच—१	अस्तंगत—१
पापयुक्त—१	शुभयुक्त—१	मित्रयुत—१	शत्रुयुत—१
समयुत—१	शुभदृष्ट—१	पापदृष्ट—१	मित्रदृष्ट—१
शत्रुदृष्ट—१	समदृष्ट—१	उच्चग्रहदृष्ट—१	मू.त्रि ग्रहदृष्ट—१

स्वक्षेत्रग्रहदृष्ट-१ मि. क्षे. ग्रहदृष्ट—१ श. क्षे. ग्र. दृ.—१ स. क्षे. ग्र. दृ—१ नीच ग्र.दृ.—१ अस्तंगत ग्र दृ.—१ स्थानदुर्बल [६।८।१२ स्थानीं असलेला]—१ स्थानबली [केंद्रीं व त्रिकोणांत असलेला]—१ स्थानमध्यम [२।३।११ स्थानीं असलेला] **एकूण गुण ३०**

या प्रमाणें प्रत्येक ग्रहाला गुण देऊन सर्व नियमांच्या गुणांचें एकीकरण करावें. नंतर ज्या बाजूला जितके गुण अधिक येतील तितकें मातृसुखाचें व पितृसुखाचें बरें अगर वाईट फल जाणावें व त्यावरून कोणचें सुख अधिक तें गुणांच्या न्यूनाधिक्यावरून ठरवावें. यालाच आपण गणितागत तारतम्यभाव असें ह्मणूं.

गणितागत तारतम्यभावानें निश्चयात्मक उत्तर मिळेलच असें समजूं नये केवळ याच गोष्टीवर अवलंबून न राहतां कोणत्या ग्रहाच्या स्थितीवर विशेष लक्ष पोहोंचविलें पाहिजे. हें ज्योतिष्यानें अनुभवानें शिकलें पाहिजे. हा अनुभव ग्रंथकारास देतां येण्यासारखा नाहीं. तो स्वतः ज्याचा त्यानेंच संपादन केला पाहिजे. गणितागत तारतम्यभाव अनुभविक दृष्टीला मदत ह्मणून घ्यावा. ज्यांनीं अनेक कुंडल्यांत अनुभव घेतला असेल ते या मदतीवांचून सुद्धां उत्तर बरोबर देऊं शकतील.

मातृपितृसुखा या निर्णयासाठीं जे बरे आणि वाईट नियम दिले आहेत ते उत्तरोत्तर हीनबली आहेत असें समजावें. ह्मणजे सर्वांत

पहिला नियम विशेष महत्वाचा व त्यापेक्षां दुसऱ्याचें महत्व किंचित् कमी या प्रमाणें शेवटला सर्वांत कमी योग्यतेचा आहे असें जाणावें.

वरील वर्णनांत जन्मकाळच्या साडेसातीचा विचार केला नाहीं. जन्मकालची साडेसाती बहुधा मातृसुखाला अनिष्ट असते. तथापि नवम किंवा दशम स्थानांतील व सिंह राशींतली साडेसाती बापाला च अनिष्ट होते.

याप्रमाणें सर्व साधक बाधक प्रमाणांचा पूर्ण विचार करून उत्तर कायम करावें, ह्मणजे तें चुकणार नाहीं, असें वाटतें. आतां या विषयाच्या पूर्ततेकारितां एखादें उदाहरण घेऊन हा विषय पुरा करितों.—

उदाहरण.

जन्म—ता० १९ जानेवारी सन १८८३ रात्रीं ४ वाजतां



मातृसुखाचे गुण

बरें		वाईट	
कलम १	१	कलम १	०
२	०	२	०
३	२	३	०
४	१	४	०
५	०	५	१
६	०	६	०
एकूण गुण	४	एकूण गुण	१

ह्मणून मातृसुख ३ गुणांनीं अधिक बरें आहे असें समजलें.

पितृसुखाचे गुण

बरें		वाईट	
कलम १	०	कलम १	०
२	०	२	०
३	०	३	२
४	०	४	१
५	०	५	०
६	०	६	०
७	०	७	१
८	०	८	०
एकूण गुण	०	एकूण गुण	४

ह्मणून पितृसुख ४ गुणांनीं अधिक वाईट आहे.

मातृसुख ३ गुणांनीं चांगलें व पितृसुख ४ गुणांनीं वाईट ह्मणून या गृहस्थास मातृसुखच अधिक मिळालें पाहिजे असें सिद्ध झालें. पित्याचा मृत्यु सन १८९७ मध्यें कार्तिक शु. ९ ला झाला आहे व माता अद्यापि हयात आहे. शनि हा रवीच्या दशमांत असतां व हर्शल हा शुक्राच्या राशींस असतां पितृनिधन झालें आहे व तें नियमास धरून आहे. मातृपितृसुखांतलें न्युनाधिक्य अशा रीतीनें कळण्यासारखें आहे. हा विषय आह्मी चर्चेसाठीं पुढें ठेविला आहे. अनुभव घेऊन नंतर कायम करावयाचा आहे असें समजावें. या पद्धतींत जो कमीपणा असेल तो कळविल्यास त्याच्या योग्यायोग्यतेचा अवश्य विचार होईल.



प्रसूति आणि मातानिधन

हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. प्रसूति किंवा जन्म ही गोष्ट प्रारब्धाधीन असली पाहिजे. या ठिकाणीं उद्योगवादाची गति कुंठित झाल्याशिवाय राहणार नाहीं. कित्येक कट्टे उद्योगवादी ज्या प्रश्नास प्रारब्धाशिवाय दुसरें उत्तर देतां येत नाहीं तो प्रश्न आपल्या आजच्या ज्ञानाच्या बाहेरचा आहे ह्मणून तो सोडून दिला पाहिजे असें युक्तिवादाचें उत्तर देतात, परंतु त्यांत अर्थ नाहीं. वाटेल त्या स्त्रीच्या ठायीं आपल्या मनांत येईल त्याच काळीं गर्भोत्पादन करणें व तो गर्भ पूर्णपणें आपणास इष्ट त्या काळींच मुक्त करणें या गोष्टी मनुष्यानें आजवर आपल्या ताब्यांत आणलेल्या दिसत नाहींत. ऋषींमध्यें हें सामर्थ्य होतें असें आपले पुराणग्रंथ सांगतात, परंतु ते सुद्धां क्वचित् प्रसंगी कांहीं हेतु मनांत आणून आपल्या सामर्थ्याचा उपयोग करीत असत. मनुष्य प्राण्याच्या संरक्षणासाठीं त्यांनीं या विषयावर एखादें शास्त्र केलें आहे असा कोठें पुरावा नाहीं. गर्भ राहणें व जन्म होणें या गोष्टी सृष्टींतील इतर कित्येक नैसर्गिक गोष्टींतीलच आहे. चंद्रोदय होणें व त्या काळीं येणें या गोष्टी नैसर्गिक आहेत, त्या मनुष्याच्या हातच्या नाहींत. उद्योगवादी या ठिकाणीं असें तर्कट रचतात कीं पुढें मागें या गोष्टी भौतिक शास्त्रानें मनुष्य आपल्या इच्छाशक्तीनें घडवून आणणार नाहीं कशावरून ! परंतु या ह्मणण्यांत कांहीं जीव नाहीं. मनुष्य जर वाटेल त्यावेळीं चंद्रोदय करूं लागला किंवा वाटेल त्या वेळीं समुद्राला भरती आणूं लागला तर सृष्टिकर्त्याला राजीनामाच देण्याचा प्रसंग येईल. मनुष्यानें कितीही उद्योग केला तरी मनुष्य

तो मनुष्यच त्याला कांहीं परमेश्वर म्हणतां येणार नाहीं. सारांश, ज्या गोष्टीमध्यें नैसर्गिक घडत आहेत त्या मनुष्याच्या ताब्यांत येणें शक्य नाहीं. गर्भ व जन्म या गोष्टी असल्याच आहेत, म्हणून त्या प्रारब्धाधीन आहेत असेंच म्हणणें भाग आहे.

प्रारब्धाधीन गोष्टी टाळतां येणें शक्य नाहींत. परंतु त्या अमुक कालीं घडणार इतकें ज्ञान जर मनुष्याला होईल तर त्याला बरेंच सावध राहतां येईल व त्याच्या योगानें त्याचें बेसावध असतां होणारें इतर नुकसान टाळतां येईल. उदाहरण, रोहिणी लागल्या तेव्हां पाऊस केव्हां पडेल याचा नियम नाहीं, हें ज्ञान मनुष्याला झाल्यामुळें तो आपलें घर शाकारतो, गवतकाडी नीट साठवून ठेवितो, व धान्य पेरतो. त्याच्या योगानें त्याला सुरक्षित राहतां येतें व पर्ज्यन्यकाळीं घरांत बसून खातां येतें. पर्जन्यकाल हा नैसर्गिक आहे, तो मनुष्याच्या हातांत नाहीं. तरी त्याच्या आगमनाचें ज्ञान झाल्यामुळें आपणास किती फायदा होतो, पहा! त्याचप्रमाणें अमुक कालीं गर्भ राहणार अमुक कालीं जन्म होणार व अमुक कालीं मृत्यु होणार या तीनच गोष्टींचें ज्ञान मनुष्याला झाल्यास पुष्कळ फायदा होणार आहे. हें ज्ञान ज्योतिषशास्त्रानें होणारें आहे. फलज्योतिषाची आजची स्थिति जरी कमकुवत असली तरी ती प्रयत्न केल्यास सामर्थ्यवान् करितां येण्यासारखी आहे. गर्भकालीं, जन्मकालीं व मृत्युकालीं गर्भ राहीलच, जन्म होईलच व मृत्यु होईलच असें जरी कळलें नाहीं तरी हरकत नाहीं. पर्जन्यकालाप्रमाणें त्याचें ज्ञान झालें तरी पुरे आहे. कारण, एवढी गोष्ट निश्चित आहे कीं, ज्या कालीं गर्भ राहील तो गर्भकालच असला पाहिजे. किंवा ज्या कालीं जन्म होईल तो जन्मकालच असला पाहिजे. किंवा ज्या कालीं मृत्यु होईल तो मृत्युकालच असला

पाहिजे. असो आज हे विचार सुचण्याचें कारण, एका बाईला ही गर्भार असतां सातव्या महिन्यापासून सूज आलेली होती. ही बाई प्रसूत झाल्यावर १७ व्या दिवशीं मृत्यु पावली. हिच्या प्रसूतिकालच्या ग्रहावरून ती अल्पावधीतच मृत्यु पावण्याचा संभव आहे, हें ज्ञान होण्यासारखें होतें. हें ज्ञान एका ज्योतिषशास्त्रानेंच होईल, दुसऱ्या कोणत्याही शास्त्राची लटपट चालणार नाहीं. हें ज्ञान झाल्यानें तिच्या कुटुंबांतील माणसांस सावध राहतां येईल. व तिच्या आणि तिच्या बालकाच्या संरक्षणाचें शक्य तितके उपाय योजतां येतील. व दुसरेही कित्येक अनर्थ टाळतां येतील. यासाठीं असल्या प्रत्येक उदाहरणाचा आपणास विचार केला पाहिजे.

प्रसूतिकाल.

ता. १५ फेब्रुवारी सन १९१० रात्रीं ९ वाजून ४० मि.

—सायन भावचलित—



१ (मातृस्थानी मकर रास १९ अं. उदित आहे व या राशींत हर्शल २४ व्या अंशांत आहे.

(२) मातृस्थानाचा अधिपति शनि षष्ठ स्थानीं आपल्या नीचांत २० व्या अंशांत आहे.

(३) मातृकारक ग्रह जो चंद्र तो मंगळाशीं युति करीत असून साडेसातींत आहे.

हे तीन योग मातेला अनिष्ट झाले आहेत, ह्मणून या मुलाला मातेचे सुख मिळणें कठीण आहे असें आपणांस सांगतां येईल ता. १४ ला शनि व चंद्र यांची भयंकर युति होती व ता. १५ व्या रात्रीं १२ वाजून ३५ मि. नीं चंद्रमंगळ युति होणार होती. स्वभावतःच या युति मातेला व बालकाला कष्टप्रद आहेत. ह्मणून जर मातेच्या शारीरिक चिन्हावरून ती कालमर्यादेंत प्रसुत होणार इतकें ज्ञान झालें तर त्या दिवशीं त्यांच्या घरच्या माणसांस सावध राहतां येईल व प्रसूतिकाळीं येणाऱ्या अडचणी दूर करण्याची तयारी करितां येईल. मकर राशीचा २४ वा अंश धनाश असून त्या अंशांत हर्शल घातक आहे व मेष राशीचा २० वा अंश वृश्चिकाश असून त्या अंशांत शनि घातक आहे. ह्मणून माता अल्पकाळांत निधन पावली व तिचें निधनही हर्शाच्या गुणानुरूप अकस्मात् झालें!

ता. ३ मार्च्य या दिवशीं सकाळीं वृषभ लग्नीं ह्मणजे मुलाच्या अस्त राशींत किंवा चंद्रमंगळ राशींत तिचे देहावसान झालें! या वेळीं चंद्र आपल्या सप्तमांत ज्येष्ठा नक्षत्रांत वृश्चिक राशीच्या अंत्य भागी होता व मगळ त्याच्या समोर हर्शलच्या अंशा इतक्याच बरोबर अंशांत होता. शनि मेष राशीच्या २१ व्या अंशांत ह्मणजे धनाशांत होता. मगळ वृषभ राशीच्या २४ व्या अंशांत ह्मणजे मघाशांत दुष्ट होता. मूळ अयत देखणें असून हयात आहे. मुलाची आई अंध होती व तिला खोकल्याचा विकार होता

फलज्योतिष हें लोकांच्या उपयोगाचें असो किंवा नसो, पण तें ज्योतिष्याला किती आल्हादकारक व मनोवेधक आहे हें यावरून चागलें ध्यानांत येईल.

पत्रव्यवहार

(१)

प्रसूति आणि मातृनिधन.

ता. १४ मांहे अक्टोबर सन १९०९ रात्रीं ९ वाजतां मुं. टा.



कुंडलींत खालीलयोग दृष्टीस पडतात.

(१) लग्न, शनि व मंगळ यांचे पूर्ण दृष्टींत.

(२) लग्नस्वामी व चंद्र शनि मंगळ यांचे पूर्ण दृष्टींत.

(३) लग्नस्वामी अस्तंगत व वक्री.

(४) अष्टमांत हर्शल.

लग्न, चंद्र, लग्नस्वामी हे तिन्ही शनि व मंगळ यांचे पूर्ण दृष्टींत असतां ही बाई प्रसूत झाली. वरील दाखविलेल्या कुंडलींतील स्थितीवरून जन्मणारा किती जगेल याची वाचकांस कल्पना होईल. लग्नस्वामी अस्तंगत वक्री असून तो शनि व मंगळ यांचे पूर्ण दृष्टींत असून चंद्रही तसाच आहे यावरून मूल फार वेळ जगणार नाहीं असें दिसेल.

मातृसुखाचा विचार केल्यास मातृस्वामी बुधच असून तोही शनि, मंगळ याचे पूर्ण दृष्टीत असून वक्री व अस्तंगत आहे. व त्याचा हर्शलशीं पूर्ण केंद्रयोग झाला आहे. यावरून या मुलास मातृसुख मुळींच मिळणार नाहीं असें दिसतें. खरी वस्तुस्थितीही अशीच आहे. मूल जन्मतांच निवर्तलें व माता पुढें २४ तासांचे आंत वारली. * आपला, ज्योतिषविद्यार्थी.

जन्म होतांच अगर पूर्वी मृत्यु येणें ही गोष्ट हर्शलावर विशेष अवलंबून आहे. कारण, त्यांत अकस्मात्पणा हा गुण मुख्य असतो वरील कुंडलींत अष्टमांत हर्शल आहे, त्यामुळें हें मूल अकस्मात् चवदावी तारीख उजाडण्याच्या सुमारासच लग्नेश जो बुध तो हर्शलशीं केंद्रयोग करीत होता व त्यानंतर थोड्याच तासांनीं चंद्र सुद्धां हर्शलशीं केंद्रयोग करीत होता, अशा समयीं प्रसूतिकाल येणें चांगलें नाहीं. हें यावरून सिद्ध आहे.

चक्रस्य पूर्वापरभागगेषु क्रूरेषु सौम्येषु च कीटलग्ने ॥
क्षिप्रं विनाशं समुपैति जातः पापै र्विलग्नास्तमयाभितश्च ॥

दशमभावारंभापासून तृतीयभावांतापर्यंत जो कुंडलीचा भाग त्यास पूर्वार्ध व चतुर्थभावारंभापासून नवमभावांतापर्यंत जो भाग त्यास अपरार्ध असें ह्मणतात. पूर्वार्धांत पाप ग्रह व अपरार्धांत शुभ ग्रह असून कीटलग्न असेल तर तत्काल मृत्यु येतो, त्याच प्रमाणें जर लग्न व सप्तम यांच्या समीप सर्व पाप ग्रह असतील तर तें मूल तत्काल मरण पावतें असें ग्रंथकार सांगतात. वरील कुंडलींत मंगळ, शनि, राहू व नेपच्यून असे चार पाप ग्रह पूर्वार्धांत उदित आहेत व सर्व शुभ ग्रह अपरार्धांत उदित आहेत, ह्मणून हें मूल तत्काल मरण पावलें. या ठिकाणीं कीटलग्न मात्र नाहीं, तरी अनुभव आला आहे.

या कुंडलींत आणखी एक चमत्कारिक योग झाला आहे तो असा-रवीच्या चतुर्थांत हर्शल, हर्शलच्या चतुर्थांत शनि, व शनीच्या चतुर्थांत नेपच्यून हा या चार पापग्रहांचा चौकड्यासारखा केंद्रयोग झाला आहे! हा योग माता, मूल व बाप या सर्वांना दुःखसागरांत लोटणारा नव्हे काय?

चंद्राचतुर्थगः पापो रिपुक्षेत्रे यदा भवेत् ॥
तदा मातृवधं कुर्यात्केंद्रे यदि शुभा न चेत् ॥

चंद्राच्या चतुर्थस्थानीं पाप ग्रह जर शत्रूच्या घरचा असेल व केंद्रांत कोणी शुभ ग्रह नसतील तर त्या मुलाची आई क्षणमात्र जगणे शक्य नाहीं. वरील कुंडलींत असाच योग आहे, ह्मणून चोवीस तासांत आई मरण पावली!

शास्त्राचा अनुभव घेणारांनीं या गोष्टी सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन कराव्या अशी विनंति आहे.

---

(२)

रा. रा. संपादक कुंडलीविज्ञान यांस.

खालील मजकूरास येत्या अंकीं स्थळ मिळेल अशी आशा आहे.

चालू वर्षाचे मार्गील एका अंकीं खालील कुंडली प्रसिद्ध करून कळविलें होतें कीं या गृहस्थाच्या दोन स्त्रिया वारल्या व दोन हयात आहेत परंतु त्या नित्य दुखगाईत असतात. कळविण्यास खेद वाटतो कीं ह्या दोन्हीं स्त्रियानुक्त्याच परस्पर दोन महिन्याचे अंतरानें वारल्या. या दोन स्त्रियांच्या कुंडल्या खालीं क्रमानुसार दिल्या आहेत. यापैकीं एकीचा मुलगा सात महिन्याचा होऊन तिचे मरणानंतर तीन आठवड्यांनीं वारला व दुसरीला एक मुलगी असून ती कायम आहे.

पुरुष कुंडली.



तृतिय स्त्री (स्त्री कुंडली सायन) चतुर्थ स्त्री



मृत्यु ता. ६-५-१९१० शुक्रवारीं ३
वाजतां दिवसा क्षयानें
जन्म ४-१२-१८८८
सकाळीं ६ वाजतां बुधवार.



मृत्यु ता. २५-३-१० शुक्र फा. शु.
१५ रावीं ९ ३५ मि.ज्वरानें.
जन्म ३०-९-९१
बुधवार ८॥ वाजतां रात्रीं

तिघांच्या कुंडलींत मिथुन लग्न उदय पावत आहे. या दोन्ही स्त्रियांचा जन्म बुधवारीं झाला व मृत्यु शुक्रवारीं झाला.

स्त्रियांच्या कुंडलींत अल्पायुयोग स्पष्ट आहे. कारण एकीचा चंद्र अष्टमांत शनीचे घरीं असून शनि चंद्राचा षडाष्टक योग झालेला आहे व गुरु अस्तंगत आहे व दुसरीचा चंद्र शनी मंगळांनीं दूषित असून लग्नावर शुभ ग्रहाची दृष्टी नाहीं मात्र शनी हा पूर्ण दृष्टीनें पाहत आहे. परंतु या दोहींचा मृत्यु एकाच वर्षीं कां व्हावा तें कळत नाहीं. या गृहस्थास लग्ना पासून व चंद्रापासून यासालीं ९ वा गुरू आला आहे त्यांत दोन स्त्रियांचा व मुलाचा असे ३ मृत्यु एकदम कसे व्हावे याचा नीटसा खुलासा आपण अथवा आपले वाचक वर्गांनीं कळविल्यास फार मेहरबानी होईल कळावें.

आपला, एक वर्गणीदार.

कुंडलीविज्ञान

पितृनिधन.

नं. १ (सायन)
शके १८१६ फाल्गुन शु.१४ रात्रीं ४क.२०मि.
ता. १०।११ मार्च १८९५



ल.	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.	ने.
१०	११	५	२	७	२	७	११	७	३	२
१४	२०	१७	५	२	७	०	२	६	१४	६
३	७	१०	५	४	३	०	८	९	८	३

नं. २ (सायन)
शके १८२१ चैत्र कृष्ण ४ रात्रीं १२ वा.
ता. २९ एप्रिल १८९९



ल.	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.	ने.
११	१२	९	४	०	७	०	८	९	८	३
१६	२३	१२	१२	१०	२१	८	५	१५	१३	
४	४	३	४	३	०	३	९	६	५	२

नं. ३ (सायन)
शके १८३० ज्ये शु. ११ सकाळीं १० वा.
ता. १० जून १९०८ अ. १५।२९



ल.	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.	ने.
२०	१७	२३	१२	१२	१०	२१	८	५	१५	१३
६	५	१८	४	४	३	६	५	३	२	३
३२	४५	५७	३२	४५	५७	३२	४५	५७	३२	

या तीन कुंडल्या तीन भावांच्या आहेत. यांवरून त्यांच्या बापाचा मृत्यु ज्या काळीं झाला तो काल कसा येतो हें पहावयाचें आहे.

सर्वांत लहान भावाची कुंडली पहा. या कुंडलींत पितृस्थान जें नवम त्यांत मेष राशीचा शनी आहे. साधारण नियम असा आहे कीं नवमांत जर जन्मकाळीं शनि अनिष्ट असेल तर तो बापाला फार दिवस जिवंत ठेवित नाहीं. दशमाधिपति शुक्र हा कर्क राशींत बाराव्या स्थानांत शत्रुगृहीं आहे, म्हणून दुर्बल आहे. दशमाधिपति दुर्बल झाला कीं, पितृसुखही दुर्बलच व्हावयाचें. या दशमाधिपतीच्या दशमांत शनि अनिष्ट आहे. म्हणजे पितृसुख कमी मिळण्यास तीन योग कारण झाले हे वाचकांच्या ध्यानांत येईल. १ ला—नवमांत शनि. २ रा—दशमाधिपति दुर्बल. ३ रा—दशमाधिपतीच्या दशमांत शनि. असे तीन योग अनिष्ट झाल्यामुळें या मुलास पितृसुख कमी दिवस मिळेल असें ज्योतिषी सांगूं शकेल.

आतां, सर्वांत वडील भावाची कुंडली पहा. हींत दशम स्थानामध्यें शनि व हर्शल हे दोन ग्रह मंगळाच्या घरीं असल्यामुळें अनिष्ट आहेत. दशमाधिपति जो मंगळ तो मिथुन राशींत असून त्याच्या दशमांत रवि व राहू हे पाप ग्रह आहेत. आणि तिसरा अनिष्ट योग असा आहे कीं, पितृसुखाचा कारक ग्रह जो रवि त्याच्या नवमांत शनि आणि हर्शल हे दोन पाप ग्रह आहेत, या प्रमाणें याही कुंडलींत तीन अनिष्ट योग झाले आहेत, म्हणून या मुलासही पितृसुख फार दिवस मिळणें अशक्य आहे असें दिसून येतें.

मधल्या भावंडाचा जन्म साडेसातींच झाला आहे. जन्मतः

साडेसाती स्वतःस किंवा बापाला अनिष्ट होते असा साधारण नियम आहे. शिवाय दशमाचा अधिपति जो शुक्र तो स्वगृहसंमुख राशींत असल्यामुळें स्वभावतःच दुर्बल आहे व त्याच्या नवमांत साडेसातीतील शनि हा हर्शलसह आहे. यावरून याही मुलास पितृसुखाला चांगलासा योग झालेला नाहीं.

या प्रमाणें आपण तीनही भावंडांच्या कुंडल्या पाहिल्या त्या सर्वांत पितृसुखाला योग चांगले झालेले नाहींत असें दिसून आलें. या मुलांचा बाप मेष राशीवर शनि हा मंगळासह असतां सन १९०९ मध्यें मृत्यु पावला आहे.

या तीनही भावंडांचा दशमाधिपति शुक्रच आहे व तो पहिल्या दोघांच्या कुंडलींत मेष राशीवर आहे. या राशीवर शनि गेल्यावर पितृनिधन झालें. तिसऱ्या मुलाच्या शुक्राच्या दशमांत शनि असतां पितृनिधन झालें. सारांश, तिघांचाही शुक्र हा दशमाधिपति, एकाच वेळीं शनीनें दूषित झाला.

पितृनिधनाचा काल ठरवितांना प्रथम सर्व भावंडाच्या कुंडल्या पुढें धराव्या व नंतर प्रत्येकीवरून त्याचा कसा बोध होतो हें पहावें. वडील व कनिष्ठ या भावंडांच्या कुंडल्या विशेष महत्वाच्या असतात. आरंभीं पितृसुख कमी दिवस मिळेल कीं जास्त दिवस हें ठरविलें पाहिजे. नवम व दशम हीं स्थानें पाप ग्रहांनीं दूषित झालीं असल्यास व त्याच ठिकाणीं जन्मकाळीं साडेसाती असल्यास अथवा रवि, अगर चंद्र यांच्याशीं शनि अगर हर्शल यांचा केंद्रयोग झाला असल्यास बापाचा मृत्यु अल्पकाळांत होणार असें समजावें. नवम व दशम हीं स्थानें रवि, चंद्र व दशमाधिपति

यांपासून पहावीं. या ठिकाणीं कोणत्याहि भावंडांची कुंडली पाहिल्यास बापाचें सुख फार दिवस मिळूं नये. असेंच दर्शविते.

याप्रमाणें बापाच्या सुखाचा साधारण अजमास झाला म्हणजे मग निश्चित वर्ष सिद्ध करावें. पितृनिधनकालीं कसे ग्रह येतात या बद्दल पूर्वी कुंडलीविज्ञानांत नियम दिलेले आहेत त्यावरून नेमका निधनकाल सांगतां येईल.

ज्यांना पितृसुखाचा ढोबळ काळ समजत नसेल किंवा एकाच्याच कुंडलीवरून पितृनिधनकाल ठरवावयाचा असेल त्यांनीं फक्त जे निधनकाल संभवतात ते सर्व सांगावे व यांपैकीं एखाद्या कालीं पितृनिधन होईल असें सांगावें.

अंत केव्हां होणार हें कळेल तर शहाणा मनुष्य सावध राहतो. पण कोंवळ्या मनाची माणसें झुरणीस लागतात. यासाठीं अंतकाल कोणाला एका एकीं सांगूं नये. ज्योतिःशास्त्र जरी नियमबद्ध आहे तरी अनुमानावरच सर्वदा जोर द्यावा लागतो. अनुमान बरोबर झालें तर भविष्य उतरतें, नाहींपेक्षां तो व्यर्थ खटाटोप होतो, व उगीच एखाद्याला दुःख उत्पन्न केल्यासारखें होतें, यासाठीं मनुष्याच्या मनाची पूर्ण परिक्षा करून अंतकाल सांगत जावे.

तारकाफल

[रा० यशवंत केशव प्रधान यांजकडून]

आकाशांत असलेल्या असंख्य ताऱ्यांपैकीं क्रांतिवृत्ताचे १६ अंशाचे पट्ट्यांत असलेल्या कांहीं स्थिर ताऱ्यांचा मनुष्यांवर व शहरांवर परिणाम होतो असें पूर्व आचार्यांचें मत आहे. त्यासाठीं कुंडलीविज्ञानचे वाचकांठीं या विषयाचें विवेचन करण्याचें योजिलें आहे. पुढील माहिती पाश्चात्य ग्रंथाधारें लिहिलेली आहे. प्रस्तुत लेखकास आर्य ग्रंथांत तारकांविषयीं माहिती आढळली नाहीं, त्यामुळें सर्व आधार पाश्चात्य ग्रंथांचा घ्यावा लागला. विज्ञानाचे वाचकवर्गापैकीं कोणास आर्य ग्रंथांत तारांविषयीं माहिती असेल तर ते कृपा करून प्रसिद्ध करितील अशी आशा आहे. आर्य लोकांस ताऱ्यांचे गतीविषयीं फारच उत्तम माहिती होती असें त्यांच्या ग्रंथांवरून दिसतें. पुढें दिलेली ताऱ्यांची स्पष्ट स्थिति इ० स० १८३४ या सालांतील आहे. त्यांस कुंडलींत उपयोगांत आणण्याचे पूर्वी ज्या सालांतील कुंडली असेल त्या सालाचे ते सारे स्पष्ट करून उपयोगांत आणावे. स्थिर ताऱ्यांची गती सरासरी ५० विकला दर वर्षास वाढत असते. व ७२ वर्षांत ते एक अंश पुढें जातात आणि एका राशींतून दुसऱ्या राशींत जाण्यास २१६० वर्षें लागतात. या स्थिर ताऱ्यांचा परिणाम माणसांचे दैवावर होतो त्या पेक्षां राष्ट्रांवर व शहरांवर विशेष होतो. म्हणूनच जेव्हां एखादा स्थिर तारा एका राशींतून दुसऱ्या राशींत जातो त्या वेळेस राज्यक्रांत्या व मोठमोठ्या उलाढाल्या होतात.

यांच्या प्रकाशकिरणांवरून ज्योतिषी लोकांनीं प्रती कल्पिल्या

आहेत. फलज्योतिषांत त्याच प्रमाणें विचार करितात. कुंडलींत खालीं दिलेल्या तारांपेकीं जे तारे लग्नाचे, दशमाचे उदित अंशांचे ३।४ अंश फरकांत असतात ते फार महत्वाचे असतात. त्याच प्रमाणें जेव्हां कोणताही ग्रह या ताऱ्यांशीं युक्त अथवा थोड्या फरकांत असतो, तेवढेच तारे कुंडलींत मांडतात. ग्रहांप्रमाणें यांचे दृष्टियोगांचा विचार करीत नाहींत. जास्त विचार करणें असल्यास प्रत्येक भावारंभाचे उदित अंशांत जेवढे तारे असतील त्यांचा विचार करावा.

या लेखांत ताऱ्यांचीं नांवें इंग्रजी आहेत, कांहीं ठिकाणीं अर्थान्वयें दुसरीं नांवें योजिलीं आहेत

ठळक तारे व त्यांचीं फलें.

ताऱ्याचें नांव.	सायन राशि	अंश	प्रत	धर्म	स्थिर ताऱ्याचा बराबाईट परिणाम
मच्छपुच्छांतील दक्षीण टोकांतील तारा	मेष	१–४	२	शनि.	अशुभ, हानिदायक.
× अन्ड्रोमाडचे डोक्यांतील	,,	१२–०	२	गु.शु.	संपत्ती मानसन्मानदायक.
मच्छ पृष्ठांतील	,,	१५–३७	४	शनि	अशुभ, पडणें जखमहोणें इत्यादि.
मिराश	,,	२८–१	२	शुक्र	कीर्ती व लग्नापासून सुख.
मेषशृंगांतील	वृषभ	५–१४	२	श.मं.	भीतीदायक, अशुभ. जखमाहोणें इत्यादि दर्शवितो.
अलमाश	,,	११–४६	२	शुक्र	मान, कीर्ति, मोठ्याघराण्यांतील स्त्रियांची मैत्री, कृपा.

ठळक तारे व त्यांचीं फलें.

ताऱ्यांचे नांव.	सायन राशि.	अंश.	प्रत.	धर्म.	स्थिर ताऱ्यांचा बराबाईट परिणाम.
ऱ्हेलसर्जो मेनकर	वृषभ	११-५३	२	शनि	आजारीपणा, अपकीर्ती, उतरतीकळा, मोठ्या जनावरापासून भीती.
क्यापूट अलगोल	,,	२३-४६	२	श. गु.	ह्या ताऱ्याइतका भयंकर नाश करणारा अशुभ दुसरा तारा नाहीं.
प्लेइस	,,	२६-४८	५	मं. चं.	चांगला भाग्योदयकारक, परंतु डोळ्यास इजा किंवा आंधळेपणा येण्याचा संभव असतो
वृषभेतील अक्युलस्	मिथून	१- ४	३	शुक्र	शुभ
एल्डरबारन	,,	७-२४	१	मंगळ	संपत्ति, सार्वजनीक मानसन्मान, मिलिटरीखाल्यांत प्रसिद्धी
ओरायन मधील रीगल ओरायन मधील बेला	,,	१४-२४	१	गु. श.	मान सन्मान कीर्ति

ν ट्रिक्स.	मिथुन	१८-३२	२	मं. बु.	मिलिटरी खात्यांत किंवा सरकारदरबारांत मान सपत्ति
* ओरायन मधील कॅपेला.	,,	१९-२६	२	मं. बु.	मान, कीर्ति, सार्वजनिक मान, संपत्ति, मोठ-
	१८८८	२७-१०			मोठाल्या लोकाशी मैत्री.
वृषभ दक्षिण शृंगांतील तारा.	,,	२०-१०	२	मंगळ	संपत्ति, नांवलौकिक.
ओरायनचे कमरपट्यांतील तारा.	,,	२१-५०	२	गु. मं.	चांगला भाग्योदय, नशीब.
ओरायनचे मस्तकांतील तारा.	,,	२१-२६	४	गु. श.	अशुभ.
वृषभ शृंगांतील झीटा तारा.	,,	२२-२३	३	मंगळ	अशुभ, फारनष्ट.
ओरायनचे कमरपट्यांतील २रा तारा.	,,	२२-५४	२	गु. मं.	सार्वजनिक मानसन्मान.
ओरायनचे स्कंधांतील बेटल् ग्यू- एझ.	,,	२६-२०	१	मं. बु.	मिलिटरी खात्यांत मान, कीर्ति, संपत्ती.
धापस.	,,	२८-३०	४	मंगळ	आयुष्यभर भरभराट.
आरीगाचे दक्षिण स्कंदांतील ता.	,,	२९-३०	२	मं. शु.	अति सार्वजनिक मान, कीर्ति, खटपटी, उद्योगी.
मिथुनाचे उजव्यापायांतील तारा	कर्क	६-३९	२	बु. शु.	सुजनता, प्रख्यात.
सिरीयस	,,	११-४१	१	गु. मं.	कीर्ति, नांवलौकिक, संपत्तीवान्.
क्यास्टर	,,	१७-४१	१	मं. शु. श.	हा तारा फार अनिष्टकारक आहे, व अपघात फार होतात.

पोलस्क	कर्क	२०-५२	१	मंगळ	मान, कीर्ति.
प्रोसीयान.	कर्क	२३-०	१	मं. बु.	संपत्ति, कीर्ति.
प्रोसेप.	सिंह	४-५४	१	मं. चं.	नाश प्रवृत्तक, अंधत्व येण्याची भिती असते.
उत्तर आसेलस.	,,	४-३८	४	मं. सू.	हे तारे अग्निमय स्वभावाचे आहेत व त्यामुळें
दक्षिण आसेलस	,,	६-१९	४	मं. सू.	अग्नीपासून अपघात होण्याची भीती असते. नावलौकिक, प्रख्याती दर्शवितात.
हायड्राचे हृदयांतील तारा.	,,	१९-३६	२	श. शु.	बायकापासून त्रास, वाईट नशीब.
रेग्युलस.	,,	२७-२६	१	मंगळ	कीर्ति, संपत्ति, मानसन्मान, लौकिक.
व्हीन्डेमीया ट्रिक्स.	कन्या	७-३१	३	श. शु. बु	खोडकर, ताप, भाग्योदय न होणें.
डोर्साले आनिस.	,,	८-४९	२	श. शु	अशुभ, मनाला शांतता मिळत नाहीं, दुःखी, अथवा विषारी तापाची बाधा होणें.
डेनेब्र.	,,	८-४९	२	श. शु बु.	अशुभ, बेअब्रू, लोकांत मानहानी होणें.
क्रेटर.	,,	२१-६	४	शु. बु	शुभ, प्रख्याती.
आरकटूक्स.	तूळ	२१-४९	१	गु. मं.	संपत्ति मानसन्मान.
कन्येचे हातांतील धान्याचे लोंबींतील तारा.	,,	२१-२६	१	शु. मं.	संपत्ति, प्रख्याती, मान.

तूळेच्या दक्षिण तागड्यां-तील तारा.	वृश्चिक	१२-२१	२	श. शु.	अशुभ, विष प्रयोगाची भीति.
तूळेच्या उत्तर तागड्यांतील तारा	,,	१६-४७	२	गु. मं.	अति भाग्यवान्.
ओर्फाक्युअसचे हातांतील तारा.	,,	१९-५४	३	मं. श.	अशुभ.
फ्रान्सस्कारपीयो.	धन	०-४७	२	श. शु.	अशुभ.
ओर्फाक्युअसचे गुढघ्यांतील तारा.	,,	६-४८	३	मं. गु.	प्रख्यातीदायक, परंतु नाश कारक.
आनटारेस	,,	७-२२	१	बु. मं.	खटपटी, उलाढाली करणारा नांवलौकिकवान्.
इगल	मकर	२९-२०	२	श. बु.	खळाळ, किड्यापासून भीति.
मकर पूच्छांतील तारा.	कुंभ	२१-८	३	शनि	अशुभ, जनावरापासून भीति.
फोमाहट.	मीन	१-२५	१	बु. शु.	नांवलौकिक, अधिकारयुक्त.
मारकेब.	,,	२१-४	२	मं. शु.	अपघातानें होणाऱ्या जखमाची त्याच प्रमाणें अग्नीची भीति.
स्कीटपेगासी	,,	२६-२१	२	शनि	जलापासून भीति.

वरील स्पष्ट स्थिति सन १८३४ मधील आहे. १९०९ मध्यें त्यांची गति १९०८–१८३४=७४×५० वि.=१ अं. १ क. ४० वि. नीं. वाढली आहे. हें अंतर प्रत्येक ताऱ्यांत मिळविलें असतां जानेवारी १९०९ ची त्यांची स्पष्ट स्थिति येईल.

वरील विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं पूर्व आचार्यांनीं कांहीं विशिष्ट तारे मिळून त्यांचे पुंज कल्पिले होते. त्यांत बारा राशींचे बारा नक्षत्रपुंजही आहेत. नक्षत्रपुंजानुरोधानें कल्पिलेल्या राशींची मर्यादा ३० अंश असूं शकणार नाहीं. परंतु पूर्वीपासून गणितांत क्रांतिवृत्ताचे समान १२ भाग कल्पिलेले असून त्या प्रत्येक ३० अं. चे भागास रास असें झटलें आहे. वर्तुळाचा आरंभ अमुकच ठिकाणापासून केला पाहिजे असें कधीं कोणी सांगणार नाहीं. परंतु सोईकरितां वसंतसंपातापासून आरंभ करावा असें पूर्व आचार्यांचें मत आहे. कारण, वसंतसंपात हें मुख आहे व येथूनच पृथ्वीचा आरंभ झाला. ॐकारांतील प्रथम अक्षर जें अ व नक्षत्रांतील प्रथम नक्षत्र जें अश्विनी त्या सर्वांचा आरंभ वसंतसंपातापासून होतो

खालीं दिलेल्या माहितीवरून वाचकांस कुंडलींत स्थिर ताऱ्यांचा कसा उपयोग करावा हें सहज कळेल.

अपघातानें किंवा चमत्कारिक तऱ्हेनें मृत्यु कोणास येतात ?

या गोष्टीचें विवेचन करण्यापूर्वी पाश्चात्य ग्रंथकार ज्यास **दायलीज–आयुष्यदायक–कारक**–ह्मणतात त्याचा विचार करूं सर्वसाधारण झटलें असतां पुरुषाचे कुंडलींत रवीचा व स्त्रियांचे कुंडलींत चंद्राचा अंमल जास्त असतो असें बारकाईनें निरीक्षण

करणाराचे तेव्हांच ध्यानांत येईल. पुरुषाचे कुंडलींत रवि बिघडला असल्याशिवाय मृत्यु आला असें क्वचित्च आढळेल. त्याचप्रमाणें स्त्रियांचे कुंडलींत चंद्र बिघडला असल्याशिवाय त्यांचा मृत्यु होणें शक्य दिसत नाहीं. लग्नाचा–पूर्व क्षितिजावर उदित असलेल्या अंशाचा–व शरीराचा अति निकट संबंध आहे, हेंही पण सहज अनुभवास येण्यासारखें आहे. लग्न, लग्नाधिपति, रवि व चंद्र हे बिघडले नसतां आजारीपणा येणें शक्य नाहीं. यावरून या तिहींपैकीं कोणी तरी आयुष्यदायक असलें पाहिजे.

रवि हा आयुष्यदायक स्थानीं असेल तर तोच आयुष्यदायक समजला पाहिजे. परंतु रवि जर तसा नसून चंद्र आयुष्यदायक स्थानीं असेल तर तोच आयुष्यदायक होईल. जेव्हां रवि व चंद्र या दोहोंपैकीं कोणीही आयुष्यदायक स्थानीं नसेल तेव्हां लग्न हें आयुष्यकारक समजलें पाहिजे. आतां आपण आयुष्यकारक स्थानें कोणतीं याचा विचार करूं. लग्नाच्या उदित अंशाचे पूर्वीचे ५ अंशांपासून ते २५ अं. पर्यंत, त्याचप्रमाणें त्याचे समोरील सप्तम स्थानचे भावारंभाचे उदित अंशांचे पूर्वीचे ९ अं. पासून २९ अं. पर्यंत, नवम स्थानाचे भावारंभाचे उदित अंशांचे पूर्वीचे ५ अं. पासून ते एकादश स्थानाचे मध्यापर्यंत हीं सर्व आयुष्यकारक स्थानें जाणावीं. ह्मणून जेव्हां सूर्य अथवा चंद्र हे अष्टम, द्वादश अथवा एकादश स्थानाच्या दुसऱ्या अर्धांत असतात अथवा जेव्हां ते अनुदित गोलार्धांत असतात त्या वेळेस लग्न हेंच आयुष्यकारक असतें. चंद्र हा आयुष्यकारक असो अथवा नसो, त्याचा शरीरप्रकृतीशीं जास्त संबंध आहे. पुरुषाचे कुंडलींत रवीचा व स्त्रीचे कुंडलींत चंद्राचा जास्त विचार करावा मुलें चार वर्षांचे वयाचीं होईपर्यंत त्यांचेवर चंद्राचा जास्त अंमल असतो.

आतां आपण अपघातानें किंवा चमत्कारिक तऱ्हेनें येणाऱ्या मृत्यूकडे वळूं, जेव्हां कुंडलींत सूर्य अथवा चंद्र हे शनि, मंगळ अथवा हर्शल यांचेशीं युति, चतुर्थदशम दृष्टि यांनीं पीडीत असतात व त्याच वेळेस आयुष्यकारकही पापग्रहानें पीडित असतें त्या वेळीं अपघात होण्याचा जास्त संभव असतो. कांहीं विशिष्ट राशि अपघातप्रवृत्तक असतात. आकस्मिक मृत्यु देणाऱ्या राशि–मेष, वृश्चिक, मकर, कुंभ. स्थिर तारांपैकीं खालील तारे आकस्मिक मृत्यु देतात. कॅपूट् अलगोल वृषभ २३–६ वृषभेंतील आक्युलस मिथुन ६–४ पोलक्स कर्क २०–५२ ओरायन दक्षिण स्कंदांतील तारा मिथुन २६–२० कार स्कारपीयो धनु ७–२२ व पेगासी मीन २६–२२ हे होत.

सूर्य आयुष्यकारक असून शनि त्या बरोबर युति, पूर्ण दृष्टि, वर्तुलपाद अथवा ९० अंश दृष्टि स्थिर राशींतून करीत असेल तर गुदमरून, फांशी जाऊन अथवा चेंगरून मरण प्राप्त होण्याचा संभव असतो. जर शनी हा सूर्य अथवा चंद्र यांबरोबर वर सांगितल्याप्रमाणें पशुराशींतून दृष्टियोग करीत असेल तर जनावरांपासून मृत्यु येण्याचा संभव असतो. शुक्र हा शनीकडून पीडित असेल व त्याच वेळेस शनि हा जर चंद्र व सूर्य यास पीडीत असेल तर स्त्रियांचे हातून किंवा विषप्रयोगानें मृत्यु होतो. जलराशींतून जर दृष्टियोग होत असेल तर बुडून मृत्यु येतो. टालमी आणखी असें ह्मणतो कीं, जर दृष्टियोग अरगो नक्षत्रपुंजांतून होत असेल तर बुडून मृत्यु येतो

शनि हा सूर्य, चंद्र अथवा आयुष्यदायक यांस चर राशींतून पाप दृष्टीनें (९०अं. १८०अं.) पाहात असेल तर राशीचे मूळ

धर्माप्रमाणें पडून, बुडून, गलबत फुटून, विषानें किंवा जुनें घर अंगावर कोसळल्यामुळें मृत्यु येतो.

शनि हा सूर्यास स्थिर राशींतून वाईट दृष्टियोग करीत असेल व त्या वेळेस तो जर पूर्व षट्कांत असेल [सूर्य व चंद्र हे जेव्हां लग्नापासून ते दशमापर्यंत व सप्तमापासून ते चतुर्थापर्यंत असतात तेव्हां ते पूर्व षट्कांत आहेत असें ह्मणतात. आणि जेव्हां ते दशमापासून सप्तमापर्यंत व चतुर्थापासून लग्नापर्यंत असतात तेव्हां ते पश्चिम षट्कांत आहेत असें ह्मणतात.] तर गुदमरल्यानें किंवा फांशी जाऊन मृत्यु येतो. व पश्चिम षट्कांत असून चंद्रास पीडा करीत असेल तर वर सांगितल्याप्रमाणेंच परिणाम घडतो.

आतां आपण राशि व स्थानें कशा प्रकारचे मृत्यु घडवितात याकडे वळूं.

अग्निराशि.—मेष, सिंह व धनु. ह्या अग्नि, वीज, बांब वगैरे स्फोटक पदार्थ, बंदुकीची गोळी यांपासून मृत्यु आणतात.

वायुराशि.—मिथून, तूळ व कुंभ. हे उंचावरून पडून किंवा फांशी जाण्यानें मरण देतात.

जलराशि.—कर्क, वृश्चिक व मीन. हे बुडून किंवा अतिशय सरदीचे विकार होऊन मृत्यु आणतात.

पृथ्वीराशि.—वृषभ, कन्या व मकर. हे पडण्यानें किंवा गुदमरण्यानें मृत्यु देतात.

मनुष्यराशि.—मिथुन, तूळ व कुंभ. या नैसर्गिक रीतीनें येणारा मृत्यु दर्शवितात. परंतु जर ह्या राशींत रवि अगर चंद्र पीडित असतील तर भयंकर रीतीनें मृत्यु होण्याचा संभव असतो.

कुंडलींतील कांहीं विशिष्ट स्थानांचा व मरणाचा संबंध आढळतो. ह्मणून आपण त्यांचा विचर करूं.

दशम स्थानी बहुशः (जेव्हां अपघातानें किंवा भयंकर रीतीनें मृत्यु येण्याचा संभव तेव्हां) म्याजिस्ट्रेटाच्या हुकुमानें मृत्यु येतो.

द्वादश स्थानीं खाजगी मारेकऱ्याकडून, घोड्याची टाप लागून किंवा घोड्यावरून पडल्यामुळें किंवा मोठ्या पशूकडून मृत्यु येतो. पुष्कळ ठिकाणीं अयुष्यभर कारागृहवास घडलेला आढळतो.

षष्ठ स्थानीं चाकराकडून किंवा शेजाऱ्याकडून.

वर लिहिलेल्या शनीच्या होणाऱ्या दृष्टियोगांत मंगळ पापदृष्टीनें मदत करील तर परिणाम फार भयंकर घडतात. परंतु मंगळाचा मुख्य धर्म झटला असतां अपघात करणें किंवा एकदम मृत्यु आणणें हा होय. त्यामुळें जळणें, घोड्याची लाथ लागून मृत्यु येणें, झाडावरून पडून मृत्यु येणें इत्यादि गोष्टी घडतील.

जर मंगळ हा आयुष्यकारक सूर्यासीं युति ९० अंश किंवा पूर्ण दृष्टि स्थिर राशींतून करील तर खून होण्याची अथवा आत्महत्या करण्याची भीति असते. जर मंगळ शुक्रयुक्त असेल किंवा वाईट दृष्टियोगानें मदत करीत असेल तर स्त्रियांचे हातून मृत्यु येण्याचा संभव असतो. जर बुधयुक्त असेल किंवा बुध वाईट दृष्टियोगानें मदत करील तर चोरापासून मृत्यु येण्याचा संभव असतो. जर सिंह, वृश्चिक, मीन अथवा क्याप्रूट अलगोल या ताऱ्याजवळून दृष्टियोग होत असेल तर तो मनुष्य फांशीं जातो. जर दशम, चतुर्थ अथवा शेफेस या ताऱ्याजवळ अन्ड्रो माडामध्यें दृष्टियोग होत असेल तर मनुष्य फांशीं जातो. परंतु सप्तमांतून दृ०यो० होत असेल तर अग्नीनें जळून मृत्यु होण्याचा संभव असतो. जर पशुराशींतून दृ०यो० होत असेल तर पडण्यानें अथवा चतुष्पाद जनावरांपासून अथवा हाडें मोडल्यानें मृत्यूचा संभव असतो. मंगळ, शनि व हर्शल हे सर्व वर सांगित-

ल्याप्रमाणें दृष्टियोग करीत असतील तर त्यांचा परिणाम किती भयंकर होत असला पाहिजे याची वाचकांनींच कल्पना करावी.

सूर्य आयुष्यकारक असून तो क्यापूट अलगोल, हरक्युलस, बेलट्रीक्स, रेग्यूलस, अन्टोरस या ताऱ्यांशीं युक्त असेल तर भयंकर रीतीनें मृत्यु येतो किंवा अति आजारीपणा प्राप्त होतो. जर तो प्लेडस, क्यास्टर, पोलक्स, प्रोसेप अथवा असेलीस यांनीं युक्त असेल तर शास्त्रघात, जखमा, बंदुकीची गोळी लागून, फांशीं अथवा गलबत फुटून मृत्यु येतो.

जर सूर्य अथवा चंद्र ईगल व फोहमाट ह्या तेजस्वी ताऱ्याशीं किंवा मकरपृष्ठांतील ताऱ्याशीं युक्त असेल तर किडे चावून अथवा कोणता तरी विषारी प्राणी चावून मृत्यु येण्याचा संभव असतो. जर सूर्य प्लेड ताऱ्याशीं युक्त असेल तर अंधत्व येण्याचा संभव असतो.

चंद्र क्यापूट अलगोल, पोलक्स अथवा बेलाट्रीक्स या ताऱ्याशीं युक्त असेल तर भयंकर रीतीनें मृत्यु येण्याचा संभव असतो. चंद्र हा प्लेड्स, प्रोसेप, अनटारेस अथवा डेनेब या ताऱ्यांशीं युक्त असेल तर अंधत्व येण्याचा संभव असतो. अथवा जर चंद्र ओरायन केंटासेरेन या ताऱ्यांशीं युक्त असेल तर निदान एका डोळ्यास उपद्रव होण्याचा संभव असतो.

सूर्यचंद्रयुति प्लेडस त्या ताऱ्याजवळ होईल व शनि अथवा मंगळ रेग्युलस या ताऱ्याजवळ असतील तर पूर्ण अंधत्व येण्याचा संभव असतो.

केंद्रांत मंगळ एलडरबान या ताऱ्याशीं युक्त असेल तर शस्त्रघात, उंचावरून पडणें या पासून मृत्यु येतो. आयुष्यकारक जर हरक्युलस अथवा आरकटूस यांशीं युक्त असेल तर श्वास कोंडून मृत्यु तो. केंद्रीं मंगळ हा कारहायड्रा या ताऱ्याशीं युति, वर्तुलपाद किंवा

पूर्ण दृष्टींत असेल तर बुडून किंवा विषारी पदार्थापासून मृत्यु येतो. मंगळ सीरीयस व शनि यांशीं युक्त असेल अथवा मारकेबशीं युक्त असेल तर रानटी जनावरें किंवा शिपाई लोक यांकडून मृत्यूचा संभव असतो. मंगळ ओरायन व शनियुक्त असेल अथवा क्यॅपूट हरक्युलस व एन्टारीस या ताऱ्याशीं युक्त असेल तर मारेकऱ्याच्या हातून किंवा बुडून मृत्यु येतो. मंगळ प्लेड या ताऱ्याशीं युक्त असेल व शनि रेग्युलस या ताऱ्यानें युक्त असेल तर आकस्मिक मृत्यु येण्याचा संभव असतो.

शनि मीन राशींत व चंद्र कन्या राशींत असेल किंवा शनि जलराशींत असून त्याचेबरोबर चंद्र पूर्ण दृष्टियोग करील तर बुडून किंवा दारूच्या व्यसनानें मृत्यु येतो.

शनि मंगळ वृश्चिक राशींत असून चंद्र कन्या राशींतून त्याच्याशीं दृष्टियोग करीत असेल तर बुडून किंवा अंमली पदार्थांचे व्यसनापासून मृत्यु येतो.

सप्तम स्थानांतील शनीबरोबर सूर्य व चंद्र पूर्ण दृष्टियोग करीत असतील तर कारागृहांत, विषारी पदार्थापासून, अति गरिबींत किंवा उंचावरून पडून मृत्यु येतो. व तो परदेशीं येतो.

शनि दशमांत असून आयुष्यकारकास आपले दृष्टियोगाने पीडित करील तर घर अंगावर कोसळून, दगड किंवा दुसरे अति जड पदार्थ पडून किंवा पाण्यापासुन मृत्यु येतो.

शनि व मंगळ द्वादश स्थानांत असतील तर मोठाल्या चतुष्पाद जनावरांपासून भीति असते.

द्वादश स्थानाचे भावारंभीं सिंह अथवा धनु रास असून त्यांत पाप ग्रह असेल तर घोड्यावरून पडण्याची भीति असते.

शनि व मंगळ द्विस्वभाव राशींत असून चंद्र त्यांच्याशीं युति, वर्तुलपाद किंवा पूर्ण दृष्टि करीत असेल तर उंचावरून एकाएकीं पडून मृत्यु येण्याचा संभव असतो.

शनि व मंगळ अथवा शनि, मंगळ व हर्शल अथवा शनि व हर्शल असे अष्टमांत असतील व त्यांस गुरु व शुक्र हे शुभ दृष्टीनें पहात नसतील तर अति भयंकर व आकस्मिक मृत्यु येतो.

शनिशुक्र सप्तमांत असून मंगळाबरोबर वाईट दृष्टियोग करीत असतील तर मरणकाळीं अति पीडा होते.

सप्तमांत मेष, सिंह व धन या राशींचा मंगळ असून आयुष्यकारकास पीडा करीत असेल तर जळून मरण्याची भीति असते.

मंगळ हा अग्निराशींत शनीशीं वर्तुलपाद अथवा ९०अं. दृष्टि कर्क, वृश्चिक, मीन या राशींतून करील तर कढत पाण्यानें भाजून किंवा रसायनिक द्रव्यानें भाजून मृत्यु येतो.

सूचना.—जेव्हां ग्रह एकमेकांस सार्धवर्तुलपाद किंवा ४५अं. वर्तुलपाद किंवा ९०अं. अथवा १३५अं. अथवा पूर्ण १८०अं. दृष्टियोग करितात त्या वेळेस ते एकमेकांस पीडा करितात.

वरील सर्व विवेचनावरून वाचकांस स्थिर ताऱ्यांच्यां धर्मानें मृत्यु कसे येतात हें कळून येईल. आतां आपण उदाहरणाकरितां कांहीं कुंडल्या घेऊं.

मिस्टर—सराह हॅरीएट थामस



* हाडाचे हृदयांतील तारा १९-३३ + दक्षिण मच्छपुच्छांतील तारा × मिथुनाचे उजव्या पायांतील तारा शु. ११-३९ सिरीयस ११-३८

जन्म—ता० ८ आगष्ट सन १८३० पहाटेस १ वाजतां अक्षांश ५०—३० उ. रेखांश २-३० पश्चिम.

या इसमास मीस गेफरी या स्त्रीचा खून केल्याबद्दल ब्रिस्टल येथें सन १८४९ मध्यें फांशी दिलें.

. ह्या कुंडलींत सूर्य हा तृतीय स्थानांत आहे ह्मणून तो आयुष्यदायक नाहीं. परंतु जन्म रात्रीचा असून चंद्र आयुष्यदायक स्थानांत आहे त्यामुळें तोच आयुष्यकारक मानला पाहिजे. तो अपघातप्रवृत्तक राशि जो मेष त्यांत मंगळानें युक्त आहे व सिंह या स्थिर

राशींत सूर्य, बुध व शनि असून त्यांच्याशीं चंद्र १३५ अं. दृष्टियोग करीत आहे. सूर्य हा शनीबरोबर युतिदृष्टि करीत असून हर्शलवर पूर्ण पहात आहे. ह्या प्रमाणें सूर्य व चंद्र हे दोन गोल शनि व मंगळ यांनी दूषित झाले आहेत. आयुष्यकारक चंद्रावरून आपण सहज अनुमान करूं शकूं कीं या मनुष्याचा मृत्यु विलक्षण रीतीनें किंवा अपघातानें झाला पाहिजे. येथें शनि पश्चिम षट्कांत असून चंद्रास व सूर्यास पीडा करीत आहे व चंद्र हा थोड्या अंशानें दशमांत आहे, ह्मणून म्याजिस्ट्रेच्या हुकमान्वयें त्याचा फांशीनें मृत्यु झाला !

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम् ।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥

'भवभूति'

पुस्तक ९ वें.] पौष कृ० १४, गुरुवार [अंक ३ रा

भविष्य करणें ह्मणजे थट्टा आहे काय?

भाराकार लिहितात, " कोणाला मवाळ बनावयाचें असेल तर त्यानें फलज्योतिषावर वर्तमानपत्रांत लेख लिहावे. थोडक्याशा ज्ञानानें पुष्कळसे कालम भरून काढितां येतात. भविष्यें बरोबर उतरलीं तरी कोणी बक्षीस देत नाहींत किंवा चुकलीं तरी नावें ठेवीत नाहींत! " सुशिक्षितांची असें लिहिण्याकडे प्रवृत्ति कां व्हावी, हें समजणें फारसें कठीण नाहीं, या विद्येवर अचूक निदान बांधण्याची ज्यांत पद्धति आहे असे ग्रंथ नाहींत, निश्चयात्मक भविष्य सांगणारे ज्योतिषी नाहींत व परकीय राजांचा या विद्येला पाठिंबा नाहीं हींच कारणें सुशिक्षितांच्या तिरस्काराचीं असावीं असें वाटतें. पूर्वीच्या हिंदुस्थानांत भौतिक शास्त्राइतकाच या विद्येस मान होता, अचूक फलें सांगतां ये कांहीं ग्रंथही होते, ज्योतिषी निश्चयात्मक व अद्भुत गोष्टी स होते, व राजेलोकांचा या विद्येला पूर्ण आश्रय होता, ह्मणून पर्यंत ही विद्या कशी तरी जीव धरून आहे. आमचा ज्योतिष हार या विद्येच्या साह्यानेंच आज तागायत चालत आ[illegible]ीस पडतें. व्यवहारही तिला अजीबात सोडून होत नाहीं असें

सुशिक्षित लोक मात्र आपल्या व्यवहाराला तिचें साह्य घेत नाहींसें झाले आहेत, इतकेंच नव्हे तर तिची प्रसंगविशेषीं थट्टाही करूं लागले आहेत ही मोठ्या दुःखाची व शरमेची गोष्ट होय! ज्याप्रमाणें उत्तम गुणी पण निर्धन मनुष्याची टवाळी करितात त्याचप्रमाणें या अद्भुत विद्येची टवाळी होऊं लागलेली आहे. फलज्योतिषावर थोड-क्याशा ज्ञानानें जर पुष्कळसे कालम भरून काढितां येत असतील तर वर्तमानपत्रांचीही तीच स्थिति आहे असें ह्मणणें ओघास येतें. नवे विचार, नवी दिशा, प्रगल्भ भाषा, एखादी गोष्ट सिद्ध करण्याची हातोटी, इतिहासाचें अगाध ज्ञान, राजकीय परिस्थिति उत्पन्न कर ण्याचें सामर्थ्य इ० गोष्टी कितीशा वर्तमानपत्रांत आढळतील बरें? फलज्योतिषावर थोडक्याशा ज्ञानानें कालमचे कालम भरून काढणारे जसे ज्योतिषी आहेत तसेच वर्तमानपत्रांचे संपादकही आहेत हें विसरतां कामा नये. एखाद्या लायब्ररींत टोपलीभर वर्तमानपत्रें अस-तात, पण संपादकीय लेख प्रथम केसरीचाच वाचण्याकडे लोकांची प्रवृत्ति कां असावी? सारांश, वर्तमानपत्रांत संपादकीय लेख जसा थोडक्याशा ज्ञानानें आदरणीय लिहिणें अवघड आहे तसाच फलज्यो-तिषावरही आदरणीय लेख लिहिणें अत्यंत अवघड आहे. थोडक्याशा ज्ञानानें लिहिलेले लेख तितक्याच योग्यतेचे असणार हें उघड आहे.

राशींचीं नांवें, द्वादशभाव, ग्रहांचीं उच्चनीचें, राशी परत्वें व परत्वें ग्रहांचीं फलें इतकी माहिती असली ह्मणजे कालम भरून येतील हें खरें आहे व तसे लिहिणारे ज्योतिषीही आढळ-तात. सुशिक्षितांनीं तिकडे लक्ष देतां कामा नये. ज्या ज्योति-षानें अमुक ग्रहस्थितीचा अमुक परिणाम घडतो असा पुरावा नसतां आपण जें अनुमान बांधतों त्याला तात्त्विक आधार आहेत. ज्योतिषानें कितीही कालम खरडले तरी ते व्यर्थ लिहिणेंसुद्धा दृष्टीनें पाहूं गेल्यास फलज्योतिषावर चार ओळी फलज्योतिषावर आहेत. भालाकार विद्वान् आहेत, तेव्हां त्यांना येतील. त्यांना एक वेळीं ९।४ कालम सहज भरून काढितां पल्या वर्तमानपत्राला सर्व प्रकारच्या वाचकांस

वाचण्यास योग्य असें स्वरूप द्यावयाचें आहे. तेव्हां त्यांस आमची अशी विनंति आहे कीं प्रत्येक वेळीं ज्योतिषी वाचकांसाठीं निदान अर्धा कालम तरी त्यांनीं आपल्या वर्तमानपत्रांत द्यावा. चित्रें, कादं-बऱ्या यांप्रमाणेंच भविष्येंही लोकांची करमणूक करितात. एखाद्या वर्तमानपत्रांत भविष्य प्रसिद्ध झालेलें असलें कीं तें काय आहे हें पाहण्यास प्रत्येक वाचक उत्सुक असतो. यासाठीं भालाकारांनीं आमच्या विनंतीला मान द्यावा. भविष्यें चुकलीं तरी कोणी नावें ठेवीत नाहींत हें ठरलेलेंच आहे. मग कचरण्याचें काय कारण?

भूकंप केव्हां होतात, रोगांच्या साथी केव्हां पसरतात, कोणता रोग कोणत्या वेळीं बलवान् होतो, आगी, वादळें, केव्हां होतात, लढाया केव्हां लागतात, अतिवृष्टि किंवा अनावृष्टि केव्हां होते, खून, रक्तपात केव्हां होतात इत्यादि गोष्टींचें ज्ञान ज्यास आहे असा ज्योतिषी क्वचित् कोणी असेल तर असो. ग्रंथांचें साह्य त्याला कित-पत उपयोगी पडत असेल तेंही सांगवत नाहीं. भालाकार समजतात तितकें सोपें हें काम खचित नाहीं. एम्. ए. किंवा एल्. एल्. बी. झालेला मनुष्य असला ह्मणजे त्याला फलज्योतिषावर कालम खरड-ण्यास फारसें अवघड नाहीं अशी आमची तरी निदान समजूत नाहीं. सतत व्यासंग करणाऱ्या मनुष्याला सुद्धां भविष्यें करणें कठीण जातें. भविष्यें करणें ह्मणजे कालम भरून काढणें असा अर्थ आह्मी समजत नाहीं.

एकदां एक सुशिक्षित हातांत दोन पत्ते घेऊन त्यांतील कोणताही एक पत्ता मनांत धरा असें ह्मणाला. व तत्काल त्यानें त्यांतील जो हातास आला तो घेऊन हाच तुमचा पत्ता काय, असें विचारलें. कर्मधर्मसंयोगानें मनांत धरलेलाच पत्ता तो होता! या प्रमाणें ९।४ वेळ त्यानें करून दाखविलें त्यांत कांहीं वेळ उत्तर बरोबर आलें तर कांहीं वेळ चुकलें. त्या वेळीं प्रेक्षकास असें वाटलें कीं, या गृहस्थाजवळ कांहीं तरी अद्भुत विद्या आहे खास. ती त्याला पूर्णपणें अवगत नाहीं इतकेंच. प्रेक्षक भोळा असल्यामुळें त्याला त्यांतलें इंगित कळलें नाहीं. पण सर्वत्र प्रेक्षक इतके मूर्ख अशी कल्पना

करणें चुकीचें आहे. त्या सुशिक्षिताच्या मतें "ज्योतिष्याचें भविष्यही अशाच प्रकारचें असतें. होय किंवा नाहीं यांपैकीं कांहीं तरी सांगतो, त्याचा अनुभव कित्येक वेळां येतो त्यामुळें अडाणी मनुष्य त्याच्या जाळ्यांत सांपडतो. यापेक्षां त्यांत अधिक अर्थ नाहीं" या सुशिक्षिताच्या मताप्रमाणेंच भालाकारांचें मत दिसतें. पण त्यांस आह्मीं नम्रपणें सुचवितों कीं भविष्य करणें ह्मणजे थट्टा नाहीं. भविष्यें करण्यास बरेंच ज्ञान लागत असतें. अनुभव आणि तत्वज्ञान यांच्या साह्यानें भविष्यें करावयाचीं असतात हातास लागेल तो पत्ता दाखविण्याचा प्रकार आणि ज्योतिःशास्त्राधारें उत्तर देण्याचा प्रकार यांत जमीन अस्मानाचें अंतर आहे.

या सुशिक्षितांच्या मताचेच एक गृहस्थ येथें येऊन ह्मणाले कीं, फलज्योतिषावर श्रद्धा बसेल असें कांहीं माझ्या कुंडलीवरून सांगा. त्यावेळीं आह्मी त्यांस सांगितलें कीं प्रथम तुह्मी आपली कुंडली आपल्या कुटुंबांतील मनुष्यांच्या कुंडल्यांत मिसळून नांवें न घालतां त्या सर्व कुंडल्या इकडे द्या. ह्मणजे त्यांतून तुमची, तुमच्या मुलाची व तुमच्या भार्येची याप्रमाणें तिघांच्या कुंडल्या ओळखून तुमच्या स्वाधीन करितों. हें करणें त्यांस पसंत पडून त्यांनीं ठरल्याप्रमाणें सर्व ल्या दाखविल्या. त्यांतून त्या तीन कुंडल्या नेमक्या त्यांच्या स्वाधीन न त्यांस तुह्मांस मूळव्याधीचा उपद्रव आहे असें सांगितलें. तेव्हां श्चर्यचकित होऊन या शास्त्राचा अभ्यास करण्यास तत्काल ाले! व आपली पूर्वीची समजूत चुकीची होती असें ह्मणाले. ोक आहे. पण यांच्यासारखी बुद्धि कोणत्या सुशिक्षितांच्या ि प्रो. आठवल्यांसारखे या शास्त्राचा विचार करणारे सुशि- नाहींया काळीं तरी दुर्मीळ आहेत. ते जर विचारच करीत लागल्यांस खरेपणा तरी कोठून आढळणार? विचार करूं. कठेल. भविष्यें करण्यास किती ज्ञान लागतें तें आपोआपच लेख लिहिण्या शिक्षितांचें या विवेकडे लक्ष लागावें इतकाच हा ेऊं नये अशी ति आहे.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम् ।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥

'भवभूति'

पुस्तक ९ वें.] ज्येष्ठ कृ० ८, शुक्रवार. [अंक ११ वा

अवतार.

दैत्यानां बलनाशाय देवानां बलवृद्धये ॥
कर्मसंस्थापनार्थाय ग्रहा जाताःशुभाःक्रमात् ॥

अर्थ.—राक्षसांना बलहीन करण्यास, देवांचें सामर्थ्य वाढवण्यास आणि कर्ममार्गाची संस्थापना करण्यास रव्यादि ग्रह उत्पन्न झाले आहेत.

रामोवतारःसूर्यस्य चंद्रस्य यदुनायकः ॥
नृसिंहो भूमिपुत्रस्य बुद्धः सोमसुतस्यच ॥

अर्थ.—राम हा सूर्याचा, कृष्ण चंद्राचा, नारसिंह हा मंगळाचा व बुद्ध हा बुधाचा अवतार आहे.

वामनो विबुधेज्यस्य भार्गवो भार्गवस्यच ॥
कूर्मो भास्करपुत्रस्य संहिकेयस्य सूकरः ॥

अर्थ.—वामन हा गुरूचा, परशुराम शुक्राचा, कूर्म हा शनीचा व वराह हा राहूचा अवतार आहे.

केतो र्मीनावतारश्च येचान्ये तेपि खेटजाः ॥
परमात्मांशमधिकं येषु ते खेचराभिधाः ॥

अर्थ.—मच्छावतार हा केतूचा असून इतर जे जे अवतार झाले ते ते सर्व ग्रहांपासूनच झालेले आहेत. ज्या ज्या व्यक्तींमध्यें ईश्वरांश अधिक ते ते सर्व अवतार असें समजावयाचें.

जीवांशमधिकं येषु जीवास्ते वै प्रकीर्तिताः ॥
सूर्यादिभ्यो ग्रहेभ्यश्च परमात्मांशनिःसृताः
रामकृष्णादयः सर्वे ह्यवतारा भवंति वै ॥
तत्रैव ते विलीयंते पुनः कार्योत्तरे सदा ॥

अर्थ.—ज्या व्यक्तींमध्यें जीवांश अधिक ते मनुष्य होत. सूर्यादि ग्रहांपासून जो परमात्मांश उत्पन्न झाला ते रामकृष्णादि अवतार झाले. हे अवतार इष्ट कार्य झाल्यावर पुनः आपापल्या ग्रहांच्या ठिकाणीं लय पावतात.

या प्रमाणें नऊ अवतार नवग्रहांपासून झाले असें शास्त्रकार वर्णन करितात. पुढें होणारा जो दहावा अवतार तो कोणत्या ग्रहापासून याचें वर्णन कोठें आढळत नाहीं. या अवतारांची कल्पना ग्रहांच्या नांवांवरून व त्यांच्या गुणधर्मांवरून बसविलेली दिसते. मंगळ हा क्रुर व तामसी ग्रह आहे ह्मणून नारसिंह हा त्याचा अवतार मानलेला आहे. भार्गव ह्मणजे शुक्र ह्मणून त्याचा भार्गव ह्मणजे जो परशुराम हा अवतार कल्पिलेला आहे. सर्व अवतारांत राम व कृष्ण या अवतारांचें माहात्म्य अधिक आहे. रामायण व भारत हे दोन ग्रंथ या अवतारांच्या वर्णनानीं भरलेले प्रचंड ग्रंथ असून त्यांचीं पारायणें होत असतात. राम कृष्ण यांचेच भक्त सर्व लोक आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं. या दोन देवांचीं देवळें सर्वत्र आहेत, तशीं इतरांचीं नाहींत. ह्मणून फलज्योतिषांत ज्या ग्रहांकडे मुख्यत्व आहे असे जे रवि व चंद्र हे दोन ग्रह त्यांचे ते अंश मस्नले आहेत.

रामाचा जन्म माध्यान्हीं झाला व रवीचें महत्वही त्याच वेळीं असतें ह्मणून राम हा रवीचा अंश मानला गेला. व कृष्णाचा जन्म रात्रीं झाला असून चंद्राचे महत्वही रात्रींच असतें त्यावरून कृष्ण हा चंद्राचा अंश मानला गेला. राम हा सूर्यवंशांत व कृष्ण हा चंद्रवंशांत झाला असें जें पुराणांत वर्णन आहे तेंही याच कल्पनेला धरून आहे. बुद्ध हें नांव बुधाशीं जुळतें ह्मणून तो बुधाचा अंश कल्पिला, वामन हा ब्राह्मण व गुरूही ब्राह्मण त्यावरून तो गुरूचा अंश कल्पिला. शनि, राहु व केतु यांच्या स्वरूपावरून अनुक्रमें कूर्म, वराह व मच्छ हे अवतार कल्पिले. या प्रमाणें अवतारांचा ग्रहांशीं संबंध जुळविलेला आहे. दहावा अवतार कलंकी हा शनीचा अवतार होईल अशी कल्पना करण्यास हरकत नाहीं.

मनुष्यांत सुद्धां जीं मनुष्यें ज्ञानी, ईश्वरोपासना करणारीं व स्वधर्माचरणी असतात त्यांच्यांत गुरूचा अंश अधिक असला पाहिजे, अर्थात् त्यांच्या जन्मकाळीं गुरु बलवान् असला पाहिजे. जीं कुटिल कारस्थानीं, व्यभिचारी, मांत्रिक, तांत्रिक, तेजस्वी व भोग भोगणारी असतात त्यांच्यांत शुक्राचा अंश जास्त असला पाहिजे व ह्मणून त्यांच्या जन्मकाळीं शुक्र बलवान् असला पाहिजे. युद्ध करणारीं, तामसी, लढाऊ पोषाख करणारीं व उग्र दृष्टीचीं जीं माणसें आहेत त्यांच्या जन्मकाळीं तो ग्रह बलवान् असला पाहिजे. मलिन वस्त्रें धारण करणारीं, दरिद्री, याचना करणारीं, गुलाम बनलेलीं, कपटी, व घात करणारीं जीं माणसें त्यांच्यांत शनीचा अंश अधिक असून त्यांच्या जन्मकाळीं तो ग्रह त्याच गुणाचा दर्शक असला पाहिजे. अधिकारी, राजे, राजाप्रमाणें ज्यांचा मान, मोठेपणानें वागणारीं व ज्याचें समाजावर वजन असून हुकमत चालवणारीं माणसें असतात त्याच्यांत रवीचा अंश जास्त असला पाहिजे व त्यांच्या जन्मकाळींही

तो ग्रह तशाच योग्यतेचा असला पाहिजे. पशुतुल्य आचरण करणारीं हलक्या जातीचीं व निंद्य कर्में आचरणारीं माणसें राहूच्या अंशाचीं असून त्यांच्या जन्मकाळींही राहू तशाच योग्यतेचा असला पाहिजे. जलचरांप्रमाणें पाण्याशीं ज्यांचा नित्य सहवास असून हलक्या वर्गाचीं जीं कोळी वगैरे माणसें तीं केतूच्या अंशाचीं असलीं पाहिजेत. या वरून आपणांत कोणत्या ग्रहाचा अंश अधिक आहे हें ज्याचें त्यांस जाणतां येईल. हर्शल व नेपच्यून हे दोन ग्रह अलीकडील असून त्यांची फलेंही अनुभवास येतात. त्यांत हर्शलचें फल चांगलें अनुभवास येतें. जीं माणसें अद्भुत स्वभावाचीं व कर्तृत्वाचीं असतात, ज्यांस अकस्मात् संकटें भोगावीं लागतात व ज्यांच्या व्यवहारांत लोकविलक्षण गोष्टी घडतात तीं हर्शलच्या अंशाचीं माणसें होत. नेपच्यूनचीं माणसें केतूच्या माणसांसारखींच कल्पिण्यास हरकत नाहीं.

वरील वर्णनावरून शंकराचार्यांत गुरूचा अंश अधिक असला पाहिजे व शिवाजींत मंगळाचा अंश अधिक असला पाहिजे.

कालाकडे दृष्टि दिली असतांही असें वाटतें कीं, निरनिराळ्या स्थळीं व निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या ग्रहांचें प्राबल्य असतें व त्या ग्रहांच्या गुणधर्माप्रमाणेंच त्या त्या ठिकाणीं स्थिति असते. हिंदुस्थानांत सांप्रतच्या कालाकडे पाहिल्यास शनीचें प्राबल्य विशेष वाढलें आहे असें दिसतें! या ग्रहानंतर कोणता ग्रह येथें प्रबल होईल याचें अनुमान जर कोणास करितां येईल तर हिंदुस्थानच्या भावी स्थितीचें ज्ञान सहज होईल. आमच्या मतें या पुढें हिंदुस्थानांत गुरूचें प्राबल्य वाढून धर्मजागृति होईल व हें काम गुरूच्या अंशाचीं अवतारीं माणसें जन्मास येऊन त्यांच्या हातूनच होईल. मात्र हा काल केव्हां प्राप्त होईल तो व्होवो!

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम् ।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥

'भवभूति'

पुस्तक ९ वें.] श्रावण व० १ बुधवार. [अंक १५ वा

विजयतोरण.

प्रसिद्ध करमणूक पत्राचे संपादक रा. हरि नारायण आपटे यांच्या उषःकाल कादंबरीचे आधारें रचलेलें विजयतोरण नाटक ता० १ मे सन १९०९ शनवार या दिवशीं रात्रीं स्टँ. १०वाजतां महाड येथील मनोरंजक नाटक मंडळीनें करून दाखविलें. तें कुलाब्याचे डि० म्याजिस्ट्रेट साहेब मि. काब्राजी यांनीं हिंदुमुसलमानांत वैमनस्य उत्पन्न करून शांतताभंग करणारें आहे असें ठरवून नाटकांत भाषण करणारे व त्यांस मदत करणारे सर्व सारखेच गुन्हेगार मानून प्रत्येकापासून २०० रु. चा जातमुचलका व २०० रु. जामीन घेण्याचा त्यांनीं हुकूम केला. हा निकाल ता.१६ आगष्ट सन १९०९ सोमवार या दिवशीं झाला. मंडळीचा हायकोर्टांत अपील करण्याचा विचार आहे. तेव्हां नाटकाच्या वेळेवरून असें संकट कां आलें याचा

ज्योतिःशास्त्राधारें विचार करून काय निष्पन्न होतें तें पाहूं. नाटक रंगभूमीवर ज्या वेळीं आलें तोच त्याचा जन्म होय. त्या पूर्वीचा त्याचा गर्भकाल समजला पाहिजे. नाटकाचा गर्भ कोणत्या दिवशीं राहिला तो दिवस समजण्यास मार्ग नाहीं. ह्मणून जन्मकालावरूनच खालील कुंडली तयार केली आहे.

जन्म.—ता० १ मे १९०९ शनिवार रा. स्टँ. १० वाजतां

सायन भावचलित



लग्न धनु राशीच्या २१ अंशांत उदित आहे. लग्नीं या राशीचे ९ अंश व मकर राशीचे २२ अंश आहेत. पहिला लग्नस्वामी गुरु हा भाग्यस्थानीं कन्येंत ४ अंश आहे. व दुसरा स्वामी शनि हा सुखस्थानीं मेष राशींत १६ अंश आहे. यांत गुरूची स्थिति बरी आहे, पण शनीची फार अनिष्ट आहे, नवमस्थ गुरु कार्यांत कीर्ति व यश देतो. पण चतुर्थस्थ नीच शनि दुःख, दारिद्र्य व विपत्ति

भोगावयास लावतो. चमत्कार असा कीं, या दोहोप्रकारच्या गोष्टी अनुभवास आल्या आहेत. या नाटकाची सर्वत्र प्रसिद्धि झाली व मंडळीस दुःख, दारिद्र्य व विपत्ति भोगावी लागली. खालच्या कोर्टांत यश मात्र मिळालें नाहीं! तें हायकोर्टांत मिळतें कीं काय हें पाहणें आहे.

कुलाबा डि० म्याजिस्ट्रेट मि० क्राब्राजी हे मनाचे थोर आहेत, याचा अनुभव या मंडळीला चांगला आला. त्यानीं सर्व मंडळीस वकीलमार्फत हजर रहाण्याची पहिल्या पासून सवड ठेविली होती. नाहींपेक्षां मंडळीच्या दुःखास पारावार नव्हता! दिवस भर पावसाचे. महाडाहून अल्लीबागेस जाण्यास या दिवशीं वाहनांची दुर्मीळता. सर्व प्रवास पायींच करण्याचा प्रसंग. वाटेंत ११।१२ नद्या भयंकर सर्पासारख्या खवळलेल्या! वगैरे अनेक दुःखें भोगण्याचा प्रसंग त्यांच्या दयाळू मनानें टाळला हें त्यांस अभिनंदनीय आहे. इतका त्रास कां चुकला याचा कुंडली वरून विचार केल्यास असें दिसतें कीं, शनि हा चतुर्थ भावाच्या अर्धा पळीकडे सरकलेला आहे व गुरु त्रिकोणांत असून तो लग्नावर पूर्ण दृष्टीनें पाहत आहे.

या नाटकामुळें मंडळीची सांपत्तिक स्थिति फारच शोचनीय झाली आहे. कारण, धनस्थानीं कुंभ राशीचा मंगळ आहे. धन स्थानाचे आधिपत्य पूर्णपणें शनीकडे आहे व तो दुर्बळ आहे. या दोन कारणांनीं सांपत्तिक स्थितीला धोका आला. शिवाय हर्शल हा वक्री झालेला पाप ग्रह धनभावारंभींच आहे ह्मणून त्याचाही धनावर वाईट परिणाम झाला.

एकंदरींत नाटकाला वेळ फार वाईट होती व तिला अनुसरूनच आतांपर्यंतचे परिणाम घडले आहेत. फिर्यादीचें पहिलें काम ता० ६।६।७ जुलईला चाललें. या वेळीं चंद्र कुंभ राशीवर होता. या वेळीं पुराव्याचें काम संपलें. फिर्यादीनें आपले मुसलमान साक्षीदार रद्द केले. त्यामुळें पुराव्याची बाजू लंगडी झाली. परंतु हा चंद्र, गुरु व जन्मचंद्र यांस सहावा असून तो शत्रुच्या घरचा होता, ह्मणून

कामाचा निकाल काय होईल हें त्यावरून सहज कळण्यासारखें होते! दुसरी ता० ३० जुलई होती, या दिवशीं खटला तकूब राहिला. तिसरी ता० १४ आगष्ट शनवार या दिवशीं होती. या दिवशीं उभय पक्षांच्या वकिलांच्या तक्रारी झाल्या. चंद्र सिंह राशींत अष्टम स्थानीं गुरु व जन्मचंद्र यांस १२ वा होता! अर्थात् हाही दिवस अनिष्ट होता हें उघड आहे. शिवाय, शनि हा वक्र झाला होता. निकाल १६ वीला झाला. हा दिवस बरा होता. नवमाचा अधिपति बुध हा शुक्रासह कन्येंत नमवांत होता व चंद्रही नवमांतच आला होता. नवमेश बुध हा तर जन्मगुरूला मिळाला होता. यावरून यश मिळावें अशी आशा होती. पण मूळच जेथें बिघडलेलें तेथें शुभ दिवसानें काय करावें? तथापि जज्जमेंट इतकें चांगलें आहे कीं, त्यावरून अपिलांत सुटका होण्यास पुष्कळ जागा आहे. शिवाय मंडळीच्या गारिबीकडे लक्ष दिल्यास अपीलाची व्यवस्था लागण्याचा सुद्धां संभव नव्हता. पण ईश्वरी कृपेनें तो योग चांगला घडून आला. आतां लवकरच अपील अर्ज दाखल होईल. तो मंजूर झाल्यानंतर सुनावणीची तारीख लागेल. गुरूच्या स्थितीकडे लक्ष दिलें तर अखेर यश मिळावें असें अनुमान होत आहे.

अपीलाच्या कामास सुमारें १५० रुपये खर्च येणार आहे. तरी ज्या कोणा सहृदय देशबांधवास यथाशक्ति मदत देणें असेल त्यानें म्यानेजर कुंडलीविज्ञान या पत्त्यावर पाठवून द्यावी. तिचा साभार स्वीकार होऊन तिची कुंडलीविज्ञानांत पोंच येईल. मंडळीनें पोटासाठीं नाटक केलें नव्हतें हें सांगणें जरूर आहे, ता० २ सपटंबरला बहुधा अपील अर्ज दाखल होईल व त्याच्या पुढील आठवड्यांत तो सुनावणीस निघेल त्या पूर्वी मदत मिळेल तर सुनावणीस चांगला वकील देतां येईल. नांव प्रसिद्ध करण्याची इच्छा नसेल तर तसें कळवावें.

पत्रव्यवहार.

[१]

श्रीयुत कुंडलीविज्ञानकर्ते यांस—

सा. न वि. वि.—पाश्चात्य ग्रंथाधारें एका ग्रहाचें वर्णन पाठविलें आहे, त्यास योग्य स्थळ मिळाल्यास दुसऱ्या ग्रहांचींही वर्णनें पाठविण्याचा विचार आहे.

शनीचें वर्णन.

सूर्यमालेंत शनि हा हर्शल व नेपच्यून या दोन ग्रहांखेरीज शेवटला ग्रह असून गुरूच्या पलीकडे आहे. तो अति चकाकीत अथवा दैदीप्यमान नाहीं. परंतु सुमारें पहिल्या प्रतीच्या तारे एवढा दिसतो. तो ताऱ्याप्रमाणें चमकत नाहीं. किंचित् काळसर व पिंगट रंगाचा दिसतो. आकाशात धूर पसरला असतां त्यांतून एखादी तारा जशी दिसते तसा तो कांहींसा फिकट भस्मी रंगाचा दिसतो. गतीनें अति मंद असून सूर्यामोंवतालची आपली द्वादश राशींतील प्रदक्षणा सुमारें २९ वर्षें, १६७ दिवस व ९ तास इतक्या दरम्यान पुरी करितो. म्हणजे प्रत्येक राशीवर सुमारें २॥ वर्षें असतो. व एका राशीला असतां तिन्या मागच्या व पुढच्या राशीस पीडा करितो अर्थात् एका राशीला शनीची बाधा ७॥ वर्षें असते.

ज्या वेळेला आपलीं सरासरी २९॥ वर्षें होतात, तेव्हां शनीचें एक वर्ष होतें. व आपलीं २॥ वर्षें होतात तेव्हां कोठें त्याचा एक महिना होतो. या त्याच्या मंदगतीमुळें त्याला आपल्या पूर्वजांनीं मंद हें नांव दिलेलें आहे तें यथार्थच आहे. डोळ्यांनीं दिसणाऱ्या ग्रहांत इतका मंद दुसरा कोणी नाहीं. तो वक्री होतो तेव्हां त्याचे मंदपणाची कमाल होते. तो एकाच ठिकाणीं पुष्कळ काळ घोटाळत असतो. तेजाचा विचार केला तरी हाच प्रकार. गुरु व शुक्र यांच्या तेजापुढें यांचें तेज कांहींच नाहीं. परंतु मंगळ, बुध हे ग्रह देखील बहुधा नेहमीं

याचेहून तेजस्वी दिसतात. पायाचा जड, तेजानें हीन तर स्वभावानेंही कसा असावा या विषयीं सहज अनुमान होतें. मागें पुढें जाऊन येऊन एकेका नक्षत्राचा पिच्छा पुरविणारा हा काळा पिंवळा निस्तेज ग्रह बराच काळ एकाच राशीवर असतो तेव्हां तो कांहीं तरी अनिष्ट करीत असेल असें साहजिक प्राचीन लोकांचे मनांत आलें असलें पाहिजे. शनि हा खल ग्रह आहे अशी सर्व देशांत फार प्राचीन काळापासून समजूत आहे. कौरवपांडवांच्या युद्धाचे वेळीं तो रोहिणीजवळ वक्र होता व तेणेंकरून जगाला अनिष्ट आहे असें पूर्ण सुचवित होता.

रोहिणीची आकृति शकट म्हणजे गाड्यासारखी आपल्या ज्योतिष ग्रंथांत सांगितलेली आहे. पश्चिमेकडची एक तारा शकटाची धुरांडी दर्शविते व पूर्वेच्या चार तारा गाडीची चौकट दर्शविते. शनि, मंगळ चंद्र हे या नक्षत्राजवळ येतात तेव्हां जर या शकटाचा भेद करितील तर सर्व जग सागरांत बुडून क्षय पावेल असें वराहमिहिर आपले बृहत्संहितेंत म्हणतो. सांप्रत शनि व मंगळ हे या शकटाजवळ येतात तेव्हां ते यांतून जात नाहीं. चंद्र मात्र १८ वर्षांत १।६ वेळ शकटारोहण करितो.

शनि आपले आंसाभोंवतालीं १० तास १४ मिनटांत फिरतो. म्हणजे शनीवर दिवस १०। तासांचा आहे. आकाशांत एखाद्या काळोख्या रात्रीं शनीकडे मोठी दुर्बीण लावून पाहिलें असतां आपणास कल्पना नाहीं अशी विचित्र मूर्ति दृष्टीस पडेल. एक मोठा वलयांकित भव्य गोल दिसेल व त्याच्या पृष्ठभागावर नाना प्रकारचे रंग चमकत आहेत, ध्रुवाकडे निराळा रंग आहे, इतर भागीं पिंवळा आहे, मध्यभागीं एक पांढरा पट्टा आहे, व मध्यें चमत्कारिक ठिपके असून त्यावर पिंगट, जांभळा व तांबुस अशा रंगाची झांक मारीत आहे असें आढळून येईल. शनीभोवतीं असलेलीं तीन वलयें त्यास लागलेलीं नाहींत. आंतलें वलय तर फारच चमत्कारिक व मजेदार दिसतें. कधीं कधीं तें जांभळें दिसतें व तें

मध्यें आहे तरी त्यांतून शनीचे गोलाचा पृष्ठभाग दिसतो. शनीच्या पूर्वपश्चिम व्यासापेक्षां दक्षिणोत्तर व्यास सुमारें दहावा हिस्सा कमी आहे. त्यामुळें त्याचा आकार अगदीं गोल नाहीं. बराच चापट आहे. भोंवतालचें वातावरण बरेंच दाट अभ्रयुक्त असल्यानें त्याचें गुरूच्या वातावरणाशीं बरेंच साम्य आहे.

शनि केवळ सूर्याचीच लहान प्रमाणावर असलेली प्रतिमा दिसतें. इतकेंच नव्हे तर सर्व सूर्यमालेचीच प्रतिमा आहे असें म्हटलें असतां चालेल. सूर्य मालेंत आठ ग्रह आहेत त्याच प्रमाणें शनीलाही आठ उपग्रह आहेत. त्यांतील सर्वांत मोठा असलेला उपग्रह बुधापेक्षां मोठा असून मंगळा एवढा आहे! आपल्या आचार्यांनीं शनीस सूर्यपुत्र म्हटलें आहे तें यथार्थ आहे. असें कोण म्हणणार नाहीं? व ह्यावरूनच आपल्या पूर्वजांचीं वेध घेण्याचीं साधनें किती उत्तम होतीं याची पूर्ण साक्ष पटत नाहीं काय?

शनीचें सूर्यापासून अंतर ८८ कोटी मैल आहे. त्याची मध्यम गति २ कला व १ विकला आहे. दैनिक गति कधीं कधीं तीन चार, पांच सहा कला अथवा क्वचित् जास्ती सुद्धा असते तो १४० दिवस वक्री असतो व वक्री होण्यापूर्वी ५ दिवस स्थिर (स्तंभी) असतो व तितकेच दिवस पुनः मार्गी होण्याच्या वेळेस स्थिर असतो.

राशिचक्रामध्यें हा ग्रह दोन राशींचा स्वामी आहे. मकर राशि हें त्याचें रात्रीचें स्वगृह असून कुंभ हें दिवसाचें स्वगृह आहे. तूळ या शास्त्रीय राशींत तो उच्च असतो व मेष राशींत नीच असतो. कुंभ या शास्त्रीय राशींत तो मुदित असतो. तो वायुत्रयीचा (मिथुन तूळ, कुंभ) दिवसाचा अधिपति आहे.

थंडपणा, शुष्कता, औदासीन्य, वैषम्य, मृत्तिकामय, पुरुष प्रकृति अति क्लेशदायक, एकांतप्रिय, दुष्ट स्वभावाचा इ० गुणांनीं तो युक्त आहे.

कापणारा आणि गोळा करणारा, शेतकरी, पशुवृत्ति, अहंकार, सैतान गूढ जादुगार इ० दुसरीं पुष्कळ नांवें व त्याचप्रमाणें त्याचें

निरनिराळे गुण व स्वरूपवाचक शब्द आहेत. शनीचे गुप्त धर्म व होणारे परिणाम हे स्पष्ट सांगण्यास फार कठीण आहेत. कारण जातकांत तो पशुस्थितीतून मानवी स्थितींत येण्याचे वेळेची स्थिति ज्या वेळेस मानवी गुणाची जागृत अवस्था होते व जेथें सर्व बल व पशुवृत्ति ह्यांचें एकीकरण व जणूं काय स्फटिकी भवन होऊन आत्मस्वरूपीं होणारे केंद्ररूपी परिमाणूंची होणारी स्थिति तो दर्शवितो. हल्लींच्या उत्क्रांतीचे अवस्थेंत शनि प्रत्येक कुंडलींत अति महत्वाचा आहे.

शनीचा लहानपणीं ह्मणण्यासारखा परिणाम क्वचितच होतो. परंतु जन्मकुंडलींतील बलाप्रमाणें तो उत्तर वयांत जास्त अंमल चालवितो. मानसशास्त्राप्रमाणें शनीपासून येणाऱ्या नादलहरींचे प्रवाह पूर्ण चांगले अथवा पूर्ण वाईट हें आपल्या पूर्व जन्मांतील स्फटिकीभवन केलेल्या विचारशक्तीचे रूपावर बरेच अंशीं अवलंबून आहे. या ग्रहाची गति मंद असल्या कारणानें त्याचा विचार करिते वेळीं जन्मकुंडलींतील स्थान इ० गोष्टींचा पूर्ण विचार फल सांगण्यापूर्वी केला पाहिजे.

या ग्रहाचा सर्वांत मोठा मानसिक गुण ह्मटला ह्मणजे पूर्णता, उद्योग, दीर्घ प्रयत्न, कोणताही बेत विचारपूर्वक रीतीनें कल्पणें व अमलांत आणणें, काळजीपूर्वक व भक्तिपुरःसर अनुकरणानें सिद्धीस नेणें हा होय. जबाबदारी, टापटीप, नियमितपणा हे शनीचे गुण आहेत. जेव्हां हा ग्रह कोणाच्याही जन्मकुंडलींत चांगलें करण्यास बलवान् असतो त्या वेळेस मानसिक बल, शहाणपणा व सौजन्य देतो जेव्हां कुंडली गुप्त शास्त्राकडील कल दर्शवित असते त्या वेळेस मानसिक शक्ति ओतप्रोत व खोल असते. जेव्हां शनि शास्त्रीय विषयाकडे मनाचा कल दर्शवितो त्या वेळेस खरे तर्क व प्रमेये शोधून काढण्याकडे इच्छा फारच प्रबल अस्ते व काळजीपूर्वक त्या विषयाचा ध्यासंग ठेवतो.

शनि हा जड तत्वाचा मालक आहे. आपणास दिसणारी ही जड पृथ्वी नव्हे तर ज्या मूळ जडांतून ह्या सर्व दृश्य वस्तु उत्पन्न झाल्या आहेत तें होय. तो त्याचप्रमाणें प्राणरूपी आहे. तो सर्व प्रकारचे आकार अथवा रूपें उत्पन्न करणारा त्याचप्रमाणें त्याचा नाश करणाराही आहे. ह्मणून त्यास पाश्चात्य पुराणांत आपलीं स्वतःचीं मुलें भक्षक देवता ह्मटलें आहे. शनि हा सूर्याशीं युत नसल्यास शीत, निर्दय, अंधकारमय व वांझ ग्रह आहे. ह्मणून तो ह्मातारीं माणसें कवडीचुंबक व व्याजबट्टा करणारे आणि हलकट व पाजी असे लोक दर्शवितो. तो शेतकीचे व खाणीचे व्यवसाय दर्शवितो. खनिज कोटींत शनि शिशाचा दर्शक आहे व देवकोटींत तो काल देवता आहे.

शनि हा अंधकार, भीति, औदासीन्य व मृत्यु यांचा दर्शक आहे. परंतु तो आयुष्य देवताही पण आहे. पूर्ण शनीचे प्रकृतीचा मनुष्य नेहमीं काटकसरीनें वागणारा, सर्व प्रकारची नासधूस व उधळपट्टी न करणारा, आपला अंतीम हेतु साध्य करण्याकरितां काळजीपूर्वक कुरकुर केल्याखेरीज सतत उद्योग करणारा आहे. बलवान् असला ह्मणजे कल्पनाशक्ति दांडगी, तरवारीचे धारेप्रमाणें वागणारा, कडकडीत अंमल गाजवणारा, मितभाषणी, काटकसरीनें खर्च करणारा, वादविवाद करण्यांत गंभीर, परमार्थाचे कामांत उत्कंठित. प्रश्नकुंडलींत तो ज्या मनुष्याचा द्योतक असतो त्याचे वरील प्रमाणें धर्म आढळतील व जर तो जन्मकुंडलींत लग्नांत बलवान् असेल तर वरील वर्णन चांगलें लागू पडेल.

पूर्णावस्थेस न पोहोंचलेल्या शनिप्रकृतीचे माणसावर परिणाम चांगले होत नाहींत व तो मनुष्य दुःखीकष्टी होतो. शनि जर फारच पीडित असेल तर तो मनुष्य लुचेगिरीचे प्रकार करील. दुसऱ्याचे

अधिकार व कीर्त्ति बळकाविण्यांत गर्क राहील. मत्सरी, लोभी, अविश्वासी, संशयी, भितरा, नीच, अधम, पाजी, बाह्य देखावा निराळा दाखवणारा, मंद, सुस्त, दुराग्रही, स्त्रीद्वेष्टा, अनृतवादी, दुष्ट स्वभावाचा, कुरकुरणारा, सदा असंतुष्ट व चिडचिड्या स्वभावाचा मनुष्य शनि निर्बल असला ह्मणजे होतो. हा ग्रह निर्बल असला तर हातांत घेतलेल्या कामांत अपयश येतें. हीं माणसें नेहमीं आपलें कर्त्तव्यकर्म काय आहे हें विसरतात व त्या मुळें दुसऱ्यास आणि आपल्यास त्रास करून जेव्हां ते एखाद्या संकटांत सांपडतात त्या वेळेस आपल्या स्वतःचे प्रयत्नानें संकट दूर करण्याचे ऐवजीं दुसऱ्याची मनधरणी करितात. या मुळें ते गरीब, गरजवंत व कधीं कधीं उपासमारी पर्यंत जातात.

जे शनीच्या नादलहरी आपल्या आत्म्याच्या कोणत्याही अंतीम हेतु साधण्याकरितां उपयोगांत आणितात त्या वेळेस तो प्रयत्नाची दिशा जागृत करितो. संसाररूपी यात्रेकरूवर त्याचेवर असलेलें जबाबदारीचें ओझें वाढवून नाहींसें करण्यास कारणीभूत होतो. पूर्णावस्थेस पोहोंचलेला शनिप्रकृतीचा मनुष्य हा विश्वासू मित्र, सुशिल भर्त्ता व न्यायी पिता असतो. परंतु वाईट शनिप्रकृतीचा मनुष्य हा घातक वैरी, सारासार विचार न करणारीं मातापितरें, दुर्गुणी भार्या अथवा भर्त्ता असतो. शनि हा दैवाचा व कर्माचा मालक ग्रह आहे. पूर्वजन्मीं स्फाटिकीभवन झालेलीं विचाररूपकें तो दाखवितो. ह्मणून पूर्व जन्मीं केलेल्या कर्माचें विमोचन करित असतां दुःख व त्रास हा अज्ञानामुळें उत्पन्न झाला पाहिजे.

वेदांतांतील गुह्य विचाराप्रमाणें शनीचें निरीक्षण करणें फारच कठीण आहे, कारण त्यांचा अंमल सर्व ठिकाणीं आहे असें आढळून येतें. या जड पृथ्वीवरील खनिज कोटीवर या ग्रहाचा अंमल

आहे. सर्व प्रकारचे घन पदार्थ व सर्व प्रकारचे पृथ्वीचे स्थूल आकार जसें—डोंगर, धातु, खनिज वस्तु, स्फाटिक इ० सर्व शनीचे मर्यादादायक व बंधनदायक अंमलाखालीं नाहींत असें कधींही आढळणार नाहीं. त्याचप्रमाणें मानवी कोटींत तो हाडाचा सांपळा ताठपणा, कठीणपणा, वृक्षकोटींत झाडाचा बळकटपणा व स्थिरपणा, ह्यावर त्याचा अंमल आहे. मनोवृत्तीचे व्यापारांत शोक, संताप, दुःख आणि सर्व खोल व बराच वेळ राहणारे मनोविकार यांवर त्याचा अंमल आहे.

मानवी कोटींत शनि हा सर्व प्रकारचे सहनशीलतेचे व शाश्वतांचे क्रमपूर्वक प्रकार दर्शवितो. लोभीपणा, हावरेपणा, काटकसरीपणा, नामर्दपणा, शुद्धता व मर्यादितपणा आणि त्याचे सर्व प्रकारचे मनुष्यधर्म, हलक्या, नीच व कवडीचुंबकाचे पायरीपासून तों तपोनिष्ठ संन्याशाचे पवित्र आचरणापर्यंतचे धर्म आढतात.

प्रत्येक मनु व मोठे महात्मे ज्या वेळेस शनीचा अंमल जास्त असतो त्या वेळेस पृथ्वीवरील लोकांस उत्क्रांति करण्याचें कामांत मदत करण्यास अवतीर्ण होतात शनि हा प्रत्येक वस्तु व मनुष्य प्राणी पूर्णावस्थेस पोहोंचविण्याकरितां उशीर, व अडथळा करितो. शनि हा सर्व आयुष्यांतील दुर्गुण अथवा गाळ एकीकरण करण्याकरितांच एके ठिकाणीं आणितो व शुद्ध करितो प्रत्येक माणसास, प्रत्येक राष्ट्रास व जातीस शनीचे द्योतक ह्मणजे धर्म अथवा कर्तव्यकर्म होय.

कोणीही आपले कर्त्तव्यकर्माची हेळसांड करून जें कर्म शनि प्राण्यास करावयास लावतो तें अज्ञानामुळें अथवा अप्पलपोटेपणामुळें न मानतां त्याचे खडतर दैवाचे तडाक्यांतून सुटतील हें संभवत नाहीं. कायद्यानें (परमेश्वरी नियमाप्रमाणें) वागल्यानें व योग्य कर्त्तव्यकर्माची पूर्ण रीतीनें पूर्णता केल्यानें शनि हळू हळू आपल्या लेकरांस सर्वसंगपरित्याग करण्याचे मार्गास लावतो. एखाद्या कडक गुरूप्रमाणें तो आत्मसंयमन करण्यास भाग पाडितो.

या प्रमाणें तो प्रत्येक सद्गुण निरनिराळे करून जे त्याचे अंमलाखालीं येतात त्याची तो ते जणूं काय कायमची मालमत्ता करून टाकितो. कोणताही दुर्गुण, गुन्हा अथवा पाप ह्याच्यांत शनीचा स्थिरता अणणारा अंमल नाहीं असें आढळणार नाहीं. त्याच प्रमाणें कोणताही सद्गुण अथवा पूर्णत्वास पोहोंचलेला कोणताही गुण हा शनीचे कसोटीस लागल्याखेरीज अथवा त्याचे अंमलानें शुद्ध झाल्याखेरीज आहे असें आढळणार नाहीं.

गूढ शास्त्राचे अध्ययनाप्रमाणें शनि हा कर्त्तव्यकर्माचा व कर्ममार्गाचा अधिपति आहे व आपल्याला माहीतच आहे कीं मुक्ति अथवा निर्याण व सर्व बंधनांतून मुक्तता हे सर्व शनीचे अंमलाखालीं आहेत त्यांनीं आपल्या कर्त्तव्या बद्दल उलट मिळणाऱ्या फलप्राप्तीची आशा सोडल्या खेरीज शक्य दिसत नाहीं.

शरीर—बहुतेक शरीरांतील भाग शीत व रुक्ष, मध्यम बांधा शरीराचा वर्ण फिकट व काळसर अथवा चिवलाचे रंगासारखा, लहान परंतु काळे डोळे, अधोदृष्टि, रुंद कपाळ, काळे व चरचरीत केश, कान मोठे, भिवया मोठ्या, जाड ओंठ, नाक ढोबर, दाढी केश थोडे. ओबडधोबड चेहरा, खांदे मोठे व रुंद कधीं कधीं वांक पोट कांहींसें लहान व शिथिल, मांड्या आंखूड व कृश असतात. घोटे व तळपाय बेढप असून चाल गुंतत असते.

शनि हा सूर्यापासून पूर्वेट्कांत असेल तर बांधा बुटका परंतु सुबक असतो. पश्चिम षट्कांत असला तर मनुष्याचा वर्ण काळा, बांधा किरकोळ व केश थोडे असतात व त्यांत जर अक्षांश कमी असले तर शरीर फारच किरकोळ असतें. व जर त्याला अक्षांश पुष्कळ असले तर शरीर लठ्ठ व गुबगुबीत असतें अक्षांशदक्षिण असतील तर शरीर फारच मांसल असतें परंतु चाल जलद असते: जर उत्तर अक्षांश असतील तर बरेंच मांसल असून अंगावर बरेंच केश असतात.

धंदे.—जमिनीशीं, मालमत्तेशीं, खाणीशीं व कोळसे, लांकडें शेतें बाग ह्यांच्याशीं संबंध आहे असे धंदे. म्युनिसिपल अथवा स्थानिक अधिकाऱ्यांच्या हाताखालील जागा, राज्यकार्यधुरंधर, राजमंत्री, पार्लमेन्टरीयन्स अथवा उपरी नोकर, म्यानेजर्स व सुपरिंटेंडेन्स असतात. स्टॉक्स, शेअर्स यांचे सट्टे करणारे असतात. जेव्हां शनि दुर्बल असतो तेव्हां कष्टाचीं, ज्यापासून मान नाहीं असें धंदे करणारे, चांभार, रात्रीं शेतांत काम करणारे, कलहप्रिय कुंभार झाडूवाले, शिशाचे नळ बसविणारे, विटा करणारे, भडभुंजे, धुरांडीं झाडणारे, प्रेतें वाहणारे, भंगी मोतद्दार, कोळशाचे व्यापार करणारे, गाडी हांकणारे, माळी, खंदक खोदणारे, मेणबत्या करणारे, काळे कपडे रंगविणारे, धनगर, गुराखी अशा प्रकारचे धंदे करणारे असतात.

रोग.—शरीरांतील शनीचा अंमल गुढघे, पोटऱ्या, पायाच्या नळ्या, घोटे, उजवा कान, दांत साधारणपणें हाडें व सांधे, प्लीहा व पानथरी ह्यांवर आहे. शनीचे रोग थंडीपासून वाढ खुंटल्यानें जीवनशक्ति कमी असणें, संधिवात, गुढगी, मूतखडा, अशक्तता, जो ग्रह पीडा करितो त्याचे दर्शक भागांत कमीपणा, उजव्या कानासंबंधीं व दांतासंबंधीचे रोग, सर्व प्रकारचे चातुर्थिक व सरदीपासून येणारे हिवताप, रक्तपिती, क्षय अर्धांगवायु, थरथर कांपणें, निष्कारण भीति, उदररोग, हातापायाचे सांधे धरणें, सुनबहिरी, मूळव्याधीनें अतिशय रक्तस्राव व जर वृश्चिक अथवा सिंह राशींत वाईट दृष्टियोग करीत असेल तर हाडें मोडतात.

दीप्तांश.—शनीचे दीप्तांश ९ आहेत. म्हणजे त्याच्या दृष्टीचा परिणाम जेव्हां त्याकडे कोणताही ग्रह दृष्टियोग करण्यास जातो अथवा स्वतः दुसऱ्या ग्रहाशीं दृष्टियोग करण्यास जातो त्या वेळेस त्या ग्रहाचे दीप्तांश व याचे अर्धे दीप्तांशाचे अंतरावर आले असतां अथवा तितक्यांतच अंशांतून सुटून जाईपर्यंत दृष्टीचा परिणाम असतो.

वर्षे—शनीची मोठ्यांत मोठी वर्षसंख्या ४६६ वर्षे आहेत. मोठी संख्या ९७ वर्षे, मध्यम ४३॥ वर्षे व सर्वांत लहान वर्षसंख्या ३० वर्षे आहे. याचा अर्थ असा कीं, समजा आपण एखादें नवीन घर बांधलें अथवा शहर बसवलें, अथवा एखाद्या घराण्यास जहागिरी किंवा मोठा मान मिळाला तर त्या वेळीं शनि अति बलवान् असेल तर ज्योतिषी असें अनुमान काढूं शकेल कीं, तो मान, जहागिरी इ० ४९९ वर्षे पर्यंत कोणत्याही तऱ्हेची हरकत न येतां चालू राहतील. ज्ञातारीं माणसें, जुनाट वृक्ष व सर्व पुरातन पदार्थ यांचा द्योतक आहे.

शनिप्रकृतीचे मनुष्यास उजाड प्रदेश, रानें, अवघड दऱ्या, पर्वत, स्मशानभूमि, पडकी किंवा मोडकळीस आलेलीं घरें, कोळशाच्या खाणी, उकीरडे अशा प्रकारच्या जागीं राहणें व हिंडणें आवडतें.

शनि लग्नीं उदय पावत असेल अथवा अस्तास जात असेल तर जन्मलेल्या मनुष्यास खितपणीचीं दुखणीं फार काढावीं लागतात. जर दशमांत अथवा दशमाजवळ येत असेल तर नेहमीं अपकीर्त्ति व त्रास सोसावा लागतो. त्या प्राण्याचे सर्व कामाचा चुथडा होतो. अशा स्थितींत जर त्यावर दुसऱ्या एखाद्या बलवान् ग्रहाची दृष्टि ससेल तर तो मनुष्य मूर्तिमंत दुःखाचा पुतळा बनतो. जर तो चतुर्थ भावांत असेल अथवा चतुर्थ भावारंभीं असेल तर त्याचे परिणाम वरील प्रमाणेंच बाईट असतात.

प्राचीन ग्रंथकारांचें असें मत आहे कीं, बव्हेरिया, साक्सनी, सिटरिया, रोमनडीओआ, राव्हेना, कानस्टानिया, इनग्लेड स्काड या देशावर शनीचा अंमल चालतो त्याचप्रमाणें शनीचें अक्षर बारीक, बरेंच कोनयुक्त, अरुंद मनाचा कोतेपणादर्शक व ओळी नेहमीं खालील बाजूकडे झुंकत्या असतात. प्राणिकोटींत गाढवें, घुबडें, कासव,

उंदीर, मोठे बेडूक ज्यांची गति मंद आहे व जे बिळांत राहतात असे प्राणी यांचा शनि हा दर्शक आहे. वनस्पतींत ब्राह्मी, सुरू मादक वनस्पति, गांजा व भांग यांचीं झाडें, गंधक व सारे काळे दगड, शिसें, पुदिन्यासारखा किंवा मिन्यासारखा सुवास, कडवट चव व उशीरानें वाढणारीं झाडें यांवर त्याचा अंमल असतो.

नादी

'यशवंत प्रधान'

---

[२]

वि० वि.—कुंडलीविज्ञान पुस्तक ८ अंक १९ मध्यें पायावरून ताप गेलेल्या माणसांच्या कुंडल्या मागितल्या आहेत. खालील कुंडली एका मुलीची आहे, ती जशी मिळाली तशीच पाठविली आहे. चार वर्षांचे वयांत डव्या पायावरून ताप जाऊन तो अगदीं पातळ व लुला झाला आहे. व उजव्या अंगाला पाठींत कुबड निघालें आहे.

जन्म—संवत् १९४१ पौषकृष्ण १४

गुरुवार इष्ट घ० ४० प. ३९

निरयन लग्नकुंडली.



नथूराव गोखले मास्तर

---

[३]

वि० वि०—खालील कुंडली वाचक वर्गापुढें मांडून तीबद्दल कोणाचें कसें अनुमान आहे तें समजण्यासाठीं पाठवीत आहें.

जन्म—श १८०३ आश्विन व. १४ सूर्योदयापूर्वी

निरयन जन्मकुंडली.



यांस एक वडील बंधू होते ते सुमारें ३ वर्षांपूर्वी वारले. एक बहीण हयात आहे. वडील मातोश्री कोणी नाहीं. यांस विरक्ति होऊन त्यांनीं सर्वसंगपरित्याग केला आहे. अद्याप लग्न झालेलें नाहीं व पुढेंही होण्याचा संभव नाहीं. तथापि अशी विरक्ति होण्यास कोणता ग्रह कारणीभूत आहे तें कळविण्याची आपले वाचक मेहेरबानी करितील अशी आशा आहे. कळावें हे वि०

आपला

रा. शं. शालिग्राम

—इंदापूर—पुणें.

NOT TO BE ISSUED

SMT. HANSA MEHTA LIBRARY, BARODA
RARE BOOK COLLECTION
UNIVERSITY LIBRARY

NOT TO BE ISSUED

SHML
M2117

M.2117.

NOT TO BE ISSUED

7BF
1651
.K8-8

M.2117